# 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास'

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे साहित्य व ललितकला
विद्याशाखेंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


।। संशोधक ।।
श्री.वसंत यशवंत गावडे
PRN No. 13612006062

।। मार्गदर्शक ।।
डॉ. पांडुरंग भोसले

संशोधन केंद्र
श्रीबालमुकुंद लोहिया संस्कृत व भारतीयविद्या अध्ययन केंद्र, पुणे


एप्रिल
२०१९

## मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **वसंत यशवंत गावडे** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या साहित्य व ललितकला विद्याशाखेंतर्गत मराठी विषयातील **पीएच.डी. (विद्यावाचस्पती)** या पदवीसाठी सादर केलेला **'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास'** या विषयावरील शोधप्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

प्रस्तुत संशोधन स्वतंत्र आणि नवे असून ह्यापूर्वी ते कोणत्याही पदवीसाठी, कोणत्याही विद्यापीठात सादर केलेले नाही. सदर शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या **पीएच. डी.** पदवीसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

स्थळ : पुणे

दिनांक :    /    /२०१९

**मार्गदर्शक**

**डॉ. पांडुरंग भोसले**

# प्रतिज्ञापत्र

मी **वसंत यशवंत गावडे** प्रतिज्ञापूर्वक प्रमाणित करतो की, **'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास'** या विषयावरील शोधप्रबंध मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या साहित्य व ललितकला विद्याशाखेंतर्गत मराठी या विषयातील **पीएच.डी. (विद्यावाचस्पती)** पदवीसाठी सादर केलेला आहे. हे संशोधन स्वतंत्र आणि नवे असून आवश्यक तेथे संदर्भनिर्देश केलेले आहेत. यापूर्वी हा शोधप्रबंध कोणत्याही विद्यापीठात, कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे **अभ्यासक**

दिनांक : / /२०१९ **वसंत यशवंत गावडे**

# ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पीएच.डी. पदवीसाठी **''साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास''** हा प्रबंध पूर्ण करण्यासाठी व्यासंगी, कुशल आणि तेवढेच विनयशील मार्गदर्शक डॉ. पांडुरंग भोसले यांचे बहुमोल मार्गदर्शन आणि वेळोवेळी प्रेरणा तसेच प्रोत्साहन मिळाले. त्यामुळे मी माझे हे सशोधन कार्य पूर्ण करु शकलो. याबरोबरच माझ्या संशोधन कार्यासाठी ज्यांनी मला सहकार्य केले, प्रेरणा दिली, प्रोत्साहन दिले त्यांचे ऋण मानणे मी माझे कर्तव्य समजतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील डॉ. श्रीपाद भट, डॉ. कल्याण काळे, डॉ.द.दि. पुंडे यांनी वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचना संशोधनाची दिशा स्पष्ट करण्यास सहाय्यभूत ठरल्या. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (पुणे), सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (जयकर ग्रंथालय, पुणे), पुणे मराठी ग्रंथालय, शासकीय ग्रंथालय (पुणे), महाराष्ट्र साहित्य परिषद (पुणे), वाघीरे महाविद्यालय (ग्रंथालय, सासवड), बाबुरावजी घोलप महाविद्यालय (ग्रंथालय, सांगवी, पुणे) यांच्या ग्रंथालयांचे ग्रंथपाल व त्यांचे सहकारी यांनी वेळोवेळी संदर्भग्रंथ उपलब्ध करुन दिले त्या बद्दल मी त्यांचा शतशः आभारी आहे.

माझी अभ्यासाची वाढती जिज्ञासा जोपासण्यासाठी जिद्दीने माझ्या पाठीशी उभे राहणारे माझे चुलते (अण्णा), चुलती (आक्का), आई-वडील, माझी पत्नी सौ.वैशाली गावडे माझ्या लेखनाची प्रथम वाचक होती. याबरोबरच माझी मुले ऋतुजा व वेदान्त, सर्व मित्र परिवार, प्राचार्य डॉ. मनोहर चासकर, प्राचार्य डॉ.बाळकृष्ण झावरे, उपप्राचार्य डॉ.शिवाजीराव ढगे, उपप्राचार्य डॉ.लतेश निकम यांनी मला वेळोवेळी संशोधन कार्यास प्रोत्साहित केले, त्याबद्दल या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा.अजितदादा पवारसाहेब, उपाध्यक्ष मा.राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲड.संदीप कदम, खजिनदार ॲड.मोहनरावजी देशमुख, सहसचिव मा.एल.एम. पवार, सहसचिव (प्रशासन) ए.एम. जाधव या सर्वांचे सहकार्य, प्रेरणा व प्रोत्साहन

मिळाले, त्या सर्वांना मनापासून धन्यवाद! तसेच बाबुरावजी घोलप महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच माझे सहकारी प्रा.सुवर्णा खोडदे व प्रा.गणेश चौधरी यांचेही वेळोवेळी सहकार्य मिळाले, याबद्दल या सर्वांचे मनापासून आभार.

प्रबंध वेळेत व उत्तम रीतीने टंकलिखित करुन देणारे मनोज घोडके, दीपक मोरे यांचे मनःपूर्वक आभार.

**वसंत यशवंत गावडे**

# अनुक्रमणिका


| अनु. | प्रकरणांची नावे | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रकरण – एक | १–२५ |
| | संशोधनविषयाची ओळख | |
| २. | प्रकरण – दोन | २६–२८ |
| | संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा | |
| ३. | प्रकरण – तीन | २९–१४१ |
| | संशोधनाची कार्यपद्धती | |
| ४. | प्रकरण – चार | १४२–७५३ |
| | माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन | |
| | (अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे | १४२–३०१ |
| | (ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे | ३०२–३९६ |
| | (क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ | ३९७–५४३ |
| | (ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन | ५४४–७५३ |
| ५. | प्रकरण – पाच | ७५४–७७० |
| | संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारसी | |
| | उपसंहार | |
| | आधारभूत साधनग्रंथ सूची | ७७१–७७२ |

| | | |
|---|---|---|
| | **संदर्भग्रंथ सूची** | **७७३–७७७** |
| | **परिशिष्ट – कादंबऱ्यांची मुखपृष्ठे** | **७७८–७८१** |

## प्रकरण – एक

## संशोधनविषयाची ओळख

१.१. प्रास्ताविक

१.२. लेखक परिचय

- १.२.१. वि.स.खांडेकर
- १.२.२. श्री. ना. पेंडसे
- १.२.३. रणजीत देसाई
- १.२.४. गो. नी. दांडेकर
- १.२.५. व्यंकटेश माडगूळकर
- १.२.६. आनंद यादव
- १.२.७. विश्वास पाटील
- १.२.८. नामदेव कांबळे
- १.२.९. रंगनाथ पठारे
- १.२.१०. राजन गवस
- १.२.११. त्र्यं. वि. सरदेशमुख
- १.२.१२. सदानंद देशमुख
- १.२.१३. आशा बगे
- १.२.१४. श्याम मनोहर
- १.२.१५. ल.म.कडू
- १.२.१६. नवनाथ गोरे

१.३. समारोप

१.४. संदर्भसूची

## प्रकरण पहिले

## संशोधन विषयाची ओळख

**संशोधन विषय निवडण्यामागील भूमिका :**

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरीतील सर्व लेखकांनी भारतीय पातळीवर एक सर्जनशील लेखक म्हणून प्रसिद्धी मिळविली आहे. या सर्व लेखकांनी आपली प्रतिमा मराठी साहित्यविश्वात एक जाणकार साहित्यिक म्हणून निर्माण केली आहे. लोकप्रिय समाजमनाचा वेध घेणे, समाजातील कुटुंबव्यवस्था, त्यातील माणसांचे विचार, विकार, भाव-भावना, त्यांच्या आशा-आकांक्षा, वासना यांच्या अनुषंगाने समाजव्यवस्थेत वावरणारा माणूस एका व्यापक पटावर वावरत असताना तो कसा जगतो याचा वेध घेण्याच्या दृष्टीने तो कसा अधोरेखित केलेला आहे हे जाणून घेण्याच्या दृष्टीने या सर्व कादंबऱ्यांचे आकलन करून घेणे ही महत्त्वपूर्ण भूमिका येथे आहे.

तसेच या सर्व लेखकांची कादंबरी लेखनाची सखोलता, व्यापकता मला प्रत्ययाला आल्यामुळे या सर्वांच्या कादंबऱ्या समजून घेण्याचा, त्यांचे स्वरूप न्याहाळण्याचा व मूल्यांकन करण्याचा तसेच त्या लेखकांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व, जीवन दृष्टिकोन, पुरूष-स्त्री विषयक दृष्टिकोन कसा आहे हे समजून घेण्यासाठी ''साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास'' हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या निर्मितीमागील प्रेरणांचा शोध घेणे.
- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व जाणून घेणे.
- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या वाङ्मयीन योगदानाची दखल घेऊन त्यांचे सामर्थ्य आणि मर्यादा स्पष्ट करणे.
- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे अखिल भारतीय मराठी साहित्यातील महत्त्व पटवून देणे.
- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्री व पुरूष व्यक्तिचित्रणांचे अनुभवविश्व उलगडून दाखविणे.

- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन करताना भाषाशैलीच्या अंगाने मूल्यमापन करणे.
- साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील धर्म, राजकारण, समाजकारण, अर्थकारण, शिक्षण, संस्कृती, परंपरा, कुटुंबव्यवस्था या घटकांच्या संदर्भात व्यक्ती व समाजाच्या जीवनजाणिवा समजून घेणे.
- प्रस्तुत कादंबऱ्यांचे सामाजिक योगदान स्पष्ट करणे.

**गृहितके :**

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या ह्या वाङ्मय प्रकारात स्वतःचे वेगळे स्थान निश्चित करणाऱ्या आहेत.

**संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :**

मराठी साहित्यविश्वात ग्रामीण साहित्य, दलित, प्रादेशिक साहित्य, स्त्रीवादी साहित्य, आदिवासी साहित्य असे विविध प्रवाह वाहताना दिसतात. या बरोबरच ऐतिहासिक, पौराणिक, सामाजिक, राजकीय अशाही साहित्यविश्वाचा शोध घेता येईल. तथापि मराठी साहित्यविश्वात आपल्या लेखनाने एक वेगळा ठसा उमटविणाऱ्या साहित्यिकांच्या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांचे आकलन, आस्वाद व मूल्यमापनाच्या पातळीवर त्या कादंबऱ्यांचे भावविश्व उलगडून दाखविणे, त्या कादंबऱ्यांचे स्थानांकन व मर्यादा स्पष्ट करणे हीच या संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा आहे.

**१.१. प्रास्ताविक :**

कोणत्याही साहित्यकृतीचा अभ्यास करत असताना आपणास त्या त्या, लेखकाच्या वैयक्तिक जीवनाची पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. लेखकाने कलाकृतीची निर्मिती करताना त्याने केलेल्या निरीक्षणाची ती एक कलात्मक पद्धतीने केलेली मांडणी असते. लेखकाने सामाजिक जीवन जगत असताना घेतलेल्या अनुभवांची जणू ती जंत्रीच असते. साहित्याचा आणि साहित्यिकाचा वेध घेताना त्याच्यावर संस्कार करणाऱ्यांचा, त्याच्या सभोवतालच्या परिसराचा, अवतीभोवतीच्या समाजवास्तवाचा आणि त्याच्या जीवनानुभवाचा धांडोळा घ्यावा लागतो, कारण त्यातूनच त्याची जडणघडण होत असते.

आधुनिक काळातील कादंबरी या महत्त्वाच्या साहित्य प्रकाराविषयी हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''एके काळी महाकाव्याला मानवी संस्कृतीमधील असलेले स्थान आधुनिक काळात कादंबरीला प्राप्त झालेले आहे. आधुनिक काळातील तीव्र जीवन संघर्ष, जीवनाला आलेला अफाट वेग, व्यक्ती आणि समाज यांच्यामधील उत्तरोत्तर गुंतागुंतीचे होत जाणारे संबंध, विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मानवी जीवनाला प्राप्त झालेली परिमाणे या सर्व गोष्टींना आणि या सर्वांच्या संबंधातून निर्माण होणाऱ्या व्यामिश्र समग्रतेला स्पर्श करु शकणारा साहित्यप्रकार म्हणून कादंबरीला हे महत्त्व प्राप्त झालेले आहे.''[१]

लेखक हा सुद्धा एक समाजाचा महत्त्वपूर्ण घटक असतो. म्हणून लेखकाची कौटुंबिक पार्श्वभूमी, बालपण, शिक्षण, व्यवसाय, पुरस्कार आणि त्याला व्यापून टाकलेला सभोवतालचा समाज या सर्वांचा त्यांच्या साहित्यकृतीवर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रभाव पडलेला दिसतो.

**१.२. लेखक परिचय :**

**१.२.१. वि.स.खांडेकर :**

वि.स. खांडेकर यांचा जन्म ११ जानेवारी १८८९ रोजी महाराष्ट्रातील सांगलीमध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव आत्माराम रामचंद्र खांडेकर होते. वि.स.खांडेकरांच्या वडिलांचे १९११ साली निधन झाले. त्यांच्या वडिलांचे चुलतभाऊ सखाराम रामचंद्र खांडेकर यांनी त्यांना दत्तक घेतले आणि त्यानंतर विष्णू सखाराम खांडेकर या नावाने ते ओळखले जाऊ लागले. मॅट्रिकची परीक्षा खांडेकर आठव्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले होते. परीक्षेत यश लाभल्यामुळे त्यांच्या मामांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश मिळविला. परंतु परिस्थिती अभावी शिक्षण इंटरच्या वर्गातच सोडून द्यावे लागले. या काळात त्यांचा परिचय बालकवी, गणपतराव बोडस, अच्युतराव कोल्हटकर, का.र. मित्र इ. साहित्यिकांशी झाला आणि त्यांच्या लेखनाची सुरूवात याच काळात झाली. 'रमणीरत्न' हे त्यांचे पहिले नाटक त्यांनी लिहून पूर्ण केले. कॉलेज सोडल्यावर ते सावंतवाडीला आले. आपल्या बहिणीकडे राहू लागले. त्यांची ययाति (१९७४) ही ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कादंबरी आहे. त्यांच्या पुर्वायुष्यात, त्यांची नाटकामध्ये अभिनय व दिग्दर्शन करण्याची आवड होती. वि.स.खांडेकरांचे लेखन ध्येयवादी आहे. अंतःकरणात समाजकल्याणाची व प्रगतीची तळमळ आहे. लालित्यपूर्ण भाषा, रम्य कल्पना, कोटीबाजपणा व समाजहिताचा प्रचार ही त्यांच्या लघुकथेची वैशिष्ट्ये आहेत. कल्पनाशक्ती अतिशय तल्लख

असल्याने तेजस्वी लेखनातून मनोरंजन करण्याबरोबर समाजजीवनावर भाष्य करणे हे त्यांच्या लेखनाचे स्वरूप होते. खांडेकरांच्या लेखनातून माणुसकीचा गहिवर दिसून येतो. त्यांच्या लेखनातून माणसावरील अपार श्रद्धा व्यक्त होते. रूपककथा हा नवा प्रकार त्यांनी रूढ केला. त्यांनी कादंबरीसह कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा चित्रपट-कथा, नाटक, व्यक्तिचित्रे अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारात अगदी विपुल असे लेखन केले. वृत्तपत्रीय लेखन व ग्रंथसंपदा या क्षेत्रात त्यांनी ठसा उमटवला. रचनाकौशल्य व तंत्रनिपुणता खांडेकरांच्या कथेत आढळून येत नाही. पण लेखनातून व्यक्त होणारे जीवनदर्शन आणि ध्येयनिष्ठा वाचकांना प्रभावित करतात. म्हणूनच तर वि.स.खांडेकर हे जीवनवादी लेखक म्हणून ओळखले जातात. 'जीवनासाठी कला' हे त्यांच्या समग्र लेखनाचे सूत्र होते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांवर अनेक भाषांमध्ये चित्रपट, दूरदर्शन मालिकाही निर्माण झाल्या. त्यांच्या साहित्याचे अन्य भारतीय भाषा व विदेशी भाषांत अनुवाद झाले. त्यांच्या 'उल्का' या कादंबरीवर मराठी चित्रपट निघाला. इ.स.१९२० साली खांडेकरांनी महाराष्ट्रातील सिंधूदुर्ग जिल्ह्यातील शिरोडे या गावी शिक्षकी पेशास सुरूवात केली. तेथे त्यांनी १९३८ पर्यंत काम केले. ह्या काळातील मिळालेल्या फावल्या वेळात त्यांनी मराठी साहित्याच्या निरनिराळ्या प्रकारांमध्ये लेखन केले. आपल्या १६ कादंबऱ्या, ६ नाटके जवळपास २५० ललितलेख, १०० निबंध आणि कित्येक टीकाटिपण्या लिहिल्या.

**खांडेकर लिखित पुस्तके** : 'अजून येतो वास फुलांना', 'अमृतवेल', 'अविनाश', 'अश्रू आणि हास्य', 'आगरकर : व्यक्ती आणि विचार', 'उल्का' (१९३४), 'उःशाप', 'कल्पकता', 'कांचनमृग' (१९३१), 'कालची स्वप्ने', 'कालिका', 'क्रौचवध' (१९४२), 'घरटे', 'घरट्याबाहेर चंदेरी स्वप्ने', 'चांदण्यात', 'जळलेला मोहर' (१९४७), 'जीवनशिल्पी झिमझिम', 'तिसरा प्रहर', 'तुरूंगातील पत्रे भाग १, २, ३', 'ते दिवस', 'ती माणसे', 'दवबिंदू', 'दोन ध्रुव' (१९३४), 'दोन मने' (१९३८), 'धुके', 'नवा प्रातःकाल', 'पहिली लाट', 'पहिले पान', 'पहिले प्रेम' (१९४०), 'पाकळ्या', 'पांढरे ढग' (१९४९), 'पारिजात भाग १,२', 'पाषाणपूजा', 'पूजन', 'फुले आणि काटे', 'फुले आणि दगड', 'मंजिऱ्या', 'मंझधार', ' मंदाकिनी', 'मध्यरात्र', ' मृगजळातील कळ्या', 'ययाति', 'रंग आणि गंध', 'रिकामा देव्हारा' (१९३९), 'रेखा आणि रंग', 'वामन मल्हार जोशी : व्यक्ति-विचार', 'वायुलहरी', 'वासंतिका', 'विद्युत प्रकाश', 'वेचलेली फुले' (कथासंग्रह १९४८), 'समाजशिल्पी' (लेख,

संपादन सुनीलकुमार लवटे) 'समाधीवरील फुले', 'सहा भाषणे', 'सांजवात', 'साहित्यशिल्पी' (लेख, संपादन सुनिलकुमार लवटे), 'सुखाचा शोध', 'सुवर्णकण', 'सुवर्णकमळे', 'सोनेरी स्वप्ने भंगलेली'. 'स्त्री आणि पुरूष', 'हिरवळ', 'हिरवा चाफा' (१९३८), 'हृदयाची हाक' (१९३०), 'क्षितिज स्पर्श', 'लग्न पहावे करून'.

'मराठी माती', 'ज्वाला', 'देवता', 'सुखाचा शोध', 'माझं बाळ', 'लग्न पहावं करून', 'सरकारी पाहुणा' या चित्रपटांच्या कथा, संवाद आणि गीते त्यांनी लिहिली.

**पुरस्कार :** वि.स.खांडेकर हे सोलापूरला १९४१ साली भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. साहित्य अकादमी (१९६०) ययाति (कादंबरी), पद्मभूषण पुरस्कार (१९६८), ज्ञानपीठ पुरस्कार (१९७४). ययाति कादंबरीसाठी कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने त्यांना डी.लिट (डॉक्टर ऑफ लिटरेचर) बहाल केली.

**१.२.२. श्री.ना. पेंडसे :**

श्रीपाद नारायण पेंडसे हे मराठी भाषेतील एक कथालेखक व कादंबरीकार होते. मुंबईच्या बेस्ट कंपनीत सेवानिवृत्तीपर्यंत नोकरी करून या संस्थेच्या आत्मीयतेपोटी त्यांनी १९७२ मध्ये 'बेस्ट उपक्रमाची कथा' हे पुस्तकही लिहिले. श्री.ना. पेंडसे आपल्या लेखनाविषयी मत व्यक्त करतांना म्हणतात, ''माझी जन्मभूमी आणि आतापर्यंत माझ्या वाटयास आलेलं जीवन. मला कादंबरीकार बनविण्यात या दोघांचा फार मोठा वाटा आहे.''[२]

प्रारंभी आपल्या कादंबऱ्यांतून कोकणातील विश्व आणि लोकजीवन चितारणाऱ्या श्री. ना. पेंडसेंनी नंतर महानगरीय अनुभवही तितक्याच ताकदीने आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त केले. ना.सि. फडके, वि.स.खांडेकर प्रभावित मराठी कादंबरी एका आवर्तात फिरत असताना पेंडसे यांच्या कादंबरीने एक नवी वाट चोखाळली. मराठीत प्रादेशिक कादंबरीची नवी शाखा, नवी प्रवृत्ती व प्रकृती त्यांच्या कादंबऱ्यांपासून रूढ झाली. कादंबरी, कथा, नाटक, व्यक्तिचित्रण, आत्मचरित्र अशा विविध वाङ्मयप्रकारांत लेखन केलेल्या पेंडसेंची मराठी साहित्यात ओळख आहे ती कादंबरीकार म्हणूनच. श्री. ना.पेंडसे यांनी लिहिलेल्या 'गारंबीचा बापू' (१९५२), 'हत्या' (१९५४), रथचक्र (१९६२) ह्या प्रादेशिकतेच्या अंगाने प्रातिनिधिक कादंबऱ्या म्हणून त्यांचा उल्लेख करता येईल.

**श्री. ना. पेंडसे यांना मिळालेले विविध पुरस्कार :** श्री.ना.पेंडसेंना लेखनासाठी अनेक पुरस्कार मिळाले. त्यात महाराष्ट्र शासनाचे पाच पुरस्कार, 'साहित्य अकादमी पुरस्कार', महाराष्ट्र फाऊंडेशनाचा 'जीवन गौरव पुरस्कार', 'प्रियदर्शनी पुरस्कार', 'लाभसेटवार साहित्य सन्मान पुरस्कार', कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'जनस्थान पुरस्कार' हे काही उल्लेखनीय पुरस्कार नोंदविता येतील.

**१.२.३. रणजित देसाई :**

रणजित रामचंद्र देसाई यांचा जन्म ८ एप्रिल १९२८ रोजी झाला. मराठीतील एक प्रतिथयश कादंबरीकार म्हणून ते प्रसिद्ध होते. ते मुळचे कोवाड (कोल्हापूर) चे होते. त्यांनी आपल्या लेखनाला इंग्रजी शाळेत असतानाच सुरूवात केली होती. त्यांचा मृत्यू ६ मार्च १९९२ मध्ये मुंबई येथे झाला.

**रणजित देसाई यांचे साहित्य :**

**कादंबरी :** 'प्रतिक्षा', 'कार्टी' (१९५८), 'स्वामी' (१९६२), 'बारी' (१९७७), 'प्रतिक्षा प्रपात', 'पावनखिंड' (१९८१), 'लक्ष्यवेध' (१९८४), 'श्रीमानयोगी' (१९८४), 'माझा गाव' (१९८६), 'राजा रविवर्मा' (१९८६), 'राधेय' (१९८६), 'अभोगी' (१९८७), 'शेकरा', 'श्रीमानयोगी', समिक्षा' (१९७९) इ. महत्त्वपूर्ण कादंबऱ्या रणजित देसाई यांनी लिहिल्या आहेत.

**कथासंग्रह :** 'रूपमहाल' (१९५८), 'आषाढ', 'आलेख', 'कालवा', 'कणव', 'कमोदिनी', 'कातळ' (१९६५) 'कालवा', 'गंधाली' (१९७१), 'जल', 'जाणे', 'बाकुल', 'मोरा', 'मधुमती' (१९८२), 'मेखमोगरी', 'मेघा', 'मोरपंखी' 'सावल्या' (१९८४) 'वैशाख', 'संकेत' इत्यादी कथासंग्रह त्यांनी लिहिले आहेत.

**नाटक :** 'हे बंध रेशमाचे' (१९७२), 'गरूडझेप' (१९७४), 'स्वरसम्राट तानसेन' (१९७५), 'रामशास्त्री' (१९८३), 'लोकनायक' (१९८३), 'धन अपुरे' (१९८४), 'कांचनमृग' (२०००), 'पंख जाहले वैरी' (२०००), 'तुझी वाट वेगळी' (२००१), 'पांगुळगाडा (२००१), 'वारसा', 'सावली उन्हाची' (२००१) इ. नाटकांचे लेखन करून रणजित देसाई यांनी नाट्यवाङ्मयातही आपला ठसा उमटविला आहे.

**पुरस्कार :** १९६३ साली 'स्वामी' कादंबरीला ' महाराष्ट्र राज्य पुरस्कार' व 'हरी नारायण आपटे पुरस्कार' तसेच १९६४ साली 'स्वामी'ला 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळाला. लेखकाला १९७३ साली 'पद्मश्री' व १९९० साली 'महाराष्ट्र गौरव' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**१.२.४. गो.नि.दांडेकर :**

गो.नी. दांडेकर ह्यांच्या 'शितू' (१९५३), 'पडघवली (१९५५), 'माचीवरला बुधा' ह्या कादंबऱ्यांमुळे मराठी कादंबरी एका वेगळ्या उंचीवर पोहोचली. ह्या कादंबऱ्यांनी विशिष्ट प्रदेशातील प्रादेशिक जीवनाला अर्थपूर्ण स्पर्श केला. त्यातूनच मराठी कादंबरीच्या नव्या वाटचालीची दिशा निश्चित होण्यास मदत झाली. ऐतिहासिक जीवनाचा प्रामाणिकपणे वेध घेण्याचा प्रयत्न ह्या कादंबऱ्या करतात. गो.नी. दांडेकर यांच्या कादंबऱ्यांविषयी डॉ.दादा गोरे म्हणतात, ''प्रादेशिक, ऐतिहासिक आणि चरित्रात्मक कादंबरी लेखन करणारे श्री.गोपाळ नीलकंठ दांडेकर हे एक वैशिष्ट्यपूर्ण कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित आहेत. तसेच गो.नी. दांडेकरांच्या कादंबऱ्या त्यांचा जीवनाचा अविभाज्य भाग आहेत.''[३] दांडेकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीविषयी डॉ. दादा गोरे म्हणतात, ''दांडेकर हे संवदेनक्षम मन आणि सुक्ष्म अवलोकन शक्ती असलेले कलावंत आहेत. त्यांनी घेतलेले जीवनानुभव विविध पातळयांवरील आहेत. १२व्या वर्षापासून त्यांनी भोगलेले दु:ख आणि दु:खातून तावून सुलाखून निघालेले त्यांचे कलावंत मन ज्ञानेश्वर-तुकाराम यांच्या साहित्याचे आणि धर्मग्रंथांचे व वेदांचे त्यांनी केलेले अध्ययन आणि त्यातून निर्माण झालेली त्यांची वेदान्त दृष्टी गाडगेबाबांच्या सहवासाने आणि भोगलेल्या दु:खाने दु:खी जनांविषयी असलेला अपार कळवळा, त्यातून कलावंत दांडेकर यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झालेली आहे.''[४] लेखक गो.नी. दांडेकर त्यांच्या स्वत:च्या कादंबऱ्यांविषयी आपले मत व्यक्त करतांना म्हणतात, ''मी लिहिलेल्या बहुधा सर्व कादंबऱ्या ही माझी आत्मचरित्रेच आहेत. माझ्या जीवनात सहेतुक व निर्हेतुकपणे आलेली स्त्री-पुरुषे नाना नावे, रुपे धारण करुन माझ्या कादंबऱ्यांमधून वावरत असतात''[५]

**१.२.५. व्यंकटेश माडगूळकर :**

मीरा तारळेकर माडगूळकरांच्या लेखनाविषयी म्हणतात, ''शिकारीच्या निमित्ताने ते अनेक ठिकाणी भटकले. जंगला-जंगलातून त्यांनी मैलोन्मैल पायपीट केली. पशु-पक्षी जवळून बघितले. काळवीट, भेकर, लांडगे, अस्वल या प्राण्यांच्या हालचाली, त्यांचे खाणेपिणे, त्यांचा

सावधपणा, त्यांचा चाणाक्षपणा त्यांची रेखाटणी केली. अतिशय पारदर्शक अशा आपल्या मनावर उमटलेले त्यांचे ठसे, पुण्यातल्या आपल्या घरात बसून शब्दांकित केले. शिकारीच्या नादाने ते पशु-पक्षांचा इतके जवळ गेले, इतके एकरुप झाले की, स्वतःच्या अस्तित्वाचे वेगळेपणही लक्षात राहू नये. परमेश्वराने ही सृष्टी निर्माण केली, त्यानं वृक्ष, वेली, पशू, पक्षी, नदी, डोंगर अशा चेतन अचेतन गोष्टी निर्मिल्या, तसा त्याने माणूसही जन्माला घातला, ही त्यांची धारणा होती.''[६] या त्यांच्या म्हणण्यामध्ये वरीलप्रमाणे आलेली वर्णने ही योग्य आहेत. प्रतिभेची अलौकिक देणगी लाभलेले महान साहित्यिक अशा शब्दात सर्व मराठी साहित्य जगताने त्यांना गौरविले.

**कथासंग्रह :** 'माणदेशी माणसं (१९४९), 'गावाकडच्या गोष्टी' (१९५१), 'सीताराम एकनाथ' (१९५१), 'हस्ताचा पाऊस' (१९५३), 'जांभळाचे दिवस' (१९५७), 'उंबरठा' (१९६०), 'काळी आई' (१९६२), 'वारी' (१९६२), 'कांगारूचे चांगभले' (१९६२), 'रानमेवा' (१९६४), 'गावाकडील गोष्टी' (१९६५), 'बाजार (१९७७). ह्या सर्व कथासंग्रहातून त्यांनी जास्तीत जास्त ग्रामीण जीवन वास्तव पूर्णतेने उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे.

**कादंबरी :** 'पुढचं पाऊल', 'बनगरवाडी' (१९५५), 'वावटळ' (१९६४), 'सत्तांतर' (१९८२), 'करूणाष्टक' (१९८६), 'पुढचं पाऊल' (१९७८), 'कोवळे दिवस' (१९७९) ह्या महत्त्वाच्या कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले.

**नाट्यलेखन :** 'सती (१९६८), 'कुणाचा कुणास मेळ नाही' (१९६८), 'तू वेडा कुंभार' (१९६८), 'पती गेले गं काठेवाडी' (१९७०), 'बिकट वाट वहिवाट' (१९७८), 'नामा सातपुते' (१९७९) ह्या नाटयलेखनामुळे त्यांचे नाव नाटक या वाङ्मय प्रकारात घेतले जाते.

**ललित गद्यलेखन :** 'पांढऱ्यावर काळे' (१९७१), 'वाटा' (१९७७), 'नागझिरा' (१९७९), 'पारितोषिक' (१९८२), 'वाळूचा किल्ला' (दु.आ.२०००), 'अशी माणसं', 'अशी साहसं', 'जंगलातील दिवस', 'परवचा, सखा'. म.द. हातकणंगलेकर माडगूळकरांविषयी गौरवोद्गार काढतांना म्हणतात, ''ईश्वराची अलौकिक देणगी असणारे माडगूळकर एक अवतारी पुरुष होते.''

माडगुळकरांच्या बहुरंगी प्रतिभेच्या आविष्काराविषयी मीरा तारळेकर म्हणतात, ''स्वतःचे साहित्यविश्व समृद्ध करतांना आपल्या बहुरंगी प्रतिभेच्या अनेक आविष्कारांनी साहित्य

रसिकांना त्यांनी दिपवून टाकले. ते स्वतः कथालेखक, कादंबरीकार होतेच पण उत्तम चित्रकारही होते. समाजाप्रमाणे निसर्गाकडेही त्यांनी सजगतेने पाहिलं. माणूस आणि तितक्याच संवेदनशीलतेने प्राणीही त्यांनी रेखाटले. 'आपणाला मनापासून चित्रकारच व्हायचं होतं, पण प्रतिकुल परिस्थितीमुळे आपण लेखक झालो', अशी खंत त्यांनी अनेकदा बोलून दाखविली. पण त्यांच्या रेखाटनातून सतत मात्र त्यांच्यातल्या चित्रकारचे दर्शन मात्र घडत राहिले.''[७] समाजाचे व निसर्गाचे सूक्ष्म निरिक्षण आपल्या शब्दांतून व चित्ररेखाटनातून माडगूळकरांनी रसिकांना भरभरून दिलेले आहे.

''माडगूळकरांचे सारे लेखन हे एका कलंदर, आत्मलिन आणि भावनिर्भर अशा कलावंताचा आत्माविष्कार आहे. त्यांच्या वृत्तीला ध्यास आहे तो जगातील श्रेष्ठतम अशा साहित्याच्या आणि कलेच्या आस्वादाचा. निसर्गातील रंग, रुप, रस, गंधाची साद त्यांना सदैव ऐकू आली. आणि तद्रूप तंद्रीत निसर्गातील गुढ उकलित राहण्यात ते तन्मय होऊन गेले. त्याच तन्मयतेचा दृश्याविष्कार त्यांची लेखनी करीत राहिली.''[८] निसर्गातील चित्र, रूप, रंग, गंध, रस, ध्वनींचा समर्पक वापर करून माडगूळकरांनी आपल्या एकूणच लेखनीमधून समृद्ध वैश्विक पातळीवरील साहित्य निर्माण केले आहे.

**१.२.६. आनंद यादव :**

आनंद यादव यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९३५ साली कोल्हापूरजवळील कागल येथे झाला. आनंद यादवांचे लहानपण अतिशय हलाकीत गेले. साहित्याच्या क्षेत्रात त्यांनी आपला नावलौकीक मिळविला. कथा, कादंबरी, काव्य, वैचारिक व ललितलेखन, समीक्षा अशा विविध साहित्य प्रकारात त्यांनी लेखन केले. ग्रामीण साहित्य संमेलन, समरसता साहित्य संमेलन इ. संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. आनंद यादवांनी कोल्हापूर व पुणे येथून आपले उच्च शिक्षण पूर्ण केले. आकाशवाणीवर त्यांनी काही काळ नोकरी केली. पुणे विद्यापीठात प्रपाठक म्हणून नियुक्ती झाल्यावर तेथेच मराठी विभाग प्रमुख म्हणून त्यांनी काम केले व निवृत्त झाले. २७ नोव्हेंबर २०१६ रोजी त्यांचे निधन झाले.

आनंद यादव यांनी सुमारे ४० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे प्रकाशित झालेले साहित्य पुढीलप्रमाणे –

**कथासंग्रह :** ‘खळाळ’ (१९६७), ‘घरजावई’ (१९७४), ‘ माळावरची मैना’ (१९७६), ‘आदिताल’ (१९८०), ‘डवरणी’ (१९८२), ‘उखडलेली झाडे’ (१९८६)

**कादंबरी :** ‘गोतावळा’ (१९७१), ‘नटरंग’ (१९८०), ‘एकलकोंडा’ (१९८०), ‘माऊली’ (१९८५), ‘संतसूर्य ‘तुकाराम’

**आत्मचरित्रात्मक कादंबरी :** ‘झोंबी’ (१९८७), ‘नांगरणी’ (१९९०), ‘घरभिंती’ (१९९२), ‘काचवेल’

**काव्यसंग्रह :** ‘हिरवे जग’ (१९६०), ‘ मळ्याची माती’ (१९७८), ‘ मायलेकर’ (१९८१)

**व्यक्तिचित्रे :** ‘मातीखालची माती’ (१९६५)

**ललित, वैचारिक लेख संग्रह/समीक्षा ग्रंथ :** ‘स्पर्शकमळे’ (१९७८), ‘पाणभवरे’ (१९८२), ‘१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह’, ‘आत्मचरित्र मीमांसा’, ‘मराठी लघुनिबंधाचा इतिहास’, ‘ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव’, ‘ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या’, ‘ मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती’

**बालकथा :** ‘उगवती मने’ हा बालकथांचा संग्रह इ. प्रकारचे समृद्ध साहित्य लेखन आनंद यादवांनी केले.

**पुरस्कार :** आनंद यादवांना त्यांच्या ‘झोंबी’ या आत्मचरित्रात्मक कादंबरीसाठी १९९० मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

### १.२.७. विश्वास पाटील :

विश्वास पाटलांचा जन्म २८ नोव्हेंबर १९५९ साली झाला. भारतीय प्रशासकीय सेवेत ते अधिकारी आहेत. मराठीतील एक नामांकित कादंबरीकार म्हणून ते प्रसिद्ध आहेत. शालेय शिक्षण घेत असताना त्यांनी अनेक पुस्तके वाचून काढली. वाचनामुळे, कथा, वक्तृत्व, पोवाडे व लोकगीतांमुळे त्यांच्यावर कळत नकळत साहित्याचे संस्कार झाले. त्यातूनच त्यांच्यामध्ये लेखनाचे बीज पेरले गेले. विश्वास पाटील यांनी सुरूवातीच्या काळात ‘जादूच्या गोष्टी’ लिहिल्या. १९७५ साली दहावीत, शिक्षण घेत असताना, ‘तरूण भारत’ या दैनिकातील वासंतिक स्पर्धेसाठी पहिलीच ‘कायदा’ ही कथा लिहिली. त्यांची प्रकाशित झालेली हिच ती पहिली कथा होय. त्यांनी ‘मराठा’ ‘नवयुग’ या नियतकालिकांमधून विशेष लेखन केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांचे कथालेखन चालूच होते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त

'झाडाझडती' विषयी डॉ.तानाजी पाटील म्हणतात, ''विश्वास पाटील यांनी जिल्हाधिकारी म्हणून अनेक ठिकाणी काम केलेले आहे. धरणग्रस्त आणि पुनर्वसनाचा प्रश्न त्यांना हाताळावा लागला आहे. त्यावेळी हवालदिल झालेल्या धरणग्रस्तांचे प्रश्न पाहुन त्यांचे अंतःकरण हेलावून जाते. सरकारी यंत्रणा मंद गतीने चालते. त्यामध्ये राजकारण मात्र मोठया प्रमाणावर होते. त्या प्रचंड अनुभवाच्या साठयाचा उपयोग त्यांनी झाडाझडतीमध्ये केला आहे. तो अनुभव त्यांनी नेमक्या शब्दकळेमध्ये मांडला आहे. धरणग्रस्तांच्या व्यापक जीवनानुभवाला त्यांनी जीवंत केले आहे.''[९]

विश्वास पाटलांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथून एम.ए. आणि एल.एल.बी. या पदव्या संपादन केल्या. १९८२ मध्ये ते राज्य सिव्हिल सर्व्हिस परीक्षा पास होऊन 'डेप्युटी कलेक्टर' या पदावर सरकारी अधिकारी म्हणून रूजू झाले. शासकीय सेवा करत असताना वेगवेगळ्या पदांवर त्यांनी प्रशासक म्हणून कामे केली. कोल्हापूर, पुणे, सांगली, मुंबई या ठिकाणी त्यांनी सरकारी अधिकारी म्हणून प्रशासनात आपल्या कामाचा ठसा उमटविला. ग्रामीण जीवनाच्या मुशीतून तावून-सुलाखून घडलेला हा लेखक पुढे प्रशासनात ही कुशल अधिकारी म्हणून गणला गेला. पण त्यांच्यामधील लेखक त्यांना स्वस्थ बसून देत नव्हता. त्यांची प्रतिभा त्यांच्या कलाकृत्तींना आकार देत होती. त्यातूनच त्यांच्या लेखनाला अर्थ प्राप्त होत होता.

**विश्वास पाटील यांचे कथालेखन :** इ.स.१९७५ मध्ये 'तरूण भारत' या दैनिकात त्यांनी 'कायदा' ही पहिली कथा लिहिली. 'कलाल चौक' (१९८२), शेट्ये प्रकाशन, कोल्हापूर यांनी त्यांचा पहिला कथासंग्रह प्रकाशित केला. या संग्रहात ग्रामीण जीवनाचे विविधतापूर्ण दर्शन घडविले आहे. या कथा संग्रहात एकूण नऊ कथा लेखकाने मांडलेल्या आहेत.

**विश्वास पाटलांच्या कादंबऱ्या :** 'चंद्रमुखी' (२००४), 'झाडाझडती' (२०१२, १९वी आवृत्ती) राजहंस प्रकाशन, 'पांगिरा' (१९९१), 'पानिपत' (१९८८), 'महानायक' (१९९८) राजहंस प्रकाशन, 'लस्ट फॉर लालबाग' (२०१५) राजहंस प्रकाशन, 'संभाजी' (२००५), मेहता प्रकाशन, 'नॉट गॉन विथ द विंड' लेखसंग्रह, 'रणांगण', नाटक, 'चलो दिल्ली' (१९८६), राजहंस प्रकाशन, 'पांगिरा', आणि 'महानायक' या कादंबऱ्यांची हिंदी भाषांतरे झाली आहेत.

**पुरस्कार :** 'पानिपत' या कादंबरीला 'प्रियदर्शनी' पुरस्कार व गोव्याचा 'नाथमाधव' पुरस्कार मिळालेला आहे. तसेच कलकत्त्याच्या भाषा परिषदेच्या पुरस्कारांसह पस्तीसहून अधिक पुरस्कार

लाभलेले आहेत. 'झाडाझडती' या कादंबरीला इ.स.१९९२ साली 'साहित्य अकादमी पुरस्कार' मिळालेला आहे.

**१.२.८. नामदेव कांबळे :**

नामदेव चंद्रभान कांबळे यांनी दलित साहित्यात आपला एक वेगळा ठसा उमटविलेला आहे. 'राघववेळ', 'ऊनसावली', 'सांजरंग' ह्या तिनही कादंबऱ्यांमधून त्यांनी संघर्षातून शिक्षणाचा आलेख आपणासमोर मांडलेला आहे. त्यांच्या 'राघववेळ' ह्या कादंबरीला 'साहित्य अकादमीचा पुरस्कार' मिळालेला आहे.

**१.२.९. रंगनाथ पठारे :**

रंगनाथ पठारे हे एक नावाजलेले लेखक आहेत. त्यांचे शिक्षण एम.एस्सी. (भौतिकशास्त्र), एम.फील.(भौतिकशास्त्र) हे आहे. त्यांनी पुणे विद्यापीठातून १९७३ मध्ये एम.एस्सी व १९८० मध्ये पुणे विद्यापीठांतून एम.फील. ही पदवी प्राप्त केली. त्यांनी १ जून १९७३ पासून संगमनेर महाविद्यालयात व्याख्याते म्हणून नोकरी केली.

**रंगनाथ पठारे यांची साहित्य संपदा :** रंगनाथ पठारे यांनी कथा, कादंबरी, अनुवाद, वैचारिक/समीक्षा व संशोधनात्मक स्वरूपाचे लेखन करून मराठी साहित्यात मोलाची भर टाकलेली आहे.

**कथासंग्रह :** 'अनुभव विकणे आहेत' (१९८३), 'ईश्वर मृतात्म्यास शांती देवो', 'गाभ्यातील प्रकाश', 'चित्रमय चकोर', 'तीव्रकोमल दुःखाचे प्रकरण', 'शंखातला माणूस' ह्या कथासंग्रहातून आपल्या कथांचे लेखन केले आहे.

**कादंबऱ्या :** 'दिवे गेलेले दिवस', 'रथ', 'चक्रव्यूह', 'हारण', 'टोकदार सावलीचे वर्तमान', 'ताम्रपट', 'दुःखाचे श्वापद', 'नामुष्कीचे स्वगत', 'त्रिधा', 'कुंठेचा लोलक', 'भर चौकातील अरण्यसदन' ह्या त्यांच्या कादंबऱ्या मराठी साहित्यात महत्त्वपूर्ण आहेत.

**रंगनाथ पठारे यांचे वैचारिक/समीक्षा/संशोधनात्मक लेखन :** 'सत्त्वाची भाषा', 'आस्थेचे प्रश्न', 'जागतिकीकरण आणि देशीवाद', 'छत्तीसगड', 'नियोगींचे आंदोलन आणि सद्यस्थिती', 'प्रश्नांकित विशेष', लेखकाने 'कवीचे अखेरचे दिवस आणि निरागस इंदिरा' हे अनुवादात्मक लेखन केलेले आहे.

**पुरस्कार :** रंगनाथ पठारे यांना त्यांच्या लेखनाबद्दल अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. 'दिवे गेलेले दिवस' या कादंबरीला, १९८७ चा 'महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार' प्राप्त झाला. 'चक्रव्यूह' या कादंबरीला १९९० सालाचा 'प्रियदर्शनी अकादमी', मुंबई व १९९१ सालचा 'महाराष्ट्र राज्य वाङ्मय पुरस्कार' मिळाला आहे. 'टोकदार सावलीचे वर्तमान' या कादंबरीला महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा १९९२ सालचा 'ह.ना.आपटे' पुरस्कार व महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांचा १९९२ सालचा 'शंकर पाटील' पुरस्कार मिळाला आहे. 'ताम्रपट' या कादंबरीला १९९८ सालचा 'साहित्य अकादमी पुरस्कार' प्राप्त झाला आहे.

रंगनाथ पठारे यांना कथा लेखनाविषयांचे अनेक पुरस्कारप्राप्त झाले आहेत. सार्वजनिक वाचनालय, नाशिक यांचा कथालेखक म्हणून १९९१ चा 'अ.वा.वर्टी' पुरस्कार प्राप्त झाला. 'स्पष्टवक्तेपणाचे प्रयोग' ह्या १९९२ च्या कथासंग्रहासाठी परिवर्तन चळवळ औरंगाबाद यांचा १९९२ सालचा 'बी. रघुनाथ पुरस्कार', महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचा १९९३ सालचा 'नी.स. गोखले' पुरस्कार आणि १९९३ सालचा 'पद्मश्री विखे पाटील' पुरस्कार मिळालेले आहेत.

**१.२.१०. राजन गवस :**

राजन गवस यांनी १९९८ साली 'तणकट' ही कादंबरी लिहिली. त्यांच्या हया कादंबरीला सन २००१ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. 'चोंडक' (१९८५), 'भंडारभोग'(१९८९), 'धिंगाणा'(१९९२), 'कळप'(१९९७), 'तणकट' हया राजन गवस हयांच्या कादंबऱ्यांनी मराठी साहित्यातील कादंबरी विश्वात आपला वेगळाच ठसा उमटविलेला आहे. गवस यांच्या कादंबऱ्यांविषयी उषा वि. चौगुले म्हणतात, ''पश्चिम महाराष्ट्रातील एका टोकावरील गडहिंग्लज, गारगोटी या कर्नाटकाच्या सिमेलगत असणाऱ्या प्रदेशाची पार्श्वभूमी राजन गवस यांच्या जडणघडणीमागे आहे. तेथील सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाने त्यांचा पिंड घडला आहे.''[१०] आपल्या प्रदेशातील सामाजिकतेचे व सांस्कृतीकतेचे प्रतीबिंब राजन गवस यांच्या लेखनामध्ये प्रतिबिंबीत झाले आहे.

**१.२.११. त्र्यं.वि. सरदेशमुख :**

त्र्यं.वि.सरदेशमुख यांची प्रकाशित साहित्य संपदा पुढीलप्रमाणे आहे. त्यांनी 'ससेमीरा', 'बखर : एका राजाची', 'डांगोरा एका नगरीचा', आणि 'उच्छाद' या कादंबऱ्या लिहून मराठी

साहित्यात आपले वेगळेपण अधोरखीत केले आहे. या त्रयींच्या माध्यमातून १९१० ते १९६० हा कालावधी व्यापलेला आहे. वर्तमानात भूत-भविष्य लपलेले असते. तिन्ही कृती आपापल्या जागी स्वयंपूर्ण वाटाव्यात अशा प्रकारच्या आहेत. सरदेशमुखांचे समिक्षेतील योगदानही महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी 'अंधारयात्रा', 'गडकऱ्यांची संसार नाटके', 'प्रदेश साकल्याचा', 'रामदास : प्रतिमा आणि प्रबोध', 'धुके आणि शिल्प', 'शारदीय चंद्रकळा', या समिक्षात्मक लेखनातून समिक्षेतील कार्ये अधोरेखित केले आहे. 'टाहो' आणि 'थैमान' ह्या नाटकांच्या लेखनातून त्यांनी नाटक हा प्रकार हाताळलेला दिसतो. त्यांनी 'उत्तररात्र' हा कवितासंग्रह लिहून काव्याच्या प्रांतातही आपला लेखन प्रवेश केलेला दिसून येतो. एकूणच कादंबरी, समीक्षा, नाटक, कविता इ. साहित्यप्रकारात लेखकाने आपली महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे.

### १.२.१२. सदानंद देशमुख :

डॉ. सदानंद देशमुख यांचे पूर्ण नाव डॉ. सदानंद नामदेव देशमुख हे आहे. त्यांचा जन्म बुलढाणा जिल्ह्यातील अमदापूर येथे दि. ३० जुलै १९५९ रोजी झाला. त्यांचे वडील शेतकरी होते. सदानंद देशमुखांना शिक्षणाची प्रचंड आवड असल्यामुळे त्यांनी माध्यमिक शिक्षण अमर विद्यालय, चिखली या ठिकाणी केले. १९८४ साली त्यांनी पदवीचे शिक्षण पूर्ण केले. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना दिवसभर कॉलेज करून घरी आल्यावर शेतात काम करावे लागे. १९८६ साली बी.एड. ची पदवी प्राप्त केली आणि सरस्वती महाविद्यालयात शिक्षकाची नोकरी स्वीकारली. १९८९ मध्ये पीएच.डी. पदवी त्यांनी प्राप्त केली. त्यांनी 'ना. धों. महानोर यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास' यावर आपली पी.एचडी. पूर्ण केली. सदानंद देशमुख आपले लेखक होण्याचे श्रेय आईलाच देतात. त्याविषयी लेखक म्हणतात, ''माझे लेखक होण्याचे श्रेय आईला द्यावे लागेल, ती मला गोष्टी सांगायची, या गोष्टींमुळे माझी कल्पकता वाढली. मी १० वीला असतांना आई गेली.... त्याच कारण अतिश्रम हेच होतं. आई गेल्यामुळे माझं आयुष्यचं बदलून गेलं. सर्वकाही उजाड उजाड वाटू लागलं. म्हणजे एखाद्या घराच्या सावलीत बसलेलं असावं आणि ते झाडचं उन्मळून पडावं तसं झालं. सदानंद देशमुखांना डोक्यावरची सावली हरवणं म्हणजे काय? ते त्यांना त्यांची आई गेल्यानंतर कळलं आहे. आणि म्हणून कल्पकता वाढवणाऱ्या व अल्पवयात जाणाऱ्या आईलाच 'लेखक' होण्याचं श्रेय त्यांनी

दिलं आहे.''[११] आईचे संस्कार, कष्ट आपल्या आयुष्यातून आईचे अकाली निघून जाणे यामुळेच सदानंद देशमुख लेखक झाले ही प्रामाणिक कबुली ते देतात हे वरील गोष्टींवरून लक्षात येते.

थोडक्यात सदानंद देशमुखांचे साहित्य हे दर्जेदार असून त्यामध्ये उपजतच नैसर्गिकता आलेली मला वाटते. बी.ए. करीत असतानाच त्यांचा विवाह सौ. विनिता यांच्या बरोबर झाला. त्यांनी अकरावी मध्ये असतानाच 'खेळखंडोबा' हे नाटक लिहून त्यात अभिनय केला. त्यांना लहानपणापासूनच लेखनाची प्रचंड आवड होती. १९७८ मध्ये 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये 'देवाघरचे मरण' ही त्यांची पहिली कथा छापून आली. महाविद्यालयीन जीवनामध्ये अनेक लेखकांचे वाचन त्यांनी केले. त्यांनी 'आनंद यादव', 'सखा कलाल', 'ना.धो. महानोर', 'भालचंद्र नेमाडे', 'जयवंत दळवी' इत्यादी साहित्यिकांच्या साहित्याने त्यांना लेखक म्हणून एक वाङ्मयीन दृष्टी दिली. त्यांनी 'अंधारबन' हा कथासंग्रह लिहिला, 'तहान' ही कादंबरी त्यांची विशेष गाजली. त्यांना अनेक प्रकारचे पुरस्कार मिळाले आणि त्यांच्यातील लेखकाला प्रेरणा मिळू लागली.

**साहित्य संपदा :** 'देवाघरचे मरण' ही त्यांची कथा विशेष गाजली. आपल्या कथांमधून ग्रामीण माणसे, प्राणी, पशू-पक्षी, निसर्ग याविषयीची असलेली आपली आत्मीयता लेखकाने प्रकट केली आहे.

**कथासंग्रह :** 'अंधारबन' (१९८८) हा यांचा विशेष गाजलेला कथासंग्रह होय. 'उठावबन' (१९९४), 'महालूट' (१९९५), 'रगडा' (२००६) हे कथासंग्रह विशेष नोंद घेण्यासारखे आहेत. 'गाबूळगाभा' हा कथासंग्रह जागतिकीकरणातील मोडकळीस आलेल्या शेतकरी जीवनाचे नेमकेपणाचे चित्रण करणारा ठरला.

**कादंबरी :** 'तहान' (१९९८), 'बारोमास' (२००२) ह्या दोन्ही कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण प्रादेशिक कादंबरी विश्वात मानाचे स्थान मिळविले.

**कवितासंग्रह व ललितलेख :** 'गावकळा' (२००५), 'भुईरिंगणी' (२००८) हे ललित लेखसंग्रह लिहिले. अशा प्रकारे एक आत्मचिंतनशील शेतीव्यवसायाशी निगडीत कथा, कादंबऱ्या, कविता, ललित गद्य इत्यादी वाङ्मयीन प्रकार लेखकाने हाताळलेले आहेत.

डॉ.शैलेश त्रिभूवन सदानंद देशमुखांच्या लेखनाविषयी म्हणतात, ''लेखनातून प्रदुषित मन साधण्याचा यशस्वी प्रयत्न झाला पाहिजे असे त्यांना वाटते. किंबहूना ते साहित्यातूनच होऊ

शकते अशी त्यांना खात्री आहे.''[१२] पुढे त्यांच्या कथात्मक साहित्याविषयी डॉ. शैलेश त्रिभूवन म्हणतात, ''कारण त्यांच्या अनुभवविश्वाला कथेचा घाट देण्याचे उत्तम सामर्थ्य त्यांच्यात आहे. आणि म्हणून एक प्रकारची सहजता त्यांच्या लेखनात दिसून येते. ते कुठेही अभिनिवेश धारण करीत नाहीत किंवा कृत्रिम अशी भावूकता आणित नाहीत. अत्यंत तटस्थतेने निष्कारण शब्दांचा सोस न करता ते निवेदन करतात. आटोपशीर मांडणी हे त्यांच्या कथेचे आणखी एक वैशिष्टय सांगता येईल आणि म्हणूनच शेतकऱ्यांच्या वेदनेला साहित्य अकादमीने केलेला सलाम, मी सदानंद देशमुखांच्या एकुण साहित्य निर्मितीला केलेला सलाम आहे, असे मानतो.''[१३] सदानंद देशमुखांच्या लेखनाला अनुभवविश्वाचा, वास्तवतेचा, नैसर्गिकतेचा ठेवा लाभलेला आहे असे मला वाटते.

**पुरस्कार :** 'बारोमास' या कादंबरीला २००४ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

**१.२.१३. आशा बगे :**

आशा बगे यांचे बालपण नागपूर येथे गेले. त्यांचे वडील वकील होते. आशा बगे या मराठी भाषेत लिहिणाऱ्या भारतीय कादंबरीकार व लेखिका आहेत. आशाताईंना संगीताची खूप आवड आहे. संगीतावर त्यांनी अनेकदा लिहिलेही आहे. त्यांच्या लेखनातसुद्धा संगीताचा संदर्भ हमखास येतोच. त्यांचे आयुष्य मोठ्या व एकत्रित कुटुंबात गेले. त्याहीमुळे असेल, पण अशा कुटुंबात होणारी स्त्रियांची घुसमट अनेक कथांमधून त्यांनी समर्थपणे मांडली. आशा बगे यांचे मराठी साहित्य व संगीतात पद्व्युत्तर शिक्षण झाले आहे. नोकरी न करता घर संसार सांभाळून त्यांनी लेखनाचा छंद जोपासला. आशा बगे यांच्या लेखनाची सुरुवात 'सत्यकथे'पासून झाली. मौजचे श्री.पु.भागवत व राम पटवर्धन यांनी मग आशा बगेंच्या लेखनशैलीला आकार दिला. नंतर मौज व बगे असे समीकरण जुळून गेले. मौजच्या दिवाळी अंकात नेमाने लेखन करणाऱ्या आशा बगे यांचा २०१८ सालापर्यंतचा प्रकाशित ग्रंथसंभार १३ लघुकथासंग्रह, सात कादंबऱ्या, ललितलेखांची पुस्तके असा व्यापक आहे.

आशा बगे यांच्या लेखनामध्ये प्रामुख्याने स्त्रियांची मानसिक आंदोलने प्रतीत होतात. पारंपरिकतेची नाळ न तोडताही आधुनिक विचारसरणीला सामोरे जाता येते तसेच मानवी भावभावनांची बंधने जोडणे किंवा तुटणे अशा प्रकारची लेखनवैशिष्टये त्यांच्या लेखनात आढळतात. स्वत:च्या लेखनाविषयी आशा बगे म्हणतात, ''मला माझ्या लेखनाच्या संदर्भात

माणूस महत्वाचा वाटतो. माणसाच्या मनाला डोकावून बघतांना थक्क व्हायला होतं.''[१४] माणसांच्या अंतर्मनाचा ठाव व स्पंदने आशा बगे यांच्या लेखनात आढळतात. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांविषयी दत्ता घोलप म्हणतात, ''आशा बगे मात्र स्त्री असणे आणि माणूस असणे, या भावनातून विविध नातेसंबंधातील स्त्रीचा अवकाश सांस्कृतिकदृष्टया कसा घडतो वा बिघडत जातो, असा शोध फक्त स्त्रीवादी चाकोरी न लावता आधुनिकता व भारतीय परंपरा या तारतम्यातून घेतात. आशा बगे यांच्या कादंबऱ्यांचे हे वैशिष्टय आहे.''[१५] आशा बगे यांनी भारतीय परंपरेत स्त्रीचे स्थान व सांस्कृतिकदृष्ट्या तिच्या भावभावनांचा शोध आधुनिक काळात घेण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

आशा बगे यांनी १६ मार्च २०१८ ते १३ एप्रिल २०१८ रोजी पहिले ''विदर्भ साहित्य संघाने पहिल्यांदा लेखिका संमेलन घेतले तेंव्हा त्यांनी अगदी आनंदाने अध्यक्षपद स्वीकारले. अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारण्यास त्यांनी नेहमीच नकार दिला. 'लेखन व संगीत हीच माझी साधना आहे, त्यात रमू द्या.' असे त्या नकार देताना नम्रपणे सांगतात.

उषा वि. चौगुले अशा बगेंच्या लेखनाच्या विशेष संदर्भात म्हणतात, ''स्वयंपूर्ण शैली, कौटुंबिक जीवनाचे सूक्ष्म चित्रण, अनुभवातील उत्कटतेचे प्रकटन, चिंतनशील वृत्तीचे आणि श्रद्धाशीलतेचे आविष्करण हे आशा बगे यांच्या लेखनाचे ठळक विशेष आहेत.''[१६] ''मध्यमवर्गीय संस्कृतीची जोपासना करणाऱ्या नागपूरसारख्या शहरात जीवन व्यतीत झालेल्या बगे लेखनासाठी जे विषय निवडतात ते तिथल्या कौटुंबिक वातावरणाशी निगडीत असतात. त्यांच्या कादंबऱ्यांत येणाऱ्या स्त्रिया स्त्रीत्वाच्या मर्यादा ओलांडत नाहीत. व्यक्तिस्वातंत्र्याच्या नावाखाली आपल्या कौटुंबिक-सामाजिक जबाबदाऱ्यांकडे पाठ फिरवित नाहीत. याचा अर्थ, त्या स्त्रिया दुबळया किंवा बावळट नाहीत. आत्मभान असलेल्या, स्वत:च्या मूल्यांची प्राणपणाने जपणूक करणाऱ्या, आदर्श जोपासणाऱ्या कणखर स्त्रिया आहेत. केवळ कथेतच स्त्रीचित्रण करताना नव्हे तर एकुणच लेखनातील 'व्यक्तिशोधा'ची बगे यांची स्वतंत्र रीत आहे.''[१७]

**कथासंग्रह :** 'अनंत', 'ऋतूवेगळे', 'चंदन', 'जलसागर', 'निसटलेले', 'पाऊल वाटेवरचे गाव', 'पिंपळपान' भाग-१,२,३ सहलेखक-शं.ना.नवरे, हमीद दलवाई पूजा 'भूमी' 'भूमिला आणि उत्सव' (कथासंग्रह), 'मारवा', 'दर्पण' (कथासंग्रह), 'ऑर्गन' (कथासंग्रह)

**कादंबरी :** 'प्रतिद्वंद्वी' (कादंबरी) 'भूमी' (कादंबरी) 'मुद्रा' (कादंबरी) 'श्रावणसरी', 'सेतू' (कादंबरी),

**संपादन :** 'वाटा आणि मुक्काम' (अनुभव कथनःसहलेखक-भारत सासणे, मिलिंद बोकिल, सानिया) 'वामन चोरघडे यांच्या निवडक कथा भाग-१,२' (संपादित)

**इतर साहित्य :** 'अनुवाद' (माहितीपर), 'चक्रवर्ती' (धार्मिक) 'त्रिदल' (ललित) 'धर्मक्षेत्रे', 'कुरुक्षेत्रे' (ललितकथा)

**पुरस्कार :** आशा बगे यांचा 'मारवा' हा कथासंग्रह विशेष प्रसिद्ध आहे. तर 'भूमी' व 'त्रिदल' या कादंबऱ्यांना अनेक सन्मान मिळाले आहेत. 'भूमी'ला २००७ चा 'साहित्य अकादमीचा पुरस्कार' मिळाला. यात त्यांनी प्रथमच एका तमिळ मुलीचे भावविश्व रेखाटले आहे. 'दर्पण' हा त्यांचा गाजलेला कथासंग्रह या पुस्तकासाठी 'केशवराव कोठावळे' पुरस्कार त्यांना मिळाला. २०१२ चा 'मालतीबाई दांडेकर पुरस्कार', २०१८ : राम शेवाळकर यांच्या नावाचा (पहिला) 'साहित्यव्रती पुरस्कार'.

**१.२.१४. श्याम मनोहर :**

श्याम मनोहर या टोपन नावाने श्याम मनोहर आफळे यांनी लेखन केले आहे. श्याम मनोहरांचा जन्म २७ फेब्रुवारी १९४१ मध्ये भिकार, ता. तासगाव, जि. सांगली येथे झाला. श्याम मनोहरांच्या लेखनात सकारात्मकता व नकारात्मकता यांचा संयोग झालेला दिसून येतो. उल्टा-सुल्टा विचार करणारा लेखक म्हणून वाचक वर्गात ते प्रसिद्ध आहेत. श्याम मनोहर यांचे वडील मनोहर आफळे हे मूळचे सातारा जिल्ह्यातील क्षेत्र माहुलीचे रहिवासी असून ते प्राथमिक शिक्षक होते. माहुली गावात आफळ्यांचे राहते घर आहे. श्याम मनोहर हे पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून विज्ञानाचे प्राध्यापक म्हणून २००१ साली निवृत्त झाले. मराठी साहित्य क्षेत्रातील महत्वाचे व प्रसिद्ध लेखक म्हणून श्याम मनोहर यांच्याकडे साहित्य वर्तुळात पाहिले जाते. त्यांच्या कथा, कादंबरी नाटक व ललित साहित्य प्रकारांचा अभ्यास करणे म्हणजे एक धनुष्यबाण पेलण्यासारखे आहे. १९८० नंतरच्या साहित्य क्षेत्रात श्याम मनोहर यांचे कथा कादंबरी आणि नाटक या प्रमुख प्रकारांतील त्यांचे स्थान मोलाचे आहे. डॉ.शशिकला कांबळे मनोहरांच्या साहित्याच्या द्रव्याविषयी म्हणतात, ''१९६० नंतरच्या समाज आणि त्या समाजातील मूल्यांमध्ये भाषिक, राजकीय कारणामुळे झालेली परिवर्तने श्याम मनोहर यांच्या लेखनात

आढळतात. अशा अर्थाने ते समकालीन सामाजिक वास्तव हेच त्यांच्या साहित्याचे द्रव्य आहे.''[१८] स्वातंत्र्योत्तर कालखंडात समाजातील बदलत्या मूल्यांचा समकालीन, सामाजिक वास्तवाच्या पातळीवरून वेध घेण्याचे महत्त्वपूर्ण काम मनोहरांच्या लेखनाने केले आहे.

**शैक्षणिक कारकीर्द** : शाम मनोहर यांचे प्राथमिक शिक्षण लिंबा, अंगापूर आणि तासगाव, सातारा या ठिकाणी झाले. तसेच त्यांचे माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश स्कूल, सातारा येथे झाले. ते सायन्स महाविद्यालय, कराड येथून १९६४ साली बी.एस्सी उत्तीर्ण झाले तर एम.एस्सी १९६७ साली पुणे विद्यापिठातून उत्तीर्ण झाले. त्यांनी डॉ. दातार कॉलेज, चिपळूण, ज्ञानप्रबोधिनी हायस्कूल, पुणे व सर परशुरामभाऊ महाविद्यालय, पुणे येथे अध्यापन केले. आपल्या सगळ्याच लेखनातून त्यांनी वेगळ्याच धाटणीची लेखनशैली साकार केलेली दिसून येते. कथा, कादंबरी व नाटक ह्या साहित्यप्रकारांमधून प्रचलित असलेल्या व प्रस्थापित झालेल्या लेखनशैलीला श्याम मनोहर यांनी छेद दिली.

**साहित्यसंपदा** : 'कॉंपिटिशन' ही त्यांची पहिली कथा आहे. श्याम मनोहर यांनी आठ लघुकथासंग्रह, आठ नाटके १ इतर अनेक विषयांवर लेखन केले आहे. तसेच त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे गुजराती, उर्दू, हिंदी, सिंधी, कन्नड आणि इंग्रजी इ. भाषामध्ये अनुवाद झाले आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्या, पुस्तके महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी सुचविण्यात आली आहेत.

**कथासंग्रह** : 'दोन्ही : आणि बाकीचे सगळे', 'बिन मौजेच्या गोष्टी' (१९८०), 'प्रेम आणि खूप खूप नंतर' हे त्यांचे कथासंग्रह आहेत.

**कादंबरी** : 'शीतयुद्ध सदानंद' (१९८७), 'कळ' (१९९६), 'हे ईश्वरराव हे पुरूषोत्तमराव' (१९८३), 'खूप लोक आहेत' (२००२), 'उत्सुकतेने मी झोपलो' (२००६), 'खेकसत म्हणते आय लव्ह यू' (२०१०), 'शंभर मी' (२०१२) ह्या त्यांच्या कादंबरी लेखकाने कादंबरी क्षेत्रात वेगळाच प्रयोग केला आहे.

**नाटके** : 'ह्रदय' (१९८५), 'यकृत' (१९८७), 'यळकोट' (१९९३), 'प्रेमाची गोष्ट' (१९९८), 'दर्शन' (२००४), 'प्रियांका आणि दोन चोर', 'सन्मान हाऊस' ही त्यांची गाजलेली नाटके आहेत.

**श्याम मनोहर यांच्या पुस्तकांचे इतर भाषेत झालेले अनुवाद :** 'बहुत लोग है' (हिंदी), 'हे इश्वरराव हे पुरूषोत्तमराव' (कन्नड), 'यकृत' (कन्नड, मल्याळम, तेलगू, तामीळ), 'शीतयुद्ध सदानंद' (कन्नड, मल्याळम, तेलगू, तामीळ), 'श्याम मनोहर कथेगळू' (कन्नड) ह्या अनुवादांमुळे त्यांचे साहित्य अनेक भाषांमध्ये गेले आहे.

**श्याम मनोहर यांच्याविषयीचे लेख व पुस्तके :** 'श्याम मनोहर : मौखिक आणि लिखिते' : संपादक चंद्रकांत पाटील, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती २०१५. 'लिमिटेड माणुसकी आणि अनलिमिटेड शहाणपण', 'समीक्षेचा अंतःस्वर' या पुस्तकातील एक लेख – देवानंद सोनटक्के, पद्मगंधा प्रकाशन, पुणे–२०१०. 'श्याम मनोहरांच्या साहित्यातील जाणिवांचा शोध : एक अभ्यास' या विषयावर डॉ. जिजा शिंदे यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे.

**पुरस्कार :** उत्कृष्ट कथालेखनाचा 'कराड पुरस्कार' (१९८२), 'राष्ट्रीय पुरस्कार' (२०१५) (कन्नड कवी कुप्पळळी वेंकटप्पा पुट्टप्पा यांच्या स्मरणार्थ), 'कुसुमांजली साहित्य सन्मान', दिल्ली (२०१५), 'गंगाधर गाडगीळ पुरस्कार' – कादंबरी लेखन (१९९४), सर्वोत्तम नाट्य लेखनासाठी 'नाट्यदर्पण पुरस्कार' (१९८३, १९८६, १९९४), महाराष्ट्र सरकारकडून 'राम गणेश गडकरी पुरस्कार' (१९९८), 'उत्सुकतेने मी झोपलो' साठी 'साहित्य अकादमी पुरस्कार' (२००८), कादंबरी लेखनासाठी 'ह.ना.आपटे पुरस्कार' (१९८३) इ. पुरस्कारांनी लेखक सन्मानित झालेले आहेत.

### १.२.१५. ल.म.कडू :

ल.म.कडू हे बालसाहित्य लिहिणारे लेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी बालसाहित्यावर सुमारे तीस पुस्तके लिहिली आहेत. ल.म.कडू प्रकाशक म्हणूनही सर्वांना परिचित आहेत. त्यांनी इ.स.१९७७ च्या सुमारास 'गमभन' ही प्रकाशन संस्था सुरू केली. लेखक, चित्रकार आणि प्रकाशक असा प्रतिभेचा त्रिवेणी संगम त्यांच्यामध्ये आहे. 'झाड' (लहान मुलांसाठी द्विभाषिक पुस्तक), 'जॉर्ज कार्व्हर' (चरित्र), 'रावीचा मोर' (बालसाहित्य), 'खारीच्या वाटा' (कादंबरी).

ल.म. कडू हे मूलतः चित्रकार आहेत. निसर्गाच्या उत्पत्ती क्रमाचे वर्णन करणारे 'झाड' हे त्यांचे महत्वपूर्ण पुस्तक आहे. 'आपल्या नथा', 'गलोलची करामत', 'आपले वृक्ष', 'महाराष्ट्रातील साप', 'मुलांचे बापू', 'कुत्र्याचे जातभाई', 'रेडक्रॉस', 'मनीचे डोळे' ही त्यांची

उल्लेखनिय पुस्तके आहेत. लीलावती भागवत बालसाहित्याविषयी म्हणतात, ''झाडे-माडे, पशु-पक्षी, नद्या, तलाव, झरे, धबधबे, वारा, धूर या सर्वांचा समावेश 'पर्यावरण' या एका शब्दात येतो. अर्थातच या विषयावरची निसर्गातल्या सर्व गोष्टीसंबंधीची पुस्तके मुलांना वाचायला मिळाली पाहिजे. निसर्गावर प्रेम करायला शिकवतील अशी ती पुस्तके हवी.''[१९] लीलावती भागवत यांच्या ह्या स्वरुपाच्या साहित्याकडून असलेल्या अपेक्षा चिंतनीय आहेत. त्या पुढे म्हणतात, ''ल.म. कडू सारखे लेखक त्या पूर्ण करतायेत, ही समाधानाची बाब आहे.''[२०] हया विचारातून ल.म. कडू यांच्या लेखनाचे बालसाहित्यातील योगदान महत्त्वपूर्ण असलेले दिसते.

१९९० नंतर जागतिकीकरणाचे वारे वाहू लागले, त्याचे प्रतिबिंब बालकादंबरीतही पडले. 'खारीच्या वाटा' हया कादंबरीविषयी प्रा.स्मिता लोणारी म्हणतात, ''दृक्-श्राव्य कादंबरी असे तिचे स्वरुप आहे. मुलांना वाचनातून आनंद देणं, त्याचबरोबर त्यांच्या संकल्पनांच्या कक्षा रुंदावत नेणं, त्यांच्यातील सुप्तशक्ती व सर्जनशीलतेला वाव देणं या कसोटयांवर उतरणाऱ्या कादंबऱ्या या कालावधीमध्ये आढळतात.''[२१] कादंबरीतील नायक 'मी' अर्थात लेखक व दिनू यांच्या सुप्त व सर्जनशीलतेला मुक्तपणे वाव 'खारीच्या वाटा' या कादंबरीतून मिळालेला दिसून येतो.

**१.२.१६. नवनाथ गोरे :**

नवनाथ गोरे हे मुळचे सांगली जिल्ह्यातल्या उमदी (जत तालुका) येथील आहेत. त्यांचे महाविद्यालयीन शिक्षण उमदी येथे झाले असून त्यांनी शिवाजी विद्यापीठातून एम.ए.(मराठी) केले आहे. नवनाथ गोरे हे तरुण मराठी लेखक आहेत. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी बुद्रुक हे त्यांचे गाव आहे. प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत त्यांनी एम.ए.बी.एड.(मराठी) पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले आहे. सध्या ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात प्रा.डॉ.रणधीर शिंदे यांच्या बृहत संशोधन प्रकल्पाचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. नवनाथ गोरे पुरस्कार जाहीर झाल्यानंतर फेसाटी विषयी म्हणतात, ''पशुपालक समाजातील माझ्यासारख्या अनेक तरुणांना शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करावा लागला. या संघर्षातून प्रेरणा घेवून मी 'फेसाटी' कादंबरी लिहिली. त्यातून वंचित जगाच्या वेदना मांडल्या आहेत. 'सुंबरान' या पारंपरिक आख्यानातून हे कथन केले. जत तालुक्याची बोलीभाषा अत्यंत समर्थपणे वापरली. पशुपालक समाजाचा वर्तमान भोवताली केंद्र करुन हे वेगळया पातळीवरचे जीवन चितारले

आहे.''[२२] नवनाथ गोरे यांच्या 'फेसाटी' या कादंबरीला २०१८ सालचा युवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला आहे. नवनाथ गोरे या पुरस्काराविषयी म्हणतात, ''साहित्य अकादमीने 'फेसाटी' कादंबरीची दखल घेतल्याने आनंद झाला. यानिमित्ताने खेड्यापाड्यांचे, दुष्काळी भागाचे व शेतकरी वर्गाचे जीवन साहित्यातून मांडता आले. त्याची दखल राष्ट्रीय पातळीवर घेतली गेल्याने आणखी प्रोत्साहन मिळाले आहे.''[२३]

**'फेसाटी' या कादंबरीस मिळालेले पुरस्कार :** 'मनोरमा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार', मनोरमा साहित्य मंडळी, सोलापूर. सृजन साहित्य साहित्य संघ, द्वारा 'सृजनप्रतिभा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार', मुर्तिजापूर. यशवंतराव दाते स्मृती संस्था, द्वारा 'बाबा पद्मनजी साहित्य पुरस्कार', वर्धा. 'स्व. सुदाम सावरकर स्मृती वाङ्मय पुरस्कार', अमरावती. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, 'श्रीमती रुक्मिणीबाई जाधव स्मृती नवउन्मेष साहित्य पुरस्कार', मंगळवेढा. करवीर साहित्य परिषद 'विशेष साहित्य पुरस्कार', कोल्हापूर. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी राज्यस्तरीय पुरस्कार', लातूर. 'अक्षरज्योत पब्लिकेशन्स् राज्यस्तरीय पुरस्कार', पंढरपूर. दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषद, 'विशेष कादंबरी पुरस्कार', कोल्हापूर. 'राजर्षी शाहू साहित्य गौरव पुरस्कार', थेरगांव, 'कोल्हापूर, उदयोन्मुख लेखन पुरस्कार', एस.एस. कॉलेज, उमदी. आपटे वाचन मंदिर, द्वारा 'वि.मा. शेळके (गुरुजी) साहित्य पुरस्कार', इचलकरंजी.

'फेसाटी' या कादंबरीला यापूर्वी मनोरमा साहित्य परिषदेचा स.रा. मोरे ग्रंथालयाचा 'विशेष पुरस्कार' मिळाला आहे. 'फेसाटी' ही कादंबरी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाच्या नवलेखक अनुदान कोषातून प्रसिद्ध झाली.

**१.३. समारोप :**

'संशोधन विषयाची ओळख' ह्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषय निवडण्यामागील भूमिका, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके तसेच प्रस्तुत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांचे व्यक्तिमत्व आणि वाङ्मयीन जडणघडण यामध्ये कादंबऱ्यांच्या लेखकांचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, विविध साहित्य प्रकारांमध्ये त्यांनी केलेले लेखन आणि त्यासाठी त्यांना मिळालेले पुरस्कार याविषयी माहिती वजा शोध घेण्यात आलेला आहे. तसेच संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा स्पष्ट केलेली आहे.

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्याच्या लेखकांचे व्यक्तिमत्व आणि वाङ्मयीन जडणघडण' ह्या भागात वि.स. खांडेकर, श्री.ना. पेंडसे, रणजित देसाई, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश मांडगूळकर, आनंद यादव, विश्वास पाटील, नामदेव कांबळे, रंगनाथ पठारे, राजन गवस, त्र्यं.वि. सरदेशमुख, सदानंद देशमुख, आशा बगे, श्याम मनोहर, ल.म. कडू, नवनाथ गोरे हया लेखकांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय करुन देण्यात आला आहे. सदर ओळख ही परिचयात्मक असून प्रस्तुत लेखकांचे व्यक्तिमत्व कसे घडले, याचा थोडक्यात उहापोह केलेला आहे. त्यामध्ये प्रथमत: जन्म व कुटुंब यांची माहिती देऊन शिक्षण व नोकरी विषयीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत लेखकांची वाङ्मयीन जडणघडण पाहतांना त्यांनी कोणकोणत्या साहित्य प्रकारांमध्ये लेखन केले आहे, त्याचा विचार करुन साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान निश्चितच अधोरेखित होणारे आहे, हे स्पष्ट केलेले आहे. प्रस्तुत लेखक हे विविध साहित्य प्रकार हाताळतात, हे येथे मांडण्यात आले आहे. तसेच त्यांच्या ह्या वाङ्मयीन सेवेसाठी त्यांना देण्यात आलेल्या विविध प्रकारच्या पुरस्कारांची माहिती नमुद केलेली आहे.

आनंद यादवांनी 'झोंबी–नांगरणी–घरभिंती', नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ–उनसावली–सांजरंग', त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी 'बखर एका राजाची–डांगोरा एका नगरीचा–उच्छाद' अनुक्रमे लिहून एक प्रकारे आपल्या सदर कादंबऱ्यांची कथानकाच्या अंगाने वाचकांची उत्कंठा वाढविण्यासाठी व जिज्ञासा जपण्यासाठी लेखकांनी उत्सुकता निर्माण केलेली दिसते.

**१.४ संदर्भ :**

१. थोरात हरिश्चंद्र, *'कादंबरी : एक साहित्य प्रकार'*, प्र.आ., मुंबई, ऑगस्ट २०१०, पृ.३.

२. पेंडसे श्री.ना., *'रथचक्र'*, दु.आ., प्रस्तावना, पृ.१४.

३. गोरे दादा, *'गो.नी. दांडेकरांची कादंबरी'*, मनोगत, गोदा प्रकाशन, दु.आ., २४ नोव्हे.२०१०, पृ.७.

४. तत्रैव, पृ.११२, ११३.

५. तत्रैव, पृ.११३.

६. तारळेकर मीरा, *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, साहित्य अकादमी प्रकाशन, २०१०, पृ.५.

७. तत्रैव, पृ.१.

८. तत्रैव, पृ.४.

९. पाटील (डॉ.) तानाजी राऊ, *'मराठी कादंबरी समीक्षा'*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ५ फेब्रु. २००९, पृ.८४, ८५.

१०. चौघुले उषा वि., *'साहित्याची आस्वादरूपे'*, प्रतिमा प्रकाशन, प्रथमा आवृत्ती, १५ ऑगस्ट २०११, पृ.१४६.

११. *'चित्रलेखा'*, जाने.२००५, पृ.६.

१२. *'सक्षम समीक्षा'*, ऑक्टो-नोव्हें.-डिसें.२०१२, पृ.२९.

१३. तत्रैव, पृ.२९.

१४. बगे आशा, *'आमचे झपाटलेले मोसमी घर'*, ललित दिवाळी अंक, १९८५, पृ.८०

१५. घोलप दत्ता, *'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार'*, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्र.आ., जुलै २०१८, पृ.३२.

१६. चौघुले उषा वि., *'साहित्याची आस्वाद रुपे'*, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, १५ ऑगस्ट २०११, पृ.३७.

१७. तत्रैव, पृ. १४७.

१८. कांबळे शशिकला, प्रास्ताविक- *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, स्नेहवर्धन प्रकाशन, प्र.आ., २६ जाने.२०११, पुणे-३०, पृ.९

१९. *'बालसाहित्य'*, पुस्तक तिसरे, बालसाहित्यः कविता, नाटक व चरित्र, य.च.म.मु. विद्यापीठ, प्रथम प्रकाशन, जून २००२, पृ.९९.

२०. तत्रैव, पृ.९९

२१. *'सक्षम समीक्षा'*, पृ.२९, एप्रिल-मे-जून, २०१६, पृ.७८

२२. *'लोकमत'*, शब्दधन दि. २३ जून २०१८, पृ.८

२३. तत्रैव, पृ.८.

*****

## प्रकरण – दोन

## संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा

''वि.वा. शिरवाडकर : एक चिकित्सक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पुंडे द.दि. यांनी डॉ.भिमराव कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९८० मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या संशोधनामध्ये शिरवाडकरांच्या एकूण साहित्याचा अभ्यास करताना 'ययाति व देवयानी' या नाटकाचाही अभ्यास केलेला दिसून येतो.

''मराठीतील ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबरी : तुलनात्मक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून कुलकर्णी सुधाकर प्रल्हाद यांनी डॉ.लीला गोविलकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९८७ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये तुलनात्मक अभ्यास करताना ऐतिहासिक व चरित्रात्मक कादंबरीची परंपरा व या परंपरांमध्ये असलेला भेद तसेच व्यक्तिनिष्ठता व वस्तुनिष्ठता उदाहरणातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

''रणजित देसाई यांच्या साहित्याचा अभ्यास (कथा–कादंबरी)'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून खांडगे भास्कर धोंडिबा यांनी डॉ.कन्हैय्या कुंदप यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९९४ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या विषयातून रणजित देसाई यांच्या कथा–कादंबऱ्यांचा विविध पातळीवरुन अभ्यास केला आहे.

''मराठी साहित्यातील आत्मचरित्रात्मक कादंबरी'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून फटांगरे सरला विठ्ठलराव यांनी डॉ.अ.वा. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००२ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या विषयात संशोधन करताना मराठी साहित्यातील आत्मचरित्रात्मक कादंबरीची संकल्पना, इतिहास व परंपरा याशिवाय काही मोजक्या कादंबऱ्यांचा अभ्यास केलेला आहे.

''साहित्यिक रंगनाथ पठारे'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून खाडे जयराम पांडुरंग यांनी डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००३ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या विषयात रंगनाथ पठारे यांच्या एकूण साहित्याचा अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये त्यांचे कथासंग्रह, कादंबऱ्या व वैचारिक समीक्षा लेखनाचा आढावा घेतला आहे.

''श्याम मनोहर यांचे साहित्य : एक चिकित्सक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून प्रा.कांबळे शशिकला यांनी डॉ.मृणालिनी शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००३ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या विषयाचा अभ्यास करताना कथासंग्रह, कादंबरी, नाटके यांचा अभ्यास करुन प्रयोगशील लेखक म्हणून असलेले त्यांचे स्थान अधोरेखित केलेले आहे. मध्यमवर्गीय शहरी जीवनाचे वास्तवरुप मनोहरांनी मांडलेले आहे, हे कांबळे यांनी आपल्या संशोधनामधून मांडलेले आहे.

''साठोत्तरी मराठी कादंबरीः एक चिकित्सक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून निफाडे भास्कर विनायक यांनी डॉ.तानाजी राऊ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००५ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. या प्रस्तुत संशोधनात १९६० नंतरच्या मराठी कादंबरीतील विविध प्रवाह तसेच ग्रामीण व दलित या कादंबरी वाङ्मयप्रकाराचे स्थान अधोरेखित केलेले आहे.

''राजन गवस यांच्या साहित्याचा चिकित्सक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून बाळाजी घारूळे यांनी डॉ.रमेश आवलगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००६ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. यात ग्रामीण, दलित, उपेक्षित समाजातील वास्तवतेचा वेध संशोधकाने घेतला आहे.

''मराठीतील साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांतील स्त्री व्यक्तिरेखा'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून प्रा.श्रीमती सुरेखा हरि जाधव यांनी प्रा.डॉ.वेदश्री थिगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१५ मध्ये पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये 'ययाति', 'रथचक्र', 'स्वामी', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'ताम्रपट', 'तणकट', 'डांगोरा एका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी', 'उत्सुकतेने मी झोपलो' ह्या कादंबऱ्यांमधील स्त्रियांच्या विविध वृत्ती-प्रवृत्तींचे कष्टाळू, जिद्दी, त्यागी तसेच विविध स्वभावधर्माचे, कुटुंबातील व समाजातील स्थानाचे महत्त्व यांचे अवलोकन केलेले आहे.

''साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या : एक वाङ्मयीन अवलोकन (१९६०-२००७)''या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून प्रा.गणपत काशिबा हराळे यांनी डॉ.भास्कर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली सन २०१५ मध्ये पीएच.डी. प्राप्त केली आहे. यामध्ये २००७ पर्यंतच्या साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन अवलोकन करुन त्यांचे वैश्विक पातळीवरील असलेले स्थान अधोरेखित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

''रथचक्र व धग – तुलनात्मक अभ्यास'' या विषयावर नाटे स्मिता शरद यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून डॉ.सु.रा. चुनेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९९२ मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. यात 'रथचक्र आणि धग' या कादंबऱ्यांमधील परंपरा, मानवी मूल्ये, तसेच मानवी भावभावनांचा व पात्रचित्रणातील साम्यभेद तुलनात्मकदृष्ट्या विविध पातळ्यांवर स्पष्ट केला आहे.

''आनंद यादव यांच्या 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती'मधील स्त्री–व्यक्तिरेखा'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून उपाध्ये बाबूराव दत्तू यांनी डॉ.र.बा. मंचरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन १९९६ मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये स्त्री व्यक्तिरेखा मांडताना तीनही कादंबऱ्या आत्मचरित्रात्मक स्वरुपाच्या असल्यामुळे स्त्री पात्रांची भूमिका अधोरेखित केलेली आहे.

''तणकट : एक अभ्यास'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून थोरात शरद नागनाथ यांनी डॉ.आनंद घाटुगडे यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००३ मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये गावगाड्यातील विविध घटकांचा एकमेकांशी असलेला अनुबंध मांडलेला दिसून येतो.

''झाडाझडती : एक आकलन'' या विषयावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून झिंजाडे बाळासाहेब तुकाराम यांनी डॉ.अविनाश आवलगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सन २००६ मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. यामध्ये धरणग्रस्तांच्या व्यथा–वेदना मांडलेल्या आहेत.

## प्रकरण–तीन

## संशोधनाची कार्यपद्धती

३.१. संशोधनाची कार्यपद्धती

३.२. आशयविश्व

- ३.२.१. ययाति
- ३.२.२. रथचक्र
- ३.२.३. स्वामी
- ३.२.४. स्मरणगाथा
- ३.२.५. सत्तांतर
- ३.२.६. झोंबी
- ३.२.७. झाडाझडती
- ३.२.८. राघववेळ
- ३.२.९. ताम्रपट
- ३.२.१०. तणकट
- ३.२.११. डांगोरा एका नगरीचा
- ३.२.१२. बारोमास
- ३.२.१३. भूमी
- ३.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो
- ३.२.१५. खारीच्या वाटा
- ३.२.१६ फेसाटी

३.३. समारोप

३.४. संदर्भ आणि टीपा

### ३.१ संशोधनाची कार्यपद्धती :

प्रत्येक क्षेत्रातील संशोधनासाठी काही ठराविक संशोधन पद्धती अवलंबिल्या जातात. परंतु साहित्याचे संशोधन करीत असताना एकच एक संशोधन पद्धती न अवलंबविता संशोधन विषय, त्याचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेऊन या पद्धती अवलंबिल्या जातात. आस्वादक समीक्षा पद्धतीचा वापर या संशोधनामध्ये अधिक प्रमाणात करण्यात आलेला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील कौटुंबिक व सामाजिक जीवन समजावून घेण्यासाठी प्रामुख्याने चरित्रात्मक, मानसशास्त्रीय, समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीचे आवश्यकतेनुसार उपयोजन केले जाईल. प्रस्तुत संशोधनासाठी मी ग्रंथालयीन पद्धती व प्रामुख्याने विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. प्रामुख्याने ग्रंथालयीन साधनांचा वापर करून प्रस्तुत विषयांचे संशोधन करण्यात आलेले आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्या या संशोधनासाठी येथे विचारात घेतल्या आहेत.

### ३.२. आशयविश्व :

कादंबरीसारख्या कथानकप्रधान वाङ्मयप्रकारात जीवनानुभव प्रसंग, कृती–उक्ती यातूनच व्यक्त होतात ते व्यक्ती, कथानकात भाग घेणाऱ्या व्यक्तींमुळे आणि त्यांच्या स्वभाव विशेषांमुळे कथानकातील घटनासिद्ध होतात. व्यक्तिरेखा आणि कथानक परस्परानुवर्ती असावे. व्यक्तीस्वभावातून प्रसंग निर्माण व्हावेत आणि प्रसंगातून व्यक्तिस्वभावाचे दर्शन घडावे, ही कोणत्याही चांगल्या ललित कृतीकडून अपेक्षा केली जाते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त या सर्वच कादंबऱ्या आधुनिक काळातील महत्त्वपूर्ण अशा आहेत. कोणत्याही वाङ्मयप्रकारापेक्षा कादंबरी हा सर्वात अधिक सर्वसमावेशक वाङ्मयप्रकार आहे. साठोत्तर कालखंडात ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, प्रयोगशील कादंबरी, विज्ञान कादंबरी, संज्ञाप्रवाही कादंबरी, वास्तववादी कादंबरी, महानगरीय कादंबरी इत्यादी कादंबरी प्रवाह अधिकाधिक समृद्ध झाले. खरं तर प्रत्येक कादंबरी ही एक स्वतंत्र कलाकृती ठरते. कादंबरीच्या सर्वसमावेशकता ह्या गुणामुळे तिच्यात इतर वाङ्मय प्रकारांचा समावेश आढळतो. प्रभा गणोरकर आशयसूत्राविषयी म्हणतात, ''एखादी स्थूल अथवा व्यापक विचारप्रणाली, कल्पना अथवा संकल्पना, अनुभूती किंवा तत्व म्हणजेच साहित्यकृतींचे आशयसूत्र ते साहित्यकृतीतील सर्व घटकांना, तपशीलांना जोडणारे असते.''[१]

कथा, कविता, नाटक, व्यक्तिचित्रे, आत्मचित्रे, प्रसंगाचित्रे, भावचित्रे या सर्वांचा समावेश कादंबरीत पहायला मिळतो. स्थूलमानाने विषय सारखा वाटत असला तरी मांडण्याची पद्धत, भाषा, रचना वेगळी असते. वातावरण वैशिष्टयपूर्ण असते. म्हणजेच कादंबरीत विषय वैविधता असते. असे असूनही कादंबरीचे वेगळेपण कायम असते. कथाबीजानुसार आशयविश्व मार्गक्रमण करते या विषयी चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''कादंबरीचे कथासूत्र तिच्या कथाबीजात अंतर्भूत नसलेल्या बाहय घटकांशी तडजोड करीत किंवा कथानिवेदकाच्या मर्जीप्रमाणे हवे तसे बाक आणि वळणे घेत जन्माला येऊ शकत नाही. कादंबरीच्या कथाबीजाची प्रकृती एकदा निश्चित झाल्यावर सेंद्रिय एकात्मतेच्या तत्त्वानुसारच त्याचा विकास होत असतो.''[२]

आधुनिक काळातील या महत्त्वाच्या साहित्यप्रकाराविषयी हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''आपल्या विशाल भाषिक अवकाशाच्या आणि सर्वसमावेशक वृत्तीच्या साहाय्याने आधुनिक मानवी जीवनाच्या सतत रंग बदलणारा आकारहीन पसारा कवेत घेण्याची कुवत कादंबरी याच साहित्य प्रकारामध्ये आहे.''[३] वरील विवेचनावरुन आधुनिक काळात कादंबरी या साहित्य प्रकाराला असणारे अनन्यसाधारण महत्त्व स्पष्ट होते.

**३.२.१. ययाति :**

ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा या तीन पात्रांच्या आत्मनिवेदनातून ययातिचे कथानक उभे राहते. ययाति ही हस्तिनापूरच्या सम्राट नहुषाच्या दुसऱ्या पुत्राच्या कथेवर आधारलेली पौराणिक कादंबरी आहे. पुराणातील ययातिचा कादंबरीसाठी वापर करतांना वि. स. खांडेकरांनी तो आजच्या भोगलंपट, संशयशुन्य मानवाचा प्रतिनिधी असा प्रतिकरुपाने उभा केलेला आहे. भोगाची विफलता दाखविणे हाच कादंबरीचा मुख्य उद्देश आहे. 'ययाति' हा हस्तिनापूरचे सम्राट नहुष महाराजांचा सुपुत्र होता. ययातिने शंभर अश्वमेध करावेत असे त्याला वाटत होते. त्यांच्या पुर्वजांपैकी पुरुरवा महाराजांनी उर्वशीसारख्या अप्सरेला आपल्या भजनी लावले. तसेच नहुष महाराजांनी स्वतः देवांचा पराभव करुन इंद्रपदावर आरुढ होण्याचा मान मिळविला. ययातिने आपल्या पूर्वजांप्रमाणे पराक्रमी वीर व्हावे असे त्याच्या वडिलांना वाटत होते. ययाति सहा वर्षाचा असतांना त्याला कळले की त्याला त्याच्या आईने स्वतःचे दूध पाजले नाही तर कलिका या दासीच्या दुधावर ययाति मोठा झाला. स्वतःचे सौंदर्य नष्ट होईल हा आईचा स्वार्थी हेतू होता. आईच्या या वृत्तीने ययातिच्या मातृप्रेमाला तडा गेला. ययातिने विचार केला. ''आईसुद्धा

इतकी स्वार्थी असते? छे! आईचे माझ्यावर प्रेम नाही. तिचे प्रेम आहे स्वतःच्या सौंदर्यावर!''(पृ.८) ययातिचा मोठा भाऊ यति हा ययातिच्या जन्मापूर्वीच घर सोडून गेला हे ययातिला त्याच्या आईकडूनच समजले. यतिच्या जाण्याने आई दुःखी होती म्हणून कधीना कधी यतिला शोधून काढण्याचा निश्चय ययातिने केला. ययाति धनुर्विद्या, मल्लविद्या, अश्वारोहन व युद्धकलेत तरबेज बनला. नगरदेवतेच्या वार्षिक उत्सवात अश्वरोहणाच्या साहसी प्रकारात सहभागी होतो. पाचव्या फेरीच्या मोहाच्या एका क्षणामुळे ययातिची घोडयावरची मांड ढिली होते. ययातिला घोड्याने हवेतच भिरकावले होते. त्याच्या त्या अपघातात अलका नावाच्या दासीने त्याची सुश्रुषा केली. आठ दिवसांनी शुद्धीवर आल्यावर ययातिला अलकेचा मोह झाला. त्या मोहाच्या क्षणी त्याने तिची लक्ष चुंबने घेतली.

ययातिला आपले शौर्य प्रकट करायचे होते म्हणून त्याने 'अश्वमेध' यज्ञ केला. अश्वमेधासाठी तो आर्यावर्तात भ्रमण करताना, मृगया करताना त्याचा बाण यतीला लागला. दोघांमध्ये झालेल्या संवादामुळे त्यांना आपण भावंडे असल्याचे ज्ञात झाले. ययाति म्हणतो, ''यतिची भेट हे माझ्या आयुष्यातले एक भयंकर स्वप्न होते. अलकेचे चुंबन हे माझ्या जीवनातले एक सुंदर होते.''(पृ.४७) देव-दानवांचे युद्ध होण्याचा संभव निर्माण झाला. ते युद्ध होऊ नये म्हणून अंगिरस ऋषींनी शांती यज्ञाचा संकल्प सोडला. या यज्ञातला प्रमुख ऋत्विज कच होता. कच हा बृहस्पतींचा मुलगा व अंगिरसाचा आवडता शिष्य. शांतीयज्ञाला दानवांकडून बाधा येऊ नये म्हणून अंगिरसांनी ययातिला पाचारण केले. त्यासमयी ययाति व कच यांच्यात तात्विक संवाद झाला.

परमेश्वराने मानवाला शरीर दिल आहे. हे सर्व गोष्टींच्या उपभोगासाठीच पण तो उपभोग कसा घ्यावा याचाच उपदेश कचाने केला. ''केवळ उपभोग म्हणजे जीवन नव्हे. देवानं माणसाला शरीराप्रमाणं आत्माही दिला आहे. शरीराच्या प्रत्येक वासनेला या आत्म्याचं बंधन हवं. म्हणून माणसाचा आत्मा सदैव जागृत असायला हवा!''(पृ.५६) या कचाला बृहस्पतीसारखे पिता आणि अंगिरसासारखे गुरु मिळाले हे कचाचे भाग्यच समजावे लागेल.

ययातिचे वडील नहुष महाराज आजारी असल्याचा निरोप घेऊन दूत आश्रमात आला. आपल्या पित्याला कुणी शाप दिला होता का? अशी विचारणा ययातिने केली. तेव्हा सर्वच शापित आहोत. वेगवेगळया कारणांमुळे माणसाला दुःखाला सामोरे जावेच लागते. माणसाचे जीवन शापच आहे असे ययातिने विचारल्यावर अंगिरस ऋषी त्याला म्हणाले, ''छे! छे! जीवन

हा एक दिव्य वर आहे. तो अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे, एवढचं!''(पृ.५९) पुढे ऋषी म्हणाले, ''शरीरसुख हा काही मानवी जीवनाच मुख्य निकष नाही तो निकष आहे आत्म्याचं समाधान!''(पृ.५९) कच आणि अंगिरस यांच्या महान उपदेशाचे पियुष प्राषन करुन ययाति हस्तिनापुरात परततो. नहुष महाराज मृत्युशय्येवर होते. त्यांच्या वेदना ययातिला पाहवणार नाहीत म्हणून अश्वमेध व शांतियज्ञ यामुळे आलेला थकवा घालविण्यासाठी महाराणीच्या परवानगीने ययातिची रवानगी अशोक वाटिकेत करण्यात आली. बाबाची मृत्यशय्येवरही जीवनाची आसक्ती, सुख उपभोगण्याची आसक्ती पाहून ययाति व्यथित होतो. ''मरण हाच जीवनाचा शेवट असेल, तर तर जगात मनुष्य जन्माला येतो तरी कशाला?''(पृ.६३) कच व अंगिरसाच्या उपदेशाचा ययातिवर परिणाम झाला नाही हे त्याच्या वरील प्रश्नावरुन सिद्ध होते. दुःखात असतानाही ययातिने मुकुलिकेबरोबर प्रणयक्रिडा केल्या. तिचा उपभोग घेतला.

दरम्यानच्या काळात कचाने ययातिला पत्र पाठविले देव दानवांच्या युद्धात दानवांचा विजय होणार कारण दैत्यगुरु शुक्राचार्य यांनी संजीवनी विद्या संपादन केल्यामुळे देवांनी मारलेल्या राक्षसांना शुक्राचार्य जीवंत करीत होते. अगस्त्य ऋषींनी शाप दिला होता, नहुषाची मुले कधीही सुखी होणार नाहीत व बाबांच्या मृत्युसमयीची जीवनाची आसक्ती यामुळे ययाति दुःख सागरात बुडाला. 'इंद्राला चळाचळा कापविणारा वीर अशी बाबांची कीर्ती त्रिभुवनात दुमदुमत होती; पण आज त्यांना हात हलविणे सुद्धा कठीण झाले आहे.'(पृ.८८) यामुळे ययाति व्यथित होत होता. ययाति अशोक वाटिकेत मुकुलिकेला भेटायला गेला होता आणि नेमके त्यावेळी बाबा गेल्याचा निरोप घेऊन मंदार आला. बाबाच्या म्हणजे नहुष महाराजांच्या मृत्युने ययाति दुःखी तर आई मात्र थोडयाच कालावधीत जीवनरसाची गोडी नव्याने चाखत आहे असे वाटू लागले म्हणजेच 'ज्याचे यौवनपुष्प नुकतेच उमलु लागले होते, तो ययाति म्हाताऱ्यासारखा निष्क्रिय आणि निरस झाला होता; आणि जिचे जीवनपुष्प कोमेजू लागले होते ती त्याची आई एखाद्या तरुणीप्रमाणे प्रत्येक गोष्टीत मनःपूर्वक रस घेत होती. नव्या नव्या स्वप्नात आणि संकल्पांत गढून जात होती.'(पृ.९५)

नहुष महाराजांच्या मृत्युनंतर ययातिला अंगिरस ऋषींचे सांत्वनपत्र आले त्या पत्रात ऋषीने कचाच्या मृत्युचा उल्लेख केला. राक्षसांनी कचाचा वध केला व त्याच्या देहाचे तुकडे तुकडे केले. ययाति या वार्तेने दुःखी झाला. थोडयाच दिवसात त्याने आर्यवर्तात यतिला शोधायला जाण्याचा निर्णय घेतला. आर्यावर्तात कर्मधर्म संयोगाने अचानक त्याला अलका

भेटली. अलकाने तिची करुण कहाणी ययातिजवळ कथन केली. तिच्या नवऱ्याने तिला जुगारात पणाला लावली. जिंकणाऱ्या व्यक्तीच्या तावडीतून ती निसटली. ययातिच्या मनात अलकेविषयी प्रेम निर्माण झाले पण ते बहिणीचे प्रेम होते. ययाति अलकेला म्हणाला, ''तू माझी बहीण आहेस! तुझ्या आईचं दूध मी प्यालो आहे.''(पृ.११०) ययाति अलकाला आर्यवर्तातून हस्तिनापूरला घेऊन आला. मंदारने महाराणीचे कान भरले. त्यामुळे महाराणीने अलकेला विषाचा प्याला दिला व अंधाऱ्या खोलीत बंद केले. देव-दैत्यांचे युद्ध थांबले. कचाला संजीवनी विद्या मिळाली. देव पक्षातले सैनिक जिवंत होऊ लागले त्यामुळे दैत्यांनी युद्ध थांबविले.

भाग दुसऱ्यामध्ये देवयानीचे आत्मनिवेदन लेखकाने मांडले आहे. देवयानी दैत्यगुरु शुक्राचार्यांची मुलगी होती. कचावर तिचे प्रेम होते. पण कचाने तिचे प्रेम झिडकारले. वृषपर्वा महाराजांनी देवयानीच्या सांगण्यावरून कचाला शिक्षा करण्यास सांगितले. खरी प्रेयसी प्रियकराला सदैव आपल्या प्रेमाच्या बंधनात ठेवण्याचाच प्रयत्न करेल त्याप्रमाणे देवयानीने कचाला ''एकदा, केवळ एकदा, माझं चुंबन घे!''(पृ.१२२) असे विनविले. 'चुंबन घेतल्यावर तू मुक्त होशील' असेही सांगितले पण मरणाच्या दारात असलेल्या कचाने साफ नकार दिला. कचाने देवयानीला सांगितले, राक्षसांनी त्याला मारुन, जाळून  त्याच्या हाडांची पूड मद्यात घालून ती दारु शुक्राचार्यांना पाजली. त्यामुळे त्याच्या हृदयाच्या मर्मस्थानी त्याला प्रवेश मिळाला. जगात दुसऱ्या कुणाला ठाऊक नसलेला संजिवनी मंत्र त्याने तिथे आत्मसात केला पण यामुळे कच तुझा भाऊ झाला. संतापलेल्या देवयानीने मुल आईच्या पोटात वाढतात. बापाच्या नाही त्यामुळे मी तुझी बहीण नाही तर प्रेयसी आहे, असे कथन केले.

शर्मिष्ठा ही वृषपर्वा महाराजांची कन्या होती. त्याच्याच दरबारात असलेल्या शुक्राचार्यांची मुलगी देवयानी ह्या दोघी मैत्रिणी होत्या. एकदा त्या जलक्रिडेला गेल्या. त्या जलक्रिडेत शर्मिष्ठा जिंकली याचा देवयानीला राग आला होता. शर्मिष्ठेने चुकुन देवयानीचे वस्त्र नेसले, त्या वस्त्रावरुन दोघींमध्ये भांडण झाले. तेव्हा शर्मिष्ठेने देवयानीला हिनविले, ''वृषपर्वा महाराजांच्या पदरी असलेल्या एका भिक्षूकाची मुलगी आहेस तू''(पृ.१३२) शर्मिष्ठा देवयानीला अपशब्द वापरु लागली त्यामुळे क्रोधाने लाल झालेली देवयानी मिळेल. त्या वाटेने पळत सुटली. शर्मिष्ठा व तिच्या दासी देवयानीमागे पळत होत्या. देवयानी लता-तृणांनी आच्छादलेल्या विहिरीच्या काठावर आली. शर्मिष्ठाही तिथे पोहचली. दोघी एकमेकींशी तिथेही भांडत होत्या. देवयानी शर्मिष्ठेने नेसलेले वस्त्र ओढत असताना तिचा तोल गेला व ती विहिरीत

पडली. शर्मिष्ठा व तिच्या मैत्रिणी निघून गेल्या. देवयानी विहिरीतून वाचवा म्हणून याचना करीत होती व नेमका त्यावेळी ययाति तेथे आला. ययातिने बाणांचा कमळासारखा एक पाळणा बनविला व देवयानी त्यात उभी राहून वर आली. ययातिला हस्तिनापूरची महाराणी होण्याची गळ घातली. दोघेही शुक्राचार्यांकडे गेले. देवयानीने घडलेली सर्व घटना आपले पिता शुक्राचार्य आणि वृषपर्वा महाराजांना कथन केली. शर्मिष्ठेने केलेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी देवयानीने शर्मिष्ठेला दासी होण्यास सांगितले. देवयानी म्हणाली, ''शर्मिष्ठेनं माझी दासी झालं पाहिजे! या हस्तिनापूरच्या महाराणीची दासी झालं पाहिजे! दासी म्हणून जन्मभर माझी सेवा करायला आत्ताच्या आता माझ्याबरोबर हस्तिनापूरला आलं पाहिजे.''(पृ.१४१) देवयानीचे वडील संजीवनीसाठी तपश्चर्या करीत बसलेले होते. संजीवनीच्या साहाय्याने दानव देवांवर विजय मिळवणार म्हणून देवयानीला कधीही दुखवायचे नाही हे शर्मिष्ठेला वडिलांचे म्हणजे वृषपर्वा महाराजांचे धोरण होते. आणि म्हणून वृषपर्वा महाराजांनी शर्मिष्ठेच्या समजूत घालण्यासाठी घरातल्या घरात शर्मिष्ठेला पत्र लिहिले. वडिलांनी घातलेली समजूत शर्मिष्ठेला मान्य होण्यासारखी नव्हती. 'प्राण गेला तरी मी दासी होणार नाही! स्वप्नातसुद्धा मी देवयानीची दासी होणार नाही!'(पृ.१४७) शर्मिष्ठेला या प्रसंगाला तोंड दयावे लागले. ते कचाने देवयानीला जे वस्त्र दिले होते ते शर्मिष्ठेने परिधान केले म्हणून त्यावस्त्रामुळे शर्मिष्ठेला कचाची आठवण झाली. कचाचे देवयानीवर व देवयानीचे कचावर प्रेम होते. कचाला लाखो स्वकीयांच्या कल्याणासाठी देवयानीचे मन दुखवावे लागले. कचाने देवयानीजवळ मत व्यक्त केले की, ''जीवनात प्रेम ही एक उच्च भावना आहे, पण कर्तव्य ही तिच्यापेक्षाही श्रेष्ठ भावना आहे! कर्तव्याला कठोर व्हावं लागतं पण कर्तव्य हाच धर्माचा मुख्य आधार आहे.''(पृ.१५०) कचाचा हा विचार शर्मिष्ठेचे मतपरिवर्तन होण्यास सहाय्यभूत ठरला. शर्मिष्ठा ही आपल्या दानव कुलाच्या उद्धारासाठी देवयानीची दासी होऊन हस्तिनापूरला जायला राजी झाली. वृषपर्वा महाराजांना देवयानीचे वडील शुक्राचार्य यांचा क्रोध ओढवून घेणे मान्य नव्हते.

शर्मिष्ठा देवयानीबरोबर तिची दासी बनून हस्तिनापूरला गेली. देवयानीने तिला तिच्या मधुचंद्राच्या रात्री पानाचे विडे तबकात घेऊन महालाबाहेर उभे केले. ययाति मद्य सेवन करुन महालात गेल्यामुळे ययाति आणि देवयानी यांच्यात वाद झाला. देवयानी रागाने महालाबाहेर आली. ययाति आणि देवयानीचे वैवाहिक जीवन सुखाचे नव्हते. 'आपल्या कवचातून कामापुरते डोके वर काढणाऱ्या प्राण्यासारखी ती वागे.'(पृ.१८०) अशाप्रकारचे देवयानीचे वागणे होते.

हस्तिनापूरचा राजा म्हणून तिने ययाति बरोबर लग्न केले होते. तिचे प्रेम राजवैभवावर होते. तिला हस्तिनापूरची महाराणी म्हणून मिरवायचे होते. 'ययाति हे तिच्या इच्छापूर्तीचे एक साधन होते.'(पृ.१८२)

दरम्यानच्या काळात उत्तरेकडच्या सीमेवर दस्यूंचा त्रास अधिक वाढला. त्यांच्यावर दबाव निर्माण करण्यासाठी युद्धावर जाण्याचा ययातिने निर्णय घेतला. ययातिला स्वारीवर जायचे होते. औक्षणाची सारी सिद्धता झाली आणि नेमके त्याचवेळी देवयानीच्या वडिलांचे म्हणजे शुक्राचार्यांचे पत्र देवयानीला मिळाले. ययातिला औक्षण करण्याचे सोडून देवयानी पत्र घेऊन बाहेर गेली. मुहूर्तवेळ टळू नये म्हणून ययातिच्या आईने शर्मिष्ठेला ओवाळायला सांगितले. शर्मिष्ठेने ययातिला कुंकुमतिलक लावला. शुक्राचार्यांनी पत्रात एखादी अपूर्व विद्या संपादन करण्यासाठी तपश्चर्या करण्याचा निर्धार केला होता. तपश्चर्या करण्यापूर्वी तू मला भेटून जा असा निरोप त्यांनी देवयानीला दिला होता. देवयानीने बाबांना भेटायला जाण्याचा निर्णय घेतला व भेटून आल्यावर त्यांच्या अभिष्टचिंतनाकरिता यज्ञ करण्याचा निश्चय केला. यज्ञ झालाही पण त्याला कच, अंगिरस, अगस्ती या ऋषींची उपस्थिती नव्हती. यज्ञाकरिता जमलेल्या महाराजांना निरोप देण्यासाठी दरबार भरला आणि त्यावेळी तेथे कचासमवेत यति उपस्थित झाला. भर दरबारात यतिने देवयानीला शर्मिष्ठेकडे बोट दाखवित विचारले, ''ए! तुझी ही दासी मला देशील?''(पृ.१९६) तेव्हा देवयानीला गंमत वाटली. प्रत्यक्ष आपला मोठा बंधू वेडयासारखा वागतो हे पाहून ययातिला शाप आठवला. 'या नहुषाची मुलं कधीही सुखी होणार नाही' ययातिने दरबारात हा तापसी ऋषी म्हणजे माझा भाऊ यति आहे हे मान्य केले. आईला मुर्च्छा आली. शर्मिष्ठा ही दासी आहे, हे कचाला त्यावेळी कळले. कचाने मोठया साहसाने संजीवनी विद्या संपादन केली, हे सर्व अबालवृद्धांना माहीत होते. त्यामुळे दरबारातील जन कचाच्या दर्शनाने आनंदले. यतिला अशोकवनात रवाना केले. तेथे तो शर्मिष्ठेच्या मागे मागे फिरत होता. एका रात्री तो तिच्या शय्येपाशी आला. त्याचा स्पर्श होताच ती ओरडली. त्या रात्री तो तेथून पळून गेला.

शर्मिष्ठा आश्रमातच वास्तव्यास होती देवयानीने तिची थट्टा करण्यासाठी ययाति महाराजांना ऋषींचा पोशाख घालून शर्मिष्ठेच्या निवासस्थानी पाठविले. तेथे ययातिरुपी ऋषीने एक चित्र पाहिले ते ययाति महाराजांचे होते, शर्मिष्ठेने रेखाटलेले. शर्मिष्ठेचे ययातिवर प्रेम आहे ते त्या चित्राने सिद्ध केले होते. त्यानंतर थोड्याच दिवसात देवयानी तिच्या बाबांच्या दर्शनासाठी

गेली. तेथे ती आजारी पडली त्यामुळे तिला तिच्या बाबांच्या घरी जास्त रहावे लागले. ययाति महाराज भुयार मार्गाने शर्मिष्ठेच्या महालात शर्मिष्ठेला भेटण्यासाठी येऊ लागले. शर्मिष्ठेला ययातिचे प्रेम तर मिळाले पण ते निर्भिड प्रेम नव्हे याची शर्मिष्ठेला खंत वाटत होती. शर्मिष्ठेला दिवस गेले होते. तत्पूर्वी देवयानीला मुलगा झाला. त्याचे नाव यदू ठेवले. त्याच्या बारशाला शर्मिष्ठाही गेली. शर्मिष्ठेला दिवस गेले हे देवयानीला समजले. तिने शर्मिष्ठेला व्यभिचारी म्हटले. हे तिला सहन झाले नाही. तिने 'मी व्यभिचारी नाही, एका थोर ऋषीच्या आशीर्वादानं..'(पृ.२५५) देवयानीने कचाचा नामोच्चार केला, याचा शर्मिष्ठेला खेद वाटला पण तिने काहीही प्रत्युत्तर दिले नाही.

थोड्याच दिवसात शर्मिष्ठेलाही बाळ झाले. 'तो एका सम्राटाचा मुलगा होता, पण तो दुर्दैवी शर्मिष्ठेच्या पोटी जन्माला आला होता.'(पृ.२५६) शर्मिष्ठेने मुलाचे नाव पुरु ठेवले. एकदा देवयानीने शर्मिष्ठेला पुरुसह महालात बोलवले. पुरु व यदूला सारखे कपडे घातले. ज्योतिषाला बोलावून त्यांचे भविष्य पाहण्यास सांगितले यदूला त्याने दुर्दैवी मुलगा आहे असे म्हटले व पुरु चक्रवर्ती राजा होईल असेही सांगितले. देवयानीने शर्मिष्ठेला पुरुच्या वडिलांचे नाव सांगितले नाही म्हणून एका भुयारातून तिला बरोबर नेले व तेथे एका खोलीत बंदिस्त केले. दुसऱ्या दिवशी दरबरात तिला व्यभिचारी म्हटले जाईल असेही सांगितले पण सुदैवाने ययातिने तिची त्या भुयारातून सुटका केली. माधवला शर्मिष्ठा व पुरुला दूर सोडून येण्यास सांगितले. माधवने त्यांना रथात बसून दूर नेऊन सोडले. त्यानंतर माधव आजारी पडला व त्यातच त्याचा मृत्यू झाला. शर्मिष्ठा पुरुला घेऊन हस्तिनापूरपासून दूर दूर प्रवास करीत होती. अचानक तिची भेट यतिशी झाली. यतिने त्या दोघांना हिमालयाच्या पायथ्याशी नेले. तेथे ते पर्णकुटीत राहू लागले. बघता बघता पुरु सोळा वर्षांचा झाला. त्याला त्याच्या आईने सांगितले, तू हस्तिनापूरचा राजकुमार आहेस. पुरुचं अलका नावाच्या सोनेरी केसांच्या मुलीवर प्रेम जडले. अलकेकडे एक पत्र देऊन पुरु हस्तिनापूरला गेला होता. शर्मिष्ठेला अलकेने ते पत्र दिले. त्यात त्याने लिहिले होते, हस्तिनापूरवर पराचक्र आलं आहे. तेव्हा मी माझ्या मित्रासह हस्तिनापूरला जात आहे. अलकाला घेऊन शर्मिष्ठा हस्तिनापूरला निघाली. हस्तिनापूरपासून सहा मैलावर असणाऱ्या गावात या दोघी पोहचल्या. तेथे त्यांना वार्ता कळाली. 'एका चकमकीत यदु आणि त्याच्या बरोबर काही शुर सैनिक यांना दस्यूंनी कैद करुन नेले होते.'(पृ.३२१) यदूला मदतीला पुरु नक्की गेला असेल व पुरुचे काय झाले असेल या चिंतेत दोघीही होत्या.

देवयानीदेखील यदूला कसे सोडवून आणावे या काळजीत होती. शर्मिष्ठा हस्तिनापुरातून गेल्यानंतर देवयानी व ययाति यांच्यातही वाद होते. देवयानी राज्यकारभार पाहत होती. ययाति अशोक वनात मदिरा व मदिराक्षी यांच्या नादात राहत होता. देवयानीने ययातिला यदूला दस्युंनी पकडल्याची वार्ता सांगितली होती. तेव्हा ययाति म्हणाला, ''महाराणीलाही शत्रूनं कैद करुन न्यावं. माझी काही हरकत नाही त्याला !''(पृ.३३८)

यदूला मुक्त कसे करावे या विचारात असतानाच एक दूत शुभवार्ता घेऊन आला. यदूला एका विराने दस्युंच्या कैदेतून सोडविले. तो वीर आपल्या सैन्यातील नाही. त्या वीरासह यदू पंधरा दिवसात हस्तिनापूरात दाखल होईल. त्याचवेळी दुसरी शुभवार्ता कळली तिच्या बाबांची तपश्चर्या संपली. भगवान शंकरांनी संजीवनीसारखीच एक अद्भूत विद्या त्यांना वर म्हणून दिली होती. शुक्राचार्य पंधरा दिवसात हस्तिनापूरला येणार होते.

ययाति मात्र अशोकवनात मुकुलिकेने आणलेल्या तरुणींचा उपभोग घेत जीवन जगत होता. सुवर्णकेसाच्या मुलीचा हट्ट त्यांनी मुकुलिका व मंदारकडे धरला. नेमके त्याचवेळी पुरुची प्रेमिका अलका त्याला शोधत हस्तिनापूरला आली. या अलकेला मुकुलिकेने अशोकवनात आणले. तिला मंदार व मुकुलिकेने गुंगीचे औषध दिले होते. रंगमहालात अलका मंचकावर बेशुद्ध स्थितीत पडलेली होती. ययातिने तिला स्पर्श करण्यापूर्वीच शुक्राचार्य येत आहे अशी वार्ता घेऊन मुकुलिका आत आली. शुक्राचार्यासमोर उभे राहण्याचे धैर्य ययातिकडे नव्हते. देवयानीने तिच्या बाबांना आपल्या हाल अपेष्टांना ययाति कसा जबाबदार आहे हे पटविले. संजीवनीसारखीच दुसरी अद्भूत विद्या तपश्चर्येने मिळविलेला पिता लाडक्या लेकीचा सुखी संसार पाहण्यासाठी आला. पण आपली मुलगी दुःखसागरात आखंड बुडालेली पाहण्याचे दुर्दैव या दुर्दैवी पित्याच्या नशिबी आले. शुक्राचार्यांसमोर उभ्या असलेल्या ययातिला संतापलेल्या शुक्राचार्यांनी शाप दिला, ''हा शुक्र एवढीच इच्छा करीत आहे की, माझ्यासमोर उभा असलेला हा पापी ययाति या क्षणी जख्ख म्हातारा होवो!''(पृ.३७४) शापीत ययातिने आरशात पाहिले, आपले वृद्ध रुप पाहून ययातिने शुक्राचार्यांकडे दयेची याचना केली. देवयानी करुण स्वरात म्हणाली, ''बाबा, यांच्याकडे बघवत नाही मला, यांना परत तरुण करा. यांचं पहिलं रुप यांना परत द्या.''(पृ.३७५) तेव्हा शुक्राचार्यांनी उश्शाप दिला, ''तुझ्या वार्धक्याचा स्वीकार करायला तुझ्याच कुळातला तुझ्याच रक्ताचा कुणीही तरुण आनंदाने पुढे आला, तर तू इच्छा करशील, त्या क्षणी ते वार्धक्य त्याच्याकडे जाईल व त्याचं तारुण्य तुला मिळेल. मात्र एक गोष्ट लक्षात

ठेव. तुझं ते उसनं तारुण्य तुझ्या मृत्युनंच त्या तरुणाला परत मिळेल. दुसऱ्या कोणत्याही मार्गानं नाही. माझं स्मरण करुन तीनदा 'हे तारुण्य मी परत करीत आहे.' असं म्हटलंस, की तू मृत होऊन पडशील.''(पृ.३७६) देवयानीला शापापेक्षा उश्शाप भयंकर वाटला. तसं ती बाबांना म्हणाली देखील. शुक्राचार्य तेथून रागाने निघून गेले. अठरा वर्षांनी ययाति व देवयानी एकत्र आले आणि तेही या विचित्र समयी असा ते विचार करत असताना युवराज म्हणजे यदू येत असल्याचा निरोप त्यांना मिळाला. यदू समवेत पुरु ही अशोकवनात आला. ययातिने यदूला आपले वार्धक्य स्वीकारण्यास सांगितले. यदूची दृष्टी नकारात्मक वाटली. पुरुने वार्धक्य स्वीकारण्याचा निर्णय घेतला. महाराज म्हणाले, ''पण-पण ते तुला घेता येणार नाही. माझ्या कुळातला, माझ्या रक्ताच्या तरुणालाच माझं वार्धक्य घेता येईल.''(पृ.३७९) तेव्हा पुरुने सत्य कथन केले. 'मी महाराजांचा मुलगा आहे.' देवयानीने विचारले, 'म्हणजे तू शर्मिष्ठेचा मुलगा आहेस?' यौवनाच्या लालसेने व जीवनात सुख उपभोगण्यात अतृप्त असलेल्या लंपट ययातिने पुरुचे यौवन स्वीकारले. रंगमहालात असणाऱ्या अलकेच्या हव्यासापोटी पुत्रप्रेम विसरलेल्या ययातिने यौवन स्वीकारले व तो रंगमहालात गेला. पण अलकेला स्पर्श करण्यापूर्वी त्याला एका स्त्रीचे हुंदके ऐकायला आले. त्या स्त्रीला पाहण्यासाठी तो रंगमहालाबाहेर आला तर तेथे पुरुला वार्धक्य अवस्थेत पाहून रडणारी शर्मिष्ठा ययातिला दिसली. आपण अक्षम्य अपराध केल्याची ययातिला उपरती झाली. ''हे उसनं यौवन मला द्यायचं आहे. ते ज्याच त्याला परत मिळावं म्हणून मी मृत्यू स्वीकारायला तयार आहे.''(पृ.३८३) हे ययातिने दोनदा म्हटले. तिसऱ्यांदा म्हणणार तेच कचदेव आले आहेत हे अस्पष्ट ऐकत असताना ययाति खाली कोसळून पडला.

कचानेही तप करुन शुक्राचार्यांसारखी विद्या प्राप्त केली होती. एवढेच नव्हे, तर शुक्राचार्यांसारखा कोपिष्ट तपस्वी कुणाला केव्हा वार्धक्याचा शाप देईन, याचा नेम नसल्यामुळे असले कृत्रिम वार्धक्य दूर करण्याची सिद्धीही त्याने प्राप्त करुन घेतली होती. त्या सिद्धीच्या बळावर त्याने एका क्षणात पुरुचे यौवन त्याला परत दिले होते. या सर्व प्रसंगानंतर ययाति व देवयानी यांचा जणूकाही पुनर्जन्म झाला होता. शुक्राचार्यांपेक्षा कच खरा ज्ञानी आहे याची देवयानीला प्रचिती आली. त्यागमूर्ती असलेली शर्मिष्ठा व तिचा त्यागी मुलगा यांच्या प्रति देवयानीला प्रेम भावना निर्माण झाली. जनतेला पुरु हा राजा म्हणून हवा होता. देवयानीने प्रजेच्या त्या इच्छेचा सन्मान केला. पुरुच्या राज्यभिषेकाच्या दिवशी ययाति, देवयानी व शर्मिष्ठा यांनी वानप्रस्थ होण्याचा निर्णय घेतला. बरोबर माधवच्या आईलाही, तिची सेवा आपल्या हातून

घडावी म्हणून नेण्याचा निर्णय घेतला. राजा झालेल्या पुरुला ययातिने आशीर्वाद दिला, ''तुझ्या नावानं हे कुळ प्रसिद्ध होवो, तुझ्या पराक्रमाप्रमाणं तुझा त्यागही वाढत राहो.''(पृ.३९४)

### ३.२.२. रथचक्र :

'रथचक्र' ही कादंबरी म्हणजे एका आईची तिच्या मुलाच्या उत्कर्षासाठी चाललेली धडपड आणि ते करताना येणारे यश-अपयश, तिची कुटुंबाकडून, समाजाकडून होणारी अवहेलना ही तिची व्यथा हे या कादंबरीचे आशयसूत्र आहे. 'रथचक्र' या कादंबरीच्या संदर्भात आपले मत व्यक्त करतांना लेखक श्री.ना. पेंडसे म्हणतात, ''माझ्या कादंबऱ्यांपुरतं बोलायचे तर 'रथचक्र' ही माझी सर्वात यशस्वी कादंबरी असे मी मानतो.''[४]

श्री.ना. पेंडसे यांची रथचक्रमधील नायिका ही अनामिक आहे. या अनाम नायिकेचे, तिच्या जीवनाचे चक्र नियतिशी संघर्ष करताना पदोपदी चिखलात रुतत जाते. ही स्त्री पराभूत होते, म्हणजे ज्या मुलाला उच्च शिक्षण देऊन मोठे करण्यासाठी तिने खस्ता खाल्या पण शेवटी त्या मुलानेच तिला झिडकारले तेव्हा ही अपयशी स्त्री स्वतःचे जीवन संपवू पाहते पण ते संपवतांना देखील नियतीने तिचा क्रुर खेळ केला, असे कादंबरीचे कथानक आहे.

तिची आई वारली तेव्हा ती सात वर्षांची होती. आत्याला मुलबाळ नव्हते. तिच्या वडिलांनी तिला आत्याकडे ठेवले. आत्याच्या घरात तिचे खूप लाड झाले. एकदा एका तापात तिच्या तोंडावरुन वारा जाऊन तिचे तोंड साफ वाकडं झाले. तिला बोलताही येतं नव्हते. कित्येक दिवस आत्या तोंड रगडीत होती. 'आईही काढणार नाही अशा खस्ता आत्यानं काढल्या.'(पृ.८३) तिचा पायगुण चांगला आहे असे आत्याचे म्हणणे होते. कारण ती आत्याकडे रहायला गेली आणि आत्याला दिवस गेले. 'बारा वर्षात घडलं नाही ते आता घडलं! तिचा पायगुण! तिच्याशिवाय सगळयांना त्या पायगुणचा लाभ मिळत होता.'(पृ.८३)

'ती' जाणती झाल्यावर तिचे वडील तिच्या लग्नासाठी स्थळे पाहू लागले. आत्याला ती स्थळ मनास येत नव्हती. शेवटी वय वाढत चालल्यामुळे वडिलांनीच लग्न ठरवले. एका संन्याशी वृत्तीच्या विद्रुप थोट्या माणसाबरोबर तिचा विवाह ठरला. एका रात्रीच्या क्षणभर सुखाची चव सोडता शारीरिक सुख असं तिला कधी मिळालचं नाही. तिला पोरांच लेंढार आणि न कमावत्या नवऱ्याची बायको म्हणून जावांचा दुस्वास तेवढा तिच्या नशिबी आला. यातच भर ती काय? चौथ्या मुलीच्या वेळी म्हणजे चौथी मुलगी पोटात असताना नवरा घर सोडून पळून गेला. त्याच्या या संन्याशी वृत्तीला तिच जबाबदार असा आरोप सर्वांनी तिच्या माथी मारला.

तिचा थोरला मुलगा तिला आई म्हणून मान सन्मान देत नाही, उलट निपुत्रिक काकूला जीव लावतो. ते आपल्याला दत्तक घेतील या आशेवर तो होता. धाकटा मुलगा हुशार आणि बुद्धीमान होता. त्याच्या शिक्षणासाठी ती तालुक्याला जाण्याचा निर्णय घेते. स्वतः अशिक्षित असूनही मुलाला खूप शिकविण्याची तिची प्रबळ इच्छा होती. या तिच्या निर्णयाला घरातील सर्वांनी विरोध केला पण त्या विरोधाला न जुमानता ती तालुक्याला गेली कारण तिचा मुलगा जिल्ह्यात पहिला आला होता. तालुक्याच्या ठिकाणी 'जिल्ह्यात पहिल्या आलेल्या मुलाची आई' असा मान मिळेल ही तिची अपेक्षा फोल ठरली. मौनीबाबा या सत्पुरुषाचा मुलगा म्हणून तिच्या या मुलाला हे यश मिळाले अशी तालुक्यात मौनीबाबाची वाहवा झाली. नवऱ्याने पदरात काहीच सुख टाकले नाही पण ज्या मुलाचा उत्कर्ष व्हावा ही तिची अपेक्षा असते तो मुलगाही आईला, त्याला वार मिळाल्यानंतर घरी म्हणजे पुन्हा त्यांच्या गावाला जायला सांगतो. कृष्णाबाई नावाच्या महिलेच्या खानावळीत हिशोबाचे काम करतो. त्याबदल्यात कृष्णाबाई त्याची शैक्षणिक, कौटुंबिक खर्चाची जबाबदारी घेते. पण थोडयाच दिवसात तिचा धाकटा मुलगा व कृष्णाबाई यांच्याविषयी लोक नको त्या अंगाने चर्चा करु लागले. कोंडयांचा मांडा करुन आपल्या मुलांना वाढविणारी ती मुलाच्या अशा बेईज्जतीने खचून जाते. शेवटी हा मुलगादेखील मौनीबाबाच्या पादुका घेऊन घरातून पळून जातो.

थोड्याच दिवसात मौनीबाबाही तेथे प्रकट होतो. लोक मौनीबाबाच्या दर्शनाला येताना ते मौनीबाबासाठी काही वस्तू आणत. त्या घेण्यात तिला काहीही वावगं वाटत नाही. मौनीबाबा म्हणजे तिचा नवरा. थोरली आजारी होती म्हणून तिला भेटण्यासाठी आला होता. नवऱ्यासमवेत ती त्यांच्या गावी आली. घरी आल्यावर तिच्या हातात जावांनी पंचारती दिली. पंचारतीने त्याला तिने ओवाळले. त्याला पाहून थोरली शुद्ध हरपली त्याच्या मंत्रपठनाने ती शुद्धीवर आली. शेजारच्या काकांना त्याने असा शब्द दिला की, आठ दिवसात इसब जाईल. लखनौवाला तिचा दीर एवढा शिकलेला पण तो सुद्धा तिच्यासमोर मान तुकवतो. दिर तिच्या धाकट्या मुलाला भेटून आला होता. तो खुशाल होता. खूप अभ्यास करीत होता हे कळल्यावर तिला आनंद झाला. घरामध्ये तिला शुद्ध करुन घेण्याविषयी चर्चा चालली होती. मधला दीर म्हणाला, ''ह्या प्रश्नांचा किती कीस पडला तरी हाती काही लागायचं नाही. झाल्या गोष्टीवर पडदा टाकावा आणि बहिणीच्या इच्छेप्रमाणे तिला शुद्ध करुन घ्यावं हे उत्तम. ह्यापुढं तिनं नीट वागावं म्हणजे झालं.''(पृ.१९६) हे ऐकल्यावर तिचे रक्त तापले. लखनौवाला दीर तिच्याविषयी चांगलं बोलेल

अशी तिची अपेक्षा होती. पण तो काहीच बोलला नाही. तेव्हा ती म्हणाली, ''अशी मेहेरबानी नको... मी काय केलं त्याची शहानिशा होऊ दे.'' सगळे जण तिच्या जवळ धावत आले त्यावेळी ती बेशुद्ध पडली. पहाटे ती शुद्धीवर आली. त्या दिवशी तिचा नवरा तिच्याशी प्रथम बोलला. ''कस आहे आता.''(पृ.१९८) पण तिने काहीच उत्तर दिले नाही.

लखनौवाला तिच्या नवऱ्याला तीर्थक्षेत्राला घेऊन जाणार होता. तेव्हा शेवटची इच्छा म्हणून थोरलीने तिच्या नवऱ्याचे दर्शन घेण्याची इच्छा व्यक्त केली. लखनौवाल्याने त्याला पाय पुढे करण्यास सांगितले. त्याच्या पायाला थोरलीने हात लावला व थोडयाच वेळात थोरली अनंतात विलीन झाली. त्या घरात आज ती खरोखर निराधार झाली असे तिला वाटले. पिंड ठेवताच कावळा शिवला. दुसऱ्या दिवशी नवरा तीर्थयात्रेला गेला. तो गेल्याबरोबर तिच्या थोरल्या मुलाच्या लग्नाचा विषय निघाला. तिच्या विरोधाला न जुमानता तिच्या थोरल्या मुलाचे लग्न लावून दिले. लग्नाच्या वेळी ती बेशुद्धच होती. लग्नानंतर तीन दिवसांनी ती शुद्धीवर आली. या सगळ्या घटनांमध्ये एक घटना मात्र तिला आनंद देणारी ठरली आणि ती म्हणजे तिचा धाकटा मुलगा मॅट्रीकच्या परीक्षेत पहिला आला, ही बातमी तिला समजली. तेव्हा तिने मुलाला पत्र पाठविले. ''निकाल ऐकुन धन्य झाल्ये. आता कसली इच्छा राहिली नाही. एकदा तुला डोळे भरुन पहावं एवढचं मनात आहे. उताराला पैसे पाठविले तर मुंबईला येईन.''(पृ.२०५) पण मुलाने मात्र तिची निराशा केली. तिला धाकट्या मुलाने उत्तरादाखल एक पत्र लिहिले. त्या पत्रातील मजकुरावरुन असे लक्षात आले, धाकट्याने तिला दुर्दैवी म्हटले. घरातील प्रत्येकाशी तू भांडली, माझे वडील पुण्यवान आहेत. कृष्णाताईशी माझे अनैतिक संबंध आहेत या गावभरझालेल्या बदनामीचे तू सत्य समजून घेण्याचा प्रयत्न केला नाहीस.''वडिलांची पुण्याई पाठीशी होती म्हणून शुद्ध राहिलो.''(पृ.२०५) धाकट्याच्या पाठीशी आई उभी राहिली नाही, आईने दगा दिला अशाप्रकारे त्याने नायिकेच्या जगण्याचा, तिचा आशेचा किरण जो होता त्यानेच तिच्यावर दोषारोप केले व ज्या बापाने जन्म देण्यापलीकडे काहीच केले नाही तो बाप मात्र अखेरीस पुण्यवान ठरला. या धाकट्या मुलाच्या विचाराने ती मात्र पूर्णपणे कोलमडून गेली. ती सैरभैर झाली. तिच्या आशा आकांक्षाच्या चिंधड्या झाल्या आणि अशावेळी सर्वसामान्य व्यक्तीच्या मनात जे विचार येतात, तेच विचार तिच्या मनात आले. मनोनिग्रह करुन ती विहिरीच्या काठावर आली. पायातील जोडवे, पितळाच्या पाटल्या, कुडीजोड इत्यादी काढून तिने हातणीवरच्या द्रोणीत ठेवले. मागच्या बाजूला गेलेले मंगळसूत्र सारखं करण्यात गुंतली

असतांना तिचा पाय घसरला व ती वेडीवाकडी कोसळली. तिच्या छातीला मार लागल्याचे तिला जाणवले व शुद्ध हरपली. पण जेव्हा ती शुद्धीवर आली तेव्हा तिचा एक हात रहाटाच्या माळेला लटकला असल्याचे तिच्या लक्षात आले. माळेवर चढण्याचा ती प्रयत्न करीत होती. माळ सरसरत खाली आली. म्हणजे आपण जिवंत आहोत याचे भान आल्यावर तिची जगण्याची धडपड सुरु झाली.

अशा प्रकारे एका अनामिकेच्या दुर्दैवाची कथा अधोरेखित करण्यासाठी या कादंबरीत लेखकाने कर्णाच्या कथेतील रथचक्राचे प्रतीक वापरले आहे. कोकणातल्या मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील स्त्रीची ही शोकांत कहाणी आहे. जन्मापासूनच कमनशिबी असलेली ही नायिका तिच्या मरणाच्या घटकेपर्यंत तिच्या दुर्भाग्याचे चटके सहन करते. यशासाठी लढतांना पदोपदी संकटांना निकराने लढा देते पण अपयश तिचा पाठलागच करते. आईविना वाढलेली ही मुलगी विवाह बंधनात अडकते तिही एका संन्याशीवृत्तीच्या व्यक्तीच्या. मुळातच संसारात रस नसलेला पण तरीही चार मुलांना जन्म देऊन, त्यांच्याविषयी बाप म्हणून आपले कर्तव्य न निभावणारा हा पिता घरातून पलायन करतो. या सर्व संकटामध्ये तिला जगण्याचा मार्ग सापडतो तो धाकट्या मुलाच्या शाळेतील हुशारीने. त्याला शिकविले तर आपले जीवन सुखकर होईल पण त्यानेही शेवटी तिच्या माथी खापरच फोडले. साऱ्या आशा-आकांक्षांचा नियतीने अशाप्रकारे घोट घेतला तेव्हा आत्महत्येचा प्रयत्न केला पण तोही सफल झाला नाही.

**३.२.३. स्वामी :**

'स्वामी' ही रणजित देसाई यांची ऐतिहासिक कादंबरी आहे. थोरल्या माधवराव पेशव्यांच्या जीवनावर आधारित ४१८ पानाची व तीन भागांत विभागलेली ही कादंबरी आहे. रणजित देसाई यांच्या स्वामी या कादंबरीविषयी डॉ.जी.पी. माळी म्हणतात, ''रणजित देसाई यांच्या कादंबरीने ऐतिहासिक कादंबरीच्या क्षेत्रात एक नवे पर्व सुरू केले. एक नवा नमुना उपस्थित केला. आपल्या प्रतिभेचे सर्व गुणविलास पणाला लावून मराठी ऐतिहासिक कादंबरीच्या प्रातांत नवे युग निर्माण केले. मराठी ऐतिहासिक कादंबऱ्यांत मानदंड ठरणारी व ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित करणारी कादंबरी म्हणून वाचक-समीक्षकांकडून 'स्वामी'चा गौरव झाला. कारण 'स्वामी'ने जसे ऐतिहासिक कादंबरीचा ढाचा बदलला, तसेच नवे परिमाणही दिले. या कादंबरीद्वारे ते खरे जनतेसमोर आले आणि त्यांनी जनमानयसाचा ठाव घेतला.''[५] कादंबरीच्या पहिल्या भागात वयाच्या १६ व्या वर्षी माधवरावांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. दिनकर महादेव

माहिती पुरवितात की, जवाहिर खान्यातून सणासुदीला खाशा स्वाऱ्यांकडे (रघूनाथ रावांकडे) अनेक नग जातात पण त्याच्या लेखी पावत्या दिल्या जात नाहीत तेव्हा माधवरावांनी दिलेला निर्णय असा होता की, नियमानुसार कारभार ठेवणे पेशवेसुद्धा नियमाला अपवाद ठरू नयेत म्हणजे ह्या प्रसंगापासून रघूनाथ व माधवराव यांच्या तिढा वाढत जातो. रघूनाथरावांचे गोपिकाबाईंकडे जाणे. त्यांचे दोघांनाही समजावून सांगणे. आनंदीबाईचा दागिन्यांचा हव्यास, माधवरावांचा दप्तरीचा अभ्यास चोख असणे. मोरेश्वर भटाच्या गायनाने मंत्रमुग्ध झालेले माधवराव त्याच्या गुणांची कदर करणे, रमा-माधवांचे देवदर्शनासाठी थेऊरला जाणे, रामशास्त्रींनी माधवरावांची केलेली कान उघडणी ही अशी की, माधवरावांचा बराचसा वेळ वेदाध्ययन, जपतप, स्नानसंध्या, अनुष्ठान यात जातो व राज्यकारभारासाठी कमी वेळ मिळतो. माधवरावांनी वाड्यात होमहवनास केलेल्या बंदीमुळे संतप्त रघूनाथरावाचे गोपिकाबाईंकडे आपले गाऱ्हणे मांडणे व गोपिकाबाईंची दोघांमध्ये समेट घडवून आणणे. तसेच राघोबा निजामाला जाऊन मिळतात व आळेगावला भिमातीरी माधवरावांविरुद्ध लढाईला सिद्ध होतात. लढाईनंतर शिकारीचा प्रसंग त्यानंतर राक्षसभुवनच्या लढाईत पेशव्यांचा जय होतो. म्हणजेच या पहिल्या भागात, माधवराव व रघूनाथराव यांच्यातील वाद विकोपाला पोहचून ते एकमेकांविरुद्ध लढाईला सिद्ध होतात. माधवरावांनी लहान वयात पेशवेपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर ती समर्थपणे पेलली.

दुसरा भाग हा अतिशय महत्त्वाचा आहे. राक्षसभुवनचा विजय संपादन करून माधवराव पुण्यात आल्यानंतर त्यांनी आपल्या प्रजेची समक्ष भेट घेण्याचे ठरविले. तेव्हा माधवराव मोहिमेवर असताना निजामाने पुणे लुटले तेव्हा हवालदिल झालेली जनता आपले गाऱ्हाणे माधवरावांसमोर मांडते. त्यामध्ये निंबाळकरांची म्हातारी जिऊ हिने निजामाला लुटीमध्ये रास्तेमामांनी कशी मदत केली हे निर्भिडपणे सांगते. तेव्हा मल्हारराव रास्ते गोपिकाबाईंचे बंधू पेशव्यांचे खुद्द मामा यांनाही माधवराव पाच हजार रुपयांचा दंड ठोठावतात. त्यानंतर माधवराव व गोपिकाबाईंच्यात आलेले वितुष्ट इतकं विकोपाला पोहचतं की गोपिकाबाई रागाने गंगापूरला निघून जातात. विसाजीपंतांनी फिरंग्यांची जहाज लुटली तेव्हा माधवरावांनी त्यांची गय केली नाही. त्यांनाही शिक्षा ठोठावली. त्यावेळी आम्ही न्यायनिवाड्यात ढवळाढवळ करणार नाही असे शास्त्रीबुवांना आश्वासन दिले. त्यानंतर रमाबाई व माधवराव या पती-पत्नीचे प्रेमळ संवाद, माधवरावांचे रमाबाईंबरोबर सारीपाट खेळणे, रघूनाथरावांनी नाचगाण्याचे कार्यक्रमाचे आयोजन

केलं. पण माधवरावांना त्यात रस नसणे, त्यानंतर रघूनाथरावांच्या पाणक्याला (विष्णूला) उगीच काम सोडून पेशव्यांचा शिरपेच कलल्याचे सांगण्याचे धारिष्ट केल्याबद्दल केलेली शिक्षा. या सारख्या ठळक घटनांचा समावेश झाला आहे.

माधवरावांनी हैदरवर आखलेली मोहिम : मोहिमेवर जाताना बरोबर धाकटे बंधू नारायणराव यांनाही बरोबर घेणे. हैदरचे पुरे पारिपत्य करावे या इराद्याने माधवरावांनी त्याचा पिच्छा पुरविला होता, लढाईच्या विविध प्रसंगातून माधवरावांचे युद्ध कौशल्य स्पष्ट होते. परंतु अथक प्रयत्न करुनही हैदर त्यांच्या हातून निसटला. वर्षभराच्या हैदरच्या मोहिमेवरुन माधवराव पुण्यात आले. आल्या आल्या सदाशिवभाऊंच्या तोतयाचे प्रकरण त्यांना मिटवावे लागले. निजामांशी सलोखा करून माधवराव निजाम यांची भेट राक्षस भूवनापेक्षा एका वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या नात्यात दोन सत्ताधिशांची कमखेडाची भेट झाली होती. त्यानंतर रघुनाथराव व माधवराव यांच्यात होणाऱ्या संघर्षात्मक संवादांचा समावेश व त्यातून ते एकमेकांसमोर लढाईला सिद्ध झाले. शरणागत रघूनाथरावांना शत्रुत्व विसरुन नमस्कार करणारे माधवराव. रघूनाथ व त्यांना सहकार्य करणाऱ्या गंगोबातात्यांना माधवरावांनी नजरकैदेत ठेवले. म्हणजेच दुसऱ्या भागात कौटुंबिक आणि राजकिय संघर्षाला माधवरावांना सामोरे जावं लागलं.

माधवराव आजारी आणि त्यांच्या आजारपणाचे दुःख सहन न होणाऱ्या कोमल मनाच्या रमाबाई यांच्यातील संवादाने मन सुन्न करुन टाकणारा हा तिसरा भाग आहे. तिसऱ्या भागातील सर्वात महत्त्वाचा प्रसंग म्हणजे माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाईंचं सती जाण या प्रसंगाने कादंबरीला परमोच्च ठिकाणी नेऊन बसवलं. त्या प्रसंगाने या दोघांमध्ये असलेलं हे नातं असं आहे की रमेशिवाय माधव किंवा माधवाशिवाय रमा हे शक्यच नाही. मनाला चटका लावणारा असा हा प्रसंग आहे.

अशी ही माधवराव प्रमुख व्यक्तिरेखा असलेली कादंबरी वाचकांच्या मनाचा वेध घेते. यामध्ये विविध प्रसंगातून माधवरावांच्या स्वभावाची गुणवैशिष्ट्ये लेखकाने वाचकांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. एक आदर्श राज्यकर्ता, पत्नीवर नितांत प्रेम, कौटुंबिक संघर्षाला सामोरं जावून त्यातून मार्ग काढणे. प्रजाहित दक्ष, आईवर श्रद्धा असलेला, गजानन व शिवाजीमहाराज यांच्यावर निष्ठा असलेला हा प्रधान पेशवा त्यांची ही व्यक्तिचरित्रात्मक, ऐतिहासिक बाज असलेली व संवादाची रेलचेल असलेली ही कादंबरी. मराठी साहित्यातील एक लेणं आहे.

तिसरा भाग हा वाचकांना खऱ्या अर्थाने वाचिक वेदना देणारा वाटतो, वाचताना मानवी मन हळवे होताना दिसते. सुरूवातच रघूनाथरावांना माधवरावांनी कैद केल्यामुळे वाढणारी अनुष्ठानं याने झालेली आहे. रामसिंग गारद्याने रघूनाथरावांच्या सांगण्यावरून माधवरावांवर केलेला प्राणघातक हल्ला. यासारखे प्रसंग. त्यानंतर माधवरावांना उद्‌भवलेला राजयक्षासारखा आजार. त्यामध्ये डोळ्यात तेल घालून माधवरावांची काळजी घेणारी रमा याचे वर्णन वेळोवेळी आले आहे. खऱ्या अर्थाने या भागात आजारपणामुळे का होईना माधवरावांचा रमाबाईशी होणारा संवाद हा वाचकाला चटका लावून जाणारा आहे. माधवरावांना हे लक्षात येत होतं की माझ्या आजारपणाच्या काळजीमुळे रमाबाई ह्या खचत चालल्या आहेत. म्हणून त्यांच्या वातावरणात बदल करावा हा खरा उद्देश पण 'मला बरं वाटावं म्हणून तू हरिहरेश्वरला जा.' म्हणून सांगणारे माधवराव यांचे वर्णन आले आहे. आजारपणाच्या काळात माधवराव थेऊर येथे वास्तव्यास जातात. त्याठिकाणी खऱ्या अर्थाने रमाबाई आणि माधवराव हे पतीचे पत्नीचं आयुष्य जगले पण त्यामध्ये फक्त दुःख होते.

**३.२.४. स्मरणगाथा :**

लेखक गो.नी. दांडेकर यांच्या 'स्मरणगाथा' या कादंबरीचे स्वरूप आत्मचरित्रापेक्षा स्मरणसाखळी सारखे आहे. कादंबरीचे कथानक प्रामुख्याने लेखकाच्या बालपणापासून ते वयाच्या तिसाव्या वर्षांपर्यंत विविध प्रकारच्या अनुभवांनी भरलेले आहे. या तीस वर्षांमधील वयाची पहिली तेरा वर्षे ही कुटुंबासोबत, वयाच्या तेराव्या वर्षी स्वातंत्र्य संग्रामात उडी घेण्यासाठी लेखकाने घरातून पलायन केले तेव्हापासून ते वयाच्या तिसाव्या वर्षांपर्यंतचा भटक्या जीवनाचा कालपट लेखकाने एक सलगपणे मांडण्याचा प्रयत्न स्मरणगाथेच्या माध्यमातून केला आहे. स्वातंत्र्यासाठी घरातून पळून गेलेल्या या मुलाला थोड्याच दिवसात आपल्या पुढाऱ्यांकडून आपण पण वापरले जात आहोत याची जाणीव झाली. ज्या उद्देशासाठी घर सोडले त्यातील निरर्थकता लेखकाला उमगली पण आता पुन्हा घराची वाट धरणे लेखकाच्या मानी स्वभावाला रूचेना म्हणून वाट नेईल त्या दिशेने लेखकाचे मार्गक्रमण सुरु होते. परत घरी जाण्याचे धारिष्ट्य लेखकाने दाखविले नाही म्हणूनच स्मरणगाथा साकारली असे वाटते. स्मरणगाथेच्या कथानकाचा विचार केल्यास लेखकाच्या वयाच्या तिसाव्या वर्षांपर्यंत लेखकाच्या जीवनातील विविध घटनांचा एकसलगपणे आढावा घेतलेला आहे.

लेखकाचे मूळ नाव आत्माराम निलकंठ दांडेकर त्यांचे घराणे खोताचे होते. मूळ गाव गुडघे, तालुका दापोली, जिल्हा रत्नागिरी त्यांच्या घराण्याकडे गोपाळगड किल्ल्याची किल्लेदारी परंपरेने चालत आलेली होती. नंतर मात्र लेखकाचे कुटुंब परतवाड्यात म्हणजे मु.पो.परतवाडा, ता.अचलपूर, जिल्हा अमरावती म्हणजे वऱ्हाड प्रांत येथे गेले होते. लेखक घरातून पलायन केल्यानंतर नगर जिल्ह्यातील अकोल्याला दोन-तीन वर्षे राहिला. तेथे त्याने गोरक्षणाचे काम केले. म्हणून त्याने गोपाल नाव धारण केले. ज्यांच्या घरी राहात होते त्यांचेच जोशी आडनाव स्वीकारले. वडिलांचे नाव परमेश्वर ठरविले परंतु परमेश्वर सांगायला, ऐकायला बरे वाटेना म्हणून परमेश्वर नाव बदलून अनंत असे ठेवले. म्हणजेच लेखकाने 'आत्माराम नीलकंठ दांडेकर' चे 'गोपाल अनंत जोशी' असे नामाभिधान स्वीकारले.

लेखकाचा जन्मच मुळात परतवाड्यातला. परतवाड्यात विदवांसाच्या बंगल्यात लेखकाचे कुटुंब वास्तव्यास होते. तीनेक वर्षांचा असताना विद्वांसाच्या बंगल्यातील ती जागा सोडून फॉन्सेका नावाच्या गोवॅनीज ख्रिश्चनाच्या बंगल्याच्या आऊटहाऊसमध्ये त्यांचे कुटुंब स्थलांतरित झाले. फॉन्सेकाच्या घरची मोलकरीण इझाबेल की जिने लेखकाला बालवयात निसर्गातील विविध गुपिते उघड केली. फॉन्सेकाचा मुलगा आल्फ्रेड व मुलगी फ्लोरा या मित्र-मैत्रिणींच्या संगतीत लेखकाचे बालपण गेले. लेखकाच्या बालपणातील लेखकाला गुरूसमान असलेली लेखकाची मोठी बहीण माई हिचे स्थान लेखकाच्या जीवनात फारच महत्त्वाचे आहे. हे लेखकाने विविध प्रसंगाच्या संदर्भाने मांडलेले आहे. लेखनाच्या ओघात लेखकाने वडील व त्यांचे सदगुरूकाका यांच्या कडक स्वभावावर प्रकाश टाकणारे विविध प्रसंग मांडले आहेत.

परतवाडा सोडून लेखकाचे कुटुंब नागपूरला स्थलांतरित झाले. त्याला कारणही तसेच घडले. वडील ज्या शाळेत शिकवित होते त्याच शाळेत लेखक आणि माई शिकत होते. दादा शिकवित असलेल्या इयत्तेतील मुलाला गुपचूप लेखकाने व माईने पेपर सांगितला अर्थात 'नापास झालो तर माझ्याकडे मरण्याशिवाय पर्याय नाही' असे त्या मुलाने सांगितले म्हणून पेपरमधील गणिते त्या मुलाला कळाली, हे मुख्याध्यापकांना कळले. या सर्व प्रकारात दादांच्या मूलांचाच हात असणार हे त्रिकालाबाधीत सत्य आहे, असे वाटून मुख्याध्यापकांनी मुलांना ऑफिसमध्ये बोलावून विचारले तसेच दादांनीही घरी गेल्यावर खूप मारले तरीही दोन्हीही मुले कबूल झाली नाहीत. या घटनेचा परिणाम असा झाला की दादांनी परतवाडा सोडण्याचा निर्णय घेतला.

लेखकाचे कुटुंब परतवाडा सोडून नागपूरला आले. कुटुंब नागपुरात स्थलांतरित झाल्यामुळे नागपूरमधील भौगोलिक परिस्थितीचे, तेथील विविध जाती धर्माच्या प्रथा, परंपरांचे वर्णन लेखकाने केले आहे. मुस्लिमांच्या मोहरम सणाचा, त्यांच्या डोले या प्रथेचा सविस्तर उल्लेख आला आहे. मराठा, महार, मुस्लीम, बंगाली, मद्रासी अशा विविध जाती धर्माच्या, विविध राज्यांमधल्या लोकांचा निवास नागपुरात आहे. हे त्यांच्या निवेदनातून समजते. नागपूरमधील 'गांजाखेत-गंगाजमना' सारख्या गलिच्छा वस्तीत दादांचे लेखकालाही बरोबर घेऊन जाणे आणि त्या अनुषंगाने त्या वस्तीतील अश्लिलतेचा प्रत्यय त्यांना येतो.

दादा लेखकाला स्वतः बरोबर नाटक पाहायला घेऊन जात त्यामुळे लेखकाला नाटकाची आवड निर्माण झाली होती. लेखकाने ''खरा देशभक्त'' या नाटकात उत्कृष्ठ काम केले होते. तो कालखंड साधारणतः एकोणीसशे सत्तावीस-अठ्ठावीस सालचा होता. 'चिमटीभर मिठापायी थोरथोर तालेवार माणसं जेलात जात होती.'(पृ.८०) अशाच वेळी दादांनी लेखकाला वर्ध्याला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. दादा म्हणाले, ''किल्लेदार, चलो वर्धा! वहाँ गांधीको देखेंगे!'' आणि खरच लेखकाला गांधीजींना प्रत्यक्ष पाहण्याचा योग आला. त्यांच्या व्यक्तिमत्वाने लेखक भारावून गेले. माईने म्हणजे त्यांच्या बहिणीने स्वातंत्र्य प्रेमाचे, देशभक्तीचे स्फुलींग लेखकाच्या मनात पेटविले होते. तीस सालचे आंदोलन देशभर पेटले होते. 'धनतोली हे तर चळवळ्यांच आगरच.'(पृ.८८) अशा या उसळत्या वातावरणात स्वस्थ बसणे लेखकाला शक्य नव्हते. लेखक ज्या शाळेत जात होते त्या शाळेतील वातावरणही लढ्यासाठी अनुकूल होते. त्यामुळे लेखक नागपुरात विद्यार्थी दशेत आंदोलनात सहभागी झाले. पण कोणीही त्याला तुरुंगात टाकत नव्हते. कारण सिटी सुपरिंटेंडेड हे दादांचे मित्र होते. त्यांच्या मुलाला दादांनी शिकविले होते. त्यामुळे नागपूरला राहून आपल्याला आंदोलन करता येणार नाही, हे लेखकाच्या लक्षात आले. त्याच वेळी मुंबईजवळ धारासनाच्या मीठाच्या सत्याग्रहाचे वृत्त वाचल्यानंतर लेखकाने मुंबईला जायचे ठरविले. शाळेतील मुलांसमोर त्याने एक प्रतिज्ञा घेतली, ''एका वर्षांत स्वराज्य मिळवून मगच शाळेत पाऊल घालीन.''(पृ.९१) लेखकाने स्वतःची सर्व सर्टिफिकेट - बिल्ले, सदरा, चड्डी पिशवीत कोंबली. माईचा नवरा म्हणजे भाऊसाहेब सुपेकर यांच्याकडे जाऊन दादांनी दहा रूपये मागितले असे खोटे सांगून त्यांच्योकडून दहा रूपये घेतले व मुंबईला जाणाऱ्या रेल्वेत तो बसला 'बारा वर्षांच एक हाडकुळं, कसनुसं लेकरू देश स्वतंत्र करायला वनवासी होत होतं.'(पृ.९३)

मुंबईत काँग्रेस हाऊसमध्ये स्वातंत्र्यासाठी जी कामे होती ती कामे करण्यात लेखकाने हातभार लावण्यास प्रारंभ केला. काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून तो सहभागी झाला. प्रभात फेऱ्यांमध्ये सहभाग घेतला. पत्रके चिकटविण्याचे काम केले दरम्यानच्या काळात मगनभाई सारख्या आदर्श सत्याग्रहीशी ओळख झाली. अशाच एक प्रभातफेरीत तो सहभागी झाला होता. गोऱ्या सार्जटांनी प्रभात फेरीवर हल्ला चढविला. दंडूक्याचा एक तडाखा लेखकाच्याही पाठीत बसला. कसा बसा तिथून पळ काढला. व काँग्रेस हाऊसवर येऊन तो पोहचला. दिवसभर देशकार्य करायचे, संध्याकाळी मगनभाईशी गप्पा मारीत बसत होता. गप्पांमधून असे कळले की आपण एका उद्देशासाठी वापरले जात आहोत. 'आंदोलन चालविण्यासाठी नेत्यांना मनुष्यबळ हवं होतं एक खारटूली घरून पळून येऊन या सेतुबंधनाच्या प्रचंड उद्योगांत आपल्या परीनं वाळूचे कण टाकीत होती. तिला कोणी मना केलं नाही. कुणावरच या अस्थिपंजर जीवाची जबाबदारी नव्हती तो जेवतो कुठं, खातो काय, झोपतो कुठं, या विचारणा करायची कुणाला गरज भासली नाही. आपलं काम निभलं पुरे झालं.''(पृ.१०४)

या संग्रामातले पुढारी स्वार्थासाठी, गळ्यात पडणाऱ्या जयमाला घालून मिरवतात. स्वातंत्र्य संग्रामातील सैनिकांचे स्मरण करायचं नाटक करतात. यांच्या बलिदानासाठी खोटा गहिवर काढतात. यातून स्वातंत्र्य संग्रामातील पुढाऱ्यांची मनोवृत्ती कळते. स्वातंत्र्य संग्रामात उडी घेतल्याचा निर्णय आपण विचारपूर्वक घेतला नाही. हे लेखकाला वाटले असेल ते त्याने व्यक्त केलेल्या मतातून स्पष्ट होते. ''मी तर केवळ वरच्या अलकरणालाच मोहून त्या वणव्यांत शिरायला धडपडत होतो.''(पृ.१०४) त्यातच मगनभाईने घरी सोडण्याची तयारी दाखवली पण लेखकाच्या मानी स्वभावाला ते मान्य होण्यासारखे नव्हते. घरी तर परतायचे नव्हते मग आता पुढे काय? हा प्रश्न डोकावू लागल्यावर लेखकाने गिरगाव सोडलं आणि दादरला कोहिनूर फिल्म कंपनीच्या दारांत उभ्या असलेल्या गुरख्यासमोर जाऊन ते उभे राहिले. त्यानंतर पाटणकर नावाच्या कॅमेरामनची भेट घेतली व त्यांच्यासमोर मालवीय नावाच्या लेखकासमोर नाटकाचे जे संवाद येत होते ते म्हणून दाखविले. पाटणकरांनी लेखकाला मालवीयजींच्या घरी राहायला सांगितले व काम लागल्यास बोलावून घेऊ म्हणून सांगितले. लेखकाने तेथे नोकराचे काम केले व जेंव्हा पाटणकरांच्या घरी लग्न निघाले तेव्हा 'पाहुणा म्हणून नव्हे, त्यांना घरकामासाठी एक पोरगा हवा होता. मजसारखा हरकाम्या त्यांना कुठं मिळाला असता?'(पृ.१११) लेखकाची रवानगी पाटणकरांच्या घरी झाली. पाटणकरांच्या घरी पडेल ते काम केले पण पाटणकर एकदा

त्यांच्यावर रागावले व म्हणाले, ''मघा सांगितला होतं ते काम कोण तुझा बाप करील का गधड्या!''(पृ.११३) आपल्या वडिलांचा अपमानकारक उल्लेख केला या गोष्टीचा राग येऊन लेखकाने क्षणात ते घर त्यागले. त्यानंतर 'बालमोहन' पौराणिक नाटक जिचे मालक दामू अण्णा जोशी होते त्यांच्या बिऱ्हाडात ते दोन दिवस राहिले. पण दामूअण्णांनी पळून आलेला मुलगा हे ओळखून अधिक चौकशी सुरू केली त्यामुळे तेथूनही पळ काढला. त्यानंतर खटाववाडीतल्या प्रेसमधले पेपर पोहचविण्याचे तसेच फिरून पेपर विकण्याचे काम स्वीकारले. त्या प्रेसमधील 'लोकमान्य' दैनिकाचे संपादक सावरकर होते. सावकरांनी लेखकाला बोलावणे पाठविले. त्याची सर्व विचारपूस केल्यावर सावरकर व लेखकाचे वडील यांचा जवळचा परिचय आहे हे लेखकाच्या लक्षात आले. सावरकरांनी लेखकाला शिपाया करवी स्वतःच्या घरी जाण्यास सांगितले. निळूभाऊंना म्हणजे लेखकाच्या वडिलांना घरी बोलावून घेऊन ताब्यात देणे किंवा घरी सोडवून येणे असा सावरकरांचा विचार चालला होता. रात्री सगळे झोपले असताना लेखकाने तेथूनही गुपचूप पलायन केले. तेव्हा लेखक म्हणाले, ''दुसऱ्यांदा मी एका घरातून पळालो होतो.''(पृ.१२१) गिरगाव सोडले आणि भायखळ्यात लेखक आला. तेथे एका पारशी टॅक्सीवाल्याने रोज त्याची गाडी पुसण्याच्या मोबदल्यात जेवण देण्याचे कबूल केले. तसेच टॅक्सीत झोपण्यासही परवानगी दिली. लेखकाचे तेथे चार दिवस मजेत गेले पण  पाचव्या दिवशी मात्र टॅक्सीवाल्याने लेखकाशी अश्लिल चाळे केले. या प्रसंगानंतर मात्र लेखकाने मुंबईला राम राम ठोकला व पुणे गाठले. पुण्यात 'युनायटेड पिक्चर्स' कंपनीत प्रवेश मिळविला. तेथे त्याने पडेल ते काम केले. तेथे पांडुरंग गोरेंनी पैसे देऊन नवीन कपडे घेण्यास सांगितले व कॅमरामॅन कांबळे यांच्या घरी राहायला सांगितले. कंपनीत हरकाम्या असल्यामुळे सगळ्यांचीच कामे करावी लागत होती. तेथेही लेखकाला वाईट प्रसंगाला सामोरे जावे लागले. लॅबोरेटरीच्या इनचार्जने लेखकाबरोबर अश्लील चाळे केले. त्यानंतर तेथेच मद्रासकडच्या अभिनेत्याच्या सेवेला पाठविले. पण तेथे लेखकानेच चूक केली होती. त्या अभिनेत्याच्या खिशातून रेवड्या घेण्यासाठी दोन पैसे चोरण्यास सुरूवात केली. त्याने लेखकाला रंगेहात पकडले व तंबी दिली. खजील होऊन तो युनायटेड सिंडिकेटच्या दारांतून बाहेर पडला ते पुन्हा न परतण्यासाठी.

नंतर लेखकाने आपला मोर्चा 'आर्यन' फिल्म कंपनीकडे वळविला व दिग्दर्शकाने पळून आल्याचे ओळखून तेथून चालते होण्यास सांगितले. त्यानंतर भांबुर्ड्याला सिनेमात काम करणाऱ्या विठाबाई पवार नावाच्या अभिनेत्रीकडे कामाच्या अपेक्षेने गेले पण तिने तिचे पातळ

धुवायला लावले. जेवायला दिले व हुसकावून लावले. अन्नासाठी दशा होऊ लागली. एका मोटार ड्रायव्हरच्या कुत्र्यासाठी कसाई खान्यातून बकऱ्याची कातडी आणण्याचे काम केले त्याच्या मोबल्यात पोटासाठी अन्न व राहण्यास निवारा मिळाला. त्याच आळीत एक वस्ताद राहत होता. तो वस्ताद परिसरातील नामवंत लोकांच्या घरचे लग्न असेल तर लग्नाच्या वरातीत लाठी, बोथाटी, तरवारी, पट्टा असे कसरतीचे उपक्रम करून दाखवण्याच्या सुपाऱ्या घेत होता. एकदा त्याला एका श्रीमंत व्यापाऱ्याचे बोलावणे आले पण त्याला मदत करणारे लोक ऐनवेळी आले नाही. त्याने लेखकाला बरोबर नेण्याचा निर्णय घेतला. लेखकाच्या डोक्यावर नारळ ठेवणार व तो नारळ वस्ताद लाठीने फोडणार असे प्रात्यक्षिक केले. नारळ वस्तादाने यशस्वीरित्या अलगद फोडला. अर्थात लेखक या प्रात्यक्षिकास तयार नव्हता पण वस्तादाने त्याला पोलिसात देण्याची धमकी दिली होती. थोड्यात दिवसात वस्तादाकडून वखारवाल्याकडे लेखकाची रवानगी झाली. वखारवाला निःसंतान होता. त्याने लेखकाला घरी नेले. मुलाप्रमाणे सांभाळले. लेखकाला फसवून गारपिरला नेले. तेथे सुंता करण्याचे नियोजन केले. लेखकाला पुढील अघटिताची कल्पना आली. 'ब्रह्मांड गरगरून गेलं. पळालं पाहिजे, आता मात्र पळालंच पाहिजे. नाही तर सृष्टि बुडाली.''(पृ.१३९) असे वाटून लेखकाने तेथून धूम ठोकली. रस्त्यात एका सायकलवाल्याने त्याला पुण्यातल्या रविवार पेठेतील एका वस्तादाच्या तालमीत आणून सोडला. घडला प्रकार कथन केल्यानंतर वस्तादाने वखारवाल्याला जाब विचारला. लेखक तेथेच तालमीत राहू लागला होता. पण त्याचे मन तेथे रमेना. नाटकात काम करण्याच्या हव्यासापोटी पुणे सोडले. नाशिकला पळ काढला.

नाशिकला गेल्यावर पोटासाठी अन्नछत्रांचा आश्रय घेतला. प्रसंगी भीकही मागितली. भद्रकाली रस्त्याजवळच्या खानावळवाल्याला दया आली व त्याने लेखकाला खानावळीत नेले. येथेच्छ जेवू घातले. त्यानंतर खानावळीत वाढप्याचे काम तसेच डबे पोहचविण्याचे त्याने काम केले. खानावळीत पाट पुरविण्याचे काम देशपांडे नावाचे गृहस्थ करीत होते. त्यांनी 'सुतार काम करायला येतोस का?' अशी विचारणा केल्यावर देशपांड्यांच्या भावाच्या फर्निचरच्या दुकानात जायला सुरुवात केली. तेथे सुतारकाम शिकून घेतले. देशपांड्यांकडे लग्न निघाले. लग्नासाठी त्यांच्या घरी पाहुणी रावळी येत होती. त्या नातलगांमध्ये एक हिमालयाच्या उंचीचा माणूस येऊन उतरला. ''माझ्या जीवनाला त्या पुरुषानं निराळ वळण दिलं. सहेतुकपणं नव्हे, अहेतुकपणं.''(पृ.१५३) असे लेखकाचे मत होते. ती व्यक्ती म्हणजे देशपांड्यांच्या आईचे भाऊ

गणेश जगन्नाथ जोशी. त्यांनाच गणपतराव बाबा संबोधले जात होते. लेखकाला हे गणपतराव बाबा स्वतःबरोबर अकोल्याला घेऊन गेले. गणपतराव बाबांच्या घरी शेतीची कामे शिकून घेतली. गायी राखणाऱ्या गुराख्याच्या गैरहजेरीत गायी राखण्याचेही काम केले. गणपतरावबाबांनी लेखकाला मुलाप्रमाणे जीव लावला. बाबांकडे निवृत्तीबुवा वारकरी येत. त्यांनी लेखकाला भजनाची दीक्षा दिली. लेखकाचे जीवन सुखात व्यतिथ होत होते. पण परमेश्वराच्या मनी काही वेगळेच असावे. जिवापाड प्रेम करणाऱ्या गणपतराव बाबांचे निधन झाले. गणपतराव बाबांच्या घरात राहणाऱ्या कृष्णाबाईने लेखकाला घरात घेतले नाही म्हणून बाबांचे मित्र निवृत्तीबुवा धनगर यांच्या बरोबर ते राहू लागले. एकदा त्यांच्या बरोबर घोंगड्या विकायला किन्हवलीला गेले. त्या ठिकाणी लेखकाला गाडगेबाबांचे कीर्तन ऐकण्याचा योग आला. ''ते अदभुत कीर्तन आइकलं त्या क्षणी माझा ठाव मला सांपडला, माझी जागा जर कुठं असेल, तर ती बाबांच्या भंवताली बसलेल्या, तऱ्हेतऱ्हेचे चमत्कारिक पोषाख घातलेल्या या फक्कड बैराग्यांमध्ये.''(पृ.१८४) असे लेखकाचे मत होते. गोपाळच्या म्हणजे लेखकाच्या जीवनाला कलाटणी देणारा हा काळ होता. गाडगेबाबांबरोबर राहण्याचा निर्णय गोपाळने घेतला. गाडगेबाबांनी देहूच्या महानंद स्वामींना गोपाळला स्वतःबरोबर देहूला घेऊन जाण्यास सांगितले. महानंद स्वामींनी देहूत नेले. त्यांनी गोपाळच्या गळ्यात संप्रदायाची माळ घातली आणि गोपाळ महानंद स्वामींचा अनुगृहीत झाला. महानंद स्वामींनी त्यांना धर्मशाळेतील सगळ्या मुलांचा मास्तर म्हणून नेमले. थोड्याच दिवसात महानंदस्वामींच्या सूचनेनुसार धर्मशाळेतील मुले व धर्मशाळेची व्यवस्था पाहणारी बनूबाई यांच्यासह गोपाळ भायखळ्याला सप्ताहासाठी गेला. सप्ताहामध्ये अनेक महंताची कीर्तने ऐकली. परतीच्या प्रवासात गोपाळनेही मुक्कामाच्या ठिकाणी गावोगावी कीर्तने केली. गाडगेबाबांचे शिष्य म्हणून गावोगावी लोकांनी खूप प्रेम दिले. सर्वजण देहूला परतले.

आषाढीवारीचे सर्वांना वेध लागले. पालखीबरोबर पंढरपूरला गेले. जाताना लेखकाने वारीतील प्रत्येक प्रसंगाचे सुरेख वर्णन केले आहे. वारकऱ्यांच्या जीवनातील आनंदाचा वेध आपल्या लेखनातून घेतला आहे. आळंदी-पंढरपूर पालखी मार्गाचे सविस्तर विवेचन लेखनाच्या ओघात लेखकाने केले आहे. गोपाळ धर्मशाळेतील सर्व मुलांसह पंढरपूरला बाबांच्या धर्मशाळेत गेले. धर्मशाळेच्या मागील खोल्यांमध्ये सर्वजण झोपले, पहाटे उठले ते बाबांच्या मेघगर्जने सारख्या आवाजाने बाबा म्हणाले. ''उठा हो! उठवा त्याहिले। चाला, झाडून काढावू लागते. चला उठा!''(पृ.२००) कंबरमोडेपर्यंत झाडून काढले. एकादशीला पांडुरंगाचे दर्शन गोपाळला

घेता आले नाही. त्यानंतर बारीत उभे राहून पांडुरंगाचे पहिलं दर्शन घेतले. त्याविषयी लेखक म्हणतात, ''पांडुरंगाचं ते सौम्य स्नेहभावानं दाटलेलं मुखमण्डल दिसलं. डोळे चांदीचे लावले होते, पण मी ते पाहिले नाहित. किंबहुना मुद्रेवरला प्रत्येक अवयव पृथकपण मला जाणवलाच नाही. भान झालं ते स्मितमुखी मुद्रेचं.''(पृ.२०३) पांडुरंगाच्या या वर्णनाने वाचकही पांडुरंगाच्या चरणी लीन होण्याचा अनुभव घेतो. एवढे हुबेहूब चित्रण लेखक साकार करतात.

पांडुरंगाचे दर्शन घेतल्यानंतर परतीच्या मार्गावर महानंदस्वामी बरोबर राहुरीजवळ वरंवड येथे येऊन गोपाळ पोहोचला. वरवंडीला येण्याचे कारण म्हणजे तेथे मरीआईचे ठाणं होतं व त्या ठिकाणी शेकडो बकरी कापल्या जात. पशुहत्येविरुद्ध मोहीम उघडण्यासाठी ते वरवंडी गेले. मरीआई शेजारी पांडुरंगाचे देऊळ बांधले होते. तेथे सोनुबाई नावाची स्त्री स्वयंपाक करीत होती. नित्यनेमाने हरिपाठ होत असे. पण अचानक एका रात्री ते झोपले होते. त्या सपरीच्या पत्रावर दगड पडू लागले होते. मरीआईचे भक्त असलेले भिल्ल यांनी तो हल्ला केला होता. 'तीन चार महिने भिल्ल मारेकऱ्यांच्या धाकाखाली राहण्याची तपश्चर्या झाली होती.'(पृ.२०८)

कार्तिकी एकादशीला आळंदीच्या यात्रेला इंद्रायणीच्या पलीकडे बाबांच्या धर्मशाळेत सर्वजण येऊन पोहचले. बाबांसोबत परिसर झाडून स्वच्छ केला. तेथे गाडगेबाबांचा सहवास त्यांना लाभला. ''पूर्वी महानंदस्वामींनी गळ्यांत एक माळ घातली होती. माळ हे वारकरी सांप्रदायाचं चिन्ह. ते गुरुनं शिष्याच्या गळ्यांत घालाव लागतं. पूर्वीची माळ काढून टाकली. हातची नवी माळ घेऊन बाबांसमोर नम्रपणे उभा राहिलो. बाबांनी अनुग्रहीत केलं. गळ्यांत माळ घातली. घोंगडीचा तुकडा गळ्यांत अडकवला (पृ.२१०) वरील निवेदनातून वाचकाच्या लक्षात येते की महानंद स्वामींनी वारकरी संप्रदायाची माळ घातली. त्यानंतर गाडगेबाबांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्यासाठी त्यांचा अनुग्रह घेतला. बाबांसारखा वेष धारण केला व आळंदीहून पायवाटेने मराठवाड्याकडून गंगाखेडकडे प्रस्थान केले. कारण गंगाखेडला बाबांचा सप्ताह चालू होणार होता. जाण्याच्या मार्गात जागोजागी गोपाळने कीर्तने केली. पेहरावावरुन बाबांचा शिष्य आहे हे लोकांच्या लक्षात येई त्यामुळे लोक कीर्तनाला चांगला प्रतिसाद देत व आपुलकीची वागणुक देत होते. गोपाळने प्रवासाचे वर्णन करताना मराठवाड्यातील प्लेगच्या साथीने उध्वस्त झालेल्या गावाचे वर्णन केले आहे. ते वाचून मन सून्न झाले. मजल दर मजल करीत लेखक गोदातीरी असलेल्या गंगाखेडला जाऊन दाखल झाले. तेथे कैकाडीबुवा सप्ताहाची धुरा

सांभाळीत होते. सप्ताहाच्या सांगतेला बाबांचे कीर्तन होते. प्रचंड जण समुदायासमोर बाबांचे कीर्तन झाले.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात असलेल्या तळबीड या गावी बाबांना सप्त्याचे निमंत्रण जिजाबा मोहिते पाटील यांच्याकडून मिळाले. ''जिजाबासह साताऱ्याकडे उड्डाण केलं, ते कृष्णाकाठी येऊन पोचलो.''(पृ.२३०) असे लेखक म्हणतात. जिजाबा बरोबर सातारा, कोल्हापूरपर्यंतचा मुलुख मनसोक्त गोपाळ भटकला. सप्ताहाला अवधी असल्याने कृष्णामाईचा सारा परिसर पाहिला. शेवटी तळबीड सप्ताहाच्या ठिकाणी लेखक गेले. तेथे गेल्यावर सैन्यातल्या एका रिटायर्ड ऑफिसरकडून वसंतगड या किल्ल्याची सर्व माहिती समजून घेतली. वसंतगड, नांदगिरी, अजिंक्यतारा हे किल्ले त्यांनी पाहिले.

सोहोली हे माण तालुक्यातील जिजाबाचे गाव. दोघेही जण सोहोलीला गेले. जिजाबाशी चर्चा करताना गोपाळला कळले की त्यांच्या गावातील देवाला बकरी कापतात. गोपाळने निश्चय केला की या गावात पशुहत्या होऊ द्यायची नाही. त्यासाठी कीर्तन करून लोकांचे उद्बोधन केले. सातारा जिल्ह्यातून मोहरा परभणी जिल्ह्याकडे वळविला. परळी वैजनाथला जाऊन आले. नांदेडला गेले. त्यानंतर असोल गावी राहिले. तेथे सप्ताहाचे सर्व नियोजन केले. गावकऱ्यांनी मोलाची मदत केली. रात्री दोन-तीन वाजेपर्यंत लेखक कीर्तन करी. गाडगेबाबा येणार असल्याने दुसऱ्या दिवशीच्या जेवणाच्या स्वयंपाकासाठी लागणाऱ्या दाणागोट्याच्या मागे लेखक लागत. गाडगेबाबा कीर्तनासाठी आले. त्यांचे कीर्तन झाल्यानंतर असोलगावी आलेल्या सर्व पाहुण्यारावळ्यांसाठी स्वयंपाक केला होता. साधारण आठ-दहा हजार जनसमुदाय त्यादिवशी तेथे जेवला असेल आणि ही एवढी मोठी जबाबदारी गोपाळने पार पाडली होती. सप्ताह पार पडला.

दुसऱ्या दिवशी गाडगेबाबांसोबत नाशिकला जायचे ठरले. नाशिकला धर्मशाळेच्या इमारतीचे काम चालू होते. तेथे गोपाळने बांधकामासाठी कामे करण्यास मदत केली. त्यानंतर बांधकामाच्या खर्चाच्या हिशोबाचेही काम केले. पत्रलेखन करणे, आलेली पत्रे वाचून दाखविणे, अशी कामे गोपाळवर सोपविली होती. गाडगेबाबांनी त्यांना धर्मशाळेच्या कामासाठी किंवा गाडगेबाबांना सढळ हाताने मदत करणाऱ्या लोकांविषयी माहिती सांगितली. नाशिकहून मराठवाड्यात गेले त्यानंतर तेथे ही कीर्तने केली. परभणीला सप्ताह झाला. शेवटचे बाबांचे कीर्तन झाले. कीर्तन झाल्यावर बाबांबरोबर परभणी सोडली. परभणीकरांनी खूप प्रेम दिले.

आपल्या संप्रदायात कोणीतरी छोट्या-मोठ्या आजारांवर प्राथमिक उपचार करता येणारा असावा या उद्देशाने गाडगेबाबांनी गोपाळला भिवंडीला एका डॉक्टरांकडे नेले. त्यांनी गोपाळला प्रथमोपचार शिकविले. वारीमध्ये लोकांना गोपाळने प्रथमोपचार करावा असा त्यांचा उद्देश होता.

विदर्भामध्ये मूर्तिजापूर तालुक्यातील ऋणमोचनला पौष महिन्यात यात्रा भरते. बाबांचे सर्व शिष्य तेथे दाखल झाले होते. बाबाही आले. एके दिवशी एका मारवाडी सज्जनाने सदावर्ताच्या जेवणात वाढण्यासाठी बुंदीचे लाडू पाठवून दिले. सर्व शिष्यगणांना भूक लागली. तेव्हा त्यांनी एकमेकांना लाडू दिले. प्रथम गोपाळने सुरूवात केली. 'एकमेकांना लाडू वाटीत अवघ्यां या चट्टामट्टा करून टाकला.'(पृ.३१९) पंगतीत बाबांनी लाडू वाढण्यास सांगितले आणि गोपाळने केलेली चूक उघडकीस आली. तेव्हा गोपाळने स्वतःची शीर कापण्याचा प्रयत्न केला पण तो असफल झाला. त्यानंतर बाबांनी त्यांना प्रेमाने समाजवून सांगितले. दरम्यानच्या काळात जेवणाचे नियम न पाळल्याने गोपाळच्या हाता-पायाला खाज सुटे व खाजवले की व्रण होई. या आजारावर कसबे गव्हाण नावाच्या गावात बळिराम नागोजी गोमासे ह्या व्यक्तिने गोपाळला उपचार घेण्यास भाग पाडले. चान्दमीयाँ नावाचे वैद्यांनी कडक पथ्ये सांगितली व योग्य तो उपचार केला. उपचारा दरम्यानचा एकांतवास खायला उठत होता. पण बळीराम बुवा आणि चान्दमीयाँ खूप श्रद्धेने उपचार करीत होते, म्हणून गोपाळनेही इच्छा नसताना उपचार करून घेतले. रोग बरा झाला.

त्यानंतर बाबूराव यादव नावाच्या व्यक्तीने रत्नागिरी जिल्ह्यातील खवटी येथे सप्ताह आयोजित केला होता. तेव्हा गोपाळला वाटले, ''माझ्याही मनी भूत भरलं, की जिथं आपण आयुष्याची दोन वर्ष काढली, तिथं (पृ.३३४) बाबांकडून तारीख घेतली व अकोल्यास गेले पण ज्या प्रमाणे सप्ताहाला इतर गावांमध्ये गोपाळला सहकार्य मिळाले तसे सहकार्य त्यांना अकोल्याला मिळाले नाही. शेवटच्या दिवशी बाबा येणार होते पण बाबांची गाडी मध्येच बंद पडली. त्यावेळी बाबांना यायलाच उशीर झाला. गोपाळला लोकांच्या रोषाला सामोरे जावे लागले.

बाबांचे पत्रलेखनाचे काम गोपाळ करीत होता. पत्राचा मायना लिहिण्यावरून वादंग निर्माण झाला. त्या पत्रात गाडगेबुवांचे अनंतकोटी नमस्कार असे लिहित. त्याऐवजी त्यांच्या ज्येष्ठ गुरूबंधूने सुचविले की ''गाडगेबुवांचे, याऐवजी तूं 'सदगुरु श्री गाडगेमहाराज यांचे' असं लिहिलं पाहिजेस.''(पृ.३४३) गोपाळ ब्राह्मण आहे. म्हणूनच असा वागतो. नाना प्रकारच्या

आरोपांची धूळ उधळली जाऊ लागली वाईट आणि बीभत्स.(पृ.३४४) या घटनेने गोपाळ व्यथीत झाला व त्याच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

गोपाळने देहूला जाण्याचा निर्णय घेतला. अर्थात गाडगेबाबांच्या परवानगीने. पण नंतर मन रमेना म्हणून आळंदीला गेले. तेथे मारुतीबुवा गुरव ज्ञानेश्वरी शिकवित होते. ज्ञानेश्वरीने मन अगदी वेधून गेले होते. अभ्यास करण्यासाठी भंडारा डोंगरावर राहायचे त्याने ठरविले. ज्ञानेश्वरी व गाथा विकत घेतली व भंडारा डोंगर गाठला. राजाराम परीट नावाचा मित्र ही त्यांना शोधत भंडारा डोंगरावर पोहचला. शेजारील गावांतून माधुकरी आणावी. ती खावी व भरपूर अभ्यास करावा असा दिनक्रम होता. गाथेतील अभंगाचे पाठांतर केले.

ज्ञानेश्वरी शिकण्यासाठी आळंदीला गेले. तेथे मारूती बुवांचे विद्यार्थी म्हणून राहिले. पण तत्पुर्वी वारकऱ्याचा वेष धारण केला. मारुतीबुवांनी लेखकावर पुत्रवत प्रेम केले. लक्ष्मणशास्त्रींकडे अमृतानुभवाचे धडे घेतले. दरम्यानच्या काळात 'केसरी'मध्ये येणाऱ्या वृत्तांमुळे चलबिचल झाले. मराठवाड्यातील लोकांवर मुसलमान राज्यकर्त्यांकडून अत्याचार होत होता. त्यासाठी आंदोलनात सहभागी होण्यासाठी गोपाळ गेला. त्याला जेलमध्येही जावे लागले. आंदोलनावरुन आल्यावर ज्ञानेश्वरीचे सिद्धबेटावर पारायण केले.

आचार्यांचे तत्वज्ञान शिकण्यासाठी मारूतीबुवांच्या मार्गदर्शनाखाली धुळ्याच्या श्रीधर पाठकांकडे गेले. श्रीधर पाठकांना गोपाळ अतिशय बुद्धीमान मुलगा आहे हे पटले. श्रीधर पाठकांनी गोपाळला 'घरी भेटून आलास तरच मी तुला माझ्याकडे ठेवून घेईन अन्यथा नाही.' घरी गेल्यावर गोपाळला कळले. आपण घर सोडून गेल्यावर दोन वर्षांनी माई व चार वर्षांनी वडील देवाघरी गेले. आणि आई खानावळी घालून कुटुंब चालवत असल्याचे पाहिले. दोन दिवस राहून पुन्हा श्रीधर पंडीतांकडे तो गेला. श्रीधर पंडितांनी त्याची योग्यता ओळखून नर्मदा परिक्रमा करण्याची जबाबदारी सोपविली. नर्मदा परिक्रमा करताना आलेल्या निरनिराळ्या अनुभवांचे कथन लेखकाने केले आहे. नर्मदा परिक्रमा पार पाडल्यानंतर ते पुन्हा श्रीधर पाठकांकडे गेले. श्रीधर पाठकांकडे राहत असताना गोखले नामक युवकाने जे प्रबोधन केले ते ऐकण्याचा योग आला. बाबासाहेब आपटे नामक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यकर्त्याने इंदूरच्या दिवाळी शिक्षण वर्गासाठी आमंत्रण दिले व त्यानंतर पुन्हा एकदा त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली. गोपाळ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता बनला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य तन, मन, धन अर्पूण केले.

वयाच्या तिसाव्या वर्षांपर्यंतचा कालखंड लेखकाने या कादंबरीत लिहिला आहे. लेखक उत्तरार्धात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य करीत होते. पण छातीत दुखण्याच्या तक्रारीमुळे त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य करण्यास परवानगी नाकारली त्याचे कारण म्हणजे अनियमित खाण्यापिण्यामुळे प्रकृतीचा तोल हरपला होता. जखमी सैनिक म्हणून छावणीकडे परत निघालो आहे.(पृ.५५७) अशी व्यथा लेखकाने व्यक्त केली आहे. तेरा ते तीस ही सतरा वर्ष लेखक धावला न खचता, न दमता. लेखक अखेरीस म्हणतो ''जीवनाविषयी मी अतिशय कृतज्ञ आहे.''(पृ.५५८)

**३.२.५. सत्तांतर :**

'सत्तांतर' ही कादंबरी लेखक व्यंकटेश माडगुळकर यांनी वानर या प्राण्याच्या विश्वासंबंधी लिहिली आहे. वानरांच्या टोळ्या आणि त्या टोळ्यांमध्ये होणारी सत्तास्पर्धा याचे चित्रण लेखकाने केले आहे. आपली प्रतिमा उंचावण्यासाठी प्रतिष्ठा मिळविण्यासाठी, आपली अस्मिता जपण्यासाठी, इतरांवर वर्चस्व गाजविण्यासाठी मनुष्य प्राणी सतत झटत असतो. त्या प्रमाणे वानरांमध्ये ही ती वृत्ती दिसते. ताकदवान वानर आपल्या ताकदीच्या जोरावर नेता बनतो व आपल्या टोळीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. याचे यथासांग वर्णन या कादंबरीत आहे. या मुख्य आशया बरोबरच घनदाट जंगलाची पार्श्वभूमी, वानरांचे दैनंदिन जीवन, इतर प्राण्यांचा सहसंबंध, वानरांच्या वागण्याच्या तऱ्हा, सवयी, दुसऱ्यांच्या सीमेवर आक्रमणाची वृत्ती माद्यांच्या निवड करण्याच्या पद्धती यांचे वर्णन आले आहे. त्यांचे परस्परांमधील प्रेम, द्वेष, तिरस्कार यांचे हुबेहुब चित्रण डॉ.रेखा वडिखाय ''या प्राण्यांना असणारे इतर प्राण्यांचे भय, वानरांमध्ये असणारी कमालीची सत्तास्पर्धा, बदल्याची भावना आणि एक संपला तरी समोर उभा होणारा नवा शत्रू, असे सत्तास्पर्धेचे चित्रण करतात. हे चित्रण प्रतीकात्मक पातळीवर पोचून सत्तेची लालसा, कौर्य, हिंसा आणि वासना या आदिम प्रेरणांचे दर्शन घडते.''[६] 'सत्तातंर' या कादंबरीला १९८३ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. कादंबरीचे लेखकाने आठ भाग केले. आठ विभागातून ही कादंबरी साकार झाली आहे.

कादंबरीचा प्रारंभ दुपारच्या टळटळीत उन्हाच्या पार्श्वभूमीने झालेला आहे. दुपारी प्राणीजीवन स्थिरावल्याचे वातावरण आणि अचानक सहा भटक्या नरांची झुंड घुसखोरीच्या प्रयत्न करतो आणि जंगलातील शांतता भंग पावते. त्यानंतर कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने वानरांना वेगवेगळी नावे दिलेली आहेत. ती प्रामुख्याने त्यांच्या स्वभावाला, शारीरिक

ठेवणीला त्यांच्यात असणाऱ्या व्यंगाला अनुसरुन अशी आहेत. सगळ्या टोळीत वयानं झालेली बाजुला -एकटं एकटंच राहण्याचा स्वभाव असलेली बोथरी (पृ.३) 'टोळीचा नेता हुप्या इ. अचानक जमिनीतून वर फुटावा तसा झाडीतून उड्या ठोकीत बाहेर आला.'(पृ.३) या हुप्याच्या डाव्या कानाचा, वरच्या बाजूला मोठ्ठा तुकडा हाणामारीत गमावला होता. म्हणून नेत्याचे नाव मुडा होते. 'अंगानं थोराड, फारशी छाती ओघळलेली नाही, नाक-डोळे जिथल्या तिथं. चपळ, बळकट दातांची अशी एक तरणीताठी होती, तिचा मान टोळीत मुडाच्या खालोखाल'(पृ.६) तिचे नाव तरणी होते. बिबट्याच्या तावडीत सापडलेली म्हणजे 'जिवावर बेतलं होतं, ते शेपटावर निभावलं. ती ही लांडी!'(पृ.७) अंगानं लहानखोर, वयात आलेली, शहाणी झालेली. 'बाकीच्या कुणीही लहान धाकट्या पोरीजवळ ओढून ओढून ती नरासारखी त्याच्यावर चढायची.'(पृ.७) अशी उनाडी. पोरवयात जिच्यावर एका तापट डोक्याच्या घुसखोर वानराने हल्ला केला आणि तिचा हातावर चावा घेतला त्यामुळे तिला डावा हात दंडापर्यंतच होता म्हणून ती 'थोटी' त्यानंतर 'बोकांडी' नावाप्रमाणे भांडण उकरुन काढणारी व ज्या वानरीवर तिचा राग असे अशा वानरीला बेसावध गाठून ही चार पायांनी तिच्यावर उडी घ्यायची. सर्वात थकलेली, म्हातारपणाच्या सर्व खुणा तिच्या व्यक्तिमत्त्वातून दिसतात अशी 'बोथरी'. तिची धाकटी बहीण होती तीही अशीच मळकट दिसायची. चार तान्ही पोरं, नुकत्याच वयात आलेल्या दोन वानरी, सव्वा-दीड वर्षांची तीन नर पोरं. अशा प्रकारे मुडा आणि त्याच्या टोळीतील वानरगण यांचा परिचय लेखकाने वाचकाला करुन दिला आहे.

उन्हाळ्यात तळ्याकाठी जाऊन पाणी पिण्याशिवाय पर्याय नव्हता. टोळीचा पाणी पिण्याचा वृत्तांत लेखकाने वर्णन केला आहे. तळ्याच्या काठी असलेल्या सागाच्या झाडावर मुडासह टोळी जमा होत असे. 'कोणातीही धारिष्ट्याची गोष्ट करताना आणीबाणीचे क्षण अगदी थोडे असतात आणि त्यांना सामोरं जाणं हीच खरी परीक्षा असते.'(पृ.१०) ही जोखीम घेण्याची जबाबदारी मुडा आणि तरणीवर होती. प्रथम मुडा मोठ्या सावधगिरीने तळ्यावर उतरला. त्यासाठी मुडाच्या पाठीशी हातभार अंतरावर तरणी सगळीकडे लक्ष देत उभी राहिली. तीन पोरं ही मुडाजवळ आली. मुडाने पाणी पिलं व तो चटकन झाडावर चढला मुडाने जिथे तोंड पाण्याला लावलं तिथचं तरणी पाणी प्याली. त्यावेळी पोरं राखणदार झाली. असेच एकमेकांची काळजी घेत सर्वजण पाणी पिले.

संध्याकाळी दिवस बुडायच्या वेळी मुडाला काहीतरी धोका असल्याचा अंदाज आला. म्हणून त्याने इशारा दिला सर्वांनी सुरक्षित ठिकाणी बसा खाली उतरु नका. बोथरीला वाटले ती ज्या झाडावर बसली होती ते झाड सोडून दुसऱ्या सुरक्षित झाडावर बसावं ती खाली उतरली व दुसऱ्या झाडावर चढणार त्या अगोदरच रानकुत्र्यानं बोथरीवर झेप घातली रानकुत्र्याच्या संपूर्ण कुटुंबाने बोथरीवर हल्ला केला. सर्वजण तिचे मास खाण्यावर तुटून पडले. दोन-अडीच तासात बोथरीचा चट्टामट्टा केला. 'वासाखेरीज तिथं आता काही निशाणी राहिली नव्हती.'(पृ.१३)

अशा प्रकारे कादंबरीच्या पहिल्या भागात लेखकाने जंगल जंगलातील प्राणी, उन्हाळ्याचे दिवस, झाडे, तसेच विशेष करुन वानरांच्या टोळ्या व त्यातील मुडा वानराच्या टोळीचे सहा घुसखोर वानर नरांच्या संघर्षाच्या पूर्वसूचना निर्देशीत केलेल्या आहेत. जंगलातील वानरांच्या टोळ्यांमधील संघर्ष, मुडाच्या टोळीचा परिचय, पाणी पिताना वानरांची विलक्षण दक्षता, बोथरीचा हृदयद्रावक झालेला शेवट याचे वर्णन केलेले आहे.

दुसऱ्या भागामध्ये प्रथम दर्शनी लेखकाने वानरांच्या टोळीचा दिनक्रम सांगितला आहे. सूर्य उगवून वर आला की झाडाच्या शेंड्याला उन्हं खात किंवा खाली जमिनीवर ती उतरत 'सकाळची वेळ इकडून तिकडं हलण्यात, पोटपाणी करण्यात जाई.'(पृ.१४) दुसऱ्या प्रहरी शांतता. तिसऱ्या प्रहरी पुन्हा हालचाल सुरु होई. फळं, पानं खात, उड्या घेत हळूहळू सगळी टोळी रात्रीच्या मुक्कामाकडे सरकत राही. रात्री बहुधा शांतता असे.

मुडा आणि लालबुडा यांच्या टोळ्या शेजारी रहात होत्या. लालबुड्या हा तेरा जणांचा प्रमुख होता. चारोळीच्या वृक्षाखाली पडलेल्या चारोळ्या खाण्यात उनाडी दंग होती. तिला पाहून सर्वजण चारोळ्या खाऊ लागले पण जेव्हा तरणी किंवा मुडा आले तेव्हा सर्वजण बाजुला झाले म्हणजेच थोडक्यात आपल्या नेत्याला व त्याच्या लाडक्या वानरीला त्यांनी दिलेला व्यक्त केलेला तो आदर होता. मोगा आणि त्याचे पाच साथीदार यांची भटकी किंवा लुटारु टोळी होती. मोगाला मुडाच्या टोळीत जे काही चांगले होते त्या सर्व गोष्टींचा हव्यास होता. लालबुड्या व मुडाच्या टोळीमध्ये संघर्ष होई पण तो लुटपुटीचा असे. जणू त्या एकमेकांशी संघर्ष करण्याचे शिक्षण घेत असतं. त्यांच्या टोळीतील भांडण खोटं म्हणता म्हणता खरं भांडण होऊ नये, याला सगळेजण जपत. 'निकराच्या चकमकीत विनाश होत तो टाळून आपआपल्या ताकदीचं प्रदर्शन प्रतिस्पर्ध्याला व्हावं. असाच सगळा रोख होता.'(पृ.१८) एकदा थोटीच्या पिलाला शेजारच्या टोळीतील वानरीन पळवल तेव्हा त्याला परत मिळवण्याच्या प्रसंगाचे

नाट्यात्मकवर्णन लेखकाने केले आहे. लालबुड्या व मुडा यांच्यात कार्य ठरलेले असे. सकाळी झोपेतून जागं होताच आज कोणत्या दिशेला जायचे हे ठरविण्याचे काम लालबुड्या करी. एकदा लालबुड्याचा काहीच प्रतिसाद नाही म्हणून मुडा लालबुड्या हद्दीत शिरला. नुकत्याच शहाण्या झालेल्या वानरीच लक्ष मुडाकडे जाताच तिने त्याला जुगण्यासाठी संकेत दिले. त्यावेळी बाकी सगळी टोळी वडफळं खाण्यात गर्क होती.

लालबुड्याच्या नाहीशा होण्याने कथानकात मोगा या नायकाचा उदय होता. लालबुड्याच्या टोळीमध्ये सातवानरी आणि दोन कळती पोरं होती. मुडाचा डाव होता की लालबुड्याच्या टोळीवर सत्ता गाजवावी. दोन्ही टोळ्यांचा स्वामी होण्याची त्याची इच्छा होती. 'मुडा अधिक सामर्थ्यवान होणार होता.'(पृ.२४) पण जेव्हा लालबुड्या नाहीसा झाल्याचा सुगावा मोगाला लागला तेंव्हा मोगा ने लालबुड्याच्या टोळीतील वानरीला वश करण्याचा प्रयत्न केला. याअगोदर तिने मुडालाही आपलेसे केले होते. 'सगळ्या वानरींच्या देखत तिनं हा नवा धनी निवडला होता.'(पृ.२६) पण जेंव्हा मुडाने हे पाहिले तेव्हा त्याने मोगाला पळवून लावले. मुडाला शह देण्यासाठी म्हणजे मोगाने आपल्या टोळीतील पाच तरुण वानरांसह लालाबुड्याच्या टोळीत घुसण्याचा प्रयत्न केला. मुडाही थोडा सांभाळून राहिला.

वाघाने कांचनमृगाचा पाठलाग केला. कांचनमृग जिवाच्या आकांताने पळत होता. पळत-पळत त्याने तळे गाठले. वाघ तळ्यापर्यंत आला थोड्या पाण्यातही शिरला पण मृग फार पुढे गेले हातची शिकार गेल्यामुळे वाघ चरफडत मागे वळाला मृग मात्र पायात, त्राण नसले तरी पैलतीर गाठण्याच्या प्रयत्नात होते. पण मगरीने डाव साधला थकलेल्या मृगावर आक्रमण केला. मृगाने सुटण्याचा निष्फळ प्रयत्न केला आणि अल्पावधीत सारीकडे शांतता पसरली. झाड सोडून कोणीही प्राणी खाली आला नाही.

अशा प्रकारे कांदबरीच्या तिसऱ्या भागात लेखकाने मोगा आणि त्याचे पाचही जोडीदार पेढारी (बेवारसनर) लालबुडाचा बेधडक घुसण्याचा प्रसंग चित्रित केला. पुढे कांचनमृगाचा पाठलाग करणार वाघ आणि मृगाचा मगरीकडून होणारा अंत ह्याचेही चित्रण लेखकाने या भागात केले आहे.

चौथा भाग हा लालबुड्याच्या चरित्रावर प्रकाश टाकणारा आहे. लालबुड्याच्या बाबतीत 'जीवन' हा अपघात होता. सात वर्षापूर्वी एका लहानशा टोळीत मध्यानरात्री लालबुड्याचा जन्म झाला. आई, मावश्या यांच्या प्रेमात तो वाढत होता. बाज पक्ष्याने

त्याच्याबरोबर खेळणाऱ्या छोट्या पिलाला उचलून नेले या प्रसंगाने लालबुड्या धास्तावला पण पुढे तो मित्रामध्ये खेळून आत्मनिर्भर बनला. थोड्याच दिवसात टोळीतील बरोबरीची पोरं, पोरी व वानरी त्याला भिऊ लागल्या टोळीत याची जागा बऱ्याच वरच्या क्रमांकाची झाली. आणि एके दिवशी त्याची व त्याच्या भावाची टोळीतून हाकालपट्टी झाली 'भडक माथ्याच्या बापानं पोरांना घराबाहेर हाकलून द्यावं तसं त्यांना हाकलून लावण्यात आलं'(पृ.३७) कदाचित लालबुड्याचे वाढते वर्चस्व त्यांच्या टोळीप्रमुखाला रुचले नाही. पुढे हाच प्रमुख बनेल या भीतीने त्याला टोळीतून हुसकावून लावले. असेच हाकललेले एकत्र गोळा झाले, व लालबुड्या त्यांचा मालक बनला. शेजारी राहणारा मुडा लालबुड्याचा लाडका शत्रू होता. त्या दोघांच्या टोळ्यात वानरी सतत भांडण होतं. पण नर हाणामारी टाळत कारण, 'सर्वंकष युद्ध पुकारणं म्हणजे आत्मनाश आहे, हे जणू त्यांना कळलेलं होतं.'(पृ.३८) आपली टोळी सोडून हद्दीपलीकडे जाणे लालबुड्या टाळत असला तरी कधी तरी त्याला टोळी सोडून जाण्याचा त्याला मोह होई. लांडोरी, चितूर, रानकोंबडी यांची अंडी शोधून खाण्याची जोखीम तो स्वीकारी. असेच एकदा चितूर पक्षिणीनं घातलेल्या अंठड्यावर डल्ला मारण्याच्या प्रयत्नात पाचोळ्यावर पडलेला हात सर्पावर पडला त्यासरशी फुत्कारुन त्यानं हाताचा चावा घेतला. त्याच्या हाताचा पंजा सुजला. वेदनांचा आगडोंब उसळला 'रात्री कधीतरी लालबुड्या अंधारात, भुतासारख्या पांढऱ्या दिसणाऱ्या करु झाडाच्या बुडाशी मरुन पडला. सकाळी टकाचोर पाखरांना लालबुड्याच्या मृत्यूचा पत्ता लागला. चोची खूपसून त्यांनी पोटपूजा केली क्रमाक्रमाने गिधाडं, तरस आणि कोल्हे यांनी लालबुड्याची नामोनिशाणी ठेवली नाही.'

अशा प्रकारे या भागात लालबुड्याच्या गायब होण्याच्या घटनेचा उलगडा करताना वानरांचा जन्म, त्यांचे बालपण, नर असल्याने टोळीतून हाकलून देणे. हाकलून दिलेल्या अशा बेवारस वानरांची टोळी होणे त्यांचा प्रमुख्य (हुप्या) होणे हा जीवनक्रम स्पष्ट केला आहे तसेच शेवटी लालबुड्याचा करुण अंत हा प्रसंग लेखकाने साक्षात उभा केला आहे.

सत्तेसाठी संघर्ष हा या कादंबरीचा मुख्य आशय आहे. सत्तांतर हा प्राण्यांचा स्थायीभाव आहे. ताकदवान, बुद्धीमान आहे, तो सतत आपले वर्चस्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. मोगाने मुडाच्या ताकदीचा अंदाज घेतला. लालबुड्या नाहीसा झाला पण लालबुड्याची टोळी आणि मुडाची टोळी एकत्र येण्याची शक्यता धुसर झाली आणि दोन्ही टोळ्या एकत्र झाल्या तरी टोळीमध्ये वानरीचीच संख्या वाढणार होती. याचा बुद्धीचातुर्याने विचार करुन मोगाने मुडाच्या

टोळीवर हल्ला केला. मुडाला प्रथम मोगाच्या टोळीतील तरुण नराबरोबर दोन हात करावे लागले. थकलेल्या मुडावर नव्या दमाने लगेच मोगा ने हल्ला चढविल्यामुळे मुडा जखमी झाला. मोगाने पुढे लागोपाठ तीन दिवस मुडाच्या टोळीवर हल्ला चढविला. तिसऱ्या हल्ल्यात मात्र मुडाने पराभव पत्करला व टोळी सोडून तो पळाला. पाणी पिण्यासाठी तो पाणवठ्यावर गेला क्षणभर रक्तबंबाळ झालेलं स्वतःचे प्रतिबिंब त्याने पाहिले. जखमी मुडा पाण्याच्या काठी एकाकी, असा मरुण पडला म्हणजे पाचव्या भागात मोगा व मुडाच्या लढाईत मोगा सरस ठरला व मुडाचा अंत झाला.

पुढच्या भागात मोगा मुडाच्या टोळीवर आपला अधिकार गाजविण्यासाठी धडपडू लागला. काणीचा पाठलाग करीत राहिला. मोगाच्या तावडीतून काणी व तिच्या बाळाला सोडविण्यासाठी बोकांडी, लांडी, बोथरीची म्हातारी बहीण मदतीला गेल्या. लेकूरवाळ्या वानरी मोगाला टाळीत होत्या पण गर्भार असलेल्या तरणीला मात्र चळ भरला, वासना झाली ती मोगाचं लक्ष स्वतःकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करीत होती, पण मोगाने तिला टाळले व तो काणीकडे आकर्षित होताना दिसला. मोगाने लांडीचं पोर तिच्या कवेतून हिसकावून घेतले. ते आपल्या बगलेत धरलं. पोराची डावी मांडी दातात धरली. लांडी, बोथरीची बहीण आणि एक तरणं पोरं मागून धावलं पण मोगाने पोराला सोडलं नाही. पोराच्या डाव्या बेगलेचा लचका त्याने तोडला व शेवटी हे जखमी पोर आईदेखत मेलं पण आईला ते कळलच नाही. 'पोराला मारुन चार दिवस झाले, तरी तिनं त्याला टाकलं नाही. घेऊनच हिंडत होती. पोरं मेलं होतं, तरी तिचं आईपण मरत नव्हत'(पृ.५०) मोगानं टोळीतील उरलेली तीन पोरं मारली. थोटी मात्र आपलं पोर घेऊन टोळी सोडून दूर रानात पळाली. धोक्यातून सुटलेल्या एकत्रीकरणातून पुन्हा टोळी बनते.

सातव्या भागाची सुरुवातच पावसाच्या आगमनान झाली रानडुक्करं, रानगवे, चितळ पाण्यावर आले. आकाशात इंद्रधनुष्यांची कमान तयार झाली. तिसऱ्या प्रहरी आभाळात काळे ढग जमले विजा कडाडू लागल्या. मोर, तितिर, साळुंक्या पावसाच्या आधी आसरा शोधू लागल्या. नीलकंठ, हळदुले, कवडे, बगळे, खंडे झाडावरून तळ्याकडे व तळ्याकडून झाडाकडे भिरभिरत होते. आभाळातून मोठ मोठ्या शेंबांनी तिरकस उड्या घेतल्या तळ्यावर तांबड्या लाह्या फुटू लागल्या. तहानलेल्या जमिनी आकंठ पाणी प्याल्या. चितळ-हरणांच्या कळपांनी आनंद व्यक्त केला.

मोगाच्या अधिपत्याखाली असलेली वानरं तळ्याकाठच्या जांभळीची फळ खाण्यात दंगली. झाडाखाली चितळाचा कळप वानरांनी टाकलेली जांभळ खाण्यात दंग होती. मोगाने धोक्याचा संकेत दिला. कळपातील मोठ्या मादीलाही बिबट्याचा वास आला ती पळाली, तिच्या मागोमाग सारा कळपही उधळला. बिबट्या जांभळीपर्यंत येताच चितळांचा कळपही उधळला. मोगाच्या बरोबर आलेल्या नरांनी मुडाबरोबर हाणामारी केली त्या पाचही नरांना लालबुड्याच्या बेवारशी टोळीत घुसखोरी केली. पाच नरांपैकी एकच खऱ्या अर्थानं नर पदवीला पोहचलेला होता. प्रथम दर्शनी पाची नर एकत्र फिरले पण माद्या दिसताच चौघात दणकट दाढीवालाच बळवंत ठरला. तिन्ही माद्यांशी तो पुनः पुन्हा जुगला. लालबुड्याच्या बेवारस टोळीला दाढीवाल्याच्या रुपाने म्होरक्या मिळाला. दाढीवाल्याचे चार साथीदार व मुडाच्या टोळीतील दोन पोरं असे सहाजण एकत्र येऊन त्यांची भटक्यांची टोळी बनली ' लालबुड्याच्या बेवारशी टोळीत घुसखोरी केली.'लालबुड्याच्या बेवारशी टोळीला नर मिळाला, सहा भटक्यांची टोळी पुन्हा परागंदा झाली.'(पृ.५६) थोड्याच काळात थोटी आपल्या पिलासह दाढीवाल्याच्या टोळीत सामील झाली. दाढीवाला सत्ताधारी बनला. म्हणजेच 'कालचे पेंढारी आजचे सत्ताधारी झाले होते.'(पृ.५७) मोगा व दाढीवाला यांनी स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले होते. ते एकमेकांशी कसे वागणार हे त्यांनी निश्चित केले नव्हते. 'काळाप्रमाणंच संघर्षही सतत वाहतच राहतो. त्याला खंड तसा नसतोच. असली तर भरती असते, पूर असतो. जेव्हा जेव्हा खाणारी तोंड भरमसाठ वाढतात, गर्दी होते, तेव्हा तेव्हा संघर्ष बळावून उठतो. जेव्हा उपलब्ध आत भूतीत वाटेकरी निर्माण होतात, तेव्हा संघर्ष उचल खातो. जेव्हा अस्थिरता निर्माण होते, एखादी जात धोक्यात येते, बाहेरुन परकं कोणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो. ज्यांना बोलता येतं, ते हा राग, उद्दामपणा, संघर्ष शब्दांतून दाखवितात, ज्यांना बोलता येत नाही त्यांचे रागलोभ, प्रेम हावभावातून, स्पर्शातून सांगितलं जातं. संघर्ष पेटला की शस्त्रास्त्र वापरली जाता. ज्यांना शस्त्रास्त्र माहितच नसतात ते सुळे, नख वापरतात. संघर्ष सर्वत्र भरुन राहिलेला असतो.'(पृ.५७) लेखकाच्या वरील भाष्यातून कादंबरीचा आशयवेध उलगडला जातो. मीरा तारळेकर सत्तांतरच्या कथानकाविषयी म्हणतात, ''सत्तांतर या कादंबरीत आरंभापासून अखेरपर्यंत वानरांच्या टोळयांचे सुक्ष्म मार्मिक चित्रण येते. कमीतकमी शब्दात माणूस तर त्यांनी रेखाटलाच होता, माणसाच्या सनातन गाभ्याचा गर शब्दाच्या नसानसातून भरताना सत्तांतरसारख्या कादंबरीतून त्यांनी प्राण्यांचे विश्‍व जिवंत करायला सुरुवात केली.

माकडाच्या प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळयांची घुसखोरी, त्यांचे संघर्ष, बचावाच्या भूमिका, मातृप्रेम, नायकत्व, माद्यांसाठी केलेल्या हाणामाऱ्या यातून सत्तांतरमध्ये प्राणीदर्शन गाढच होत राहिले.''७

मोगाने मुडाच्या टोळीचा ताबा घेतला होता. मुडाच्या टोळीतील माद्या मोगाला समर्पित झाल्या होत्या. मोगा उनाडी मागं हिंडत होता. जुगत होता. ती गर्भार राहिल्यावर लाजरी बरोबरही मोगा जुगत होता. लेकर गमावलेल्या माद्याही टोळीत होत्या. पावसाने निसर्ग बहरायला लागला होता. पावसाळा येऊ घातल्यामुळे पाखरांची घरटी बांधण्यासाठी धडपड सूरु झाली. ढोकरी पक्षांनी चिंचेचा महावृक्ष शोधला. त्यावर घरटी बांधायला सुरुवात झाली. त्यानंतर पाणपक्षी, साळुंक्या, गायबगळे, करकोचे, पाणकावळे यांनीही घरटी बांधली. घरटी बांधून झाल्यावर ढोकरी, पक्षी माद्यांची वाट पाहू लागले माद्यांचा थवा दिसल्यावर नरांनी माद्यांना हाका दिल्या. माद्या योग्य नराची निवड करु लागल्या त्यांना आकर्षक वाटणाऱ्या नराकडे माद्या जाऊ लागल्या जोड्या जमल्यानंतर घरट्यांचा ताबा माद्यांनी घेतला. घरटे नीट नेटके, बळकट करण्यासाठी सामान आणण्यासाठी नरांना पाठवित नरांना आणलेल्या योग्य काड्या निवडून घरटे नीटनेटकी करीत, पावसाळ्यात वानरं जमिनीवर उतरत नसत ढोकरीच्या अंड्यातून लोकरीच्या गोळ्यांसारखी पिलं जन्माला आली. पिलाच्या आई-वडिलांनी पिल्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था करण्यासाठी घरट्याबाहेर पडण्यास सुरुवात केली. ढोकरींची, पाण कावळ्यांची, गायबगळ्यांची पोरं, चिंचेच्या झाडावर वाढत होती. तळ्याकाठावर उलथून पडलेल्या जांभळीच्या खोडाखाली पंज्याने खड्डा खोदून मगरीने तिची अंडी लपवली होती. नव्वद दिवसांनी अंगठ्याच्या टरफलातून दीड-दीड वीत लांबीची पिलं बाहेर आली. त्या पिलांना घेऊन मगर तळ्यात शिरली. गर्भार तरणीला चिमुरडं पोरं झालं. 'हा पोर मुडाचा होता. सत्तांतरानंतर जन्माला आल्यामुळेच केवळ तो वाचणार होता.'(पृ.६२) मुडाचा हा मुलगा जगला वाचला तर मोगाला संपवून टोळीचा मालक होणार असे मत लेखकाने व्यक्त केले. म्हणजेच सत्तासंघर्षाचे हे चक्र वर्षानूवर्षे अविरत पणे फिरत राहणार हा संकेत देऊन कादंबरीचा समारोप होतो.

### ३.२.६. झोंबी :

१९८७ मध्ये 'झोंबी' लिहून वाचकांसमोर आली आज त्या गोष्टीला जवळजवळ ३१ वर्षे पूर्ण झाली पण आजही मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागातून शहराकडे महाविद्यालयीन शिक्षणासाठी विद्यार्थीवर्ग येत आहे. आजही ग्रामीण भागातले हे आनंद यादव परिस्थितीशी

असेच झगडत आहेत म्हणून यादवांचे हे पुस्तक म्हणजे ग्रामीण भागातल्या शिक्षणासाठी संघर्षशील असणाऱ्या मुलांसाठी प्रेरणादायी आहे, असे मला वाटते.

'झोंबी' ह्या आत्मचरित्रात्मक कादंबरीसाठी आनंद यादव यांना १९९० चा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला. वयाच्या पन्नाशीत यादवांनी झोंबीचे लेखन केले. यादवांनी झोंबीचे लेखन लालित्याच्या अंगाने केलेले आहे. त्यामुळे ही आत्मचरित्रात्मक कादंबरी वाचताना वाचक एकरुप होऊन जातो. त्यातला प्रत्येक अनुभव जिवंत वाटतो. असा अनुभव वाचक घेत राहतो व हेच त्या कादंबरीचे वेगळेपण आहे. आयुष्यात बालपणात घडलेल्या प्रत्येक घटना, आलेला प्रत्येक अनुभव त्यांनी, त्यांना त्या क्षणी जसा जाणवला होता, भावला होता, लक्षात राहिला होता तसाच त्याच भावनेसह रेखाटला. आणि म्हणून तो जास्त प्रत्ययकारी झाला. 'झोंबी' ही यादवांच्या बालपणातल्या संघर्षाची करुण कथा आहे. त्यांच्या बालपणापासून ते दहावींपर्यंतच्या जीवन प्रवासाची कहाणी या कादंबरीत मांडली आहे.

ग्रामीण जीवनात येणारे व परिस्थितीने दिलेले दाहक अनुभव या कादंबरीत आनंद यादवांनी मांडले आहेत. प्रतिकूल परिस्थितीशी झगडणाऱ्या एका संवेदनशील मुलांची कथा या आत्मचरित्रात आहे. आनंद यादवांच्या कुटुंबात आई, वडील, भावंडं व ते स्वतः ह्यांचे परस्परांशी असलेले सहसंबंध मनावर एक वेगळाच प्रभाव पाडून जातात. वडिलांकडून आईवर झालेला अत्याचार, आईची असहायता, वयाची पस्तीशी ओलांडण्याच्या आत आठ मुलांना जन्म देऊन तिची झालेली दैन्यावस्था वाचताना वाचक सुन्न होतो.

आनंद यादवांना शिक्षण घेण्यासाठी आपल्या वडिलांशी करावे लागणारे वैचारिक युद्ध हे शिक्षणासाठी असुसलेल्या जीवाची कहाणी सांगत जाते. त्याचा परिस्थितीशी चाललेला लढा सांगत जाते. हिरण्यकश्यपू व प्रल्हाद ह्यांच्यात असणारे द्वंद्व व आनंदा व रतनू यांच्यातील द्वंद्व सारखेच होते. याचा उल्लेखही झोंबीत झालेला आहे. ह्यांचा प्रत्यत वाचकाला पदोपदी येत राहतो. शाळेत जाण्यासाठी बापाचा तीव्र विरोध व आनंदाची शाळेत जाण्याची प्रचंड आसक्ती, अभ्यासाची तळमळ विचार करायला भाग पाडणारी आहे.

आनंदाचा जीवनप्रवास तर वाचक अनुभवतच राहतो पण त्यासोबतच आनंदाच्या आईचं दुबळं अन भयान भावविश्व आनंदाच्या बहीण भावंडांचे वैराण आयुष्य हे सारं एका ग्रामीण विश्वाशी वाचकाची नाळ जोडत जाते तेव्हा नागरी जीवन व ग्रामीण जीवन यात असणारा विलक्षण भेद वाचकाला जाणवत राहतो.

दहावीपर्यंतच्या शिक्षणाच्या लढाईचा हा प्रवास मांडताना यात कोठेही आत्मप्रौढी मिरविलेली नाही. प्रचंड हाल सोसताना कोणती प्रौढी असणार? जे वाट्याला आलं ते मांडलं. किती मार खाल्ला, बापाने गुराढोरा सारखा लाथेखाली तुडवला तरी आनंदाने शाळेत जाण्याचा ध्यास सोडला नाही. तो शाळेशी जोडला जाणारा धागा तुटता तुटता बांधून ठेवत होता व तेच आनंदच्या जिद्दीचे खरे कौतुक होते.

आनंद यादवांची 'झोंबी' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी लालित्याच्या अंगाने लिहिलेली आहे आणि म्हणूनच ती अधिक परिणामकारक झाली आहे. ही कादंबरी वाचल्यानंतर वाचकाला उत्कंठा लागते ती आनंदाच्या पुढच्या आयुष्यात काय घडले असेल याची. 'झोंबी' आणि त्यानंतर त्यांनी लिहिलेल्या आत्मचरित्राचे तीन भाग नांगरणी, घरभिंती, काचवेल या प्रत्येक कादंबरीतून आनंद यादव उलगडत जातात व वाचक स्तंभित होत राहतो. लेखकाचे हे लेखन बहुजन समाजातील मनाचं प्रतिनिधित्व करणारं लेखन आहे. आजही ग्रामीण भागातून येणारा युवक झोंबीकडून प्रेरणा घेतो. या युवकाला ध्येयप्राप्तीच्या वाटेत रस्ता दाखवणारा एक मार्गदर्शक असेच स्थान झोंबीचे आहे. वाचकाला अस्वस्थ करणारे हे पुस्तक आनंदच्या जिद्दीने त्याला स्वस्थ पणे जगण्याचे बळ देते.

एकूण एकोणतीस प्रकरणांमध्ये केलेली ही मांडणी म्हणजे केवळ आनंद यादवांचे चरित्र आहे असे नाही तर तत्कालीन कुणबिकीचा एका वास्तव लेखाजोखा यात आलेला आहे. झोंबीच्या केंद्रस्थानी आनंद ऊर्फ आनंदा रत्नाप्पा जकाते आहे. या केंद्रबिंदूभोवती संबंध प्रकरणांची मांडणी केलेली आहे. 'झोंबी' मधून नायकाच्या हालाखीच्या कुटुंब व्यवस्थेचे चिंतन होत असले तरी प्रत्येक नव्या प्रकरणाच्या सुरुवातीला वाचकांसमारे आपले जगणे घेऊन आलेला अन्दू जकाते भेटतो आणि त्याच्या झोंबीचीच कहाणी तो अनुभवित जातो. 'झोंबी' ही नायकाच्या जीवन चरित्राभोवती फिरते. 'झोंबी' मधील प्रकरणांची मांडणी आणि एकूण आत्मचरित्रातील तपशील लेखकाच्या जडणघडणी भोवती फिरतात आणि लेखकाने सदर लेखन आत्मचरित्र असल्याचेही स्पष्टपणे नोंदवले आहे. त्यामुळे निवड-मांडणीच्या सूत्रातील हेतू स्वच्छपणे स्पष्ट होतो. हे सगळे नोंदवताना आत्मचरित्रकार म्हणून आनंद यादवांचे मोठेपण लक्षात येते. आत्याचे अनैतिक वर्तन, स्वतःचे चोरीचे उद्योग, बापाचे शिवीशिवाय न बोलणे, गावातले जोगतिणीचे संदर्भ, त्यांचे देखणेपण, शाळेचे वर्तन, तेथील शिक्षक त्यांच्या वागण्याच्या तऱ्हा, नात्या-नात्यांमधील संघर्ष आणि त्या संघर्षात असलेली माणुसकी हीनता, बापाचं

स्वार्थी, ऐतखाऊ आणि निष्ठूर धोरण या सगळ्या तपशिलांची मांडणी करताना हे आपल्या प्रत्यक्ष जीवनात घडले आहे. याचे भान असूनही, गंभीरपणे एका वैराग्यवृत्तीने केल्यासारखे वाटते. मांडणीतील तटस्थ कोरडेपणा आपल्या जीवनाकडे किती त्रयस्थ पाहता येते याचा प्रत्यय देणारा आहे.

ग्रामीण जीवनातल्या वेदना, दुःख अडचणी लेखकाने झोंबीतून मांडल्या आहेत. 'झोंबी' ही ग्रामीण जीवनाचे वास्तवरुप साकारणारी कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने आपला जीवनपट कलात्मक रीतीने मांडलेला आहे. कागल, कोल्हापूर परिसरातील शेती व्यवसाय, शेतात राबणारा आंदा, शाळेविषयी असलेली लेखकाची गोडी, शिक्षण मिळविण्यासाठी केलेला संघर्ष अशी लेखकाची व्यथा झोंबीत दिसते. शाळेतल्या पहिल्या वहिल्या आठवणी ही सुखद होत्या. पुढे त्याही बदलल्या. शाळेतल्या गमतीजमती, अंगलट आलेल्या खोड्या, मास्तरांचे विविध प्रकारचे स्वभाव, चोरून विड्या ओढण्याचा नाद, खोटं बोलून कातडी बचावण्यची अंग वळणी पडलेली सवय, याचं मोठं चित्ताकर्षक शब्दचित्रण यादव करतात. मात्र या सुखाला कारूण्याची दयनीय कडाही असते. कवितेच्या प्रेमानं यादवांना प्रचंड बळ दिलं त्याला आपल्या हुशारीचा आत्मविश्वास तर या झोंबी सारखा साथ देत होता. आनंदाची 'झोंबी' दारिद्र्याबरोबर होती. बापाबरोबर होती आणि एक सूक्ष्म स्थरावर शाळेतील पोरांबरोबरही होती. या जगात अक्कोळकर मास्तर असतो; तसाच एखादा फॉर्मच्या फीचा अजस्त्र प्रश्न सोडवणारा व्यवहारी पण सहानुभूतिशील धर्माधिकारी मास्तरही असतो.

'झोंबी' मध्ये स्त्रीजीवनाचा अनेक पदरी जीवनसंघर्ष आपणास पहावयास मिळतो. आई म्हणून ताराची जीवनकथा भेदक आहे. दारिद्र्याच्या आगीत तिचे आयुष्य भाळून निघाले. पोरींची परवड पाहून ती हंबरडा फोडण्यापलीकडे काही करू शकली नाही. कन्या, बहीण, सून, पत्नी, आई अशा अनेक नात्यातून ताराची व्यक्तिरेखा वाचकांसमोर उभी राहते, प्रत्येक भूमिका तिचे कारुण्यपूर्ण जीवन वाचकांना हलवून सोडते, वाचक अंतर्मुख होतो.

वयात आलेल्या बहिणींची कशीतरी स्वतःच्याच मनाची समजूत घालून फसवणूक करीत केलेली लग्नं आणि त्यातलं अनेक पदरी दारिद्र्याचं परंपरेच्या झिरझिरीत वस्त्रातून होणारं दयनीय प्रदर्शन, यातलं कारुण्य फार प्रभावीपणे हा कलावंत प्रकट करतो. सासू-सासऱ्याचं छत्र गेल्यावर ताराला (यादवांच्या आईला) नणंदेचा कडक सासूसारखा छळ सहन करावा लागतो.

आनंद यादवांच्या संवेदनशील मनाने ग्रामीण स्त्रीव्यवस्थेचा ठाव घेतलेला आहे. 'झोंबी' या कादंबरीत आई, बहीण, आत्या, आजी अशा नात्यातून ग्रामीण स्त्रीचे जीवनदर्शन घडते. या कादंबरीतीली स्त्री व्यक्तिरेखांमधून ग्रामीण स्त्रीचे अंतर्मन तिच्या मनाची रुढी परंपरेनुसार झालेली जडणघडण, तिचे कष्ट, तिची शारीरिक व मानसिक अवस्था, तिचे कौटुंबिक व सामाजिक स्थान दिसून येते.

आनंद यादवांचा 'झोंबी' मधील स्त्री व्यक्तिरेखेकडे पाहण्याचा उदारपणा जाणवतो. आईची (तारा) व्यक्तिरेखा मांडताना ते आपल्या आईचे दुःख फार जवळून पाहतात व ते मांडतात. एकंदरीत सामाजिकदृष्ट्या या कादंबरीतील स्त्रियांचे स्थान व जीवन परावलंबी आहे. रुढी परंपरेत अडकल्याने अंधश्रद्धा, व्रतवैकल्याकडे, नवसाकडे वळतांना त्या दिसतात. लग्नानंतर सासरच आश्रयस्थान, मुलगा वंशाचा दिवा, मुलगा-मुलगी भेद, बहुपत्नीत्वाची प्रथा, स्त्री उपभोगीय वस्तू (नायकीन व जोगतीन यांच्या रुपाने) अशा सामाजिक चालीरिती या व्यक्तिरेखा दर्शवितात. बालविवाह, परित्यक्ता, घटस्फोटित, बहुपत्नीत्व, दारिद्र्य, सोशिकता, तिचे शारीरिक कष्ट, मानसिकता, दुर्बलता, लाचारी, मानहानी, तिचे होणारे दमण, याचबरोबर तिची चिकाटी, तिचा व्यवहारी दृष्टिकोन, तिची मानमर्यादा, संकटांना तोडं देण्याची तिची ताकद अशा विविधांगाने यादवांनी 'झोंबी' या कादंबरीमध्ये ग्रामीण स्त्री जीवनाचे पैलू टिपण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीतील स्त्री जरी सोशीक आहे, मात्र कुठेतरी तिचा उद्रेक होताना दिसतो. 'झोंबी'तील ग्रामीण स्त्रीचे स्थान 'चूल आणि मूल' असे आहे.

साने गुरुजींची आई आपल्याला जेवढी महान वाटते तेवढीच महान आनंदची आई देखील आहे. ह्या माऊलीने प्रचंड यातना, रतनू जकातेचा प्रचंड जुलूम सहन करून आनंदाच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. आनंदाला पाटीने वळण लावले पण त्याच्या हातात पाटी रहावी म्हणून आई ठाम होती. या कला कृतीतील कुटुंबकथा आईच्या भव्य व्यक्तिरेखेमुळे खूप उंचीवर जाते. एका अर्थाने ती भारतीय स्त्रीच्या यातनांची कर्मकथा आहे. झोंबी मध्ये आई हे लेखकाचे खऱ्या अर्थाने दैवत आहे हे स्पष्ट होते.

'झोंबीचे' निवेदन जरी प्रमाण भाषेतले असले तरी संवाद मात्र कागल-कोल्हापुरी बोलीचे आहेत. त्यामुळे अनुभवांच्या अस्सलपणाचा प्रत्यय तर येतोच परंतु आत्मचरित्राची गुणात्मकताही वाढते. निवेदन जरी प्रमाण भाषेत असले तरी जागोजागी बोलीतील रुपांचा वापर केल्यामुळे निवेदनाची भाषा प्रभावी बनत जाते. एका अर्थाने बोलीतील अरिष्ठ रूपांचाही अभ्यास

करण्याच्या दृष्टीने संवादातील मुक्तपणा उपयोगी पडणारा आहे. तृतीय पुरुषी निवेदनातला निवेदक प्रौढ आणि साक्षर आहे. या आत्मचरित्रातील तृतीय पुरुषी निवेदन तपशील येतात ते आनंदाच्या अनुभवाशी जोडले गेलेले आहेत. उदा. आनंदा रानात गेला तेथील तपशील येतात. शाळेत गेला की शाळेचे वर्णन येते. तो रूसून कोल्हापूरला जातो तेव्हा कोल्हापूरचे तपशील येतात. म्हणजे एखादे निवेदनात्मक (तृतीय पुरुषी) वर्णन आनंदा करीत नसला तरी ते निवेदन आनंद मधीलच निवेदक अदृश्य रुपात वावरून करीत आहे असे भासते.

निवेदनाच्या तंत्रामुळेही 'झोंबी' ची परिणामकारकता वाढली आहे. या आत्मचरित्राची पहिली पंचवीस पाने सरळ सरळ तृतीय पुरुषी निवेदनाची आहेत आणि पुढे पान पंचवीस पासून तृतीय पुरुषी आणि प्रथमपुरुषी निवेदनाचे मिश्रण होत जाते. तृतीयपुरुषी निवेदनातून प्रथमपुरुषी निवेदन सुरु होते. निवेदनाचे हे जे तंत्र बदलले आहे ते अर्थपूर्ण आहे. कारण कथानायकाच्या जन्मापासूनचे सगळे तपशील त्याला आठवणं अशक्य आहे. आणि त्याच्या पूर्वीच्या घराण्याचे चिंतन करण्यासाठी लेखकाने घेतलेली ही झेप महत्त्वाची आहे. तृतीयपुरुषी निवेदनात तारा–रतनूची जी कहाणी येते, त्या कहाणीत हे कथा नायकाचे आई–वडील असतील असा भास होत नाही आणि मग त्याची कथा सांगून झाल्यावर कथानायक स्वतःची कथा सांगू लागतो. तेव्हा निवेदन प्रथमपुरुषी होते. निवेदन जरी प्रथमपुरुषी असले तरी निवेदक आणि कथानायक यांच्यातील रेषा ठळकपणे जाणवते. वस्तुतः पान पंचवीसपासूनचे पुढील निवेदन प्रथम पुरुषी असले तरी निवेदनामधून स्वतंत्र असा निवेदक दृष्टीस पडत जातो. तथाकथित कथा वस्तूंच कादंबरीकारावर वावरत असणारं जोखड न स्वीकारता निवेदनात्मक शैलीत नाट्यमय प्रसंग कसे निर्माण करता येतात याचे उदाहरण ठेवणारी ही कादंबरी आहे. संवेदना, भावना, प्रसंग, घटना, रसात्मक स्थळ, शब्दांच्या आधारे प्रभावीपणे व्यक्त करण्याची लेखकाची क्षमता मोठी आहेच. कारण त्याला सर्जनशील भाषेचे मोठे मौल्यवान देणं लाभलेलं आहे. काही परिस्थितीची चित्रं पुनःपुन्हा येतात आणि काहीसा विस्तार व सपाटपणा जाणवतो. पण लेखकाच्या भार्षिक सामर्थ्यामुळे तो कुठेच कंटाळवाणा होत नाही मराठीमध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भाषेचे खास वैभव प्रथम प्रकट झालेलं दिसतं. लेखकाच्या काव्यात्मक भाषेच्या गुणांमुळे निसर्ग सौंदर्याची चित्रे अतिशय जिवंत वाटतात आणि सर्वच कथनातील ग्रामीण प्रतिमासृष्टी आपल्या खास वैभवात वावरते. वेचक शब्दांनी, शब्दप्रतिमांनी वास्तवाचे अंश चैतन्यमय करण्याचे कसब ठायी ठायी दिसते. यातील दारिद्र्यातून अंकुरित झालेला विनोद दुखरी नस चाळवीत नर्म हास्य

ही उत्पन्न करतो. म्हणूनच ग्रामीण वास्तव चैतन्यमय करणारी ही पहिली मौलिक आणि मूल्यवान आत्मचरित्रात्मक कादंबरी होय.

आशय आणि अभिव्यक्तीमध्ये एकरुपत्व आल्यामुळे 'झोंबी'ची वाङ्मयीन गुणवत्ता वाढलेली आहे. हेच 'झोंबी'च्या शैलीचे खरे यश आहे. 'झोंबी' ची कहाणी ही खरी कथा आहे आणि ती कथा कागल (कोल्हापूर) परिसरात घडत आहे. १९३०-३५ च्या दरम्यान एका गावाचे आणि त्या गावातल्या गावगाड्याचे व कुणबिकांचे काय चित्र होते आणि त्यातून कुणब्याच्या मुलाला शिक्षणाच्या किती अडचणी येत जातात. याचे तपशीलवार चित्र या आत्मचरित्रात आहे. या चित्रात आनंद आणि त्याचे कुटुंब अधिक आलेले आहे. व्यापक दृष्टीकोनातून कुणबी किंवा गावगाडा आलेला नाही. ही वस्तुस्थिती आहे. परंतु कथानायक ज्या काळात व वयात येथे वाढला आहे त्याच काळाचे व वयाचे चित्र लक्षात घेतले तर नायकाच्या आकलन कक्षेच्या पलीकडचे चित्र येथे येत नाही ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कारण जवळपास १९८७ म्हणजे आनंद यादव वयाच्या चाळीशीनंतर हे आत्मचरित्र लिहित आहेत. तेव्हा या वयामध्ये त्यांना कागल, तेथील परिसर, गावगाडा, जोगतिणी, धनगर, ब्राह्मण, वतनदार, व्यापारी, स्त्री-पुरुष संबंध या सगळ्यांचे नवे आकलन झालेले असणार आणि तसे असून ही या प्रौढ वयाच्या नव्या आकलनाचे भान ते आनंदाच्या बालसुलभ आकलनावर लादत नाहीत. म्हणून आनंदाच्या ज्या मर्यादा आहेत. त्याच मर्यादा या आत्मचरित्रात्मक कादंबरीच्या आहेत.

**३.२.७. झाडाझडती :**

विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीची विभागणी सात भागांमध्ये केलेली आहे. धरणाच्या भूमीपूजनापासून कादंबरीला सुरुवात होते. धरण सुरु झाल्यानंतर धरणग्रस्तांची व्यथा लेखकाने मांडण्याचा प्रयत्न पोटतिडकीने केलेला दिसतो.

जांभळी या गावाच्या क्षेत्रामध्ये धरण बांधायचा निर्णय खूप वर्षापासून सरकारने घेतला. पण प्रत्येक वेळी सरकारचा प्रयत्न जांभळीकरांनी हाणून पाडला होता. अगदी १० वर्षापूर्वी ही खासदार शिंगाडे यांना धरणाच्या भूमिपूजनाचा घाट घातला होता, पण तेव्हा जाधवांच्या आवडाबाईने भूमिपूजनाचे ताटावर पायाची ठेप मारून ताट हवेत उधळले होते. ''तुमचं संसार फुलायसाठी आमची राखरांगुळी करता?''(पृ.१३) असा खडा सवाल तिने मंत्र्यांना, पोलिसांना केला. धरणाचे भूमिपूजन होऊच दिलेल नाही पण खासदार शिंगाडे यांनी जांभळी धरण व्हावं

म्हणून आमरण उपोषण केले आणि पुन्हा धरण या विषयाला वाचा फुटली. खासदार शिंगाडे यांचे गाव खैरापूर हे दुष्काळी गाव होते. त्यांचा मुलगा सर्जेराव याला गावात साखर कारखाना सुरु करायचा होता. कारखान्याचे शेअर्स ही दोघांनी गोळा केले होते, पण कारखाना सुरु करायचा तर ऊसक्षेत्र हवे आणि म्हणून जांभळी धरण बांधण्यात खासदार शिंगाडे यांचा वैयक्तिक स्वार्थ होता पण त्याला त्यांनी दुष्काळग्रस्त समाजाचा विकास असे गोंडस नाव दिले. धरण होणार म्हणून लाभक्षेत्रातले लोक खूश होते. पण धरणात ज्यांच्या जमिनी जाणार ते धरणग्रस्त मात्र 'आधी मरण मगच धरण' असे म्हणत होते. झाडाझडतीच्या आशयविश्वाविषयी डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात, ''झाडाझडती ही एक लक्षणीय कादंबरी आहे. धरणग्रस्तांच्या जीवनाचे आशयद्रव्य अत्यंत ताकदीने या कादंबरीत लेखकाने ओतले आहे. धरणामुळे केवळ गावेच उध्वस्त झाली नाहीत तर माणसेही अमूलाग्र उध्वस्त झाली. काही परागंदा झाली. काही पुर्नवसनाच्या वळचणीला येऊन कायम उपरे म्हणून जगू लागले. तर काही पुर्नवसनाच्या आशेने जीव तगवीत तसेच जगत राहिले. धरणग्रस्त शेतकरी आणि आदिवासींच्या हालअपेष्टा, पुढारी आणि सरकारी अधिकाऱ्यांची दुट्टपी कागदी धोरणे, अंतर्गत हेवे दावे, संधीसाधूंचे राजकारणे इ. अनेक बाबींची लेखकाने केलेली वर्णने आणि गुंफलेले ताणेबाणे इतके रेखीव आहेत की, आजच्या कादंबरीपुढे झाडाझडती हा एक आदर्श ठरावा.''[८] धरणग्रस्तांच्या संपूर्ण जीवनाला धरणरुपी सुरुंग लावण्याचे काम सरकारने केले होते. ज्या गावात त्यांची पाळेमुळे रुजलेली होती. पिढ्यान्‌पिढ्या त्यांच्या वाडवडिलांनी स्वतः त्यांनी आपले संसार वाढविले, फुलविले, त्या मायभूमीवर त्यांचे जीवापाड प्रेम होते. त्या मायभूमीपासून परागंदा होण्याइतके मोठे दुःख ते त्यांच्यासाठी कोणते असणार? हे दुःख सहन न करू शकलेला गोईंदा आपले जीवन संपवितो. धरण होणारच आपल्याला आपल्या भूमीला पारखे व्हावे, हे लक्षात. आल्यानंतर किमान आपल्याला पुनर्वसनाचा चांगला लाभ ही माफक अपेक्षा धरणग्रस्तांची धुळीला मिळाली. भ्रष्ट सरकारी यंत्रणा, लाला जाधव व दत्तु करवंदेसारखे लोकप्रतिनिधी धरणग्रस्तांच्या तव्यावर स्वतःची पोळी भाजून घेतात. 'ही कुठली परमुलखातली मान्सं हायत कां? ते आमचे सक्क भाऊ ते थोरले आमी धाकलं त्यांनी सांगायच आनी आमी ऐकायचं त्यांनी बोलायचं आमी डुलायचं.''(पृ.३६) असे म्हणणारे लाभ क्षेत्रातले लोक जेव्हा धरणग्रस्तांना आपल्या जमिनी देण्याची वेळ येते तेव्हा सरड्यासारखे रंग बदलतात. धरणाचे काम शेवटच्या टप्प्यात आले होते त्यामुळे त्यांना पाणी तर मिळणारचं होते. पण चांगल्या शेलक्या जमिनी देण्याइतके त्यांचे मन

मोठे नव्हते. लाभक्षेत्रातला राघू भिवा म्हणाला. ''आमच्या शेलक्या जमिनी काढून देण्यापेक्षा आमाला ते धरणबी नगो आणि त्याचं पानीबी नगो''(पृ.११५)

''१९९१ साली प्रकाशित झालेली विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही अशी प्रदीर्घ कादंबरी होती, जिच्यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक अशा सर्व पातळ्यांवर राबणाऱ्या सर्वसामान्य माणसाचा त्याच्या मातीशी आणि पर्यायाने प्रदेशाशी व त्या प्रदेशाच्या संस्कृतीशी असणारा संबंध एका वेगळ्या आयामातून प्रकट होऊ पाहात होता.''[९]

धरणग्रस्तांच्या प्रश्नांसाठी झटणारे खैरमोडे गुरूजी जीवाच्या आकांताने धरणग्रस्तांचे प्रश्न निर्दयी सरकारपुढे मांडत होते. त्यासाठी रक्ताचं पाणी करत होते. पण गेंड्याचे कातडे पांघरलेल्या सरकारी यंत्रणेला, मंत्र्यांना त्या गोष्टीचे काहीही घेणे देणे नव्हते. त्यांना स्वतःच्या तुमड्या भरायच्या होत्या. धरणग्रस्तांच्या जमिनीला सहा वर्षापूर्वीचा भाव दिला होता. त्यांच्या जमिनीचे मूल्य मातीमोल ठरवण्यासाठी सरकारने अनेक कारणे सांगितली. त्यांच्या जमिनी कवडी मोल ठरल्या. परमुलखात तेवढ्या पैशात जमिनी खरेदी करणे अवघड होते. त्यांनी त्यांची गुरे ही अतिशय कमी भावात विकली. धरणग्रस्तांना प्रत्येक लाभासाठी संघर्ष करावा लागत होता. आणि संघर्ष करुनही त्यांच्या पदरात काहीच पडत नव्हते. 'धरण म्हणजे मरण' आहे याचा त्यांच्या संघर्षमय जीवनामुळे वाचकाला प्रत्यय येतो.

बऱ्याच अडीअडचणी पार करत जांभळीकर धरणग्रस्त खैरापूरला आल्यानंतर त्यांच्या मुख्य म्हणजे निवासाच्या सोयीचा प्रश्न उभा राहतो. बऱ्याच लोकांनी चावडीत, समाज मंदिरात आश्रय घेतला. आवडाई, आठ महिन्याचे पोट असलेल्या सुनेला घेऊन कुठे राहायचे या चिंतेत होती. आणि आनुबाई नावाच्या स्त्रिला फुलाची अवस्था पाहून दया आली तिने त्यांना गुरांच्या गोठ्यात राहायला जागा दिली पण तिचा मुलगा ज्ञानूभाऊने त्याचा रागराग करायला सुरुवात केली. शिरपा आनुबाईला शिव्या घालीत होता. ''आयेऽ मायला तुझ्या ऽऽ ही वाटंची बूतं कशाला कशाला आणून ठेवलीस आपल्या गोठ्यात? काय संबंध ह्या कारवानांचा न आपला?''(पृ.१८३) मायलेकरांचे चाललेले भांडण आवडाई व हैबतीने ऐकले व तिथली जागा सोडण्याचा निर्णय घेतला. तिथून लगेच पडक्या शाळेत सामान नेले. व खोपाट बांधल त्यात फुलाला ठेवले. बाहेर जोराचा पाऊस पडत होता आणि नेमकं त्याचवेळी फुलाचे दिवस भरल्यामुळे पोटात कळा येऊ लागल्या खोपटात पाणी शिरलं. बिचारी ओल्याचिंब पाचाटांवर बाळंत झाली तिला मुलगा झाला पांडू येताळाने छडीनं घंगाळ वाजवून आनंद व्यक्त

केला.(पृ.१९१, १९२) गुणवंता, साळू वहिनी, कुशापाचे कुटुंब यांनाही धरणाचे तडाखे बसत होते. झांजडवाडीचे संपूर्ण पूनर्वसन होणार नव्हते. मसणमाळच्या कुशापाला तर पुनर्वसनातून वगळले होते. पंच्याहत्तर टक्के घरे पाण्याखाली गेली तरच संपूर्ण गावठाण हलवता येईल आणि म्हणूनंच झांझडवाडीच्या फक्त तेरा घरांचे पुनर्वसन होणार होते कुशापा जंगलाचा राजा पण एखाद्या भिकाऱ्यासारखा मोरेसाहेब आणि जिल्हाधिकाऱ्यांसमोर आपली व्यथा मांडत होता. कुशाराजाला जमीन जास्त असल्याने धरणात जमीन जाऊनही सोळा एकरापेक्षा जास्त जमीन मागे राहात होती आणि त्यामुळे त्याचे पुनर्वसन नाकारले होते. (पृ.१९९-२००) खैरमोडे गुरुजी धरणग्रस्तांच्या मुलांना कारखान्यात नोकऱ्या मिळाव्यात म्हणून चेअरमन सर्जेरावांना विनवण्या करीत होते फक्त लेबर म्हणून नोकऱ्या देऊ शकतो. असा स्पष्ट निर्वाळा सर्जेरावांनी दिला. तेव्हां गुरुजी म्हणाले. ''साहेबऽ याआगोदर आम्ही डोईवर बुरुम-दगड वाहून धरण बांधलं. आता कारखान्याच्या पाट्या वाहतो. आम्ही लेबर म्हणूनच मरायचं.''(पृ.१७६) धरणग्रस्तांच्या प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी गुरुजींनी नोकरीचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला. हिरा मास्तरीन गुरुजी नोकरी सोडणार म्हटल्यावर आपला संसार कसा चालणार? मुलीचे लग्न कसे होणार? याची काळजी करु लागली.

धरणग्रस्तांना नवनवीन संघर्षाला सामोरे जावे लागत होते लाभक्षेत्रांतील जमिनी कसण्यासाठी धरणग्रस्तांना मिळाल्या, पण लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना कोरडवाहू जमिनी पाण्याखाली आल्यामुळे त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. ते धरणग्रस्तांशी भांडण-तंटा करू लागले. राघू भिवाने हैबती आणि आवडाईला रानात येऊन दम भरला तर धोंड्याने सावळेरामाने पिकवलेल्या उभ्या पिकात गुरे सोडली व पिकाची नासाडी केली. त्या प्रसंगाने मन गलबलून येते. शासनव्यवस्था, पुढारी यांच्यापुढे आपली व्यथा मांडूनही काही उपयोग होत नाही म्हटल्यावर बिचारा सावळेराव जांभळीला निघून गेला. बलुतेदारांनी मजुरीवर जाणेच पसंत केले. एकटा शिवा चांभार तेवढा खाण्यापिण्यापुरते पैसे कमवित होता.

भ्रष्ट सरकारी अधिकारी व धनाढ्य खैरापूरवासीय यांच्यामध्ये बिचाऱ्या धरणग्रस्तांचे हाल होत होते. पण धरणग्रस्तांच्या दुःखाला वाचा फोडणारे व त्यांच्या व्यथांची कदर करणारे अनिल देशमुख नावाचे कलेक्टर आंबेपूरला लाभले. कलेक्टर अनिल देशमुख यांनी खैरमोडे गुरुजींची सर्व व्यथा जाणून घेतल्यावर वेळोवेळी गुरुजींना मदत केली.

या कादंबरीचे कथानक हे प्रामुख्याने विविध धरणग्रस्तांच्या कुटुंबाभोवती फिरताना दिसते. कथानायक खैरमोडे गुरुजी त्यांची हिरा मास्तरीन व मुलगी शेवंता असा छोटासा परिवार असलेले, खैरमोडे नोकरी असलेली गुरुजी आपला उदरनिर्वाह व्यवस्थित चालवू शकले असते पण त्यांनी स्वार्थी वृत्तीने न वागता आपले अखंड आयुष्य धरणग्रस्तांच्या कल्याणासाठी वेचले. नोकरी गमावली, खैरापूरकरांनी प्राणघातक हल्ला केला, एकुलत्या एक लाडक्या मुलीच्या म्हणजे शेवंताच्या आयुष्याची धुळधान झाली. जीवनाच्या अंतापर्यंत ते धरणग्रस्तांसाठी झडती देत होते. आवडाईने आपला पती गमावला. एवढेच नव्हेतर आयुष्यभर नोकरी आणि शेत मिळावे यासाठी लढणारा हैबती याला आवडाईला गमवावे लागले. राघू भिवा सारख्या बेडर व्यक्तीने हैबतीचा खून केला. नकुसाने धरणाच्या कामात आपल्या प्राण प्रिय पतीचा अपघात मोठ्या कष्टाने पचविला व शिवरामाच्या अंकुराला म्हणजे बिरज्याला मोठा करण्यासाठी धैर्याने संकटांना तोंड दिले. याचप्रमाणे कुशापा, पांडूयेताळा, गोम्या कोळी, गावातील सर्व बलुतेदार यांच्या जीवनाची माती झाली. धरणाने त्यांच्या जीवनाला मरणकळा आली.

लाभक्षेत्रातील लोकांनी मात्र या सर्व प्रक्रियेत स्वतःची पोळी भाजून घेतली. खासदार शिंगाडे यांचा मुलगा सर्जेराव देशमुख यासारख्या धनाढ्यांनी आपल्या तुमड्या भरल्या. ज्याच्या जीवावर आपण मोठे झालो त्या धरणग्रस्तांविषयी त्यांना थोडाही कणव वाटला नाही. स्वतःचा विकास साधताना धरणग्रस्तांचे जीवन मात्र भकास झाले. जांभळी धरणाने गावाचा झालेला कायापालट पाहून जांभळीकर दुःखी झाले कारण त्यांच्या आयुष्याच्या धूळधाणीतून हे नंदनवन झाले. पण हे नंदनवन पाहण्यापलीकडे धरणग्रस्तांना इतर काहीही लाभ झाला नाही. आयुष्यभर फक्त झाडाझडती आणि फक्त त्यांच्या जीवनाची झाडाझडतीच झाली होती.

**३.२.८. राघववेळ :**

'राघववेळ' सामाजिक वास्तवाचे चित्रण दाखवणारी कादंबरी आहे. तळागाळातल्या अस्पृश्य समाजाचे चित्रण, ग्रामीण जीवनाचा व्यापक पट यातून मांडला आहे. 'राघववेळ' ही कादंबरी १९९३ साली प्रसिद्ध झाली. 'राघववेळ' या कादंबरीला १९९५ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. कादंबरीचा पूर्वार्ध हा विधवा वालंबीच्या फाटक्या संसाराचा, संघर्षाचा आहे. मध्यभाग हा गजरी, कौशी व गावातील दुष्ट लोकांच्या लैंगिक संबंधावर आधारीत आहे. उत्तरार्ध रघूच्या शिक्षणाचा व यशस्वीतेच्या भागावर आधारलेला आहे. नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' या कादंबरीत तळागाळातल्या अस्पृश्य समाजाचे चित्रण

केले आहे. ही कादंबरी सामाजिक वास्तवाचे चित्रण करणारी आहे. वखारी आणि डोंगरकिनी या दोन गावांच्या भोवती प्रामुख्याने कथानकाची मांडणी करण्यात आली आहे. 'राघववेळ' ह्या कादंबरीची ३८ प्रकरणातून लेखकाने विभागणी करून ३०७ पृष्ठांची कलाकृती साकार केली आहे. प्रत्येक प्रकरण तोलामोलाचे असून कादंबरीचा प्रवाहीपणा यातून दिसतो.

राघववेळ या कादंबरीच्या प्रस्तावनेत वालंबी विषयी लेखक म्हणतो, ''ह्या कादंबरीत वालंबीने रघुच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न पाहिले आहे. तिला जणू वाटते की, 'माणसाचे जग असावे''.[१०] 'राघववेळ' ही कादंबरी मातंग समाजात जन्मलेल्या रघुनाथ कळणू जाधव या मुलाची कहाणी आहे. त्याचबरोबर मांग कुटुंबाची ती कथा आहे. आणि एकूणच मातंग समाजाची ती व्यथा, वेदना आहे असे मला वाटते. ''आपल्या मुलांना जगवणे ही वालंबीच्या जगण्याची प्रेरणा होती. त्यासाठी हत्तीचे बळ घेवून गाव कुसाबाहेरच्या मांग वेटाळातील वालंबी झुंजत होती.''[११] रघू आणि त्याचा समाज यांच्या वाट्याला अर्थपूर्ण जगणे कधी आलेच नाही हे वास्तव लेखक या कादंबरीतून मांडतो.

लेखकाने 'राघववेळ', 'ऊन-सावली', 'साजरंग' ह्या तीन कादंबऱ्यांमधून आपली जीवन कहाणी मांडण्याचे ठरविले. या त्रयीपैकी 'राघववेळ' मध्ये रघूच्या पाचवी ते दहावी पर्यंतच्या प्रवासाची हृदयद्रावक कहाणी लेखक मांडतो. रघूचे कुटुंब, मातंग समाज, गावातील प्रतिष्ठीत गणला जाणारा वर्ग, शालेय जीवनातील विविध प्रसंग, श्रद्धा-अंधश्रद्धा, रूढी-परंपरा, चाली-रीती, कोर्टाची न्यायव्यवस्था याच्यावरही लेखक भाष्य करताना दिसतो. पण लेखकाने हे सर्व करताना रघूची आई वालंबीला केंद्रस्थानी ठेवलेले हे चित्र गावगाड्यातील मातंग समाजाच्या एका स्त्रिच्या वाट्याला आलेले आहे. ते मातंगांचे प्रातिनिधिक रूप आहे. नामदेव कांबळे 'राघववेळ' कादंबरीच्या मनोगतात म्हणतात, ''वालंबी मला दिसली. भेटली. भावली मुलांचे जीवन घडविताना पाहिली तीला मी. त्यांच्यासाठी जीव ओतताणा मला ती दिसली. ती आणि तिची मुलं. मिळेल ते खायची, उद्याच्या आशेवर आला दिवस लोटायची, एक दुर्दम्य आत्मविश्वासाने''[१२] प्रस्तुत मनोगतातून वालंबीच्या कणखर प्रवृत्तीचे व उद्याच्या आशेच्या किरणांचे भाष्यच जणू लेखक व्यक्त करतो.

'राघववेळ' ह्या कादंबरीची नायिका वालंबी ही स्वतः निरक्षर असूनही तिला शिक्षणाचे महत्त्व समजले होते. ती आपल्या रघू व सिताराम या मुलांना चांगले शिक्षण देण्याचे स्वप्न उराशी बाळगते. पतीचे निधन लवकर झाल्यामुळे संसाराची सारी जबाबदारी तिच्यावर येऊन

पडते. ही कादंबरी विधवा वालंबी ह्या मातंग स्त्रीच्या जीवनावर आधारलेली असली तरी वालंबी, कौशी, रघू व सिताराम या पात्रांभोवती फिरताना दिसते. पायरूचेही व्यक्तिचित्रण लेखकाने समर्पकपणे साकार केले आहे.

आपल्या मुलांना जगवणे ही वालंबीच्या जगण्याची प्रेरणा होती. त्यासाठी हत्तीचे बळ घेऊन गावकुसाबाहेरच्या मांग वेटाळातील वालंबी सतत झुंजत होती. लिंबाळे शरणकुमार, ''वालंबी पैशासाठी यादव पाटील यांच्याकडे जाते, तीथे तिच्या शरीराची मागणी होते. हरणी ज्वारी मागायला जाते, तिचा भोग घेतला जातो. कौशी ग्रहण मागायला जाते, तिचे स्तन धरले जातात. कौशी मजूरीला जाते, तिच्यावर बलात्कार होतो. गजरीचा तिच्या घरी येऊन भोग घेतला जातो आणि रघूला मुलीचा हात धरला म्हणून शिक्षा होते. एकूण ही कादंबरी शरीरसंबंधावर कशी आधारित आहे हे स्पष्ट होते.''[१३] अशाप्रकारे परिस्थितीचा गैरफायदा घेऊन सवर्ण लोकांनी लैंगिक शोषनच केलेले यातून दिसते. समोरच्या व्यक्तिच्या पोटाच्या भूकेची गरज लक्षात घेऊन शारीरिक भूकेची मागणी केली जाते पण रघूने सवर्ण मुलीचा हात धरला म्हणून त्याला शिक्षा होते हे मांडताना लेखकाने हे लक्षात घ्यायला हवे होते की, सवर्ण मुलाने सवर्ण मुलीचा हात पकडला असता तरीही त्याला शिक्षा झालीच असती.

रघूची आई वालंबी विधवा आहे, म्हणून ती आपला धाकटा दीर पायरू याची अडीअडचणीच्या प्रसंगी मदत घेत होती. पायरू हा आपल्या भावाच्या कुटुंबाला सर्वतोपरी वेळप्रसंगी आपल्या परीने मदत करीत होता. वालंबी आपल्या इज्जतीला घाबरते म्हणून यादव पाटील याला आपले शरीर ती देऊ शकत नाही.

गावपंढरीतल्या मातंग समाजाची परवड लेखक राघववेळ मध्ये प्रभावीपणे मांडतो. आईच्या बरोबरीने पडेल ते काम करून अनेक संकटांवर मात करीत रघू आपला मार्ग कसा शोधत जातो, याचे प्रत्ययकारी चित्रण यात आले आहे. आपल्या मुलांना शिकवूण मोठे करणे हे रघूची विधवा आई वालंबीचे ध्येय आहे. रघू हा या कादंबरीचा नायक असला तरी कथानक मात्र वालंबी भोवती फिरताना दिसते. रघूच्या आयुष्यातील विकासाच्या दृष्टीने तो कालखंड रामप्रहरच आहे. 'राघववेळ' कादंबरीविषयी डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''ही वालंबीच्या व्यथेची कथा आहे आणि म्हणूनच तिच्या पुत्राच्या-रघूच्या व्यथेची आणि धडपडीची ही गाथा आहे आणि लेखकाने आपली स्वतःची जीवनकहाणी म्हणून न सांगता ती रघूच्या रूपाने सांगितली आहे. ती स्वतःच्या सुखदुःखातून स्वतःला निःशेष करीत जाण्याची

प्रक्रिया मला महत्त्वाची वाटते. याचे कारण असे की, कोठेही आत्मदया उत्पन्न करण्याचा वा आत्मसमर्थण करण्याचा, स्वतःचे मोठेपण सांगण्याचा आणि स्वतःच्या दुःखाचं समाजावर खापर फोडण्याचा मोह येथे पूर्णपणे टाळलेला आहे.''[१४] मला वाटते की राघववेळेच्या यशाचे हे फार मोठे गमक आहे कारण गावातील गावगाड्याचे वास्तव समग्रपणे रेखाटण्यासाठी लेखकाने एक मौलीक युक्ती वापरलेली आहे आणि ती वास्तव पातळीवर साकार केली आहे. ''तिने भाजी चिरली. धुऊन घेतली, मडक्यात टाकली.'' गरिबीमुळे भाजी मडक्यात शिजवावी लागते हे भयाण वास्तव लेखक वरील वाक्यातून मांडतो. झडीमुळे शाळेलाही सुट्टी दिली होती. रघूची चुलती हरणी त्याच्याही घरी पीठ नव्हते. रघूच्या आईने भाजी, मिरच्या व मीठ दगडी खलात टाकून खसाखसा चटणी वाटली व प्रत्येकाला मूठमुठ भाजी दिली. एवढ्या हालाखीच्या परिस्थीततही वालंबी आपल्या मुलांना उपाशी न ठेवण्याचा प्रयत्न करते, त्यांची भूक शमविण्याचा प्रयत्न करते. लेखक म्हणतो भूकेचे एक सुक्त आहे. त्याचाच भाग म्हणून लेखक भूकेच्या ऋचा आपल्यासमोर ठेवतो. ऋचा पहिली म्हणजे भूक पोटाची ''पोटाची आग लई वक्टी ! काय बी करायला लावते माणसाले ती. सोताची भूक इसरता आली आस्ती आपल्याले, बायकोले बी. पण चिल्यापिल्यांची भूक नाही इसरता येत.''(पृ.१२) ऋचा दुसरी. भूक कुडीची : ''आपण रांडव बाई. मन काय आपल्याले नाही? हाय नं, मन हाय, कुडी हाय. पण मन मारा लागते न माय ! पडीक जमीन वहितीले काढली तर तन टाका का धान टाका, उगवतेच ते. जीव काय बी म्हणो पण कुडीची भूक टाळा लागते. रांडव बाईले तर इसराच लागते अशा भुकेले.''(पृ.१२) न उघडणारा झडीचा पाऊस, नाल्याकाठी सरपण गोळा करणे, अंबाडीची भाजी मडक्यात टाकणे, हरणीच्या लहान मुलीचा पदमीचा भुकेसाठी आक्रोश. वालंबीला वाटते की, आपला पती कळणू असता तर दहा घरी जाऊन आला असता. आपल्या अन्नाचा प्रश्न सोडविला असता.

गावातील कष्टकरी हात जोडत होते. पावसाला थांबण्याची विनंती करीत होते. उकंड्याने पायरूकडून पोती लावायचे काम करून घेतले पण त्याला मात्र ज्वारी दिली नाही. बुग्याची तान्ही देशमुख मानदाराच्या घरी जावून ज्वारी घेऊन आली होती. पायरू आशेने तिकडे जातो पण देशमुख मात्र पायरूला म्हणतो, ''असं कर, जराभरानं दे भाबीले धाडून''(पृ.१०) हरणीला पायलीभर ज्वारीसाठी देशमुखाला शरीर द्यावे लागते. तिने आणलेल्या ज्वारीमधील थोडी ज्वारी

वालंबीला देण्याची विनंती पायरू करतो, आपल्या भावाच्या कळणूच्या कुटुंबाविषयी त्याला आस्था होती.

झडीने उघडीप दिल्यानंतर लाखोलीच्या पंगतीचे वर्णन लेखक करतो, श्रावणातील शेवटच्या सोमवारी होणारी गावपंगत म्हणजे लाखोलीची पंगत दरवर्षी होत असते. त्या पंगतीच्या स्वयंपाकासाठी मांग वेटाळातील लोक लाकडे फोडण्याचे काम करतात. सवर्णांच्या जेवणानंतर त्यांना जेवण करायचे असते असा रिवाज होता पण सर्व पंगती संपूनही त्यांना ताटकळत थांबावे लागते. वाढलेल्या पत्रावळीवरून उठावे लागते. ज्यांनी लाकडे फोडली त्यांनी जेवा. मुलांनी जेवू नका अशा प्रकारे नारायणाने सांगितल्यानंतर बाकीच्यांना पंगतीवरून उठावे लागले पण सहादूने सर्वांना पत्रावळी टाकल्या सर्वांनी देवाचा प्रसाद घेतला. रघूचा घास मात्र घशाखाली जात नव्हता. लाखोलीच्या पंगतीतील अपमान आता परत पोळ्याच्या जेवणाच्यावेळी व्हायला नको असे रघूला वाटते म्हणून तो पायरू बरोबर गावात पोळ्याचे जेवण करायला जात नाही. तान्ह्या पोळ्याचा, करेचा दिवस उजाडला. सर्व मातंग सिंदीच्या फोकाची टोपली, गंज, तवली, ताटली घेऊन भाकरी मागण्यासाठी गावात जातात. मोळाची एक, गेरूची एक अशा दोन पुरणपोळ्या, वरणभात, भाजी, आंबील, कालवण असे काही बाही त्यांच्याकडे जमा होते. पूर्ण गाव मागून व्हायला साडेअकरा वाजतात. सुदाम्याच्या अंगणात सगळ्यांचे ढीग लावून सगळे अन्न सारखे वाटले होते. यातून मातंगांमधला समजदारपणा व एकमेकांना समजून घेण्याचा गुण दिसून येतो.

तळहातावर पोट भरणाऱ्या मातंग समाजाची पावसाळ्यातील संततधार म्हणजेच झडीच्या दिवसात त्रेधातिरपीट उडत होती. घरातील पीठ संपल्यामुळे इकडे तिकडे जाऊन उसनवारी करावी लागत होती. शाळेला झडीची सुट्टीच देऊन टाकली होती. वालंबी पांडुरंग पाटलाच्या शेतातून अंबाडीची भाजी घेऊन येते. संध्याकाळसाठी सरपण म्हणून नाल्याच्या काठाला असलेल्या बाभळीच्या वाळलेल्या काठ्या ती घेऊन येते. त्यादिवशी पायरूच्या घरीही संध्याकाळच्या स्वयंपाकाला पीठ नव्हते. पायरू हरी जाधवांकडे ज्वारी मागण्यासाठी जातो तिथेही त्याला ज्वारी मिळत नाही. नंतर तो उकंडाकडे जातो तेथेही मिळत नाही. पोटासाठी होणारी ही परवड अनेक प्रसंगातून लेखक मांडतो.

सर्वच मातंग समाजातील लोकांच्या घरी अन्नाचा प्रश्न निर्माण झालेला असतो. एकनाथ वाण्याची आजारी म्हैस मेल्यानंतर शिवऱ्या, बुग्या, सुदामा, पायरू ती म्हैस आखरावरच्या वाण्याच्या कुपाजवळ आणतात त्याचे चामडे सोलतात, ''तोवर वेटाळातील मुले, मुली,

बायकामाणसे जमेल त्या अवजारानिशी टोपली, घमेली, पातेली, डबे, खोके काहीतरी घेऊन आखरावर आले. पायरू, शिवऱ्या, बुग्या, सुदामा सोबत बाकीच्यांणीही शक्य तितके म्हसीचे लचके तोडले.'(पृ.१६)

'राघववेळ' ही दलित जीवनाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. आपणावर होणारा अन्याय, भोगाव्या लागणाऱ्या यातना, भुकेचा प्रश्न यांचे दर्शन या कादंबरीतून होते. ह्या यातनांच्या आणि त्यामागील संवेदनक्षम मनाच्या दर्शनाने वाचकांना हादरवून सोडलेले दिसते. आर्थिक स्थैर्य नाही, सामाजिक प्रतिष्ठा तर नाहीच नाही. आपला शतकानुशतके दबलेला आवाज उठविण्यासाठी रघूचे मन तळमळताना दिसते पण विलाज मात्र नसतो. रघूच्या आईला रघू दहावीची परीक्षा पास झाल्यावर खूप आनंद होतो. तिच्या कष्टाचे चिज होते. तिला आनंदाश्रू आवरत नाहीत फक्त मनाला एक हुरहुर लागते हे यश बघण्यासाठी रघूचे वडील हवे होते. 'राघववेळ' ह्या कादंबरीत भूक, शोषण, अगतिकता, लाचारी, गुलामी, वेठबिगारी या सगळ्यांचे दलित जीवनाशी असलेले नाते यांचा शोध लेखकाने घेतलेला आहे. या कादंबरीला ग्रामजीवन, निसर्ग तेथील माणसांच्या वृत्ती प्रवृत्ती इत्यादीची पार्श्वभूमी लाभलेली आहे.

'राघववेळ' ही कादंबरी वालंबी आणि रघूला केंद्रस्थानी ठेवून लिहिलेली असली तरी, या कादंबरीत एकूणच दलितांमधील मातंग समाजाचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक दर्शन घडविणे हा प्रधान हेतू आहे असे दिसते. मातंग समाजातील सामाजिक होरपळ, त्यांचा उपेक्षीतपणा, सवर्णांच्या घरची कामे करताना होणारा अत्याचार याचे विदारक चित्रण यामध्ये आलेले आहे. रघूला समजलेले व वालंबीला उमजलेले शिक्षणाचे महत्त्व यातून परिवर्तन व विकासाची लागलेली आस अधोरेखित होते. बदलत्या काळात स्वत्व शोधाचा विचार करून पारंपरिक दृष्टी आणि विचारपद्धती नाकारू पाहणारे रघूचे अंतर्मन प्रगट करण्याचा केलेला लेखकाचा प्रयत्न कादंबरीला एका विशिष्ट उंचीवर घेऊन जातो.

राघववेळ ही कादंबरी मांग कुटुंबाचे दारिद्र्य, उपासमार आणि परावलंबित्व दाखविणारी आहे. मांग कुटुंबे पारतंत्र्यातही झगडत होती आणि स्वातंत्र्यातही झगडत आहेत. अगदी तळहातावर पोट भरणाऱ्या मातंगाच्या वाट्याला तीच भूक, तेच शोषण, तीच मुस्कटदाबी, तीच मारहाण, मानहान कधी तरी त्यांच्या वाट्याला एखादा आनंदाचा क्षण येतो. लेखकाने हाच आनंदाचा क्षण कादंबरीच्या समारोपामध्ये टिपण्याचा प्रयत्न केला आहे. पण या समारोपाला ही कारूण्याची झालर निर्माण झाली आहे. कारण रघू मॅट्रिक परीक्षेत पास होतो तेंव्हा ते यश

पाहण्यासाठी रघूचे वडील नसतात. कादंबरीच्या अखेरीस वालंबी आपल्या मनाशी म्हणते, ''झालं माझ्या कष्टाचं चिजं, पाह न पास झाला रघू आपला. तुमचं ऐकलं, कंबर बांधली. चीजच झालं त्याचं. तुम्ही आस्ते आता तर नव्हतं व्हतं!''(पृ.क्र.३०६) वालंबीच्या या मनोगतातून आपला पती कळणू याच्याविषयीचा आदरभाव प्रकट होतो. रघूचे हे यश पाहण्यासाठी तुम्ही पाहिजे होता असे तिला वाटते. म्हणूनच वालंबी म्हणते खरंच व ऽ आजचा दिस माझ्या जिनगीतला लय आक्रीताचा दीस हाय.''(पृ.३०७) वालंबीच्या कष्टाचे सार्थक झाले होते. रघू मॅट्रीकची परीक्षा पास झाला होता. कादंबरीचा शेवटी रघूच्या कृती–उक्तीतून प्रकट होतो तो म्हणतो, ''माये, पाय जोडून दर्शन घेऊ दे मले''(पृ.३०७) यातून आईवरील श्रद्धाभाव प्रकट होतो. शेवटी सिताराम येतो तो म्हणतो, ''काय झालं व माये?'' त्यावर वालंबी म्हणते, ''दादा पास झाला आपला.'' सिताराम म्हणतो, ''म्हून लडतं? डोळे पूसबा''(पृ.३०७) वालंबीने सीतारामला जवळ घेतले होते. आपल्या अश्रूंना तिने मोकळी वाट करून दिली. सितारामने ही रघूप्रमाणे शिकावे ही सूप्त इच्छा जणू काय तिच्या मधून व्यक्त होत होती. अशा प्रकारे रघूच्या यशाचे आनंदाश्रू व आपला पती कळणू या क्षणी नाही हे दुःखाश्रू तिच्या डोळ्यातून ओघळत होते. असा सुःख दुःख मिश्रीत 'राघववेळ'चा शेवट मनाचा ठाव घेतल्याशिवाय राहात नाही.

**३.२.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे लिखित राजकीय कादंबरी आहे. राजकीय क्षेत्रातल्या विविध वृत्ती प्रवृत्तींच्या राजकारण्यांचा सखोल अभ्यास करणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये १९४२ ते १९७९ अशा दीर्घ कालखंडाचा अभ्यास केला आहे. त्यामुळे ८०७ पृष्ठसंख्या असलेली, ती विशाल पटाची कादंबरी आहे. १९४२, १९५६, १९६२, १९७५ व १९७९ असे त्याचे पाच कालखंड गृहीत धरुन लेखन केले आहे. १९३९ साली इंग्लंडने दुसऱ्या महायुद्धात उडी घेतली. सावदेकर (डॉ.)आशा म्हणतात,''१९४२ ते १९८० या चाळीस वर्षातील महत्त्वाच्या स्थित्यंतराचा वेध घेत सत्तेचे राजकारण, सद्सद्विवेकबुद्धीला अस्वस्थ करणाऱ्या घडामोडी मांडून ही कादंबरी महाराष्ट्राचा एक सामाजिक व सांस्कृतिक छेद राजकीय आयामाच्या अंगाने सादर करते.''[१५]

इंग्रज परकीय सत्तेचा अंमल सर्व शक्तीनिशी झुगारुन देण्यासाठी, आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळवून नाना सिरुर या कादंबरी नायकाने एक लढवय्या गट तयार केला. जयप्रकाश

नारायण, राममनोहर लोहिया यांसारखे भूमिगत चळवळीतले, यांच्यापासून प्रेरणा घेऊन वकिलीचे शिक्षण अर्धवट ठेवून नाना सिरुर यांनी स्वतःला स्वातंत्र्यसंग्रामात झोकून दिले. त्यासाठी नाना आणि त्यांचे सहकारी प्राणावर उदार होऊन लढले. अखेरीस स्वातंत्र्याची पहाट उगवली आणि भारतात लोकशाहीचा उदय झाला. या लोकशाहीत नेत्यांची सत्ता लोलूपता वाढली, नाना सिरुरांसारखा सच्चा कार्यकर्ता मात्र सत्तेच्या मोहाला बळी पडला नाही. पण लोकाग्रहाखातर जेव्हा निवडणूकीला सामोरे गेला तेंव्हा मात्र जाती-पातीच्या राजकारणाचा अडसर आला आणि त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विकासाच्या वाटा तयार झाल्या. या सर्वांचा समग्रपणे आढावा लेखकाने घेतला आहे.

१९४२ ते १९५७ या कालखंडामध्ये नाना सिरुर व त्यांचे सहकारी यांनी जयप्रकाश नारायण यांच्याकडून प्रेरणा घेऊन इंग्रज सरकार विरुद्ध बंड करुन सरकारला नामोहरम करण्यासाठी झुंज दिली. पाच लाखांचा सरकारी खजिना लुटला, इंग्रज सरकार विरुद्ध समाजाने पेटून उठावे म्हणून पत्रके छापली. छापलेली पत्रके सांगितलेल्या ठिकाणी पोहचविण्याचे काम पांडुरंग तिकोनेने केले. ब्रिटिश सत्तेचे प्रतीक असलेली कचेरी ताब्यात घेतली. ठाण्याचे प्रमुख म्हणून पांडुरंग व तहसिलदार म्हणून तुकाराम या दोघांनी सूत्रे हाती घेतली. सरकारचा ताबा असलेली धान्य कोठारे ताब्यात घेऊन ती गोरगरीब जनतेत वाटण्याची जबाबदारी गोविंदभाई तामसरेंवर सोपविली. राममनोहर व अच्युतराव यांची प्रेरणादायी भाषणे ऐकविण्यासाठी स्थापन केलेल्या रेडिओ केंद्राच्या माध्यमातून लोकांना ती ऐकविण्यासाठी व्यवस्था केली. पोलीस ठाणे व तहसील कचेरी ताब्यात घेतल्यामुळे तेथे लष्कराला पाचारण केले होते. म्हणून नाना, तुकाराम, पांडुरंग, गुलाबा नाईक व गोविंद तामसरे हे सर्व जण बुवासाहेब जाधवांच्या शेतात लपले. पण थोड्याच दिवसात पोलिसांना संशय आल्याची खबर मिळताच त्यांना त्यांचे विंचवाचे बिऱ्हाड तेथून हलवावे लागले. तेथून गोडेपाटलांच्या वैतागवाडीला जाण्याचे ठरले पण जाता-जाता त्यांनी टेलिफोनचे खांब उखडणे, तारा तोडणे हे उपद्व्याप केले पण ते करताना तुकारामाच्या पायावर खांब पडला व तो जखमी झाला. अथक प्रयत्नाने तुकारामाला त्याच्या मामाच्या गावी पोहचविले. मामांनी डॉक्टर बोलावून आणला. त्यांचे पायाचे हाड मोडले होते. नगरच्या दगडी दवाखान्यात उपचारासाठी नेले. तुकाराम पकडला गेला. ऑपरेशन नंतर तुकारामाला नगरच्या तुरुंगात ठेवले.

तुकाराम वगळता नाना व त्यांचे सहकारी यांनी ब्रिटिश फौजेसाठी शस्त्रे घेऊन जाणारी ट्रेन उडवून देण्याचा प्रयत्न केला पण तो सफल झाला नाही. त्यामुळे नाना व त्यांच्या सहकार्यांना तेथून पलायन करावे लागले. त्या धावपळीत गोविंदभाई तामसरे या सहकार्याला गोळी लागली. त्यांना तेथेच झुडूपाच्या जाळीत लपवून बाकी सर्वजण तेथून पळून गेले. सर्वांच्या नावे पकड वॉरंट काढले होते. सर्वजण सुटले पण गोविंदभाई मात्र सापडले. गोविंदभाईना बोलते करण्यासाठी पोलिसी खाक्याचा वापर केला पण त्यांनी भ्र शब्द काढला नाही. वैतागवाडीला गोडे पाटलांच्या घरी असताना नानांची तब्येत बिघडली. त्यांना लहानूकोमच्या घरी आणले. नानांना डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला. नानांच्या तब्बेतीची विचारपूस करण्यास आलेल्या राधाकिसनने पुन्हा पोलीस चौकी ताब्यात घेण्याचा प्रस्ताव मांडला. सगळ्यांच्या इच्छेखातर नानांनी परवानगी दिली पण ते स्वतः मात्र आजारणामुळे त्या लढ्यात सहभागी होणार नव्हते. गुलाबा नाईक, नारायण, पांडुरंग, राधाकिसन आणि आवडाबाई यांच्या नेतृत्त्वाखाली पोलिसचौकीवर पुन्हा ताबा मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यात आवडाबाईच्या पायाला गोळी लागली. तिला पोलीस घेऊन गेले. नारायण, पांडुरंग पळाले. नाईकांना मात्र पकडले. त्यातच पोलिसांना नानाच्या मुक्कामाचा सुगावा लागल्याचे कळताच नानांनी द्वारका आजीच्या पडळीवर आश्रय घेतला. नाईकांना दगड्या व मारत्या भिल्ल यांनी पोलिसांच्या तावडीतून सोडविले. नानांसह नारायण व पांडुरंग हे द्वारका आजीच्या पडळीवर आले. पडळीवर आलेल्या पोलिसांना द्वारका आजीने पळवून लावले. तिघांनाही सुखरुप काढून दिले. थोडे दिवस राहून ते तिघे वैतागावाडीला राहून नंतर प्रवासात येणाऱ्या अडचणींना सामोरे जात मुंबईला गेले. तेथे त्यांनी साने गुरुजींची भेट घेतली. साने गुरुजींनी त्यांना 'विशाखा' या काव्यसंग्रहातील कविता ऐकवून स्वातंत्र्य लढ्यासाठी प्रेरित केले. थोड्याच दिवसात नाना, पांडुरंग व नारायण हे नाशिक येथे पोलिसांच्या तावडीत सापडले. 'पोलिस महाशयांनी त्यांच्या पाठीवर थाप घातली होती. आणि म्हणाले देखील की,' 'चला आता, फार हिंडफीर झाली. आता मुक्कामाला जाऊ'(पृ.१३४) दरम्यानच्या काळात देश पारतंत्र्यातून मुक्त झाला.

स्वातंत्र्यप्राप्ती नंतरच्या बदलत्या राजकीय जीवनाचा आलेख या भागात लेखकाने चितारला आहे. १९५७ सालानंतर झालेल्या स्थित्यंतराचा पट त्यांनी वाचकांसमोर मांडला आहे. जेलमधून सुटल्यावर नानांनी वकिलीची सनद मिळविली. त्यानंतर सानेगुरुजींनी नाशिकच्या हरिभाऊ कुलकर्णी यांची अनुताई हिच्याशी नानांचा विवाह जुळविला. पांडुरंग तिकोनेने

शिक्षकाची नोकरी स्वीकारली. आईने म्हणजे द्वारकाबाईने पसंत केलेल्या मुलीशी विवाह करुन पांडुरंगने आपला संसार थाटला. शिक्षकांच्या अडीअडचणी, प्रश्न सोडविण्याचे कार्य पांडुरंगने आरंभिले. बापूसाहेब देशमुख यांचा स्वातंत्र्यलढ्यात उल्लेख नसला तरी कादंबरीमध्ये ते प्रमुख तीन पात्रांपैकी एक असल्याने त्यांच्याही कार्याचा आढावा घेणे क्रमपात्र ठरते.‘खुशाल देह्यादुपारी खून करा आणि देशमुख वकिलांकडे जा. सुटका हामखास’ (पृ.१४५) अशी ख्याती असलेले बापुसाहेब. तसेच तुकाराम भोईटे पाटलांवर तुरूंगातील कैद्यांच्या सहवासाचा परिणाम असा झाला की तो ‘तुरुंगातून सुटला तो पुरता कम्युनिष्ट होऊन’(पृ.१४७) प्रवरा नदीकाठचा हा भूमीपुत्र ऊसाचा मळा पिकवितो. परिसरात एकच कारखाना त्यामुळे तो कारखाना पिकणाऱ्या ऊसाला पुरा पडत नव्हता म्हणून तुकारामने सहकारी साखर कारखाना काढण्याचे ठरविले. नानांनी गांधीजींची शिकवणीची कास धरली. सत्य, अहिंसा, करुणा आणि सत्याग्रह या मार्गाचा अवलंब करण्याचे त्यांनी ठरविले साने गुरुजींच्या ‘जगाला प्रेम अर्पावे’ हे तत्त्वज्ञान त्यांनी अंगिकारले. आवडाबाईने शिवणकाम सुरु केले. आवडाबाईने तिची एकुलती एक मुलगी लिला हिचा विवाह लावून दिला. परंतु ती सासरी रमली नाही. त्याला कारणही तसेच होते. राधाकिसन वीज कंपनीत वायरमन म्हणून नोकरीस लागला. कादंबरीच्या या भागात, नाना सिरुरांसह तुकाराम भोईटे पाटील व बापूसाहेब देशमुख वकील हे कादंबरी नायक होताना दिसतात.

तुकाराम भोईटे पाटलाने यशवंतराव चव्हाणांची भेट घेऊन साखर कारखान्यास परवानगी मिळविली. दौलतराव शिंदे त्या विभागाचे आमदार असून त्यांच्या परस्पर भोईटे पाटलांनी कारखान्याच्या मंजुरीचे कार्य केल्यामुळे आमदार भोईटे पाटलांचे राजकारणातील प्राबल्य वाढणार म्हणून धास्तावले. पण कारखान्याच्या चीफ प्रमोटरपदी तुकाराम भोईटे पाटलांचे नाव जाहीर करतात. यशवंतराव चव्हाणांच्या सहकार्यामुळे तुकाराम हे प्रभावित होतात. यशवंतरावही भोईटे पाटलांशी संपर्क वाढवितात. कारण मोठ्या नेत्यांना एकनिष्ठ कार्यकर्ते निर्माण करण्यासाठी झटावे लागते. यशवंतराव स्वतः तुकारामाच्या वडिलांची म्हणजे पुंजा पाटलांच्या तब्बेतीची विचारपुस करण्यासाठी येतात. आणि या सर्वामुळे कम्युनिस्ट असलेले भोईटे पाटील काँग्रेसनिष्ठ बनतात.

कादंबरीत नव्यानेच उदय झालेले बापूसाहेब देशमुख वकील आपल्या व्यवसायात प्रसिद्धीस पावतात. त्यांचा इंदिराराजे निंबाळकर यांच्याशी प्रेमविवाह होतो. उदय नावाच्या त्यांच्या मुलाच्या रूपाने संसारीक जीवनही फुलते. इंदिराजींना पतीने राजकारणात उतरुन यश

मिळवावे अशी अपेक्षा असते. देशमुख साहेब पूर्वतयारी म्हणून जनसंपर्क वाढविण्याच्या कामाला लागतात. त्याचाच एक भाग म्हणजे काशिनाथ ढोरमोले वकिलाशी जवळीक साधतात, भुजाडीमामांना आपलेसे करतात. यशवंतराव चव्हाण भोईटे पाटलांच्या घरी आले तेव्हा कॉंग्रेस पक्षात प्रवेश केल्याचा पुष्पहार यशवंतरावांच्या हस्ते त्यांनी घालून घेतला. तत्पुर्वी देशमुखांची किर्तीही पसरली होती. आमदार दौलतराव शिंद्याच्या निवडणुक प्रचारार्थ देशमुखांनी आपल्या ओघवत्या व अभ्यासपूर्ण भाषणांनी जनतेला आकर्षित केले होते.

आमदार दौलतराव शिंदे एकदा आमदार झाल्यानंतर आपल्या विभागाकडे फिरकलेही नव्हते. पुढच्या निवडणुकीचे वेध लागल्यानंतर मात्र परिसरातील स्थानिक, नावाजलेल्या कार्यकत्यांच्या भेटीचे आयोजन त्यांनी केले. त्यामध्ये प्रामुख्याने बुवासाहेब जाधव यांची त्यांनी भेट घेतली. वास्तविक पाहता बुवासाहेबांनाही निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची इच्छा होती. नाईलाजास्तव त्यांनी दौलतरावांना पाठींबा दिला. बुवासाहेब व भुजाडीमामा यांच्यातील मतभेदांचा फायदा दौलतरावांनी उठविला. भुजाडीमामांशी सख्य निर्माण केले. बापूसाहेब देशमुखांसारख्या हुशार व्यक्तीची साथ मिळविली. यातूनच आमदार दौलतराव शिंदे यांनी भोईटे पाटील, बुवासाहेब जाधव, देशमुख वकील, भुजाडीमामा यांचा एक प्रभावी गट निर्माण केला. संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या मुद्द्यावरुन कॉंग्रेस व समितीवाले नाना यांच्यात मतभेद निर्माण झाले. वास्तविक पाहता बुवासाहेब जाधव व भोईटे पाटील यांना नानांविषयी आदर होता पण राजकारणात पुढे मैत्री कमी होत गेली.

नानांनी वकिली व्यवसायासोबतच सेवादलाचे कार्य सुरु केले होते. बावन्न सालच्या निवडणुकीत खूप आग्रह करुनही निवडणुकीला उभे राहण्याला नानांनी नकार दिला परंतु पुढच्या निवडणुकीला मात्र नानांच्या सहकार्यांनी नानांना निवडणुकीला उभे राहण्याचा आग्रह धरला. प्रजासमाजवादी पक्षाकडून ते निवडणूक लढविणार होते. पण अचानक त्यांना तिकिट दिले नाही. कॉम्रेड पवार यांना तिकिट दिले. त्यामागे विरोधी पक्षाने म्हणजे दौलतराव शिंद्यांनी मोठ्या चातुर्याने डाव टाकला होता. नानांच्या विरोधात आपण उभे राहिल्यास आपण विजय संपादन करुच शकत नाही. अशी दौलतरावांना भीती होती. नानांनी स्वतः ला तिकिट मिळाले नसले तरी त्यांनी त्यांच्या पक्षाच्या उमेदवारांचा चांगला प्रचार केला. त्याचेच फलीत कॉम्रेड पवार निवडणुकीत विजयी झाले. दरम्यानच्या काळात नानांनी धरणग्रस्तांच्या व्यथा समजून घेऊन धरणाला विरोध करण्यासाठी त्यांना बंड करुन उठण्यास सांगितले. लहानूकोमच्या शेतीवर

वनखात्याने कब्जा केला होता. त्या लहानूकोमच्या कल्याणासाठी लढण्याचे आश्वासन नानांनी दिले. तुकाराम भोईटे पाटलांनी साखर कारखान्याने दिलेल्या संचालक पदाचा नानांनी राजीनामा दिला.

१९६२ नंतरच्या कालखंडाची सुरुवातच लेखकाने नानांनी मुख्यमंत्र्यांना धरणग्रस्ताच्या प्रश्नाकडे लक्ष द्या नाहीतर आमरण उपोषण हत्यार उपसणार असल्याचे पत्र देण्याने केली आहे. नाना आमरण उपोषणाला बसले. नानांच्या उपोषणाला निस्सार मोमीन, गोविंदभाई तामसरे, अकबरभाई, हमाल कार्यकर्ते, गुलबा नाईक, पांडुरंग तिकोने तसेच शाळीग्राम पाचपुते या सर्वांनी पाठींबा दिला. आमदार दशरथ पवार नानांची भेट घेण्यास गेले. वार्ताहरांनी आमदारांना या सर्व प्रकरणात तुमची भूमिका काय? या प्रश्नाचे उत्तर देताना सरकारने उपोषणापर्यंत वेळ येऊ द्यायला नको होती. तसेच ज्या गावातील धरणग्रस्तांचा प्रश्न आहे ते गाव माझ्या मतदार संघात नाही. असे उत्तर देऊन पत्रकारांचे तोंड बंद केले. नाना उपोषणाला बसल्याने नानांच्या पत्नी अनुताई यांचे वडीलही नानांची भेट घेण्यासाठी आले. बापूसाहेब देशमुखांना पत्रकारांनी नानाच्या उपोषणाबद्दलची भूमिका विचारली तेव्हा बापूसाहेब म्हणाले, ''विस्थापितांची समस्या ही महत्त्वाची आणि जेन्युईन अशी समस्या आहे. याच्याबद्दल कोणीही वेगळं बोलणार नाही. त्याचे प्रश्न आहेत. विकासासाठी काही करताना काही थोड्या लोकांवर अन्याय हा होणारच. पण त्यातले प्रश्न हे तात्पुरत्या स्वरुपाचे असतात. आणि सहानुभूतीच्या भावनेतून त्यावर मार्ग हा काढावाच लागतो. कोणतंही सरकार त्यासाठी प्रयत्न करणारच''(पृ.३०२) यावरुन बापूसाहेबांनी विकासाच्या कामात मूठभर लोकांची आहुती द्यावीच लागते तसेच सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न नाना करीत आहे असे मत मांडले. नानांच्या उपोषणाला तेरा दिवस झाले होते. एस.एम. नानांच्या भेटीसाठी गेले. यशवंतराव चव्हाण यांनी नानांची भेट घेऊन धरणग्रस्तांच्या पुनर्वसना संदर्भात सकारात्मक विचार मांडले तसे आश्वासन घेऊन नानांनी उपोषण मागे घेतले.

दादासाहेबांनी काँग्रेसमध्ये रीतसर तीन वर्षापूर्वीच प्रवेश केला. यशवंतराव चव्हाण खास तेवढ्यासाठी आले होते. त्यानंतर दादासाहेबांनी जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक लढवली. दणदणीत मतांनी ती जिंकली तिथेही ते उपाध्यक्ष झाले. दादासाहेबांची विचारसरणी वेगळ्या धाटणीची होती. त्याच्यामध्ये आणि नानांच्या विचारसरणीत तफावत होती. 'दादासाहेबांचा रस्ता सहकाराचा. सहकारातून समृद्धीचा.'(पृ.३१६) दादासाहेबांच्या मते, 'तत्त्वाच राजकारण त्यासाठी पुरेसं नाही. हे शक्तीचं राजकरण आहे. आणि यातून विकास होतोय. तत्त्वाबित्त्वाचं

नानासाहेबांनी करावं आणि तत्त्वाची चाड दादासाहेबांना नाहीय असं थोडंच आहे?' भल्या माणसांना सहाय्य करण्याची वृत्ती त्यांच्यापाशीही होती. परवा दगडू पाटील गोडे यांचा मुलगा आला होता. लगेचच लावून घेतला. सातवी पास होता तरी मेकॅनिकमध्ये टाकून दिला का? आस्था आहेच ना! समजा ही ताकद आज उभी नसती तर दादासाहेबांना हे करता आलं असतं का? नुसती भाषणं करुन काय उपयोग? काहीतरी उभं कराव लागतं त्यातून मग आणखी पुष्कळ करता येतं लोकांचे प्रश्न असतात. पण उपोषण आत्मक्लेश हा तर ते सोडविण्याचा मार्ग नाही.'(पृ.३१७) यावरुन दादासाहेबांचे विचार कळले. वास्तविक पाहता त्यांनी व्यक्त केलेल्या भावना योग्य वाटतात. सत्तेत असेल तर आपण लोकांची मदत प्रत्यक्षरित्या करु शकतो.

शंकरराव जोशी नावाच्या व्यक्तीने कॉलेज सुरु करण्याचा ध्यास घेतला. त्या प्रसंगी बापूसाहेब देशमुख व नाना सिरुर आणि त्या दोघांचे सर्व सहकारी एका व्यासपीठावर आले. बापूसाहेब देशमुखांच्या मते विज्ञान शाखा प्रथम सुरु करु या कारण आर्टस् शाखा सुरू करणे म्हणजे फक्त सुशिक्षित बेकार तयार करण्यासारखे आहे. नाना सिरुरांच्या मते विज्ञान शाखा सुरू करणे खर्चीक बाब आहे. आपण प्रथम आर्टस् शाखा सुरू करू आणि नंतर विज्ञान. नानांच्या मते, ''विज्ञान, तंत्रज्ञान यांना आधुनिक काळात महत्त्व आहे हे खरं असलं तरी त्याचा वापर करताना जो विवेक, समंजस दृष्टी असावी लागते ती या शिक्षणातून मिळेल. उद्या समजा काही मुले बेकार झाली तर ती शहाणी बेकार होतील. शहाणपणाचे विचार करतील. त्यांना काही मार्ग शोधता येतील.'(पृ.३३९) अशा प्रकारच्या चर्चेनंतर शेवटी आर्टस् सुरु करण्याच्या विषयावर शिक्कामोर्तब झाला. तसेच बांगरवाडी येथे भैरवनाथ उपसा जलसिंचन योजनेच्या पुर्तीसाठी दादासाहेब भोईटे पाटील व बापूसाहेब देशमुख यांनी प्रयत्न केले. शाळा, कॉलेज स्थापने, जलसिंचन योजना सुरु करणे यासारखी विकासाची कामे त्यांच्या मतदार संघामध्ये सुरु करण्यासाठी नेते हिरहिरीने पुढे आले.

निवडणुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर होता. काँग्रेस पक्षामध्ये उमेदवारी मिळविण्यासाठी रस्सीखेच सुरु झाली. निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यासाठी दादासाहेब भोईटे पाटील, बापूसाहेब देशमुख, बुवासाहेब जाधव मागच्या वेळी हारलेले दौलतराव शिंदे यासर्वांची प्रबळ इच्छा होती. परंतु अखेरीस बापूसाहेब देशमुख यांच्यासारख्या हुशार आणि चाणाक्ष व्यक्तींच्या नावावर शिक्का मोर्तब झाला. प्रजासमाजवादी पक्षात मात्र नानांना कोणीही विरोधक नव्हता. त्यामुळे प्रजासमाजवादी पक्षाकडून नानांची बिनविरोध उमेदवारी जाहीर झाली. त्यामुळे अर्थातच

बापूसाहेब देशमुखांविरुद्ध नाना सिरुर अशी लढत होणार होती. भुजाडीमामा, काशीनाथ ढोरमोले, श्रीपतराव ढमाले, भुजंगराव निकम आणि अर्थातच इंदिराराजे ही बापूसाहेबांची अंतर्वर्तुळातली मंडळी तर नानासाहेबांची सारी मोहीम निस्सार हाताळीत होता. त्याची पत्नी लीला, शाळीग्राम, पाचपुते, आवडाबाई, राधाकिसन, अकबरभाई हे स्थानिक कार्यकर्ते तर होतेच. बापूसाहेब देशमुखांच्या प्रचारासाठी खुद्द यशवंतराव चव्हाण हजर झाले. तसेच बुवासाहेब जाधवांसारख्या वजनदार व्यक्तींची नाराजी घालवण्यासाठी यशवंतराव चव्हाण बुवासाहेब जाधवांच्या घरी गेले. यशवंतराव म्हणाले, 'याचक म्हणून आलोय, भिक्षा मागायला दाराबाहेर उभं राहणंच बरं.'(पृ.३९७) या त्यांच्या वाणीने बुवासाहेब पुरते विरघळले. यावरुन यशस्वी राजकारण्यांना आपल्या कार्यकत्यांचा राग घालविण्याची कला प्राप्त झालेली असते हे सिद्ध होते. नाना सिरुरांचे कार्यकर्तेही सायकलवरुन मतदारापर्यंत जाऊन नानांचा प्रचार करीत होते. पण अखेरीस बापूसाहेब देशमुख विजयी झाले. नानांची हार झाली. खचलेल्या नानांनी प्रजासमाजवादी पक्षाचा राजीनामा अध्यक्षांकडे सुपूर्द केला. नानांच्या या निर्णयाने निस्सार सुन्न झाला. निस्सारला आपल्या राजीनाम्याचे समर्थन करण्यासाठी नाना म्हणाले, 'राजकीय पक्ष हे राजकारणासाठीच असतात आणि राजकारण सत्ता प्राप्तीसाठी असते. या दोन्ही गोष्टी करायच्या नाहीत म्हंटल्यावर पक्षाची बांधिलकी मी कशासाठी ठेवू.'(पृ.४३१) पक्षात राहिलो नाही तरी सामाजिक कामात तुमच्याबरोबर असेन तुम्हाला साथ देईन असा शब्द नानांनी मोमीन निस्सारला दिला.

पुढच्या टप्प्यातील म्हणजे १९६८ नंतरच्या कालखंडाचे विवेचन लेखकाने राजकारणातील विविध घडामोडीं बारकाव्यांसह केले आहे. सदुसष्टच्या निवडणुकीत दादासाहेब खासदार झाले. जिल्हापातळीवरुन एकदम देशपातळीवरच्या राजकारणात त्यांना जावे लागले. दादासाहेब भोईटे पाटलांचा बंगला, बंगल्यावर जायला डांबरी रस्ता, बंगल्याभोवती ऐस पैस जागा होती. दोन मुली व एक मुलगा आणि पत्नी गोधाबाई असा परिवार त्यात मोठ्या मुलीचे लग्न झालेले. बंगला किंवा इतर भौतिक सुविधांचा नानांना सोस नव्हता. ''पण मित्र असतात त्यांचे प्रेम असते व्यवहाराच्या भक्कम पायावरची मैत्री माणसाला अनिच्छेने काही गोष्टी स्वीकारायला लावते. त्यातील दादासाहेबांना स्वीकारावी लागलेली ही एक''(पृ.४३८) सुरुवातीला अनिच्छेने जरी स्वीकारलेली असली तरी नंतर त्याची उपयुक्तता पटू लागली.

नानांनी वेळोवेळी ज्या गोरगरीब जनतेवर अन्याय होतो त्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. तसाच एक प्रसंग लेखकाने मांडला आहे. परिसरात बव्हंशी बड्या शेतकऱ्यांनी दलितांच्या जमिनी बळकावल्या. त्यासाठी नानांनी बैठक बोलावली होती. निस्सार मोमीन, सीताराम वैराट, शालिग्राम पाचपुते, रामसिंग परदेशी आणि पुष्कळ कार्यकर्ते आले होते. ज्यांनी दलितांची जमीन अशी बळकावली आहे. त्या बळकावलेल्या जमिनीत, त्या जागेत बैठा सत्याग्रह करण्याचे ठरले, धोंडिभाऊ खुपटे या महाराची जमीन दादासाहेब भोईटे पाटील यांनी कसायला सुरुवात केली होती. नेमके तेथेच बैठा सत्याग्रह सुरु केला. हा सर्व प्रकार दादासाहेबांना समजल्यावर ते तातडीने दिल्लीहून आले. त्यांनी धोंडिभाऊ खुपटे यांना बोलावून प्रेमळ संवाद साधला. त्यांना पैसे देऊन खूश खरेदीचा कागद करुन घेतला. खुपटे यांनी तक्रार मागे घेतली व ते दिल्लीला निघून गेले. परंतु नानांना या गोष्टीची कल्पना नव्हती त्यांचे आंदोलन चालूच होते. याचा परिणाम असा झाला की नानांना चार-आठ दिवसांसाठी अटक झाली. एकदा पांडुरंग तिकोने साबणाच्या कारखान्याचे प्रपोजल घेऊन गेले. तेव्हा तिकोने यांनी नानांनी केलेल्या सत्याग्रहाविषयी मत व्यक्त केले. नानांविषयी तिकोनेच्या मनात आदर होता. आपण आपल्या एका सच्चा मित्राच्या अटकेला कारण ठरलात याचा मला खेद वाटला. तसेच खुपटेला ती जमीन परत करण्याचेही तिकोने यांनी सांगितले. दादासाहेबांनीही मान्य केले. वर्षसहा महिन्यांनी आपण ते करु असे त्यांनी सांगितले आणि दादासाहेबांनी पांडुरंगला दिलेला शब्द पाळला. थोड्याच दिवसांनी बंगल्यासमारेच जमिनीची कागदपत्रे धोंडिभाऊ खुपटे यांना देण्याचा छोटेखानी समारंभ योजिला.

नानांचा मुलगा जयप्रकाश याला इंजिनियरिंगच्या ॲडमिशनसाठी अर्धा टक्का कमी पडत होता. स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा असा पुरावा ॲडमिशनसाठी सादर केला तर जयप्रकाशला ॲडमिशन मिळाले असते. तसा आग्रह त्याने नानांकडे धरला पण नानांनी त्याला साफ नकार दिला. त्यांच्यामते सर्टिफिकेटमुळे तुला प्रवेश मिळेल 'पण स्वतःच्या हुशारीच्या बळावर, केवळ स्वतःवर अवलंबून असणाऱ्या एखाद्या गरीब मुलाचा प्रवेश त्यामुळे नाकारला जाणार हे योग्य आहे का?'(पृ.४६७) म्हणजेच नानांनी जयप्रकाशला ठाम नकार दिला. अशा पद्धतीने नानांच्या व्यक्तिमत्त्वातून वेळोवेळी आदर्श तत्त्वाचाच प्रत्यय येतो.

नानांची मुलगी अरुणा हिने दहावीनंतर प्री.डिग्री आर्टस् वर्गात ॲडमिशन घेतले कॉलेजात तिने 'कमवा व शिका' योजनेत नाव नोंदविले. नानांच्या पत्नीनेही पती वकील

असूनही त्याचा बढेजाव मिरवला नाही. साधेपणाने राहिल्या नानांच्या अल्पशा कमाईत समाधानाने संसाराचा रेटा पुढे नेते.

बापूसाहेब देशमुख यांना भोईटे पाटलांच्या प्रगतीची असूया वाटत होती. आणि म्हणूनच पंचायत समितीच्या निवडणुकीत त्यांचा उमेदवार भुजाडी मामा यांच्या विरुद्ध भोईटे पाटलांचे समर्थक शंकरराव दरंदले यांचा विजय झाला. ही आपली भोईटे पटलांविरुद्धची हार आहे असे वाटले. पण कालांतराने शंकरराव दरंदले व भोईटे पाटील यांच्यातही दुरावा निर्माण झाला. तेव्हा पेट्रोलपंपाच्या मान्यतेसाठी शंकरराव दरंदले बापूसाहेबांकडे गेले. देशमुख साहेबांनी त्यांना प्रथमदर्शनी नकार दिला. पण धोरणी इंदिराराजे यांनी बापूसाहेबांना शंकरराव दरंदलेचें पेट्रोलपंपाचे काम करण्याविषयी मनवले. भुजाडीमामा ही बापूसाहेबांकडे स्वातंत्र्यसैनिक असल्याचे सन्मानपत्र मिळावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. अखेरीस बापूसाहेबांच्या प्रयत्नाने सन्मानपत्र मिळाले व मानधनही सुरु झाले. राजकारणात आपल्या गटातील लोकांना मदत केली पाहिजे. त्यांना सांभाळून घेतले पाहिजे अशी इंदिराराजेंची बापूसाहेबांना शिकवण होती. बापूसाहेब श्रीपतींच्या प्रसंगावधानाने फार मोठ्या बदनामीच्या प्रसंगातून वाचले होते.

बुवासाहेब जाधवांनी आमदार पदाच्या निवडणुकीला उभे राहण्यासाठी तिकीटाचा हट्ट पक्षाकडे केला पण त्यांना नकाराला सामोरे जावे लागले. पुढे सगळ्यांनी पंचायत समितीला उभे राहण्याचा आग्रह धरला पण तो मनापासून नव्हता. 'उभे नका राहू, तुमच्या वजनाचा आधार तेवढा द्या, ही भावना'(पृ.४५९) सर्वांचीच होती. बुवासाहेब एकदा सरकारी विश्रामगृहात आले. त्यांनी आंघोळ उरकली. कपडे बदलून ते पलंगावर बसले. विवस्त्र अवस्थेतील एक स्त्री त्यांच्या पलंगावर बसली आणि तेवढ्यात दरवाजा वाजला. बाहेर इंदिराराजे होत्या. बुवासाहेबांनी नाईलाजाने दार उघडले. आत आल्यावर त्यांनी त्या स्त्रीला पाहिले नंतर भेटू असे बुवासाहेबांना म्हणून त्या निघून गेल्या. त्यानंतर बुवासाहेब मनाने खचले. देवभोळा माणूस पण त्याच्या नशिबी इतक्या अश्लिल प्रसंगाला सामोरे जाण्याची वेळ आली. ही झालेली मानहानी बुवासाहेब जाधव यांना पचविता आली नाही. त्यानंतर त्यांनी राजकारणाला कायमचा रामराम ठोकला. बुवासाहेबांना वाण्याचे बील द्यायला देखील पैसे नव्हते इतकी त्यांची दयनीय अवस्था झाली होती. दादासाहेबांनी बुवासाहेबांचा एक्कावन हजारांची शैली देऊन सत्कार केला त्याचा मुख्य उद्देश राजकारणातून संपलेल्या व्यक्तीचा दादासाहेब सत्कार करतात. म्हणजे दादासाहेबांचे मन किती विशाल आहे याची जनतेला कल्पना येईल, 'दादासाहेबांचे थोर हृदय त्यांना माहीत व्हावे

हा मर्यादीत हेतू आहे. उगी जास्त गाजावाजा करण्याची काय गरज?' त्यानिमित्ताने बुवासाहेबांवर प्रेम असणाऱ्या माणसांना दादासाहेबांविषयी प्रेम वाटते हे खरे'(पृ.५६५) गोविंदभाई तामसरे यांचा दीर्घ आजारपणानंतर मृत्यू झाला. त्यांची आजारपणात गुलाबराव नाईक, नाना, निस्सार यांनी तसेच त्यांच्या कुटुंबियांनी खूप काळजी घेतली. पांडुरंग तिकोने हा त्यांचा मित्र गोविंदभाईच्या अंत्यविधिला येऊ शकला नाही. म्हणून नंतर तो गोंविदभाईच्या घरी गेला. तो गोविंदभाईच्या मुलींना किंमती साड्या घेऊन गेला. त्यातून पांडुरंगाचे सहृदयी मन व्यक्त होते.

कादंबरीच्या या भागात इतरही महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. त्यामध्ये प्रमुख्याने शहरात स्थापन केलेल्या महाविद्यालयातील एका तरुण मुस्लीम प्राध्यापकावर आरोप केला जात होता. तो असा की हा प्राध्यापक महाविद्यालयातील चांगल्या कुटुंबातील मुलींशी गैरवर्तन करतो पण प्रत्यक्षात मात्र तसे नव्हते. तो मुलींबरोबर व मुलांशी देखील मनमोकळा संवाद साधत होता. त्याचे राहणीमान टापटीप होते. मुख्य मुद्दा म्हणजे त्याने अगदी कमी कालावधीत जास्त प्रगती केली होती. हे इतर प्राध्यापकांना खपत नव्हते म्हणून ते त्याची उगीच बदनामी करीत होते. तसेच मुंबई मध्ये हिंदू-मुस्लीम यांच्यातील जातीय दंगलीमधून जाळपोळ ह्या सारख्या हिंसक घटना कादंबरीत समाविष्ट केल्या आहेत. बापूसाहेब देशमुखांचा मुलगा उदयसिंग मुंबईला एल्फिन्स्टन कॉलेजात बी.ए. च्या शेवटच्या वर्गात शिकत होता. त्याच्या कॉलेजात शिकणाऱ्या रीटा ब्रुकनेर या ॲग्लो इंडियन मुलीशी त्याचा विवाह झाला.

दादासाहेब भोईटे यांचा मुलगा अंकूश भोईटे हा पुण्यात शिकण्यास गेला तेथे त्याची अजीत काटे या मुलाशी भेट झाली. अंकूश बी.ए. करीत होता. त्याचा विषय इतिहास आणि राज्यशास्त्र एस.वाय.बी.ए. ला असताना तो जनरल सेक्रेटरी झाला. अंकुशचा मित्र अजित त्याचे वडील सर्जेराव काटे यांनी पुण्यात आल्यावर अंकूशला पाहिले व आपल्यामुलीचा अंकुश बरोबर विवाह करण्याचे योजिले. त्यामुळे ते अंकुशला काटेवाडीला येण्यासाठी आग्रह करीत. तसेच शरदपवारांनी अंकुशसारख्या उद्योन्मुख नेत्याला काटेवाडील येण्याचा आग्रह धरला.

या भागात देशपातळीवर अनेक घडामोडी होताना दिसतात. देशाला स्वातंत्र्य मिळून पंचवीस वर्षे पूर्ण झाली म्हणून तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्य सैनिकांस 'ताम्रपट' प्रदान केले. मुंबईलाही हिंदू-मुस्लीम दंगे झाले त्यामध्ये जाळपोळ रक्तपात झाला. निरपराध गोर-गरीब लोकांचे नुकसान झाले. अशा पक्रारे विविध घडामोडी घडत गेल्या या

भागातील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे यशवंतराव चव्हाण यांनी नानांना पद्मश्री किताब देण्याचा निर्णय घेतला तसे पत्र त्यांनी नानांना दिले पण नानांनी यशवंतरावांना पद्मश्री न स्वीकारण्याबाबत विनम्रपणे नकार कळविला.

१९७५ नंतर कालखंड देशाच्या दृष्टीने देशवासीयांच्या व अतिशय खडतर गेला 'गरिबी हटाओ' चा नारा देऊन निवडणूक जिंकली. पंचवीस वर्षात लोकशाही प्रजासत्ताकाचे एकाधिकारशाही प्रजासत्ताक झाले? स्वातंत्र्याचा गळा आवळला गेलाय. आपल्याच लोकांकडून, स्वकीयांकडून सारे आवाजबंद झालेत. सारीकडे भीतीची, दहशतीची भावना या देशाला हे काय झाले?(पृ.५९७) लेखकाच्या या निवेदनातून या कालखंडातील देशवासीयांच्या अवस्थेची कल्पना येते. तत्कालीन पंतप्रधान यांनी १९७५ साली आणीबाणी जाहीर केली.

दादासाहेब भोईटे पाटलांना समारंभपूर्वक 'ताम्रपट' मिळाल्याचा आनंद त्यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी साजरा केला. थेट दिल्लीत प्रवेश मिळाल्यामुळे इंदिरागांधीविषयी आदर निर्माण झाला होता. यशवंतराव चव्हाण यांचे दादासाहेबांच्या बंगल्याच्या हॉल मधील तैलचित्र काढून त्याठिकाणी 'ताम्रपट' लावला गेला एवढेच काय पण बंगल्याचे नाव ही 'ताम्रपट' ठेवले गेले. आणीबाणीमुळे सर्वांच्या मनात एक धास्ती असे कोणत्या वेळी कोण काय करील याचा भरवसा नव्हता. 'कासवासारखे हात, पाय, डोके, आकसून घेऊन टणक पाठीने गुपचूप राहण्याचा खेळ सावधानतेने करावा लागत आहे.'(पृ.६०३) महाराष्ट्रातील राजकारणात इंदिरागांधीनी बरेच बदल केले. बहात्तरच्या विधानसभा निवडणुकीनंतर वसंतराव नाईक मुख्यमंत्री झाले. आपले सरकार निवडण्यासाठी त्यांना दिल्लीवारी करावी लागली. म्हणजेच सर्व निर्णय इंदिराजींनीच घेतले. पण त्यात यशवंतराव चव्हाणांच्या मतालाही प्राधान्य असे. पण यावेळी मात्र निवडणुकीनंतर सर्वांनाच दिल्लीत बोलावले. प्रत्येक आमदाराची मुलाखत घेतली बापूसाहेबांना बोलावून त्यांच्यासमोर फाईल टाकली. सी.बी.आय.ने तयार केलेला नेटका व तंतोतंत अहवाल त्यात होता. 'तलावाकाठीच्या गेस्ट हाऊसमधल्या चांदण्यारात्रीचे फोटोग्राफ्स'(पृ.६०५) त्यामुळे बापूसाहेबांना मंत्रीपदावरुन पाय उतार होण्यास सांगितले. इंदिराजींना यशवतरावांचे वाढते प्राबल्य मान्य नव्हते. त्यामुळे त्यांचा महाराष्ट्रातला पाया ढिला करायचा होता. आणीबाणीमुळे सारी ताकद एका ठिकाणी एकवटली होती.

आणीबाणीमुळे प्राध्यापक कुलकर्णी सारखे बुद्धीजीवीवर्ग घाबरले होते. कारण ते ब्राह्मण आर.एस.एस.चे काम करतात म्हणून अटक होईल अशी त्यांना सतत भीती त्यामुळे

आणीबाणीचा 'पुरस्कार' कवितासंग्रह ही या भाबड्या व्यक्तीने लिहिला होता. इंदिरा गांधीजींच्या हुकूमशाहीविरुद्ध नानांनी आवाज उठविला कोणतीही व्यक्ती देशापेक्षा मोठी नाही, असे ते मानत होते. 'इंदिरा म्हणजे इंडिया आणि इंडिया म्हणजे इंदिरा'(पृ.६१०) अशी देशाची गत झाली आहे. असे नानांना वाटते. इंदिराजी सत्ता लोभासाठी साऱ्या देशावर अन्याय करीत आहेत. अन्यायाविरुद्ध आपण आपला आवाज बुलंद केला पाहिजे असा ते सल्ला देतात.

खेड्यापाड्यात मात्र आणीबाणीला विरोध नव्हता. कारण सावकारांनी लोकांचे गहानवटीला ठेवलेले सर्व ऐवज जनतेला दिले. शहरात ही स्थिती मात्र भयावह होती. वैराटांसारख्या प्राध्यापकाने प्रथमदर्शनी समर्थन केले. मात्र नंतर त्यांनी आणीबाणीला विरोध करणारी भाषणे केलीत. त्यासाठी त्याला जेलमध्ये डांबले पण नानांना मात्र पकडले नाही. याचा खेद नानांना वाटत होता. गुलाबराव नाईक व राधाकिसन यांना मात्र आणीबाणी विरोधी पत्रक वाटल्यामुळे नाईलाजाने पकडून नेले.

राजकारणामध्ये तरुण पिढीचा उदय होऊ लागला होता. दादासाहेबांच अंकुशराव भोईटे पाटील यांनी शस्त्रक्रियेचे मोठे शिबिर आयोजित केले आणि त्या शिबिरास संजय गांधी यांच्या बरोबर मुख्यमंत्री शंकररावही उपस्थित राहिले. म्हणजे अंकुशसारख्या तरुणाने अल्पावधीत दिल्लीत आपली पत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शरद पवार साहेबांना अंकुश भोईटे यांनी आपले गुरु मानले. या ठिकाणी राजकारणी लोकांना एकदा सत्ता मिळाली की त्यांची सत्ता लालसा वाढत जाते. तर एकदा राजकारणात उतरती कळा लागली की त्यांना समाजात कोणीही महत्व देत नाही. पोलीस, खात्यात बापूसाहेबांची पत पद गेल्यावर घसरल्याचे दिसते. बापूसाहेबांच्या जीवनातील सुखाची गोष्ट म्हणजे त्यांचा मुलगा उदयसिंगाने कोकणातल्या राणे यांच्या भाग्यश्री नावाच्या मुलीशी विवाह केला व त्यांना सुकन्या नावाची मुलगी होती. मुलगा गोव्यातली शेती करीत होता. मंत्री झालेल्या सच्च्या व्यक्तीने स्वतःसाठी गाडी देखील घेतली नाही. अधिकाराचा गैरवापर केला नाही. पण बदलत्या राजकारणाची नांदी ओळखून बापूसाहेब देशमुख यांनी आपल्या कार्यकत्यांच्या विनंतीला मान दिला. जनता दलाल प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

१९७९ चा काळ म्हणजे जनतापक्षासह शरद पवार यांना सत्ता स्थापन केल्याचा काळ अठ्ठ्याहत्तरच्या विधान सभा निवडणुकीमध्ये अंकुशराव भोईटे पाटील विरुद्ध बापूसाहेब देशमुख अशी लढत झाली, पण या लढतीमध्ये बापूसाहेबांची हार झाली. शरद पवार त्यांचा गट तसेच

साथीला अंकुशराव भोईटे पाटील काँग्रेसमधून बाहेर पडले. पूर्वाश्रमीचे जनसंघ, समाजवादी संघटना, काँग्रेसवाले असे सारे एकत्र आले जनता पक्षातील बापूसाहेब देशमुखांसह त्यांचे कार्यकर्ते यांची ही त्यांनी साथ मिळविली. शरद पवारांच्या नेतृत्वाखाली नव्या पुलोद मंत्रीमंडळाचा शपथविधी पार पडला. हा कालखंड म्हणजे जनता पक्ष्याच्या अल्पशा राजवटीचा आणि पुन्हा इंदिराजींच्या समाज ताब्यात घेण्याचा काळ. या सर्व पक्ष्यांच्या एकजुटीमध्ये एस.एम.जोशी, नानासाहेब यांच्यासारखे तत्वाला मानणारे नेते देखील तडजोड करतात, याचा नाना सिरुर यांच्या मनावर खोल परिणाम झाला. ते मनाशी म्हणतात, 'पेपर नको होता, वाचनचं बंद केलं होतं... चारपाच दिवस झाले पेपरात काय असणार? दिल्लीची सत्ताबाजी, चरणसिंग, राजनारायण, मोरारजी, जगजीवनराम वाघिणीसारखी टपलेली इंदिरा गांधी, खेळखंडोबा, कळसुत्री बाहुल्यांचा खेळ. जयप्रकाश नारायण कसे आहेत?' माहीत होऊन काय फरक पडणार? ते तर कधीचेच गेले असणार. ह्या सत्ताबाज कळसूत्र आणि मळसूत्र आणि कोणकोणत्या सूत्रांनी शिणलेला त्यांचा आत्मा कधीच बधिर होऊन गेला असेल.'(पृ.७२२) या विचारातून नाना सिरुर यांची अगतिकता दिसून येते. विविध टप्प्यावर येणाऱ्या अनुभवांमुळे प्रथम राजकारणातून ते बाहेर पडले व अखेरीस समाजकारणात त्यांना रस वाटेना. डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर नानांच्या व्यथेविषयी म्हणतात, ''सिरुरांची व्यथा म्हणजे लेखकांची अन्तर्व्यथा लेखकाचा आवाज भारतीय राजकारणातल्या नैतिक मूल्यांचे हे पूर्ण विघटन''[१६]

दादासाहेब भोईटे पाटील यांनी मात्र भवितव्य लक्षात घेवून जाणतेपणाने द्राक्षाच्या बागेत मद्यार्काचा कारखाना काढण्याचे ठरविलं म्हणजेच आर्थिक सुबत्तेत भर टाकण्याचाच प्रयत्न केला. जयप्रकाशला दोन मुली झाल्या, त्यानंतर तिसरा मुलगा झाला. पण तो व्यंग होऊन जन्माला आला तेव्हा दादासाहेब अंतर्मुख होतात. राजकारणात काही लोक आपल्याकडून दुखावले गेले त्याचा तर हा परिणाम नसेल. कुटुंबातल्या सर्व बाजुंनी अनुकूल असल्यातरी दैवी शक्तीपुढे कितीही यशाची शिखरे गाठलेल्या माणसाला हात टेकावे लागतात. तसेच अचानक मंत्री झालेले बापूसाहेब देशमुख मात्र मधल्या पडत्याकाळातील अनुभवांमुळे थोडे बदलले. बापूसाहेब बिअरबारसाठी शंकर नानांकडून कमिशन घेऊन परवानगी देण्याचे आश्वासन देतात. परमेश्वराच्या कृपेनेच अपेक्षितरित्या आपल्याला पुन्हा मंत्री होण्याचे भाग्य लाभल्यामुळे वाचन व्यासंगी व बुद्धीवादी बापूसाहेब होम हवन, पूजापाठ यांच्यामागे लागले.

कौटुंबिक स्थिरस्थावर किंवा समाधानी नाना सामाजिक क्षेत्रात मात्र व्यथीत असतात. उच्च पदवी घेऊनही परदेशाचा रस्ता न धरता भारतातच सेवाकार्यत रमणारा त्यांचा मुलगा जयप्रकाश तसेच भारतीय संस्कृतीविषयी आत्मीयता बाळगणारी त्यांची सून सुनेत्रा, तसेच मुलगी अरुणा हिलाही डॉक्टर मोहिते यांनी पसंत केले होते. यामुळे नानांना कौटुंबिक क्षेत्रात जीवनाचे सार्थक झाल्यासारखे वाटते. पण राजकारणातील व सामाजिक क्षेत्रातील उलथापालथीमुळे नाना स्वतःला सर्व जगापासून संबंध तोडून कोषात बंद करुन घेताना दिसतात. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''इथे नानांना तो आध्यात्मिक स्पर्श-सार्थकतेचा क्षण गवसला.''[१७] लेखकाच्या मते, 'मुळात जीवनाचा आरंभ किंवा त्याचे असणे यात सूर्य जसा सनातन तशीच करुणाही सनातन मूलभूत गोष्ट व्यापक आणि पेरलेली माणसांच्या मनात मानव्याचे प्रेम ही गोष्ट सनातन व्यापक करुणेचे रुप तुम्ही माणूस आहात म्हणून माणसाविषयी प्रेम किंवा खरे तर साऱ्याच सजीवांचे परस्परांशी संबंध या साऱ्यांना व्यापून करुणेचा उजेड सतत सोबत सारीकडे लख्ख सूर्यप्रकाश जसा नित्य'(पृ.८०६) आहे.

**३.२.१०. तणकट :**

'तणकट' ही राजन गवस यांची ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीत प्रामुख्याने गावातील राजकारण, काळी व पांढरीचे चित्रण आले आहे. गावातील सवर्ण लोक महार, मांग तसेच विविध व्यावसायिक यांच्याही जीवनाला स्पर्श करणारी ही कादंबरी आहे. मुख्यता या कादंबरीचा नायक हा महार समाजातील सुशिक्षित मुलगा कबीर कांबळे आहे. त्यामुळे प्रामुख्याने दलित-ग्रामीण कादंबरी असे म्हणता येईल.

कादंबरीचे कार्यक्षेत्र हे प्रामुख्याने कबीरचे खेडे आणि त्याचे कॉलेज आहे. त्यामुळे या द्विस्तरावर घडणाऱ्या घटनांचा त्या संबधाने येणाऱ्या विविध व्यक्तींचा कादंबरीमध्ये अंतर्भाव होतो. गावातील सर्व समाजाने झिडकारलेला बाळासाहेब शेडबाळेने महारवाड्याला आपलेसे केले. त्याला कारणही तसे ठोस होते. बाळासाहेबाने गावातील डेअरीत साठ हजार रूपयांची अफरातफर केली होती. चातुर्याने तो स्वतः कायदेशीररित्या अलिप्त राहून त्याने गावातील जाणत्या माणसांना फसविले आणि त्यामुळे बाळासाहेब शेडबाळेला गावातीलं सवर्णांनी बाहेरची वाट दाखवली. दुखावलेल्या शेडबाळेने महार, गावातील सवर्ण तसेच महार-मांग यांच्यात संघर्ष लावून देण्याचा सतत प्रयत्न केला. महार समाजाने गावात कोणाकडे पैशासाठी हात पसरू नयेत म्हणून महारांसाठी स्वतंत्र पतसंस्था सुरु केली. जयभीम तरुण मंडळासाठी वडारवाड्या

पलिकडची जागा मंजूर करुन आणली व तेथे 'जयभीम तरुण मंडळ' स्थापन केले. महारवाड्यातील मुलांसाठी उत्पन्नाचे साधन म्हणून पंढऱ्या बँजो पार्टी सुरु केली. या सर्व कामामध्ये त्याने गौतम काबंळे, दादबा, भीमा महार, डेप्युटी गोपाळ यांची मदत घेतली. जालिंदर बनसोडे आलताफ कांबळे या नेत्यांनीही स्वार्थासाठी वेळोवेळी शेडबाळेला त्याच्या कार्यात साथ दिली. महारवाड्यात बाळासाहेब शेडबाळे महारांसाठी राबत होता त्यामुळे 'सगळ्या महारवाड्यात बाळासाहेब म्हणजे देवमाणूस हेच समीकरण रुढ झालं होतं.'(पृ.१३८) हाच देवमाणूस पुढे महारांसाठी दानव ठरतो. कारण पुढील कथानकात असे समोर आले की बाळासाहेबाने महार समाजातील अनेक लोकांचे अंगठे घेऊन मोठ मोठ्या रकमांचे कर्ज घेतले. आणि रामा महाराची सुली हिला घेऊन पोबारा केला. खरतर बाळासाहेब शेडबाळेने महार लोकांसाठी केलेल्या सुविधा ह्या बिचाऱ्या अडाणी लोकांसाठी नव्हत्या तर त्यातून त्याला स्वतःचा स्वार्थ साधायचा होता. कारण जेव्हा जालिंदर बनसोडेला जयभीम तरुण मंडळाच्या जागेसाठी लाच देऊन काम करुन घेतो त्यावेळी बनसोडेने 'एवढी पदर मोडू कशाला कराला?'(पृ.१३९) हा प्रश्न बनसोडेला विचारला तेव्हा या प्रश्नांचे शेडबाळेच्या तोंडातून अचानक आलेले उत्तर ''जालिंदर तुला नाही कळायचं. ही पदरमोड नाही. ही गुंतवणुक आहे'' (पृ.१३९) या उत्तरात त्याच्या वृत्तीचा सार दडलेला होता.

कादंबरी नायक कबीर आणि शेडबाळे हे वेगवेगळ्या मतांचे दोन प्रवाह कादंबरीच्या निमित्ताने पुढे आले आहेत. गाव आणि कॉलेज हे दोन ठिकाणे कबीरची अनुभवक्षेत्रे होती. कॉलेजमध्ये शिकवत असलेले प्राध्यापक यांचे दलित समाजातील विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या हीन वागणूकीचे उदाहरण प्रा. गंजेकर यांच्या माध्यमातून समोर येते.(पृ.१५) प्रा. नसलापुरे हे ब्राह्मण जमातीविषयी वाईट बोलत त्यामुळे प्रल्हाद कुलकर्णीने प्रा. नसलापुरे यांची चौकशी झाली पाहिजे. असा तगादा लावला. तर कबीर व सुबाना यांनी प्राचार्यांना प्रा गंजेकर हे जातीयवादी आहेत व ते मागास पोरांना हिणवतात असा त्यांच्यावर आरोप केला.(पृ.१२७) प्रा. अवचित भालेराव आणि नसलापुरे दलित समाजातलेच असून त्यांच्यातही गटातटाचे राजकारण होते.(पृ.१३१) कबीरला सुरुवातीला फणीद्र कांबळे सरांविषयी आदर होता पण त्यांच्यातही मतभेद होता. फणींद्र सरांच्या मते. ''सगळ्या सवर्ण मंडळींना जर शुद्धीवर आणायचं असेल तर आपण मिळेल त्या संधीचा फायदा घेऊन त्यांना धक्का दिला पाहिजे''(पृ.११४) तर खेड्यातल्या महारवाड्यात जगायचे म्हणल्यावर सवर्णांशी संघर्ष करुन उपयोग नाही असे कबीरचे मत होते.

कबीरचे कॉलेजच्या प्राध्यापकांबरोबरच त्याच्या मित्रांशी असलेले परस्पर संबंध यावरही दृष्टीक्षेप टाकणे गरजेचे आहे. पितांबर जगदाळे सारखा सवर्ण मित्र दलित समाजातील विद्यार्थ्यांना ज्या सवलती मिळतात त्या सवलतींचा दलित सदुपयोग करतातच असे नाही. स्कॉलरशीप म्हणून मिळणाऱ्या पैशावर ही मूले व्यसनाच्या आहारी गेली आहेत ही सत्यता पटविण्याचा पितांबरने प्रयत्न केला.(पृ.६३, ६४) मोहन बल्लाळ सारखा सवर्ण मित्र आपण हा समाज सुधारण्याच्या राजकारणात पडू नये आपण आपला विकास साधावा. अशा प्रकारचा सल्ला कबीरला देतो. काशिनाथ ऐनापुरे, हिरामण, सुबाना, दयानंद रत्नाकर, राजा कांबळे यांना दलित संघातर्फे तालुका व्यापी मेळावा घेतला त्यांच्या मते दलितांच भांडवल करुन स्वतःच्या तुंबड्या भरणाऱ्याला संपविण्याचा काशिनाथ व त्याचे मित्र यांचा मुख्य हेतू होता. पण आलताफ कांबळे, जालिंदर बनसोडे, आनंदा कांबळे तालुक्यातील या स्थानिक पुढाऱ्यांनी हा दलित संघातर्फे घेतला जाणारा मोर्चा हाणून पाडला. या सर्व प्रकरणात कबीर मात्र अलिप्त राहिला. अशा प्रकारे तरुण वर्गाचे वेगवेगळे विचारप्रवाह त्यांच्या चर्चेतून, कार्यातून लेखकाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने सवर्ण व महार यांच्यातील संघर्ष स्पष्ट केला आहे. गणू पाटलाच्या मुलाने आप्पुण्ण्या महाराला बेदम मारले या प्रसंगातून संघर्षाला सुरुवात झाली. दलित नेत्यांनी लोकांनी गावातल्या लोकांच्या बांधावर कामाला न जाण्याचा निर्णय घेतला आणि उलट पक्षी गावानेच दलित समाजावर बहिष्कार टाकला अशी केस रंगविली. त्यातूनच पुढे जयभीम तरुण मंडळासाठी मिळविलेल्या जागेवरुन दोन्ही गटात तणावपुर्ण वातावरण निर्माण झाले. या सर्वांमध्ये कायदा दलितांच्या बाजूने असल्याने त्याचा दलितांनी काही अंशी गैरफायदाही घेतल्याचे जाणवते. पण आक्काबा राणे सारखी अनुभवी व्यक्ती दोन्ही समाजात समेट घडविण्याचा प्रयत्न करते, शेवटी बाळासाहेब शेडबाळेने महार समाजातील लोकांच्या नावावर काढलेल्या कर्जातून त्या बिचाऱ्यांची सुटका करण्यासाठी ह्याच दलित समाजाला साथ देताना आढळते.

महार व मांग यांच्यातही वाद होते. मांग समाजाला अनेक गावातील अनेक महत्वाच्या कामात असलेले मानाचे स्थान महारांना खपत नव्हते. त्यामुळे ते मांग समाजाचा दुःस्वास करताना आढळले. महारांनी बॅजोपार्टी सुरु केली म्हणून यल्लाप्पा दावणेच्या मदतीने मांगांनी झांजपथक सुरु केले. वास्तविक पाहता महार व मांग दोन्हीही दलित त्यांच्यात सख्य असायला

हवे होते पण त्यांच्यातही तेढ होते हे स्पष्ट होते. कादंबरी नायक कबीर मात्र या सर्व गोष्टींमध्ये अलिप्ततावादी धोरण अवलंबताना दिसला. पण जेव्हा बाळासाहेब शेडबाळेकडून शेवटी आपल्या लोकांची फसवणूक झाली त्यावेळी मात्र कबीर त्यांच्या पाठीशी उभा राहिला.

कादंबरीच्या माध्यमातून दलित समाजाची एक खंत समोर येते ती म्हणजे महारवाड्यातून शिकून सवरून मोठी झालेली, नोकरीला लागलेली मुलं महारवाड्याकडे आपल्या कुटुंबाकडे पाठ फिरवताना दिसली ती खंत तानू म्हातारी व्यक्त करताना दिसली. त्याचबरोबर डेप्युटी गोपाळचा मुलगा मन्या हा या स्वार्थी तरुण वर्गाचा प्रतिनिधी ठरला तो देखील कबीरला 'ह्या घाणीतून लवकर बाहेर पड'(पृ.२३५) असा सल्ला देताना दिसला. कृषी हाच जगण्याचा पर्याय असलेल्या 'तणकट' या कादंबरीत लेखकाने या व्यवसायात सवर्णांना मजूर म्हणून दलित वर्गाची गरज होती व दलितांना आपल्या पोटापाण्यासाठी मजुरीवर जाणे भाग होते म्हणजेच कादंबरीत गावगाड्याचे चित्रण करताना सर्वच जाती धर्मातील लोकांचे व्यवसायानुसार परस्परावलंबीत्व होते हे स्पष्ट झाले. ग्रामीण भागातील विविध प्रथा, परंपरा, सण-उत्सव यांचा कादंबरीत समावेश झाला आहे.

रंगनाथ पठारे हया कादंबरीतून आशावाद व्यक्त करताना म्हणतात, ''एका शोषित समूहावर पसरलेल्या व अंततः अशक्य गडद झालेल्या काळोखाचा शोकात्म प्रत्यय देऊन कादंबरी संपते. तरीही या अंधारातून उजेड उगवणारच हे आश्वासनही ती देते.''[१८] रंगनाथ पठारे यांनी या कादंबरील रुढ चौकट मोडणारी कादंबरी म्हटले आहे.

अशाप्रकारे लेखकाने 'तणकट' या कादंबरीमध्ये अशिक्षित, अडाणी, दलित समाज कसा फसविला जातो. बाळासाहेबासारखा सवर्ण त्यांच्या अडाणीपणाचा फायदा कसा उठवितो. त्याचबरोबर दलित पुढारी आपल्या स्वार्थासाठी आपल्याच समाजाला ठगताना दिसले. गावातील जातीयवादाचे लोण हे शाळा, कॉलेजांमध्येही पसरले होते. आंबेडकर जयंती साजरी करताना त्या आदर्श व्यक्तीच्या जयंतीला दारू पिऊन आनंद व्यक्त करताना नैतिकमूल्यांचा ऱ्हास होताना दिसला. दलित समाजही मिळणाऱ्या सोयी सवलतीचा काही प्रमाणात गैरवापर करताना दिसले. कायदा आपल्या बाजूने आहे, अशावेळी त्याचाही अतिरेकी वापर करताना आढळले. अशाप्रकारे नाण्याच्या दोन बाजू लेखकाने स्पष्ट केल्या आहेत. गावातील सवर्ण मंडळीही आपला वरचढपणा गाजविण्याचा प्रयत्न करताना आढळले. गावगाडा, जातीय संघर्ष, शैक्षणिक भ्रष्टाचार, पुढाऱ्यांची लालची वृत्ती, दलित समाजाचा अडाणीपणा व सवर्ण मंडळींचा दलितांकडे

पाहण्याचा दृष्टिकोन या सर्व अंगाने कादंबरीला लेखकाने स्पर्श करुन दलित ग्रामीण कादंबरीला उच्चस्थानावर नेऊन ठेवले आहे.

**३.२.११. डांगोरा एका नगरीचा :**

त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी 'साईखेड' संस्थानच्या राज्यकारभाराविषयी जे भितीदायक व लोकांमध्ये सततचे असलेले भयावहाचे वातावरण त्यामधून पोलिसांचे 'साईखेड' मधील जनतेवर असलेले लक्ष कादंबरीच्या प्रारंभापासून लेखक आपणा समोर सूचित करतो. लेखक प्रारंभीच ते भय पुढीलप्रमाणे आपणासमोर सूचित करतो. ''१९२९ चा जुलै महिना. साईखेडाभोवती भयाचं अन् दडपशाहीचं आवरण ओलयाकिच्च पासोडीसारखं एकाएकी पांघरुन आलं. पंढरी, शाळेत शिकणारा सतराअठरा वर्षाचा मुलगा. पण मामलेदार देसायांच्या घरचा आश्रित म्हणून पोलिसकोठडीत त्यानं जे अनुभवलं ते त्याला अनपेक्षित तर होतंच, पण त्याच्या एकूण जाणशक्तीला घुसळून सोडणारं आणि झाकोळून टाकणारं होतं.

त्या अनुभवातून बाहेर आल्यावर पंढरी आधीचा होता तो राहिलाच नाही. त्याच्यासारखी अध्यात न मध्यात असलेली बेसावध सगळी जणं अशीच दिङ्मूढ होऊन गेली. अर्धआंधळं माणूस सांजेच्या समयी निवाऱ्याला जाता जाता खड्ड्यात पडावं, तसं साईखेडाला झालं होतं. तसं पाहिलं तर एकाएकी नव्हतं हे झालेलं.''(पृ.३)

वरील निवेदनातून लेखक वाचकाला कादंबरीच्या उत्सुकतेविषयी सजग करताना दिसतो. साईखेड संस्थान कसे असेल. ह्या संस्थानातील माणसे, राज्यकर्ते, पोलिसयंत्रणा आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील साईखेड संस्थानिकांची स्थिती आपल्या समोर साक्षात उभी राहते. राजा गेल्यानंतर संस्थानाची झालेली वाताहत इत्यादी गोष्टी 'डांगोरा एका नगरीचा' कादंबरीच्या प्रारंभी केलेल्या निवेदनातून सूचकतेने लेखक मांडतो.

एका रुंदशा खोबणीत वसलेलं साईखेड दिवसादेखील दृष्टीआड लोपून गेलेलं असे. त्याच्या तीन बाजूंनी असलेली चढण गावाला पोटात घ्यायची अन् झाडांच्या शेंड्यांनी त्याला पार झाकायची. जुन्या राजवाड्यातील आर्मरी हॉलच्या गच्चीवरचा निशाणाचा चौथरा आणि नव्या राजवाडयातली दुर्बिणीसमोरची गॅलरी या दोनच जागा साईखेड्यात सर्वात उंच अशा होत्या. तिथून सगळा गाव एखाद्या विशाल तबकात पत्री-फुलांचा शीग भरलेली असावी तसा दिसायचा. दोन वेशींना जोडणारा थेट पण चिंचोळा राजरस्ता घरं, दुकानं, गुदाम यांना आपल्या दोन्ही बाजूंना घेऊन रुजलेला होता. झाडं त्याच्या पासून आत हटलेली असल्यामुळे तो तेवढा

उघडा वाटायचा. बाकी गाव उंचावरुन पाहणाऱ्यालाही काही खुणांनीच ओळखू येई. नानचंद शहांचा बाजारपेठेतील हवेली, शाहूपेठेतला शिवमंदिरांचा चकाकणारा कळसभाग आणि ब्राह्मण आळीत सावनूरकर वकिलांनी नव्यानं चढवलेली लाल कौलारु माडी या माना वर करुन उभ्या असलेल्या इमारती मात्र गावाच्या डोईवरुन पलीकडे पाहू शकत होत्या. त्यांना उत्तरेकडला सिद्धमठ आणि दक्षिण वेशीबाहेरचा दर्गा सहज दृष्टीक्षेपात येत होता.(पृ.१९०) या वर्णनावरून साईखेड संस्थानचे स्थान, वैभव, वैशिष्ट्य या गोष्टींचे स्वरूप आपल्या लक्षात येते.

साईखेड, दिवसा काय आणि रात्री काय, दगडमातीच्या खुज्या बसकट घरांच्या वस्तीचं, झाडांच्या दाट पुंजक्यांना वेढलेलं एक लहानसं अरण्यचं होतं. बुजऱ्या आणि उदासं माणसांचं. किरण साधून त्यावर झडप घालणाऱ्या दृष्ट आणि क्रुर माणसांचं. त्यांच्याभोवती असलेली चार तळ्यांनी आणि त्यांच्या काठावरल्या झाडीमंडळींनी त्याला शोभा दिली होती, तशी एक भयावहताही. अति झालं म्हणजे माणसं झाडाला टांगलेली दिसत. तळयाच्या पाण्यात तरंगताना दिसत. साईखेडात दिवसादेखील इतकी चेंगट सुस्ती असायची की दिवेलागण होताच घराघरातून हातपाय ताणून आडवी व्हायची. गावचे रस्ते जवळपास ओस पडायचे. आजार कट्ट्यांवर दुकानांच्या फळया बंद होत चालल्या की अंधार साचायचा. चांदणं असेल तर त्याचा कमी अधिक दाट शिडकावा गावभर उमटायचा. घरांचे मोठे दरवाजे उघडे राहत तोवर घासलेटी चिमण्यांचा आणि कंदिलाच्या क्षीण मातकट उजेड रस्त्यावर थरकत पडलेला दिसे.(पृ.१९०) साई खेडाच्या अभारण्यात काही ध्येयवेडयांनी उंचावर मचाणं बांधली होती. दूरचे तेजालेलं आकाश न्याहाळता यावं, आसपासच्या श्वापदांचे हल्ले परतवायला हाकारे भरावेत म्हणून ह्या विभूती आपले महान कार्य करत होत्या. शंभुरावांचा छापखाना व त्यातून आठवडयाला झळकत येणारा 'ज्योतिप्रकाश', 'राष्ट्र' हरिभटांच्या धूमकेतूसारख्या अकस्मात उगवणाऱ्या एकांडया उद्याम प्रभात फेऱ्या, सोपानंबुवांचं पोर्णिमेचं देवीच्या देवळातलं वीणा अन् चिपळ्यांच्या साथीचं सुरेल झणझणीत कीर्तन आणि हेडमास्तर सामंतांची दरवर्षी विजयादशमी, मकरसंक्रांत या दिवशी तरुण विद्यार्थ्यांपुढे जुन्या राजवाड्याच्या देवघरासमोरील पटांगणात होणारी देशभक्ती आणि धर्मनिष्ठा यांवरची व्याख्यानं यांनी साईखेड जागवलं होतं.

### ३.२.१२. बारोमास :

'बारोमास' ही ग्रामीण कादंबरी साहित्यविश्वात एक मैलाचा दगड ठरलेली आहे. वैदर्भिय कृषिजीवनाचे व त्या अनुषंगाने भारतीय शेतकऱ्यांचे प्रतिनिधिक प्रत्ययकारी चित्रण व

सुशिक्षित तुरुणांचे वैफल्यग्रस्त जीवन 'बारोमास' कादंबरीत अधोरेखित होते. 'बारोमास' या कांदबरीला २००४ साली 'साहित्य अकादमीचा पुरस्कार' मिळाला आहे. आजच्या विद्यमान परिस्थितीत शेतकऱ्याला ज्या विपरीत परिस्थितीतून मार्गक्रमण करावे लागते, ज्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. हे सगळे प्रश्न नेमकेपणाने डॉ. सदानंद देशमुखांनी आपल्या कादंबरीत मांडले आहेत. शेती आणि शेतीशी संबंधीत ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे प्रश्न या कादंबरीत आहेत. तसेच शेतकऱ्याला बाराही महिने आर्थिक अडचणींचे आहे. शेती परवडत नाही, तरीही तिला सोडता येत नाही, हे वास्तव कादंबरीतून देशमुखांनी मांडले आहे. लिंबाळे शरणकुमार बारोमास विषयी म्हणतात, ''बारोमास ही एका शेतकरी कुटुंबाची किंवा खेड्याची वेदना नाही. भारतातल्या सगळ्याच शेतकऱ्यांच्या दुःखाची ही कैफियत आहे. आधुनिक शेती आणि पारंपरिक शेती ह्या प्रश्नापासून ती कादंबरी सुरू होते आणि शेतकरी संघटनेच्या आंदोलनातील रास्त मागण्यांनी ही कादंबरी शेवटाकडे प्रस्थान करताना दिसते. शहर आणि खेड्यातील वाढते अंतर याचे उदाहरण म्हणून एकनाथ आणि अलकाच्या वैवाहिक जीवनाकडे पाहता येईल. पिकावरील किडीमुळे शेत आणि शिवार यांचा नाश होत आहे, तर भ्रष्टाचाराच्या किडीमुळे संपूर्ण समाजव्यवस्थाच नासली आहे, ह्याचे विदारक चित्र 'बारोमास' मध्ये पाहायला मिळते.''[१९]

अमडापूर, चिखली या बुलढाणा जिल्ह्याच्या परिसरातील जीवनदर्शन घडविणारी ही ३५० पृष्ठांची दीर्घ अशी कलाकृती आहे. तिच्यातून समकालीन शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण तपशीलवार आलेले आहे. तसेच समकाळात ग्रामीण भागात झालेले बदल जसे बदलती अर्थव्यवस्था, चंगळवादी प्रवृत्ती, त्यातून आर्थिक दारिद्र्यामुळे ग्रामीण लोकांची होणारी कुचंबणा, निसर्गाचा लहरीपणा, विज्ञान तत्रंज्ञानामुळे झालेला विकास, महामार्गामुळे बदललेले ग्रामीण जीवन सावकारकी, ढाबा संस्कृती, भारनियमन, भ्रष्टाचार, सुशिक्षित बेकारांच्या समस्या, अंधश्रद्धा इत्यादी. शेतकऱ्यांना करावा लागणारा संघर्ष, मानवी मन हेलावून टाकणारा आहे. शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले दुःख, जगण्यातील वेदना, त्यातून निर्माण होणाऱ्या आत्महत्या, त्यांच्या अवतीभवतीच्या मूल्यांची झालेली वाताहत या सगळ्या मूल्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न या कादंबरीच्या अनुषंगाने झालेला आहे.

कृषिक्षेत्र तर जागतिकीकरणाच्या विळख्यात पूर्णपणे अडकले आहे हे उदाहरणासह 'बारोमास' कादंबरीकाराने दाखवून दिले आहे. जागतिकीकरणाच्या काळात शेतीच्या मालाची

आयात करावी लागते. ती भरमसाठ किंमत देऊन आणि आपल्या शेतकऱ्यांचा माल कमी किंमतीत विकावा लागतो. ही वैश्विक व्यापारातील भिन्नता आहे. त्यामुळे समाजाचा व राष्ट्राचा पोशिंदा असणारा हा शेतकरी शेवटी नाईलाजाने आत्महत्या करतो. त्या अनुषंगाने देशमुखांनी पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रश्नांना वाचा फोडली आहे.

'बारोमास' ही कादंबरी एकीकडे ग्रामीण कृषी व्यवस्थेच्या पडझडीची, तसेच बदलत्या व्यवस्थेची वास्तव मांडणारी कादंबरी आहे. त्याशिवाय उच्च शिक्षण घेऊन नोकरी न मिळालेल्या ग्रामीण भागातील सुशिक्षित बेकारांची व्यथा, वेदना व त्यातून त्यांची घरात व समाजात होणारी कोंडी कादंबरीत तपशीलवार मांडली आहे. एकनाथच्या रुपाने सुशिक्षित बेरोजगार तरुणाची व्यथा मांडली आहे. डोनेशन द्यायला पैसे नाहीत म्हणून नोकरी नाही. नोकरी नाही म्हणून शेतीत काम करावे लागते, राबावे लागते. शेतीत धड राबताही येत नाही आणि शेतीपासून नातंही तोडता येत नाही. हे वास्तव लेखक मांडतो.

विदर्भातल्या 'सांजोळ' गावचे प्रातिनिधिक चित्र या कादंबरीमध्ये रेखाटले आहे. तसेच सामाजिक, सांस्कृतिक वातावरण या कादंबरीमध्ये व्यक्त होते. शेतकऱ्यांचे न संपणारे दुःख यात आहे. लहरी निसर्गावर अवलंबून असलेली शेती ही शेतकऱ्याला कशी अस्थिर करून सोडते. शेतकऱ्याचा मुलगा मोठा जिद्दीने आणि कष्टाने शिक्षण घेतो. शिक्षण सम्राटांच्या भ्रष्टाचारी वृत्तीमुळे त्याला नोकरी लागत नाही. तो शेती करीत राहतो. मधूच्या नोकरीसाठी दिलेले पैसे आमदार गडप करतो. उत्तम ठोकरेचा अपघाती मृत्यू आमदारच घडवितो. काळजाच्या तुकड्यासारखी सांभाळलेली जमीन गेल्यामुळे सुभानराव उद्ध्वस्त होतो. जांभुळ खोऱ्यातल्या डोहात उडी घेऊन सुभानराव आपले जीवन संपवितो. किनवटच्या रावसाहेबांची आत्महत्या ही सावकाराच्या कर्जामुळेच होते. अशा प्रकारचे प्रसंग लेखकाने मोठ्या ताकदीने मांडले आहेत.

विदर्भातील शेतकरी सतत अस्मानी-सुलतानी अशा दोहोंच्या दुष्टचक्रात सतत भरडत आला आहे व भरडला जात आहे. त्यामुळे शेतकऱ्याची परिस्थिती आणखीनच बिकट होऊन शेवटी गेल्या १० ते १५ वर्षात हजारो वैदर्भिय शेतकऱ्यांनी आत्महत्या करुन मृत्यूला कवटाळले आहे. वैदर्भिय शेतकरी बांधवांच्या दाहक अशा वास्तव जीवनाचे प्रतिबिंब 'बारोमास' मधून उमटले आहे. लेखकाने सुशिक्षित तरुणांची व्यथा आणि अस्मानी-सुलतानी गर्तेत सापडलेला शेतकरी अशा दुहेरी भूमिकेतून एकनाथचा जीवनपट चित्रित केलेला आहे. कादंबरीचा प्रारंभच मुळात नव्या जुन्या पिढीमधील, संस्कृतीमधील संघर्षाने करुन बदलत्या ग्रामीण विश्वाचे जणू

संकेतच दिले आहेत. नानुआजाला आधुनिक शेती पद्धती, संकरित बियाणे, किटकनाशके खटकतात. यामुळे शेती तर निकस होणारच पण माणसंही निकस होतील असे भाकित नानू आजा वर्तवितो, निसर्ग, सरकार व सावकार हे शेतकऱ्यांचे तीन शत्रूच आहेत. म्हणूनच तर तेजराव तात्या बोलकी खंत व्यक्त करतो ती अशी ''शेतकऱ्यांच्या बाजूचं कोणीचं रहायलं नाई सरकार नाई, आडते नाई अन हे बदकवऱ्या वाणाच आभाळं त आजेबातच नाई!''

स्वार्थी व्यापारी, नोकरशाही, सरकार कोणाचेही शेतकऱ्यांकडे लक्ष नाही. उलट सगळे त्याला गिळायला बसले आहेत. शेतीच्या व बँकेच्या कर्जासाठी लागणारे सातबारा मिळावे म्हणून बळी मामा तलाठ्याकडे चकरा मारून रडकुंडीला येतो. तेव्हा त्याला कळते की, तलाठ्याचा खिसा गरम केल्याशिवाय सातबारा मिळणे नाही. ग्रामसेवक, तलाठी, पटवारी, तहसील कार्यालयातील कर्मचारी शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेत असतात; त्यांची पिळवणूक करीत असतात. या शेतकऱ्याचं संपूर्ण आयुष्य दुःख, दैन्य, दारिद्र्य या विवंचनेतच संपते. या गोष्टीची लेखकाने गांभीर्याने नोंद घेतली आहे. शासनच खरेतर शेतकऱ्यांच्या प्रश्नांची गंभीरतेने दखल घेत नाही. असा निष्कर्ष लेखक काढतो. कादंबरीकाराने एकाच वेळी एका शेतकरी पुत्राचा, बेरोजगाराचा, ग्रामीण विस्थापित व मध्यमवर्गीय व्यक्तीचा विचार केलेला दिसतो.

'बारोमास' कादंबरीचा नायक एकनाथ याच्या मनात विचार येतो, 'अलकाचा बाप साधा पगारदार पण कसा वैभवात जगतो, आपण सव्वीस एकराचे मालक पण धड खुर्ची नाही आपल्या घरात. तुंबलेली उधारी हेच आपले वैभव. कर्ज आणि उधारी हेच आपले भाग्योदय यापेक्षाही भीषण बाब सांगताना तो म्हणतो, 'शेतमाल विकून कर्ज फेडून उरलेल्या पैशात आपण अंडरपॅन्टचा कपडाही विकत घेऊ शकत नाही.'' वाढता भ्रष्टाचार रोखल्याशिवाय सामान्य माणूस सुखी होवू शकणार नाही.' अशी शेतकरी पुत्र एकनाथची एक सामाजिक न्यायाच्या मागणी विषयीची भूमिका असल्याचे दिसते.

एकनाथ भ्रष्टाचारासह अनेक संवेदनशील प्रश्नांना वाचा फुटावी म्हणून चक्काजाम करताना आपल्याला दिसतो. आजूबाजूला दिसणारी बेकारी, निवडणुकीतील भ्रष्टाचार बुद्धिमान माणसाची होणारी अवहेलना, अनुदानातील घोटाळे, भ्रष्ट राजकीय नेते पाहून तो हळहळतो. पैसे नाहीत म्हणून वीज कापलेले शेतकरी, अन्नाला मोताद झालेले शेतकरी, गुलाम झालेले शेतकरी, कर्जात बुडालेले शेतकरी वगैरे अनेक बाबी तो लक्षात घेतो. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारावरही तो

आपले लक्ष केंद्रीत करतो. सेट, नेट व पीएच.डी. नसतानाही प्राध्यापकपदी कायम नोकरी करणाऱ्या व्यक्तीचे उदा. देऊन यु.जी.सी.च्या चुकीच्या नियमांकडेही तो सर्वांचे लक्ष खेचतो. अर्थात एकनाथच्या संवेदनशीलतेचीच जाणीव यातून होताना दिसते.

ग्रामीण कृषी व्यवस्थेचे, कृषी संस्कृतीचे, सुशिक्षित बेकारांच्या प्रश्नांचे, निसर्गाच्या अवकृपेचे, सावकारी पाशाचे, शेतकऱ्यांच्या हिताच्या चळवळीचे, मनःपूर्वक ग्रामीण वास्तवाचे दर्शन 'बारोमास' मधून घडते. आजचे वर्तमान वास्तव अतिशय प्रखरपणे सदानंद देशमुख यांनी 'बारोमास' मध्ये मांडले आहे. 'बारोमास' एका गरीब शेतकरी कुटुंबाची कथा आहे. परंतु त्यावेळी ती एका संपूर्ण गावाची सामाजिक आणि समाजातील सर्वच घटकांची कथा आहे. एक कुटुंब कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे. मात्र कुटुंबातील एका-एका सदस्यांच्या कहाणीतून कथानक पुढेपुढे जाते व आजच्या शेतकरी जीवनाचे समग्र दर्शन ग्रामीण भागातील बदलासह प्रकट होते. तर गेल्या २५ वर्षातील ग्रामीण भागातील बदलही त्यांनी हुबेहुब टिपले आहेत. ग्रामीण जनतेच्या चंगळवादी प्रवृत्तीत झालेली वाढ, वृक्षतोड, निवडणुका, शेतकरी संघाची आंदोलने, कमी श्रमात जास्त पैसा मिळविण्याची प्रवृत्ती, भारनियमन, पाणीटंचाई इत्यादी आजच्या शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांची चर्चा कादंबरीतून आली आहे. ग्रामीण भागातील तरूणांच्या बेकारीचे हे भीषण वास्तव व या तरूणांची होणारी मानसिक कुचंबना लेखकाने हुबेहूब चित्रित केली आहे.

'बारोमास' ही कादंबरी केवळ एका शेतकऱ्याची किंवा एकनाथची करुण कहाणी नाही; तर या रोगट कृषिव्यवस्थेत पिचलेल्या आत्म्याची हत्या झालेल्या पण शरीराने धडधड करीत जीवन कंठीत जगणाऱ्या भूमिपुत्रांची सत्य कथा आहे. या कादंबरीतून एक प्रश्न निर्माण होतो. कृषिप्रधान भारत देशात या बळीराजाला 'बळी' द्यावं लागतं हे समाजव्यवस्थेला शासन प्रणालीला एकंदरीतच लोकशाहीला काळीमा फासणारं आहे.

शेतकरी कुटुंबातील एकनाथ हा तरुण प्रतिकूल परिस्थितीतही एम.ए. प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण होतो. प्राध्यापक होण्याचे स्वप्न ही बघतो. परंतु आजच्या 'डोनेशन शिक्षण संस्कृती'ला बळी पडतो. अलकाशी लग्न केल्यानंतर दुहेरी जबाबदारीने एकनाथची अवस्था अधिकच केविलवाणी होते. शहरी संस्कृतीत व सधन कुटुंबातील अलकाची अपेक्षा तो पूर्ण करू शकत नसल्याची खंत त्याला सतत बोचत असते तर दुसरीकडे आई-बापाच्या अपेक्षाही पूर्ण करू शकत नसल्याची खंत सतत बोचत असते. त्यातूनच पश्चातापाची भावना निर्माण होते. एकनाथ

उदास होतो. चिंता, क्लेश, पश्चाताप, भय यामुळे एकनाथची अवस्था अधिकच दयनीय होते. पुढे तो शेती व्यवसायाकडे वळतो, आधुनिक पद्धतीने शेती करण्याची धडपड करतो. गावात कृषीतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करतो. शेतीचे तंत्रशुद्ध ज्ञान लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करतो. परंतु त्यातही त्याला फारसे यश मिळत नाही. नोकरी नाही शेतीतही यश नाही. संसारातही मनासारखे घडत नाही. त्यामुळे एकनाथच्या पदरी निराशाच येते. ''आपल्याला भूतकाळ लागला. आपल्या वर्तमानला पाय नाहीत. भविष्याला हात नाहीत. वर्तमान लंगडे..... भविष्य लुळे.... मग उगाळत बसा भूतकाळाचा कोळसा... काळा काळा!'' अशी एकनाथची जीवन नौका दिशाहीन होत जाते. शेंवतामाय आणि अलका यांच्यातील सततचे शाब्दिक द्वंद्व, अलकाची नेहमीची माहेरची वारी, लहान भाऊ मधूचा उर्मटपणा यामुळे एकनाथ मनाने पूरता खचून जातो. त्याला एकटेपणाची जाणीव बोचत असते.

शेती असून शेतकरी नाही, शिक्षण असून कर्मचारी नाही, घर असून बेघर झालेले. भाऊ नसल्यासारखे. एकाकी एकटे खऱ्या अर्थाने आपण एक-नाथ आहोत असे सतत वाटत होते. अशी ही करूण कहाणी एकट्या एकनाथचीच नाही तर ग्रामीण भागातील घरा-घरातील तरुणांची जीवनगाथा आहे. एकनाथ हा केवळ प्रतिनिधी आहे.

शेतकरी संघटनांच्या कार्यकर्त्यांची, नेत्यांची भाषणे, शासनाकडून होणारी धरपकड, अन्नपाणी, औषधोपचार व जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा त्याशिवाय शेतीशी निगडित साधन सामुग्रीचा (बी-बियाणे, औषधी इत्यादी) तुटवडा त्याचा प्रत्यक्ष शेतकरी समूहावर होणारा परिणाम अतिशय भेदक व वास्तव स्वरूपात रेखाटला आहे.

हाताला काम नाही, खिशात पैसा नाही, नोकरी नाही. अशा गर्तेत सापडलेला मधू शेतीच्या बांधावर असणारी मोठ-मोठी झाडे, कडुनिंब, बाभूळ इत्यादी झाडे तोडून विकतो आणि त्या पैशावर मौजमस्ती, चैन करतो. शेती पिकत नाही, एकनाथ शेतकरी आंदोलनात सहभागी होतो. अशा विविध वळणावर ही कादंबरी साकार होते. अलका-एकनाथ, अलका-शेवतांमाय यांच्यातील संघर्ष ग्रामीण-नागर संस्कृतीतील संघर्ष आहे. ग्रामीण जीवनातील बदल, परिवर्तन, सूक्ष्मातील सूक्ष्म तपशीलासह लेखक साकार करतो.

'बारोमास' ही कादंबरी म्हणजे शेतकऱ्यांच्या जीवनाची हालअपेष्टा चित्रित करणारी आहे. या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील विविध घटना, प्रसंग, लोकजीवन, परंपरा, रिती-रिवाज, सण-वार, ग्रामीण वास्तव चित्रित केले आहे. भाषिक दृष्ट्या तर 'बारोमास' ही

कादंबरी या दशकातील 'मैलाचा दगड' ठरली आहे. 'बारोमास' ही कादंबरी महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रण करणारी आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि उदारीकरणाच्या परिणामाबरोबर कृषीसापेक्ष व्यवस्थेतील बदल जाणणारे जीवनमान ती सामर्थ्याने चित्रित करते. एकनाथ तनपुरेच्या माध्यमातून ग्रामीण समाजातील सुशिक्षित बेरोजगार नावाच्या नवीन जातीची शोकांतिका व हाल मांडते. शेतकऱ्यांचे जीवन, त्यांचे दुःख, दारिद्र्य, शोषण इत्यादी बाबीसह कादंबरीतील विषय ग्रामीण समाज जीवनातील ज्वलंत विषय आहे. या वास्तवाचा वेध लेखकाने घेतला आहे. पारंपरिक शिक्षणामुळे खेड्यातील एक तरुण पिढी पांगळी होऊन कशी वाम मार्गाला लागली आहे, याचे चित्रण मधूकर, दिलीप पवार व इतर व्यक्तिरेखांच्या माध्यमातून आपल्याला दिसून येते.

शेतकऱ्याचे सर्वांगीण शोषण करून खेड्यांना नागविणारी नौकरशाही, सावकारशाही व शासन व्यवस्था कशी लुटत असते याचे चित्रण यात आलेले आहे. ग्रामीण आणि नागरी स्त्रीची दोन रुपे या कादंबरीत रेखाटली आहेत. अलका-ममता वारे या स्त्रीव्यक्तीरेखा भौतिक सुखासाठी धडपडतात. तर शेवंतामाय विस्कटत जाणाऱ्या आपल्या व मुलाच्या संसाराला सावरण्याचा प्रयत्न करते. याचे जिवंत चित्रण या कादंबरीत येते. वर्तमान परिस्थितीत खेड्यात जन्मने म्हणजे 'दलित' ही नवी व्याख्या खेड्याचे दुबळेपण व मागासलेपण चित्रित करते. शेतकऱ्यांच्या दुःखाचे, शोकाचे, टोकदार चित्रण कोणीही केले नव्हते. ते सदानंद देशमुखांनी 'बारोमास' मधून केले आहे. प्रा.डॉ. मधुकर मोकाशी कादंबरीच्या कथानकाविषयी मत मांडतांना म्हणतात, ''अस्वस्थ खेडयातील ग्रामजीवनाचे व पर्यायाने कुटुंबाची घुसमट, वेदनेचा हुंकार, तेथील परिसरास प्रामाणिकपणाने, अनुभूतीशी एकरुप होऊन लेखकाने बारोमास कादंबरी लिहिली आहे.''[२०]

'बारोमास'मध्ये विदर्भातील बोलीचा सहज स्वाभाविक वापर, प्रतिमा, प्रतीकांचा वापर त्यामुळे अर्थाची वलये अधिक विस्तारत जातात. त्यातूनच भाषिकदृष्ट्या कादंबरीला एक वेगळा रुपबंध प्राप्त होतो. ग्रामीण भागातील समग्र बदल वऱ्हाडी बोलीसह बारोमासमधून जसेच्या तसे प्रतिबिंबित झाले आहेत. अधिकाधिक ग्रामीण शब्द, म्हणी व वाक्प्रचारांचा वापर 'मातीशी नाते असणाऱ्या या लेखकाने केला आहे. त्यामुळे ही कादंबरी अधिक जिवंत झालेली आहे. यातनामय ग्रामीण जीवनाचे वास्तव तेवढेच कलापूर्ण, काव्यमय चित्रण या कादंबरीत आलेले आहे. गावगाड्याची कृषिकेंद्रीत ग्रामसंस्कृती, लोकजीवन, लोकमानस, भौतिक ग्रामीण परिसर,

तिथला निसर्ग, ग्रामीण जीवनातील समस्या व त्यावरील उपाय यांची डोळस जाण लेखकाला आहे. त्यामुळेच की काय कादंबरी त्यातील आशयाच्या सच्चेपणामुळे भाषिक मर्यादा ओलांडून खऱ्या अर्थाने भारतीय शेतकऱ्यांची प्रातिनिधीक शोकांतिका ठरते. मातीचीच भाषा ते वापरत असल्याने या प्रखर ग्रामीण वास्तव दर्शनाला एक आगळे वेगळे रूप प्राप्त होते. 'बारोमास' या कादंबरीतील संपूर्ण घटना, प्रसंग व त्यांच्या अनुषंगाने येणारी भाषाशैली, संवादात्मकता याचबरोबर प्रतिमा, प्रतिके आणि रुपके यांचा विचार करतांना वाटते की, एक ताकदीची, नैसर्गिक अभिव्यक्तीची शैली ही 'बारोमास' कादंबरीकाराजवळ आहे. याचा प्रत्यय येतो. त्यामुळे बारोमास श्रेष्ठ दर्जाची शोकांतिका बनली आहे.

### ३.२.१३. भूमी :

मैथिली ही आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीची नायिका आहे. मैथिलीच्या व्यक्तिचित्रणातून लेखिकेने बालपणापासून कधीही कोणाचे प्रेम न मिळालेली मैथिली कशी घडत गेली. म्हणजे तिची जडणघडण, तिचा स्वभाव कसा बनत गेला हे लेखिकेने 'भूमी' या कादंबरीत मांडले आहे. या ग्रंथात दत्ता घोलप म्हणतात, ''कुटुंब, विवाह, मातृत्व आणि स्त्री-पुरुष संबंधाना येणाऱ्या समाज मान्यतेच्या अंगाने विचार करावा लागतो. मातृत्व, आई आणि मूल या संबंधाने बदलाच्या धूसर शक्यता या स्त्रियांच्या कादंबरी लेखनात दिसतात. वैध मातृत्वाचे गौरवीकरण, स्त्रीच्या जन्माची सार्थकता याला छेद जातांना दाखविले आहे. आईकडून मुलांचे त्रासिक भावाचे संबंध आहेत तसेच मुलांकडून आईविषयी प्रेमाचे गौरवीकरण, ज्याला आपल्या भारतीय संस्कृतीने उदात्त केलेले आईचे नाते यालाही तडा जातांना दाखविले आहे. भूमी कादंबरीतील मैथिली आणि तिच्या मुलाचे बिघडलेले भावसंबंध उदाहरण म्हणून दाखविता येईल.''[२१]

मैथिलीचे वडील तिच्या लहानपणीच वारले ते गेल्यानंतर आईने आधारासाठी म्हणून, मैथिलीच्याच शाळेतल्या एका शिक्षकाशी मैत्री केली. मास्तर रोज संध्याकाळी घरी येण्यापूर्वी मैथिली समुद्रकाठी पुट्टू बरोबर खेळायला जायची. पुट्टू हा तिचा मित्र होता. पुट्टूची आई जेव्हा विचारते, ''साडे सात वाजले नाही का तुझे? तो मास्तरडा बसला असेल न अजून!''(पृ.२) कुणी तिला 'आईला नाईट ड्युटी आहे कां?' असे विचारी, तेव्हा लहान असूनही तिला नाईट ड्युटी किंवा साडेसातची टिंगल टवाळी समजू लागली होती.

तिची आई तामिळी-ख्रिश्चन होती. म्हणजे मैथिलीच्या आई-वडिलांचा आंतरजातीय विवाह झाला होता त्यामुळे इतर कोणीही नातेवाईक त्यांच्याकडे आल्याचा उल्लेख कादंबरीत आला नाही. एकट्या आई व्यतिरिक्त  तिला बालवयात कोणाचेच प्रेम मिळाले नाही. आणि थोड्या दिवसातच आईच्या किडनीत बिघाड झाल्यामुळे तिला वारंवार दवाखान्यात जावे लागत होते. त्यावेळी मैथिली घरात एकटीच राहात असे. स्वतःसाठी स्वयंपाक ही करू लागली होती. पण थोड्याच दिवसात तिची आईदेखील हे जग सोडून गेली. तेव्हा तिच्या आत्याने तिला मुंबईला नेले. आत्याचा मुलगा संजू व नवरा गोपाळराव यांना मैथिलीला तेथे नेलेले आवडले नाही. मैथिलीने खूप शिकाव अशी तिच्या आत्याची इच्छा होती. मैथिलीला मात्र शिक्षणात रस नव्हता. तिची दहावीची परीक्षा झाली गणित, इंग्रजी व संस्कृत या विषयाखेरीज सर्व पेपर तिला अवघड गेले होते. या तीनच विषयात ती पास झाली होती.(पृ.३२) दहावी दरम्यान मधू सबनीसासारखा सच्चा मित्र मिळाला. गोपाळरावांच्या पहिल्या बायकोचा मुलगा उदय की जो मुली पाहण्यासाठी मुंबईला आला तो मैथिलीला पाहून प्रभावित झाला मैथिलीबरोबर लग्न करण्याची इच्छा त्याने आत्याकडे व्यक्त केली. मैथिलीला खूश करण्यासाठी त्याने तिला नवीन ड्रेस घेतला पण त्या बदल्यात तिच्याकडे वेगळीच अपेक्षा केली सुरुवातीला मैथिलीही वाहवत गेली. पण नंतर सावरली.(पृ.४०) मैथिलिने बीनाला 'मला काहीतरी काम मिळवून दे' सांगितल्यावर बीनाने तिला मालाडला एका लायब्ररीत नोकरी मिळवून दिली. दोन महिने तिने तेथे नोकरी केली पण त्याचा परिणाम म्हणजे तिला वाचनाची गोडी निर्माण झाली.(पृ.४३) त्यानंतर तिने पुन्हा दहावीच्या अभ्यासाकडे लक्षकेंद्रीत केले तिला त्यावेळी ऐंशी टक्के मार्क्स मिळाले.(पृ.४४) आत्या व गोपाळराव उदयच्या लग्नाला गेले असताना संजू आणि मैथिलील घरात दोघेच होते. त्यावेळी संजूने मैथिलीवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला.(पृ.४५) रोहिणी मायादेव यांनी मैथिलीला देवस्थळे बाईंकडे नोकरीसाठी म्हणून पाठविले. पण देवस्थळीबाईंनी कामावर ठेवण्यापूर्वी कॅरॅक्टर सर्टिफिकेट मागितले. पण तिने ते देण्यास नकार दिला. पुस्तकांच्या प्रेमापोटी मैथिलीने निर्णय बदलला व देवस्थळीकडे जाण्याचा निर्णय घेतला. पण दोघीही तशा तात्विक विचाराच्या असल्याने त्यांचे सतत वाद होत, हे त्या दोघींमधल्या संवादांमधून जाणवते.(पृ.५२) देवस्थळीबाईंना मैथिलीचा स्वाभीमानी स्वभाव व दिसण्यातील ऐटबाजपणा नेहमी खटकला आणि त्यामुळे त्या मैथिलीशी सुरुवातीला तुसडेपणाने वागल्या पण हळूहळू त्यांचे मैथिलीविषयी मत बदलले. मैथिलीने बारावीचा अभ्यास मनापासून करण्याचे ठरविले व

तिने बारावीला अठ्ठ्याऐंशी टक्के गुण मिळविले. शिक्षणासाठी कोणाहीपुढे हात पसरायला लागू नये. म्हणून मेडिकलला जाण्याइतके मार्कस मिळूनही तिने कला शाखा निवडली. निकालानंतरच्या मधल्या वेळात तिने अवांतर वाचन केले.

कॉलेज जीवनात नाटकांमध्ये भूमिका करण्यास सुरुवात केली. 'हॅम्लेटची' भूमिका अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केली. त्यातच तिला कीर्ती, मिलिंद व चेतन यासारखे मित्र भेटले. मिलिंद जोशी (कीर्तीचा भाऊ) त्याला मैथिली आवडू लागली होती. तो तिला नाटकाची तालीम संपल्यावर घरी सोडवायला येऊ लागला होता. न कळत मिलिंद ही मैथिलीच्या प्रेमात पडला. त्याने तिला ड्रेस घेतला व भेटण्यासाठीही बोलावले मैथिलीदेखील त्याच्याकडे आकर्षित झाली होती. परंतु त्यांच्या लग्नाला मिलिंदच्या घरातून विरोध झाला. कारण मैथिलीच्या आई-वडिलांचा आंतरधर्मीय विवाह व तमिळी ख्रिश्चन असलेल्या आईने लग्नानंतर धर्मांतर केले नाही. यामुळे मैथिली अतिशय दुखावली गेली. किर्ती चेतन व मित्रा सर यांनी मात्र त्यावेळी तिला धीर देण्याचा प्रयत्न केला. मिलिंद नोकरीनिमित्त अमेरिकेला गेला. मैथिली तिला लागलेल्या ठेचेमुळे सावरून पुन्हा अभ्यासाकडे वळली बी.ए. ला 'इंग्रजी लिटरेचरमध्ये विद्यापीठात सर्वात जास्त मार्क, संस्कृतमध्ये डी.टी.'(पृ.८७) नंतर तिने नोकरी करायचे ठरविले त्यासाठी ती दांडेकरांकडे गेली. कारण त्या कंपनीच्या मॅनेजिगं बॉडीवर दांडेकर होते. परंतु दांडेकरांनी चांगला प्रतिसाद न दिल्यामुळे मैथिली नाराज झाली. चेतनने पुन्हा आपण राजसंन्यास करू असा प्रस्ताव मैथिली समोर मांडले पण तिने ते मान्य केले नाही. कीर्ती मैथिलीला डॉ. मित्रांच्याकडे भेटायला आली. कीर्ती गरोदर होती. दोघींच्या छान गप्पा झाल्या.

मैथिली एम.ए.ला कॉलेजला पहिली, विद्यापीठातूनही पहिली आली. त्यानंतर देवस्थळी बाई अल्पशा आजाराने गेल्या, ही बातमी म.टा.मध्ये आली असे आत्याने सांगितले. ताबडतोब मैथिली देवस्थळीबाईंकडे गेली तेथे शंतनूशी तिची भेट झाली पण शंतनू थोडा अबोल असल्याने मैथिलीला निघावे वाटले, पण तेवढ्याच तेथे दांडेकर आले. मैथिलीने त्या दोघांना कॉफी करून दिली व नंतर मैथिली घरी आली.

दांडेकर मैथिलीच्या घरी शंतनू व मैथिली यांच्या लग्नाचा विषय घेऊन आले. मैथिलीने मला शंतनूशी बोलायचे आहे असे सांगून विचार करण्यास वेळ मागितला. शंतूनला आपली आई ख्रिश्चन धर्मीय होती हे सांगितले व मला लग्नाला जास्त खर्च करता येणार नाही तेव्हा रजिस्टर्ड मॅरेज करायचे आहे असे सांगितले. शंतनूलाही जास्त नातेवाईक गर्दी आवडत नसल्याने

त्याने होकार दिला. लग्नानंतर ते मद्रासला गेले. मद्रासला गेल्यानंतर तिने तिचे शिक्षण पुढे सुरु ठेवले. तिने डॉ. अरूणाचलम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. चा थिसीस सबमिट केली. पी.एच.डी. साठी 'शेलेच्या कविता' हा अभ्यास विषय निवडला कारण शेले हा डॉ. मित्रासरांचा आवडता कवी होता.

पीएच.डी.चे काम पूर्ण झाल्यानंतर मैथिली लवकर घरी येऊ लागली. घरात एकटेपणाची जाणीव तिला होऊ लागली. मला मूल हवं आहे, असा विचार तिने शंतनूकडे व्यक्त केला. शंतनूने मुल दत्तक घेण्याचा सल्ला दिला. थोड्याच दिवसात मैथिली आई होणार होती, पण बेबीच वजन गर्भाशयाला पेललं नाही आठव्या महिन्यातच ब्लडिंग सुरु झालं. मुलगी होती. जन्मानंतर थोडाच वेळ मुलीने बाहेरचा प्रकाश पाहिला. मैथिली व शंतनू हताश झाले त्यानंतर मैथिली सव्वा, दीड महिना घरी होती नंतर पुन्हा कॉलेजला जाऊ लागली. लहान मुलांसाठी पुस्तक लिहू लागली. त्यानंतर पुन्हा मैथिलीला दिवस गेले. मैथिली व शंतनूला मुलगा झाला त्याचा नाव मैथिलीने अंशुमन ठेवले. अंशुमनच्या जन्मानंतर शंतनूच्या जीवनात आनंद आला. तो अंशुमनबरोबर रमू लागला पण अंशुमनच्या जन्मानंतरही तो मैथिलीशी एकरूप होऊ शकला नाही. 'त्याच्या मुलाची ती आई आहे. हेच त्याच तिच्याशी नातं. बस्स'(पृ.१३३) दरम्यानच्या काळात शंतनूची पाँडेचरीला बदली झाली. धर्मराजन म्हणजे मैथिली व शंतनू यांचे घरमालक की जे पती-पत्नी त्यांच्या वरच्या मजल्यावर राहत होते. एक दिवशी जिना उतरताना ते पडले आणि देवाघरी गेले. मिसेस धर्मराजन मुलाबरोबर निघून गेल्या. त्यानंतर मैथिलीने घर बदलले आणि ॲनी बेझंट नगरमध्ये घर घेतले. मैथिलीची मैत्रिण कावेरी शंतनू आणि मैथिली यांच्यात सतत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करते आणि म्हणूनच कावेरीने मैथिलीला फिरायला नेण्याचा बेत आखला.

कावेरीचा नवरा गणेश, मैथिली व शंतनू यांनी दोन दिवसांची ट्रीप ठरवली. ते ट्रीपला गेले पण तिथेही शंतनू मैथिलीपासून अलिप्त राहिला. मैथिलीने मला एक गोंडस मुलगी हवी अशी अपेक्षा व्यक्त केली. तेव्हा मी ऑपरेशन केले असल्याची कबुली शंतनूने मैथिलीला दिली. शंतनूला मैथिलीसमोर आपण फारच खुजे आहे, असे वाटायचे ती तिच्या वैयक्तिक जीवनात यशाची शिखरे गाठत होती व शंतनू अपयशाकडे चालला होता. त्यामुळे तो यात मैथिलीचा काहीही दोष नसताना तिचा मत्सर करत होता, असे वाटते. शंतनूला कंपनीने पाँडेचेरीला पाठविले, तो गेला पण थोड्याच दिवसात पुन्हा मद्रासला जायला सांगितले, तेव्हा त्याने

रेजिग्नेशन दिले व तो मद्रासला आला. शंतनू घरीच असल्यामुळे अंशुमनची सर्व जबाबदारी त्याने घेतली. दरम्यान अंशुमनला शंतनूचा लळा लागला. मैथिली मात्र त्या दोघांपासून दुरावली. जेव्हा मैथिलीने शंतनूला बंगलोरला बालसाहित्याच चर्चासत्र आहे. आपण तिघेही जावू असे सांगितले तेव्हा शंतनू म्हणाला, ''माझ्या घरी राहण्याची तू काळजी करू नको. मला सवय झाली आहे. तू घरी असली म्हणजेच आजकाल एक दडपण येतं माझ्यावर, नसली की मला जरा मोकळं वाटतं!''(पृ.१५७) शंतनूच्या या प्रतिकियेतून दोघांच्या नात्यातील कडवटपणा उघड होतो.

मैथिलीने डॉ. अरुणाचलम यांच्या मुलाच्या फॅक्टरीत शंतनूला नोकरी मिळवून दिली. मुंबईचा फ्लॅट विकायचा म्हणून दांडेकर मद्रासला आले तेव्हा दांडेकरांनी शंतनू मैथिलीशी तुम्ही माझे लग्न लाऊन देऊन माझे नुकसान केल्याचे पत्र त्याने मला पाठविल्याचे मैथिलीला सांगितले. शंतनूला दांडेकरांविषयी फार राग येत होता व मैथिलीशी ही तो जुळवून घेऊ शकला नाही, पण अंशुमन व तो चांगला मित्र बनले. बिचारी मैथिली मात्र त्या दोघांपासून दुरावत गेली.

गोपाळराव म्हणजे मैथिलीच्या आत्याचा नवरा यांच्या मृत्यूनंतर मैथिली मुंबईला गेली तेथे गेल्यानंतर किर्ती तिची मैत्रिण नवऱ्यापासून अलिप्त राहते. तिचा मित्र चेतन याने लग्न केले नाही. तसेच मिलिंद अमेरिकेत सेटल झाला. या सर्व गोष्टी तिला किर्तीकडून कळल्या. शंतनूला मैथिलीच्या गाडी पोहचण्याची वेळ अंशुमनने सांगूनही तो मैथिलीला आणायला गेला नाही. शंतनू आणि मैथिली या दोघांमधील संवाद कमी होता आणि दिवसेंदिवस तो कमीच होत चालला होता. 'हिंदू'मध्ये मॅगेझिन सेक्शनला अंशुमनच आर्टिकल छापून आलं. 'वेव्हज'(पृ.१६९) मैथिलीने लेखाबद्दल प्रतिक्रिया दिली ती अंशुमनला आवडली नाही. 'आई म्हणजे आपला घरातला सर्वात जवळचा टीकाकार!'(पृ.१७१) असे अंशुमनचे मत बनत चाललं होत. शंतनू मैथिलीबद्दल असलेला राग त्याच्या मित्रांमध्ये व्यक्त करत होता. असे तिची मैत्रिण कावेरीने मैथिलीला सांगितले. म्हणजे त्या तिघांमध्ये कौटुंबिक तणाव निर्माण होऊ लागला होता. अंशुमनने त्या तणावाला आईच जबाबदार आहे असे मत व्यक्त केले. ''तू समर्थ होतीस! डॅडी तसे नव्हते.'' नाहीत ते तुला भीत ही होते. मला लहानपणापासून कळायच ते त्याचं भिण. तुझ्या लक्षात नाही आलं. अम्मा!''(पृ.१७३) यावरून अंशुमनने मनमोकळेपणाने आपल मत व्यक्त केले पण त्यामुळे मैथिली दुखावली गेली. त्याच दरम्यान मैथिलीने पेपरमध्ये बंगलोर युनिव्हर्सिटीची अॅड वाचली इंग्रजी विषयाकरता. त्याच क्षणी तिने तिथून दूर जाण्याचा निर्णय घेतला. बंगलोरला तिला सुभद्रा जोशी व डॉ.निरंजन यांचा सहवास लाभला. डॉ.निरंजन यांची

मुलगी लली की जी दिव्यांग होती, तिच्याशी प्रेमभाव निर्माण झाला. दरम्यानच्या काळात अंशुमन व शंतनू मैथिलीपासून विभक्त राहूनही आनंदी जीवन जगत होते. अंशुमनने निरजाशी लग्न केले. नीरजासह तो मुंबईला गेला. शंतनू एकाळी पडला तेंव्हा मैथिली पुन्हा त्याला साथ देण्यासाठी त्याच्याजवळ परतली. कतृत्त्वाच्या उच्च शिखरावर पोहचलेली स्त्री कुटुंबातील व्यक्तींकडून किती अवहेलना झाली तरी कुटुंबाशी तिची असलेली नाळ तोडू शकत नाही, हेच सत्य आहे. मर्यादा पुरुषोत्तम रामाची सीता जशी तशी मैथिली आपल्या भूमीपासून विलग झाली नाही.

### ३.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो :

श्याम मनोहरांच्या 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीला सन २००६ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. ही कादंबरी आशय आणि अभिव्यक्तीच्या बाबतीत वेगळ्याच धाटणीची आहे. ही कादंबरी साधारणपणे तीन विभागात विभागली गेली आहे. पहिला भाग 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे '(पृ.३ ते ५४) पर्यंत आहे. दुसरा भाग  कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू (पृ.५५ ते १४९) आणि तिसरा भाग 'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' (पृ.१५३ ते१८९) या तीन भागात स्वतंत्रपणे कथानक साकारलेली आहेत. 'कुटुंबव्यवस्था' हा कादंबरीचा गाभा मात्र एकच आहे. कुटुंबव्यवस्थेचे चित्रण या तीनही भागात लेखकाने केलेले आहे.

श्याम मनोहरांच्या लेखनाचा विशेष नोंदवितांना डॉ. शशिकला कांबळे म्हणतात, ''कोणत्याही श्रेष्ठ लेखकाच्या लेखनाप्रमाणे ते एकाच वेळी समकालीन आहेत. आणि त्याचबरोबर कालातीतही आहे. कारण श्याम मनोहर मानवी दु:खाचा अर्थ लावताना केवळ समकालीन वास्तवाशी येऊन थांबत नाहीत तर त्यापलीकडे जाऊन दु:खाच्या मूळ प्रश्नांना जाऊन भिडतात. या भिडण्यापासून जीवनातील विसंगती त्यांना आकळते. त्या शोधयात्रेत ते जीवनातील सूत्रहीनतेशी येऊन पोहचतात. माणसांविषयी त्यांचे चिंतन त्यांच्या साहित्यातन प्रामुख्याने लक्षात येते.''[२२] लेखिका मानवाच्या मूलभूत नैसर्गिक प्रवृत्तीविषयी आपले मत नोंदविताना म्हणतात, ''दैनंदिन जीवनातील आहार-निद्रा-भय-मैथुन या नैसर्गिक गरजेत अगदी गुंगून गेलेल्या समाजाच्या आंतर्ववर्तुळातील कीड दाखवून देतात.''[२३]

'व्यक्तीने उलटासुलटा विचार करण्याची देणगी गमावता कामा नये. उलटा विचाराला आपला स्वत:चा व दुसऱ्याचाही विरोध होतो. उलटा विचार प्रस्थापित होऊ शकतो पण पुन्हा उलटा विचार करून बघायचा. उलटयाच्या उल्टा विचार म्हणजे सुल्टा विचार नव्हे उल्टयाच्या

नाना तऱ्हा असतात. मग भीतीदायक, दुष्ट, भंपक विचारही छान हाताळता येतात. मनाचा घट्टपणा कमी होतो. मन जेवढे सैल तेवढे जीवनाचे झिरपणे अधिक मानवी मन जेवढे सैल किंवा मुक्त होईल तेवढे त्याच्या जीवनाचे झिरपणे सुकर होईल हे एकच आशयसुत्र घेऊन कादंबरीची तीन उपकथानके लेखकाने गोवली आहेत. 'उत्सुकतेने मी झोपलो' या श्याम मनोहर यांच्या कादंबरीचे तीन विभाग आहेत. त्यातील पहिला भाग कुटुंबव्यवस्था आणि चांदणे एका मध्यमवर्गीय कुटुंबातली मुलगी लग्नानंतर चांगल्या सुखवस्तू कुटुंबात नांदंते. याचे चित्रण कादंबरीत आले आहे. अमरावतीला तिचे शिक्षण झाले नंतर तिला एम. ए. करायचे होते. पण तिने पुण्याला जाण्याचा हट्ट धरला माधुरी ही एकत्र कुटुंबात वाढलेली मुलगी होती. माधुरीचे वडील दोन चुलते, आई, दोन काकू त्याची मुले असा सगळा परिवार होता. माधुरीचे वडील आर्थिक व्यवहारात हुशार होते व आई देखील हुशार होती. माधुरीचे वडील आईचा सल्ला घेत व थोरली जाऊ देखील आईचा सल्ला घेत होती. म्हणजेच काय एकत्र कुटुंबात माधुरीच्या आई-वडिलांना मान होता. माधुरीचा धाकटा भाऊ एफ. वाय. बी. कॉम.ला आहे. त्याला शिक्षणात रस नसल्याने तो वडिलांच्या हॉटेल व्यवसायात लक्ष घालतो. पिता पुत्रांचे संबंध हे मैत्रिपूर्ण आहे माधुरीच्या मतालाही कुटुंबात स्थान होते. त्यामुळेच माधुरीच्या पुण्याला जाण्याच्या निर्णयाला कुणीही विरोध दर्शविला नाही माधुरी पुण्याला आली होती.

माधुरी व माधुरीची मैत्रिण यशोधरा यांच्यामध्ये आपण शिकतोय ते कशामुळे? या विषयावर चर्चा झाली. यामध्ये भारतात कलकत्ता येथे पहिली शाळा सुरू करणारी फिमेल ज्यूव्हेनाइल सोसायटी, इंग्लडहून आलेल्या मिस कुक तसेच अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुंबई शहरात पहिली शाळा उघडली. राजाराम मोहन रॉय यांनी बंगालमध्ये सामाजिक सुधारणा स्त्री शिक्षण याबद्दल लोकजागृती केली. १८४८ मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. १८८४ ला पुण्यात मुलींची माध्यमिक शाळाही सुरू केली. १९५१ मध्ये स्त्री पुरुष समानतेचा कायदा पास झाला. या यशोधरेने विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तिनेच दिले आणि या सर्वांमुळे आज आपण शिकतोय. ही भूमिका येते.

एम.ए.भाग दोनची परीक्षा झाल्यावर माधुरी अमरावतीला जाऊन आली. तिथे मैत्रिणींच्या भेटीगाठी घेतल्या. मामेभावाचे लग्न झाले. तिने सुटी तिच्या कुटुंबासोबत मजेत घालवली. त्यानंतर ती आई-वडिलांसमवेत पुण्यात आली. तिच्या वडिलांचे मित्र मोहनराव यांचे पुण्यात बाणेरला मोठे हॉटेल होते. वडिलांना मित्राची भेट घ्यायची होती तसेच तिच्या वडिलाचा

पुण्यात प्लॅट होता. तो भाडयाने द्यायचा होता परंतु माधुरीने त्यास नकार दर्शविला तीच पीएच.डी.साठी पुण्यात राहणार होती. तेव्हा तिने फ्लॅटमध्ये राहण्याचा निर्णय घेतला.

माधुरीच्या सर्व मैत्रिणी कष्टाळू व सेवाभावी वृत्तीच्या होत्या. चित्रपट क्षेत्रात मिळेल त्या संधीचा लाभ घ्यायचा व काम सुरू करायचे असे सर्वांनी ठरविले होते. माधुरी फिल्म अर्काईव्हकडे गेली व तिने चित्रपट सृष्टीतील महत्त्वपूर्ण माहितीची टिपणे काढली. सिनेमातोग्राफ ची माहिती समजून घेऊन त्यावर चित्रपट पाहिले. धुंडिराज गोविंद फाळके यांनी ख्रिस्ताचं जीवन : Life of Christ हा चित्रपट पाहिला येशूचे चरित्र पाहून आपणही श्रीकृष्ण, श्रीराम यांच्या चरित्रावर चित्रपट काढावा असे त्यांना वाटले. त्यांनी आर्टसमध्ये चित्रकला व स्थिर प्रकाशचित्रण हयाचा अभ्यास केला. पुढे आर्ट प्रिंटिग प्रेस सुरू केले. रंगीत फोटोग्राफीच्या शिक्षणासाठी ते जर्मनीला गेले. सतत पिक्चर पाहणे विलायतेतून तांत्रिक माहितीचे कॅटलॉग पुस्तकं मागविणे, सतत वाचन, जागणे करून नजरेवर ताण पडून त्यांचे दोन्ही डोळे जवळजवळ निकामी झाले,. मुंबईच्या डॉ. प्रभाकर या नेत्ररोग तज्ञामुळे दृष्टी ठीक झाली. त्यांनी ‘राजा हरिश्चंद्र’ हा पहिला चित्रपट काढला. तसेच तिने फिल्म इन्स्टिट्युट ऑफ इंडियाविषयी सर्व माहिती मिळविली. आठवडाभर माधुरीने सर्व नोंदी केल्या होत्या व तिने आर्ट फिल्म काढण्याचा निर्णय घेतला. साप्ताहिकाच्या पुरवणीत तसा आलेला लेख माधुरीच्या वडिलांनी आनंदाने सर्वांना दाखविला. पण हा आनंद क्षणिक ठरला कारण दोनच दिवसांनी माधुरी अमरावतीला गेली. तिने आपला निर्णय बदलल्याचे वडिलांना सांगितले. तिचा हा निर्णय ही सर्वांना आवडला.

पुढचा सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे माधुरीचे लग्न ठरले त्यानिमित्ताने लेखकाने भारतीय समाजात कुटुंब महत्त्वाचे आहे. लग्न ही कौटुंबिक घटना आहे. कुटुंब चालू राहण्यासाठी लग्न असते आणि लग्न म्हणजे नवरा–नवरी यांच्यात नाते संबंध निर्माण होणे असे नाही, तर नवऱ्याच्या कुटुंबाचे व त्याच्या नातेवाईकांचे नवरीचे कुटुंब व त्याच्या नातेवाईकांशी स्नेहबंध जुळले जातात. नाशिकच्या श्रीमंत कुटुंबातील सुबोधशी माधुरीचा विवाह ठरला. विवाह ठरल्यानंतर माधुरी पुण्याला गेली तेथे ती मुक्तपणे हिंडली. लग्न व कुटुंब ह्या गोष्टीचे चित्रण लेखकाने समर्पकतेने केले आहे.

सुबोध व माधुरी लग्नाआधी पुण्यात एकमेकाना भेटले. दोघेही मर्यादेशील आहेत. सुबोध त्यांच्या मावशीकडे राहिला व माधुरी तिच्या फ्लॅटवर राहिली. चित्रपट व कौटुंबिक विषयावर

त्यानी दोघांनी गप्पा मारल्या. थोडयाच दिवसात त्यांचे लग्न झाले. लग्नाचे रिसेप्शन जंगी झाले. तीन एकराच्या मैदानाला तट घातला होता. असंख्य स्टॉल्स होते. खुद्द उपमुख्यमंत्री रिसेप्शनला उपस्थित झाले होते यावरून सुबोधच्या कुटुंबाच्या श्रीमंतीची व प्रतिष्ठेची सहज कल्पना येते. माधुरीचे लग्नानंतर नाव बदलले 'सुमाधुरी' असे नाव ठरले. सुमाधुरीचे वैवाहिक जीवन सुरू झाले. आज्जेसासूला मान द्यायचा, डोक्यावर पदर असला पाहिजे. या सारख्या गोष्टींचे शिक्षण सुरू झाले. तसेच माधुरी व सुबोध हे हनीमुनला उटीला गेले. त्या दरम्यान त्याने माधुरीने फिल्म काढाव्यात यासाठी तिला प्रोत्साहन दिले.

माधुरीच्या घरातील कौटुंबिक वातावरण खेळीमेळीचे होते. सुसज्ज बंगला, नोकचाकर, दागदागिन्याची सुबत्ता तसेच नवरा-बायकोचे प्रेमळ संवाद तसेच कुटुंबातील पुरुष माणसे आपल्या नात्यातील लोकांच्या अडीअडचणी सोडविण्याचा प्रयत्न करतात नातेवाईकांना सुबोधच्या कुटुंबाचा सर्वार्थाने आधार आहे. 'जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सुबोधचा भाऊ खूप व्यग्र होता, तर जिल्हा साहित्य संमेलनात सुबोधचे वडील व्यग्र होते.' (पृ.३५) म्हणजेच राजकीय वर्तृळातही कुटुंबातील व्यक्तींना मान होता. एकंदर लेखकाने केलेल्या वर्णनातून सुबोधच्या कुटुंबाची सुबत्ता आणि प्रतिष्ठा समजते. तसेच कौटुंबिक वातावरणही व्यक्तिविकासासाठी पोषक आहे.

सुबोधने त्याचा मित्र अनिकेत ज्याने सिनेमा करण्याचे ठरविले होते त्याला आपल्या घरी आणले. सुमाधुरीबरोबर चर्चा करण्याचा त्याचा उद्देश होता. पण सुमाधुरी मात्र त्या चर्चेत नकारात्मक बोलते सुबोध सुमाधुरीला नकारात्मक विचार करू नकोस असे सुचवितो. कारण सुमाधुरी गर्भवती होती. सुबोधने आपण तुझ्या गर्भारपणातले शुटिंग करू असा प्रस्ताव मांडला. सुमाधुरी म्हणाली 'ट्रिक इन्टरेस्टिंग आहे' गर्भारशा स्त्रीशी निगडित असलेल्या वातावरणाचे चित्रण पण त्यात गर्भार स्त्री दाखवायची नाही असे ठरले. हे मात्र सुमाधुरीला आवडले नाही ती म्हणते, 'वा! ट्रिक! म्हणे आर्ट फिल्म पण कन्टेट? ओल्ड! वेस्टरकडून टेक्निक येतेय. पण कन्टेट ओल्ड'' चित्रपटात 'प्रणयिनी आणि माता दोनच मूल्य! व्वा रे संस्कती ! गर्भारपण जणू पासिंग फेज व्वा!'(पृ.४०) यातून सुमाधुरीच्या मनात चाललेल्या उलट सुलट विचारांचा उलगडा होताना दिसतो.

सुमाधुरीने पुण्यात असताना एका सिनेमात असिस्टंटशिपची जबाबदारी घेतली. त्या सिनेमात एक गरीब गर्भारशी बाई ॲक्सीडेंटमध्ये मरते, असं दृश्य होतं. त्यात ॲक्सीडेंट ची सर्व

वातावरण निर्मिती केली. गर्भार स्त्री दाखवली नाही व शेवटी एक प्रौढ स्त्री तिच्या मृत्यूची बातमी टेलिफोनबूथ मधून सांगते. गर्भारशी स्त्रीच्या अक्सिडेंटचे कसे नवीन टेकिंग घ्यावे असा ती विचार करते. म्हणजे जेव्हा तिने सिनेमा करण्याचे ठरविले तेव्हा तिने उत्साह दर्शविला पण त्याही वेळी तिच्या मनात उलट सुलट विचारांचे वादळ उठलेच होते.

सुमाधुरी बाळंतपणासाठी माहेरी गेली माहेरी गेल्यावरही सुबोध तिला सकारात्मक विचार करण्याचा सल्ला देत असे. आणि सुबोधला छान बातमी कळाली. मुलगा झाल्याची घरातील सगळे आनंदीत झाले. बाळाचे बारसे करण्याचे ठरले. त्यांच्या गावातल्या सहा मुलींनी पारंपरिक पद्धतीने बारशाचा खेळ करून दाखविण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यांनी त्यामध्ये बाळाचे आई-बाबा, आजी -आजोबा, आत्या व आईची मैत्रिण अशा भूमिका केल्या. नाटकानंतर प्रत्यक्ष आत्याने बाळाचे नाव परिस ठेवले. तसेच लाडाचे नाव सुब्बू ठरविले.

सुबोधचे वडील महाराष्ट्राच्या गृहमंत्र्याच्या वाढदिवसाच्या जय्यत तयारीला लागले होते. गृहमंत्र्याची नाण्यांनी तुला करायची होती. तुला करण्यासाठी पैसा गाळा करण्याच्या कामाला ते तयारीनिशी लागले होते. त्या पैशातून एक रिसर्च इन्स्टिट्यूट निर्माण करायची होती. सुबोधचा भाऊ द्राक्ष निर्यातीच्या कामानिमित्ताने मुंबईला होता. तसेच नेमके त्यावेळी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यानी एक योजना जाहीर केली. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मुंबईत स्वस्तात फ्लॅट द्यायचे. सुबोधच्या वडिलाची गृहमंत्र्यांशी जवळीत होती पण गृहमंत्री व मुख्यमंत्री यांचे नीट जमत नव्हते पण तरीही जुहूत फ्लॅट मिळवणार ही महत्वाकांक्षा सुबोधचा भाऊ बाळगून होता. भाऊ मुंबईला थांबणार म्हटल्यावर सुबोधला कामाचा व्याप वाढला.

एकत्र कुटुंबपद्धतीमुळे बाळाला सांभाळणारे खूप होते. सुबोधने सूब्बूच्या बालपणातील प्रसंगाचे शुटिंग करण्याचे ठरविले घरातल्या प्रत्येकाबरोबर सुबोध शुटींग करत होता. आईबाळाकडे पाहतेय व बाळ आईकडे पाहतयं ह्या क्षणाचे दृश्य त्याला टिपायचे होते. ते त्याला जेव्हा बाळाचे स्तनपान झाले बाळ तृप्त झाले तेव्हा तो क्षण त्याला टिपता आला. सुब्बू पीत असतानाचे शुटींग करण्याचे सुबोधच्या मनात होते पण त्याने ते केले नाही कारण ते कुटुंबव्यवस्थेत बसत नाही. सुमाधुरी याही क्षणी गर्भारशी बाईच्या ॲक्सिडेंटचा सीन करा याचा विचार करत होती पण तिला सुचत नव्हते. तेव्हाही सुबोध तू आता फक्त मातृत्वाचा विचार कर असा सल्ला देतो. मध्यरात्री त्याला जाग येते तेव्हा सुमाधुरी खोलीत नाही हे पाहून सुबोध काळजीत पडतो घरभर शोधतो, त्याच्याबरोबर आई व वहिनी ही शोधत होत्या शेवटी ते टेरेसवर

गेले. तेव्हा तेथे सुमाधुरी होती. तेव्हा ती सगळ्यांना चांदणे दाखवते व निसंदिग्ध संवाद करते. तेव्हा सुबोध, वहिनी व सुबोधची आई संभ्रमात पडतात. तिची प्रेमाने विचारपूस केली. माधुरी चे बोलणे संभ्रम निर्माण करणारे होते. ''कल्पकता, सौंदर्याची जाण आणि वर्ल्ड हयूला मला मराठी शब्द येत नाहीत. हे माझ्या मनात रूजत नाहीय. नुस्ते डोक्यात आहेत ते शब्द हे मनात कसे रूजतील? ह्याचा मी विचार करतेय.''(पृ.५३) सुबोधने आई व वहिनीला झोपायला जायला सांगितले सुबोधन सुमाधुरीशी मुक्त संवाद साधला. सुबोध सुमाधुरीला म्हणाला आपण दोघे टेरेसवर गेलो असतो. तेव्हा सुमाधुरीने उत्तर दिले, ''मला एकटीलाच विचार करायचा होता.''(पृ.५४) सुमाधुरीने आई व वहिनीला सांगितलेले सुबोधला आवडले नाही तो सुमाधुरीला सांगत होता तुला जे काही सांगायचे असत ते मला सांगत जा आई वहिनीला सांगू नकोस. आपल्याला जे काही करायच ते कुटुंबाच्या चौकटीत बसलं नाही तरी ते आपण केलं पाहिजे अशा अर्थाचे मत सुमाधुरी सुबोधजवळ व्यक्त करते सुबोधला ते पटत असले, तरी तो त्यावर स्वत:ची प्रतिक्रिया देत नाही.

'उत्सुकतेने मी झोपलो' या श्याम मनोहर यांच्या कादंबरीच्या कुटुंबव्यवस्था आणि चांदणे या भागात सुमाधुरी ही नायिका आहे. अमरावतीची सुमाधुरी पुण्यात 'मास कम्युनिकेशन' या विषयात एम.ए. करते पुण्यात शिक्षण घेत असताना मुक्त स्वातंत्र्याचा उपभोग घेते. तिचा विवाह सुबोध या नाशिकच्या उच्चभ्रू कुटुंबातील मुलाशी होतो. आकर्षक दिसणाऱ्या सुमाधुरीला चित्रपटसृष्टीत करीअर करण्याची इच्छा होती. सुमाधुरीकडे सर्जनशीलता होती. पण प्रतिष्ठित अशा समाजातील रीतिरिवाज आणि माणसाचे परस्परसंबंध यामुळे सुमाधुरीच्या सर्जनशीलतेचा कोंडमारा होतो. अर्थात सुबोधचे सुमाधुरीवर खरे प्रेम आहे हे जरी सत्य असले, तरी त्या प्रेमाला मुक्ततेचा स्वातंत्र्याचा अभाव आहे असे दिसते. नवनिर्मितीचे प्रतीक मानलेले चांदणे मात्र कुटुंबात नाही म्हणूनच तर स्वत:ची घुसमट होणारी माधुरी रात्री अपरात्री टेरेसवर चांदणे पाहण्यासाठी एकाकीपणे स्वतंत्र विचार करण्यासाठी जाते. म्हणजेच ती बंड करू पाहते. निर्मितीला कुटुंबात स्थान नाही. आणि सुमाधुरीच्या मते निर्मिती ही कुटुंबातच झाली पाहिजे हे या कादंबरीचे आशयसूत्र आहे.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : कथानकाच्या याभागामध्ये एकत्र कुटुंबाचे विभक्त कुटुंब होते. त्या कुटुंबातील मुलांचे म्हणजे भावंडांचे परस्परसंबंध तसेच त्यांचे त्यांच्या मित्राशी असलेले सबंध मानलेल्या नात्याचे महत्त्व, तसेच संशोधन क्षेत्रातील काही घडामोडी मित्राचे

म्हणजे हर्षदच्या कुटुंबातील म्हणजे विभक्त कुटुंबातील समस्या या सर्वांचा आढावा या भागात लेखकाने घेतला आहे.

विलास फुलपाखरांवर संशोधन करीत होता. त्याचा मित्र हर्षद त्याला जेव्हा एकटे वाटेल तेव्हा विलासच्या घरी जायचा पण विलासने त्याच्या आईच्या अफेरच्या उल्लेख केला व त्यांच्या दोघांमध्ये खूप भांडणे झाली त्यांची मैत्री तुटली. हर्षदच्या घरातील आई-वडिलांचा संवाद होत नव्हता. आई तिच्या पद्धतीने जगत होती याचा परिणाम हर्षदचे अभ्यासात लक्ष लागत नव्हते. तसेच सिग्रेट या व्यसनाच्या आहारी तो गेला होता.

विलास डॉ. नारखेडकर यांनी शहरात स्थापन केलेल्या 'यंग टॅलेन्ट इन सायन्स' या इन्स्टिटयूट मध्ये जायचा. तेथे डॉ. करवले हे प्रोफेसरही होते. दोघांचेही विलासला मार्गदर्शन लाभले होते. तो बी.फार्म ही करीत होता. विलासच्या वडिलांचा व काकांचा गाद्या, उशा, लोड तयार करण्याचा व्यवसाय होता पण त्या व्यवसायात राम नाही असे त्याच्या आईचे म्हणणे होते त्यामुळे मेडिकल शॉप टाकून ते करता करता फुलपाखरांचे संशोधन करण्याचाही विलासचा मनोदय होता.

माणसाला घडविण्यात अथवा त्याला विकृत बनविण्यात त्याचे कुटुंब फार महत्त्वाचे आहे. विलासची कुटुंबव्यवस्था चांगली होती. पण त्याचा मित्र हर्षद मात्र सतत चिंताग्रस्त होता. हर्षदच्या आईचे अफेर होते आणि याचा सगळीकडे बभ्रा झालेला होता. हर्षदच्या  कुटुंबातही सतत तणावाचे वातावरण होते. आई हर्षद व त्याचे पप्पा यांच्यासाठी स्वयंपाक करून नोकरीला जात होती. आई-वडील व मुलगा यांच्यामध्ये संवाद नव्हता. याचा परिणाम हर्षद एकाकी बनला. त्याचे अभ्यासात लक्ष नव्हते सिग्रेट या व्यसनाच्या तो आहारी गेला होता. पण जेव्हा आई-वडिलांचा प्रॉब्लेम संपला हे त्याच्या लक्षात येते. तेव्हा तो निश्चय करतो आता खूप अभ्यास करायचा. मित्रांमध्ये जायचे नाही. सिग्रेट ओढणे बंद करायचे. म्हणजे कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने वाचकांना तरूणाची वाढती व्यसनाधिनता याला महत्त्वाचे कारण म्हणजे कुटुंबातील तणावपूर्ण वातावरण आहे. हे दाखवून देण्याचा प्रयत्न केलेला आहे. विलासची बहीण वनिता हिच्यावर हषर्दचे अव्यक्त प्रेम होते. वनिताला मात्र हे माहित नव्हते. आनंद व दुःख या दोन्ही प्रसंगी हर्षदला वनिताची आठवण होताना दिसते. हे त्याच्या खालील स्वगतातून स्पष्ट होते, ''वनिता जर अशी वागली, मला सोडून दुसऱ्याबरोबर गेली, तर वनिताची खैर नाही. मी नाही वनिताला डायव्होर्स देणार... वनिता आईप्रमाणे वागणारच नाही. तिचे

आपल्यावर खरेखुरे प्रेम उद्याच्या उद्या वनिताला भेटायचे.'(पृ.१०९) खर, तर हर्षदचे वनितावर एकतर्फी प्रेम होते. कारण वनिताने आपल्या हर्षदवरील प्रेमाचा कुठेही उच्चार केलेला आढळत नाही.

वनिताचे तिच्या चुलत भावावर अतिशय प्रेम होते. त्या भावंडामध्ये बहीण भावांना एकमेकांविषयची आपुलकी, प्रेम काळजी होती. वनिताच्या मते विलासच्या आईचे घर फोडले त्यामुळे तिचा विलासच्या आईवर राग होता. विलासने फुलपाखरांवर संशोधन केले होते. त्याने इंटरनॅशनल जर्नलला पेपर पाठवला होता. पण तो बरेच दिवस झाला नव्हता. अखेरीस थोडयाच दिवसात त्याचा पेपर इंन्टरनॅशनल जर्नलमध्ये ॲक्सेप्ट झाला. त्यावेळी विलासला आनंद होत होता आणि पडेलही वाटत होते. विलासचे त्याच्या मित्रांनी अभिनंदन केले. 'कॉलेजात प्राचार्यांनी त्याला ऑफिसात बोलावून घेतले फुलांचा गुच्छ दिला' संजय त्याला टुंस्टिटयूवर न्यायला आणण्यासाठी त्याच्या कॉलेजला गेला. डॉ. नारखेडकर त्याला म्हणाले ''ही इंस्टिटयूट तुझीच आहे खूप काम कर भारताला मोठ्या शास्त्रज्ञांची तहान लागलेली आहे'' विलासला पडेल वाटले. सर्वांनी त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला त्याला वनिताची आठवण झाली वनिता कुटुंब फुटलं म्हणून आपल्याला टाळतेय याची विलासला जाणीव झाली होती. कारण त्याला ती सख्या बहिणीपेक्षा जास्त प्रिय होती अपार्टमेंटच्या कंपाऊंट बाहेर त्याला वनिता भेटली. तिने साश्रू नयनांनी अभिनंदन केले. म्हणजेच वनिताच्या डोळ्यात आनंदाश्रू होते.

विलासचा पेपर ॲक्सेप्ट झाल्यापासून संजय विलासशी जास्त जवळीक साधत होता. कारण इंस्टिटयूटचा सेक्रेटरी नेमणार आणि ती विद्यार्थ्यामधूनही खबर त्याने डॉ. नारखेडकरांकडून त्यांच्या उपरोक्त ऐकली. सेक्रेटरी पद विलासला मिळणार याचा अंदाज संजयला आला त्याने धूर्तपणा केला. विलासला गाठले व त्याचा प्लॅन सांगितला. 'मी नारखेडकरांच्या इन्स्टिटयूटमध्ये सेक्रेटरी व्हायचे तू न मी मित्र राहायचे.'(पृ.१२९) विलासही तयारीला लागला त्याने संजयप्रमाणे डॉ. करवल्यांची इस्टिटयूट स्वच्छ करून घेतली. दरम्यानच्या काळात विलासच्या आईला मातृगौरव पुरस्कार मिळाला. या वृत्ताने वनिता मात्र अस्वस्थ झाली. तिने विलासची भेट घेतली व त्याला प्रश्न केला ''तुझ्या संशोधनात तुझ्या आईचा किती वाटा आहे.(पृ.१३५ तेव्हा त्याने मोठे संशोधन असते ते आईला माहितीही नसेल हे मान्य केले. म्हणजेच त्याच्या संशोधनात आईचा वाटा नाही हा निष्कर्ष वनिताने ठामपणे मांडला तेव्हा त्यावरील विलासचे भाष्य मार्मिक आहे. ''आईवडिलांना वाटते, आपल्या मुलाने खूप शिकावे आणि मोठे व्हावे. मोठे व्हावे

म्हणजे काय? तर पैसे कमवावेत रांकेला लागावे. ज्ञान हा शब्दही नसेल कोणत्या आईवडिलांच्या मनात येत. कुटुंबव्यवस्थेत ज्ञानाला जागा नाहीय.(पृ.१३५)

संजय विलासला सेक्रेटरी होण्यासाठी त्याची मन धरणी करतच होता. संजय विलासला म्हणाला, ''आपण दोन्ही इस्टिटयूट ताब्यात ठेवायच्या आपल्या थोडक्यात काय त इस्टिट्युट ताब्यात ठेवण्याच्या राजकारणात विलासही सक्रिय झाला होता. त्याच वेळी कुटुंब फुटण्यावरून विलासच्या घरात वाद चालला होता. विलास विचित्र परिस्थितीत सापडला होता तेव्हा तो अंतर्मुख होऊन वनिताची आठवण काढून त्याचे स्वगत असे होते, वनिता घर फुटले याचे दुःख नाही दुःख होत मला सेक्रेटरी व्हायसाठी मी धडपड करतोय त्यात गोडी आली त्याचे दुःख होतेय मला त्यानंतर त्याने इस्टिटयूटला न जाण्याचा फक्त कॉलेजचा अभ्यास करण्याचा निश्चय केला. छोट्या संशोधनापेक्षा मोठ्या प्रॉब्लेमवर संशोधन करण्याचे तो मनात सतत घेळवत असतो. मोठा प्रॉब्लेम पाहिजे त्याच्या मनात एकच एक वाक्य होते.

वनिताची तेवीस वर्षीय मावस बहीण कॅन्सरने वारली. अशा दुःखाच्या प्रसंगी सारे कुटुंब एकत्र आले. विलासने वनिताला दुःखातून बाहेर काढण्यासाठी सतत तिच्या सहवासात राहायचे ठरविले. चार दिवस तो सतत तिच्याबरोबर राहिला त्याला त्यावेळी जाणीव झाली. दुःखाचा नुसता आशय जाणवला तर माणूस आध्यात्मिक होतो. शब्दांसह दुःख जाणवले, तर माणूस साहित्यिक होतो.' वनिताच्या मावस बहिणीच्या मृत्यूनंतर माणसाचे आयुष्य शंभर वर्षे, हत्तीचे किती वर्षे? फुलपाखराचे किती हे विचार विलास घोळवू लागला तो पुन्हा दोन्ही इस्टिटयूटमध्ये जावू लागला. ग्रंथ वाचू लागला त्याच्यामते मोठा प्रॉब्लेम जीवनाशी निगडीत नसतो सृष्टीशी निगडीत असतो. अर्थात मोठ्या प्रॉब्लेवर कधीच संशोधन होत नसते. मोठा प्रॉब्लेम बघत बघत छोटया प्रॉब्लेमवर संशोधन करायचे असते. मोठा प्रॉब्लेम नुसता जाणवतोय आता सुचतील छोटे प्रॉब्लेम.'(पृ.१४५)

वनिताही संभ्रमावस्थेतच होती. संशोधन करू पाहणाऱ्या लोकांशी आपण कसे वागाले पाहिजे?(पृ.१४८) तस तिने हर्षदला ही विचारले. त्यावेळी 'न सूचणे हे क्रूर आहे' हे हर्षदलाही जाणवले. संशोधन करू पाहणाऱ्यांशी कसे वागल पाहिजे. उन्हाळा ऋतू सुरू झाला होता हा एक काळ आणि दुसरा काळ म्हणजे मनातल्या प्रश्नावर आपोआप चालू असलेल्या विचाराने निर्माण केलेला या ठिकाणी दुसरा काळ म्हणजे संकट असावे. शेवटी फुलपाखरूच म्हणत असावे. आमच्यात अभ्यास करत नाही. नाहीतर आम्ही विलासचा अभ्यास केला असता.

इतका कडक उन्हाळा पडलाय ह्या ऋतूत आम्ही नसतो. तुम्ही असता.''(पृ.१४५) या वाक्यावरून असे स्पष्ट होते. फुलपाखरे कडक उन्हाळ्यात दिसत नाहीत.

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : बाबांचे जावयाच्या घरी स्वागत होते. मुलीचे सासरे, सासू स्वतः मुलगी हॉलमध्ये आली होती. चहापान्याचे विचारले गेले. शेवटी जेवणाचे ठरते. तेवढयात जावई बाबांना वर्तमानपत्र देऊन सिग्रेट ओढायला बाहेर जातो. बाबांनीही स्वतःच्या आई-वडिलांसमोर घरात कधी सिगरेट ओढली नव्हती. दिवाळीच्या सणानिमित्त मुलीच्या सासऱ्याने आवर्जून बोलविले होते. एकुलती एक मुलगी. तिच्या घरी वडील आलेले होते. मुलीच्या सासरी जावयानं दिलेल्या वर्तमानपत्रात डोळे लावून मुलीचे वडिल गप्पपणे कोचात बसून होते. मुलीची सासू बाहेर येऊन म्हणाली, ''आता मागचे काही एक आठवायचे नाही. एकेक दिवस येईल तो आनंदात घालवायचा.''(पृ.१५४) काहीही केले तरी हे परक्याचे घर होते.

''पावसाळा लवकर जाणे- आयुष्य लवकर जाणे- मरण लवकर येणे- पावसाळा सावकाश जाणे- आयुष्य सावकाश जाणे- मरण सावकाश येणे- पण ब्रॉकायटिसचा त्रास होणे.'' सदुसष्ट वर्षाचे विधूर म्हातारा. सुनेचे सदुसष्ट वर्षाचे विधूर वडील एकटे काय करणार? पावसाळयात त्यांच्या श्वासनलिकेला सूज येते. श्वासोच्छावास करतांना छातीत दुखते. पावसाळा कधी संपतो असे त्यांना होत असे. त्यांना आपल्या बायकोबरोबरच्या दिवाळ्या आठवत होत्या.

भूकंपामध्ये दुसऱ्या बेडरुममधला बायकोचा फोटो खाली पडला होता. काच फुटली होती. बायकोचा सगळा वेळ संसाराचा विचार करण्यात गेला होता. 'बायकोला सैंपाकाची इतकी आवड होती की, इतर गोष्टीसाठी तिला मोकळीक नकोच वाटत होती.' धुण्या-भांडयाला मोलकरीण होती. ती येऊन गेली होती. स्वयंपाकाची बाई यायला अवकाश होता.

पहिल्या भागात सुमाधुरीला एकटीला गच्चीवर जाऊन चांदणेदेखील पाहता येत नाही. तिला स्वतंत्र विचार करायचा असतो. सर्जनाला कुटुंबव्यवस्थेत थोडीफार जागा मिळावी हिच तिची माफक अपेक्षा असते. थोडक्यात एकत्र कुटुंबात एकट्याला विचार करायला संधीच नसते. योग्य तो स्पेस मिळू शकत नाही.

दुसऱ्या भागात विचाराला स्वातंत्र्य मिळाले, पण त्याचे काहीसे स्वैराचारात रुपांतर झाल्यासारखे वाटते. त्यातूनच एकत्र असलेले कुटुंब विभक्त होते. स्वतंत्र विचारांना सुरुवात होते. पण कुटुंब व्यवस्थेत ते फुलपाखराप्रमाणे अल्पकाळ असते. दुसऱ्या भागात

कुटुंबासंस्थाविषयी लेखकाने काही मुलभूत प्रश्न उपस्थित केलेले दिसतात. कुटुंबव्यवस्थेला आधुनिक काळात वेगवेगळे हादरे बसत आहेत. कादंबरीचा हा दुसरा भाग घटनाप्रधान आहे. पण विलास, वनिता आणि हर्षद यांच्या वेगवेगळ्या समस्यांनी गुंतागुंतीचा होत जातो. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न प्रत्येक जण आपापल्या परिने करताना दिसतो.

तिसऱ्या भागात एकत्र कुटुंब नाही, विभक्त कुटुंब नाही, तर एकट्याने कशाप्रकारे जीवन कंठावे? किती विचार करावा? विचार स्वातंत्र्याला वेळ आणि वेळच याविषयी लेखकाने तीन वेगवेगळ्या कुटुंबांच्या व्यवस्थेतून केलेले मार्मिक भाष्य म्हणजे ''उत्सुकतेने मी झोपलो'' ही कादंबरी आहे.

'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीतील कुटुंब ही श्रीमंत, उच्चशिक्षित आहेत. सिग्रेट पिणे, ड्रिंक्स करणे हे या कादंबरीतील पात्रांचेच स्थायीभावच आहे. या कादंबरीतील कुटुंबामध्ये मोलकरीण, सैंपाकीण असलेल्या दिसतात. कादंबरीतील नवरा-बायको एकमेकांना एकेरी नावाने संबोधतात. कादंबरीत लेखकाने साकार केलेली पात्रे सेक्सविषयी मनमोकळेपणाने भाष्य करतात. सेक्स या विषयालाही कुटुंबव्यवस्थेत महत्वपूर्ण स्थान आहे असे लेखक नमूद करताना दिसतो.

### ३.२.१५. खारीच्या वाटा :

'खारीच्या वाटा' ही ल. म. कडू यांची कादंबरी आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य हे प्रमुख पात्रच एक लहानसा प्राणी म्हणजे 'खार' आहे. खार आणि तिच्या अवतीभवती असणारे, तिचे पालनपोषण करणारे तिचे सवंगडी म्हणजे लेखक आणि लेखकाचा मित्र दिन्या. तसेच लेखक आणि दिन्या या किशोरवयीन मुलांचे सहृदय असणे मनाला भावते. निसर्गरम्य परिपूर्ण अशा खेड्यात लेखक रहात असताना त्याने व त्याच्या मित्राने केलेल्या निरनिराळ्या करामती वाचताना 'रम्य ते बालपण' याचा वाचकास प्रत्यय येतो. 'बालपणाचा काळ सुखाचा' पण या सुखाला, आनंदाला दृष्ट लागावी असे घडले. गावाच्या नदीवर धरण बांधण्याचा फतवा सरकारकडून आला. धरणामुळे खार, दिन्या व लेखक यांची ताटातूट होते आणि वाचकाचे टोळे पाणावतात. लेखकच नव्हे तर सर्व गाव आनंदाच्या झुल्यावर असताना धरणरुपी कुऱ्हाड झुल्याच्या फांदीवर पडली आणि सारे जण एकमेकांपासून दुरावले. कादंबरीचा अंत हा शोकात्म आहे.

एका छोट्याशा गावात इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत शाळा होती. ही शाळा गावातील देवळात बसत होती. लेखक इयत्ता चौथीमध्ये शिकत होता. शाळा स्थापन झाल्यानंतर चौथी

पास होऊन बाहेर पडणाऱ्या पहिल्या तुकडीचा लेखक विद्यार्थी होता. लेखकाच्या वर्गात दिन्या नावाचा मुलगा होता. तो नियमित शाळेत येत नसे. असाच एके दिवशी तो शाळेत आला नव्हता म्हणून गुरूजींनी दिन्याला शाळेत घेऊन येण्याविषयी लेखकाकडे निरोप दिला. गुरूजी म्हणाले, ''उदया त्या दिन्याला घेऊन ये. सारखा रानात उंडरत असतो. चौथीशी गाठ आहे म्हणावं...'(पृ.७) गुरूजींनी दिलेला निरोप दिन्याला सांगण्यासाठी लेखक शाळा सुटल्यानंतर दिन्याच्या घरी जायला निघाला असताना त्याला रस्त्यात दत्ता व काही मुले घोळका करून बसलेले दिसले. तेथे गेल्यावर कळले की दत्त्यासह ती मुले खारीच्या पिलाला डिवचत होती. लेखकाला त्या पिलाची कीव आली. सर्व मुलावर लेखक खेकसला व त्या बिचाऱ्या पिलाला टोपीत ठेऊन घरी आणले. घरी गेल्यावर आईनेही पिलाचे स्वागतच केले. अडोशाला पोत्यावर त्या पिलाला ठेवले. आई व लेखक यांच्यातील चर्चेअंती खारीचे 'लुकी' असे नामकरण झाले. आईने लुकीचे आंथरून, पांघरून, दवापाणी केले. तिला बशीमध्ये पाणी पाजले. नंतर तिच्यावर न सारवलेली टोपली पालथी घातली की जिच्यामुळे टोपलीत हवा खेळती राहील. त्यावर एक वजनदार दगड ठेवला. दगड ठेवण्याचे कारण म्हणजे लेखकाने भांब्या नावाचा बोकाही पाळला होता. कदाचित भांब्या लुकीला उंदीर समजून खाऊन टाकील असे लेखकाला वाटले. लुकीची सर्व व्यवस्था करून लेखक झोपला. सकाळी लुकीच्या काळजीने लवकर उठला. लुकी जिंवत आहे हे पाहून लेखकाला हायसं वाटलं. त्यानंतर आई लुकीची लहान मुलाप्रमाणे खाण्यापिण्याची काळजी घेऊ लागली. लेखक आणि दिन्याही लुकीची देखभाल करीत होते. सर्वांच्या प्रयत्नाला यश आलं आणि लुकीच्या तब्बेतीत सुधारणा झाली. तिचे रूप पालटले. हळूहळू ती रांगूही लागली. लुकीसाठी दिन्या लेखकाच्या घरी येत होता. दिन्याच्या बुद्धीचातुर्याने त्याने लुकीला हातावर चढवण्यास मदत केली. त्याने प्रथम स्वतःच्या तळहातावर भात ठेवला पण लुकीने प्रतिसाद दिला नाही, मग दिन्याने लेखकाच्या तळहातावर भात ठेवला. त्यानंतर लुकीने थोडी शीतं खाल्ली. नंतर कोपराच्या खळग्यात भाताची शीतं ठेवली. लुकी तोल सावरत कोपरापर्यंत आली. त्यानंतर दुसऱ्याही दिवशी हेच केलं. प्रथम ती तळहातावर आली, तिथे भात नव्हता, मग ती सरळ कोपरापर्यंत आली. तिथे मात्र भात ठेवला होता तो तिने खाल्ला. तिची भूक भागली नव्हती, मग दिन्याने भात मानेवर ठेवला. लुकी काहीशी गडबडली. अंग सावरून खळग्यात बसली. पकड घट्ट करून मजल दरमजल करीत कोपरापासून मानेपर्यंत पोहोचली. बराच भात तिने खाल्ला. नंतर दिन्याने खोडकरपणा केला. तळहातावर भातच ठेवला

नाही. लुकी संतापली. तिथून रागाने निघून गेली. त्यानंतर फक्त आईने बशीत ठेवलेला भातच लुकी खात असे. या कृत्यामुळे दिन्याला मात्र अपराध्यासारखे झाले. हा प्रसंग त्याच्या जिव्हारी लागला. दिन्याने त्यावर उपाय शोधला. त्याच्या आईने केलेल्या कापण्या आणल्या. त्या खळग्यात व नंतर खांद्यावर ठेवली. कदाचित आधी घडलेल्या घटनेचा लुकीला विसर पडला असावा. तिने क्रमाक्रमाने एकेक कापणी खाल्ली. त्यानंतर दिन्याच्या प्रयत्नानेच लुकी लेखकाच्या उजव्या हातावर चढून मानेवरून डाव्या हातावर येत होती. डाव्या बाजूला आईने मांडलेला भात खात होती.

अशा पद्धतीने लुकीच्या खेळाच्या कक्षा रुंदावत गेल्या. सात–आठ महिन्यात लुकी घराच्या कानाकोपऱ्यातून हिंडून आली. ती घरातल्या सर्व माणसांच्या, पाळलेल्या प्राण्यांच्या तसेच  लेखकाच्या मागे पुढे करीत असे. चिंचेच्या झाडावर चढून आपल्या मित्र मैत्रिणींना साद घालायची. मैत्रिणींकडून प्रतिसादही मिळत असे. चिंचेचं झाड एवढचं तिचं विश्व मर्यादित न राहता बांबुच्या बेटात, बेलाच्या झाडाच्या शेंड्यावर, तिथून जांभळीवर, आंबा, पिपरण असा सारा परिसर तिने मनसोक्तपणे हिंडायला सुरुवात केली. सगळं हिंडून लेखकाची शाळेत जायची वेळ झाली की घरात येऊन घरच्या पंगतीला जेवायला बसत होती. लेखकाच्या घराच्या समोरील चिंचेच्या बुंध्याजवळ एक मोठा दगडी कुंडा होता. त्यात कोंबड्यांसाठी पाणी भरले जात होते. ती लहान असताना कुंडावर अनेक पक्षी व कीटक पाणी प्यायला येत होते, पण ती थोडी मोठी झाल्यावर तिच्या मनामध्ये ही भावना निर्माण झाली की या कुंडावर फक्त माझा आणि कोंबड्यांचाच हक्क आहे. तिचं पाणी पिऊन होईपर्यंत पाण्याजवळ येण्याची कोणाचीही टाप नव्हती. 'मोठा दरारा होता तिचा!'(पृ.४३) पण एक दिवस एक दयाळ पक्षी पाणवठ्यावर आला व पाणी पिऊ लागला लुकीने खूप आकांडतांडव केले पण दयाळ पक्ष्याने मात्र त्याकडे लक्षच दिले नाही. तो पक्षी पाणी पिऊन निघून गेला. त्यानंतर दयाळ पक्षाचे पाहून इतर पक्ष्यांमध्ये ही धारिष्ट्य आले, त्यांनीही तेथे पाणी पिण्याचा आनंद लुटला. सरडे, सापसुरळ्या शिवाय माश्या, मुंग्या एकच झुंबड उडू लागली. त्या गणगोतात लुकीही सामील झाली. 'कुणालाच कुणाचं भय उरलं नाही.'(पृ.४५)

दिन्याला व लेखकाला नदीवर पोहायला जायचे होते. पण आईने परवानगी दिली नाही पण सकाळी बाबांनी पाण्यात घायपात भिजवायला सांगितले होते. पडत्या फळाची आज्ञा असे समजून दिन्या व लेखक नदीवर गेले. त्यांनी लुकीला बरोबर घेतले. दिन्या व लेखक घायपात

भिजत घालत होते. त्यावेळी लुकी जांभळाच्या बेटात घुसली व जांभळे खात बसली. असा त्या तिघांचा दिनक्रम सुरु झाला.

दिन्याच्या चाणाक्षपणाचा प्रत्यय वेळोवेळी कादंबरीमध्ये आला आहे. त्याच्या मते सर्वात आधी पाडाचा आंबा खार खाते. तिने, अर्धवट खाल्लेले आंबे झाडावर लटकताना दिसले की 'आंबा पाडाला लागला' असे कळते. या गोष्टीचा फायदा करून घ्यायचा असे दिन्याने व लेखकाने ठरविले. ठरविलेला निर्णय सत्यात उतरविण्यासाठी दुसऱ्या दिवशी त्या तिघांनी आंबेमाळ गाठला. आबेमाळावर शेंदऱ्या, खोबऱ्या, खापऱ्या, पुंगशा, गाडग्या असे वेगवेगळ्या प्रकारचे आंबे होते. लुकीला गाडग्या आंब्यावर चढण्याचा इशारा केली लुकी झाडावर चढली. कैऱ्यांचा एकेक घोस तपासणी सुरु झाली. पण त्या झाडावर एकही पाड सापडला नाही. नंतर खापऱ्या आंब्यावर तिला पाड सापडला. तो तिने आनंदाने खाल्ला. शेंदऱ्या आंब्यावर चढली. तिला ज्या फांदीवर पाड दिसले ती त्या फांदीवर थांबून राहिली. मान उंचाऊन तिने लेखकाकडे पाहिले म्हणजे ती संकेत करीत होती. तो दिन्याच्या लक्षात आला. दिन्या ओरडला, ''ती तोड म्हणतेय.''(पृ.६१) शेवटी ती बुंध्याला आली म्हणजे आता या झाडावरचे पाड संपले असा तिने संकेत दिला आणि लुकीच्या मदतीमुळे दिन्या व लेखकाला या वर्षाची आंबेसराई मजेत गेली होती.

**३.२.१६. फेसाटी :**

'फेसाटी' ही कादंबरी नवनाथ गोरे यांनी ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर लिहिलेली आहे. या कादंबरीला सन २०१८ चा 'युवा साहित्य अकादमी' पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'फेसाटी' या कादंबरीमधून समाजातील विविध स्तर टिपण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. समाजात विविध स्तर असतात त्यात द्रारिद्रयाने पिचलेला, अल्पशिक्षीत, मोल मजूरी करणाऱ्या समाजाची व्यथा ही इतरांपर्यंत पोहोचत नाही तो समाज गरिबीतच जगत असतो. अशा समाजात जन्मलेल्या, लहानपणापासून रोजचा संघर्ष, उपासमार अनुभवलेल्या व अशाही परिस्थितीत आई वडिलांच्या तळमळीमुळे शिक्षणाची वाट धरलेल्या नवनाथ गोरे यांनी त्यांचे जिणे 'फेसाटी' या कादंबरीत मांडले आहे. सख्खी व चुलतभावंडे, आईवडील, चुलता चुलती व आजी अशी माणसे असलेल्या घरात लेखक शेंडेफळ आहे म्हणूनच ते लाडाचे होते. आईवडील ज्यांना काका काकू म्हणत त्यांचा व मोठ्या भावंडांचा नवनाथवर खूप जीव होता. ताईचे लग्न व काही दिवसांनी तिच्या मृत्यूचे लेखकाला खूप दुःख झाले. गरीब असल्याने भाकरी बरोबर कालवन

नसते हे त्याला काकूने लहानपणी सांगितल्याने त्यांच्यात जुळवून घेण्याची वृत्ती निर्माण झाली. शिकण्याचा नाथाला कंटाळा येत असे, पण आपण शिकून पोलीस व्हावे, यासाठी काकांनी गाय विकली, हे लक्षात घेऊन शिकण्यासाठी तो प्रवृत्त होत असे. त्याचा शिक्षणापर्यंतचा प्रवास व त्या काळातील अनुभव 'फेसाटी' मधून ओघवत्या भाषेत मांडले आहेत.

'फेसाटी' ह्या कादंबरीत नवनाथ गोरे यांनी आपल्या जीवनाची झालेली हेळसांड, पोटासाठी चाललेला संघर्ष, कर्जबाजारी शेतकऱ्यांची व्यथा मांडलेली आहे. लेखकाचे व त्याच्या कुटुंबाचे जीवन म्हणजे फक्त संकटांची मालिकाच आहे. आयुष्यभर या कुटुंबाने फक्त संकटांचा सामना केलेला आहे. सुखाचा एकही क्षण त्यांना लाभला नाही. अनेक अडथळे पार करत लेखकाने एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. लेखकाचा कष्टप्रद जीवन प्रवास त्याने आपल्या ह्या कादंबरीत मांडला आहे. लेखक नवनाथ गोरे आपल्या फेसाटीविषयी म्हणतात, ''मी दुष्काळी भागातील दाहक जीवन साहित्यातून मांडले. त्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेत मानाचा साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहिर झाला, याचा खूपच आनंद आहे. दुष्काळाशी झुंजतांना लेखनीनेच मला बळ दिले. साहित्य अकादमीसारख्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेने 'फेसाटी' कादंबरीची दखल घेतल्याने मनस्वी आनंद होत आहे. या निमित्ताने खेडयापाडयातील, दुष्काळी भागाचे आणि शेतकरी वर्गाचे जीवन साहित्यातून मांडता आले. जत तालुक्यातील दुष्काळी भागाच्या व्यथा, वेदना मी मांडल्या. जे अनुभवले, भोगले तेच मांडले.''[२४]

लेखकाच्या वडिलांचे नाव सोपान आहे. लेखक व त्याची भावंडे वडिलांना काका म्हणत आणि आईला काकू म्हणत होते. आण्णाची साथ नसतानाही काकाने शेत घेतले. त्यासाठी मेंढरं विकली. काकूचे सोने मोडून बैल घेतला. मामाचा एक बैल आणला व पेरणी केली. उगवतीला आलेल्या रानात पावसाने थैमान घातले. घरात जोंधळ्याचा एक दाणा पण शिल्लक नव्हता. उसन पासन करुन जोंधळे आणून त्याच्या कण्या केल्या व सगळ्यांना वाढल्या. त्यातच काकूने दोन जुळ्या पोरींना जन्म दिला. म्हणजे त्याअगोदर थोरला मुलगा पण तो पांगळा होता. त्यानंतर हिराक्का व तिच्या पाठीवर दोन जुळ्या मुली. त्यांचे नाव नंदाक्का व सुंदाक्का ठेवले होते. दादाला चौथी पास झाल्यावर पाचवीला बोर्डिंगमध्ये ठेवले होते. सुमाताई, इंदाताई पण नाथापेक्षा मोठ्या होत्या. लेखक त्याच्या पेक्षा दोन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या इंदाताई बरोबर शाळेत जाऊ लागला. इंदाताई लेखकाला फार जपायची. अंगणवाडीत दोघेही जात होते. नाथा पाच वर्षाचा झाला तेव्हा पहिलीत नाव घालण्यासाठी दादा शाळेत घेऊन गेला पण कोळी

गुरुजींनी लहान आहे असे म्हणून नकार दिला. इंदाताईचे नाव पहिलीत घेतले. काकू म्हणाली, ''येवढं वरिसं राहू द्या शाळंला जातयं नाय म्हणतूया पुढल्या वरसी घालूया.''(पृ.२४) आई शेताला जात होती तिच्याबरोबर कामाच्या ठिकाणी खेळत बसण्यात नाथाचे एक वर्ष गेले.

नाथाचा पहिलीच्या वर्गातील पहिलाच दिवस होता. पूर्ण नाव सांगितले नाही म्हणून गुरुजींनी नाथाला मारले. इतके मारले की, नाथाची चड्डीच ओली झाली. गुरुजींनी इंदाताईला नाथाला घरी घेऊन जाण्यास सांगितले. नाथाने शाळेत न जाण्याचा चंग बांधला पण आपली आवडती गाय शिंगरीला काकाने विकून नाथाला पोलिसांचे कपडे घेतले तेव्हा नाथाने शाळेत जाण्याचा निर्णय घेतला. नाथा म्हणाला, ''काका, म्या उद्यापासनं शाळला जातू.''(पृ.२९) त्यानंतर थोडी शाळेची गोडी लागली. पहिलीची परीक्षा न देताच नाथा पास झाला, दुसरीच्या वर्गात गेला त्यावेळी काका शेटजीच्या मळ्यात चाकरीला होता. सगळी शेती चुलत्याच्या नावावर होती. चुलता काकाच्या नावावर शेत करायला तयार नव्हता. त्यामुळे काकू व वहिणी मिळून सगळ्या मोलमजुरीचं करत होत्या. कामाच्या पैशातून खायला प्यायला सुद्धा नीट मिळत नव्हते. अतिशय हालाकीच्या परिस्थितीत जगत होते. त्यातच पुन्हा नाथाच्या पाठीवर एक मुलगी झाली. तिचे नाव नकूसा. पण ही नकूसा खूप ताप आल्याने देवाघरी गेली.

काका नऊ एकराचा मालक होता. पण चुलता काकाच्या नावावर शेत करीत नव्हता. वास्तविक पाहता दोघे भाऊ एकत्र असताना काकानेच जमीन घेतली होती. दोघांच्या नावावर जमीन करण्याचा खर्च जास्त लागत होता. म्हणून काकाने स्वतःच्या भावाच्या नावावर सर्व शेती केली. भावाने काकांना फक्त दोन एकर जमीन दिली. चुलता म्हणायचा, ''तुला कशाला नऊ एकर जमीन पाहिजी? तेवढीच दोन एकर घीन करन खाकी.''(पृ.३४) दोघांमध्ये यावरुन तंटा झाला. काकाने पोलीस पाटील व गावातील प्रतिष्ठित मंडळींसमोर गाऱ्हाणे मांडले पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. काकाने चुलत्याच्या पोराच्या डोक्यात खोरं घातले. चुलत्याने पोलिसात वर्दी दिली. पोलिसांनी काकाला अटक केली. आंदामामानं जमीन देऊन काकाला सोडवलं. शेती नसल्याने काकाच्या आयुष्याला कायमची चाकरी करावी लागली होती. त्या नंतर दोन दिवसांनी शिमग्याचा सण होता. शेजारीपाजारी सर्वजण पोळ्या खात होते, पण नाथाच्या कुटुंबाच्या आयुष्याचा शिमगा चालू होता. बारा महिन्यातला कोणताही सण नाथाच्या कुटुंबाला साजरा करता आला नाही. त्यातच थोरली हिराक्का लग्नाला आली होती. तिच्या लग्नाचा घोर काकूला लागून राहिला होता. या सगळ्या संकटात दादाची म्हणजे नाथाच्या

मोठ्या भावाची मात्र शाळा चालू होती. तो पांगळा आहे, शिकून त्याला नोकरी मिळेल व घराची गरिबी हटेल अशी सर्वांची अपेक्षा होती. हिराक्काला पाहुणे पाहायला येत होते. हिराक्का पाहुण्यांना पसंत पडत होती पण हुंड्यासाठी लग्न मोडत होते. शेवटी काकूचा थोरला भाऊ म्हणजे नाथाचा थोरला मामा नामदेव याने त्याचा थोरला मुलगा धुळाप्पा याच्याशी हिरक्काचे लग्न ठरविले. एकतोळा सोने, घड्याळ, रेडिओ अन दोन आहेर, भांडीकुंडी, कापडं येवढं ठरलं. कर्जपाणी काढून लग्न करुन दिले पण सुखाचा हा क्षण हिराक्काच्या आयुष्यात क्षणिक ठरला. वटभरणाला सोनं आणले नाही. म्हणून मामा-मामीने हिराक्काला माहेरी पाठविले. लग्नानंतर चार-पाच दिवसांनी काका फार आजारी पडला. त्याच्या दवाखान्यासाठी बारा हजार खर्च झाले. दादाने सात हजाराची जमवाजमव केली शेवटी काकूने डोरलं गहाण ठेवून पैसे आणले व दवाखान्याचा खर्च भागविला. हिराक्काला मामा-मामी सासूरवास करीत होते. दुसऱ्याच दिवशी मामीने हिराक्काला विहिरीत ढकलून दिले. त्यातच तिचा अंत झाला. नाथा व त्यांचे कुटुंब हिराक्काच्या आठवणीने व्याकूळ होत होते.

नाथा तिसरीतून चौथीत गेला. इंदाताई पाचवीत गेली पण नाथासाठी तिला पुन्हा चौथीतच बसविले. सातपुते गुरुजींनी पाढे येत नाहीत म्हणून खूप मारले. त्यानंतर नाथा शाळेत जातच नव्हता. अखेरीस तो चौथीत नापास झाला. कारण नाथा परीक्षेला गेलाच नाही. त्यावर्षीचा बेंदराचा सण बिना पोळ्यांचाच गेला. नंदाक्का मोठी झाली होती. तिला पाहुणे पाहायला येत होते. पण हुंड्यासाठी लग्न मोडत होते. अखेरीस पाच हजार हुंडा आणि एक तोळा सोनं देऊन नंदाक्काचे लग्न ठरविले. काका-काकू वरील कर्जाचा डोंगर वाढतच होता. लेखकाचे चौथीचे वर्ष होते. याही वेळेला नाथा परीक्षेला गेला नाही, त्यामुळे पुन्हा चौथीतच राहिला. दादाने म्हणजे नाथाच्या मोठ्या भावाने सुशिक्षित बेरोजगाराचे प्रकरण केले. उमदीत गाळा भाड्याने घेतला, किराणा मालाचे दुकान सुरु केले पण धंदा चालला नाही. दुकान मोडकळीला आले. उमदीतून दुकान मानेवस्तीवर आणले. गिऱ्हाईक येत होती, पण उधारीमुळे धंदा बुडाला. दुकानाचे हप्ते तटले होते. त्याच परिस्थितीत मामाने सुंदाक्काचे लग्न ठरविले. तीन हजार हुंडा, अर्धा तोळ सोनं, संसार सेट. त्या लग्नासाठी आठ हजार कर्ज काढले. आता सुमाताईच्या लग्नाचा प्रश्न ऐरणीवर होता. पण सुमाताई नशीबवान होती असे म्हणावे लागेल. तिचे आंद्यामामाने स्वतःच्या मुलाशी लग्न ठरविले. सुमाताई नाथाच्या घरातून दहाफुटाच्या अंतरावर असलेल्या मामाच्या घरी नांदायला गेली. काकू नाथाला पुन्हा शाळेत जाण्याचा आग्रह

करीत होती. मानेवस्तीवरच्या शाळेत मी जाणार नाही तर मर्चंडीवस्तीवर शाळेत जाईल असे सांगितल्यावर नाथाला मर्चंडीवस्तीवरच्या शाळेत घातले. चौथीत नाथा आणि मलकारी बाबा दोघेच मोठे होते. गुरुजी नाथाला दुसरीच्या मुलांकडून पाढे म्हणून घ्यायला सांगत होते. त्यामुळे नाथामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला पण तिथेही नाथाने गुरुजींचा मार खाल्ला. तो बरेच दिवस शाळेत गेला नाही पण परीक्षेला मात्र गेला. अखेरीस नाथाची चौथी पार पडली होती.

दादाचं दुकान मानेवस्तीवरनं वळसंगेवस्तीला आणलं. तेथे दादाने दारूही विकली. पण तेथेही उधारीमुळे धंदा बुडाला. त्यातच दुकानात चोरीही झाली. कर्जाने घर बुडत होते. सारे कुटुंब अन्नाला मोताद झाले होते. उपासमारीची वेळ आली होती. नाथा आता पाचवीत गेला होता. घरापासून चार-पाच मैल लांब उमदीत शाळेला जायचे होते. महिनाभर शाळा सुरु झाली. तरी नाथा शाळेत गेला नव्हता. महिन्याभरानंतर तो इंदूताई बरोबर शाळेत जाऊ लागला. कारण इंदूताई त्याच शाळेत होती. शाळेत सर्वांना नवीन कपडे होते. नाथाला ढिगाळच्या चड्डीची लाज वाटली. चार-पाच महिन्यानंतर नाथाला कपडे मिळाले. तेव्हा तो शाळेत जाऊ लागला. पाचवीचे वर्ष संपले. घराचे दारिद्रय काही संपत नव्हते. संकटात भर म्हणून की काय दावणीच्या सगळ्या गुरांना गोचीड झाली. नाईलाजाने सर्व गुरांना विकावे लागले. दारात फक्त एकच गायी होती. गोचडं झाली तेंव्हा काकू म्हणाली, ''दारातील जितराब सगळी गिली, तवा गोचडली गेली.''(पृ.७८) नाथाचे कुटुंब नशिबी आलेले भोग भोगीत होते.

नाथा सहावीच्या वर्गात गेला. इयत्ता वाढत होत्या पण मार काही चुकत नव्हता. या वर्षी शिवार हिरवेगार झाले होते. काकूने काकाला गाय घेण्याविषयी सुचविले. अगोदरच देणे राहिले होते. गाय घ्यायला पैसे कुठून आणायचे असा काकाला प्रश्न पडला होता. कोंड्या पारध्याकडून दहा टक्के व्याजाने सहा हजार घेतले व बैल विकून मिळालेले सहा हजार अशी बारा हजारांची गाय घेतली. त्यावर्षी जोंधळ्याची अकरा पोती झाली. खूप वर्षातून काकू जात्यावरचं गाणं म्हणून दळत होती. पण हा सुखाचा क्षणही फार काळ टिकला नाही. अवकाळी आलेल्या पावसाने व झाकायला काहीच नसल्यामुळे जोंधळे भिजलं. जुंधळ्याचा कडबा विकून जे पैसे मिळाले त्यात फक्त व्याज मिटवले मुद्दल तसेच राहिले होते.

सातवीच्या वर्गात असतानाचा एक प्रसंग नाथाने सांगितला आहे तो असा, चुकून एका मुलीच्या अंगार नाथाकडून शाई शिंपडली गेली. 'पोरगी लागली रडायला थई थईऽऽ... नाचायला.'(पृ.८६) वाघमारे सरांनी हातावर छड्या मारल्या, दुसऱ्या एका सरांनी पण छड्या

मारल्या. नाथाने पुन्हा शाळेत न जाण्याचा निर्णय घेतला. नाथाने निर्णय घेतला तो असा,'म्या ठरवलं आतापासनं शाळा बंद शाळच्या आयला पांडूरंग लावला.'(पृ.८७) त्यानंतर काकू नाथाला ऊस खुरपायला घेऊन जात होती. ऊस मालकाच्या गुरांच खाने, पिणे, शेण काढणे सगळ नाथा करीत होता. त्यातच नाथा आजारी पडला. कामावर जाणं बंद केलं. दिवसभर मित्रांबरोबर फिरणे, दगड्याच्या संगतीनं गुटखा खाण्याचे व्यसन लागले.

नाथाला वाटू लागले, 'माझा जल्म काय मार खायला झाला व्हय. हिथनं पुढं मार खायचा नाय, शाळंलाबी जायाचं नाय, आपल रानात काकू बरं खुरपायला गेल्यालं लई बरं रे बाबा'(पृ.९२) असे वाटण्याचे कारण म्हणजे नाथाला आठवीतही पाढे येत नाहीत म्हणून सरांचा मार खाल्ला. काकूने शाळेत जाण्याविषयी फार समजावले. दादाने सरांना सांगून नाथाला शाळेत पाठवले. पुन्हा गणिताच्या सरांनी मारले नाही. त्याला शाळेची आवड निर्माण झाली. बापू हा नाथाचा मित्र बोर्डिंगमध्ये राहत होता. बापूच्या आग्रहामुळे नाथा पण बोर्डिंगमध्ये राहू लागला. नाथा शनिवार, रविवार घरी येऊन आईला मदत करीत होता. घरातले सगळे मिळून काम करीत होते, पण तरीही कर्ज फिटत नव्हते. कोंड्या पारध्याचे अठ्ठावीस हजार रुपये झाले होते. कोंड्या पारधी आला की त्याच्याकडून दोन महिन्याचा वायदा मागून घ्यायचा त्याला कोंबड्या, गाडीच्या तेलाचे पैसे द्यावे लागायचे, मजुरीचे पैसे तेला मिठावरच खर्च होत होते.

नाथाला कामीन झाली होती. कामीन डागण्याची कला त्याच्या मधला मामा तुकारामला येत होती. काकू नाथाला घेऊन मामाकडे गेली पण मामा मामीने आईचा अपमान केला. कामीन डागण्यास नकार दिला. काकूने मामाला शिव्या दिल्या. काकूने नाथाला बरं वाटावं म्हणून सगळ्या देवांना नवस केला. 'गारणं देवानं आयकलं हुंत'(पृ.९८) काकू मुलाला बरं करण्यासाठी श्रद्धेबरोबर अंधश्रद्धाळूपणाही करीत होती. त्यातच आठवीचं वर्ष संपलं. नववी आणि दहावी संपल्यावर शिपायाची का होईना नोकरी मिळेल अशी अपेक्षा वाटत होती. नववीच्या वर्षातील एक प्रसंग लेखकाने सांगितला. बोर्डिंगमध्ये राहत असताना गुपचूप मासे करुन खाल्ले पण त्यांनतर नाथा खूप आजारी पडला, अंग सुजलं, उलट्या झाल्या. बापूनं तारळेकरांच्या दवाखान्यात नेले. डॉक्टरने उपचार केले. त्याला काका काकूने घरी नेले.

कोंड्या पारधी पैसे नेण्यासाठी आला. हाता पाया पडून पुन्हा एक महिन्याची मुदत मागून घेतली. घरात खायला फुटका दाणा पण नव्हता. नाथाचे कुटुंब हालाकीत जीवन जगत होते. दारापुढे असलेली एक गाय दोन हजार रुपयांना विकली. लेखक पुन्हा शाळेत जाऊ

लागला. थोड्याच दिवसात पुन्हा बोर्डिंगमध्ये राहू लागला. शिवशरण नावाच्या मुलाच्या संगतीने तंबाखू खाण्याचे व्यसन नाथाला लागले होते. परीक्षा चालू असताना डोके दुखीचा त्रासही सुरु झाला होता. परीक्षा संपल्यानंतर दहावीचे तासही सुरु झाले होते. पण नाथा तासाला गेला नाही. तो काकूबरोबर कामाला जाऊ लागला. दादा व काका पैशासाठी पाहुण्याच्या दारी जात होते पण कोणीही मदत केली नाही. कोंड्या पारध्याला दिलेला वायदा जवळ आल्यामुळे जमीन गहान ठेवून पैसे जमविण्याचे ठरविले. 'शांताच्या पाटलाला साडेतीन एकर जमीन लिहून दिली. तीन रुपये व्याजानं. पस्तीस हजार घेतले.'(पृ.१०२) त्यातून पारध्याचे कर्ज भागविले. दहावीच्या तासाला जायाला सुरुवात केली पण दोन टायमाला अन्न मिळाले पाहिजे या विचाराने रोजगार हमीच्या कामावर काका-काकू बरोबर जायला सुरुवात केली. काकूच्या हाताला कुत्र चावलं होतं तरीसुद्धा काकू रक्ताळलेल्या हाताने खड्डे खणायला मदत करीत होती. नाथाचे अंगही दुखत होते. नाथाचा विजय नावाचा मित्र घरी आला त्याने सांगलीला येण्याविषयी विचार मांडला. काकूच्या विरोधाला न जुमानता नाथाने घर सोडले व सांगली गाठली. रात्र स्टँडवरच अन्नपाण्याविना काढली. रस्त्यावर पडलेल्या केळ्याच्या साली त्याने खाल्ल्या. दुसऱ्या दिवशी विजयशी फोनवर संवाद साधला. विजयने त्याला त्याच्या बहिणीच्या घरी नेले. दोघेही नाथाला काही तरी काम मिळावे म्हणून फिरले. शेवटी त्याला एका बिअरबारमध्ये झाडण्यापुसण्याचे काम मिळाले. महिना बाराशे रुपये पगार ठरला. चोवीस दिवस काम केले. नऊशे रुपये घेतले. काकूला साडी घेण्यास गेलेल्या नाथाला तेवढ्या पैशात साडी ही मिळाली नाही. शेवटी नाथा घरी आला.

दिवसेंदिवस नाथाच्या कुटुंबियांना जास्तच हालाखीत जीवन जगावे लागत होते. 'दिवसभर लोकांच्या रानांत राबायचं पोटापुरतं आणायचं दररोज येक देणंकरी दाराम्होरं बसत हुता'(पृ.११२) अशी अवस्था झाली होती. त्यातच नाथाला कामीन झाली होती. तो कामीन डागायला जात नव्हता. शेवटी मरणाच्या भितीने नाथाने डागून घेतलं. दहावीच वर्ष सुरु होऊन पंधरा दिवस झाले तरी नाथा शाळेत गेला नाही. दादाने शाळेत जाण्याविषयी खूप संमजावलं. काकूने तोंडाच्या कण्याकरुन सांगितलं. शेवटी बापू म्हणजे नाथाचा मित्र त्याने ही समजावल तेव्हा नाथा पुन्हा शाळेत जाऊ लागला. नाथा आणि त्याला शिक्षकाने मारणे हे जणू काही अटळ घटीत होते. गणिताच्या बिराजदार सरांनी मारलं. शिव्या दिल्या. गणिताच्या तासाला बसण्यास सरांनी परवानगी नाकारली. एक महिनाभर शिंदे सरांनी बोर्डिंगच्या मुलांचा गणिताचा

तास घेतला, पण हेडमास्तरला कळल्यावर तास बंद करायला लावला. कशीबशी सहामाई परीक्षा उरकली. घरची आर्थिक परिस्थिती ताणतणावाचीच होती. कोंड्या पारध्याचं कर्ज मिटवलं पण शांताप्पा पाटलाच देणं वाढत चाललं होतं.

पुढे लेखकाने इतर घटनांचाही मागोवा घेतला आहे. घराच्या मागे राहणाऱ्या एका मुलीचे तिच्या मामाबरोबर लग्न लावून दिले पण तिला नवरा पसंत नव्हता म्हणून तिने स्वतःला पेटवून घेतले. दवाखान्यात नेण्याअगोदरच तिचा जीव गेला होता. बोर्डिंगमधल्या मनोज नावाच्या मुलाचा प्रेमभंग झाल्यामुळे त्याला दारुचे व्यसन लागले होते. बोर्डिंगमध्ये मुलांना शिव्या देताना शिंदे सरांनी पकडलं. तेव्हा सरांनी अंग सुजेपर्यंत मारले. बोर्डिंगमध्ये असताना एकदा सिगारेट ओढली. पण सरांच्या हाती तो सापडला नाही. म्हणून नाथा मारापासून वाचला. दहावीच्या वार्षिक परीक्षेची फी अडीचशे रुपये असल्याचे सरांनी सांगितले. परीक्षेच्या फी चा घोर नाथाला लागला. शेवटी काकूने कोंबड्या विकल्या व तिनशे रुपये नाथाला दिले. थोड्याच दिवसात नंदाक्का चौथ्या बाळांतपणाला आली होती. तिला पोरगीच झाली होती. नाथाला गणित व इंग्रजी विषय अवघड जात होते. त्या विषयांमध्ये आपण पास होणार नाही याची चिंता त्याला सतावत होती. दोन्ही विषयांची पुस्तके त्याने फाडली आणि फक्त फाडलीच नाही तर जाळली सुद्धा! पुन्हा शाळेला राम राम ठोकला. नेहमीप्रमाणे काकूने समजावले. परीक्षेला पंधरा दिवस राहिले असताना त्याने अभ्यासाला सुरुवात केली. परीक्षा दिली. आनंदाची बाब म्हणजे बोर्डिंगातले सात जण पास झाले होते त्यात नाथा ही पास झाला होता.

दादाने नाथाला समजावल्यानंतर नाथाने उमदीत एम. व्ही. हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये आर्ट्सला प्रवेश घेतला. शांताप्पा पाटलाला जमीन लिहून दिलेल्या कर्जाचा आकडा एक लाख सत्तर हजारापर्यंत गेला होता. त्याची तीन वर्षाची मुदत संपत आली होती. त्यावर्षी पाऊस जास्त पडला तेव्हा ऊस लाऊन कर्ज फेडता येईल. म्हणून सावकाराकडून मुदत वाढवून घेतली. शेतात ऊस लावला पण चार महिन्यांनी ऊस करपून गेला. रानाच्या वाटेवरुन जाणारा प्रत्येक वाटसरु हळहळून म्हणायचा, ''अरं रं! काय वनवास आला बाबा गोऱ्याच्याला घरात येक देई घेईला आलेली पोरगी, येक पांगळ पोरगं, ही एक बारक पोरगं, कामाला जातयानं आई बा, ऊसाला. असला काय संसार बाबा. देव पण असा कसा काय डोळं झाकून बसलाय कुणास ठावं गड्या काय भोग म्हणायचा. बाबा देव जाणं''(पृ.१३२) वाटसरुंनी व्यक्त केलेल्या

भावनेतून नाथाच्या घरची दयनीय अवस्था स्पष्ट होते. नाथाला अकरावीची परीक्षा न देताच सरांनी पास केले होते. तो आता बारावीला गेला होता.

नाथाचा मोठा मामा नामदेव ज्याने हिराक्काला मारले त्याने आंद्या मामाकडे प्रस्ताव मांडला, चार एकर नामदेव मामाच्या नावावर जमीन द्यायची. दोन तीन वर्ष तो जमीन पिकविल व्याजाचे पैसे फेडून घेईल जेव्हा मुद्दल त्याला परत मिळेल तेव्हा तो जमीन नाथाच्या वडिलांच्या नावावर करेल 'माणसाला गरिबी नाक टेकायला लावत्याई ती काय खोटं नाय'(पृ.१३३) नाथाचे बारावीचे वर्ष होते. वार्षिक परीक्षेची नाथाला फार भीती वाटत होती. त्यावर उपाय म्हणून नाथा दारू पिऊन पेपरला गेला. अशाप्रकारे त्याने कशी तरी परीक्षा संपवली. कादंबरीच्या ओघात लेखकाने इतर ही विषयांना स्पर्श केला आहे. नाथाचा मित्र दगड्याचे एका मुलीवर प्रेम होते. तो तिला प्रेमाने मैना म्हणायचा. नाथाला सोबतीला घेऊन तो मैनेला रात्री बारा वाजता भेटायला गेला. त्यांची झालेली फजिती लेखकाने वर्णिलेली आहे.

चुलता व काका यांचे झालेले भांडण त्यामध्ये पोलिसांचे चुलत्याने पैसे देऊन तोंड बंद केले. नाथाच्या कुटुंबाला अन्यायाला सामोरे जावे लागत होते. म्हणजेच लेखकाने समाजातील भ्रष्टाचार कादंबरीच्या माध्यमातून उघड केलेला आहे. नाथा बारावीला इंग्रजी या विषयात नापास झाला. त्यानंतर तो सांगलीला कामधंदा मिळविण्यासाठी गेला 'रत्नत्रय सेल्स' कंपनीचा माल पोहचविण्याचे काम केले. एक दिवस कापड पेठेत फिरायला गेला असताना कापड दुकानात असलेल्या पुतळ्यांना पोरी समजून त्यांच्याकडे पाहात राहिला. त्यातुन विनोद निर्मिती झाली विनोद निर्मितीचा तुरळक प्रसंग लिहून कादंबरीला वेदनेपासून थोडेसे दूर नेण्याचा प्रयत्न लेखक करतो. इंग्रजी विषयात नापास झाल्याचे दुःख नाथाला झाले नाही. उलट आनंदच झाला. कारण काकू त्याचे लग्न करुन देण्याचा विचार करु लागली होती. नाथाची बहीण सुमाताई या सुमाताईची मुलगी शांता हिच्याशी लग्न लाऊन देण्याचा प्रस्ताव मांडला होता. बारक्यापणीच सुमाताई म्हणायची, 'काकू माझी शांती नव्याला दिती बग'(पृ.१४८) नव्या म्हणजे नवनाथ, म्हणजेच लेखकाला बहिणी नव्या म्हणत होत्या. पण आता मात्र सुमाताईचे विचार बदलेले होते. ती तिची मुलगी शांती हिला नाथाला द्यायला तयार नव्हती. पोटच्या पोरीच्या वागण्याने काकू दुखावली गेली. तिने नाथाला शाळा शिकविण्याविषयी कळकळीने विणवनी केली. नाथाचे ते वर्ष वायाच गेले त्याने त्या वर्षी मजुरीने काम केले. टोणेचा बापू आणि विष्णू हे बी.ए. ला होते. त्यांनी नाथाला इंग्रजी विषयाची पुन्हा परीक्षा देण्याविषयी सल्ला दिला. जतला इंग्रजीचे तास

घेतात तेव्हा तू जतला चल. तिथं इंग्रजी विषयाचा तास लावला म्हणजे पास होशील. मित्राच्या समजावण्याने त्याने जतला जाण्याचा निर्णय घेतला. नाथा जतला गेला तेथे सचिन क्लासमध्ये बंडगर सर इंग्रजी शिकवत होते. त्यांच्या शिकवणीने त्याला इंग्रजी विषयी थोडी गोडी लागली होती. नाथा मित्रांच्या खोलीत चोरून राहत होता. दिवसभर ओढ्याच्या कडेला असलेल्या झाडाखाली तो अभ्यास करीत होता. तेथे त्याची जया नावाच्या मुलीशी ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. नाथा व जया एकमेकांच्या प्रेमात पडले. ते दोघे जण रोज एकमेकांना भेटू लागले. पण थोड्याच दिवसात जयाच्या घरच्यांनी तिचे लग्न ठरविले. व नाथाच्या आनंदावर विरजण पडले. दादाने सुशिक्षित बेरोजगाराचे प्रकरण केले होते पण साहेब सात हजार घेतल्याशिवाय ते प्रकरण मंजुर करीत नव्हते. आनंदाची गोष्ट म्हणजे इंग्रजीत छत्तीस मार्क पडले व नाथा इंग्रजी विषयात पास झाला. नाथाने बी.ए. वर्गात प्रवेश घेतला. नेहमीप्रमाणे नाथा कॉलेजला जात होता. चुलत्याने व नामदेव मामाने नाथाची शेती हडप केली. काका-काकुने खूप हळहळ केली. नाथा कॉलेजच्या एन.एस.एस.च्या कॅम्पला गेला. पहिल्या वर्षाची परीक्षा झाली पेपर चांगले गेले होते. नाथा पास ही झाला.

नाथा कॉलेजला जाऊन मजुरीला पण जात होता. पहिल्या वर्षाची फी भरायची राहिली होती. रणजीत नावाच्या मित्राने हजार रुपये दिले व फॉर्म भरला. इंग्रजी शिकविणाऱ्या श्रीकांत काटे सरांनी मदतीचा हात दिला. शिकण्याची गोडी निर्माण झाली. शेतात मोलमजुरी करुन शिक्षण चालू होते. पण संकटे पाठ सोडत नव्हती. नाथाचा चुलता त्याच्या कुटुंबाच्या वाईटावर होता. तो नाथाच्या कुटुंबावर करणी करीत होता. असे काकूला वाटत होते. संकटात संकट म्हणजे कोणीतरी त्यांचे घर पेटवले त्यावेळी पेटीत दादाचे प्रकरण मंजूर झाल्याचे पैसे होते. त्या आगीत तेही भस्म झाले. ''पोटाची आग ईजवूपतूर सगळ्या संसाराचा कोळसा झाला हुता,'' (पृ.१७८) घराचा पंचनामा केला. आठ दिवसाने पाच हजार रुपये मिळाले. त्यातुन निवाऱ्याची सोय केली. साऱ्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली. सात-आठ महिने उघड्यावर राहिले. जतच्या अनिलराजे डफळे यांनी चार पत्रे घेऊन दिले. माजी आमदार उमाजीराव सनमडीकर यांनीही सहकार्य केले. काडीकाडी जमवून काका-काकुंनी पुन्हा संसार उभा केला. तरीही चिंता काही संपत नव्हती. इंदाताई लग्नाचे वय होऊ गेल्यामुळे थोराड दिसत होती. त्यामुळे तिचे लग्न जमत नव्हते. शेवटी पाच हजार हुंडा आणि एक तोळा सोनं आणि संसारसट्ठ देण्याचे ठरवून लग्न जमले.

महाविद्यालयीन शिक्षणात मुला-मुलींच्या प्रेमाचा लेखकाने कथानकात समावेश केला आहे. नाथाचा मित्र रमेश व दिव्या यांचा संवाद लेखकाने लिहिलेला आहे. अशा काही प्रसंगाचा उल्लेख करुन लेखक पुन्हा स्वजीवनाकडे वळताना दिसतो. काकूची हाक आली, ''अरं बाळा, पळपळ घात झालाय.''(पृ.१८५) कोणीतरी कापसाच्या शेतावरील बांधाला आग लावली. बांधावरील झाडं निम्मी अर्धी जळाली होती. काकू आणि नाथानी रात्रभर पाणी ओतले. लेखक म्हणाला, 'इस्तवावर खेळत हुतो.'(पृ.१८६) कापसाला पाणी पाजणारी पाईपलाईन आगीत जळून खाक झाल्यामुळे कापूस जगवण्याची आशा संपली 'कापसानं पाक टांग मारली.'(पृ.१८७) त्यातच कर्जाचा डोंगर डोक्यावर होताच. नाथा कोणाच्याही मळ्यात कामाला जात होता. त्यात आनंदाची गोष्ट म्हणजे नाथाचा तिसऱ्या वर्षाचा निकाल लागला नाथा पास झाला होता. शिवानंद पाटील सरांनी, विद्यापीठात एम.ए. करण्याचा, एम.पी.एसी. करण्याचा सल्ला दिला. एडमिशन द्यायला फीसाठी वणवण चालू झाली होती. शेवटी सुमताईनं दोन हजार रुपये दिले. काकूने भाकरी बांधून दिली. बॅग भरुन काका, काकू व दादाचा आशीर्वाद घेऊन नाथा पुढील शिक्षणासाठी घराबाहेर पडला. फेसाटी कादंबरीविषयी प्रा.रणधीर शिंदे आपले मत मांडतांना लिहितात, ''नवनाथसारखे असंख्य तरुण हया काळाच्या भोवऱ्यात भिरभिरत आहेत, अशा प्रदेशातील समाजातील एका दुर्दैवी दारिद्र्याची कुटुंबकथा त्याने 'फेसाटी' कादंबरीतून सांगितली. हुलगं मांडगं खात मजुरीची कामे करीत धडपडणाऱ्या नायकाची संघर्षकथा निवेदली आहे.सुंबरान सारख्या आख्यानरुपाने आणि जत परिसरातील जिव्हाळ बोलीतून ती सहजपणे उलगडली आहे.''[२५] अशा प्रकारे लेखकाने जे भोगले ते आपल्या 'फेसाटी' या शीर्षकाखाली उतरवले. धनगर समाजातील दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या कुटुंबाची होणारी वाताहत लेखकाने प्रातिनिधिक स्वरूपात मांडली आहे. एका कुटुंबात नाथाच्या वडिलांच्या स्वतःच्या भावाने सतत फसवणूक केली. मुलं म्हणजे देवाची देण असे समजुन दोन मुलं व चार मुली असा मोठा परिवार त्यात हिराक्का व नकुसा या दोन मुली गेल्या. म्हणजेच आठ आपत्यांना जन्म दिला. कमावणारे हात चार म्हणजे काका-काकू आणि खाणारी तोंड जास्त त्यास उत्पन्नाचे साधन शेती आणि पशुपालन अतिवृष्टी किंवा अनावृष्टी यामुळे हातातोंडाशी आलेल्या पिकाची धूळधान व्हायची. त्यामुळे अनेक वेळा नाथांच्या कुटुंबाला उपाशी पोटी झोपावे लागले होते. सणासुदीला सुद्धा गोडधोड मिळाले नाही. दादा, नाथा व इंदाबाई यांच्यात शिक्षणाचा उल्लेख कादंबरीत आला आहे. त्यामुळे हालाखीच्या परिस्थितीमुळे

इतर बहिणींना शाळेतही घातले नाही. अन्न, वस्त्र, निवारा व आजच्या काळात शिक्षण ह्या प्राथमिक गरजांसाठी या युगातील नाथाच्या कुटुंबाला संघर्ष करावा लागतो. यासारखी दुसरी शोकांतिका नाही.

प्रस्तुत कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने समाजातील हुंडाबळी, भ्रष्टाचार, सावकारकी, अंधश्रद्धा या सारख्या अनिष्ट वाईट, वृत्ती प्रवृत्तींना स्वानुभवातून व्यक्त केले आहे. नाथाचे वडील मोठ्या मुलीचे लग्न करुन देताना तिच्या हुंड्यासाठी कर्ज काढतात ते कर्ज डोक्यावर असताना दुसऱ्या मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढतात. म्हणजेच नाथाच्या वडिलांसारखा पिता सतत कर्जाच्या ओझ्याखाली दबदलेला दिसतो. काकू सारखी माता की जिने स्वतःची मुलगी स्वतःच्या भावाला दिली. सख्ख्या मामीने हिराक्काला हुंड्यासाठी विहिरीत ढकलून दिले. हिराक्काच्या आठवणीने व्याकूळ होणारी माता व भावंडे पाहून मन सुन्न होते. अपंग असणारा लेखकाचा मोठा भाऊ जेव्हा सुशिक्षित बेकाराचे प्रकरण सरकार दरबारी टाकतो. तेव्हा त्याला पैसे मिळण्यापूर्वीच सात हजारांची केलेली मागणी किंवा नाथाच्या चुलत्याने त्यांची शेती हडप केली त्यावेळी पोलिसांना चारलेले पैसे त्यामुळे नाथाच्या वडिलांना सतत अन्यायाला सामोरे जावे लागते. यातून सरकार दरबारी बोकाळलेला भ्रष्टाचार समोर येतो. एखाद्या शेतकऱ्याने काढलेले कर्ज हे त्याच्या नाशास कारण असते. तो फक्त व्याजच कसेबसे फेडू शकतो. चक्रवाढ व्याजाच्या चक्रात तो इतका अडकला जातो की, त्याची मजल मुद्दल फेडण्या पर्यंत जातच नाही. आणि शेवटी त्याला त्याची शेती विकावी लागते व शेती हे उपजिविकेचे साधनच तो हरवून बसतो. लेखकाने त्याच्या मनोगतात म्हटले आहे. 'भयानक जगण्यानं बरचं काही शिकवल्यानं माझ्या अनुभवाचा साठा मोठा होता. दुःखाचं एक छिद्र बुजवलं तर दुसरं लगेच तयार असायचं' हे वेळोवेळी पटते.

जगण्यासाठीचा संघर्ष, अन्नासाठीचा संघर्ष, शिक्षणासाठीचा संघर्ष, लेखकाने वास्तव पातळीवरुन मांडण्याचा केलेला प्रयत्न मराठी साहित्याला एक वेगळेच परिमाण देऊन जातो.

### ३.३. समारोप :

प्रस्तुत प्रकरणामध्ये साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या आशयांच्या अनुषंगाने विविध संशोधन पद्धतींचा अवलंब केला आहे. कथानके, उपकथानके यांचा परामर्श घेतलेला आहे. 'ययाति', 'रथचक्र', 'स्वामी', 'स्मरणगाथा', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'तणकट', 'ताम्रपट', 'डांगोरा एका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी', 'उत्सुकतेने मी

झोपलो', 'खारीचा वाटा', 'फेसाटी' या कादंबऱ्यांच्या कथानकांतून विविध जातीच्या लोकांच्या विविध स्वभावाच्या लोकांचे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय जीवन व्यक्त होते.

कादंबरीचे आशयविश्व हे एका विशिष्ट विषयानुवर्ती त्यात असणाऱ्या पात्रांभोवती गुंफलेले दिसते. लेखकाच्या लेखनातून विविधता जाणवते. त्यात पौराणिक, ऐतिहासिक विशिष्ट व्यक्तींचे जीवनानुभव व्यक्त करणाऱ्या सामाजिक समस्येवर प्रकाश टाकणाऱ्या अशा आशयाच्या कादंबऱ्यांचे लेखन केले आहे.

'ययाति' या कादंबरीमध्ये लेखकाने ययातिच्या भोगलंपट वृत्तीचे पर्यावसन विफलतेत कसे होते हे वाचकांच्या निदर्शनास आणले आहे. जीवन हे भोगासाठी नाही तर त्यागातूनही जीवन सार्थकी लागते हेच कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र आहे. ययाति व देवयानी यांच्या व्यक्तिमत्वावर कच, शर्मिष्ठा व पूरु यांसारख्या आदर्श व्यक्तिमत्वांचा प्रभाव पडतो व त्यातून अखेरीस ययाति व देवयानी यांचे सर्वांगाने उद्बोधन होते. हेच लेखकाने सिद्ध केले आहे.

'रथचक्र' कादंबरी ही मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील एका अनामिक स्त्रीच्या भावविश्वाशी गुंफली आहे. 'ती'च्या जन्मापासून ते तिने तिचे स्वत:चे जीवन संपविण्याच्या केलेल्या निष्फळ प्रयत्नापर्यंतचा जीवनालेख कादंबरीतून प्रतित होतो. पत्नी म्हणून जो दर्जा मिळणे अपेक्षित असतो तो तर तिला लाभला नाहीच. एकत्र कुटुंबातही तिची अवहेलना झाली. हुशार असणाऱ्या धाकटया मुलाने खूप शिकावे या तिच्या स्वप्नासाठी साऱ्या कुटुंबाच्या विरोधाला सामोरे जाणारी 'ती' मात्र त्याच धाकटया मुलाच्या प्रेमाला पारखी होते. बालवयातच आईच्या प्रेमाला पारखं झालेल्या 'ती' ला लग्नानंतर ही कुणाचेच प्रेम लाभत नाही. तिचे दुर्दैव तिचा सतत पाठलाग करते. मध्यमवर्गीय ब्राम्हण कुटुंबातल्या एका स्त्रीची शोकांतिका या कादंबरीतून प्रतीत होते.

स्वामी ही रणजित देसाई लिखित ऐतिहासिक कादंबरी माधवराव पेशव्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. लहान वयात पेशवाईची सूत्रे हाती घेतलेल्या माधवरावांना सतत परकीय आक्रमनांना तोंड दयावे लागते. परकियांशी लढताना त्यांना कौटुंबिक कलहाला सामोरे जावे लागते, याची सल त्यांच्या मनात खोलवर जखम करुन जाते. शारीरिक आजाराने माधवराव खचले. या कादंबरीच्या कथानकात मनाला सुखावह ठरणारे रमा माधव यांचे एकमेकांविषयी असलेले उत्कट प्रेम व्यक्त होते.

गो.नी. दांडेकर यांचे त्याच्या बालपणापासून ते वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंतच्या जीवनानुभवांची स्मरण साखळी म्हणजे स्मरणगाथा पहिली तेरा वर्षे कुटुंबासमवेत घालवल्यानंतर स्वातंत्र्य मिळविण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन घरादाराचा त्याग केल्यानंतर त्यातील निःष्फळता जाणवल्यानंतर सुरु झालेली भटकंती त्यामध्ये आलेले अनुभव कालानुक्रमे लेखकाने वाचकांसमोर मांडले आहे. प्राथमिक गरज म्हणजे अन्न ते मिळविण्यासाठी धडपड म्हणजेच दानापेक्षा काम श्रेष्ठ मानून उदरनिर्वाहासाठी केलेला आटापिटा वर्णिला आहे. नाटकात काम मिळविण्यासाठी केलेला निष्फळ प्रयत्न तसेच गाडगेबाबांचे प्रामाणिक शिष्य होण्यासाठी, गाडगेबाबांच्या कार्याला हातभार लावण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला. शेवटी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सच्चे कार्यकर्ते बनले. त्यानंतर वारकरी संप्रदायाचे पाईक होण्यासाठी केलेला अट्टहास पूर्ण झाला.

सत्तांतर ही व्यंकटेश माडगूळकर लिखित वानरांच्या टोळ्यांच्यामध्ये सत्तेसाठी होणाऱ्या सत्तासंघर्षावर आधारित कादंबरी आहे. मनुष्य जातीमध्ये असलेल्या नेत्याप्रमाणे ताकदीच्या जोरावर इतर दुर्बलांवर वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीचा त्याचबरोबर टोळीला सुरक्षित ठेवण्याचा आपल्या कर्तव्याचे नेत्याला भान असते. त्याचप्रमाणे वानराचे वर्तनही नेत्याचे असते. विविध मानवी भावभावनांचे प्रकटीकरण लेखकाने वानरांच्या कृतीतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तासंघर्षाला केंद्रवर्ती मानून लेखकाने ह्या कादंबरीचे लेखन केले आहे.

'झोंबी' ही आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाची जीवनाशी चाललेली झोंबी कादंबरीतून वेळोवेळी व्यक्त होते. प्रतिकुल परिस्थितीवर मात करीत लेखकाने आपल्या दहावी पर्यंतच्या शिक्षणाचा टप्पा कसा पार केला तसेच त्यासाठी त्याला करावा लागणारा जीवनसंघर्ष कादंबरीतून मांडला आहे.

'झाडाझडती' या कादंबरीत लेखक विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांची होणारी झाडाझडती कथीत केली आहे. विकासाच्या नव्या वाटा चोखाळताना, दुर्बलांचा कसा बळी दिला जातो हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. आनंदाने जीवन जगत असलेल्या समूहाला धरणामुळे बेघर व्हावे लागते. त्यांच्या दु:खाची वेदनेची कदर ना सत्ताधाऱ्यांना असते ना ज्यांच्यासाठी त्यांना धरणग्रस्त व्हावे त्या लाभार्थींना! भूमिपुत्राच्या जीवनाची व्यथा लेखकाने झाडाझडती खऱ्या या शीर्षकाखाली व्यक्त केली आहे.

'ताम्रपट' रंगनाथ पठारे लिखित ताम्रपट ही कादंबरी १९४२ ते १९७९ अशा दीर्घ कालखंडातील राजकीय स्थित्यंतराचा वेध घेणारी आहे. या कादंबरीचे वैशिष्टय म्हणजे या कादंबरीचे दादासाहेब भोईटे पाटील, नाना शिरुर आणि बापूसाहेब देशमुख असे तीन नायक आहेत. राजकारणातून समाजकारण? समाजासाठी निर्मोही वृत्ती व राजकारणातून स्वत:चा स्वार्थ साधणे असे तीन मतप्रवाह व्यक्त होतात.

'तणकट' ही राजन गवस यांची ग्रामीण कादंबरी आहे. कादंबरी नायक कबीर कांबळे हा महार समाजातील सुशिक्षित तरुणांचे प्रतिनिधित्व करतो म्हणून तिला दलित ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. अशिक्षित, अडाणी, दलित समाज बाळासाहेब शेडबाळे सारख्या सवर्णाकडून फसविला जातो. कबीर कांबळे शेडबाळेसारख्या बांडगुळावर विश्वास ठेवू नका, असे वेळोवेळी पटवितो. परंतु स्वकीयच त्याच्यावर बहिष्कार टाकतांना दिसतात. दलितांच्या बद्दल कळवळा दाखवून राजकारणी लोक स्वत:ची तुंबडी भरतांना दिसतात.

'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीत त्र्यं.वि. सरदेशमुखांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील समाजवास्तव तसेच संस्थानांमधील घडलेल्या राजकारणाचे चित्रण केले आहे. साईखेड या संस्थानाने भोगलेल्या-अनुभवलेल्या दुःखाच्या कहाणीचा वृत्तांत येथे रेखाटलेला आहे. इ.स. १९२२ ते इ.स.१९२९ या कालखंडातील साइखेड संस्थानात घडलेल्या घडामोडी लेखकाने मांडलेल्या आहेत. संस्थानातील दुषित वातावरण, प्रत्येक राजकीय गोष्टीत इंग्रजांचा हस्तक्षेप, भोळयाभाबड्या जनतेचे अडाणीपण, इंग्रजांचे डावपेच, स्वार्थी, भ्रष्टाचारी, सत्तांध अधिकारी वर्ग, संस्थानामधील घाणेरड्या राजकारणात भरडली जाणारी सर्वसामान्य जनता, गोरगरिबांवर होणारा अन्याय, प्रामाणिक माणसांना होणारा त्रास, न्याय देवता व पोलीस यंत्रणा यांचा उलटा कारभार, राणी दमयंतीला नजरबंद करुन स्वार्थ साधणारा अधिकारी वर्ग अशा प्रकारच्या घटनाप्रसंगांचे विराट, सविस्तर व भीतीदायक विदारक चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने चित्रित केलेले आहे.

'बारोमास' या सदानंद देशमुखांच्या कादंबरीतील शेतकरी कुटुंबातील एक सुशिक्षित बेरोजगार एकनाथ याची व्यथा लेखकाने मांडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्याची बारोमास म्हणजे बाराही महिने होणारी जीवनाची हालअपेष्टा, त्रेधातिरपीट मांडली आहे. एकनाथ व त्याचा भाऊ हे दोघेही उच्च शिक्षण घेवून भ्रष्टाचारी समाजव्यवस्थेमुळे नोकरीपासून अलिप्त

राहतात. शेतात कधी पिक पिकलं तर टिकत नाही, अशा प्रतिकुल परिस्थितीत कसे जीवन जगतात याची शोकात्म कहाणी लेखकाने मांडली आहे.

माणसाच्या जीवनातील विविध बारकावे, व्यथा-वेदना, अंतर्गत संघर्ष, सामाजिक संदर्भासह या कादंबऱ्यांमध्ये चित्रित झालेले आहे. या सर्व घटना-प्रसंगांची व कादंबऱ्यांच्या विविध विषयांची व प्रकारांची दखल मराठी साहित्य अकादमीने घेतलेली आहे. १९६० नंतर मराठी साहित्य अर्थातच कादंबरी अधिक व्यापकपणे जीवनवादी बनलेली आहे.

काव्यात्म, ओघवती शैली, नेमकी शीर्षकं, अप्रतिम आणि सूचक मुखपृष्ठे, 'सत्तांतर' व 'खारीच्या वाटा' यामधील बोलकी रेखाटने यामुळेच एकुण हया कादंबऱ्या आनंदीदायी ठरतात. एकूणच मराठी साहित्यात या सर्वच कादंबऱ्यांनी मोलाची भर घातली आहे. कादंबरीला किती विविध आयाम असू शकतात, हे प्रस्तुत कादंबऱ्यांमधून प्रत्ययाला येते, कादंबरीचा आशय हाच अविष्कारात कशी महत्वाची भूमिका बजावतो, आशय आणि आविष्कार यांच्या अद्वैतातूनच कादंबरी कशी प्रभावी ठरते, याची प्रचिती प्रस्तुत कादंबऱ्यामधून येते. 'उत्सुकतेने मी झोपलो' यात शाम मनोहर यांनी रुढ संकेत मोडून एक नवा प्रयोग केला आहे. प्रस्तुत सर्वच कादंबऱ्यांमधून समाज व संस्कृतीच्या बदलाचे पडसाद यशस्वीपणे टिपले आहेत.

### ३.४. संदर्भ आणि टीपा :


१. गणोरकर प्रभा (संपा.), *'वाड्मयीन संज्ञा-संकल्पना कोश'*, जी.आर. भटकळ फाउंडेशन, पृ.११७.

२. बांदिवडेकर चंद्रकांत, *'मराठी कादंबरीचा इतिहास'*, द्वि.आ., पुणे, १९९६, पृ.४.

३. थोरात हरिश्चंद्र, *'कादंबरी: एक साहित्यप्रकार'*, प्रा.आ., मुंबई, ऑगस्ट २०१०, पृ.३.

४. पेंडसे श्री.ना., *'रथचक्र'*, प्रस्तावना, मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ., १९६२, पृ.२५.

५. माळी (डॉ.) जी.पी., *'रणजित देसाई, जिवन आणि साहित्य'*, शब्दवेल प्रकाशन, प्रथमावृत्ती, ८ एप्रिल २००२, पृ.११३, ११४.

६. वडिखाये रेखा, *'महायुध्दोत्तर मराठी कादंबरी'*, लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती ३ जुलै २०१२, पृ. १५९.

७. तारळेकर मीरा, *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, साहित्य अकादमी प्रकाशन, २०१०, पृ.२, ३.

८. ठाकूर (डॉ.) रविंद्र, *'मराठी ग्रामीण कादंबरी (१८८०-२०००)'* स्नेहवर्धन प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, १ सप्टेंबर १९९३, पृ.१७६.

९. सावदेकर आशा, *'कादंबरीचा आशयवेध'*, विजय प्रकाशन, नागपूर-१२, प्रथमावृत्ती, १४ ऑगस्ट २०१३, पृ. १३६.

१०. कांबळे नामदेव, *'राघववेळ'*, देशमुख आणि कपंनी, पुणे, प्रस्तावना, पृ.१८.

११. तत्रैव, पृ.६.

१२. कांबळे नामदेव, *'राघववेळ'*-मनोगत, पृ.१९.

१३. लिंबाळे शरणकुमार, *'साहित्याचे निकष बदलावे लागतील'*, दिलीपराज प्रकाशन, पुणे-३०, द्वितीया आवृत्ती, २००७, पृ.१०२.

१४. बांदिवडेकर (डॉ.) चंद्रकांत, *'देशीवाण'*, अक्षर प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च २००२, पृ.४४२, ४४३.

१५. सावदेकर (डॉ.)अशा, *'कादंबरीचा आशयवेध'*, विजय प्रकाशन, नागपूर, २०१३, पृ.२२४.

१६. *देशीवाण*, उ.नि., पृ.४७४.

१७. *देशीवाण*, उ.नि., पृ.४७५.

१८. पठारे रंगनाथ, *'आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे'*, पृ.२२४.

१९. लिंबाळे शरणकुमार, *'वादंग'*, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २० मे २०१०. पृ.३५०.

२०. मोकाशी (डॉ.) मधुकर, *'ग्रामीण दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पृ.४५२.

२१. घोलप दत्ता, *'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार'*, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्र.आ., जुलै २०१८, पृ.३१.

२२. कांबळे (डॉ.) शशिकला, *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथमा आवृत्ती, पृ.९, १०.

२३. तत्रैव, पृ.१०.

२४. *दै.सकाळ,* शनिवार, दि.२३ जून २०१८, पृ.१.

२५. शिंदे रणधीर, *महाराष्ट्र टाईम्स्,* दिवाळी अंक, २०१८, पृ.१७१.

*****

## प्रकरण– चार

# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

**(अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे**

**(ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे**

**(क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ**

**(ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन**

**(अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे**

**१.१. प्रास्ताविक**

**१.२. पुरुषांची व्यक्तिचित्रणे**

**१.२.१. ययाति**

**१.२.२. रथचक्र**

**१.२.३. स्वामी**

**१.२.४. स्मरणगाथा**

**१.२.५. सत्तांतर**

**१.२.६. झोंबी**

**१.२.७. झाडाझडती**

**१.२.८. राघववेळ**

**१.२.९. ताम्रपट**

**१.२.१०. तणकट**

**१.२.११. डांगोरा एका नगरीचा**

**१.२.१२. बारोमास**

**१.२.१३. भूमी**

**१.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो**

**१.२.१५. खारीच्या वाटा**

**१.२.१६. फेसाटी**

**१.३. समारोप**

# प्रकरण चार
# माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन

## (अ)साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे

### १.१. प्रास्ताविक :

कादंबरीसारख्या कथानकप्रधान वाङ्मयप्रकारात जीवनानुभव व्यक्त होतात. ते व्यक्ती-प्रसंग, कृती-उक्ती यातूनच. घटनांच्या वेधक गुंफणीला आपण कथानक म्हणतो व कादंबरीचा तो एक महत्त्वाचा घटक मानतो. तथापि कथानक ज्या घटनांनी बनते, त्या घटना तरी कशा सिद्ध होतात? अर्थातच त्या घटनांत भाग घेणाऱ्या व्यक्तींमुळे आणि त्यांच्या स्वभावविशेषांमुळे 'अमुक एक प्रसंग का निर्माण झाला?' या प्रश्नाचे उत्तर 'त्या प्रसंगाशी निगडीत असलेल्या व्यक्तीचे स्वभाव असे होते म्हणून' असेच द्यावे लागेल. या दृष्टीने व्यक्तिचित्रण व कथारचना ही कादंबरीची आवश्यक अंगे खरी, पण त्या दोहोत व्यक्तीचित्रण हे अधिक व्यापक व महत्त्वाचे आहे. व्यक्तिचित्रणाविषयी डॉ. शिरिषकुमार लांडगे म्हणतात, ''कादंबरीकार पात्राच्या अंतर्बाह्य मनोवस्थेचे चित्रण करू शकतो तसेच त्यांचे कृतीतील पर्यावसनाचे सहजतेने चित्रण करू शकतो. घटना-प्रसंग प्रत्यक्षात घडत आहेत हे निवेदन, वर्णन, चित्रण, संवाद आदींच्या मदतीने दाखवू शकतो.''[१]

अर्थात व्यक्तिचित्रण करतानाही कथानकाच्या दृष्टीने उपयुक्त व प्रभावी अशाच स्वभाव धर्माचे चित्रण करण्यावर भर देणे आवश्यक ठरते. कादंबरीतील कृतीच्या दृष्टीने आवश्यक अशा स्वभाव वैशिष्ट्यांना दूर सारल्याने व्यक्तिचित्रणातील मितव्यांचे तंत्र कादंबरीकाराला अवलंबिता येते. मात्र कृतीला व्यक्तिचित्रणाचे महत्व देत असताना व्यक्तिचित्रणाचे महत्व डोळ्याआड करुन चालणार नाही. कादंबरीतील कथानक, घटना-प्रसंग व्यक्तींच्या स्वभावावर अवलंबून नसल्यास त्या बालिश व भाकडच ठरणार. हेन्री जोन्स म्हणतो त्याप्रमाणे ''कथानक म्हणजे व्यक्तींच्या स्वभाव धर्माच्या काही व्यक्ती विशिष्ट हेतूने विशिष्ट परिस्थितीत वागत असता त्यांच्या होणाऱ्या क्रिया-प्रतिक्रियांमधूनच होत असतो. त्यामुळे कथनकातील घटना व्यक्तींच्या स्वभावातून आकार घेतात, तर उलट त्या व्यक्तिस्वभावतही प्रकाश टाकतात, घटना व व्यक्तीचे हे परस्परानुवर्तित्व हाच कादंबरीच्या आणि अर्थातच कोणत्याही ललितकृतीचा महत्त्वाचे गुण विशेष होय.''[२] अनेक

व्यक्तिमत्व आपल्या मनात ठसलेली असतात. जनमाणसात त्यांना अढळ स्थान असते. त्यांचे आभाळाएवढे कर्तृत्व असते.

''कोणतीही व्यक्ती घेतली तर एका बाजूने परिस्थितीचा तिच्या मनोव्यापारावर परिणाम होत असतो व दुसऱ्या बाजूने तिचे ते बदलते मनोव्यापार तिच्या बोलण्यातून, कृतीतून व्यक्त होतात व त्या शब्दांनी, कृतींनी तिच्या परिस्थितीत बरावाईट बदल होत असतो. भोवताली घडणाऱ्या घडामोडींचा परिणाम व्यक्तींच्या अंतरंगावर होत असतो. उलट अंतरंगातील चलबिचल त्या व्यक्तीच्या बाह्य वर्तनात मूर्त रुपाने प्रगट होत असते.''[३]

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधून स्त्री व पुरुषविषयक विविध संदर्भ आलेले आहेत. स्त्री-पुरुष समाजात वावरत असताना त्यांचा अनेकविध क्षेत्रांशी संबंध येतो. ते विविध क्षेत्रात वावरताना कशाप्रकारचे वर्तन करतात? त्या क्षेत्रात त्यांना यश मिळते का? यश मिळविण्याकरिता त्यांना कोणकोणत्या संघर्षाला सामोरे जावे लागते? कोणत्या तडजोडी कराव्या लागतात? ह्या संबंधीचा विचार ह्या पात्रांच्या अनुषंगाने करता येईल. इतिहास, धर्म, जात, संस्कृती, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, श्रद्धा, अंधश्रद्धा, संघर्ष, रुढी, चालीरिती, गावगाडा, भूक, बंडखोरी, जातीयता अशा अनेक संदर्भातून स्त्रियांचे व पुरुषांचे स्वभाव गुण वैशिष्टे शोधता येणे शक्य आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये जे जे विविध प्रकारचे संदर्भ आलेलेआहेत.त्या विषयीचा शोध पुढीलप्रमाणे घेता येईल. डॉ.शिरीषकुमार लांडगे कादंबरीतील व्यक्तिचित्रणे आणि कथानक यांचा अनन्योसंबंध स्पष्ट करताना म्हणतात, ''कथानक हे पात्रचित्रणाने पूर्ण होत असते. प्रत्यक्ष जीवनाप्रमाणे कादंबरीतील पात्रांना व्यक्तिमत्व असते. प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणे पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाचे अंतर्बाह्य घटक असतात. पात्रांची परस्परांहून असणारी पृथगात्मकता, मानवी जीवनाशी असणारे साधर्म्य, त्यांचे मानवी रूप, त्यांच्या जीवनक्रमातील स्वाभाविकता, त्यातून प्रकट होणारी विकसीत अवस्था या सगळ्यांमुळे पात्र चित्रण वैशिष्ट्यपूर्ण करत असते.''[४] कादंबरीत अनेक पात्रे असतात त्यांच्यातील परस्पर संबंधांना महत्व असते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणे प्रत्यक्ष जीवनाप्रमाणे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेली दिसतात. प्रस्तुत कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणे हे कुटुंबातील मुलगा, पती, वडील, नातेवाईक ह्या भूमिकेतून आपणासमोर साकार झालेली आहेत. तसेच काही पात्रे समाजातील राजकारणी, समाजसेवक तर काही पात्रे बंडखोर वृत्तीची, खलनायकाची भूमिका बजावणारी आहेत.

## १.२. पुरुषांची व्यक्तिचित्रणे :

### ४.२.१. ययाति :

'ययाति' हा हस्तिनापूरचा राजकुमार पराक्रमी पुरुरव्याचा पणतू व शूर नहुषाचा पुत्र होता. ययातिच्या आईने स्वतःचे सौंदर्य कमी होईल म्हणून कलिका नावाची दासी की जिला त्यावेळी अलका नावाची मुलगी होती तिच्या वाट्याचे दूध कालिकाने ययातिला पाजले आणि एका दासीच्या दुधावर आपण वाढलो यामुळे ययातिला आईचा अतिशय राग आला. अगदी लहान पणापासून ययाति हव्यासी वृत्तीचा होता. फुलाला झाडावरच ठेऊन त्याचा सुगंध घेणे त्याला पटत नव्हते. त्या फुलाचा चोळामोळा करुन त्यातला सारा सुगंध एका क्षणात आपल्याकडे ओढून घ्यावा असे त्याच्या मनात येई.

आईसुद्धा किती स्वार्थी असते? हे त्याला जेव्हा अंगवार पाजले नाही. म्हणून वाटू लागले तेव्हा तो आईवर रुसला. आई बरोबर एक शब्दही बोलेना. तेव्हा आईला धास्ती वाटली व ती एवढी का धास्तावली याचे कारण सांगताना तिने एक रहस्य ययाती समोर प्रकट केले. ययातिचा थोरला बंधू यति लहान असतानाच महाल सोडून निघून गेला खूप शोधलं, पण सापडला नाही आणि तोही त्याच्या सारखा निघून जाईल अशी तिला सतत भीती वाटत राहते, कारण 'नहुष राजाची मुले कधीही सुखी होणार नाहीत असा अगस्त्यऋषीनी शाप दिलेला होता. त्यामुळे नाना शंकाचे काहूर तिच्या मनात माजले आणि अशाच धास्तावलेल्या स्थितीत तिने ते दुःख ययाति समोर व्यक्त केले अर्थात तिला ते तो मोठा झाल्यावर सांगायचे होते. मी यतिला तुझ्यासमोर एक ना एक दिवस घेऊन येईल असे तो आपल्या आईला सांगतो आणि त्या संवादानंतर त्याला अचानक आपण मोठे झालोत याची जाणीव झाली. स्वप्नाच्या जगातून तो सत्याच्या जगात आला दुःख काय असते याची त्याला प्रथम जाणीव झाली.

राजपूत्र म्हणून त्याला अनेक विद्यांमध्ये पारंगत व्हायचे होते सात आठ वर्षात किती गुरुंनी मित्रांनी ग्रंथांनी त्याच्या मनाला आकार दिला होता. ययातिचे पणजोबा पुरुरवा यांनी उर्वशीचे हरण करुन राक्षसांचा पराभव केला व उर्वशीला आपले पत्नीपद दिले. आजोबाही पराक्रमी होते व वडिलांनी दस्यूचा पराभव करुन ऋषींना अभय दिले. पुढे देवांचा पराभव करुन इंद्रपद सुद्धा जिंकले. या तिघांचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन आपणही पराक्रमी व्हावे या महत्वकांक्षेने प्रेरित होऊन कवी मनाचा ययाती धनुर्विद्येत पारंगत झाला. अमात्य त्याचे प्रेरणा स्थान बनले, **'जीवन हे देवालय नाही! ते रणांगण आहे.' 'जग शक्तीवर चालते, स्पर्धेवर जगते, भोगासाठी धडपडते'** (पृ.२१) या

त्यांच्या उपदेशामुळे प्रेरित होऊन त्या दिवसापासून ययाती शक्तीचा उपासक बनला. कौर्य आणि शौर्य ही जुळी भावंडे आहेत, असे तो मानू लागला.

युद्ध, शिकार या गोष्टी त्याला आकर्षित करू लागल्या राजपुत्रांच्या मर्यादात त्याला कोंडल्यासारखे वाटले. नगरदेवतेच्या उत्सवाच्या शेवटच्या दिवसाच्या साहसी खेळात त्याने पराक्रम गाजविला पण त्यामध्ये घोड्यावरून पडून तो बेशुद्ध पडला. ज्यावेळी तो शुद्धीवर आला. तेव्हा त्याच्यासमोर अलका उभी होती. ती त्याला एखाद्या मत्स्यकन्येप्रमाणे भासली व त्यावेळी ययातिचे यौवन जागृत झाले. तिचे कितीही चुंबन घेतले तरी ययातिची तृप्ती झाली नाही आणि त्या क्षणाला अतिरेकी वासनेला तो बळी पडला. जीवनात या हव्यासापोटी त्याने अनेक वाईट कृत्ये केली. वडिलांच्या अंत्यसमयी त्याचे मन रमावे म्हणून त्याला अशोक वाटिकेत ठेवले होते. तेव्हा त्याच्या सेवेसाठी नेमलेली मुकुलिका, त्याच्यावर अतोनात प्रेम करणारी शर्मिष्ठा, पत्नी म्हणून मिळालेली देवयानी की जिने त्याच्यावर कधीही मनापासून प्रेम केलं नाही. मित्राची (माधव) पत्नी माधवी, मित्राची पुतणी तारका या सर्वांना आपल्या वासनेचे बळी केले. यातून ययातिची स्त्री लंपट वृत्ती दिसून येते. वि.स.खांडेकर ययातिविषयी म्हणतात, ''ययाति हा आजच्या सर्वसामान्य मनुष्याचा पुराणकाळातील प्रतिष्ठित प्रतिनिधी आहे. विविध सुखे मिळूनही तो सदैव अतृप्त आहे. नवनव्या सुखांच्या मागे आंधळेपणाने धावत आहे. सुख आणि आनंद यांच्यातील फरक त्याला कळत नाही. सुख-क्षणभर मिळणारे शरीरसुख हे चिरंतन सुख मानून, ते सतत कसे मिळेल याचे तो चिंतन करीत आहे. त्याच्या भावविश्वात अन्य कुठलेही मुल्य नाही.''[५]

अश्वमेध यज्ञ करताना त्याला एका जंगलात यति भेटला तेव्हा त्याने ययातिला उपदेश केला. ''शरीर हा मनुष्याच्या मोठा शत्रू आहे. त्याच्यावर माणसाने विजय मिळवावा. 'आसक्तीने मनुष्य शरीर पूजक होतो.''(पृ.४३) अशा प्रकारच्या गोष्टी तो ययातिला समजावू लागला. यतिची भेट हे ययातिच्या आयुष्यातले एक भयंकर स्वप्न व अलकेचे चुंबन हे त्याच्या जीवनातले सुंदर स्वप्न होते. खूप आग्रह केला पण यति ययाति सोबत आला नाही.

देवदानवांचे महायुद्ध सुरु होणार होते. ऋषी अंगिरस यांनी शांती यज्ञाचा संकल्प सोडला. राक्षसांकडून विधीमध्ये बाधा येऊ नये म्हणून अंगिरसांनी बाबांकडे ययातिची मागणी केली. त्यावेळी त्याला कचासारखा मित्र मिळाला निष्पाप मुक्या पाखराची शिकार करण्यापासून त्याने ययातिला बाजूला लोटले. मी ही शिकार करतो. परंतु दर्भाची माझ्या शत्रुंची शिकार मी आत्मरुपी घोड्यावर बसून करतो फूल तोडणे हा फक्त क्षणिक आनंद आहे. केवळ उपभोगाचा आनंद, केवळ

उपभोग म्हणजे जीवन नाही. त्याचप्रमाणे अंगिरसांनी ययातिला जीवन हा एक दिव्य वर आहे. तो परमेश्वराचा कृपाप्रसाद आहे. तो अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे. हे समजावून सांगितले.

म्हणजेच ययातिला त्याच्या जीवनात अमात्य, यति, कच व अंगिरस जीवनाचे अंतिम सत्य काय आहे? हे समजावून सांगतात. त्याच्या कौटुंबिक जीवनात त्याने आईवडिलांवर खूप प्रेम केले. आईला कधीही दुःख दयायचे नाही असा निश्चय केला. मोठ्या भावाला यतिला हस्तिनापुरात घेऊन येण्याचा प्रयत्न केला. मोठा भाऊ आहे मग तो सिंहासनावर बसेल आणि आपल्याला फक्त राजपुत्र म्हणून जीवन जगावे लागेल. असा वाईट विचार त्याने केला नाही. उलट मोठा भाऊ म्हणून आपण त्याला मान देऊ त्याच्या आज्ञेत राहू असे त्याचे आदर्श विचार होते. सिंहासनाचा त्याला मोह नव्हता. पती म्हणून मात्र तो यशस्वी होऊ शकला नाही. व्यसनाधिन होऊन शयनगृहात गेल्यामुळे देवयानी त्याचा तिरस्कार करु लागते. त्याचे पर्यवसन म्हणजे देवयानी त्याला शपथ घालते. ''तिने ययातिशी तो केवळ हस्तिनापूरचा राजा म्हणून लग्न केले होते! तिचे प्रेम राजवैभवावर होते, राणीचे लक्ष पदावर होते ययातीवर नव्हते. ययाति हे तिच्या इच्छापूर्तीचे एक साधन होते!''(पृ.१८२)

शर्मिष्ठा देवयानीची दासी होती पण तिचे मात्र ययातिवर खरे प्रेम होते. ययाति या कादंबरीमध्ये कथानायक हस्तिनापूरचा राजा आहे पण तो पूर्ण कथानकामध्ये कुठेही राजा प्रजा असा कोणताच संदर्भ आलेला नाही. फक्त त्याने पार पाडलेला अश्वमेध यज्ञ आणि त्यानंतर त्याला असलेला शिकारीचा छंद व नगरदेवतेच्या उत्सवात त्याने दाखविलेला पराक्रम या ठराविक घटना सोडता एक राजा म्हणून त्याचे कर्तृत्व कुठेही नजरेत भरत नाही. सतत चैनी विलासी मद्यधुंद व शारीरिक वासनांच्या आहारी गेलेला राजा अशी त्याची प्रतिमा निर्माण होते.

मृत्यूच्या कल्पनेने तो भयभीत होतो. आत्म्याच्या तृप्तीसाठी शरीर आवश्यक आहे. मृत्यूने शरीरातील चेतना गेल्यावर आपण शरीराशिवाय सर्व सुखांचा भोग कसा घेऊ शकतो. मृत्यूच्या कल्पनेने व्याकूळ होतो. त्याला नेहमी सूख उपभोगण्यासाठी चिरतरुण राहायचे असते. ज्यावेळी शुक्राचार्याच्या शापामुळे तो वृद्ध होतो. तो स्वतःला आरशात पाहतो तो अतिशय व्यथीत होतो. शुक्राचार्याकडे पुन्हा तारुण्य देण्याची याचना करतो. देवयानीही वडिलांना विनविते. तेव्हा शुक्राचार्य शाप देतात. 'तुझ्या वार्धक्याचा स्वीकार करायला तुझ्याच कुळातला, तुझ्याच रक्ताचा कुणीही तरुण आनंदान पुढं आला, तर तू इच्छा करशील, त्या क्षणी ते वार्धक्य त्याच्याकडे जाईल.'(पृ.३७५) शर्मिष्ठेचा मुलगा पुरु हे वार्धक्य घेण्यास तयार होतो. स्वतःच्या क्षणिक

सुखासाठी पोटच्या गोळ्याचा ययातिने बळी दिला होता. अठरा वर्ष एका राक्षसी वासनेचे मंदिर बांधीत आली आणि पुरुचे तारुण्य स्वीकारुन व आपले वार्धक्य त्याला देऊन राक्षसी वासनेच्या मंदिरावर त्याने कळस चढविला. पण कचाने तपस्याकरुन असे कृत्रिम वार्धक्य दूर करण्याची सिद्धिही प्राप्त केली व पुरुचे तारुण्य त्याला परत दिले. शर्मिष्ठेचा त्याग, पुरुचा त्याग व त्यामुळे बदललेली देवयानी या सर्व सुखाचा त्याग करुन आपण वानप्रस्थाश्रम स्वीकारावा अशी तो इच्छा व्यक्त करतो.

**कच :**

कच हा देवगुरु बृहस्पतींचा मुलगा. देवदानवांचे युद्ध सुरु होण्याचा संभव निर्माण होतो. ते युद्ध होऊ नये, म्हणून अंगिरस शांतियज्ञाचा संकल्प सोडतो. या यज्ञातला प्रमुख ऋत्विज म्हणून अंगिरस त्यांचा आवडता शिष्य कच याची नेमणूक करतो.(पृ.४७) अंगिरसांसारख्या निःस्पृह ऋषींनी कचाला यज्ञातले इतके महत्वाचे पद देणे म्हणजे आश्चर्य होते.

कच हे व्यक्तिमत्व लेखकाने प्रामुख्याने समाजप्रबोधनपर रेखाटले आहे. ययाति महाराजांना उपदेश तसेच शर्मिष्ठा, यति यांचे आपल्या अमृतवाणीने त्याने जीवन उज्ज्वल केले आहे.

ययाति आणि कच यांचा संबंध अंगिरस ऋषींच्या आश्रमात येतो. ययातिवर शांतीयज्ञाचे दानवापासून संरक्षण करण्याची जबाबदारी टाकली होती. त्यावेळी ययाति व कच यांच्यामधील संवाद अतिशय बोधपर आहेत. त्या आश्रमातली एक ऋषिकन्या अर्धवट उमललेली कळी त्यांना भेट देणार त्यावेळी कचाने तिला कळी तोडण्यापासून परावृत्त केले. त्या प्रसंगावर ययाति आणि कच यांच्यात तात्विक संवाद झाला. ययातिच्या विचारानुसार त्याकळीचे उदया फुल होईल, ते वेलीवर हासत राहील व नंतर ते गळून पडेल. हे पाहण्यात कसला आलाय आनंद त्या पेक्षा ती तोडण्यात हुंगण्यात, केसात गुंफण्यात, आणि शय्येवर पसरण्यात खरा आनंद आहे. त्यावेळी कचाने अतिशय मार्मिक उत्तर दिले, 'आनंद आहे खरा, पण तो क्षणभंगूर! केवळ उपभोगाचा.'(पृ.५५) उपभोगापेक्षा त्यागाचा आनंद सर्वश्रेष्ठ आहे. ययातिला त्यावेळी यतीची आठवण होऊन त्याने कचाला विचारले 'या जगात संन्यास हा एकच सुखाचा मार्ग आहे का?' तसेच पुढे त्याने प्रश्न केला 'उद्या मी राजा व्हायचं सोडून, मी संन्यासी झालो, तर ते योग्य होईल? त्यावेळी कचाने त्याचे उदबोधन केले. राजा होऊन प्रजेचं न्यायानं पालन करणं प्रजेच्या सुखाकरिता झटणं हा तुमचा धर्म आहे. राजधर्म हा संन्यासधर्माइतकाच श्रेष्ठ आहे.' केवळ उपभोग म्हणजे जीवन नव्हे. शरीरावर प्रत्येक वासनेला आत्म्याचं बंधन हवं. तसेच अपहारासारखा अधर्म नाही.

कचाच्या मनाचा अंत लागत नाही. त्याच्या कल्पना स्वप्नासारख्या वाटतात. कच संजीवनी विद्या संपादन करण्यासाठी वृषपर्वा महाराजाच्या राज्यात गेला होता. शुक्राचार्यांनी त्याला आपला शिष्य होण्याची संधी दिली. शुक्राचार्यांना प्रसन्न करुन आपण संजीवनी विद्या संपादन करु अशी कचाची आशा होती. व संजीवनीच्या सहाय्याने देवांना धुळीला मिळवू असे राक्षसांना वाटत होते. राक्षस कचाचा द्वेष करु लागले. राक्षसांनी कचाचा वध केला.(पृ.९९) राक्षसांनी कचाला मारुन त्याच्या हाडांची पूड मद्यात घालून ती दारु शुक्राचार्यांना पाजली. त्यामुळे त्यांच्या हृदयाच्या मर्मस्थानी कचाला स्थान मिळाले. कुणालाही ठाऊक नसणारा संजीवनी मंत्र कचाने तेथे आत्मसात केला. शुक्राचार्यांच्या कन्येचे (देवयानीचे) कचावर प्रेम होते त्यामुळे संजीवनी मंत्रासह का होईना कचाला सजीव करण्याची विनवणी तिने तिच्या बाबांना केली.(पृ.१२३) मुलीच्या आग्रहाखातर शुक्राचार्यांनी कचाला जिवंत केला. खर तर कचाचेही देवयानीवर प्रेम होते. त्याविषयी शर्मिष्ठेला सांगताना तो म्हणतो, 'माझ्या हृदयातला एक लहानसा कोपरा केवळ देवयानीचाच. तो सदैव तिचाच राहिल'. पण कचाच्या हृदयावर कर्तव्याचं स्वामित्व आहे. जीवनात प्रेम ही एक उच्च भावना आहे पण कर्तव्य तिच्यापेक्षाही श्रेष्ठ अशी भावना आहे! आणि म्हणूनच देवयानीचे प्रेम झिडकारुन तो निघून गेला. 'कोणताही ऋषिपुत्र तुझं पाणि ग्रहण करणार नाही!' असा शाप कचाने देवयानीला दिला.(पृ.१२२) कचाने देवयानीवर प्रेम केले 'पण आमचं प्रेम सफल झालं नाही' अस तो शर्मिष्ठेला सांगतो. प्रिय व्यक्तीचा तिच्या गुण दोषासंह स्वीकार करण्याची शक्ती प्रेमात असते. आणि कचाने देवयानीवर तसं प्रेम करण्याचा प्रयत्न केला पण त्याच्या प्रेमात कामुकतेची छटा आढळली नाही. त्याला देवयानीच मन दुखवावं लागलं.

महायज्ञाच्या निमित्ताने देवयानीचे निमंत्रण स्वीकारुन कच यतिसह राजवाड्यात जातो. तेथे तो अशोकवनात वास्तव्यास राहतो. अचानक आठव्या दिवशी तो राजवाड्यात येतो. त्यावेळी तो देवयानीला अनेक तात्विक विचार समजावून सांगतो. 'संसार हा तुझा धर्म आहे मी यति (संन्यासी) आहे; संन्यास हा माझा धर्म आहे. संसारात उपभोगाला मानाचं स्थान आहे. संन्यासात तो अक्षम्य आहे.(पृ.२०९) शर्मिष्ठेला तू दासीपणातून मुक्त करं जगात दुसऱ्यांच दुःख जर समजून घ्यायचं असेल तर आपण स्वतःला त्याच्या जागी गृहीत धरावं. हस्तिनापुरातून जाण्यापूर्वी त्याने महाराजांना देण्यासाठी शर्मिष्ठेकडे एक पत्र दिले. त्या पत्रात त्याने देवयानी व ययाति यांना उपदेशपर अनेक संकल्पना समजावून सांगितल्या. आत्म्या विषयीचे गुढ अनेक रुपकांच्या सहाय्याने समजावून सांगितले जाते. 'मानवी जीवनात आत्मा हा रथी, शरीर हे रथ, बुद्धी हा सारथी आणि मन हा

लगाम आहे. विविध इंद्रिय हे घोडे. उपभोगाचे सर्व विषय हे त्यांचे मार्ग आणि इंद्रिय व मन यांनी युक्त असा आत्मा हा त्याच भोक्ता आहे.'(पृ.२१७) मन आणि बुद्धी यांच्या संयमाने आपण हा शरीर रुपी रथ चालविला पाहिजे.

स्त्री-पुरुषांच्या प्रेमाविषयी सांगताना कच पत्रात लिहितो ''प्रीती म्हणजे केवळ शारीरिक आसक्ती नव्हे!''(पृ.२१८) खऱ्या प्रीतीमध्ये मना मनाचं मिलन होतं. कालांतराने ते दोन आत्म्यांच मिलन होतं. संसार हा असा श्रेष्ठ आणि पवित्र यज्ञ आहे. सहस्त्र अश्वमेधांच पुण्य त्यात सामावलेलं आहे. मात्र हा संसार यज्ञ सफळ होण्यासाठी त्यात पतिपत्नीनी पहिली आहुती ही अहंकाराची दिली पाहिजे. त्याचबरोबर सुखापेक्षा दुःखातच माणसं अधिक जवळ येतात (पृ.२१४-२१८) अशा प्रकारे कचाने ययाति व देवयानी या दाम्पंत्याचे उद्‌बोधन केले की जे आज समाजातील सर्व पती-पत्नी साठी मौलिक आहे.

शर्मिष्ठा व ययाति यांचा पुत्र पुरु याने शापित वडिलांचे वार्धक्य स्वीकारले व त्याचे यौवन ययातिला दिले. शुक्राचार्यांसारखे तपस्वी कुणालाही वार्धक्याचा शाप देतील हे कचाने लक्षात घेऊन असले कृत्रिम वार्धक्य दूर करण्याची सिद्धी त्याने प्राप्त करुन घेतली. त्या सिद्धीच्या बळावर त्याने एका क्षणात पुरुचे यौवन त्याला परत दिले.(पृ.३६२) कचाने केलेल्या कार्यांचा आढावा घेताना असे सांगता येईल त्याने संजीवनी विद्या दानवांच्या राज्यात जाऊन कितीसाहसाने संपादन केली आणि दानवांचा डाव त्यांच्यावरच उलटविला. शुक्राचार्यांसारखे तपस्वी संजीवनीसारखी कसली तरी विचित्र विद्या संपादन करतील आणि पुन्हा देव दानवांमध्ये युद्धे सुरु होतील. आपणही उग्र तप करुन उमाशंकरांना प्रसंन्न करुन घ्यावे आणि जगात शांतीच राज्य कसं स्थापन होईल, हा मंत्र तेवढा मला सांगा असा हट्ट त्यांच्या पायाशी करावा असे कचाला वाटले.

कच काही जन्मतः विरक्त नव्हता देवयानीवर त्याचे मनोमन प्रेम होते त्याने स्वतःच्या सुखापेक्षा स्वजाती विषयीचे कर्तव्य श्रेष्ठ मानले. त्या कर्तव्यापायी प्रेमाचा त्याग केला. त्या त्यागाने त्याचे जीवन विफल, उदास किंवा निष्क्रिय झाले नाही.(पृ.३६२) हाच प्रेम त्याग केलेला कच जेव्हा ययाति बरोबर विवाह बद्ध झालेल्या देवयानीच्या महालात जातो तेव्हा देवयानी त्याला आसनावर बसायला सांगते व पाहुण्यांना घरासारखं व्हावं लागत. पण मी काही पाहुणा नाही. हे माझंच घर आहे. बहिणीच्या घरी भावाला कधी परकेपणा वाटतो का?(पृ.२०८) म्हणजेच कचाने देवयानीला तिच्या विवाहानंतर बहीण मानले.

पूर्वी कचाची देवयानी प्रेमिका होती. कच कर्तव्यपूर्तीसाठी तिच्याशी विवाह करत नाही हा देवयानीवर त्याने अन्याय केलेला वाटतो. कचात हा बदल त्याच्या मध्ये असलेल्या यतिवृत्ती (संन्यासी वृत्ती) मुळे होतो. मनुष्याच्या मनात इतके परिवर्तन करण्याचे सामर्थ्य संन्यासीवृत्तीमध्ये असते हा घटक आपणास विचारप्रवृत्त करण्यास भाग पाडतो. कांदबरीच्या माध्यमातून कर्तव्यतत्पर व जीवनाचे आदर्श तत्वज्ञान सांगणारा कच देवयानीच्या दृष्टिकोनातून पाहिल्यास कृतघ्न वाटतो. कारण कचावरील प्रेमापोटी देवयानीने कचाला जिवंत करण्यास तीन वेळा शुक्राचार्यांना भाग पाडले. अशा देवयानीच प्रेम कचाने झिडकारले व 'कोणताही ऋषिपुत्र तुझं पाणि ग्रहण करणार नाही' असा त्याने देवयानीला शाप दिला. यातून कचाचे वागणे देवयानीच्या बाबतीत मात्र अयोग्य वाटते. परमेश्वर प्राप्तीसाठी संन्याशी जीवन स्वीकारलेला यति जेव्हा पुढे भ्रमिष्ठासारखा वागू लागतो त्याचे कचाच्या सहवासाने परिवर्तन होते. शर्मिष्ठेची जेव्हा देवयानीचे दासीपण स्वीकारण्याविषयी द्विधा मनस्थिती होते. त्यावेळी कचाने केलेल्या उपदेशामुळेच ती दासीपण स्वीकारण्याचा निर्णय घेते. कचासारखा विरक्त, त्यागी, पवित्र, असा भाऊ लाभला याचा शर्मिष्ठेला अभिमान वाटतो. त्याच प्रमाणे पित्यालाच श्रेष्ठ मानणारी देवयानी, शुक्राचार्यांपेक्षा कच खरा ज्ञानी आहे असे खात्रीने सांगते.

अशा प्रकारे कचाच्या आदर्श व्यक्तिमत्वाचा देवयानी ययाति, यति, शर्मिष्ठा, पुरु यांच्यावर प्रभाव पडतो. आणि त्याने वेळोवेळी केलेला उपदेश समाजप्रबोधन करण्यास महत्वाचा वाटतो.

**यति :**

यति हा हस्तिनापूरच्या नहूष महाराजांचा मोठा पुत्र होता. त्याचा जन्म अंगिरस ऋषींच्या आशीर्वादाने झाला म्हणून त्याची आई प्रत्येक वाढदिवसाला त्याला घेऊन त्या ऋषींच्या दर्शनासाठी त्यांच्या आश्रमात जायची एकदा असाच तो त्या आश्रमात गेला तेव्हा रात्री त्याला भलभलती स्वप्ने पडू लागली. तो हळूच उठून जवळच्या पर्णकुटीत गेला. नेमकं त्यावेळी आश्रमातले शिष्य बोलताना त्याने ऐकले 'या नहुष राजाची मुलं कधी सुखी होणार नाहीत' (पृ.४४) आणि तेव्हाच यतिने दुःखी राजपुत्र होण्यापेक्षा सुखी संन्यासी व्हायचे ठरवले. भटकत भटकत तो हिमालयात गेला. तिथं त्याला एक हटयोगी गुरू भेटला. तो एका जागी फार दिवस राहत नाही. त्याच्या दृष्टीने कशाचीही आसक्ती असू नये. आसक्ती हा आत्म्याचा सर्वांत मोठा शत्रू आहे. कुठल्याही जागेच थोडसं प्रेम वाटू लागलं, की ती तो तत्काळ सोडतो. त्याच्या मते 'जग जिंकण्या इतकं मन जिंकण सोपं नाही!'(पृ.४५)

खरंतर मुलाचे पाय पाळण्यात दिसतात त्याप्रमाणे ह्या यतिला लहानपणापासून देवाधर्माचा नाद होता. दासीने आणून ठेवलेल्या फुलांचा त्याने कधीही वास घेतला नाही त्यातली फुलं दगडाचा देव करून त्याला वाहायचा. समाधी लावून डोळे मिटून बसायचा दाढी लावून ऋषी व्हायचा. तो भित्र्या स्वभावाचा होता. राजवाड्यात आलेल्या तपस्वी, संन्याशी यांच्याशी त्याची मैत्री व्हायची. हाच यति पुढे स्वतः संन्याशी झाल्यानंतर त्याला पाण्यावरून किंवा अग्नीवरुन चालणे हे जमिनीवरुन चालण्या इतकं सोपं वाटायचं. पूर्व आर्यावर्तातले जादुटोण्यासाठी प्रसिद्ध असलेले लोक त्याच्या पुढे नांगी टाकायचे. पण या सिद्धीवर तो संतुष्ट नव्हता. स्त्रियांचा त्याला खूप राग यायचा. साऱ्या जगातल्या स्त्रियांचे पुरुषात रुपांतर करुन टाकण्याची महत्वाकांक्षा त्याने मनात बाळगली. आणि ही सिद्धी प्राप्त करण्यासाठी त्याने अघोर व्रते केली. नेमकं त्यांच वेळी शुक्राचार्यांच्या संजीवनी विद्येची वार्ता त्याला समजली त्यांच्या सारखे गुरु आपल्याला इष्ट मार्ग दाखवतील म्हणून तो राक्षसराज्यात गेला. स्त्रियांविषयी इतका राग असण्याचं कारण म्हणजे इंद्राणीच्या मोहाने मोहीत झालेले नहुष महाराज एका पालखीत बसले व ती पालखी मोठमोठ्या ऋषींच्या खांद्यावर होती. ती पालखी त्यांनी वेगाने चालवावी म्हणून अगस्त ऋषींना नहूषाने लाथ मारली व त्याच ऋषींनी 'नहुषाची मुले सुखी होणार नाहीत' असा शाप दिला. आणि हा शाप यतिला कळल्यामुळे तो सुखाच्या शोधासाठी बाहेर पडला. आणि याला कारण बाबांचा इंद्राणी विषयीचा मोह हेच होते की ज्यामुळे त्याला स्त्रियांचा राग यायचा.

जेव्हा तो कचाला भेटतो त्यावेळी तो त्याला बुद्धिभ्रंश झालेला संन्यासी वाटतो. कचाच्या संगतीने त्याचे परिवर्तन झाले भृगुपर्वतावर तो मातेच्या व कचाच्या बरोबर राहू लागल्यामुळे तो किंचित सावरला त्याला अष्टोप्रहर स्थिर करण्याचा प्रयत्न करीत होता. त्या दोघांची सतत चर्चा चाले प्रहर प्रहर वादविवाद चालत त्यातूनच शेवटी यतिला जीवनाचा सुवर्णमध्य सापडला (पृ.३०७) शर्मिष्ठेची व त्याची जंगलात भेट झाली तेव्हा तिला वाटते. पूर्वी भ्रमिष्टासारखी दिसणारी दृष्टी आता प्रेमळ वाटली. एखाद्या विहिरीतले शेवाळ बाजूला केल्यावर आतले स्वच्छ पाणी दृष्टीस पडावे तसा भास तिला त्याच्याकडे पाहून झाला.

**अंगिरस :**

अंगिरस ऋषींच्या आशीर्वादाने यतिचा जन्म झालेला असतो. त्यामुळे यतिच्या वाढदिवशी आई त्याला त्या ऋषींच्या दर्शनाला घेऊन जायची. देव दानवांचे महायुद्ध सुरु होण्याचा संभव निर्माण झाला म्हणून अंगिरसाने शांती यज्ञ करण्याचा संकल्प सोडला होता. त्या यज्ञात दैत्यांनी

बाधा आणू नये म्हणून ययातिला अंगिरसांनी बोलावून घेतले. ययातिला अचानक अमात्यांनी एका दुताकरवी नहुष राजाची प्रकृती बिघडल्याचा निरोप पाठविला तेव्हा अंगिरसांचा निरोप घेण्यासाठी ययाति त्यांच्याकडे गेला. तेव्हा अंगिरसांनी ययातिला जो उपदेश केला तो अतिशय मोलाचा होता. ''धर्मसेवेप्रमाणे पितृसेवा हेही तुझं कर्तव्य आहे.'' त्याचबरोबर अंगिरस त्याला उपदेश करत होते सुखं अनेकदा मृगजळाचा शोध ठरतो. सुख ही दुःखाची छाया आहे, की दुःख ही सुखाची सावली आहे. तेव्हा सुख दुःखाच्या कोड्यात तू पडू नकोस. धर्म, अर्थ, काम हे तुझे पुरुषार्थ आहेत. अर्थ आणि काम हे धर्माच्या संगतीने योग्य वाटतात. जगात माझ्याशी जस वागावं अस आपल्याला वाटतं तस तू जगाशी वाग या श्रद्धेने तू वागलास तर तुला धर्मबुद्धी प्रकाश मिळेल. तसेच ययातिच्या मनात जी त्याच्या वडिलांना दिलेल्या शापाची भीती होती ती भीती दूर करण्याचा अंगिरसांनी प्रयत्न केला. 'या जगात जन्माला येणारा प्रत्येक शापित असतो!'(पृ.५९) तेव्हा ययातिला वाटते जीवन म्हणजे फक्त शापच आहे. या शंकेचं निरसन अंगिरस करतात. जीवन हा एक दिव्य वर आहे तो परमेश्वराचा कृपाप्रसाद आहे. तो अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे. या शापातून मुक्त होणं हाच मानवी जीवनाचा हेतू आहे. शारिरीक सुख दुःखाची अनुभूती हा केवळ मनुष्याला मिळालेला वर आहे. व या अनुभूतीच्या जोरावर तो शापातून मुक्त होईल. पण शरीर सुख हा काही मानवी जीवनाचा मुख्य निकष नाही. तो निकष आहे आत्म्याचं समाधान.(पृ.५९) अशा प्रकारे अंगिरसांने ययातिला उपदेश केला व अंगिरसाच्या माध्यमातून लेखकाने मनुष्य जातीला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरे दिली व त्यातून समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला.

**शुक्राचार्य :**

शुक्राचार्य हे दैत्यांचे गुरू होते. महर्षी शुक्राचार्य म्हणजे ज्यांनी संजीवनी विद्या संपादन करुन देवांना 'त्राहि भगवन्' करुन सोडलं, राक्षसांचा अजिंक्य गुरू देवयानीचा पिता होता. राक्षसांनी कचाला मारले व त्याच्या हाडांची भुकटी करुन ती शुक्राचार्यांच्या मद्यात टाकली. कचाने तेथे संजीवनी मंत्र संपादन केला. देवयानीच्या कचावरील प्रेमापोटी तिने शुक्राचार्यांनी कचाला संजीवनी मंत्रासह जिवंत करण्यास सांगितले. कच संजीवनीसह जिवंत झाला.

शुक्राचार्य हे जितके थोर तितकेच कोपिष्ट ब्राह्मण होते. संजीवनी विद्या गमावल्यामुळे तिच्यापेक्षाही प्रभावी विद्या संपादन करायची व दैत्यांना देवाहून श्रेष्ठ करायचे अशी त्यांची महत्वाकांक्षा होती. संजीवनी विद्येनं मेलेला मनुष्य जिवंत करता येतो. आता जिवंत मनुष्य नुसत्या मंत्राने कसा मारता येईल, ही विद्या संपादन करण्याचा शुक्राचार्यांनी निश्चय केला होता.(पृ.३०९)

देवयानीवर त्यांचे फार प्रेम होते. संजीवनी विद्या गमावल्यानंतर ते देवयानीला सांगतात संजीवनीचा स्वामी असलेला तुझा बाप आज हजारो जोगड्यांतला एक बैरागी आहे. नखं आणि दात गेलेल्या सिंहानं जगावं कशाला. भणंग भिकारी झालेल्या तुझ्या बापाला 'माझी मुलगी पदरात घ्या!'(पृ.१२९) अस म्हणून दुसऱ्याचे पाय धरण्याची वेळा आली आहे. ययाति सारखा जावई लाभला पण जावयाचे मात्र त्यांना कौतुक नव्हते. संजीवनी सारखीच दुसरी तपश्चर्या संपादन करुन ते खूप वर्षांनी देवयानीचा सुखी संसार पाहायला येतात. पण आपली मुलगी दुःख सागरात बुडालेली ते पाहतात व याला ययाति जबाबदार आहे. म्हणून ते ययातिला शाप देतात 'माझ्या समोर उभा असलेला पापी ययाति या क्षणी जख्ख म्हतारा होवो!!'(पृ.३७४) आणि शुक्राचार्यांच्या शापवाणीने ययाति म्हातारा होतो. ययाति दयेची याचना करतो व देवयानी म्हणते बाबा यांचं पहिलं रुप यांना परत द्या तेव्हा ते उःशाप देतात. तुझ्याच रक्ताचा तरुण आनंदाने पुढं आला, तर तू इच्छा करशील, त्या क्षणी ते वार्धक्य त्याच्याकडं जाईल. त्याचं तारुण्या तुला मिळेल. आणि ययाति व उसनं तारुण्य त्याच्या मृत्यूनंतर त्या तरुणाला मिळेल. पण हा उश्शाप देवयानीला शापाहून भयंकर वाटला. कोपिष्ट शुक्राचार्य तेथून निघून गेले. शुक्राचार्यांना आपल्या जीवनात आपल्याला अपमान व पराजयच आला याची खंत शेवटी वाटते. सगळं आयुष्य तपश्चर्या करण्यात व विद्या संपादन करण्यातच व्यतीत केलेले शुक्राचार्य व्यक्तिगत आयुष्यात मात्र अपमानीत व पराजीत राहिले.

**पुरु :**

पुरु हा शर्मिष्ठा ह्या त्यागी वृत्तीच्या आईचा त्यागी मुलगा. ययातिला शुक्राचार्य वार्धक्याचा शाप देतात आणि नंतर तुझे हे वार्धक्य तुझ्या रक्त्याच्या तरुणाने घेतल्यास तुझे वार्धक्य त्याला मिळेल व त्या मुलाचे तारुण्य तुला मिळेल असा उशाप देतात. तेव्हा रागावलेली देवयानी पुरुला त्याचं वार्धक्य घेण्यास सांगते. पुरु म्हणाला, ''राजकन्या असून, आपल्या कुळासाठी दासी झालेल्या आईचा मी मुलगा आहे. मी आपलं वार्धक्य घ्यायला तयार आहे.''(पृ.३८०) वासनेच्या आहारी जाऊन ययातिने आपले वार्धक्य पोटच्या मुलाला दिले व त्याचे तारुण्य स्वीकारले. पण शेवटी पुरुला आपले यौवन पुन्हा प्राप्त होते. कारण कचाने कृत्रिम वार्धक्य दूर करण्याची सिद्धी प्राप्त करुन घेतली होती. त्या सिद्धीच्या बळावर त्याने एका क्षणात पुरुचे यौवन त्याला परत दिले.

पुरुने वार्धक्य स्वीकारलं तेव्हा ययातिने राज्य त्याला दिले होते पण यौवन परत मिळताच पुरु धावत देवयानीकडे गेला तिच्या पायावर डोकं ठेवून म्हणाला, ''आई यदु माझा वडील भाऊ आहे. बाबांनी मला राज्य दिलय् पण मी ते घेणार नाही.''(पृ.३९३) पुरुला राज्याचा मोह नाही.

त्याला आई व भाऊ हवा आहे. पुरुच्या या वागण्याने स्वाभीमानी देवयानी प्रथम विरघळली. त्याच्यासारख्या त्यागी, पराक्रमी मुलाने देवयानीला आई म्हणून हाक मारली तेव्हा तिला खूप आनंद वाटतो. दस्यूच्या कैदेत सापडलेल्या भावाची मुक्तता करणारा पराक्रमी पुरु, शर्मिष्ठेसारख्या त्यागी मातेचा पुत्र शोभणारा, पित्याच्या इच्छा वार्धक्य आनंदाने स्वीकारणारा पुत्र, राजाच्या सिंहासनापेक्षा भाऊ, देवयानी सारखी आई या नात्यांचा हव्यास करणारा असा हा पुरु आपल्याही मनाला भूरळ पाडतो. शेवटी प्रजेलाही पराक्रमी पुरुच राजा म्हणून हवा असतो. व तो शेवटी राजा होतो. जणू काही ज्योतिषाने सांगितलेली भविष्यवाणी 'पुरुच्या हातावर चक्रवर्ती राजाच्या खुणा आहेत' हे अखेरीस खरे ठरते.

**नहुष :**

ययातिचे वडील, हस्तिनापूरचे सम्राट नहुष हे अतिशय शूर असे राजे होते. पूर्ववयात त्यांनी दस्यूंचा पराभव केला. ऋषींनी त्याला अभय दिले. इंद्राचा पराभव केला. व नहूष महाराज स्वर्गाचा राजा झाला. पण हे इंद्रपद त्यांना मिळाले इंद्रपदाच्या प्राप्तीमुळे त्यांना गर्व झाला माझ्या एवढा पराक्रमी त्रिभुवनात नाही याने तो मदोन्मत झाला. इंद्राणीकडे भोगदासी म्हणून पाहू लागला. इंद्राणीने एक अट घातली. त्याच्या पराक्रमाला शोभेल अशा वाहनात बसून त्याने तिच्या मंदिरात प्रवेश करावा. तसेच ऋषींनी वाहून नेलेली पालखी त्रिभुवनातील अलौकिक वाहन होईल. अस तिनं सुचविल्यामुळे तर त्याच्या उन्मादात आणखीनच भर पडली. मोठ मोठ्या  ऋषींच्या खांद्यावर स्वर्गीय रत्नांनी अलंकृत केलेली महाराजांची पालखी ऋषी नेऊ लागले पण त्याची गती त्याला मंद मंद वाटू लागली. केव्हा एकदा इंद्राणीच्या मंदिरात जातो आणि इंद्राणीच्या लावण्याचा मनसोक्त उपभोग घेतो असे त्याला झाले. त्यामुळे तो चिडला वाहकांनी घाई करावी म्हणून त्यानं एका ऋषीच्या मस्तकावर लाथ मारली व ते ऋषी म्हणजे अगस्त ऋषी.(पृ.८४) त्यावर अगस्त ऋषींनी महाराजांना शाप दिला, 'या नहुष राजाची मुलं कधी सुखी होणार नाहीत'(पृ.४४) आणि जेव्हा हा शाप यतीला कळतो तेव्हा तो बालवयातच सुखाच्या शोधासाठी बाहेर पडतो. याच नहुष महाराजांना आयुष्यभर ते दुःख सहन कराव लागते आणि म्हणूनच या शापामुळे त्यांचा इंद्रावर व देवपक्षावर राग होता.

ययाति अंगिरस ऋषींच्या आश्रमात असताना नहुष महाराजांची प्रकृती बिघडली असा त्यांना निरोप कळतो. ययाति निरोप कळताच नुहुष महाराजांच्या महलात येतो. मृत्यूसमयी ते ययातिच्या बरोबर विलाप करतात त्यांना मृत्यू नको असतो कारण 'हे सारे सौंदर्य, हे सारे वैभव

इथंच टाकून जाव लागणार' यांची त्याना खंत वाटत होती. आईसमोर उभी होती ते म्हणतात, ''या अमृताची माझी तहान अजून भागली नाही.'(पृ.६२) हस्तिनापूरचा दिग्विजयी सम्राट अश्रू ढाळीत होता, हे त्याचे रुदन होते. ययातिला ते सांगत होते ययु मला जगायचय. तुम्ही सारे कृतघ्न आहात! तुम्ही आपल्या आयुष्यातला एक एक दिवस मला द्या. पराक्रमी असलेला राजा ज्याने इंद्रपद भूषविले पण मरणाच्या दारात मात्र तो याचक ठरतो. किती ही सुख भोगले तरी त्याची सुखाची, उपभोगाची आसक्ती अतिशय तीव्र होती व त्या आसक्तीसाठी त्याला मरण नको वाटते.

**माधव :**

हस्तिनापूरच्या राजकवींचा दुसरा मुलगा माधव तो मोठा रसिक आणि बोलका होता. ययातिचे वडील जेव्हा मृत्यूशय्येवर होते तेव्हा तो अतिशय व्यथित झाला होता. त्यावेळी ययातिचे मन रमविण्यासठी माधवला त्यांच्या सेवत ठेवले होते. ययातिने माधवला जन्ममृत्यूचे गुढ उकलण्यासाठी एखाद्या पंडिताकडे नेण्यास सांगितले. पंडिताच्या विनोदी कथा सांगून माधवने ययातिला खूप हसविले. माधवच्या थोरल्या भावाला काव्याचा नाद होता थोरल्या भावाच्या पत्नीच्या मृत्यूनंतर त्याचे मन संसारात रमेना मग तीर्थयात्रेला गेला त्यामुळे घरात भावाची पत्नी, वृद्ध आई व भावाची मुलगी तारका या सर्वांची जबाबदारी माधववर होती.

जेव्हा देवयानीने शर्मिष्ठेला राजवाड्याच्या तळघरात कोंडले तेव्हा ययातिने तिला तेथून सोडवून अशोकवनात माधवाच्या हाती सुपुर्द केले व तिला रथात बसवून राजधानी बाहेर सोडविण्याची जबाबदारी सोपविली ती त्याने यशस्वी पणे पार पाडली पण त्या रात्री तो पावसात भिजल्यामुळे खूप आजारी पडला. त्यावेळी त्याचे माधवी नावाच्या गोड अश्राप पोरीबरोबर लग्न ठरलेलं होतं. तसेच तारकेला सांभाळण्याची जबाबदारीही त्याच्यावर होती. 'माधवीने व मी पाहिलेली स्वप्ने आम्हांला पुरी करायचीत' असेही तो म्हणत होता. पण मृत्यू त्याचे काम अचूक करतो त्याचा खूप कार्यभाग राहिला असतानाही त्याला मरणाला सामोर जावे लागते.

**यदू :**

यदू हा देवयानी व ययाति यांचा पुत्र होय. दस्यूवर आक्रमण करण्यासाठी यदू जातो. एका चकमकीत यदू आणि त्याच्या बरोबरीचे काही शूर सैनिक यांना दस्यू कैद करुन नेतात. पण पुरु त्याच्या मदतीला जातो. व दस्यूंच्या कैदेतून सोडवून आणतो. दोन भावांचे एकमेकांविषयीचे प्रेम यातून व्यक्त होते.

**४.२.२ रथचक्रः**

**मौनीबुवा :**

'रथचक्र' या कादंबरीतील मौनीबुवा हा 'ती', चा पती आहे. त्याच्या कपाळावर खूण कानाच्या पाळ्यांवर दाट केस, बटबटीत डोळे, पाठीमागून चपटक असलेलं डोक कोपरांपासून कापलेला डावा हात असं त्याच व्यक्तिमत्व होत.(पृ.१) अगदी लहानपणापासून देवाचं नाव घेत कडूनिंबाच्या झाडावर तासनतास बसून असे. एक दिवस झाडावरून पडला. रात्रभर थोरलीच्या मांडीवर डोकं ठेवून विव्हळत होता. त्या विव्हळण्यात सुद्धा तो देवाचं नाव घेत होता. त्यावेळी कोपरापासून त्याचा हात कापावा लागला.

त्याची मुंज झाली. त्यानंतरची गोष्ट शेजारच्या काकांनी पाहिलं अशोकाच्या झाडाखाली तो ध्यानस्थ बसला होता. तो त्यांना स्थितप्रज्ञ वृत्तीचा वाटला. काकांनी त्याच्या पायावर फुलं ठेवली दर अमावस्येला त्याच्या अंगात येत असे. लखनौच्या भावाला या साऱ्या गोष्टींचा राग येत होता. या भावालाही सगळी माणसे जगातून उठवणार म्हणून लखनौवाल्याने त्याला त्याच्याबरोबर नेलं. ध्यान, जप सगळ्यांना बंदी घातली. हिंदी शिकवण्यासाठी मास्तर ठेवला. बुट, पॅन्ट घालून आपल्याबरोबर फिरायला नेलं. एकादशी करायची नाही म्हणून ताकीद दिली. तेथे अमावस्येला त्यांच्या अंगातही आले नाही. पण तो तेथून पळून आला. डोंगरावर जाऊन बसला नुसत्या दुर्वा खाऊन अनुष्ठान सुरु केले. भाऊ न्यायला आले तेव्हा रडू लागला. भावांनी धीर दिला 'या पुढं तुला आम्ही अंतर देणार नाही.'(पृ.६३) त्यानंतर तीनच महिन्यांनी त्याचे लग्न लावून दिले. शेजारच्या काकांनीच त्याच्यासाठी मुलगी शोधली. लखनौवाल्याची त्याचे लग्न लावून देण्याची इच्छा नव्हती. अखेर भावांनी त्याचं लग्न लावून दिले. लग्न झाल्यानंतर सहा महिने झाले तरी तो बायकोच्या खोलीकडे फिरकला नव्हता. सगळ्या जावांनी दोघांची भेट घडविण्याचे ठरविले. त्याची वाट पाहात असताना केव्हातरी झोपेत तिला बिलगला आणि तिला काही कळण्याच्या आतच तेथून पसार झाला. त्यानंतर आठवडा झाला की चोरासारखा खोलीत यायचा घिसाड घाईने कार्यभाग उरकायचा आणि निघून जायचा आणि दुसऱ्या दिवशी पाप घडलं म्हणून नाक धरून देवघरात तासनं तास बसायचा.

घरातल्या सगळ्यांची त्याच्यावर श्रद्धा होती. अमावस्येला त्याच्या अंगात आले की सगळे लीन होऊन त्याच्यापुढे बसायचे. त्याचे उपवास असायचे. निर्जळ्या असत. दर महिन्या दोन महिन्या आड सप्ताह करी सड्यावरच्या मठीत गोमूत्र पिऊन त्यानं सप्ताह केला. दिवसेंदिवस त्याच

संसारात मन रमेना. तो या सगळ्या कर्मकांडात जास्तच गुरफटत गेला. धाकटी मुलगी गर्भात नुकतीच हालचाल करत असेल तेव्हा तो घरातून पळून गेला. त्याच्या पलायनाचा दिवस घरात पुण्यतिथी सारखा पाळला जाई. बिचारा कोठे असेल? याची सर्वजण चिंता करत. कुठून बातमी आली की त्याच्या वर्णनाशी जुळणारी व्यक्ती अमूक ठिकाणी पाहिली की घरचे लोक त्याला शोधण्याचा प्रयत्न करीत. ही गोष्ट मौनीबुवाला समजली की तो त्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी निघून जायचा. तो घरी परत यावा म्हणून घरातले सर्वजण फार प्रयत्न करायचे पण 'ती' मात्र त्याच्या येण्याचा धसका घ्यायची. तिला त्याच्या बद्दल कधीही प्रेम वाटले नाही. उलट त्याचा तिला तिरस्कार वाटायचा चार मुलांची जबाबदारी तिच्यावर टाकून तो तेथून आत्मोद्धारासाठी पलायन करतो. त्याचा परिणाम तिला व तिच्या मुलांना निराधार म्हणून जीवन जगावं लागतं. घरात, त्याच्या गावात एव्हढेच काय पण तालुक्याच्या गावी देखील त्याला मान होता. शिकले सवरलेले शेजारचे काका देखील त्याला पुण्यवान मनुष्य मानायचे. लहानपणी बापाचं प्रेम न मिळालेला मुलगा वडीलांच्या चांदीच्या पादुकांवर लीन व्हायचा. तिच्या पाठीमागे नवऱ्याची पुण्याई आहे असं सर्वांच मत होते. बारावर्षानंतर मौनीबुवाचं आगमन आणि धाकट्या मुलाचं पलायन एकाच वेळी घडते. मुलगा कोठे गेला असेल याची कोणालाही विवंचना नव्हती. चार दिवस तो तालुक्याला आपल्या कुटुंबा समवेत राहात होता पण त्याने एकदाही बायको व मुलांची प्रेमाने चौकशी केली नाही एखादे अजाण मूल घरात वावरावे असे त्याचे वागणे होते. पहिल्या दिवसापासून त्याच्या दर्शनासाठी लोक यायचे. त्याच्या भोवती बसायचे. तो पद्मासन घालून बसायचा.

थोरल्या जावेला भेटण्यासाठी तो घरी आला. जावा त्याच्या पायावर दूध –पाणी घालतात. तिच्या हातात पंचारती देऊन पतीला ओवाळायला सांगतात. घरी आल्यावर थोरल्या जावेच्या पाया पडतो. थोरली त्याला डोळे भरून पाहते आणि कोलमडून बेशुद्ध पडते. तो काही तरी मंत्र म्हणतो थोड्यावेळाने ती शुद्धीवर येते. लखनौवाला ही त्याच्या पुढे नतमस्तक होतो. शेजारच्या काकांना महारोग झाला म्हणून त्याच्या मुलांना वाटते पण मौनीबुवा त्यांना इसब आहे असे सांगतो व आठ दिवसात ते बरे होतील असे सांगतो.

या कादंबरीतलं मौनीबुवा हे व्यक्तिमत्व. कर्तव्यशुन्य असूनही प्रमुख पात्रांमध्ये गोवलं गेलं आहे. एक पती म्हणून किंवा चार मुलांचा बाप म्हणून त्यानं कोणतही कर्तव्य पार पाडलं नव्हत. लग्न करुन एका स्त्रीचं जीवन उद्धवस्थ केलं होतं. त्याच्या पत्नीला त्याचा वैरागी जीवनाच्या

ढोंगीपणाचा खूप राग यायचा. पण लोक त्याला देत असलेला मान पाहून ती अंतःर्मुख झाली. आपली काही त्याला समजून घेण्यात चूक होते की काय असा तिला संभ्रम निर्माण होतो. कारण त्याच्या सामर्थ्याने थोरली शुद्धीवर येते. लखनौवाल्याचा या बुवाबाजीवर विश्वास नव्हता पण तो देखील मौनीबुवा पुढे नतमस्तक होतो. धाकटा मुलगा ग्रहणाचा अभ्यास करणारा हुशार मुलगा तो देखील आपण पहिला आल्याचे श्रेय वडिलांच्या पुण्याईला देतो. अशा तऱ्हेने कर्तव्यपराङ्मुख असूनही कादंबरीत लेखक त्याला मानाचे स्थान प्राप्त करुन देतो.

**लखनौवाला :**

लखनौवाला लहानपणापासून हुशार होता. लहानपणी घराबाहेर पडला, वार लाऊन शिकला. मोठा झाला तरीसुद्ध शिक्षणाचे महत्त्व घरात कोणालाही पटत नाही याचे धाकटीला आश्चर्य वाटत होते. तो घरी आला की एखाद्या पुतन्याला शिक्षणासाठी लखनौला घेऊन जाऊ पण कोणीच त्याची ही गोष्ट मनावर घ्यायचं नाही.(पृ.४) धाकटीला वाटायचे आपल्या धाकट्या मुलाने लखनौच्या काकांकडे राहावे आणि खूप शिकावे लखनौवाल्याची बायको शिकलेली होती. त्याचा मुलगा आय.सी.एस. ला नापास झाला तेव्हा मौनीबाबाला भेटण्यासाठी मनःशांती साठी तो त्यांच्याकडे गेला होता.

मौनीबाबा दिसल्याची बातमी कुठून आली की लखनौवाल्याला कळविले जाई. त्याला घरी घेऊन येण्यासाठी लखनौवाल्याकडे तगादा लावला जाई. कारण त्याला घेऊन यायचे म्हणजे पैसे हवेत. पण लखनौवाल्याचे विचार थोडे उच्च दर्जाचे होते. बायकापोरांची जबाबदारी दुसऱ्यावर टाकून स्वतःचा उद्धार करण्याकरीता निघून जाणाऱ्या माणसाकरीता त्यांच्याकडे सहानुभूती नव्हती. संसारात मन रमत नाही तर पोरं कशी झाली? हा सवाल लखनौवाला आपल्या भावांना विचारतो.(पृ.१२) आपले भाऊ एकजात नालायक आहेत, असं त्याचे मत होते. ते पैसे मिळवतात किती, उधळतात किती, त्यांना कर्ज किती? खोटी कारण सांगून आपल्याकडून पैसे कसे उकळतात. सारं त्याला कळत असे.(पृ.५) हा दीर तऱ्हेवाईक असला तरी शहाणा आहे असं 'ती'ला वाटायचं.(पृ.५) लखनौवाला अंधश्रद्धाळू नाही. त्याच्यामते देवाचं करु नये असे त्याचे म्हणणे नाही पण माणसाने प्रथम आपल्या आयुष्याचा विचार केला पाहिजे.(पृ.७)

लखनौवाला बोलतो, ओरडतो. तो कडक शिस्तीचा आहे. पण पुरुषांसारखे पुरुष त्यांच्यापुढे लुळे का पडतात? असा प्रश्न धाकटीला पडायचा.(पृ.९) थोरलीचा लखनौवाल्यावर जीव होता. थोरलीचा तो लाडका आहे असं सगळे भाऊ म्हणत. पण थोरली निषेध करी; पण

तिचा धारवाडी काटा थोडा झुकता होता हे खरंच.(पृ.२१) थोरलीने लखनौवाल्या दिराला अगदी लहानपणापासून सांभाळले होतं. त्यामुळे ती त्याला आईच्या ठिकाणी वाटायची थोरली बद्दल त्याला  फार आदर होता. आमच्या कातड्याचे जोडे करुन घातले तरी, तरी तुझे ऋण फिटायचे नाहीत असे तो थोरलीला म्हणायचा.(पृ.१९९) गावाला आला की, थोरलीकडे त्याची बैठक असे तो थोरलीला आपल्या संसाराची हकिकत सांगायचा. लखनौला येण्याचा आग्रह करायचा.(पृ.२१)

लखनौवाल्याच्या पैशाला यश नाही असं घरात सगळी म्हणत.(पृ.२९) लखनौवाल्याला सासुरवाडीहून डबोलं मिळालं असं धाकट्याला कुठून तरी कळल होत. लखनौवाला इस्टेटीच्या वाटण्या करायला सांगणार होता. वाटण्या करायच्या आणि स्वतःच्या वाट्याचा हिस्सा तो मौनीबाबाला देणार होता.(पृ.२२) या विचारातून असे दिसते की मौनीबाबा व त्याच्या कुटुंबाविषयी लखनौवाल्यांच्या मनात उदारतेचा भाव होता. भावाविषयी प्रेम होते. लखनौवाल्याला सगळे कठोर मनाचा म्हणून ओळखत होते. स्वतःच्या मुलांना मारतानासुद्धा त्याच्याजवळ दयाक्षमा नसे. सातआठ वर्षापुर्वी बायको मुलाना घेऊन आला होता. तेव्हा आणखी गरे मिळाले नाहीत म्हणून त्याच्या मुलानं हातातले गरे अंगणात फेकले. त्यावेळी लखनौवाल्याने  केरसुणीच्या बुंध्यानं मुलाला बुकलीत अंगणात आणि मातीत पडलेले गरे खायला लावले. हताश होऊन सगळी त्याच्याकडे पाहात होती; पण पुढे होऊन त्याला प्रपादायला कोणी तयार नव्हतं.(पृ.३१) अशाप्रकारे लखनौवाला कडक शिस्तीचा माणूस होता.

असा हा लखनौवाला लहानपणापासूनच हुशार होता. व लखनौला नोकरीला होता. शिक्षणामुळे माणूस सारासार विचार करतो हे लखनौवाल्यामुळे समजते. मौनीबाबाचे अंगात येणे त्याला मान्य नव्हते. म्हणजे देवावर श्रद्धा असावी पण माणसाने अंधश्रद्धा बाळगू नये ज्याला आपल्या कुटुंबाचे पालनपोषण करण शक्य नाही त्याने लग्नच करु नये असा विचार त्याने मांडला. थोरलीला आई प्रमाणे मानायचा. मौनीबुवाचा राग येत असला तरी जेव्हा त्याला शोधण्याची वेळ येई तेव्हा भावांना तो मदत करायचा. त्यासाठी तिच्या बांगड्या भावांनी मोडू नयेत असे त्याने सांगितले. अंधश्रद्धा बाळगणारा नसला तरी शेवटी जेव्हा मुलगा आय.सी.एस नापास झाला तेव्हा मौनीबाबाच्या दर्शनाला गेला. बायकोला मौनीबुवाने नेम धरण्यास सांगितले. हा प्रसंग मनाला पटत नाही. तरीपण मौनीबाबाचे कुटुंबात असलेले सर्वांचे श्रद्धेचे स्थान म्हणून लेखक अधोरेखित करतो. ‘ती’च्या नजरेतून मात्र मौनीबाबाचे स्थान हे श्रद्धेचे असू शकत नाही, हे ‘ती’च्या दृष्टीकोनातून बरोबर आहे.

**'ती' चा थोरला मुलगा :**

'ती' चा नवरा पळाला तेव्हा 'ती' चा थोरला मुलगा सात वर्षाचा होता. बिचारा पोरका झाला म्हणून त्याचं घरात कौतुक चाललं होतं. दहा वर्षांचा झाला तरी त्याला कोणी शाळेत जा म्हणून सांगेना. गोंजारुन, रागावून तिनं सागूंन पाहिले; पण घरातील पुरुष मंडळी लक्ष घालणार नाहीत हे त्याला ठाऊक होत तिचं ऐकल्या न ऐकल्या सारखं करुन तो उनाडायला जाई. एक दिवस तावडीत सापडला तेव्हा त्याला तिनं आडवा उभा बदडून काढला. एकदाचा तो शाळेत जाऊ लागला. नापास होत होत चौथ्या इयत्तेपर्यंत त्याने मजल गाठली आणि आणि पुन्हा शाळेत जाईनासा झाला. अखेरचा प्रयत्न म्हणून तिनं त्याला पकडले. गिरमिटासारखा त्याचा कान पिळला. एक हिसका देऊन त्यानं स्वतःला सोडवून घेतलं आणि 'साल्ये' म्हणून ओरडला. त्यानंतर ती त्याच्या वाटेस गेली नाही. अगदीच राहवलं नाही म्हणजे आडून आडून चौकशी करी. तंबाखू खातो, विड्या ओढतो, गडी माणसात वावरतो अशा बातम्या तिच्या कानावर येत. घरात सगळी त्याला नावाजीत. कामाला वाघ. झाप विणायला उतकडावर नारळ सोलायला बसला की त्याच्या पुढे गडी माणसाना फांफू करायची पाळी येई. विहिरीपासच्या माडावरचे नारळ पाडायला पाडेकरी सुद्धा कचरत. विहिरीत लोंबकळत असलेल्या त्या माडावर माकडोसारख्या उड्या मारीत तो जाई एक दिवस पाय घसरून धाडकन विहिरीत पडला. गडी माणसांनी आरडाओरड केली. सगळी धावत विहिरीशी आली. पाण्यावर बुडबुडे आले पाठोपाठ प्रेतासारखा तरंगत तो वर आला. तिनं किंकाळी फोडली. अखेरीची आशा म्हणून तिनं विहिरीकडे पाहिलं तेव्हा उताणा पोहत आरामात तो लांगेशी येत होता.

त्याचं थोबाड आणि मस्ती यापेक्षा त्याच्या मतलबी स्वभावाचा तिला राग येई. मधल्या काका-काकूंशी तो फार प्रेमाने वागे काकूचे पाय चेपून देई काकाच्या पाठीला साबण लावून देई. आपण असे वागलो की त्यांची माया जडेल आणि ते आपल्याला दत्तक घेतील असे त्याला वाटे.(पृ.३) 'ती' जेव्हा धाकट्या मुलाच्या शिक्षणासाठी तालुक्याला जायला निघते तेव्हा थोरला मात्र पोहचवायला सुद्धा आला नाही. तालुक्याला आल्यावर तिला मात्र त्याची काळजी वाटत होती. मधला त्याला दत्तक घेणार हे तिला आवडल नव्हत कारण तिचा मुलगा एक बदफैली माणसाला बाप म्हणणार खाडीपलीकडील नायकिणीची मुलं त्याला सावत्रभाऊ म्हणणार याची तिला चिड आली. 'धाकट्याच्या शिक्षणाकरिता ती तालुक्याला आली त्या उद्योगात मोठ्याला मात्र तिनं वाऱ्यावर सोडलं.(पृ.१०३) याची तिला खंत वाटते.

तो एकदा तालुक्याला आल्यावर ती त्याला समजावून सांगते. बैलासारखं तुला राबवून घेतात आणि देतात काय? एका पैशावर तरी तुझी सत्ता आहे? त्यापेक्षा तू इथं ये शिवणकाम शिक आपण इथे सर्वजण एकत्र राहू. तो तालुक्याला आला की तेवढ फक्त ऐकून घ्यायचा पण पुन्हा गावाला जायचा. गावालाच राहून पैसा कमविण्यासाठी मुळव्याधीवर कसली मुळी देतात त्या मुळीच्या शोधार्थ दीड महिने खाजण पालथी घालीत होता. सडे धुंडाळीत होता. मधला व तो मध्यस्थी मध्ये मुळव्याधीवर औषध देण्याचा धंदा करणार होते. त्यात पैसा मिळाला की आपण आईला घेऊन वेगळं राहू असे त्याला वाटे. मधल्यादिराने सावकाराच्या फेंगड्या मुलीबरोबर त्याच लग्न जमवले होतं त्याच्या बदल्यात सावकार मधल्या दिराला पाच हजाराची प्रॉमिसरी नोट ठेवणार होता. ही गोष्ट तिला कळल्यावर तिने मुलाला खूप समजाविण्याचा प्रयत्न केला पण अखेरिस ती आपल्या नवऱ्या व मुलींसोबत गावी आली त्यानंतर थोड्याच दिवसात सावकाराच्या मुलीशी 'ती' च्या थोरल्या मुलाच्या लग्नाचा विषय निघतो तेव्हा थोरला मुलगा म्हणतो तालुक्यात व गावात कृष्णाबाई व धाकटा यांची जी बभ्रा झाली आहे त्यामुळे मला मुलगी मिळणार नाही आणि त्यामुळे मला आता सावकाराच्याच मुली बरोबर लग्न कराव लागणार. तेव्हा आई (ती) बेशुद्ध पडते. लग्नानंतर तीन दिवसांनी शुद्धीवर आल्यावर नव्या सुनेनच तिला पाणी दिले.

'ती' जेव्हा गावाला आली तेव्हा थोरला मुलगा म्हणतो आई तू फार कष्ट केलेस आता काळजी करु नकोस मी आहे असा धीर देतो. तिच्या थोरल्या मुलालाच तिच्या कष्टाची, त्रासाची जाणीव असते.

**शेजारचे काका :**

श्री.ना. पेंडसे यांनी काका ही व्यक्तीरेखा अशी साकारली आहे की, पूर्ण गावात इंग्लिश जाणणारी एकूलती एक व्यक्ती. असा त्यांना मान होता. सरकारी हुकूम, तार काही आलं की लोक काकांकडे धावत जात. काका कागद वाचीत आणि अर्थ सांगत. त्यांचा तालुक्याला ये-जा होती. तेथे ओळखी होत्या गावातल्या साडेतीन शहाण्यात त्यांची नेहमी अंतर्भाव होई. अर्धे शहाणे काका. काका हुशार खरे पण त्यांना अक्कल कमी, असं गावकऱ्यांचं मत होतं. तोंडावर त्यांना कोणी दुखवीत नसे. पाठीमागं त्यांची थट्टा होई त्याला काकाच जबाबदार होते. नको त्या ठिकाणी ते तोंड खुपशीत लोकांनी आपलं मत घ्यावं. सल्ला घ्यावा आपण मार्गदर्शन करावं, असं त्यांना वाटे हे अखेरीस स्वतःच उठून जात आणि सल्ला देत. सार्वजनिक कामाची आवड त्यांना होती. जमाखर्चात ते गोंधळ करीत कनवटीचे पैसे घालीत आणि लोक म्हणत काकांनी पैसे खाल्ले. पण

पुन्हा महत्वाच्या कामांसाठी त्यांना काकाचं हवे असतं. आणि काकाना मान दिला की ते खूश असत. काकांची मुलं मात्र त्यांच्याशी चांगली वागत नव्हती. काकांची मुलं सावकारी करायची. कधी कधी काकाही गुपचूप व्यवहार करायचे. एकदा तारणाशिवाय पन्नास रुपये दिले म्हणून मुलानी तुम्ही या फंदात पडू नका असं सांगितले पण शेवटी एका मुलानं त्यांच्यावर हात टाकला. पण तासाभराने काही घडलेच नाही अशा चेहऱ्याने काका घराबाहेर पडले सगळ्यांना सल्ला देणारा हा माणूस घरात वागताना शहाणपणा कुठं गहाण टाकतो? हा हे एक प्रश्नच होता.

'ती'च्यावर काकांचे फार उपकार होते. तिच्या धाकट्या मुलाला ते शिकवित. तो सातवीला जिल्ह्यात पहिला आला त्याच्या पुढच्या शिक्षणासाठी तिला तालुक्याला जाण्याच्या कामात काकांनी खूप सहकार्य केले. खोली पाहून देणे तिला तालुक्याला पोहचवायला ते गेले तिला घरातून तांदूळ द्यावा म्हणून त्यांनी थोरलीकडे विषय काढला. तिला काकांचा फार मोठा आधार होता. तिचे लग्न काकांनी ठरविले पण आपण या मुलीचे कल्याण केले नाही कारण तिच्या आयुष्याच्या झालेल्या वाताहतीचे ते साक्षीदार होते. त्यामुळे तिच्या या वाताहतीला आपणही जबाबदार आहोत अशी काकांना खंत होती.

महारोग झालाय म्हणून काकांनी गोठ्याच्या पडवीत कूड बांधून स्वतःकरिता खोली तयार केली. मौनीबुवा त्यांना भेटण्यासाठी गेले तेव्हा हा महारोग नाही तर इसब आहे असं त्यांना सांगितले व आठ दिवसात तो बरा होईल. काकांना तर परमेश्वर भेटल्याचा आनंद झाला. काकांचीही मौनीबाबा वर श्रद्धा होती. शास्त्रीबुवांचा हा मुलगा घराण्याचं नाव काढणार असं ते म्हणायचे. तिला म्हणायचे तुझ्या पाठीशी फार मोठी पुण्याई आहे.

अशा प्रकारे गावात एकमेव असे शिकलेले आणि सर्वांना मदत करणारे असे काकांचे व्यक्तिमत्त्व होते.

**मधला दीर :**

मधला दीर शिक्षणाला मंद होता. पण हिकमती होता. मंतरलेले गंडे विकू लागला. नाक धरुन देवघरात बसे आणि काळ्या दोऱ्याला गाठी मारी दोन दोन पैशांना गंडा विकी. वर्तमानपत्रात गंडा मिळण्याची जाहिरात दिली. जाहिरातीचा परिणाम म्हणजे गंडे नेण्याकरिता खूप लोक येऊ लागले. घरातील सगळी मंडळी काळ्या दोऱ्याला गाठी मारण्याच्या कामाला लागली. नंतर तर त्याने काही माणसे कामाला ठेवली व तो चकाट्या पिटत, गप्पा मारत फिरु लागला, काळ्या दोऱ्याला गाठी मारत, म्हणजेच लोकांची फसवणूक करत त्याने खूप पैसा कमविला. पैसा आला

आणि त्याबरोबर त्याच्या चैनी वाढू लागल्या. खर्चाला पायबंद राहिला नाही. न्हाव्यापासून सगळ्या उधाऱ्या होत्या. शेवटी अंगणात कोल्हाटणी सुद्धा नाचू लागल्या आणि शेवटी याच्या चैनी–विलासी वागण्यामुळे घर कर्जबाजारी झालं.

**'ती' चा धाकटा मुलगा :**

धाकटीच्या पहिल्या मुलानंतर दहा महिन्यांच्या आतच दुसरा मुलगा झाला म्हणून त्याच्यावर जन्मापासूनच तिचा राग होता. दिसण्यात बापासारखा म्हणून ती अधिकच नाराज होती. दृष्ट लागावी असं त्याचं बाळसं होतं.(पृ.१०) जन्माला आला तेव्हा तो सुपात मावत नव्हता तीन वर्षांपर्यंत गुटगुटीत होता.(पृ.७) पण थोट्या कुशीच्या घरी फणसाचे खूप गरे खाल्ले त्यामुळे नंतर त्याला हगवण लागली तीन महिने हागत होता. गुटगुटीत शरीर गेलं फासळ्या, मणके दिसू लागले. चिरचिऱ्या बनला. हट्ट करू लागला. वाकडं तोंड करून तिच्याकडे आला की रट्ट्या मारून त्याला ती दूर लोटी सारे त्याला रोंग्या म्हणू लागले.(पृ.११)

धाकट्याच्या बरोबरीची मुलं दोन इयत्ता पुढे गेली होती तरी हा शाळेत जात नव्हतां. त्याला बळजबरीने शाळेत पाठवावं लागत होतं. तिला फसवून त्यानं एकदा शाळा चुकवली निगडीच्या काठीनं त्याला तिन नख शिखांन्त फोडून काढलं. आडवे, उभे बसतील तसे फटके ती मारीत होती. शेवटी थोरलीने त्याला बाजूला केलं व धाकटीला म्हणाली त्याला हात लावला तर ही धुण्याची काठी टाळक्यात घालीन. दिवस भर विव्हळत होता पण तिंन त्याच्याकडे लक्ष दिलं नाही शाळेची वेळ झाली की त्याच्यावर ती पहारा ठेवत असे. त्यानंतर मात्र तो नियमित शाळेत जाऊ लागला. सातवीच्या परीक्षेपर्यंत त्यानं पल्ला गाठला. सातवीच्या परीक्षेत तो जिल्ह्यात पहिला आला. पुढच्या शिक्षणासाठी एखाद्या मुलाला लखनौला घेऊन जाईन असं लखनौवाला म्हणायचा पण धाकट्या मुलाला लखनौवाल्याचा खूप राग येत होता त्यामुळे त्याला लखनौला जायचं नव्हतं. त्याच्या पुढच्या शिक्षणासाठी ती त्याला तालुक्याला घेऊन जाण्याचा निश्चय करते पण त्याच वेळी पळून गेलेल्या बापाचा ठावठिकाणा कळल्याच्या बातमीने ती काळजीत पडते. बाप आला तर ती त्याला तालुक्याला घेऊन जाऊ शकत नव्हती. सातवीला पहिला येऊन ही हा मुलगा आनंदी दिसत नव्हता. वडीलांप्रमाणे निर्विकार वृत्तीने वावरताना दिसतो. सोळा वर्षांचा झाला तरी तो अगम्य राहिला. मोकळ्या मनानं कधी बोलला नाही. त्याच्या हुशारीच घरात कोणाला कौतुक नव्हते; पण तिच्या कौतुकाची त्याला कदर नव्हती. त्याला जवळ घ्यावं. त्याच्या पाठीवरुन हात फिरवावा, त्याला शाबासकी द्यावी असे तिला वाटे पण तिच्याकडे तो फिरकतच नसे लखनौवाल्या

दिरा प्रमाणे आई बद्दलही त्याने वेगळेच ग्रह तयार करून घेतलेत अशी तिला शंका यायची. स्वतः धाकटाच तालुक्याला यायला तयार होतो किंवा नाही याची तिला चिंता लागली होती, पण अखेरीस मुलगा तालुक्याला शिक्षणासाठी जायचं असा निर्णय तिला सांगतो त्यावेळी घरच्यांच्या विरोधाला न जुमानता ती तालुक्याला येते. तेथे आल्यानंतर आपण लखनौवाल्याला तालुक्याला येण्यापूर्वी सांगायला हवं होतं अस तिला वाटते त्यावर उपाय म्हणून लखनौवाल्याला पत्र लिहायचे ती ठरवते मुलाला पत्र लिहिण्यास सांगते. पण तुला त्याचा पुळका आला आहे तर तूच पत्र लिही असं तो सांगतो. तुझ्याच करता सांगते आहे. अडीअडचणीला त्याच्याकडेच तोंड वेंगाडायला म्हणजे पैसे मागावे लागतील असे ती सांगते तेव्हा धाकटा म्हणतो, ''माझं शिक्षण नाही झालं तरी चालेल पण ह्या माणसाची मेहरबानी मला नको.''(पृ.८८) त्याच्या शिक्षणासाठीच 'ती' तालुक्याला आली होती पण घरात तो कोणाशीही मन मोकळे पणाने बोलत नव्हता. नवऱ्यासारखाच घुम्या आतल्या गाठीचा हा मुलगा इतका हुशार नसता तर बापाचीच वाट त्याने धरली असती, असे तिला वाटायचे.

'तो' अभ्यासात खूप हुशार होता. शाळेच्या संमेलनात संस्कृतमध्ये भाषण करुन त्याने सगळ्यांना थक्क केलं होतं. पण ही बातमी सुद्धा त्याने आईला सांगितली नव्हती. मास्तरीण बाईंनी तिला सांगितलं. तो लहानपणापासूनच एक पाठी होता. फायनलच्या वर्षी त्याने 'अमरकोश' पाठ केला. त्याचे इंग्रजी पाठांतरही चांगले होते. त्याच्या संस्कृतातल्या भाषणाने गावभर त्याची हुशारी गाजत होती. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी त्याला स्कॉलरशीप मिळणार ही बातमी व संस्कृत मधल्या भाषणान त्याचं झालेलं कौतुक म्हणून 'ती' सणावारासारखं जेवण बनवते पण त्याच त्याला काहीही वाटत नाही त्यामुळे तिचा विरस होतो. नवऱ्याच्या स्वभावासारखी भावना शुन्यता आणि अलिप्तता त्याच्या स्वभावात आलेली होती.

शिक्षणाचं शेवटचे वर्ष आणि शेवटचे चार महिने राहिलेले असताना गावाकडून तांदूळ देणं बंद झालं. 'ती'ने नरवणकरांकडे नोकरी घरली पण अतिश्रमाने तिला अशक्तपणा आला जेवणाचा बाका प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. तेव्हा त्याने वार लावण्याचा विचार केला. सर्व वारांची व्यवस्था झाली की तो आई व बहिणींना गावाला जाण्यास सांगणार होता. परंतु वार लावणे म्हणजे कुणाचा मिंधेपणा घेणे आणि हे त्याला नको असं ती (आई) समजावते. मग तो कृष्णाबाई नावाच्या 'स्त्री' कडे खाणावळीमध्ये हिशोब लिहिण्याचे काम स्वीकारतो. कृष्णाबाई त्याला घरच्यांना पुरतील एवढे जेवणाचे डबे देते.

आई व बहिणीसाठी नवीन लुगडी देते त्याला अभ्यासासाठी खोलीची ही व्यवस्था करते थोड्याच दिवसात कृष्णाताई म्हणजे आपल्याला देवासारखी भेटली असं त्यांना वाटतं. परंतु नंतर तिचं खर रूप समोर येतं. ती त्याच्या भावना चाळविण्याचा नवाच डाव मांडते त्याला नादी लावते. आणि तो ही एखाद्या लहान मुलानं चॉकलेट मागाव तस नको त्या गोष्टीची तो कृष्णाबाईकडे अपेक्षा करु लागतो. परीक्षा महिन्या दीड महिन्यावर आली आणि त्याचे अभ्यासातले लक्ष उडते. पण पाय पुरता घसरण्यापूर्वीच तो भानावर येतो. आणि वडिलांच्या पादुका आणि काही पैसे घेऊन घरातून पळून जातो. पुन्हा तो मन लावून अभ्यास करतो.

लखनौवाला त्याला भेटून आलेला असतो. मॅट्रिकच्या परीक्षेत तो पहिला येतो. तेव्हा तिला खूप आनंद होतो. आपल्या कष्टाचं चीज झालं असं तिला वाटतं. मुंबईला मला तुला भेटायला यायचं आहे तेव्हा उताराचे पैसे पाठविले तर बर होईल असं ती पत्र पाठविते पण मुलगा तिच्या पत्राला अतिशय कृतघ्नपणे उत्तर देतो, कृष्णाबाईकडे आपल्या जेवणाची सोय व्हावी म्हणून मी जात होतो. पण तू त्यावेळी निर्माण झालेल्या प्रसंगात खंबीरपणे पाठीशी उभी राहिली नाहीस. केवळ वडिलांची पुण्याई पाठीशी होती म्हणून शुद्ध राहिलो. तू माझ्यासाठी केलेले कष्ट याची मला जाण आहे. पण मला आता कोणीही भेटावं अशी माझी इच्छा नाही.

असा हा 'ती'चा मुलगा सातवीत जिल्ह्यात पहिला तसेच मॅट्रिकला पहिला आलेला असा हुशार विद्यार्थी होता. एकपाठी होता. संस्कृत उत्तम जाणणारा कुशाग्र बुद्धीमत्तेचा विद्यार्थी असतो. पण तरीही तो अंधश्रद्धा माणणारा होता असे वाटते. कारण जेव्हा तिच्या थोरल्या मुलीच्या अंगात आले तेव्हा त्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची तो जमवा जमव करतो. ज्या वडिलांना आपल्याला साधे डोळे भरून पाहिलेलं देखील नाही. आपल्यासाठी एक पिता म्हणून कोणतेही कर्तव्य पार पाडलं नाही. जन्म देऊन आपली जबाबदारी ढकलून आत्मोद्धारासाठी आपल्याला वाऱ्यावर सोडून जातो त्याला हा मुलगा पुण्यात्मा म्हणतो. आणि त्याच्या पुण्याईमुळेच आपण पहिले आलो असे मानतो. जेव्हा मुंबईला पळून जातो त्यावेळी वडिलांच्या पादुका घेऊन जातो त्यावरून त्याची वडिलांवर असलेली श्रद्धा व्यक्त होते. पण ज्या माऊलीने आपल्या शिक्षणाची जबाबदारी उचलली. आपले शिक्षण पूर्ण करण्यासाठी स्वतः अनेक हालअपेष्टा सहन केल्या कोणत्याही बिकट संकटांना सामोरी गेली अशा आईच्या बाबतीत मात्र त्याच्या मनात थोडाही प्रेमाचा ओलावा नव्हता ही गोष्ट मनाला खटकते.

### ४.२.३ स्वामी :

**माधवराव पेशवे :**

'स्वामी' ही ऐतिहासिक व व्यक्तिप्रधान कादंबरी आहे. माधवराव पेशवे यांच्या कर्तृत्वाचा गौरव लेखकाने या कादंबरीत केला आहे. माधवराव जेव्हा दरबारात प्रवेश करतात. तेंव्हा त्यांची व्यक्तिरेखा वाचकांच्या मनपटलावर कोरण्याचे काम लेखकाने केले आहे. 'वयाने फार तर सोळा वर्षांची उमर. अद्यापि कोवळ्या मिसरुडांचा काळा रंग ओठावर फाकला नव्हता. गौरवर्णाची, सडसडीत पण पीळदार अंगलीचे रेखीव चेहऱ्याची माधवरांची मूर्ती आपल्या तीक्ष्ण नजरेने दरबार न्याहाळीत होती. मस्तकावरील पगडीवर हिऱ्यांचा शिरपेच शोभत होता. पगडीवरच मोत्यांच्या तुऱ्याच्या झुरमुळ्या कानाला स्पर्श करीत होत्या, कानात चौकडा, गळ्यात टपोऱ्या मोत्यांचा कंठा शोभत होता अंगात घातलेल्या तलम निम्याच्या आतील किनखापाच्या बंडीची वेलपत्ती स्पष्ट दिसत होती. वीरासन घालून बसल्यामुळे चुणीदार पायजमा अंगरख्याखाली झाकून गेला होता.'(पृ.५) प्रा.नरहर कुरुंदकर माधवरावांच्या मधल्या गुणांचा अचूक वेध घेतांना म्हणतात, ''एकाच वेळी कठोर दाहक उत्कट, उग्र आणि तितकेच हळवे, स्वप्नाळू, सुसंस्कृत असे व्यक्तित्व उभे करणे हे कादंबरीचे यश आहे.''[६] अशा या रुबाबदार दिसणाऱ्या माधवरावांनी आपल्या अल्पावधी कालखंडात महाराष्ट्राच्या मनावर अधिराज्य केले. पानिपतच्या पराभवाने नेस्तनाभूत झालेल्या महाराष्ट्राला पेशवाईला सावरण्याचे, सामर्थ्यवान बनविण्याचे कार्य माधवरावांनी केले. माधवराव मराठी राज्याचे 'स्वामी' बनले.

श्रीमंताचा दप्तरीचा अभ्यास खूप आहे. हे आपणांस दप्तरीचे कारकून श्रीमंतांचे नाव काढताच चळवळ कापतात.(पृ.१५) यावरुन समजते. तसेच माधवरावांना लष्करी खर्चापासून ते खासगीच्या आठवड्याच्या खर्चापर्यंत बारिक-सारिक माहिती आहे. राज्याचा ताळेबंद त्यांना मुखोद्गत हे सखाराम दादासाहेबांना सांगतात यावरुन माधवरावांना दप्तरीची खडान-खडा माहिती होती हे समजते.

डॉ.द.त्ता. भोसले माधवरावांच्या मृत्यूच्या विषयीचे आपले मत नोंदविताना व स्वामीच्या लोकप्रियतेचे कारण सांगताना म्हणतात, ''एक तर ही एका दिलदार, पराक्रमी व रसिक अशा उमद्या मनाची अकाली झालेली शोकांतिका आहे. मरण्यासारखे कोणतेही दुष्कृत्य या राजाने केलेले नाही. कोणताही टोकाचा दुर्गुण याच्या ठायी वसत नाही. कोणताही गुण अतिरेकी प्रमाणात वाढलेला नाही. फुलत्या वयात स्वप्नांची फुलपाखरे पकडण्यासाठी धडपडणाऱ्या या राजाला,

एकाएकी मृत्यूच पकडतो. आणि फुलायच्या ऐवजी सुकण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ होतो. ही दारुण स्वरुपाची झालेली शोकांतिका अटळ स्वरुपात जाणवते. अन् त्यामुळेच कादंबरीची लोकप्रियता वाढलेली असावी. एखाद्या निरपराध अन् समृद्ध व्यक्तिमत्वाचा क्रूर नियतीने निर्दयपणे अंत घडवून आणला असेल, तर सामान्य वाचकांच्या भावनांना छळणाऱ्या या दु:खाना उधान येते. त्या अनावर होतात. स्वामीच्या लोकप्रियतेला हे एक कारण मानता येईल. दारुण शोकांतिका! दारुण अंत.''[७]

माधवरावांना इतरांच्या गुणांची कदर होती. माधवरावांना एकदा पहाटेच जाग आली. मोरेश्वर भट गणेश महालात गात होता. त्याच्या गोड आवाजाने माधवराव रोमांचित झाले. ते स्वतः तेथे गेले व म्हणाले, ''उद्या तू कारभाऱ्यांना भेट ते तुझ्या गुणांची कदर करतील.''(पृ.२१) वेदाध्ययन, स्नानसंध्या, जपतप यातच माधवरावांचा जास्त वेळ जातो. माधवरावांनी पेशवेपद स्वीकारल्याने आता राज्यकारभारासाठी जास्त वेळ द्यावा असे सांगताना रामशास्त्रींनी त्यांची चांगलीच कान उघडणी केली. त्यावेळी माधवराव म्हणाले, '' आमची चूक झाली आम्ही तुम्हाला वचन देतो की यापुढे हा प्रकार घडणार नाही.''(पृ.४२)

रघूनाथराव बापूंच्या कान भरण्यामुळे माधवरावांच्या विरुद्ध निजामांना जाऊन मिळतात व माधवरावांविरुद्ध चालून येतात. लढाईच्या पहिल्या दिवशी दोन्ही बाजूचे मोठे नुकसान झाले. माधवरावांनी काकांच्या स्वाधीन होण्याचा निर्णय घेतला. रघूनाथरावांच्या डेऱ्यात शिरले. पेशवाईचा शिरपेच गालीच्यावर ठेवला, त्यांचे जोडे छातीशी कवटाळले व त्यांना विनवले, ''आपल्या मर्जीप्रमाणे त्या शिरपेचाची व्यवस्था करा. पेशवाईचे हवे तर राज्यकरा. मला हवी ती शिक्षा द्या; पण आपसांतील कलहासाठी निजामासारख्या पिढीजात शत्रूला घरात आणू नका!''(पृ.९९) यावरुन वेळप्रसंगी माघार घेण्याचा गनिमीकावा त्याचबरोबर मोठ्यांबद्दल असलेली आदराची भावना माधवरावांमध्ये असल्याचे दिसते. लढाईनंतर माधवरावांनी पूर्ण शरणागती पत्करली हताश होऊन ते गोपिकांबाईना पत्र लिहित होते आणि अचानक श्रीपती धावत आला व म्हणाला, ''सरकार, घात झाला! चारी बाजूंनी गारदी येत आहे.''(पृ.१०४) माधवरावांनी श्रीपतीला तलवार म्यान करुन तटस्थपणे दाराशी उभे राहण्यास सांगितले. आजूबाजूला गारद्यांच्या चौक्या उभारल्या जात होत्या. त्यांचा गोंगाट कानी पडत होता. तरीही त्यांनी अर्धवट राहिलेले पत्र पूर्ण केले. यावरुन संकटसमयी स्थितप्रज्ञ वृत्तीने राहावे हे माधवरावांकडून शिकण्यास मिळते.

'हाती आलेल्या सत्तेच्या कैफाने व विजयाच्या धुंदीने राघोबांनी माधवरावांच्या सुरुवातीच्या कारकिर्दीतील साऱ्यांचे काटे दूर करायला सुरुवात केली खरी; पण तो कैफ आणि

बेहोशी फार काळ टिकू शकली नाही.'(पृ.१११) निजामांची पंचेचाळीस हजार फौज, भोसल्यांची तीस हजार फौजेशिवाय दीडशे तोफा व दहा हजार गारदी घेऊन निजाम भोसल्यासह भीवरेच्या काठावर येऊन दाखल झाला. त्याचबरोबर एक खलिता पाठविला निजामांकडून घेतलेले सर्व किल्ले मागविले व यापुढे सर्व कारभार निजाम भोसल्यांच्या सल्ल्याने करावा अशी अट घातली. अशा बिकट समयी माधवरावांनी रघूनाथरावांना यातून सुटण्याचा मार्ग सुचविला शिवाजी महाराजांचा गनिमीकावा अवलंबायचा, ''आपण निजामाचा मुलूख बेचिराख करीत सुटू, तोवर मल्हारबा आपल्याला येऊन मिळतील. गोपाळराव सुद्धा आमची विनंती अमान्य करतील, असं वाटत नाही. आपला फौजफाटा भक्कम होईपर्यंत निजामाला झुलवत ठेवू. आमच्या आघाडीच्या वार्ता त्यांच्या कानी गेल्या की, तो माघारी वळेल. तोवर तो दमलेला असेल. गनिमी काव्याने त्याला आपल्याला सहज झोडपून काढता येईल!''(पृ.११४) यावरुन माधवरावांची बुद्धीमत्ता चाणाक्ष होती हे सिद्ध होते. दादासाहेबांचा म्हणजे रघूनाथरावांचा मुलगा भास्करराव यांचा अपघाती अंत झाला. माधवरावांना ही बातमी समजली तेव्हा माधवराव त्वरेने दादासाहेबांकडे गेले. रघूनाथराव माधवरावांना म्हणाले, ''माधवा, माझ्या भास्कर गेला, रे! माझा सारा उजेड नाहीसा झाला'' त्यासमयी सांत्वन करताना माधवराव म्हणाले, ''आज तुमचा भास्कर गेला नाही, माधव गेला. असं समजा, तुमचा भास्कर तुमच्यापुढे उभा आहे.''(पृ.११७) अशा पद्धतीने माधवरावांनी दुःखी काकांचे सात्वन केले.

माधवराव राक्षसभुवनच्या लढाईवर असताना मोघलांनी पुणं लुटलं आपल्यावर कोसळलेल्या संकटाची माहिती समजताच पेशवेजातीने आपल्या दाराशी येऊन चौकशी करतात. यावर त्यांचा विश्वास बसत नव्हता. मोघलांनी घरं लुटली असतानाही समोर पेशवा पाहताच सर्व नुकसान भरपाई झाल्यासारखे वाटत होते. यावरुन माधवरावांचे प्रजेवर असलेले नितांत प्रेम व्यक्त होते. ''ज्याला प्रजारक्षण करता येत नाही, त्याने राज्याची जबाबदारी स्वीकारु नये.''(पृ.१६०) असे माधवरावांचे मत त्यांचे त्यांच्या प्रजेवर असलेल्या प्रेमाचे द्योतक आहे. मोघलांनी पुणं लुटलं, ही लूट करण्यास रास्तेमामा म्हणजे माधवरावांची आई गोपिकाबाई यांचे बंधू मल्हारराव रास्ते यांनी मदत केली. रास्ते मामांचा हा अपराध समजताच पेशव्यांनी त्यांना पाच हजार रुपयांचा दंड केला तीन दिवसांच्या आत जर ह्या रकमेचा भरणा केला नाही तर त्यांची स्थावर जंगम जप्त करुन भरणा करुन घ्यावा लागेल अशी शिक्षा सुनावली. म्हणजेच गुन्हेगार स्वकीय असला तरी त्याची माधवरावांनी गय केली नाही. विसाजीपंत लेल्यांनी फिरग्यांची जहाज लुटली अशी फिरंग्यांनी तक्रार

केली. म्हणून शास्त्रीबुवांनी विसाजीपंतांना न्यायालयासमोर बोलावले पण ते हजर झाले नाहीत. त्यांना जरेबंद करुन न्यायालयासमोर हजर केलं. तीन दिवसाच्या आत नुकसान भरपाई करुन द्यावी. तसं न केल्यास मालमत्ता जप्त करुन नुकसान भरपाई करुन द्यावी असा हुकूम शास्त्री बुवाना केला. सखाराम बापू माधवरावांना शास्त्रीबुवांची ही चूक आहे असं पटवत असताना म्हणाले, ''लेल्यांच्या सारख माणसांना जर न्यायालयासमोर उभ करण्यात येतं, तर कदाचित आम्हांवरच...''(पृ.१६९, १७०) तेव्हा माधवराव उत्तरले, ''बापू दुर्दैवानं तसा प्रसंग आला, तर तुम्हालाच काय पण आम्हालादेखील न्यायालयासमोर जावं लागेल. ती पाळी येऊ नये, ह्यासाठीच आपण जपायला हवं.''(पृ.१७०) म्हणजेच न्यायालयासमोर सर्व समान आहेत खुद्द आम्ही म्हणजे पेशव्यांनी जरी एखादा गुन्हा केला तर त्याला शासन हे झालेच पाहिजे. असा माधवरावांचा विचार आदर्श न्यायबुद्धीचा होता. नानांनी माधवरावांच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य सांगितलं, 'श्री शंकराला प्रसन्न करणे एक वेळ सोप आहे; पण श्रीमंतांची मर्जी राखणं दुरापास्त'(पृ.१७४) रामशास्त्रींच्या न्यायबुद्धीवर खूश होऊन माधवरावांनी रामशास्त्रींना गळ्यातला कंठा दिला व आपल्या आम्ही ढवळाढवळ करणार नाही असा शब्द ही दिला.(पृ.१७६) विसाजीपंताना सुनावताना माधवराव म्हणतात, ''पंत! ध्यानी घ्या, इथ सत्ता आमची असेल पण राज्याचं न्यायासन आमच्या खाली नाही.ते आमच्यावर आहे! तिथं आमची सत्ता चालत नाही.''(पृ.१७२) यावरुन स्वतः पेक्षा न्यायदेवता श्रेष्ठ आहे हे त्यांनी पटविले. ''माधवरावांच्या या कथेत करुण रंजनाची सोय असून ती कितपत ऐतिहासिक आहे हा प्रश्न त्यानंतरचा आहे. पानिपताच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर माधवरावांवर पडलेली जबाबदारी बिकट होती. कोलमडलेली राजव्यवस्था, गृहकलह, स्वतःचे आजारपण यातून मार्ग काढताना त्यांची दमछाक झाली तरीही अल्पवयात आणि अल्पकाळात त्यांनी दाखवलेले कर्तृत्व, त्यांची न्यायनिष्ठूरता इत्यादी वैशिष्ट्यांतून कोणालाही आवडेल अशी तडफदार व्यक्तिरेखा साकार झाली आहे. परंतु तत्कालीन राजकीय वास्तवाचा शोध घेण्याची काही प्रक्रिया येथे झाली आहे असे वाटत नाही.''[८] या दृष्टीने भालचंद्र नेमाडे यांनी 'स्वामी' ची केलेली चिकित्सा महत्त्वाची ठरते.

माधवराव चैन विलासात दंगहोत नव्हते याचे स्पष्टीकरण असे की राघोबांनी आयोजित केलेल्या नाचगाण्याच्या कार्यक्रमात गेले. परंतु कलावंतीनीने नजरेला नजर भिडवताच त्यांचा चेहरा शरमिंदा झाला व तेथून निघून गेले. राघोबांचा पाणक्या विष्णूने माधवरावांचा शिरपेच कलला आहे, हे माधवरावांना सांगताच त्यांनी त्याला दररोज चाळीस घागरी आणण्याची शिक्षा सुनावली

याचे कारण पाणक्याला फावल्या वेळ मिळाला म्हणून त्याचे माधवरावांच्या शिरपेचाकडे लक्ष गेले.

माधवरावांची युद्धकौशल्यातील चातुर्य हे हैदर रट्टेहळीतल्या, तळावर केलेल्या हल्ल्यातून समजते पण निसर्गाच्या तांडवामुळे हैदर तेथून निसटला. हैदरशी लढताना मुराररावांच्या खांद्यातून रक्त ठिबकत होते. तेंव्हा माधवरावांनी आपल्या कमरेचा दुशेला सोडला आणि मुराररावांच्या विरोधाला न जुमानता त्यांच्या रक्ताळलेल्या खांद्यावर लपेटला. आपल्या माणसांविषयी, सैन्यांविषयी माधवरावांजवळ प्रेमाचा ओलावा होता. म्हणजेच माधवरावांच्या व्यक्तिरेखेविषयी प्रा.श्री.मा.कुलकर्णी म्हणतात, ''इतिहासाशी इमान राखून माधवरावांच्या कारकीर्दीच तपशीलवार वर्णन करण्यात व माधवरावांच्या स्वभावाचे अनेक पैलू चित्रिण्यात श्री.देसाई यांनी फार मोठी परिश्रमशीलता, साक्षेप, संगम व योजकता दाखविली आहे.''[९]

कादंबरीत आलेल्या विविध घटनाप्रसंगातून माधवरावांचे उत्कृष्ट गुण दाखविण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे. माधवराव पेशवे म्हणजे एक मुरब्बी राजकारणी, धोरणी युद्धनेता, तडफदार प्रशासक, ध्येयवादी, माणसांची उत्तम पारख असलेला राज्यकर्ता, चाणाक्ष राजकारणी तसेच आपल्या थोडक्या कालावधीत दैदिप्यमान कार्यसम्राट म्हणून नावलौकिक त्यांनी मिळविला. रणजित देसाई यांनी माधवराव पेशवे एक आदर्श पुत्र, आदर्श पेशवा, आदर्श पती व आदर्श माणूस असा बहुगुणसंपन्न राजकर्ता रेखाटला आहे.

'स्वामी'मधील रमा-माधवाचे प्रेम आदर्श पती-पत्नीचे अत्युच्च भावनिक पातळीवर साकारलेले आहे. या पती-पत्नींना सहजीवन फार काळ घेता आला नाही. पण जो काळ त्यांना सहजीवनाचा लाभला, त्यामध्ये ते एकमेकांशी इतके बांधले गेले की, जेव्हा माधवरावांचा अंत होतो तेव्हा रमाबाई सती गेल्या. माधवरावांनीही मृत्यूपत्रात रमाबाईसाठी काहीही लिहिले नव्हते. माधवराव अंतसमयी रमाबाईंना म्हणाले ''रमा, तुझ्या निष्ठेला सीमा नाही! तुझी श्रद्धा सफल होवो. रमा, तुला सांगितलं, तर आश्चर्य वाटेल. पण मृत्यूपत्र करताना तुझ्या बाबतीत काहीही करायला मन धजलं नाही, सारं राज्य तुला दिलं असतं, तरी ते अपुरं पडलं असतं. का, कुणास ठाऊक पण माझ्या मागं तू राहशील असा विश्वासच वाटत नव्हता मला''(पृ.४०२) यावरुन रमा-माधव यांच्यातील उत्कट प्रेमभावाची आपणांस कल्पना येते. शंकर सारडा माधवरावांच्या व्यक्तिमत्वाला अगदी मोजक्या शब्दात साकारतात, ''माधवरावांच्या खुल्या हृदयाचे दर्शन कितीतरी प्रसंगी आपल्याला होते. आणि त्यामुळे माधवरावांची शोकांतिका मनाला चटका आणि तेथेच त्यांचा

झालेला मृत्यू हा कथाभाग तर अत्यंत अविस्मरणीय आहे. फारसे भावविवश न होता, हृदय पिळवटून टाकण्याचे सामर्थ्य त्यात आहे.''[१०]

माधवरावांना सर्व सूख–ऐश्वर्य, प्रेम लाभलं पण नियतीनं ते फार काळ टिकू दिलं नाही. माधवरावांसारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्वावर काळाने आपला घाला घातला याने वाचक उद्‌विग्न होतो.

**राघोबादादा :**

राघोबादादा म्हणजे माधवरावांचे काका. डोक्यावर पगडी मोत्यांचा शिरपेच व झुरमुळ्या पगडीला शोभा देत होत्या गळ्यात निळा कंठा, अंगात अंगरखा व पायात सुरवार अंगाने किंचित स्थूल व मध्यम उंचीचे असे राघोबांचे व्यक्तिमत्व होते. माधवराव राघोबांना मुलापेक्षा प्रिय होते त्यांनी स्वतः ऐवजी पेशवाईची वस्त्रे माधवरावांना देण्यासाठी ताराबाईंना विनवलं.

चार मंडळी कुतर्क सांगून जातात आणि आम्ही मोहवश होतो हा आमचा अपराध असं राघोबा दादा मान्य करतात. गंगोबा व सखाराम बापू ही मंडळी नेहमी राघोबादादांना माधवरावांविरुद्ध भडकवून देतात. माधवरावांना आपल्या काकांविषयी सुरुवातीला अतिशय आदर होता. ते म्हणतात ''काकांच्या इतका प्रेमळ बोला फुलांनी कोमेजणारा जीव असल्या राजकारणात बघायला मिळण कठीण ''काकांसारखा स्वच्छ मनाचा माणूस मिळणे दुर्मिळ. काका म्हणजे गंगोदक, आहे.''(पृ.६८) राघोबा त्र्यंबकमामांना म्हणतात. 'आपल्यापेक्षा माझं माधवावर जास्त प्रेम आहे. माधवराव जेव्हा म्हणतात काका आपण वडील. जी आज्ञा कराल त्याप्रमाणे राहीन ह्यात बदल होणार नाही! तेव्हा माधवरावांच्या मुर्तीकडे पाहून राघोबांचे डोळे चटकन पाण्याने भरतात.'(पृ.७७) यावरून राघोबा हलक्या कानाचे, शीघ्रकोपी पण सत्य कळल्यावर लगेच राग विसरणारे व हळवे वाटतात सखारामबापू नेहमी राघोबांचे कान भरण्याचे काम करतात. ही वाड्याभोवती वाढती शिबंदी मला ही लक्षणे ठीक दिसत नाही.(पृ.८४) म्हणजेच बापू, राघोबांना माधवराव कैद करतील अस पटवून देतात.

राघोबा निजामाला जाऊन मिळतात. मुरादखान आणि विठ्ठल सुंदर यांना घेऊन पुण्यावर चाल करण्यासाठी निघाल्याची बातमी येते.(पृ.८८) सैन्याच्या खर्चासाठी पैठण क्षेत्र लुटले. म्हणजेच स्वकीयांबरोबर लढण्यासाठी राघोबांनी यवनांशी सुलूख केला.

राघोबा निजामांच्या मदतीने माधवरावांविरुद्ध चालून गेले दोन्ही पक्षाचे मोठे नुकसान झाले. खुद्द काकांविरुद्ध लढण्याची आपणावर वेळ आली ही गोष्ट माधवरावांना पटत नव्हती आणि

अखेरीस माधवराव राघोबांशी सलोखा करण्यास गेले तेव्हा त्यांनी मस्तकीचा शिरपेच गालीच्यावर ठेवला व राघोबांचे जोडे छातीशी कवटाळवले. डोळ्यात पाणी तरारलेली उघडी बोडकी, हाती जोडे घेऊन उभी असलेली माधवरावांची मूर्ती पाहून राघोबांना भडभडून आले आवेगाने ते पुढे झाले. त्यांनी माधवरावांच्या हातातील जोडे हिसकावून देऊन दूर फेकून दिले आणि माधवरावांना आपल्या मिठीत कवटाळले. यावरून राघोबा जरी कठोर असले तरी माधवरावांवर त्यांचे खूप प्रेम होते हे दिसते. माधवरावांबरोबर सलूख केला पण पुन्हा सखाराम बापूंच्या सांगण्यावरून माधवरावांच्या तळाभोवती गारद्यांचा कडा पहारा दिला.

नाशिकवरून राघोबा हैदर विरूद्धच्या मोहिमेत माधवरावांची मदत करण्यासाठी आले पण सखाराम बापूंच्या कानभरणीमुळे त्यांचे पुन्हा मत परिवर्तन झाले परकीयांशी हात मिळवणी करून राज्य उलथण्याचे स्वप्न काका पाहतात.(पृ.२७५) माधवराव राघोबांविरूद्ध मोर्चे बांधणी करतात. माधवराव व राघोबा यांच्यात संघर्ष होतो. त्यात राघोबांचा पराभव होतो. राघोबा शरणागती पत्करतात. माधवरावांनी पुढे होऊन राघोबादादांचे पाय शिवले.(पृ.२७७) घरातली दुफळी जगजाहिर होऊ नय, म्हणून राघोबांना सन्मानाने आणल. पण नंतर त्यांना नजरकैदेत ठेवलं. नजरकैदेत असतान अनुष्ठान जोरात चालू होती.(पृ.२९६) रामसिंग गारद्याने राघोबांच्या सांगण्यावरून माधवरावांवर हल्ला केला ही गोष्ट माधवरावांच्या लक्षात आली कारण राघोबांनी कापऱ्या आवाजात प्रश्न केला गारदी काय म्हणाला तो? काही बोलला?(पृ.३००)

माधवराव शेवटी थेऊरला वास्तव्यास जातात तेव्हा राघोबा त्यांच्या भेटीसाठी थेऊरला जातात. तेव्हा राघोबा आपल्या चुका मान्य करतात. ते म्हणतात हे पदरचे हलकट कान भरवतात, चेतावतात ह्या साऱ्या गोष्टींना ही पदरची माणसे कारणीभूत आहेत.

शेवटी नारायणरावाची जबाबदारी माधवराव राघोबांवर सोपवितात. तेव्हा राघोबादादा म्हणाले, 'नारायण माझा आहे. ह्या गजाननाची शपथ घेऊन सांगतो.' तेव्हा माधवराव म्हणाले. ''काका ह्या तुमच्या शपथेवर मला विश्वास धरता आला असता तर अंतकाळी गजाननाचं नाव न घेता तुमचं नाव घेतलं असतं.''(पृ.४०४) यावरुन राघोबा दिलेला शब्द पाळीत नव्हते, हे स्पष्ट होते.

माधवराव राघोबांविषयी आपलं मत स्पष्ट पणे व्यक्त करतात. आपण तीन वेळा मराठी राज्याविरुद्ध बगावत केलीत. आपल्याला सावरण्याची मी शिकस्त केली आपल्याला कैद करुनही कैदेत ठेवले नाही. वर्षाकाठी लक्षावधी रूपये तैनात देऊनही आपलं समाधान झालं नाही

आपल्याला मुसलमानी सल्तनती शौक करण्याची हौस आहे हे आम्हाला माहीत आहे; पण त्या शौकाबरोबर त्या रक्ताचा गुणदेखील आपल्या हाडीमासी एवढा रूजला असेल, ह्याची कल्पना, नव्हती राज्यकर्ता आसन्नमरण झाल्यावर त्याच्या मुलांनी त्याच्या मृत्युची वाट न पाहता राज्यात बगावत करण हा त्यांचा रिवाज आहे. तोच रिवाज आपण पाळत आहात.(पृ.३८५) माधवरावांच्या वरील बोलण्यातून जणू त्यांनी काकांच्या चुकांचा पाढाच वाचला आहे. तेव्हा काका ही प्रांजळपणे आपल्या चुका मान्य करतात. ते म्हणतात, ''हे पदरचे हलकट कान भरतात, चेतावतात, ह्या साऱ्या गोष्टींना  ही पदरची माणसे कारणीभूत आहेत तू समजतोस, तसा मी नाही.''(पृ.३८५) राघोबांनी बऱ्याचदा बगावत केली व ती माधवरावांच्या वेळोवेळी लक्षातही आली. राघोबांनी केलेल्या चुकांबद्दल माफी मागत गेले व माधवराव काकांना माफ करत गेले. याविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''राघोबांची माधवरावांविषयीची पुत्रवत माया आणि माधवरावांच्या मनातील राघोबांविषयीची पितृवत ममता यांत कुठेतरी भारतीय कुटुंबसंस्थेतला नातेसंबंधाचा चिवट धागा आहे, तो त्याच्या वास्तव रुपात काहींना गूढ ठेवण्यात लेखकाला यश मिळालं आहे.''[११]

राघोबांची तलवार अटकेपावेतो गेली ज्याने उदगीरच्या निजामाला चौदा लाखांचा मुलूख ओकायला लावला.(पृ.४८) यातून राघोबांचा धूर्तपणा व लढावय्या स्वभाव प्रत्यास येतो.

**रामशास्त्री प्रभुणे :**

रामशास्त्री प्रभुणे हे पेशव्यांच्या दरबारातील न्यायाधीश होते. माधवराव नित्याची पूजा, वाचन झाल्या खेरीज कोणत्याही कामाला हात लावत नव्हते. माधवरावांच्या नित्यकर्मामुळे सरदारांना त्यांची वाट पाहावी लागत होती. रामशास्त्रींनाही त्यांची भेट घेण्यास तिष्ठावे लागते. जेव्हा दोन दिवसांनी त्यांची माधवरावांशी भेट झाली तेव्हा रामशास्त्री म्हणाले, ''आता उरलेले आयुष्य गंगेच्या काठी ईश्वर चिंतनात काढावे असे वाटते. तेव्हा आपल्या सेवेतून मुक्तता व्हावी ही इच्छा व्यक्त करण्यासाठी मी आलो आहे.''(पृ.४०) माधवरावांनी निवृत्तीचं कारण विचारल्यानंतर रामशास्त्री अतिशय खोचक उत्तर देतात, श्रीमंत आपण ब्राह्मण असून क्षात्रधर्म स्वीकारला आहे; आपण पंतप्रधान आहात, राज्याची जबाबदारी आपल्या शिरावर आहे. प्रजापालन हे आपलं कर्तव्य आहे. जेव्हा आम्ही येऊ तेव्हा तुम्ही होमहवनात, पुजेत, अनुष्ठानात गर्क आमच्या सारख्यांनी सल्लामसलत घ्यायची ती कोणाची? वेदाध्ययन जपतप करायचं असेल तर त्याला कोण आडकाठी करेल त्यासारखं पवित्र कर्तव्य नाही जर राज्याची कर्तव्ये पार पाडून हे करता येत नसेल तर श्रीमंत माझा आपल्याला स्पष्ट सल्ला आहे मसनद सोडा! मी आपणाला

साथ देईन आपण दोघेही गंगाकाठी जाऊ आणि तेथे उर्वरित आयुष्य घालवू यातून रामशास्त्रींचा स्पष्टवक्तेपणा व निर्भिड स्वभाव व प्रजेचे हित पाहणारा स्वभाव जाणवतो. म्हणजेच रामशास्त्रींकडे स्पष्टोक्तेपणा होता. पेशवेपदावर असलेल्या मराठी राज्याच्या स्वामीची जर चूक होत असेल तर रामशास्त्री त्यांना आत्मचिंतन करण्यास भाग पाडतात. विसाजीपंत लेल्यांनी फिरग्यांची जहाज लुटली. तेव्हा या बड्या आसामीला रामशास्त्रींनी तीन दिवसांच्या आत नुकसान भरपाई करण्यास सांगितली. नाही केल्यास मालमत्ता जप्त करून नुकसान भरपाई करून घेतली जाईल अशी शिक्षा सांगितली. त्यांनी पेशव्यांची शिफारस केल्यावर रामशास्त्रींनी त्यांना चांगलेच सुनावले, ''पेशवे आपल्या घरचे असतील त्यांची शिफारस इथ चालणार नाही.''(पृ.१७१)

यावरुन कोणत्याही दडपणाला बळी न पडता सदसदविवेक बुद्धीने रामशास्त्री न्यायदानाचे काम करत होते. रामशास्त्रींच्या न्यायबुद्धीवर खूश होऊन माधवरावांनी त्याना गळ्यातला कंठा दिला. व आपल्या न्याय निवाड्यात आम्ही ढवळाढवळ करणार नाही. असा शब्दही दिला. रामशास्त्रींच्या व्यक्तिरेखेबद्दल नरुभाऊ लिमये म्हणतात, ''न्यायाधिशाचे स्थान राजसत्तेच्यावर असते आणि त्याहीवर फक्त गजाननाची सत्ता चालते हा मोलाचा संदेश दिला'' यावरून रामशास्त्री न्यायदेवतेचा करीत असलेला सन्मान आपल्या लक्षात येतो.[१२] माधवराव आजारपणात थेऊरला आले व नंतर त्यांनी औषधोपचार बंद केले तेव्हा रामशास्त्री म्हणाले ''श्रीमंत! स्पष्ट बोलतो, त्याची माफी असावी आपल्याला बोलण्याचा आमचा अधिकार नाही. पण जोवर जीव आहे, तो वर शरीरधर्म हा पाळलाच पाहिजे, ही धर्माज्ञा आहे.''(पृ.३६३)

रमाबाईंनी सती जाण्याचा निर्णय घेतल्यावर शास्त्रीबुवा रमाबाईंना म्हणतात ''देवांनी सुद्धा नतमस्तक व्हावं, असा आपला अधिकार आहे. आशीर्वाद द्यावा.''(पृ.४१०) रमाबाईंनी शास्त्रीबुवांना आपल्या हातातील हिऱ्याची अंगठी दिली. रमाबाईचा उदारपणा यातून दिसतो.

**सखाराम बापू :**

सखाराम बापू म्हणजे राघोबांच्या अगदी जवळची व्यक्ती. सखाराम बापूंना कारभाराची वस्त्र मिळाली होती. सखाराम बापू म्हणजे राघोबा व माधवराव यांच्यात वितुष्ट निर्माण करणारी व्यक्ती होती. एकदा माधवराव नाना शास्त्री व मल्हारबा यांच्या समवेत पर्वतीवर जातात. सखाराम बापूंच मत असे की, ''नुकतेच श्रीमंत आजारातून उठलेले... त्यांनी का जावे? ही वाड्याभोवती शिबंदी, मला ही लक्षण ठीक दिसत नाहीत!''(पृ.८४) यावरून माधवराव रघूनाथरावांना कैद करण्याच्या प्रयत्नात आहेत असे बापू ठसवितात.

घोडेगाव व आळेगावला झालेल्या लढाईनंतर माधवराव सगळा मानपान विसरून रघूनाथ काकांना शरण जातात. रघूनाथरावही माधवाला प्रेमाने मिठी मारतात या गोष्टीने सखाराम बापू अस्वस्थ होतात. व रघूनाथरावांना म्हणतात, आपला (रघूनाथरावांचा) स्वभाव पडला प्रेमळ; पण राजकारणात हे चालत नाही, भावनेला, राजकारणात स्थान नाही. आणि सल्ला देतात, ''माधवरावांना पेशवेपदावर ठेवून सारी सत्ता आपल्या हाती घ्या. आणि आपली वाट प्रथम निष्कंटक बनवा. जय मिळवूनही माधवरावांचे पेशवेपद कायम ठेवल्याबद्दल प्रजा धन्यवाद देईल.''(पृ.१०१) यावरून असे दिसते की, सखाराम बापूंचे वर्तन हे धूर्तपणाचे होते.

गोपाळरावांनी हैदरचा पराभव केल्याची बातमी गोपाळरावांचा जासुद आणतो. तेव्हा बापूंचा चेहरा पडतो. कारण गोपाळरावांचा पराभव झाला तर गोपाळराव गैरमर्जीत जातील. सखाराम बापूंना इतर सरदारांच वर्चस्व वाढू नये असं वाटत होतं. हैदर विरुद्धच्या मोहिमेत मदत करण्यासाठी आलेल्या राघोबांना सखारामबापू फितवतो. सखाराम बापू सांगतात तुमच्या करवी हैदरचा बिमोड करायचा आज निजाम थंड गोळा होऊन पडलाय तसाच हैदरलाही पाडायचा मग उरला एकच... हाती आलेल्या सत्तेच्या मार्गातली धोंड आणि ती म्हणजे तुम्ही.(पृ.२२४)

एकदा माधवराव पेटत्या शेगडीमध्ये संदूकीतील एक एक कागद टाकून तो जाळून नष्ट करीत असता त्याठिकाणी सखाराम बापू आले. तेव्हा बापूंनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना माधवराव म्हणाले, ''बापू, आमच्या दरबारी जे निष्ठावंत, इमानी सेवक, सरदार, मानकरी आहेत. त्यांच्या बेइमानीपणाचे पुरावे आम्ही नष्ट करीत आहोत.''(पृ.३०९) त्यातीलच एक कागद सखाराम बापूंच्या हाती दिला. ते तो कागद वाचू लागले त्यांचा हात थरथरू लागला. त्यांच्या कपाळी घाम फुटला कारण खुद्द बापूंनी निजामाला लिहिलेले पत्र होते. निजामांकडून मिळालेल्या पैशांचा त्यात उल्लेख होता. सखाराम बापू चाणाक्ष होते. माधवरावांना त्यांच्या बुद्धीमत्तेचा आदर होता. सखाराम बापूंची सत्तालालसा जबरदस्त होती. ते उपेक्षित राहूच शकत नाहीत अस मत माधवरावांनी बापूं बद्दल व्यक्त केल. आपल्या पश्चात बापूंना मुतालकीची वस्त्रे देण्याची माधवरावांची इच्छा स्वतः माधवराव व्यक्त करतात.

रघूनाथराव जेव्हा पेशव्यांच्या नजर कैदेत होते तेव्हा दादांना चेतवणाऱ्या बापूंवर ही कडी नजर होती आजवर जे संकल्प केले ते संकल्प दादांमुळे तडीस जाऊ शकले नव्हते. दादा व बापू यांच्या कैदेने हे आजवर अपुरे राहिलेले संकल्प तडीस जातील ह्याची तिळमात्र शंका माधवरावांना उरली नव्हती.

**गोपाळराव :**

गोपाळराव माधवरावांचे हितचिंतक व प्रामाणिक सरदार होते. जेव्हा माधवराव व रघूनाथराव निजामासह घोडनदीच्या दोन्ही तटी एकमेकांसमोर उभे ठाकले. दोन्ही बाजूंची हानी झाली. 'काकांच्या विरुद्ध लढताना ह्या जीवास केवढ्या वेदना होतात, ते कसे सांगू? असे माधवराव म्हणतात. आणि म्हणून वाटाघाटीचा निर्णय घेतात. तेव्हा मल्हारराव निरोप घेऊन येतात माधवरावांनी तळ मागे घ्यावा. पण गोपाळराव म्हणतात, श्रीमंत आपण हा सल्ला आपण मान्य करु नये. ''आपल्या कुवतीचा आदमास घेण्यासाठी दादासाहेबांनी हा डाव टाकला आहे. अशा रितीने अपमान करून घेण्यापेक्षा रणांगणावर मृत्यू पत्करलेला बरा सारेच काही आपल्या विरुद्ध बिथरलेले नाहीत. आम्ही आपल्या पाठीशी आहोत जे होईल ते होऊ देत!''(पृ.९२) म्हणजेच यातून गोपाळरावांची राजनिष्ठा व्यक्त होते. माधवराव घोडनदीकाठचा तळ हालवून आळेगावास गेले. तेव्हा जासुदाने बातमी आणली. रघूनाथराव अचानक चाल करुन येताहेत तेव्हा गोपाळराव म्हणतात, ''आपण श्रीपतीला घेऊन सुरक्षित स्थळी जावे. मी तोवर दादासाहेबांना थोपविण्याची शिकस्त करतो.(पृ.९३) यातून गोपाळरावांची स्वामी निष्ठा सिद्ध होते.

''गोपाळराव पटवर्धन आपल्यातलेच आहेत कितीही मोठी जोखीम अंगावर असली तरी निधड्या छातीने ही बिकट जबाबदारी पेलणारा एकच सरदार मला दिसतो.''(पृ.२०८) असे सखारामबापू आपले मत व्यक्त करतात. माधवराव म्हणतात, ''ज्याच पिढीजात घराणं मराठी दौलतीशी इमाने इतबारे एकनिष्ठ आहे, त्याच घराण्यातील गोपाळराव आहेत. कित्येक घराण्यांना ईश्वराचा वरदहस्त असतो.''(पृ.२०९) हैदरसारख्या मातबराचे डावपेच ओळखून त्याला पाणी पाजणारे सरदार आपल्यापाशी आहेत, याचा संतोष माधवरावांना झाला होता. आज गोपाळरावांची फार आठवण येते त्यांच्या सारखा निष्ठावान माणूस शोधून मिळणं कठीण.'' अशा शब्दात माधवराव गोपाळरावांचे ऋण व्यक्त करतात. जर गोपाळराव पटवर्धन आणि मुरारराव घोरपडे ही माणस आमच्याजवळ नसती तर कर्नाटकाची मोहीम यशस्वी होण कठीण होतं.(पृ.३३१) असे गौरवोद्‌गार गोपाळरावांबद्दल माधवराव काढतात. असा विश्वासू व लढवय्या माणसांविषयी माधवरावांना अभिमान आहे.

**मोरेश्वर भट :**

माधवरावांना एकदा पहाटेच जाग आली मोरेश्वर भाट गणेशमहालात गात होता. त्याच्या गोड आवाजाने माधवराव रोमांचित झाले. माधवराव स्वतः तिथे गेले व म्हणाले, ''उद्या तू

कारभाऱ्यांना भेट ते तुझ्या गुणांची कदर करतील.''(पृ.२१) यावरून मोरेश्वर भट उत्कृष्ठ गायक होता हे समजते. माधवरावांनी त्यांच्या कलेची कदर केली होती. पेशव्यांच्या दरबारी गायक असलेले हे मोरेश्वर भाट नंतर जयपूरच्या दरबारी नोकरी करतात. जेव्हा त्यांना कळले की माधवरावांची प्रकृती ठीक नाही तेव्हा ते माधवरावांचे दर्शन घेण्याच्या उत्कट इच्छेने पुण्याला आले. तेव्हा माधवराव म्हणाले ''पाहिलत पंत? पुर्वजन्मांचे ऋणानुबंध ह्या खेरीज ह्याला काय नाव देणार? असे प्रसंग आले, की वाटत, जन्माचं सार्थक झालं.'' ''माधवरावांनी आपली कोणती इच्छा?'' असं विचारल्याव मोरेश्वरांनी ''एकवेळ आपल्या पायाशी सेवा करावी एवढीच इच्छा व्यक्त केली.''(पृ.३४९) माधवरावांवर मोरेश्वर भटांची असलेली श्रद्धा यातून व्यक्त होते.

**विसाजीपंत लेले :**

विसाजीपंत लेल्यांनी फिरंग्यांची जहाजं लुटली. अशी तक्रार फिरंग्यांनी केली. म्हणून शास्त्रीबुवांनी विसाजीपंतांना न्यायालयासमोर बोलावले; पण ते हजर झाले नाहीत. त्यांना जेरबंद करून न्यायालयासमोर हजर केले. तीन दिवसाच्या आत नुकसान भरपाई करून द्यावी असा हुकूम शास्त्रीबुवांनी केला. विसाजीपंत लेल्यांना सुनावताना माधवराव म्हणतात, ''पंत ध्यानी घ्या, इथं सत्ता आमची असेल पण राज्याच न्यायासन आमच्या खाली नाही ते आमच्या वर आहे! तिथं आमची सत्ता चालत नाही.''(पृ.१७२) न्यायव्यवस्था मानणारे व न्यायदेवतेला सर्वश्रेष्ठ स्थान देणारे माधवरावांचे विसाजीपंत लेल्यांविषयीचे उद्‌गार अंतर्मुख करणारे आहेत.

**रास्ते मामा :**

माधवराव राक्षसभुवनच्या लढाई वर असताना मोघलांनी पुणं लुटलं. ही लूट करण्यास रास्ते मामांनी त्यांना मदत केली रास्ते म्हणजे मल्हारराव रास्ते गोपिकाबाईंचे बंधू, पेशव्यांचे खुद्द मामा रास्ते मामांचा अपराध समजताच पेशव्यांनी त्यांना पाच हजार रूपयांचा दंड केला. तीन दिवसांच्या आत जर ह्या रकमेचा दप्तरी भरणा केला नाही तर त्याची स्थावर जंगम जप्त करून भरणा करून घ्यावा लागेल, अशी शिक्षा सांगितली. रास्तेमामांच्या चित्रणातून असे दिसते की, आपलेच लोक आपल्याला दगा देतात व शत्रूला मदत करतात.

**पाणक्या विष्णू :**

राघोबांचा पाणक्या. माधवराव पर्वतीवरून आले त्यांनी गणेश दरवाज्यात प्रवेश केला तेव्हा तो माधवरावांना म्हणाला ''तुमचा शिरपेच थोडा कलला आहे सरकार''(पृ.१९५) तेव्हा

माधवरावांनी विष्णूला आठ दिवस दररोच चाळीस घागरी पाणी आणीत जा नाही आणल्यास जेवढे कमी भरतील तेवढे फटके ह्याला मारीत जा. अशी शिक्षा दिली. आपल्या कामाव्यतिरिक्त आपण दुसरीकडे लक्ष देऊ नये. असे माधवरावांना वरील शिक्षेतून सुचवायचे आहे.

**नाना फडणवीस :**

किडकिडीत, पगडी धारण केलेली मूर्ती माधवराव म्हणतात, नानाचं खासगी चारित्र्य मला माहित का नाही? त्यांचा धूर्तपणा, स्वतःला सांभाळून, सुरक्षित राखून काम करण्याची पद्धत का मला माहित नाही? पण त्याच वेळी हिशोबाचा चोखपणा माझ्या नजरेतून सुटला नाही. असे मत माधवरावांनी नाना फडणवीसांबद्दल त्याचें गुणदोष दाखवून व्यक्त केले.

**दिनकर महादेव :**

दिनकरराव महादेव याच्यावर पेशव्यांच्या जवाहिर खान्याची जबाबदारी होती. दिनकरराव आपली जवाहिरखानातून मुक्तता व्हावी अशी विनंती करतात. त्याचे कारण विचारले असता. ते निर्भिडपणे उत्तर देतात, ''श्रीमंत! पेशव्यांचा जवाहीरखाना म्हणजे फार मोठी जबाबदारी सणा सुदीला खाशा स्वाऱ्यांकडे अनेक नग जातात-येतात त्यांच्या लेखी पावत्या आल्या नाहीत, तर घोटाळे होण्याचा संभव एक दागिना गहाळ झाल्याने पेशव्यांचा जवाहिर खाना रिकामा होणार नाही; पण माझ्या सारखा सामान्य माणूस जन्मातून उठेल.''(पृ.७) दिनकरराव हे सर्व रघूनाथरावांच्या बाबतीत बोलत होते. याचाच अर्थ राघोबादादा खूद्द माधवरावांचे काका नियमबाह्य वागतात तेव्हा दिनकरराव निर्भिडपणे त्यांची चूक सर्वांसमोर मांडतात. त्यातून त्यांची निर्भिड वृत्ती दिसते. यावरुन दिनकररावांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते.

**रामजीकाका :**

पागोट्यातून गालापर्यंत वाढलेले कल्ले. पांढऱ्या गालमिश्या, चेहऱ्यावर सुरकुत्यांची जाळी रमाबाईंनी रामजीला पुण्याहून सतीची वस्त्रे आणण्यासाठी पाठवले होते. अशा प्रकारचे प्रामाणिक विश्वासू व्यक्तिमत्त्व स्वामी कादंबरीमध्ये येते.

**गंगोबा तात्या :**

गंगोबातात्या हे होळकरांचे मातबर सरदार होते ती दरबारातील जुनी आसामी होती. वयस्क राघोबादादांच्या मर्जीतली. होळकरांची दादांच्या बाजूला जी विश्वास माणसे बसली होती. त्यातच गंगोबाही एक होते. गंगोबातात्या रघूनाथरावांना माधवच्या विरुद्ध कानभरणी करतात. परकियांशी

हातमिळवणी करून राज्य उलथण्याचे स्वप्न पाहणाऱ्या काकांना साथ देणाऱ्या गंगोबा तात्यांनाही माधवराव दोरखंड लावून जेरबंद करतात.(पृ.२७८) कांदबरी प्रारंभ गंगोबातात्या या व्यक्तिचित्रणाने झाला. किडकिडीत देहयष्टी, भेदकडोळ्यांचे गंगोबातात्या हे बडे प्रस्थ होळकरांचे सरदार विश्वासूक असा त्यांचा लौकिक होता राघोबादादांची मर्जी साऱ्यांना ज्ञात होती. गद्दारी करणाऱ्यांची माधवराव गय करीत नाहीत. म्हणजेच गंगोबातात्या हे राघोबा व माधवराव यांच्या नात्यात विष पेरण्याचे काम करणारे विघ्नसंतोषी व्यक्तिमत्त्व होते, असे गंगोबा तात्याच्या व्यक्तिचित्रणातून स्पष्ट होते.

**त्र्यंबकराव :**

दादासाहेब कर्नाटकच्या मोहिमेतून निघून आले तेव्हा रावसाहेबांची जबाबदारी त्र्यंबक मामांनी स्वीकारली. त्र्यंबकमामा रघूनाथरावांना माधवरावांना जपण्याची सांभाळून घेण्याची जबाबदारी आपली आहे हे पटवण्याचा प्रयत्न करतात. त्र्यंबकमामा माधवराव व रघूनाथराव यांच्या मध्ये समेट घडवून आणण्याचा नेहमी प्रयत्न करतात. त्र्यंबकराव सर्वांना समजावून घेऊन एकमेकांत समन्वय साधायला लावणारे व्यक्तिमत्व वाटते.

**महादजी सितोळे :**

राक्षसभुवनच्या मोघलांविरुद्ध लढाईत महादजी सितोळेने अंबारीत बसलेल्या विठ्ठल सुंदरचा भाल्याने वेध घेतला. काही कळण्याच्या आत विठ्ठल सुंदर छाती आवळून घेत अंबारीत कोसळला. विठ्ठल सुंदरचे शिर भाल्याच्या टोकावर साऱ्या सैन्यात फिरत होते. हे सारे माधवराव भारावलेल्या नजरेने पाहात होते. त्यांचा ऊर अभिमानाने भरून आला होता. त्याच क्षणी माधवरावांनी महादजीला मांजरी गाव इनाम व सरदारकी बहाल केली. महादजी सितोळे लढवय्ये होते. माधवरावांनी त्यांच्या कामगिरीची दखल घेऊन त्यांना इनाम व सरदारकी दिली. महादजी सितोळेंसारख्या कर्तबगार पुरुषांनी शौर्याची परंपरा टिकविली असे दिसते.

**मल्हारराव होळकर :**

मल्हाररावांचा रूबाब दांडगा, मल्हारराव माधवरावांच्या भेटीला यायचं झालं, तरी संगती घोडदळ असतं. मल्हारराव होळकरांचे महत्व हे अनन्यसाधारण होते. संकटसमयी माधवरावांना वेळोवेळी होळकरांनी मदत केलेली दिसून येते.

**नारायणराव :**

नारायणराव हे माधवरावांचे धाकटे बंधू. स्वभाव बालिश होता. असे अनेक प्रसंगातून समजते. कर्नाटकाच्या मोहिमेवर जाताना त्यांनी नारायणरावांना बरोबर नेले. रट्टेहळीच्या लढाईत हैदरची फजिती झाली. तेव्हा ते बालिशपणे म्हणतात. ''मी वहिनीना हुबळीचा संग्राम सावनूरच्या नबाबान दिलेली मेजवाणीची आणि ह्या रट्टेहळीत हैदरच्या झालेल्या फजितीच्या बातम्या सांगणार मग वहिनी खूप खूश होतील.''(पृ.२०३) नंतर ते माधवरावांना आपण कधी परतायचं असा प्रश्न विचारतात तेव्हा धार असलेल्या शब्दात ते नारायण रावांना उत्तर देतात. ''शत्रू असा घरात वावरताना घरी परतण्याच्या गोष्टी करणं आम्हास शोभत नाही, हे तुम्हाला कळायला हवं...''(पृ.२०४) त्यावेळी ते नारायणरावांच्या पाठीवरुन प्रेमाने हात फिरवितात. नारायणराव माधवरावांना प्रश्न विचारीत.

हैदरशी तह करून माधवराव पंचमहलातून तळ हलविण्याचा निर्णय घेतात. त्यानंतर एक पारधी तेथे हरणाचे दोन बच्चे घेऊन येतो तेव्हा नारायणराव म्हणतात. ''दादा मी हे घेऊ'' तेव्हा माधवराव म्हणतात अजून तुमचा पोरकटपणा जात नाही. तेव्हा नारायणराव म्हणतात, 'हे बच्चे मी वहिनीसाठी घेतो.'

अंतः समयी माधवराव नारायणरावांना जवळ बोलवून म्हणतात, ''नारायणा आता तू लहान नाहीस तुला मोठी जबाबदारी पेलायची आहे. काका आणि सखारामबापूंच्या सल्ल्याने जा. त्यात तुझं कल्याण आहे. तापट स्वभाव कर्तृत्ववान माणसाला शोभून दिसतो. तुझ्या तापट स्वभावाला मूरड घाल!! नारायणरावांचा हात काकाच्या हाती  दिला. तुम्ही याला सांभाळा आपला म्हणा.(पृ.४०४)

रमाबाईंचा सती जाण्याच्या निर्णयप्रसंगी नारायणरावांनी रमाबाईंचे पाय धरले व वैनी म्हणत आक्रोश करायला सुरूवात केली. माधवरावांचा नारायण रमेचा नारायण तिचे पाय अश्रुंनी भिजवत होता. तेव्हा रमाबाईंनी त्यांना करड्या आवाजात म्हटले. तुम्ही आता राज्याचे स्वामी आहात हे अश्रू हा आक्रोश शोभत नाही तुम्हाला. इकडून आपल्या डोळ्यातील अश्रू पाहण झाल तर काय म्हणतील?''(पृ.४०९) स्वामींखेरीज इतर सर्व पात्रे ही स्वामींच्या व्यक्तिमत्वाचे रंग खुलविण्यासाठी मदतनीस म्हणून येतात. अर्थातच त्यात चंचल मनाचे राघोबा आणि देवावर वाहिलेल्या फुलासारखी रमा ही दोनच पात्रे काहीशी प्रामुख्याने येतात. परंतु कथानकाच्या ओघामध्ये येणाऱ्या प्रत्येक गौण पात्रालाही कादंबरीत अनन्यसाधारण महत्त्व आहे.

**गौण पात्रे :**

भोसल्यांचे वकील देवाजी पंत, रघूनाथरावांच्या सांगण्यावरून माधवरावांवर हल्ला करणारा रामसिंग गारदी (पृ.२९७), गंगाविष्णू म्हणजे माधवरावांवर औषधोपचार करणारे वैद्य म्हणजे साक्षात अश्विनी कुमार असा त्यांचा लौकिक होता. ते रंगाने सावळे, मोठे ठसठशीत नाक भेदक डोळे बांध्याने मध्यम उंच असलेले व त्यांच्या चेहऱ्यावर विद्वत्तेचे तेज दिसत होते.(पृ.३६४), रूपेश्वरबुवा माधवरावांवर उपचार करणारे वैद्य. रूळणारी शेंडी कानात मोत्याची बाळी मगगटांत चमकणारी सुवर्णसलकडी अशी पात्रे येतात.

**४.२.४ स्मरणगाथा**

**गोपाळ :**

लेखकाचे मूळगाव गुडघे हे दापोली तालुक्यात रत्नागिरी जिल्ह्यातील एक खेडे. परंतु ते राहायला परतवाडा, तालुका अचळपूर, जिल्हा अमरावती, प्रांत वऱ्हाड मध्ये होते. लेखकाचे पुर्ण नाव आत्माराम नीलकंठ दाण्डेकर होते. लेखकाने महात्मा गांधीच्या स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी घरातून पलायन केले. गोपाळ अनंत जोशी हे नाव धारण केले. त्याची कारण मिमांसा अशी पळून गेल्यानंतर लेखक ज्यांच्या घरी राहत होते. तेथे लेखक गोरक्षणाचे काम करत होते. म्हणून गोपाल, परमेश्वराचा पुत्र म्हणून परमेश्वर ठेवले पण ते सांगायला – ऐकायला बरे वाटेना म्हणून परमेश्वर ऐवजी अनंत असं ठेऊन टाकलं व ज्यांच्या घरी आश्रयाला होते त्यांचे आडनाव जोशी तेच स्वीकारले. अशा प्रकारे ते आत्माराम नीलकंठ दांडेकरांचे गोपाळ अनंत जोशी झाले.(पृ.२). गो.नी. दाण्डेकरांचे वडील अतिशय कडक शिस्तीचे होते.

'स्मरणगाथा' ही गो.नी.दांडेकर यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये लेखकाने त्याच्या स्वतःच्या तिशीपर्यंतचे आयुष्य रेखाटले आहे. वयाची बारा वर्षे लेखकाने आई–वडील, भावंडे यांच्या सोबत घालविली. शैक्षणिक जीवनात अतिशय हुशार म्हणून मान्यता पावलेला हा विद्यार्थी होता. लहानपणी वडिलांच्या कडक स्वभावामुळे गोपाळवर चांगले संस्कार झाले होते. त्याचे उच्चार स्पष्ट असावेत असे वडिलांना वाटत असल्यामुळे स्वतःचा परिचय सांगताना त्यांना स्पष्ट शब्दात सांगावा लागत होता. फॉन्सेकाच्या बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहात असताना गोपाळ त्यांना गीतेचा पहिला अध्याय, देवा परम समर्था, हनुमान स्तोत्र म्हणून

दाखवत असे तेव्हा फॉन्सेका लेखकाची पाठ थोपटून म्हणे, ''खैसा ब्राइट लडका हाय!''(पृ.२५) असा हा बालपणी अतिशय कुशाग्र बुद्धीमत्तेचा मुलगा होता.

लेखकाची बहीण माईच्या संगतीमुळे देशप्रेम, देशभक्ती याचे बाळकडू कुटुंबातच मिळाले आणि त्यातून नागपूर शहरात स्वातंत्र्यासाठी आंदोलने होत होती त्यामुळे विद्यार्थीदशेतील गोपाळही या आंदोलनात सहभागी होत होता. मुंबईला मिठाचा सत्याग्रह होणार या बातमीने गोपाळचे लक्ष वेधले व त्यात सहभागी होण्यासाठी गोपाळने घराला कायमचा रामराम ठोकला. वयाच्या बाराव्या वर्षी गोपाळसारखा एक हाडकुळं लेकरू देश स्वतंत्र करण्यासाठी वनवासी झाले.

मुंबईला काँग्रेस हाऊसमध्ये काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून स्वातंत्र्य आदोलनात लेखक सहभागी झाला होता. 'एक खारटूली घरून पळून येऊन या सेतुबंधनाच्या प्रचंड उद्योगात आपल्या परीने वाळूचे कण टाकीत होती'.(पृ.१०४) पण थोड्याच दिवसात स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झाल्याचा पश्चाताप लेखकाला वाटला. केवळ वरच्या अंलकरणालाच मोहून स्वातंत्र्याच्या वणव्यात लेखक पडला होता. काहीही झालं तरी घरी जायचे नसल्यामुळे व चित्रपटात काम करण्याची प्रबळ इच्छा, आवड असल्याने दादरा कोहिनूर फिल्म, बालमोहन पौराणिक नाटक मंडळ यात काम मिळविण्यासाठी अर्जव केला परंतु त्यांनी केवळ हरकाम्या गडी म्हणून लेखकाचा वापर करून घेतला त्यामुळे तेथूनही पळ काढला.

भायखळ्याला पोटासाठी एका टॅक्सीवाल्याची टॅक्सी पुसण्याचे काम केले. पण त्या टॅक्सीवाल्याने गोपाळ बरोबर अश्लिल चाळे केले म्हणून त्याने तेथून स्वतःची सुटका करुन घेतली अशा प्रकारे मुंबईत, दादर, गिरगाव, भायखळा या भागात भटकंती केली आणि मुंबई सोडली. पुण्यात युनाटेड सिंडिकेट कंपनीत कलाकार होण्याच्या अपेक्षेने लेखक गेला पण तेथेही फक्त हरकाम्याच बनला. तेथून 'आर्यन फिल्म' कंपनीत गेला पण सर्व निरर्थक ठरले. अन्नासाठी मोताद होण्याची वेळ आल्यानंतर ब्राह्मण असलेल्या या मुलाने एका मोटार ड्रायव्हरच्या कुत्र्यांसाठी कसाईखाण्यातून बकऱ्याची कातडी आणण्याचे ही काम केले. तेथेच जवळ राहणाऱ्या वस्तादाने त्याला वरातीत नेले व स्वतःचे काम साधले वरातीत साहसी कृत्य करुन दाखवण्याची सुपारी घेणाऱ्या या वस्तादाने लेखकाच्या डोक्यावर नारळ फोडण्याचे साहस केले. वस्तादाकडून पुढे वखारवाल्याकडे गेलेल्या लेखकाचे मुस्लीम धर्मात धर्मांतर होता होता वाचले. अशा प्रकारे मुंबई नंतर पुणे असे भटकल्यावर नाटकात काम करण्याच्या इच्छेपोटी त्याने नाशिकचा रस्ता धरला.

नाशिकला भद्रकाली रस्त्याजवळच्या खानावळीत वाढण्याचे काम केले. त्यानंतर देशपांडे सुताराच्या फर्निचरच्या दुकानात सुतारकाम शिकून घेतले. देशपांडे सुतारांकडे पाहुणे म्हणून आलेल्या निःसंतान गणपतराव बाबांनी लेखकाला त्याच्या घरी म्हणजे अकोल्याला नेले. मुळचे आत्माराम नीलकंठ दांडेकर नाव असेलेला हा लेखक गोपाळ अनंत जोशी बनला. कारण गणपतराव बाबांकडे गोरक्षणांचे त्याने काम केले. म्हणून गोपाळ परमेश्वराचा पुत्र म्हणून अनंत व गणपतराव बाबांचे आडनाव जोशी म्हणून त्याच्या आडनावाचा स्वीकार केला. गणपतराव बाबांनी मुलाप्रमाणे सांभाळले पण या कृपाछत्राचा लाभ गोपाळला जास्त दिवस मिळाला नाही. गणपतराव बाबांच्या मृत्यूनंतर गोपाळने अकोले सोडले.

दैवानेच पुढचा मार्ग ठरविलेला असल्याने गाडगेबाबांच्या कीर्तनाचा लाभ घेण्याची संधी मिळाली. गोपाळच्या जीवनाला कलाटणी देणारी सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे किन्हवलीला गाडगेबाबांचे कीर्तन ऐकण्याचे भाग्य त्याला लाभले. गोपाळने गाडगेबाबांच्या संाप्रदायात जाण्याचा ठाम निश्चय केला. गाडगेबाबांनी गोपाळला महानंद स्वामीं बरोबर देहूला पाठविले महानंदस्वामींनी त्यांना वारकरी संप्रदायाची दिक्षा दिली. कीर्तन, पायी पंढरपूरवारी अधूनमधून गाडगेबाबांचा सहवास असे मजेत दिवस चालले होते. बाबांकडे हट्ट केला बाबांच्या संप्रदायात प्रवेश केला. 'बाबांनी अनुग्रहीत केलं. गळ्यांत माळ घातली घोंगडीचा तुकडा गळ्यात अडकवला.'(पृ.२१०) बाबांचा शिष्य बनून मराठवाडा, नाशिक, सातारा, परभणी अशा ठिकाणी सप्ताह भरविले. कीर्तने केली. कीर्तनांमधून समाजप्रबोधन केले. गोपाळ बाबांचा विश्वासू शिष्य बनला. गाडगेबाबांनी गोपाळवर पत्रलेखनाची जबाबदारी सोपवली परंतु गाडगेबाबांच्या काही शिष्यांनी गोपाळवर आरोप केला की, गोपाळ ब्राह्मण असल्याने तो पत्राचा मायना लिहिताना सदगुरु श्री. गाडगेमहाराज यांचे ऐवजी गाडगेबुवांचे असे लिहितो. या प्रसंगाने गोपाळ व्यथीत झाला व पुन्हा एकदा त्याच्या जीवनाला कलाटणी मिळाली. गोपाळ देहूत दाखल झाला. त्यानंतर आळंदीत मारुतीबुवा गुरव यांच्याकडे ज्ञानेश्वरी शिकले, ज्ञानेश्वरी व गाथा यांचा अभ्यास करण्यासाठी भंडारा डोंगर गाठला तेथे राजाराम परीट नावाच्या मित्राच्या सहवासात अभ्यास केला. आचार्यांचे तत्त्वज्ञान शिकण्यासाठी मारुती बुवांच्या मार्गदर्शनाखाली धुळ्याच्या श्रीधर पाठकांकडे वास्तव्यास गेले. श्रीधर पाठकांनी त्याला नर्मदा परिक्रमा करण्यास सांगितले नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पार पाडली. त्यानंतर गोपाळला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्य करण्याची संधी मिळाली.

या सर्व कार्यात लेखक वयाच्या तिशीच्या उंबरठ्यावर आला होता. वयाच्या तेराव्या वर्षापासून भटकंतीला सुरुवात झाली ते तीस वर्षापर्यंत म्हणजे एकूण सतरा वर्षाचा कालखंड या ठिकाणी वर्णिला आहे. सतरा वर्षाच्या या कालखंडामध्ये लेखकाने विविध भूमिका पार पाडल्या. शालेय जीवनात एक हुशार विद्यार्थी असा नाव लौकिक होता. इंग्रजी शब्दांचे स्पेलिंग पाठांतर अतिशय उत्कृष्ठ होते. त्याबाबत लेखक म्हणतो, 'तिकडून शब्दे' आईकू येताच माझ्या तोंडावाटे फाड, फाड, भट्टीतल्या फुटाण्या सारखं त्याचं स्पेलिंग बाहेर पडे.'(पृ.८३)

पुढे हाच हुशार विद्यार्थी कीर्तनकार म्हणूनही नावारुपास आला. गाडगेबाबांच्या सांप्रदयात असताना त्याने उत्कृष्ट कीर्तने केली. कीर्तनामधून अंधश्रद्धा निर्मुलनाचे कार्य केले. लेखक म्हणतो 'जीवनात इतकी प्रतिष्ठा प्रथमच लाभली होती. गाडगे महाराजांच्या सांप्रदायातला म्हणून जनलोक पाया पडत.'(पृ.१९२) निरनिराळ्या गावांमध्ये गावातील लोकांच्या सहकार्याने सप्ताहाचे आयोजन केले त्यावेळी गोपाळ कुशल संघटक वाटला. अभिनयाच्या शोधात फिरला पण कोणत्याही फिल्म कंपनीने नाटकात कलाकार म्हणून काम करण्याची संधी दिली नाही. पण अकोल्यास गणपतराव जोशी यांच्या कडे राहत असताना 'स्वर्गावर स्वारी' या नाटकात प्रल्हादाचे काम अतिशय उत्कृष्ठ केले. नाटक संपताक्षणी भले भले धावत आत आले. गणपतराव बाबांना म्हणाले, 'बाबा, प्रल्हाद आणि मीनाक्षी- दोन्ही पोरांची अगोदर तुम्ही दृष्ट काढा बघू।'(पृ.१७७) यावरुन गोपाळने उत्कृष्ठ अभिनय केला हे सिद्ध होते.

गोपाळच्या बालहृदयात त्याच्या बहिणीने म्हणजे माईने स्वातंत्र्याचे स्फुलींग पेटविले होते आणि म्हणूनच 'बारा वर्षाचे एक हाडकुळं, कसनुसं लेकरु देश स्वतंत्र करायला वनवासी होत होतं.'(पृ.९३) देश स्वतंत्र करण्याच्या इर्षेने घरातून पळून जाऊन स्वातंत्र्य चळवळीत स्वयंसेवक म्हणून कार्य केले. पुढे मराठवाड्यात मुसलमान सत्तेकडून सामान्य जनतेवर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्याच्या कार्यालाही हातभार लावला. पुढे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता म्हणूनही कार्य केले. वाढत्या वयात शरीरात होणाऱ्या बदलांना सामोरे जाताना विविध अघोरी उपाय केले. जेवतानाही आपण संयमी बनावे यासाठी अन्न धूऊन बेचव अन्न प्रथम पथ्य पाळण्यासाठी म्हणून खाल्ले व पुढे नियमितपणे तसेच अन्न खाल्ले.

त्याने त्याच्या संपूर्ण भटकंतीमध्ये अनेक माणसे जोडली. त्याच्या प्रेमळ स्वभावामुळे त्याला अनेक लोकांकडून प्रेम मिळाले त्यामध्ये प्रामुख्याने गणपतराव जोशी, गाडगेबाबा, आळंदीचे मारुतीबुवा, धुळ्याचे श्रीधर यांचा नामोल्लेख करता येईल.

'स्मरणगाथा' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखकाने वयाच्या तिशीपर्यंतची केलेली भटकंती रेखाटली व त्या अनुषंगाने त्याला आलेले सर्व अनुभव भेटलेल्या व्यक्ती यांचे वर्णन केले. त्या अनुभवातून गोपाळने स्वतःचे स्वानुभव सांगताना त्याच्या स्वभावाचे निरनिराळे गुणविशेष प्रकट केले व त्यातूनच गोपाळचे व्यक्तिमत्त्व साकार झाले.

**संत गाडगेबाबा :**

लेखकाला गाडगेबाबांचे प्रथम दर्शन झाले ते किन्हवलीला सप्ताहाच्या शेवटी बाबांचे कीर्तन होते. पांढरे स्वच्छ रूपेरी केस बत्त्यांच्या प्रकाशात चकाकणारे, गोल चेहरा, मुद्दाम वाढवलेली जोपासलेली थोडकी मिशादाढी, गोरेपणाकडे झुकणारा रंग, काहीसे घारे डोळे, मुद्रेवर अभय कारूण्य थोडका मिस्किलपणा, अत्यंत सूक्ष्म नाटक भरलेली अंगकाठी, चिंध्यांचा सदरा. लुंगी गळ्यात तो पट्ट्यांच्या घोंगडीचा ट्रेडमार्क. हाती बांबूची जाडजुड काठी आणि एक गाडग(पृ.१८३) लेखक म्हणतो,''जीवनात इतकी प्रतिष्ठा प्रथमच लाभली होती गाडगेमहाराजांच्या संप्रदायांतला म्हणून जनलोक पाया पडत''(पृ.१९२) बाबा वऱ्हाड प्रांतातले मूर्तिजापूर तालुक्यातले कोतेगांव गावचे होते. त्यांची बोली वऱ्हाडी होती. वऱ्हाडी बोलीवर वैदर्भी रीतीचे संस्कार झाले असल्यामुळे तिच्यांत माधुर्य आणि गोलाई निर्माण झाली होती. थोडासा हेलही मिसळला होता आणि अशा या वऱ्हाडी बोलीत बाबांचं कीर्तन सुरू होई.

बाबा त्यांचे कीर्तन संपले की गुप्त होतात. गुप्त होतात म्हणजे काय जादूने नाही तर अचानक सर्व जनसमुदायातून चटकन निघून जातात की लोकांच्या लक्षात देखील येत नाही. बाबा साधारण पासष्ट सत्तर वर्षांचे होते पण आपल्या पेक्षा लहान व्यक्तिलाही ते पाया पडू देत नव्हते. लहान मुलांशीही आदरार्थी बोलत. जर कोणी त्यांच्या पाया पडू लागले की पाठीत त्याच्या रपाटा बसलाच म्हणून समजा.

बाबांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांना स्वच्छता फार प्रिय होती. ज्या ठिकाणी जातील तेथील परिसर आधी ते झाडूने लख्ख करीत. पंढरपूरला बाबांच्या धर्मशाळेत लेखक व त्यांचे सहकारी झोपले असताना पहाटे आवाज कानी पडला, ''उठा हो! उठवा त्याहिले! चाला झाडून काढावे लागते. चाला उठा!''(पृ.२००) लेखक व सहकार्यांनी उठून पाहिले तर एखाद्या ढाण्या वाघासारखे गर्जना करीत बाबा उभे होते. बाबा स्वतः झाडीत होते. त्यांची झाडण्याची सुद्धा विशिष्ठ पद्धत होती. एकान झाडीत पुढं चलायचं. एक ओळ धरून. खाली वाकून. आडव्या हातानं दुसऱ्यान तीच ओळ धरीत त्याच्या मागोमाग चलायचं त्याच्या मागं तिसरा, चौथा. मोठमोठी पटांगण ही

अगदी थोडक्या वेळात झाडून होतं. कोणाला झाडता आले नाही तर बाबा त्याला स्वतः कृती करून दाखवित असत. बाबांचा उपदेशही न्याराच होता, ''येक्या जागी राहू नोका. कोठीसाही काम केल्याबिगर खाऊ नोका. कोनाचंही काम कराव. झाडून काढाव. लाकड फोडाव. खुरपाव मग कोनीही खायाले घालते. मस्त कीर्तन कराव कोनापासून काई घेऊ नोय. येक्या घरी जेऊं नोय. कोनाच्या घरी राहू नोय. मस्त जंगलात झोपाव.''(पृ.२११)

नाशिक गोदाकाठी धर्मशाळेचे बांधकाम चालू होते तेव्हा 'स्वतः बाबा अवघ्यापूर्वी कामावर हजर होत. या म्हाताऱ्याला बांधकामाचं, खोदकामाचं, जमीन समतल करण्याचं अंगगतच ज्ञान होत बहुधा सर्वच धर्मशाळांच्या आणि इमारतींच्या नकाशांचं काम त्यांच्या निदर्शनाखालीच झालेलं होतं.'(पृ.२६७)

गाडगेबाबांचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे, 'ज्याच्या नावावर पुढं महाविद्यालयं आणि प्रशाळा निघाल्या, तो पुरुष खरोखर अगदी निरक्षर होता. डेबुजीबुवा – त्यांचं मूळ नाव डेबूजी होतं–एवढी सही देखील त्यांना करता येत नसे. या अक्षरशत्रू पुरुषानं अक्षरशः लक्षावधी रूपये गोळा करून त्याचा नेटका विनियोग केला. त्यातली पै देखील स्वतःच्या कामी न लावतां.'(पृ.२६९) 'गाडगेबाबा ही व्यक्ति अतिप्रसिद्ध महात्माजी किंवा पण्डित नेहरूं इतकी, काकणभर अधिकच लोकप्रियता त्या पुरुषाची'(पृ.२७४) गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनांमधून अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम केले. प्राणी हत्येवर टिका केली. विनोदातून ते लोकांना समाजप्रबोधनाचे धडे देत. त्यामुळे त्यांचे शिष्यही अशाप्रकारे कीर्तनात विनोद निर्मिती करून लोकांची कानउघडणी करीत. लेखक गो. नी. दांडेकर हे बाबांचे शिष्य होते. त्यांच्या कीर्तन करण्याच्या पद्धतीवर बाबांची छाप होती. गाडगेबाबांनी गोपाळवर प्रेम केले.

**गणेश जगन्नाथ जोशी :**

गणेश जगन्नाथ जोशी यांना लोक गणपतराव बाबा म्हणत होते. लेखक नाशिकमध्ये देशपांड्यांच्या घरी राहत होते. तेव्हा त्यांच्या घरी लग्न निघाले त्यावेळी त्यांच्या घरी गणपतराव बाबा पाहुणे म्हणून आले होते. देशपांड्यांच्या आईचे ते भाऊ होते. देशपांड्यांच्या घरात त्यांचा मोठा आदर होता. त्याचे भले घवघवीत रूप शरीराने काहीसे स्थूल. अतिशय देखणी मुद्रा, सुरेख नाक, डोईस रूमाल बांधीत, सदरा, कोट, अंगावर उपरण घेत. पायी पुणेरी जोडा असे त्यांचे व्यक्तिमत्व होते.

लग्न आटोपल्यावर लेखकाने त्यांना नाशिकभर फिरून आणले. गणपतराव बाबांनी लेखकाला अकोल्याला त्यांच्या बरोबर घेऊन जाण्याचा हुकूम सोडला. त्याना कुणीही विरोध करू शकत नव्हतं लेखक गणपतराव बाबांबरोबर अकोल्याला गेला.

अकोले तालुक्याचे गणपतरावबाबा हे अनभिषिक्त राजे होते. त्यांनी जोशी की केली नाही. त्या भागाच्या सुख दुःखाशी ते समरस झाले होते. परिसरातील कोळीठाकर समाज मारवाडी सावकारांकडून कर्ज घेत. त्यावेळी या अनपढ गरीब समाजाच्या मदतीला बाबा धावून जात असत. 'स्टँपवेंडर हा त्यांचा व्यवसाय. खरेदी-विक्रीचे व्यवहार अगोदर गणपतरावबाबांना कळायचे. त्यांच्याकडून स्टॅम्प घेतल्याविना ते व्हायचे नाहीत. त्यांनी रक्षकासारख सजग असावं प्रत्येक व्यवहाराची चौकशी करावी. अन्याय होत असेल तिथं तुटून पडावं. त्यामुळं गणपतरावबाबा भिल्लकोळी ठाकरांच्या कंठीचे तन्मणि झाले.'(पृ.१५५) गोरगरिबांविषयीची तळमळ त्यांच्याकडे होती.

अकोले तालुक्याचा मामलेदार खान नावाची व्यक्ती होती. तो मोठा उन्मत्त दुराचारी होता. मनमाने तसा तो वागायचा. तरण्याताठ्या लेकी बाळींवर त्याची वाईट नजर होती. रात्री कुणाच्याही घरी निरोप यायचा आज धाडून द्या. गावकरी लेकीबाळी अकोल्यास ठेवीनासे झाले. मामलेदाराचा पापाचा घडा भरला असे गणपतराव बाबांच्या लक्षात आले. बाबांच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी मामलेदाराला ठार मारले. बाबांसह अनेकांना शिक्षा झाली. बाबा कठोर कारावासाची शिक्षा भोगून आले तोपर्यंत त्यांची पत्नी देवा घरी गेली होती. दरम्यानच्या काळात कृष्णाबाई परदेशी नावाची स्त्री गणपतरावबाबांच्या घरात शिरली.(पृ.१५६,१५७)

लेखक गणपतराव बाबाच्या घरी गेल्यावर बाबांनी त्याला त्यांचे शेती फिरवून दाखविली. त्यांच्याकडे गाई चरायला घेऊन जाणे, शेतीची कामे यासारखी कामे केली. लेखकाच्या पायावर कुऱ्हाडीचा घाव बसला आणि लेखकाच्या उजव्या अंगठ्याला जखम झाली त्यावेळी गणपतराव बाबांनी त्याची सेवा सुश्रुषा केली.

गणपतराव बाबांनी लेखकावर पुत्रवत प्रेम केले. लेखकाने त्याचे जोशी हे आडनाव गणपतराव बाबांचेच लावले होते. गणपतराव बाबांनी गोपाळला कीर्तन करण्यास व नाटकात काम करण्यास प्रोत्साहन दिले त्यांना गोपाळ बद्दल फार अभिमान वाटत होता. ''आता माझ्या माग गोरक्षणाचं कसं होईल, ही काळजी उरली नाही.''(पृ.१७८) असे गोपाळबद्दलचा विश्वास गणपतराव बाबांना होता.

गोपाळला पुत्रवत प्रेम करणाऱ्या गणपतराव बाबांचा सहवास अल्पकाळच मिळाला. काकडीची कोशिंबीर खाल्ल्याचं निमित्त झालं त्यांच पोट फुगलं. वैद्यांचे उपचार उपयोगी पडेनात तेव्हा गणपतराव बाबांनी पंचांना जवळ बोलावलं मुखावाटे शब्द फुटत नव्हता आसवं वाहावीत गोपाळचा हात त्यांच्या हाती दिला. गरागरा डोळे फिरवले. आणि सगळ संपले. प्रेत यात्रेला खूप लोक जमले. गणपतरावबाबांसारखी प्रेत यात्रा लेखकाने पाहिलीच नव्हती. 'अशी प्रेतयात्रा अकोल्यांत कुणाची निघाली नाही. सिद्धेश्वरावांनी गणेशजगन्नाथ जोशी नामक शूर वीराच्या मृत देहाला अगीन डाग दिला.'(पृ.१७९)

**निवृत्तीबुवा धनगर :**

निवृत्तीबुवा धनगर हे गणपतरावबाबांचे परममित्र होते. निवृत्तीबुवा वारकरी. निष्ठावंत. आळंदी पंढरी करायचे. त्यांचा सूर चढा होता. त्यांना गरजे पुरते गायकीचे ज्ञान होते. भजनी मंडळीतले ते खलिफा होते. दर आठ दिवसांनी भजन करायचे. निवृत्तीबुवांनी गोपाळला भजनाची दीक्षा दिली.

निवृत्तीबुवा घोंगड्या बनविण्याचा पारंपरिक व्यवसाय करीत होते. निवृत्तीबुवा किन्हवलीला बाजारात घोंगड्या विकायला घेऊन जात. गणपतराव बाबांच्या मृत्यूनंतर कृष्णाबाईने गोपाळला बेघर केले. तेव्हा गोपाळला निवृत्तीबुवांनी आश्रय दिला. गोपाळ निवृत्तीबुवांबरोबर किन्हवलीला गेला तेथेच त्याला गाडगेबाबांसारख्या महान संताच्या कीर्तनाचा लाभ झाला. व गोपाळच्या जीवनाला कलाटणी मिळाली.

**महानंदस्वामी :**

महानंदस्वामी हे गाडगेबाबांचे शिष्य होते. गोपाळला गाडगेबाबांनी महानंदस्वामी यांच्याकडे सोपविले. 'महानंदस्वामी हा एक ठेंगणा, शिडशिडीत बांध्याचा, मोठा हुशार माणूस होता. त्याच गाव चिंचवड. ते कुंभार होते.

महानंदस्वामीचं ठाण होतं देहू. तिथं बाबांची धर्मशाळा इंद्रायणीतीरी होती. त्या धर्मशाळेत महानंदस्वामींची मुलं राहात आणि अभंग पाठ करीत. मुलं म्हणजे त्यांची स्वतःची नव्हेत. लेखकासारखीच घर सोडून बाबांच्या मागं निघून आलेली महानंदस्वामींनी गोपाळला या सगळ्या मुलांचा मास्तर म्हणून नेमले. 'महानंदास्वामींनी गळ्यात एक माळ घातली होती. माळ हे वारकरी सांप्रदायाचं चिन्ह.'(पृ.२११) वरील उल्लेखावरून महानंदस्वामींनी गोपाळला वारकरी संप्रदायाची माळ घातली हे स्पष्ट होते. गोपाळला वारकरी संप्रदायाची दीक्षा त्यांनी दिली.

**बळिरामभौ :**

बळिरामभौचे पुर्ण नाव बळिराम नागोजी गोमासे होते. दर्यापूर तालुक्यातील कसबे गव्हाण या गावातील ते रहिवासी होते. बळिरामभौनी मास्तरकी केली होती. त्यांना आखाड्याचा शौक होता. पंढरीची वारी होती. माळ घातली होती. घरीच हौदा केला होता. नामदेवराव, रूपराव, महादेव बेलदार असे दहाबारा चेले होते. त्यांना भौ आखाड्यात खेळवीत. डाव शिकवित. भौंचा गावाला धाक होता. रूंद दातांचे, आडव्या अंगाचे, चांगले गोरे, किंचित घारे डोळे असलेले भौ कधीकधी कीर्तन करीत कुणाचे काम अपुरं पडू देत नसत. लग्न ठरविताना गावकऱ्यांना भौ हवेतच. ते असले की दुसरा पक्ष फारसा वाद घालीत बसायचा नाही. कुणाची सून नांदत नसली, तर भौ जाऊन त्या दोघांचा प्रपंच सुरळीत चालू लागेलसं पाहायचे. कुणाच्या लेकीला मारझोड होत असली, तर भौ तिच्या सासरच्या मंडळींना रागवायचे. भौ हे पारमार्थिक वृत्तीचे होते त्यांच्या नादानं ज्ञानेश्वरीकडे लेखकाचे लक्ष ओढले गेले.

लेखकाला त्वचेचा विकार झाला होता. म्हणजे अंग खाजवण अन् त्यामुळे व्रण उठत. तेव्हा भौ म्हणाले, ''गोपाळबाबा, इथं चान्दमीयाँ नावाचे एक प्रसिद्ध वैद्य आहेत. त्यांच्याकडे जाऊन  आपण प्रकृति दाखवू या.''(पृ.३२३) भौ गोपाळबाबाला चान्दमीयाँकडे घेऊन गेले. चान्दमीयाँने उपचारासाठी ज्या गोष्टी करायला सांगितल्या म्हणजे गावाच्या बाहेर निवांत झोपडी बांधायला सांगितली, गाईचे दूध, ज्वारीची भाकरी आणि तूरीच वरण विना फोडणीचं. मीठ न घातलेलं. लोणी हे सर्व भौनी पुरविले. आजार पुर्ण पणे बरा होई पर्यंत जबरदस्तीने गोपाळबाबाना उपचार घ्यायलाच लावले. बळिराम भौं सारखी निस्सिम प्रेम करणारी माणसं गोपाळला त्याच्या भटकंती मध्ये भेटली.

**राजाराम परीट :**

राजाराम परीट नावाचा लेखकापेक्षा दोन वर्षांनी लहान मुलगा बाबांच्या संस्थेत होता. अभ्यास करावा, असं त्याला फार वाटे. गोपाळ अभ्यासासाठी देहूला गेलाय हे जेव्हा राजारामला कळले तेव्हा तो देहूला गेला. तेथून गोपाळला शोधत भंडाऱ्या डोंगरावरही गेला.

दोघे मिळून एका गुहेत राहत. राजाराम एक दिवस व गोपाळ एक दिवस असे दिवसा आड माधुकरी मागत. दोघेही गाथेतील अभंग पाठ करण्यासाठी गुहेबाहेर डोंगरावर झुडपं होती, त्यांच्या खाली जाऊन बसत होते. राजारामला कोणते अभंग पाठ करायचे ते गोपाळ त्याला निवडून देत असे.

राजारामाचा गोपाळवर फार जीव होता. लेखकाची जेवणाची काही पथ्य होती. त्यामुळे गोपाळ तिखट, आंबट माधुकरी पाण्यात धुवून खाई. राजाराम सायंकाळी रानात जाई तिथून शेतातल्या उडदाच्या, मुगाच्या शेंगा, अंबाडी, माठ अशी भाजांची पाने असे लेखकासाठी आणत असे. लोकांना न विचारता त्यांच्या शेतातून काहीबाही तोडू नये असे गोपाळने सांगितल्यावर राजाराम म्हणे, ''फार तोडल तर पाप. एकट्या माणसापुरतं तोडलं तर काही पाप नाही.''(पृ.३५२) राजारामाची गोपाळ वर श्रद्धा होती. अध्ययनाच्या काळात गोपाळला सूख लागावं यासाठी तो फार श्रम करी.

**कैकाडी बुवा :**

कैकाडीबुवांचे नाव राजाराम असे होते. त्यांचे मूळ गाव नगर जिल्ह्यातले होते. राजाराम ठेंगणाठुसका, बाकदार आखूड नाकाचा माणूस सुपं टोपल्या विणायचा व त्या विकायचा. कैकाडीबुवांचे नवल असं की, दोन नियम त्यांनी मोठ्या निष्ठेनं कितीक वर्ष पाळले. पहिला, ते कधी आडवे होऊन झोपले नाहीत. बाकी सर्व नियम इतर शिष्यांप्रमाणेच होते. म्हणजे एका घरी न जेवण. गावात मुक्काम न करता तो रानांत करणं. रात्री तीन तीन वाजेपर्यंत कीर्तन करणं. होता होईल तो विनाश्रमाचं कुणाकडे न खाणे(पृ.२२५) कीर्तन संपल्यावर कैकाडीबुवा आडवे होऊन झोपत नसत. कुठं तरी कुण्या मळ्यांत, कुणाच्या खळ्यावर, कुण्या झाडाखाली जी उरली रात्र काढायची ती एका कुबडीवर टेकून. बसल्या बसल्या. तसच बसल्या बसल्या झोपी जायचं कठीण होतं. पण हे त्यांनी कितीक वर्षे केलं.(पृ.२२५) गाडगे बाबांचा नियम होता कुणालाही पाया पडून द्यायचे नाही. शिष्यगण त्यासाठी वेगवेगळे उपाय योजायचे. कैकाडीबुवा तर पायांना फडकीत बांधीत. काय कुणाची बिशाद की त्या पायावर कुणी डोकं ठेवील? कुणाला ते पायाचा स्पर्श ही करू देत नसत. कैकाडी बुवांची कीर्तनाची एक पद्धत होती. स्त्रीवर्गाच्या भावनांना स्पर्श होऊन जाईन असं त्याचं कीर्तन असे. जनाबाईचे दळणावरचे अभंग, दळणावरची रूपकं. कीर्तनात ते ओव्या म्हणत स्त्रीवर्गाला ते माग सूरधरून म्हणायला लावीत. हजार हजार बायका एकदम त्या ओव्या म्हणत. कैकाडीबुवा कीर्तनात दोन-तीन हजार श्रोत्यांशी संवाद साधीत असत. भजनात कोणी टाळी वाजवायला कंटाळा केला तर ते म्हणत, ''आता टाळ्या वाजवू नका. मात्र पुढला जन्म स्त्रीचा मिळाला, तर जन्मभर भाकरी थापताना टाळ्या वाजवीत बसा!''(पृ.२२७) म्हणजे कीर्तनात विनोदही करीत होते. कैकाडीबुवा कवी देखील होते. गाईविषयी त्यांच्या मनात अपार कळवळा होता. त्यांनी गाईवर एक कवन केलं होतं. 'मानवा विचार कर काई। कसाबाला विकू

नको गाई।।'(पृ.२२७) असे त्यांच्या कवनात पहिल कडवं होतं. लोकांच्या तोंडी एक कडवं रूजलं होतं. ''असा कसा कैकाडीबाबा येड लावून गेला गावा।।''(पृ.२२७) यावरून कैकाडीबुवांची लोकप्रियता लक्षात येते.

**चान्दमीयाँ :**

गोपाळला अंगाला खाज सुटणे व तेथे त्वचेवर वण पडणे असा व्याधी जडला म्हणून बळिरामभौ यांनी ज्या वैद्याकडे नेले तो वैद्य म्हणजे चान्दमीयाँ. चान्दमीयाँ रोग्याला तपाशीत काष्ठौषधींच्या पुड्या रोग्याला देत. रोग्याला कडक पथ्य सांगितली जात. लख्ख पांढरी दाढी, धोतर, सदरा असा तो ऋषीतुल्य मनुष्य स्वच्छ मराठी भाषेत बोलत होता. त्याच्याकडे पाहताक्षणी कुणाही रोग्याचं मत अनुकूल होत असे. एका महिन्याभरात गोपाळबाबांचा आजार एकदम बरा झाला.(पृ.३२३, ३३०)

**लक्ष्मणबुवा इगतपुरीकर :**

लक्ष्मणशास्त्री 'अमृतानुभव' ग्रंथाचे विवेचन सुरू करणार असे कळल्यावर गोपाळने मारूतीबुवांच्या परवानगीने अमृतानुभव शिकण्यास सुरुवात केली. लक्ष्मणबुवा म्हणजे एकमार्गी, निःस्पृह पुरुष ते सतत चिंतनात गढून गेलेले असत. लक्ष्मणबुवा अमृतानुभवचे विवेचन करीत असताना गोपाळ त्यांना प्रश्न विचारीत होता. पण बुवा यत्किंचितही क्षुब्ध न होता गोपाळच्या शंकांचे निरसन करण्याचा प्रयत्न करीत होते. गोपाळच्या सततच्या शंकामुळे त्याच्या बरोबर शिकणारे विद्यार्थी त्याला रागावले तेंव्हा गोपाळ पाठाला न जाता शेतात गेले लक्ष्मणबुवानी रागावून गोपाळला पाठाला न येण्याचे कारण विचारले आणि म्हणाले, ''मी अमृतानुभव तुझ्यासाठी सांगतो आहे. तू नाना शंका विचारतोस. त्यामुळं नवं नवं चिंतन होतं. सुचत चालतं हा काय विचारील? त्या दिशेने नवा विचार स्फुरतो. रोज संध्याकाळी मी टिपणं काढतो, अभ्यास करतो. हे सगळं कुणासाठी? अरे शंखा, रडतोस काय असा? आसवं गाळायला काय मी तुला मारंल? मग?''(पृ.३९६) अशा सरळ स्वभावाचे ते अभ्यासू व्यक्तीमत्त्व होते.

**मारूतीबुवा गुरव :**

आळंदीच्या वारकरी शिक्षण संस्थेतील ज्ञानेश्वरीचे मारूतीबुवा प्रवचनकार होते. 'सरळ लांब नाक, निर्भय प्रसन्न काहीशी स्मित मुद्रा, कपाळावर उभा गंध, अंगी बाराबंदी, डोईला

रूमाल'(पृ.३६४) 'बुवांची वाणी लख्ख होती. विद्यार्थ्यांना कळावं, अशी माया त्यांच्या मुद्रेवर स्पष्ट दिसत होती.'(पृ.३६६)

गोपाळ मारूतीबुवा गुरव यांच्याकडे ज्ञानेश्वरी शिकण्यासाठी गेला. मारूतीबुवांनी त्यांना पहिल्यांदा वेश बदलण्यास सांगितला. गोपाळ गाडगेबाबांच्या धर्मशाळेत जेवायला जात होता. ती फार दूर आहे हे मारूतीबुवाच्या लक्षात आल्यावर त्यांनी गोपाळला त्यांच्या जवळ राहायला सांगितले. माधुकरीसाठी ब्राह्मणांच्या घरीही सांगून ठेवले गोपाळ आणलेली माधुकरी धुवून खातो हे जेव्हा मारूती बुवांना कळले तेव्हा त्यांनी गोपाळ सगळ खात जा म्हणून उपदेश ही केला. मारूती बुवांनी लेखकावर अक्षरशः पुत्रवत प्रेम केलं. दर एकादशीला सकाळी मुलांना फराळ मिळे, रात्री मिळत नसे मारूतीबुवा गुपचूप गोपाळला खोलीत बोलवीत दहावीस खजूर बिया एखादा राजगिरा लाडू खायला देत. गोपाळने आचार्यांचे तत्वज्ञान शिकण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हा मारूती बुवांनी त्यांना धुळ्याच्या श्रीधर पाठकांकडे पाठविले.

**अनंतराव क्षीरे :**

धुळ्याचे अनंतराव क्षीरे नावाचे गृहस्थ हे सामाजिक कार्यकर्ते होते. हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराविरूद्ध त्यांनी आवाज उठविला होता.त्यांनी स्वतःबरोबर पंचवीस कार्यकर्त्यांची एक तुकडी घेतली. मराठवाड्यात सत्याग्रह करण्याच्या संकल्पनेने ते प्रेरित झाले. व त्या योजनेचा प्रचार करीतच ते आळंदीला आले. त्यांनी निझामी सत्तेला आव्हान देण्यासाठी मराठवाड्यात प्रवेश करणार अशी घोषणा केली व इच्छा असणाऱ्यांनी त्यांच्या बरोबर याव असे आव्हान केले. मारूतीबुवांची परवानगी घेऊन गोपाळ मराठवाड्यात सत्याग्रहास गेला.

**श्रीधरशास्त्री पाठक :**

गोपाळला आचार्यांचे तत्वज्ञान शिकण्याची इच्छा होती. तेव्हा मारूतीबुवांनी लेखकास धुळ्याला श्रीधर पाठकांकडे पाठविले. 'सामान्यपणं स्थूल, शरीर, मुंडित, गोल, साम्य मुद्रा. गळ्यांत रूद्राक्षमाळा उघडे भस्म लावलेले. पंचा नसलेले. पायी काहीही न घातलेले. डोळ्यांना चष्मा'(पृ.४२०) अशी सहज लक्षात येण्यासारखी श्रीधरशास्त्रींची व्यक्तिरेखा. लेखक आपल्या समोर उभी करतो.

शास्त्रीबुवांनी चिठ्ठी दिली. सरस्वती पाठ शाळेत पाठविले. सरस्वतीपाठशाळा ही शास्त्रीबुवांच्या प्रयत्नांनी उभी राहिलेली संस्था. गीताभाष्याचे पाठ शास्त्रीबुवांनी सुरू केले होते. 'सर्वांसमोर ग्रंथ होते काकांसमोरच का तो नव्हता. त्यांना ग्रंथाची गरजही नव्हती. वेदान्त त्यांना

करतळी आवळा डोलावा तसा अवगत होता.'(पृ.४२४) त्यांचा वाणीचा प्रवाह गंगाप्रवाहासारखा धोधो चालला होता. थांबणे नाही की अडखळणे नाही. गोपाळने त्यांना अनेक शंका विचारल्या त्याचा परिणाम असा झाला की काकांनी त्याला स्वतःजवळ राहण्याचा आग्रह केला.

शास्त्रीबुवांनी गोपाळच्या पुर्वायुष्याची चौकशी केली व त्याला त्याच्या घरी जावून येण्याविषयी हट्ट धरला त्याला जाण्यासाठी लागणारे घरभाडे देखील पुरविले. काकांच्या आग्रहाखातर गोपाळ त्याच्या घरी आई व भावंडांना भेटून आला. दादा व माई गेल्याचे त्याला कळले. पुन्हा धुळ्याला आल्यावर काकांनी लेखकाला गीताभाष्य समजाविले. नर्मदा परिक्रमा करण्याची क्षमता गोपाळमध्ये आहे हे ओळखून त्यांनी त्याला नर्मदा परिक्रमा करण्याचा आग्रह धरला. पण तत्पुर्वी गीताभाष्य पुर्ण करावे अशी इच्छा गोपाळने व्यक्त केली. 'त्या महर्षीला जर काही एक वेड असेल, तर ते नर्मदेचं होतं. कित्येकदा ते नर्मदेवर जाऊन महिना महिना राहात. वार्धक्यामुळं परिक्रमा करणं त्यांना अशक्य झालं होतं.'(पृ.४३७) गीताभाष्य संपल्यावर गोपाळ काकांच्या सांगण्यावरून नर्मदा परिक्रमेस गेला.

**यशवंत दांडेकर ऊर्फ सद्गुरू स्वयंप्रकाश आत्मा :**

यशवंत दांडेकर हे लेखंकाचे काका म्हणजे वडिलांचे भाऊ होते. की ज्यांनी घरादाराचा त्याग करून फकिरी स्वीकारली होती. त्यानंतर त्यांनी सद्गुरू स्वयंप्रकाश आत्मा हे नाव धारण केले होते. 'लखख घारे डोळे, लांबलचक जटा दाढीमिशा, लिंबासारखी तेजस्वी कांति. दोन्ही भुवयांच्या मधोमध गोंदलेल्याची खूण. केवळ एक लंगोटी अन् कफनी एवढाच वेश. असे हे लोक विलक्षण सद्गुरू'.(पृ.१५)

अशा त्यांच्या विचित्र पोशाखामुळे त्यापेक्षा त्यांच्या विचित्र वागणुकीमुळे लोकांना त्यांच्या विषयीच्या रहस्याचा उलगडा व्हावा असे वाटायचे. दररोज साठसत्तर मैल चालणारे सद्गुरू सहासात महिन्यात कधीतरी लेखकाच्या घरी जायचे. लेखकाच्या आईला म्हणायचे, ''वहिनी, सद्गुरूची पुडी आज तुझ्या घरी आहे!''(पृ.१६) म्हणजे ते त्यांच्या आईला जेवायला वाढ म्हणून सांगायचे त्यांचे जेवण म्हणजे आई कणीक भिजवून व पोळ्यालाटून थकायची. आई त्यांना जेवण पुरे करायला सांगायची तेव्हाच ते थांबायचे. शीर्षासन लावून तास-तास उलटे उभे राहायचे. मुक्कामी राहिल्यानंतर वडिलांशी कोणत्यातरी विषयावर गुपचूप चर्चा करून सकाळी सगळे उठण्या अगोदर गायब व्हायचे. सद्गुरू स्वातंत्र्य संग्रामाचे कार्य करीत होते. 'सावकरांनी इंग्लडमधून मोठमोठ्या पुस्तकांच्या पोटांतून पिस्तूलं इकडे धाडली त्या संबंधात सरकारनं सद्गुरूंना पकडलं.

पकडलं ते बरोबर झालं. पिस्तुलं, बाँब असल्या भानगडींशी सदगुरूचा घनिष्ठ संबंध होता.'(पृ.१७) ब्रिटिश सरकारने त्यांना पकडून खूप मारझोड केली पण ते पिस्तुल, बाँब या बाबीविषयी बोलते झाले नाही. शेवटी नाईलाजाने त्यांना सोडून दिले परंतु गुप्त पोलिसांचा ससेमिरा त्यांच्या मागे लागला. असेच गुप्तचर त्यांच्या मागावर असताना सदगुरू गोवकोट बंदरात लाँचीत चढले. उतरायचं होतं ओणी भोटी बंदरास. गोवकोट ते दाभोळ असा पंचवीस मैलांचा प्रवास बोट करीत असे. सदगुरूबाबा प्रवासात तिकीट काढीत नसत. या बोटीतही त्यांनी तिकिट काढले नव्हते. तिकीटबाबूंनी त्यांना बोटीतून उतरण्यास सांगितले. त्यांनी खाडीत उडी मारली व बोटीबरोबर पोहू लागले. त्यामुळे ते बोटीच्या ज्या बाजूला पोहत सगळे प्रवासी बोटीच्या त्या अंगाला उभे राहत त्यामुळे लाँच बुडण्याचा एक प्रसंग एक-दोन वेळा आला असता. सदगुरूंना उतरविल्याचा पश्चाताप करण्याची वेळ तिकिटबाबूवर आली. ओणीभाटी बंदरापर्यंत साधारण वीस  मैल ते पोहले.

सदगुरूंची देशभर भ्रमंती झाली होती. त्यांना वैद्यकीचा नाद लागला होता. म्हणजे महारोग, अन् पांढरे कोड या रोगांवरची औषध त्यांना माहीत होती. त्यांचे शरीर वेतासारखे लवत होते. मयूरासन करीत असता त्यांचे घारे डोळे तांबडे भडक होत असतं. असे हे वेगळ्याच धाटणीचे व्यक्तिमत्व लेखकाला आकर्षित करीत होते. त्याबद्दल लेखक म्हणतात, ''बालपणी माझ्या मनावर मोहिनी घालणारं हे एक जबर व्यक्तिमत्व. धुमकेतूप्रमाणं ते हवं तेव्हा उगवायचे. अचानक मावळायचे. ते आले, की तेवढ्यापुरतं मला आनंदपर्वच असायचं.''(पृ.२०)

औषधांविषयी लेखकाला माहिती सांगेनं म्हणून गेलेले काका पंचतत्वात विलीन झाले. या देशासाठी इंग्रजांच्या जबर मार खाल्लेले एक घाऱ्या डोळ्यांच माणूस त्याने आपले तेजस्वी डोळे मिटले. कादंबरीच्या ओघात लेखकाने सदगुरूंच्या व्यक्तिमत्वाचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे लेखकासाठी ते आदर्श होते. लेखक म्हणतात, ''त्या माझ्या आदर्श पुरुषाचं हे वाङ्मय श्राद्ध.(पृ.२२)

**दादा (लेखकाचे वडील) :**

लेखक त्यांच्या वडिलांना दादा म्हणत होते. दादा अतिशय कडक शिस्तीचे, अतिबुद्धीमान, अवलिया व्यक्तिमत्व होते. निर्व्यसनी, नाकासमोर पाहून चालणारे; अगदी पहाटे उठायचे तेव्हा पासून त्यांचे दैनंदिन चक्र चालू व्हायचे ते अगदी रात्र होईपर्यंत. त्यांचे वाचन दांडगे होते, त्यांच्या अंगी नानाविध कला होत्या. ते उत्तम फोटोग्राफर होते. त्यांना रत्नांची परीक्षा करता येत होती.

रंगीबेरंगी गारा गोळा करण्याचा त्यांना छंद होता. ते उत्तम नट होते. ते बऱ्यापैकी गातही होते. त्याच्या तरल बुद्धीमत्तेचे उदाहरण म्हणजे एकदा स्पेलिंगवरून वाद निघाला तेव्हा चिडून त्यांनी वेब्स्टरची डिक्शनरी ए पासून झेड पर्यंत पाठ केली आणि तिही सहा महिन्यांत.

दादांचे बालपण कोकणातील निसर्गसंपन्न परिसरात गेले. भोवतालच्या परिसरामुळेच दादा अतिशय हूड, निर्भय बनत गेले. जिवाणू मारणे हा त्यांच्या हातचा मळ होता. कोकणात भुतांच्या भयाने इतर माणसं फॅ-फॅ करीत बेशुद्ध पडायची, तर दादा हाता कंदील काठी घेऊन भुतांचा वावर असल्याचं सांगितले जाण्याच्या परिसरापर्यंत जाऊन यायचे अन् मग त्या बेशुद्धांवर उपचारही करीत होते. मोठेपणी ही हेच दादा लोकप्रिय झाले, ते त्यांच्या निर्भयपणामुळे लेखक व त्यांचे कुटुंब फ्रान्सेकाच्या बंगल्यात राहायला गेले होते त्यापुर्वी ते विद्वांसाच्या आऊट हाऊसमध्ये राहत होते. विद्वांसाने चंद्रया नावाचा वाघ पाळला होता. पिंजरा धुणाऱ्या गड्याच्या चुकीमुळे वाघ पिंजऱ्यातून सुटला आणि त्याचवेळी चंद्रयाचे मालकही तेथे नव्हते. विद्वांसाचा नोकर धावत धावत दादांकडे आला. तेव्हा दादांनी तासाभरात चंद्रयाला पिंजऱ्यात घातले. याही पेक्षा लोकांना गरज पडायची ती घरात साप निघाल्यावर 'दादा दोन फटक्यात जनावर मारायचे'(पृ.४६) अशी दादांची ख्यातीच होती. सात आठ फूटलांबीचा, तांबूस पिवळसर रंगाचा नाग मारल्याचा प्रसंग लेखकाने कथन केला आहे.

दादांच्या मनावर निरनिराळ्या धर्मांच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाचा परिणाम झाला होता. त्यामुळेच ते काहीसे उदारमतवादी झाले होते. एचिलपूरचे मौलवी वारंवार घरी येत त्यांचे वादविवाद होतं. विशेष म्हणजे दादांना उर्दू, अरबीही चांगले वाचता येत होते. ते कुराणही चांगले वाचू शकत होते. दादांना रंगभूमीचे फार आकर्षण होते. त्यामुळे लेखकही रंगभूमीशी समरस होत असे. अचलपुरी कुण्या नाटक मंडळीचा मुक्काम पडला की मग त्यांच्या मागे अनेक कामे असायची नाटकातील सर्व कलाकारांचे जेवण खाणे, दुखणे-खुपणे याची सर्व व्यवस्था दादाच करायचे. वास्तविक पाहता दादांचे व्यक्तिमत्व चांगले म्हणजे मूळची प्रकृती चांगली, रूप राजस देखणे, रंग गोरा, मुद्रा रेखीव, एखाद्या ग्रीक पुतळ्यासारखी, वाणी स्वच्छ असे असूनही ते नाटकात भरती झाले नाहीत.

दादा परतवाड्यात ए.व्ही. स्कूलमध्ये शिक्षक होते. अतिशय निष्ठापूर्वक ते शिकवित. एखाद्या घटक शिकवण्यापूर्वी त्यातील सर्व बारकावे ते स्वतः समजून घेत. छडीला राजमान्याता असलेला तो काळ असल्यामुळे आपपर भाव न ठेवता ते छडीचा वापर करीत. त्यांच्यापाशी

शिकलेले किती एक विद्यार्थी आजचं भली स्थानं भूषविताहेत. ते एकमुखाने म्हणतात की 'दाण्डेकर मास्तरांचा मार खाल्ला नसता तर काही आजचं स्थान आम्हाला लाभलं नसतं. या दादांच्या उत्तम शिकविण्यामुळं ते पालकांमध्ये लोकप्रिय होते.'(पृ.५१) या सर्वगुणसंपन्न शिक्षकाचे डोके फिरले की ते नोकरी सोडून देत. त्यांना पुन्हा नोकरीवर घ्यावे म्हणून लेखकाच्या आईला खटाटोप करावा लागे.

दादाचे डोके फिरले की ते तीन एक महिने तंद्रीत असत. तंद्रीतून बाहेर आले की दोन वर्ष नेहमीचं निरूपद्रवी जीवन. त्यांचा तोल सुटू लागणार हे त्यांच त्यांना जाणवे. दैनंदिन कार्यक्रमात खंड पडू लागे. नेहमी दिनक्रम विस्कटून जाई. बांधून ठेवलेली वस्त्रे ते शोधून काढीत की ज्या वस्त्रांची गरज त्यांना दोन वर्षांनी लागत. असे अंगात कफनी घालून डोक्याला मोठा साफा गुंडाळीत काना एवढी उंच, तेल पाजलेली अशी उत्तम वेळूची काठी हाती बाळगीत. गळ्यांत फकिरा सारख्या जाड मण्यांच्या माळा ते घालीत. व घराबाहेर पडत अशा वेशात असले की ते हिंदीत बोलत. दादांनी तीन-चार गुरू केले होते. त्यातले एक उज्जयिनीचे शीलनाथमहाराज. दुसरे नागपूरचे ताजुद्दीनबाबा. हे विदेही मलंग नागपूरचा सक्करदरा नावाचा एक शहरा बाहेरचा भाग. तिथं राहायचे त्यांना बसायला आसन म्हणून कुठं लांबवर रोवून ठेवलेला मैलाचा दगड दादांनी उपटून काढला होता. अन् तो एकट्यानं खांद्यावर वाहून ताजुद्दीनबाबा होते तिथवर आणला होता. प्रसन्न होऊन बाबांनी म्हटलं होतं. ''जा बेटा! मेरा नाम रख!''(पृ.४८) दादांच्या मलंग वेशाची कारण मीमांसा आपल्याला वरील परिच्छेदातून लक्षात येते.

नागपुरात राहायला गेल्यापासून वडिलांच्या मलंगवेशात एका कवटीची भर पडली होती. अशा वेशात दादा लेखकाला घेऊन नागपूरच्या गांजाखेत भागात घेऊन गेल्याचे वर्णन आले. गांजाखेत-गंगाजमना ही अतिशय गलिच्छ वस्ती समजली जात होती. 'तिकडे वाईटवाईट बाया राहतात. नको ते उद्योग चालतात. सगळ्या नागपुरातले गुन्हेगार दिवसभर त्या बायांच्या घरांतून झोपा काढीत असतात, अन् रात्री आपापल्या उद्योगांसाठी बाहेर पडतात. गांजा, भांग, चरस, दारू, सर्व प्रकारच्या व्यसनांना तिथं मुक्तद्वार आहे. सभ्य गृहस्थाने जाणे वर्ज्य आहे अशा वस्तीत दादा जात होते आणि तेथे स्वतःच्या मुलालाही घेऊन जात होते हे वर्तन वाचकाच्या मनाला रूचत नाही.

गोपाळने घरातून पला केल्यानंतर दादा खचले. मी मारून मारून माझा पोरगा घालवला किंवा त्याच्यावर घर सोडण्याची वेळ माझ्यामुळे आली अशी अपराधीपणाची भावना दादांच्यात

निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी कोणाही मुलाला मारले नाही. गोपाळ गेल्यानंतर चार वर्षांनी त्यांनी गोपाळ म्हणजे आपला मुलगा पळल्याची बोच अनावर होऊन त्यांनी अफू आणली ती कोळून प्यायले. पहाटपर्यंत कुणाच्या ध्यानी आलं नाही 'एक अतिशय बुद्धीमान, दुराग्रही तापट, सतशील, जीवन येणे प्रमाणे संपलं.'(पृ.४३०)

**मगनलाल :**

लेखकाने स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेण्यासाठी घरातून पलायन केले व मुंबई गाठली. मुंबईत काँग्रेसहाऊसमध्ये काँग्रेसचा स्वयंसेवक म्हणून ते सहभागी झाले. ते प्रभात फेऱ्यांमध्ये सहभागी होत होते. तेव्हा लेखकाचा एका स्वयंसेवकाशी परिचय झाला. 'एक गुजराती स्वयंसेवक होता. मगनलाल त्याचं नाव. तो आदर्श सत्याग्रही होता. अनुशासनाचा पक्का. कुणाचही भांडण झालं कशाहीसाठी हा ते तोडायला मधे उडी मारायचा. - म्हणायचा. ''अरे सांती रख्खो बाबा! बापूकी आग्यां मानो! सांती रख्खो!''(पृ.१०१)

प्रभात फेरीतील लोकांवर गोऱ्या सार्जंटांनी लाठी हल्ले सुरू केले. मगनलाललाही लाठ्यांचे तडाखे बसले. तो ठणकत, लंगडत पाठीवरचे वळ चोंबाळीत कसाबसा काँग्रेसहाऊस वर येऊन पोचला. लेखक दिवसभर देशकार्य केल्यनांतर संध्याकाळी मगनलालबरोबर चर्चा करीत होता. त्याच्याशी बोलताना कळून आलं की आपण एका उद्देशासाठी वापरले जात आहोत. हे मगनलाललाही उमगले होते. 'पण तो प्रामाणिक होता. पत्करलेल्या मार्गावर त्याची श्रद्धा होती. आपलं सामर्थ्य किती ते त्याला पक्कं ठावकी होतं. ते सरळ देशाच्या कामी लावायचं अशा निश्चयान तो स्वांतत्र्य संग्रामात सहभागी झाला होता.'(पृ.१०२)

आंदोलनाचा अंत दिसायला लागल्यावर मगनलालने लेखकाला घरी जाण्याविषयी सुचविले. लेखकाने नकार दिला तेव्हा मगनलालने समजावले, ''असे तर किती पळून येतात. घरून पळून जाण्याची सुरसुरी या वयांत अनेकांना येत असते. त्यात तुझं पळून येणं देशकार्यासाठी होतं. घरी तुला कोणी रागावणार नाही. मी त्यांना समजावून सांगेन. म्हणेन, की तिथं यानं आंदोलनात करता आलं तितकं केलं. आता याला कुणी छळू नका. याचा अपमान करू नका.''(पृ.१०६) अशा रितीने मगनलालने घरी सोडवण्याची तयारी दर्शवली पण लेखकाने ती मान्य केली नाही. मगनलाल सारखा प्रामाणिक माणूस हा लेखकाला घरची आठवण करुन देणारा प्रेमळ व्यक्तिमत्त्वाचा भेटतो.

**पाटणकर :**

पाटणकर हे कोहिनूर फिल्म कंपनीत कॅमेरामन होते. लेखक दादरच्या कोहिनूर फिल्म कंपनीत अभिनय करण्याच्या उद्देशाने गेले तेंव्हा तेथे पाटणकर हे गृहस्थ भेटले. पाटणकरांनी लेखकाची मुलाखत घेतली. लेखकाने त्यांना देशभक्ताची दोन भाषणे म्हणून दाखविली. पाटणकर लेखकाला म्हणाले, ''हे बघ सध्या आमच्या कंपनीत तुझ्याजोग काम नाही''(पृ.१०८) सध्या लेखकाला मालवीयजींच्या घरी राहण्यास त्यांनी सांगितले.

थोडक्यात मालवीयजींच्या घरी नोकर म्हणून पाठविले. त्यानंतर थोड्याच दिवसात पाटणकरांच्या घरी लग्न निघाले म्हणून पाटणकरांनी लेखकाला घरी नेले. हा अनाथ पोरगा पाटणकरांच्या घरी हरकाम्या गडी म्हणून काम करू लागला होता. काम करता करता मध्येच त्यांच्या घरी आलेल्या पाहुण्या मुलांशी भेंड्या खेळण्यात लेखक रमला व पाटणकरांनी सांगितलेले काम विसरला. पाटणकरांनी लेखकावर रागावून त्याला शिवी दिली.(पृ.११३) त्यामुळे लेखकाने पाटणकरांचे घर त्यागले.

पाटणकरांच्या व्यक्तिमत्वावरून असे लक्षात येते की, गोपाळ सारख्या मुलांच्या स्वप्नांचा चक्काचूर करून अशा मुलांना घरकामात जुपुण स्वतःचा स्वार्थ साधायचा असे ते करत. पाटणकर एक स्वार्थीवृत्तीचे व्यक्तिमत्व होते.

**मालवीय :**

कोहिनूर फिल्म कंपनीत मुन्शी म्हणजे लेखनाचे काम करणारी व्यक्ती. लेखकाने त्यांच्याही घरी त्यांचा नोकर म्हणून काम केले. मालवीय हे कवी मनाचे होते.(पृ.१०९) प्रतिभामनाचा मालविय हा लेखकाच्या मनाचा ठाव घेणारा आहे, म्हणून लेखकही त्यांच्याघरी काम करतो.

**उग्रजी :**

सुप्रसिद्ध हिंदी लेखक पांड्ये बेचन शर्मा 'उग्र'. 'उग्र' हे त्यांनी स्वीकारलेले टोपननाव. मूळ नाव बेचन पांडे. पांडेच त्यांनी पांडेय बनवले. हिंदी साहित्य क्षेत्रात ते उग्रजी म्हणून सुपरिचित होते. ते लुंगी नेसत 'डोक्यावर खूप लांब केस होते. दाढीमिशी मुंडलेल्या. माणूस विद्वान होता. खूप वाचत असे'(पृ.१०९) पण लेखकाविषयी त्याला राग होता. मालवीयजींना त्याला त्यांच्या घरी आणलेले उग्रजींना आवडले नाही. उग्रजी व मालवीयजी भांग प्यायचे. दोघेही निरनिराळ्या विषयांवर चर्चा करीत होते. ते बिचारे लेखक काहीही कळत नसताना श्रवण करायचे.

**दामू अण्णा जोशी :**

दामू अण्णा जोशी बालमोहन नाटक मंडळाचे मालक होते. लेखक दोन दिवस त्या नाटक मंडळामध्ये राहिले पण तिसऱ्या दिवशी दामू अण्णानी बोलावले व लेखक पळून आल्याचे ओळखून त्याच्यावर प्रश्नांची सरबत्ती केली.

**सावरकर :**

खटाववाडीत असलेल्या 'लोकमान्य' दैनिकाचे सावरकर संपादक होते. तेथे वृत्तपत्र विकण्याचे काम गोपाळने केले सावरकरांनी गोपाळला ऑफिसमध्ये बोलावून घेतले चौकशी अंती त्यांनी गोपाळला ओळखले नीलकंड दांडेकर व सावरकर आप्तेष्ट होते. गोपाळला घरी नेण्यास सांगितले. लेखक म्हणाले, ''अगदी न कळत मी तर वाघाच्या गुहेत जाऊन मस्त झोपलो होतो.''(पृ.११९) हा वाघ म्हणजे अर्थात सावरकर होते. लेखक त्यांच्या घरून दुसऱ्यांदा पळून गेले. स्वातंत्र्य संग्रामातील सावरकरांचे योगदान त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्पष्ट होते.

**पारशी टॅक्सीवाला :**

पारशी टॅक्सीवाल्याने लेखकाला गाडी पुसण्याच्या मोबदल्यात लेखकाला खायला प्यायला दिले चार दिवस चांगले गेले पण पाचव्या दिवशी हॉटेलात जेवायला घातले. टॅक्सीत झोपायला गेल्यावर तो टॅक्सीवाला गाडीत शिरला लेखकाला डोळा लागल्यावर त्याच्याशी अश्लिल चाळे करू लागला लेखकाने तेथून पळ काढला. या प्रसंगानंतर लेखकाने मुंबई सोडली. अशा प्रकारच्या अश्लील वर्तन करणाया व्यक्तिमत्त्वातील हा टॅक्सीवाला होता.

**पांडुरंगराव तलगिरी :**

युनायटेड पिक्चर्सचे पांडुरंगराव तलगिरी होते. त्यांची लेखकाने भेट घेतली. पांडुरंगरावांनी कांबळे नावाच्या कॅमरामेनच्या नावे चिठ्ठी दिली. ''एक मुलगा धाडीत आहे. त्याच्या योग्य काम असेल ते याला द्यावे.''(पृ.१२५) पांडुरंगरावांनी लेखकाला पैसे दिले व नवीन कपडे घेण्यास सांगितले. उदारमतवादी माणुसकी असलेल्या समाजातील व्यक्तिमत्त्वांचा लेखकाने आढावा घेतला आहे.

**राजाराम देशपांडे :**

युनायटेड पिक्चर्समधील सर्व लोकांसाठी जेवण बनविण्याचे स्वयंपाकाचे काम राजाराम देशपांडे यांच्याकडे होते कंपनीत बरेच जण कोल्हापूरकडचे असल्याने राजाराम झणझणीत स्वयंपाक

करीत होते. यांनी लेखकाला मांस खायचे शिकविले.(पृ.१२६) राजाराम देशपांडे अतिशय धाडसी होते. एकदा साप निघाला तेव्हा हे पीठ भिजवत होते तशाच हाताने त्यांनी सापाचा पाठलाग केला. सापाच्या शेपटीला पकडून त्यांनी त्याला आकाशात गरगर फिरवला व जमिनीवर आपटला. यातून धाडसी राजाराम देशपांडे आपल्याला जाणवतात.

**बबनराव वस्ताद :**

बबनराव वस्ताद म्हणजे तमाशा शौकीन असा एक पहेलवान. त्यांनी लेखकाला मासे पकडण्याचे तंत्र शिकविले काही चूक झाली तर शिव्याही द्यायचे. 'अगदी स्वतःच्या जन्मदात्याचा उल्लेख ''तिच्या आयला आमचा बा'' असा व्हायचा'(पृ.१२७) एक मित्र म्हणून तो चांगला होता. एक करारी व्यक्तिमत्त्व म्हणून लेखकाला ते भावले होते.

**वस्ताद :**

लेखक पुण्याला आल्यावर आर्यन फिल्म कंपनीतून हुसकून दिले. दारोदार हिंडण्याची वेळ लेखकावर आली एका मोटार ड्रायव्हरच्या घरी त्याच्या कुत्र्याला कसाई खान्यातून बकऱ्याची आतडी आणून देण्याच्या मोबदल्यात जेवायला मिळत होते. त्या मोटार ड्रायव्हरच्या शेजारी एक स्त्री राहत होती. तिचा जीव ज्यावर जडला होता तो होता घोडनदीचा एक वस्ताद तालीमपटू. पट्टा, तलवार, फगीरदगा, विटा, लठी, बोथाटी असे सगळे चालविण्यात तो पटाईत होता. काळा रोम होता. अर्ध्या वयाचा दर चारसहा दिवसांनी तो येई. एक दोन दिवस राहून जाई वरातीच्या मोसमामध्ये वस्तादाला क्षणाचीही फुरसत नसे वरातीमध्ये त्याला लाठी, बोथाटी, तरवारी, पट्टा असे हात करून दाखवण्याची सुपारी मिळत असे. एकदा ऐनवेळी त्याला मदत करणारे साथीदार येऊ शकले नाहीत. तेव्हा त्याने लेखकाला बरोबर नेले होते. त्याच्या डोक्यावर अलगद नारळ फोडण्याचे कसब वस्तादाने करून दाखविले. लेखक मात्र जीव मुठीत ठेऊन बसला होता. स्वार्थासाठी अनेकांनी लेखकाचा वापर करुन घेतला, हे या व्यक्तिमत्त्वातून स्पष्ट होते

**वखारवाला :**

लेखक काही दिवस वखारवाल्याकडेही राहायला होता. त्या वखारवाल्याला मुलबाळ नव्हते. म्हणून त्याची बायको नवऱ्याला म्हणाली, ''वत्ते बच्चकू अपने ह्या लाव नं! पालेंगे पोसेंगे- बडा करेंगे!''(पृ.१३८) आणि लेखकाची रवानगी वखारवाल्याकडे झाली. वखारवाल्याने चांगले चुंगले खायला दिले. नवा सदरा आणि चड्डी घेऊन दिली. पुण्याच्या दक्षिणपुर्वेस असणाऱ्या गारपीर

या ठिकाणी लेखकाला सुंता करण्यास नेले लेखकाने मोठ्या चतुराईने तेथून पळ काढला. अनाथ वाटणाऱ्या मुलांसाठी समाजात कणव असणाऱ्यापैकी वखारवाला एक होता.

**कमरू पैलवान :**

वखारवाल्याने लेखकाला मुसलमान बनविण्याचा प्रयत्न केला पण त्याचा प्रयत्न फसला नंतर लेखक एका सायकल वाल्याच्या मदतीने रविवार पेठेत आला. त्या सायकल वाल्याने रविवार पेठेतील काची तालमीसमोर लेखकाला आणून सोडले. कमरू पैलवानाने त्याला आश्रय दिला. त्याने लेखकाला घरी नेले. त्यानंतर वखारवाल्याकडे जावून त्याने त्याला दमही दिला. लेखक तेथेच तालमीत राहत होता पण तेथे त्याचे मन रमले नाही.

**महाराजजी :**

'महाराजजी चांगला उंच धडंग, काळाकुट्ट पुढले दात पडले होते. अंगानं सडसडीतच होता'(पृ.३६७) महाराजजीला गांजा ओढण्याचे व्यसन होते. गांजाच्या धुरामुळे ओठ अगदी विवर्ण झाले होते. ''संध्याकाळी चिलीम झाली, की तास दोन तास ते बेहोष पडून असतात.''(पृ.४७७) ही खंत मिराने गोपाळकडे व्यक्त केली.

''महाराजजी मीराला गाणं शिकवायला जायचे. गांजा पिऊन घशाचं मातेरं करून घेतलं पण आजही जर कधी गातील मन लावून, तर रानांतली गुरं धावत येऊन उभी राहतील आइकत!''(पृ.४७९) अशी स्तुती मीराने महाराजजींची केली. त्यांच्या स्वरावर मीराने मनापासून प्रेम केलं. मीरा त्यांच्याबरोबर पळून आली होती. थोड्याच दिवसात त्यांना आपली चूक उमगली पण आता काहीही पर्याय नव्हता. हेच शल्य विसरण्यासाठी त्यांनी व्यसन लावून घेतलं. गांजा मिळाला नाही तर मिराला महाराजजी छळत होता, मारत ही होता. अशा प्रकारच्या साधु महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचा समाजातील वेगळे स्वार्थी व्यक्तिमत्त्व म्हणून उल्लेख केलेला आहे.

**गोखले :**

गोखले नावाच्या युवकाने लेखकाच्या जीवनाला कलाटणी दिली. आपल्यावर मुघलांनी, इंग्रजांनी राज्य केले याचे कारण आपल्यामध्ये परस्परांविषयी असलेली कटू भावना. इंग्रजांना घालवून देण्यासाठी उग्र संघर्ष चालू आहे पण संघर्षापूर्वी समाज संघटित व्हायला हवा अशा आशयाचे भाषण गोखले यांनी केले. आणि गोपाळच्या मनात राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सामील

होण्याचे स्फुलिंग पेटले. देशभक्तीची प्रेरणा निर्माण करणारी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याविषयीचा अभिमान व्यक्त करतो.

**बाबासाहेब आपटे :**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कामाला सर्व जीवन समर्पित केलेले. तत्वचिंतक ब्रह्मचारी यांनीच गोपाळला इंदूरला दिवाळी शिक्षण वर्गासाठी आमंत्रण दिले होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अशा प्रकारच्या व्यक्तिमत्त्वांचा लेखकावर प्रभाव असलेला दिसतो.

**३.२.५ सत्तांतर :**

'सत्तांतर'मधील पात्रे ही वानरेच आहेत. 'सत्तांतर' कादंबरीतील वानरांची शरीरवैशिष्ट्ये व स्वभाववैशिष्टये यानुसार त्यांचे नामकरण केलेले आहे. 'सत्तांतर' हया कादंबरीत प्रमुख व्यक्तिरेखा महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यात प्रामुख्याने १.मुडा, २.लालबुडया, ३.मोगा, ४.दाढीवाला या नर (पुरुष) व्यक्तिरेखा आहेत. तर तरणी, लांडी, बोथरी, मादी (स्त्री) व्यक्तिरेखा आहेत. कादंबरीत काही व्यक्तिरेखा गौण असल्यातरी कादंबरीतील त्यांचे स्थान अतिशय महत्त्वपूर्ण असलेले दिसते. त्यामध्ये बोथरीची बहीण, काणी, लाजरी, थोटी, उनाडी, जाडी बोकांडी, तरणी हया व्यक्तिरेखा लेखकाने तेवढयाच ताकदीने उभ्या केल्या आहेत.

**मुडा :**

'सत्तांतर' ह्या कादंबरीत 'मुडा' हा एक प्रमुख हुप्या आहे. एका वानर टोळीचा प्रमुख हया नात्याने त्याचे कादंबरीतील स्थान महत्त्वपूर्ण आहे. या हुप्याच्या डाव्या कानाचा, वरच्या बाजूचा मोठा तुकडा हाणामारीत गमावला होता आणि तो मुडया कानाचा झाला होता. म्हणूनच लेखकाने त्याचे नामकरण मुडा केलेले आहे. हा वजनाने भारी होता आणि फार संतापी, रागीट होता. याचे स्नायू पिळदार होते. एकूणच हा खैराच्या गाठीसारखा टणक होता. मारामारीच्या बऱ्याच खुणा त्याच्या अंगावर होत्या. शेपटावर सुद्धा चांगल्या दोन विती लांब असा वण होता.

या विशाल अरण्यातला, तळ आणि नाला यांच्यामधला एक लहानसा, आडवा-उभा अर्धा कोस भरेल, असा पट्टा म्हणजे मुडा वानरनराचं राज्य होतं. त्यानं ते सामर्थ्यानं कमावलेलं होतं. या प्रदेशातील फळझाडं त्याची होती. इथल्या झाडांची लुसलुशीत कोवळी पालवी, कळया, फुलं, फळ, भेड, रस, डिंक सगळं त्यांच होतं. इथली खारमाती त्याला चाटण्यासाठी होती. हा एवढा प्रदेश तो आपल्या भूपकारानं दणाणून सोडत होता.

टोळीतल्या सगळया वानरी त्याच्या होत्या. सारी लहान-मोठी पोरं बाळं त्याची होती. गेले चार पावसाळे तो या लहान संस्थानचा अधिपती होता. हे राज्य त्याला वडिलोपार्जित असं, वारस म्हणून मिळालेलं नव्हते. ते त्याला सामर्थ्यानं मिळवावं लागलं हातं. एकवार मिळालं म्हणून आता ते आपलचं राहील, म्हणून त्याला स्वस्थ राहता येत नव्हतं. सतत युद्धमग्न राहून त्याला ते सांभाळावं लागतं होतं. अनेकांनी त्याच्या अधिकाराला आजवर आव्हान दिलं होतं.(पृ.३,५) सतत जागृक राहून आपले साम्राज्य मुडा समर्थपणे सांभाळत होता. आपल्या टोळीतील सोळा जणांच्या संरक्षणाची जबाबदारी तो समर्थपणे पेलताना दिसतो. सततच्या संघर्षातून 'मुडा' वानर जगला होता. सुरुवातीला वानरांच पोरं म्हणून जगला होता. नंतर कोवळा नर म्हणून जगला होता. हाणामाऱ्यांतून जगला होता आणि ऐन तारुण्यात एका टोळीचा प्रमुख झाला होता. गेले चार पावसाळे तो टिकून राहिला होता.

मुडा हा चार वर्षापासून आपली सत्ता टिकवून आहे. कारण तो बलवान, पराक्रमी, धूर्त, आक्रमक, टोळीतील सर्वांची काळजी घेण्यास योद्धा वानर प्रमुख आहे. मुडा हा प्रस्थापित राज्यकर्त्याचे प्रतीक वाटतो. मुडा हा सात वानरी, चार लहान पोरं, दीड वर्ष-सव्वा वर्षाची तीन नरपोरं आणि वयात आलेल्या दोन पोरी सोळा जणांची जबाबदारी टोळीनायक या नात्याने तो समर्थपणे पेलवत होता. मुडा हा दररोज सकाळी सर्वात उंच फांदीवर चढून चौफेर बघतो आणि तोंड आभाळाकडे करुन 'हूप्प... हूप्प' असा आवाज करतो. प्रत्येक दिवशी कुणीकडल्या रानात-भागात टोळीने खाणं धुंडाळायचं हे ठरविण्याचा अधिकार फक्त त्यालाच असतो. अचानक एक दिवस लालबुड्या नाहीसा होतो. त्या सुवर्ण रुंधीचा फायदा घेऊन मुडाने आपल्या राज्याच्या सीमा वाढविलेल्या होत्या. अनेक वेळा मुडाने मोगा आणि त्याच्या पाच साथीदारांना आपल्या बलाढय शक्तीच्या जोरावर धुडकावून लावले होते. आव्हानात्मक पवित्रा घेऊन तो येणाऱ्या संकटांवर मात करीत होता. लालबुड्या अचानकपणे गेल्यानंतर त्याच्या टोळीतील शहाण्या वानरींशी मुडा वारंवार जुगतो. लालबुडयाचे अस्तित्त्व संपल्यावर त्याच्या टोळीवर आपली सत्ता गाजवितो. मुडा आपले साम्राज्य वाढवितो. म्हणूनच या कादंबरीचा नायक हा मुडा आहे. मुडा हा नेहमीच बचावात्मक पवित्रा घेत असतो. सहसा तो संघर्ष, भांडणे आणि हाणामाऱ्या टाळण्याचा प्रयत्न करतो. सत्ता मिळविण्यासाठी मोगा आणि मुडा यांच्यात संघर्ष होतच होता. मोगा आपल्या साथीदारासह सतत तीन दिवस मुडाच्या टोळीवर हल्ले-आक्रमण करतो. शेवटच्या हल्ल्यात मुडाची उजवी कुस शेवटच्या बरगडीखाली टिचभर उसवल्यामुळे तो पराभव स्वीकारुन टोळी सोडून पळून जातो.

मुडाचा काळाभोर चेहरा मोगा आपल्या धारदार नखांनी ओरबाडून रक्तबंबाळ करतो. आणि त्यातच मुडाचा करुण अंत होतो. मुडाची सत्ता संपुष्टात येते. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संघर्ष हे मुडाच्या जीवनाचे सारतत्त्व असल्याचे लेखक नमूद करतो. नराला जगण्यासाठी सत्तासंघर्ष आणि जीवनसंघर्ष करावाच लागतो. ह्या संघर्षात कमजोर प्राण्याचा किंवा व्यक्तिचा टिकाव लागू शकत नाही. या संघर्षात प्रत्येकाला आपले अस्तित्त्व सिद्ध करावे लागते.

**लालबुडा :**

सात वर्षापूर्वी याच जंगलात लालबुडयाचा जन्म झाला होता. एका लहानशा टोळीतील आईच्या पोटी भर मध्यानरात्री वानरींचा घोळका आजूबाजूला जन्मलेला असतांना लालबुडयाचा जन्म झालेला होता.(पृ.३४) चार दिवसांचा होता, तेव्हापासून टोळीतील इतर हौशी आयाबायांनी वारंवार त्याला आईच्या मिठीतून ओढून नेला होता. कुणी माया करत, कुणी हाल करत. दिवसातला जवळजवळ निम्मा वेळ पोर मावश्यांकडे फिरत असे. आईची छातीही त्याला फार कमी काळ मिळाली. सहा महिन्यांचा झाला. न झाला, तेव्हाचा आईनं त्याला छातीपासून तोडणं सुरु केलं. या वयापासून काय खावं, काय खाऊ नये, कोणत्या फळाला हात लावावा वा कोणत्या लावू नये याचे धडे या पोराला मिळाले. थोडक्यात यातून असे दिसून येते की, लवकर आपल्या पायांवर उभे राहावे व स्वावलंबी बनावे याचे शिक्षण यातून मिळावे असा काहीसा उद्देश वानरांचा असतो. लालबुड्या हा सर्वांचा लाडका होता. सर्व निवडक गोष्टी त्याला मिळत होत्या. बरोबरीच्या पोरांबरोबर कुस्त्या, पाठशिवणी, हुतुतू खेळण्यात त्याचा वेळ आनंदात जाऊ लागला. लालबुडया हळूहळू वाढत होता. अडीच-पावणे तीन वर्षाचा झाला. त्याच्या अंगातील मस्ती दिसू लागली. वेळ अणि संधी मिळताच हे गुंड पोरं गुंडगिरी करत होते. जे-जे उत्तम ते ते मिळविण्याकडे त्य ाचा अग्रक्रम असायचा टोळीतील पोरं पोरी त्याला घाबरून असत. त्याची जागा टोळीत बऱ्याच वरच्या क्रमांकाची होती.

काही आगळीक झाली नसतांना त्याची व त्याच्या भावाची टोळीतून हकालपट्टी झाली. मग असे हाकलून दिलेले आणखीही चारसहा जण गोळा झाले. इकडेतिकडे भटकत मिळेल ते, मिळेल तिथे ओरबाडून खात मोठे झाले. अंगच्या ताकदीने लालबुडया एका टोळीचा मालक झाला मुलूख बळकावून मालक झाला होता. मुडाच्या टोळीच्या सरहद्दीत लालबुडाच्या टोळीचे साम्राज्य पसरलेले होते.

शेजारी राहणारा मुडा हा लालबुडाचा शत्रू होता. या दोन टोळ्यांत सतत भांडणे होत-होती. परंतु जीवघेण्या हाणामाऱ्या ते टाळत. आपली टोळी सोडून हद्दीपलीकडे दूर जाणे ही धोक्याची गोष्ट लालबुड्या नेहमीच टाळत असे. पण थोडे इकडे तिकडे घसरण्याने झाडांच्या शेंडयावर उड्या घेत घेत तो टोळीपासून दूर जाई आणि काही साहस ही करी. साहस म्हणजे अडचणीच्या जागी शिरणे, झाडाच्या टोळीत काखे इतका हात घालून पाहणे, झाडावर किंवा जमिनीवर, पाखरांनी घातलेल्या अंड्यांच्या तपासात राहणं आणि अशी अंडी दिसली की, ती फोडून आतील बलक चाटून पुसून फस्त करणे. रानकोंबडी, लांडोरी यांनी घातलेली अंडी, हुडकून काढणे. ती शिताफीने काढून झाडावर पळणे आणि निवांतपणे खाणे यात मजा आहे. अंडी चोरून खाणे ही चोरीच होती. भुकेल्या पोटी ही चोरी करण्याची बुद्धी अनेकांना होई. कोल्हयानां, रानडुकरांना, वाघांना आणि एका जागी दोन चोरांची गाठभेट झाली की हाणामारींचा प्रसंग येईच.

ज्या दिवशी लालबुड्या नाहीसा झाला त्या संध्याकाळी त्याने एकट्यानेच हे साहस केले होते. या झाडावरून त्या झाडावर उडी मारतांना एक वाळलेली जाड काटकी नेमकी चितूर मादीवर पडली आणि ती दचकून फर्डरकन उडाली. ही अंडी लालबुड्याने पाहिली आणि तो चपळाईने खाली उतरला. घाईगडबडीत पाचोळ्यावर जोराने हात सर्पावर पडला. त्याच्या  हाताचा सर्पाने चावा घेतला हाताचा पंजा सुजला, वेदनांचा आगडोंब उसळला. तो डहाळ्या हलवत होता. चित्कार करत होता. झाडावर चढत होता. खली उतरत होता. जागीच हागमूत होऊन त्याच्या शरीराची विटंबना झाली. पोंटात ढवळून मागोमाग उलटी झाली. रक्त गेलं, श्वास घेणे जड जाऊ लागले रात्री कधीतरी लालबुड्या अंधारात भुतासारख्या पांढऱ्या दिसणाऱ्या करू झाडाच्या बुडाशी मरून पडला.

लालबुड्याचे पात्र साकार करतांना तसेच त्याच्या मरणाचा प्रसंग दाखवितांना माडगूळकर म्हणतात, ''वानरे पक्षांची  अंडी खातात, हे रहेमान या शास्त्रज्ञाचे निरीक्षण आणि व्हेरवंट जातीची माकडे साप दिसताच एक विशिष्ट आवज काढून सावधनतेचा इशारा देतात.(स्ट्रॅहसकेर १९६७) हे दोन संदर्भ  'संत्तांतरातील' लालबुडयाचे मरण या प्रसंगाची बीजे आहेत.''[१३] लालबुड्या हा मुडाच्या म्हणजेच शेजारच्या टोळीचा सत्ताधारी आहे. मुडाच्या टोळीबरोबर त्याची टोळी लुटुपुटुचा संघर्ष करते. मात्र भयानक निकरार्थी लढत लालबुड्या टाळतो. लालबुडयाच्या मृत्यूबद्दल र.बा. मंचरकर म्हणतात, ''साहस आणि बेसावधपणा लालबुडयाला मृत्यूच्या पाशात ओढून नेतात. येथे अशा गोष्टींना क्षमा नाही. चुकांची किंमत प्राणांनीच मोजावी लागते. घटका भरली की कोणी

वाचत नाही. आकस्मिकता आणि विद्रुपता ही मृत्यूची शस्त्रे येथे सदैव परजलेली असतात. 'जीवो जीवस्य जीवनम्' हाच येथला न्याय आहे. 'सबळ तोच टिकेल' हाच येथला मंत्र आहे. हे डार्विनला जाणवलेले जग आहे. या संघर्षाचे स्वरूप संरक्षणात्मक आहे.''[१४]

अतिधाडस कधी आपणाला शेवटाला घेऊन जाते. अंडी चोरून खाणे म्हणजेच चोरी करणे हे दृष्टकृत्य आहे. सावधानता पाळली नाही, की आकस्मिक कोणताही प्रसंग ओढावू शकतो. चुकांची किंमत फार मोठा द्यावी लागते. शक्तीमान असतो तोच टिकतो. लालबुड्याच्या बाबतीत या सर्व गोष्टी घडल्या होत्या. ही सर्व नरपात्रे मानवी स्वभावांची प्रातिनिधिक चित्रे आहेत.

**मोगा :**

मोगाच्या तोंडाभोवती भरपूर झिंज्या होत्या. मोगा हा बुटका पण भक्कम शरीराचा आणि तीक्ष्ण दृष्टी असेलला होता. दहा जणांत उठून दिसावा असे त्याचे व्यक्तिमत्त्व होते. ज्यावेळेला तो मुडाच्या कळपात शिरतो त्यावेळी नुकत्याचे शहाण्या झालेल्या, तत्काळ वंश झालेल्या त्या वानरीनं लगोलग मोगाशी जवळीक केली. ती त्याच्या शेजारी येऊन बसली आणि वाकून-वाकून त्याच्या बगलेखालची बाजू दोन्ही हातांनी स्वच्छ करायला लागली. पलीकडे उंच डहाळयावर बसून मुडा हे पाहत होता.

'मोगा हा भटक्या लुटारू पेंढाऱ्यांचा प्रतिनिधी आहे. पाच तरणेबांड साथीदार नेहमी त्याच्या सोबतीला असतात. मुडाने चार वर्षापूर्वी ह्याला सत्ताभ्रष्ट करुन हुसकावले होते. तेंव्हापासून तो पेंढारगिरी करीत हिंडत राहतो. त्याच्यासारखेच अजून पाच बेवारस वानर नर त्याच्याबरोबर साथीदार म्हणून आपली भूमिका बजावत असतात.' मोगाला स्वतःची टोळी किंवा भूमी नसते. तेंव्हा तो पेंढाऱ्यासारखी लुटमार करणे, दिशाहीन भटकणे, दुसऱ्याच्या हद्दीत शिरणे अशी कृत्य करीत राहतो.

मुडाने आपली वडिलोपार्जित सत्ता बळकावलेली आहे. ती परत मिळविण्याची योग्य संधी केव्हा येईल? याची मोगा वाट पाहत असतो. मोगा पाच वर्षाचा झाला होता. त्याच्याच परिवारातील पाच जवान नर पोरं त्याच्या मदतीला होती. मोगाला सत्ता मिळविण्याचा अनुभव नव्हता. पण आपल्या साथीदारांच्या मदतीने सत्ता मिळविणे गरजेचे वाटत होते. सत्ता मिळाल्यास पेंढारी मोगाला टोळीच्या प्रमुख पदाची प्रतिष्ठा मिळणार होती.

मोगा हा दांडगर घुसखोर सत्तेचे प्रतीक आहे. काहीवेळा पराभव त्याच्या वाटयाला येत होता. अनेक पराभव पत्करल्यानंतर कधीतरी मुडाला पराभूत करुन, धुळीत लोळवून मोंगा सत्ताधीश

बनतो. लुटारू-पेंढारी ह्या नगर प्रमुखाला पुन्हा टोळी प्रमुख सत्ताधीशाचा दर्जा लाभतो. सत्तेबरोबर येणारे सूख व उपभोगही त्याला मिळतात. लालबुडयाच्या मृत्यूनंतरही त्याच्या टोळीची सत्ता बळकवण्यासाठी मोगा आणि मुडा यांच्यात तीव्र संघर्ष, जीवघेणी स्पर्धा सुरु होते.

मोगा लालबुड्याच्या कळपात बेधडकपणे शिरुन त्या कळपातील नुकत्याच शहाण्या झालेल्या वानरीला जुगतो. हे सर्व बाजूच्या डहाळीवर बसलेला मुडा पाहतो. मोगावर हल्ला करण्यासाठी तो धाऊन जातो. मोगाला हल्ल्याची चाहूल कळताच शेपटी वर करुन बचावात्मक पवित्रा घेऊन तो पळून जातो. मुडा त्याच्या मागोमाग धावत जातो. मोगाला हद्दीबाहेर हुसकावण्याचे काम तो करतो.

मोगा ह्या टोळ्यांमध्ये अनेकवेळा घुसण्याचा प्रयत्न करतो. अंदाज घेत असतो. डावपेचाची रचना करीत असतो. मोगा आणि त्याचे पाच साथीदार हे मुडावर हल्ला करतात. त्याला रक्तबंबाळ करतात. त्या हल्ल्यातच मुडाच्या उजव्या बरगडीचा शेवटची कूस उसवली जाते. आणि त्यातच मुडाचा शेवट होतो. आपली वडिलोपार्जित गमावलेली सत्ता परत मिळविण्यात मोगा यशस्वी झालेला दिसून येतो.

मुडा आणि लालबुड्याच्या मृत्युनंतर त्यांची सत्ता आणि साम्राज्य मोगाला उपभोगायला मिळते. मुडा आणि लालबुडयाच्या टोळींचे प्रमुखत्व (नायकत्व) करण्याची संधी मोगाला लाभते. टोळीचा नायक असल्यामुळे सर्व निवडक गोष्टी त्याला मिळतात. निवडक फळ, निवडक जागा त्याला प्राप्त होतात. दोन्ही टोळीत त्याचा दरारा निर्माण होतो. त्याचा आदब राखला जातो आणि सर्वच जण त्याला घाबरुन राहतात. ह्या दोन्ही टोळीतील तरणी, काणी, लांडी, लाजरी, उनाडी या वानरी मोगाला शरण जातात व वश होतात.

**दाढीवाला :**

दाढीवाला हा मोगाचा सोबती होता. गायब झालेल्या लालबुड्याच्या टोळीला प्रमुख मिळावा आणि मोगा, दाढीवाला ह्यांच्या माध्यमातून मुडा आणि लालबुड्या ह्यांच्या टोळीतील समतोल कायम रहावा. ह्यासाठी लेखकाने ही व्यक्तिरेखा निर्माण केली आहे. लालबुड्याच्या टोळीवर मोगाचा सोबती दाढीवाला कब्जा करतो आणि उरलेल्या नरपारोंना हाकलून देतो. मोगा आणि दाढीवाला हे शेजारी होते. मोगाच्या पाच साथी दारांमधील सर्वात ताकदवान पेढांरा म्हणजे हा दाढीवाला वानर होता. मोगा सोबत जाऊन मुडाशी हा हाणामारी करतो. दाढीवाला हा पेंढारी लालबुड्याच्या बेवारस टोळीत घुसतो. आणि ह्या टोळीतील झिप्री, जाडी या तिन्ही माद्या गर्भार

असतानाही तो पुन्हा पुन्हा त्यांच्याशी जुगतो. मोगाच्या पेंढारी टोळीतील पाचजणांपैकी खऱ्या अर्थाने नर या पदवीला पोचलेला दाढीवाला एकमेव अंगावर धावून जाण्याची वृत्ती त्याच्या ताकदीची निशाणा होती. हुसकावून जो जास्तच दादागिरी करून चौदा जोडीदारांना हुसकावून लावतो. चार दिवसानंतर दाढीवाला उत्तरोत्तर जास्तच दादागिरी करत राहतो. बोकांडी आणि मारकुटी ह्या लालबुड्याच्या टोळीतील दोन माद्या पाच दिवसांनीच माजावर येतात. आणि दाढीवाल्याला जुगतात. पेंढारी म्हणून असलेल्या दाढीवाल्यांच्या रूपाने लालबुड्याच्या बेवारशी ढोळीला नर मिळाला होता. मुडाच्या टोळीतली दोन पोरं दाढीवाल्याने हुसकावलेल्या चौघांना जाऊन मिळाली होती. ह्यातून तयार झालेली 'सहा भटक्यांची टोळी' पुन्हा परागंदा झाली (पृ.५६) दाढीवाल्याच्या मनात लालबुड्याच्या टोळीचे नेतृत्व करण्याची सत्ताकांक्षा निर्माण होते. त्यांच्या मनात निर्माण झालेल्या सत्तेच्या लालसेविषयी माडगूळकर लिहितात, 'प्रौढ वानरींना वाटाडया करून दाढीवाला आपल्या राज्याच्या सीमा बघू लागला. रस्ते, वाटा माहीत करून दाढीवाला आपल्या राज्याच्या सीमा बघू लागला. कोणतं फळझाड कुठं आहे, झोपायला झाडं कुठं कुठं आहेत, पाणी कुठ आहे. धोक्याच्या जागा म्हणजे रानकुत्र्यांची वस्ती, बिबट्याची जाळी, अजगराचं बीळ त्यांनं बघून घेतलं-आणि सगळं स्थिरस्थावर झाल्यावर, दोन आठवडयांनी पहिल्यांदा भल्या पहाटे जाग येताच त्यानं भूपकार केला.'(पृ.५६-५७) कालचा बेवारस नर टोळीतील एक पेंढारी दाढीवाला सत्ताधारी बनला होता. सत्तासंघर्षात विजयी झाला होता.

दाढीवाल्याचा आवाज अजून विरला नाही. तोवर काटे सावरीच्या उंच झाडावरून प्रतिसाद आला होता. तो प्रतिसाद मोगाचा होता. दाढीवाला व मोगा शेजारी झाले होते. ते दोघे शेजारधर्म निभावणार होते, की एकमेकांच्या जीवावर उठणार होते हे भविष्यकाळ ठरवणार होता. आज केवळ दाढीवाल्याने आपले अस्तिव स्वयंघोषित केले गेले होते. त्याची दखल घेतली होती. मुडा आणि लालबुड्या ज्याप्रमाणे सख्खे शेजारी होते. त्याप्रमाणेच मोगा आणि दाढीवाला हे दोघे मुडा आणि लालबुड्याला सत्ताभ्रष्ट करून काबीज केली होती. मोगा आणि दाढीवाला शेजारी झाले होते.

**तरणा :**

मोगाच्या टोळीतील एक तरणाबांड पेंढारी वानर म्हणजे 'तरणा' होय. नावाप्रमाणेच तरणाबांड लढवय्या हा वानर आपल्या साथीदारांसह मुडाच्या टोळीत घुसतो. पाव-एक घटका घबराटीचे वातावरण यांच्याकडून तयार करण्यात येते. मुडाच्या टोळीत घबराट पसरवतो. त्याचाच

फायदा घेऊन तरणा मुडाला न्याहळतो. त्याची आणि मुडाची नजरानजर होते. 'तरणा'च्या डोळ्यात खून चढतो. तो दात–ओठ खाऊन मुडाच्या अंगाशी येऊन भिडतो. त्यांच्या हया धुमश्चक्रीचे वर्णन लेखक करतात, ''जबडा उघडून त्यानं आपले सुळे दाखवले. गुरगुराट केला. दात कराकरा खाल्ले. दोघांनीही काही क्षण एकमेकांचा अदमास घेतला आणि दोन अनोळखी कुत्रे जसे एकमेकांच्या अंगावर तुटून पडतात, तसे हे तुटून पडले. पातेरा वाजला. त्यांच्या तडाक्ष्यांनी वाळली पानं हवेत उडाली. कधी तरणा नरवर, तर कधी मुडा वर''(पृ.४२) तरणा नर नावाप्रमाणेच तरुण होता. तसेच तरणाबांड असल्यामुळे चलाख, चपळ ही होता. त्याचे चावे, सुळे चुकवता चुकवता बेजार होऊन गेला होता. मुडाने ही आपल्या अंगाच्या ताकदीने तरणांच्या शेपटाच्या बुंध्याला पकडून कडकडून, जेवढी शक्ती आहे तेवढी एकवटून चावा घेतो आणि आपले सुळे मांसात घुसताच हिसडा (झटका) मारतो. तरणा नर कळवळून जिवाच्या आकांताने ओरडून सुटका करून घेतो आणि पळून जातो. तरणाचा पाटलाग करण्यासाठी मुडा त्याच्यावर झेप घेतो. नेमकी ती वेळ साधून तरणाचा साथीदार मोगा मुडावर हल्ला करतो. मुडाच्या कचाट्यातून तरणाची सुटका होते. मोगा आणि मुडा यांच्यात तुंबळ हाणामारी होते. निम्मी अर्धी शक्ती तरणाबरोबर दोन हात करण्यात खर्ची झालेल्या मुडाला मोगा त्वेषाने हल्ला करून रक्तबंबाळ करतो. नंतर हे सहाही घुसखोर वावटळी प्रमाणे गटगटत, निघून नाहीसे होतात. तात्पर्य मुडाला अर्धा घायाळ करण्यात, त्याचे निम्मे खच्चीकरण करण्यात तरणाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे. म्हणून तरणाचे व्यक्तिमत्त्व कादंबरीत महत्त्वाची भूमिका वठवणारे ठरले आहे.  सत्तांतरमधील मुडा, लालबुड्या, मोगा, दाढीवाला, तरणाा ही सर्व नर पात्रे मानवी स्वभावांची प्रातिनिधिक चित्रे आहेत.

**४.२.६. झोंबी :**

**आनंद :**

'झोंबी' या कादंबरीचे नायक लेखक स्वतः आनंद यादव आहेत. कारण झोंबी ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने त्याच्या जन्मापूर्वीची कौटुंबिक पार्श्वभूमी त्यानंतर त्याचा जन्म, बालपण व मॅट्रिक पर्यंतच्या शिक्षणाचा कालावधी मांडतांना या कालखंडातील त्याच्या जीवनातील घटनांचा आलेख कादंबरीत रेखाटला आहे. आनंदची आई तारा व वडील रतनू यांचे हे दोन बहिणींच्या पाठीवर झालेले पुत्ररत्न होते. आनंदचा जन्म झाल्यावर मुलाला जन्म दिल्यामुळे ताराला कृतकृत्य झाल्यासारखे वाटले. आनंदच्या जन्मामुळे आईचे नांदणे

पक्के झाल्याचा विश्वास तिच्यात निर्माण झाला. वडिलांनाही धन्य वाटले पण ते तात्पुरत्या स्वरूपाचे वाटते कारण पुढे हा आनंद त्याच्या जीवनात कधीच पाहायला मिळाला नाही.

रामाला नारळ फोडून, चिरमुरे, भेडबत्तासू देवाला ठेवून साकेकर गुरूजींच्या मार्गदर्शनाखाली आनंदच्या बिगारी पासूनच्या शिक्षणाचा श्री गणेशा झाला. 'बिगरीतनं इन्फंट्रीत गेलो. बिगरी कधी पास झालो ते आठवत नाही; पण 'आता वरच्या वर्गात बसा.' असं एक दिवस मास्तरांनी सगळ्यांना सांगितलं.'(पृ.३६) बिगरी, इन्फंट्री आणि त्यानंतर पहिलीत प्रवेश असा क्रम होता. चौथी पर्यंतचे आनंदचे शिक्षण निर्विघ्न पणे पार पाडले परंतु इयत्ता पाचवीत रणदिवे मास्तरांनी आनंदने लिहिलेल्या निबंधाचे कौतुक केले. ''हा जकाते असाच अभ्यास करत राहिला तर उद्या मोठा लेखक होईल. कागलच्या लेखकांची परंपरा राखील.''(पृ.८३) स्वतंत्रपणे डोके चालविणारा हुशार मुलगा अशी आनंदीची पाचवीत प्रसिद्धी झाली. पण त्याच्या शिक्षणाला ग्रहण लागायला इयत्ता पाचवीमध्ये सुरुवात झाली. सहा महिन्यांची बारा आणे फी तटली आणि बारा आण्यांसाठी लेखकाची परीक्षा बुडाली. वडिलांची इच्छा आता लिहिण्या वाचण्यापुरते शिक्षण झाले त्यामुळे शेताला पाणी पाजायला, ढोरं राखायला आनंदाने शिक्षण सोडून शेतात जावं, असे वाटत होते. लेखकाने वर्षभर शेतीची कामे केली पण शाळा शिकायला मिळावी म्हणून त्याची तगमग होत होती. लेखकाच्या वडिलांचे मित्र दत्ताजीराव देसाई यांच्या मध्यस्थीने आनंदने वडिलांना समजावण्याचा प्रयत्न केला आणि शेवटी नाइलाज झाल्याने शेवटी वडिलांनी नाखुशीने परवानगी दिली.

इयत्ता पाचवी व सहावीमध्ये लेखकाच्या अंगी असणाऱ्या कलागुणांचा विकास झाला उदा. कविता करणे, अभिनय करणे इयत्ता सहावीमध्ये आनंद दुसऱ्या क्रमांकाने पास झाला. इयत्ता सातवीत मात्र पुन्हा शाळेत जायला वडिलांचा विरोध होऊ लागला. बरीच पुस्तके बदलली होती त्यामुळे नवीन पुस्तके घ्यावी लागणार होती. सातवीचे वर्ष म्हणजे बोर्डाचे पेपर्स त्यामुळे परीक्षेला बसण्यासाठी एकशेवीस दिवस शाळेचे भरणे आवश्यक होते. दादाच्या विरोधाला सामोरे जात लेखकाने इयत्ता सातवी पदरात पाडून घेतली सबंध तालुक्यात आनंदचा सातवीमध्ये प्रथम क्रमांक आला.(पृ.२०६) सातवी झाल्यावर वर्षभर पुन्हा शाळा सोडली. आठवीत असलेल्या आबाजीची पुस्तके वाचली. हायस्कूलच्या हेडमास्तरांना आठवीत घेण्याविषयी विनंती केली. आठवीत थोडेच दिवस शाळेत जाऊनही पहिला नंबर मिळविला. इयत्ता नववीतही दादाच्या विरोधाला न जुमानता प्रवेश मिळविला. पण शाळेच्या फी चा प्रश्न आवासून उभा राहिला. घरची आर्थिक परिस्थिती

चांगली असणाऱ्या मुलांना फ्री शीप मिळाली परंतु आनंदला मात्र वशिला नसल्यामुळे फ्रीशीप मिळाली नाही. शिक्षकांनी फी साठी तगादा लावला यावर उपाय असा काढला आबाजीची गणित–भूमितीचा शिकवणी आनंदने घ्यायची व त्याचा मोबदला आबाजीने फी भरण्यासाठी आनंदला पैसे द्यायचे. दोन महिन्यांची फी आबाजीने भरली. दुसऱ्या सहामाहीतही अर्धी फ्रीशीप मिळविली. ओढाताण करून नववीत कसाबसा आनंद पास झाला.

दहावीचा निकाल कडक लावतात त्यामुळे आनंद धास्तावला होता. दादा शेतीच्या कामासाठी आनंदला शाळेत जाऊ देत नव्हता तरीही आनंदा दुपारपर्यंत शेतात काम करून दुपारनंतर धावतपळत शाळेत जात होता. 'सकाळपासून चार–साडेचार तास राबूनही, मी कोरडी भाकरी नि कोरडी भाजी घेऊन पळत होतो.(पृ.३४०) आनंदच्या शिक्षणाविषयीच्या आसक्तीविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''शाळेच्या व्यतिरिक्त सर्व वेळ केवळ मळ्याात ढोर मेहनत करून शाळा करू पाहणारा आनंदा या सर्वात चक्रव्यूहात शिरलेल्या अभिमन्यूची मिथ्य प्रतिमा वाचकांपुढे साकार करतो.''[१५]

यावरून लेखकाने शिक्षणासाठी किती कष्ट सोसले याची आपल्याला कल्पना येते. शाळेत उशिरा जाण्यामुळे शाळेतील शिक्षकांकडून मिळणारी शिक्षाही भोगली. तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करत, अतिशय मेहनत करून दहावीची परीक्षा दिली. फी बाकी असल्याने फक्त पास झालाय एवढच कळले. मार्क्स कळाले नाही, पण त्यावरही समाधान मानत शेताच्या कामाला सुरूवात केली. पुढे एस.एस.सीचे महत्वाचे वर्ष पदरात पाडून घेण्याचा निश्चय केला दादाने पुन्हा विरोध करण्यास सुरूवात केली. शाळेत गेला. म्हणून दादाने आनंदला खूप मारले. रागाच्या भरात आनंद घर सोडून गेला. कोल्हापूरला नकला करून, दाखवून पैसे मिळविण्यासाठी बऱ्याच शाळांमध्ये गेला पण सर्वांनी दरवाजे बंद केले. केळीची साल खाऊन दिवस काढले. दोन दिवस खूप शोधाशोध करूनही आनंद सापडला नाही. म्हणून रतनू हवालदिल झाला. गोपातात्याने आनंदला शोधून आणले. पण त्यानंतर मात्र रतनूने आनंदला विरोध केला नाही. शेताची कामे करून दोन अडीच महिनेच अभ्यास केला तरीही हायस्कूलच्या विद्यार्थ्यात तिसऱ्या नंबराने आनंद पास झाला होता. आनंदने कष्ट व अभ्यास याच्या जोरावर आपले शिक्षण पूर्ण केले. आनंदचे कौतुक करताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''आनंदाची शिक्षणावरची आस्था जवळजवळ उपजत होती. त्याला बुद्धीचे देणंही लाभलं होतं. शिक्षकांच्या मदतीशिवाय अभ्यास करण्याची त्याची क्षमता होती.

त्याला कल्पनेचं देणं लाभलं होतं.''[१६] अशा प्रकारे शिक्षणासाठी लेखकाने खूप अडीअडचणींना सामोरे जात आपले शिक्षण पुर्ण केले.

आनंद हे एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व होते. लेखकाला वाचनाची आवड होती. चंद्रकांत नावाच्या मित्राकडे शंभर पुस्तके होती. त्याच्या कडून ती पुस्तके घेऊन दोन-वेळा वाचली. तिसऱ्यांदा मात्र ती वाचू वाटेनात. 'वाचनाचं वेड मात्र आगी सारखं भडकत चाललं.'(पृ.७१) पुस्तकं खरेदी करण्यासाठी दहा रूपयांची चोरी देखील केली यांचाही उल्लेख आनंदने केला आहे.(पृ.७२) यातून आनंदचा प्रामाणिकपणा लक्षात येतो.

आनंदचा मित्र दिन्या आनंदला सिनेमाच्या कथा सांगत होता त्याऐकून लेखकालाही सिनेमा पाहण्याचा छंद लागला. शेणी गोळा करून ती विकून त्या पैशात सिनेमा पाहण्याचा उद्योग आनंदने केला 'संत ज्ञानेश्वर', 'गोरा कुंभार', 'भगवा झेंडा' या सारखे चित्रपट लेखकाने पाहिले. दादाला कळू न देता गुपचूप आनंद सिनेमाला जात होता. पण जेव्हा दादाला कळाले तेव्हा 'दादानं तटलेल्या बैलाच्या पाठीत चाबकाचे कोयंडे ओढावेत तसे पाठीवर ठेंग्याचे तडाखे दिले.' अशी कबुली देण्यास आनंद विसरत नाही. लेखकाची चित्रकलाही सुरेख होती. इंटरमिजिएट परीक्षा दिली त्यातही बी-ग्रेड मध्ये आनंद पास झाला. पाटील सरांनी परीक्षेची फी भरल्याशिवाय सर्टिफिकेट दिले नाही.(पृ.२९९) शाळेत नाट्यछटा- नकला ही उत्कृष्ट रीतीने करता येत होत्या. लेखकाला कविता लेखनाचाही छंद होता. काम करता करता भरपूर ग्रामीण कविता लिहिल्या 'हिरवं जग' असे त्यांनी त्याच्या कवितेच्या वहीला नाव दिले होते.(पृ.३५५)

अशा प्रकारे बालवयातला हा आनंद हुशार तर होताच पण त्याचबरोबर विविध कलांमध्ये निपूण होता. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात ते खरेच आहे कारण लहानपणापासूनच लेखकाला लेखनाची आवड होती. साहित्याची प्रतिभाशक्ती उपजतच त्याच्याकडे होती आणि म्हणूनच आनंद यादव हे प्रतिभसंपन्न लेखक झाले आणि त्यांच्या 'झोंबी' या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

'झोंबी' या कादंबरीतील आनंदची व्यक्तिरेखा शिक्षणातील अडचणींना सामोरे जाऊन आपले शैक्षणिक ध्येय गाठण्याची प्रेरणा देते. शिक्षणासाठी आर्थिक अडचण, वडिलांचा प्रखर विरोध, हायस्कूलच्या शिक्षकांचे पाहिजे एवढे सहकार्य नाही. वडिलांचा शेतीचा कामासाठीचा अट्टाहास या सारख्या एक ना दहा अडचणींवर मात करत लेखकाने आपले एस.एस.सी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

**रतनू :**

रतनू म्हणजे लेखक आनंद यादव यांचे वडील. आनंद त्यांना दादा म्हणत होता. रतनूचा ताराबरोबर बालविवाह झाला होता. म्हणजे रतनू लग्नाच्या वेळी अवघ्या आठ-नऊ वर्षांचा होता. वयाच्या सातव्या वर्षीच रतनू तालमीत जात होता. रतनूचे वर्णन लेखकाने छान केले आहे. 'भोकरी रंगाचे पाणीदार डोळ, कट्यारीच्या आकाराचं धारदार नाक. फुगवट नाकपुड्या. गुटगुटीत अंग, तांबूस गोरा रंग. उन्हात तापला की गाजरा सारखा दिसे.'(पृ.४) लेखकाची आई तारा बायको म्हणून शोभत नाही असे रतनूच्या बहिणींचे म्हणणे होते. ऐन तारूण्यात रतनूचे आई-वडील वारले व रतनू पोरका झाला. पंचवीसच्या पुढे मोजता येत नव्हतं आणि अशा वेळी साऱ्या संसाराची जबाबदारी रतनूवर येऊन पडली.

पत्नी तारा आणि मुले यांच्यावर शेतीची कामे सोपवून लेखकाचे वडील गावात दौलतराव देसाई, रखमा यांच्याशी गप्पा मारत बसत होता. 'देसायांच्या वाड्यात त्याला उशीच्या खुर्चीवर बसायला मिळे. त्यात आणि कपबशीतनं प्यायला दिलेल्या चहात त्याला मोठेपणा वाटे.(पृ.१२७) तारापेक्षा मोठ्या असणाऱ्या दोन मैत्रिणी रतनूला होत्या एक रखमा नावाची जोगतीण आणि एक माळ्याची बाई(पृ.२३) या गोष्टींचा उल्लेख ही लेखकाने कोणताही आडपडदा न ठेवता केल्याचे जाणवते. सतत कोणाशीतरी गप्पामारत बसणे हा रतनूचा जणू आवडता छंदच होता. दोन वेळेला मोटं शिवाय कोणतेही काम रतनू करीत नव्हता.

रतनूचा आनंदच्या शिक्षणाला खूप विरोध होता. लिहिणे, वाचणे गरजेपुरते आले की शिक्षण बंद. त्याच्या मते, ''भटाच्या घरात लिवणं, म्हाराच्या घरात गाणं नि शेतकऱ्याच्या घरात दाणंच पिकलं पाहिजे, का नग?''(पृ.१४७) आनंदने फक्त शेतात कामच केल पाहिजे असा रतनूचा अट्टाहास होता. त्यासाठी त्याने अनेक वेळा आनंदला मारले होते. शाळेच्या स्नेहसंमेलनात जेव्हा आनंदने उत्कृष्ट काम केले तेव्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी आनंदला शाब्बासकी दिली त्यावेळी आनंदच्या नाईक मास्तरांनी उच्चारलेलं वाक्य पुढीलप्रमाणे होते. ''मुलगा हुशार आहे; पण याचं आणि त्याच्या वडिलांच नात प्रल्हाद हिरण्यकश्यपूच्या नात्या सारखं आहे. शिक्षणासाठी याचे इतके हाल होतात; की ते बघवत नाहीत. आणि ऐकवतही नाहीत.''(पृ.२०४) नाईक मास्तरांनी व्यक्त केलेल्या मतातून पिता पुत्रांच्या नात्याची कल्पना येते व रतनूच्या स्वभावाची ही ओळख होते.

रतनूची वृत्ती अंधश्रद्धाळू होती. त्याला स्वतःला दृष्टांत होतो असा भास होत असे. दृष्टांत म्हणजे त्याला स्वप्न पडत असे आणि ते स्वप्न खरं होतं असे त्याला वाटत असे. रतनू जन्माने पायाळू होता. पायाळू माणसात देवाची वस्ती असते असा त्याच्या खेड्या पाड्यात समज होता. या दृष्टांतापायी तो एकदा एका गोसाव्याकडून ही फसवला गेला असता. हलसिद्ध आप्पावर म्हणजे त्यांच्या ग्रामदैवतावर त्याची श्रद्धा होती. आनंदचे वडील रतनू या व्यक्तिमत्वाविषयी पु.ल. देशपांडे कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''ह्या कथेचा नायक, खलनायक आणि विनोदी पात्र त्याचा बाप रतनू हाच म्हणायला हवा. बसता बुक्की आणि उठता लाथ हेच कुटुंबप्रमुखाचे बायकापोरांच्या बाबतीत धोरण असायला हवे. ह्या सिद्धांतावर त्यांची अढळ श्रद्धा होती. त्याच्या मनाला कशाहीमुळे पाझर म्हणून फुटायचा नाही. ह्या साऱ्या कथेत हा रतनू एक दोन ठिकाणी किंचित गलबलल्यागत झालेला दिसतो. तेवढ्या अनुभवानेही आन्द्याच्या बाल्याच्या वाळवंटात अकस्मात पावसाची सर येऊन गेल्यासारखे वाटले. स्वत:ला शेतकरी म्हणवणारा हा माणूस सदैव अंगमेहनत टाळायचा. थोरामोठ्यांच्या बैठकीत बसायला मिळावे म्हणून धडपडायचा आणि सतत राबराबून आपण कसे हैराण झालो आहोत असा उलटा कांगावा करीत राहायचा.''[१७]

अशा प्रकारे रत्नाप्पा जकाते म्हणजे आनंदचे वडील मुलांना फक्त जन्म देणे त्यांच्या पालनपोषणाविषयी, त्यांच्या शिक्षणाविषयी, आस्था नसलेला, बायका मुलांच्या जीवावर ऐतखाऊपणे बसून खाणारा, बायको व मुलांना शिव्या देणारा, मारहाण करणारा, फक्त कुटुंबावर हुकमत गाजवणारा पती व बाप होता. आनंद जेव्हा कोल्हापूरला पळून जातो व खूप शोधल्यानंतरही सापडत नाही त्यावेळी फक्त रतनू हेलावल्यासारखा भासतो.

**लिंगाप्पा :**

लिंगाप्पा म्हणजे ताराचा धाकटा भाऊ होता. ताराचे आई-वडील वारले मोठा भाऊ रामा त्याच्या आत्तीच्या गावी राहात होता त्यामुळे लिंगाप्पाला ताराशिवाय कोणाचाही आधार नव्हता. तारा लिंगाप्पाला नवऱ्याला कळणार नाही अशा पद्धतीने शेंगा-गुळ, कधी एकादी अर्धी भाकरी द्यायची पण रतनूला हे कळल्यावर त्याने ताराला चाबकाने मारले.(पृ.१६,१७)

ताराची मुलगी अनसा हिच्यापेक्षा लिंगाप्पा चौदा-पंधरा वर्षांनी मोठा होता. तरीही ताराने अनसा व लिंगप्पाचे लग्न जमविले. लिंगाप्पाला प्रपंचाला लावण्यासाठी व ताराला ही संकटसमयी आधार होईल या विचाराने तिने अनसा व लिंगाप्पाचे लग्न लावून दिले. लग्नात दोनशे रूपये दयाज

द्यायचे ठरले होते त्यामुळे ते लिंगाप्पाने वर्षभर बहिणीच्या म्हणजे ताराच्या मळ्यात राबून फेडले. नंतर तो गुजराच्या मळ्यात इंजिनवर ड्रायव्हर म्हणून कामाला लागला.

अनसा व लिंगाप्पा आनंदच्याच घरी राहात होते पण एक दिवस कमी भाकरी केल्यामुळे आईने (तारा) ने आनसला मारले. आनसाने रागाने विहिरीत उडी मारली आनंदने तिला वाचविले. परंतु त्यानंतर आईने तिच्या भावाला म्हणजे लिंगाप्पाला स्वतंत्र संसार थाटण्यास सांगितले. आनसा व लिंगाप्पाचा राजा राणीचा संसार सुरू झाला. लिंगाप्पा कष्ट करून पैसा कमवून आनसाच्या हवाली करत होता. खायला फक्त तिघेच अनसा लिंगाप्पा व त्यांचा दोन वर्षांचा मुलगा लिंगाप्पा इंजिन दुरूस्त करण्याचे काम करीत होता. गुजराच्या एका मळ्याचे कारभारीपणही त्याच्याकडे होते. एका इंजिनावर ड्रायव्हरचे काम तो करीत होता. तीन माणसांची कामे एकटा करीत होता त्यामुळे शेठजी लिंगाप्पावर खूश होता.(पृ.२४७)

लिंगाप्पाच्या सुखी संसाराला दृष्ट लागली. अनसां वारंवार आजारी पडू लागली होती. मामाने तिच्यावर कोल्हापूरला नेऊन उपचार केले. अनसाला टी.बी. झाला होता. त्याच्यावर कोणतेही उपचार होऊ शकत नाहीत असे डॉक्टरांनी सांगूनही लिंगाप्पा तिची खूप सेवा सुश्रूषा करीत होता तिला खायला प्यायला घालणे, गोळ्या औषधे देणे ही कामे फार प्रेमाने लिंगाप्पा करीत होता. त्याला त्याच्या स्वतःच्या जीवाचीही पर्वा नव्हीत. ‘मला काय झालं तर होऊ दे’ म्हणून धाडसानं मामा तिची सेवा करीत होता(पृ.२५७) लिंगाप्पाच्या सेवेला यश मिळाले नाही. आजारपणात गरोदर असलेली अनसा शेवटी मुलाला जन्म देऊन मरण पावली. थोड्याच वेळात जन्मलेल बाळ ही गेले. लिंगाप्पा खूप दुःखी झाला. लिंगाप्पा त्याच्या आईविना पोरक्या झालेल्या बाळूला खूप जपत असे.

अनासाच्या मृत्यूनंतर तो पुन्हा पोरका झाला होता. बाळू वर त्याचे खूप प्रेम होते. त्याने बाळूची आई होण्याचाही प्रयत्न केला. अशा प्रकारे जन्मभर पोरका असलेल्या लिंगाप्पाने पत्नीला व मुलाला भरभरून प्रेम दिले. अशाप्रकारे लिंगाप्पा प्रेमळ व कुटुंबवत्सल होता.

**शिवा :**

शिवा हा आनंद यादवांचा धाकटा भाऊ. आनंद नंतर धाकटी बहीण हिरा व हिराच्या पाठीवर शिवाचा जन्म झाला. हिराला माती खाण्याची सवय होती. हिराच्या संगतीने शिवाही माती खात होता. माती खाण्यामुळे शिवा नाळरोगी बनला होता. ‘नाळरोगी असलेला पाच-सहा वर्षांचा शिवा उसाच्या पाटाकडनं शेळी नि तिची करडं चारू लागला नि चहापुरतं शेळीत दूध तयार करू

लागला.'(पृ.८१) शिवा नाळरोगी, गालफुगरा झाल्यामुळे त्याला फार कष्टाची कामे करायला सांगितली जात नव्हती पण शेताला पाणी देताना पाण्याची दारं मोडावी लागत होती. बसून बैलांची शेणं काढावी लागत होती. दादा म्हणजे त्याचे वडील शेतात असले की दादासाठी मळ्यात चहा घेऊन येणे  व दिवस भर मळ्यातच काहीतरी सोपी कामे करणे हे शिवाचे काम होते. म्हणजे आजारी असणाऱ्या शिवाला कामात सूट नव्हती फक्त प्रकृतीला झेपतील अशा प्रकारची कामे शिवाला सांगितली जात होती.

**दत्ताजीराव देसाई :**

दत्ताजीराव देसाई हे वतनदार होते. दत्ताजीरावांच्या वडिलांनी आनंदच्या आजोबाला त्यांचा मळा फाळ्यानी करण्यासाठी दिलेला होता. दत्ताजीराव म्हणजे त्या परिसरातील गर्भश्रीमंत व्यक्ती होती. दत्ताजीरावला पैसे कमविण्यासाठी कोणत्याही प्रकारे राबावे लागत नव्हते. कोल्हापुरासही त्यांची इस्टेट होती. घाटगे घराण्याची खूप जवळचा संबंध असलेल्या दत्ताजीरावांना कोल्हापूर-दरबारी खूप मान होता. कोल्हापूरला काही काम असल्यास ते रतनूला बरोबर घेऊन जात. दत्ताजीरावांबरोबर गप्पा मारणे, फिरणे याचा रतनूला अभिमान वाटत होता.  आपला पती सतत दत्ताजीरावांकडे बसून राहतो त्यामुळे शेताच्या कामाला मदत होत नाही म्हणून तारा रतनूला समजावण्याचा प्रयत्न करते तेंव्हा रतनू म्हणाला, ''आगं, मोठा माणूस हा त्यो त्येच्या नुसत्या संगतीला जरी ऱ्हायलो तरी आपली पोल्मी वाढतीया. आज ना उद्या अडचणीच्या वक्ताला कोर्ट दरबाराची कामं हुतील माझी.''(पृ.१२६) या रतनूच्या वाक्यावरून दत्ताजीराव देसाई यांच्या प्रतिष्ठेची आपल्याला कल्पना आली.

रतनूच्या प्रती दत्ताजीराव देसाई यांना मानाचे स्थान होते. रतनू त्यांचा शब्द पाळीत असे हे ताराला माहीत होते त्यामुळे जेव्हा जेव्हा रतून ताराचा छळ करीत असे तेव्हा तेव्हा तारा दत्ताजीरावांच्या कानावर रतनूच्या तक्रारी घालीत होती. त्याच्या मुळे रतनूच्या वागण्यात थोडाफार बदल होत होता. रतनूने आनंदची शाळा बंद केली हे गाऱ्हाणे देखील दत्ताजीरावांना सांगितल्यावर त्यांनी रतनूची चांगलीच कान उघडणी केली. आनंदला शाळेत जाण्यास सांगितले. रतनूला आनंदची शाळेची फी भरण्यास सांगितले चिकाटीने अभ्यास करण्यास सांगितला आणि जर शाळेत पाठविले नाही तर मी तुला शिकविल अशी हमी दिली.

अशा प्रकारे दत्ताजीराव देसाई हे श्रीमंत व्यक्तिमत्व रतनू सारख्या फाटक्या व्यक्तीलाही मित्राचा दर्जा देते. वेळप्रसंगी त्याच्या चुकांची त्याला जाणीव करून देते. व सर्वात महत्वाचे म्हणजे

आनंदच्या शिक्षणात पडलेला खंड त्यांच्या मुळे दूर होतो. आणि आनंदचे शिक्षण नव्याने सुरू होते.

**शिवाप्पा जाधव व आप्पाजी जकाते :**

ताराचे वडील शिवाप्पा जाधव आणि रतनूचे वडील आप्पाजी हे रानाकडेला रान आल्याने एकमेकाचे दोस्त झाले. त्यामुळे त्यांचे स्नेह संबध वाढले. आप्पाजीने रतनू व ताराच्या विवाहाचा प्रस्ताव शिवाप्पा पुढे मांडला. शिवाप्पाला वाटले. ''आप्पा जकात्या सारखा वाघ आपल्या दावणीला आपण होऊन येतोय. गावात आपल्याकडं वाकड डोळा करून बघायची कुणाची टाप न्हाई.''(पृ.५) मैत्रीचे रूपांतर नात्यात होईल व वेळप्रसंगी एकमेकांची परस्परांना मदत होईल. रतनू व ताराच्या विवाहात त्यांच्या आई वडिलांनी आपली हौस भागून घेतली. हे दोन्ही व्याही मात्र कालांतराने एकमेकांचे वैरी बनले. शिवाप्पाची पत्नी म्हणजे ताराची आई वारली त्यानंतर शिवाप्पा निराधार झाला ताराला सासरी पाठविले होते. शिवाप्पा व तिचा भाऊ यांचे अन्नासाठी हाल होऊ लागले. सर्व बाजूंनी संकटांनी घेरल्याने शिवाप्पाचे दारूचे व्यसन वाढले. ताराच्या लग्नात तिला घातलेल्या सोन्याच्या पुतळ्या शिवाप्पाने मोडल्या. ही गोष्ट आप्पाजीला कळल्यामुळे आप्पाजी संतापला दारू पिऊन घरी आलेल्या व ताराला मला जेवायला वाढ म्हणणाऱ्या शिवाप्पाला आप्पाजीने तारा देखत मारला 'नालाच्या पायताणासकट लाथा घातल्या.'(पृ.११) उपास मारीनं दारू पिऊन पिऊन खंगून शिवाप्पाचा अंत झाला. रतनूच्या आई-वडिलांनी रतनूला सलग दोन मुली झाल्या म्हणून हाय खाल्ली. व रतनूचे वडील म्हणजे आप्पाजी ही वारला.

अशा प्रकारे या दोघांच्या मैत्रीचे रूपांतर शत्रूत्वात दारूच्या व्यसनापायी झाले हेही त्याचे एक कारण सांगता येईल.

**हळदीकर :**

हळदीकर हे एक राष्ट्रीय स्वयंम् सेवक संघाचे प्रमुख होते. आनंदच्या मळ्याशेजारीच संघाची एक शाखा होती. संध्याकाळी तिथे पंचवीस-तीस तरूण व आनंदच्या वयाचीच काही मुले संघाचा गणवेश घालून निरनिराळ्या प्रकारचे खेळ खेळायची. कवायती करायची, गाणी म्हणायची. आनंद तेथे म्हशी राखायचा. म्हशी तेथे चरायला सोडून आनंदही त्यांच्यात खेळत होता. नियमित गेल्यामुळे हळदीकरांनी आनंदचे नाव दाखल करून घेतले. आनंदने इयत्ता पाचवीत शिकत असल्याचे त्यांना सांगितले परंतु आनंद शाळा सोडून दिल्याचे इतर मुलांच्या कडून हळदीकरांना समजले तेव्हा हळदीकरांना त्याचे शाळेत न येण्याचे कारण 'मळ्यात शेतीची कामे

करावी लागतात' असे आनंदने सांगितले हळदीकर व त्यांच्या दोन सहकार्यांनी आनंदच्या घरी जाऊन त्याच्या दादांना म्हणजे रतनूला खूप समजावले. पण आनंदचे वडील कुणब्याच्या मुलाने शेतीच केली पाहिजे या मुद्यावर ठाम राहिले. अशा प्रकारे आनंदने शिकावे म्हणून ज्या-ज्या व्यक्तींनी मदत केली त्या व्यक्तीमध्ये हळदीकरही होते.

**विठोबा आण्णा :**

विठोबा आण्णा दिवाणजी इयत्ता चौथी शिकलेले होते. ते आनंदच्या वडिलांचे मित्र होते. सणगर समाज म्हणजे घोंगडी विणून पोट पाणी भरणारा गरीब समाज त्या समाजातले विठोबा आण्णा पण चार इयत्ता शिकल्यामुळे आणि धाडसीवृत्तीमुळे परिस्थितीवर मात करून आज दिवाणजीसारखे राहत होते. रतनूच्या वडिलांकडून उसने पैसे घेऊन एक इंजिन घेतलं आणि आज विठोबा आण्णाजवळ तीस इंजिन, गिरणी, अठरा एकराचे रान असा बढेजाव होता. रतनूचे वडील वारले तेव्हा रतनूनेही इंजिन घ्यावे असा सल्ला दिला पण रतनू फक्त आयदीपणे शेतात पिकेल ते खात बसला. आणि खर्चाची तोंड मिळवणी करण्याच्याच विवंचनेत नेहमी राहिला.

आनंदला रतनूने पाचवीतून शाळा सोडून देण्यास भाग पाडले तेव्हा विठोबा आण्णांनी रतनूची चांगलीच कान उघडणी केली. विठोबा आण्णा स्वतःच्या मुलांना शिक्षणासाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देतात. अशा प्रकारे विठोबा आण्णा शिक्षणाचे महत्व पटलेले व्यक्तिमत्व होते. व त्यांनी ही आनंदच्या शिक्षणासाठी वडिलांना समजावून सांगितले.

''गल्लीत शिक्षणासाठी खरं धडपडणारं जकात्याचं एकच पोरगं; न्हाईतर त्येच्या भण आमची पोरं. सालभर अभ्यास करूनही नापासच हुत्यात.''(पृ.२९३) असे आनंदबद्दल गौरवोद्‌गार आबाजीच्या वडिलांनी म्हणजे विठ्ठल सणगर यांनी काढले होते. म्हणजे विठ्ठल सणगर यांना आनंद बद्दल अभिमान वाटत होता.

**गोपातात्या :**

गोपातात्या हे रतनू जकातेचे मित्र होते. गोपातात्याने फाळ्याच्या जमिनीचे सुरक्षित कूळ म्हणून मान्यता मिळावी व फाळा योग्य प्रमाणात ठरवावा म्हणून कोर्टात अर्ज केला होता. रतनूलाही कोर्टकचेरीच्या कामात आणि मळ्याच्या मालकां विरूद्ध कोर्टात जाण्यासाठी गोपातात्याचे मार्गदर्शन उपयोगी पडले. कोर्टकचेऱ्यांवरच गोपातात्या आणि रतनू यांच्यामध्ये संवाद चालत.

आनंदाच्या बाबतीत गोपातात्याने केलेली मदत फार मोलाची ठरली. एकदा आनंदा त्याच्या वडिलांच्या मारझोडी व शिव्यांना कंटाळून घर सोडून गेला. आई-वडिलांनी आनंदला

खूप शोधले पण आनंदचा शोध लागला नाही शेवटी गोपातात्या स्वतः आनंदला शोधण्यासाठी कोल्हापूरला गेले. कोल्हापूरला स्टेशन रोडला गोपातात्याची व आनंदची भेट झाली तात्याने आनंदला तो पळून गेल्यानंतर त्याच्या आई-वडिलांची व भावंडाची आनंद सापडावा म्हणून झालेली जीवाची आगपाखड आनंदजवळ कथन केली. तेव्हा आनंदने आपल्याला दादाने पुढे शिकविले तरच मी घरी येईल अशी अट घातली. तेव्हा गोपा तात्याने आनंदला वचन दिले. ''मी शिकवितो तुला. ह्या ताटातल्या भाकरीची शप्पत घेऊन सांगतो. कवाबी मॅट्रिक झाल्यावर, नोकरी लागल्यावर माझा खर्च फरत फेड म्हणं.''(पृ.३७५) अशा रितीने आनंदची समजूत घालून तात्याने आनंदला घरी आणले. अशा प्रकारे गोपातात्या कायद्याच्या बाबतीत तज्ज्ञ असलेला व कनवाळू व्यक्तिमत्वाचा, शिक्षणाचे महत्व पटलेला व संकटात मदत करणारा आदर्श नागरिक वाटला.

**घाटगे क्लार्क :**

आनंदच्या शाळेतील क्लार्क आनंदच्या शेजारच्या गल्लीतच राहत होता. शाळेतील बऱ्याच मुलांना फ्री शीप मिळाली त्यामध्ये चांगली आर्थिक परिस्थिती असणाऱ्या मुलांचाच समावेश होता. फ्री शीप न मिळण्याचे कारण म्हणजे घाटगे क्लार्कनी सरांना आनंद बद्दल चुकीची म्हणजे अर्ध सत्य अशी माहिती पुरविली. आनंदचे आजोबा व्यापार आणि सावकारी करीत होते. हे जरी सत्य असले तरी आज मात्र आनंदचे कुटुंब अन्नाला मोताद आहे. सद्य परिस्थितीचे कथन घाटगे क्लार्कनी सरां जवळ केलेच नाही. घाटगे क्लार्क सारख्याबेरकी व्यक्तीही आपल्याला समाजात वावरताना दिसतात.

**बापूचा म्हातारा :**

दम्याचा विकार असलेला हा बापूचा म्हातारा घराच्या दाराशेजारी बसत होता. दम्याचा आजार असल्याने तोंडाने आड करून तो खूप श्वास आत ओढायचा नि तोंड मिटून ओठानं फुर्र करत तोच श्वास सोडत असे. आनंद ने त्याला भिंतीशेजारी बसलेल्या अवस्थेत मरत असताना पाहिले होते.

**सिद्धू माळकर :**

सिद्धू माळकर हा धनगर समाजातील म्हातारा होता. तो दारात बसून पान खायचा व दारातच पानाचे रंगीत बेडके थुंकायचा त्यामुळे त्याच्या भोवती नेहमी माशा घोंघत असायच्या.

त्याच्या कमरेला बारीक लंगोटी असायची ती पाहून मुले खी-खी करत हसायची. तो बायकोला खूप शिव्या द्यायचा.

**लक्ष्मू म्हातारा :**

लक्ष्मू म्हातारा हा आनंदच्या वडिलांचा चुलता होता. दररोज दुपारी बारा वाजेपर्यंत आनंदच्या घराच्या वळचणीला बसायचा अंगात ढगाळ कोट, बोट-बोटभर वाढलेली दाढी व डोक्याला चिंध्या झालेला पटका तो घालीत असे. चिलीम ओढता ओढता तो आपल्या पुर्वायुष्यातल्या विविध घटनां मांडण्याचा एकट्याचा स्वतःशी संवाद चालायचा. कधी-कधी आनंद त्याच्याशी गप्पा मारीत असे. त्यांच्या गप्पांमधून आनंदला त्याच्या आजी-आजोबा व घरातील इतर मंडळी यांची सविस्तर माहिती मिळायची. बापूचा म्हातारा, सिद्धू माळकर व लक्ष्मू म्हातारा धनगर गल्लीत राहणाऱ्या गौण पात्रांचाही लेखकाने झोंबी मध्ये आढावा घेतला आहे. त्यातूनही समाजातील दैन्य, दारिद्र्य याची कल्पना येते.

**आनंदचे मित्र :**

**वसंत पाटील :**

वसंत पाटील हा आनंदचा वर्गमित्र होता. स्वभावाने शांत असलेला हा मुलगा गणित विषयात अतिशय हुशार होता. वाचनाची ही त्याला आवड होती. या साऱ्या चांगल्या गुणांमुळे वर्गाशिक्षकांनी वसंत पाटीलला वर्गसेक्रेटरी म्हणून नेमले होते. आनंदनेही वसंत पाटीलचेच अनुकरण केले त्यामुळे आनंदचाही गणित विषय पक्का झाला. आनंद व वसंत पाटील वर्गातील इतर मुलांची गणित तपासीत होते. दोघे एकमेकांचे मित्र बनले.

वसंत पाटील चित्र ही बऱ्यापैकी काढत होता. आनंदला चित्र काढण्याची विशेष आवड नव्हती पण वसंत पाटीलचे पाहून आपण त्याच्या पेक्षा कोणत्याही क्षेत्रात कमी पडू नये म्हणून आनंदनेही चित्र काढण्याचा सराव केला. अशा या कुशाग्र बुद्धीमत्तेच्या वसंत पाटीलला शिक्षणापासून वंचित राहावे लागले. वसंतची आई त्याच्या लहानपणीच वारली व त्यानंतर त्याच्या वडिलांनी दुसरे लग्न केले. असा हा पोरका वसंत आजीजवळ म्हणजे आईच्या आईजवळ राहत होता. आजीही बिचारी वृद्ध विधवा रोजगाराला जाऊन आपले पोट भरत होती. अशा सगळ्या पार्श्वभूमी मुळे वसंतने दोन थिएटर मधल्या स्लाईडस् रंगविण्याचे काम घेतले होते. त्या पुढे येणाऱ्या सिनेमाच्या स्लाईडस् असत. यातून त्याला थोडेफार पैसे मिळत होते.

वसंत पाटील च्या व्यक्तिरेखेतून आपल्याला असे जाणवते  आईविना पोरक्या असलेल्या हुशार मुलाला आपले शिक्षण पुर्ण करता आले नाही पण आनंदच्या शिक्षणात कितीही अडीअडचणी आल्यातरी आईच्या भक्कम आधारा मुळेच आनंद आपले एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण करू शकला कदाचित वसंत पाटीलची आईही त्याला आधार द्यायला त्याच्या पाठीशी असती तर तोही आपले शिक्षण पूर्ण करू शकला असता असे मला वाटते.

**आबाजी सणगर :**

आबाजी सणगर हा आनंदचा जिवलग मित्र होता. आबाजीने आनंदला त्याच्या घरी अभ्यासाला येण्याचा आग्रह केला. गणित, शास्त्र, भूगोल यासारख्या अवघड विषयांचा अभ्यास दोघेमिळून एकत्र करू त्यामुळे आपल्या दोघांचाही चांगला अभ्यास होईल. ही माझी शिकवणीच आहे. ''तुझी जी हाफ फी हाय, ती मी ह्या महिन्यापासून भरीत जाईन.''(पृ.३३६) असा आबाजीने आनंदला शब्द दिला. आबाजी सणगराची पुस्तके वाचूनच आनंदने आपले शिक्षण पुर्ण केले. याचाच अर्थ असा आनंदला त्याच्या शिक्षणातील अडसर दूर करण्यात आबाजीसारख्या दोस्ताची मोलाची मदत मिळाली.

लेखकाच्या मित्रांचा नामोल्लेख करताना बापू कोळी, चंद्रकांत मेरवाडे, सुरेश माने या मित्राचा उल्लेख करणे ही क्रमप्राप्त ठरते. बापू कोळी अतिशय गरीब स्वभावाचा होता. बरीचशी गणिंत आनंद त्याला विचारून करीत असे व बापूलाही समजून सांगत असे. आणि त्यामुळेच ते मित्र बनले. चंद्रकांत मेरवाडे व सुरेश माने या दोघांना वाचनाचे वेड होते चंद्रकांत कडे शंभरपेक्षा जास्त गोष्टींची पुस्तके होती. आनंदने ती त्यांच्याकडून मागून घेतली व भराभर वाचून काढली. कदमांचा शिर्प्यामुळे लेखकाने पाटीचे तुकडे चोरून बिड्या ओढल्या तसेच चोरी केलेला पैसा चड्डीच्या नाडीच्या शिवणीत कसा ठेवायचा या सारख्या वाईट गोष्टींचा धडा आनंदला कदमांच्या शिर्प्यामुळे मिळाला.

**बाबू :**

आनंदच्या आत्याचा मुलगा बाबू. आनंद तिसरीत होता तेव्हा बाबू इयत्ता पाचवीमध्ये शिकत होता. आनंदला बेरीज वजाबाकीची गणिते येत नव्हती ती त्याने बाबूकडून समजून घेतली. आत्याची व आनंदच्या वडिलांचे वाद झाले म्हणून आत्या गावातल्या घरी वेगळं राहू लागली होती. वेगळं  राहायला लागल्यावर आत्याने म्हैस घेतली. त्या म्हशीचे दूध विकून ते सुखाने राहत

होते पण वीज पडून म्हैस गेली त्यामुळे आत्या व बाबू यांना रोजगारासाठी मजुरीवर जावे लागले. बाबूला त्यासाठी पाचवीतून शाळा सोडावी लागली.

आनंदाचे वडील आनंदला शिक्षण बंद करून शेताला मदत कर अशा हट्टाला पेटल्यामुळे ते आनंदला सदा मारझोड करीत होते. म्हणून बाबूने त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला. बाबू म्हणाला, ''तू कुळंब्याच्या पोटाला आलाईस नि किती केलं तरी तुझा त्यो बाऽहाय; त्येचं तॉंड चुकवून तू जाणार कुठं?''(पृ.२३६) बाबूच्या समजावण्याचा उद्देश आनंदने वडिलांचा मार खाऊ नये एवढाच होता. पुढे आत्तीच्या या मुलाबरोबर आनंदही रोजगाराला जात असल्याचा उल्लेख आला आहे. अशा प्रकारे बाबू आनंदला मदत करणाऱ्या पैकीच एक होता.

**गणपा :**

गणपा निंबाळकराला आनंदच्या वडिलांनी सालगडी म्हणून ठेवले होते. गणपाच्या संगतीमुळे आनंदला शेतीच्या कामातील बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. गणपा आनंदाला वेगवेगळ्या प्रकारच्या गोष्टी सांगत असे. गावठी विनोद सांगत असे. लोकगीते म्हणणे, शाहू महाराजांचा पाळणाही म्हणणे त्याला आवडत होते. गणपाने आनंदला सर्वात महत्वाची गोष्ट शिकविली ती म्हणजे पोहणे. आणि त्यामुळेच आनंद जीव देणाऱ्या त्याच्या अनसा नावाच्या बहिणीचे प्राण वाचवू शकला असे मला वाटते.

**दिन्या :**

गणपा सारखेच दिन्याकडूनही शेतीची कामे आनंदला शिकायला मिळाली. दिन्याला सिनेमा पाहण्याचे वेड होते तो आनंदला सिनेमाची कहाणी सांगत असे आणि त्यामुळेच आनंदला सिनेमाचे वेड लागले. 'सुसंगती सदा घडो सृजन वाक्य कानी पडो' याचा आपल्याला नेहमी अनुभव येतो. आनंदच्या बालमनावर संस्कार करणाऱ्या त्याच्या मित्रांचा उल्लेख होणे आवश्यक आहे वसंत पाटील सारख्या हुशार मुलाचे आनंदने अनुकरण केल्यामुळे आनंदचेही जीवन उजळून निघाले. शिकण्यास मदत करणाऱ्या आबाजीमुळे लेखकाला आपले शिक्षण पुर्णत्वास नेता आले. 'एकदा शिकविणे म्हणजे दहा वेळा शिकण्यासारखे आहे.' आबाजीला शिकविल्यामुळे आनंदाचा त्या-त्या विषयांचा अभ्यास पक्का झाला. चंद्रकांत व सुरेश यांच्या मुळे लेखकाला वाचनाची आवड निर्माण झाली 'उत्तम वाचकच उत्तम लेखक बनू शकतो' वाचनाच्या छंदामुळेच आनंद ते आनंद यादव लेखक असा उच्चकोटीचा प्रवास झाला.

आत्याचा बाबू, गणपा, दिन्या यांच्याकडून वेगवेगळी शेतीची कामे कशी करावीत याचे शिक्षण मिळाले. जगण्यासाठी आवश्यक असणारे व्यवहारज्ञान ही मिळाले. कदमांच्या शिर्प्याने शिकविलेल्या वाईट गोष्टी ह्या तात्पुर्त्या स्वरूपाच्या ठरल्या कारण मनुष्यावर जेव्हा चांगले संस्कार जास्त होतात तेव्हा वाईट गोष्टी त्याच्या जीवनात क्षणभंगूर ठरतात असे मला वाटते. शेवटी एकच महत्त्वाचे वाटते मनुष्याच्या जीवनात मित्राचे स्थान अतिशय महत्वाचे आहे. चांगले मित्र मिळणे हे आपले भाग्यच आहे.

**आनंदला लाभलेले शिक्षक :**

लेखक आनंद यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा करून देणारे शिक्षक म्हणजे साकेकर मास्तर होते. त्यांनी 'अननसातला अ, आगगाडीतला आऽ या प्रमाणे मुळाक्षरे बिगरीत शिकविली. त्यानंतर इन्फंट्रीत गेल्यावर निबांळकर मास्तरांनी शिकविले. लेखकाच्या बालबुद्धीला ते भूत असल्यासारखेच भासत.(पृ.३७,३८) पहिलीच्या वर्गाला माने मास्तर शिकवित होते. दाढीमिशा पांढऱ्याशुभ्र झालेल्या या वयस्क माने मास्तरांचा मुलगा पहिलीच्या वर्गात बसण्याच्या वयाचा होता. लेखकाने आगाऊपणे माने मास्तरांना प्रश्नही विचारला होता. ''मग मास्तर, तुमचा मुलगा एवढा ल्हानगा कसा?''(पृ.५३)

इयत्ता दुसरीच्या वर्गाला शिकवायला काजी मास्तर होते. काजी मास्तर मारकुटे होते. आनंदच्या हातावर त्यांनी छड्या मारल्या तेव्हा आनंदने घरी जाऊन वडिलांना बोलावून आणले तेव्हा वडिलांनी मास्तरला चांगलाच दम भरला त्यानंतर मात्र काजी मास्तरने आनंदला मारले नाही.(पृ.५३) इयत्ता तिसरीच्या मोठ्या आकड्यांची बेरीज वजाबाकी शिकवणाऱ्या कांबळे मास्तरांनी उदाहरणे चुकली म्हणून आनंदच्या थोबाडात मारली, पण आनंदने सराव केला व तो अचूक गणिते सोडवू लागला तेव्हा ह्याच कांबळे गुरूजींनी शाबासकीही दिली.

इयत्ता चौथीला शिकवायला घाटगे मास्तर होते. 'इतिहास शिकवताना साभिनय शिकवायचे.'(पृ.६४) ह्या सरांचा पाठ विद्यार्थी कानात प्राण आणून ऐकत होते. मन लावून शिकवत असताना कुणा विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष केल्यास ते व्यथित होत व त्या विद्यार्थ्याला मारतही पण विद्यार्थ्यांवर काही संकट आल्यास ते पित्याप्रमाणे काळजी घेत. एकदा पांडू काटकर नावाचा त्यांचा विद्यार्थी जिन्याखालच्या फरशीवर रक्तात न्हात बेशुद्ध पडला त्यावेळी दोन्ही हातांनी उचलून त्यांनी घाईने दवाखान्यात नेले आणि डॉक्टरांना म्हणाले, ''डॉक्टर चला लौकर; माझं पोर जायबंदी झालंय.''(पृ.६६) यावरून ते प्रेमळ होते हे स्पष्ट होते.

इयत्ता पाचवीला पहिले दोन महिने रणदिवे मास्तर होते. ते विद्यार्थ्यांना निबंध लेखन करण्यास सांगत. लेखकाने लिहिलेल्या निबंधाचे रणदिवे सरांनी फार कौतुक केले. त्यावेळी ते म्हणाले होते, ''जकाते हुशार मुलगा आहे. स्वंतत्र डोकं लढवितो.''(पृ.८३) पण प्रोत्साहन देणाऱ्या या रणदिवे सरांची दोनच महिन्यात दुसऱ्या वर्गावर नेमणूक झाली गस्ते मास्तरांना त्यांच्या वर्गावर नेमले. ते फार चिडखोर होते. त्यावर्षी पाचवीत शिक्षणात खंड पडला व पुन्हा पाचवीला प्रवेश घेतला रणनवरे मास्तरांनंतर त्याच वर्गाला मंत्री मास्तर वर्गशिक्षक म्हणून लाभले मंत्रीमास्तर अभ्यासू विद्यार्थ्यांचे कौतुक करीत होते. म्हणूनच लेखक म्हणतात, ''माझ्या आयुष्यात 'आनन्दा' ही पहिली हाक पहिल्यांदा त्यांनी मारली''(पृ.१६०) त्यामुळे आनंदमध्ये आत्मविश्वास जागा झाला.

आनंदला मराठी शिकवायला सौंदलगेकर मास्तर होते. त्यांच्यामुळे मराठी भाषेची गोडी निर्माण झाली. बॉयस्कॉटची चळवळ चालविणारे, भूमिती शिकवणारे तु.बा.नाईक मास्तर यांनी मुलांच्या अभिनय, गायन या कलांना प्रोत्साहन दिले. त्यातूनच आनंदच्या अभिनयाच्या कलेला वाव मिळाला चित्रकला विषय  शिकविणारे सणगर मास्तर व सौंदलगेकर मास्तर यांनी आपण होऊन लेखकाच्या चित्रकलेच्या परीक्षेचे पैसे भरले होते.

प्राथमिक शिक्षण संपून लेखक हायस्कूलच्या वर्गात आले हायस्कूल मधले सर्व शिक्षक अतिशय टापटिप होते. इंग्रजी व इतिहास शिकवणारे अक्कोळकर मास्तर तिरसट आणि कडक होते. अक्कोळकर मास्तरांचा पहिलाच तास नियमितपणे होता. लेखकाला शेताची कामे उरकून शाळेत जावे लागत होते आणि त्यामुळे अक्कोळकर सरांच्या तासाला आनंदला उशीर होत होता. सरांनी एकदा उशीरा येणे या कारणामुळे लेखकाचे थोबाड फोडले म्हणजे तोंडात मारले आणि ओरडून म्हणाले, ''यू रास्कल गेऽट आऊट!''(पृ.३४२) आनंदला संस्कृत शिकवायला देशपांडे मास्तर होते. त्यानंतर मात्र लेखक उशीर झाल्यानंतर त्यांच्या तासाला वर्गात गेलेच नाहीत. खडावा घालणाऱ्या या सरांना गुडघ्या गुडघ्या एवढ्या चिखलात काम करणाऱ्या मुलांचे दुःख काय हे कळणार नाही असे लेखकाला वाटते. त्यांच्या दोन्ही मुलांना फ्री शीप मिळाली होती पण लेखकाला फ्री शीप मिळाली नाही याची आनंदला खंत वाटते.(पृ.२९६)

अतिशय मोजकं आणि काटेकोर बोलणारे, अकरावीचं संस्कृत शिकविणारे धर्माधिकारी सर आनंदाचे वर्गशिक्षकही होते. लेखकाची फी भरायची बाकी राहिली होती. त्याची कारणमिमांसा सरांनी सहानुभूतीपूर्वक ऐकून घेतली होती.(पृ.३६२) एस.एस.सी.बोर्डाच्या फॉर्मची फी भरण्यासाठी चे पैसे धर्माधिकारी सरांनी भरले, पण त्या मोबदल्यात आनंदच्या आईने घरच्या

म्हशीचे एक शेर दूध सहा आण्याप्रमाणे तीन महिने घालण्याचे मान्य केले. सात-साडे सात आणे शेर या भावाचे दूध सहा आणे या भावाने घातले. अशा प्रकारे लेखकाच्या खडतर शैक्षणिक वाटचालीत लेखकाला या वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्तीच्या शिक्षकांचे, विविध विषयांचे मार्गदर्शन मिळाले. काही शिक्षकांनी प्रेम दिले तर काही शिक्षकांच्या अवहेलनेलाच आनंदला सामोरे जावे लागले. सोन्याचा कस अग्नीत लागतो. व धैर्याचा कस संकटात लागतो हे म्हणतात ते आनंदच्या बाबतीत पटते कारण आनंदच्या शिक्षणात एवढी संकटे आली तरी आनंद हायस्कूलच्या विद्यार्थ्यात तिसऱ्या नंबरने पास झाला.

झोंबी ही आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी असल्याने या कादंबरीतील प्रमुख पात्रे ही कुटुंबातीलच आहे. यामध्ये आलेल्या पुरुष व्यक्तिचित्रणामध्ये प्रामुख्याने कादंबरी नायक स्वतः आनंद हे आहेत. आनंदचे वडील रतनू त्याच्या वडिलांचे वडील आप्पाजी जकाते, आईचे वडील शिवाप्पा जाधव, आनंदचा लहान मामा लिंगाप्पा, भावंडांमध्ये शिवा, अप्पा, दौलत अशी त्याच्या कुटुंबातीलच पात्रे आहेत. आनंदचे शैक्षणिक वाटचालीत विविध टप्प्यांवर त्याला लाभलेले शिक्षक त्यात प्रामुख्याने त्याच्या जीवनाला आकार देणारे शिक्षक बहुतांशी आहेत पण त्याला त्रास देणाऱ्या पैकी अक्कोळकर सरांचाही विविध प्रसंगांमधून लेखकाने उल्लेख केला आहे. आनंदने ज्या मित्रासोबत आपले बालपण व्यतीत केले त्यात शालेयमित्रामध्ये वसंत पाटील, आबाजी सणगर, चंद्रकांत मेरवाडे, सुरेश माने, बापू कोळी ह्या आदर्श मित्रांचा सहवास आनंदला मिळाला. तसेच आत्याच्या मुलगा बाबू, शेतात काम करतानाचे मित्र गणपा, दिन्या यांच्याकडून ही आनंदला व्यवहार ज्ञान मिळाले. वेळोवेळी आनंदच्या  वडिलांमुळे त्याच्या शिक्षणात खंड पडत होता अशा वेळी आनंदला मदत करणारे रतनूचे मित्र दत्ताजीराव देसाई, विठोबा आण्णा सणगर, गोपातात्या यांची व्यक्तिमत्वे कादंबरीला आधुनिक विचारसरणीकडे घेऊन जातात. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख हळदीकरही आनंदच्या वडिलांना आनंदच्या शिक्षणासाठी समजावून सांगतात. आनंद ज्या गावात किंवा ज्या गल्लीत राहत होता तेथील दारिद्र्याची जाणीव बापूचा म्हातारा, सिद्ध माळकर, लक्षू म्हातारा या गौण पात्रांवरून होते. झोंबी ही ग्रामीण कादंबरी तसेच कृषीव्यवस्थेशी नाते सांगणारी आहे त्यामुळे पात्रांचे राहणीमान ग्रामीण जीवनाला साजेसे आहे. याला अपवाद फक्त आनंदचे हायस्कूलचे शिक्षक त्यांचा पोशाख मात्र टापटीप होता. पात्रांची भाषा ही ग्रामीण आहे. पात्रांचे संवाद हे बोलीभाषेतच आहेत.

### ४.२.७ झाडाझडती :

**वसंता खैरमोडे गुरूजी :**

खैरमोडे गुरूजी म्हणजे एक चालती बोलती आग होती. 'आधी मरण मगच धरण' झोपेतून जागे होताना गुरूजी असे ओरडत उठत होते. त्याला कारण म्हणजे गुरूजींनी कोयना भागात एका डोंगरावरच्या शाळेत शिक्षकाची नोकरी केली होती. कोयनेच्या बुडीतातल्या भागातले कुडलेले-पिचलेले, माणसांतून उठलेले धरणग्रस्त त्यांनी पाहिले होते. त्यांच्या जीवनाची झालेली परवड गुरूजींना ज्ञात होती 'वीज कोयनेला, समृद्धी महाराष्ट्राला आणि भिकेची थाळी धरणग्रस्तांना!'(पृ.१०) धरणामुळे ज्यांच्या जमिनी ओलिताखाली येणार त्यांना हे धरण म्हणजे आनंद होणार पण धरणात जमिनी गेलेल्या लोकांचे कुत्र देखील हाल विचारत नाही.

महारवाड्यात जन्मलेल्या या गुरूजींनी येसकराची घुंगराची काठी वाजवीत पंधरा वर्षे गाव जागता ठेवला होता. धरणात बुडणाऱ्या जांभळी गावाला वाचवण्यासाठी त्यांचा आटापिटा चालला होता. धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाची  मागणी, मोर्चे, सत्याग्रह असे अविरत कार्य चालू होते. सहा फूट उंच, शेलकाट्या, सावळ्या, खादीच्या पेहरावल्या या वाघाने सरकारच्या नाकाला दम आणला होता. खैरमोडे गुरूजींविषयीचा आदर व्यक्त करताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''गरिबांच्या बाजूनं सह्याद्रीच्या ताठकड्यासारखा उभा आहे. वसंत खैरमोडे मास्तर. तो प्राथमिक शाळेतील शिक्षक आहे. आपला प्रामाणिकपणा, उदार वृत्ती, लढाऊ बाणा, दृढता, इमानदारी, तसेच दरिद्री व गरिबांसाठी त्याच्या हृदयात वाहणारा सहानुभूतीचा झरा, या गुणांमुळे तो धरणग्रस्तांचा देव होतो.''[१८]

गुरूजींच्या नावाची एवढी दहशत होती की, भूसंपादनाचे अधिकारी दबकत-वचकत जांभळीत जायचे आणि त्यामुळेच गुरूजी म्हणजे गावकऱ्यांच्या काळजाची कळ झाले होते. कितीतरी वेळा गुरूजी म्हणजे जांभळी बुद्रुक असे वाघठाण तालुक्याला वाटत होते. धरणाला विरोध करणाऱ्या खैरमोडे गुरूजी व जांभळी गावातील वाघेठाणला गेलेल्या गावकऱ्यांना पोलिसांनी पकडले व पोलिसठाण्यात डांबले. तेंव्हा सारे गाव चवताळले. ''एकटा खैरमोडे गुरूजी बाहीर ऱ्हाव दे. ताणून मारल सगळ्यांना तो''(पृ.८) अशा भैरूने केलेल्या वक्तव्यातून गुरूजींवरील असलेली त्यांची श्रद्धा व्यक्त होते. तसेच गुरुजींचा लढवय्या बाणा दिसतो.

खैरमोडे गुरूजी व गावातील लोक यांना वाघेठाणला डांबून जांभळी गावातील लोकांच्या उभ्या पिकांवर आणि घरांवर बुलडोझर चालवून धरणासाठी भूसंपादन केले. धरण होणार हे

गुरूजींना लक्षात आल्यावर किमान धरणग्रस्तांचे पुनर्वसन, मुलांना सरकारी नोकऱ्या मिळाव्यात पुनर्वसित गावात त्यांना सर्व सोयी सुविधा मिळाव्यात म्हणून खैरमोडे गुरूजींनी खासदारांपुढे आपली रडकथा गायली. लाभक्षेत्रातल्या लोकांना खैरमोडे गुरूजी म्हणजे विकासाच्या कामातील धोंड भासायचे. खैरमोडे गुरूजींनी आपलं सारं तारुण्य झगडण्यात आणि लढण्यात घालवलं. अंगात गरम रक्त आणि हाडात जिद्द होती. धरणग्रस्तांना त्यांच्या मालमत्तेचा योग्य वाटा मिळावा म्हणून वाघदरे साहेबांचे पितळ उघडे पाडले मोजदारांनी शेताची तोंड न पाहताच गावचा नकाशा टेबलावर ठेवून मोजणी केली व बोगसपेमेंट केले असा वाघदरे साहेबांवर आरोप केला. तसेच लाला जाधव आणि दत्तू करवंदे यांचे ही वैरत्व पत्करले आणि या सर्वाचे पर्यावसन म्हणजे गुरूजींना आलेली निलंबनाची नोटीस 'सरकारी कामात ढवळाढवळ करून अडथळे आणल्याबद्दलची तीनशे त्रेपन्नची फिर्याद आधीच पोलीस स्टेशनला नोंदली होती.'(पृ.७८) खैरमोडे गुरूजींविषयी आशा सावदेकर म्हणतात, ''जातीने हरिजन आणि व्यवसायाने मास्तर असलेला हा माणूस खैराच्या झाडासारखा चिवट आहे.''[१९] म्हणजेच धरणग्रस्तांच्या प्रत्येक समस्येच्या निवारणासाठी गुरूजी तन,मन, धन अर्पूण प्रयत्न करतात.

**खासदार शिंगाडे :**

खैरापूरगावचे रहिवासी असलेले खासदार शिंगाडे यांचे खैरापूर हे गाव म्हणजे दुष्काळी भागातील बाजारपेठ होती. शिंगाडे पाटील म्हणजे जुना जाणता पुढारी. शिंगाडे खासदार जांभळी धरण योजना पुर्ण व्हावी म्हणून उपोषणाला बसले होते. उपोषणाला आठ दिवस झाले आणि धरण बांधण्याच्या निर्णयाला जोर चढला. दहा वर्षा पूर्वीच खासदाराने धरणाचे भूमीपूजन केले पण जांभळीवासीयांनी धरणांचा डाव उलथून लावला होता. आणि पुन्हा शिंगाडेंनी धरणासाठी उपोषण केल्यामुळे धरणाच्या प्रस्तावाला मंजूरी मिळाली. धरण होण्यात खासदार शिंगाडे यांचा वैयक्तिक स्वार्थ होता. खासदार शिंगाडेचा चिरंजीव सर्जेरावने साखर कारखाना काढण्याच्या हट्ट केला. त्यासाठी बापलेकांनी लाखो रूपयांचे शेअर्सही गोळा केले. पण कारखाना काढायचा तर ऊसक्षेत्र दाखविण्याचा नियम होता. दुष्काळी भागात बागायत दाखवायची कशी? धरणाशिवाय पाणी नाही. पाण्याशिवाय ऊस नाही आणि ऊसाशिवाय साखर कारखाना नाही.'(पृ.२९) मुलाचा साखर कारखाना काढण्याचा हट्ट पुरविण्यासाठी खासदारांनी हा उपोषणाचा घाट घातला.

जांभळीतील लोकांचे पुनर्वसन माझ्या गावात म्हणजे खैरापुरात करावे असे धरणग्रस्तांना खासदारांनी आश्वासन दिले. ''ह्या वनवाशी लेकरांवर माझीच नजर राहिली पाहिजे'' असे खासदार

धरणग्रस्तांना म्हणाले. ''माझ्या गावात तुमच पाऊल म्हणजे स्वर्गातलं पाऊल! तुमच्या जीवाला बोचणी तर माझ्या काळजाला कळ फिकीर कशाला करता?(पृ.३७) अशी भाषणबाजी करून धरणग्रस्तांची मने जिंकण्याचा प्रयत्न त्यांनी केला.

**गोम्या कोळी :**

गोम्या कोळी पाणक्या होता. वाघजाईच्या पात्रातून हल्याच्या पाठीवरून पाणी आणणे आणि साऱ्या गावाचे रांजण भरून देणे हे त्याचे काम होते. पाण्याच्या खेपा उरकल्या की बलुत्यांची घर गाठून चतकोर-चतकोर भाकरी गोळा करून एखाद्या आई माई कडून ताक मागून त्यात चार भाकरी चुरायच्या, जेवण करायचे आणि उरलेल्या भाकरी गाठोड्यात बांधून घरी आणायच्या हा त्याचा दिनक्रम ठरलेला होता.

गोम्या कोळ्याचे शरीर गुटगुटीत होते. चिबडासारखे गाल, बारीक डोळ आणि फेंदरं नाक. रंग हल्या सारखाच काळा तुकतुकीत होता. गोम्या आणि हल्या जुळे भाऊच असावेत असे जांभळीकरांना वाटत होते.(पृ.४) गोम्याचा त्याच्या हल्यावर फार जीव होता. हल्याला काही टोचल, बोचल तर गोम्याचा जीव काकुळतीला येत होता. हल्याला शेतात कामाला लावणे मान्य नव्हते. एकदा त्याची बायको कमळी हिच्या हट्टापायी शेतात जुंपलं. हल्या शेतात चालत नाही म्हणून कमळीने हल्याला मारल याचं गोम्याला  वाईट वाटलं होत. लाडका हल्या गेल्यानंतर गोम्याने अंग टाकले. गोम्या कोळनला हल्या प्राणप्रिय होता.

**लाला जाधव :**

लाला जाधव जिल्हा परिषदेवर निवडून आल्यामुळे जिल्ह्यात त्याला मान होता. खासदार शिंगाडेसाहेब यांच्याशी त्याने सुत जुळवले. एकमेकांना सहकार्य करून ते स्वतःचा स्वार्थ साधत होते. आवडाबाईचा तो पुतण्या होता. तिला मदत करायची सोडून फक्त तिच्यापुढे संकटे निर्माण करण्याचा लाला प्रयत्न करीत होता. लालाचा पुर्वइतिहास तर तो असा, ''लाला जाधव चौथी असताना शाळा सोडून ऊसाच्या फडात लपून बसायचा म्हणून श्रीपतीने म्हणजे त्याच्या वडिलांनी गुरासारखं लालाला बडविले. लाला आंबेपूरला पळून गेला व तेथे कोळशाच्या वखारीत हमाल म्हणून राबू लागला. वखारीचे मालक गरीब बिचाऱ्या धनगर कातकऱ्यांच्या कष्टाचे मोल फक्त एक आणा आणि हा एक आण्याचा माल शेट शहरात बारा आण्याला विकतात. लालाने म्हैब्या नावाचा व्यापारी गाठला. आणि कोळशाचा व्यापार सुरू केला. एका वर्षात गलेलठ्ठ पैसा कमविला त्यानंतर म्हैब्याला बाजूला सरकून स्वतंत्र व्यवसाय सुरू केला. वाघेठाण व आंबेपूरला लाकडाच्या

व कोळशाच्या वखारी काढल्या. त्यातून पुढे झेडपीत निवडून आला. पुढे अनेक खासदार आमदारांचे नाते वाईक या धंद्यात उतरले. आजूबाजूच्या परिसरातील जंगलांची तोडकरून सर्व परिसर ओसाड करून टाकला. धंद्यात स्पर्धा वाढली म्हणून लाला रस्त्याच्या व पुलाच्या कंत्राटात घुसला. येणारा पैसा वाढतच गेला. धरणात जांभळी गाव जाणार याची त्याला फिकीर नव्हती कारण त्याने आंबेपूरला व वाघेठाणला घरे बांधली होती.''(पृ.६१,६२) लालाने जांभळीकरांना भडकवले. धरणाचे काम बंद पाडायचे गुरूजी सोडता सर्व धरणग्रस्त लाला जाधव आणि दत्तू सरपंचाच्या जाळ्यात अडकली. धरणग्रस्तांविषयी कळवळा आहे, असे या दोघांनी भासविले पण सत्य वेगळेच होते. धरणाचा ठेकेदार व ह्या दोघांमध्ये एक गुप्त करार झाला होता. धरणाच्या ठेकेदाराची एका वेळी चार धरणांची कामं सुरू होती त्याची मशिनरी मोकळी नव्हती. लाला जाधव ही गैरमार्गाने संपत्ती मिळविणाऱ्यांचे प्रतिनिधित्व करणारे व्यक्तिमव दिसते.

**दत्तू करवंदे :**

दत्तू करवंदे जांभळी गावचा सरपंच होता. 'मोठ्या झाडावर बांडगुळ वाढावं तसा लालाच्या आधारावर दत्तू वाढला.'(पृ.६२) लालाच्या घरी अगदी घरगड्यासारखे राबून राहात होता. लाला बरोबर राहून गावपातळीवरील राजकारणात सक्रिय झाला. ग्रामपंचायत निवडणुकीअगोदर सहा महिने लोकांत मान्यता पावलेल्या खैरमोडे गुरूजींचा सच्चा कार्यकर्ता बनला खैरमोडे गुरूजींचा विश्वास संपादन केला. गुरूजींनीच त्याला सरपंच बनविले. स्वार्थी वृत्तीचे दत्तूने पंधरा दिवसातच ग्रामपंचायत बगलेत मारून लालाच्या कळपात घुसला.(पृ.६२) दत्तू व लाला हे धरणग्रस्तांचे प्रश्न मिटावेत म्हणून खासदारांनी त्यांना धरणग्रस्तांचे त्यांना प्रतिनिधी म्हणून नेमले. धरणग्रस्तांच्या मुलांसाठी खैरापूरला शाळा बांधली. त्याचे बांधकामाचे कत्रांट लाला व दत्तूला दिले होते. कमी प्रतीचा माल वापरून शाळा बांधली. अनेक प्रकारच्या खोट्यानाट्या सह्या करून खोटी कागदपत्रे करुन त्यांनी जमिनी लाटल्या होत्या. ''आपल्या एका घरात वेगवेगळे बारा खातेदार दाखवून चाळीस एकरांच्यावर जमीन दत्तूने लाटली होती.''(पृ.३६१) जिवंतपणी स्वतःच्या सावत्र आईचा मृत्यूचा दाखला जोडून दोघांच्या वाट्याचे सत्तर हजार रुपये हडप केले. दत्तू करवंदे म्हणजे मेलेल्या माणसाच्या टाळू वरचे लोणी खाणारा द्वाड व्यक्ती होता. वास्तविक पाहता धरणग्रस्तांचा प्रतिनिधी बनून धरणग्रस्तांना मदत करणे त्याचे कर्तव्य होते. पण त्याने स्वतःचीच तुंबडी भरण्याचा प्रयत्न केला. दत्तू करवंदेच्या चित्रणातून लेखकाने बेरकी राजकारण्यांचे वास्तववादी चित्र समाजापुढे उभे केले आहे.

**लंगडा गोईंदा :**

आवडाबाईचा कारभारी गोईंदा हा कुस्तीगीर होता. त्याचा थोरलाभाऊ तुका आणि गोईंदा यांनी आजूबाजूच्या गावात जत्रा गाजविल्या होत्या. त्यांचा चुलता श्रीपती जाधवाला पुतणे डोईजड होतील असे वाटल्याने त्यांना ठार मारण्याचा विचार पक्का केला. दोघा भावांना एका रात्री चावडीच्या खांबाला बांधून चाबकाने फोडले. दोघे भाऊ मेल्यासारखे गपगार पडल्यावर दोघांना बांधून लाडूबाच्या डोंगराच्या वर कड्याला नेले. श्रीपतीने मारेकऱ्यांवर कामगिरी सोपवली होती ते रात्रभर दारू पिऊन जेवणखाण करत बसले. पहाटे गोईंदा शुद्धीवर आला. व बांधलेल्या स्थितीतच झाडांमध्ये घुसला तिथच त्याने तीन दिवस जाळवंडाचा पाला खावून काढले. तिसऱ्या दिवशी शिकारीला आलेल्या वाघेठाणच्या इनामदाराने गोईंदाला त्याच्या मामाच्या घरी पोहचविले. मामाच्या घरी दोन वर्ष मामाने त्याला जपले. आवडाबरोबर लग्न लावून दिले व जांभळीला आणले. मामा चार वर्ष त्याच्या मदतीला थांबला. अशा प्रकारे लेखकाने गोईंदाच्या पूर्वायुष्याचा वेध घेतला आहे.

आवडाबाईबरोबर सुखाचा संसार चालू असतानाच धरणाचे संकट उभे राहिले. आणि गत आयुष्यातल्या शेत, बांध, सोन्या बैला, हैबतीचा जन्म या आठवणींने गोईंदाचे मन उचंबळून आले. धरणासाठी सरकारने भूमी संपादित केली. बुलडोझरने मोठ्या हौशेने बांधलेले गोईंदाचे घर सपाट केले. घराची जागा साफ सरणासारखी दिसू लागली. हडळीच्या विहिरीकाठावर हतबल होऊन गोईंदा तिथेच बसून राहिला आणि ज्याची भीती आवडाबाईला होती शेवटी तेच घडले. गोईंदाने विहिरीत जीव दिला. अशा प्रकारे चुलत्याने मारण्याचा घाट घातला पण नशिबाने त्यातून सुटलेल्या गोईंदाने धरणाच्या संकटाने व्यथित होऊन जीवनाकडे पाठ फिरवली. तेंव्हा पांडू म्हाताऱ्याने मांडलेली व्यथा ''आता गावानं उभी जिंदगानी रडत कुथत काढायची. साऱ्यांनी पेटायचं ते ह्या सरणासारखं! गावाला सरण मिळालं पर मरण न्हाई! एक गोईंदा हुता पुण्यवंत म्हणून सुटला रांगडाऽऽ!''(पृ.२७) या व्यथेने वाचकांच्या मनाला हुरहुर लागली.

**हैबती :**

हैबती हा आवडाबाईचा धाकटा मुलगा. तारूण्यात रुपासारख्या रूपवान मामाच्या मुलीबरोबर लग्नाची स्वप्न रंगवणारा पण क्षणात त्यांच्या स्वप्नांचा चुराडा झाला. हैबती सारख्या धरणग्रस्ताबरोबर लग्न करून माझी गत डोंबाऱ्याच्या पोरीवानी करू का? असं म्हणून रूपाने हैबती बरोबर लग्नाला साफ नकार दिला. त्यानंतर लग्नाचा विषय हैबती काढूच देत नव्हता शेवटी

परिस्थितीशी मिळते जुळते घेत धरणग्रस्तच असलेल्या भिवादादाच्या फुला नावाच्या मुलीबरोबर हैबतीचा विवाह झाला. पण समाधानाची गोष्ट म्हणजे फुला रंगाने उजळ नव्हती पण गुणाने फार चांगली याचे हैबतीला समाधान होते.

वडिलांच्या मृत्यूनंतर खैरमोडे गुरूजींच्या पाठपुराव्यामुळे हैबतीला धरणाच्या नोकरीवर घेतले खरे पण अधिकाऱ्यांनी त्याच्या समोर नेहमी संकटे उभी करण्याचा प्रयत्न केला. त्याच्या कामाचे दोनशे चाळीस दिवस भरले की तो नोकरीत कायम होणार होता. पण कामावर गेल्यानंतर हैबतीला सहीला मस्टर दिलं नाही. 'धरणाच्या कामावर जवानी जाळली. धरणात गाव बुडला. बाप गाडला. बारा वरसं रखडलू आनी आता पर्मनंट ह्युयाच्या वक्ताला मस्टर दाबून ठेवलंय''.(पृ.३३१) अशी जिल्हाधिकारी देशमुख साहेबांपुढे हैबतीने व्यथा मांडली. देशमुख साहेबांनी त्याला नोकरीचा शब्द दिला पण त्यांची बदली होण्याआधीच कमी केले त्याचे कारण त्याचे वय संपले.(पृ.३८०) आई, पत्नी खैरापूरला अनेक संकटांना तोंड देत होते. नोकरीची गाडी शेवटी रूळावर आलीच नाही. हताश हैबतीच्या मनात आत्महत्येचा विचार आला. आत्महत्याकरण्यासाठी धरणावर गेला देखील पण उडी मारण्या अगोदर त्याला त्याच्या मुलाचा, सदाचा रडण्याचा भास झाला, बिनकुंकवाच्या फुलाला कोण आसरा देईल आणि त्याने पाय मागे घेतला. 'पत्थराला पाझर फोडू. पण मला जगायचं आहे! मला जगायचं आहे!'(पृ.३८) असा निर्धार करून तो चंबूगबाळ घेऊन खैरापूरला आला व शेती करू लागला पण तिथेही संकटांनी त्याची पाठ सोडली नाही. राघू भिवा व धोंडीराम हे हैबतीच्या मागे हात धूवून लागले राघू भिवाने हैबतीला मारण्यासाठी मारेकरी पाठवले हैबतीच्या अंगावर काठ्या व दगडांचा वर्षाव झाला. व ते मारेकरी पळून गेले. आवडाईने हैबतीला दवाखान्यात नेण्याचा निर्णय घेतला, पण राघूने त्यांचा रस्ता आडवला त्याला वाटले हैबतीला घेऊन पोलीस स्टेशनला जातील पण शेवटी हैबतीच्या गळ्याला हात लाऊन पाहिल्यावर हैबती जगत नाही हे लक्षात आल्यावर जीपमध्ये टाकून दवाखान्यात नेले पण खैरापूरचे डॉक्टरांनी त्याची अवस्था पाहून त्याला आंबेपूरला नेण्याचा सल्ला दिला आणि यात बराच वेळ गेला. शेवटी हैबतीची प्राणज्योत मालवली.(पृ.४५३ ते ४५८) एका धरणग्रस्ताचा अशा प्रकारे खून झाला. हैबतीची ही करूणरसाने भरलेली कहाणी वाचून वाचकाचे मन सुन्न होते. धाडसी आवडाईच्या पोटी जन्मलेला हा भूमीपूत्र जीवनाच्या अंतः पर्यंत संघर्ष करतो.

**बामणाचा दिगुआण्णा :**

जांभळी गावातील देवी काळूबाईची पूजा दिगुआण्णा मनोभावे करीत होता. त्याची काळूबाईवर खूप श्रद्धा होती. गावातील लोक धरणात गाव बुडणार का? म्हणून देवीला कौल लावत होते. तेव्हा दिगुआण्णा विश्वासाने छातीवर हात ठेवून 'गाव बुडणार नाही' असे सांगत होता.(पृ.८) धरणाचा शेवटचा थरच बांधायचा राहिला तरी दिगुआण्णा बोलत होता, ''शिंच, कसलं होयंत धरण?''(पृ.१३३) हा त्याचा अंधविश्वास फोल ठरला. जरी धरण बांधल तरी ते काळूबाई टिकू देणार नाही. अशा वेड्या आशेवर गावातच राहिलेल्या आड्यावर जाऊन बसलेल्या दिगुआण्णाला शेवटी पुराच्या पाण्यातून कायलीत बसून कॉलनीवर आणले. मरण समोर दिसत असतानाही घरादाराचा मोह न सुटणारा बामणाचा दिगुआण्णा तऱ्हेवाईक, अंधश्रद्धाळू, भोळाभाबडा वाटतो.

**कुशापा :**

कुशापा हा मसणमाळचा परंपरागत राजा होता. कुशापाचं घराण म्हणजे धनगरांच्या राजाचं घराण. शंभर एकर जमिनीचा मालक असलेल्या कुशापाच उत्पन्न संपुर्ण मसणमाळमध्ये भारी होतं. कुशापा सर्वांच्या अडीअडचणीला उपयोगी पडायचा. 'कुशापा म्हणजे छोट्याशा मसणमाळचं नाकच जणू.'(पृ.८९) कुशाराजाची आणि गुणवंताची दोस्ती झालेली होती. विविध जमातीतील कुशापाला मान द्यायची त्याला आपला राजं म्हणायची 'फणसाच्या गऱ्यागत गोड वाटणारा कुशाराजा हा सगळ्यांनाच दोस्त वाटायचा'(पृ.८९) कुशापा जंगली प्राण्यांची शिकार करण्यात तरबेज होता.

धरणामुळे मसणमाळ ही पाण्याखाली गेले आणि कुशापा देखील धरणग्रस्त झाला. एकेकाळी परिसरात राजा म्हणून नावारूपाला आलेल्या कुशापाला अनेक संकटाना तोंड द्यावे लागले. प्रसंगी कुटुंब चालविण्यासाठी वाघाची शिकार व दारूचा धंदा ही हीन प्रतीची कामे करावी लागली.

**अनिल देशमुख :**

धरणग्रस्तांना आशेचा किरण दाखविणारे आंबेपूर जिल्ह्याचे कलेक्टर म्हणून नेमणूक झालेले अनिल देशमुख धरणग्रस्तांसाठी देवदूत बनून आले होते. अधिकारी म्हणून येण्यापूर्वी अनिल देखमुख साहेब यांनी धरणग्रस्तांची दुरावस्था स्वतःच्या डोळ्याने पाहिली होती. त्यामुळे जांभळी

धरणामुळे विस्थापित झालेल्या सर्वांच्या बद्दल त्यांना सहानुभूती होती. आणि त्यामुळेच ते खैरमोडे गुरूजी धरणग्रस्तांच्या ज्या अडीअडचणी सांगत होते त्यावर देशमुख साहेब अंमलबजावणीचे आदेश सोडत होते. पण त्यामुळे पुनर्वसनवाले सर्व अधिकारी देशमुख साहेबांना वचकून राहू लागले होते. 'देशमुख कलेक्टर देवासारखाच आलेला धडाधड निर्णय घेऊन त्यानं आजवरची भिजती घोंगडी वाळत घातली होती. चुकीची नोंद केल्याबद्दल दणदिशी जोशी सर्कलला सस्पेड केला होता. ही बातमी राष्ट्रभक्तीत मोठ्या मथळ्यात प्रसिद्ध झालेली, सगळीकडे साहेबांच अभिनंदन होत होतं.'(पृ.२५८) शासकीय खात्यातील सर्वच अधिकाऱ्यांनी जर अनिल देशमुख यांचा आदर्श घेतला तर भ्रष्टाचाराचे उच्चाटण होईल असे वाटते. देशमुख साहेब म्हणजे तरूण, तडफदार, अतिशय हुशार आणि मुख्य म्हणजे धरणग्रस्तांविषयी प्रेम असणारे राजकीय दबाव तंत्रांला बळी न पडता आपले कार्य न्याय्य व निस्वार्थी वृत्तीने करणारे धडाडीचे अधिकारी होते.

**सर्जेराव शिंगाडे :**

सर्जेराव शिंगाडे हे खासदार शिंगाडे यांचे सुपुत्र होते. सर्जेरावाला खैरापूरभागात साखर कारखाना सुरू करायचा होता परंतु त्यासाठी खैरापूर सारख्या दुष्काळी भागात पाणी खेळविणे महत्वाचे होते. म्हणून सर्जेरावांनी आपल्या वडिलांकडे जांभळी धरणाचा हट्ट धरला. आणि त्याच्या हट्टापायीच खासदारांनी जांभळी धरण व्हावे म्हणून उपोषण केले. धरणग्रस्तांना खैरापुरात मोक्याची जागा दिल्या मुळे वैतागलेल्या सर्जेरावाने युक्तीवादाने जागेचा प्रस्ताव बदलला. सर्जेराव शिंगाडे हा अतिशय स्वार्थी वृत्तीचा धरणग्रस्तांविषयी प्रचंड राग असलेला युवक होता. कारखाना झाल्यानंतर साखर कारखान्याचे चेअरमन म्हणून जबाबदारीचे काम तो पाहत होता.

**बाबू पवार :**

हा धरणग्रस्तांचे नेतृत्व करणारा धडाडीचा तरूण होता. धरणग्रस्तांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध तो नेहमी बंडखोर होताना दिसतो. बंडखोर बाबू पवार खैरमोडे गुरूजींच्या विचाराने प्रभावित झाला होता. राजकारणी व अधिकारी लोक यांच्याशी बाबू पवार नेहमी संघर्ष करताना दिसतो. धरणग्रस्तांना बाबू पवार नेहमी मदत करताना दिसतो..

**म्हाकू भोसले :**

म्हाकू भोसलेने आपले संपूर्ण आयुष्य धरणग्रस्तांसाठी वाहून घेतले होते. धरणग्रस्तांच्या हक्कांसाठी तो नेहमी सरकारी यंत्रणेशी झुंजत होता. आवडाई, हैबती, नकुसा यांना वेळोवेळी मदत

करताना म्हाकू आढळतो. आवडाई व खैरमोडे गुरूजी यांच्या विषयी म्हाकूच्या मनात आदर होता. या दोघांचा शब्द म्हाकू कधीही डावलत नव्हता. जांभळी सारखीच अनेक गावे धरणाने परगंदा झाली होती. ती सारी गावे एक न करू शकल्याचे गुरूजींना शल्य डाचत होते हे म्हाकूने हेरले होते. आणि म्हणूनच म्हाकू धरणग्रस्तांच्या एकजूटीसाठी झटत होता. 'गुरूजींची मदार म्हाकू आणि हैबतीवरच होती. हीच दोन पोरं आपलं काम चालू ठेवतील असा त्यांना भरवसा होता.'(पृ.४३६) गावठाणात मुलींवर अन्याय, अत्याचार होत होता तो म्हाकूला पाहवत नव्हता. त्याचे रक्त उसळून येत होते. मंजी व छगनरावाच्या अश्लिल वागण्याचा राग येऊन म्हाकून त्यांचे विदारक व भयावह पद्धतीने हाल केले.

**पंढरी पाटील** :

पंढरी पाटील हे 'खैरापूर' या गावातील धरणग्रस्तांचे दुःख समजून घेणारे होते. पंढरी पाटील हे धरणग्रस्तांविषयी आस्था असणारे आदर्श व्यक्तिमत्व होते. खैरापूर मधल्या अगदी थोड्या लोकांना धरणग्रस्ताविषयी अनुकंपा होती, त्यापैकी एक म्हणजे पंढरी पाटील होते.

**सुभानजी :**

सुभानराव म्हणजे आवडाईचा मावसभाऊ होता. आवडाईच्या थोरल्या मुलाला म्हणजे गुणवंताला त्याने दत्तक घेतले होते. सुभानजी मुंबईला नोकरी निमित्त राहत होता. गुणवंता, त्याची पत्नी साळू व त्याची मुले ही सुभानजीच्या गावाला म्हणजे झांजडवाडीला राहून शेती करीत होती. त्याचे त्याच्या बहिणीवर फार प्रेम होते त्यामुळे अडीनडीला आवडाईला मदत तो करीत होता. ''माणसानं जन्मा यावं, कुठंबी वाढावं पण आपल्याच आयपांढरीत मरावं. जिथं जन्मलू तिथं मरण्यासारखं सुख न्हाई''(पृ.२९३) असे त्याचे मत होते.

एकदा सुभानजी खैरापूरला आवडाईला भेटायला गेला रानातली औतं बघत फिरत असताना अचानक त्याच्या छाताडात कळ आली व तो तिथेच मरण पावला. त्याच्या इच्छेखातर त्याचा मृतदेह झांजडवाडीला नेण्याचा हैबतीने अटोकाट प्रयत्न केला. पण त्याला सुभानजीला झांजडवाडीच्या अलीकडेच अग्नी डाग द्यावा लागला. सुभानजी गावातील लोकांना मोठ्या मनाने मदत करीत होता. दिलदार मनाचा सुभानजी गेला तेव्हा लोक म्हणत होते, ''अराराऽ केवढा पुण्यवंत माणूस आणि त्याच्या नशिबाला कसला ह्यो झाडा?''(पृ.३०८) 'सुभानजी मेला झांजडवाडीच नाक गेलं म्हणून सारी हळहळत होती. अशा प्रकारे सुभानजी एक प्रेमळ भाऊ मानस पुत्रावर प्रेम करणारा, जन्मभूमीवर प्रेम करणारा आदर्श व्यक्ती लेखक रेखाटतो.

**हरबा नावाडी :**

जिल्हा दूध संघाने एक लाँच विकत घेतली होती. त्या लाँच मधून कॉलनीतील लोकांसाठी दूध आणले जायचे. त्या लाँचवर हरबा नावाचा भोई होता. ह्या लाँचमुळे नांदगाव, फणसावड, बिबेवाडी, मसणमाळ, झांजडवाडी, इरलेवाडी या गावापर्यंत वाहतूकीची सोय झाली होती. हरबाला रूपया – बारा आणे देऊन लोक लाँच मध्ये बसून प्रवास करायचे. साधारणतः त्याला पंधरा रूपये मिळायचे. मिळालेल्या पैशात मटणाची थाळी आणि तीन कप दारू पिऊन त्यांची चंगळ चालली होती. हऱ्याचा पाटील झाला, लोकांनी त्याला हऱ्या म्हणलेले आवडत नव्हते. पाटील म्हणून हाक मारा असे त्याने सर्वांना बजावले. औषधांचा बहाणा करून कातोडी लाँच मधून मोहाची दारू न्यायचे हे हरबाच्या लक्षात आल्यानंतर  मोहाच्या दारूत चार आणे वाटा तो घ्यायचा व दिवसरात्र दारू पिऊन नशेत राहात होता. प्रवास करणाऱ्या सर्व प्रवाशांकडून तो काहीना काही वानसामान घ्यायचा. तो स्वतः धरणग्रस्त असल्याने तो नेहमी धरणग्रस्तांना मदत करताना आढळतो.

**पांडू येताळा :**

पांडू येताळाला शामू, भिमू, अशोक, नामू ही मुलं होती. घरात बारातेरा खाणारी तोंड होती. पांडू येताळाचे एकच खाते धरल्याने चार एकर जमीन मिळाली. त्यातली दीड एकर टाकाऊ होती. सगळ घरदार घेऊन पांडू येताळा मोल मजुरीला बाहेर पडायचा. पांडू येताळा वयाच्या पासष्टाव्या वर्षी देखील भांगलणं–खुरपणं करीत होता. राबून पाठीचा इळा झालेला.(पृ.२८५) अशोकला शिकविले डी.एड. केले. खैरमोडे गुरूजींनी प्रयत्न केले. अशोकला नोकरी मिळाली. आंबेपुरात असताना अशोकने लग्न केले. वडिलांना अक्षता टाकायला सुद्धा बोलावले नाही. तेव्हा पांडबाला खूप दुःख झाले. गुरूजींची देशमुख साहेबांकरवी गावठाणात बदली करून घेतली पण अशोक शाळेतून खैरापूरला जायचा. वडिलांकडे येत नव्हता. तेव्हा पांडू येताळा गुरूजींना म्हणाला, ''मास्तराऽ मास्तराऽऽ काय केलंस हे? अरं काय पेरलंस आनी हे काय उगवलं?''(पृ.२८४) तेंव्हा गुरूजींनी त्याची समजूत काढली. पांडवाला राजू नावाचा नातू होता आजारात त्याचा मृत्यू झाला. पांडवाला त्याचा नातू फार प्रिय होता. प्रिय नातवाच्या मृत्यूने पांडबा जीवनाला कंटाळला त्याच्या गालावरचे हसू कायमचे मावळले. नातवाच्या मृत्यू नंतर पांडबाने अंग टाकले. आणि एक दिवस तोही राजूला भेटायला गेला. पांडु येताळा हे कष्टाळू व्यक्तिमत्व होते. शिक्षक असलेल्या मुलाचा

दुर्दैवी पिता, म्हातारपणी राजू या नातवाचे मरण पाहण्याचे दुःख ज्याच्या नशिबी आले असा दुर्दैवी आजोबा होता.

**राघू भिवा :**

राघू भिवा हा कादंबरीत खलनायकाची भूमिका बजावताना दिसतो. राघू भिवा हा खैरापूर मधील धनदांडग व्यक्तिमत्व होते. खासदार शिंगाडेंचे सुपुत्र सर्जेराव देशमुख यांच्या संगतीत राघू भिवा राहत होता. त्याला पांडा व धोंडा ही दोन मुले होती. त्याची जमीन धरणग्रस्त हैबतीला मिळाली होती. राघू भिवाची जमीन गेल्यामुळे तो हैबतीचा हाडवैरी झाला होता. हैबतीला तो जमीन पचू देणार नव्हता. तालुक्यात त्याचे वजन होते. साखर कारखान्याच्या पर्चेस कमेटीचा तो चेअरमन होता. खासदारांच्या संगतीत राहून राजकारणातील डावपेचात तो पारांगत झाला होता. 'दुनिया उलथी पालथी करणाऱ्या राघू अण्णाच्या रानातली धरणग्रस्त बाहेर निघेनात याचंच खैरपूरकरांना आश्चर्य वाटलं होतं.'(पृ.२६०) हीच सल राघू भिवाला डाचत होती. आणि शेवटी त्याने अमानुष कृत्य केले. हैबतीसारख्या कष्टाळू माणसावर प्राण घातक हल्ला केला. त्यातच हैबतीचा अंत झाला. राघू भिवा सारख्या राक्षसीवृत्तीचा पाठीराखा खासदार शिंगाडे असल्याने राघू भिवाला अटकही झाली नाही. शेवटी धरणग्रस्तांनी तीव्र आंदोलन केल्यामुळे मुख्यमंत्र्यांसमोर आपली शोभा होऊ नये म्हणून राघूला पोलीस स्टेशनला हजर व्हायला सांगितले.

**ताया कांबळे :**

ताया कांबळे म्हणजे गुरूजींचा खानदानी विरोधक होता. त्याचे एकच सुत्र होते, ''मास्तर शाणा असू दे न्हाय तर खुळा पन त्येला जुमानायच न्हाई एवढं खरं.''(पृ.५२) दत्तू करवंदे व लाला जाधव सारख्या दुराचारी व्यक्तीबरोबर राहून तो भ्रष्टाचारी बनला. चोरगे कारकूनाला हाताशी धरून धरणग्रस्तांकडून लाच घेऊन तुमची कामे करून देतो असा धरणग्रस्तांना विश्वास द्यायचा. थोड्याच दिवसात ताया कांबळे पुढारी झालेला होता. सदोदीत वाघेठाणच्या मामलेदार ऑफिसात किंवा पुनर्वसनाच्या कचेरीत त्याचा वावर होता. कुणाला प्लॉट मिळवून देणे, जमिनीचा ताबा देणे, घरबांधणीचे कर्ज मंजूर करणे अशी कामे करून तायाने भरपूर माया कमविली होती. ताया सारख्या दलालाला धरणग्रस्तांच्या कामापासून दूर ठेवा अशा स्वरूपाचे अर्ज गुरूजींना दिले होते पण तायानेच गुरूजींविरुद्ध तक्रार केली.

**पत्रावळे साहेब :**

भ्रष्टाचारी वृत्ती असलेले पत्रावळे साहेब दोन मुलींची लग्न उरकायची असल्यामुळे 'आण गुमान' अशी चोरगे कारकुनाला ताकीद द्यायचे. कामाच्या नावाने बोंब असलेल्या पत्रावळे साहेब अनेक भानगडींमध्ये अडकलेले होते.

**दिलीप पवार :**

दिलीप पवार हे मुळचे सातारा जिल्ह्यातले होते. डि.आर.ओ. दिलीप पवार साहेब यांच्या गावापासून काही मैलांवरच एका मोठ्या धरणाचं बांधकाम झाले होते. त्यामुळे धरणग्रस्तांबद्दल त्यांच मत बिलकूल प्रतिकूल नव्हतं. खैरमोडे गुरूजीं धरणग्रस्तांच्या अडचणी दिलीप पवार साहेबांना नेहमी ऐकवत आणि पवार साहेब धरणग्रस्तांच्या अडचणी समजून घेऊन मदत करीत होते. पवार साहेबांच्या कृपेमुळेच कितीतरी वर्षांनी खैरमोडे गुरूजी पुनर्वसनाच्या ऑफिसात चहा पिले होते. पवार साहेबांनी ताया कांबळे सारख्या एजंटांना पुनर्वसनाच्या ऑफिसमध्ये येण्यास लगाम घातला होता.

**४.२.८. राघववेळ :**

**रघू :**

रघुचे पूर्ण नाव रघुनाथ कळणू जाधव. मांग समाजात जन्मलेल्या रघुची ही कथा लेखकाने मांडेलेली आहे. 'रघू' हा शोषित वर्गाचा प्रतिनिधी आहे. मातंग समाजामध्ये हळूहळू नव्या जाणिवांचा उदय, आपले अस्तित्व काय? या प्रश्नाची उकल आपणास रघूच्या व्यक्तिचित्रणातून साकार होते. रघू हा स्वतंत्र विचारसरणीचा आपणास प्रत्ययाला येतो. अंधश्रद्धेवर त्याचा विश्वास नाही. प्रथा, परंपरा त्याला मान्य होत नाहीत. लाचारीचे जीवन त्याला नकोसे वाटते पण इलाज नसतो. कारण आपली समाज व्यवस्थाच अशा प्रकारची निर्माण झालेली आहे. म्हणून मातंग समाजातील लोक जुलूम सहन करतात. सितारामला धोंडी केलेले आवडत नाही. प्रत्येक वेळेला पायरुने म्हणजेच त्याच्या चुलत्याने म्हणावे 'आपला वाटा आणायला चला' ही लाचारी मनस्ताप करणारी वाटते. जुन्या परंपरेनुसार गावकऱ्यांची कामे हक्काने करायची, त्याच्या बदल्यात मोबदला म्हणून पायली पसाभर धान्य, नाहीतर उरलेलं धान्य मेहेरबानी म्हणून घ्यायचे. ह्या गोष्टीचे मांग वेटाळातील इतरांना काहीही वाटत नाही पण रघूला मात्र या साऱ्या लाचारीची चीड येते. रघू शिक्षण घेत असतो. शिक्षणाच्या संस्कारामुळे नव्याने विचार करणाऱ्या, घडणाऱ्या मनाला हे

लाचारीचे जीवन पटत नाही. कधी अंबाडीची भाजी, कधी मेलेल्या ढोराचा हिस्सा खाऊन, कधी भीक मागून आणलेले उष्टे अन्न खाऊन, तर कधी उपाशीपोटी तो शाळेत जातो. मोकळ्या वेळेत आईला टोपल्या विणण्यासाठी, मजूरी करण्यासाठी आईच्या बरोबरीने पडेल ते काम करणे, फणे वेचणे, ज्वारीचे बुंधे माती झटकून गोळा करणे यासाठी रघू आईला मदत करतो. कुटुंबाविषयी त्याच्यामध्ये आपुलकी आहे. आईचे दुःख व कष्ट याची त्याला जाणीव होती. अनेक संकटांवर मात करीत रघू आपला मार्ग शोधत जातो. मंगल जोशीचा हात धरला म्हणून रघूला शिक्षा होते. रघू मॅट्रिकची परीक्षा पास झाल्यावर वालंबीचे दर्शन घेतो. त्याच्यातून त्याच्यावरील संस्कार व आई-वडिलांवर असलेला श्रद्धाभाव व्यक्त होतो. आपला चुलता पायरु निर्दोष सुटावा म्हणून रघू देवाला शेरणी कबुल करतो. लहाने बापू (पायरु) निर्दोष सुटतो. रघू आपल्या आईकडे साखरेसाठी पैसे मागतो. वालंबी त्याला चार आणे देते. तो देवाला शेरणी वाटतो. रघू वडिलांच्या जागेवर आपल्या चुलत्याला (पायरुला) मान देत होता. त्याच्याबरोबर प्रत्येक वेळेला चर्चा करत होता. त्याची प्रत्येक गोष्ट ऐकत होता. पटत नसली तरी लहाने बापूला मान देत होता.

**पायरु :**

पायरु हा रघूचा चुलता. त्याला सगळेजण लहाने बापू म्हणत होते. त्याचा रघूच्या कुटुंबाला मोठा आधार होता. आपला भाऊ कळणूच्या मृत्यूनंतर पायरु आपली भावजयी वालंबी हिला प्रत्येक आणीबाणीच्या प्रसंगी साथ देत होता. आपल्या घासातला घास देऊन आपल्या भावाच्या कुटुंबाला मदत करीत होता. पायरुची बायको हरणीला हे पटत नव्हते. ती नेहमी रागराग करीत असे. मदत करण्यास विरोध करी पण पायरु तिची समजूत काढत होता.

**यादव :**

देवराव पाटलाच्या दावणीला असलेला यादव दिवस निघण्यापूर्वी घराबाहेर पडत होता. पाटलाच्या गोठ्यातील शेण उकिरड्यात टाकणे, गुरांना चारापाणी करणे यातच त्याचा दिवस जाई. दिवस उगविण्याअगोदरच तो आपले सर्व काम आटोपत असे. त्यानंतर तो घरी यायचा कौशी त्याच्यासाठी पाणी विसणायची.(पृ.१०३) यादव हा कष्टाळू असलेला दिसून येतो.

**गोपाळराव देशमुख :**

वसारी गावातील गोपाळराव देशमुख हा मानदार होता. बुग्याच्या तान्हीला ओटी भरुन ज्वारी तो देतो. ते समजल्यावर पायरु त्याच्याकडे ज्वारी मागण्यासाठी जातो. गोपाळराव देशमुखाचा

भला थोरला वाडा होता. त्याला वळसा घालून पायरु येतो. डोक्यावर गांधी टोपी, मिशा असलेला गोपाळराव पायरुला म्हणतो, ''आसं कर, जराभरानं दे भाबीले धाडून''(पृ.१०) ह्या त्याच्या बोलण्यातून वासनेने बरबटलेला गोपाळराव देशमुख याच्या मनातील वाईट विचार समजतो. साऱ्या गावचा तो छिलेल माणूस होता. पाठीमागे एकदा त्याने तान्हीला धरले होते. लहानी माय आणि त्यांचे भांडण यावरुनच झाले होते. हरणीचाही त्याने पायलीभर ज्वारीसाठी शरीरभोग घेतो. गोपाळरावाची दृष्ट प्रवृत्ती यातून लेखक मांडतो.

**यसोंता :**

यसोंता हा रघूचा चुलत भाऊ होता. त्याचे वय बारा वर्षाचे. रघू बरोबरचा तो होता. पण यसोंताला धड बाराखडीही येत नव्हती. पायरु म्हणतो, ''कशी ईन? त्यो शाळेत गेला कव्हा?''(पृ.) यसोंताला दोन वर्षे शाळेत टाकून पाहिले होते. तो दप्तर चड्डीत खोचायचा. गोदरीतून वाहणाऱ्या वढयात गावापलीकडे जाऊन पोहत असे. शाळेपासून, लिहिण्यापासून तो दूर गेला होता. त्याचे लक्ष लिहिण्या-वाचण्यात नव्हते. पायरुने त्याला मारुन, हाणून शाळेत पाठविण्याचा प्रयत्न केला. शेवटी त्याला ते कंटाळले. शाळेतून त्याचे नाव काढून टाकले होते.

**भुजंगराव देशमुख :**

पंडीतराव देशमुखांचा मुलगा भुजंगराव देशमुख हा प्रतिष्ठेच्या जोरावर दिवसाढवळ्या गावातील मातंग स्त्रियांचा उपभोग घेत होता. त्याच्या या वृत्तीचा परिचय करुन देताना लेखक म्हणतो, ''भीकदेखील मोफत वाटायची नाही. भीकेचे मोबदल्यात वासनेची अपेक्षा करायची अशी त्याची वृत्ती आहे.'' भुजंगराव देशमुखाच्या पत्नीचे नाव सिंधुताई होते. वासनांध लोकांची प्रातिनिधिक रुप म्हणजे भुजंगराव देशममुख होते.

**पंडीतराव देशमुख :**

पंडीतराव देशमुखांना दोन मुले होती. एकाचे नाव भुजंगराव व दुसऱ्याचे नाव प्रतापराव होते. पंडितराव आपल्या मुलांवर चांगले संस्कार करु शकले नाहीत. म्हणून वाईट प्रकारची प्रवृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली होती.

'राघववेळ' ह्या कादंबरीतील पुरुष व्यक्तिरेखांचे चित्रण करताना लेखक रघुची व्यक्तिरेखा समर्थपणे साकार करतो. रघूचा सख्खा भाऊ सितारामचे आजारपण आणि गावासाठी धोंडी निघणे हे महत्त्वपूर्ण वाटते. यसोंता हा रघूचा चुलत भाऊ आहे. गावातील दोन मातब्बर, मानदार व्यक्ती

म्हणले पांडूरंग पाटील व गोपाळराव देशमुख यांचे चित्रण साकार करण्यात लेखक यशस्वी झाला आहे. पायरु हा रघूचा चुलता आहे. त्याला सगळे ल्हाने बापू म्हणत. त्याची व्यक्तिरेखा लेखकाने आपुलकीचा आधार, कुटुंबाला सुखदुःखाला मदत करणारा अशी रेखाटली आहेत. सोपानरावाचा गडी उकंडा बौद्ध धर्माचा, सर्व मांग वेटाळातील लोकांना 'बसारे जेवायला' म्हणणारा लिंगायतचा बकन, मांग वेटाळातील शिवऱ्या, बुग्या अन्नासाठी हिंडतांना दिसतात. तसेच हरि जाधव, एकनाथ वाणी, रामराव मार्के, पंडीतराव देशमुख, पंडीतराव देशमुखांची मुले भुजंगराव देशमुख व प्रतापराव देशमुख, गोपाळराव, काशिका, सहादू, नारायण व लक्ष्मण या व्यक्तिरेखा लेखकाने समर्थपणे साकार केल्या आहेत.

**४.२.९ ताम्रपट :**

**नाना सिरुर :**

१९४२ च्या चलेजाव आंदोलनात महात्मा गांधीना अटक झाल्याने जयप्रकाश व राममनोहर लोहिया यांसारखा नेत्यांनाही अटक झाली. इंग्लड दुसऱ्या महायुद्धात ओढले गेलेले असताना इंग्रजांना देशातून घालवण्याची हीच खरी संधी आहे असे म. गांधी व नेहरू यांची मते परस्पर विरोधी आहेत. नेहरू म्हणतात 'आंदोलन करणे हे देश विघातक आहे' तर म. गांधीच्या मते 'ब्रिटिश युद्धाच्या खाईत होरपळत आहेत याचा आपण फायदा घेऊन देशभर आंदोलन केलेच पाहिजे.' नाना सिरूर हे या आंदोलनातले सक्रिय कार्यकर्ते होते. नानांच्या सहकार्यांचा नानांवर खूप विश्वास होता. चळवळ, आंदोलन म्हणजे फक्त नाना म्हणेल ते करायचे.

चंद्रकांत बांदिवडेकर हे 'ताम्रपट'मधील व्यक्तिरेखांबद्दल विशेषत: नानासाहेब सिरूर यांच्याबद्दल लिहितात, ''ताम्रपट ही राजकीय कादंबरी आहे असं म्हणण्यापेक्षा राजकीय पार्श्वभूमीचा उपयोग करून राजकीय क्षेत्रांतल्या विविध स्वभावांच्या माणसांचा सखोल शोध घेण्याचा प्रयत्न करणारी कृती आहे. हा शोध घेताना राजकीय घटना आणि कादंबरीतील माणसांपासून लेखकानं पुरेसं अंतर ठेवलं आहे. यातील मुख्य केंद्रीय व्यक्तिरेखा ही नाना सिरूर यांची आहे आणि एक प्रकारे लेखकाचा स्वत:चा आवाज या व्यक्तिरेखेतून ध्वनित होत आहे असं म्हटलं तरी फारशी चूक होणार नाही. मात्र नाना सिरूर यांच्या आन्तरिक उर्मीचा, विचारलहरींचा, दृष्टिकोणाचा, कृत्यांचा, स्वभावाच्या मुळाशी असलेल्या प्रेरणांचा शोध घेताना जी बहुलतावादी अनाग्रही आणि वस्तुनिष्ठ भूमिका घेतली आहे यातून लेखकाने स्वत:चं अन्तरही प्रकट केलं आहे.''[२०] ताम्रपट या दीर्घपटाच्या कादंबरीचे नायक नाना सिरुर ही अतिशय आदर्श

व्यक्तिरेखा आहे, नाना सिरुर, स्वातंत्र्याच्या कार्यात आपल्या तरुणांचा हातभार लागला पाहिजे. यासाठी तरुणांना प्रेरणा देण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी भाषणे करतात. भूमिगत चळवळीचे नेते जयप्रकाश नारायण, राम मनोहर लोहिया यासारख्या नेत्यांच्या कार्याला सिद्धीस नेणसाठी नानांनी, आपल्या नेतृत्वाखाली एक गट केला. त्यात प्रामुख्याने तुकाराम भोईटे, पांडुरंग तिकोने, गोविंदभाई तामसरे, गुलबानाईक, नारायण सोनवणे, राधा किसन, आवडाबाई, लहानू कोम इत्यादी व्यक्तिनानांनी सांगितलेला शब्द प्रमाण मानून स्वातंत्र्य लढ्यासाठी तन, मन, धन अपूर्ण लढत होते. पाच लाखांचा सरकारी खजिना लुटणे, ब्रिटिश राजसत्तेचे प्रतीक अशी कचेरी ताब्यात घेणे यासारख्या कृती करुन भारतीय जनतेमध्ये चेतना निर्माण करण्याचे कार्य नानांनी केले. 'आपली अदम्य स्वातंत्र्याकांक्षा प्रकट करण हा आपला उद्देश आहे.'(पृ.४९) अशी महत्वकांक्षा नानांनी पहिल्या टप्प्यात पुर्ण करण्याचा नानांनी यशस्वी प्रयत्न केला. टेलिफोनचे खांब उखडणे, तारा तोडणे, तसेच शस्त्रागारांनी भरलेली ट्रेन पुलावर आल्यानंतर पूल उडवून देण्याचा प्रयत्न पण तो अयशस्वी झाला यासारखे धाडसी कृत्ये नानांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने केली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जेलमधून सुटल्यानंतर नानांचा विवाह साने गुरुजींच्या मध्यस्थीने नाशिकच्या हरिभाऊ कुलकर्णींची मुलगी अनुताई यांच्याशी झाला. नानांनी आपला वकिली व्यवसाय सुरु केला. वकिली व्यवसायाबरोबरच त्यांनी सेवादलाचे कार्यही सुरु केले. बावन्न सालच्या निवडणुकीत खूप आग्रह करुनही निवडणुकीला उभे राहण्याला नानांनी नकार दिला पण नांनाच्या कार्यकर्त्यांनी अट्टाहासाने प्रजासमाजवादी पक्षाकडून उभे करण्यासाठी प्रयत्न केले. अचानक कॉम्रेड पवारांना तिकिट दिले नानांनी स्वत:ला तिकिट मिळाले नसले तरी त्यांचा उमेदवार कॉम्रेड पवार यांचा प्रचार केला. त्याचाच परिणाम म्हणून कॉम्रेड पवार विजयी झाले.

धरणग्रस्तांचा प्रश्न किंवा आदिवासींच्या समस्या नानांनी सोडविण्यासाठी लढा दिला. प्रसंगी उपोषणही केले. तालुक्यात कॉलेज उभारण्याच्या कामातही नाना सक्रीय होते. दलितांच्या जमिनी अनेक धनिकांनी बळकावल्या. अन्यायाविरुद्ध ही सत्याग्रह केला म्हणजेच नानांनी गोरगरीब जनतेवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली. त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी फार प्रयत्न केले.

नानांच्या बाबतीत एक महत्त्वाचा गुण सांगता येईल तो असा... जय प्रकाशला इंजिनिअरिंगच्या ॲडमिशनसाठी अर्धा टक्का कमी पडला होता. त्याला जर स्वातंत्र्य सैनिकाचा मुलगा असा पुरावा मिळाला असता तर त्याचे ॲडमिशन झाले असते परंतु नानांनी स्वातंत्र्य सैनिकांसाठी असणाऱ्या साऱ्या सोयी सुविधा नाकारल्या. त्यांच्यामते सर्टिफिकेटमुळे तुला प्रवेश

मिळेल पण स्वत:च्या हुशारीच्या बळावर केवळ स्वत:वर अवलंबून असणाऱ्या एखाद्या गरीब मुलाचा प्रवेश त्यामुळे नाकारला जाणार हे योग्य आहे का?(पृ.४६७) नानांची मुलगी अरुणा हीने कॉलेजमध्ये 'कमवा व शिका' या योजनेत नाव नोंदविले. त्यांच्या पत्नी अनुताई यांनी वकिलाची पत्नी म्हणून अहंकार बाळगला नाही. एकंदर नानांचे कौटुंबिक जीवन अतिशय साधेपणाने घालविले. एवढचे नाही तर यशवंतराव चव्हाण यांनी नानांना पद्मश्री किताब देण्याचा निर्णय घेतला पण नानांनी पद्मश्री न स्वीकारण्याबाबत विनम्रपणे नकार दिला. ''रंगनाथ पठारेंच्या 'ताम्रपट'मध्ये सर्वात महत्वाची व्यक्तिरेखा म्हणजे नानासाहेब सिरुर होय. रंगनाथ पठारेंच्या 'ताम्रपट'मधील व्यक्तिरेखेबद्दल मराठीतील ज्येष्ठ समीक्षक प्रा.म.द. हातकणंगलेकर म्हणतात, ''ताम्रपट'चे एक केंद्रवर्ती प्रयोजन म्हणजे नानासाहेब सिरुर या व्यक्तीची चरित्रकहाणी. सिरुर हे या कालखंडातल्या अवमूल्यन प्रक्रियेत टिकून राहिलेले व्यक्तिमत्व आहे. ते या कादंबरीच्या आशयाचा कणा म्हणून लेखकाला अभिप्रेत आहे. आपल्या इतर कादंबऱ्यांतूनही एक प्रकारचा नैतिक कस असणाऱ्या व्यक्तिमत्वाचे चित्रण त्यांनी केले आहे. कोसळत्या काळात मूल्यांचे निरांजन सतत तेवत ठेवणारी ही माणसे म्हणजे काळाच्या, समाजाच्या, व्यक्तींच्या ऱ्हासकारणावर उतारा असे त्यांना वाटत असावे. त्यांच्या ध्येयवादी दृष्टीला समाजातील अनैतिकता, अराजकता, सामाजिक अन्याय, विषमता कमी होईल, अशी त्यांची भूमिका दिसते. समाजव्यापी बदलाची कल्पना ते मांडत नाहीत. ग्रामीण पातळीवरचा ध्येयवाद माणूसकी त्यांना अभिप्रेत आहे. आजच्या सर्वभक्षक, भ्रष्टाचारी सत्तेशी कसे लढायचे? या सत्तेने देऊ केलेले सर्व लाभ नाकारुन एकलेपणाने नि:स्वार्थी जीवन काढणे हे त्याचे उत्तर! नानासाहेब सिरुरांच्या आयुष्यात हे सारे घडते. त्यांना अंतिमत: करुणेचा उजेड सारीकडे व्यापून राहिलेला दिसतो. काठोकाठ कारुण्य हेच तेज. अनैतिक राजकारणाच्या थैमानाने हतप्रभ झालेल्या सर्वसामान्य जनतेसाठी हे सारे कितपत साहाय्यभूत ठरेल? करुणेचा ताम्रपट व्यक्तीसाठी अंतिम समाधान देईलही; पण जनसामान्यांचे काय?''[२१] असा अभिप्राय नोंदविलेला आहे.

आयुष्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक स्थिरत्व व समाधानी दिसतात. उच्च पदवी घेऊनही परदेशाचा रस्ता न धरता भारतातच सेवाकार्यात रममाण होणारा त्यांचा मुलगा जयप्रकाश याबद्दल त्यांना अभिमान वाटतो. आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगणारी सून त्यांना मिळाली. त्यांची मुलगी अरुणा हिला प्राध्यापक नवरा मिळाला. थोडक्यात कौटुंबिक बाबतीत नाना सर्वांगाने समाधानी होते.

राजकारणात चाललेल्या विविध घडामोडींविषयी विचार करताना ते व्यथीत होताना दिसतात. निवडणुकीमध्ये होत चाललेली नीतीमूल्य यांची पायमल्ली नानांनी अनुभवली. एवढे अपार कष्ट करुन मिळवलेलं हे स्वातंत्र्य परंतु स्वातंत्र्याचे फलित जर उज्ज्वल नसेल तर आपले सारे कष्ट निरर्थक झाले असे त्यांना वाटते.

**तुकाराम भोईटे :**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात तुकाराम भोईटे व बापूसाहेब देशमुख हे काही अंशी कादंबरीचे नायक झाले. तुकाराम भोईटे याला वाचनाची आवड होती. शिक्षणासाठी त्याला तालुक्याच्या जवळ असलेल्या त्याच्या नात्यातल्या सीता आजीजवळ ठेवले होते. नाना सिरूरांची ओळख झाल्यानंतर त्यांच्या सेवादलात तुकाराम सामील झाला होता. स्वातंत्र्याच्या आंदोलनात त्याने नानांना सहकार्य केले होते. पोलीसठाणे आणि तहसिल कचेरी ताब्यात घेतली. तेव्हा नानांनी तुकाराम भोईटेंना तहसीलदार म्हणून नेमले होते. पोलीसठाणे व तहसील कचेरी ताब्यात घेतल्यामुळे पोलीस त्यांच्या मागावर होते त्यामुळे तुकाराम भोईटे, नाना व त्यांचे सर्व सहकारी भूमीगत झाले. तुकाराम भोईट्यांच्या नात्यातल्या बुवासाहेब जाधवांच्या वस्तीवर ते राहिले पण पोलिसांना त्याचा सुगावा लागला. यांचा संशय आल्यामुळे त्यांनी गोडे पाटलांच्या वैतागवाडीला जाण्याचे ठरविले. रस्त्याने जाता-जाता टेलिफोनचे खांब पाडण्याच्या उद्योगात तुकारामच्या पायावर खांब पडून पायाला दुखापत झाली. म्हणून तुकारामाला पठारवाडी म्हणजे त्याच्या मामाच्या गावी सोडण्यात आले. तेथून त्याला उपचारासाठी नगरच्या दगडी दवाखान्यात नेले. पायाच्या ऑपरेशननंतर त्याला नगरच्या तुरूंगात ठेवले होते. तुरूंगात त्याचा कम्युनिस्टांशी संपर्क आला व तुरूंगातून सुटल्यानंतर तो पूर्ण कम्युनिस्टवादी बनला.

तुकाराम दादा शेती जोमाने करीत होता. ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात त्या परिसरात घेतले जात होते व त्या परिसरात एकच साखर कारखाना होता. त्यामुळे नवीन कारखाना उभारण्याच्या संदर्भात सर्व कागदपत्रांची भोईटे पाटलांनी पुर्तता केली. भाऊसाहेब हिऱ्यांची भेट घेण्यासाठी ते मुंबईला गेले. तेथे सचिवालयात योगायोगाने त्यांची यशवंतराव चव्हाणांशी भेट झाली. खुद्द यशवंतरावांनी त्यांना त्यांच्या केबिनमध्ये बोलावून तुकाराम भोईट्यांचे मत जाणून घेतले त्यामुळे भोईटे पाटीलावर यशवंतरावांचा प्रभाव पडला.

सहकारी कायद्यान्वये कारखान्याची नोंदणी असा कागद घेऊन आमदार दौलतराव शिंदे एके दिवशी तुकाराम भोईट्यांच्याकडे गेले. कारखान्याचे नोंदणीचे श्रेय भोईटे पाटलांना दिले.

कारखान्याच्या चीफ प्रमोटरपदी तुकाराम भोईटेंचे नाव आमदार शिंदे यांनी स्वतः पदाचा राजीनामा देऊन जाहीर केले. आमदारांच्या मते, ''निष्कारण शोभेसाठी खुर्चीत बसण्यात अर्थ नाही. काम करणाराच खुर्चीत बसला पाहिजे.''(पृ.२१९)

निवडणूक प्रचारांत नानांनी भोईटे पाटलांची भेट घेतली तेव्हा चर्चेअंती असे सिद्ध झाले की दौलतराव शिंदे नाकर्ते असले तरी कारखान्याच्या कामात यशवंतरावांनी केलेल्या मदतीमुळे भोईटे काँग्रेसपक्षाकडे झुकले होते. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री प्रचारा दरम्यान त्या भागात आले असताना तुकाराम भोईटेंचे वडील पुंजा पाटील यांची भेट घेण्यासाठी तुकाराम भोईट्यांच्या वस्तीवर आले होते.

तुकाराम पुंजाजी पाटील तथा दादासाहेब भोईटे हे शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन झाले. त्या आधी त्यांनी रीतसर काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांच्या प्रवेशाप्रसंगी खुद्द मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण उपस्थित होते. तुकाराम भोईटे पाटलांनी जिल्हा सहकारी बँकेची निवडणूकही लढविली. दणदणीत मतांनी निवडणूक जिंकली आणि जिल्हा सहकारी बँकेचे उपाध्यक्ष पद भुषविले.(पृ.३०५)

'दादासाहेबांचा रस्ता सहकाराचा. सहकारातून समृद्धीचा'(पृ.३१६) होता. आपल्याला यश संपादन करायचे असेल किंवा आपल्या हातून जनतेचे कल्याण करायचे असेल तर त्यासाठी तत्वाचं राजकारण पुरेसं नाही, शक्तीच्या राजकारणातून विकास होतो. उदा. दगडू पाटील यांचा मुलगा फक्त सातवी पास होता तरी त्याला मेकॅनिकल मध्ये टाकून दिला. हाती सत्ता नसती तर हे करता आले नसते. अशा प्रकारची दादासाहेबांची विचारसरणी होती.(पृ.३१७) बांगरवाडी येथे भैरवनाथ उपसा जलसिंचन योजना सुरू करण्यासाठी लागणाऱ्या सर्व कागदपत्राची पुर्तता करून तसेच जिल्हा बँकेचे प्रकरण मंजूर करून घेऊन ती योजना यशस्वीरित्या सुरू केली आणि साऱ्या शिवारात भरपूर पाणी उपलब्ध करून देऊन स्थानिक जनतेचा विकास साधला.(पृ.३६०)

दादासाहेब भोईटे पाटील यांना जिल्हा परिषदेत पाच वर्ष सेवा करण्याची संधी मिळाली. त्या संधीचे त्यांनी सोने केले. तालुका पातळीवरून ते जिल्हा पातळीवर गेले. त्यांचा जनसंपर्क अधिक व्यापक झाला आणि याचा फायदा कारखान्याची चेअरमनशिप तर होतीच त्याबरोबरच खासदार होण्याची संधीही मिळाली.(पृ.४३८) सत्ता आली की त्याबरोबर सुबत्ता येते आणि कळतनकळत काही स्वार्थ ही साधला जातो. खासदार भोईटे पाटलांनी त्यांच्या शेताशेजारीच महाराची जमीन बळकावली होती असा त्यांच्यावर आरोप केला होता. धोंडीभाऊ खुपटे यांची ही

जमीन पडीक होती. दादासाहेबांच्या बांधाला लागून असल्याने त्यांनी ती वहिवाटीला आणली व तलाठ्यांकडून रेकॉर्डही दुरूस्त करून घेतले. सातबाऱ्याला त्यांचे नावही आले. कोणीतरी खुपट्यांचे कान भरले तेव्हा दादासाहेबांनी त्यांना खंडणीही दिली. दोन तीन वर्षांनी खुपटे पुन्हा आले. तेव्हा आपली कोणतीही जमीन मी कसायला घेतली नाही. असे दादासाहेबांनी सांगितले. खुपटे यांना पैसे देऊन खूश खरेदीचा कागद लिहून घेतला. दादासाहेबांनी खुपट्यांची जमीन बळकवण्याच्या प्रसंगाच्या वर्णनावरील भाष्य करताना डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''दादासाहेबांनी दलिताची जमीन बळकावली हा प्रसंग जितका वास्तवांच समर्पक भान करून देणारा तितकाच नाट्यमय?''[२२] खुपटेंची बळकावलेली जमीन दादासाहेब त्याला समारंभपूर्वक प्रदान करतात. समारंभात मराठा खासदार एका महाराला भाईबंद म्हणतात. हा प्रसंग जनतेला प्रभावित करणारा होता.

दादासाहेबांच्या जबाबदाऱ्या वाढल्या असल्या तरी कारखान्यावर पकड ठेवणे त्यांना गरजेचे वाटले 'सहकाराच्या गंगेचा मूळ स्त्रोत इथेच तर आहे बाकी साऱ्या व्यवस्थेचा हा पाया'(पृ.४६१) त्यांच्या मुलीच्या लग्नासाठी खुद्द मुख्यमंत्री वसंतराव नाईक व भारताचे गृहमंत्री यशवंतराव चव्हाण उपस्थित होते.

दादासाहेबांना वाचनाची आवड होती. त्यांचे वाचन अतिशय बारकाईने व अद्ययावत होते. प्राध्यापक वैराट यांनी समाजप्रबोधन पत्रिकेत लिहिलेला लेख वाचला व त्याबद्दल प्रा. वैराटांचे कौतुकही केले. दादासाहेबांचा स्वभाव तणावाखाली काम करणारा नव्हता. प्रा. चिटणीस व कॉलेज मॅनेजमेंटची मित्र मंडळी यांच्यात वादविवादात्मक चर्चा चालली होती. पण 'नर्म विनोदाची पखरण करीत, हास्याची कारंजी फुलवीत दादासाहेबांनी आपले विचार मांडले'(पृ.५२५) दादासाहेब भोईटे पाटलांनी बुवासाहेब जाधवांना एकावण्ण हजार रूपयांची थैली समारंभपूर्वक दिली यातून त्यांचा मनाचा मोठेपणा सिद्ध होतो.

**बापूसाहेब देशमुख :**

बापूसाहेब देशमुख हा वाचनाची खूप आवड असलेला अतिशय हुशार असा तरूण होता. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांना भारतातून घालवून देण्यासाठी अनेक मार्ग अवलंबिले होते. त्यातीलच एक म्हणजे शाळांवर बहिष्कार टाकणे. यावर बापूसाहेब देशमुखाचे असे मत होते, 'हुल्लडबाज साले! शाळेवर बहिष्कार घालून काय साधणार?'(पृ.६५) शाळेवरील बहिष्कारामुळे त्यांचे नुकसान होत आहे याची त्याला बोचणी लागली होती. वाचनामुळे देशविदेशात चाललेल्या घटनांची त्याला

खबर होती. कीटस बायरन, शेली, शेक्सपिअर यांचे साहित्य वाचन, त्यातले सौंदर्य अनुभवणे, ब्रिटिश संस्कृती त्यांची परंपराप्रियता यावर बापूसाहेब खूश होते. 'ब्रिटिश हे आपले शत्रू, ते परकीय हे त्याला ही मान्य होते. तरीही त्यांच्या गुणांवर, कर्तृत्वावर तो मनातल्या मनात फिदा होता.(पृ.६६)

बापूसाहेब देशमुख हे वैयक्तिक हितसंबंध जपणारे, स्वतःच्या करियरचा, स्वतःच्या विकासाचा विचार करणारे असे करिअरिस्ट वृत्तीचे व्यक्तिमत्त्व होते. वकिली या आपल्या व्यवसायात अतिशय नावलौकिक त्यांनी मिळवला होता. नैतिकतेच्या चक्रात न अडकता व फक्त व्यावसायिक हितसंबंधाची पाठराखण करीत वकिली व्यवसाय ते करीत होते आणि म्हणूनच गिरगावच्या गहिनाजी कोळसेने त्याच गावच्या भोसल्यांच्या सुनेवर बलात्कार करूनही बापूसाहेबांनी त्याला सहीसलामत सोडविला. 'अशिलांनी पैशाचा विचारच करायचा नाही. देशमुख वकिलांनी केस घेतली म्हणजे जिंकलीच. त्यात काही सवालच नाही इतका मशहूर फौजदारी वकील झालाच नाही.'(पृ.१४५) अशी बापूसाहेबांची पंचक्रोशीत प्रसिद्धी झालेली होती.

बापूसाहेब सरदार भगवानराव निकमांच्या घरी वाचनासाठी जात होते. प्राचीन ग्रीक महाकाव्ये, शोकनाट्ये आणि कीट्स बायरन, शेली, वर्ड्सवर्थ वाचताना त्यांच्या मनात उच्चवर्णीय देखण्या स्त्रीची जी प्रतिमा कोरली गेली होती. तशाच इंदिरा राजे भगवानराव निकमांच्या घरी अवतीर्ण झाल्या. 'सरदार निकमांच्या नात्यातली, फलटणच्या मातब्बर निंबाळकरांच्या घराण्यातील प्राचीन साहित्यातील नायिका पहात असल्याची बापूसाहेबांची पहिली भावना झाली.'(पृ.१५६) दोन्ही कुटुंबाच्या राहाणीमानात खूप अंतर होते तरी इंदिराराजे व बापूसाहेब यांचा प्रेमविवाह झाला. आपल्या वकिली या व्यवसायात संपत्ती आणि नावलौकिक मिळविल्यानंतर बापूसाहेबांनी निवडणुकीला उभे राहावे अशी इंदिराराजांची महत्त्वाकांक्षा होती.

आमदार दौलतराव शिंदे यांनी निवडणुकीला उभे राहिल्यानंतर प्रचाराची धुरा सांभाळण्याची बापूसाहेबांना विनंती केली. प्रचाराची भाषणे ते करू लागले. वकिली व्यवसाय असल्याने आपलाच मुद्दा कसा योग्य आहे हे पटविण्याचे कसब त्यांच्याकडे चांगलेच होते. मुळातच ते पट्टीचे वक्ते होते. त्यांची विषयाची मांडणी शैलीदार होती या सगळ्या बाबींमुळे त्यांच्या सभेला गर्दी होत होती. यशवंतराव चव्हाण पुंजा पाटलाला भेटण्यासाठी तुकाराम भोईटे पाटलांच्या घरी गेले. तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत ॲडव्होकेट बापूसाहेब देशमुख यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यासाठी 'भुजाडीमामांनी सारी व्यवस्था चोख केली होती.'(पृ.२७४)

नाना सिरूरांनी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी आमरण उपोषण सुरू केले होते. त्यावेळी बापूसाहेब पत्रकारांना आपली प्रतिक्रिया देतात. ''प्रश्न आहेत. ते जसे त्यांना जाणवतात तसे आम्हालाही, फक्त त्यांच्या सोडवणुकीचे त्यांचे आणि आमचे मार्ग भिन्न आहेत. आततायी मार्ग आम्हाला वर्ज्य–''(पृ.३०३) शासनावर दबाब आणण्याची पद्धत त्यांना योग्य वाटत नाही.

मंत्री म्हणून बापूसाहेब दिल्लीत होते तेव्हा डालमिया नावाच्या एका व्यक्तीने त्यांना सुंदर तरूणींचे अश्लील फोटो दाखवून त्यांना अडकविण्याचा प्रयत्न केला. पण डालमिया त्यात यशस्वी झाला नाही. एकदा एका रिसॉर्टचा पुर्ण मजला त्यांच्यासाठी रिझर्व करून दिला. त्याठिकाणचे वातावरण अतिशय सुखद आणि प्रसन्न करणारे होते. त्या ठिकाणी मदिरा ही त्यांच्या पुढे ठेवली. अशा प्रसन्न वातावरणात मदिरा पिण्यावर त्यांचा निर्बंध राहिला नाही. मद्यधुंद झाल्यानंतर अचानक एक सुंदर स्त्री पारदर्शक वस्त्र परिधान करून त्यांच्या जवळ येऊ लागली झिरझिरीत नाम मात्र अडसर तिने दूर केला आणि तत्क्षणी बापूसाहेब भानावर आले. 'ओह गॉड! इट वॉज अ ट्रॅप! सरळ सापळा होता.(पृ.५५९) म्हणजे त्यांना बदनाम करण्यासाठी हा सापळा रचला होता.

**अंकुश भोईटे :**

दादासाहेब भोईटे यांचा मुलगा अंकुश भोईटे. पी.डी.चे वर्ष त्याने तालुक्याच्या गावीच पुर्ण केले. एफ.वाय. बी.ए. ला त्याला पुण्यातल्या कॉलेजला शिकायला पाठविले. दादासाहेब एक यशस्वी पुढारी आमदार व नंतर खासदार हे पद भुषविलेले त्यांचाच हा मुलगा. एफ.वाय.ला असतानाच जिमखान्याच्या जागेसाठी निवडणुकीला उभा राहिला. अपुऱ्या ओळखींमुळे तो यशस्वी झाला नाही. पण पुढे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्यामुळे त्याचे नाव सर्व परिचित झाले. गोळाफेक, भालाफेक, थाळीफेक, यांत इंटर कॉलेजिएटला पहिला येतो. कबड्डीची चॅम्पियनशीप कॉलेजच्या इतिहासात त्याने पहिल्यांदाच खेचून आणली. उत्कृष्ट खेळाडू, वडील खासदार, साखर कारखान्याचे चेअरमन तरीही निगर्वी, शिस्तशीर असल्यामुळे पुढच्या वर्षी मात्र जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आला.(पृ.५३०,५३१)

तालुक्यात कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करून ते अंकुश भोईटेने यशस्वीरित्या पार पाडले. आशियातले सगळ्यात मोठे शिबिर की ज्याला खुद्द संजय गांधी हजर राहिले होते. अंकुशरावांनी मात्र राजकारणात शरदरावांच्या बरोबर राहून यशस्वीरित्या वाटचाल करण्याचा ठाम निर्णय घेतला. काटेवाडीच्या अजित काटेंच्या बहिणीबरोबर अंकुश विवाहबद्ध झाला. अजित आणि सुनिता यांना दोन मुली झाल्या व त्यानंतर एक मुलगा झाला पण त्या मुलाचे

ओठ फाटलेले वरचा ओठ बेपत्ताच जवळपास, नाकाजवळ, सशाच्या ओठांसारखं विद्रपु त्यामुळे अजित व सर्व कुटुंबिय नाराज झाले होते. अंकुश भोईटे राजकारणाचा वारसा घरातूनच मिळाल्यामुळे राजकारणात यशस्वी होताना दिसतो.

**जयप्रकाश :**

जयप्रकाश हा नाना सिरूर यांचा मुलगा. जयप्रकाश ने कॉलेजच्या 'कमवा-शिका' योजनेत काम केले. जयप्रकाशला इंजिनिअरिंगला ॲडमिशन घ्यायचे होते. त्याला त्यासाठी अर्धा टक्का कमी पडत होता. त्याला जर नानांनी स्वातंत्र्य सैनिक असल्याचा म्हणजे स्वातंत्र्यासाठी त्यांनी नाशिक सेंट्रल जेलमध्ये तुरूंगवास भोगल्याचे पत्र मिळविले तरी त्याला ॲडमिशन मिळाले असते परंतु नानांनी त्याला साफ नकार दिला. याचा जयप्रकाशला खूप राग आला.

नाना सिरूर ह्या आदर्श व्यक्तिमत्व असलेल्या पित्याचा, जयप्रकाश हा मुलगा, ह्या मुलाचेही विचार आदर्शच वाटले. पवई आय.आय.टी. मध्ये इंजिनिअरिंग पुर्ण केले. तेथे त्याने 'दास कॅपिटल' ग्रंथाचे वाचन केले. मार्क्सवादाचा, साम्यवादी तत्वज्ञानाचा अभ्यास केला. मानवी जीवन व भौतिक शास्त्रीय नियम यांची सांगड घालता येत नाही. असे मत त्याने व्यक्त केले. जयप्रकाश आय.आय.टी. मधून एम.टेक झाला होता. उच्च शिक्षण पुर्ण झाल्या वर सामान्यतः मुले विदेशी जातात. जयप्रकाश अमेरिकेतल्या संयुक्त संस्थानात जाण्याऐवजी शहाद्याला गेला. तिथल्या श्रमिक संघटनेत काम करण्यासाठी तो स्वतःहून जातो.

सुनेत्रा ही जयप्रकाशची पत्नी होती. सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या गटामध्येच जयप्रकाश व सुनेत्रा यांची ओळख झाली आणि ओळखीचे रूपांतर त्यांच्या विवाहात झाले. त्यानंतर ते दोघे कोल्हापूरला राहू लागले. ॲडमिशनसाठी स्वातंत्र्यसैनिकाचा मुलगा असल्याची सवलत मागणारा जयप्रकाश, ती नानांनी मिळवून दिली नाही म्हणून पुढे नानांवर रागावला नाही. उलट त्याला नानांविषयी आदर वाटतो. स्वतःच स्वतःचे निर्णय घेऊन स्वतःच मार्ग शोधला व चांगले आयुष्य जगू लागला.

**शाळिग्राम :**

शाळिग्राम पाचपुते एम.ए. होऊन महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नोकरीला होता. शाळिग्रामचा विषय मराठी होता. नानांच्या उपोषणाच्या वेळी सर्व कार्यात तो सक्रिय होता. सेवादलाचा तो तरूण कार्यकर्ता होता.

**शंकर जोशी :**

हायस्कुलात ड्रॉइंग टीचर होते. आपल्या शहरात कॉलेज सुरू करावे म्हणून चिकाटीने व्रतस्थपणे त्यासाठी झटणारे एक व्यक्तिमत्व कोणत्याही सुविधा उपलब्ध नसताना केवळ विद्यापीठाच्या परवान्याचा कागद घेऊन शहरात कॉलेज सुरू करण्याचा चंग बांधला व शेवटी कॉलेज सुरूही केले.

**प्राचार्य चिटणीस :**

आपल्या शहरात कॉलेज असावे या ध्येयाने प्रेरित झालेले शंकरराव जोशी प्राचार्य पदासाठी आणलेली व्यक्ती चिटणीस चांगलाच धडाडीचा उद्योगी होता. प्राचार्य पदासाठीची निवड शंकररावांनी अचूक केलेली होती. तालुक्यात रोज कुठेना कुठे जाऊन सभा घेणे, भाषणे करूण शैक्षणिक जागृतीची आवश्यकता पटवित होते. खाण कामगारांमध्ये त्यांनी शैक्षणिक आस्था निर्माण केली. बाजारात जाऊन तिथल्या चौकात जाऊन भाषण करणे. वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून कॉलेजसाठी निधी जमविण्याचे तंत्र प्राचार्यांनी चांगल्या प्रकारे अवगत केले होते.(पृ.३६५)

नाना सिरूर, देशमुख वकील, दादासाहेब, बुवासाहेब, भुजाडीमामा, आमदार पवार, प्राचार्य चिटणीसांसह कॉलेजचे संचालक मंडळ यशवंतरावांची भेट घेण्यासाठी गेले होते. तेव्हा प्राचार्यांनी कॉलेजसाठी जागेची उपलब्धता झालेली नसतानाही महिन्याभराने इमारतीच्या पायाभरणी समारंभाचे निमंत्रण दिल्यामुळे साऱ्यांनाच आश्चर्य वाटले. तेव्हा महिन्याभरात आपण जागा मिळवू असा त्यांना विश्वास होता पण तो इतर सर्वांना मात्र प्राचार्याला फाजील आत्मविश्वास आहे असे वाटते. पण प्राचार्यांना वाटते की यशवंतराव आल्यानंतर त्यांच्या मनात आले तर ते मुख्यमंत्री निधीतून आपल्याला पैसे देतील. प्राचार्यांच्या बाबतीत लेखक म्हणतो, 'ते ज्या कामासाठी आले होते ते येनकेन प्रकारे करणे, तसा रस्ता करणे हे त्यांचे उद्दिष्ट होते व त्यादृष्टीने योग्य तेच त्यांनी केले होते.'(पृ.३७१) प्राचार्य त्यांना पाहिजे ते खुबीने करतो. त्यांच्या तालावर सर्वांना नाचवतो.'(पृ.३७५)

प्राचार्य विद्यापीठाच्या डिनशिपच्या निवडणूकीत काठावर निवडून आले. तेव्हा मात्र त्यांनी राजकारण सोडून दिले व सामाजिक कार्य करण्यास सुरूवात केली. यादववाडीच्या शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी जलसिंचन योजना राबवली.(पृ.६३३)

**सीताराम कचरू वैराट :**

वैराट हा हरिजन बोर्डिंगात राहून शिक्षण घेत होता. बोर्डिंग सुपरिटेंडेटनी त्याला बोर्डिंगमधून काढून टाकले होते. याचे कारण म्हणजे त्याने सुपरिटेंडेटचे बोर्डिंगात काम करणाऱ्या सैंपाकाचे काम करणाऱ्या एका तरूण पोरीशी अश्लिल चाळे चाललेले असताना अचानक वैराट तेथे गेला, त्याने नको ते पाहिले. सुपरिटेंडेट साहेबांनी मात्र उलट वैराटवरच असा आरोप केला की वैराटने एका अब्रुदार महिलेचा विनयभंग करण्याचा प्रयत्न केला. सदर महिलेनेही वैराट विरुद्ध कबुली दिली. त्यामुळे वैराटला आपण गुन्हेगार नाही हे सिद्ध करण्याची संधीच मिळाली नाही आणि हताश होऊन तो नानांच्या घरी गेला.

नानांच्या आधाराने तो शिक्षण घेत होता त्याचा विषय राज्यशास्त्र होता. दलिताच्या जमिनी काही बड्या मंडळींनी हडप केल्याच्या अनेक तक्रारी नानांकडे येऊ लागल्यानंतर त्यावर योग्य मार्ग काढणे सुरू झाल्यानंतर वैराटने त्याचा विचार मांडला, ज्यांनी दलितांच्या जमिनी बळकावल्या आहेत त्या जागेत आपण बैठा सत्याग्रह घ्यायचा. तेथे जमिनीचा मूळ मालक आपले कार्यकर्ते व इतर सर्व दलित जे नाडले गेलेले आहेत. खासदार भोईटे पाटलांनी जी जमीन बळकावली आहे तेथून सुरूवात करण्याची कल्पना मांडली. नानांच्या मनात आलं, 'होस्टेल मधून त्याला काढून टाकलं तेव्हा हा आपल्याला भेटला नसता, पुढे शिकला नसता तर याचं काय झाल असतं? आणि किती सहनशील जिद्दीने आयुष्य पाहिलेलं आहे याने!'(पृ.४४२) वैराट दलितांच्या जमिनी त्यांना मिळवून देण्याच्या ध्येयाने प्रेरित झाला होता. सारी सुत्र तो चांगली हाताळत होता. स्वतः निर्णय घेत होता. याचे नानांना कौतुक वाटत होते.

प्रा. वैराटांचे लेखन कौशल्य चांगले होते. त्यांनी समाजप्रबोधन लिहिलेल्या लेखाचे दादासाहेबांनी वाचन केले होते तसेच लातूरच्या एका सभेतील भाषण ही त्यांनी ऐकले. तेव्हा वैराटांविषयी दादासाहेबांनी गौरवोद्गार काढले, ''त्यांच्या सारखे प्राध्यापक इथे आहेत याचा मला अभिमान वाटतो.''(पृ.५२४) तसेच वैराटांची आपण पुन्हा निवांत भेट घेऊ असे आश्वासनही दिले. त्यामुळे वैराट दादासाहेबांवर प्रभावित झाला. त्याबरोबर त्याचं व्यक्तिमत्व विकसित होत गेले. प्रत्येक गोष्ट नानांना विचारून करावी याविषयी त्याचे मन तयार नव्हते. त्याचे त्याविषयी असे मत होते की सतत त्यांना विचारून निर्णय घेणे म्हणजे आपलं डोक गहाण टाकण्यासारखं आहे.

**काशीनाथ ढोरमले :**

काशीनाथ ढोरमले हा बापूसाहेब देशमुखांचा असिस्टंट होता. आई–वडील, तीन भाऊ, चार बहिणी, दोन बहिणींची आणि चारही भावांची लग्न झाली होती. घरात कुणीही फारसं शिकलेलं नव्हते. काशिनाथ ढोरमले सातवी पर्यंत त्यांच्या गावात म्हणजे नगर जवळ जातेगावात शिकला नंतर पुण्याला शिवाजी मराठा बोर्डिंगात आला. काशीनाथ साठी इंदिराराजेंनी भुजंगराव कदम यांची मुलगी सुचविली. त्यापाठी मागे इंदिराराजेंचा उद्देश असा होता की, भुजंगराव कदम हे देवगावच्या पंचक्रोशीत नावाजलेले धनाढ्य शेतकरी होते. अशा लोकांशी संबंध ठेवणे फायद्याचे होईल.

काशीनाथने बापूसाहेबांचा असिस्टंट म्हणून काम केल्यामुळे आणि मुळातच हुशार असल्यामुळे त्याच्याविषयी एका माहितगाराने योग्य प्रतिक्रिया दिली होती. ''लय वस्ताद! आसा बारकाट गडी दिसतो पन कोर्टात गेल्यावर ध्यानात येतंय पार उलथ पालथं करून टाखीतयं बराबर कैचीत धरतं.''(पृ.२९७) बापूसाहेबांनी काशीनाथला कारखान्याचा कायदेविषयक सल्लागार म्हणून काम मिळवून दिले. त्यानंतर त्याने दौलतराव शिंदे यांच्याशी स्नेहाचे संबंध वाढवून डायरेक्टरशिप घेतली.

काशीनाथ ढोरमले वकील व नाशिकचा मित्र सुदाम धोबी यांची योगायोगाने भेट झाली. पण सुदाम टी.बी. पेशंट काही दिवसातच वारला, त्यांच्या कुटुंबाला आधार देण्याच्या निमित्ताने ढोरमले वकिलाने त्याच्या बायकोशी सलगी केली.(पृ.४८१) काशीनाथ ढोरमले स्वार्थी तसेच विश्वासघातकी असलेला दिसतो.

**उदयसिंह :**

उदयसिंह हा इंदिराराजे व बापूसाहेब यांचा मुलगा होता. शिक्षणासाठी त्याला लोणावळ्याला डॉन बॉस्कोमध्ये अगदी के.जी.पासून ठेवला होता. तो सुट्ट्यांमध्ये येतो किंवा अधूनमधून आईवडील दोघेही भेटायला जातात. उदय सिंह त्याच्या आईवडिलांसोबत एकदा त्यांच्या मूळ गावी गेला. तेव्हा 'इथं हे ग्रँडपा, ग्रँडमा त्यांची बाकी सारी माणस फारचं शॅबी लोक होते हे सारे!'(पृ.२३८) असे उदयला वाटले. त्याचे सर्व कझिन्स म्हणजे मॅनरलेस डर्टी रॅटस! त्याला वाटले. आजोबांनी घेतलेला गालाचा मुका त्याला आवडला नव्हता. खिशातील रूमाल काढून त्याने गाल पुसून टाकला होता.

उदयसिंह मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजात बी.ए. च्या शेवटच्या वर्गात शिकत होता. तेंव्हाच त्याने या देशात मला राहायचे नाही असा निर्णय घेतला होता त्याने त्याच्या आईला सांगून

टाकले, ''सी ममा, माय डिसीजन इज फायनल, आय ॲम गोईंग टू मॅरी हर ॲन्ड लीव्ह धिस कंट्री फॉर गुड'' म्हणजे उदयसिंहने रीटा ब्रुकनेर ही त्याच्या कॉलेजात शिकणारी, ॲग्लो इंडियन मुलगी हिच्याशी लग्न करण्याचा निर्णय सांगतो.

**भुजाडीमामा :**

भुजाडीमामांचे गाव ढवळगाव होते. ते एक सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचा जनसंपर्क चांगला होता. नामदेवराव भुजाडी उर्फ भुजाडीमामा जिल्हा लोकल बोर्डचे ते मेंबर होते. पन्नाशी पेक्षा जास्त वय असणारे, अंगकाठी दणकट, आडवातिडवा देह, प्रथमदर्शनी बावळट व भाबडा दिसणारी व्यक्ती होती. बोलायला लागल्यावर वरील दोन लावलेली विशेषणे खोटी होतात. त्यांच्या बोलण्याची शैली अघळपघळ होती. देशी भाषा, जबरदस्त आत्मविश्वास त्यामुळे जे बोलतात ते खरे आहे की खोटे हे तो फक्त परमेश्वरचं ठरवू शकेन. बेचाळीसच्या आंदोलनात आपणही बरेच कार्य केले होते. प्रसंगी तुरूंगवासही भोगला होता असे भुजाडीमामाचे स्वतः विषयीचे मत ते वारंवार सर्वांना ऐकवीत होते. बापूसाहेबांसारख्या व्यक्तींनी राजकारण करावे असे भुजाडीमामाचे मत होते.

भुजाडीमामा बोलायला अघळपघळ होते. पण मामा मुत्सदी होते त्यांच्या मनात काय आहे याचा सहजासहजी थांग लागत नसे. बापुसाहेब जाधव निवडणुकीला उभे राहण्याच्या तयारीत आहेत का? हे पाहण्यासाठी किंवा त्याचा अंदाज घेण्यासाठी भुजाडीमामांनी त्यांची भेट घेतली. महाराष्ट्र सरकारने स्वातंत्र्यसैनिकांना सन्मानपत्रे दिली होती. मानधन सुरू केले होते. दोनवर्षांआधीच ही योजना कार्यान्वित झाली होती. भुजाडीमामा स्वातंत्र्यसैनिक होते ही गोष्ट तालुक्यात जगजाहीर होती. भुजाडीमामांना मात्र हे सन्मानपत्र प्राप्त झाले नव्हते. त्यामुळे लोक थट्टेने त्याविषयी भुजाडीमामांना विचारायचे अर्थात त्यांच्यावर स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतल्याची नोंद नव्हती. नोंद होती ती चोरी, दरोडेखोरी, लुटालुट.

पहिल्या पंचायती राज्यात सभापती पदासाठी शंकरनाना दरंदले यांच्याविरुद्ध तीन मतांनी ते हरले. खरे तर त्यांची राजकीय क्षेत्रात पिछेहाट होत चाचली होती. बापूसाहेबांचा आधार त्यांना होता.(पृ.४४५) बापूसाहेबांनी अखेरीस त्यांना स्वातंत्र्यसैनिक असल्याचं सन्मानपत्र मिळवून दिले.

**दौलतराव शिंदे :**

दौलतराव शिंदे हे तालुक्याचे आमदार होते. तालुक्याचे आमदार एकदा निवडून आल्यानंतर मुंबईला गेले ते पुन्हा तालुक्यात आलेच नाहीत. पुन्हा इलेक्शनची वेळ आली तेव्हा त्यांना स्थानिक

कार्यकर्त्यांची आठवण झाली. एका साखर कारखान्याच्या क्षमतेपेक्षा जास्त ऊसाचे पीक परिसरात निघत होते. त्यासाठी नवीन कारखाना काढण्याची आवश्यकता होती. आमदार दौलतराव शिंदे यांनी या कामात वास्तविक पुढाकार घ्यायला हवा होता. परंतु भोईटे पाटलांनी नवीन कारखान्याच्या संदर्भात सर्व कागदपत्रांची पूर्तता करुन कारखान्याची नोंदणी करवून आणली. एकदा आमदार झाल्यानंतर पुन्हा निवडणुकीला उभे राहायचे ठरविल्यानंतर बुवासाहेब जाधवांसारख्या की ज्यांना त्या परिसरात मान मराबत होता, तसेच भुजाडीमामांचा आपणास पाठींबा मिळावा कारण मामाही मुत्सद्दी राजकारणी होते म्हणून भेटीसाठी, चर्चांचे तंत्र त्यांनी वापरले.

१९५७ च्या निवडणुकीत त्यांना नाना सिरूर सारख्या प्रतिस्पर्ध्यांला सामोरे जावे लागणार म्हणून दौलतरावांच्या पायाखालची माती सरकली होती. ते धास्तावलेले होते. त्यांनी प्रतिस्पर्धी पक्षात नानांऐवजी कॉम्रेड दशरथ पवार याला तिकीट मिळावे यासाठी भरपूर पैसा खर्च केला आणि असा डाव खेळला की पक्षाने नानांना तिकीट न देता कॉम्रेड पवार यांना दिले. नानांना तिकीट नाही म्हटल्यावर आपणच विजयी होणार हा आत्मविश्वास दौलतरावांना वाटणे साहजिकचं होते आणि म्हणूनच भुजाडीमामा दौलतरावांना म्हणाले, ''इलेक्शनचा निकाल आजच लागला म्हणा तुम्ही!''(पृ.२४३) निवडणुकीच्या प्रचार कार्यात बापूसाहेब देशमुखांची मदत मिळविण्यासाठी आमदारसाहेब बापूसाहेबांच्या घरी गेले. निवडणुकीसाठी भरपूर पैसे खर्च करूनही दौलतराव शिंदेची हार झाली. दोनशे अकरा मतांनी दौलतराव शिंदे पडले.

अशा प्रकारे एकदा निवडून आल्यानंतर आपल्या भागाच्या विकासासाठी कोणतेही कार्य केले नाही आणि पुढच्या पंचवार्षिकला निवडून येण्यासाठी आपल्या विभागात प्रचार दौरे केले. अशा आमदाराला पराभवाला सामोरे जावे लागते म्हणजे अशा नाकर्त्या किंवा कर्तृत्वहीन आमदाराला मतदार जनतेने धडा शिकवला होता.

**बुवासाहेब जाधव :**

बुवासाहेब जाधव हा दगडूजी जाधवांचा थोरला मुलगा. नाना, तुकाराम भोईटे, पांडुरंग तिकोने, गुलबा नाईक, गोविंदभाई तामसरे हे भूमिगत झाले व तुकाराम भोईट्यांच्या ओळखीच्या बुवासाहेब जाधवांच्या मळ्यात राहू लागले. बुवासाहेब जाधवांनी त्यांना आश्रय दिला. बुवासाहेब जाधव यांचे घराणे गावातच नाही तर आसपासच्या गावात, तालुक्याच्या त्या भागात मशहूर होते. त्यांना मानणारे, त्यांच्या मताचा आदर राखणारे लोकही पुष्कळ होते आणि म्हणूनच दौलतराव शिंदे आमदार बुवासाहेबांच्या संपर्कात राहत. 'ज्याला मतपेटीचे राजकारण करायचे त्याला अशा

बँका सांभाळाव्याच लागतात.'(पृ.१६४) बुवासाहेब जाधवांनी त्यांच्या मुलीचा विवाह मोठ्या थाटात लावून दिला. तालुक्यातील बहुसंख्य मान्यवरांची मंडळी लग्नाला उपस्थिती होती. 'असे लग्न आधी झाले नाही वा पुढे ही कधी होणार नाही अशी कैकांनी संतोषपूर्वक ढेकर देत पावती दिली.'(पृ.३४५) आमदारकीची निवडणूक लढविण्यासाठी बुवासाहेबांना तिकीट पाहिजे होते पण ती उमेदवारी बापूसाहेब देशमुखांना मिळाली त्यामुळे ते दुखावले गेले होते. 'आपल्यावर अन्याय झाला आहे असे बुवासाहेबांना प्रामाणिकपणे वाटत होते. आपल्यासारख्या जुन्या आणि प्रामाणिक कार्यकर्त्याची बूज राखली गेलेली नाहीय.'(पृ.३९२) असे त्यांना वाटत होते. दिवसेंदिवस बुवासाहेबांची परिस्थिती खालावत चालली होती. पुण्याला गेलेल्या त्यांच्या भावांनी स्वकर्तृत्वावर प्रपंच वाढवला होता. ते स्वतःचा हिस्सा म्हणजे वाटणी मागू लागले. गावच्यांनी वाटणी मागितली. बुवासाहेबांनी वाटणी करून दिली. बुवासाहेबांची मुले मात्र कष्टाळू निघाली नाहीत. बुवासाहेबांचे घर म्हणजे बडा घर पोकळ वासा असे झाले होते.(पृ.४५६,४५७) 'राजकारण संपले घर फाकळले सारीच रया गेली.'(पृ.४५८)

बुवासाहेबांच्या जीवनात एक प्रसंग असा घडला की त्यामुळे त्यांना आयुष्यातून उठण्याची वेळ आली. एकदा बुवासाहेब सरकारी विश्रामगृहात आले. आंघोळ करून कपडे बदलून गादीवर झोपले. अचानक नग्न अवस्थेत एक स्त्री त्यांच्या पलंगावर येऊन बसली आणि त्याचवेळी दाराची कडी वाजली, त्या स्त्रीला त्यांनी आत जाण्यास खुणावले पण ती हालली नाही. दारावरची कडी जोरात वाजू लागली नाईलाजाने त्यांनी दार उघडले. दारात उभ्या असलेल्या इंदिराराजेंनी जोरात दार ढकलून आत पाहिले ते दृष्य पाहून त्या निघून गेल्या. त्यावेळी त्या नग्न बाईला बुवासाहेब म्हणाले, ''जा बाई आता. झालं ना तुपल काम!''(पृ.४६०) बुवासाहेबांना राजकारणातून पूर्णपणे उठविण्यासाठी इंदिराराजे यांनी हा डाव टाकला होता. बुवासाहेबांच्या निष्कलंक चारित्र्याला डाग लागला होता. मनातून ते खच्ची झाले होते. दादासाहेबांनी बुवासाहेबांविषयी आपल मत व्यक्त केले. ''जुन्या पठडीत वाढले. तिथचं राहिले, सरळ भोळा भला माणूस. छक्के पंजे माहीत नाहीत मिनिस्टर साहेबांच्या लोकांनी धक्का दिला. त्यात बिचाऱ्याचं मनचं उडून गेलं आणि घरातलं सारं वैभवही गेलं. भाऊ वेगळे. सगळा गाडाच खचल्यासारखा झालां.''(पृ.४७७) एकेकाळी ज्यांच्या घरी लक्ष्मी नांदत होती त्या बुवासाहेबांवर वाण्याचे बील थकविण्याची वेळ आली. दादासाहेबांनी समारंभ पूर्वक एकावण्ण हजारांची थैली प्रदान केल्यामुळे बुवासाहेब जाधवांच सुपाएवढं हृदय भरून आलं.(पृ.५६४)

**नारायण सोनवणे :**

नारायण सोनवणेचं मूळ गाव पाडळी होते. तो बडोद्याला शिकायला होता. पांडुरंग तिकोनेचा बाल मित्र. सडपातळ, काटक शरीर यष्टी, काळसर खडकाळ वर्ण, अंगात चिवटपणा. बडोद्यापासून उपाशीतापाशी बेचाळीसच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी नारायण सोनवणे आला होता. पांडुरंग, नाना व त्यांचे सहकारी यांच्याबरोबर नारायणलाही अटक झाली. तुरूंगातून सुटल्यावर गावी गेला तर त्याचे वडील वारल्याचे त्याला कळले. तिथून तो मुंबईला गेला. ओळखीच्या एक जणाबरोबर गोदीवर कामाला गेला. तिथे बोटींनी जगभर हिंडता येते. बोटीवर त्या मंडळींच्या हाताखाली काम करायचं. एक जणाने त्याला मेक्सिकोत नेले. तेथे जंगलात लाकुडतोडी म्हणून काम केले. तेथे कंटाळला, मग एका मित्राने अमेरिकेला जायचे ठरविले होते. नारायणही त्याच्याबरोबर जमवलेले सर्व पैसे खर्चून अमेरिकेला गेला. तिथे डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये स्वीपरचे काम करणे सुरू केले. तिथे त्याची मॅर्गाशी ओळख झाली. ती मेक्सिकन इंडियन होती. त्या दोघांनी लग्न केले आणि गारमेंटसचं एक बारकं स्टोअर काढलं. रीयल इस्टेटमध्ये पैसा गुंतवला. खूप पैसे कमविले. ऑफिसमध्ये बसून फक्त सुपरव्हिजन करतो. त्याला आर्थर नावाचा मुलगा होता. ही सर्व माहिती नारायण सोनवणेने नानांना पत्राद्वारे कळविली.

डॉ.बांदिवडेकर नारायण सोनवणेविषयी म्हणतात, ''एके काळी नानांबरोबर क्रांतिकार्यात भाग घेतलेल्या पण नंतर परदेशी स्थायिक झालेल्या नारायण सोनवणे यांचाही एक रोचक इतिहास पत्र रूपाने आला आहे.''[२३] नारायण सोनवणेची झालेली वाताहत व त्यातून तो खंबीरपणे पुन्हा उभा राहिला, अशा आमच्या वेगळ्या व्यक्तिमत्त्वाचा संघर्षमय प्रवास लेखक मांडतो.

**गुलबा नाईक :**

गुलबा नाईक भक्कम तब्बेतीचा, अंगात हत्तीचं बळ असलेला, पूर्वाश्रमीचा दगड्या भिल्लाच्या टोळीतील दरोडेखोर होता. गुलबा नाईकाचा वर्ण काळाभोर, खडकाळी, राकट होता. एखाद्या काळ्या आफ्रिकन मुष्टीयोद्धा सारखी त्याची अंगयष्टी होती. रानातल्या चित्त्यासारखी त्यांची नजर होती. नानांनी त्याला एका सावकाराच्या सुनेवर रेप केला या खोट्या आरोपातून वाचवल्यामुळे नानांवर त्याची जबर निष्ठा निर्माण झाली. नानांचा तो एकनिष्ठ सहकारी व त्यांचा पहिला अनुयायी होता. नानांवरील निष्ठेमुळे तो नानांच्या सेवादलात सामील झाला. नाईक, दगड्याभिल्ल आणि त्यांचे सहकारी यांनी मिळून सरकारी खजिना लुटला पण लूट स्वराज्याच्या कामाला दिली. अर्थात सरकारी खजिना लुटण्यापूर्वी त्यांनी नानाची परवानगी घेतली नव्हती. पण

स्वराज्याच्या कामात आपली मदत व्हावी या हेतूने त्यांनी ही लूट केली होती. गुलबा नाईकाच्या दृष्टीने नाना म्हणजे राम आणि तो स्वतःला रामभक्त हनुमान समजत होता. 'चळवळ आंदोलन म्हणजे नाना म्हणेल ते करायचे असा सुलभ अर्थ त्याला माहीत होता.'(पृ.४)

पोलीस कचेरी ताब्यात घेण्याच्या दुसऱ्या लढ्यात नाईक पोलिसांच्या हाती लागले म्हणजे पकडले गेले. त्याला तालुक्याच्या ठिकाणी ठेवून घेण्याचे धाडस तिथल्या मंडळींचे नव्हते म्हणून पोलीसगाडी जिल्ह्याला नाईकांना घेऊन निघाली होती. अचानक दगड्या, मारण्या भिल्लांनी पोलिसांच्या गाडीवर हल्ला केला व नाईकांना सोडवले. नाईक वैतागवाडीला गेले. नानांनी आपल्या सर्व सहकार्यांना मदतीचा हात देऊन उभे केले. नाईकांना रिमांड होमचा रखवालदार म्हणून नोकरीला लावले.

नाईकांना आपल्या सहकार्यांबद्दल प्रेम होते. गोविंदभाईंना अर्धांगवात झाला तेव्हा गोविंदभाईंची प्रेमाने तेल मालीश करून दिली होती. तेव्हा नानांच्या मनात आलं, ''आपण गोविंदभाईंना दवाखान्यात नेलं, पैसे खर्च केले, अमुक केलं आणि तमुक, पण स्नेहाची अस्सल ऊब जी नाईक त्यांना देऊ शकतात. ती आपण नाही देऊ शकत!''(पृ.३७३)

**राधाकिसन :**

नाना सिरूर यांच्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील धडाडीचा कार्यकर्ता राधाकिसन हा सरळसोट माणूस पण भडक माथ्याचा होता. शरीराने आडमाप. घरात अठराविश्व दारिद्र्य व खाणारी तोंड जास्त पण तरी सुद्धा दुधदुभत्या विना हुलग्याची शेंगोळी खाऊन पहिलवानकी करणारा असा कुस्तीगीर होता. सुरूवातीच्या काळात भरतीत ब्रिटिशांनी याला सैन्यात भरती केले. तिथे थोडे दिवस राहिल्यानंतर तो सैन्यातून पळून आला. पोलिसांचा ससेमिरा नको म्हणून नानांनी त्याचा एक पाय थोडा बारीक आहे असे पटवून दिले. आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर त्याची मुक्तता झाली. त्यानंतर त्याच्या तालमीतील अनेक मुलांसह तो आंदोलनात सामील झाला.

नानांनी राधाकृष्णाला भूमिगत होताना बरोबर नेले नाही. कारण सेवादलाच्या कामात राधाकिसन सारखा व्यक्ती तेथेच ठेवणे नानांना योग्य वाटले होते. दुसऱ्यांदा पोलिसकचेरी ताब्यात घेण्याच्या वेळी राधाकिसनच्या दंडात गोळी लागली. त्यानंतर राधाकिसनही भूमिगत झाला. तालुक्यापासून दूरच्या गावशिवारातल्या रानात त्याचा पैलवान मित्र होता तेथे राधाकिसन गेला. त्याच्या घरी त्या पैलवानाची आई व पत्नी दोघीच होत्या आणि नेमका त्या ठिकाणी एक गोरा सोल्जर तेथे आला. तो त्या म्हातारीला तुझ्या सुनेचा मला फोटो काढायचा असे म्हणू लागला.

म्हातारीने सुनेला भीत भीत बाहेर पाठविले. फोटो काढण्यासाठी सोल्जरने सुनेच्या हनुवटीला हात लावला त्यासरशी राधाकिसनने सोल्जिराच्या डोक्यात कुऱ्हाडीचे घाव घातले सोल्जिर गतप्राण झाला. मग त्याच्या घोड्यावर स्वार होऊन राधाकिसन पसार झाला.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर किंवा तुरूंगातून सुटल्यानंतर प्रत्येक जण काही ना काही काम धंदा करू लागला होता. तसेच राधाकिसन पेन्टा या खाजगी वीजकंपनीत वायरमन म्हणून काम करू लागला होता. 'त्या कामात त्याचा हातखंडा आणि वेळेला कोणतेही काम करण्याची त्याची तयारी असे.(पृ.१५३) नामवंत पैलवान असलेल्या राधाकिसनने वाढत्या वयामुळे व कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे पैलवानकी बंद केली. 'खेळणे बंद झाले तरी काही वर्षे मुले त्याला आग्रहाने सोबत घेऊन हगाम्यांना जात; व तिथे स्वतःस पैलवान राधाकिसन यांचा पठ्ठा असे म्हणवून घेत.(पृ.१८८) नानासाहेबांच्या निवडणूक प्रचारात पहिलवानांचा पाठिंबा मिळावा म्हणून राधाकिसनने जीवाचे रान केले होते. राधाकिसनने आपल्या उदरनिर्वाहासाठी पीठाची गिरणी सुरू केली होती.

**निस्सार मोमीन :**

निस्सार मोमीन हा पांडुरंग तिकोने गुरूजींचा विद्यार्थी होता. गुरूजींकडून बेचाळीसच्या आंदोलनाच्या रोमांचकारी कथा निस्सारने ऐकल्या होत्या. त्या कथांचे नायक नाना होते. त्यामुळे निस्सार मोमीनच्या मनात नानांविषयी प्रचंड आदर होता. 'मुंडासे वळण्याचा परंपरागत व्यवसाय सोडून एक मोमिनाचा पोरगा आज विधी विद्यालयात शिकत आहे.'(पृ.२१७) याचे श्रेय तो तिकोने गुरूजींना देतो. निस्सार मोमीनचे शिक्षण पुर्ण झाल्यावर नानाकडे येऊन त्याने काम सुरू केले. वर्षभरानंतर नानांनी त्याला स्वतंत्रपणे वकिली करायला सांगितली पण त्याने साफ नकार दिला.

निस्सार व आवडाबाईची मुलगी लीला यांचा आंतरजातीय, आंतरधर्मीय लग्न करण्याचा प्रस्ताव नानांच्या परवानगीने हा विषय नानांसमोर मांडला. मोमीन निस्सार आणि लीला यांच्या विवाहाच्या वेळी नानांनी अनेक कार्यकर्त्यांना बोलावले होते. त्यामध्ये बापूसाहेब देशमुख, प्रा.चिटणीस, कोष्टी पंचायतीचे पुढारी युसुफ बेग व मस्तान पाशा. कॉंम्रेड मोहिते, नगरपालिकेचे अध्यक्ष पडतानी, ॲडव्होकेट मेहता. बहुतांशी व्यक्तिंनी या विवाहासंदर्भात सकारात्मक विचार मांडले.

**गोविंदभाई :**

गोविंदभाई तामसरे विडी कामगारांचे नेते व नानांच्या सेवादलातील निष्ठावान कार्यकर्ते होते. 'धोतर, नेहरू टोपी, असा साधा काहीसा मातकट वेश, थोडे पिवळट डोळे, ओठ काळपट, निळसर होते. विडी ओढण्याची सवय असावी हे जाणवत होते.'(पृ.२३) नानांनी तहसील कचेरी व पोलीसठाणं ताब्यात घेतले तेंव्हा धान्याच्या गोडावूनचा ताबा घेऊन ते व्यवस्थित टाकण्याची जबाबदारी गोविंदभाईंवर सोपवली होती. गोविंदभाई नानांबरोबर भूमिगत झाले होते. त्यांच्या भूमिगत होण्यामुळे घरातल्या कामावर विशेष परिणाम झाला नव्हता. कारण घरचे काम करायचे त्यांनी सोडून दिलेले होते. 'घरचं खाऊन लष्कराच्या भाकऱ्या भाजायचा ठेका घेऊन कैक दिवस लोटलेले.'(पृ.७१)

शस्त्रांनी भरलेली ट्रेन उडवून देण्याचा त्यांचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर तेथून पळून जाताना गोविंदभाईंच्या मांडीत गोळी घुसल्यामुळे त्यांना पळता येईना म्हणून त्यांना झाडाच्या जाळीत लपवून नाना व इतर सहकारी पळाले. गोविंदभाईंना पोलिसांनी पकडले. नाना व त्यांच्या सहकार्यांची माहिती मिळविण्यासाठी गोविंदभाईंना पोलिसांकडून अनेक प्रकारचा जाच होऊ लागला होता. गोविंदभाईंना कितीही त्रास झाला तरी त्यांनी तोंड उघडले नाही. त्यांना तुरूंगातून सोडल्यानंतरही त्यांनी नानांच्या अनेक सत्कृत्यांना हातभार लावला होता. थोड्याच दिवसात पत्नीचे निधन झाले त्यानंतर त्यांनाही अर्धांगवात झाला. तेव्हा नानांनी डॉक्टरकडे नेले. घरी आणल्यावर नाईक तेलमालीश करण्यासाठी गेले होते. बिछान्यावर खिळून झिजत झिजत गोविंदभाईंनी देह ठेवला. नाना निस्सार, गुलाबराव नाईक यांनी गोविंदरावांची शेवटच्या क्षणापर्यंत काळजी घेण्याचा प्रयत्न केला.

**पांडुरंग तिकोने :**

पांडुरंग तिकोने हा नाना सिरूर यांचा स्वातंत्र्य चळवळीतलील एक सहकारी होता. अंगाने किरकोळ काटकुळा होता. जातीने ठाकर किंवा महादेव कोळी नव्हता पण त्याच्या शरीरयष्टीमुळे तो ठाकर आहे असे वाटायचा असे लेखकाचे मत आहे. त्याचा पोषाख म्हणजे अर्धी चड्डी, अर्ध्या बाह्यांचा सदरा, टोपी असा होता. बेलापूरच्या फॅक्टरीत त्याचा मामा एक साधा कामगार होता. पांडुरंग पाचवीपर्यंत तेथे शिकला. पुढच्या शिक्षणासाठी तो तालुक्याला आला आणि बोर्डिंगात राहू लागला. 'नवयुग', 'विविधवृत्त' अशी नियतकालिके त्याच्या वाचण्यात येऊ लागली. नानाची ओळख झाली. ओळखीचे रुपांतर मैत्रीत झाले. नानांच्या स्वातंत्र्य आंदोलनात तो सहभागी झाला. नगर, पुण्याहून आलेल्या पत्रकाच्या तुकाराम आणखी प्रती छापायचा व पांडुरंग तिकोने वर

किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या वैतागवाडीला दगडू पाटील गोडे यांच्याकडे त्या प्रती पोहचविण्याची जबाबदारी नानांनी सोपविलेली होती. पांडुरंग नानांच्या प्रत्येक कार्यात सहभागी होता. चव्वेचाळीस साली जेलमधून सुटल्यानंतर त्याने प्रथम शिक्षकाची नोकरी स्वीकारली. वैयक्तीक आयुष्यात स्थिरस्थावर झाल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील अनेक अडीअडचणी सोडवण्यासाठी तो उभा राहिला. प्राथमिक शिक्षक जिल्हा संघटनेचा नेता असलेले तिकोने गुरूजी यांना बदलत्या काळाशी जुळवून घेता आले नाही. आणि म्हणूनच शिक्षक संघटनेत तो होत्याचा नव्हता झाला होता आणि आता पांडुरंगची बदली जामखेड तालुक्यात झाली होती. तेव्हा दादासाहेबांनी त्याला सुचवले. ''सध्या कारखान्याचं एक कॉन्ट्रॅक्ट आम्हाला द्यायचंय. फेन्सिंगचं कंपाऊंड वॉल घालायचीय ते काम तू घे.''(पृ.३३५) ''नंतर तुला आणखी कामे मिळवून देऊ. सध्या नोकरी करून तू हे काम कर पुढे तुला योग्य वाटल्यास नोकरी सोडून दे.''(पृ.३३६)

पांडुरंग तिकोनेला दादासाहेबांच्या पाठींब्यामुळे कारखान्यात डायरेक्टर हे पद मिळाले. 'चेअरमन साहेबांचे जुने मित्र म्हणून त्यांचा बोर्डात दरारा होता.'(पृ.४६२) साबणाच्या कारखान्याचं प्रपोजल केलं. गोविंदभाईंच्या मृत्यूनंतर पांडुरंग तिकोने गोविंदभाईच्या मुलींसाठी साड्या घेऊन गेले. आपल्यावर केलेल्या उपकाराची फेड करणारा, अनेक स्वातंत्र्य संग्रामातील एक सच्चा कार्यकर्ता व समाजासाठी झटणारा वाटतो.

**गौण पात्र :**

भास्करराव हे नाना सिरूर यांचे वडील. गोदूताई, बाळकृष्ण, श्रीधर, अनंता नाना, प्रभाकर व मुक्ता ही त्यांची मुले. श्रीधर पोलिसात होता आणि नाना स्वातंत्र्य चळवळीत. अनंता पुण्याला मिलिटरी अकौंटसमध्ये, बाळकृष्ण नगरला म्युनिसिपालिटीत अधिकारी होता. नाना वकिली शिकत होता. आदिवासी भागातील व क्रांतीसाठी सज्ज झालेला तसेच दगडू भिल्ल, मारूती भिल्ल गुलाबराव नाईकांचे सहकारी त्यांच्या टोळ्या स्वेच्छेने आंदोलनात सहभागी झाल्या होत्या.

**४.२.१० तणकट :**

**कबीर :**

'तणकट' या कादंबरीचा नायक हा महारवाड्यातील एक कॉलेजमध्ये शिक्षण घेत असलेला तरुण होता. महारवाड्यातून कॉलेजमध्ये शिकणारा तो एकमेव विद्यार्थी होता. त्याच्या कॉलेजमध्ये शिकवत असलेले प्राध्यापक दलित समाजातील विद्यार्थ्यांना हीन वागणूक देतात याचा कबीरला

राग येतो. प्रा.गंजेकर यांनी कबीरने वर्गाच्या दाराला लाथ मारली असे समजून अपमानास्पद बोल ऐकविले ते असे, ''शिक्षणाला एक संस्कृती लागते. ती नसली की असंच होणार. नुस्त्या स्कॉलरशिप, सवलती देऊन शिक्षण पोहचत नाही. त्याला संस्कार असावे लागतात.''(पृ.१५) तेव्हा कबीरने प्रा.गंजेकर यांना उत्तर दिले, ''दारावर लाथ मी मारलेली नाही, यानं मारलेली आहे, याचे आडनाव कुलकर्णी आहे.''(पृ.१६) कबीरचे उत्तर ऐकल्यानंतर प्राध्यापकांची बोलती बंद होते, याचाच अर्थ कॉलेजमध्ये दलित म्हणून मिळणाऱ्या वागणूकीला कबीर सडेतोड उत्तर देतो.

दलित-सवर्ण या वादात दलित पुढारी तापल्या तव्यावर आपल्या पोळ्या भाजून घेतात. हे कबीरच्या वेळोवेळी लक्षात येते, हा मुद्दा तो आपल्या स्वकीयांच्या निदर्शनास आणतो परंतु त्याच्याकडे दलित बांधव लक्ष देत नाहीत. दलित चळवळी, तालुक्यातील राजकारण यापासून कबीर नेहमी अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो. गणू पाटलाचा मुलगा आण्णाप्पाने आपुण्ण्या महाराला मारले त्यावेळी महार समाजाने सवर्णाच्या शेतात मजुरीला जायचे नाही असे ठरविले. पण कबीरने मात्र याला साफ नकार दिला. गाववाल्यांच्या शेतात मजुरीला गेलो नाही तर उपासमारीची वेळ येईल. त्याविषयी कबीरने व्यक्त केलेले मत, ''पण खेड्यातल्या म्हारवाड्यात जगायचं म्हणजे तुमचं हे म्हणनं मला पटत नाही. तिथं हरघडी गावातल्या माणसांच्या दारात जावं लागतंय. रोज उठून एकमेकांची तोंड बघावी लागतात. त्यातच त्येंच्या बांधावर आमचं पोट अवलंबून असतंय. तिथं तुम्ही म्हणता तसा संघर्ष उपयोगी नाही, असं माझं ठाम मत आहे.''(पृ.११५) याचाच अर्थ कबीर आपल्या समाजातील लोकांच्याच विरोधात वागत असल्याचे जाणवते. जेंव्हा बाळासाहेब शेडबाळेकडून त्याचेच आप्तस्वकीय फसविले गेले तेंव्हा मात्र हाच कबीर त्यांच्या मदतीला जातो. महारवाड्यातून शिकून नोकरीनिमित्त ज्यांनी गावाचा, महारवाड्याचा त्याग केला. म्हणजे पुन्हा महारवाड्याचे तोंड पाहिले नाही अशा पैकी गोपाळचा मुलगा मन्या कबीरला महारवाडा सोडण्याचा सल्ला देतो; पण तो कबीरला पटला नाही.

**बाळासाहेब शेडबाळे :**

बाळासाहेब शेडबाळे हा जिल्हा मध्यवर्ती बँकेत नोकरीला होता. आक्काबा राणे याने त्याला नोकरीला लावले होते. त्याच्या नोकरीमुळे त्याला मान होता. गावातील डेअरी, सोसायटी, पतसंस्था यामध्ये त्याला संचालकपद होते. सोसायटीच्या चेअरमन पदासाठी त्याच्यावर जबरदस्ती केली पण आपण पडेल ते काम करू पण चेअरमनपद नको अशी नम्र भूमिका त्याने घेतली त्यामुळे गावातील लोकांना त्याच्या विषयी आदर वाटू लागला. गावातील विविध संस्थांमधील कागदोपत्री

व्यवहार बाळासाहेबच पाहात होता. हे सर्व करत असताना शेती, घर यामध्ये त्याने प्रगती केली. तारा नावाची पत्नी, पाच मुली, एक मुलगा व आई या सर्वांची कौटुंबिक जबाबदारी त्याच्यावर होती.

बाळासाहेब शेडबाळेने संस्थांमधील कागदोपत्री व्यवहार सांभाळून विश्वास संपादन केला व गावच्या डेअरीमध्ये साठ हजारांचा भ्रष्टाचार केला. बंडू पाटील चेअरमन व सेक्रेटरी तुळसीदास मिसाळ यांना या प्रकरणात अडकविले. याचा वचपा काढण्यासाठी बंडू पाटलाने त्रयस्थ व्यक्तीद्वारे त्याला बेदम मारले. त्यावेळी त्याला आक्काबा राणेनी दवाखान्यात नेले. पण शेडबाळे कृतघ्न होता. त्याने केस लावली व त्यात आक्काबा राणेचेही नाव टाकले होते. त्यावेळी डंग्या मारूतीनं शेडबाळे बद्दल व्यक्त केलेले मत अगदी समर्पक होते. ''गेलं का न्हाई बेणं जातीवर. शेवटली कडूचं ते कडूचंच. त्येला काय कळणार, उपकार आनी बिपकार? उफराट्या आवलादीचं! चांगलं हातपाय मोडाय पायचे व्हत म्हणजे कळालं असतं.''(पृ.४३) बाळासाहेब दवाखान्यातून आल्यानंतर मात्र सावधगिरीने राहात होता. त्यानंतर त्याने महारांची ऐकी करून त्यांना गावातील सवर्ण लोकांशी लढण्यास सिद्ध करण्याचे उद्योग सुरू केले. दादबा, भिम्या व गौत्या यांना हाताशी धरून दलित तरूण मंडळ स्थापन केले. गावामध्ये दलितांसाठी पतसंस्था मंजूर केली. बँजो पार्टी स्थापन केली. दलितांच्या घरात लाईटची सोय करून दिली. पण हे करत असताना त्यात भ्रष्टाचारही केला. गौतम कांबळेच्या मदतीने कर्ज मागणीच्या अर्जावर अनेकांच्या फसवून सह्या व अंगठे घेतले व बँकेचे कर्ज घेतले. सर्व पैसे घेऊन पसार झाला. महार वाड्यातील राम्या महाराची बायको सुला हिच्या बरोबर त्याचे अनैतिक संबध होते तो जाताना तिलाही घेऊन गेला.

अशा प्रकारे बाळासाहेब शेडबाळे हा सवर्ण असूनही नेहमी त्याच समाजाच्या विरोधात उभा राहिला. दलित समाजातील लोकांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना विविध सुधारणांची स्वप्न दाखवून त्यांना गंडविणारा महाठक निघाला. सुली महारनी बरोबर त्याचे अनैतिक संबध होते याची उघड चर्चा होत असूनही तो शरमला नाही. सवर्ण आणि महार समाज यांच्यात सतत वाद कसे निर्माण होतील यासाठीच प्रयत्न करणारा विघ्न संतोषी व्यक्ती म्हणजे बाळासाहेब शेडबाळे होता.

**मोहन बल्लाळ :**

कबीरचा मित्र मोहन बल्लाळ हा अतिशय हुशार मुलगा होता. कबीर आणि मोहन या दोघांमध्ये नेहमी तात्वीक चर्चा होत होती. मोहन बल्लाळ सवर्ण जातीतला असूनही तो कबीरचा

चांगला मित्र होता. सत्यपाल धर्मरक्षीने आपल्या व्याख्यानात 'आंबेडकरांचे धर्मांतर' या नियोजित विषयाला सोडून भलतीकडे बोलण्याचा विषय नेला त्यावेळी मोहनने टिका केली. तेव्हा ही आमची बोलणाऱ्यांची पहिलीच पिढी आहे असे समर्थन कबीरने केले. तेव्हा 'पहिल्या पिढीनेच अत्यंत जबाबदारीने बोलल पाहिजे.''(पृ.३७) असे मत मोहन बल्लाळने व्यक्त केले. मोहनच्या मते आपण जग सुधारायचे कॉन्ट्रॅक्ट घेतलेले नाही. आजची परिस्थिती आणि आंबेडकरांच्या कालखंडातली परिस्थिती यामध्ये तफावत आहे. आज आपण आपल्या व्यक्तिगत आयुष्यात ठाम उभारण्याचा प्राणपणाने प्रयत्न करायला हवा. त्याच्या मते ''समाधानानं जगण्यासाठी आपण ज्या वास्तवात जगतो त्या वास्तवाचे सर्व संदर्भ आपल्याजवळ असावेत.''(पृ.२०४) मोहन बल्लाळची हुशारी त्याच्या मेंदूच्या वळ्या तपासाव्यात असे कबीर मस्करीत म्हणतो.

**आप्पुण्या महार :**

आप्पुण्या महार गणू पाटलाच्या शेतात कामाला जात होता. आप्पुण्याची म्हैस शेताभोवती चरता चरता बांधावरच्या गुलब्यात (भरलेल्या शेतात) घुसली म्हणून गणू पाटलाच्या मुलाने आप्पुण्याने त्याच्या म्हशीला बेदम मारले. तेव्हा दलित नेत्यांनी गणू पाटलाच्या मुलावर केस टाकली. पण इतका मार खाल्लेला असला तरी घाबरलेल्या आप्पुण्याला त्याच्या विरोधात केस टाकू नये असेच वाटत होते.(पृ.७३)

**जालिंदर बनसोडे :**

जालिंदर बनसोडेचे मूळ गाव बसर्गा होते. सुरूवातील तालुक्याच्या गावी वकिलाच्या हाताखाली तो स्टॅम्प लिहायचं काम करीत होता. त्यातूनच मग संघटनेत गेला आणि संघटनेच्या माध्यमातून एक कार्यकर्ता म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यातूनच त्याला जणूकाही पैसे कमावण्याचे लायसनच मिळाले. संघटनेच्या नावावर बनसोडे कुणाकडूनही पैसे उकळत होता. त्यात इथं आलेल्या प्रत्येक फौजदार, मामलेदार यांची ओळख करून घेऊन त्यांचा दलाल म्हणून तो प्रसिद्ध झाला. कुणाची कसलीही केस आली की दलाली मारतोच. महार वाड्यातल्या भावाभावाच्या किरकोळ भांडणात त्याने दोघांकडूनही पाच–पाचशे रुपये घेतले. अशा प्रकारे फक्त इतरांना गंडवणे व पैसा कमविणे हाच जालिंदर बनसोडेचा धंदा होता.(पृ.७२) स्वार्थी प्रवृत्तीचा व लोकांकडून पैसे घेऊन गोरगरिब लोकांना फसविणारा तसेच सरकारी कार्यालयांमध्ये ओळख निर्माण करुन बनवाबनवी करणारा लबाड प्रवृत्तीचा दिसतो.

**प्रा. गंजेकर :**

प्राध्यापक श्रीनिवास गंजेकर राज्यशास्त्र शिकविणारे प्राध्यापक होते. सवर्ण समाजातील असल्याने कबीर सारख्या विद्यार्थ्याचा त्यांनी कारण समजून न घेता अपमान केला. त्यावेळी कबीरने त्यांना योग्य उत्तर देऊन त्यांचे दात त्यांच्या घशात घातले होते. प्रा.गंजेकर हे जातीयववादी होते.

**प्राचार्य तवंदीकर :**

कॉलेजातही जातीय राजकारण करणारे ब्राह्मण जातीच्या प्राध्यापकांच्या पाठीशी उभे राहणारे हे प्राचार्य होते. जातीयवादाला खतपाणी घालणारा हा जातीयवादी प्रमुख प्राचार्य सुशिक्षित पिढीतील किडलेल्या मानसिकतेचा लेखकाने उभा केलेला आहे.

**अवचित भालेराव :**

अवचित भालेराव आकर्षक व ऐटबाज राहणीमान असलेले प्राध्यापक होते. ते स्वतः मातंग समाजातील होते पण ते कबीरला आंबेडकरांच्या अर्थशास्त्रीय विषयावर व्याख्यान आयोजीत केले आहे तेव्हा 'तुझ्या समाजातील विद्यार्थ्यांना गोळा करून व्याख्यानाला घेऊन ये' असे सांगतात तेव्हा कबीरला अवचित भालेराव सरांविषयी राग येतो. ते सतत तुझा समाज असा उच्चार करीत.(पृ.२६) अशा प्रकारे प्राध्यापक असूनही समाजात जातीय तेढ निर्माण करणारे शिक्षक कबीरच्या कॉलेजमध्ये होते.

**फणींद्र कांबळेसर :**

फणींद्र कांबळेसर हे आरा तालुक्यातल्या जुनिअर कॉलेजचे शिक्षक होते. प्रथम दर्शनी कबीरला कांबळे सरांचे व्यक्तिमत्व आवडले होते. पण नंतर त्यांचे मतभेद झाले. सवर्ण समाजातील लोक आजही हीन वागणूक देतात आणि म्हणून गावावर बहिष्कार टाकलाच पाहिजे हे फणींद्र सरांचे मत होते पण गावावर बहिष्कार टाकून खेड्यातील लोक पोटाला काय खाणार असे कबीरचे मत अशी मतभिन्नता या दोघांच्या विचारात होती.

**सत्यपाल धर्मरक्षी :**

सत्यपाल धर्मरक्षी हे दलित महासंघातील प्रमुख कार्यकर्ते होते. तसेच ते प्राध्यापकही होते. 'आंबेडकरांचे धर्मांतर' या विषयावर व्याख्यान देण्यासाठी प्रा. अवचित भालेरावांनी त्यांना निमंत्रीत केले पण मुख्य विषयाला सोडून त्यांनी हिंदू धर्मातील ब्राह्मण–मराठे वाणी कसे नालायक आहेत.

दलित पोरांनी त्यांना ठोकले पाहिजे असे विचार व्यक्त केले.(पृ.३७) स्वार्थासाठी मंत्र्यांच्या पायावर लोटांगणं घेणारा हा प्राध्यापक होता.

**दादू हेडी :**

दादबा महार बाळासाहेब शेडबाळेचा मित्र बनला होता. यल्लप्पा दावणे मांगाने त्याला जनावरांच्या धंद्याला बाजारात न्यायला सुरूवात केली पण दादबाचा मूळ फसवणुकीचा स्वभाव वारंवार उफाळून येत होता. भीमा महाराने मध्यस्थी करून दादू महाराला दोन म्हशी घेऊन दिल्या पण त्याने यल्लाप्पा दावणेला बऱ्याचदा वायदा करून ही पैसे देत नव्हता यामुळे यल्लाप्पाने सरळ त्याच्या घरी जाऊन म्हशी सोडून आणल्या.

**पितांबर जगदाळे :**

पितांबर जगदाळे हा कबीरचा मित्र होता. कबीरच्या गावातलाच व कॉलेजमध्ये ही कबीरच्याच होता. पण तो कॉमर्सला होता. कॉलेजला सायकलवर येऊन जाऊन करायचा. रस्त्यात कबीर दिसला तर त्यालाही डबलशीट घेऊन यायचा.(पृ.१७) पितांबर जगदाळेचे घराणे मालदार होते. त्यामुळे घरातल्या पोरांच आयुष्य मजेचं होत याचा कबीरला नेहमी हेवा वाटत होता. कबीर म्हणाला, ''तुझ्यासारख्या जगदाळ्याच्या न्हाई तर पाटलाच्या घरात जन्माला यावं बघ कशाची फिकीर नाही. सगळी चैनच चैन. हे काय आमचं त्येच्या आयलाऽऽ रोज नवीनच गारबांड पाठीमागनं.''(पृ.६३) पितांबर हा कबीर व त्यांच्या समाजाला मिळणाऱ्या सवलतीवरून नेहमी चेष्टा करीत होता. त्यावेळी कबीर दुखावला गेला. मिळणाऱ्या सवलतीवर म्हणजे स्कॉलरशीपच्या पैशावर मजा करणारी किती तरी मुले त्यांच्या समाजात आहेत हे सत्य त्याने कबीरा समोर व्यक्त केले. गौत्या पिक्चर बघतो, राजा कांबळे दिवसाला दहा रूपयाची सिग्रेट ओढतो. पण ते असे का वागतात? याला कारण ते मनातला उद्रेक लपवायला यामार्गाने पळवाटा काढतात, असे कबीरला वाटते.

**थळू आजा :**

गावातील चावडीवर गेली चाळीस वर्ष तराळाचे काम करणारा थळू आजा. गावातील गावकरी व महार यांच्यात सलोखा असावा, असे थळू आजाला वाटायचे. एकमेकांमध्ये सामंजस्याची भावना निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून लेखकाने थळू आजा साकार केला आहे. गावगाड्यातील जातीच्या उतरंडीमधील एकमेकांना सलोख्याने रहावे लागते.

**आक्काबा राणे :**

आक्काबा राणे म्हणजे गावातला इनामदार माणूस होता. पन्नास बिग्यांचे उत्पन्न असलेला श्रीमंत व्यक्ती होता. तालुक्याचे आमदार महिपतराव सरनोबत त्यांचा जवळचा नातेवाईक होता. गावात कोणत्याही पदावर नसलेली ही व्यक्ती, पण गावात त्यांच्या शब्दाला मान होता, कारण ते नेहमी सत्याच्याच बाजूने होते. भावकीतही त्यांना मान होता. लोकांना त्यांच्या बद्दल आदरयुक्त भीती होती.(पृ.१३) महारांनी वेळोवेळी टाकलेल्या केस वर आक्काबा राणेनी शांतपणे तोडगा काढला. सवर्ण व महार यांच्यातील वाद मिटविण्याचा प्रयत्न केला. 'म्हातारा सत्तरी गाठला तरी अजून कणखर आणि पिळदार दिसत होता. चेहऱ्यावर तकतकी. डोळ्यात निर्मळपणा.'(पृ.१५९) असे व्यक्तिमत्व आक्काबा राणेचे होते. आक्काबा राणे महारांशी वितंडवाद होऊनही जेव्हा बाळासाहेबाने महारांना फसविले तेव्हा त्यांच्या मदतीला धावून जाणारा सच्चा माणूस होता. समाजात सामंजस्य निर्माण करणारे व्यक्तिमत्त्व लेखक रेखाटतो.

**सदोबा महार :**

कादंबरीचे नायक कबीरचे वडील म्हणजे सदोबा. आपल्या मुलाने म्हणजे कबीरने आपले शिक्षण पूर्ण करावे अशी सदोबांची इच्छा होती आणि म्हणूनच शाळा बुडवून कबीरने मजुरीला जाण्याला सदोबाचा तीव्र विरोध होता.(पृ.११) सदोबा महार हा तसा कुणाच्या अध्यात मध्यात नव्हता पण त्याला कोणी विनाकारण त्रास दिला तर मात्र तो गप्प बसणाऱ्यातला नव्हता. गौत्या, शेडबाळे, डेप्युटी गोपाळा, दादबा कबीरच्या घरी भांडायला आले त्यावेळी सदोबा महार म्हणाला, ''डेप्युटीऽऽ ह्या दादयाला सांग. पुना जर माज्या पोराच्या नादाला कोण लागल तर ह्यो सद्या म्हार काय करंल आनी काय न्हाई, हे सांगाय येणार न्हाई. तुला म्हाईती हाय म्हणून सावध करून ठेवतो.''(पृ.१४६) सत्या मांगाच्या बरोबरीने कुऱ्हाड हातावर टाकून रानात सदोबा फिरत होता. या घटनेची आठवण होऊन भांडायला आलेले सगळेच घाबरले व आल्या पावली मागे फिरले. यावरून वरकरणी शांत वाटणारा सदोबा अतिशय रागीट होता.

**गौत्या :**

गौत्या दहावी नापास झाल्यामुळे पुढचे शिक्षण बंद करून आई-वडिलांच्या जीवावर फक्त रूबाबात राहात होता. गौतम कांबळे आणि कबीर यांच्यात नेहमी वैचारिक मतभेद होत होते. गौत्या हा नेहमी सर्वांवर दादागिरी करत होता. बाळासाहेब शेंडबाळेच्या संगतीत आल्यामुळे,

सवर्ण लोकांशी वाद घालणे, भांडण तंटा करणे हे उद्योग तो करीत होता. गौतम कांबळे सारख्या उसळत्या रक्ताच्या मुलाला हाताशी धरुन शेडबाळेने महार लोकांना फसविण्याचे अनेक प्रताप केले पण गौतम कांबळेला शेडबाळेचे खरे रूप अगदी शेवटी झालेल्या फसवणुकीमुळे कळून आले.

**रामा महार :**

रामा महार चांगल्या वाद्यागत गडी, बसल्या ताटावर सात–आठ भाकरी खाल्ल्याशिवाय न उठणारा. महारवाड्यात त्याच्या सारखा खाणारा आणि कामाला उभा राहणारा कोणी उरला नव्हता. तो नुसत्या मुंडाशा व रस्त्यातून चालला की काळाकुट्ट, बलदंड दगड चालल्याचा भास व्हायचा. पण अलीकडे मात्र त्याची अन्नावरची वासना उडाली होती. कारण बाळा शेडबाळेच्या फेऱ्या त्याच्या घराकडे वाढल्या होत्या. या साऱ्यात तो स्वतःलाही जबाबदार धरत होता. रामानेच सुलीला शेडबाळे कडून दोन मण भात उसण आणायला लावले होते. त्याच्याकडून पैशाची उचलपण घेतली होती. त्यात हळूहळू सुली अडकत गेली आणि मग सुलीच्या आणि रामाच्या हातात काहीही राहिलं नाही. अशा प्रकारे पहाडासारखा बलदंड देहाचा माणूस पण बायकोच्या अनैतिक वागण्याला बंद करू न शकलेला असहाय पती म्हणजे रामा महार होय. आपल्या पत्नीच्या वाईट वर्तणुकीमुळे रामा महार खचून गेला होता. परिस्थितीमुळे त्याच्यावर ही परिस्थिती आलेली होती.

**यल्लाप्पा दावणे :**

यल्लाप्पा हा मांगवाड्यातला जुना हेडी. वयाची पन्नाशी ओलांडली होती पण चाळीशीत असल्यासारखा दिसत होता. चार तालुक्यातले बाजार हिंडण्यात त्याचा आठवडा जात होता. बाजारात फिरता फिरता आप्पाण्णा हेड्या बरोबर त्याची ओळख झाली. त्याने जनावरांच्या बाजाराचा नाद लावला. गावातले सोबतीला कोणीतरी असावं म्हणून दादबा महाराला या धंद्याचा नाद लावला पण दादू महार फसवेगीरी करू लागला म्हणून भीमा महाराला बरोबर घेऊन जाऊ लागला, भीमा महार भाबडा होता. पुढे भीमा महाराच्या सांगण्यावरून दादू महाराला यल्लाप्पाने दोन म्हशी दिल्या. पण दादबाने त्याला पैसे द्यायला. आज देतो उद्या देतो. असे म्हणायला सुरूवात केली. तेव्हा यल्लाप्पाने त्याच्या घरी जाऊन म्हैशी सोडून आणल्या.(पृ.२९,५८,५९) महारवाड्यात बँजो पार्टी निघाली म्हणून यल्लाप्पाने मांगोड्यात आठदहा पोरांना एकत्र करून झांज पथक तयार केलं.(पृ.१४२) यल्लाप्पा दावणे हा बेडर आणि समाजासाठी झटणारा होता.

### ४.२.११ डांगोरा एका नगरीचा :

**हरिभट ग्रामोपाध्ये :**

हरिभट ग्रामोपाध्ये हे साईखेडातले एक सदाफिरस्ते चळवळी पुरूष म्हणून प्रख्यात होते. त्यांचं पाऊल सदा भिरभिरतं असे. जिथं जिथं गांधीच्या चळवळीचा प्रवाह वाहू लागे तिथं हरिभट हजर होत. सहभागी होऊन परत येत. १९२४ च्या जानेवारीत गांधींवर कर्नल मॅडॉक पुण्यात ससूनमध्ये शस्त्रक्रिया करत होते, त्यावेळी हरिभट झाडाखाली ससूनच्या आवारात सचिंत होऊन बसले होते. शस्त्रक्रिया करतेवेळी अचानक वीज गेली तेंव्हा दिव्यांच्या उजेडात कर्नलने शस्त्रक्रिया यशस्वी केली होती. गांधींचा जीव वाचवला होता. हे सारे रसभरीत वर्णन साईखेडकर कित्येक महिने हरिभटांच्या तोंडून ऐकत होते. इस्पितळात ठेवले असतांना गांधी ब्रिटिशांचे एक कैदी म्हणून खोलीभर, बाहेर पहारा होता. पहारेकऱ्यांचा डोळा चुकवून एके दिवशी आत जाऊन गांधींना आपण नमस्कार करुन आलो, पडल्या पडल्या त्यांनी हसून बघितलं, हे हरिभट हरखून सांगत होते.(पृ.१५८) गांधीचा विचार, गांधीवरील प्रचंड श्रद्धा हरिभट ग्रामोपाध्ये यांच्यामध्ये होती. हरिभट म्हणजे राष्ट्रप्रेम आणि राष्ट्रभक्ती यांनी प्रेरित झालेले वेगळे व्यक्तिमत्त्व होते

**दौलतराव :**

दौलतराव गावरान वृत्तीचा होता. शिक्षणाचे त्याला वावडं होतं अन् घरच्या संस्कारातली लहानपणापासूनची चणचण त्याच्या अशी अंगवळणी पडली होती की, आपण नुसते धष्टपुष्ट आणि खुशालचंद होत गेलो याचा चटका कधीच बसला नाही. सुबत्ता आणि सत्तेमुळे तो मुळात दुष्ट नसूनही वाकड्या वाटेकडे झुकला होता. दौलतरावाला बऱ्यावाईटाचा विवेक नव्हता, त्यामुळे आपले आचार–विचार भ्रष्ट झाले आहेत याची दखल त्याच्यापाशी नव्हती.

**नानचंद शहा :**

नानचंद शहा हे गावातले एक धनिक श्रेष्ठी होते. त्यांना झालेला आनंद त्यांनी देसायांच्या घोड्याचं पूजन करुन व्यक्त केला होता. त्याच्या पाठीवर एक लाल–पिवळी रेशमी, झूल त्यांनी घातली होती.(पृ.१५८) नानचंद बरकतदार आणि नेक व्यापारी होते. वकिलीचा अभ्यास पुरा करुनही वडिलांना मरतेसमयी वचन दिल्याप्रमाणे सावकारी पेढी आणि व्यापार यात लक्ष घालून होते. शब्दाला सच्चा अन् उदार मनाचा धनिक म्हणून त्याचा लौकिक होता. त्यांनी कधी कोणा

अधिकाऱ्याला लाच म्हणून कधी पैसा दिला नव्हता. कुणाची खुशामत केली नाही. गोरगरिबांना नाडलं तर नव्हतेच; वेळप्रसंगी मदत करत होते.

**अरविंद :**

अरविंद शेलाट्या काठीचा, गोरटेला मुलगा होता. मुलखावेगळं नव्हे पण ठसठशीत आणि तरतरीत असं त्याचं रुप होतं. कुणाच्याही डोळ्यात भराव असं. दाट काळे केस, तसेच काळे डोळे, आजारानं तो थोडा दुबळा पिकुटला झाला होता. पण त्याच्या डोळ्यात चमकपाणी होतं आणि जिवणीत एक सौम्य हसरी लकेर होती. उजळ वर्णाचा, दरदरीत नाकाचा सुंदर जिवणीचा हा तरुण मुलगा होता.(पृ.४०६)

**सखाराम :**

सखाराम सगळ्यांचा मैतर होता. राजवाड्याच्या रखवालीचा प्रमुख म्हणून शिपाईदलात त्याला प्रतिष्ठा होती. त्याच्यापाशी जावं, कशापायी रडतोस म्हणून विचारावं, इतकं धैर्य हवालदाराला नव्हतं. त्याच्यावर लक्ष ठेवायचं अन् जेल पोलिसाच्या ताब्यात द्यायचं एवढचं त्याचं काम हातं.(पृ.४४५) हवालदाराला ही सखारामविषयी प्रेम वाटत होते.

**बखले :**

बखले हुशार, सभाशास्त्र जाणणारे, न्याय कोणता नव्हे हे पक्कं ओळखणारे, तरी पुष्कळदा त्याचंच दान करण्यात शहाणपण असतं, ही खूणगाठ बाळगणारे होते.

**माधवराव देसाई :**

माधवराव देसाईंना संस्थानचे रयत कल्याण-अधिकारी या नव्यानं निर्माण केलेल्या पदावर राजांनी प्रतिष्ठीत केले होते.

**४.२.१२. बारोमास :**

**एकनाथ :**

'बारोमास' ही कादंबरी शेतकरी कुटुंबातील प्रतिकूल परिस्थितीत एम.ए (प्रथम श्रेणी) बी.एड शिक्षण घेऊन नोकरीपासून वंचित राहिलेल्या एकनाथची करूण कहाणी आहे. आईवडिलांनी स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन दोन्ही मुलांना शिकविले. पण डोनेशन भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे हुशार, होतकरू, कवी वृत्तीच्या एकनाथला नोकरी मिळाली नाही. मनाने खचलेला

एकनाथ शेवटी शिक्षण कनवटीला बांधून कोणतीही लाज न बाळगता, शेती या आपल्या पारंपरिक व्यवसायाकडे मोठ्या उमेदिने वळला.

अलका सारख्या सुशिक्षित, मोहाडीतल्या शहरी वातावरणात वाढलेल्या मुलीशी, एकनाथचा विवाह झाला. मुलगा शिकलेला आहे. आज ना उद्या जावयाला नोकरी मिळेल या अपेक्षेने अलकाच्या इंजिनियर असलेल्या वडिलांनी अलकाचा विवाह एकनाथशी लावून दिला होता. पण शेवटी या नववधूच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला होता. आपण अलकाला सुखात ठेवू शकत नाही. याची एकनाथला नेहमी खंत वाटते. तेव्हा वारंवार रागाने अलका माहेरी जाते याचा एकनाथला राग येत नाही 'माहेरात तिला सुख मिळते. मिळवू द्या'(पृ.६९) असे एकनाथला वाटते. नोकरी मिळाल्यावर प्रत्येक पगारात आपण आपल्या आईला नवी साडी घेऊ असा आईला त्याने शब्द दिलेला होता. जेव्हा आई तिच्या फाटक्या साड्यांचे गाठोडे काढून दोन साड्यांचा चांगला भाग जोडून एक साडी करते तेव्हा एकनाथला स्वतःचा राग आला.

आपण आपल्या बायकोला सुखी ठेवू शकत नाही व आई वडिलांना ही सुखी करू शकलो नाही या गोष्टीची एकनाथला सतत बोचणी लागली होती. लहानभाऊ मधू त्याच्याशी नेहमी उर्मटपणे वागतो. अलका व शेवंतामाय यांचे सततचे शाब्दिक वाद, अलकाचे सतत माहेरी जाणे, ती ही आपल्या पतीला समजून घेत नाही. संकटसमयी तिची साथ त्याला मिळाली नाही. एकाकी एकटे खऱ्या अर्थाने आपण एकनाथ आहोत असे त्याला वाटते. 'सबका मालिक एक-नाथ'(पृ.२५८) यावरून असे वाटते की एकनाथचे कौटुंबिक जीवन वैफल्यग्रस्त होते. अलका माहेरी निघून गेली तरी एकनाथला तिचा राग येत नाही. एकनाथ तनपुरेच्या व्यक्तिरेखेबद्दल प्रा. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''एका बाजूला काव्याची आवड आणि काव्य लिहिण्याची ताकदही, तर दुसऱ्या बाजूला सर्वस्वी अभावग्रस्त धगधगीत वास्तव यांतली मानसिक तडफड ताकदीनं व्यक्त केलेली आहे. या मानसिकतेत ममता वारेसारख्या 'मोहतुंबी' शिक्षिकेचं फडफडणारं मनपाखरू एकनाथच्या भीषण वास्तवतेला अधिक गडद करतं. माझं करीयर आता मी निवडणार आहे असं सांगून माहेरी जाणारी अलका चूक करते आहे, असं वाचकाला वाटत नाही. एकनाथबद्दल प्रचंड सहानुभूती असतानाही तसं वाटत नाही. एवढंच नव्हे तर एकूण परिस्थितीत अलकाचं वागणं, स्वतःला दुःख देणारं असलं तरी चुकीचं आहे, असे एकनाथलाही वाटत नाही. एकनाथचं मन इतक मोठं आहे, की एकनाथबद्दल त्याला शेवटपर्यंत सहानुभूतीच वाटते. एकनाथ ज्या सहानुभूतिशील दृष्टीने अलकाच्या मनाचा वारंवार विचार करतो ती एकनाथच्या म्हणजेच

लेखकाच्या परिपक्वतेची खूण आहे.''[२४] अलका मोहाडी सारख्या शहरीवातावरणात आणि सुखवस्तू कुटुंबात वाढलेली मुलगी लग्नानंतर साजोळ सारख्या खेड्यात अठराविश्व दारिद्र्य असलेल्या कुटुंबात दिवस काढते याचे एकनाथलाही वाईट वाटत होते पण तो सहानुभूती देण्यापलिकडे काहीच करू शकत नव्हता.

शेती करताना त्याला अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागत होते. शेतीला लावलेला उत्पादन खर्च ही वसूल होत नाही त्यामुळे पुढील पिकासाठी कर्ज काढावे लागते व ते कर्ज फेडण्या इतके उत्पन्न ही शेतीतून मिळत नाही. अशा प्रकारे एकनाथ सतत कर्जाच्या दृष्टचक्रात अडकला गेला. अशाप्रकारे बारोमास कादंबरीच्या माध्यमातून लेखकांने एकनाथ या नायकाचे 'सुशिक्षित तरूणांची व्यथा आणि अस्मानी सुलतानी गर्तेत सापडलेला शेतकरी अशा दुहेरी भूमिकेतून एकनाथचा जीवनपट चित्रित केलेला आहे.'[२५] कापसाच्या भावासाठी शेतकरी संघटनेने केलेल्या आंदोलनात एकनाथ सहभागी झाला. सांजोळच्या बसस्टँडवर चक्का जाम केलं होतं. एका एस.टी. कंडक्टरने स्वतःच एस.टी.च्या टायर खाली जाळ लावला पण आळ शेतकऱ्यावर आला त्यावेळी पोलिसांनी केसेस केल्या आणि त्यामुळे एकनाथ कोर्टाच्या फाशात अडकला. तेजराव खपखेच्या भाषणांनी प्रभावित होऊन एकनाथ शेतकऱ्याच्या संघटनेचा सक्रिय कार्यकर्ता झाला. व्यापारी, सरकार व नोकरशाही यांच्या गुलामीतून शेतकऱ्याला मुक्त करण्यासाठी एकनाथनेही लढा दिला.(पृ.१३४) 'एकनाथ समस्याग्रत शेतकऱ्यांचा व बेरोजगारांचा एक प्रतिनिधी ठरतो'[२६] एकनाथ हा प्राणीमात्रांवर प्रेम करणारा प्राणी मित्र वाटला. त्यांच्या घरामध्ये पाळलेल्या चंद्री मांजरीला दूध भाकरीचा काला करून खायला घालत होता. एकनाथने घरात पाऊल ठेवल्याबरोबर चंद्री मांजर लाडाने त्याच्या पायात घोटाळायची.

एकनाथचे वृक्षांवर ही फार प्रेम होते. मधू ने म्हणजे एकनाथच्या भावाने सोनखाशीतल्या शेताच्या बांधावरचे झाड स्वतःला कपडे घेण्यासाठी विकले तेव्हा एकनाथला फार वाईट वाटते. त्याच्यामते, 'बिनझाडाचा बांध म्हणजे बिनकपड्याचा माणूस आणि आपलं तर कसं आहे, वावरात झाड दिसल नाही की आपल्याला करमत नाही.'(पृ.१००) यावरून एकनाथ वृक्षमित्र होता असे वाटते. एकनाथ या व्यक्तिमत्वाचा सर्वांगाने विचार केला तर एकनाथ हळव्या मनाचा, आई वडिलांविषयी आदर बाळगणारा, शेतीमित्र, प्राणीमित्र, वृक्षमित्र वाटला. प्रचंड सहनशीलता असलेला युवक होता. उच्चशिक्षित असूनही शेतीच्या कामाची लाज न बाळगणारा उमद्या

व्यक्तिमत्वाचा होता. शेतकऱ्याच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी शेतकरी संघटनांमध्ये काम करणारा कार्यकर्ताही होता.

**मधू :**

एकनाथचा धाकटा भाऊ मधू. बारावी सायन्स फस्ट डिव्हिजनमध्ये पास झालेला, टॅलेन्ट मुलगा होता. शेतकी शाळेचे ट्रेनिंग त्याने केले होते. तसेच स्पर्धा परीक्षेतही तो पास झाला होता. पण डोनेशन भरण्यासाठी पैसे नसल्यामुळे हुशार असूनही नोकरी लागली नाही. नोकरी नसल्यामुळे कोणी आईवडील मुलगी देत नव्हते आणि त्यामुळे लग्न ही झाले नाही.(पृ.४५) मधू हा पायाळू होता. पायाळू लोकांना धनाचा लाभ होतो या समजूतीने तो व त्याची सोनेरी टोळी धनाच्या शोधात बनुबा नावाच्या बोगस मांत्रिकाच्या नादी लागून सतत जमीन खोदत. त्यांना कधीही धनाचा लाभ झाला नाही. हाडांचे सांगाडे, देवी देवतांच्या किंवा इतर दगडी मूर्ती ह्या त्या जमिनीत सापडल्या होत्या. आत्माराम, नथ्थू मोगल, दाम्या गज्या, सावळा मलंग, तेजस नवई व दिलीप पवार सगळ्यांनी धनाच्या शोधात स्वतःच्या जीवनाची माती करून घेतली होती.

आडदांड, रगेल स्वभावाचा मधू हा शेतीचा आणि आपला काडीचाही संबंध नाही असा वागत होता. त्याने एकनाथला शेतीच्या कामात मदत कधीच केली नाही. नोकरीसाठी शेत विकून डोनेशन भरले नाही या गोष्टीचा त्याने कुटुंबातील सर्वांवर राग काढला होता. आई-वडील व भाऊ यांच्याशी त्याने कधीच प्रेमाने संवाद केला नव्हता. वहिनीबरोबर झालेल्या वादात त्याने अलकाच्या थोबाडीत मारली या घटनेने अलका कायमची माहेरी निघून गेली. आपण आपल्या भावाच्या संसाराचा विचका केला याचा त्याला थोडाही खेद वाटला नाही. बहिणीच्या नवऱ्याने आत्महत्या केली या घटनेनेही मधू दुःखी झाला नाही. त्याच्या अंत्यविधीला देखील गेला नाही. कारण नोकरीच्या वेळी पैसे भरण्याचा सल्ला रावसाहेबाने म्हणजे बहिणीच्या नवऱ्याने त्याला दिला नाही आणि म्हणूनच त्याला तलाठ्याची नोकरी मिळाली नाही. आपल्या अपयशाचे खापर सतत दुसऱ्याच्या माथी फोडणारा मधू हा भांडखोर मुलगा होता. मधुच्या व्यक्तीरेखेविषयी प्रा. मधुकर मोकाशी म्हणतात, ''मधु हा ग्रामीण संस्कृतीच्या नव्या वळणाचा-बदलाचा-क्रांतिचा-विद्रोही-बंडखोर प्रवृत्तीचा नायक वाटतो.''[२७] कल्याणीचा मळा गहाण ठेवून त्याने नोकरी साठी पैसे भरले पण त्यातही त्याची मोठी फसवणूक झाली होती. सुशिक्षित बेकार असलेला मधू अंधश्रद्धेच्या आहारी जावून गुप्तधनाच्या मागे धावतो. बेकारीचे खापर सर्व कुटुंबियांच्या माथी फोडून सतत बंडखोर वृत्तीने वागतो.

**सुभानराव :**

विठ्ठलाचे भक्त, वारकरी संप्रदायाची भगवी पताका हाती घेणारे, विदर्भातल्या दुष्काळी भागातला शेतकरी म्हणजे सुभानराव होय. थोरला मुलगा एकनाथ व धाकटा मुलगा मधू यांना स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन उच्च शिक्षण दिले. सुभानरावांच्या मुखी नेहमी विठ्ठलाचे नाम होते. मोठा मुलगा एकनाथच्या हाती घर व शेताचा कारभार सोपवून ते पांडुरंगाच्या भजनात गुंतलेले आढळतात. मधूने कल्याणीचा मळा गहाण ठेवला व नोकरीसाठी पैसे भरले पण त्यामध्ये मधूची फसवणूक झाली. नोकरीतर मिळालीच नाही पण हातचा कल्याणीचा मळाही गेला. त्यांचा कल्याणीच्या मळ्यात जीव गुंतला होता व तेथे त्यांच्या वडिलांची म्हणजे नानू आज्याची समाधी होती. कल्याणीचा मळा मुलाने घालविला व जावयाने कर्जबाजारी झाल्यामुळे फाशी घेतली या दोन घटनानंतर ते मनाने खचले. हताश होऊन त्यांनी एंन्ड्रीन पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला पण मिठाचे पाणी पाजून उलट्या करायला लावल्या. त्यामुळे काही औषध बाहेर पडले पण तरीही जीवाला धोकाच होता म्हणून त्यांना लहान मुलाची सौच पाण्यात कालवून पाजला व त्यामुळे झालेल्या उलट्या मध्ये शरीरातील सर्व एन्ड्रिन बाहेर पडले आणि त्यांचे प्राण वाचले पण नंतर त्यांना ही गोष्ट लक्षात आल्यावर आपण डुकराच्या वंशात गेल्यासारखे वाटले.

**नानू आजा :**

नानू आजा म्हणजे एकनाथचे आजोबा. पारंपरिक शेतीला प्राधान्य देणारे. आधुनिक शेतीपद्धतीच्या दुष्परिणामांनी धास्तावलेले व्यक्तिमत्व होते. शेतामध्ये संकरित वाण पेरणे, तसेच विविध रसायनांचा वापर करणे यामुळे शेतीचे उत्पन्न वाढते हे जरी खरे असले तरी त्यामुळे जमिनीचा कस नाहीसा होतो. आणि ती जमीन आपल्याला कसदार धान्य देणार नाही. आधुनिक तंत्राने शेतीचे उत्पन्न वाढते त्याबरोबरच खर्चही वाढतो आणि त्यामुळे खर्चाची फक्त तोंड मिळवणी होते. शेतकऱ्याचा काहीही फायदा होत नाही. नानू आज्याचा मुलगा सुभानराव यांनी त्यांच्या विरोधाला न जुमानता शेतीमध्ये संकरित वाणाची पेरणी केली आणि त्यामुळे नानूआज्यात व त्यांच्या मुलात वाद होऊ लागले. गावरान ज्वारी शिवाय मी खाणार नाही असं आज्याने सांगितले. थोडे दिवस सुभानरावांनी गावरान ज्वारी आणली पण ती ही मिळेनाशी झाल्यावर शेवटी हायब्रीडच्याच भाकरी द्यायला सुरूवात केली. पण हे आज्याच्या लक्षात आले. आणि नानूआजा खंगत चालला तेव्हा त्याने त्याची स्वतःची समाधी बांधण्याचे ठरविले तेव्हा एकनाथने समाधी बांधण्याने तुम्ही सांधुसंत आहात का? तेव्हा नानू आजा म्हणाला, ''नाय, माणूसच हाये

साधाभादा. पण माहं मरण मले कळून आलं न! ह्या हायब्रीडच्या जमान्यात काई नास्ती दिवस टिकाव धरत नाही आता मी.''(पृ.३) म्हणजे नानू आजा हा संकरित वाण व रसायने यांच्या अधिक वापरामुळे माणसाचे आयुष्यमान कमी होते या मताचा पुरस्कर्ता होता हे सत्य आहे. पण आजच्या लोभी शेतकऱ्याला मात्र हे कळत असूनही वळत मात्र नाही. मरणापूर्वीच स्वतःची समाधी बांधून घेणारा नानूआजा हे व्यक्तिमत्व वेगळ्या धाटणीचे वाटते.

**दिलीप पवार :**

दिलीप पवार बी.एड झाला होता. तो शेवलीच्या विनाअनुदानीत शाळेत नोकरीला होता. तीन वर्ष कोणताही मोबदला न घेता त्याने नोकरी केली. शाळेला ग्रँट आल्यावर संस्थावाल्यांनी एक लाख डोनेशन मागितले. शेतीवाडी नसलेला व विधवा मायेने कामधाम करून सांभाळलेला दिलीप नोकरीसाठी एवढे पैसे कोठून आणणार? आणि म्हणून मधूच्या सोनेरी टोळीत सामील झाला. पण जमीन खणत असताना माणसाचा सांगाडा त्याच्या अंगावर पडला.(पृ.३३) दिलीप पवार घाईत पळायला गेला आणि खाली पडला. त्याच्या डोक्याचा मागचा भाग दगडावर आपटला मेंदूला मार लागल्यामुळे तो बेशुद्ध पडला पण शुद्धीवर आल्यावर तो भ्रमिष्ठासारखा वागू लागला. त्याच्या मेंदूला मार लागल्यामुळे तो वेडा झाला. बिचाऱ्या आईच्या म्हणजे धुरपदाबाईच्या समोर आभाळ कोसळले.(पृ.४७) दिलीप पवार सारख्या सुशिक्षित बेकारांची दयनिय स्थिती लेखक ह्यांच्या चित्रणातून साकार करतो.

**दिनकर दाभाडे :**

दिनकर दाभाडे हा एकनाथचा मित्र होता. तो सेट परीक्षा पास होऊनही त्याला नोकरी नव्हती. लग्नाच्या बँड पथकात वाजवायला जायचे काम करायचा. पूर्वी त्याच्या घरी सुबत्ता होती. वारकऱ्यांच्या पंगती त्यांच्या दारात उठायच्या पण नापिकी, कर्जबाजारी यामुळे 'आताच्या जमान्यात वाढणारे हात भिकारी झाले.'(पृ.१९३) दिनकर दाभाडे सारख्या उच्चशिक्षित तरूणाची हालअपेष्टा समाजाला ऐकवत नव्हती.

**सुरेश साठे :**

सुरेश साठे हा मधूचा मित्र होता. दोघेही बारावीची परीक्षा बरोबरच पास झाले. पटवाऱ्याची परीक्षाही दोघे पास झाले पण इंटरव्हूच्या वेळी सुरेश साठेने पैसे भरले व वशिला लावला त्यामुळे त्याला नोकरी मिळाली परंतु मधू नोकरीला मुकला. सुरेश साठेचे रूबाबदार रहाणे, गाडी, बंगला

या साऱ्या वैभवाने मधूचे मन उदास झाले. आपणही डोनेशन दिले असते तर आज आपण सुरेश साठे सारखेच रुबाबात राहिलो असतो.(पृ.८६) वशिला व भ्रष्टाचार ह्यामुळे सुरेश साठे सारखा नोकरीला लागतो. मधु मात्र हे करू न शकल्यामुळे बेकारच राहतो.

**तलाठी कांबळे :**

तलाठी कांबळे हा लाचखोर नोकर होता. बळीमामाला कर्ज काढण्यासाठी सातबाराचा उतारा बँकेत द्यायचा होता. कांबळे तलाठ्याने त्याला खूप हेलपाटे घालायला लावले. जेव्हा बळीमामाने त्याला पन्नास रूपये दिले तेव्हा तलाठ्याने त्याला सातबाराचा उतारा दिला.(पृ.७४) समाजातील सरकारी कार्यालयातील भ्रष्ट प्रवृत्तीवर लेखक प्रकाश टाकतो.

**मुगुटराव :**

मुगुटराव हा एकनाथच्या शेतावर मजूरीने काम करणारा शेतमजूर होता. मुगुटराव दररोज संध्याकाळी टि.व्ही. पाहायला जायचा. टि.व्ही मध्ये दिसणाऱ्या सुंदर स्त्रियांकडे आशाळभूत नजरेने पाहायचा. शेतकऱ्याला शेतात पीक येऊ अथवा न येऊ, मालाला भाव मिळो अथवा न मिळो मजूराला मात्र त्याच्या कामाचा मोबदला रोख मिळत होता. त्यामुळे शेतकऱ्यापेक्षा शेतमजूर खाऊन पिऊन सुखी होता. त्याला काहीही चिंता नव्हती.

**बनुबा :**

बनुबाला जमिनीतले धन शोधण्याची कला अवगत होती असा समज होता. मंत्रविद्येचे त्याला ज्ञान होते. त्याचबरोबर जमिनीत कुठे पाणी आहे? हे ही त्याला समजत होते. असे त्याचे मत होते. ''भुईत दडेल पाणी भुईवर आणून दांडातून खळखळ खेळवण हाच आमचा हुद्दा. हीच आमची कमाई! जगाच्या कल्याणा संताच्या इभूती.....''(पृ.३०) असे बनुबा स्वतः बद्दल सांगत होता पण एक वेळ धन शोधण्यासाठी लागणाऱ्या विधीचे त्याने पाचशे रूपये घेतले होते. मध्या व त्याच्या सोनेरी टोळीला मात्र एकदा ही धनाचा लाभ झाला नव्हता.

**बळीमामा :**

एकनाथचा बळी मामा माळवणला राहात होता. तेथे त्याची दहा एकर शेती होती. त्याच्या भावांनी त्यांची स्वतःची शेती चोपडा शेठला विकली. त्यामुळे चोपडाशेठ बळीमामाला शेत विकण्याचा आग्रह करीत होता. बळीमामाने नकार दिला मग चोपडाशेठने त्याला त्रास द्यायला सुरूवात केली. चोपडा शेठच्या दहशतीला घाबरून अखेरीस बळीमामाने चोपडा शेठला शेत

विकले व तो सांजोळला बहिणीच्या आश्रयाला आला. सांजोळला १० एकर शेती घेतली, जागा घेतली पण इथली शेती कोरडवाहू होती. त्यामुळे त्याचे कुटुंब हालाखीत जगू लागले. शेती करून मामा, मामी व त्यांची मुलगी मुक्ता मजूरीवरही जात होते. एकनाथने मुक्ताशी लग्न करावे असे मामा, मामी व शेवंतामायला वाटत होते पण एकनाथला काहीच न शिकलेल्या मुक्ताशी लग्न करायचे नव्हते. त्याला शिकलेल्या मुलीशी लग्न करायचे होते आणि म्हणून त्याने मामाच्या मुलीला नाकारले.

**तेजराव खपके :**

तेजराव खपके हे शेतकरी संघटनेचे सक्रिय नेते होते. त्यांनी सरकारच्या आयात निर्यात धोरणावर व बाजारपेठातून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणावर कडाडून हल्ला केला. शेतकऱ्यांनी मालाची स्वयंविक्री करावी असे त्यांचे मत होते. त्यांच्यावर शरद जोशींच्या विचारांचा पगडा होता. त्यांना त्यांच्या कार्यासाठी शरद जोशींच्या भाषणातून प्रेरणा मिळाली होती. 'संघटना नस्ती तर शेतकऱ्याचे हाल कुत्र्यानं खाल्ले नस्ते.'(पृ.१८५) अशा प्रकारे ते संघटनेचे समर्थन करीत. कर्मचाऱ्यांनी संप केला तर त्यांना पगार वाढ मिळते पण शेतकऱ्यांनी आंदोलन केले तर त्यांना मात्र शिक्षा होते, कोर्टात जावे लागते. शेतकऱ्यांसाठी सरकारने दिलेली सबसिडी त्यांचे फायदे शेतकऱ्यांना मिळत नाहीत. सबसिडीचे पाणी शेतकऱ्यांच्या तोंडाला पुसले जाते. देशातला शेतकरी गुलाम झाला आहे अशी खंत ते व्यक्त करतात.

**समाधान चांदणे :**

समाधान चांदणे हा तेजराव तात्यांबरोबर शेतकरी संघटनेचे कार्य करणारा सक्रिय कार्यकर्ता, तात्यांचा खास माणूस. दोघांची जोडगोळी अख्ख्या तालुक्यात प्रसिद्ध होती.

**४.२.१३. भूमी :**

**शंतनू :**

शंतनू कांदबरीची कथा नायिका मैथिली हिचा नवरा होता. आचार विचार यांच्यात कोणतेही साम्य नसताना केवळ परिस्थितीशी जुळवून घेऊन शंतनू बरोबर मैथिलीने विवाह केला. देवस्थळी बाईंचा मुलगा शंतनू याची व मैथिलीची पहिल्यांदा भेट, देवस्थळी बाईंच्या मृत्यूनंतर शंतनू मुंबईला आला व मैथिलीला बाईंची निधनवार्ता कळली म्हणून देवस्थळीबाईंच्या घरी मैथिली गेली तेव्हा झाली. दांडेकरांनी मध्यस्थी करून हा विवाह घडवून आणला. शंतनू मद्रासला एका

कंपनीत इंजिनिअर होता. त्याचे देवस्थळी बाईंशी म्हणजे त्याच्या आईशी असलेले नाते फार प्रेमाचे नव्हते ''आय वॉज नेव्हर अटॅच्ड टु हर.''(पृ.१०९) असे शंतनू स्पष्टपणे मैथिलीला सांगतो. शंतनू रंगाने एकदम सावळा, उंच पण जरा स्थूलही, डोळ्यात एक पिंगट झाक आणि बराचसा निर्विकार चेहरा आता डोक्याला थोडं टक्कल समोरून सगळे केस मागे जमा झालेले.

विवाहानंतर मैथिली शंतनूबरोबर मद्रासला आली. शंतनू व मैथिली यांच्या वैवाहिक जीवनात, चैतन्याचा अभाव होता. शंतनूमध्ये कमालीचा संथपणा होता. दोघांच्या एकान्तातही त्याचा कुठला उत्कट हुंकार मैथिलीला जाणवला नाही. होता तो फक्त अटळ अशा शारीरिक गरजेचा व्यवहार(पृ.११६) मैथिली आणि शंतनू ही दोन परस्परविरोधी व्यक्तिमत्वे होती. मैथिली तिच्या शैक्षणिक कार्यात यशाच्या शिखरावर पोहचलेली. याउलट कामाच्या नवीन पद्धती, तडफ, जिद्द, अँबिशन इ. गोष्टी शंतनू करता खूप दुरच्या होऊन गेल्या होत्या. कंपनीतही त्याला मान नव्हता. त्यामुळे शंतनू निराशावादाकडे झुकला होता त्यामुळे तो सतत ड्रिंक करायचा.

मैथिली आणि शंतनू यांना मुलगा झाला अंशुमन त्याचे नाव होते. अंशुमनच्या जन्मानंतर शंतनूमध्ये थोडा बदल झाला. अंशुमन मोठा झाल्यानंतर पिता पुत्रांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण झाले. मैथिली व शंतनू एकमेकांपासून दूरावत गेले. मैथिलीला न सांगता शंतनूने फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन केले. शंतनूला मैथिलीसमोर असमर्थ, छोटं, खुजं वाटायचं. मैथिलीला पतीचे प्रेमही भरभरून मिळाले नाही.

**मिलिंद :**

मिलिंद हा मैथिलीची मैत्रिण कीर्तिचा भाऊ. मिलिंद एम.टेक होता व टाटा युनिसिस मध्ये नोकरीला होता. मैथिलीची 'हॅम्लेट' ची भूमिका पाहून मिलिंद प्रभावीत झाला. मैथिलीला तो नाटकाची तालीम झाल्यानंतर त्याच्या गाडीतून घरापर्यंत सोडवत होता. या भेटीचे रूपांतर प्रेमात होऊ लागले होते. त्याचाच मित्र चेतन याच्या घरीही ते बऱ्याचदा भेटायचे. मिलिंदने तिच्यासाठी ड्रेस घेण्याची इच्छा व्यक्त केली. पण मैथिलीने नकार दिला. मिलिंद तिच्यावर रागावला पण शेवटी मैथिलीने ड्रेस घेण्यास होकार दिला  व त्याने तिला भेटायला बोलावले. पाऊस येत असतानाही मैथिली त्याने घेतलेला ड्रेस घालून जाते यावरून ती मिलिंदच्या प्रेमात पडली हे सिद्ध होते (पृ.७७) पण पुढे मैथिलीची आई तमिळी ख्रिश्चन व तिने लग्नानंतर धर्म बदलला नव्हता म्हणून घरातून लग्नाला विरोध झाला तेव्हा मिलिंदने वर्षभरासाठी अमेरिकेला जाण्याचा निर्णय घेतला व वर्षभरात मैथिलीला एम.ए. करण्यास सांगितले. मिलिंद अमेरिकेला जाण्यापूर्वी मैथिलीला

भेटण्यास बोलावतो पण ती गेली नाही. मिलिंद अमेरिकेला गेला. मिलिंद अमेरिकेहून परत आलाच नाही. 'तो लग्न ही तिकडच करणार आहे. अमेरिकन मुलगी आहे.'(पृ.९९) अस किर्तीने मैथिलीला सांगितले. कारण मिलिंदने चेतनला तसे पत्रात लिहिले होते.

मैथिलीच्या जीवन प्रवासात आलेला हा मिलिंद मैथिलीच्या दृष्टीने मृगजलासारखा ठरला. मैथिलीने मिलिंदवर खऱ्या अर्थाने प्रेम केले पण मिलिंद मात्र पलायनवादी निघाला. खर प्रेम असेल तर वास्तविक पाहाता त्याने आई वडिलांची समजूत काढून मैथिलीशी लग्न करायला पाहिजे होते. कारण मैथिली त्याला मनापासून आवडली होती आणि ती त्याला अनुरूपही होती. पण तसे मात्र होवू शकले नव्हते.

**संजू :**

संजू हा मैथिलीच्या आत्याचा मुलगा. मैथिलीला तिच्या आईच्या मृत्यूनंतर मुंबईला त्यांच्या घरी आईने आणलेले संजूला आवडले नव्हते त्या गोष्टीमुळे तो मैथिलीचा तिरस्कार करायचा. एकदा मैथिलीची आत्या आणि गोपाळराव उदयच्या लग्नासाठी गेले तेव्हा मैथिली आणि संजू दोघेच घरी होते. त्यावेळी संजूने संधीचा फायदा उठविण्याचे ठरविले. मैथिलीला मिठी मारण्याचा प्रयत्न केला पण मैथिलीने त्याला तीव्र प्रतिकार केला व स्वतःच स्वतःला त्याच्यापासून वाचवले. म्हणजेच पोरक्या मुलीला भावाच्या मायेने आधार द्यायचे सोडून तिच्या निराधारपणाचा फायदा उठविणाऱ्या लंपट तरूणाचे संजू प्रतिनिधित्व करताना आढळतो.

**मधू सबनीस :**

मैथिलीची जीवनगाथा सांगताना लेखकाने जी काही व्यक्तिचित्र रेखाटली आहेत. त्यातीलच एक म्हणजे मधू सबनीस. मधू सबनीस हा तिचा इयत्ता दहावी मधील मित्र. त्याचे वडील वारले म्हणून त्याला शिक्षणासाठी काकांनी मुंबईला आणले होते. त्याची आई त्याच्या गावातल्या प्राथमिक शाळेत शिक्षिका होत्या. ट्युशन नसताना दहावी मध्ये त्याला पंच्याहत्तर टक्के गुण मिळाले होते. लहान भावंडाची जबाबदारी आपल्यावर आहे या जाणिवेमुळे मधूने नोकरी करून पुढचे शिक्षण पुर्ण करण्याचा निर्णय घेतला होता. मैथिलीला मधू व आपण सम दुःखी आहोत असे वाटले होते परंतु त्याला दहावीला चांगले गुण मिळाले व आपण मात्र नापास झालो याचे वैषम्य वाटू लागले होते त्यामुळे तिने मधूला टाळणेच पसंत केले. मैथिलीला मधू हा एक सच्चा मित्र म्हणून भावतो.

**उदय :**

उदय हा मैथिलीच्या आत्याच्या नवऱ्याच्या पहिल्या बायकोचा मुलगा होता. इंजिनिअरिंगचा डिप्लोमा करून मध्यप्रदेशात नोकरी करत होता. लग्नासाठी मुली पाहण्याच्या निमित्ताने तो मुंबईला तिच्या आत्याच्या घरी आला होता. मैथिलीला पाहून तो प्रभावित झाला. मैथिलीला नवीन ड्रेस घेऊन दिला. तिच्या बरोबर जुहूबीच वर गेला त्यावेळी तो तिच्याशी लंपट वृत्तीने वागला. मैथिलीशी लग्न करण्याची इच्छा त्याने व्यक्त केली. मैथिलीला या शहरापासून दूर म्हणजे जबलपूरला जायला मिळेल या गोष्टीचा क्षणिक मोह झाला. त्यानंतर त्याने 'हॉटेलात दोन तास खोली रिझर्व्ह करतो तू तेथे ये अशी अपेक्षा व्यक्त केली पण नंतर मैथिली भानावर आली. ती हॉटेलात गेली नाही.'(पृ.३८) म्हणजे उदय हा संयम नसलेला तरूण लेखिकेने रेखाटला आहे.

**चेतन :**

चेतन राजवंशी हा मिलिंदचा मित्र. म्हणजे चेतन, मिलिंद, मैथिली व किर्ती यांची चांगली मैत्री होती. चेतन हा एस.टी मध्ये क्लार्क होता. त्याचे आई वडील नाशिकला खानावळ चालवत होते. पण नंतर ती ही बंद पडली होती. चेतन एक नाटककार होता. मैथिलीच्या 'हॅम्लेट' ची भूमिका पाहून चेतन व मिलिंद प्रभावित झाले व नाटकाच्या प्रयोगानंतर मैथिलीला भेटले.(पृ.६६) मैथिलीने 'हॅम्लेट' मराठीतून करावा व त्यात हॅम्लेटची प्रेयसी 'ऑफीलिया' हिची भूमिका तिने करावी अस प्रपोजल त्याने मैथिली समोर मांडले पण तिने त्याला नकार दिला.

चेतनचे व्यक्तिमत्व तसे कादंबरीत महत्वाचे नव्हते मैथिली व मिलिंद यांच्यातील तो दुवा होता कारण ते दोघे एकमेकांना त्यांच्याच घरी भेटत होते. नाटकावर त्यांच्या चर्चा करायचे. रंगीत तालमीपर्यंत पोहोचलेले चेतनचे नाटक. पण त्याचे प्रयोग होऊ शकले नाहीत. (पृ.७२) त्यामुळे चेतन नाराज झाला. मैथिलीने चेतनविषयीचे तिचे मत अतिशय समर्पक शब्दात व्यक्त केले आहे. 'कशाशीही, कुणाशीही बांधून नसलेला, तरीही आपल्या मातीत घट्ट पाय रोवून असलेला चेतन....'(पृ.९५) लेखकाने चेतन हे जिद्दी व नाटकाची आवड असलेले व्यक्तिमत्त्व रेखाटले आहे.

**दांडेकर :**

दांडेकर हे एका बँकेत ऑफिसर होते. हाजी आलीला त्यांचा फ्लॅट होता ते तेथे राहत होते. मुलगा अमेरिकेला इंजिनिअर होता. मुलगी जावई लंडनला डॉक्टर होते.(पृ.९०) देवस्थळी

बाई आणि दांडेकर एका बँकेत होते ते एकमेकांचे मित्र बनले होते. दांडेकर स्वार्थी माणूस होता असे देवस्थळी बाईंचे मत होते कारण जेव्हा मैथिली देवस्थळीबाईंकडे जाते व त्यांना सांगते माझ्या नोकरीसाठी तुम्ही दांडेकरांना वशिला लावावा म्हणून फोन करा तेव्हा देवस्थळी बाई म्हणतात, ''फोन तर करीनच ग.. पण मैथिली, हा माणूस भरवसा करावा असा नाही.''(पृ.८९) ''शंतनूच्या पाठीवर पुष्कळ दिवसांनी मला दिवस राहिले. शंतनू बारा वर्षांचा होता. मला खूप आनंद झाला आणि दांडेकरांनी आमच्या घरात पसरवल की ते मूल त्यांचच आहे आमचे संबंधही होते. पण मला माहीत होतं की ते मूल त्याच नाही.''(पृ.८९) देवस्थळी बाईंच्या वक्तव्यावरून दांडेकरने देवस्थळी बाईंसारख्या स्त्रीची फसवणूक केली. स्वार्थी वृत्तीचा व भरवसा ठेवण्यालायक ती व्यक्ती नव्हती.

**मॅथ्युज अंकल :**

मॅथ्युज अंकल म्हणजे मैथिलीच्या आईचे जवळचे मित्र होते. ते मैथिलीच्या शाळेत टिचर होते. ते दररोज संध्याकाळी सहा-साडेसहा नंतर मैथिलीच्या घरी जायचे. मैथिलीची आई आणि मॅथ्युज टिचर यांच्यातील नातं हे जगमान्य नव्हते. त्यांच्या मैथिलीच्या घरी येण्यामुळे शेजारी असणारे लोक मैथिलीला टोचून बोलायचे. मैथिलीला मॅथ्यूज अंकलचा खूप राग यायचा. त्याला अंकल म्हणावं असे तिला वाटत नव्हत. मैथिलीची आई किडणीत बिघाड झाल्यामुळे आजारी होती त्यावेळी तिला तिचा अंत दिसत होता. तेव्हा आपल्या मृत्यूनंतर मॅथ्यूजने मैथिलीला सांभाळावे अशी अपेक्षा आईने अंकल जवळ व्यक्त केली आणि त्यानंतर मॅथ्यूज तिच्या आईला भेटायलाच आले नाहीत. मॅथ्यूजच्या वर्तनावरून ते एक अतिशय स्वार्थी व्यक्तिमत्व होते. कारण निराधार स्त्रिला तिच्याकडून फायदा होत आहे तो पर्यंतच साथ दिली. पण जेव्हा मैथिली सांभाळण्याची वेळ येईल हे लक्षात आल्यावर कृतघ्नपणे वागले.

**डॉ.मित्रा :**

डॉ.मित्रा हे इंग्लिश लिटरेचर शिकवायचे. मैथिली ही डॉ. मित्रा यांची आवडती विद्यार्थीनी होती. गॅदरिंगमध्ये मैथिलीने शेक्सपिअरचे स्वगत बसवले तेव्हा डॉ. मित्रांनी तिला मदत केली. मित्रा सरांबद्दल मैथिलीला प्रचंड आदर होता. मित्रासर तोंडावर कधीच स्तुती करायचे नाहीत. सगळ्या बाजूंनी आपल्या विषयापर्यंत पोचण यावरच ते पुर्ण लक्ष केंद्रित करत ती कुठे कमी पडली तर लगेच बोट ठेवत. मैथिलीने तिच्या पीएच.डी.चा विषय 'शेलेच्या कवितांचा अभ्यास' हा

निवडला याचे कारण शेले हा डॉ.मित्रांचा आवडता कवी होता. डॉ.मित्रा यांच्याविषयी मैथिलीच्या मनात अतिशय आदर होता.

**डॉ.पद्मनाभन :**

हे सायकॉलॉजीचे प्रोफेसर होते. सिनिऑरिटीने त्यांच्या डिपार्टमेंटचे हेड व्हायला हवे होते पण त्यांना डावलल्याची त्यांची तक्रार नव्हती. त्यांचे पिरियड झाले की ते एक मिनिटही थांबत नव्हते. कारण घरी त्यांची बायको की जिला माईल्ड पॅरॅलेसिसचा अॅटॅक आला होता व त्यांना मुलबाळही नव्हती. त्यामुळे बायकोची सर्व जबाबदारी डॉ. पदमनाभन यांच्या वरच होती. मैथिली मद्रास युनिर्व्हसिटीत आल्यानंतर ज्या दोघा प्रमुख व्यक्तिंशी बंध जुळले त्या पैकीच एक म्हणजे डॉ. पद्मनाभन होते. पद्मनाभन यांचे त्यांच्या पत्नीवर खूप प्रेम होते असे दिसते कारण रिटायरमेंट घेऊन पत्नीच्या आजारावर रिसर्च करावा, पुस्तक वाचावी असे मत त्यांनी व्यक्त केले होते.

**डॉ.अरूणाचलम :**

मैथिलीने डॉ. अरूणाचलम यांच्याकडे पीएच.डी. करीता नाव नोंदविले. पीएच.डी.चा थिसीस सबमिट केल्यानंतर डॉ. अरूणाचलम यांची मैथिली आणि शंतनूला जेवायला बोलावले होत.(पृ.११७) माणुसकी असणारे व उदारमतवादी विचाराचे अरुणाचलम होते.

**३.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

'उत्सुकतेने मी झोपलो' ही श्याम मनोहरांची वेगळ्या धाटणीची कादंबरी आहे. या कादंबरीत मनोहरांनी एक वेगळाच प्रयोग केला आहे. कादंबरीचे त्यांनी तीन भाग केले आहेत. पहिला भाग 'कुटुंब व्यवस्था आणि चांदणे', दुसरा भाग 'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरु', तिसरा भाग 'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' या तीन विभागातून विविध स्वभाव धर्माची पात्रे लेखकाने रेखाटली आहेत. कुटुंबातील आई-वडील व त्यांची मुले तसेच कुटुंबाशी घनिष्ट संबंध असलेले नातेवाईक. प्रत्येकाचे कुटुंबात असलेले महत्त्वपूर्ण स्थान, प्रत्येकालाच कुटुंबव्यवस्थेत स्वतंत्र विचार करण्याचे स्वातंत्र्य असते हे विविध पात्रांच्या माध्यमातून लेखक समर्थपणे व्यक्त करतात. निसर्गातील चांदणे, फुलपाखरु आणि पाऊस या गोष्टींचा कुटुंब व्यवस्थेतील पात्रांशी असलेला ऋणानुबंध लेखक दाखविताना दिसतो.

'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे' : 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे' या पहिल्या भागात लेखकाने पुरुष व्यक्तिरेखांमध्ये सुबोध, सुमाधुरीचे वडील, सुबोधचे वडील, सुमाधुरीचा(माधुरीचा) धाकटा भाऊ,

मोहनराव (सुमाधुरीच्या वडिलांचे मित्र), सुमाधुरीचा मुलगा-सुब्बु(परीस), पराग इत्यादी पात्रांची निर्मिती लेखकाने केलेली आहे. या पात्रांच्या द्वारे श्याम मनोहर यांनी कुटुंबव्यवस्थेतील मुलीचे स्थान, लग्न, मुलाचा जन्म, सेक्स्, एकत्र कुटुंबातील प्रथा, परंपरा, चालिरिती, प्रत्येकाची विचार करण्याची प्रवृत्ती, विचार, स्वातंत्र्य, अंघश्रद्धा इत्यादीचे चित्रण केले आहे.

**सुबोध :**

सुबोध सैनिक स्कुलमध्ये शिकला होता. कुठेही तो कमी नव्हता. सुमाधुरीच्या मित्र-मैत्रिणींबरोबर सुबोध इंग्रजीत बोलत असे. सुबोध हा सुमाधुरीचा सुसंस्कारीत पती आहे. तो आधुनिक विचारांचा पुरस्कर्ता आहे पण कुटुंबातील पुरुषसत्ताक व्यवस्थेत त्याला अनेक मर्यादा येतात. कारण त्यांचे कुटुंब एकत्र आहे. सुबोधचे घराणे मराठा आहे. त्यात तो पॉवरफुल आहे. सुबोधला नाशिकला भरपूर बागायती शेती असते. सोबत पेट्रोलपंप आहे. लग्न होण्याअगोदर सुबोध व माधुरीचे संबंध खूप मोकळेपणाचे असतात. पण लग्नानंतर एकत्र कुटुंबपद्धतीमुळे त्यांच्या या खेळीमेळीच्या, मोकळेपणाच्या संबंधावर बऱ्याच मर्यादा येतात. सुमाधुरीने सिनेमा क्षेत्रात नाव कमवावे असे त्याला वाटते. तिची अभिरुची वाढावी म्हणून तो तिला प्रोत्साहन देत असतो. तिच्या अत्याधुनिक जीवनशैलीबद्दल त्याला सतत अभिमान वाटतो. तिचे व्यक्तिमत्त्व बहरावे, फुलावे, सर्वगुणसंपन्न व्हावे ही त्याची अंतःकरणापासूनची प्रबळ इच्छा आहे.

ते दोघे लग्न ठरल्यानंतर जेव्हा एकत्र सिनेमा पहायला जातात, तेव्हा अंधारातही एकमेकांचे हात हातात घेत नाहीत. कारण ह्या दोघांवर कुटुंबव्यवस्थेने मर्यादा पाळून स्वातंत्र्य उपभोगण्याचे संस्कार केलेले आहेत. सुबोध हा कुटुंबातील नातेसंबंध आणि घडणाऱ्या इतर गोष्टींकडे सदसद्विवेकपुर्ण दृष्टीकोनातून पाहत नसतो. कुटुंबाकडून प्रेम, सुरक्षितता, सुख-समाधान एवढ्याच संकुचित दृष्टीने पाहत असतो. तो आधुनिक विचार मांडतो परंतु जुन्या परंपरेची कास तो सोडवू शकत नाही. दोलायमान मानसिकतेत गुरफटलेल्या आधुनिक पिढीचा सुबोध हा प्रतिनीधी आहे. सुमाधुरी जेंव्हा ती स्त्रीमुक्तीवादी नाही असे सांगते तेंव्हा सुबोध हलकासा सुटकेचा सुस्काराही सोडतो. सुबोधला स्त्री-मुक्तीचे तत्त्व अंशतः मान्य होते.

**सुमाधुरीचे (माधुरीचे) वडील :**

माधुरीच्या वडिलांचे वर्णन करताना श्याम मनोहर लिहितात, ''माधुरीचे वडील मध्यम उंचीचे, बदामी रंगाचे, मध्यम बांध्याचे आहेत. डोक्यावरचे केस विरळ असले तरी हातावर दाट केस आहेत. ते नेहमी पँट, बुश शर्ट, सँडल वापरतात. रोज रात्री एक पेग घेतात. बोलायचा

आवाज मृदू आहे. नोकर लोकांशी मायेने वागतात.''(पृ.०३) घरची शेती ते स्वतः करतात, परंतु पाच वर्षापूर्वी ते हॉटेलच्या व्यवसायात पडलेले आहेत. त्यांचा थोरला भाऊ मिलिटरीत कर्नल आहे. धाकटा भाऊ नागपूर विद्यापीठात अधिव्याख्याता आहे. त्यांचे आपल्या भावांवर आणि पुतण्यांवर खूप प्रेम आहे.(पृ.०३) सुमाधुरीचे वडील हे आर्थिक व्यवहारात हुशार आहेत. ते आपल्या पत्नीचा प्रत्येक सल्ला मानत असतात. त्यांचे जुनं वडिलोपार्जित घर होते. तीन पिढ्यापर्यंत ते थोडे थोडे वाढवत नेलेले होते. माधुरीच्या वडिलांचा स्वभाव, त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कुटुंब व्यवस्थेतील त्यांचे स्थान वरील वर्णनावरुन लक्षात येते.

**सुमाधुरीचा धाकटा भाऊ :**

हा माधुरीपेक्षा दोन वर्षानी लहान होता. माधुरी व आई-वडिलांपेक्षा तो उंच व धष्टपुष्ट होता. त्याचा चेहरा, डोळे, नाकपुड्या मोठया होत्या. तो नेहमी मोठा श्वास घेत असे. हॉटेलचे मॅनेजमेंट बघणे, खूप खाणे, भरपूर व्यायाम करणे, जीन्स-पँट, टी-शर्ट घालणे त्याला आवडत होते. सिनमा पाहणे त्याला आवडत नसे. हिंदी सिनेमाची गाणी मात्र त्याला खूप आवडत होती. आयुष्यात त्याला भरपूर पैसा मिळवायचा होता. मस्त आर्किटेक्चरचा बंगला बांधायचा ही त्याची महत्त्वकांक्षा होती.(पृ.४) यावरुन असे लक्षात येते की, आजच्या काळातील तरुणांना सर्व गोष्टी लवकरात लवकर मिळाव्यात. तसेच व्यायाम करावा व ऐश-आरामी जीवन असावे असे वाटते.

माधुरीचा धाकटा भाऊ एफ.वाय.बी.कॉम. च्या वर्गात शिकत होता. त्याला शिक्षणात रस नसल्यामुळे तो जास्तीत जास्त वेळ हॉटेलमध्ये लक्ष देण्यात घालवितो. तो माधुरीपेक्षा दोन वर्षांनी लहान होता. आपल्या बहिणीने तिला पाहिजे तेवढे शिकावे असा त्याचा उदारमतवादी दृष्टीकोन आहे. आपली बहीण हुशार आहे याचा त्याला अभिमान वाटतो. सुमाधुरीचे पुण्याला एम.ए.(मास कम्युनिकेशन)चे शिक्षण घेण्यासाठी जायचे ठरते तेंव्हा तिचा धाकटा भाऊ म्हणतो, ''माधुरी, रहा पुण्याला, ऐश कर. पण रात्री साडेनऊला बरोबर फ्लॅटवर तुला आईचा फोन येणार, रोज रात्री बरोबर साडेनऊला. साडेनऊला फोन उचलला गेला नाही तर दुसऱ्या दिवशी माधुरी मॅडम अमरावतीला. ओव्हर''(पृ.०८) भावाच्या सांगण्यावरुन असे दिसते की, पूर्वी मुलीने 'सातच्या आत घरात' यायलाच पाहिजे. पण तू शहरात शिक्षणासाठी जातेस. ऐश कर. मज्जा कर. पण बरोबर साडेनऊ म्हणजे साडेनऊला फ्लॅटवर(घरात) ये.

थोडक्यात कुटुंबातील भावाची भूमिका यातून व्यक्त होते. तसेच मुलीच्यावर असलेले संस्कार व्यक्त होतात.

**आबा (सुबोधचे वडील) :**

आबा शांत स्वभावाचे होते.(पृ.३१) आबा प्रोड्यूसर होते. पण त्यात ते बुडाले होते. त्यांनी एक मराठी सिनेमा प्रोड्यूस केलेला होता. त्यांचा पाऊण एकरात मधोमध चौदाशे स्क्वेअर फूटावर भव्य-दिव्य बंगला आहे. चौदाशे स्क्वेअर फूट जमिनीवर व तेवढाच दुसरा मजला असा ऑफ व्हाईट रंगाचा बंगला आहे.

**सुबोधचा थोरला भाऊ :**

सुबोधच्या थोरल्या भावाला जुन्या कार विकून नव्या कार घ्यायची हौस होती. त्याची ती फॅशन झाली होती. त्याच्या त्या आवडीचे सगळेजण सेलीब्रेशन करत होते. अगोदर नवीन कार घ्यायची, मग जुनी कार विकायची, असे त्याचे चालू होते. जुनी कार विकण्यात तो वाकबगार होता. जुनी कार विकण्याचा आणि नवी कार घेण्याचा त्याला छंद होता. तसेच त्याला शेतीची आवड होती. शेतीतून उत्पादित केलेली द्राक्ष निर्यातीत त्याचा हातखंडा होता.

**अनिकेत :**

अनिकेत तीस-बत्तीशीतला होता. मराठी समाजाचा, गोरा रंग असलेला, चेहऱ्याची ठेवण मराठा, चांगले खाल्लेले-प्यालेले कणखर शरीर तसेच त्याच्या आवाजात कणखरपणा होता.

**सुबोधचा मामेभाऊ :**

हा व्यवसायाने डॉक्टर होता. त्याने 'आरोग्य संपदा' नावाचे त्रैमासिक सुरु केले होते. त्याचा प्रकाशन सोहळा आरोग्य विद्यापीठाच्या अधिष्ठातांच्या हस्ते संपन्न झाला होता.

'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरु' मधील व्यक्तिचित्रणे : 'कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरु' या दुसऱ्या भागात विलास, वनिता, हर्षद या मुख्यपात्रांच्या माध्यमातून शोधकतेने प्रामुख्याने चित्रण केलेले आहे. शोध लागणे, शोध लावणे, शोध घेणे यांचे कुटुंब संस्थेतील महत्त्व व स्थान लेखक ह्या पात्रांच्या माध्यमातून व्यक्त करतात. ह्यासाठी हर्षदचे आई-वडील, डॉ.नारखेडकर, डॉ. किरवले, विलासचा चुलतभाऊ (पराग), विलासची आई आणि डॉ.गौरी आत्या या पात्रांच्या साहाय्याने श्याम मनोहर यांनी 'कुटुंब व्यवस्था आणि फुलपाखरु'च्या आशयाची मांडणी केलेली आहे. डॉ. शशिकला कांबळे प्रस्तुत कादंबरीतील एकूण पात्रांविषयी म्हणतात, ''श्याम मनोहर यांची जीवनातील मूलभूत प्रश्नांकडे पाहण्याची पद्धत वेगळी आहे. व्यक्तिजीवनात व्यक्तीव्यक्तींमधील परस्परसंबंधावरुन त्यांच्या कुटुंबियांचे परस्पर संबंध ठरत असतात.''[२८]

**विलास :**

विलास अतिशय सेन्सिटिव्ह होता. विलासचे एकत्र कुटुंब होते. विलासला दोन काकूंचे घर होते. ''विलास तसा भोळसट आहे''(पृ.११४) विलासकडे फुलपाखरांच्या चित्रांचा अल्बम होता. विलासला मेडीकल स्टोअर्स काढायचे होते. त्याची आई नेहमी घरी होती. इंटरनॅशनल जर्नलमध्ये विलासचा पेपर ॲक्सेप्ट झाला होता. विलासच्या चुलत बहिणीचे नाव वनिता होते. वनिता म्हणते, ''लहानपणापासून मी पाहयलीय, आठवतय मला विलास नर्व्हस असायचा. आता तो नर्व्हस नाहीय, दुःखी आहे.''(पृ.१४७) वनिता विलासची चुलत बहीण असली तरी सख्ख्या बहिणीपेक्षा जास्त काळजी घेते व प्रेमळ आहे. बारावी नंतर विलास बी.फार्मला गेला होता. विलासला फॅमिली फुटल्याचे दुःख झाले होते. फॅमिली नीट हवी असतेच. विलास हा शांत स्वभावाचा, ज्ञानाची आसक्ती असलेला, संवेदनशील व संशोधन वृत्तीचा, एकांताची आवड असणारा, फुलपाखरांवर शास्त्रीय संशोधन करणारा, असा विद्यार्थी लेखकाने आपल्या समोर उभा केला आहे. फुलपाखरांबद्दलची शास्त्रीय माहिती आणि त्यांची छायाचित्रे असलेला एक अल्बम विलासने तयार केलेला होता. 'कुटुंबव्यवस्थेत ज्ञानाला जागा नाही' ही त्याच्या मनातील खदखद आहे. विलास ज्ञान निर्मितीत आणि विचार प्रक्रियेत एकाग्र असल्यामुळे कुटुंबात असूनही तो एकलकोंडा, विचारमग्न बनत जातो. आपल्या मनातील खंत आपल्या चुलत बहिणीकडे (वनिता) विलास व्यक्त करतो. ''आई-वडिलांना वाटते, आपल्या मुलाने खूप शिकावे आणि मोठे व्हावे. मोठे व्हावे म्हणजे काय? तर पैसे कमवावेत. रांकेला लागावे. ज्ञान हा शब्दही नसेल कोणत्या आईवडिलांच्या मनात येतं. कुटुंबव्यवस्थेत ज्ञानाला जागा नाहीय.''(पृ.१३५) विलासच्या मनातील घुसमटीवरुन हे लक्षात येते की, कुटुंबातील आई, काकू यांना संशोधनातील काही एक समजत नसते. कुटुंबातील प्रत्येकाला वाटते. आपल्या मुलाने शिकून खूप पैसा कमवावा. मोठे व्हावे. ही माफक अपेक्षा असते.

**पराग :**

पराग व विलास चुलतभाऊ होते. आजीने या दोघांना फोटोग्राफी शिकायला पाठविले होते. दोघात मिळून कॅमेरा घेऊन दिला होता. एक फोटो परागने व दुसरा फोटो विलासने काढायचा असे आजीने ठरवून दिले होते. पराग कुटुंबातील सर्वांचे फोटो काढत होता. पराग विलासला म्हणायचा, ''माझे फोटो काढ.''(पृ.६९) विलास टाळू बघायचा. विलासला माणसांचे फोटो

काढायला आवडत नव्हते. त्याला पावसाळ्यानंतर फुलपाखरांच्या दिवसांत फुलपाखरांचे फोटो काढायला आवडायचे.

**हर्षद :**

हर्षदचे कुटुंब उच्चशिक्षित होते. मोठा बंगला होता, कार होती. वडील कंपनीत ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर होते. आई कंपनीत पर्चेस ऑफिसर होती. हर्षदची इच्छा सी.ए. होण्याची होती. चहा पित पित सिग्रेट ओढण्याची त्याला सवय होती. भरपूर व्यायाम करीत होता. त्यासाठी तो जिमला जात होता. तेथे भरपूर जोर बैठका काढत होता. त्याला बॉडी बिल्डर व्हायचे होते.(पृ.१०६) एक्झरसाईज करायची सायकल त्याच्या रुम मध्ये होती. टेन्शन आले, कंटाळा आला की, तो घराबाहेर जाऊन लांबच्या लांब रस्त्याने फिरुन येतो. आपल्या घरातला प्रॉब्लेम संपावा असे त्याला मनोमन वाटत होते. म्हणून तो नेहमी आई-वडिलांना एकांत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत होता. ''आमची एकत्र फॅमिली फुटली.''(पृ.११६) विलास म्हणाला. त्यावर हर्षद मृदूपणे म्हणतो, ''विलास, मला सारखं वाटतंय, तुमचं कुटुंब एक होणार!... विलास नक्की तुमचे सगळे कुटुंब एक होणार पुन्हा''(पृ.११६)

हर्षद कुटुंबव्यवस्थेकडे दुरस्थ होऊनच पाहत असतो, कारण, आईच्या अफेअरच्या कल्पनेनेच तो सतत पछाडलेला, गोंधळलेला, तणावग्रस्त असतो. हर्षदला ज्या ज्या वेळी टेन्शन येत असे त्यावेळी तो स्कुटरवर स्वार होतो. सिग्रेट पितो, श्रीमंती एन्जॉय करतो. ह्याविषयीचे वर्णन लेखक करतो, ''हर्षदने बिअरची, बिर्याणीची ऑर्डर दिली, सिग्रेटचे पाकीट मागवले. तासभर श्रीमंती एन्ज्यॉय केली.''(पृ.१०५) यावरून हे लक्षात येते की, उच्चभ्रू कुटुंबव्यवस्थेतील मुलांच्या समस्या वेगळ्या असतात, ते घरच्या कारणांमुळे व्यसनाच्या आहारी गेलेले असतात.

**मुकुंद :**

हर्षदच्या मित्राचे नाव मुकुंद होते. दोघे एकत्रित काम करीत होते. मुकुंदच्या घरचे सारे काही चमत्कारिक होते. मुकुंदाच्या आईची दोन लग्ने झाली होती. मुकुंद हा दुसऱ्या लग्नाचा होता. त्याच्या आईने पहिल्या नवऱ्याला सोडले होते. मुकुंदच्या जन्मानंतर दोन वर्षांनी त्याच्या आईने दुसऱ्या नवऱ्यालाही सोडले होते. त्याच्या आईचे दोन्ही नवरे जिवंत होते. आई व मुकुंद दोघेही मावशीकडे राहत होते. मावशीने तिच्या बंगल्यात मुकुंदला व त्याच्या आईला दोन खोल्या दिल्या होत्या. मुकुंद बारावी पासून नोकरी करत होता. बापाला त्याने एकदाही पाहिलेले नव्हते. मुकुंद धीटपणे जगत होता. नववी व दहावीत असताना तो चिडचिडा स्वभावाचा होता. आता मात्र तो

घरचे काही लपवत नव्हता. हर्षद व मुकुंद यांच्या बऱ्याच गोष्टींमध्ये सारखेपणा होता. डरायचे नाही आपले जीवन मस्त उभे करायचे अशी त्या दोघांची धारणा होती.

**किशोरीलाल :**

किशोरीलाल हे हर्षदच्या वडिलांचे जीवलग मित्र होते. त्यांचे विचार अध्यात्मीक होते. हर्षदच्या वडिलांचे किशोरीलालवर व किशोरीलालचे हर्षदच्या वडिलांवर प्रेम होते. हर्षदचे वडील किशोरीलालांकडे जातात म्हणून कोणतेही निर्णय शांततेत घेतात असा सर्वांचाच समज झाला होता.

**संजय :**

संजय हा विलासचा डॉ. नारखेडकरांच्या इन्स्टिट्यूटमधील मित्र होता. डॉ. निरगुडकरांनी त्याला फोटोग्राफी शिकवली होती. त्याचा उपयोग म्हणजे विलासचा पेपर ॲक्सेप्ट झाल्याची बातमी स्थानिक वर्तमानपत्रात येण्यासाठी झाला होता. संजयला नारखेडकरांच्या इन्स्टिट्युटमध्ये सेक्रेटरी व्हायचे होते. तसेच संजयचा प्लॅन होता की, विलासनेही डॉ.करवल्यांच्या इन्स्टिट्युटमध्ये सेक्रेटरी व्हावे. दोघेही मित्र म्हणून राहणारे होते. दोन्हीही इन्स्टिट्युटमधील प्रयोगशाळा, लायब्ररी, लेक्चररूम स्वच्छ ठेवणार होते. विलासचा पेपर इन्टरनॅशनल जर्नलमध्ये ॲक्सेप्ट झाल्यावर विलासचा पहिला सत्कार संजयने केला होता. मोठा गुच्छ आणि पाच किलो पेढे घेऊन तो आला होता. दूधघाट उतरल्यावर उजवीकडे दरी लागते तेथे हा पेपर लिहिण्याची आयडिया पहिल्यांदा सुचली होती. संजय व विलास दोघेही त्या ठिकाणी कॉलेजवरून तसेच गेले होते.

**डॉ.करवले :**

डॉ. करवले हे डॉ. नारखेडकरांच्या इन्स्टिट्यूटच्या फंक्शनचे पाहुणे होते. ते अमेरिकेत केमिकल इंजिनिअर होते. उंच, भक्कम बांध्याचे, सावळे, आरोग्यवान, कपाळावर शेंदराचा छोटा तिलक, पांढरी सलवार, निळाभोर झब्बा, डाव्या खांद्यावरून लाल करवतीकाठाचे मोतिया रंगाचे उपरणे, चेहऱ्यावर गांभीर्य, मंदसे हास्य, मृदू आणि नम्र आवाज ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये होती.

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : 'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीतील तिसऱ्या भागातील पुरुष चित्रणांमध्ये मुलीचे वडील (बाबा) मेजर सावदे, भास्करराव, मुलीच्या वडिलांचे मावस भाऊ

दरेकर, माधवराव, वकील, मुलीचे सासरे, मुलीच्या वडिलांचे जावई अशा प्रकारच्या पात्रांचा कौटुंबिक पात्रांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**मुलीचे वडील (बाबा) :**

'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' या भागातील मुख्यपात्र मुलीचे वडील. त्यांच्या नित्यक्रमात टि.व्ही.वरील बातम्या ऐकणे, अन्न गरम करणे, वाढून घेणे, जेवण करणे इत्यादी गोष्टी होत्या. ते जेवतांना एकट्याचा नव्हे तर देवांचा विचार करत होते. आभाळ भरुन आले आणि पाऊस आला की त्यांना श्वासोच्छवास करतांना छातीत दुखत असे. ते पूर्वी व्यवहार करताना लोकांचे वागण्याचे अर्थ लावत होते. ते साधे सरळ जगले होते. वर्तमानपत्र चाळणे, मुलीचा फोन, नेहमीचा बाजारहाट, ज्येष्ठ नागरिकांबरोबर संध्याकाळी फिरणे... लाईट बोलणे.(पृ.क्र.१७९) 'सदुसष्ट वर्षाचे विधूर वडील मुलीच्या सासरी जावयानं दिलेल्या वर्तमानपत्राला डोळे लावून गप्पपणे कोचात बसून आहेत.' असा एकही फोटो दिवाळीच्या वर्तमानपत्रातील पुरवणीमध्ये नाही. मुलीच्या घरी नातीसाठी त्यांचे स्थान दोन नंबरचे आजोबा हे होते.

**मेजर सावदे :**

मेजर सावदे पासष्टीतले होते. बाबांना (मुलीच्या वडिलांना) दोन वर्षांनी लहान होते. सेवानिवृत्त झाले होते तरी ॲक्टिव्ह होते. जॉगिंग, टेनिस, बिझनेस एकदम फिट्ट होते. पोट बिलकुल नव्हते. रोज ड्रिंक घेत होते तरी आहार मेडीकलप्रमाणे घेत होते. फळे, सॅलड, व्हाईट मीट. सगळ्या गल्लीत मेजर सावद्यांची माहिती झालेली होती की, मेजर सावदे ह्या वयातही सेक्स करतात. त्यांची बायकोही देखणी होती. मेजर सावदे यांना दोन मुलगे न् एक मुलगी होती. एक मुलगा अमेरिकेत होता, दुसरा इथेच राहून बिझनेस, इम्पोर्ट-एक्स्पोर्टचा करत होता. मुलगी कॅनबेराला होती. अचानकपणे एक दिवस दुपारी एक वाजता गडबड झाली होती. सर्वत्र चर्चा सुरु होती. शेजारच्या बंगल्यातील मेजर सावदे गेले.

**भास्करराव :**

भास्करराव हे शेजारच्या अपार्टमेंटमध्ये राहणारे, चांगले नावलौकीक कमावलेले. हायस्कुलमध्ये हेडमास्तर होते. तीन वर्षापूर्वी हेडमास्तर पदावरुन सेवानिवृत्त झाले होते. उंचीने व वजनाने तसे बेतास बेत पण चपळ न् कामाला वाघ होते. उत्साही, हाडाचे शिक्षक होते. स्वतःच्या खर्चाने 'पालक आणि पाल्य' या विषयावरचे त्रैमासिक चालवत होते. समाजाबद्दल फार तळमळ

असणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. कावेरी लहानपणापासूनच टोकाचे आणि विचित्र बोलणारी होती. 'पालक आणि पाल्य' यांचे संबंध फार अवघड होत चाललेले आहेत. यावरील हे त्रैमासिक होते.

**मावस भाऊ :**

मुलीच्या वडिलांचे मावस भाऊ आणि वडील एकाच वयाचे होते. त्यांचा बिझनेस होता. नव्वद कि.मी. वरच्या गावात तो बिझनेस होता. टाऊन होते. गणपतीच्या मूर्त्या विकणे, आंब्याच्या दिवसात हापूस आंबे विकण्याचे काम तो करत होता. मावस भावाची नात बी.टेक. होऊन नुकतीच अमेरिकेला गेली होती. मावसभावाचे लग्न, मुलगा, नात, नातू अगदी सगळे भराभर झाले होते. त्याची बायको संसारात हुशार होती. मुलांना खूप शिकविणे त्याला जमले नव्हते. नात, नातू चांगले शिकत होते. मावसभाऊ उत्साहाने, आनंदाने नातीबद्दल बोलत होता. ''जीवनाचा अर्थ काय?'' या प्रश्नाचे उत्तर मात्र त्याला सांगता आले नाही. उलट तोच म्हणाला, ''आनंदाच्या वेळी नसतो विचारायचा हा प्रश्न, तू हल्ली काय तत्त्वज्ञानी झालायस की विनोदी झालायस?''

**दरेकर :**

दरेकर दहा ते दोन वाजेपर्यंत गाढ झोपत होते. नगारा वाजला तरी त्यांना जाग येत नव्हती. बरोबर दोनला जाग येत होती. दोन ते पाच ते जागे असत. परत पाच ते साडे सात झोप घेत असे. घरचेही त्यांना झोपू देत होते.

**माधवराव :**

रामकथा ऐकून झाल्यावर सात ज्येष्ठ नागरिकांनी गणपतीला जाण्याची पद्धत माधवरावांनी पाडली होती. हा गणपती गल्लीतच होता.

**वकील :**

'भूकंप होतोय, खाली चला!' असे म्हणणारे अपार्टमेंटमधील शेजारचे वकील शेजारधर्म निभावताना दिसतात. रामकथा सांगणारा गवंडी महाराज व फिरायला जायच्या ग्रुपमधील तात्या. इत्यादी गौण पात्रांचाही या कादंबरीत प्रसंगानुरूप समावेश करण्यात आलेला आहे.

**४.२.१५. खारीच्या वाटा :**

**लेखक : (मी)**

ल.म. कडू यांनी कादबंरीत स्वतःला 'मी' असे म्हणून लेखन केले. लेखक हा या कादंबरीत इयत्ता चौथीत शिकणारा किशोरवयीन मुलगा आहे. मरणासक्त अवस्थेत पडलेल्या खारीला की जिला मुले त्रास देत होती. त्या त्रास देणाऱ्या मुलांच्या तावडीतून खारीला सोडवून

घरी नेणारा हा मुलगा प्रेमळ वाटतो. त्याने खारीचे योग्य संगोपन केले. तिची सेवासुश्रुषा केली. त्याच्या संगोपणामुळे खार एकदम ठणठणीत झाली. दिन्याशी त्याची घनिष्ठ मैत्री होती. दिन्याबरोबर राहून त्याने अनेक गोष्टी आत्मसात केल्या होत्या. हे लेखक प्रांजळपणे मान्य करतो. चंदर या कलाप्रेमी मित्रांबरोबर त्याने मूर्ती तयार केल्या. म्हणजेच लेखकाच्या अंगी मूर्ती तयार करण्याची कला होती. आईने सांगितलेली कामे तो आवडीने करीत असे. आईने त्याला घायपात नदीत भिजवायला सांगितले होते. तसेच गुरांना नदीवर पाणी पाजायलाही तो घेऊन जात असे. म्हणजेच आई–वडिलांना कामात मदत करणारा मुलगा आहे हे याप्रसंगावरून समजते. आईच्या आज्ञेचे तो पालन करतो.

रानात गुरे चरायला घेऊन गेल्यानंतर त्या ठिकाणी मुले विविध खेळ–खेळत. लेखकही त्या सर्वांमध्ये खेळाचा मनसोक्त आनंद लुटीत असे. दिन्याच्या प्रत्येक करामतीचा व लुकीच्या प्रत्येक कृतीचा तो एकमेव साक्षीदार होता. त्यामुळेच दिन्याच्या व लुकीच्या संदर्भातील प्रत्येक अनुभव लेखकाने आपला मित्र दिन्याला कादंबरी नायक बनविल्याची अनुभूती देतो. त्यातूनच लेखकाचे मोठेपण सिध्द होते. धरणामुळे गाव सोडून जाण्याच्या वेळी त्याला अतिशय दुःख होते. अतिशय जड अंतःकरणाने तो लुकीचा निरोप घेतो. दिनू ज्या वेळेला गाव सोडून जातो. त्यावेळेला लोकांना तो भेटत नाही. याची सलही लेखकाला लागून राहते. पण कदाचित तो ताटातूटीचा प्रसंग ते दोघेही सहन करू शकले नसते म्हणून त्यांची भेट झाली नसावी असे मला वाटते. शेवटी आपला परममित्र दिनू याने लुकीसाठी दिलेल्या कापण्या लेखक चिंचेच्या झाडाच्या खोडात ठेऊन जातो. यातून लेखकाचे सहृदय मन व्यक्त होते.

**दिनू :**

दिनू हा लेखकाचा वर्गमित्र. दिनू आणि लेखक इयत्ता चौथीमध्ये शिकणारे विद्यार्थी होते. दिनूचे घर मागच्या आळीत होते. दिनू नियमित शाळेत जात नसे, म्हणून त्याचे गुरूजी त्याला रागवत. पाड जमविण्यासाठी तो झाडे धुंडाळीत फिरत असे. लेखकाने खारीचे पिलू आणल्याचे दिनूला सांगितले. लुकीच्या गमती दिनूला आवडत होत्या म्हणून तो नियमितपणे लेखकाच्या घरी येत असे. दिन्याची गुरे राखोळी नसल्याने गुरांच्या चारा पाण्याचे दिनूलाच पाहावे लागत होते. गुरांना नदीवर पाणी प्यायला न्यावे लागत होते, हे सर्व करूनही तो लेखकाच्या घरी यायचा ‘हरेके बाबतीत काहीतरी वेगळं करण्याची दिन्याची खोड’(पृ.३२) म्हणूनच लुकीला भाताची शितं बशीत न ठेवता लेखकाच्या तळहातावर, दुसऱ्या दिवशी कोपराच्या खळग्यात, तिसऱ्या दिवशी खांद्यावर

ठेवल्याने लुकीची हालचाल वाढली. एका प्रकारे दिनूने तिच्याकडून हातावर चढण्या उतरण्याचा सराव करून घेतला. पण जेव्हा त्याने एकदा लुकीला फसविण्याचा प्रयत्न केला तेव्हा मात्र ती फुरगटुन बसली. तेव्हा दिन्याला अपराध्यासारखं वाटलं त्याच्या तो प्रसंग जिव्हारी लागला. 'नापास झाल्यासारखं वाटायला लागलं.'(पृ.३७) लुकीचा रूसवा घालविण्यासाठी त्याने तिला खायला कापण्या आणल्या. तळहात, कोपरे, बखोट्यावर एकाचवेळी एकएक कापणी ठेवली त्याचा हा उपाय लागू पडला. 'दिन्याचं डोकं और चालायचं औचिद्यासारखं काहीतरी ठरवायचा. ठरलेलं करून बघायचा. त्याशिवाय जिवाला शांतता नाही. त्याची धाटणीचं न्यारी. जगाआगळी.'(पृ.५३)

दिन्याच्या मते सर्वात आधी पाडाचा आंबा खार खाते. त्याने बुद्धीचातुर्याने पाड शोधण्यासाठी खारीचा वापर करून घेतला. दिन्याच्या मनाचा ठाव लागणे कठीण होतं. मनाजोगी कल्पना सुचली की तो आपल्या कानाची पाळी पकडायचा. लुकी राहायची लेखकाच्या घरी, लेखकाच्या अंगाखाद्यांवर खेळायची 'एवढ असूनही लुकीची भाषा दिन्यालाच कळायची.'(पृ.६२) खोबऱ्या आंब्याचे पाड खाण्यास इतर मुलांनी जाऊ नये म्हणून आंब्याच्या ढोलीत नाग आहे त्याला आम्ही पाहिलय असे त्यांना त्याने सांगितले. इतर मुले भितीने खोबऱ्या आंब्याकडे फिरकली नाहीत. दिनूने व लेखकाने खोबऱ्याचे मनसोक्त पाड खाल्ले. त्याची बतावणी कामास आली. यावरून 'दिनू पक्का धोरणी'(पृ.६३) हे आपणास कळते. तसेच आंब्याची आढी कशी लावावी हे लेखकाला दिनूमुळेच समजते.

आदल्यावर्षी त्यांनी लपवलेल्या हिरड्यावर कोणी तरी डाव मारला त्याचा बदला घेण्याचे त्याने ठरविले. 'एखादी गोष्ट त्याच्या डोक्यात घुसली की तो शेवटाला नेणारच!'(पृ.११९) दिनूने लुकीला हिरड्यांचा वास हुंगायला लावले. नंतर लुकीला हिरड्याचे इतर मुलांनी लपवलेला ऐवज शोधण्यास नेले. लुकीच्या मदतीने इतरांच्या ऐवजावर डल्ला मारला.

गुरूजींनी कितीही मारले तरी न रडणाऱ्या दिनू. धरणामुळे त्याची बहिणीपासून ताटातूट होणार या कल्पनेने आभाळ कोसळावं तसा रडला म्हणजे त्याचा मोठ्या बहिणीवर फार जीव होता. दर सणाला बहिणीला आणण्यासाठी तो मुऱ्हाळी म्हणून जात असे. गाव सोडण्यापूर्वी काही दिवस अगोदर दिनू व लेखक गावात फिरले. ज्या दगडावर लेखक व चंदरने चित्र काढले त्या दगडावर प्रेमाने हात फिरवला. ज्या दिवशी दिनूचे सामान ट्रकमध्ये भरले त्या दिवशी ट्रक लेखकाच्या घराजवळ थांबला. त्याच्या आईने लुकीसाठी कापण्या आणून दिल्या पण दिनू मात्र लेखकाला भेटण्यासाठी गाडीतून उतरला नाही. त्याने लेखकाचा निरोप घेतला नाही याची चूटपूट

लागली. कदाचित दिनूला लेखकाला सोडून जाताना पाहण्याचे धारिष्ट्य नसेल असे वाटते. त्यामुळे एकमेकांची नजरानजरही त्या दोघांना सहन न होणारी होती. ताटातूट होणार होती.

अशाप्रकारे चाणाक्ष, बुद्धीमत्ता असलेला, डोक्यात आलेल्या कल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविणारा मुलगा, गमती-जमती करणारा, लुकीला लळा लावणारा, हळव्या मनाचा, गुरे सांभाळून आई-वडिलांना मदत करणारा, बहिणीवर अपार प्रेम असणारा असा हरहुन्नरी दिनू कादंबरीत महत्त्वाची भूमिका वठविणारा वाटतो. तो मनाला भावतो.

**धोंडिबा :**

धोडिंबा हा गुरे राखण्याचे काम करीत असे. सालाना पध्दतीने लेखकाची गुरं धोंडिबाकडे राखळी होती. पेरण्या झाल्या की गुरं धोंडिबाच्या ताब्यात होती. तर धान्याची पोती घरात येईपर्यंत गुरे धोंडिबाकडे असत. त्या बदल्यात त्याला ठरलेल्या धान्याचा वाटा द्यायचा अशी पध्दत होती. धोंडिबाकडे घुंगराची काठी होती. 'एखाद्या बादशहानं मानदंड सांभाळावा तसा धोंडिबा ही काठी बाळगुन असायचा.'(पृ.१७)

धोंडिबा अंगानं कडक, चिकट, स्वभावानं मायाळू, इमानदार कधी खटखट नाही. मटमट नाही. गुरांना आपले समजून सांभाळी. दुभत्यांना ओला चारा, पेंड घाली. कालवडीसाठी शेलका पाला आणायला विसरत नसे. सारं मन लावून करीत असे. पिकांची काढणी झाली की धोंडिबा घरी जायचा व म्हणायचा, 'आता ही जितराबं आन् तुम्ही सांबाळा' ''माझा जीव निस्ता टांगणीला लागला होता.''(पृ.७२) त्याचे हे मत अगदी खरं होतं. पावसात काही जनावरं ढढाळणी लागत. गळफटुन जात. त्यांना घरीच बांधून ठेवावं लागे. त्यासाठी पेंढी आणायची. चरता चरता चाभरट जनावरं शेंडा मारायला लसलस करीत. ओल्या घशीला घसरून पडलं तर फऱ्याचा खुबा निखळण्याची भीती. त्यांच्यावर ध्यान ठेवायचं. गाभण जनावर तर तळहाताच्या फोडागत जपावं लागे. या सगळ्यातून सही सलामत सुटलेला धोंडिबा गाऱ्हाणं मांडायचा, ''आता आपल्याच्यानी नाय निभत. म्होरल्या साली. दुसरीकडं बघा.''(पृ.७३) अस निर्वाणीचं सांगून गेलेला धोंडिबा पुढच्या वर्षी पुन्हा यायचा. अशा प्रकारे धोंडिबा गुरांवर नितांत प्रेम करणारा त्यांची प्रेमाने काळजी घेणारा गुराखी होता.

**गुरुजी :**

लेखकाला शिकविणारे गुरूजी कडक शिस्तीचे होते. बिनभिंतीच्या उघड्या शाळेत वर्गाच्या जागा गुरूजींनी ठरवून दिलेल्या होत्या. बिगरी आणि इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गाला

शिकविण्याचे काम एकटे गुरूजीच करत होते. गुरूजी मुलांना धुळपाटीवर अक्षरं गिरवायला सांगत. गुरूजी मुलांच्या ओळींमधून फिरत. चौथीच्या वर्गाला मात्र दगडी पाटी होती. गुरूजींच्या हातात लवलवती हिरवीगार छडी असायची. जो मुलगा लिहितांना चुकेल त्याच्या पाठीवर रपकन सपका बसायचा. ज्या दिवशी नवीन अक्षर शिकवलं जायचं त्या दिवशी तर छडी पिचून जायची. चौथीचा वर्ग मात्र वेगळा असायचा. ''चौथी म्हणजे शाळेतली शेवटची परीक्षा. म्हणून महत्त्वाची. गुरूजी विशेष लक्ष देत.''(पृ.६) गुरूजी अभ्यास मात्र अगदी हडसून-खडसून घेत होते. सगळे विद्यार्थी पास होऊन निकाल चांगला लावण्यासाठी ते सतत प्रयत्नशील असत.

गुरूजी एकटेच रहायचे. ते मितभाषी होते. त्यांचे बरेचसे व्यवहार आवाज, हातवारे, खाणाखुणा करून चालत. म्हणजेच गुरुजींनी टेबलावर दोनदा मूठ आपटली तर मधली सुट्टी व एकदा आपटली म्हणजे 'गप्प बसा'. टाळी वाजवून हात वर म्हणजे सगळ्यांनी बे चे पाढे म्हणा. कधीकधी त्यांनी टोपी टेबलावर ठेवली की त्यांचे काहीतरी बिनसलय अस वर्गातील मुलांनी समजायचं. गुरुजी शुन्यात बघत राहायचे. एकटे एकटे हरवलेले. शाळाच गप्प गप्प होत असे. लेखकाचे गुरूजी हाडाचे शिक्षक होते. मुलांनी वेळेवर व नियमित शाळेत यावे. अभ्यास करावा. यासाठी ते मुलांना शिक्षाही करत. सतत मुलांचा अभ्यास घेण्यात तल्लीन असत. पण त्यांच्या वैयक्तिक जीवनामध्ये त्यांना कशाची तरी चिंता होती. हे त्यांच्या कुठेतरी शुन्यात बघण्यातून किंवा एकटे-एकटे हरवल्यासारखे राहिल्यावरून लक्षात येते.

**चंदर :**

चंदर हा लेखकाचा मित्र, गणतात्याचा मुलगा. चंदरला मातीच्या मूर्ती करण्याचा छंद होता. लेखकाचा अगदी जवळचा मित्र दिनू याला मात्र चंदरशी असलेली लेखकाची मैत्री आवडत नसे. 'चंदर आला की दिन्या फटकून राहायचा.'(पृ.८३) चंदर आणि लेखक गुरांना चारायला घेऊन गेल्यावर तिथे आखरावर बसून गणपती, मडकी, लाटणं, बैल अगदी भूतांच्या मूर्तीसुध्दा!(पृ.८४) घडवायचे. मातीत थोडं शेण घालून मळल्यावर मूर्ती तडकत नाहीत हा शोध चंदरनेच लावला होता.

लेखकाला एक खिळा सापडला. त्या खिळ्याचा उपयोग छन्नी सारखा करून लेखकाने दारातल्या दगडावर, चिपेवर डोंगर, सूर्य कोरला. लेखकाने चंदरला छन्नी व कोरलेल्या चित्रांविषयी सांगितले तेंव्हा चंदरने लेखकाची ही कलाकृती पाहिली. लेखकाने ठिसूळ खड्याने दगडावर बैल काढला. चंदरने त्या रेघांवरून छन्नी चालवित थोड्याच वेळात बैल रेखाटला. त्या दोघांना दगडावर

छन्नीने चित्र काढण्याचा अगदी छंदच लागला. खडबडीत दगड छन्नीवर मारून हात लाल झाले यावर उपाय चंदरला सुचला त्याने उखळात ठेवायचा गरगरीत आणि गुळगुळीत गोटा वापरायला घेतला. चंदरने पुरूषभर उंचीचा एकही फट नसलेला, सपाट, गुळगुळीत खडक हेरला. त्यावर त्या दगडाला शोभेल असे चित्र काढण्याचे ठरविले. लेखक व चंदर या दोघांनी मिळून त्यावर दोन सुंदर मोर काढले व त्या दोन मोरांच्या मध्ये दिन्याच्या सांगण्यावरून लुकीचे चित्र साकारले. चंदरने लुकी असं नावही कोरलं. 'ल' चा उकार मोठा करून त्याला शेपटीसारखा झुबकाही काढला.'(पृ.८९) यावरून चंदरची कल्पनाशक्ती ही उत्कृष्ट होती हे लक्षात येते. हे चित्र साकारायला ते महिनाभर दगडाशी झुंजत होते. म्हणजेच त्यांच्याकडे चिकाटी होती.

मूर्ती बनविण्याच्या छंदामुळे चंदरने व लेखकाने गावातल्या अनेक लोकांच्या मूर्ती बनविल्या. त्यामध्ये प्रामुख्याने ढेरपाट्या बाबूराणू, बुटकी राही, छपरी मिशीवाला काशा, खुरट्या दाढीचा बाबजी, एक डोळा नसलेला शिरप्या, लुकडी सुली, मोठ्या कानाचा सुपल्या, तोतरा कत्या अशा कितीतरी जनांना त्यांनी मातीत बांधून ठेवले होते. त्यांच्या नकला करण्यात त्यांना मजा वाटे. चंदर संगळ्यांचे आवाज काढण्यात पटाईत होता. चंदर हे आगळवेगळं व्यक्तिमत्व होत. एक उत्कृष्ठ मूर्तीकार, नकलाकार असा लेखकाचा तो सखा होता. चंदरमुळे लेखकही त्याच्या सारखा उत्कृष्ठ मूर्तीकार बनला. 'सुसंगती सदा घडो' याचा प्रत्यय वाचकाला चंदर व लेखक यांच्या मैत्रीमुळे येतो.

**राजा कराडकर :**

राजा कराडकर हा लेखकाच्या गावातील एक सुशिक्षित व्यक्ती होता. सत्यनारायणाची पूजा आणि आरत्या पुस्तकात पाहून तो म्हणायचा, ''माणूस मोठा मस्तवाल. तालेवार आणि तोंडाळ.''(पृ.१२४) पूजेचे ताट घेऊन गावातल्या सर्व देवांची पूजा तो नित्यनेमाने करायचा. परततांना वाटेत कोणी आडवं गेलेलं त्याला चालायचं नाही. कराडकर जवळ आला की माणूस डोक्यावरील ओझ्यासह खाली बसायचा त्यामुळे माणसाची वाटेवर पडलेली सावली आखूड व्हायची वाट मोकळी झाल्यावर कराडकर तिथून जायचा. तो कोणाची सावलीही ओलांडीत नसे.

कराडकरांचे गावात दुकान होते. दुकान म्हणजे ओसरीवर एक बाकडं होतं त्यावर काही बरण्या मांडलेल्या असत. चहापावडर, काडीपेटी, चुना, तंबाखू, गूळ, पकरीचे पुडे व सणासुदीला मोठ्या गोळ्या एवढच त्यांच्या त्या छोटेखानी दुकानात असे. कधीतरी तो माल आणण्यासाठी जात असे. त्याचा कुणीतरी नातेवाईक सरकारी नोकरीत होता. त्या नातेवाईकांकडून त्यांच्या

गावच्या नदीवर धरण होणार ही बातमी त्याला कळली व ती त्याने गावकऱ्यांना सांगितली, पुढे जेव्हा प्रत्यक्ष धरणाच्या 'गावच्या सगळ्या गोष्टी त्याच्याच घरी ठरायच्या.'(पृ.१३५) त्यावेळी सिनेमावाले दोन व्यक्ती ही कराडकरांच्या घरी आले होते. त्यांना धरणग्रस्त धरणामुळे खूश झालेत असा प्रसंग दाखवायचा होता. कराडकरांनी गावकऱ्यांना त्यांची सर्व पूर्व तयारी करायला सांगितले. थोडक्यात काय तर सुणासुदीला लग्नप्रसंगी जसं गाव दिसतं तसं दिसायला हवं... अस साहेबांच म्हणण होतं.'(पृ.१३५) हे कराडकरांनी लोकांना नीट समजावले. राजा कराडकर हे गावातील लोकांपेक्षा वेगळं व्यक्तिमत्व होतं. देवभक्त, लोंकाच्या सावलीचीही विटाळ मानणारा होता. गावातील लोकही कराडकरांना मान देत असल्याचे स्पष्ट होते.

**बबन :**

लेखकाच्या वर्गात असलेला हा बबन सतत कावरा बावरा कुठतरी हरवलेला असायचा. त्याचे वर्गात लक्षच नसायचे. नुसता भांबावलेला असायचा. म्हणून तर गुरूजी त्याला 'भांब्या' म्हणत त्यांचे मित्रही त्याच्या उपरोक्ष त्याला भांब्या म्हणत, तो असताना मात्र बब्या म्हणायचे. लेखक म्हणतात, 'हा बबन म्हणजेच भांब्या दिसला की मला आमचा बोका आठवायचा.'(पृ.१५) तिरकस बघणं, बेगुमान संथ चाल, पैलवानी अक्कड, आपल्याचं नादात, तरीही सावध असे. धडधाकट यष्टी दोघांचेही सर्व काही सारखंच होते त्यावरूनच लेखक बोक्याला भांब्या म्हणू लागला होता. बोक्याचं तेच नाव पडलं. फक्त बबन घरी आला तर लेखक बोक्याला तशी हाक मारीत नसे. कारण बबन तापट होता, तगडा होता. नसती बलामत गुदरायची असे लेखकाला वाटायचे.

**दत्ता :**

दत्ता हा लेखकाचा वर्गमित्र होता. दत्ताचा मामा पुण्यात राहत होता. त्याला त्याचा मामा काळ्या शाईत नाव लिहिलेली टोपी देत असे. त्या टोपीवरील दत्त सायब पांचाळ हे नाव टोपी धुतली तरी जात नसे. त्याचा शर्टही वेगळाच असे. त्याच्या शर्टवर छातीवर येईल असा तळहाताच्या गोलाई एवढा शिक्का, मधोमध कमळ, त्यात उभी देवी, दोन्ही अंगाला सोंडावर केलेले हत्ती, सोंडेत फुलांच्या माळा. गोलाच्या बाहेर लक्ष्मी मिल अशी अक्षरे होती. दत्ता त्या सदऱ्यामुळे ऐट दाखवित असे.(पृ.८,९) अशाप्रकारे दत्ताची वेशभूषा होती.

**भांब्या :**

भांब्या म्हणजे लेखकाने पाळलेला बोका होता. तो सर्वसाधारण मांजरात मोडणारा नव्हता. तब्येतीनं तगडा, भूरकट, अंगावर काळेपट्टे वाघासारखे. कपाळाच्या मधोमध पांढुरका चट्टा टिळा लावल्यासारखा खुलून दिसायचा. त्याची नजर भेदक होती. तांबूस नाकाखाली जबड्यावर लवलवते केस जणू लव्हाळ्यासारखे दिसत होते. त्याची शेपटी जाडजूड होती. मजबूत फरे आणि दणकट पाय या सर्व वर्णनावरून असे लक्षात येते की, भांब्याचा एकूण पैलवानी बाज होता. दिसायला उग्र असलेला हा भांब्या वृत्तीने मात्र प्रेमळ होता. म्हणूनच कोंबडीची छोटी पिलं त्याच्या अवतीभवती फिरत. चोरटी मांजरं आणि उंदीर भांब्याला घाबरून असत. एखाद्या सैनिकासारखा तो धान्याच्या पोत्यांकडून येरझरा घालत असे. भांब्याचे घरातील माणसांवर फार प्रेम होते. तिसऱ्या प्रहरी माणसांचा कामावरून येण्याचा त्याला अचूक अंदाज असे. आई व अप्पाच्या शेतावरून परतण्याच्या वाटेवर तो जाऊन बसायचा. आई अप्पांसमवेत घरी यायचा. वरकरणी तापट वाटणारा भांब्या मात्र फणसाच्या गऱ्याप्रमाणे गोड होता. घरातील माणसांवर, प्राण्यांवर त्याचे अतिशय प्रेम होते.

**४.२.१६. फेसाटी :**

**काका :**

लेखक व त्याची भावंडे त्यांच्या वडिलांना काका म्हणत. काका म्हणजे अविरत कष्ट करणारी कष्टाळू व्यक्ती आयुष्यभर मोलमजूरी करण्यात त्यांचा सारा जन्म गेला. कर्जबाजारी शेतकऱ्यांचे विदारक चित्रण त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्पष्ट होते. लेखकाच्या वडिलांना एक भाऊ होता. त्याला सर्वजण आण्णा म्हणत होती. आण्णा व लेखकाची आजी यांना मोडता घालूनही काकाने शेती खरेदी केली. शेतीसाठी मेंढर विकली चुलता सतत करबूर करीत होता. काकाच्या भावाने संकट समयी कधीही काकाला मदत केली नाहीच पण सख्खा भाऊ सतत काकाच्या समोर संकटे उभी करीत राहिला. काकाची आणि चुलत्याची सतत भांडणे व्हायची. काकाला सगळ्या पोरीच आहेत एकच पांगळ पोरगं आहे असे म्हणून चुलता काकाला अर्ध शेत देण्यास नकार द्यायचा. चुलत्याला चार मुलं होती. म्हणून स्वतःच्या मुलांना शेती जास्त मिळावी म्हणून चुलता सतत काकांशी वाद घालयचा. भांडणात काका म्हणायचा, ‘अरं देव वरं काय डोळं झाकूण बसला नाय, म्या काय कुणाचं वाटूख केलं नाय. देव दिल येकादं पोरगं. सगळा माझा पांग

फिटलं.'(पृ.९७) काकू काका मुलासाठी सगळ्या देवधर्माला नवस करीत होती. शेवटी सिद्धनाथाच्या कृपेने लेखकाचा जन्म झाला. काकू-काका सगळ्या देवाला जात होती. काकांचा दोन्ही मुलांवर व मुलींवर फार जीव होता. पाच पोर पण काकाने मुलींचा कधीही राग राग केला नाही. कर्ज काढून काकाने प्रत्येक मुलीचे ठिकठाक लग्न लावून दिले. पहिल्या मुलीच्या लग्नाचे कर्ज फिटत नाही तेच दुसऱ्या मुलीच्या लग्नासाठी काका कर्ज काढीत होता. प्रसंगी काका दावणीला असलेली गुरे देखील विकावी लागली.

काकाच्या जीवनातील एक घटना म्हणजे काका एकदा यमदरबारातून परत आला. हिराक्काचे लग्न होऊन चार-पाच दिवसच झाले होते. एकदमच काकाच्या पोटात दुखायला लागले त्यांना रक्ताच्या उलट्या होऊ लागल्या होत्या. त्या रात्री पाऊस खूप पडत होता. लेखकाच्या आंदा मामाने बैलगाडीतून उमदीत बार्शीकरच्या दवाखान्यात नेले पण डॉक्टरने जतच्या मोदी डॉक्टरांकडे नेण्यास सांगितले, मोदी डॉक्टरकडे नेले त्याने तपासले व सोलापूरला न्यायला सांगितले. आतड्याला पीळ पडला होता. डॉक्टरांनी ऑपरेशन केले. सत्तावीस टाके पडले होते. अशा प्रकारे महत्प्रयत्नाने काका मरणाच्या दारातून आला.

काकाचे सगळे आयुष्य हे फक्त कष्ट करण्यातच गेले मुलींचे लग्न करणे त्यासाठी कर्ज पांगळ्या दादाला म्हणजे मोठ्या मुलाला शिकायला होस्टेलला ठेवले पण तो शिकला नाही. शेवटी त्याला दुकान सुरु करुन दिले त्यासाठी कर्ज म्हणजे सगळे आयुष्य हे कर्ज फेउण्यातच गेले. म्हणून सतत मोलमजूरी नशिबी आली. शेतावर फार प्रेम होते. म्हणूनच जेव्हा दादा शेत विकून कर्ज फेडू असा प्रस्ताव मांडतो तेंव्हा काका त्याला रागावून म्हणाला, ''आम्हाला मातीत घालनं ईकून खात बसं.''(पृ.१०२) कोंड्या पारध्या करुन पैसे उचलेले पण प्रत्येक वेळी फक्त पारध्याला व्याजाचेच पैसे दिले मुद्दल फेडताच आली नाही. कोंड्या पारध्याच कर्ज फेडण्यासाठी शेवटी शांताप्पा पाटला जवळ जमीन गहाण ठेवली. काका हे व्यक्तिमत्त्व कष्टकरी, कर्जबाजारी धनगर समाजातील व्यक्तींचे प्रतिनिधित्व करताना दिसते.

**दादा :**

थोरला दादा म्हणजे लेखकाचा मोठा भाऊ. अगदी गोरा गुटगुटीत दिसायला डोरक्याची केसं काळी भोर होती. त्याच नाक लांबसडक असल्यामुळे कधी ताव जर आला तर काकू त्याची दृष्ट काढायची. आजी दादा बाबत नेहमी म्हणायची, 'माझा पांगळा लय हुशार हाय गं सुबा, हेला शाळा शिकूदी बाय कवा भाकर भाकर म्हणत नाय. दिल तेवढी खातूया ल्योक.'(पृ.१४) दादा

दोन दिवस उपाशी असला तरी कधीही उपाशी वाटत नव्हता. दादा जन्मतःच पांगळा होता. मामाने त्याला सोलापूरच्या दवाखान्यात नेले पण ऑपरेशन केल्यानंतरही पाय नीट होणार नाही असे डॉक्टरने सांगितले. दादाच्या आज्याचे नाव ठेवले होते. 'ईश्वर म्हणून काकूनं काका म्हताऱ्या म्हणत हुती.'(पृ.१०४) दादा चौथी पास झाल्यावर पाचवीत त्याला बोर्डिंगमध्ये ठेवले, 'दादा पांगळाय शिकून लवकर नौकरी लागील अन घरची गरिबी जाईल असं सगळ्यांना वाटायचं.'(पृ.३५) दादा स्वतः जास्त शिकला नाही पण आपल्या भावाने मात्र खूप शिकावे असे त्याला नेहमी वाटायचे म्हणूनच जेव्हा जेव्हा शाळेत न जाण्याचा विचार नाथाच्या मनात बळावला की दादा त्याची समजूत घालून त्याला शाळेत पाठवायचा.

दादाने सुशिक्षित बेरोजगाराचं प्रकरण केलं दुकानासाठी जागा पाहून उमदीत पॉलीशाचा गाळा भाड्याने किराणा मालाच दुकान चालू केलं सहा महिन्यात दुकान मोडकळीस आले बँकाचा हप्ता, दुकानाच्या जागा बदलूनही उपयोग झाला नाही. उधारी थकली शेवटी दुकान बंद करावं लागलं. पुढे दादा अपंगाच्या प्रकरणासाठी फिरत होता. साहेब प्रकरण मंजूर करण्याचे सात हजार रुपये मागत होता. प्रकरण मंजूर झाल्यानंतर सगळ्यांचं किरकोळ भागवून चाळीस हजार रुपये पेटीत ठेवले होते. पण जेव्हा त्याचे घर पेटविल तेव्हा ते चाळीस हजार जळून गेले. जन्मतः अपंग असलेला हा दादा जणू अपयश व नैराश्यच भाळी घेऊन आला असे वाटते. पण लहान भावाला तो प्रेरणा देणारा स्फूर्तीदाता आहे.

**आंदामामा :**

आंदामामा खऱ्या अर्थाने काकूचा पाठराखा होता. वेळोवेळी संकटाच्या वेळी तो त्याच्या परीने मदत करायचा. लेखक म्हणतात, 'माझा मधला मामा आंदा तो पण काम करुन प्वॉटपाणी भागवत होता.'(पृ.३२) म्हणजे तो ही काही फार श्रीमंत नव्हता. पण तरीही तो आधनं-मधनं मदत करायचा. लेखकाच्या बहिणींच्या लग्नात मामाची काकूला साथ होती. काकाच्या म्हणजे लेखकाच्या वडिलांच्या आजारात मामाने काकाला दवाखान्यात नेण्यासाठी काकू बरोबर खूप धावपळ केली मामा डॉक्टर ला विनवित होते, ''कितीबी खर्चं हुंद्यावो. पण माझ्या भनीचा कुकू राहिला पाहिजी बगा. माझ्या भनीसाठी माझा जीव गाहाण ठिवीन. पण वाचवा वो डॉक्टर साहेब.''(पृ.३८) चार दिवस मामा आणि काकू ही दोन्ही भावंड उपाशी होती. आंदामामाने लेखकाची बहिण सुमाताई हिला स्वतःची सून करुन घेतली. सगळा लग्नाचा खर्च ही केला लेखक

म्हणतात, ''मामा तवा मला देवापेक्षा चांगला वाटला.''(पृ.६१) आंदामामा हा एकमेव नातेवाईक होता की ज्याने नाथाच्या कुटुंबाला नेहमी आधारचं दिला.

**थोरला मामाः**

लेखकाच्या थोरल्या मामाचे नाव नामदेव होते. मामाचा थोरला मुलगा धुळाप्पा ह्याच्यासाठी मामाने हिराक्काला मागणी घातली. मामा म्हणाला, ''सुबाक्का मी तुझी पोरगी माझ्या धुळ्याला करतूकी. तू कायबी करु नगुचं. मी सगळं करतू.''(पृ.३६) पण हाच मामा काकूचा जन्माचा वैरी बनला. त्याच्या बायकोने सुनेला म्हणजे हिराक्काला विहिरीत ढकलून दिले. धुळ्या व नामदेव मामाला त्यासाठी तुरुंगात जावं लागलं. जेलमधून आल्या आल्या धुळ्याचे दुसरे लग्न लावून दिले. गहाण ठेवलेली बहिणीची जमीन सोडवण्यासाठी मदतीचा हात दिला पण घात केला तिच जमीन नाथाच्या चुलत्याला विकली. कृतघ्न प्रवृत्तीच्या माणसाचे रुप म्हणजे हा थोरला मामा दिसतो.

**तुकाराम मामा :**

लेखकाचा तुकाराम मामा कामनीला डागत होता. त्याचा हातगुण चांगला असल्याने मामाकडे कामनीला डागायला खूप दूरवरुन लोकं येत होती. एका माणसाला डागायला तो शंभर रुपये घ्यायचा. काकूचे आणि मामाचे लेखक लहान असताना भांडण झाले होते. एकदा नाथाला कामीन झाली होती तेव्हा काकू मुलाच्या जीवासाठी मामाचा राग विसरुन त्याच्या घरी गेली तेव्हा मामा व मामीने काकूला हुसकावून लावले. मामा चवताळून बोलला, ''ये सुभी, उठ माझ्या दारातनं पहिली. हू चलती हिथनं. कशाला हात जोडत्याचं. देवाच्या पुढं हात जोडजाकी देव पावतुया.''(पृ.९६) इतक वाईट बोलल्यानंतर सुद्धा काकूने त्याच्या पायावर डोके ठेवले पण या पाषण हृदयी मामाला दया आली नाही. रक्ताचे नातेसुद्धा वाईट प्रवृत्तीने वागू शकते. याचे उदाहरण म्हणजे तुकाराम मामाचे व्यक्तित्व लेखक साकार करतो.

**चुलता :**

चुलत्याला सर्वजण आण्णा म्हणत होते. चुलता शेडजीच्या इकडे चाकरीला होता. इंजिन दुरुस्ती करायचं काम तो करायचा. त्याला चार मुलं आणि दोन मुली होत्या. चुलत्याच्या विरोधाला न जुमनता काकाने शेत घेतलं पण दोघांच्या नावावर करायला खर्च जास्त येत होता. म्हणून चुलत्याच्या नावावर शेत केलं. उपकराची फेड त्याने उपकाराने केली. पुढे तो काकाच्या नावावर

शेत करण्यास तयार झाला नाही. सतत सख्ख्या भावापुढे संकटे उभे करणारा असा हा लेखकाचा चुलता वैऱ्याप्रमाणेच वागला. चुलता बांधावरचं काटं तोडून नाथाच्या रानात टाकायचा एकदा रात्रीच्या वेळी दोन वाफे मका कापून नेली. चुलत्या विरुद्ध पोलीस स्टेशनमध्ये जावूनही उपयोग होत नव्हता. कारण पोलीस पैसे खावून गप्प बसत होते. पंचही त्याचीच बाजू घ्यायचे लेखक म्हणतो, 'गरीबीनं आमच्या माना मुरगळल्या हत्या.'(पृ.१४३) एक काकाने धान्याची पेरणी केली. उगवण्या अगोदरच चुलत्याने पेरणी केलेल्या त्या शेतात कोंबड्या सोडल्या. वरच्या रानात जाण्याची वाट बंद केली. लेखकाच्या कुटुंबापुढे सतत संकटे निर्माण करणारा त्याचा चुलता हा जन्माचा वैरी ठरतो.

**गौण पात्रे :**

गौण पुरुष पात्रांमध्ये लेखकाला लाभलेले मित्र व शिक्षक यांचा सहभागही महत्त्वाचा आहे. दगड्याच्या नादाने विड्या ओढणे, गुटखा खाणे या व्यसनांचा आहारी नाथा गेला होता. विजय चांगला मित्र होता. हट्टापायी लेखक घर सोडून काम मिळविण्यासाठी सांगलीला गेला तेव्हा विजयने नाथाला सहकार्य केले. बापू हा बोर्डिंगमध्ये राहून शिकणारा विद्यार्थी होता. त्याने लेखकालाही बोर्डिंगमध्ये राहण्यास बोलावले. बापूच्याच खोलीत लेखक राहत होता. दहावीला असताना लेखकाने शाळेत जाणे बंद केले तेव्हा बापूने त्याला समावले, 'चल लगा शाळंला. येवढ वरिस संपल म्हणजी दहावी पूर्ण हुत्या मी पण हाय. काय कमी जास्त पडल तर दितू तुला.'(पृ.११४) लेखक दहावीला इंग्रजीत नापास झाला त्यावेळी इंग्रजीची परीक्षा देण्यास व त्यासाठी लेखकाला जतला जावून क्लास लावण्याचा सल्ला दिला. बी.ए. च्या पहिल्या वर्षाला असताना एस.टी.चे पैसे वाचावेत म्हणून लेखक बापूच्या सायकल वरुन जात होता. बापूने जे एक मित्र म्हणून लेखकाला चांगली साथ दिली. दोन दिवसापासून उपाशी असलेल्या नाथाला राजू ने भाकरीचं गाठोडं सोडून दिलं त्या दिवशी नाथाने साताठ भाकऱ्या खाल्ल्या. पुजारी राजू व संतोष भैय्या लेखकाला सोडून कधीच जेवत नव्हते.

**लेखकाचे शिक्षकः**

लेखकाचा पहिलीच्या वर्गातील पहिला दिवस होता. पूर्ण नाव सांगता येत नाही. म्हणून सातपुते गुरुजींनी खूप मारलं. पाटीवर थुंकू नये म्हणून समजावणारे कोळी गुरुजी मर्चंडीवस्तीवरच्या शाळेतील काळेल गुरुजी की ज्यांनी पहिली, दुसरीच्या, तिसरीच्या वर्गातील मुलांचे पाढे मुळाक्षर बाराखडी म्हणून घ्यायला लावीत. पण शायीस्तेखानाचा वध कोणी केला. या प्रश्नाचे उत्तर सांगता

आले नाही म्हणून काळेल गुरुजींनी मारले. सहावीच्या वर्गात असताना सतत मावा खाणारे सावंत सर यांनी मम्मी म्हणज काय? हा प्रश्न विचारला त्याचे उत्तर न आल्याने लेखकाला शिव्या दिल्या. लेखकाचे सातवीचे वर्गशिक्षक वाघमारे सर यांनी ही मारले लेखकाने बोर्डिंगमध्ये असताना एका मुलाला शिव्या दिल्या त्या शिंदे सरांनी ऐकल्या म्हणून छडीच्या चिंधड्या होईपर्यंत मारले. बी.ए.च्या पहिल्या वर्गात असताना शिवानंद पाटील सरांनी मुळाक्षरे विचारली कोणालाही सांगता आली नाहीत तेव्हा 'हिथबी मुळाक्षरच शिकुत्याती, नकुरे बाबा ह्यो वनवास'(पृ.१६८) असे लेखकाला वाटले. थर्ड इयरचा निकाल लागला तेव्हा लेखक पास झाल्यावर विद्यापीठात एम.ए. करण्याचा सल्ला शिवादंन पाटील सर यांनी दिला. इंग्रजी विषय शिकविणारे काटे सर चांगले होते. ते लेखकाला म्हणायचे, ''अरे नाथा संघर्ष कर. माझी साथ आहे तुला, कसलाही त्रास झाला तरी मागे हटायचे नाही!''(पृ.१७६) शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर चांगले वाईट दोन्हीही प्रवृत्तीचे गुरुजनवर्ग लेखकाला लाभला. शेवटी डॉ.रणधिर शिंदे यांच्यामुळे जीवनाला एक प्रकारची ऊर्जा मिळाली, त्यातूनच लेखनाचा उत्साह वाढत राहीला.

एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त पुरुष पात्रांचा विचार करता येथे येणारे पुरुष पती, बाप, दीर, आजोबा, चुलता, मामा, सासरा, मुलगा या विविध नात्याने वावरतांना दिसतात. बरेच पुरुष पुरुषी मानसिकतेचे, स्त्रियांचे शोषण करणारे, काही त्यांना मदत करणारे, काही संधीसाधू, हेवेदावे करणारे, कुरघोड्या करणारे, स्वतःच्या भावभावना, विचार, कल्पना व्यक्त करणारे, काही शूर, काही परिस्थितीशी जुळवून घेणारे, राजकारणात वर्चस्व असलेले, काही राजकारणाचे बळी ठरलेले, भ्रष्टाचार करणारे, काही संघर्ष करणारे अशा विविध रुपात ते आढळतात.

**(ब)साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे :**

**१.१. प्रास्ताविक**

**१.२. स्त्रियांची व्यक्तिचित्रणे**

**१.२.१. ययाति**

**१.२.२. रथचक्र**

**१.२.३. स्वामी**

**१.२.४. स्मरणगाथा**

**१.२.५. सत्तांतर**

**१.२.६. झोंबी**

**१.२.७. झाडाझडती**

**१.२.८. राघववेळ**

**१.२.९. ताम्रपट**

**१.२.१०. तणकट**

**१.२.११. डांगोरा एका नगरीचा**

**१.२.१२. बारोमास**

**१.२.१३. भूमी**

**१.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो**

**१.२.१५. खारीच्या वाटा**

**१.२.१६. फेसाटी**

**१.३. समारोप**

**१.४. संदर्भ आणि टीपा**

कुटुंबव्यवस्थेत स्त्रीचे स्थान अतिशय महत्वपूर्ण असते. कुटुंबव्यवस्थेच्या सद्यस्थितीविषयी भाष्य करताना, स्त्री साहित्याचे अभ्यासक अरुणा दुभाषी म्हणतात, ''भारतीय समाजाने अजूनपर्यंत कुटुंबव्यवस्था टिकवली आहे. नजिकच्या काळात ती नष्ट होईल असे वाटत नाही. आपण अजूनही कुटुंबाशी, समाजाशी जोडून घेत समूहभावनेने जगत आहोत. साहजिकच भारतीय स्त्री ही कुटुंबसंस्थेत बांधील आहे. तिची सुटका व्हायची असेल तर ती कुटुंबसंस्था मोडण्याचा आणि नवे प्रश्न निर्माण करण्याचा मार्ग उचित नाही. त्याऐवजी दैनंदिन कौटुंबिक जबाबदारीतून स्त्रीला मुक्त कसे करता येईल हा विचार करणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने या गृह बंदीशाळेतील कैदीला सोडवण्याचा कोणत्याच पुरुषाने प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही.''[२९] माणूस आयुष्यात आपल्या कुटुंबासाठी झगडत असतो. कुटुंबासाठी स्त्रीचे स्थान अनन्यसाधारण असते. कुटुंब सांभाळत सांभाळत ती अनेक क्षेत्रात आपले नाव उज्वल करण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु आपल्या रुढी, परंपरा, चालीरिती, अंधश्रद्धा या जोखंडातून मुक्त होण्यासाठी प्रयत्न करणारी स्त्री आपणास दिसते. धाडसी, कर्तृत्वान, शिक्षणाचे महत्त्व ओळखणारी स्त्री आपणास काही कादंबऱ्यातून दिसते. परिस्थितीशी हतबल झालेली, कुटुंबासाठी अतोनात कष्ट उपसणारी, आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे अशी स्वप्न बाळगणारी स्त्री काही कादंबऱ्यामधून दिसते. काही स्त्रिया स्वतंत्र विचारसरणीच्या असलेल्या दिसतात.

### १.२.१ ययाति

**देवयानी :**

देवयानी ही दैत्यगुरु शुक्राचार्यांची कन्या होती. ती आपल्या पित्याप्रमाणे तापट, वडिलांच्या मोठेपणाचा बडेजाव सांगणारी अतिशय स्वार्थी वृत्तीची व लहरी स्वभावाची मुलगी होती. देवयानी लहानपणापासून अतिशय लाडात वाढलेली होती. वडिलांनी तिला तळहाताच्या फोडाप्रमाणे जपले होते.(पृ.१२८) तिच्या दुदैवाने तिची आई तिला लवकर सोडून गेल्यामुळे तिला आईचे प्रेम मिळाले नव्हते. त्यामुळे आई जे मुलीवर संस्कार करते ते तिच्यावर झाले नव्हते. त्यामुळे तिचा स्वभाव हट्टी, दुराग्रही बनला होता. आईचे प्रेम तिला मिळाले नाही आणि पुढे सासूचे प्रेम संपादन करता आले नाही. 'आभाळात दोन विजा अचानक एकमेकांवर येऊन आपटाव्यात ना तसे दैवाने या दोघींना एकत्र आणले होते.'(पृ.१५१)

कच हे देवयानीचे पहिले प्रेम होते. तिने कचावर अतिशय प्रेम केले पण देवयानीचे प्रेम झिडकारुन तो तेथून निघून गेला. तिचे हृदय त्याने पायाखाली तुडविले. ''कोणताही ऋषिपुत्र तुझं

पाणिग्रहन करणार नाही!''(पृ.१२२) असा शाप कचाने तिला दिला. तेव्हा ती प्रेमभंग झालेल्या हरिणीप्रमाणे झाली पण हळुहळु ती बंडखोरही बनली. इतर स्त्रियांप्रमाणे ती प्रेमभंगामुळे रडत बसणर नव्हती. तिला परमेश्वराने दिलेले सौंदर्य व बाबांनी दिलेली बुद्धी ही  रडत बसण्यासाठी नव्हती. ऋषिपुत्राच्या गळयात माळ घालून रानातल्या झोपडीत दिवस कंठण्याची हौस तिला नव्हती. या देवयानीच्या विचारातून तिची बंडखोर वृत्ती दिसून येते. दैवयोगाने देवयानी हस्तिनापूरची महाराणी बनली. यज्ञाचे निमित्त करुन ती कचाला आमंत्रण देते. आमंत्रण देण्यामागे तिचा उद्देश कचावर सूड उगविण्याचा होता. ''कुबेराचे डोळे दिपून जातील अशा वैभवात मी लोळत आहे, हे त्याला कळावे, जी देवयानी तुझ्या झोपडीत झाडलोट करीत राहणार होती. ती सिंहासनावर विराजमान झाली आहे, हे त्याने डोळयाने बघावे आणि मनात लज्जित होऊन माझी क्षमा मागावी.''(पृ.१९८) आपले वैभव पाहून कचाला आपण केलेल्या कृत्याच्या पश्चाताप व्हावा असे देवयानीला वाटते. प्रेमाच्या सफलतेचे समाधान आता मला मिळणार आहे असे देवयानीला वाटते. अर्थात कचाचेही तिच्यावर उत्कट प्रेम होते पण कर्तव्यासाठी त्याला त्या प्रेमाचा त्याग करावा लागला होता.

शर्मिष्ठा ही देवयानीची बालमैत्रिण, वृषपर्वा महाराजांची मुलगी अगदी लहानपणापासून देवयानी तिचा मत्सर करायची. देवयानीला स्वतःच्या सौंदर्याचा गर्व होता. एकदा त्या दोघी जलक्रिडेला गेल्या असताना त्या दोघींमध्ये कडाक्याचे भांडण झाले. शर्मिष्ठेने तिला हिनवले. 'तू माझ्या वडिलांच्या पदरी असलेल्या भिक्षूकाची मुलगी आहेस. तुझे वडील माझ्या वडिलांचे आश्रीत आहेत.' आपल्या वडिलांना भिक्षूक म्हटलेले देवयानीला आवडले नाही. देवयानी रागाने पळत सुटते व तिच्या मागे शर्मिष्ठाही पळते. देवयानी एका विहीरीच्या काठावर येते. दोघांच्या ओढाओढीत देवयानी विहिरीत पडते. शर्मिष्ठा तिला तिथेच ठेवून निघून जाते व त्याच रस्त्याने ययाति महाराज जात असतात. तेंव्हा त्यांना विहिरीतून आवाज येतो. ते तिला विहिरीतून बाहेर काढतात. भिजलेल्या कपड्यांमुळे देवयानीचे सौंदर्य खुलून दिसते. ययातिची नजर तिच्यावर खिळते. हा तरुण म्हणजे हस्तिनापूरचा महाराज ययाति आहे हे देवयानीच्या लक्षात आल्यावर देवायानी त्याच्यासमोर लग्नाचा प्रस्ताव मांडते. ययातिचा होकार मिळाल्याबरोबर त्याला घेऊन ती आपल्या वडिलांसमोर जाते. पण वडिलांबरोबर वृषपर्वा महाराजही असतात. वृषपर्वा व शुक्राचार्य यांना घडलेला सर्व प्रकार कळतो. आपण ययाति महाराजांबरोबर हस्तिनापुरात जाणार आहोत. पुन्हा वृषपर्वा महाराजांच्या नगरीत पायदेखील ठेवणार नाही. असे देवयानी ठरविते. ती संतापली

असतांना वृषपर्वा महाराज दयेची याचना करतात. परंतु देवयानी शर्मिष्ठेला तिच्या गुन्ह्याबद्दल माफ करणार नाही असं सागते. तेव्हा देवयानी जी शिक्षा शर्मिष्ठेला देईल ती शिक्षा शर्मिष्ठा स्वीकारेल असं सांगते. देवयानीला सूड उगविण्याची चांगलीच संधी मिळते. ती शर्मिष्ठेला माझी दासी बनवुन माझ्या बरोबर हस्तिनापूरला पाठवा अशी शिक्षा सांगते. वडिलांच्या विनंतीमुळे शर्मिष्ठा बिचारी तिचे म्हणणे मान्य करते.(पृ.१३२, १३३) डॉ. आशा सावदेकर देवयानीविषयी म्हणतात, ''शर्मिष्ठा ही राजकन्या आहे हे न स्वीकारण्यातच तर देवयानीचे देवयानीपण आहे.''[३०] ययाति आणि देवायानी यांची भेट योगायोगाने झाली. 'खरचं! सूडसुद्धा किती सुंदर असू शकतो!'(पृ.१३७) असे तिला वाटते. महाराजांची पत्नी बनून ती हस्तिनापूरला जाते. पतिपत्नीच्या पहिल्या भेटीत इतक्या उन्मत्तपणाने शयन मंदिरातून निघून जाणारी तरुणी ही सगळयांच्या दृष्टीने एकमेव ठरते. ययाति महाराजांनी मद्य पिल्याचा देवयानीला राग आला होता. ययाति महाराजांनी मद्य न पिण्याविषयी वचन दिल्यानंतर त्यांच्या वैवाहिक जीवनाला सुरळीतपणे सुरुवात झाली. पण मनाने ती ययातिशी एकरुप झाली नाही. आपल्या कवचातून हळूच कामापुरते डोळे वर काढणाऱ्या प्राण्यासारखी ती वागे.

थोड्याच दिवसांनी आपण आई होणार आहोत ही बातमी ती महाराजांना सांगते. तिला मुलगा होतो. त्याचे नाव यदू ठेवले. यदुच्या बारशाच्या दिवशी शर्मिष्ठाही आई होणार हे गुपित तिला समजते. तेव्हा ती त्याच्या पित्याचे नाव विचारते पण ती 'एका ऋषीच्या आशीर्वादाने मला दिवस गेले' असे शर्मिष्ठा सांगते. पण जेंव्हा मद्यधुंद ययाति 'शर्मिष्ठा कुठं आहे? माझी शर्मिष्ठा कुठ आहे? राक्षसणी! तू तिचा जीव घेतलास! तुझ्यासारखी दृष्ट स्त्री साऱ्या जगात नसेल! तू-तू.'(पृ.३३१) ययातिच्या तोंडच्या शर्मिष्ठेविषयी अशा उल्लेखानी ती संतापली. 'मला कधीही स्पर्श करणार नाही, अशी शपथ घ्या! बाबाचे नाव घेवून शपथ'(पृ.३३१) महाराजांनी तशी शपथ घेतली आणि ते देवयानीच्या महालातून गेले. पति-पत्नी संबंधाचा, जीवनातल्या रम्य, रेशमी, नाजूक धागा त्या दिवशी तुटला. अठरा वर्ष देवयानीने महाराणी असूनही एखाद्या सन्यांसिनीसारखे आयुष्य काढले. रात्र-रात्र ती तळमळत राहिली.

देवयानीचा मुलगा यदु मोठा झाल्यावर दस्यूंचा पराभव करण्यासाठी गेला, परंतु दस्यूंनी त्याला पकडून नेले. अशोक वनात असलेल्या महाराजांना यदूला पकडण्याची बातमी कळते. तरीसुद्धा ते यदुला सोडविण्यासाठी गेले नाहीत. तेंव्हा ती तिच्या मनातील भावना व्यक्त करते. 'माझे ते लग्न नव्हते, बलिदान होते. विवाह होमातल्या त्या अग्निज्वाळांत गेली अठरा वर्ष मी

जळत आहे.'(पृ.३२५) 'ययाति' या कादंबरीतील देवयानी ही व्यक्तिरेखा रेखाटताना लेखकाने तिची तुलना शर्मिष्ठेसारख्या त्यागी व खरे प्रेम करणाऱ्या मुलीशी केली. त्यामुळे देवयानी कादंबरीतील खलनायिका बनते. ''सिद्धीच्या बळावर अंतर्धान पावणाऱ्या हटयोग्यासारखी वाटते.'(पृ.१८०) ययातिशी लग्न केवळ तो हस्तिनापूरचा राजा, नहुष महाराजांचा पुत्र आहे. म्हणून, तिचे प्रेम राजवैभवावर होते, राजा पदावर होते. ययातिवर नव्हते. ययाति हे तिच्या इच्छापूर्तीचे एक साधन होते!''(पृ.१८२) देवयानीने शर्मिष्ठेला स्वतःची दासी बनविले पण खर तर 'खरी दासी आहे देवयानी! वैभवाची, प्रतिष्ठेची आणि अहंकाराची गुलाम होऊन बसली आहे ती!' (पृ.२३२) ज्याचा आत्मा स्वार्थाच्या, वासनांच्या आणि मोहाच्या आहारी जातो तो मनुष्य या जगात सदैव दास्यात खितपत पडतो. देवयानीच्या एकंदर स्वभाववृत्तीला व्यक्त करताना लेखकाने तिच्यात असलेल्या अहंकार व महत्त्वाकांक्षा या तिच्या वर्तनातून दिसतात हे सांगताना लेखक वि.स.खांडेकर म्हणतात, ''देवयानीचे खरे प्रेम कचावर होते. ते तिचे पहिलेवहिले आणि उत्कट प्रेम होते. तिने ययातिशी लग्न केले, ते महत्त्वाकांक्षेने प्रेरित होऊन, तिने शर्मिष्ठेला आपली दासी केले. ते सुडाच्या समाधानासाठी अशी अहंकारी, महत्त्वाकांक्षी, मनात दंश धारणारी आणि प्रेमभंगाने अंतरंगात द्विधा झालेली स्त्री कशी वागेल, याचा विचार करून मी या कादंबरीतील देवयानीचे चित्रण केलेले आहे.''[३१]

देवयानी तिच्या जीवनात वेगवेगळया भूमिका पार पाडतांना वेगवेगळया नात्यांमध्ये अपयशीच झालेली वाटते. शर्मिष्ठेची खरी सखी ती होऊ शकत नाही. कचासारख्या उमद्या व्यक्तिचे प्रेम ती संपादन करु शकत नाही. ययातिची पत्नी म्हणून यशस्वीपणे संसार करु शकत नाही. सून म्हणूनही ती स्वतःचा वेगळा ठसा उमटवू शकत नाही. शुक्राचार्यांसारख्या थोर व्यक्तिची मुलगी म्हणून अभिमान मिरवते. सु.रा. चुनेकर हे देवयानीच्या शोकात्म झालेल्या वाताहतीबद्दल म्हणतात, ''अंतरातली खरी देवयानी ओळखून घेण्याचा ती कधी प्रयत्नच करी नाही. खरी देवयानी सम्राज्ञीपदाच्या वैभवात कधी रमू शकत नाही. ययाति एका प्रकाराने भग्नात्म होता, देवयानी दुसऱ्या प्रकाराने भग्नात्म होती. ययाति एका मार्गाने भोगाच्या मार्गाने-आपल्या व्यथा विसरू पाहतो. देवयानी ऐश्वर्याच्या, सत्तेच्या उन्मादात त्या बुडवू बघते. देवयानी सुष्ट आहे की दुष्ट आहे? हळवी आहे की कठोर आहे? निश्चित सांगणे कठीण आहे. असे निश्चित एकरंगी विधान करताही येत नाही. देवयानीला काय कमी होते? अलौकिक रूप होते, बुद्धी होती. श्रेष्ठ कलागुण, उत्तम जन्म होता. दैवी गुण तिला लाभले होते. तरी तिचे जीवन अपेक्षी शोकात्म झाले. तिच्या वृत्तीचाही

वाटा या अपयशात होताच. केवळ दुर्दैवाच्या, नियतीच्या शापाचा हा परिणाम नाही. तिच्या विफल, पराभूत जीवनाला तिची तीही जबाबदार आहे.''[३२] तिच्या मानसिक कवचात केवळ एका व्यक्तिला जागा होती ती म्हणजे शुक्राचार्य! पण शेवटी शुक्राचार्यांपेक्षा खरा ज्ञानी कच आहे. तिची खात्री पटते. फक्त यदुची आई म्हणून ती थोडीशी मनाला भावते.

शेवटी शर्मिष्ठेची त्यागी वृत्ती व तिच्या पोटी जन्म घेतलेल्या पुरुची त्यागी वृत्ती कचाचे व्यक्तिमत्त्व या सर्वांचा परिणाम होऊन देवयानीचा जणू काही पुनःर्जन्मच होतो. ती शर्मिष्ठेशी चांगली वागू लागते. आपण दोघी मिळून ययातिची सेवा करु असं सुचविते. तसेच यदुला सिंहासनावर बसवावे असा अट्टाहास न करता सिंहासनावर पुरु बसेल की यदु हे प्रजेवर सोपविले. शेवटी ययाति बरोबर वानप्रस्थाश्रमाला जाण्याचं ठरविते.

**शर्मिष्ठा :**

शर्मिष्ठा ही वृषपर्वा महाराजांची कन्या. राजकन्या असून आयुष्यभर दासीचे जीवन जगावे लागलेली त्यागमूर्ती होती. शुक्राचार्य हे वृषपर्वा महाराजांच्या दरबारी गुरुदेव होते. त्यांची मुलगी देवयानी व शर्मिष्ठा या दोघी एकत्रच वाढल्या. देवयानीमुळे शर्मिष्ठेवर नेहमीच अन्याय होत असे. वसंतोत्सवाच्या वेळी नाटके असत. देवयानीला फुलराणीची भूमिका दिली होती. तिला चांगले नृत्य करता येत होते. फुलराणी नाटकात नृत्यही करावे लागणार होते. शर्मिष्ठेला वनराणीची भूमिका दिली होती. पण वनराणी फुलराणीपेक्षा मानाने मोठी म्हणून देवयानीच्या हट्टापायी देवयानीला वनराणी व शर्मिष्ठेला नृत्य येत नसतानाही फुलराणी व्हावं लागतं. विविध स्पर्धामध्ये उदा.नृत्य, गीत, सौंदर्य इ. स्पर्धांमध्ये देवयानीला प्रथम क्रमांक मिळाला. काव्यात शर्मिष्ठेची कविता खरतर सरस होती पण देवयानीने वाद केला आणि म्हणून ते बक्षीस दोघींमध्ये वाटुन द्यावे लागते. देवयानीचे वडील संजीवनीसाठी तपश्चर्या करीत बसलेले! संजीवनीच्या सहाय्याने दानव देवांवार विजय मिळविणार म्हणून देवयानीला कधीही दुखवायचे नाही, हे बाबांचे धोरण शर्मिष्ठेलाही पाळावे लागले. अशाप्रकारे देवयानीमुळे शर्मिष्ठेवर ती एक राजकन्या असूनही अन्याय होत होता आणि शर्मिष्ठाही वडिलांच्या इच्छेखातर ते निमुटपणे सहन करीत होती.

पण जलक्रिडेच्या वेळी घडलेल्या प्रसंगात मात्र शर्मिष्ठेच्या सहनशीलवृत्तीचा स्फोट झाला आणि ती देवयानीला खूप अपशब्द बोलली. केवळ या एका चुकीबद्दल शर्मिष्ठेला देवयानीची आयुष्यभर दासी बनून राहावे लागते. त्यावेळी शर्मिष्ठेची समजूत घालण्यासाठी तिच्या वडिलांनी तिला पत्र लिहिले कारण तिला प्रत्यक्ष समजावण्याचं धैर्य त्या दुर्दैवी पित्याकडे नव्हते.

शुक्राचार्यामुळे दानवांच जीवन स्वच्छंद व मुक्त संचार करण्यासारखे होईल. अन्यथा त्यांना क्षुद्र किडयांप्रमाणे भूमीवर सरपटत राहावं लागते आणि म्हणून एक राजा म्हणून मला माझे कर्तव्य पालन करण्यासाठी शुक्राचार्यांची मर्जी सांभाळणे आवश्यक आहे आणि म्हणून पित्याच्या या कर्तव्यापालनाखातर तुला देवयानीचे दासीपद स्वीकारावं लागेल. घरातल्या घरात त्यांनी शर्मिष्ठेला पत्र लिहिले होते. त्यांना शर्मिष्ठेला दासीपद स्वीकार असे प्रत्यक्ष सांगता आले नसते कारण 'प्रेमाने कर्तव्याचा पराजय केला असता!'(पृ.१४६) तिने दासीपद स्वीकारले कारण तिला कचाने केलेला उपदेश आठवला. 'दासीपण म्हणजे दुसरे काय आहे? मरण-माणसाच्या अभिमानाचे मरण! त्याच्या मोठेपणाचे मरण!'(पृ.१४८) राजकुलांत जन्म झाला म्हणून आज शर्मिष्ठा राजकन्या. जर तिने दासीच्या पोटी जन्म घेतला असता तर त्यावेळी तिने दासीपद आनंदाने स्वीकारले असते. अशी ती स्वतःची समजूत घालते आणि ऋषीच्या वेष परिधान केलेल्या महाराजांनी कोपऱ्यातल्या महाराजांच्या चित्राकडे बोट दाखवून त्यांनी विचारले. 'या ययातीवर तुझं प्रेम बसल आहे?' पण शर्मिष्ठेने काहीही उत्तर दिले नाही. तेव्हा त्या ऋषींनी तिच्या समोर एक रहस्य उघड केले. महालाच्या मंचका समोरच्या भिंतीवर एक लहान कळ होती ती त्यांनी दाबली. मधला पुरूषभर उंचीचा भाग झटकन बाजूला झाला. ती भुयारात जाण्याची वाट होती. त्यांनी पुन्हा कळ दाबली. भिंत पुन्हा पुर्ववत झाली व तिला याच महालात तू एकटीच झोपत जा. महालाचे दार बंद करून तुझ्या विश्वासातल्या दासी महालाबरोबर ठेव. रात्री या भिंतीतून तुला शमा हाक ऐकू आल्यावर कळ दाबून भुयार मार्ग उघड. तुला ययाति महाराज दिसतील आणि खरचं एक दिवस तसच घडलं. देवयानी तिच्या वडिलांकडे गेली असताना महाराज दररोज तिच्याकडे येऊ लागले.(पृ.२४३) 'दैवाने तिला ययाति महाराजांचं प्रेम दिलं पण ते तिला उघडपणे व्यक्त करता येत नव्हतं.'

'कुबेरानं एखाद्या स्त्रीला पृथ्वीमोलाचा अलंकार द्यावा; पण तो एकांतात नि अंधारात घालण्याची आज्ञा करावी!(पृ.२४७) असा ती अनुभव घेत होती आणि निसर्गाने आपला चमत्कार दाखविला.' कारण शर्मिष्ठा आई होणार होती आणि तिला आनंद होण्याऐवजी भीती वाटली. कारण देवयानीला जर सत्य कळले, तर देवयानी शुक्राचार्यांना सांगेन आणि शुक्राचार्यांच्या शापाला महाराज बळी पडतील. देवयानीला महाराजांचा कधीही संशय येणार नाही, असे वागायचे! आल्या प्रसंगाला एकटीने तोंड द्यायचे!(पृ.२५१) कारण शर्मिष्ठेने महाराजांवर निःस्वार्थी प्रेम केले होते. देवयानीला मुलगा झाला. त्याच्या बारशाला शर्मिष्ठा गेली. तेथे गेल्यानंतर शर्मिष्ठेला दिवस गेलेत, हे देवयानीच्या लक्षात आलं तेव्हा तिला व्यभिचारी म्हणून हिणवलं. 'मी व्यभिचारी नाही. थोर

ऋषींच्या आशीर्वादानं(पृ.२५५) देवयानीने त्यासंदर्भात कचांच नाव घेतलं. तेव्हा शर्मिष्ठेला फार वाईट वाटलं. तिने मनातल्या मनात कचाची क्षमा मागितली.

शर्मिष्ठेच्या पोटी पुत्र जन्मला, त्याचे नाव तिने पूरुरवा ठेवले. एकदा देवयानीने शर्मिष्ठेच्या पुरूला घेऊन राजवाड्यात यायला सांगितले. ज्या पंडिताने पूर्वी भविष्य सांगितले होते की, शर्मिष्ठेचा मुलगा सिंहासनावर बसेल त्याच पंडिताची परीक्षा पाहण्यासाठी देवयानीने एक युक्ती केली. यदु व पुरूला अगदी सारखे भाऊ दिसतील असा वेष दिला. खूप खेळणी देऊन त्यांना महालात खेळायला लावले व नंतर त्या ज्योतिष्याला दोन्ही मुलांचे हात बघायला लावले. यदुकडे पाहत तो म्हणाला, 'हा मुलगा दुर्दैवी आहे' व पुरूकडे पाहून 'हा चक्रवर्ती राजा होईल!' देवयानी हे ऐकून खूप संतापली. तिला तिच्या मुलाच्या वडिलांचे नाव विचारले. पण शर्मिष्ठेने सांगितले नाही. शेवटी देवयानीने तिला तळघरात बंदिस्त केले व तीन प्रहरांचा कालावधी विचार करण्यासाठी दिला. त्यानंतर तुला पुरूच्या पित्याचे नाव सांगावेच लागेल नाहीतर दरबारात तुझ्या व्याभिचाराची चौकशी करवीन असे सांगितले व दार बंद करून निघून गेली. नंतर मध्यरात्री महाराजांनी तिला अशोक वनाकडे नेले. तेथून माधवला तिला रथात बसून नगराबाहेर सोडण्यास पाठविले.

शर्मिष्ठेची त्यानंतर भटकंती चालू झाली नंतर योगायोगाने तिला यति भेटला. यतिने तिला हिमालयात नेऊन सोडले. त्या ठिकाणी त्याला मानणारे बरेच लोक होते. तेथे ती त्या लोकांमध्ये सुरक्षित राहिली. पुरू अठरा वर्षांचा झाला. तेथेच त्याची अलका नावाच्या मुलीशी मैत्री झाली. तिचे पुरूवर प्रेम होते. एकदा अचानक पुरू तेथून निघून गेला. तेव्हा अलकाने पुरूने दिलेले पत्र शर्मिष्ठेला दिले. तो यदुला दस्यूं विरुद्धच्या लढाईत मदत करण्यासाठी पूरू व त्याचे मित्र हस्तिनापूरला जात आहेत असा उल्लेख होता. तेव्हा शर्मिष्ठासुद्धा हस्तिनापूरकडे अलकेला घेऊन निघते. हस्तिनापूरच्या शेजारी एका खेडेगावात जावे व तेथे पूरूच्या मित्रांकडून किंवा इतर सैनिकांकडून पूरू सुरक्षित असल्याच्या बातम्या कळतील आणि थोड्याच दिवसात त्यांना बातमी कळाली. यदूला दस्यूंच्या कैदेतून पूरूने सोडविले व ते दोघे देवयानीला भेटण्यासाठी अशोक वनाकडे आले. तेथे शुक्राचार्यांच्या शापाने ययाति महाराज वृद्ध झाले होते व शुक्राचार्यांनी उश्शाप दिला. 'तुझे वार्धक्य स्वीकारणारा तुझ्याच रक्ताचा तरूण हवा'. तुझ्याच रक्ताच्या तरूणाने जर तुझे वार्धक्य घेतले तर तू तरूण होशील व तो तरूण म्हातारा होईल. तेव्हा पूरूने आपण महाराजांचा मुलगा आहोत हे रहस्य त्याच्या समोर कथन केले. तेव्हा पूरूने आपण आपले यौवन महाराजांना देत आहोत असे सुचविले. महाराजांनी त्या तरूण अलकेच्या हव्यासापोटी पुरूचे यौवन घेतले व

पुरू म्हातारा झाला. त्यावेळी तेथे शर्मिष्ठा आली. कचाने शर्मिष्ठेबद्दल आपले मत व्यक्त केले. तो म्हणाला, 'ताई, पत्नी होण्यापूर्वीच तू आई झालीस! साऱ्या दानवकुलाची आई झालीस! ज्या आत्मशक्तीने हा त्याग केलास, ती तुझ्या ठायी सतत वाढत राहो.'(पृ.२३२) आणि त्याच हे मत अगदी योग्य आहे. दानवकुलाच्या कल्याणासाठी तिने दासीपद स्वीकारलं.

देवयानी व शर्मिष्ठा ही परस्परविरोधी व्यक्तिचित्रणे लेखकाने आपल्यासमोर उभी केली आहेत. शर्मिष्ठा ही एक मुलगी, प्रेमिका, आई म्हणून आपली कर्तव्ये पार पाडते व एक आदर्श स्त्रीच्या रूपाने उभी राहते आणि कर्तव्य पालनासाठी त्यागमूर्ती बनते. तिच्या रूपाने एक आदर्श कन्या लेखकाने आपल्या समोर उभी केली आहे. दासीपद स्वीकारून शर्मिष्ठा देवयानीबरोबर हस्तिनापुरात जाते. तिथे गेल्यानंतर राजमातेने मात्र तिला प्रेम दिले. परदेशात पडलेल्या पोरक्या पोरीवर प्रेम करणारे एक तरी माणूस या राजवाड्यात आहे असे वाटून शर्मिष्ठेच्या मनाला धीर येई. ययाति आणि देवयानीचा विवाहोत्सव पाहून शर्मिष्ठा अश्रु गाळील असे देवयानीला वाटले. पण शर्मिष्ठेने तिला तशी संधी दिली नाही. मधुमीलनाच्या रात्री शर्मिष्ठेला पानाचे तबक घेऊन देवयानीने महालाबाहेर उभं केले. तिचा दासी म्हणून ती पदोपदी अपमान करीत राहिली. राजकन्या असलेली शर्मिष्ठा देवयानीने केलेला अपमान सहन करुन वाचकांसमोर आदर्शवत ठरली. अशा या शर्मिष्ठेसारख्या आदर्श व्यक्तिमत्वाबद्दल वि.स.खांडेकर म्हणतात, ''म्हणूनच शर्मिष्ठा मला पुन्हा केव्हा तरी भेटेल, अशी मला आशा आहे. ती वानप्रस्थ झाली आहे. हे खरे! पण कथाकादंबऱ्यांना आवश्यक असणाऱ्या घटना केवळ नगरात आणि राजवाड्यात घडतात, असे थोडेच आहे? त्या अरण्यात-प्रसंगी वानप्रस्थांच्या आश्रमातही-घडतात! कुणाला माहीत, प्रौढ शर्मिष्ठा केव्हा तरी अचानक भेटायला येईल आणि आपले पुढले अनुभव मला सांगेल, ती केव्हाही येवो! कोणत्याही रूपाने येवो! तिचे मी आनंदाने स्वागत करीन.''[३३] प्रेमळ, त्यागी आणि संयमी असे शर्मिष्ठेचे व्यक्तिमत्व वाचकप्रिय झाले तसेच भविष्यात प्रौढ असलेली शर्मिष्ठा आपल्याला भेटावी अशी अपेक्षा लेखकही व्यक्त करताना दिसतात.

**अलका :**

अलका ही कलिका नावाच्या दासीची मुलगी होती. लहानपणी ययाति हा कलिकेचेच दूध पिला. अलका व ययाति बालपणी राजवाड्यात एकत्र खेळले होते. ययाति सहा वर्षांचा होईपर्यंत अलका त्याची सवंगडी होती. नगरदेवतेच्या उत्सवात उन्मत्त घोड्यावर बसून पाच फेऱ्या मारायच्या या साहसी खेळात ययाति सहभागी होतो आणि शेवटची फेरी संपल्यानंतर तो त्या

घोड्यावरून पडून बेशुद्ध होतो. आठ दिवस तो त्याच अवस्थेत होता. राजवैद्य उपचार करीत होते. अलकेला ययातिच्या सेवेसाठी ठेवले होते. आठ दिवसानंतर जेव्हा ययाति शुद्धीवर येतो व समोर अलकेला पाहतो, तेव्हा तिच्या सौंदर्याचा त्याला मोह होतो. त्याच्या बाहूंच्या विळख्यात अलकेला ओढतो व अलकेचे चुंबन घेतो. पण त्या दिवसानंतर अलका मात्र रात्री युवराजांच्या महालाकडे फिरकत सुद्धा नाही. पण त्या गोड प्रसंगाच्या आठवणी मात्र युवराजांच्या मनात सतत रेंगाळत राहतात. अश्वमेघ यज्ञ पार पाडून आल्यानंतर ययातिला ओवळणाऱ्या दासींमध्ये अग्रभागी अलका पंचारती घेऊन उभी आहे. असे ययाति स्वप्नात पाहतो.

जेव्हा ययाति अश्वमेघ यज्ञ पूर्ण करून नगरात येतो, तेव्हा अलकेला शोधणाऱ्या ययातिला मात्र पंचारतीत ओवाळणाऱ्या दासींमध्ये अलका दिसत नाही. तेव्हा न राहून त्याने अलका कुठे दिसत नाही, असे आईला विचारले, ती तिच्या हिमालयातील पायथ्याशी असलेल्या मावशीकडे गेली. असे आईने सांगितले. ययातिच्या मनात मात्र सतत अलकेचे विचार पिंगा घालत असतात. 'अलकेचे चुंबन हे माझ्या जीवनातले एक सुंदर स्वप्न होते.'(पृ.४७) असे युवराज म्हणतो.

ययाति यतिला शोधण्याकरीता मंदारला बरोबर घेऊन आर्यावर्तात जातो. पण तेथून यति राक्षस राज्यात गेला असावा अशी त्यांना माहिती मिळते. म्हणून ते परतीच्या प्रवासाला लागतात. एका रम्य स्थळी येऊन पोहचतात. ते रम्य स्थळ सोडून जाऊ नये असे ययातिला वाटू लागते. एकदा असाच तो वृक्षावर बसून नदीच्या भोवतालचे सौंदर्य न्याहाळत होता, अचानक त्याला नदीच्या ऐलतीरावर एक तरूणी नदीच्या डोहात उडी मारताना दिसली. तिला वाचवण्याकरीता ययातिने डोहात उडी मारली व त्या तरूणीला वाचविले आणि ती तरूणी म्हणजे अलका होती. तेव्हा शुद्धीवर आल्यानंतर तिने तिची कर्म कहानी युवराजांना सांगितली. तिच्या मावशीने तिचे लग्न एका शेतकऱ्याशी लावले. पण तो शेतकरी जुगारी होता व त्याचा जिवलग मित्र जादूटोणा करीत असे. जत्रेच्या निमित्ताने अलका, तिचा नवरा व त्याचा मित्र घराबाहेर पडले. अलका तिच्या नवऱ्याला चार उपदेशाचे शब्द सांगू लागली, तेव्हा तिचा नवरा मित्राला म्हणाला, 'हिला बकरी करून टाक एकदा तर तिच्या नवऱ्याने तिला जुगारात पणाला लावले व तो जुगार हारला जिंकणारा तिच्याकडे पाहून जिभल्या चाटू लागला. तेव्हा ती तेथून निसटली व ती जीव देण्याच्या निश्चयाने येथे पोहचली.' हे सर्व ऐकल्यावर ययाति अतिशय दुःखी झाला. तू ययाति महाराजांची बहीण आहेस त्यामुळे तुला आता घाबरण्याचे काहीही कारण नाही असा विश्वास दिला.

जादुटोण्याच्या भीतीने अलका अतिशय अस्वस्थ झाली होती. ती रात्री-अपरात्री किंचाळून उठत असे. शेवटी ययातिने तिला स्वतःच्या महालात झोपविले. पण एकाही क्षणी त्याच्या मनात तिच्याबद्दल वाईट विचार आणला नाही. महाराजांवरील विश्वासाने तिच्या मनातील भीती हळूहळू कमी होऊ लागली. ते परतीच्या मार्गावर असताना ती युवराजांच्या बरोबरच होती. 'जगाच्या दृष्टीने अलका ही एक दासीची मुलगी होती. पण ययातिच्या दृष्टीने ती केवळ एक बहीण होती.'(पृ.११३) अलकेसह ययाति हस्तिनापुराला पोहचला. दिवसभरात त्याला अलका दिसली नाही, म्हणून रात्री त्याने आईकडे चौकशी केली तेव्हा राजांनी दासींकडे लक्ष देऊ नये, असे आईने सुचविले. त्या रात्री आईने ययातिला एका तळघरात नेले. तेथे त्याला मरणोन्मुख अलका दिसली. तिच्याजवळ एक रिकामा पेला पडला होता. यावरून तिला विष पाजण्यात आले होते असे वाटते. अंतसमयी ती महाराजांना काही तरी सांगण्याचा प्रयत्न करीत होती. ती म्हणाली, 'तो-तो-मंदार-त्यानं-त्यानं-त्याला मी(पृ.११७) यावरुन हस्तिनापूरला येताना परतीच्या प्रवासात अलका महाराजांबरोबरच होती. हे मंदारने ययातिच्या आईला सांगितले असावे व त्यामुळे एका राजाने दासीच्या इतकं आहारी जाऊ नये. असे आईला वाटले असेल म्हणून अलकेला आईने संपविले असे वाटते. अलका ययातिच्या खांद्यावर डोक टेकवून शेवटच्या घटका मोजत होती. या तिच्या शेवटच्या प्रवासात तिला अखंड धीर देईल, अशी एखादी खुणेची वस्तू द्यावी म्हणून नकळत ययातिची मान खाली गेली व अलकेच्या ओठावर ययातिचे ओठ टेकले. ती मात्र तोंड वळविण्याचा प्रयत्न करत होती. कारण तिच्या तोंडाला विष लागले होते. त्याचा ययातिला त्रास होईल असे तिला वाटले असावे. पण तरीही ययातिने तिची असंख्य चुंबने घेतली. तोंड वळविण्याच्या धडपडीत तिचे मस्तक खांद्यावरून निसटते. ती धाडकन खाली पडते. तिचा मृत्यू होतो.

अलका ही खरेतर लहानपणापासूनच समर्पिता वाटते. बालपणी आईच्या दुधावर वास्तविक पाहता तिच्या मुलाचाच सर्वस्वी हक्क असतो. पण अलकेच्या दुधात मात्र ययाति वाटेकरी होतो. अलका तारूण्यात आली. तेव्हा ययातिला तिच्या सौंदर्याचा मोह होतो. अलकेने ययातिला आपल्या मोहात वश केले नव्हते. तरीही तिला ययातिला आईच्या सांगण्यावरून तिच्या मावशीकडे पाठविले जाते. तेथे ही तिचे दुर्दैव पुढे उभे राहते. ते नवऱ्याच्या रूपाने तो नवरा तिला जुगारात पणाला लावण्यापर्यंत तिचा छळ करतो. पुढे सुदैवाने ययातिच्या रूपाने तिला थोडे भावाचे प्रेम मिळते. तेही तिच्या नशिबात चिरकाल नव्हते आणि तिचा कोणताही अपराध नसताना मंदारच्या

सांगण्यावरून तिला मृत्यूला सामोरे जावे लागते. अलकेची बाबतीतला दैवाचा खेळ पाहून मन हेलावते.

**मुकुलिका :**

मुकुलिका ही अतिशय चतूर आणि देखणी दासी होती. वयाने पंचविशीच्या आत बाहेर होती. अश्वमेध व शांतीयज्ञ पार पाडून ययाति आला व त्यातच नहुष महाराजांचे आजारपण यामुळे ययातिला आईने महालापासून काही अंतरावर असलेल्या अशोक वनात ठेवले. तेथे सर्व सुखाची सिद्धता केली होती. तेथे त्यांच्या सेवेसाठी मुकुलिकेला ठेवले होते. ती मुकेपणाने ययातिची सेवा करीत होती. त्याच्या खाण्यापिण्याची काळजी घेत होती. मृत्युशय्येवर पडलेल्या वडिलांची दुरावस्था पाहून ययाति दुःख सागरात बुडाला व सुन्न मनाने अशोक वनात आला. मुकुलिकेची ययातिला भुरळ पडली. त्या रात्री युवराज–युवराज राहिले नाही व मुकुलिका दासी राहिली नाही. ते दोघे केवळ प्रेमिक झाले.

मुकुलिका ही एक अभिनयपुर्ण नटी होती. रात्री प्रेयसी व दिवसा दासी अशा भूमिका ती कुशलतेने पार पाडत होती. तिच्यावर ययाति एकदा खूप रागावले. पण त्याचा राग मनात न धरता ते जेव्हा तिला प्रेमाने बोलवितात तेव्हा ती पुन्हा प्रेमाने ययातिच्या जवळ येते. ती नेहमी तिचे दासीपण निभावण्यात तत्पर असते. ययाति सतत आनंदी कसा राहील याचाच ती प्रयत्न करते. अशोक वनात असेच तिला रागावलेला ययाति पुन्हा प्रेमाने जवळ बोलवतो व ती मंचकाजवळ उभी होती आणि भुयार मार्गाने मंदार तेथे येतो व ययातिला महाराजाची तब्येत खूपच खालावली म्हणून ताबडतोब तेथून घेऊन जातो. पण तो मुकुलिकेकडे न पाहता तत्परतेने भुयार मार्गाने निघून जातो. मंदारने मुकुलिकेला तेथे पाहिलेले होते व यापूर्वीही महाराज मृत्यूशय्येवर असताना ययाति मात्र मुकुलिकेच्या बाहुपाशात आनंद उपभोगीत होता. हा वृतांत आईला मंदार कडून समजला असावा. त्यामुळे मुकुलिकेची गरज संपताच आईने तिला नगरातून हाकलून दिले होते. त्यानंतर मुकुलिका महाराजांना दिसली ती माधवच्या आजारपणात त्याची सेवा करीत होती. आज भेटलेली मुकुलिका त्यांना सेवाभावी वाटली की पूर्वी त्यांना लंपट भासली होती. ती ज्या गुरूंच्या समवेत राहात होती ते गुरू म्हणजे मंदार. मंदार आणि मुकुलिका त्यांच्या आश्रमातील नवनव्या सुंदर स्त्रिया ययातिच्या सुखविलासासाठी ययातिच्या अशोक वनातल्या महालात पाठविल्या जात होत्या. मंदार आणि मुकुलिकेने त्याला अठरा वर्ष त्या सुखात बुडविले होते.

मुकुलिकेने महाराजांना आपल्या मोहपाशात कुशलतेने अडकून ठेवले होते. ती महाराजांना सतत सुखी ठेवण्याचा प्रयत्न करीत होती. तिने माधवची सेवा मनापासून केली. मुकुलिका दोन रूपात आपल्या समोर लेखकाने उभी केली. एक म्हणजे आपल्या मोहजालात अडकवणारी मोहिनी व दुसरी सेवाभावीवृत्ती असलेली मुकुलिका आहे.

**ययातिची आई :**

ययातिची आई नहुष महाराजांची पत्नी. यति हा तिचा मोठा मुलगा व ययाति लहान मुलगा. लहानपणी यति परमेश्वर प्राप्ती व सुखाचा मार्ग शोधण्यासाठी निघून जातो. त्यामुळे ययातिची आई ही नेहमी ययातिच्या बाबतीत धास्तावलेली वाटते. नहुष राजाला मिळालेला शाप, ''नहुषाची मुले कधीही सुखी होणार नाहीत.'' हा तिला नेहमी सतावीत होता. यति निघून गेला. त्याप्रमाणे ययाति गेला तर याची तिला नेहमीच काळजी वाटायची. ययातिने यतिप्रमाणे संन्यास घेऊ नये म्हणून ती त्यासमोर संसारिक सुखाचे गाजर ठेवून तो ऐहिक सुखात कसा रमेल याचा ती विचार करायची.

इंद्रावर ज्याने विजय मिळवला होता त्या नहुष महाराजांची ती पत्नी होती. महाराणी होती. तिने ययातिने शिकार करून आणलेल्या पाखराचे मांस स्वतः शिजवले, हे संयुक्तिक वाटत नाही. कारण राजवाड्यात या सर्व कामांसाठी नोकर असतात. तसेच अनेक वर्षांपूर्वी घराचा त्याग केलेल्या आपल्या मुलाचे आजही दुःख वाटणारी आई, मात्र पाखरातल्या एका आईचा मृत्यू हसतमुखाने पाहते. आपल्या मुलाने शिकार केली म्हणून त्याचे कौतुक करते. ''त्या मुक्या मातेचे मांस मिटक्या मारीत खाते.''(पृ.२१) हे मात्र मनाला खटकते. नहुष महाराज मृत्यू शय्येवर असताना त्यांच्या आजारपणात आईकडे पाहणे, ययातिला कठीण वाटे. महाराजांच्या मृत्यूने तर ती हे जग सोडून जाईल, असे वाटत होते. पण प्रत्यक्षात मात्र घडले ते निराळे. महाराजांच्या मृत्यूनंतर लवकरच राजमाता म्हणून तिने घरची बाहेरची सारी सूत्रे हाती घेतली. राज्यकारभाराच्या सगळ्या गोष्टींमध्ये उत्साहाने लक्ष घालू लागली. ती एक महाराणी असली तरी तिच्या मनातही एक शल्य नेहमी तिला खात होते. महाराजांनी इंद्रावर विजय मिळविला व ते इंद्राणीच्या मोहात पडले. तिच्या हव्यासापोटीच त्यांना शाप मिळाला. अशा पुरूषांना मुठीत ठेवण्यासाठी त्यांच्या पत्नीला स्वतःचे सौंदर्य चिरकाल टिकवण्यासाठी नेहमी तत्पर रहावे. लागते आणि म्हणूनच तिने ययातिला स्वतःचे दूध पाजले नाही. ''वात्सल्यापेक्षा सौंदर्याची काळजी करणे आवश्यक होते तिला.''(पृ.९६) परिस्थितीने माणूस घडत असतो. नियती हे त्याला सारे करावयास भाग पाडते.

महाराणी असलेली ही आई आपण एक स्त्री आहोत आणि स्त्रिला अनेक दुःखांना सामोरे जावे लागते. एखादा माणूस कितीही आवडत असेल तर स्त्रिने फक्त त्याच्या ताटाखालचे मांजर होऊनच राहायचं का? असा तिला प्रश्न पडतो. पुढे ती म्हणते, 'मी महाराणी नव्हते, ययु, महादासी होते!'(पृ.१०२) म्हणजेच आयुष्यभर ती महाराजांच्या तालावर नाचते. पण त्यांच्या मृत्यूनंतर ती बंडखोर बनते. आता मात्र ती कुणाच्याही तालावर नाचणार नाही असा निर्धार करते.

ययाति जेव्हा अलका नावाच्या दासीच्या आहारी जात आहे हे लक्षात आल्यावर ती त्या अलकाला मारून टाकते. यतिला घेऊन कच जेव्हा राजवाड्यात आला, तेव्हा आईला खूप आनंद झाला. आपल्याला त्याने आई म्हणून हाक मारावी असे तिला नेहमी वाटे. यतिला स्त्रियांचा अतिशय राग होता. त्याने आई म्हटलेच नाही, म्हणून ती आई व्यथीत झाली नंतर देवयानीने यतिला राजवाड्यात ठेवून घेण्यास विरोध केला म्हणून त्याला अशोक वनात ठेवले. आई देखील अशोक वनात राहायला गेली. यति तेथूनही पसार झाला. शेवटी कचाबरोबर महाराणी भृगुपर्वतावर वानप्रस्थ होऊन निघून जाते. कचाने यतिलाही त्याच पर्वतावर त्याच्या आईजवळ आणून दिले. हा यति पुढे आईचे प्रेम व कचाचा सहवास यामुळे सुधारला. हस्तिनापूरची महाराणी पण तिला तिचे आयुष्य नेहमी संकटांना सामोरे जाण्यातचं घालवावे लागते. आपल्या मुलांच आयुष्य त्यांच्या वडिलांना मिळालेल्या शापामुळे शापीत होऊ नये म्हणून ती सतत धडपडताना दिसते. परस्त्रियांच्या सौंदर्याला मोहून जाणं हा या घराण्याचा वारसाच आहे, असे तिला वाटते. आई म्हणून ती यतिच्या विरहाने दुःखी होते तसेच ययाति त्यागी किंवा संन्यासी होऊ नये म्हणून ती त्याच्यापुढे सर्व सुखांचा मार्ग मुक्तपणे खुली करताना दिसते. त्याच्या मनात सुखाची आसक्ती निर्माण व्हावी म्हणून प्रयत्न करते. नहुष महाराजांची पत्नी म्हणून वावरताना वरवर जरी ती समाधानी असल्यासारखी वाटत असली तरी ती मनापासून सुखी नव्हती. अशी व्यथा ती व्यक्त करते. याचे कारण पतीचा इंद्राणीविषयीचा मोह असल्यामुळे ती वैवाहिक जीवनात मात्र सुखी नव्हती.

**तारका :**

तारका ही ययातिच्या मित्राची म्हणजे माधवची पुतणी होती. तारका अवघी तीन महिन्यांची असताना तारकाची आई देवाघरी गेली. तिच्या बोबड्या बोलांनी व तिच्या मुद्रेवरील बालिश भावांनी ययाति आकर्षित होऊन तिच्याशी त्यांनी गप्पा मारल्या. ''मला तुमची लानी कलाल?''(पृ.९७) असा प्रश्न तिने महाराजांना विचारला, तिच्या या प्रश्नाने महाराजांना हसू आले होते. पण तिचा विरस होऊ नये म्हणून ते हसले नाहीत. ज्या तारकेच्या बाहुल्यांच्या लग्नाचा

खेळ खेळताना ययातिने पाहिला त्याच तारकेशी ययातिने अतिशय क्रूर खेळ खेळला. त्याच्या शारीरिक वासनेला ती सुद्धा बळी पडली. काही दिवसांनी तिला वेड लागले. ''आगीच्या ठिणग्यांना फुले मानून ती वेचायला आगीत शिरली आणि जळून मेली.''(पृ.३५३)

आयुष्यभर नशिबी आलेले भोग भोगताना तारका दिसते. जन्मतःच म्हणजेच तीन महिन्यांची असताना तिच्यापासून आईला हिरावून घेऊन परमेश्वराने तिच्यावर अन्याय केला. वडील पत्नी गेली म्हणून घरातून निघून गेले. काका, माधव याने बालपणी सांभाळले, लाड केले. पण तो ही आजारपणात देवाघरी गेला. आणि शेवटी ययातिच्या वासनेच्या भक्षस्थानी ती पडली. वेडी झाली व त्या वेडातच तिने स्वतःचा आत्मघात केला. अशी ही दुर्दैवी मुलगी तारका होती.

एकूणच 'ययाति' या कादंबरीतील 'स्त्री' व्यक्तीरेखा रेखाटताना लेखकाने देवयानी व शर्मिष्ठा या परस्परविरोधी स्वभाव वैशिष्ट्यांना दाखवून वाचकांच्या मनावर त्या बिंबविल्या आहेत. देवयानी तिच्या वडिलांसारखी तापट, मोठेपणाचा बडेजाव सांगणारी, आत्मकेंद्रित, प्रतिष्ठालोलूप, स्वार्थी, लहरी व असमंजस आहे, तर शर्मिष्ठा तिच्या अगदी उलट म्हणजे त्यागी, संयमी, प्रेमळ अशी आहे. ययातिवर निस्पृह वृत्तीने प्रेम करणारी त्याची बालमैत्रीण अलका स्वतःच्या मोहजालात ययातिला अडकवणारी मुकुलिका, ययातिच्या वासनेला बळी पडलेली तारका या प्रमुख व्यक्तिरेखा लेखकाने आपल्या कांदबरीत खुलविल्या आहेत. स्वतःच्या सौंदर्यावर प्रेम करणारी ययातिची आई मोठा मुलगा यति घर सोडून गेल्यामुळे सतत धास्तावलेली असते. ययातिने घराचा त्याग करुन संन्याशी वृत्ती ठेवू नये म्हणून ययातिला सतत ऐहिक सुखात रममान ठेवण्याचा प्रयत्न करताना दिसते.

**१.२.२ रथचक्र :**

**नायिका 'ती' :**

या कादंबरीची नायिका एक ब्राम्हणकन्या आहे. ती चांगल्या संस्कारमय वातावरणात लहानची मोठी झाली. वडील उत्तम ज्योतिषी असूनही त्यांना मुलीची होणारी वाताहत दिसली नाही. 'ती' सात वर्षाची असताना तिची आई वारली. आत्याने तिचा सांभाळ केला. एकदा लहानपणी एका तापात तिच्या तोंडावरून वारा जाऊन तिचे तोंड वाकडे झाले होते. तिच्या आत्याने तिचे तोंड रगडून नीट केले. तिच्या पायगुणाने आत्याला गर्भ राहतो. म्हणून आत्या व आतोबा तिचे खूप लाड करतात.

आत्या व आत्याच्या नवऱ्याने तिच्यासाठी खूप स्थळे पाहिली. 'ती'चे वडील पाच वर्षापासून लग्नाचे प्रयत्न करीत होते. पण आत्याला मनासारखे स्थळ मिळतच नव्हते. शेवटी आत्याच्या पसंतीचा विचार न करता वडिलांनी तिचे लग्न ठरविले. कोकणातील एका खेड्यातील शास्त्रीबुवांच्या सर्वात लहान मुलाशी तिचे लग्न ठरले. सासरी आली तेव्हा सख्ख्या सुनेसारखं सर्वांनी तिच कौतुक केलं. तिचा पायगुण चांगला ती कामसू. तिच्या रूपावरून कोणी बोलू लागलं की जावा म्हणत तिचे डोळे कसे आहेत. थोरली तिला मुलीसारखी समजे. ती भाग्यवान आहे म्हणून तिला असा नवरा मिळाला असं सर्वांना वाटे. थोरली तिला खूप जपे कपभर दूध देई सायीच दही घाली. लग्न थाटात पार पडलं. सुनमुखाच्या वेळी ती दागिण्यांनी मढून निघाली. बाप शांत झाला. हुंडा दिला. पण मुलीच्या अंगावर सासरच्या लोकांनी दागिने घातले. यानं वडील सुखावले. पण दुसऱ्याच दिवशी जावांनी आपापले दागिने परत घेतले. याचे तिला आश्चर्य वाटले नाही. कारण ठुशीची आतली बाजू घामट झालेली तिनं पाहिली होती. यामुळे हे दागिने आपले नाहीत. या गोष्टीची कल्पना तिला आली होती.

तिचा नवरा लहानपणापासूनच संन्याशीवृत्तीचा होता. लखनौवाल्याची इच्छा नसताना इतर दिरांनी त्याचे लग्न लावून दिले. लग्नानंतर सुधारेल असे त्यांना वाटले. तिला चार मुलं होतात. दोन मुले आणि दोन मुली, चौथी मुलगी पोटात असताना, नवरा घरातून पळून गेला. चार मुलांची जबाबदारी टाकून तप करण्यासाठी निघून गेला. नवरा निघून गेल्यामुळे आपण निराधार आहोत, याची जाणीव तिला होऊ लागली. आधीच ती नवऱ्याच्या विरागी वृत्तीमुळे दुःखी होती. पोरांचं लेंढार आणि न कमवत्या नवऱ्याची बायको म्हणून तिची अवहेलना होत होती आणि त्यातच नवरा निघून गेल्यामुळे याला तिच जबाबदार आहे, असा आरोप सर्वांनी केला आणि तेव्हाच खऱ्या अर्थाने तिच्या दुःखी, कष्टी जीवनाला सुरूवात झाली. थोरली सोडता इतरांनी तिला छळायला सुरूवात केली. नुसत्या लावालाव्या करायला सांगा असं जावा म्हणायच्या. लखनौवाल्या दिरांनी वाटणीची बोलणी काढली त्याला तीच जबाबदार आहे, असा मधलीने तिच्यावर आरोप केला. कुटुंबातील सगळ्यांनी तिच्याशी अबोला धरला होता.

दहा वर्षांनंतर कुठून तरी बातमी आली की, त्यांच्या वर्णनासारखी व्यक्ती नर्मदा तिरी आहे आणि नेहमीप्रमाणे त्याला शोधण्यासाठी लखनौवाल्याला पत्र पाठवून बोलावून घेतले. त्याच्याकडून मौनीबाबाला शोधायला जाण्यासाठी आर्थिक मदत हवी असते आणि नेमका त्याचवेळी तिच्या धाकट्या मुलाचा सातवीचा निकाल आला होता. तो जिल्ह्यात पहिला आला होता. त्याच्या

पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याच्या गावी जाण्याचा तिने निर्णय घेतला होता. पण तिच्या नवऱ्याच्या येण्याची बातमी तिच्या तालुक्याला जाण्याच्या निर्णयाला खो बसणारी होती. यामुळे तिची घालमेल झाली होती. घरातल्या सगळ्यांना धाकट्या मुलाची जिल्ह्यात पहिला आल्याची बातमी कळली होती पण कोणालाही त्याच कौतुक नव्हतं. तिच्या नवऱ्याचा शोध लागला म्हणून तो घरी यावा म्हणून बिल्ब पत्रांचा अभिषेक करण्याच्या तयारीला सगळं कुटुंब कामाला लागल पण तिला मात्र मुलाच्या पुढच्या शिक्षणाची विवंचना होती. जावांना मात्र तिचा खूप राग येत होता. त्या घरातली एक नतद्रष्ट बाई आहे, हावरट आहे. चोरून खाते, दुसऱ्याचे चांगले झालेले पाहवत नाही. एवढा नवऱ्याचा शोध लागला तरी तिला काही वाटत नाही. ''ही रांडेची आपल्या पोरांच पुढच शिक्षण कसं होईल याच्या काळजीत.''(पृ.३४) शेजारच्या काकांच्या मदतीनं व कुटुंबातील व्यक्तिंच्या विरोधाला न जुमानता तिने तालुक्याला जाण्याचे ठरविले. थोरलीनेही मदत केली. अखेरीस दोन मुली आणि धाकटा यांना घेऊन ती तालुक्याला आली. काकांनी तिच्यासाठी खोली पाहिली, अर्थात तिला ती जागा आवडली नव्हती. पण तरीही भाडे कमी असल्यामुळे तिने तिथच राहण्याचा निर्णय घेतला.

तालुक्याच्या ठिकाणी आपली वेगळी ओळख निर्माण करण्याचे तिने ठरविले. पहिल्या नंबरवाल्याची आई तिची ही अपेक्षा फोल ठरली. कारण गावात येऊन थोडेच दिवस झाले होते. तिच्या कानावर एक-एक गोष्ट येऊ लागली. मौनीबुवांची बायको म्हणूनच सगळे जण तिला ओळखत होते. तिच्या नवऱ्याला या गावात खूप मान होता. सगळं गाव तिच्या नवऱ्याच्या कौतुकात दंग होतं. तिचं दुर्दैव बलवत्तर ह्यात शंका नव्हती. आयुष्यभर तिनं ज्याची घृणा केली, त्याच्या पुण्याईवर तिला जगावं लागणार होतं. काकांचे शब्द तिला आठवले, ''तुझ्या माग उभी असलेली पुण्याई मोठी आहे.''(पृ.९६) सार जग त्याचा आदर करतं, त्याच्यात तसंच काही तरी असल पाहिजे. कावीळ झाल्यागत ती पाहत राहिली. म्हणून तिला आतापर्यंत दिसल नाही. अशी तिनं स्वतःची समजूत घातली. ज्या माणसानं आपल्या संसाराच खोबर केलं, ज्याचा ती मनस्वी तिरस्कार करत होती. तरीही तिन त्याच्या चांदीच्या पादुका आणून त्याची पूजा करण्याचा निर्णय घेतला. आज ती निर्भेळ पराभव पदरात घेत होती.

तालुक्याच्या गावी तिचे ठीक चाललं होते. लग्नानंतर इतके सुखाचे दिवस तिने पाहिलेले नव्हते. तासनतास कामाचे रगाडे उपसावेत, धापा टाकीत झोपाळ्यावर बसाव, पण तोंडदेखलं का होईना पण, ''दमलीस?'' म्हणणार माणूस नसावं हे दुःख तिन अनुभवलं होतं. धाकट्याच्या

शिक्षणाकरिता ती तालुक्याला आली. त्या उद्योगात मोठ्याला मात्र तिन वाऱ्यावर सोडल ह्याची तिला खंत वाटत होती. थोरला मुलगा गावाला राहून ढोरासारखं काम करतो, त्यानं तालुक्याला यावं, शिवणकाम शिकावं व आपल्याबरोबर राहाव असे तिला वाटायचं पण थोरला मात्र राजी होत नव्हता.

धाकट्याच्या शिक्षणासाठी ती सार कष्ट, हाल-अपेष्टा सहन करत होती. पण धाकट्याला त्याच काहीही वाटत नव्हतं. तो वार मिळविण्याकरता घरं धुंडाळतो आहे हे तिला माळवालीकडून कळतं. सगळे वार मिळाल्यानंतर तो तिला घरी जायला सांगणार असतो. हे कळल्यावर तिच्यावर दुःखाचा डोंगर कोसळतो. ज्याच्यासाठी एवढ्या खस्ता खाल्ल्या त्याला जर आपली गरज नसेल तर आपल्याला जगण्याची तरी गरज काय आहे अस तिला वाटू लागतं. ''आयुष्यभर जमवलेली पुंजी अकस्मात लुबाडली जावी तशागत तिची अवस्था झाली.''(पृ.१३१)

वार लावल्यास नाही म्हटल तरी माणूस मिंधा बनतो. तू वार लावू नको, लोकांकडे धुणीभांडी करायला सुद्धा जाईन. ती नरवणकरांकडे मजुरीने जाते. पण ही नोकरी आपल्याला झेपणार कशी अशी तिला काळजी वाटत होती. हाड हाताला लागत होती. हातावरच्या शिरा दिसत होत्या. आपल्याला फक्त अशक्तपणा आला आहे, ती मनाचं समाधान करते. मुलाच्या शिक्षणासाठी घरोघरी भीक मागण्याची वेळ आली तरी आपण ती मागून त्याच शिक्षण पूर्ण करू असा तिनं निर्धार केला. अशा या कठीण प्रसंगी अचानक तिला तिच्या हातातल्या सोन्याच्या पाटल्यांची आठवण झाली. गरजेपूरत सोनं काढून आपली सध्याची पैशाची अडचण सोडवावी असे तिने ठरवल. पण त्या पाटल्या पितळी आहेत. अस सोनारानं सांगितल. घरखर्चाचा व मुलाच्या फिचा प्रश्न तिला सतावू लागला. घरून तांदूळ मिळण बंद झाले होते. त्यामुळे आता खायच काय? या विवंचनेत ती होती. तिनं आठळी शिजवल्या. याच काळात मुलानं कृष्णाबाई नावाच्या एका स्त्रिच्या खानावळीत हिशोब लिहिण्याचे काम घेतले. खानावळीतून पोळ्या व बटाट्याची भाजी आणली. त्यादिवशी सगळी तृप्त होऊन झोपी गेली. पण मुलगा कृष्णाबाईकडे जातो. गावभर त्याची उलटसूलट चर्चा सुरू झाली. मुलगा कृष्णाबाईसारख्या व्याभिचारी स्त्रीकडे जातो. म्हणून सगळ्यांनी तिलाच दोष दिला. मुलाचं अभ्यासातलं लक्ष उडाल असं मास्तर सांगू लागले. मुलाविषयी अनेक अफवा गावभर पसरल्या. बदनामीच्या भीतीने मुलगा पळून गेला आणि त्यानंतर लगेचच तिचा नवरा तेथे आला. ज्याच्याकरिता एवढ्या यातना सहन केल्या, त्याच तोंड काळ झालं. शेवटी नवरा व मुलींसोबत गावाला आली. इच्छा नसताना तिला नवऱ्याला पंचारतीनं

ओवाळाव लागतं. घरी आल्यानंतर घरात चर्चा सुरू होती. झाल्या गोष्टीवर पडदा टाकावा आणि थोरल्या वहिनींच्या इच्छेप्रमाणे तिला शुद्ध  करून घ्यावं हे उत्तम. ह्यापुढ तिनं नीट वागाव म्हणजे झालं. पण हे ऐकल्यानंतर तिला फार संताप आला. असा मी काय गुन्हा केलायं? मला शुद्ध करून घ्यावं असं ह्यांना वाटत.

तिचा मुलगा याही वेळेस पहिला आला. हे ऐकून तिला तिच्या जीवनाच सार्थक झालं असं वाटतं पण मुलाच्या पत्राने ती अतिशय दु:खी झाली. कारण त्याने तिला अनेक दूषणे दिलेली असतात. म्हणजेच प्रत्येक माणसांशी तुझी भांडणे होतात. वडिलांच्या पादुका आणण्याच तुझ नाटक होतं हे मला समजल होतं. तुम्हाला दोन वेळच्या जेवणाची पंचाईत नको, म्हणून मी कृष्णाबाईकडे गेलो. त्यावेळी तू विश्वासाने माझ्या पाठिशी उभी राहायला हवी होती. वडिलांची पुण्याई पाठिशी होती म्हणून मी या भयंकर प्रसंगात शुद्ध राहिलो. माझ्या शिक्षणासाठी तू काढलेल्या खस्तांची मला जाणीव आहे पण तू मला भेटू नये, अशी माझी इच्छा आहे. डॉ. आशा सावदेकर 'ती' या व्यक्तिरेखेविषयी म्हणतात, ''एका स्त्रीच्या जगाशी आणि परिस्थितीशी चाललेल्या संघर्षातील एकाकी पडून तुटत जाणे या कादंबरीत भेटते.''[३४]

आपलं तीस वर्षाचं आयुष्य निरर्थक गेलं, या विचाराने ती आत्महत्येसाठी विहिरीवर आली. पण पाय घसरून वाकडीतिकडी विहिरीत पडली. 'रथचक्र' या कादंबरीतील नायिका 'ती' ही तिच्या जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत नियतीशी चाललेली झुंज लेखकाने यशस्वीरित्या मांडली आहे. 'ती' ही सुधारणावादी विचारांची प्रवर्तक वाटते. शिक्षणाचे महत्त्व उमगलेली ही स्त्री मुलाच्या शिक्षणासाठी वाटेत आलेल्या संकटांना सामोरे जाऊन त्याचे शिक्षण पुर्ण करण्याचा प्रयत्न करते. दहा–बारा वर्ष नवऱ्यापासून अलिप्त राहते. सीतेसारखं दिव्य करण्याचा प्रसंग तिच्यावर आला तरी ती डरणार नव्हती. पावित्र्याची पुण्याई तिच्या पदरी होती. देवाचा नाद तिला कसलाच नव्हता. अंगात येण हे थोतांड आहे. असे तिचे विचार होते. आईची भूमिका ती यशस्वीपणे पार पाडताना दिसते. मुलाच्या शिक्षणासाठी एवढ्या खस्ता खाते पण त्याबद्दल तिच्याविषयी कोणीही गौरवोद्गार काढत नाहीत व जो पिता मुलांसाठी काहीही करत नाही तो मात्र पुण्यात्मा ठरतो. हीच तिची शोकांतिका आहे. शेवटी जीवन संपवणेसुद्धा ती तिच्या मनासारखं संपवू शकत नाही यापेक्षा मोठं दु:ख ते कोणते? अशी ही नायिका मनाला चटका लावून जाते. एकूणच एकत्र कुटुंबातील ह्या दुर्दैवी नायिकेची करुण कहाणी समाजातील पिडीत महिलांचे प्रतिनिधित्व करते. तरी एवढे हाल सोसूनही आपल्या मुलांसाठी ती खंबीरपणे उभी राहते.

**थोरली :**

'रथचक्र' या कादंबरीतील कोकणातील ब्राह्मण कुटुंबातील एक आदर्श स्त्री; म्हणजे 'ती'ची थोरली जाऊ, तिचा उजवा हात उघडत नसे. कोपराशी किंचित कोन करून तो हात लोंबकळायचा परंतु तिचे केस अतिशय सुरेख, खूप लांब होते. नवरा गेल्यानंतर थोरलीच्या सुंदर केसांचे वपन करण्यात आले होते. थोरलीने समजूतदारपणे आणि सोशिकतेने कोणत्याही प्रकारे विरोध न करता केशवपन करू दिले. थोरलीच्या आशीर्वादाने झोपडीच्या जागी घर उभं राहिली. शास्त्रीबुवा म्हणजे सासरे व पती ही दोन्ही कर्तबगार पुरूष मंडळींच्या जाण्याने सर्व कुटुंबाची जबाबदारी थोरलीवर होती. तिचे दीर लहान होते. तिने त्यांना स्वत:च्या मुलांप्रमाणे जीव लावला. पुरेसे तांदूळ घरात नाहीत. म्हणून त्या माऊलीने नाचणींची आंबील पाजून दिरांना वाढवलं. लखनौवाल्या दिरावर तिचा जीव होता अस सर्वांचं म्हणण होते पण ती सर्वांनाच जपायची. थोरली जाऊ 'ती'ला मुलीप्रमाणे प्रेम द्यायची.

सर्वजण घरात तिला मानतात. सर्वांना तिच्याबद्दल आदर असतो. तिचा शब्द मोडण्याची कोणाचीही ताकद नव्हती. आयुष्यातले केवढे चढ–उतार तिने पाहिले होते. हातातोंडाशी आलेले चार मुलगे मेले. तिचा चौथा मुलगा आजारी पडल्याचं पत्र लखनौहून आलं. थोरलीन जाण्याची तयारी केली आणि पाठोपाठ दुसर पत्र आलं, ''वाताच्या झटक्यात त्यानं पहिल्या मजल्यावरून उडी घेतली आणि तो मेला.'' बी.ए.च्या परीक्षेत तो पहिला आला होता. लखनौवाला त्याला इंग्लंडला धाडण्याचा बेत करीत होता. बातमी ऐकून थोरली बेशुद्ध पडली. ती तीन दिवसांनी शुद्धीवर आली. धाकटीने मुलाच्या शिक्षणासाठी तालुक्याला जायचा निर्णय घेतला. तेव्हा तिनं तिला पाठींबा दिला. धाकटीचा मुलगा सातवीला जिल्ह्यात पहिला आला. म्हणून थोरलीने त्याला पाच रूपये बक्षीस दिले. धाकटीला दिरांनी मदत करावी म्हणून ती दिरांशी भांडण करते.

थोरली खूप आजारी पडते. त्यावेळी धाकटीचा नवरा अर्थात मौनीबाबा येतो. त्याला ती आईच्या ठिकाणी असते.(पृ.४९) तिने त्याला मुलाप्रमाणे सांभाळलेले असते. तिचे दर्शन घेण्यासाठी तो गावी आला होता. तो तिचे पाय धरतो आणि रडतो. तेव्हा थोरली म्हणते, ''हे काय? आम्ही तुझे पाय धरायचे.''(पृ.१९१) त्याला डोळे भरून पाहाते आणि दुसऱ्याच क्षणी कोलमडून पडते. तेव्हा मौनीबाबा कसला तरी मंत्र म्हणतो ती शुद्धीवर येते आणि त्याला हाक मारते, ''माझी इच्छा तृप्त झाली. आती मी चालल्ये.'' तु कुळाचा उद्‌धार केला आहेस असं सांगते. मौनीबुवाच्या पायावर डोक ठेवण्याची, गौशात दान करण्याची इच्छा व्यक्त करून ती

पुण्यवान स्त्री अनंतात विलीन होते. थोरली ही आदर्श स्त्री होती. एकत्र कुटुंब पद्धतीचा ती आधार स्तंभ होती. स्वतःची मुल व नवरा परमेश्वराने अवेळी तिच्याकडून हिरावुन घेतले तरी ती फक्त त्याचचं दुःख कुरवाळत न बसता कुटुंबातील सर्वांना आईचं प्रेम देते आणि म्हणून कुटुंबातील सर्व जण तिला मान देतात. कुटुंबाला एकत्र बांधून ठेवणारी ती आदर्श गृहिणी लेखकाने वाचकांसमोर निर्माण केली.

**मधली जाव :**

मुलबाळ नसलेली, कमावत्या पुरुषाची पत्नी. तिला घरात मान असायचा. थोरलीसुद्धा तिला वचकून असायची. ती अतिशय लहरी बाई. रागवायला तिला कारण लागत नसे. अचानक अबोला धरी. राग गेला की आपोआप बोलू लागे. एकत्र कुटुंबातील मनमानी वृत्तीने वागणारी मधली जाव कुटुंबात स्वतःचे स्थान टिकवून ठेवताना दिसते.

**लखनौवाल्यांची बायको :**

कधी काळी गावी आली की ऐट दाखवायची, शिकलेली होती. त्यामुळे गावच्या लोकांच्या भाषेला हसायची. मुलगा आय.ए.एस. ला नापास झाला तेव्हा मौनीबुवाने सांगितलेले नेम तिने धरले होते. शिक्षण घेवूनही ती अंधश्रद्धा बाळगत असलेली दिसते. सुशिक्षित असली तरी मुलगा पास व्हावा म्हणून नेम धरणे हे संयुक्तिक वाटत नाही.

**थोटी कुशी :**

कादंबरीच्या नायिकेला वेळोवेळी मदत करणारी थोटी कुशी म्हणजे तिची मैत्रिणच होती. स्वयंपाकात अतिशय सुग्रण होती. त्यामुळे तालुक्याच्या गावी नरवणकरांसारख्यांच्या कुटुंबात काही लग्न किंवा इतर काही कार्यक्रम असले की थोटी कुशीला बोलावणं पाठविल जायचं. ती जायची आणि येताना कार्यक्रमातले लाडू किंवा नारळ घेऊन यायची. कार्यक्रमांना स्वयंपाक करणे हेच तिच्या उदरनिर्वाहाचे साधन होते. एकदा तिच्या जावांनी गंमत म्हणून तिच्या धाकट्या मुलाच्या गळयात गोवऱ्यांची माळ घातली. तेंव्हा थोटी तिथचं होती. तेंव्हा थोटी बोलली, ''सोन्याचा दागिना नाही म्हणून घातला की काय?''(पृ.४८) असं हसतहसत म्हणून तिनं त्याच्या गळ्यातील गोवऱ्यांची माळ काढली व खुंटीला अडकवली. पण मग मात्र घडलेला प्रकार गावभर सांगत सुटली. कादंबरीची नायिका 'ती'च्या मुलाचा पहिला नंबर आला तेव्हा तालुक्याला नरवणकरांच्या घरी, त्या मुलाचा बाप आई, मुलगा सगळे माझ्या परिचयाचे आहेत अशी फुशारकी मिरवते. ती

तालुक्याला गेल्यावर तिला भेटण्यासाठी थोटी नेहमी जायची. कुशीजवळ थोरली तिच्यासाठी सामान पाठवायची तिला जेव्हा गावाकडून तांदूळ मिळणे बंद झाले. तिला आर्थिक चणचण भासू लागली. तेव्हा नरणवणकरांकडे सुकडी सोलण्याचे काम थोटीने मिळवून दिलं. अशा प्रकारे थोटी म्हणजे साधीभोळी अशी स्वयंपाकात सुग्रण असलेली स्त्री होती. ''थोटी म्हणजे फणस.'' समाजात परोपकार वृत्तीने वावरताना थोटी कुशी वाचकाना भावते.

**कृष्णाताई :**

कृष्णाताई ही खानावळ चालवणारी स्त्री होती. कादंबरीची नायिका 'ती' चा धाकटा मुलगा तिच्याकडे हिशोब लिहिण्याची नोकरी स्वीकारतो. सुरुवातीला कृष्णाताई त्याला खूप मदत करते. त्यांच्या घरच्यांसाठी डबा देते. त्याच्या आई व बहिणींसाठी लुगडी देते. त्याच्या राहण्याची ही सोय लावते, म्हणजे त्याला त्याच्या अभ्यासासाठी स्वतंत्र खोली देते. ह्या सर्व गोष्टींमुळे तिला संकटसमयी देव भेटल्यासारखे वाटते. पण थोड्याच दिवसात त्यांचा भ्रमनिरास होतो. कारण त्याला नंतर असा अनुभव येतो की, ''ही तर वेश्या दिसते! सभ्यतेचं सोंग हिला जमतं कसं?''(पृ.१७१) कारण या सतरा-अठरा वर्षाच्या मुलाच्या भावना तिने चाळवल्या व त्यामुळे वाईट विचार तिच्या मुलाच्या डोक्यात येऊ लागले. अभ्यासात त्याचे मन रमेना. अशी ही सभ्यतेचा बुरखा पांघरलेली पण प्रत्यक्षात असभ्य असलेली कृष्णाताई लेखकाने मांडली.

**तिच्या मुली :**

तिच्या मुली काळ्या-सावळ्या असल्या तरी चारचौघीत उठून दिसणाऱ्या होत्या. सतत धारवाडी परकराचा आईकडे हट्ट करणारी धाकटी मुलगी आई तो घेणार म्हटल्यावर खूश व्हायची. ती लहान असल्यामुळे थोडी हट्टी व अल्लड होती. त्यामानाने मोठी थोडी समंजस होती. अमावस्येला तिच्याही अंगात यायला सुरुवात झाली होती. नरवणकरांकडे महिनाभर काम केल्यामुळे थकलेल्या आईला अशक्तपणा आला तेंव्हा तुला बरं वाटत नाही तर तू कामाला जाऊ नकोस असं आईला सांगते. तुझ्या ऐवजी मी कामाला जाते असं म्हणते यावरुन ती आईला जपणारी होती. सर्व कादंबरीमध्ये तिच्या मुलींना गौणत्व आहे.

रथचक्र या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा 'ती' आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाने कादंबरीतील पात्रांना नावे दिली नाहीत. ती आणि तिच्याशी नातेसंबंध असणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा. श्री.ना.पेंडसे यांची रथचक्र या कादंबरीतील अनामिका नायिका दुःखाच्या, दुर्भाग्याच्या चक्रात अडकते. शेवटपर्यत तडफडते. एकत्र कुटुंबाचा पाया असलेली तिची थोरली जाऊ तिला

प्रेमाने वागविते. कमावत्या पुरुषाची पत्नी म्हणून टेंभा मिरविणारी मधली जाऊ, तसेच गौण म्हणून उल्लेखलेली धाकटी, गावी आल्यावर ऐट दाखविणारी लखनौवाल्या दिराची पत्नी. तिची मैत्रिण की जिला लेखकाने फणसाची उपमा दिली ती थोटी तसेच कृष्णाबाई म्हणजे वरवर पाहता सभ्य दिसणारी पण व्याभिचारी स्त्री, थोटी व कृष्णाबाई यांना लेखकाने नाव दिले आहे. कारण त्या नायिकेशी नातेसंबंधाने बांधलेल्या नाहीत. चारचौघींमध्ये उठून दिसणाऱ्या तिच्या मुली. वरील सर्व स्त्री व्यक्तिरेखा लेखक श्री.ना. पेंडसे यांनी रथचक्र या कादंबरीत रेखाटल्या आहेत.

**१.२.३. स्वामी :**

**रमाबाई :**

'स्वामी' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा माधवराव अर्थात स्वामी व गृहस्वामी म्हणजे रमाबाई माधवराव पेशव्यांची महाराणी. लांबट उभा चेहरा, कपाळी लावलेल्या कुंकवाच्या चंद्रकोरीमुळे रमाबाईंचा सात्विक चेहरा उठून दिसतो.(पृ.६१) नाकी डोळी रेखीव, गौरवर्ण, टपोरे नेत्र, कपाळी चंद्रकोर, डोळयात काजळ(पृ.५१) अशा त्या रुपवान होत्या. एकदा दक्षिणेतले जवाहिऱ्यांचे मोठे व्यापारी आले. त्या व्यापाऱ्याला माधवरावांनी रमाबाईच्या महाली पाठविले. तेंव्हा रमाबाईंनी प्रश्न विचारला, ''इकडून काही दरबारी खरेदी झाली का?''(पृ.१८२) नाही हे उत्तर ऐकल्यावर त्या म्हणाल्या, ''आपण मोती घेऊन जा, आम्हाला मोत्यांची सध्या गरज नाही असं कळवा.''(पृ.१८३) पेशव्यांच्या सम्राज्ञी पण त्यांना दागिन्यांचा हव्यास नव्हता.'' अतिशय लहान वयात त्यांना जबाबदारी कळू लागली तसेच 'तुझ्या पायान साक्षात लक्ष्मी घरी आली आहे.'(पृ.१४४) अशा प्रकारे गोपिकाबाई त्यांच कौतुक करतात.

रमाबाई माधवरावांसाठी दूध व औषध घेऊन उभ्या होत्या तेंव्हा माधवराव म्हणतात, ''तुम्ही जर आमच्या आयुष्यात आला नसता तर दररोज हे घेणं कठीण होतं.''(पृ.२५७) ''ज्या ज्या ठिकाणी मी काही सुंदर पाहतो, तिथं तिथं तुझी उत्कटतेने आठवण येते.''(पृ.३१३) आजारपणामुळे माधवराव हताश होतात तेव्हा ते रमाबाईंना म्हणतात, ''तू नसतीस, तर कुणी सांगाव, हे सारं सहन करण्याचं त्राणही राहिल नसतं. आता आशा राहीली फक्त तुझ्या सोबतीची... तेवढी मिळाली, तरी पुष्कळ झालं...''(पृ.३७९) रमा या अखेरच्या वेळी कुठल्याही विचारानं मन अस्वस्थ होत नाही. पण तुझा विचार आला, की जीव व्याकुळ होऊन जातो.(पृ.३९६) मला आयुष्यभर तुझ्याकडे लक्ष देता आले नाही ही खंत ते रमाबाई पुढे व्यक्त करतात. ''राज्याची स्वप्न साकार झाली, पण संसाराची स्वप्न तशीच राहून गेली आता त्यांना काही अर्थ उरलेला

नाही...''(पृ.३९८) रमा, पुनर्जन्मावर माझा विश्वास आहे. तुझी सोबत मिळाली तर अजाणतेपणी झालेल्या तुझ्यावरचा सारा अन्याय मी भरुन काढीन पुन्हा ती चूक होऊ देणार नाही.''(पृ.३९८) माधवरावांची प्रकृती खालावत चाललेली पाहून रमाबाईंनी रामजीला सतीची वस्त्र आणण्यास सांगितली. ही गोष्ट जेंव्हा माधवरावांना समजली तेंव्हा माधवराव म्हणतात, ''रमा, तुझ्या निष्ठेला सीमा नाही! तुझी श्रद्धा सफल होवो. रमा तुला सांगितलं, तर आश्चर्य वाटेल पण मृत्युपत्र करताना तुझ्या बाबतीत काहीही करायला मन धजलं नाही. सारं राज्य तुला दिलं असतं तरी ते अपुरं पडलं असतं. का, कुणास ठाऊक, पण माझ्या माग तू राहशील असा विश्वासच वाटत नव्हता मला.''(पृ.४०२) माधवरावांनी जीवनाच्या अंतसमयी रमाबाईंविषयी ज्या हृदयद्रावक भावना व्यक्त केल्या त्यातून रमाबाईंच्या सात्विक, सच्छील वृत्तीचे दर्शन होते. लेखक रणजित देसाई यांना रमाबाईचे चित्रण कशा प्रकारे करायचे याचा संदर्भ घेऊन प्रा. आनंद यादव म्हणतात, ''इथं रमा माधवरावांशी एकजीव झालेली आहे. पतीला समजून घेणारी, कोवळ्या, हळव्या मनाची एक आदर्श पत्नी इथं दादांनी अप्रतीम कौशल्यानं रेखाटली आहे. दादांचं आदर्श पत्नीचं हे रूप होतं.''[३५] रमाबाईच्या माधवरावांच्या मृत्यूनंतर सती जाण्याच्या निर्णयाने लेखकाने रमाबाईंच्या व्यक्तिचित्रणाला अत्युच्च शिखरावर नेऊन ठेवले.

माधवरावांचे देहावसान झाले, तेव्हा रमाबाई रेशमी श्वेतवस्त्र परिधान करतात. सौभाग्याचे सर्व अलंकार त्यांनी घातले होते आणि त्यामुळे उपवासाने अतिकृश होऊनही त्यांचे लावण्य झाकले नव्हते. धीमे धीमे पावले टाकीत रमाबाई माधवरावांच्या उशालगत जाऊन बसल्या आणि जवळचा मयुर पंख घेऊन माधवरावांना ढाळू लागल्या. सर्वांनी त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला पण त्यांचे मतपरिवर्तन झालं नाही. समोरच्या अथांग जनसमुदायाला रमाबाईंनी हात जोडले आणि शिडीवरुन चितारोहन केलं. माधवरावांचं मस्तक आपल्या मांडीवर घेऊन रमाबाई बसल्या होत्या. माधवरावांचा शांत चेहरा निरखीत होत्या. जनसमुदायातून उठणारा आक्रोश त्यांच्या कानावर पडत नव्हता. चितेभोवती राखणदार, ढोलकरी, नगारे, ढोलकीवाले टिपऱ्या सरसावून उभे होते. फुटणाऱ्या लाकडांखेरीज काही आवाज कानांवर येत नव्हता. लेखकाने रमाबाईचे सती जाणे हा प्रसंग वर्णन करून रमाबाईचे माधवरावांप्रती असलेले उत्कट प्रेम व्यक्त केले. रमाबाईच्या व्यक्तिरेखेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''अल्लड रमेच, प्रौढ प्रेयसीचं आणि समर्पित पत्नीचं हे शोकान्त चित्रण या कादंबरीच्या भाव समृद्धतेतलं महत्त्वाच वैशिष्ट्ये आहे.''[३६] वास्तविक पाहता पेशव्यांच्या घराण्यात सती जाण्याची प्रथा नसतानाही रमाबाईंनी सती जाऊन

समर्पणाची उत्तुंग झेपच घेतलेली आहे. पतीविषयी असलेले निस्सिम प्रेम, कुटुंबातील मोठ्या व्यष्क्तींविषयी असलेला आदर, नोकराप्रती प्रेम असलेल्या रमाबाई सती जाण्याच्या प्रसंगाने वाचकांच्या मनाला चटका लावून जातात.

**गोपिकाबाई :**

माधवरावांची आई रघुनाथराव व माधवराव यांच्यातील संघर्ष मिटविण्याची भूमिका पार पाडतात. त्या रमाबाईंच्या सासू होत्या. पण रमाबाईंचं फार कौतुक करायच्या. ''तुझ्या पायानं साक्षात लक्ष्मी माझ्या घरी आली आहे.'' असे गौरोवद्गार त्या रमाबाईविषयी काढायच्या.(पृ.१४४) मल्हारराव रास्ते हे गोपिकाबाईंचे बंधू पेशव्यांचे खुद्द मामा निजामाने पुणं लुटलं त्या लुटीत निजामाला रास्ते मामांनी मदत केली हे माधवरावांना कळल्यावर त्यांनी रास्ते मामांना पाच हजार रुपयांचा दंड केला. तीन दिवसाच्या आत जर रक्कमेचा दप्तरी भरणा केला नाही तर त्यांची स्थावर जंगम जप्त करुन आम्हाला भरणा करुन द्यावा लागेल. अशी शिक्षा माधवरावांनी फर्मावली. रास्ते मामांनी घडला प्रकार गोपिकाबाईंना सांगितला. गोपिकाबाई संतापल्या, त्यांनी माधवरावांना दंड माफ करण्यास सांगितले. पण माधवरावांनी नकार दिला. तेव्हा गोपिकाबाई म्हणाल्या, ''माधवा, जर दंड वसूल झाला तर मी पाणी प्यावयास देखील ह्या वाड्यात राहणार नाही.''(पृ.१६५) गोपिकाबाई माधवरावांवर रागावून गंगापूरला गेल्या. माधवरावांच्या आजारपणातही गोपिकाबाई आल्या नाहीत. माधवरावांच्या मृत्युसमयी किंवा त्यानंतरही त्या आल्याचा उल्लेख कुठेच आला नाही.

अंतःसमयी माधवरावांना गोपिकाबाईंची खूप आठवण झाली. ते बापूंना म्हणतात, ''ज्यांनी आम्हाला जन्म दिला, वाढवलं, त्यांच्या स्मरणाविना आमचा एकही दिवस उलटला नाही, त्या आमच्या मातोश्रींचं दर्शन अंतकाळीही दुर्लभ व्हावं, ह्यांच दुःख फार मोठं वाटतं, त्यांना सांगा की, त्यांची आठवण आम्हाला सदैव येत होती.''(पृ.४०३) हा प्रसंग मन व्यथीत करणारा वाटतो. मधल्या काळात मातोश्रींचा पत्रव्यवहार मात्र चालू होता. माधवराव रमाबाईंना म्हणतात, ''दोन महत्त्वाची पत्रे होती. एक गंगापूरला पाठवायला हवं. बरेच दिवसांत मातोश्रींची खबर नाही.''(पृ.३१३)

गोपिकाबाईंची व्यक्तिरेखा सूनेचे वेळोवेळी कौतुक करणारी  वाटली. स्वतःच्या भावाने केलेल्या अपराधास मुलाने केलेली शिक्षा त्यांना मान्य झाली नाही. मुलाच्या न्यायवृत्तीचा

अभिमान वाटण्याऐवजी मुलावरील त्यांचा रोष मनाला चटका लावतो. कारण माधवरावांच्या आजारपणातही त्या मुलाला भेटायला आल्या नाहीत.

**आनंदीबाई :**

रघुनाथरावांच्या पत्नी म्हणजे आनंदीबाई, माधवरावांनी भर दरबारी रघुनाथरावांचा केलेला अपमान आनंदीबाईंना सहन झाला नव्हता. त्या म्हणतात, ''मला तो मुलासारखा आहे, पण भर दरबारी झालेला पतीचा अपमान कोण सहन करु शकेन? पोटच्या पोराचीदेखील गय करणार नाही.''(पृ.१६) आनंदीबाईंना दागिन्यांचा भारी सोस होता आणि म्हणूनच रास्ते मामींच्या गळ्यातल्या मोत्याच्या तन्मणीचं खोड आनंदीबाईंना भूरळ पाडत होते. रमाबाई हरिविजय वाचत होत्या, तेथे आनंदीबाई गेल्या व त्यांना म्हणाल्या, ''पांडव वनवासात जातात बाई। तो प्रसंग ऐकताना डोळे पाणावतात.''(पृ.५०) म्हणजेच आनंदीबाईंचे पांडवप्रताप व हरिविजय याविषयी असलेले अज्ञान उघड होते. रमाबाईंनी सती जाण्याचा निर्णय घेतला तेंव्हा आनंदीबाईं त्यांना समजावत म्हणाल्या, ''ऐक, मुली! असा अविचार करु नकोस, आम्ही नाही का तुला? का सोडून जातेस आम्हाला?'' पतीला कुटुंबात मानाचे स्थान असावे अशी अपेक्षा, मत्सरी व्यक्तिमत्त्व पण रमाबाईंच्या सती जाण्याच्या समयी हळवे होताना दिसते.

**पार्वतकाकू :**

पार्वतीकाकू ह्या माधवरावांच्या काकू व सदाशिवभाऊंच्या पत्नी होत्या. पानीपताच्या लढाईवरुन सदाशिव भाऊ घरी पुन्हा परतलेच नाहीत. सदाशिवभाऊ जिवंत आहेत हाच पार्वतीकाकूंचा ठाम विश्वास अखेरपर्यंत होता. पार्वतीकाकूंचा आपल्या पतीविषयी असलेला श्रद्धाभाव यातून प्रकट होतो.

'स्वामी' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखांमध्ये देवावर वाहिलेल्या सुगंधित फुलांसारखी रमा की जिने पेशव्यांची परंपरा नसताना सती जाऊन समर्पणाची उत्तुंग झेप घेतली. कादंबरीत लेखकाने अल्लड रमेचं, प्रौढ प्रेयसीचं आणि समर्पित पत्नीचं शोकात्म चित्रण केले आहे. माधवरावांच्या आई, गोपिकाबाई यांनी सुनेवर कन्येवत प्रेम केले. भावाने केलेला गुन्हा मुलाने म्हणजे माधवरावांनी पोटात घातला नाही म्हणून अखेरपर्यंत माधवरावांवर नाराज असलेल्या गोपिकाबाई, दागिन्यांचा हव्यास असलेल्या माधवरावांच्या काकू आनंदीबाई तसेच पती जिवंत आहे असा ठाम विश्वास असलेल्या सदाशिवभाऊंच्या सश्रद्ध पत्नी पार्वतीकाकू या प्रमुख व्यक्तिरेखा रणजित देसाई यांनी स्वामी या कादंबरीत शब्दबद्ध केल्या आहेत.

### १.२.४ स्मरणगाथा :

**कृष्णाबाई :**

कृष्णाबाई परदेशी नावाची एक अपऱ्या नाकाची, स्थूल, गोरीबाई. ती गणपतराव बाबांच्या पत्नीच्या निधनानंतर थोड्याच दिवसात घरात जी शिरली ती कायमचीच वास्तव्य करु लागली. लेखकाने गणपतरावबाबा व कृष्णाबाई यांच्या नात्याचा कुठेही स्पष्ट उल्लेख केलेला नाही. दर आठ दिवसांनी कृष्णाबाई गोरक्षणाची पेटी आणि झोळी घेऊन गावात फेरी मारी. परतताना पेटीत खुर्दा असे व झोळी धान्याने गच्च भरलेली असे. लेखकाला गणपतरावबाबांनी अकोल्याला स्वतःच्या घरी नेले. तेव्हा लेखक म्हणतात ''माझं येणं कृष्णाबाईला फारसं आवडलं नाही.''(पृ.१५८) लेखक कृष्णाबाईबरोबर गोरक्षणाची पेटी व झोळी घेऊन जाऊ लागला त्यावेळी लोक तिला लेखकाविषयी विचारीत असत तेव्हा कृष्णाबाई म्हणते, ''तो? एक अनाथ पोरगा. ह्यांनी माझ्या मदतीला आणला.''(पृ.१५९) पहिल्याच दिवशी झोळी आणि पेटी गच्च भरली. तेव्हा कृष्णाबाईला बरं वाटलं असावं. कारण त्यानंतर तिची लेखकाबरोबरची वागणूक सुधारली.

गणपतराव बाबांच्या मृत्यूनंतर मात्र कृष्णाबाईने लेखकाला घरात येण्यास प्रतिबंध केला. बाबा होते तोपर्यंत कृष्णाबाईचं काहीही चालत नव्हते पण ते गेल्यावर तिने आपली विषारी नखे बाहेर काढली. घरोघरी जाऊन तिने प्रचार केला. ''या मुड्द्यानंच धन्यांना कायबाय खाऊं घातल.''(पृ.१७९) गणपतरावांच्या वाड्यावर ती मालकीण म्हणून हक्क गाजवत होती. कदाचित तिला गोपाळ हा गणपतरावांच्या वाड्याचा वारसदार होईल याची भीती असावी. कृष्णाबाईने गोपाळला घरात येण्यास बंदी केली तेव्हा पंचमंडळीनी निर्णय दिला. ''गोरक्षण तुझं हे आम्हाला कबूल. गणपतराव बाबांनी शेवटी तुला आमच्या स्वाधीन केलं. पण तू वयात येई पर्यंत तुझी पालक म्हणून कृष्णाबाईच राहील. तू तिच्याशी जुळवून घ्यायला पाहिजेस.''(पृ.१८०) अशा प्रकारे गणपतरावबाबांच्या मालमत्तेवर हक्क सांगणाऱ्या कृष्णाबाईचे व्यक्तिमत्त्व लेखकाने उभे केले आहे.

**बनूबाई :**

बनूबाई सातारा जिल्ह्यातली कणखर व्यक्तिमत्वाची बाई होती. देहू या गावी लेखक महानंदस्वामी कडून वारकरी संप्रदायाची दीक्षा घेऊन वास्तव्यासाठी गेले. तिथल्या धर्मशाळेतील मुलांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था बनूबाई करीत होती. 'बनूबाई थोराड अंगाची, धारदार नाकाची,

मोठी शूर आणि हिंमतीची बाई होती. मूलं तिला काहीशी वचकून असत.'(पृ.१८६) महानंदस्वामींनी बनूबाईस पत्राने कळविले की सर्व मुलांना घेऊन भायखळ्याला सप्त्याला येणे. 'बनूबाईच्या अंगी या सर्वच मुलांना शासन लावायाजोगं कर्तृत्व होतं.'(पृ.१८७) ती सर्वांना घेऊन मुंबईला गेली. सप्ताह संपल्यावर सर्व मुलांना बनूबाई देहूला घेऊन आली. असा त्या मुलांनी देहू ते मुंबई व मुंबई ते देहू असा पायी प्रवास केला. धर्मशाळेतील मुलांना शिस्त लावणारी बनूबाई ही व्यक्तिरेखा होती.

**माई :**

माई नावाप्रमाणेच अतिशय प्रेमळ होती. लेखक गो.नी. दांडेकर यांची दोन वर्षांनी मोठी असलेली बहीण. बालपणी लेखक आणि माई यांची खूप मैत्री होती. एकमेकांविषयीच्या गुप्त गोष्टी ते एकमेकांना नेहमी सांगत होते. लेखकाला स्वतः मध्ये जो काही चांगुलपणा मिळाला असेल त्याचे श्रेय लेखक माईला प्रांजळपणे देतात. निसर्गातील विविध घडामोडींची रहस्य तिने लेखकाला उघड करून सांगितली. निसर्गावर प्रेम करायला शिकविले. इंग्रजी राजवटीविषयी चीड तिनेच लेखकाच्या मनात निर्माण केली. शिवाजी महाराजांविषयीचा आदरभाव निर्माण होणाऱ्या कादंबऱ्याचे वाचन लेखकाने माईच्या प्रेरणेनेच केले. लेखक व लेखकाला असलेली भावंडे व शेजारी पाजारी त्यांच्या आईला 'माई की माँ' असेच संबोधित. याचा लेखकाला राग येत असे. त्याला राग आलाय हे मनकवड्या माईला समजत होते. ती लेखकाला तिच्या कुशीत घेऊन त्याची समजूत काढीत असे आणि म्हणून लेखक म्हणाले, ''याच मुळं आई-दादां पेक्षांही माई हीच माझी उपास्य देवता झाली.''(पृ.५३) माईच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन त्याला जसे भावले तसे लेखकाने केले आहे. ''त्याच्याच तोंडावळ्याची, मोठाल्या काळ्याशार डोळ्यांची, दात थोडे बाहेर असलेली, प्रसंन्न मुद्रेची एक मुलगी, परकर-पोलकं नेसलेली.''(पृ.५४) असे माईचे प्रथम दर्शनीचे रुप होते. दोघांनी मिळून आर्या श्लोक, साक्या, दिंड्या, फटके, शार्दूल विक्रीडित असे खूप पाठांतर केले होते. कितीतरी वस्तूंचे नुकसान केले तर वडिलांचा मारही दोघांनी मिळून खाल्ला होता. ''पण पाठीवर छड्या वाजत असतांही आम्हां दोघांना एकमेकांचा आधार असे.''(पृ.५४) असे लेखकाचे मत होते. लेखकाने आणि माईंने वडिलांचा खूप मार खाल्ल्याचा प्रसंगही लेखकाने उल्लेखिलेला आहे. लेखकांचे वडील वरच्या वर्गाला गणित शिकवित होते. दादा शिकवित असलेल्या वर्गातील एक मुलगा गणिताच्या पेपरसाठी या दोन्ही भावंडांकडे गयावया करू लागला. मी जर पास झालो नाही तर मला आत्महत्याच करावी लागेल. असे त्या मुलाने सांगितल्यावर

दोन्ही सहृदय भावंडाच्या मनात त्याच्या विषयी करूणा उत्पन्न झाली. दादाच्या खिशातून पेपर काढून तो पाहून त्या मुलाला सांगितला, पण हा सर्व प्रकार हेडमास्तरांना कळला. दोघांनाही हेडमास्तरांनी ऑफिसमध्ये बोलावले व त्या गैर प्रकाराविषयी विचारणा केली पण दोघेही कबूल झाले नाहीत. वडिलांनीही विचारले वडिलांनीही दोघांना खूप मारले पण त्या भावंडांनी एकमेकांची साथ सोडली नाही.

अशा या प्रेमळ माईचा सहवास आता आपल्याला मिळणार नाही याची जाणीव लेखकाला माईचे लग्न ठरल्यावर झाली. भाऊराव सुपेकर या देशस्थ, कण्व शाखीय, बिजवरा सोबत माईचा विवाह ठरला. लग्नाच्या खर्चात भाऊराव आप्पाची मुंज करून देणार होते. लग्न ठरलं त्या रात्री माईने लेखकाला तिच्या कुशीत घेतले. दोघेही एकमेकांशी काहीही न बोलता आसवं ढाळीत होते. लेखकाला माईच्या पश्चात कसे जगावे लागणार हे आपल्याला लेखकाच्या स्वगतामधून समजते, ''आता माझे निर्णय मलाच घ्यायचे आहेत. माझे प्रश्न मीच सोडवायचे आहेत. माझ्या जीवनाच्या दिशा मीच ठरवायच्या आहेत. इथून पुढं मला माईचं मार्गदर्शन मिळणार नाही. आतां जीवनाच्या या शर्यतीत एकट्यानं धावायचं आहे. माझ्याच जबाबदारीवर जिंकलो तरी मीच. हारलो तरी माझा मीच. हे हर्ष शोकांचे फुंद माझे मलाच आंतल्या आंत जिरवावे लागतील.''(पृ.८७) लेखकाच्या जीवनात माईचे स्थान आईपेक्षाही उच्च होते असे मला वाटते. पुढे लेखकाने मांडलेले मत, ''त्या एकाच रात्री, माईच्या माझ्या गुरूच्या मिठीत माझं बाल्यं संपलं.''(पृ.८७) माई लग्न होऊन गेल्यानंतर लेखकामध्ये मोठी पोकळी निर्माण होणार होती. लग्नानंतर माई स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झाली. भाऊरावांना म्हणजे माईच्या पतीला सरकारी नोकरी होती. म्हणून त्यांनी समजावण्याचा प्रयत्न केला तेव्हा माई म्हणाली, ''तर मग नोकरी सोडून द्या. दुसरी खाजगी पत्करा. इतका पगार मिळणार नाही, पण जो मिळेल, त्यात मी घर चालवीन. हवी तर मी नोकरी करीन.''(पृ.८८) म्हणजे पती सरकारी नोकरी करतात म्हणून इंग्रज सरकार विरूद्ध उठाव करायचा नाही. हे माईला मान्य नव्हते. तिने धनतोलीत या त्यांच्या गावात पहाटे उठून प्रभात फेरीत घोषणा देत, राष्ट्रीय उत्थानाची गाणी म्हणत आपला सक्रीय सहभाग नोंदविला होता. गोपाळवर नितांत प्रेम करणारी कहीण त्याच्यावर आईप्रमाणे प्रेम करणारी भासली. प्रेमळ व हळव्या असलेल्या माईचे दुसरे रुप स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेणाऱ्या रणरागिणी प्रमाणे वाटले. लहानपणी माईचे आणि गोपाळचे असलेले बहीण-भावांचे प्रेम समाजात एक आदर्श निर्माण करणारे तसेच सुखदुःखात एकमेकांना साथ देणारे होते.

**इझाबेल :**

लेखक ज्या बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहत होते त्या बंगल्याचा माल फ्रॉन्सेका व त्या फ्रॉन्सेकाची मोलकरीण इझाबेल ही होती. फ्रॉन्सेकाच्या घरची ही मोलकरीण ही लेखकाची मैत्रीण होती. गोव्यातील सृष्टीसंपन्न प्रदेशातल्या या मुलीने लेखकाला बालपणी सृष्टीचा परिचरा करून दिला होता. वृक्षवनस्पतीची तिला जाण होती. कृमिकीटकांशी तिचा परिचय होता. 'बसकं नाक असलेली, अंबाडा घातलेली फ्रॉक ल्यालेली इझाबेल.'(पृ.२३) असे लेखकाने तिचे वर्णन केलेले आहे.ती म्हैस चरायला घेऊन गेली की लेखक तिच्या बरोबर फिरत असत. जीवसृष्टीतील अनेक गोष्टींचे ज्ञान लेखकाला इझाबेल मुळे मिळाले. उदाहरणार्थ गांडूळ निरूपद्रवीजीव आहे. बेडूक आठ महिने जमिनीच्या तळात गाढ झोपून असतात. गोमीला शेकडो पाय असतात, नाकतोड्याच्या मागील दोन तंगड्या चिमटीत धरल्यातर तो चावत नाही. म्हणून लेखक म्हणतात, ''इझाबेलच्या रूपानं गुरू मिळाला.''(पृ.२४) निसर्गातील कितीतरी गोष्टींची माहिती लेखकाला लहानपणी इझाबेल या अनाथ किरिस्ताव मुलीमुळे मिळाली. निसर्गातील बऱ्याच गूढ रहस्य उकलणारे इसाबेल निसर्गपूजक भासते.

**मीरा :**

नर्मदा परिक्रमा करीत असताना प्रवासात जे काही लोक अनुभवायला मिळाले त्यातीलच एक म्हणजे मीरा होती. तिचा आवाज अतिशय सुरेल होता. परिक्रमा करणाऱ्या एका परिक्रमावासीची परिक्रमा संपली म्हणून त्याने सर्व परिक्रमावासींसाठी जेवण बनविले होते. जेवून गोपाळ निवांत झोपला होता पण अचानक मीरेचे मधूर स्वर कानावर पडले आणि गोपाळ त्या स्वरांच्या दिशेन पळाला. एका विराणी नंतर दुसरी सुरु केली.तेथून पुढे गोपाळची मीरेबरोबर ओळख झाली. महाराजजी म्हणजे तिला ज्यांनी गायनाचे धडे दिले होते. मीरा त्यांच्याबरोबर पळून आली होती. महाराजजीचे लग्न आधीच झालेले होते. पण मीरा महाराजजी यांच्या आवाजावर फिदा झाली त्यामुळे मीरा त्याच्याबरोबर पळून आली. 'महाराजजींच्या अन् तिच्या रंगरूपांत अन् वयात कुठं ही कसलं ही साम्य नव्हतं.'(पृ.४६७) तिने गोपाळला भाऊ मानले होते. रंग, रुप, वय याचा विचार न करता केवळ गायनाचे धडे दिलेल्या महाराजजींबरोबरच पळून जावून लग्न करणाऱ्या मीरेचे वागणे विपरित वाटते. समाजात एखाद्या कलेवर नितांत प्रेम करणारे लोक भावनेच्या भरात वाहवत जातात, असे वाटते.

### १.२.५ सत्तांतर :

**उनाडी :**

उनाडी ही अंगाने लहानखोर होती, पण वयात आली. शहाणी झाली, तेव्हा हिचे शारीरिक चाळे सुरू झाले. बाकीच्या कुणीही लहान धाकट्या पोरीजवळ ओढून ओढून ती नरासारखी त्यांच्यावर चढायची. पोरी ओरडत, किंचाळत दूर पळायच्या, टोळीच्या मालकाचा इतर वानरीचा डोळा चुकवून ही शेजारच्या टोळीच्या हद्दीत जात होती. या टोळीत दोन वयात येऊ घातलेली पोरं होती. त्यापैकी एकाला फसवून झुलवून ही झाडाझुडपात आणायची. त्याच्याकडे कुले करून चार पायांवर उभी राहायची आणि जोरजोरात मान डोलावत राहायची. जणू काय ती त्याला बोलवत असे. अशा प्रसंगी तिच्या टोळीतील जाणत्या वानरीचे लक्ष हिच्यावर असायचे. दुसऱ्या टोळीतले ते पोर घाबरत घुबरत, इकडे तिकडे बघत उनाडीशी जुगू लागले की, एखादी अनुभवी वानरी उड्या घेत यायची आणि पोरावर हल्ला करायची. त्यांचे केस ओढायची, तडारने मारायची, दात दाखवायची. त्याचे कारण असे होते की, ''अशा तऱ्हेने टोळीतल्या वानरी बाहेरच्या नराशी जुगू लागल्या, तर सतत भाराभर पोरं टोळीत जन्मत राहतील आणि संख्येवर बंधन राहणार नाही. सगळे उपासमारित सापडतील. वंशखंड होईल. शिवाय अगदी नजीकची गोष्ट म्हणजे हिला पोरं झालं की, नवा भागीदार झाला.''(पृ.७ सत्तांतर) यातून लेखकाने यांच्या जीवनातील भविष्यात उद्भवणारी संकटे, समस्या, स्वअस्तित्व याच्यावर मार्मिक भाष्य केले आहे. उनाडीच्या चित्रणातून लेखक लैंगिक आकर्षणाचे वर्णन करतो. विशिष्ट वयातील ही नैसर्गिक प्रवृत्ती त्यातून मांडतो. हिच्या उनाड वागण्यामुळे, स्वभावामुळे, लेखकाने तिचे 'उनाड' असे नामकरण केलेले आहे. हिच्या उनाड वागण्यामुळे हिच्यावर सतत टोळीतील कुणी ना कुणी वानरीला लक्ष ठेवावे लागते.

**तरणी :**

तरणी अंगाने थोराड होती. तिची छाती फारशी ओघळलेली नव्हती. नाक-डोळे जिथल्या तिथं. चपळ होती, ती बळकट दातांची होती. मुडाच्या खालोखाल तिचा मान टोळीत होता. चवताळलेल्या, रागावलेल्या मुडापाशी धीटपणाने जाणारी फक्त ती एकटीच होती. मुडाजवळ गेल्यावर त्याचे केस आपल्या लांबसडक काळ्या बोटांनी ती विंचरायची. टोळीतील बाकी वानरी तिला घाबरून असायच्या. मुडानंतर टोळीत तिचा दरारा होता. 'ही तरणी गर्भार होती. दोन महिन्यांचा गर्भ हिच्या पोटात होता.'(पृ.६) अशा प्रकारे टोळीत मानाचे स्थान असलेली तरणी

आपणास दिसते. तरणी ही कोणत्याही आणीबाणीच्या क्षणी मुडाला पूर्णपणे साथ देत होती. ते पाणी पिण्याचा प्रसंगामधून अधिक स्पष्ट होईल. ''तरणीनं मग धारिष्ट्य केले. ती सरासर साग उतरून झेपावत थेट पाण्याकाठी आली आणि मुडाच्या पाठीशी हातभर अंतरावर बसून तिनं चौफेर नजर टाकली. मागून कोणी नकळत येणं फारच कठीण आहे, हे तिला माहीत होतं. कारण अजून सागाच्या झाडावर बसून राहिलेल्या टोळीने तत्काळ चित्कार करून तिला सावध केलं असते. मागं तरणी आहे, हे बघताच दोन्ही हात गवतात ठेवून मुडा खाली वाकला आणि त्यानं पाण्याला तोंड लावलं. तब्बल चार-पाच क्षण त्यानं पाण्याला लावलेलं तोंड वर उचलले नाही.''(पृ.११) यावरून असे दिसते की, मुडा हा तरणीवर अतिशय विश्वास ठेवतो. शिवाय तरणी टोळीतील पोरांना सागावरून खाली बोलावून पाणी पिण्यास प्रवृत्त करते. टोळीतील सर्वांच्या संरक्षणाची काळजी घेणारी आणि टोळीत मानाचे स्थान निर्माण केलेली तरणी लेखकाने साकारलेली दिसते.

**लांडी :**

लांडी ही चांगली चपळ होती. धडधाकट होती. एकदा भल्या पहाटेच्या काळोखात आपण जमिनीपासून निर्धोक उंचीवर बसलो आहोत, असं समजून झोपलेल्या या वानरीकडे नव्यानंच शिकार शोधू लागलेल्या पोरसवदा बिबट्याचं लक्ष तिच्यावर गेलं. आकाशाच्या पार्श्वभमीवर त्याला डहाळीत बसलेली वानरी आणि पाल्यातून खाली लोंबणारं तिचं शेपूट दिसलं. पंधरा-वीस पावलं दूर अशी जाळीआड दडून बिबट्यानं अदमास घेतला. जोरात झेप घेऊन हे भक्ष्य आपण पंजाच्या तडाख्यानं खाली पाडू, असं त्याला वाटलं. त्याचे विलक्षण लवचिक स्नायू आकुंचित झाले आणि भयंकर गुरगुराट करून त्यानं सटकन झेप घेतली. ती पुरी पडली नाही. वानरीचं अर्धमुर्ध शेपूट फक्त पंजाच्या तडाख्यात तुटून त्याच्या दातांच्या पकडीत आलं. वानरीनं भयाकारी चीत्कार केला. लांडीच्या जीवावर बेतलं होतं, ते शेपटावर निभावलं होते. म्हणून अर्धे शेपूट गमावलेल्या वानरीचं नामकरण लेखकाने लांडी म्हणून केले होते. (पृ.७) लांडी ही मुडाच्या टोळीतील प्रेमळ वानरी आहे. लांडी ही लेकुरबाळी असल्यामुळे भांडणांमध्ये ती सावध पवित्रा घेऊन पडते. लालबुड्याच्या टोळीतील जाडी ही लांडीचे तान्हे पोर घेऊन आपल्या टोळीकडे गेल्यावर त्या पोराला घेऊन येण्यासाठी जाडीच्या तावडीतून सोडविण्यासाठी लांडीही तिच्या हद्दीत धावून जाते. दिवस मावळल्यापासून झांजड पडेपर्यंत हा प्रकार परत परत चालू असतो. मोठ्या धाडसाने लांडी त्याला प्रतिकार करते त्याच्या अंगावर धावून जाते. त्याला हाकलून लावते. वरील गोष्टीतून आपल्या लक्षात येते की, लांडीचे पोर हिसकावून पळून जाण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळी लांडी आपल्या

पोराला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करते. पण मोगाच्या पायाच्या रट्ट्यामुळे ती भेलकांडून खाली पडते. मोगाच्या डोळ्यात खून उतरल्यामुळे लांडीच्या डोळ्यासमोर मोगाने ठार मारलेल्या आपल्या लेकराजवळ ती घाबरत घाबरत जाते. मरण पावलेल्या आपल्या लहान पोराला कमरेभोवती लपेटून त्याला छातीशी कवटाळण्याचा ती प्रयत्न करते. पण आधार काढून घेताच पोर पुन्हा जमिनीवर पडते. लांडी मायेच्या ममतेपोटी पोर मेलेले असतानाही त्याला गोंजारत राहते. प्रेमापोटी ती त्या तान्ह्याला पोटाशी घट्ट धरूनच हिंडू फिरू लागते. लांडीच्या या वेड्या वात्सल्याचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतो, ''पोराला मरून चार दिवस झाले, तरी तिनं त्याला टाकलं नाही. घेऊनच हिंडत होती. पोर मेलं होतं, तरी तिचं आईपण मरत नव्हतं.''(पृ.५०) लांडीच्या पोराच्या या मरणाच्या प्रसंगातून लेखक आपल्याला आईच्या वात्सल्याचे, प्रेमाचे, ममतेचे, आपल्या लेकराविषयीच्या उत्कट आपुलकीचे तत्त्वज्ञान सांगून जातात.

**लाजरी :**

ही वयाने चौदा महिन्यांची होती. लाजरी ही मुडाच्या टोळीतील बरी वानरीन होती. तिच्यात काही व्यंग नव्हते, ''पण काहीही नेहमीपेक्षा वेगळं झालं, संकटाची चाहूल आली रे आली की, अगोदर खोडाआड, पानाच्या आड, जमिनीवर असली तर वारूळाआड, अगदीच काही नाही, तर दुसऱ्या वानरीच्या पाठीमागे दडायची.''(पृ.८,९) अशा प्रकारे लाजरीच्या या भित्रेपणाचे आणि लाजाळूचे वर्णन लेखकाने केले आहे. तिचा स्वभाव लाजाळू होता. त्यामुळे लेखकाने हिचे नामकरण लाजरी असे केलेले आहे. उनाडीला दिवस राहिल्यावर मोगा लाजरीच्या मागे लागतो. नव्या बळकट अशा या मोगाला बघून लाजरी ही वाफेवर आली होती. शेपूट आपटत होती. मोगाकडे कुल्ले करून ती सतत डोकं हलवीत राहते. आपल्या सूचक इशाऱ्याने त्याला भूलविण्याचा ती प्रयत्न करते. त्याचा फायदा घेऊन मोगा तिच्याबरोबर वारंवार जुगत राहतो.

**बोकांडी :**

मुडाच्या टोळीतील ही वानरीन अंगाने चपळ, हातापायी धडधाकट, पण फार भांडखोर होती. तिची ही भांडणं कुटुंबातल्या म्हणजेच आपल्या टोळीतील वानरींशी तर व्हायचीच, पण ही दुसऱ्या टोळीतल्या वानरीशीही मुद्दाम भांडणं उकरून काढायची आणि जिच्यावर हिचा जास्ती राग असायचा, अशा वानरीला बेसावाध गाठून ही चारी पायांनी तिच्यावर उडी घ्यायची. त्यामुळे हिला बाकीच्या वानरी फार घाबरायच्या. कारण सगळ्यांमध्ये तिचा दराराच तसा होता. (पृ.९) लेखक बोकांडीच्या चित्रणातून कुटुंबातील एखाद्या भांडखोर व्यक्तिमत्वाची ओळख करून देतो. त्यातून

त्या व्यक्तिमत्वाच्या स्वभावाची कल्पना येण्यास आपणास मदत होते. त्याला सगळेजण टरकून राहतात. 'बोकांडी' ही मुडाच्या टोळीतील धीट आणि खोडकर वानरी आहे. ही इतर वानरी सावध नसताना त्यांच्यावर चारी पायांनी उडी घेऊन बोकांडी बसते. म्हणून लेखकाने हिचे नामकरण बोकांडी असे केलेले आहे. दुसऱ्या टोळीतील इतर वानरींशीही जाणून-बुजून भांडणे उकरून काढण्यात ती तरबेज होती. बोकांडीला विटकरी रंगाचे तान्हे पोर असते. बोकांडीच्या खोडीला स्वभावामुळे इतर वानरी हिच्या वाट्याला सहसा जात नाहीत.

**काणी :**

एका डोळ्याने अधू असलेली ही वानरीन होती. म्हणून तिचे काणी हे नामकरण लेखकाने केले होते. काणी ही मुडाच्या टोळीतील वानरीन आहे. ही हिकमती आहे. हिम्मतवान आहे. काणीला एक तान्हं पोर आहे. तिच्या सोबतीला इतर कोणी वानरी असल्या की तिला धैर्य येते. ती धाडसाने प्रतिस्पर्धाच्या अंगाला, वैरिणीच्या अंगाला जाऊन भिडते. वैरिणीच्या झिंज्या ओढून तिला चावा घेते.

काणी आपले तान्हं पोर पोटाशी घेऊन झाडाचा कोवळा पाला, कोंब खात बसली होती. तिच्या फांदीवर जाऊन मोगा बसतो. दोघांमध्ये चांगले चार वाव अंतर होते. काणी आपल्या एका चांगल्या डोळ्याने रोखून पोराकडे बघते. नीट केसांना लटकण्याचा त्याला इशारा करते आणि ताबडतोब तिथून ती निघून जाते. भराभर ते झाड सोडून पलीकडच्या झाडावर जाऊन ती बसते. आपण हे मुद्दाम केले आहे, हे लक्षात आणून देऊ नये म्हणून तिने मोगाकडे बघितलेसुद्धा नाही. काणी गेल्यावर तिच्या पाठोपाठ मोगाही तिथेच गेला. काणी तिथनं हलली आणि पुन्हा आपल्या पहिल्या झाडावर आली. मधेच टेहळणी करायचे सोडून तो भराभर खाली उतरला आणि जांभळीच्या सावलीत विश्रांती घेत बसलेल्या काणीकडे तो धावतो. तिचे पोर ओरबाडण्याचा प्रयत्न करतो. पण बोकांडी, लांडी, बोथरीची म्हातारी बहीण तिच्या मदतीला येतात. मध्ये तिघीजणींची संरक्षण भिंत उभी राहते.

काणीचे पोर ओरबाडल्यामुळे रक्तबंबाळ झालेले असते. मोगाच्या ह्या पाठलागामुळे काणी भेदरून गेलेली असते. मोगा तिची पाठ सोडत नव्हता. पार शेवटच्या झाडाकडे ती बापडी पोराला घेऊन बसली होती, तर हा नेमका तिकडेही गेला. ज्या डहाळीवर ती बसली होती, त्याच डहाळीवर हा पण जाऊन बसतो आणि तेथून खाली धाडकन सव्वापुरूषभर अंतरावर बसलेल्या काणीवर झेप घेतो. तिच्यावर प्राणघातक हल्ला करतो. काणी झेप चुकवते की मोगाचा अंदाज चुकतो. कोणास

ठाऊक.पण ती उडी थोडी पुढे पडते. वजनाने डहाळी वाकून जमिनीला टेकते. काणी पोराला घेऊन दुसऱ्या झाडावर निसटल्यावर ही फांदी काही काळ हलत राहते. सुदैवाने काणी व तिचे पोर या प्राणांतिक हल्ल्यातून बचावते. काणी ही जिद्दी, करारी, प्रेमळ, वानरीन असलेली दिसते.

**बोथरी :**

'बोथरी' ही सर्वांत जास्त वय असलेली वानरी होती. ती थकलेली दिसत होती. नाक फेफट होते. डोळ्यांभोवती सुरकुत्या पडलेल्या होत्या. दिसायला मळकट दिसत होती. हिचे सर्वच दात पडल्यामुळे तिचा चेहरा जास्तच म्हातारा दिसत होता. हिच्या अंगावरचे सर्व केस झडून गेले होते. वार्धक्याच्या सर्व खूणा तिच्या व्यक्तिमत्वात जाणवत होत्या. एरव्ही उंचावरच्या फांदीवर दात विचकत बसायची. मात्र संकट चालून आले की, अंगात उर्मी घेऊन, हे झाड सोडून धूम पळून जायचे आणि शेजारी असलेल्या दुसऱ्या सुरक्षित झाडावर जाऊन बसायचे. याची तिला सवय होती. मुडाच्या टोळीतील 'बोथरी' ही सर्वांत अनुभवी वयस्कर असलेली वानरी मात्र रानकुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडते. याचे चित्रण लेखकाने अंगावर शहारा उभा राहावा असे केलेले आहे.

**बोथरीची बहीण :**

बोथरीची बहीण ही म्हातारी असूनही ती मोगाला पोरं मारण्यापासून सतत अडवत होती. तिला जखमा होत होत्या. त्यातच डाव्या हाताचं एक बोट तुटलं होत. डोळा फुटला होता. (पृ.५०) मोगाने ज्यावेळी चिकटून बसलेले काणीचं पोर, पाठीमागून येऊन ओरबाडलं होते. त्यावेळी काणीने घशात आवाज केला. मोगाला दूर लोटले, तोंड संदावून दात दाखवले. त्यावेळी तिच्या मदतीला बोकांडी, लांडी आणि बोथरीची म्हातारी बहीण धावत आल्या होत्या. काणी, तिचं पोर आणि मोगा यांच्यामध्ये जाऊन त्यांनी तिघींच्या अंगाची भिंत उभी केली होती. लेखक म्हणतो, ''मोगावर त्या उघड्या जबड्यानं खेकसू लागल्या. मोगाच्या अंगावर धावून जाऊन त्यांनी त्याला हाकलला.'' या प्रसंगामध्ये न घाबरता धीटपणाने काणीला व तिच्या पोराला संरक्षण देण्यासाठी वय झालेले असतानाही बोथरीची बहीण मदतीला गेलेली दिसते.

**थोटी :**

थोटी ही मुडाच्या झुंजार पण भांडखोर वानरी आहे. थोटीवर लहान वयातच (पोरवयातच) एका तापट डोक्याच्या वानर घुसखोराने हल्ला केला होता. आईकडून हिसकावून हिला पळवली होती. तिचा चावा घेऊन टाकून दिली होती. हिला डावा हात दंडापर्यंत होता. थोट्या हातानेच

ही आजपर्यंतचे आयुष्य जगली होती. त्या स्थितीतच तान्हं पोर पोटाशी वागवायची, खायची, प्यायची, भांडणात मात्र सगळ्यांच्या अगोदर पुढे व्हायची (पृ.७) हिला डावा हात दंडापर्यंतच होता म्हणून लेखकाने हिचे नामकरण 'थोटी' असे केले आहे.

**गौण पात्र :**

झिप्री, जाडी, भुली ह्या लालबुड्याच्या बेवारशी टोळीतील वानरनी. ह्या तिघींच्याही पोटी गर्भ होते. पण मोगाच्या बरोबर येऊन ज्यांनी मुडाशी हाणामारी केली ते पाची नर लालबुड्याच्या बेवारशी टोळीत घुसून दंगा गोंधळ करतात. त्यावेळी वानरनी कोणताही विरोध करत नव्हत्या. ह्या नरपोरांनी त्यांना पुन्हा पुन्हा ओढून अंगाखाली घेतले होते. गर्भार असूनही तिन्हीही वानरी त्यांच्याकडे गेल्या होत्या. तात्पर्य माणूस परिस्थितीमुळे दुर्बलतेमुळे कोणतीही गोष्टी मनात नसताना, इच्छा नसताना करतो. तेच ह्या प्रसंगातून दिसते.

ताकदवान, बलाढ्य, सत्ताधारी व टोळीचे प्रमुखत्व असलेल्या नर वानरांपुढे ह्या वानरी नतमस्तक झालेल्या दिसतात. त्यांनी आपले सर्वस्व त्यांना अर्पण केलेले दिसते. कारण त्यांचा सांभाळ करणारा अन्न, पाणी, निवारा, सुरक्षितता मिळवून देणारा वानर टोळीचा नायक त्यांना अपेक्षित असतो. लांडी ही वात्सल्याची मूर्ती वाटते. खोडकरवृत्ती व धाडसी प्रवृत्तीची बोकांडी आहे. थोटी ही झुंजार बाण्याची दिसते. हुकमत गाजवणारी काणी दिसते. कामवासनेने विव्हल उनाडी भेटते, आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या झिप्री, जाडी, भुली ह्या दिसतात. सत्तांतरमधील सर्वच वानरी परिस्थितीमुळे उपजतच शहाणपण लाभलेल्या वाटतात.

**१.२.६ झोंबी :**

**तारा :**

तारा म्हणजे लेखकाची आई. तारा आणि रतनू यांचा बालविवाह झाला होता. लग्नाच्या वेळी तारा अवघ्या एक वर्षाची आणि रतनू आठ-नऊ वर्षांचा होता. ताराचे वडील शिवाप्पा आणि रतनूचे वडील आप्पाजी फाळयाने शेती करीत. त्यांचा बांधाला बांध असल्याने ते ऐकमेकांचे मित्र बनले. शिवाप्पा आणि आप्पाजी यांनी रतनू व ताराचा विवाह ठरविला. लग्न म्हणजे काय? ते त्या निरागस मुलांना न कळण्याच्या वयातच त्यांचे लग्न झाले. नवरा म्हणून दाखवून दिलेल्या मुलाला नवराच का म्हणायचे, हे तिच्या बालिश वृत्तीला कळलेले नसताना ती रतनूला नवरा मानू

लागली. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षीच ताराला नांदायला जावे लागले होते.बाहुला बाहुली खेळण्याच्या वयात ताराला तिच्या सासरी घरातील सर्व कामे करावी लागतात.

ताराची सासू आणि दोन्ही नणंदा तिच्याकडून मोलकरणी सारखी कामे करुन घेत होत्या. कामाला वैतागलेली तारा सतत माहेरी पळून जात होती. मग तापट रतनू तिला लिंगाडीच्या छडीने मारीत होता. सहा वर्षांच्या या लहान जीवाला जोखमीची कामे करावी लागत होती. तिला उंच ऊसात पाण्याची दारं मोडावी लागत होती. रानडुक्कर कोल्ही ऊसातून हिंडत होती. ऐनवेळी समोरून रानडुक्कर दिसला की तिच्या काळजाचं पाणी होई नि घाबरून रडत, ओरडत ऊसातून बाहेर येई. बाहेर आल्यावर तिला रतनूच्या क्रोधाला सामोरे जावे लागे. बिचारी तारा रडवेली होऊन मी सासरी जाणार नाही. अशी गयावया आईकडे करीत होती. मग ताराची आईही मुलीला सांभाळून घ्या म्हणून ताराच्या सासूला विनवित होती आणि या सगळ्याचा उलटाच परिणाम होत होता. रतनू ताराला शिव्या देऊन मार-झोड करीत होता. ''तुझ्या आयला तुझ्या ! पळून जातीस; थांब तुझा पायचं मोडून ठेवतो.'' म्हणून नवरा हिसकीनं नाहीतर ठेग्यानं तिच्या पायांच्या नळ्या गवसून मार देई...(पृ.९) न जाणत्या वयात तारावर मोठी जबाबदारी येऊन पडली होती त्यामध्ये तिची दमछक होत होती.

तारा रंगरूपाने रतनूपेक्षा डावी आहे. असे तिच्या नणंदेचे म्हणजे कंबळाचे म्हणणे होते. कंबळा रतनूला नेहमी म्हणायची, ''खरं सांगायचं तर तुला ही बुरकुंडी बायकू सोभूनच दिसत न्हाई. वाळक्या लाकडागत दिसती नुसती.''(पृ.१५) सासू, सासरे, नणंद व नवरा ताराला छळत होते. आई वडिलांची माया ही तिला फार काळ मिळाली नाही. थोड्याच दिवसात ताराची आई वारली. ताराच्या समोरच तिच्या वडिलांना तिच्या सासऱ्याने पायातल्या चपलेने मारले. त्या निरागस जीवासमोर वडिलांना मारहान झाली. ताराने गयावया केली. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तिच्या वडिलांनी तिला लग्नात त्यांनीच घातलेल्या अडीच तोळ्याच्या पुतळ्या मोडल्या त्या पुतळ्यांसाठी तिला व तिच्या वडीलांना खूप छळले. ''जा म्हायारला नि आण माझ्या पुतळ्या''(पृ.११) म्हणून नवरा कुचलू लागला. ताराचे वडील उपासमार व दारू पिणे यामुळे वारले आणि बिच्चारी तारा पोरकी झाली.

तारा पंधराव्या-सोळाव्या वर्षी वयात आली. वयाच्या अठराव्या वर्षी तिला पहिली मुलगी झाली आणि त्यानंतर दोन वर्षांनी तिला पुन्हा दुसरी मुलगी झाली. रतनू ला म्हणजे आपल्या मुलाला दुसरीही मुलगीच झाली. आणि त्यानंतर थोड्याच दिवसात रतनूचे आई-वडील वारले.

आपल्याला दुसरी मुलगी झाली म्हणूनच आई वडिलांनी हाय खाल्ली व ते हे जग सोडून गेले, असे वाटून ताराचा छळ जास्तच वाढला. त्यानंतर तारा थोडी निर्ढावली कारण सासू-सासरे वारल्यानंतर नवऱ्याला फक्त आपलाच आधार आहे असे तिला वाटू लागले आणि त्यातही तिचा भ्रम निरास झाला. थोड्याच दिवसात कंबळा म्हणजे ताराची नणंद सासूच्या रूपात अचानक प्रकट झाली. कंबळाचा नवरा चोरीत सापडला व तुरूंगात टाकला गेला. त्यानंतर तो तुरूंगातच मरण पावला. त्यामुळे कंबळा कायमचीच माहेरी राहणार हे नक्की झाले. ''ताराला नणंदेच्या रूपान घरात नवी सासू उगवली.''(पृ.१५) नणंदेचा होणारा त्रास तारा रतनूच्या मैत्रिणींजवळ व्यक्त करीत होती. याला कारण त्या मैत्रिणी रतनूला समजावून सांगतील. रतनूच्या मैत्रिणी ताराला खूश करण्यासाठी रतनूला कंबळा विरूद्ध भडकवत होत्या. यातूनच ताराची चतुराई दिसली. तसेच नवऱ्याच्या मैत्रिणी आहेत, ही गोष्ट ताराने मोठ्या मनाने मान्य केली होती.(पृ.२४)

डॉ.द.ता. भोसले ताराच्या दुःखाविषयी म्हणतात, ''ताराचे दुःख तर खरोखर शब्दातीत असे आहे. तिचे सारे आयुष्य म्हणजे दुःखाचे एक महाकाव्यच ठरले आहे. पतीबरोबर ती रानात राबते. घरात कष्टाशी झुंजत असते. पोरासाठी जीव पाखडत असते. नको असलेल्या मुलांमुळे तिच्यावर दुःखाचे ओझे लादले जाते. पोरांचे आजारपण, नवऱ्याचा रानीट स्वभाव, अपुऱ्या कमाईमुळे होणारी उपासमार, वाया जाणारे ढोर कष्ट, या सर्व गोष्टी तिच्या दुःखाला कारणीभूत ठरलेल्या आहेत. त्यामुळे आनंदापेक्षाही या कादंबरीतील ताराच खऱ्या अर्थाने आपणाला अधिक भावते. सर्वांची दुःखे ती वाटून घेते. सर्वांची दुःखे ती हसतमुखाने पचविते. सोसलेल्या दुःखाचा कुठे उच्चारही करीत नाही अन् तरीही विस्कटलेल्या संसारासाठी आपल्या जीर्ण होत चाललेल्या आयुष्याचा तुकडा-तुकडा कर्तव्य भावनेने जोडत जाते. अवघ्या मानव जातीची सोशिकता आणि भूमीची क्षमावृत्ती यांचा तिच्या ठायी मिलाफ झालेला जाणवतो.''[३७](पृ.१६४) तारा ही दुःखाच्या महाकाव्याची नायिका वाटते. ताराचे व्यक्तिमत्त्व म्हणजे कष्टाळू, सहनशील, अबला स्त्री अशा विशेषणांनी युक्त होते. आपल्या मुलांना सांभाळण्याची जबाबदारी आपली स्वतःचीच आहे. असे समजून ती मुलांसाठी, आपल्या संसारासाठी सतत राबत होती. शेतातील माळवं विकून मुलांसाठी कपडे, खाऊ तसेच घरात लागणारे रेशन आणत होती. आपल्या तुटपुंज्या कमाईतही मुलांचे लाड करण्याचा प्रयत्न करीत होती. आनंदला शिक्षण घेता यावें म्हणून तिचा जीव तुटत होता. आपल्या लग्न झालेल्या मुलींचा शेवंता, अनसा, हिराचा संसार चांगला व्हावा म्हणून ही ती प्रयत्न करत होती. ताराची इच्छा नसतानाही तारावर मातृत्व लादले जाते. एक कडेवर, एक बोटाला आणि

एक पोटात असा तिचा क्रम वर्षानुवर्षे चालला होता. तरीही मुलांविषयीचे तिचे प्रेम कमी होत नव्हते. अतिशय दारिद्र्यातही मुलांचे योग्य संगोपन करण्याचा केविलवाना प्रयत्न तारा करीत होती. एक आई म्हणून ताराची रडकथा मनाला उद्‌विग्न करते.

ताराला नवऱ्याचे खरे प्रेम कधी लाभलेच नाही. नवऱ्याकडून ताराला शिव्या, मारहान, अपमान या निंदनीय गोष्टींनाच सामोरे जावे लागत होते. नवऱ्याच्या काम वासना पूर्ण करणे ह्याची ताराला किळस वाटू लागली. पण नवऱ्याच्या दांडगेशाही वृत्तीमुळे ताराला सर्व सहन करावे लागत होते. ''नगं नगं म्हटल तरी भसासा ही पोरं एवढी कशाला काढून ठेवतोस? ह्यांस्नी मी एकटी कुठलं कुठलं आणून घालू? जलमली तवा नखं का लावली न्हाईस ह्यांच्या नरड्याच्या घाट्यास्नी?''(पृ.१३१) यातून तारा नवऱ्याच्या जाचाला कंटाळली हे दिसते. ताराच्या व्यक्तिरेखेविषयी चंद्रकांत बांदिवडेकर यांनी मांडलेल्या मतातून आनंदच्या आईने म्हणजे ताराने जे भोगले त्याचे सारांश रूपाने कथन केले आहे, ''या कलाकृतीतील कुटुंबकथा आईच्या भव्य व्यक्तिरेखेमुळे खूप उंचीवर जाते. एका अर्थानं ती भारतीय स्त्रीच्या यातनांची कर्मकथा आहे. लग्न म्हणजे काय हे न समजताना एक वर्षाच्या मुलीचं लग्न होणं, लग्नानंतर माहेर सर्व अर्थानं तुटून जाणं, भावांना भाकरी देण्यासाठी लपवालपवी करावी लागणं, आणि नवऱ्याकडून चाबकाचा मार खाणं, म्हाताऱ्या भुकेजल्या बापाला अर्धी भाकरी देण्याचं स्वातंत्र्य नसणं, भावांच्या येण्यामुळे नवऱ्याच्या संशयी वृत्तीनं माहेरशी संबंधच नकोसा वाटणं, पोरांचं लेंढार पैदा करताना शरीर, मन, सर्व झिजून झिजून जाणं, नवऱ्याचा क्रोधाच्या धगीत सतत वावरत राहाणं, आणि आनंदासारख्या शिकण्यासाठी धडपडणाऱ्या मुलालाही संरक्षण आणि उत्साह देण्याची इच्छा सतत कोमेजून जाणं, हे सर्व यातनामय जीवन या स्त्रीला जगावं लागतं.''[३८] ताराच्या जीवनात फक्त यातना, दुःख, व्यथा-वेदनाच असलेल्या दिसतात.

अशाप्रकारे आनंद यादव यांनी आपल्या आईचे कादंबरीच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व प्रकट केले आहे. मुलगी म्हणजे बापाच्या गळ्यातील धोंडा असे मानले जाण्याच्या काळात जन्मलेली शेतकरी कुटुंबातील तारा नवरा म्हणजे काय? हे कळत नसताना बोहल्यावर चढवली. अशी ही एक वर्ष वयाची नवरी सहा वर्षाची झाल्यावर सासरी नांदायला गेली. सासू-सासरे, नणंदा व नवरा यांच्या जाचाला बळी पडली. सतत मुलींना जन्म देते याचा सुद्धा तिलाच दोष दिला गेला. चूल आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र होतं, त्याचबरोबर तिला शेतातही खूप राबावे लागत होते. मुलगी, पत्नी, सून, आई व बहीण या भूमिका पार पडत ताराला सहनशीलवृत्तीने आणि कष्टाळूवृत्तीने

वागावे लागले. आपले कौटुंबिक जीवन व्यतित करत असताना ताराचीही स्वतःचा जीवनाशी झोंबीच चाललेली आहे, असे वाटते.

**कंबळा :**

कंबळा म्हणजे लेखकाची मोठी आत्या होती. लेखकाच्या वडिलांपेक्षा कंबळा दोन वर्षांनी लहान होती. तिचा नवरा चोरी करताना पकडला गेला आणि तिच्या परवडीला सुरूवात झाली. नवरा तुरूंगात गेल्यामुळे कंबळा व तिच्या मुलाचे हाल होऊ नयेत म्हणून लेखकाच्या वडिलांनी तिला माहेरी आणले. पण त्यामुळे ताराला नणंदेच्या रूपात घरात नवी सासू उगवली. कंबळाने भावाच्या कुटुंबाचा सर्व कारभार स्वतःच्या हाती घेतला. घराची खरी मालकीण तारा हिच्या जीवनाची फरफट वाढली. म्हणतात ना भटाला दिली ओसरी आणि भट हातपाय पसरी. कंबळा व तिचा मुलगा भावाच्या घरी मजेत राहत होते. तारा व तिच्या मुलींना मात्र सुखाचा घास खायला मिळत नव्हता. कंबळा ताराच्या विरूद्ध भावाचे कान भरीत होती. कंबळाच्या तक्रारी ताराने रतनूच्या मैत्रिणींकडे केल्या, तेव्हा कंबळा तुझ्या संसारातून स्वतःसाठी माया जमवित आहे. ताराला छळत आहे. असे मैत्रिणींनी रतनूला पटविले. रतूनचे मत परिवर्तन झाले आणि म्हणूनच रतनूने कंबळाला जुने घर लिहून दिले. वर्षभरासाठी धान्य दिले. घर खर्चासाठी चारशे रूपये दिले. एक म्हैस घेऊन दिली. स्वतंत्र राहणे हे कंबळालाही आवडत होते. कारण ''तिला अनेक तरूण पुरूष प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष स्वतंत्र राहण्याबद्दल सुचवू लागले.''(पृ.२५) कुटुंबातील नणंद-भावजयी यांचे असलेले संबंध लेखक मांडतो.

कंबळा वेगळं राहिल्यानंतर रोजगाराला जाऊ लागली. रोजगाराच्या पैशातून म्हैस घेतली. पण वर्षभरातच म्हशीवर वीज पडून ती गेली. जमवलेला सगळा पैसा म्हशीत घालवला व ती म्हैस गेली. त्यामुळे तिने तिच्या मुलाला पाचवीतून शाळेतून घरी ठेवले. कंबळा व तिचा मुलगा दोघेही मजुरीवर जात होते. एकटी स्त्री स्वतंत्र राहिली की समाजाची तिच्याकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ''आत्तीकडे तरूण बेलवड्या येत होता.''(पृ.२२७) आत्तीला बेलवड्याकडून धान्य मिळत होते. रात्री दहा पर्यंत तो कंबळाच्या घरात बसत होता. ही गोष्ट आळीतील लोकांच्या नजरेतून सुटली नाही. लेखकाच्या वडिलांनी कंबळाला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण कंबळाने त्याकडे दुर्लक्ष केले.कंबळाच्या व्यक्तिचित्रणातून असे लक्षात येते की, नवऱ्याचा आधार गेला की, स्त्री आत्मनिर्भर होण्याच्या प्रयत्नात बाहेरख्याली पणाला चटावते असे दिसते. एकट्या स्त्रीला मदत करण्याच्या मोबदल्यात तिच्या स्त्रीपणाचा फायदा उठविला जातो.

**आनसा :**

आनसा म्हणजे अनुसया. लेखकाची मोठी बहीण आनसा दहा–अकरा वर्षांचीच असताना तिचा विवाह झाला. आनसाचे तिच्या धाकट्या मामा म्हणजे लिंग्या बरोबर लग्न लावून दिले. आनसाचे व लिंगाप्पाचे लग्न लेखकाच्या वडिलांनी दारापुढे मोठ्या ढांगा ढोंगात लावून दिले होते. ''गोरीगोमटी पिंगट घाऱ्या डोळ्यांची नाजूक आवाजाची आनसा भारी पातळ नेसून, दागिनं घालून, अंगाला हळद लावून बाहुलीसारखी नटली होती. कामानं रापलेल्या, काळपट, खडबडीत हाताचं चरबरीत बोट; तिच्या कोवळ्या कर्दळीसारख्या गोऱ्या हाताला शोभा देत नव्हतं...''(पृ.६०) वरील वर्णनावरून आनसा अतिशय सुंदर होती. तर लिंगप्पा हा तिला शोभत नव्हता हे दिसते.

आनसा आणि मामा लग्नानंतरही लेखकाच्या घरीच राहात होते. आनसा आईला मदत करत होती. एकदा आनंदाची आई रेशन आणायला गेली व त्याच्या बहिणीला म्हणजे आनसाला आईने भाकरी करायला सांगितल्या होत्या. पण कदाचित तिचे हात दुखू लागल्याने तिने अपुऱ्याच भाकरी केल्या आणि त्यामुळे आईने तिला थोबाडीत मारल्या आनसाला याचा राग अनावर झाला. आनंदाची भाकरी घेऊन आनसा शेतात आली. घुळीची भाजी आहे, असे सांगून तिने धडप्यात बांधलेले गठळं आनंदाच्या हातात दिलं. वास्तविक त्यामध्ये आनसाने आपले दागिने ठेवले होते. आनंदाने तिला पाटाकडंला ठेवायला सांगितले. ती विहिरीवरच बैलाच शेण आणायला सांगून गेली व तिने विहिरीत उडी मारली. बराच वेळ झाला तरी आनसा आली नाही. म्हणून आनंदा विहिरीकडे गेला त्याने विहिरीत डोकावून पाहिले. तर आनसाने विहिरीत उडी मारल्याचे त्याच्या लक्षात आले. आनंद चपळाईने विहिरीत उतरला व आनसाला विहिरीच्या बाहेर काढले. या घटनेनंतर आईने आनसा व तिच्या नवऱ्याला म्हणजे लिंगाप्पाला वेगळे राहण्यास सांगितले.

वेगळं राहायल्या लागल्यानंतर आनसाचा संसार सुरळीत चालला होता. फक्त नवराबायकोचा स्वयंपाक करणे. एवढचं काम तिला करावं लागत होत. लेखकही तिच्या घरी गेल्यावर त्याला तिच्याकडे चवदार अन्न मिळत होत.(पृ.१३७) आनसाला मुलगा झाला. त्याचं नावं बाळू ठेवलं होते. भाऊबीजेच्या दिवशी आनसाच्या घरी आनंदा गेला. पण कदाचित आनसा आजारी असल्यामुळे भावाला ओवाळायला विसरली याचे आनंदला दुःख झाले. आनसाने एक म्हैस घेतली व आनसा दुधाचा धंदा करू लागली. संसाराला पै पै जमवू लागली. स्वतःसाठी तिने दाग दागिने केले.(पृ.२४६) आनसा बाजारांच्या दिवशी भावडांसाठी खायला घेऊन येत होती. पण आनसाच्या सुखी संसाराला दृष्ट लागली. अधूनमधून आनसा आजारी पडू लागली. पाच–

सहा महिने झाले, सरकारी दवाखान्यात नेऊनही आजार बरा होत नव्हता. शेवटी मामाने आनसाला कोल्हापूरच्या दवाखान्यात नेले. पाच-सहा महिने कोल्हापूरलाही ठेवले तिला बर वाटेना. शेवटी पुन्हा कागलला आणलं. मोकळ्या हवेशीर जागी तिला ठेवा असे डॉक्टरने सांगितल्यामुळे अनासाला एका हवेशीर ठिकाणी ठेवले. मामाने आईला आनसाला माहेरी ठेव म्हणून विनवणी केली. पण  आईने नकार दिला.

मामा आनसाची खूप सेवा करीत होता. पण अनसा आजाराला वैतागल्यामुळे गोळ्या-औषध फेकून देत होती. आनसाचा आजार खूपच वाढल्यामुळे आईने आनसाला माहेरी आणले. आनसा या सगळ्या आजारपणात गरोदर होती. तिला सातवा महिना होता. आई आनसाची खूप काळजी घेत होती. पण आठवा महिना लागला आणि तिला वेणा सुरू झाल्या. मुलाला जन्म देऊन आनसाने मृत्यूला कवटाळले. दोन दिवसांनी तिचं बाळही गेलं. आनसा गेल्यानंतर कळलं की आनसाला टी.बी. झाला होता. टी.बी. झालेला माणूस जगू शकत नव्हता. शेवटच्या स्टेजला गेल्यावर डॉक्टरांनी तिला घरी पाठवले होते.(पृ.२५६,२५७) एखाद्या तालेवाराच्या घराप्रमाणे आनसाने मामाचा संसार उभा केला. म्हशी घेतल्या, सोनं केलं, सोपा वाढवून घेतला. परड्यात गोठा बांधला. भांडीकुंडी केली, पैसा अडका केला. स्वकष्टाने संसार उभा केला आणि शेवटी नशिबाने मात्र तिला साथ दिली नाही. टी.बी.च्या आजारात तिचा मृत्यू होतो.

**शेवंता :**

ताराची आणि रतनूची शेवंता ही दुसरी मुलगी. पहिली मुलगी आनसा व दुसरीही मुलगीच झाली म्हणून घरातील सर्वजण नाराज झाले. रतनूच्या आईने तर गळा काढून रडायलाच सुरूवात केली. एका पाठोपाठ दोन मुली झाल्याचा दोष रतनूचे आई-वडील तारालाच देतात. थोड्याच दिवसात रतनूची आंब्या, चिंचाची सावली गेली म्हणजे रतनूचे आई-वडील वारले. ''बायकूच्या पोटाला दोन्ही पोरीच आल्या, म्हणून माझ्या आईबापाचं हातपाय वट्यात आलं नि ते जिवाला मुकलं.''(पृ.१३) असे रतनूला वाटले. ताराच्या वाट्याला नवरा व नणंदांचा जाच सुरू झाला. नवरा तिला सतत मारीत होता. याचा परिणाम असा झाला, की तारा शेवंताचे योग्य संगोपण करू शकली नाही. जन्म झाल्या झाल्या तिचा सगळ्या कुटुंबातील व्यक्तिंनी रागराग केला. अशा या शेवंताचा मृत्यू वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षीच झाला. कुटुंबामध्ये मुलांची संख्या जास्त असल्यामुळे प्रत्येकाची योग्य ती काळजी घेतली जात नाही. याचाच प्रत्यय शेवंताच्या मृत्यूने येतो. ह्या घटनेने वाचकांचे मन सुन्न होते.

**हिरा :**

हिरा म्हणजे लेखकाची धाकटी बहीण होती. तिला माती खाण्याची सवय होती. माती खाण्याच्या सवयीमुळे ती नाळरोगी बनली होती. तिच्या माती खाण्याच्या सवयीमुळे तिच्यापेक्षा लहान असलेल्या सर्व भावंडांनाही माती खाण्याची सवय लागली होती. माती खाण्याच्या सवयीमुळे हिराच्या अंगात कसलीच ताकद नव्हती. तिला कोणतेही काम वाकून करता येत नव्हतं. त्यामुळे ती आईला स्वयंपाकाला मदत करीत होती व लहान भावंडांना सांभाळी. आईच्या सख्ख्या मामाच्या मुलाबराबर हिराचे लग्न आईने ठरविले. आईच्या मामाचा मुलगा शंकर हा देखील आजारी असल्यागत वाटत होता. पण आईचाही नाईलाज होता. कारण सुजऱ्या, फुगऱ्या नाळरोगी हिराला नवरा कुठे मिळणार. शंकर आणि हिरा यांचे लग्न झाले. हिराला सासू नव्हती. पण नणंद शेजारीच राहात असल्यामुळे नणंदेचा जाच तिला होता. लग्नानंतर हिरा एक दीड वर्षच सासरी नांदली. सासरच्या लोकांनी परत माहेरी आणून घातली. कारण लग्न झाल्यावरही हिरा माती खात होती. पंधरा वर्षाची झाली तरी हिरा माती खात होती. तिला, थोडं काम केले तरी दम लागत होता. तिच्या अंगात रक्त नव्हतं. हळद लावल्यासारखा तिचा रंग पिवळट दिसत होता. हिराचे लग्न होऊन दोन-अडीच वर्षे झाली. तरी माहेरी आलेल्या हिराला सासरच्या मंडळींनी नांदायला नेले नाही. आईने हिराला तिच्या सासरी नेऊन घातले व हिराच्या जबाबदारीतून आई मुक्त झाली.

**धोंडूबाई :**

शिवाच्या नंतर जन्मलेली धोंडूबाई हिराच्या संगतीमुळे माती खात होती. माती खाण्याच्या सवयीमुळे धोंडूबाई नाळरोगी, गालफुगरी झाली होती. साडे चार वर्षाच्या धोंडूबाईला तिच्या लहान्या बहिणींना म्हणजे, सुंदरा व चंदराला सांभाळावे लागत होते. हिराच्या लग्नानंतर हिराची म्हसरं धोंडूबाईला बघावी लागत होती. धोंडूबाई आईला स्वयंपाकात मदतही करीत होती. पाणी भरण्याचे कामही ती करीत असे. 'बाजाराच्या दिवशी; ही नऊ-दहा वर्षाची धोंडी आईला माळवं विकायला मदत करी.'(पृ.३००) माळवं विकून मिळालेल्या पैशात ती आईने सांगितलेल्या वस्तू घेऊन येत होती. सतत कामात व्यग्र असलेली धोंडूबाई तिच्याच वयाच्या मुलींची लग्न होत आहेत हे पाहायची. तिच्याच वयाच्या मुलींच्या लग्नानंतरच्या दाग-दागिणे, साड्या यामुळे खुललेल्या रूपाचा तिलाही मोह होत होता. तिच्याही मनात एक अनोखं स्वप्न उमलू लागले होते. गरीब परिस्थितीमुळे आपण आपल्या इच्छा-आकांक्षा यांना मुरड घालत असतो. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी प्रत्येकजण कष्ट करताना दिसतो. हे धोंडूबाईच्या व्यक्तिमत्त्वातून दिसते.

**चंदरा आणि सुंदरा :**

धोंडूबाई नंतर ताराला दोन जुळ्या मुली झाल्या होत्या. चंदरा आणि सुंदरा जुळ्या मुलींना सांभाळताना ताराची तारांबळ उडत होती. 'दोघीची काळीभोर जावळं, उठावदार नाकं, पाणीदार काळे मासोळीसारखे डोळे बघून दृष्ट लागे. एकीची चण बारीक तर दुसरीची-सुंदराची- चण किंचित मोठी. दोघीही गोऱ्यागोमट्याा आणि सुंदर दिसत होत्या...'(पृ.८१) धोंडूबाई या दोघींना सांभाळत होती. आईचे दूध पुरेसे न मिळाल्याने व जन्मतःच अशक्त असल्यामुळे दीड-पावणे-दोन वर्षांच्या झालेल्या या मुली चालू शकत नव्हत्या. दोघीही माती खात असल्याने सुजऱ्या व फुगऱ्या बनल्या होत्या. चंदराचे माती खाण्याचे प्रमाण अधिक होते. चंदराने त्रास देऊ नये, शांत रहावे, म्हणून तिला अफू खाऊ घातली जात होती. त्या अफूचा परिणाम तिच्या मेंदूवर झाला असावा. कारण त्यामुळे ती निश्चल झाली. खूप माती खाण्यामुळे ती भोपळ्यागत सुजली. औषधोपचार केले. तरीही उपयोग झाला नाही. सुंदराचा निष्पाप जीव अंधारातच मरून पडला. अशा या आनंदच्या बहीणी दारिद्र्यामुळे कुपोषित, आजारी तसेच दुर्दैवी वाटतात.

**रतनूची आई :**

रतनूच्या आईने रतनूचा बालविवाह लावून दिला. ताराला लागोपाठ दोन मुली झाल्यामुळे रतनूची आई दुःखी झाली. दुसरी मुलगी जन्मल्यानंतर तिने गळाच काढला. तिनं सूरच धरला, ''आता माझ्या लेकाच्या पोटालाऽ पोरीचंच लेंढार लागणार गं ऽऽ बाई ! एकुलता योक रत्नासारखा जपलेला माझा ल्योक; त्येचा वस बुडणाऽर!''(पृ.१२) आपल्या मुलाला सतत मुलीच होतात या विचाराने आईन हाय खाल्ली व थोड्याच दिवसात ती वारली.

**आकणी :**

आकणी ही रतनूची धाकटी बहीण, आनंदाची धाकटी आत्या आकणी आडदांड होती. तिला फारशी संसारपणाची, प्रौढपणाची समज नव्हती, बुद्धी सर्वसाधारण होती. मनाची शहाणी नव्हती. खुळचटासारखी वागे! तिच्या सासूला तर ती 'लेकांच्या गळ्यातला धोंडा'(पृ.२१) वाटत होती. सासरी तिला पोटाला खायला शिळी भाकरी आणि तिही एकाच वेळी मिळत होती. सासरी तिला सासूरवास होत होता म्हणून ती वारंवार माहेरी पळून येत होती. रतनू तिला दमदाटी करून सासरी घालवून द्यायचा. आकणी नांदायला जायला तयार नव्हती. त्यामुळे तिला रतनूने खूप मारले व सासरी नांदायला पाठविले. पण थोड्याच दिवसात आकणीला घेऊन जावे असा निरोप सासरच्या

मंडळींनी रतनूला पाठविला. रतनू तिच्या सासरी गेला. तेव्हा त्या गावातील दहा-बारा जण रतनूच्या अंगावर धावून गेले व आकणी सारखी वेडसर पोरगी आमच्या पोराच्या गळ्यात घालून आमच्या मुलाला फसविले, असा रतनूवर आरोप केला. आकणीला चार दिवस उपाशी एका खोलीत कोंडून ठेवले होते. तेव्हा खोलीच्या बाहेरून रतनूने संवाद साधला, 'तिचा आत ओढलेला आवाज, तिची मरणाची इच्छा, तिचे निर्वाणीचे शब्द, तिचा आक्रोश ऐकून रतनूच्या काळजाचं पाणी झालं.'(पृ.२२) रतनूने आकणीच्या सासरच्या मंडळींविरूद्ध पोलिसात तक्रार दिली. पण पोलिसांनी त्याच्या तक्रारीकडे लक्ष दिले नाही. शेवटी रतनूने तिच्या लग्नाचा खर्च, तिचे दागिने घेतले व पंचात सोडचिठ्ठी घेतली. आकणीला माहेरी आणले. थोड्याच दिवसांनी म्हणजे एक-दोन वर्षांनी आकणीचा पुर्नर्विवाह झाला. तिला सिद्धनेर्लीला दिले. तिचा नवरा गरीब होता. रतनूच्या शब्दाबाहेर नव्हता.

**बाळा सणगरीण :**

बाळा सणगरीण ही आनंदाच्या गावातील सुईण होती. ताराच्या बाळांतपणाच्या वेळी सुईणीचे काम बाळा सणगरीण हिनेच केले होते. ताराच्या दुसऱ्या बाळंतपणाच्या वेळी ताराला मुलगी झाली. तेव्हा बाळा सणगरीण रतनूच्या आईला म्हणाली, ''नात झाली नात! झेकास जोडी झाली. तुझ्या लेकाच्या पोटाला.''(पृ.१२) तेव्हा रतनूच्या आईने तर गळाच काढला. तेव्हा बाळा सणगरणीने तिची समजूत काढली. ''तुझ्या नाती सुंदर आहेत, देवासमोरच्या दिव्यासारख्या आहेत. तेव्हा आता रडण्यापेक्षा त्यांच्यासाठी उदंड आयुष्य माग.'' असा प्रेमळ सल्ला दिला. यावरून बाळा सणगरीण ही मुलीच्या जन्माचे स्वागत करणारी आहे असे समजते. ताराने तिच्या मुलीचा म्हणजे आनसाचा विवाह तिच्या भावाबरोबर, लिंगाप्पा बरोबर करायचे ठरविले. तेव्हा बाळा सणगरणीने त्याला विरोध दर्शविला. ती ताराला म्हणाली, ''तारा अगं, पोरगी नाजूक, देखणी हाय, कुठंबी खपंल एवढ्या दांडग्या लिंग्याला कशाला देतीस तिला? भाऊ असला म्हणून काय झाल?''(पृ.५६) लिंगाप्पा व आनसा यांच्या वयात खूप अंतर होते. याची जाणीव बाळा सणगरणीला होती.

यावरील दोन्ही संवादावरून बाळा सणगरणीच्या आधुनिक विचारसरणीची आपल्याला कल्पना येते. ताराला झालेल्या दुसऱ्या मुलीचे तिने स्वागतच केले. तसेच अल्पवयीन मुलगी व दांडग्या वयाचा मुलगा यांच्या विवाहाला तिने विरोध दर्शविला. ताराला रतनूने मारले तेव्हा रतनूची कानउघडणी बाळा सणगरणीनेच केली. कुणाची चूक झाली तर पुरूषासारख्या ती शिव्या द्यायची.

ती शेजाऱ्या-पाजाऱ्यांना सतत मदत करायची. त्यामुळे लोक तिला सन्मानाने वागवायचे. अशा प्रकारे आधुनिक विचारसरणी तसेच सर्वांना उपयोगी पडणारी ही बाळा सणगरीण ताराची जीवलग मैत्रिण होती.

**यल्लू जोगतीण :**

कागल गावाच्या बाहेर यल्लमाचं देऊळ होते. यल्लमा देवीच्या जोगतीणींमध्ये यल्लू जोगतीण मुख्य होती. यल्लू जोगतीण एखाद्या गावदेवीसारखी, एखाद्या सम्राज्ञीसारखी गाण म्हणत, तरूणांची मनं झुलवत यल्लमाचा जग घेऊन गावातून जात असे. इतर वेळी ती एखाद्या गरीब जोगतीणीसारखी जोगवा मागत फिरत नसे. गावच्या प्रतिष्ठित डॉक्टरने तिला ठेवली होती. शिवाय अधनं-मधनं हौशी तरूण तिला काहीबाही देत असत. यल्लू जोगतीण इतर जोगतीनींपेक्षा वैभवात राहत असे.

**समा :**

ताराची मुलगी हिरा व तिची नणंद समा होती. हिराला त्रास देणारी समा ही खाष्ट नणंद होती. मोठ्या नणंदेचा तोरा ती मिरवत होती. शंकर म्हणजे हिराचा नवरा समाचा भाऊ याला तिने तिच्या ताटाखालचे मांजर बनविले होते. समाच्या तापट स्वभावामुळे समाच्या नवऱ्याचेही तिच्यापुढे काहीही चालत नव्हते. अशा प्रकारे बिचाऱ्या हिराला छळणारी समा नणंद लेखकाने दुर्लक्षिली नाही.

बाळा सणगरीण की जी सुईन ताराची मैत्रिण होती. तिचे विचार स्त्री जन्माचे स्वागत करणारे वाटले. यल्लू जोगतीणी सारखी गौण व्यक्तिरेखाही गावातील प्रथा परंपरा सांगण्याच्या ओघात लेखकाने रेखाटली आहे. झोंबी या कादंबरीतील स्त्री व्यक्तिचित्रणांचा विचार करता प्रमुख व्यक्तिरेखा आनंदची आई तारा ही आहे. इतर व्यक्तिरेखा ह्या ताराशी नाते सांगणाऱ्या आहेत. ताराची सासू, ताराची आई, ताराच्या मुली यामध्ये अनसा, शेवंता, हिरा, धोंडूबाई, चंद्रा, सुंदरा, लक्ष्मी इ. आनंदच्या आत्या म्हणजे ताराच्या नणंदा कंबळा, आकणी, हिराची नणंद समा या स्त्री व्यक्तिरेखा प्रामुख्याने कौटुंबिक व्यक्तिरेखा म्हणता येतील. झोंबी या कादंबरीतील व्यक्तिरेखा या प्रामुख्याने सासुरवास सहन करणाऱ्या, काबाडकष्ट करणाऱ्या व दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या वाटतात. वयाने लहान असलेल्या मुलीला देखील तिच्या लहान भावंडांना सांभाळणे किंवा आईला मदत होईल अशी कामे करावीच लागत होती.

### १.२.७. झाडाझडती :

### जाधवांची आवडाबाई :

धरणाच्या भूमिपूजनाच्या ताटावर पायाची ठेप मारून ताट हवेत उडवणारी धाडसी धरणग्रस्त स्त्री म्हणजे जाधवांची आवडाबाई होती. ''तुमच संसार फुलायसाठी आमची राखरांगुळी करता? तुमाला आयाभैनी, घर संसार हाय का न्हाय?''(पृ.१३) असा सवाल तिने भूमिपूजनास आलेल्या मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना विचारला व भूमिपूजनाचा कार्यक्रम उधळून लावला होता. त्यावेळी आवडाई, खैरमोडे गुरूजींसह निम्म्या गावाला अटक झाली होती. ही घटना दहा वर्षांपूर्वीची होती आणि पुन्हा धरणाचा प्रश्न ऐरणीवर उभा राहिला होता. वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी आवडा जांभळीत नांदायला आली. लंगड्या गोईंदा व हैबतीसह आवडा रानात वस्ती करून राहत होती. जांभळीवर वरच्या आळीला जाधवांची भावकी राहत होती. त्यात लाला जाधवाचा म्हणजे आवडाबाईच्या पुतण्याचा वाडा होता. वाड्यात आवडाबाईच्या कारभाऱ्याचाही वाटा होता. पण लालाच्या वडिलांनी गोईंदाला माणसातून उठवला आणि म्हणूनच ती वाड्यापासून दूर वस्तीवर राहायला गेली होती. लाला जाधव गावचा पुढारी होता. तो सतत आवडाच्या संसारात हजार अडचणी उभ्या करत होता. पण हिंमतबाज आवडा डरली नाही. आवडानं लंगड्या नवऱ्याचा संसार धाडसाने केला होता.

हैबती आणि थोरला मुलगा गुणवंता ही दोन अपत्य त्यापैकी गुणवंताला तिच्या मावस भावाने दत्तक घेतला होता. झांजडवाडीत त्यांचा संसार फुलला होता. त्यामुळे तिला गुणवंताची काळजी नव्हती. तिला चिंता पडली ती हैबतीची. धरण झाले तर मुलाला परागंदा व्हाव लागेल. याच तिला वाईट वाटत होते. तेव्हा श्रद्धेने काळूबाईचा अंगारा दारात फुकून देवीला हात जोडून म्हणायची, ''आये, लेकराला बाशिंग तेवढं बांधू दे, मग धरणाला कवाबी चूड लागू देऽ!''(पृ.१६) धरण होणार या विचाराने गोईंदाच बरेवाईट होईल. कारण गोईंदा हळवा होता. अशा शंकेने तिच काळीज चुर्र ऽऽ झाले होते. त्यामुळे गोईंदाला जपलं पाहिजे याची तिला जाणीव होती. ही सर्व चिंता असतानाही ''माजं घरटं म्या मोडू द्याची न्हाईऽऽ''(पृ.१६) ह्या तिच्या निर्धारातून तिचे धैर्य दिसून आले.

आवडाबाईचा भाऊ सुभानजी तिला त्याच्या गावाला म्हणजे झांजडवाडीला येण्याचा आग्रह करीत होता. पण आवडाबाईच्या मानी स्वभावाला ते मानवत नव्हते. ''जे गावाचं हुईल ते माझं''(पृ.४०) अशी आवडाबाई सुभानजीला म्हणाली. आवडाबाई अतिशय प्रेमळ स्वभावाची

होती. शिवरामाच्या मृत्यूनंतर त्याची पत्नी नकुसा व तिच्या बाळाला आवडाबाईच्या जीव लावत होती. तसेच सुनेला तर अगदी मुलीप्रमाणे सांभाळत होती. असे तिच्या व्यक्तिमत्त्वातून जाणवते. आपल्या लंगड्या नवऱ्याचा संसार तिने मोठ्या हिंमतीने सांभाळला होता. पतीच्या आत्महत्येनंतर आवडाबाई फार व्यथीत झाली. पण त्या दुःखाला गोंजारत न बसता ती हैबतीसाठी पुन्हा उभी राहिली. हैबतीचे लग्न लावून दिले त्याच्या पत्नीला स्वतःच्या मुलीप्रमाणे प्रेम दिले. आवडाबाई म्हणजे हैबतीचा आधारस्तंभ होती. धरणग्रस्त विविध कुटुंबांनाही ती वेळोवेळी मदत करीत होती. सावळेरामाने मोठ्या कष्टाने पिकवलेल्या शेतात धोंड्याने गुरं सोडून पिकाची नासाडी केली. धोंड्याच्या कुकृत्याला सर्जेरावाची साथ होती आणि म्हणून सावळे रामाने जांभळीला जाण्याचा निर्णय घेतला. तेव्हा आवडाबाई त्याला म्हणाली, ''मनं आवरायचं गुलामा, तू पळून गेलास तर इथल्या लोकास्नी धरणग्रस्त हुसकून लावायची सवं लागंल. शाणा बन मन आवरं.''(पृ.२२१) यावरून आवडाबाई सर्व धरणग्रस्तांना धीर देऊन त्यांना संकटाशी सामना करण्यासाठी, लढण्यासाठी प्रेरित करीत होती. धरणाने विस्थापित झालेल्या कुटुंबाची आवडाबाईच्या प्रतिनिधिक कुटुंबातून लेखकाने व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

गुण्यागोविंदाने जांभळीत नांदणारी आवडाबाई धरणग्रस्त म्हणून खैरापूरला आली. आपला मुलगा, सून व नातू यांच्यावर मायेची पाखरण करीत होती. मुलाचा संसार नीट करण्यासाठी कष्ट करीत होती. संकट समयी मुलगा व सुनेला धीर देत होती. आपल्या प्राणप्रिय मुलाचा हैबतीचा खून झाला. तेव्हा मात्र ती हतबल झाली. हैबतीचा मारेकरी राघू भिवाला शिक्षा होऊ नये म्हणून खासदार शिंगाडे आवडाबाईला प्रकरण चिघळायला लावू नका असं विनवू लागले. तेव्हा आवडाबाई बोलली, ''सरकार, धरणाच एवढं काय? धा धरण बांधा की, तुमचा इकास करा पर आमची कपाळं का भकास करता? माजं कुकू पुसल धरणानं तेबी दुःख पर माजा मांडवावरचा चढता येल खुडून तुमाला काय मिळालं?''(पृ.४६५) आवडाबाईने मांडलेल्या व्यथेने वाचकाला तिच्या दुःखाची कल्पना येते.

अशा प्रकारे आवडाबाईच्या एकदंर चित्रणातून आपणास आवडाई धाडसी, निर्भिड, काटक, कष्टाळू ग्रामीण स्त्री उभी राहते. आवडाबाई एक आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श सासू व आदर्श समाज सेविका होती. लंगड्या गोईंदाची काठी, हैबती व गुणवंतासाठी प्रेरक शक्ती दात्री व फुलाची सासू नाही तर प्रेमळ आई. सर्व धरणग्रस्तांचे डोळे पुसणारी आदर्श मार्गदर्शक अशा विविध अंगानी आवडाईचे व्यक्तिमत्त्व खुलविण्याचा लेखकाने प्रयत्न केलेला दिसला.

**हिरा मास्तरीण :**

खैरमोडे गुरूजींची पत्नी म्हणून मास्तरीण पण वास्तविक पाहाता तिनं तिच्या उभ्या हयातीत शाळेचा उंबरा ओलांडला नव्हता. एकुलत्या एका पोरीला न्हाऊ घालावे. शाळेत पाठवावे आणि गुरूजींच्या येण्यापूर्वी स्वयंपाक करून त्यांना प्रेमाने जेवण वाढण्याचे काम हिरा मास्तरीण करीत होती. दुपारचे उन टळले की, स्वयंपाकाच्या सरपणाची सोय करण्यासाठी बाहेर पडायचे. कुणाच्या शेतात रोजंदारीने जायला तिला लाज वाटली नाही. घरची कामं सोडून गुरूजींना लष्कराच्या भाकरी भाजण्याचे काम करू नये. असे हिरा मास्तरणीला वाटत होते. ती गुरूजींना समजावयाची पण गुरूजींना तिचे समजावणे व्यर्थ होते. गुरुजींच्या मागे संसाराचा गाडा ती समर्थपणे सांभाळत होती. नोकरदाराची पत्नी असूनही धरणग्रस्तांना ज्या अडचणींना सामोरे जावे लागले, त्याच संकटांचा सामना हिरा मास्तरणीला देखील करावा लागला.

**बनूबाई :**

जांभळीच्या दत्तू सरपंचाची बनूबाई ही सावत्र आई. बनूबाई व तिचा पती रघूबा करवंदे जांभळीत सुखाने राहत होते. पण लग्नाला अकरा वर्षे झाली तरी बनुबाईचं पोटपाणी पिकलं नाही. म्हणून तिने स्वतः नवऱ्याचे दुसरे लग्न लावून दिले. सवतीला मुलगा झाला. बनुबाईच्या समतजूतदारपणाचे करावे तेवढे कौतुक थोडे होते. सवतीचा मुलगा म्हणजेच दत्तू मोठा झाल्यावर बनूबाईला ठिसफिस करू लागला. आपल्या माघारी दत्तू बनूबाईचा सांभाळ करणार नाही. हे रघूबाला दत्तूच्या वर्तनावरून लक्षात येते. म्हणून रघूबाने मरण्यापूर्वी बनूबाईचा हिस्सा काढून दिला. नवऱ्यापाठी बनूबाई आपल्या वाट्याची शेती पिकवू लागली होती. पण दत्तू तिच्या उभ्या पिकात गुरे घालून पिकाचा नाश करीत होता. शेवटी कंटाळून ती वाघेठाणला भावाच्या आश्रयाला गेली. भावाच्या घरात आपला बोजा वाटायला नको म्हणून भावाच्या घरी धूणंभाडी करू लागली. जांभळीला धरणग्रस्तांना म्हणून तिच्या वाट्याचे पैसे मिळतील म्हणून जांभळीला गेली. आंबेपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयात तिला वाघदरे साहेबांकडून कळले की, दत्तू सरपंचाने तिच्या मृत्यूचे सर्टिफिकेट देऊन त्याचे नाव वारस म्हणून नोंदवून दोघांच्या वाट्याचे सत्तर हजार हडप केले. ‘‘माझ्या दारातच मी मरेन. देवा परमीसरा, मला शेवटाची दह्यादुधाची आंगूळ माज्या तुळशीजवळच मिळूंदे रं ऽ!’’(पृ.६७) अशी शेवटी इच्छा असणाऱ्या बनूबाईची ही इच्छा पुर्ण झाली नाही. याचा वाचकाला खेद वाटतो.

**रूपा :**

रूपा ही हैबतीच्या मामाची मुलगी. हैबती लग्नाच्या वयाचा झाल्यावर त्याने रूपाला पत्नी म्हणून मनोमनी स्वीकारले होते. रूपाचा रूपडं त्याच्या नजरेसमोरून हालत नव्हते. आवडाई आणि हैबती रूपाला लग्नाची मागणी घालण्यासाठी गेले. तेव्हा हैबतीबरोबर लग्नाच्या विषयावर रूपा आणि तिचे वडील यांची चर्चा हैबती व आवडाईने ऐकली. हैबतीबरोबर तिने लग्नाला नकार दिला. कारण ''तिथली माणसं दरवेशावानी गाव सोडून परमुलखात जाणार भिनभिकाऱ्यावानी भीक मागीत! मग मी बी जाऊ का तारंवरनं उड्या मारायला ऽऽ डोंबाऱ्याच्या पोरीवानी?''(पृ.क्र.७४) रूपाच्या या वक्तव्याने धरणग्रस्तांच्या मुलांना लग्नासाठी मुली होकार देत नाहीत. ही एक सामाजिक समस्या लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**साळू वहिनी :**

आवडाईचा मोठा मुलगा गुणवंता ह्याची पत्नी साळू, हैबतीची वहिनी. गुणवतांला त्याच्या मामाने दत्तक घेतले असल्याने गुणवंता त्याच्या बायको मुलांबरोबर झांजडवाडीत सुखाने संसार करीत होता. पण धरणाचा घाला अखेरीस त्यांच्यावरही आला.

**१.२.८. राघववेळ :**

'राघववेळ' कादंबरीची नायिका वालंबी आहे. रघूची आई म्हणून वालंबीची ही व्यक्तिरेखा निश्चितच दलित कादंबरीला एक महत्त्वाचे परिमाण मिळवून देणारी वाटते. भाऊकीला धरून राहणारी, शिक्षणाचे महत्त्व समजलेली, श्रद्धाळू, कष्टाळू, प्रेमळ व आपल्या शिलाला धक्का न लावणारी, वालंबी महान स्त्री वाटते. रघूची चुलती हरणी (लहान माय) पायरूला सतत बोलणारी संकुचित वृत्तीची व संशयी वाटते, सोपानरावाची मुलगी सरूबाई, बुग्याची तान्ही, हरणीची लहान मुलगी पद्मी, भुजंगरावाची पत्नी सिंधुताई, मुंजी, सहादूची बायको गंगू, गंगूची मुलगी कमल, राधी, राधीची नात सगणी, वच्छी, वच्छीची सून मीरा, वच्छीची जाव गिरजा, धुरपा या गौण स्त्रीव्यक्तिरेखा लेखकाने साकार केल्या आहेत. वालंबी, कौशी ह्या मुख्य स्त्रीव्यक्तीरेखा कादंबरीत आलेल्या दिसून येतात.

**वालंबी :**

वालंबी अगोदर भट्टीवर काम करीत होती. कामाचा ताण अधिक असला तरी शेतीच्या कामाच्या मजूरीपेक्षा भट्टीवर दीड-पट्टीने मजूरी मिळत होती. पण नंतर वालंबीचे भट्टीचे काम सुटले होते. वालंबी गावातील बाळंतपण करण्यात हुशार होती. ''बाळंतपण करतो पण रोजच्या

रोज कोण देते.''(पृ.५) असे ती म्हणाली व आपले दुःख आवरत मुलाला न दाखविण्याचा प्रयत्न तिने केला. नाक शिंकारण्याचे निमित्त तिने ते पुसले. पण रघुने पाहिलेच तिला.(पृ.५) वालंबीला तंबाखू खाण्याची सवय होती. या कादंबरीतील नायिका वालंबी ही स्वतः निरक्षर असूनही तिला शिक्षणाचे महत्त्व कळाले आहे. आपल्या दोन्ही मुलांना चांगले शिक्षण देण्याचे स्वप्न मनाशी बाळगते. वालंबीला तिचा मुलगा सीतारामच्या आजाराच्या उपचारासाठी वीस-पंचवीस रुपये मिळत नाही. कारण ती रांडव आहे. शेवटी वालंबी पैशासाठी यादव पाटलाकडे जाते. तिथे तिच्या शरीराची मागणी होते. वालंबी ही भिकूलालचा मूग सोळाव्या हिस्याने तोडायला जाते. चार दिवस मूग तोडून मिळालेल्या हिस्यामुळे घरखर्च होऊन पायलीभर मूग शिल्लक राहतो. शेषराव कालेच्या शेतात ती फणे वेचण्यासाठी जाते. रघू आणि कौशी ही तिची मुलेही तिच्याबरोबर काम करीत होती. या व्यक्ती आणि प्रसंगातून शेतीकाम करुन पोट भरणाऱ्या शेतमजूरांचे भावविश्व यातून साकार होते. ते कृषिसंस्कृतिला जोडलेले दिसून येते. शेतात पिक येऊ लागल्यानंतर ती उडदाचा सर्वा करायला जाते. आलेले उडीद विकून त्या पैशात सर्वपित्री अमावस्याला नवऱ्याचे पितर जेऊ घालते.

वालंबी यादव पाटलांच्या चक्कीवर त्यांच्याकडे मदतीच्या अपेक्षेने जाते. तेव्हा तोही तिला आडोशाला नेऊन वासना पूर्तीच्या अपेक्षेने पाहतो. पण ती स्वतःवर नियंत्रण ठेवते. डॉ.चंद्रकांत बांदिवडेकर वालंबी विषयी म्हणतात, ''रंडकी वालंबी आपल्या तीन पोरांसह केवळ जगण्यासाठी भयंकर संघर्ष करीत आहे. आणि तरीही तिच्यातलं वात्सल्य, कुटुंबाविषयी आपुलकी जिवंत असते. वालंबी हळूहळू अशी महान दिसू लागते. ही सर्व कुटुंब पसाभर ज्वारी एकमेकाला देऊ शकत नाही. अंगावर पिणारं पोरं आईच शोषण करत असतचं. अंबाडीची भाजी खाऊन जगण्याच्या वेळीसुद्धा त्या भाजीचा वाटा दिराच्या घरी पाठविण्याची माणुसकी वालंबीमध्ये, रघुमध्ये शिल्लक राहते.''[३९] मुलाबाळांच्या पोटासाठी कष्ट उपसून वालंबी त्यांना भाकरी खाऊ घालते. सरपण म्हणून नाल्याच्या कडेला असलेल्या वाळलेल्या बाभळीच्या काटक्या आणते. आपल्या रक्ताच्या नात्यांना जीवापाड जपणारी कादंबरीतील ही पात्रे माणुसकीचा गहीवर असलेली मला वाटतात.

वालंबीचा नवरा मेल्यानंतर तिने मोठ्या जिद्दीने व धैर्याने आपल्या मुलांचा सांभाळ केलेला आहे. आलेल्या परिस्थितीशी दोन हात करत, झगडत ती सामोरी जाते. तिचा दीर पायरु तिला प्रत्येक वेळी मदतीचा हात देतो. मानसिक आधार देण्याचे काम करतो. दळणकांडण करुन, कळणाकोंढा खाऊ घालून वालंबी रघु, सीतारामाला शिकवित होती. धान्याचा हंगाम संपत

आल्यानंतर मांग स्त्रिया शेतकऱ्यांच्या खळयातील धान्याचे मातेरे काढून साठवतात. साठवलेल्या धान्यात वालंबी दिवाळी साजरी करते. गावातील बाळंतपण करण्यासाठी वालंबीचा हातखंडा होता. वालंबी पैशासाठी यादव पाटलाकडे जाते. तिथे गेल्यावर तिच्या शरीराची मागणी त्याच्याकडून होते. पण स्वतःला त्याच्यातून ती सावरते. सवर्ण पुरुषाला शरीर न दिल्यामुळे तिला उसने पैसेही मिळत नाहीत.

वालंबी बाळंतपण करण्यात हातखंडा असलेली स्त्री होती. कोणत्याही लेकीबाळी बाळंतपणाला आल्या की मोठ्या कौशल्याने आडलेल्या–नडलेल्या लेकी–बाळींचे बाळंतपण ती यशस्वीतेने करे. उदाहरणार्थ, मीराच्या बाळंतपणाचा प्रसंग. वालंबीच्या कौशल्याचा परिपाक असलेला दिसतो.

**गजरी :**

कौशीची सासू गजरी हिचे गावातील पंडीतराव देशमुखाबरोबर अनैतिक संबंध होते. गजरी हा कौशीला पंडीतराव देशमुखांचा मुलगा भुजंगराव देशमुख ह्याच्याबरोबर संबंध ठेवायला भाग पाडत होती. कौशी मात्र या संबंधांना नकार देत होती. गजरी दुपारच्या चहासाठी आपले शरीर दुसऱ्याला उपभोगायला देत होती. गजरी ही कौशीची सासू तिला खूप छळते. कौशीत व नवऱ्यात बेबनाव घडवून आणते. कौशीने जेवणात विषारी सरडयाची शेपटी घातली असा तिच्यावर आळ घेऊन तिला माहेरी पाठविते. गजरी भूकेसाठी शरीराचा व्याभिचार करुन कुटुंब चालविते.

**कौशी :**

कौशी काम करण्यायोग्य झाल्यावर वालंबी तिला कामावर घेऊन जाऊ लागली होती. रघु कौशीला बाई म्हणत होता. कौशी ही मजूरीसाठी दुसऱ्याला तिच्या शरीराचा उपभोग घेऊन देते. सासूबरोबर भांडण होऊन कौशी माहेरी जाण्यासाठी निघालेली होती. तरीही माहेरी निघताना ती सासूच्या पाया पडली होती. यातून कौशीवर झालेले चांगले संस्कार दिसून येतात.

सैजी रायबाची बायको. सैजीला आंधळी मुलगी होती. हरणी  हरणी ही रघुची चुलती होती. तिला सर्वजण ल्हाणे माय म्हणत होते.

'राघववेळ' मधील स्त्री दारिद्रयाने गंजलेली असल्यामुळे इतरत्र उदाहरणार्थ, गजरीसारखी आसरा शोधणारी आहे. राघववेळमधील स्त्री पोटासाठी धडपडणारी आणि अन्याय, अत्याचार, जुलूम सहन करणारी पण प्रसंगी प्रतिकार करणारी दिसते. उदा.कौशी व वालंबी. सवर्णांकडून वासनेचा बळी ठरणारी सोशिक, प्रसंगी निष्ठूर होणारी आहे. 'राघववेळ' मधील स्त्री मायाळू,

दुसऱ्याच्या सुखःदुखात सामील होणारी, धर्म परंपरा जपणारी, अंधश्रद्धेच्या वरवंटयाखाली भरडली जाणारी अशी स्त्री व्यक्तिरेखा रेखाटली आहे. तिच्या आयुष्यातील संकटांचा शोध व मनात चाललेल्या खळबळीचा ठाव लेखक घेताना दिसतो. स्वतःच्या मुलांवर व पतीवर जेवढया निष्ठेने ती प्रेम करते तेवढीच ती श्रद्धाळू आहे. तसेच जात, परंपरा जपणारी आहे. 'राघववेळ'मध्ये लेखकाने स्त्री व्यक्तिरेखांच्या माध्यमातून हे आपणासमोर मांडले आहे.

**१.२.९. ताम्रपट :**

**इंदिराराजे :**

'इंदिराराजे' या बापूसाहेब देशमुखांची पत्नी इंदिराराजे आणि बापूसाहेब यांचा प्रेमविवाह झाला होता. गोऱ्यापान, उंच, भरदार, अत्यंत देखण्या, वागण्यात देशमुखी खानदानी अदब असलेले इंदिराराजेंचे व्यक्तिमत्त्व होते. त्यांना चित्र काढण्याचा छंद होता. त्यांना वाचनाची ही आवड होती. 'सॉमरसेट मॉम इंदिराराजेंचा आवडता लेखक'(पृ.१५७) बापूसाहेब देशमुख सरदार निकमांच्या वाड्यात वाचनाच्या ओढीने जात. इंदिराराजे या सरदार निकमांच्या नात्यातल्या फलटणच्या निंबाळकर घराणातल्या सुखवस्तू कुटुंबातल्या कन्या होत्या. सुट्यांमध्ये त्या भगवानराव निकमांच्या घरी यायच्या. तेथेच बापूसाहेब व इंदिराराजे यांची पहिली भेट झाली आणि त्यानंतर त्या प्रत्येक सुट्टीत निकमांच्या घरी येऊ लागल्या. त्या बापूसाहेबांच्या प्रेमात पडल्या. 'दोन्ही घराण्यांच्या परिस्थितीत महदंतर रेशमी रूजाम्यावर सपाता घालून हिंडण्यात इंदिराराजेंचे सारे आयुष्य गेलेले, तर बापूसाहेबांच्या घरी सारे नांगरट देशी लोक कुणबीक ही वहिवाट होती. कुळीने बरे होते. तरी एकूण वापर कुणबीछापच होता.'(पृ.१५७) अशा दोन्ही कुटुंबात तफावत असली तरी त्यांच्या निश्चयापुढे निंबाळकर कुटुंबियांनी माघार घेतली. लग्नानंतर इंदिराराजींशी काहीही संबंध ठेवणार नाही, असे सांगून विवाहास मान्यता दिली. विवाहानंतर दोन खोल्यांच्या संसारात इंदिराराजे कोणतीही कुरकूर न करता राहिल्या होत्या. पैशाची काटकसर करावी लागत होती. माहेरी एखाद्या राजकन्येसारखी राहिलेली ही इंदिरा लग्नानंतर मात्र स्वयंपाक, धुणी-भांडी हे सारे करत होती. सासर माहेरचं असं कोणीही त्याच्याकडे येत नव्हतं. 'पण इंदिराराजे डगमगल्या नव्हत्या.'(पृ.१८४) लग्नानंतर असलेल्या परिस्थितीशी जुळवून घेतले हाते.

इंदिराराजे यांच्या पायगुणाने बापूसाहेबांचे दिवस पालटले. त्यांचा वकिलीचा व्यवसाय नावारूपाला आला. कौटुंबिक स्थैर्य आल्यानंतर इंदिराजे यांनी बापूसाहेबांना राजकारणात आणण्यासाठी प्रयत्न केले. राजेंद्र सलालकर इंदिराराजेंविषयी म्हणतात, ''इंदिरा राजे कणखरपणे

स्वतःच्या बुद्धीसामर्थ्यावर राजकारणात नवऱ्याला उभं करते.''[४०] पुढे बापूसाहेब आमदार म्हणून निवडूण येतात त्यावेळी इंदिराराजे या बापूसाहेबांना योग्य तो सल्ला देणे, कार्यकर्ते सांभाळणे, त्यांच्याशी चांगला संवाद साधणे, त्यांना एकत्र ठेवणे, ही कामे त्या मोठ्या खुबीने पार पाडत. इंदिराराजे यांच्याकडे दूरदर्शी धोरणी विचारांची चौकट होती. 'परिस्थितीचे योग्य आकलन, कोणत्या वेळी काय करावे याची श्रेष्ठ समज याबाबतीत त्या बापूसाहेबांच्या कैक योजनेपुढे होत्या.'(पृ.६८५) इंदिराराजांना राजकारणाचे बाळकडू लहानपणापासूनच मिळाले होते. बापूसाहेबांना राजकारणात वेळोवेळी अनेक अडचणी येत पण इंदिराराजे त्या अडचणी आपल्या चाणाक्ष बुद्धीने सोडवित. बापूसाहेबांना राजकारणात ज्याच्यापासून धोका आहे अशा बुवासाहेबांना मोठ्या चातुर्याने राजकारणातून त्यांनी बाजूला केले. बापूसाहेब मंत्री झाल्यानंतर आपल्या मतदार संघावर आपला ताबा ठेवण्यासाठी जिल्हा परिषद अध्यक्ष म्हणून श्रीमंतराव ढमाले या व्यक्तीवर त्यांनी विश्वास ठेवला. बापूसाहेब ढमालेंनी बापूसाहेब देशमुखांना अडकविण्यात येणाऱ्या सापळ्यातून वाचविले. त्यावेळी कृतज्ञता म्हणून त्याच्या भावाला स्पेअरपार्टचे दुकान आणि मुलाला औषध एजन्सी दिली. काँग्रेसमधले आपले राजकीय वर्चस्व संपुष्टात येत आहे हे लक्षात येताच जनता पक्षात त्यांनी प्रवेश केला.

त्या कौटुंबिक जबाबदाऱ्याही समर्थपणे पार पाडत होत्या. उदयने म्हणजे त्यांच्या मुलाने रिटा ब्रुकनेर नावाच्या युरोपीयन मुलीशी विवाह करण्याची परवानगी मागताच परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्या त्याला संमती देतात. पण उदय तिला सोडून परत येतो व गोव्याच्या राण्यांच्या मुलीशी विवाह करतो. पण जेव्हा रिटा ब्रुकनेर उदय सिंगावर हक्क सांगू लागते. तेव्हा योग्य मार्गाने तिला उदयसिंगापासून त्यांनी तोडले होते. अशा प्रकारे अतिशय चाणाक्ष बुद्धीमत्तेच्या इंदिराराजे या यशस्वी पुरूषाच्या मागे उभ्या असलेल्या दिसतात.

**गोधाबाई :**

गोधाबाई टाकळी भानच्या गव्हाण्यांचा घरातल्या ह्या तुकाराम भोईटे पाटील यांच्या पत्नी. गोधाबाई दिसायला तशा सर्वसाधारणच होत्या. रंग गव्हाळ, उन्हाने रापल्यासारखा चेहरा, दणकट शरीर यष्टी असलेल्या अतिशय कष्टाळू, पाटलीण म्हणून शोभणाऱ्या अशा आहेत. 'गोधाबाई' आपल्या पातळीवर गुपचूप सावकारी सदृश्य व्यवहार करीत होत्या. भांडी, दागिने वा तत्सम वस्तू गहाणवटीने घेऊन त्यांनी लोकांना पैसा व्याजाने दिलेला होता.'(पृ.६०४) म्हणजेच गोधाबाईंनी भोईटे पाटलांना कळू न देता सावकारीचा धंदा करून आपल्या सुबत्तेत भर टाकली

होती. आणीबाणीच्या काळात दादासाहेबांनी ह्या सर्व वस्तू ज्याच्या त्याला देऊन टाकल्या होत्या. एकदा त्यांना चक्कर येऊन गेली. तो हार्ट ॲटॅक होता. असं डॉक्टरांनी सांगितलं. मोकळ्या हवेत डॉक्टरांनी फिरायला सांगितले. तेव्हा गोधाबाईंना वाटतं, ना काम ना धंदा आणि उगाच हिंडायच? निदान गेल्या सरशी समजा डोक्यावर पाटी घमेलं अस काही नेले तर चार शेणाच्या पोठ्या ज्या रस्त्यात दिसतील त्या गोळा केल्यातर वावराला तेवढचं खत तर मिळेल. म्हणजे व्यायाम म्हणून हिंडण्यापेक्षा काम केलं तर व्यायामही होईल आणि कामही असे त्यांचे विचार होते.(पृ.७३२) या उदाहरणातून त्या कष्टाळू असल्याचे दिसते.

अंकुशला म्हणजे त्यांच्या मुलाला पहिल्या दोन मुली झाल्या. तेव्हा त्या खूप नाराज झाल्या. वंशाला दिवा हवाच असा अट्टहास धरून बसल्या. आपल्या भावाची दणकट मुलगी सून म्हणून आणायला हवी होती. अंकुशची पत्नी सुनिता हिच्यावर त्या नाराज होत्या. ते फक्त दोन मुली झाल्या म्हणून. बाकी त्यांचीही सुनेवर माया होती. 'मराठमोळ्यांची, देशमुखांच्या घरची शिकली सवरलेली सून आहे. म्हणून सुरूवातीला दबूनच राहायच्या त्या.'(पृ.७३४) अंकुशला मुलगा झाल्याची बातमी समजताच गोधाताईनी बैलगाडीत साखरेची पोती ठेवली व पूर्ण गावभर साखर वाटत फिरल्या पण जेव्हा त्यांना नातवाचे ओठ फाटलेले आहेत. हे कळले तेव्हा त्यांच्या आनंदावर मात्र विरजन पडते. गव्हाण्यांच्या घरातून पाटलीणबाई भोईट्याच्या घरी आल्या. पाटलीण बाईंच्या पावलांनीच या घरात लक्ष्मी वस्तीला आली होती. दादासाहेबांसारख्या यशस्वी राजकारण्याची पत्नी म्हणून त्यांनी संसार केला. उन्हातान्हात राबून प्रसंगी सावकारकी करून संसार वाढविला. दादासाहेबांसारख्या मोठ्या व्यक्तीची पत्नी असुनही त्यांनी कष्टाची लाज धरली नाही. शेतात राबण्यात कमीपणा मानला नाही. कर्तबगार पाटलीण म्हणून त्या आपल्या मनावर ठसा उमटवितात.

**अनुताई :**

नाना सिरूर या कादंबरी नायकाची पत्नी म्हणून अनुताईंचे व्यक्तिमत्त्व महान आहे. अनुताईंचे वडील 'हरिभाऊ कुलकर्णी जे नाशिकच्या नगरवाचनालयात ग्रंथपाल होते आणि सेवादलाशी ज्यांचा अगदी स्थापनेपासून संबंध होता.'(पृ.१३८) अनुताई व नाना यांचा विवाह साने गुरूजींनी जमविला होता. तेव्हा साने गुरूजी म्हणाले, 'मुलगा वकिली करतो. दोन वर्षाआधीच सनद मिळालीय त्याला.'(पृ.१३९) अनुताई या खरं तर मोठ्या स्वातंत्र्य सैनिकांची पत्नी. चूल आणि मूल हेच आपले कार्यक्षेत्र मानून त्या राहिल्या. अनुताई म्हणजे अगदी साधी राहणी, सालस

वृत्ती, समजुतदार स्वभाव, घरातल्या सर्वांची कामे सेवाभावी वृत्तीने करणारी, कुटुंबवत्सल स्त्री, पती हाच परमेश्वर मानणारी होती. त्या नेहमी नानांच्या आज्ञेत राहात. नानांचा स्वभाव म्हणजे गरीबांना मदत करणे, दारी आलेल्या भुकेलेल्या व्यक्तीला जेवू घालणे. पण अनुताईंना त्याचा स्वतःला त्रास झाला तरी त्यांनी त्या गोष्टीचा राग पतीवर काढला नाही. अनुताई ही घरात आलेल्या सर्व व्यक्तींचा मान राखून त्यांची सेवा करायच्या. नाना व्यवसायाने वकिल होते. ते इतर वकिलांप्रमाणे खूप पैसा कमवू शकले असते. परंतु नाना संसाराला पाहिजे. तेवढाच पैसा मिळवतात. अनुताईंनी या गोष्टीचा कधीही त्रागा केला नाही. आपल्या इच्छा आकांक्षांना मुरड घालून काटकसरीने त्या संसाराचा गाडा चालवितात. नानांच्या स्वभाववृत्तीनुसार अनुताई देखील स्वतःमध्ये खूप बदल करून घेतात.

जयप्रकाश व अरूणा या दोन मुलांच्या खाण्यापिण्याच्या आवडीनिवडी त्या जपतात. मुलांना अतिशय प्रेमाने सांभाळतात. जयप्रकाशला इंजिनिअरींगला प्रवेश मिळविण्यासाठी अर्धा टक्का कमी पडतो. जर नानांनी जय प्रकाशसाठी स्वातंत्र्य सैनिकचा मुलगा आहे. असा दाखला मिळवला तर जय प्रकाशला इंजिनिअरींगला प्रवेश मिळणार होता. पण नानांच्या स्वभावाची अनुताईंना कल्पना होती. त्यामुळे त्या जयप्रकाशला म्हणाल्या होत्या, 'ऐकणार नाहीत. हे ऐकणार नाहीत.'(पृ.४६५) जय प्रकाश व नाना यांच्यामध्ये जो वादविवाद चालला होता, नानांनी नाशिक सेंट्रल जेलच्या अधिकाऱ्याकडून बेचाळीसला ते तिथे जेलमध्ये होते, असे सर्टिफिकेट आणावे असे जयप्रकाशचे म्हणणे होते. पण नानांच्या त्यागी वृत्तीला ते मान्य नव्हते. त्या दोघांच्या वादात अनुताईंना मुलाची बाजू पटत असली तरी त्यांनी नानांपुढे मुलासाठी अट्टहास केला नाही. आपल्या मुलाच्या भविष्याचा प्रश्न असतानाही नवऱ्याला जे करायला आवडत नाही, त्यात भले कितीही फायदा असला तरी त्या करायच्या नाहीत. ते तत्त्व त्यांनी निर्विकारपणे स्वीकारले होते.

एकदा नानांनी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या संदर्भात उपोषण केले. नानांच्या उपोषणाच्या वेळी अनुताईंचा जीव टांगणीला लागलेला होता. पण केवळ आपल्याकडे पाहिल्यानंतर नानांचा धीर खचू नये. म्हणून त्या नानांना भेटायलादेखील जात नाहीत. त्यावेळी गोदूताई अनुताईंना म्हणाला 'तुही बाई कशी गं एवढी निकरट?'(पृ.३१३) गोदूताईंना तोंडाचा पट्टा चालू केला पण अनुताई शांतपणे घरातली कामं करत होत्या. एका क्षणी नाना या साऱ्या परिस्थितीला कंटाळतात. तेव्हा ते स्वतःला स्वतःच्या खलबतखान्यात बंदिस्त करून घेतात. तेव्हा ते अनुताईंवर उगीचच चिडतात. त्यावेळी ही माऊली त्यांना कोणतेही उलट उत्तर देत नाही. नानांना नैराश्येतून आलेला

चिडचिडपणा त्या स्थितप्रज्ञवृत्तीने स्वीकारतात. राजेंद्र सलालकर अनुताईंच्या ह्या स्वभाव धर्माविषयी म्हणतात, ''नवऱ्याला न आवडणाऱ्या गोष्टींविषयी, त्यात कितीही फायदा दडलेला असला, तरीही कुठलाही त्रागा न करणे, शांतपणे आलेल्या परिस्थितीला सामोरे जाणे हा भारतीय स्त्रीचा पतीधर्म त्यांनी जोपासला आहे.''[४१] अनुताई पतीला म्हणजेच नानांना समजून घेणाऱ्या, त्यागी वृत्तीच्या, कष्टाळू, समंजस वाटतात असे मला वाटते.

नानासारख्या आदर्श पतीची आदर्श पत्नी म्हणून अनुताई ही व्यक्तिरेखा लेखकाने रेखाटली आहे. पतीने अंगिकारलेल्या नितीमुल्यांना समोर ठेवून पतीच्या पावलावर पाऊन ठेवून चालणारी आदर्श पत्नी आदर्श गृहिणी म्हणून वाचकांच्या मनाला भावते.

**आवडाबाई :**

अशिक्षित, विधवा कोष्टी समाजातील रोकठोक व समंजस विचारांची स्त्री आवडाबाईचा तिच्या आईवडिलांनी लहानपणीच विवाह लावून दिला. पण प्लेगच्या साथीतच तिचा नवरा वारला, त्यानंतर लिला नावाच्या तिच्या मुलीला घेऊन ती माहेरी आली. त्यावेळी वडिलांनी तिच्या पुनर्विवाहाचा विचार मांडला. पण तिने या गोष्टीला साफ नकार दिला. त्यावेळी 'नाना कृष्णा सारखा तिच्या मदतीला आला.'(पृ.२५) नानांनी तिला हिंमतीवर उभे राहण्यासाठी मदत केली. कमी भाडं असलेली खोली. एक हातमाग व थोडे भांडवल कर्ज म्हणून तिने घेतले. थोड्याच काळात कर्जाऊ घेतलेली रक्कम जिद्दीने फेडली. ताठ मानेने एकटी लेकीला घेऊन राहू लागली. स्वतः स्थिरावल्यानंतर स्वतः होऊन नानांच्या कार्यात उतरली. महिला संघटनांचे काम ती करू लागली.

१९४२ च्या 'चले जाव' आंदोलनात राष्ट्रसेवा दलाच्या महिला आघाडीमध्ये आवडाबाईने सक्रिय सहभाग घेतला. पोलिसचौकीवरील आंदोलनात महिलांचे नेतृत्व आवडाबाईने केले. जमावाला घाबरवण्यासाठी पोलिसांनी हवेत गोळीबार केला. जमाव पांगला, सगळे कार्यकर्ते पळाले, असे नाही. सुरक्षित अंतरावर संधीची वाट पहात दबा धरून बसले. 'अंगात वीरश्री संचारल्यासारखी आवडाबाई निशाण घेऊन पुढे निघाली.' ''भारऽत माता की जऽऽय!''(पृ.१०१) अशी आवडाबाईने जोरकस घोषणा दिली. पोलिसांनी आवडाबाईला मागे फिरण्यास सांगितले. पण ही हिम्मतवान बाई मागे फिरली नाही. पोलिसांनी गोळीबार केला व एक गोळी आवडाबाईच्या पायात घुसली. लीला मोठी झाल्यानंतर आवडाबाईने तिचे लग्न करून दिले. पण तिचा नवरा नपूंसक आहे. हे लिलाच्या लक्षात आल्यानंतर ती कायमची माहेरी आली. मुलीची ही अवस्था

पाहून आवडाबाई व्यथित झाली. पण मुलीच्या पाठी खंबीरपणे उभी राहिली. त्यानंतर मोमीन निस्सार व लिला यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाल्यानंतर ह्या आंतरजातीय विवाहाला आवडाबाईने संमती दिली.

ऐन तारूण्यात पतीचे निधन झाले. मोठ्या दिराला ती आवडते. अशी त्याने त्याची इच्छा आवडाबाईसमोर व्यक्त केली. तसेच वडिलांनीही पुनर्विवाहासाठी तिच्या समोर हात जोडले पण या सर्व गोष्टींना तारूण्यात असताना विरोध केला. पण जेव्हा तिला डोकेदुःखीचा आजार सुरू झाला. तेव्हा भावासारखा मानलेल्या राधाकिसनने एकदोनदा तिचे डोके चेपून दिले. पण नंतर तिला राधाकिसनने डोके दाबणे आवडू लागले. तिचा मनाचा तोल जाऊ लागला आहे. हे राधाकिसनच्या लक्षात आल्यानंतर त्याने आवडाबाईची कानउघडणी पुढीलप्रमाणे केली, ''तुपल्या मनाला कायी वाटाया पायजे. तुपलं तुलाच समजाया पायजे समदी जवानी त्वा एवढी कडक चांगली वागून कहाडली आन् आता तुला हे सोभा देत नाही.''(पृ.४२२) त्यानंतर भानावर येऊन आवडाबाईने किसनभाऊला आपल्याला वाईट कृत्यापासून वाचवल्याची कबुली दिली.

अशा प्रकारे अशिक्षित असली तर बुद्धीवादी, मुलीच्या आंतरजातीय विवाहाला परवानगी देऊन उच्च विचार सरणीचा अवलंब करणारी, १९४२ च्या लढ्यात सहभागी झालेली रणरागिणी, जिद्दी, मनाचा तोल जाता जाता सावरलेली अशी आवडाबाई लेखकाने उभी केली आहे.

**गौण व्यक्तिरेखा :**

**सीताबाई :**

सीताबाई ही तुकाराम भोईटे पाटलांच्या दूरच्या नात्यातली होती. रानात एकटी अशी तिची पडळी होती. तिच्या पडळीवर तुकारामासारखी जी शिक्षण घेण्यासाठी आली होती. तिथे अनेक शिकणारी पोरं राहत होती. ती सगळ्या मुलांना भाकरी घालीत होती. 'तिची पडळी एका अर्थाने या पोरांना मोफत वसतिगृहच होते.'(पृ.६) घरापासून दूर शिक्षणासाठी आलेल्या मुलांना तिचा मोठा आधार होता.

**सुशीलाबाई :**

सुशिलाबाई ही भास्करराव सिरूर यांची पत्नी श्रद्धाळू वृत्तीची होती. 'तुळशी वृंदावन, गोपाळकृष्णाची पूजा हा त्यांचा नित्य नेम'(पृ.१७) पावसात पोरांना सांभाळूनही वयाच्या मानाने अधिक नेटकी व टवटवीत दिसणारी अशी ही नाना सिरूर यांची आई. अध्यात्मवादी होती.

**मुक्ता :**

मुक्ता ही नाना सिरूरांची बहीण तिच्या लहानपणी नाना त्याच्या खलबत खान्यात त्याच्या मित्रांना घेऊन जी चर्चा करायचा ते जाणून घेण्याचं कुतूहल या लहानग्या मुक्ताला होत असे.

**लक्ष्मीबाई :**

लक्ष्मीबाई गोविंदभाई तामसरे या विडी कामगारांच्या नेत्याची कष्टाळू पत्नी होती. गोविंदभाईचा कुटुंब चालवण्याच्या कामी काहीही हातभार लागत नव्हता. त्यामुळे गोविंदभाई भूमिगत झाल्याचं कळूनही लक्ष्मीबाईला विशेष खेद वाटला नाही. लक्ष्मीबाई पाच सहा लहान लहान मुलांना विडी बांधण्याचा पिढीजात धंदा करून वाढवित होती. 'दोन बारक्या खोल्यांच्या घरातील ओल, तंबाखूचा वास, तेंदूची पाने आणि किरटी पोरे यात ती किरटी लक्ष्मी कावून गेलेली होती.'(पृ.७१) मुलांच्या मदतीने विडी बांधण्याच्या पिढी व्यवसाय करून लक्ष्मीबाई कुटुंबाचा उदरनिर्वाह करतांना दिसते.

**लीला :**

लीला आवडाबाईची मुलगी लीलाच्या वडिलांचा प्लेगच्या साथीत मृत्यू झाला. तेव्हा ती लहान होती. आवडाबाईने म्हणजे तिच्या आईने लीलेला प्रेमाने वाढविले. लीला फार हुशार वगैरे काही नव्हती. पण मोठी चुणचुणीत आणि चंट पोरगी होती. दिसायलाही टवटवीत, सुरेख, जबाबदारीतून मोकळं होण्यासाठी आवडाबाईने सोळा-सतरा वर्षाची असतानाच लीलेचं लग्न लावून दिलं. 'गोरा गोमटा, प्रसन्न, हसतमुख दिसणारा पोरगा लीलेचा नवरा माणसात नव्हता-पुरूषच नव्हता.'(पृ.१९४) ही गोष्ट लीलेच्या लक्षात आली आपली फसवणूक करण्यात आली आहे. हे कळताच लीला कायमची माहेरी निघून आली. नानांनी तिला रिमांड होम मधील मुलांना शिकविण्याची जबाबदारी सोपवली. रिमांड होम मधल्या मुलांची ती लाडकी बाई होऊन गेली. मुलं तिच्या भोवती बाई-बाई करत पिंगा घालू लागली. 'लीलेचे रितेपण हटले होते. ती आनंदी होती.'(पृ.१९६) नानाच्या कार्यात उत्स्फूर्तपणे सहभागी असलेल्या मोमीन निस्सार विषयी तिला आकर्षन वाटू लागले. आवडाबाई व नाना यांच्या संमतीने तिने मोमीन निस्सार या मुस्लीम मुलाशी आंतरधर्मीय विवाह केला. त्यांना एक मुलगा झाला. पुढे ती निस्सारबरोबर संसारात रमली व तिने आईलाही प्रेमाने सांभाळले. लीलाने आंतरधर्मीय विवाह करुनही तीला समाजात व कुटुंबात मानाचे स्थान असलेले दिसते.

**अरूणा :**

नाना सिरूर यांची कन्या अरूणा एम. ए. नंतरचा सोशल वर्कचा डिप्लोमा तिने केला होता. ब्राह्मण कुटुंबात वाढली. ती अतिशय हुशार, जिज्ञासवृत्तीची मुलगी होती. नानावर तिचा खूप जीव होता. पुढे ती प्राध्यापक होते आणि पुण्यात स्थायिक होते.

**सुशिला :**

सुशिला ही दादासाहेब भोईटे पाटलांची द्वितीय कन्या सुशिलेचा विवाह धुळ्याचे यादवराव हुंबे-देशमुख यांच्याशी झाला होता. तिचा नवरा नाशिकला बँकेत कारकून होता. दादासाहेबांच्या कृपेने तो बँकेचा मॅनेजिंग डायरेक्टर झाला. सुशिलेचा नवरा बाहेरख्याली वृत्तीने वागू लागला. तेव्हा सुशिला माहेरी आली व आपल्या नवऱ्याच्या ह्या वाईट वृत्तीचा पाढा आईसमोर वाचला. तेव्हा पाटलीणबाईंनी तिची समजूत काढली, ''यावढ्या तेवढ्यावरून आस निघून येनं सोभत नायी बाई आपल्याला!''(पृ.७४८) सुशिला पतीच्या दुराचारी वर्तनाला कंटाळून त्यापासून दूर जाताना दिसते.

**शालूबाई :**

शालूबाई भोईटे पाटलांची थोरली कन्या 'कान्हेगावच्या निषेपाटलांच्या घरात दिलेली. तिने सुरूवातीला कैक कष्टात दिवस काढलेत.'(पृ.७३३) तिच्या नवऱ्याच दुसऱ्या एका बाईशी लफडं होत. तिने पाळत ठेवून नवरा व त्या बाईला शोधलं. नवऱ्यासमोर त्या बाईच्या झिंज्या धरून त्या बाईला ठोकलं, 'पाटलीण बाईंची लेक शोभणारी आहे, खरी ही शालूबाई.'(पृ.७३४) नवऱ्याला वठणीवर आणणारी शालूबाई लेखकाने रेखाटली आहे.

**सुनिता :**

सुनिता ही बारामतीच्या अजित काटे यांची बहीण व दादासाहेबांचा मुलगा अंकुश भोईटेची पत्नी. अजित व अंकुश एका कॉलेजमध्ये शिकत असताना, त्यांच्या मैत्रीचे रूपांतर नात्यात झाले. सुनिताला पहिल्या दोन मुली झाल्या. त्यामुळे गोधाबाई म्हणजे सुनिताच्या सासुबाई नाराज झाल्या. तिसरा मुलगा झाला. त्याचे ओठ व टाळू फाटलेली होती. बाळांतपणानंतर मुलगा असा व्यंगयुक्त जन्मल्यामुळे ती फार दुःखी होती. सासूने तिच्याकडे दुर्लक्ष केले. व्यंगयुक्त मुलाच्या जन्मामुळे तिच्या सुखी संसाराला दृष्ट लागल्यासारखे वाटते. कुटुंबामध्ये अशा प्रकारच्या घटना घडत असतात. त्यामुळे कुटुंबातील सासरकडची मंडळी निराश होताना दिसतात.

**भाग्यश्री :**

भाग्यश्री उदयसिंहाची पत्नी म्हणजे बापूसाहेब देशमुखांची सून गोव्याच्या राणे कुटुंबातील मुलगी तिला सुकन्या नावाची एक मुलगी होती. गोरापान रंग, तुकतुकीत दंड, लालसर फळासारखा चेहरा अशी ती रूपाने देखणी होती. एकदा उदय आणि ती सिनेमा पाहण्यासाठी गेले होते. काही उनाड मुल भाग्यश्रीची छेड काढतात. उदय व त्या मुलांची भांडणे होतात, फलके मांमाच्या सहकार्याने सर्व मिटविले जातात. देखणे रुप व आकर्षक राहणीमान यामुळे उनाड मुलांचे लक्ष भाग्यश्रीकडे वेधले जाते, असे दिसते.

**रीटा ब्रुकनेर :**

रीटा ब्रुकनेर ही अँग्लो इंडियन होती. तिचे वडील ब्रिटिश व आई हिंदूस्थानी उदयसिंग यांच्याशी ओळख झाली. मैत्री झाली आणि नंतर त्याच्याबरोबर विवाह करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा विवाह झाला. पण थोड्याच दिवसात रीटा व उदय यांचे बिनसल. उदय पुन्हा हिंदूस्थानात परततो व भाग्यश्री बरोबर लग्न करतो. थोड्याच दिवसात रीटा हिंदूस्थानात येते. मुंबईत आल्यावर तिला उदय भेटतो. उच्चभ्रू कुटुंबातील मुलांना प्रेमाच्या जाळ्यात अडकवून त्यांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या मुलींपैकी एक रिटा ब्रुकनेर ही होती.

**लतिका :**

लतिका ही काशिनाथ ढोरमले या वकिलाची मुलगी ती कुमार क्षत्रिय या खत्री जातीच्या मुलाबरोबर पळून जाते. इंदिरा राजेंच्या चातुर्यबुद्धीने तिला शोधून तिचा विवाह लावला जातो. वडिलांच्या प्रतिष्ठेचा विचार न करता आंतरजातीय विवाह करणारी लतिका बंडखोर वाटली.

**कदमबांडेबाई :**

कदमबांडेबाई म्हणजे, ‘दारूड्या बेजबाबदार नवऱ्याची सोज्वळ घरंदाज स्त्री सुडौल गुटगुटीत दारिद्र्यातही अभिजात सरजामी डौल’(पृ.५९०) दारूच्या नशेत तिच्या नवऱ्याकडून एक अपघात झाला. त्यानंतर रघतपिती सारख्या आजारात त्याचा अंत झाला. खानदानी घराण्यातील या स्त्रीला आधार देण्यासाठी दादासाहेबांनी तिला समाजसेविकेसारखे काम दिले. पण त्यांच्यात वेगळ्याच प्रकारचे संबंध आहेत असा अपप्रचार झाला. समाजसेवेचे काम करीत असतानाही समाजामध्ये तिच्याविषयी  होत असलेल्या अपप्रचारामुळे समाजाची संकुचित विचारसरणी व मानसिकता दिसून येते.

**सुदाम धोब्याची बायको :**

काशिनाथ ढोरमले वकिलाचा वर्गमित्र सुदाम धोबी वकील साहेबांची सुदाम धोब्याच्या घरी येणे जाणे वाढले. आजारी सुदाम धोब्याच्या मृत्युनंतर त्यांच्या कुटुंबाची जबाबदारी ढोरमले वकिलांनी घेतली. सुदाम धोब्याच्या बायकोनेही मदत स्वीकारली. पतीच्या निधनानंतर परपुरुषाच्या आश्रयाला जाणाऱ्या तिच्या वर्तनातून नैतिक मूल्यांचा ऱ्हास झालेला दिसतो.

**बाळशास्त्री दीक्षितांची सून :**

सोनगावच्या बाळशास्त्री दीक्षितांची सून वयाच्या तिसाव्या वर्षीच विधवा होते. सासऱ्याच्या तिरक्या नजरेतून वाचण्यासाठी व निम्मी इस्टेट मिळविण्यासाठी ती काशिनाथ ढोरमले वकिलाकडे येते. मदतीच्या मागे ढोरमले वकिलाची स्वार्थी वृत्ती दिसून येते. निराधार स्त्रियांना मदत करण्याच्या हेतूने जवळीक साधून स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या वृत्तीला महिला कशा बळी पडतात, हे ह्या व्यक्तिमत्त्वामधून स्पष्ट होते.

**गोदूताई :**

गोदूताई ही नाना सिरूर यांची मोठी बहीण एखाद्या आईची आपल्या लेकरावर असावी तशी माया गोदूताईंची या भावावर होती.(पृ.२१२) नानांच्या उपोषणाच्या वेळी नवऱ्यासह ती नानांना भेटायला येते. नानांच्या राजकीय कार्यास बहिणीचा पाठींबा असलेला दिसून येतो.

**सुनेत्रा :**

सुनेत्रा ही जयप्रकाशची पत्नी. तिचे वडील सरकारच्या विदेशी सेवेत नोकरीला असल्याने तिने बरेच देश लहान वयात पाहिलेले आणि म्हणूनच तिला इंग्लडला शिकण्याची संधीही मिळाली होती. चंद्रकांत बांदिवडेकर नानांच्या समाधानी आयुष्याविषयी म्हणतात, ''नानाच्या जीवनात सार्थकतेबरोबर आनंदाचा क्षण निर्माण करणारा भाग म्हणजे जय प्रकाश आणि सुनेत्रा यांच्या निरोगी नात्याचा, सुंदर सहजीवनाचा प्रत्यय देणारा क्षण''[४२] विदेशी वातावरणात वाढली असली, तरी भारतीय संस्कृतीविषयी तिला प्रेम आहे. मुलगा व सुन यांच्याकडे पाहिल्यानंतर नांनाना जीवनात कृतकृतार्थ झाल्यासारखे वाटते.

**द्वारकाबाई :**

द्वारकाबाई ही पांडुरंग तिकोणेची आई. नारायण, पांडुरंग व नाना भूमिगत असताना तिने या तिघांना पोलिसांनी पकडण्यापासून बुद्धीचातुर्याने वाचविले होते. म्हणून ती महान वाटते.

**सावित्री :**

काशिनाथ ढोरमले वकिलाची पत्नी सावित्री ही देवगावच्या भुजंगराव कदमांची मुलगी होती. तिचे वडील इंदिराराजेंच्या नात्यातील होते. त्यामुळे इंदिराराजे यांनीच त्यांचे लग्न जमवले. सावित्री ही तिच्या नावाप्रमाणेच होती. म्हणजे पतीविषयी तिला अतिशय प्रेम होते. आपल्या सुखी संसारासाठी सतत उपवास, पूजाअर्चा करणारी, श्रद्धाळू वृत्तीची काशिनाथने सत्यनारायण पूजाअर्चा किंवा संकष्टी चतुर्थी अशा दिवशी मद्य सेवन करू नये असे तिला वाटत असे. सावित्री अतिशय देखणी होती. पिवळसर गोरा रंग कपाळावर ठसठशीत मुद्देसुद कुंकू नाकात चमकती लफ्फेदार नथ ऐश्वर्याने माखलेल्या देवित्वाचा मूर्तिमंत गोंडस आकार मार्दव तृप्ती असलेली काशिनाथ ढोरमले वकील यांची पत्नी सावित्री होती. सावित्री नावात सारे आले.(पृ.३०९) आपल्या नावाला शोभले अशा प्रकारचे तिथे वागणे होते.

**बाल स्त्री व्यक्तिचित्रण :**

**मुक्ता :**

मुक्ता ही भास्करराव सिरूरांची धाकटी मुलगी. नाना त्याच्या खलबतखान्यात त्यांच्या सहकार्यांशी चर्चा करायचा त्याची तिला गंमत वाटायची. तो घराबाहेर गेला की मुक्ताही त्याच्याबरोबर जाण्याचा हट्ट करायची आणि नेल नाही म्हणून रुसून बसायची. ती तिच्या वडिलांना नेहमी प्रश्न विचारते, म्हणजे ती चौकस वृत्तीची होती. मुक्ताही सेवादलात जायची. त्यांच्या वानरसेनेला तिथ बसायला संधी दिली होती.

'ताम्रपट' या कादंबरीमध्ये प्रामुख्याने नाना सिरुर, बापूसाहेब देशमुख व तुकाराम भोईटे पाटील या तिघांच्या पत्नी अनुक्रमे अनुताई, इंदिराराजे, गोधाबाई या प्रमुख स्त्री व्यक्तिरेखा आहे. अनुताई अल्पसंतुष्ट, पतीने स्वीकारलेल्या समाजसेवेच्या व्रताना त्यांनी अंगिकारलेल्या नितीमूल्यांना साजेसे वर्तन त्यांचे होते. तर इंदिराराजे चाणाक्ष, पतीला राजकारणात यशस्वीपणे उभे करणाऱ्या आदर्श राजकारणी होत्या. साखर कारखान्याच्या मालकाची पत्नी असूनही शेतात कष्ट करण्याचा आपला मानस त्या पूर्ण करतात. आवडाबाई सारखी विधवा कोष्टी समाजातील स्त्री. स्वातंत्र्य युद्धात सक्रिय सहभागी राहिली. मुलीच्या आंतरधर्मीय विवाहाला विरोध केला नाही. म्हणजे आधुनिक विचारसरणीची वाटली. आवडाबाईची मुलगी लीला. तिचा पहिला विवाह ज्या मुलाबरोबर झाला तो पुरुष नव्हता. म्हणजे तिची फसवणूक झाली होती. नाना सिरुरांची सुविद्य

कन्या अरुणा प्राध्यापिका झाली. गोविंदभाई तामसरे की जे नानांबरोबर स्वातंत्र्ययुद्धात सामील झाले होते त्यांची कष्टाळू पत्नी लक्ष्मीबाई दादासाहेब देशमुख यांच्या दोन कन्या सुशिला की जी आपल्या बाहेरख्याली नवऱ्याचे रडगाणे आईला ऐकवायची या उलट त्यांची थोरली मुलगी शालूबाई हिने लफडेखोर नवऱ्याला वठणीवर आणले. बापूसाहेब देशमुखांची सून सुनिता तसेच त्यांचा मुलगा उदय याने सुनिता बरोबर लग्न करण्याआधी ज्या ॲंग्लोइंडियन असलेल्या रिटा ब्रुकनेर बरोबर विवाह केला पण पती-पत्नीचे संबंध दीर्घकाल टिकले नाहीत. नाना व अनुताई यांची सून सुनेत्रा व जयप्रकाश यांचे पती पत्नी म्हणून सुंदर सहजीवन होते. अशा प्रकारे ताम्रपट या कादंबरीमध्ये विविध वातावरणात वाढलेल्या अनेक स्त्रियांची वर्णने आली आहेत.

**१.२.१०. तणकट :**

**तारा :**

तारा ही बाळासाहेब शेडबाळेची पत्नी, गरीब घरची असल्यामुळे संसार अतिशय काटकसरीने करीत होती. तीन मुली, एक मुलगा व म्हातारी सासू या सर्वांची देखभाल करणे व शेतीची कामे करणे हाच तिचा दिनक्रम होता. सासूच्या सततच्या वटवटीमुळे ती किरपण व कुरूप बनत चालली होती. शेडबाळे बँकेत नोकरीला होता. उरला सुरला वेळ त्याचा महारवाड्यात म्हणजे सुलीच्या घरी जात होता. त्यामुळे ताराकडे लक्ष द्यायला, तिची काळजी घ्यायला तिच्या नवऱ्याला वेळच नव्हता. ''बायकोनं आता आपल्या परीने प्रत्येक गोष्टीला तोंड देण्याइतपत समर्थ बनत गेले पाहिजे.''(पृ.२३) असे बाळासाहेबांचे मत होते. अन्याय करणाऱ्या पतीला वेळीच प्रतिबंध घालणे गरजेचे होते, ताराला ते जमले नाही.

**सुली :**

रामा महाराची बायको सुली रंगाने काळी सावळी असली तरी शरिराची ठेवण चांगली होती. 'लग्न होऊन म्हारवाड्यात आली तेव्हा आडदांड रामाला बायको फैना मिळाली, अशी चर्चा सगळ्यांच्या तोंडात होती.'(पृ.३१) लग्न झाल तेव्हा सुली किरकोळ होती. पण सहा महिन्यात फाटक्या-तुटक्या लुगड्यातही तिचा बांधा उठून दिसत होता. अतिशय कष्टाळू होती. त्यामुळे गावातल्या बायका तिने कामाला यावे म्हणून रामा महाराला विनवायच्या. पण एक दोन वेळा बाळासाहेब शेडबाळेच्या शेतात कामाला गेली आणि सुलीमध्ये बदल झाला. लग्नाला सात वर्ष होऊनही सुलीची ओटी भरली नव्हती. थोड्याच दिवसात. शेडबाळेच्या सुलीच्या घरी चकरा

वाढू लागल्या. रामा महाराने शेडबाळे कडे उसनवारी केल्यामुळे तो ही दोघांच्या वागण्याबद्दल चकार शब्द काढत नव्हता. बाळासाहेब तिला घर खर्चाला पैसा देत होता.(पृ.३२) तिला महिन्याला नवनवीन साड्या आणून देत होता. एवढच काय सुलीला सर्व सोयी सुविधा असलेले छोटेसे घरही शेडबाळेने बांधून दिले. दलित समाजासाठी सुरू केलेल्या पतसंस्थेत तिला सभासद पद ही शेडबाळेने दिले होते. अशा प्रकारे रामा महाराची सुशिल पत्नी फुकट मिळणाऱ्या पैशाला लाचार होऊन बाळासाहेब शेडबाळेच्या जाळ्यात अडकली आणि त्याच्या मोहाला बळी पडून रामासारख्या नवऱ्याला सोडून शेडबाळेबरोबर पळून जाते.

**गंगाव्वा :**

कादंबरीनायक कबीरची आई शेतावर राबून मोलमजुरी करून आपले कुटुंब चालविणे एवढेच या माऊलीला माहीत होते. कबीरने शिक्षण पूर्ण करावे अशी तिची तळमळ होती. गावावर बहिष्कार टाकण्याच्या विरोधात कबीरचे कुटुंब असल्यामुळे समाजाने या कुटुंबाला वाळीत टाकले. याची गंगव्वाला खंत वाटली. पण जेव्हा शेडबाळेकडून सर्व समाज फसवला गेला. तेव्हा गंगव्वाने पुढील मत व्यक्त केले. 'बोंबलू देऽऽ घे रांडा-भाडे ! आमचा खंग भाजाय निगालती त्येंचाच भाजला. रांडा भाड्यास्नी भोगाय आलं. थळोबानं बगून घेतलं.'(पृ.२२६) वरील वाक्यातून त्यांच्या कुटुंबाला समाजाने दिलेला त्रास व यातून तिला समाजाचा आलेला राग व्यक्त होताना दिसला.

'तणकट' या कादंबरीमध्ये राजन गवस यांनी रेखाटलेल्या स्त्री पात्रांमध्ये प्रामुख्याने बाळासाहेब शेडबाळेची पत्नी तारा आपल्या बदखयाली पतीचा मार खाणे व कुटुंबाचा मुलाबाळांचा सांभाळ करणे असेच जीवन ती जगली. सुली सारखी स्त्री जिने बाळासाहेब शेडबाळेला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकविले त्याच्या पैशावर घरदार बांधले. कादंबरी नायक कबीर याचा आई गंगाव्वा, आयुष्यभर कष्ट करण्यातच तिचा जन्म गेला. ह्या स्त्रीपात्रांचा समावेश केलेला दिसून येतो.

**१.२.११. डांगोरा एका नगरीचा :**

**राजस :**

कोल्हापूरच्या एका सरदार कुळातील तरुण पदवीधर स्त्री शाळेची मुख्याध्यापिका म्हणून नेमली होती. शाळा सुरु होण्याआधी सहा महीने ती साईखेडात दाखल झाली होती.

बिवलकरांकडून सर्व समजून घेण्यासाठी, तिचं नाव राजस निंबाळकर छत्रपती शाहू महाराजांचा आशीर्वाद घेऊन एका नव्या उमेदीने आणि उत्साहाने राजस साईखेड्यात आली होती. रघुवीरसिंहांच्या पहिल्या भेटीपासूनच एका रोमांचकारी अनुभवाशी तिचा परिचय झाला. त्याचवेळी कसल्यातरी अनामिक भयाचा शहाराही तिला जाणवला होता. छत्रपती शाहू महाराजांच्या सांगण्यावरुन राजस साईखेडामध्ये हेडमिस्ट्रेस म्हणून आलेली होती. ती पदवीधर होती. शाहू महाराजांनी राजसला जाताना सांगितले होते, ''मुली, जोतिबांना स्मरुन काम कर. मुलींना विद्यावंत कर. मुलींचा उद्धार झाला तरच माणसांची जात सुधारणार. आमचा भरवसा धर. तुझ्या पाठीशी आहोत. तू थोर होशील.''(पृ.७०) राजसला सगळीकडून तिच्या कामाची वाहवा झालेली दिसत होती. हेडमास्तर सुमंत तिच्या ग्रहण शक्तीवर आणि योजनाकुशलतेवर पहिल्यापासून खूश होते. माधवराव देसाई, शंभूराव जाधव आणि कृष्णराव राजोपाध्ये यांचे प्रोत्साहन तिला वेळोवेळी मिळालं. कामकाजाच्या तुरळक बैठकीत खुद्द राजे रघुवीरसिंहांनी शाळेच्या संदर्भात केलेल्या सूचनांनी तिच्या कामांना वेग आला होता. कधी अनपेक्षित भेटी झाल्या. त्यात कौतुकाचे व प्रशंसेचे कटाक्ष राजांनी दिले.

**दमयंती :**

अपत्याविना स्त्रियांच्या अस्तित्वाला अर्थात आयुष्याला पूर्णत्व येवू शकत नाही. भारतीय संस्कृतीत आई झाल्याशिवाय परिपूर्ण स्त्री म्हणून मान्यता मिळत नाही. त्यामुळे या सुखापासून वंचित राहीलेल्या वांझपणाची दुःख भोगणाऱ्या दमयंतीचे व्यक्तिमत्त्व व्यथा-वेदनांनी दुःखी झालेले दिसते. वात्सल्यपूर्तीची अपेक्षा पूर्ण न झाल्यामुळे तिच्या वागण्या-बोलण्यात वेगळेपणा आढळतो. ती सतत दुःखी, कष्टी असलेली दिसते. एवढे राजवैभव असूनही जीवनात ती यशस्वी झालेली दिसत नाही. अशा प्रकारचे दमयंतीचे व्यक्तिमत्त्व लेखकाने रेखाटले आहे.

सावित्रीदेवी, दमयंती, राजसची आई, ताहेर यासारख्या विधवा स्त्रियांना कादंबरीत दुर्लक्षितपणाची, उपहासाची वागणूक मिळालेली दिसते. ताहेरा, चंद्रिका या स्त्रिया सज्ञान होण्याच्या आतच त्यांच्यावर समाजव्यवस्थेने कुटुंबाची जबाबदारी दिलेली दिसते. त्यातूनच त्यांचे बालपण हिरावून घेतलेले वाटते. राजसची आई हिने प्रेमविवाह केल्यानंतर तिला कौटुंबिक व सामाजिक अडचणींना सामोरे जावे लागते. आंतरधर्मीय, आंतरजातीय प्रेमविवाहामुळे तिच्या पुढच्या पिढीला म्हणजेच राजसला जीवनात अनंत अडचणी निर्माण होतात.

राजस, मिस क्लारा या प्रगल्भ विचारांच्या व उच्चशिक्षित स्त्रिया स्वाभिमानी, स्वावलंबी जीवन जगताना दिसतात. त्यांच्या बौद्धिक विकासाचा आलेख उंचावताना दिसतो. त्यांच्यावर पुर्णतः कुणाचेच बंधन नसल्यामुळे आयुष्यातील प्रत्येक महत्त्वाचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या उपभोगताना दिसतात. त्यांनी आयुष्यात येणाऱ्या संकटांना धैर्याने तोंड देत आजच्या स्त्रियांपुढे एक आदर्शच निर्माण केलेला दिसतो.

चंद्रिका, रुक्मिणी, प्रल्हाद भटाची बायको या स्त्रियांना पतीवर्चस्वामुळे हीन, अपमानीत किंवा सहनशीलतेचे जीवन जगावे लागते. सासू-सून ह्या दूषित नात्यामुळे दमयंती, सावित्रीदेवी यांचे कुटुंबातील स्वास्थ्य, आनंद नाहीसा झालेला दिसतो. ह्यांच्या वाट्याला दुःखी, कष्टी, यातनामय जीवन आलेले दिसते.

**१.२.१२. बारोमास :**

**अलका :**

अलका ही एकनाथ या कथानायकाची पत्नी. तिचे वडील एम.एस.ई.बी.मध्ये इंजिनिअर होते. मोहाडीसारख्या सुखवस्तू शहरात नोकरी करणाऱ्या बापाच्या घरात अलका लहानची मोठी झाली. तिथं सगळं पॉश होते. म्हणजे त्यांचे घर आजूबाजूचा परिसर. एकनाथबरोबर लग्न झाले आणि ती सांजोळात आली तेथे मात्र अगदी उलट परिस्थिती होती. जिकडे तिकडे धूळ घरात तिला चुलीवर स्वयंपाक करावा लागत होता. चुलीला जाळायला सरपण सुद्धा चांगले नव्हते. म्हणजे ओल्या सरपणावर धूर धूर व्हायचा त्यावर स्वयंपाक करताना बिचारीचे फार हाल व्हायचे. एकनाथ एम.ए., बी.एड. कधी ना कधी नोकरी मिळेलच या अपेक्षेने तिच्या वडिलांनी तिचे लग्न एकनाथबरोबर लाऊन दिले होते. अलकालाही तसेच वाटले. पण अशाच हालाखीच्या परिस्थितीत दिवस चालले होते. त्यामुळे दिवसेंदिवस अलका संतापी होऊ लागली होती. या सर्व गोष्टींचा राग ती एकनाथवर काढू लागली.

एकनाथबरोबर ती कधीच प्रेमाने वागली नाही. मुले न होऊ देण्याचा तिने निर्णय घेतला. एखादं तरी मुल होऊ द्यावे असे एकनाथ ने म्हटल्यावर ती म्हणते, ''काय करायच पैदा करून? इथं आपली तरी सोय आहे का? दारिद्री घरात नरकवास आहे नुस्ता, नुस्ती रडारड.''(पृ.२२) सासू शेवंता माय व तिच्यात नेहमी वाद विवाद व्हायचे. पेरणीला पैसे हवेत. म्हणून अलकाच्या सोन्याच्या बांगड्या मोडाव्यात म्हणून शेवंता मायने तगादा लावला होता. त्यामुळे अलका माहेरी निघून गेली. तिचा दीर मधू सुरूवातीला तिच्याशी लहान भावासारखा वागायचा. पण जेव्हा तिने

त्याला आलेले चांगले स्थळ परतवून लावले, तेव्हापासून दोघांमध्ये वाद-विवाद व्हायचे. एकदा तर मधूने तिच्या मुस्काटात मारली. तेव्हा मात्र ती माहेरी गेली ती परत आलीच नाही. अलकाच्या दृष्टीकोनातून विचार केला तर अपेक्षा भंग झालेली वैवाहिक स्वप्नांचा चुराडा झालेली बिचारी मुलगी आपल्या समोर उभी राहते. एवढा शिकलेला नवरा मिळाला. त्यामुळे तिने जे सुखी संसाराचे स्वप्न पाहिले होते, ते मात्र सत्यात उतरलेच नाही आणि त्यामुळे बेकार नवरा, आडदांड दीर, भांडखोर सासू आणि दारिद्र्याचा जीवनक्रम याला तिने कायमचा रामराम ठोकला ती मोहाडीला जी गेली ती कायमची.

**शेवंतामाय :**

एकनाथची आई शेवंतामय स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन तिने आपल्या मुलांना शिकविले. आपल्या मुलांना नोकरी मिळेल ही तिची अपेक्षा कधीच पूर्ण झाली नाही. सतत फाटलेल्या दोन साड्याच्या चांगल्या भागांची जोडणी करून तिने साड्या नेसल्या पण त्याविषयी कूरकूर केली नाही. सूनबाई अलका व शेवंतामाय यांच्यात कधीच सुसंवाद नव्हता. पिकाच्या पेरणीसाठी पैसे नसल्यामुळे अलकाने बांगड्या मोडाव्यात असे तिला वाटायचे. पण तिने ते ऐकले नाही. तेव्हा बाईच्या जातीची घर संसारात राखचं होते. असे तिने सुनेला समजावून सांगितले.(पृ.१२) शेवंतामाय सून माहेरी गेल्यावर घर स्वच्छ ठेवायची. पण अलका माहेराहून आली की, घरातल्या कोणत्याही कामाला हात लावायची नाही. आपल्या भावाची मुलगी सून म्हणून करून आणण्याची तिची खूप इच्छा होती. कारण तिने शेतात कष्ट केले असते. अलकावर ती सतत नाखूश असायची. तिच्या मते, ''ज्या खुट्याचं ढोर त्याच खुट्याले बांधाय पाहयजे व्हतं पहयलं कावून खुटा चुकवला''(पृ.१२) धाकटा मुलगा मधू शेतात काहीच मदत करत नव्हता. पण याबाबत शेवंतामाय काहीच तक्रार नव्हती. कधी ना कधी त्याला धनलाभ होईल व आपली गरिबी दूर होईल असेच तिला वाटायचे.

मुलगी, जावई, नातू, राजू या सर्वांवर तिचे फार प्रेम होते. जावयाने फाशी घेतली या घटनेनंतर तिने हाय खाल्ली. राजू कर्ज फेडण्यासाठी पैसे मागायला आला होता. तेव्हा जर एकनाथच्या बायकोने बांगड्या दिल्या असत्या तर जावयाने कर्ज फेडले असते व त्याने फाशी घेतली नसती. असे तिला वाटते व सर्वांचे खापर ती एकनाथच्या माथी मारते. नवऱ्याला ती फलाण्या हे संबोधन वापरायची. नवरा म्हणजे कुंकवाचा धनी. नवऱ्याने म्हणजे सुभानरावांनी एन्ड्रीन पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. त्यावेळी शेवंतामायने नवऱ्याचे प्राण वाचावेत म्हणून

सुभानरावाला मिठाचे पाणी पाजले. उलट्याबरोबर पोटात गेलेले औषध बाहेर पडले. शेवंतामायच्या करूण कहानीविषयी, प्रा.लक्ष्मीकांत येळवंडे म्हणतात, ''मनात योजलेल्या आशा-आकांक्षा फुलविणाऱ्या कितीतरी कष्टकरी शेतकरी स्त्रियांची आयुष्याचे कसे मातेरे होते हे आपणाला शेवंतामायच्या रूपाने प्रातिनिधीक स्वरूपात बारोमास मध्ये पाहावयास मिळते.''[४३] अशा प्रकारे आपल्या दरिद्री संसाराला ठिगळे जोडत मुलांचे शिक्षण पूर्ण करणारी, महानुभाव पंथ स्वीकारणारी, शेतावर प्रेम करणारी कुटुंबवत्सल स्त्री. लेखकाने साकार केली आहे.

**ममता वारे :**

ममता वारे एक शिक्षिका होती. तिचा नवरा दत्ता वारे करणखेडला ग्रामसेवक होता. हे कुटुंब एकनाथच्या शेजारी राहायला होते. दत्ता वारे करणखेडला राहायचा सुट्टी असल्यावर सांजोळला जायचा. अलका व ममता वारे दोघींची मैत्री होती. अलकाला मुलं नको होती व ममता वारेला मात्र मुल होतचं नव्हती. याची ममता वारेला खंत वाटायची. एकनाथकडे ती प्रेमाने पाहायची. हे एकनाथच्या लक्षात आले होते. अलकाला ती सतत मदत करायची. मधूने अलकाच्या थोबाडीत मारले. त्यावेळी तिने अलकाला शुद्धीवर आणण्यासाठी प्रयत्न केले. शुद्धीवर आल्यावर तिला चहा करून आणला. त्या घटनेने ममता वारे एकनाथवर नाराज झाली. एकनाथकडे स्वतःच्या पत्नीला संरक्षण देण्याइतकाही पुरूषार्थ नाही, असे तिच्या नजरेतून एकनाथच्या लक्षात आले होते. बारोमास या कादंबरीतील एकूण स्त्री व्यक्तिरेखांविषयी शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''बारोमास मधल्या स्त्रीव्यक्तिरेखा दुबळ्या व खुज्या वाटतात. शेवंतामायचा अपवाद सोडला, तर अन्य स्त्री-व्यक्तिरेखा ह्या अत्यंत दुय्यम व नगण्य वाटतात. एकनाथची पत्नी अलका, अलकाची बहीण जया, एकनाथची बहीण मंगलअक्का, ममता वारे, मुक्ता, गुंफामामी, भामाबाई आणि ध्रुपदाबाई अशा स्त्री-व्यक्तिरेखा पराधीन, दुबळ्या आणि लक्षात न राहणाऱ्या ठरल्या आहेत. लेखकाने ग्रामीण स्त्रीचे समग्र चित्रण केलेले दिसत नाही, ही बारोमासमधील फार मोठी उणीव आहे. बारोमास मध्ये अनेक व्यक्तिरेखा आणि प्रसंगांची गर्दी आहे, ह्या गर्दीमध्ये सर्वच व्यक्तिरेखांचा चेहरा हरवलेला दिसतो.''[४४] 'बारोमास' या कादंबरीतील कथानायकाची पत्नी अलका ही आहे. लग्नापूर्वी सर्व सोयींनी युक्त अशा कुटुंबात राहिलेली अलका लग्नानंतर थोडे दिवस आपल्या सुशिक्षित बेकार नवऱ्यासोबत हालाकीत राहिली पण नंतर मात्र माहेरी निघून गेली ती पुन्हा आलीच नाही. पोटाला चिमटा घेऊन मुलांना वाढवणारी एकनाथची आई शेवंतामाय ही शेतकरी कुटुंबातील कष्टाळू स्त्री म्हणून लेखकाने साकार केलेली आहे. एकनाथच्या घराशेजारी

राहणारी ममता वारे ही शिक्षिका स्वतंत्र विचार करणारी वाटली. अशा प्रकारे या तीन प्रमुख स्त्री व्यक्तीरेखा वेगवेगळ्या स्वभावाच्या होत्या.

### १.२.१३. भूमी :

#### मैथिली :

आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीतील 'मैथिली' ही प्रमुख व्यक्तिरेखा होय. मैथिलीच्या बालपणापासून ते तिच्या प्रौढत्वाच्या कालखंडापर्यंतचा जीवनप्रवास लेखिकेने रेखाटला आहे. एका अनाथ/पोरक्या, हट्टी मुलीचे एका बुद्धीमान समजस, प्रचंड आत्मविश्वासाच्या जोरावर आयुष्याला समजून घेणाऱ्या प्रगल्भ स्त्रीमध्ये रुपांतर होते. मैथिलीचे बालपण मद्रास शहराजवळील कडलूर या समुद्रकिनार पट्टी लाभलेल्या गावात गेले. आशा बगेंच्या भूमीतील मैथिलीबद्दल डॉ. अरूंधती वैद्य म्हणतात, ''भूमी ही कादंबरी म्हणजे एका पोरक्या पण मनस्वी आणि जीवनाच्या प्रवासात स्वयंसिद्धा ठरलेल्या मुलीची ही कहानी आहे. वस्तूतः या कहानीला रूढार्थाने कथानक नाही. ते एका आत्ममग्न स्त्रीचे, तिच्या परीने तिच्या अस्तित्वासाठी संघर्ष असणारे एक जीवनायन आहे. लेखिका म्हणते त्याप्रमाणे, मद्रासजवळच्या गावात समुद्र किनाऱ्यावर गुडघ्यात मान घालून बसलेल्या एका मुलीची ही कथा आहे. त्या पोरक्या मुलीच्या आयुष्याचा आणि तिच्या जडणघडणीचा वेध घेणे. ही या कादंबरीची प्रेरणा आहे. तिच्या आयुष्याचा शोध घेताना लेखिकेच्या वास्तवातील तसेच कल्पनेतील अनेक व्यक्ती यामध्ये येत गेल्या आणि त्यांच्यामध्ये घडणाऱ्या अनेक घटनाप्रसंगांमधून, भावनिक गुंतागुंतीतून आणि आंतरिक संघर्षातून हे कथानक आकारत गेले आहे.''[४५] हे भूमी या कादंबरीत वेळोवेळी पटते.

मैथिलीचे वडील तिच्या बालपणीच वारले. म्हणजे तिला ते कसे होते, हे देखील आठवत नाही. थोड्याच दिवसात किडनीत बिघाड झाल्यामुळे मैथिलीच्या आईचे कृपाछत्रही हरवले. या पोरक्या झालेल्या मैथिलीला तिच्या आत्याने मुंबईला नेले. त्या आत्याला तिच्या कुटुंबातील व्यक्तिंकडून विरोध झाला. आत्याकडे राहून तिने आपले शिक्षण पूर्ण केले. त्या कालावधीत तिला ज्या मित्र-मैत्रिणींची सोबत मिळाली. त्या विषयीचा कडू-गोड अनुभवांचा उल्लेख लेखिकेने केला आहे. त्यातील तिचा प्रियकर मिलींद जोशी याची मैथिलीशी विवाह करण्याची प्रबळ इच्छा होती व मैथिली देखील मिलींदच्या प्रेमात पडली होती पण केवळ मैथिलीच्या आई-वडिलांचा आंतरधर्मीय विवाह झाल्यामुळे मैथिलीला मिलिंदच्या आईने नकार दिला. कादंबरीत ही उल्लेखलेली घटना मनाला उद्विग्न करून जाते. बिचाऱ्या मैथिलीचा काहीही दोष नसताना तिला

तिच्या प्रेमाला मुकावे लागले. ''मिलींदने पसंत केलेली मुलगी स्कॉलर, गोरी, उंच, स्मार्ट, देखणी आणि त्याला जोडून गुणीसुद्धा ! कशात मिलींदला नि तिला रस होता? त्या नाटकात नाही, शिक्षणात नाही, तर घरकामात. घरातलं सगळं बघते. आत्याचा उजवा हात. लहानपणापासून कामाची सवय. आई सततच आजारी नं!''(पृ.८०) कुटुंब व्यवस्थेत आंतरधर्मीय व आतंरजातीय विवाहाला समाज लवकर स्वीकारायला तयार होत नाही. स्वीकार झालाय तर त्याच्या परिणाम मुलांच्या जीवनावर होतो.

मैथिलीच्या वरील वर्णनावरून असे लक्षात येते की, मैथिली सर्व गुण संपन्न होती. पण तरीही तिला मिलींदच्या आईने सून म्हणून नाकारले. कारण आंतरधर्मीय विवाह समाजाच्या पचणी पडलेला नव्हता. पुढे देवस्थळीबाईंकडे काम करता करता देवस्थळी बाईंच्या मृत्युनंतर दांडेकर यांनी सुचविलेले स्थळ म्हणजे देवस्थळीबाईंचा मुलगा शंतनू, की जो कोणत्याच दृष्टिकोनातून मैथिलीच्या योग्यतेचा नव्हता. तरीही शंतनूशी तिने विवाहाचा निर्णय घेतला. ह्या तिच्या निर्णयाने वाचक विमनस्क होतो असे वाटते. शंतनूने तिला पत्नीचा दर्जा दिला नाही. मैथिली आणि शंतनू यांचे वैवाहिक जीवन हे फारसे नांदा सौख्यभरे असे नव्हते. दोन्हीही परस्पर विरोधी व्यक्तिमत्त्व होती. तरीही मैथिलीने पत्नी धर्म निभवला. अंशुमन सारख्या सुंदर आणि गोंडस मुलाला तिने जन्म दिला. अंशुमन मोठा झाल्यावर त्यालाही शंतनू बद्दल सहानुभूती होती. मैथिली तिच्या वैयक्तिक जीवनात यशस्वी होता. याउलट शंतनू त्याच्या वैयक्तिक जीवनात असफल होता. त्यामुळे साहजिकच शंतनू आणि अंशुमन नात्याने मैथिलीपासून दुरावत गेले.

अशा प्रकारे मैथिलीच्या आत्याचा अपवाद वगळता मैथिलीला तिच्या कौटुंबिक जीवनात कुणाचेही प्रेम मिळाले नाही आणि म्हणूनच की काय आनंद शोधण्यासाठी वाचनाची आवड असलेल्या मैथिलीने एम.ए.(इंग्रजी) तसेच पीएच.डी पर्यंतचे शिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. तिने लहान मुलांसाठी लेखनही केले होते. मद्रास, बँगलोर या ठिकाणी तिने प्राध्यापिका म्हणून ही नोकरी केली. मुलगा व पती यांच्यापासून दूर गेलेली मैथिली अंशुमन आपल्या पत्नीसोबत गेल्यानंतर पुन्हा पती सोबत राहिली. स्वभूमी पासून दूर गेलेली मैथिली पुन्हा त्याच्या पडत्या काळात त्याची साथी बनली. मैथिली हे रामायणातील नाव आहे. उषा वि. चौघुले मैथिलीच्या व्यक्तिमत्त्वाचे वर्णन करताना रामायणातील नावाशी साधर्म्य बाळगून म्हणतात, ''वाल्मिकींनी जिला मर्यादा पुरूषोत्तम रामाच्या पुरूषी संकुचित दृष्टीतून चित्रित केली. त्या मर्यादेत ही आधुनिक मैथिली अडकून राहत नाही. परिस्थितीचा माणसांचा शोध घेता घेता ती स्वतःचाही शोध घेते. हा

शोध घेत असताना ती परंपरेशी असलेली स्वतःची नाळ तुटू देत नाही. परंपरा स्वीकृतीतून आधुनिक विचारसरणीला सामोरे जाता येते. हे आपल्या कृतीने व कर्तृत्वाने ती सिद्ध करून दाखविते.''[४६] आणि म्हणूनच शेवटी एकाकी पडलेल्या नवऱ्याला साथ देण्यासाठी पुन्हा त्याच्याबरोबर एकत्र राहण्याचा निर्णय घेते.

मैथिलीचे राहणीमान साधी राहणी आणि उच्च विचारसरणी असे तिच्या बाबतीत म्हणता येईल. नटणे-थटणे, दाग-दागिने, भारी साड्या, मेकअप ह्या सर्वसामान्य स्त्री ला आकर्षिक करणाऱ्या गोष्टींपासून मैथिली अलिप्त राहते. घरातही तिला महागड्या वस्तू असाव्यातच असे वाटत नाहीत. बँगलोरमधले मैथिलीचे घर हे फार साधे होते. गरजेपुरत्याच वस्तू तिच्या घरात होत्या या सर्व भौतिक सुखाची तिला लालसा नव्हती.

मैथिलीच्या स्वभावाचा विचार केला तर ती स्वाभिमानाने जगणारी वाटली. कितीही संकटे आली. तरी तिने लाचारी पत्करली नाही. त्यामुळे ती देवस्थळेबाईंशी जुळवून घेऊ शकली नाही. देवस्थळे बाईंकडे ती कामाला आली. तेव्हा शंतनूने तिचा 'नवी कामवाला' असा केलेला उल्लेख तिला खटकला. तेव्हा ती रागाने म्हणाली, 'मी कामवाली नाही. बाईंना गरज होती म्हणून आठवड्यातून एक-दोनदा...'(पृ.५९) महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना. मैथिली नाटकांत उत्कृष्ट भूमिका करीत होती. तिचा मित्र चेतनने हॅम्लेटमध्ये ऑफीलियाची म्हणजे हॅम्लेटच्या प्रेयसीची भूमिका करण्याचा आग्रह केला. तेव्हा मैथिली म्हणाली, 'मला नाही कुणाची प्रेयसीबियसी व्हायचं कुणाची कोण म्हणजे दुय्यम भूमिका. मला ते कुणी तरीच असायला आवडेल. ज्याचे संदर्भ सततच इतरांना असतील.'(पृ.६७) म्हणजेच नाटकातही तिला प्रमुख भूमिका हवी होती.

लेखिका आशा बगे यांनी 'भूमी' या कादंबरीत व्यक्त केलेली मैथिली ही आधुनिक स्त्रीशी नाते सांगणारी आहे. स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेली आपल्या शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात ती यशस्वी झाली. पण कुटुंबात मात्र ती स्वतःचे स्थान मिळवू शकली नाही. कुटुंबातील व्यक्तिंकडून सर्वसामान्य स्त्रीकडून जी अपेक्षा व्यक्त केली जाते ती मैथिली पुर्ण करू शकली नाही. याची खंत वाचकाला वाटते. पोरकी मुलगी शेवटी पती व मुलगा यांच्यासोबतही प्रेमाची आस पुर्ण करू शकली नाही. ह्या गोष्टीची मनाला खंत लागून राहते. मैथिलीला आयुष्यात कुटुंबाकडून जे प्रेम मिळायला पाहिजे होते ते लग्नाच्या अगोदर व लग्नानंतरही मिळू शकत नाही ही तिच्या वाट्याला आलेली एक शोकात्मिकाच आहे.

**मैथिलीची आई :**

'भूमी' ह्या कादंबरीतील नायिकेच्या आईचे व्यक्तिचित्र म्हणजे थोड्याच कालावधीचे आहे. कारण तिच्या किडनीत बिघाड झाल्यामुळे तिचा मैथिली लहान असतानाच मृत्यू झाला. मैथिलीचे वडील डॉ. विश्राम हुद्दार सर्जन होते. मैथिलीच्या आई तमिळी ख्रिश्चन होती व वडील हिंदू धर्मीय होते. मैथिलीची आई-वडिलांचा आंतरधर्मीय विवाह झाला होता. मैथिलीच्या वडिलांनी त्यांचे मित्र डॉ. चित्तरंजन यांच्या मुलाचे ऑपरेशन केले. पण त्या दरम्यान तो मुलगा गेला. चित्तरंजनने त्यांच्यावर केस लावली. वडील केस जिंकले पण त्यानंतर ते हताश झाले. त्यांनी नोकरी सोडली. त्यानंतर मैथिलीची आई त्यांना तेथून घेऊन आली.(पृ.९) आंतरधर्मीय विवाह असल्यामुळे त्यांच्याकडे कोणीही नातेवाईक येत जात नसावा. डॉ. चित्तरंजन यांचा मुलगा आपल्या हातून गेला याचे तिच्या वडिलांना वैशम्य वाटत होते आणि त्यातच ते मनाने खचले व शेवटी तेही नंतर जग सोडून गेले.

मैथिलीची आई आणि मैथिली यांचा आधार गेला. थोड्याच दिवसात मैथिलीच्या आईने मैथिलीच्या शाळेतले एक शिक्षक मॅथ्युज टीचर यांच्याशी मैत्री केली. ते दररोज संध्याकाळी मैथिलीच्या घरी येत होते. मैथिलीची आई व मॅथ्युजटीचर यांच्यातील नात्याला नाव नव्हतं पण शेजारी असलेल्या पट्टूच्या आईच्या वक्त्यव्यावरून ते नातं बदनाम होते. असे वाटते. कारण मैथिली दररोज साडेसात पर्यंत समुद्रावर खेळायची. कारण साडेसात पर्यंत मॅथ्युज टिचर मैथिलीच्या घरी असायचे. तेव्हा तिच्या जवळ राहणाऱ्या पुट्टूची आई मैथिली वर ओरडली, 'साडेसात वाजले नाहीत का तुझे? तो मास्तरडा बसला असेल नं अजून!'(पृ.२) म्हणजेच म्यॅथ्युज व मैथिली यांच्यातील नात्याची बदनामीकारक प्रसिद्धी झाली हे दिसते.

मैथिलीच्या आईच्या किडनीत बिघाड झाला. त्यामुळे तिला वरचेवर हॉस्पिटलला जावे लागत होते. मॅथ्युज टिचर बरोबर ती मद्रासच्या हॉस्पिटलमध्ये गेली. तिथे ती ॲडमिट झाली. तिला तिचा अंत समोर दिसू लागला होता आणि आपण गेल्यानंतर मैथिलीला कोण सांभाळणार याची चिंता तिला सतावू लागली होती. आपल्या मृत्यूनंतर मॅथ्युज अंकलने तिला सांभाळावे अशी तिची अपेक्षा तिने मॅथ्यूज जवळ व्यक्त केली. पण त्यानंतर मॅथ्युज तिला हॉस्पिटलमध्ये भेटायला यायचे टाळतात. हॉस्पिटलमध्ये असतानाच तिने डॉक्टर अंकल, मुंबईची मैथिलीची आत्या आणि तिची मोठी बहीण म्हणजे, मैथिलीची मावशी अशा तिघांना पत्र लिहिली. पण कोणीच तिच्या पत्रांना उत्तर दिले नाही.(पृ.२२)

मैथिलीच्या चिंतेतच तिचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. मृत्यूनंतर तिच्या आईला जाळायचे की, पुरायचे असा संभ्रम निर्माण झाला. कारण ती तामीळी ख्रिश्चन व पती हिंदू धर्माचे. पतीचे नाव लावत होती. पण ती देवळात कधीही गेली नाही. तिने धर्मांतर केले नाही. ती चर्चमध्ये जाऊन कँडल लावायची.

अशा प्रकारे लेखिकेने मैथिलीच्या आईचे व्यक्तिचित्र रेखाटले आहे. तिला आंतरधर्मीय विवाहामुळे कोणत्याही नातेवाईकांची मदत मिळत नाही. पतीची शेवटपर्यंत साथ मिळत नाही. ज्या मॅथ्युज टिचरला आधार मिळावा म्हणून जवळ केले. शेवटच्या क्षणी त्यानेही साथ सोडली. त्यातच किडनीच्या विकाराने ग्रासले आपल्या मुलीला आपल्यानंतर कोण सांभाळील. या काळजीतच तिचा अंत झाला. दुर्दैवाने संकटाने जिची साथ सोडली नाही. अशा मैथिलीच्या दुर्दैवी आईचे व्यक्तित्व लेखिकेने आपल्या समोर मांडले आहे.

**देवस्थळेबाई :**

मैथिलीच्या जीवनात न कळत प्रवेश केलेल्या देवस्थळी ह्या सुरूवातीला मैथिलीशी अतिशय तिरसटपणे वागल्या. पण हळूहळू त्या तिच्याशी प्रेमाने वागू लागल्या होत्या. पुस्तक प्रेमी पती, त्यांना पत्नी व मुलगा यांच्यापेक्षा जास्त पुस्तके प्रिय होती आणि म्हणूनच त्यांना पुस्तकांचा फार राग यायचा. म्हणूनच देवस्थळेबाई म्हणतात, 'I Hate, Those Books! ती फक्त त्यांची होती.'(पृ.६५) देवस्थळींची बरीचशी पुस्तके वाचनालयाला व उरलेली त्यांनी मैथिलीला देऊन टाकली.

देवस्थळेबाई बँकेत होत्या. त्याच बँकेत सदानंद दांडेकरही होते. नकळत देवस्थळेबाई व दांडेकर यांच्यात संबंध निर्माण झाले. शंतनू हा देवस्थळेबाईंचा मुलगा. शंतनू नंतर बाई गरोदर होत्या. तेव्हा दांडेकरने हे मूल त्याचे आहे. असे सांगितल. वास्तविक ते त्याचे नव्हते आणि ह्या गोष्टीमुळे देवस्थळे बाई आणि शंतनूचे वडील एकमेकांपासून दूर गेले.(पृ.८९) म्हणजे दांडेकरने देवस्थळे बाईंच्या कुटुंबात वाद निर्माण केले होते.

देवस्थळेबाई पतीचे प्रेम मिळवू शकल्या नाहीत. मुलगा शंतनू व बाईचे ही कधी पटले नाही. दांडेकरांनी ही त्यांचा फक्त स्वतःचा स्वार्थ साधला. प्रा. देवस्थळे यांचे निधन झाले व शंतनू नोकरी निमित्त मद्रासला गेला. त्यामुळे देवस्थळेबाई घरात एकाकी जीवन जगू लागल्या. त्यातच वय झाल्यामुळे त्यांना घरातले कामही करता येत नव्हते. त्यामुळे घरात कामवाली ठेवावी लागत असे आणि घरात काम करण्यासाठी म्हणूनच मैथिली त्यांच्या घरी जायची. देवस्थळे बाईंनी

स्वतःला नेहमी नशेत ठेवण्याचा प्रयत्न केला. मैत्रिणींबरोबर रमी खेळणे. ड्रिंक्स घेणे. यात गुंतून घेतले. त्यांच्यातल स्त्रीपण त्यांनी जपलं शंतनूच्या स्वभावामुळे त्यांनी मैथिलला शंतनूशी लग्नाच कधी साध सुचवलही नाही. 'दोघीत एक वेगळंच नातं रूजल'(पृ.११३) म्हणून बाईंची निधनवार्ता कळल्यानंतर तिचे पाय त्यांच्या फ्लॅटकडे वळले.

मैथिली देवस्थळेबाईंविषयी शंतनूकडे मत व्यक्त करताना म्हणते, ''काही माणसं आपल्या न कळतच आपल्याकरता असतात. नेहमी तशा देवस्थळेबाई होत्या. मी सहासहा महिने येत ही नव्हते, तरीही पण आले की त्या आणि हे घर असायचं माझ्याकरता.''(पृ.१०९) एकंदर विचार केला तर देवस्थळेबाई आणि मैथिली यांच्यात एक साम्य होते. ते म्हणजे त्या नेहमी इतरांच्या प्रेमापासून उपेक्षित राहिल्या. देवस्थळेबाईंना मैथिलीचा भुतकाळ कळल्यानंतर त्यांना मैथिलीविषयी कणव निर्माण झाला. मैथिली ही एक चांगली मुलगी आहे. आपल्या मुलाला योग्य आहे. पण त्यांना आपल्या मुलापेक्षा मैथिलीची काळजी वाटली. कारण त्यांना शंतनूचा स्वभाव माहीत होता. शंतनूकडून मैथिलीला प्रेम मिळणार नाही या जाणीवेने त्यांनी मैथिलीकडे लग्नाचा विषय कधीच काढला नाही. कारण प्रा.  देवस्थळेंनी त्यांना कधीही भरभरून प्रेम दिले नाही आणि त्यांचाच मुलगा शंतनू मैथिलीबरोबर तसाच वागेन ही त्यांना खंत होती.

**मैथिलीची आत्या :**

मैथिलीची आत्या सुज्ञ विचारांची होती. मुलींनी शिकून स्वतःच्या पायावर उभे राहिले पाहिजे. अस वाटणारी मैथिलीवर अतिशय प्रेम असलेली स्त्री होती. आत्याचा मॅट्रिकनंतर माँटेसरीचा कोर्स झालेला होता. लग्नाआधी नोकरी ही करत होती. आत्या मोठी त्यानंतर झालेली भावंड जगलीच नाहीत. सगळ्यात लहान विश्राम म्हणजे मैथिलीचे वडील.(पृ.४६)

मैथिलीच्या आईच्या मृत्यूनंतर आत्याने मैथिलीला मुंबईला नेले. गोपाळराव म्हणजे आत्याचा नवरा व आत्याचा मुलगा संजू यांना ते आवडलं नाही. मैथिलीने खूप शिकाव अशी तिची इच्छा होती. मैथिलीच्या यश-अपयशात तिने मैथिलीला खंबीरपणे आधार दिला.

मैथिलीने शंतनूशी लग्न करायचे ठरवले. तेव्हा आत्याला तिचा तो निर्णय धाडसाचा वाटतो. मुलगी मुलापेक्षा लहान असावी असं ठरवलं त्याच कारण मुलगी लहान असली की त्यांच्या सेवेला बरी असेच हिशेब असतील.(पृ.११३) असे मत आत्या व्यक्त करते. यावरून तिची विचार करण्याची पद्धत सर्वसामान्याहून वेगळी आहे असे वाटते. तिची मतं ही आदर्श होती. तिनेच मैथिलीला सन्मान शिकवला. 'आजूबाजूच्या खोट्या-खऱ्याच्या अगणित मिश्रणांतली ही

अत्यंत खरी अशी बाई'(पृ.२४९) असा उल्लेख लेखिकेने केला आहे. आत्या अंशुमनच्या जन्मानंतर मैथिलीकडे मद्रासला जाते. तेव्हा मैथिलीच्या घरातील तणावपूर्ण वातावरणाला मैथिलीही काही प्रमाणात जबाबदार आहे. असे आत्या स्पष्टपणे तिला सांगते. शंतनूचा स्वभाव ही जबाबदार आहे असे मैथिली सांगते. होईल शंतनूतही बदल होईल असे सांगते आणि नाहीच बदलला तर, 'आपण बदलून पाहायचं! दरवाजा ठेंगणा असला तर आपणच वाकून नाही का जात, मैथिली!'(पृ.१३०) शंतनूत बदल झाला नाही तर, मैथिलीने आपल्या बदल करून घ्यावा असे काहिसे आत्याला सुचवायचे होते. जानकी आंटी प्रेमळ स्वभावाची होती.

**गौण पात्रे :**

**जानकी आंटी :**

मैथिलीची आई हॉस्पिटलमध्ये असताना जानकी आंटीने मैथिलीला डबा करून दिला. जानकी आंटी मैथिलीची नातेवाईक नव्हती. फक्त शेजारी की, जिला तिच्या घरात कोणतेही निर्णय घेण्याची परवानगी नसताना तिने मैथिलीच्या आईच्या मृत्यूनंतर तिला सांभाळण्याची जबाबदारी स्वीकारून खरा शेजार धर्म दाखविला होता.

**स्वामीनाथनची पत्नी :**

स्वामीनाथन यांचे कुटुंबही मैथिलीच्या शेजारी राहायला होते. स्वामीनाथन, त्यांची पत्नी, नोकर आणि त्यांचा टॉमी नावाचा कुत्रा असे त्यांचे कुटुंब होते. टॉमी समुद्रात वाहून गेला. त्यावेळी खेळताना शेवटचा चेंडू मैथिलीने टाकला व तो चेंडू आणण्यासाठी टॉमी गेला नाही व परत आलाच नाही. पण जेव्हा मैथिली आणि त्यांची भेट झाली. तेव्हा त्या मैथिलीवर रागावल्या नाही. उलट तिला नारळाची वडी खायला दिली.

**बिना :**

बिना मैथिलीच्या आत्याची मुलगी होती. ती टेलिफोन एक्सचेंजमध्ये सर्व्हिस करते. छोट्या गुड्डीला म्हणजे तिच्या मुलीला आत्याजवळ ठेऊन जायची व संध्याकाळी घ्यायला यायची. ती आली की मैथिलीला चांगल वाटायचं.

**मिसेस पद्मनाभन :**

डॉ. पद्मनाभन यांच्या पत्नीचे नाव वरदलक्ष्मी होते. त्यांना माईल्ड पॅरिलिटिक ॲटक आला होता. त्यांची उजवी बाजू अधू होती. पण मैथिलीशी गप्पा मारताना स्वतःच्या दुखण्याचा

आजाराचा कुठेही उल्लेख केला नाही. घरेलू दिसत असल्या तरी त्यांनी बरच वाचलेले होतं असं वाटते.

**धर्मराजन बाई :**

मैथिली व शंतनू लग्नानंतर मद्रासला राहायला आले. ते ज्या घरात राहायचे त्या घराच्या मालकीण धर्मराजन बाई होत्या, त्यांचा मुलगा अमेरिकेला होता. आपल्या अवतीभवती असलेल्या लोकांना आपल्याकडे पाहून आनंद वाटावा. म्हणून त्या नेहमी घरातही नटून थटून राहत.(पृ.११९) त्याचे पती त्यांना प्रेमाने चिनू म्हणत. पती-पत्नीचे एकमेकांवर अतिशय प्रेम होते. ही एक आदर्श जोडी वाटते.

**सुभद्रा जोशी :**

मैथिली नोकरी निमित्त बंगलोरला राहायला गेली तेव्हा तिथे तिला सुभद्रा जोशी नावाची मैत्रिण मिळाली. या नव्या शहरात मैथिलीची पहिली ओळख सुभद्रा बरोबर झाली. सुभद्रा ही अविवाहित होती, डॉ. सुधीर हे सुभद्रा जोशीचे सहकारी होते. सुभद्रा, सुधीर व मैथिली यांच्यात जवळीक साधण्याचे सुभद्रा दुखावली गेली. सुभद्रा व सुधीर यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला पण थोड्यात काळात त्यांनी विवाह न करण्याचा निर्णय घेतला. यावरुन सुभद्रा चंचल विचारसरणीची होती. ती तिच्या मतावर ठाम राहत नाही, असे दिसते.

**वासुकी :**

मैथिली जेव्हा बेंगलोरला गेली, तेव्हा ती ज्या घरात राहत होती त्या घराची वासुकी घरमालकीण होती. वासुकीची आई तिच्या लहानपणीच वारली होती. दोन, ही मुलं व वासुकी मद्रासला राहत होते. वासुकीने पळून जाऊन लग्न केले तिचा नवरा दुबईला होता. वासुकी तिच्या मुलांना व सासुला घेऊन बंगलोरमध्ये राहत होती. पळून जाऊन लग्न केल्याने वासुकीला माहेर तुटले होते. वासुकी ही साधी मुलगी होती, तिला नवनवीन पदार्थ करण्याची व खाऊ घालण्याची हौस होती. ती नवीन पदार्थ केला की मैथिलीला आणून द्यायची वासूकी सारख्या गौण पात्राचा उल्लख करण्याचे कारण म्हणजे मैथिलीला असे वाटले,'वासुकी सारखी पत्नी शतनूला मिळायला हवी होती.' एक कुटुंबवत्सल स्त्री म्हणून लेखिका वासुकीच्या व्यक्तिमत्त्वाकडे पाहतात.

**कीर्ती :**

कीर्ती मैथिलीची मैत्रिण होती. मैथिली आणि कीर्ती जोशी यांनी मिळून हॅम्लेटमधले काही प्रवेश सादर केले. मिलिंद हा कीर्तीचा भाऊ होता. तो ही नाटकाच्या तालमीनंतर मैथिलीला घरी

सोडवायचा. मिलिंद व मैथिली यांनी एकत्र यावे यासाठी कीर्ती प्रयत्न करीत होती. त्या दोघांचं लग्न व्हाव असे कीर्तीला वाटत होते. पण तिच्या आईने त्यांच्या लग्नाला विरोध दर्शविल्यामुळे मिलिंद व मैथिलीचे लग्न होऊ शकले नाही. थोड्याच दिवसात कीर्तीचे लग्न झाले. तिचे पती डॉक्टर होता. एम.एस.करत होता. कीर्तीचे सासू-सासरे ही डॉक्टर होते त्यांच स्वतःच नर्सिंग होम होत. कीर्ती लग्न होऊन बडोद्याला राहायला गेली. कीर्ती जेव्हा बाळांतपणासाठी माहेरी आली तेव्हा तिची आणि मैथिलीची भेट झाली तेव्हा तिने मैथिलीला सांगितले. तिच्या सासरच्या मंडळींना फक्त घर सांभाळणारी मुलगीच सून म्हणून हवी होती, नॉन-मेडिको, सासू-सासरे व नवरा डॉक्टर असल्याने तिघेही सतत हॉस्पिटलमध्ये असतात व तिला एकटीला घरी एकाकी वाटतं.

मैथिली आणि कीर्ती यांची पुन्हा भेट झाली ती खूप वर्षांनी तेव्हा 'ती स्वतंत्र फ्लॅट घेऊन राहत होती- एकटीच मुलीचं लग्न झालं होतं.'(पृ.२५१) म्हणजेच कीर्तीला तिच्या सासरच्या मंडळींनी जुळवून घेतले नाही. डॉक्टरांनी म्हणजे कीर्तीच्या नवऱ्याने दुसरे लग्न केले होते. कीर्तीला लग्नानंतर ऐश्वर्य मिळाले पण कुटुंबात आदराचे स्थान मात्र मिळाले नाही. कुटुंबातील अवहेलनेला झुगारुन स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व जोपासण्याचा निर्णय घेऊन तिने वेगळा आदर्श निर्माण केला.

**नीरजा :**

अंशुमनने पसंत केलेली मुलगी ती आर्किटेक्ट होती. नीरजा तामिळीयन होती. सावळी आणि लोभस होती. नीरजाने मैथिलीची पुस्तकं वाचली होती. अंशुमनने मुंबईला जॉब घेतला होता. नीरजाला घेऊन मुंबईला जाण्याचा निर्णय घेतला आणि वडिलांजवळ आईने राहायला यावे म्हणून त्याने आईला विनविले. लग्नानंतर पतीबरोबर स्वतंत्र संसार थाटणारी नीरजा स्वार्थी वृत्तीची वाटली.

**बालव्यक्तिचित्रण :**

**लली :**

लली ही सुधीर यांची मुलगी, तिची आई म्हणजे सुधीर यांची पत्नी या जगात नव्हती. लली ही बारा तेरा वर्षांची मुलगी मोठाले डोळे, हातापायाच्या काड्या, त्या मानानं डोक बेढब मोठं होतं. तिची मान, हनुवटीला चिकटलेली होती ती कमालीची अशक्त होती. मैथिलीने तिला पाहिले तेव्हा मैथिली सुन्न झाली. थोडक्यात लली ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या विकलांग मुलगी होती. मैथिलीचे सुधीरच्या घरी वारंवार येण्याने लली खूश होत असे मैथिली ललीची

प्रेमळपणाने काळजी घेत होती. ललीनं ‘कुणी ठेवला नाही असा विश्वास ठेवला. अगदी आतड्यातून विश्वास! तान्हं मूल ज्या नितान्त विश्वासनं आईचं पोट कुस्करतं, पदर धरुन ठेवून गाढ झोपी जातं, तो चिमुकला सुंदर विश्वास...’(पृ.२४८) ललीला कॅसेट लावून दिली की तिला गाणी ऐकण्याचा आवड होती. लली थोड्याच दिवसात देवा घरी गेली ललीसारख्या मुलीचा सांभाळ करणे तसे सोपे नव्हते आणि म्हणूनच लली हे जग सोडून गेली तेव्हा सुधीर यांची आई म्हणाली, ‘‘सुटला बिचारा! फार भोगलं.’’(पृ.२५४) लली विषयी मैथिलीला प्रेम होते. ललीचा ही मैथलीवर जीव व विश्वास होता. घरातले सगळेजण तिची काळजी घेंत होते.

अशा प्रकारे ‘भूमी’ या कादंबरीमध्ये लेखिका आशा बगे यांनी ‘मैथिली’ ही कादंबरी नायिका रेखाटली आहे, मैथिली सारख्या हुशार, देखण्या. स्त्रिची तिच्या आयुष्यात होणारी वाताहत कथन केलेली आहे. आईचा आंतरधर्मिय विवाह त्यामुळे तिला तिच्या प्रेमाला मुकावे लागले. तिची आत्या जे विचार मांडते तो असा. लग्नसमयी स्त्री लहान व पुरुष वयाने मोठा असतो याचे कारण तिला नवऱ्याची अखंडपणे सेवा करता यावी असा समजाचा स्वार्थी दृष्टिकोन. देवस्थळेबाई सारखी स्त्री पती वाचनाची आवड असलेला सतत न कळत देवस्थळेबाईंकडे त्यांचे दुर्लक्ष आणि त्यांचे सदानंद दांडेकर सोबत राहणे ड्रिंक्स घेणे. मैथिली बरोबर शंतनूचा विवाह लाऊन दिल्यानंतर शंतून मैथिलीबरोबर चांगला वागेल का? या त्यांच्या काळजीतून त्यांना मैथिली एक स्त्री म्हणून तिच्या विषयी असलेला आपलेपणा स्पष्ट होतो. जानकी आंटी, स्वामीनाथनची पत्नी, मिसेस पद्मनाभन, धर्मराजनबाई, वासुकी या कुटुंबवत्सल स्त्रिया तसेच कीर्ती सारखी मैत्रिण सुशिक्षित सुविद्य पण तिने फक्त पती, सासू, सासरे, यांची सेवाच करावी कारण ते तिघे ही डॉक्टर असल्याने त्यांना कीर्तीने गृहिणी म्हणून आपली कर्तव्य पार पाडावीत अशी अपेक्षा वाटते. सुभद्रा जोशी ही मैथिलीची मैत्रिण ती अविवाहित राहिली का? ते याचे कारण उमगले नाही. सुशिक्षित असलेली मैथिलीची सून नीरजा. अशा प्रकारे ‘भूमी’ या कादंबरीत लेखिकेने वेगवेगळ्या स्वभावाच्या विविध कौटुंबिक समस्यांना एकाकीपणे तोंड देणाऱ्या, तसेच आपला पती, आपले कुटुंब यालाच सर्वस्व मानणाऱ्या स्त्रियांचा जीवनपट कादंबरीत मांडला आहे.

**१.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : सुमाधुरी (माधुरी), सुमाधुरीची आई, सुबोधची आई, सुबोधची वैनी, सुमाधुरीची मैत्रीण यशोधरा, सुमाधुरीचे आज्जेसासू या व्यक्तिरेखा साकार केल्या आहेत.

मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबातील ह्या व्यक्तिरेखा साकार करताना लेखक आपणासमोर उच्चभ्रू वर्गाचे दाखले देतो.

**सुमाधुरी :**

सुमाधुरीची उंची पाच फूट चार इंच उंच होती. बळकट बांध्याची होती. गहूवर्णी होती. चालताना ताठ मानेने चालणारी.(पृ.१०) अमरावतीला बी.ए.चे शिक्षण पूर्ण करुन एम.ए.(मास कम्युनिकेशन) करण्यासाठी पुण्याला आलेली होती. तिच्या वडिलांनी पुण्याला एक फ्लॅट घेऊन ठेवला होता. तेथे ती राहत होती. सुमाधुरीला सिनेमा आणि दिग्दर्शनाची प्रचंड आवड होती. सुमाधुरी अतिशय संवेदनशील आहे. स्वतःच्या जीवनाकडे पाहण्याची एक वेगळीच मूल्यदृष्टी तिच्याकडे होती. सुमाधुरीला नवनिर्मितीचा व सर्जनशिलतेचा ध्यास होता. आपण काहीतरी वेगळे करुन दाखववे अशी तिची प्रबळ इच्छाशक्ती होता. तिचा आर्ट फिल्म काढण्याचा मनोदय निश्चित झालेला असतो. श्रीमंत मराठा कुटुंबातील सुमाधुरी ही स्वतंत्र विचारांची कास धरुन आपली जीवनशैली सुधारु इच्छित होती. सुमाधुरीचे विचार हे सर्जनशील होते.

माधुरीचे लग्न सुबोधशी होते. सुबोधचे कुटुंब हे उच्च मध्यमवर्गीय होते. माधुरीचे नाव लग्नानंतर सुमाधुरी ठेवले होते. सुमाधुरीला सिनेमाची आवड असते. सिनेमाबद्दल ती इत्यंभूत माहिती गोळा करते. सुमाधुरीवर आधुनिक मूल्ये आणि विचारांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. कुटुंबात सुमाधुरी सर्वात लहान असल्यामुळे तिला सगळयांना मान दयावा लागतो. घरात नवीन असल्यामुळे तेथील रितीभाती शिकून घ्याव्या लागत होत्या. सुबोध सुमाधुरीला बाहेर जाताना जीन्स घालण्यास परवानगी देतो. परंतु घरात असतांना असे कपडे घातलेले आजीला आवडणार नाहीत असेही तो आवर्जून सांगतो. कुटुंबव्यवस्थेला पारंपरिक संस्काराच्या प्रभावातून सर्व नातेसंबंध जोपासण्याचा हा प्रयत्न लेखक पती-पत्नीच्या माध्यमातून व्यक्त करतो. सुमाधुरीला आपले करियर घडवितांना, व्यक्ती म्हणून आपला आत्मविकास करताना नातेसंबंधाची जोपासना करावी लागते. नातेसंबंध जोपसण्याबरोबर आपला स्वतःचा विकास ही तेवढाच महत्त्वाचा तिला वाटतो. एकट्याने राहून विचार करणे ही व्यक्तिची नैसर्गिक प्रेरणा कुटुंबामध्ये पूर्ण होऊ शकत नाही, असे तिला वाटते.

सुमाधुरीवर पाश्चिमात्य संस्कृतीच्या विचारांची फार मोठी छाप पडलेली दिसते. पाश्चिमात्य संस्कृतीत सेक्सकडे सहजतेने पाहिले जाते. तेवढया सहजतेने आपल्याकडे बघितले जात नाही. म्हणूनच ती सुबोधला म्हणते, ‘‘कुटुंबव्यवस्थेत बेभान सेक्सला जागाच नसते, म्हणून

परदेशाचे हनीमून घेतलेय आपण. हनीमूनला जा न करा बेभानपणे सेक्स''(पृ.३३) या तिच्या परखड आणि सडेतोड विचारसरणीवरुन तिच्यावर पाश्चिमात्य चंगळवादी विचारांचा प्रभाव पडल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**गौण पात्रे :**

**सुमाधुरीची आई :**

सुमाधुरीची आई सावळया रंगाची, मध्यम उंचीची होती. दुसऱ्या बाळंतपणात तिचे पोट बरेच सुटल्यामुळे ती पोटावरुन भरपूर पदर लपेटून घेत होती. घराबाहेर पडताना (वावरताना) डोक्यावर पदर घेत होती. घरातील सगळे बघणे, सैंपाकपाणी, पाव्हण्यारावळयांचे करणे यात तिला खरोखर रस होता. कष्टाळू होती. आळस अजिबात नव्हता. धाकटी जाऊ आडमुठी होती. तिलाही अजिबात कुरकुर न करता सांभाळून घेते हे घरातील सर्वांना माहीत होते. नात्यातल्या कोणाच्याही अडचणीला ती उभी राहत होती. त्यामुळे तिला घरात व नात्यात मानाचे स्थान होते. माधुरी व वडिलांनाही तिचा अभिमान होता. माधुरीचे वडील तसेच माधुरीच्या आईची थोरली जाऊ देखील तिचा सल्ला, विचार मानत होती.

**यशोधरा :**

यशोधरा व माधुरी दोघी मैत्रिणी होत्या. दोघी एम.ए.(मास कम्युनिकेशन) करत होत्या. मुलीच्या शिक्षणाची ''परिस्थिती कुणी बदलली?''(पृ.६) या माधुरीच्या प्रश्नाचे उत्तर ती सविस्तरपणे स्वतः केलेल्या अभ्यासातून देते. ''कलकत्ता फिमेल ज्युव्हेनाईल सोसायटीने १८२० साली कलकत्त्याला बंगाली मुलींची शाळा काढली. ही हिंदी मुलींची भारतातली पहिली शाळा १८२१ मध्ये ब्रिटिश फॉरिन स्कूलतर्फे स्त्रीशिक्षण प्रसार करण्याच्या हेतूने मिस कुक इंग्लंडवरुन हिंदूस्थानात आल्या व त्यांनी कलकत्त्याला दुसरी मुलींची शाळा उघडली. अमेरिकेत मिशनरी सोसायटीने मुंबई शहरात १८२४ मध्ये मुंबई इलाख्यातील पहिली मुलींची शाळा उघडली. राजा राममोहन रॉय यांनी १८ व्या शतकाच्या शेवटी बंगालमध्ये सामाजिक सुधारणा व स्त्री शिक्षण ह्या बद्दल लोकांत जागृती उत्पन्न केली. महात्मा ज्योतिराव फुल्यांनी १८४८ मध्ये पुण्याला मुलींची शाळा काढली. १८८४ मध्ये पुण्याला पहिली मुलींची माध्यमिक शाळा सुरु झाली. १९५१ च्या घटना कायद्याने स्त्रीपुरुष समानता मान्य झाली. त्यामुळे स्त्रीशिक्षणाचा वेगळा असा प्रश्न राहयला

नाही.'' वरील सर्वांमुळे आपण आज शिकतो. महात्मा ज्योतिराव फुल्यांमुळे आपण शिकतोय हे माधुरीला पटले होते.

यशोधरेच्या घराण्यात शिकलेली पहिली व्यक्ती म्हणजे तीचे वडील होते. आजी–आजोबा निरक्षर होते. वडील एम.एस्सी. झाले होते. कर्मवीर भाऊराव पाटलांनी सातारला सायन्स कॉलेज काढले कमवा–शिका योजना काढली म्हणून यशोधरेचे वडील शिकले होते.

यशवंतराव चव्हाणांनी मराठा समाजाला खरी अस्मिता दिली. नेहरुंनी आधुनिकता आणली होती. राजीव गांधींनी आय.टी. व टी.व्ही. आणला. म्हणून आज माधुरी व यशोधरा एम.ए.(मास कम्युनिकेशन) करत होती. स्त्री शिक्षणाची सोय झाली. म्हणून यशोधरा उच्च शिक्षण घेऊ शकलेली आहे. स्त्री शिक्षण हे भारताच्या विकासाच्या व स्त्री उद्धाराचा महत्त्वाचा टप्पा वाटतो.

**सुबोधची आई :**

सुबोध सुमाधुरीला म्हणतो, 'माझी आई तशी गरीब आहे मनाने'(पृ.३१) तिच्याजवळ श्रद्धाशिलता होती. तिला सिनेमा पाहण्याची आवड होती. रोज ती पूर्ण सिनेमा पाहत होती. घरच्या सण समारंभाचा ती हिशोब मांडून ठेवत होती. योग्यवेळ साधून ती पंधरा दिवस उरळी कांचनला निसर्गोपचारासाठी जाऊन येते.

**सुबोधची वहिनी (सुमाधुरीची थोरली जाऊ) :**

सुबोधची वहिनी स्वयंपाकात अतिशय सुगरण होती. रेसिपीचा माहेरी असतानाच तिने कोर्स केलेला होता. ती हसरी होती. नेहमी जोक्स(विनोद) करत होती. तिचा स्वभाव विनोदी होता. तिला नीटनेटके राहायला व फॅशनेबल दिसायला आवडत होते. ती वरचेवर ब्यूटीपार्लरला जाऊन येत होती. सुबोधची वहिनी आधुनिक काळातील स्वभाव गुणधर्म व अंगी कौशल्य प्राप्त केलेली लेखकाने साकार केली आहे.

**सुबोधची आजी :**

जुन्या वळणाची व विचारांची सुबोधची आजी होती. कुटुंबव्यवस्थेच्या पारंपरिक चौकटीत वावरताना ती दिसते.

**कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू :**

'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीच्या प्रस्तुत भागात वनिता, हर्षदची आई, गौरी आत्या या स्त्री व्यक्तिमत्त्वांचे कुटुंबव्यवस्थेतील स्थान लेखक संघर्षमय पद्धतीने साकार करतो.

**वनिता :**

वनिता ही विलासची चुलत बहीण होती. एकत्र असणारे कुटुंब फुटले होते. त्यामुळे वनिता विलासच्या कुटुंबाशी निगडीत राहिली नव्हती. कॉलेजमध्ये मात्र विलास व हर्षद बरोबर तिची रोज भेट होत होती. वनिता जुनाट विचारांची नव्हती. ती सुंदर होती. हर्षदवर तिचे प्रेम होते. विलासला या विषयी संशयपण येत नसे. कारण तो भोळसट होता. वनिताची मावसबहीण कॅन्सरने तेवीसाव्या वर्षी वारली होती. विलास व परागचे कुटुंब वनिताच्या कुटुंबाला भेटले होते. विलास तर चार दिवस वनिताच्या घरी राहिला होता. वनिता म्हणाली होती, ''विलासची आई नालायक आहे. तिने आमचे कुटुंब फोडले''(पृ.११२) हर्षद म्हणतो, विलासची आई प्रेमळ आहे, मुद्दाम आपल्याला काय काय खायला देते. कुटुंब विभक्त झाल्यावर वनितावर फार मोठा आघात होतो. विलास आणि वनिता या बहीण भावंडांच्या हळवार नात्यालाही तडे जातात. हर्षदच्या घरचा प्रॉब्लेम सुटला. तेव्हा हर्षद रात्रंदिवस अभ्यास करण्याचे ठरवितो. त्यावेळी वनिताच्या घरात भांडणे सुरू झाली. घर फुटलं (विभक्त झाले). वनिताला खूप वाईट वाटते. ती चिडून म्हणते, ''विलासच्या नालायक आईने आमचे एकत्र कुटुंब फोडले. माझ्या आईने आणि वडिलांनी इतका त्याग करून आमचे कुटुंब एकत्र ठेवले होते. विलासच्या नालायक आईने कुटुंब फोडले.(पृ.११२) वनिता विलासच्या आईला दोष देते. एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला नावे ठेवण्याची कुटुंबातील ही प्रवृत्ती यातून दिसून येते.

**हर्षदची आई :**

हर्षदची आई कॉलेजमध्ये असताना इन्टरयुनिव्हर्सिटी टीममध्ये होती. क्रिकेट खेळायची, उत्तम बॉलर होती. हर्षदच्या घरी धुणं भांड्याला मोलकरीण होती. हर्षदचे आई वडील एकमेकांना नावाने हाक मारत होते. वडिलांचे नाव रघूवीर व आईचे नाव सुषमा होते. वडील हर्षदच्या आईला सुबू म्हणत व हर्षदची आई रघूवीर म्हणायची.

**गौरीआत्या :**

गौरीआत्या वनिताची मानलेली आत्या होती. वनिताच्या वडिलांना, दोन्ही काकांना बहीण नव्हती. म्हणजे वनिताच्या आजीला मुलगी नव्हती. म्हणून आज्जीने गौरीला मुलगी मानलेली होती. मुलगा हवा, मुलगीही हवी तेव्हाच कुटुंब पूर्ण होत. (पृ.७७) बहीण नसल्यास बहीण मानण्याची प्रथा, मुलगी नसल्यास मुलगी मानण्याची प्रथा यातून कुटुंबाला संपूर्ण कुटुंबाचा दर्जा

प्राप्त होतो. असे वनिताच्या आत्याचे (गौरी) म्हणणे होते. गौरी आत्याचे घर श्रीमंताचे होते. सोन्या-चांदीचा पेढी होती. गौरी आत्याला सख्खे भाऊ होते. गौरी आत्याचं मानलेल्या भावावर सगळ्या भावांपेक्षा जास्त प्रेम होते. वनिताने खूप शिकावे पण तरी घर सांभाळणे हेच स्त्रीचे खरे कार्य आहे.(पृ.७८) असे गौरी आत्याचे तत्त्वज्ञान होते.(पृ.७८) गौरी आत्याच्या ह्या गोष्टीला वनिता तत्त्वज्ञान म्हणायची. ही गौरी आत्याची गोष्ट वनिताला आवडत नसे. पण वनिताला गौरीआत्या आवडायची. गौरी आत्या मधुर गोड बोलत असे. तरी वनिताला एक प्रश्न पडायचा. गौरी आत्या मधुर बोलते, तरी तिचे धाकट्या दिराशी पटत का नाही?(पृ.७८) कुटुंबव्यवस्थेत या गोष्टी येतच असतात.

गौरी आत्याचे आपल्या मानलेल्या भावांवर खूप प्रेम होते. उत्साह असो की चिडलेली असो गौरी आत्याचा आवाज मधुरच राहतो. गौरी आत्याने पेढ्याचा पुडा घेतला. आणि उत्साहाने म्हणाली, ''मी तुमचाच विचार करत होते.''(पृ.७८) ''तू आमचाच विचार करतेस नेहमी. तुझ्या भावांवर तुझं इतके प्रेम आहे! '' वनिता म्हणाली, ''सगळ्यांना वाटतं, तुझं तुझ्या भावांवर इतकं प्रेम कसं!''(पृ.७८) यावरून असे दिसते की, कुटुंबव्यवस्थेत विचार करायला अनन्यसाधारण महत्त्व असते. आदर्श संयुक्त कुटुंबाचा पुरस्कार वनिताच्या कुटुंबाला मिळायलाच पाहिजे, असे गौरी आत्याने वनिताला सूचविले आहे. वनिता आणि गौरीआत्या त्यांच्या दृष्टीने आपली ही फॅमिली एक आदर्श आहे आणि आदर्श संयुक्त कुटुंबाचा पुरस्कार आपल्याला मिळायलाच हवा.

**कुटुंबव्यवस्था आणि पाऊस :**

**कावेरी माळवदे :**

कावेरी माळवदे ह्या न्यायाधीश होत्या. आता त्या सेवानिवृत्त झाल्या होत्या. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा त्यांचा फार मोठा व्यासंग होता. भास्करराव व त्या बालपणी कोल्हापूरला एका शाळेत शिकल्या होत्या. दिसायला काळ्यासावळ्या, किडकिडीत, केसांचे पुरुषांप्रमाणे कटिंग केलेले, पँट, टि शर्ट घातलेल्या, असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. भास्करराव व मुलीचे वडील त्यांच्याकडे त्रैमासिकासाठी लेख आणायला गेले होते. तेव्हा त्यांना या व्यक्तिमत्त्वाची ओळख झाली होती.

**मुलगी :**

वडिलांना मुलगी बाबा म्हणत होती. वडिलांना ती भोळी, इनोसंट वाटत होती. मुलगी तिच्या सासूला बरोबर ताब्यात ठेवेन. हे बाबांचे बोल खरे झाले होते.

**आत्तेबहीण :**

बाबांची आत्तेबहिण आनंदी होती. तिला कोणत्याही प्रकारचे आपले दुःख सांगायचे नाही, हे बाबांनी ठरविले होते. आतेबहीण एकटीच होती. तिचा पार्टनर देवाघरी गेला होता. एकुलता एक असणारा मुलगा अमेरिकेला स्थाईक झाला होता. आतोबा होते तेव्हा बाबा (मुलीचे वडील) व त्यांची पत्नी तिच्याकडे राहात होते. 'वृद्ध एकटा विधूर मामेभाऊ आणि वृद्ध एकटी विधवा आत्तेबहीण ह्यांनी कायमचे एकत्र रहावे. वेगळ्या प्रकारचे कुटुंब, कुटुंबे अशी नाना प्रकारची असली पाहिजेत.'(पृ.१५८) नातेवाईकांमध्ये एखादी व्यक्ती निराधार झाल्यास कुटुबं व्यवस्थेने त्याला आपल्यात सामील करून घ्यावे.

**सैंपाकीण काकू :**

स्वयंपाक अतिशय चांगला करायची. भाजी तर छानच करत होती. बाबांना म्हणजेच मुलीच्या वडिलांना आधार वाटात होती. तसेच मुलीची सासू व मुलीची मुलगी (छोटी) ही दोन गौण पात्रे यामध्ये लेखकाने मांडलेली आहेत.

एकूणच कादंबरीतील जवळजवळ सर्व स्त्री पात्रे उच्चभ्रू पांढरपेशी वर्गातील असून श्रीमंतीचे रुप या पात्रांमधून दिसते. स्त्री पात्रे स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करणारी आहेत.

**१.२.१५ खारीच्या वाटा :**

**लुकी :**

'खारीच्या वाटा' या कादंबरीची नायिका ही प्रामुख्याने लुकी आहे. लुकी म्हणजे खारीचं पिलू. या पिलाची आणि लेखकाची गाठ पडली ती एका झाडाखाली. लेखक त्या वाटेने चालला असतांना काही मुले या पिलाला डिवचत असलेली लेखकाने पाहिली. 'पिलू' म्हणजे मांसाचा गोळाच होता. त्यावर तुरळक, लवलवते केस, तुरीच्या डाळिंबी एवढे कान. डोक्यावर चिकटवल्यासारखे. डोळे मात्र पाणीदार दवाच्या थेंबासारखे चमचमते (पृ.९) लेखकाला पिलाची कीव आली. पिलाला त्रास देणाऱ्या मुलांवर लेखक खेकसला. टोपीमध्ये त्या पिलाला उचलले. हाताच्या तळव्यावर घेतले व तो तडक घरी आला. आईने व लेखकाने तिला सुरक्षित ठिकाणी ठेवले व तिचे नामकरण केले त्या पिलाला 'लुकी' हे नाव दिले. तिला दवापाणी केलं. लेखकाच्या घरात लुकी झपाट्याने वाढत होती. पाठीवर केस दिसू लागले. शेपटीचा झुबका आकार घेत होता. काही भुरे केस काळपट व्हायला लागले. काही पांढरट. पाठीवर अस्पष्ट असे काळेपांढरे पट्टे

जाणवू लागले. तोंडावर लव उमटली. नखं दिसायला लागली. डोळे अधिक चमकदार झाले. लुकीची तरतरी वाढली उत्साह वाढला. तशी चुळबुळही वाढली. हळूहळू लुकी रांगूही लागली. मोकळ्या बशीकडे जायची व बशीच्या काठावर अलगद तोंड टेकवायची म्हणजे लुकीला भूक लागली हे लेखक व दिन्याला समजायचे.

लेखकाचा मित्र दिन्याला लुकीचा लळा लागला होता. दिन्या लेखकाच्या घरी येऊ लागला होता. लेखक लुकीला बशीत भात ठेवत असे. दिन्याने नवीनच प्रयोग केला. तळहातावर भात ठेवला. लुकी लेखकाच्या तळहातावर बसून भात खाऊ लागली. नंतर दिन्याने लेखकाच्या कोपराच्या खळग्यात भाताची शितं ठेवली. लुकीने तिथेही चढून शिते संपवली. त्यानंतर खांद्यावर ठेवली. लुकी शिखर सर केल्याच्या अविर्भावात खांद्यावर भात खात होती. पण एकदा दिन्याने लुकीची फसवणूक केली. कुठेच भात ठेवला नाही. तेव्हा मात्र लुकी फुरगटून बसली. त्यावर उपाय दिनूनेच काढला. त्याच्या आईने करून दिलेल्या कापण्या दिनू घेऊन आला. तळहात, कोपर आणि बखोटयावर एकाचवेळी एकेक कापणी ठेवली. हा उपाय उपयोगी पडला. लुकीनं कापण्या फस्त केल्या. त्यानंतर थोड्याच दिवसात म्हणजेच सातेक महिन्यात लुकी लेखकाच्या घरी चांगलीच सरावली. घरातला कानाकोपरा तिने पादाक्रांत केला. आई, आप्पा म्हणजे लेखकाचे आई-वडील, भांब्या, बारशाबैल, हौशा कुत्रा आणि कोंबड्या सर्व तिचा गोतावळा झाले. ''लुकीची वाढ झपाटयाने होत होती. अंग बऱ्यापैकी धरलं होते. पाठीवरचे पट्टे स्पष्ट दिसू लागले. केसांचा तलमपणा, तकाकी वाढली. शेपटी गोंडेदार. नाकाचा भाग किंचित फुगीर तिथले केसही वाढलेले व लवलवते. डोळ्यात चमक. आत्मविश्वास. आवाज बदललेला एकूणच लुकी आता रूबाबदार वाटत होती.''(पृ.४०) फक्त घरातच फिरणाऱ्या लुकीचे विश्व विस्तारलं होतं. घरासमोरचे चिंचेचे झाड, अंगणात, परढ्यात लुकीचा वावर वाढला. कुंपणाच्या झुडपातून धावणे, बांबूच्या बेटात आडवे-तिडवे वळसे घालणे, बेलाचा शेंडा एका दमात गाठणे, जांभळ, आंबा, पिपरण असा सारा परिसर मनसोक्त ती हिंडत होती.

लुकी जशी वाढत गेली तसा तिचा जहांबाजपणही वाढत गेला. ते पुढील प्रसंगावरून स्पष्ट होते. लेखकाच्या अंगणातील चिंचेच्या बुडाजवळ मोठा दगडी कुंडा होता. त्यात कोंबडयांसाठी पाणी ठेवलं जायचं. पाण्याचा कुंड फक्त तिच्यासाठी आणि कोंबड्यासाठी आहे असा तिचा समज होता. ती त्या कुंड्याची मालकीण असल्यासारखी वागायची. इतर प्राणी तिला भीत. 'तिचं होईपर्यंत पाण्याजवळ येण्याची एकाचीही टाप नसायची. मोठा दरारा होता

तिचा!'(पृ.४३) पण तिच्या या जहांबाजपणाला दयाळ पक्षाने आव्हान दिले. तिच्या विरोधाला न जुमानता निवांत पाणी प्याला. हे नाटय सर्व पक्षिगणांसमोर घडले त्यानंतर सर्व पक्षी निर्ढावले लुकीचाही विरोध मावळला. 'कुणालाच कुणाचं भय उरलं नाही.'(पृ.४५) लेखक व दिन्या नदीवर गेले तेव्हा ते लुकीला सोबत घेऊन गेले. ते दोघे घायपात भिजविण्यात गुंतलेले असतांना. लुकी जांभळं खात बसली. यातूनच दिन्याला कल्पना सुचली लुकीच्या मदतीने पाडांचा शोध घेण्याचे ठरविले. ते लुकीला घेऊन आंबेमाळला गेले ''पाठ उंच करून घडाच्या फटीत निमुळतं तोंड खुपसून लुकीची 'पाड तपासणी' चालु होती.''(पृ.५९) लुकीला पाडाचा आंबा सापडला की कचकच असा आवाज आनंदाने करायची. तेव्हा लेखक सांगतात, ''आता तीच आमच्या वाटाड्या झाली होती.''(पृ.६१) लुकीमुळे त्यावर्षीची आंबेसराई लेखक व दिन्यासाठी फार मजेची गेली. हिरडे गोळा करण्याच्या कामातही त्यांना लुकीची फार मदत झाली.

एकदा लुकी दोघांसमवेत जनावरांसह नदीवर जात असतांना बारशाबैलाच्या पाठीवर पडली. बैल बिथरला त्याच्या शेपटीचा सपाटा लुकीला चांगलाच जोरात बसला. त्यावेळी बिचारी लुकी मरणप्राय प्रसंगातून वाचली. धोंडिबा परढ्यात लाकडे रचत असताना त्याला साप दिसला सापाचा शोध घेण्यासाठी गुरुजी व त्यांचे विद्यार्थी म्हणजे लेखाक दिन्यासह परढ्यात जमले. तेव्हा निसटलेल्या सापाचा शोध लुकीने घेतला. 'लुकीचं कौतुक झालं'(पृ.१०२) लेखकाच्या आईने कोंबडी पाळली होती. त्या कोंबडीला आठ पिले होती. त्या कोंबडीला एकदा कोल्ह्याने पळविले. ती आठ पिलांची आई गेली. 'तेव्हापासून लुकी पिलांची आई झाली.'(पृ.१०७) साधा उंदीर दिसली तरी लुकी 'कचकच' असा विशिष्ट आवाज करी. पिलांना धोक्याचा इशारा समजे. पिलं टोपलीखाली लपत. भांब्याला म्हणजेच लेखकाच्या घरातल्या बोक्याला उंदीराची शिकार करण्याच्या कामीही लुकी मदत करीत असे. म्हणजेच घरातल्या प्राण्यांना देखील लुकीचे सर्व सहकार्य मिळत होते.

'त्या वर्षी लुकीच्या जीवावर दिन्यानं बरेच बेत आखले आणि पारही पाडले हरकामी लुकीची मदत कशी घेता येईल याचा दिन्या नेहमी विचार करी.'(पृ.१३०) होळीसाठी सावरीच्या फुलांची माळ करणे हा मुलांचा छंद होता. मोठ्यात मोठी माळ करण्याची त्यांच्यात शर्यत लागे. 'पाडाचा आंबा शोधायला जशी लुकीची मदत घेतली होती. तीच युक्ती पुन्हा वापरायची असं ठरलं.' 'यापूर्वी एवढी लांब माळ होळीनं पाहिली नव्हती.'(पृ.१३१) धरण बांधण्याच्या निर्णयाने साऱ्या गावावर अवकळा पसरली लेखकाच्या घरावरही त्याचा परिणाम झाला. सर्वात महत्वाचं

म्हणजे लुकीवरही धरणाचे पडसाद उमटलेले दिसले. लेखक सांगतो. ‘लुकी आता पहिल्यासारखी वागत नाही.’(पृ.१४७) बराचवेळ चिंचेवर राहायची जेवणापूरती यायची. पाण्यात डुंबायची नाही. रानात भटकत नसायची. धरणामुळे गाव सोडण्यापूर्वी लेखकाच्या वडिलांनी गुरांना सांभाळण्यासाठी त्यांच्या एका नातेवाईंकाकडे सोडण्याचा निर्णय घेतला. बारशा व जैशा बैल वाड्याबाहेर निघाले. तेव्हा लुकीने बारशा बैलाच्या पाठीवर उडी मारली नंतर ती जैशाच्या वशिंडावर गेली. याचाच अर्थ तिने त्या बैलांना शेवटचे भेटून घेतले. दिन्याने गाव सोडण्यापूर्वी लुकीला कापण्या दिल्या पण लुकीने त्याला तोंडही लावलं नाही. लेखकाच्या गाव सोडण्याच्या प्रसंगी जेव्हा सर्व सामान ट्रकमध्ये भरले. तेव्हा लुकी हे सर्व पाहात होती. मुटकुळं करुन पडलेली. लेखकाने तिला करगळीने डिवचलं. तिनं मान उचलली. लेखकाने नेहमीसारखा उजवा हात भुईवर टेकवला लुकी जडपणे हातावर चढली हळूहळू कोपरापासून मानेवर आली. जरा बसली आणि अचानक आपलं इवलंसं तोंड आचके देत लेखकाच्या मानेवर आपटू लागली.(पृ.१५७) ती दुःखी झाली होती. जणू काही तिला काहीतरी सांगायचे होते असे वाटते. वरील सर्व कृतीतून तिच्या दुःखाची वाचकाला कल्पना येते. लेखक जेव्हा गाव सोडून जायला निघतो तेव्हा दिन्याने दिलेल्या कापण्या दोन फांद्याच्या बेचक्यात ठेवतो. तेव्हा लुकी वरच्या फांदीवरून पाहते. लुकी चिंचेच्या शेंडयाकडे गेली. तिच्या पाणेदार डोळ्यांकडे पाहून लेखकाला वाटते. ‘चिंचेचं एखाद तरी पान ओलं झालं असेल...’(पृ.१५८) सर्वजण गाव सोडून जाणार म्हटल्यावर लुकीलाही अश्रू आवरले नाहीत.

लुकीच्या व्यक्तिमत्त्वातून लेखकाने लुकीचा मानवी भाव-भावनांशी मेळ घालण्याचा प्रयत्न केला आहे असे वाटते. लुकीला लेखक व दिन्या यांनी जीवापाड जपले व तिने त्यांना वेळोवेळी मदत केली. घरातील भांब्या, बारशा, जैशा, कोंबडी यांच्यावरही लुकीने प्रेम केले. ‘प्राण्यांवर प्रेम केले तर तेही आपल्याला सर्वतोपरी मदत करतात’ हाच संदेश लुकीच्या व्यक्तीमत्वातून वाचकाला मिळतो. लेखक गाव सोडतांना लुकी त्यांच्याबरोबर जात नाही. गाव सोडत नाही, ह्या एका तिच्या कृतीचा मनाला चटका लागतो. त्याची हुरहुर वाचकाला लागल्या शिवाय राहात नाही. वाचक विचारमग्न होतो.

**आई :**

लेखकाची आई अतिशय प्रेमळ होती. तिचे प्राण्यांवर प्रेम आहे. याची लेखकाला खात्री असल्यानेच त्याने खारीच्या पिलाला घरी नेले पिलू गुंडाळलेली टोपी लेखकाच्या हातात होती. आईने दगडी जोत्याच्या आणि कुडाच्या मधल्या सापटीत पोतं अंथरलं. टोपी चिंध्यांच्या

बिछान्यावर ठेवली. लेखकाने बऱ्याच विचाराअंती खारीचे नाव लुकी ठेवलं. आईला ते आवडलं आईने तिच्यासाठी बशीत पाणी घेतलं व पाजलं आईला तिची कितीतरी काम होती तरीसुद्धा तिने सर्व काम बाजूला ठेऊन लुकीची काळजीपोटी लेखकाला तिची काळजी घेण्याविषयी सूचना दिल्या. लेखकाने तिला एका न सारवलेल्या टोपली खाली ठेवले. त्यावर दगड मांडले. दुसऱ्या दिवशी लुकीच्या काळजीने लेखक लुकीच्या टोपलीजवळ गेला. पण लुकीचे काय झाले असेल या भीतीपोटी टोपली उचलण्याचे धाडस त्यांच्यामध्ये नव्हते. तिला लेखकाच्या मनातलं समजत असे. आईने टोपली वरचा दगड काढला टोपली उचलली. तोपर्यंत लेखक लांबच. आईने त्याला खुणेने बोलावले. लुकीची हालचाल जाणवल्याने ती जीवंत आहे. हे पाहून दोघांच्याही जीवात जीव आला. आईने वाटीत दूध आणले व ते लुकीला बशीत ओतून पाजण्यास सांगितले. दूध पिल्यानंतर लुकीने तिचे तोंड जमिनीवर घासले. आईच्या मते प्राणी लगेच स्वच्छ होतात. आळशी नसतात. आई लुकीकडे कौतुकाने पाहत होती.

लेखकाची आई म्हणजे शेतकरी कुटुंबातील स्त्री. वडिलांबरोबर शेतात काम करणे. आपल्या मुलांची  देखभाल करणे. कोंबडया पाळणे. भांब्या बोक्याची काळजी घेणे. आणि लुकीचीही देखभाल करणे यासारखी कामे आनंदाने करीत होती. लेखकाची आई कष्टाळू व प्राणीमात्रांवर प्रेम करणारी माऊली वाटते.

**१.२.१६. फेसाटी :**

प्रस्तुत कादंबरीत काकू, हिराक्का, नंदाक्का व सुंदाक्का, सुमाताई, इंदाताई या प्रमुख व्यक्तिरेखांबरोबरच नकुसा, आजी, मामी, लेखकाच्या मैत्रीणी जया व गीता या स्त्री पात्रांचा आढावा घेतला आहे.

**काकू :**

कष्टमय जीवन जगताना आपल्या मुलांवर नितांत प्रेम करणारी माऊली म्हणजे लेखकाची आई. तिला सर्वजण काकू म्हणायचे ही काकू दिवसभर गुरं ढोरं राखून शेतात काम करुन परतताना गवताचा भारा घेऊन यायची तेव्हा पाखरावानी वाट बघत बसलेली मुलं काकूच्या भोवती गोळा व्हायची. एकत्र कुटुंबात 'खायला भाकर मिळायची नाय म्हणून काकू दिसभर पोटाला फडकं बांधून काम करायची. सांच्याला उरलं-सुरलं खायाच नायतर तसंच झोपायचं.'(पृ.१३) लेकरांना कण्या शिजवून घालून काकू उपाशी झोपायची पण तिच्या चेहऱ्यावर कधीही मरगळ दिसली नाही. काकूला स्वतःच असं काहीही अस्तित्व नव्हतं जत्राखेत्रा, देवधर्म कधी तिने केला नाही. ती फक्त

राबराब राबायची. प्रा.रणधीर शिंदे काकूच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन करतांना लिहितात, ''चेहरा गोल उभट, सावळा रंग, कष्टानं रापलेलं शरीर, कपाळावर ठसठशीत रुपयाएवढं कुंकू, चेहऱ्यावर मुलाविषयीचा दाटून आलेला अपार तृप्ततेचा भाव''[४७] नाथाने खूप शिकावे म्हणून काकू नेहमी नाथाला समजवायची नाथाला शिक्षणाविषयी आस्था नव्हती. शिक्षकांनी मारले किंवा शाळेत जायला चांगले कपडे नाहीत म्हणून लेखकाने बऱ्याचदा शाळा सोडून देण्याचा निर्णय घेतला की त्याला नेहमी शिक्षणाचं महत्त्व पटवायची ''बाळां शाळंला जारं ह्या कामानं प्वॉट भराच नाय बघ ही येळ गिली म्हणजी पुन्हांदा येत नाय.''(पृ.९२) खूप शिकल्यावर नोकरी मिळाली म्हणजे तुला आमच्या सारखं राबावं लागणार नाही. ती आपल्या मुलाच्या उज्ज्वल भविष्याची स्वप्न पहात होती. नाथाने पोलीस व्हावं अस काकूला वाटायचं नाथाला कामीन झाली तेव्हा मुलाच्या जीवासाठी मामाने कितीही अपमानीत केले तरी काकूने मामाचे पाय धरले. केवळ मामाने कामीन उतरावी म्हणून. काकाच्या आजारपणात स्वतःचा एकुलता एक दागिना म्हणजे डोरलं तिने गहाण ठेवलं दादाला डोरलं गहाण ठेवू वाटत नव्हतं पण तेव्हा काकू म्हणाली, ''तुझा बाबा वाचला ह्येच लाखमोलाचं झालं. माझ्या कपाळाचं कुंकू राहिलं. डोरलं काय म्या उद्या घिन.''(पृ.३९) एकदा काकू पाण्यात पानशार कापायला गेली तिथे तिला साप दिसला काकूला खूप भीती वाटली. त्यावेळी ही ती स्वतःचा विचार करत नाही काकू म्हणाली, ''देवाची मया आयचं राखण म्हणून म्या वाचली. मला कायतर झालं असतं तर माझ्या लेकरांनी कुणाचं त्वाँड बगायच हुतं.''(पृ.७१) मुलांच्या आजारपणात मुलांच्या प्रेमापोटी काकू देवाला नवस करायची, त्यांची दृष्टी काढायची, मायाक्काचा भंडारा लावायची. मुलींचे लग्न करुन देणे त्यांचे चांगले झाले म्हणजे तिला त्यातच धन्यता वाटायची हिराक्काला मारल्याच दुःख तिच्या मनात सतत घर करुन बसलं होतं. लेखकाने काकू बद्दलचे व्यक्त केलेले मत समर्थक वाटते. लेखक म्हणतात,''माझी काकू म्हणजी गरिबाची गायनं कुणालाचं काय नाय. नुसतं गरिबीनं पिंजून काढलं हुतं. आमच्यासाठी जगत हुती. आमच्या पोटासाठी कामाला मरत हुती.''(पृ.१०३) नाथाची आई दारिद्र्य जीवन जगत असताना आपल्या मुलांवर मायेची पाखरण करताना दिसते. सदोदीत येणाऱ्या संकटांना धैर्याने तोंड देत होती. अखंड आयुष्यभर फाटलेल्या संसाराला ठिगळे देण्याचे काम आनंदाने करणारी ही काकू मनाला भावते.

**हिराक्का :**

थोरल्या दादाच्या पाठीवरची हिराक्का लेखकाची मोठी बहीण होती. हिराक्का अतिशय हुशार होती. हिराक्का तिच्या पाठच्या जुळ्या बहिणींना सांभाळायची. शेतात काम करुन आल्यावर

बांधावर हिराक्काच्या जवळ यायची तेव्हा तिला काकू एक भाकरी खायला द्यायची ती त्यातील आर्धी आईला व चतकोर सुमताईला द्यायची. थोड्याच दिवसात हिराक्का पाहुणे बघायला यायचे पण हुंड्यासाठी लग्न मोडायच. काकूच्या थोरल्या भावाने म्हणजे नामदेवने त्याचा मुलगा धुळाप्पासाठी काकू विचारलं, ''सुबाक्का मी तुझी पोरगी माझ्या धुळ्याला करतूकी, तू कायबी करु नगुचं. मी सगळं करतू.''(पृ.३६) एक तोळा सोन, घड्याळ, रेडिओ अन् दोन आहेर, भांडीकुंडी, कपडे एवढे देण्याचे ठरले.

आक्काचा जन्म झाल्यापासून पहिल्यांदाच म्हणजे तिच्या लग्नाच्या दिशी तिला नवीन कपडे मिळाले होते. त्या अगोदर तिने काकू जिथे कामाला जायची त्या मालकीनीने दिलेले कपडे घालायची तिच्या झंपराला सतरा ठिगळं असायची. झग्याला वेगवेगळ कापड असायचे, 'गरिबीला आक्का दोन हात करुन मदत करायची.'(पृ.३६) लग्न होऊन आक्का मामाच्या घरी नांदायला गेली. आजारातून उठलेल्या वडिलांना भेटायला आलेली आक्का माहेरी आल्यावर रडत होती. अचानक एक दिवस कपड्यांच गाठोडं घेऊन माहेरी आली तिला तिचे सासरचे लोक ''वट भरणात सोनं आणलं नाय म्हणून तू निघून जा. म्हणत्याती.''(पृ.३९) असे सांगितले तिच्या पाठीवर माराचे वळही होते. काकूने आंदामामाला समजून सांगण्यास सांगितले. दुसऱ्या दिवशी मामाने समजावून सांगितले. तेंव्हापासून भांडण कमी झाले पण मामी चे हिराक्काला शिव्या देणे चालूच असायचे दसऱ्याच्या दिवशी मामीने हिराक्काला विहिरीत ढकलून दिले. मामीनं धुणं आणून विहिरीच्या काठावर टाकले. धुणं धुवायला आली व विहिरीत पडली. असा कांगावा केला. सकाळी बारा वाजता तिला विहिरीतून बाहेर काढलं फाडकाम करुन रात्री आक्काला आणलं होतं. सतत दोन दिवस पाऊस पडत असल्याने आक्काचे दहन करता आले नाही. गाडी भरुन सरपण आणले व घराच्यामागे असलेल्या लिंबाखाली आक्काला जाळले. पण तरीही अधनं मधन पाऊस पडतच होता. जिवंत असताना हिराक्काला हिराक्काला कधीही सूख मिळाले नाही व मेल्यानंतर तिचे हालच झाले. नवरा व सासरा यांनी जेलमध्ये जावे लागले जेल मधून आल्या – आल्या हिराक्काच्या नवऱ्याची म्हणजे धुळ्याची गाठ येसा बरोबर मारली कारण येसाच्या बाबाने दहा एकर जमीन धुळ्याच्या नावावर केली होती. आक्काला मारण्यापूर्वीच येसाच्या वडिलांचा व नामदेव मामाचा घाट शिजला होता. 'जमिनीसाठी आक्काचा जीव घेतला'(पृ.५५) हिराक्का हुंड्याच्या अनिष्ट प्रथेला बळी पडणारी दुर्दैवी लेक ठरली.

**नंदाक्का व सुंदाक्का :**

नंदाक्का व सुंदाक्का या दोघी जुळ्या बहिणी होत्या. नंदाक्का पाच हजार हुंडा व एक तोळ सोनं द्यायचं ठरवून नंदाक्काच लग्न ठरलं तिला गिरगावला दिले होते. नंदा बाळांतपणाला आली, 'नंदाक्का बाळात झाली हुती आणिख पोरगी झाली हुती.'(पृ.१२३) याचा अर्थ तिला पोरीच झाल्या होत्या. लेखकाच्या पाठीवर नकुसाचा जन्म झाला तेव्हा सुंदाक्काने काकूची कानउघडणी केली. आमच्याच पोटापाण्याचा प्रश्न असताना ही कशाला जन्माला घातली. नकुसा मेल्यावर काकूच्या मनात आले सुंदाक्काच्या मनाजोगं झालं असेल. तीन हजार हुंडा अर्धा तोळा सोनं, संसार सेट, भांडीकुंडी द्यायचं ठरलं. सुदाक्काला मोठ्यावाडीला दिले. भिमराव मोठे व भिताबाई हे सुंदाक्काचे सासरे-सासू काकाला गाई घ्यायला सुंदाक्काच्या सासऱ्याने कोंड्या पारध्याकडून कर्ज मिळवून दिले. गाई आणायला काका बरोबर लेखकही गेला होता. सुंदाक्काने त्याला वीस रुपये दिले. व शाळेत जाण्याविषयी समजावले.

**सुमाताई :**

जुळ्या बहिणींच्या नंतरची सुमाताई होती. सुमाताई सगळ्या भावंडामध्ये लाडकी होती. काकाचे तिच्यावर खूप प्रेम होते. काका तिला 'माझं पाडास' म्हणत होता. काका धान्य दळायला गेला होता त्याच्याबरोबर सुमाताई पण गेली रात्रीचे नऊ वाजले तरी दोघे घरी आले नव्हते. दोघांना ओढा ओलांडून यायचं होतं. काकाच्या छातीपर्यंत पाणी आले होते. मोठ्या मुश्किलीने दोघेही ओढ्याच्या बाहेर आले पण सुमाताई बेशुद्ध पडली होती अंगाला शेकवल्यावर ती शुद्धीवर आली पण तिला ताप आला होता. अशा मोठ्या संकटातून सुमाताई वाचली होती. लेखक चौथीत असताना सातपुते गुरुजींना लेखकाला मारले होते. तेव्हा सुमाक्काने लेखकाला उचलून घेतले व म्हणाली, ''काकू नव्याची शाळा राहुदी, त्यो गुरुजी येवढं मारतूया म्हणजी? येक दिस जीव घिल ताटीवाला लेकराचा आम्ही कवा हेला पाची बोटानं शिवलं नाय, ह्याच्यासाठी आम्ही माती-माती खातूया, अन् ह्यो मारतूई कडू कुठला.''(पृ.४७) सुमाताईचे हे बोलणे कौतुकास्पद होते.

सुंदाक्काच्या लग्नाला दोन महिनेच झाले असतील आद्यामामानं सुमाताईच्या लग्नाचा प्रस्ताव मांडला. त्याच्या मुलाबरोबर सुमाताईचे लग्न ठरविले. श्रावण महिन्यात सुमाताईचे लग्न झाले. लेखकाच्या घरापासून दहा फुटाच्या अंतरावर असलेल्या मामाच्या घरी सुमाताई नांदायला गेली होती. लेखक लहान असताना सुमाताई म्हणायची, ''काकू माझी शांती नव्याला दिती बग.''(पृ.१४८) लेखकाची पण इच्छा होती. काकू सुमाताईच्या घरी गेली व दादाला म्हणाली

शांताला कुठल्या पाहुण्याला दाखवू नको नाथाला दे. पण सुमाताईने या प्रस्तावाला पूर्णपणे नकार दिला. तिच्या मते नव्या काहीही काम करत नाही. शिवाय नापास पण झालाय. तंबाखू खातो विड्या पण ओढतो. दगड्याच्या नादाने बायका, पोरी बघत फिरतो. एकंदर काय तर नव्याला जावई करुन घ्यायला सुमाताईने साफ नकार दिला. शिवाय जेव्हा लेखकाचे घर जळाले तेंव्हा सुमाताई ने मदतीचा हात दिला नाही. लेखक म्हणतो, ''येका आईच्या पोटी जन्मल्याल्या बहिणी कोणच आल्या नव्हत्या. येका नाळचा जल्म तुटला त्यो तुटलाच.''(पृ.१७९) सुमाताई ही संकटसमयी माहेरच्या माणसांना मदत करीत नाही. त्यातून तिची स्वार्थी वृत्ती लक्षात येते.

**इंदाताई :**

नाथापेक्षा दोन वर्षांनी मोठी असलेली बहीण म्हणजे इंदाताई नाथा इंदाताई बरोबर अंगणवाडीत जात होता. इंदाताई अतिशय प्रेमळ स्वतः उपाशी राहून ती नाथाला भाकरी द्यायची म्हणूनच नाथा म्हणतो, '' इंदूताई मला देवावाणी वाटायला लागली, स्वतःचा जीव मारुन मला जगवत हुती.''(पृ.३०) नाथाच्या हट्टापायी इंदाताई ओढ्याला बोरे गोळा करायला गेली पण इंदाताई च्या पायात शुबाभळीचा काटा मोडला खूप रक्त गेले ते पाहून इंदाताई बेशुद्ध पडली काकूने दाताने काटा काढला होता. दुसऱ्या दिवशी इंदाताईचा पाय सुजला.

इंदाताई पाचवीला जाणार होती. पण नाथा चौथीला एकटा जायलाच तयार नसल्याने इंदाताईला पुन्हा चौथीतच बसविले. एकदा गुरांना खूप गोचिड झाले म्हणून दादाने गोचिडाच औषध आणल सगळ्या जणावरांना लावलं नाथाने सगळ्यांचा डोळा चुकवून पाठीच्या तोंडावर औषधाचा जास्तच थर लावला. पाढीने ते औषध चाटल व ती मेली तेव्हा नाथा घाबरला व आपणही गोचिडाचे औषध पिवून मरुन जावे असे नाथाला वाटले. तस तो इंदाताईला म्हणाला, इंदाताईने रागाने नाथाच्या तोंडात मारली तेंव्हा इंदाताई ने नाथाला प्रेमाने समजावले, ''बाळा हिकडं बगं. आपली काकू काका किती काम करत्याती. कुणासाठी करत्याती? आपल्यासाठी नव्हं. अन् म्हणतुया मरतू. जीभचं कापीनं आणि येकदा बोलला म्हणजी.''(पृ.७७) दिवसभर तिने नाथाचा हात सोडला नाही व राहिलेली औषधाची बाटली तिने फेकून दिली. बिचारी इंदूताई दिवसभर गुरांची वैरण काडी करायची. इंदाताई ही कष्टाळू, कुटुंबासाठी झटणारी, भावाला जिवापाड जपणारी, कुटुंबाच्या सुखदुःखात सहभागी होणारी अशी मायाळू, प्रेमळ बहीण व आईला कामात मदत करणारी, सर्वांची काळजी घेणारी, आईच्या मायेने जीव लावणारी थोडक्यात आईचे प्रतिनिधित्व इंदाताई करते.

**गौण पात्र :**

**नकुसा :**

लेखकाच्या पाठीवर कितीतरी वर्षांनी जी मुलगी झाली तिचे नाव नकुसा ठेवले. तापल्याचे निमित्त होऊन नकुसा देवाघरी गेली. ती गेल्यानंतर आपण तिचे नाव नकुसा ठेवल्याची काकूला बोचणी लागली. नकुसा नावाप्रमाणे नकोशी झाली आणि देवाघरी गेली.

**आजी :**

लेखकाच्या आजीचे नाव 'शिवबाई' होते. लेखकाच्या वडिलांना शेती घेण्याची इच्छा होती पण आजी मोडता घालयाची. कारण कर्जाचा डोंगर करु नये म्हणून. आजी काकूचा छळ करायची. पोटाला पोटभर अन्न द्यायची नाही. कजाक सासू म्हणून शिवबाई कथानकात समोर येते.

**मामी :**

मामी ही हिराक्काची सासू होती. तिने हिराक्काला विहिरीत ढकलले. मामी पण हिराक्काची कजाक सासू होती. मामी या नात्याला काळीमा फासणारी ही हिराक्काची सासू होती. समाजात सासूचे स्थान हे प्रेमळ असणे गरजेचे आहे पण परंपरेने ते व्यक्तिमत्त्व सूनांचा छळ करणारेच असते. ते बदलणे गरजेचे आहे.

**जया :**

जया लेखकाची मैत्रीण होती. लेखक बारावीला इंग्रजी विषय गेला म्हणून तासासाठी एका मित्राच्या रुममध्ये राहत होता. दिवसभर ओढ्याच्या कडेला असलेल्या झाडाखाली बसून अभ्यास करीत होता. आत्याजवळ राहणारी जया घरी करमत नाही म्हणून ती देखील तिथेच झाडाखाली अभ्यासाला येत होती. तेथेच त्यांची भेट झाली ते एकमेकांशी गप्पा मारु लागले. मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यांना एकमेकांना भेटण्याचे आकर्षण वाटू लागले, जया म्हणाली, ''आपण पळून जाऊन लग्न करु या.''(पृ.१५८) पण दोघांचही वय कोर्टात जावून लग्न करण्या इतपत नव्हतं. शेवटी जया कचरेवाडीला तिच्या गावाला गेली. नाथा जयाला पाहण्यासाठी कचरेवाडीला गेला. जयाचे लग्न दोन दिवसावर आले होते. तरी जया नाथाला म्हणत होती. ''जावू आपून लांब कुठंतर''(पृ.१६४) पण त्याने कोणतीच प्रतिक्रिया न दिल्याने जया नाथावर रागवून निघून गेली. शेवटी नाथा ही हताश होऊन परतला. जया ही नाथावर प्रेम करणारी प्रेमिका लग्न ठरलं तरी पळून जाण्याचा विचार करणारी मुलगी होती.

**गीता :**

गीता ही देखील नाथाची मैत्रिण होती. दोघांची भेट उटगीला एन.एस.एस. च्या कॅम्पच्या निमित्ताने झाली गावात संडास बाथरूमाचे खड्डे खणण्याचे काम एन.एस.एस.चे विद्यार्थी करीत होते. खड्डे खणण्यासाठी ग्रुप केले होते. नाथाच्या ग्रुपमध्ये तीन मुली होत्या. त्यातलीच एक मुलगी गीता होय. तिने नाथाला बारा वाजता शाळेच्या मागे यायला सांगितले. रुमच्या बाहेर आला तर खर पण पुन्हा घाबरून गेला व रुममध्ये त्यानंतर त्याने तिच्याशी बोलनेच सोडून दिले. मुलगी असूनही गीता नाथाला गुपचूप भेटण्याचा प्रस्ताव मांडते. नाथा मात्र घाबरतो. हे दोघांमधला विरोधाभास दर्शविणारे वर्तन होते.

अशा प्रकारे 'फेसाटी' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा काकू संकटांना सामोरे जात आपला संसार सांभाळते. दारिद्र्यात वाढलेल्या बहिणींच्या नशीबीही हालाकीचे जीवनच असते. हिराक्काची सासू, काकूची सासू सासूरवास करताना दिसतात. एवढेच नव्हे तर हिराक्काची सासू सूनेला जीवे मारते. हे तिचे वर्तन स्त्री जातीला काळीमा फासणारे आहे, असे दिसते. नाथाच्या वैराण जीवनात आशेचा प्रेमळ अंकुर फुलविणाऱ्या नाथाच्या प्रेयसी जया आणि गीता त्याच्या जीवनात अल्पावधीचा का होईना आनंद निर्माण करुन जातात.

**(क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ**

**१.१. प्रस्तावना**

**१.२. मराठी कादंबरीत आलेले विविध संदर्भ**

**१.२.१. श्रद्धास्थाने**

**१.२.२. अंधश्रद्धा**

**१.२.३. जातियता**

**१.२.४. घटना/प्रसंग**

**१.२.५. पौराणिकता**

**१.२.६. कृषिजीवन**

**१.२.७. बंडखोरी**

**१.२.८. संघर्ष**

**१.२.९. भूक**

**१.२.१०. गावगाड्याचे चित्रण**

**१.२.११. शोषण**

**१.२.१२. प्रथा परंपरा**

**१.२.१३. धार्मिकता**

**१.२.१४. अश्लिलता**

**१.२.१५. व्यथा / वेदना**

**१.३. समारोप**

**१.१. प्रस्तावना :**

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधून स्त्री व पुरुष विषयक विविध संदर्भ आलेले आहेत. स्त्री-पुरूष समाजात वावरत असताना त्यांचा अनेक विविध क्षेत्रांशी संबंध येतो. ते विविध क्षेत्रात वावरताना कशा प्रकारचे वर्तन करतात? त्या क्षेत्रात त्यांना यश मिळते का? यश मिळविण्याकरिता त्यांना कोणकोणत्या संघर्षाला सामोरे जावे लागते. कोणकोणत्या तडजोडी कराव्या लागतात. ह्यासंबंधीचा विचार ह्या पात्रांच्या अनुषंगाने करता येईल. इतिहास, धर्म, जात, संस्कृती, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, श्रद्धा, अंधश्रद्धा, संघर्ष, रुढी, चालीरिती, गावगाडा, भूक, बंडखोरी, जातीयता अशा अनेक संदर्भातून पुरुषांचे व स्त्रियांचे स्वभावगुण-वैशिष्ट्ये शोधता येणे शक्य आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यामध्ये जे जे विविध प्रकारचे संदर्भ आलेले आहेत. ते कथानकातील घटना-प्रसंगांना योग्य प्रकारचे आहेत. त्याविषयीचा शोध प्रस्तुत प्रकरणात घेतलेला आहे.

''ग्रामजीवनात सण, उत्सव, रूढी, परंपरा, समजुती, प्रथा, रीतीरिवाज, खेळ, श्रद्धा आणि अंधश्रद्धा इत्यादींना अधिक महत्त्व असते. त्यांच्या संस्कारातून लोकजीवन घडते.''[४८] ग्रामीण वा नागरी भागात वेगवेगळ्या प्रकारच्या प्रथा-परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा ह्या व्यक्तिपरत्वे कुटुंबपरत्वे, समाजपरत्वे वेगवेगळ्या येत असतात.

वास्तविक पाहता व्यक्ती, कुटुंबासाठी समाज यांच्या परस्पर संबंधाविषयी गीता साने म्हणतात, ''कुटुंब हा समाज व व्यक्ती यांच्यामधला दुवा आहे आणि विवक्षित समाजात चपखलपणे सामावणारी माणसे कुटुंबात तयार होतात, त्यासाठी कुटुंबाला काही कर्तव्ये असतात, तसेच काही अधिकारही असतात. त्यादृष्टीने कुटुंब ही समाजाची कार्यकारी व्यवस्था आहे असे म्हणता येईल.''[४९] कुटुंब ही समाजाची महत्त्वपूर्ण व्यवस्था असलेली संस्था आहे. या व्यवस्थेमध्ये जीवन जगत असताना माणसाला अनेक घटना प्रसंगांना सामोरे जावे लागते. माणसाच्या आयुष्यात त्याला आपापल्या धर्मातील पुराण ग्रंथांना, ग्रामीण भागातील जनतेत कृषीजीवनाला महत्त्वाचे स्थान असते. समाजातील व्यक्तींमध्ये बंडखोर प्रवृत्ती व संघर्ष हा सतत चालूच असतो. माणसाबरोबरच प्राण्यांनाही त्यांच्या आयुष्यात ह्या गोष्टींना सामोरे जावे लागते. त्यातूनच भूक, शोषण, अश्लिलता, व्यथा-वेदना ह्या गोष्टी व्यक्तींच्या वा प्राण्यांच्या जीवनात कमी-जास्त प्रमाणात येतच असतात. त्यातून कुणाचीही सुटका नसते. मानवाने निर्माण केलेल्या धर्मव्यवस्थेच्या व धार्मिकतेच्या बाबतीतही माणूस नेहमीच सक्रीय झालेला असतो.

मॅक ड्रायव्हर आणि पेल ह्यांनी म्हटल्याप्रमाणे, ''लैंगिक संबंधावर आधारलेला, प्रजोत्पादन व मुलांचे संगोपन करणारा टिकावू स्वरुपाचा समूह म्हणजे कुटुंब होय.''[५०] समाजात विवाहाला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यातूनच कुटुंब साकार होत असते. कुटुंबव्यवस्था ही समाजव्यवस्थेला परिपूर्ण बनविण्याचा प्रयत्न करते.

बर्जेस व लॉक ह्यांनीही कुटुंबाचे स्वरुप स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''विवाह संबंध, रक्तसंबंध किंवा दत्तक विधान इ. संबंधानी एकत्र आलेल्या एकाच घरात राहणाऱ्या, परस्परांशी पती-पत्नी, आई-वडिल, मुलगा-मुलगी, भाऊ-बहिण ह्या सारख्या भूमिकांमधून व्यवहार करणाऱ्या व्यक्तींच्या गटाला कुटुंब असे म्हणतात.''[५१] कुटुंबातील हे संबंध समाजातील अनेक घटकांशी संबंधित असतात. त्याचाच उपयोग लेखक आपल्या साहित्य कृतींमधून करीत असतो. थोडक्यात साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब त्यामध्ये पडत असते.

**१.२.१. श्रद्धास्थाने :**

आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात कोणत्या ना कोणत्या रुपाने एक असे श्रद्धास्थान असतं, की जिथं मनुष्य नतमस्तक होत असतो. ह्या श्रद्धास्थानामुळेच आपल्याला आपले कार्य पूर्ण करण्यास प्रेरणा मिळत असते.

**१.२.१.१. ययाति :**

सौंदर्य आणि सामर्थ्य यांची पूजा करायला ययातिच्या गुरूंनी त्याला शिकवलं होतं आणि ययातिचीही या दोन मूल्यांवर श्रद्धा होती.(पृ.१८) शिकण्यावर ययातिची श्रद्धा होती. ज्या प्रमाणे भोवतालच्या भूमिभागाचा परिणाम होऊन नदीचे पात्र बदलते त्याप्रमाणे ययातिचे मन बदलत गेले. बागेतील नाना रंगाची फुले अंगावर रोमांच उभे राहणारा चंचल मनाचा ययाति जेव्हा धनुर्विद्या ग्रहण करतो. त्याला सभोवतालच्या सर्व गोष्टींचे विस्मरण होते व त्याचे मन एकाग्र होते.(पृ.२०) कवी मनाच्या ययातित प्रचंड भावनिक बदल होतो. चिमुकल्या जीवावर बाण सोडताना प्रचंड वेदना झालेल्या ययातिवर अमात्यांच्या उपदेशाचा परिणाम होतो. मनुष्याची आयुष्यभर धड़पडही भोगासाठी असते. आपलं जीवन हे देवालय नाही तर रणांगण आहे. जग शक्तीवर चालते स्पर्धेवर जगते, भोगासाठी धडपडते आणि त्या दिवसापासून ययाति शक्तीचा उपासक बनला. क्रौर्य आणि शौर्य ही जुळी भावंडे आहेत असे तो मानू लागला.(पृ.२१) अशा प्रकारे गुरुवर व गुरुंने सांगितलेल्या मूल्यांवर ययातिची श्रद्धा होती.

**१.२.१.२. रथचक्र :**

मौनीबुवाच्या पलायनानंतर त्याच्या पलायनाचा तो दिवस घरात पुण्यतिथी सारखा पाळला जायचा(पृ.१) म्हणजे कुटुंबातील सर्वांच्या मनात मौनीबुवांविषयी श्रद्धा होती. मधला दीर म्हणतो, ''त्याचे पाय अर्थात मौनीबाबाचे घराला लागतील त्या दिवसापासून आमची पुन्हा चलती सुरू होणार आहे.'(पृ.१५) काका तिला म्हणतात, ''तुझ्यामागं उभी असलेली पुण्याई मोठी आहे''(पृ.९६) म्हणजे मौनीबुवा तुझे पती आहेत या पुणात्म्याची पुण्याई तुला लाभली आहे. तालुक्याच्या गावी सुद्धा त्याला पुण्यवान मानणारे लोक होते. वयोवृद्ध काका मौनीबुवाला पायाला हात लावू देत नाही म्हणजे पाया पडू देत नाहीत.(पृ.१९२) थोरली जाऊ की जी मौनीबुवाची आई शोभेल ती अंतःसमयी मौनीबुवाच्या पायावर डोकं ठेवण्याची इच्छा व्यक्त करते. वरील सर्व प्रसंगातून सर्वांची मौनीबाबावर श्रद्धा होती हे लक्षात येते.

थोरलीवरही नायिकेची श्रद्धा होती ती म्हणते, ''तीर्थ घ्यावे अशा योग्यतेचे ते पाय आहेत असं तिला वाटलं.''(पृ.२९) लखनौवाला थोरलीला म्हणतो, ''वहिनी, आमच्या कातड्याचे जोडे करून तुला दिले तरी तुझे उपकार फिटायचे नाहीत.'' यावरून कादंबरी नायिका व लखनौवाला यांची थोरल्या जावेवर श्रद्धा होती. देवावरील श्रद्धाही आली आहे. मौनीबाबासारखे वर्णन असलेली व्यक्ती दिसल्याची बातमी कळल्यानंतर त्या वर्णनाची व्यक्ती मौनीबाबाच असावी म्हणून शंकराच्या पिंडीवर लघुरूद्राचा अभिषेक सुरू झाला. लक्ष बिल्वपत्र पिंडीला वाहण्याचं उदक सुटलं यावरून या कुटुंबातील व्यक्तींची शंकरावर श्रद्धा होती.(पृ.२) तसेच काही अपराध घडल्यानंतर नाक धरून देवघरात मौनीबाबा बसत यावरून त्यांची देवावर श्रद्धा होती हे स्पष्ट होते. तसेच देवाला नमस्कार घालीत प्राण सोडणारे शास्त्रीबुवा म्हणजे तिचे सासरे यावरून दैववाद दिसतो. मौनीबुवा विषयी घरच्यांची व बाहेरच्या लोकांची अगाध श्रद्धा होती. थोरलीवर आईप्रमाणे लखनौवाला व 'ती'ची श्रद्धा होती. शंकरावर श्रद्धा असणारे हे कुटुंब होते.

**१.२.१.३. स्वामी :**

क्षणभर स्थिर नजरेने गणेशाकडे पाहिले आणि दुसऱ्या क्षणी भानावर येऊन मोठ्या निष्ठेने मसनदीला मुजरा केला.(पृ.५) नगारखान्यावर भगवा ध्वज डौलाने फडकत होता. नकळत माधवरावांची मान झुकली.(पृ.२५) थेऊरच्या देवालयाच्या शिखराचे दर्शन होताच माधवरावांनी लगाम खेचला. वेग मंदावला आणि माधवरावांनी हात जोडले. मंदिराबाहेर चढाव काढून माधवरावांनी मंदिरात प्रवेश केला गाभाऱ्यात शेंदराने मढवलेली स्वयंभू श्रीचिंतामणीची दीड-दोन

हात उंचीची बैठी मूर्ती होती. दोन्ही बाजुंच्या पेटत्या समयांच्या उजेडात गाभारा प्रकाशला होता. काही क्षण माधवराव त्यामूर्तीकडे पाहत हेते. त्यांचे हात जोडले गेले. नेत्र मिटले गेले. माधवराव देवाच्या समोर कोणतीही बैठक न घेता खालीच बसतात तेव्हा ते म्हणतात. देवाच्या दरबारात आमची हीच जागा योग्य आहे.(पृ.२८) माधवराव नेहमी गणेश स्तोत्र पठन करत.(पृ.२९) तो मंगलमूर्ती आहे. विघ्नहर्ता आहे. त्याचेच नाव सिद्धीविनायक आहे.(पृ.२९) माधवरावांच्या ह्या सर्व कृतीतून आपल्या असे लक्षात येते की, गणपती हे माधवरावांचे श्रद्धास्थान होते. तसेच ते भगव्या ध्वजाकडेही श्रद्धेने पाहात होते.

''महाराष्ट्राच्या मनाचा गौरवबिंदू म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवाजी महाराजांबद्दलची विलक्षण आपुलकी माधवराव पेशव्यांच्या मनातही वारंवार दाटून येत होती. शिवाजी महाराजांचे हिंदू पतपातशाहीचे स्वप्नच जणू माधवरावांनी पुरे करण्याच्या प्रयत्नात आपल्या जीवनाची अल्पशी हयात ११ वर्षे चंदनासारखी झिजून घालवली. मराठी मनाच्या आकांक्षाच जणू शिवाजी व माधवराव यांनी पुर्ण केल्या.''[५२] शास्त्रीबुवा, ''वयात का कर्तबगारी अवलंबून असते, श्रीमंत! तसं असतं तर सोळाव्या वर्षात तोरणा सर करुन छत्रपतींनी मराठी राज्याची मुहूर्तमेढ रोवली नसती'' तेव्हा माधवराव म्हणतात, ''कुठे तो थोर युग-पुरुष आणि कुठे आम्ही!''(पृ.२९) पर्वतीवर आलं की मन बेचैन होऊन जात हे छत्रपतींच्या गादीचं प्रतीक त्यावर नतमस्तक होताना अनेक विचार येतात. छत्रपतींच्या राज्याच्या सेवेत आमच्या हातून कसूर होत नाही ना, अशी मनात शंका येते. ''धनीपण सोपं पण : पण सेवकत्व फार कठीण!''(पृ.२९७) निजामाशी लढताना शिवरायांच्या नितीचा वापर करावा जे शिवाजी छत्रपतींनी केलं तेच धोरण आचरायचं.(पृ.११४)

माधवराव शास्त्रीबुवांना म्हणतात ''तो लालमहाल पाहा... ज्या ज्या वेळी मोहिमा यशस्वी करून येतो, त्या त्या वेळी आम्ही येथे येतो. तेथून या महालाकडे पाहतो आणि यशाची चढलेली धुंदी पार नाहिशी होते. ज्यांच्या पराक्रमाने मराठी राज्य उभं राहिलं ज्यांना यवनयुवती पाहूनही मातोश्रीची आठवण झाली. ज्यांच्या राज्यात धर्म आणि राजकारण एकत्र नांदलं. त्यांच्या राज्याचे आम्ही योगभ्रष्ट मानव!'' पित्यावर संकट येताच सारा अभिमान दूर ठेवून, मोगल सत्तेपुढे शरणागती पत्करण्यास क्षणाचाही विलंब लावला नाही अशी पितृभक्ती. मातेच्या इच्छेसाठी रात्रीत गड सर करण्याची मातृनिष्ठा! मुसलमान झालेल्या स्वकीयाला पुन्हा धर्मात घेऊन त्याला आपल्या घराण्यातील मुलगी देण्याची धर्मनिष्ठा. मोहिमेतही प्रजेला त्रास होऊ न देण्याची प्रजानिष्ठा असा तो युग पुरुष कुठे आणि आम्ही कुठे.(पृ.२८१) माधवराव पेशव्यांची दोन महत्त्वाची श्रद्धास्थाने होती,

पहिले श्रद्धास्थान म्हणजे विघ्नहर्ता गणपती आणि दुसरे श्रद्धास्थान व प्रेरणास्थान म्हणजे श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज ही त्यांची श्रद्धास्थाने त्यांना प्रेरणा देत होती.

**१.२.१.४. स्मरणगाथा :**

लेखकाला लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यासारख्या देशभक्तांचा आदर होता. लोकमान्य हे दांडेकर कुटुंबियांचे आप्त होते. लेखक म्हणतात, ''मी काही लोकमान्यांना पाहिलं नव्हतं तरी ते माझे पितृव्य हा अभिमान होताच. मात्र गांधीजीचं कर्तृत्व प्रत्यक्ष दिसत असल्यामुळं त्यांच्या विषयी मोठा आदर''(पृ.८१) लेखकाच्या देशभक्तीच्या मागे तीन निरनिराळ्या प्रेरणा हे त्यांनी जे मत व्यक्त केले आहे त्यातून समजते; ''सर्वांत मुलगामी अन् प्रबळ होती. ह.ना. आपट्यांच्या अन् नाथमाधवांच्या शिवछत्रपती विषयक कादंबऱ्यांच्या वाचनानं निर्माण झालेली. दुसरी होती लोकमान्यांची-रक्तावाटे उतरलेली, तिसरी गांधीजीच्या स्वातंत्र्याच्या उद्घोषामुळे निर्माण झालेली.''(पृ.८२) म्हणजेच लोकमान्य टिळक, महात्मा गांधी व छत्रपती शिवाजी महाराज ह्या आदरणीय व्यक्तिंविषयी लेखकाच्या मनात श्रद्धा होती.

संत ज्ञानेश्वरांविषयी त्यांना प्रचंड आदर होता. भक्ती होती. 'या महापुरूषाच्या प्रज्ञेनं तत्वचिंतनाच्या किती प्रान्तामध्ये अगदी सहज विहार केला आहे! वय किती? तर केवळ पंधरा वर्ष. ते जणू 'बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते'।। या अनुभवाचं मूर्तिमंत रूप होते. वैदिक तत्वज्ञान, उपनिषद, तत्वचर्चा, साही दर्शनं, नास्तिकवाद, ते ज्या सांप्रदायाचे अनुगृहीत ते शैव तत्वज्ञान, ही सर्व त्यांच्या घरी पाणी भरीत होती. योग शास्त्राचे ते आचार्य. भक्तिप्रधान कर्मयोगाचे ते प्रवर्तक, ज्ञानियांचे शिरोमणि.'(पृ.४१८) गोपाळने ज्ञानेश्वरी वाचली. त्यातील तत्वज्ञानाने ते भारावून गेले. ज्ञानेश्वरांच्या विषयी त्यांच्या मनात अपार श्रद्धाभाव निर्माण झाला.

त्याच्या जीवनाला आकार देणाऱ्या आई-दादांविषयी त्याला आदर होता. त्याची थोरली बहीण माई विषयीदेखील त्याला आदर होता. माई विषयी लेखक म्हणतात, ''ती माझी केवळ थोरली बहीण नव्हती तर ती माझी गुरूही होती.''(पृ.८५) गणपतरावबाबांनी गोपाळला घरी नेवून त्याचा पुत्रवत सांभाळ केला. खूप प्रेम दिले. त्याच्या विषयीही गोपाळच्या मनात श्रद्धाभाव होता.

गाडगेबाबांसारख्या महान संताचा सहवास लेखकाला मिळाला. बाबांनी त्यांना अनुगृहीत केलं. गळ्यांत माळ घातली. घोंगडीचा तुकडा गळ्यात अडकवला. यावेळी मात्र चक्क बाबाच्या पायावर गोपाळने डोकं ठेवले. त्यांनी उचलून पोटाशी धरलं. तेव्हा लेखक म्हणाले, ''आता दाही दिशा माझ्यासाठी खुल्या झाल्या होत्या.''(पृ.२११) संत गाडगेबाबाच्या विषयी गोपाळच्या मनात

प्रचंड श्रद्धाभाव असलेला दिसतो. त्याचबरोबर लक्ष्मणबुवा इगतपुरीकर, मारूतीबुवा गुरव, श्रीधरशास्त्री पाठक हे गोपाळला गुरू म्हणून लाभले. ते लेखकाला श्रद्धास्थानी व पुजनीय होते.

**१.२.१.५. सत्तांतर :**

माणसामध्ये ज्याप्रमाणे कुटुंबातील मोठ्या व्यक्ती किंवा प्रमुख यांच्याविषयी आदरभाव वा श्रद्धा असते, ते सांगतील त्याप्रमाणे कुटुंबातील सर्वच सदस्य कृती करतात. त्यांच्या सूचनेप्रमाणे वागतात. प्रमुखांच्या सूचनेचे पालन करतात. त्यामधून जसा श्रद्धाभाव दिसतो, यांचा मान राखला जातो. कुटुंबाप्रमुखालाही आपल्या घरातील सदस्यांविषयी काळजी असते. त्याप्रमाणेच वानर टोळयांमधील टोळीप्रमुखाला मानाचे स्थान आहे. टोळी प्रमुख म्हणजे हा 'हुप्या' आपल्या ओळीतील सर्वांच्या संरक्षणाची, अन्नाची, भविष्याची, संध्याकाळच्या मुक्कामाची काळजी घेतांना दिसतो. म्हणून टोळीतील इतर वानर नर–माद्या, छोटी मुले हया टोळी प्रमुखाच्या म्हणजेच 'हुप्या'च्या सूचना व इशाऱ्यानुसार आपली कृती हालचाल करताना दिसतात. तो टोळीप्रमुखच त्यांच्या श्रद्धेचे स्थान असतो. टोळीतील सव्रजण त्यालाच आपला कर्ता–करविता, अन्नदाता, संरक्षणकर्ता समजतात. म्हणूनच कादंबरीत मुडा, मोगा, लालबुडया, दाढीवाला हे आपापल्या टोळीतील इतर सदस्यांच्या श्रद्धास्थानीच असलेले दिसतात.

**१.२.१.६. झोंबी :**

आनंदाच्या गावात प्रामुख्याने रामाचे मंदिर, गैबीचे मंदिर व यल्लमा देवीचे मंदिर या मंदिरांचा लेखकाने विविध प्रसंगी उल्लेख केलेला आहे. आनंदचे पहिल्यांदा शाळेत नाव घातले तेव्हा दादाने म्हणजे आनंदच्या वडिलांनी रामाला नारळ फोडला.(पृ.३४) आनंदचा संबंध तालुक्यात इयत्ता सातवीत प्रथम क्रमांक आला तेव्हा आनंदने गैबीच्या मंदिरात पेढा ठेवला व त्यानंतर मारूतीच्या मंदिरात जाऊन मारूतीला प्रदक्षिणा घातली.(पृ.२०६) गावाच्या बाहेर पाटलाच्या नव्या वाड्यापलीकडं एक यल्लमा देवीचे मंदिर होते. तिथे वर्षातून एकदा जत्रा भरत होती.(पृ.२१७)

आनंदचा जन्म झाला आणि रतनू म्हणजे लेखकाच्या वडिलांना आनंद झाला. हलसिद्ध आप्पा नवसाला पावला म्हणून वडिलांनी आनंदच्या बारशाला भंडारा घातला. गावापासून दहा मैलावर असणाऱ्या आप्पाच्या वाडीतून हलसिद्ध आप्पाचे देव पालखीत घालून गावाकडे आणले.(पृ.१९) अशा प्रकारे राम, गैबी, यल्लमादेवी, हलसिद्ध आप्पा ह्या ग्रामदैवतांना श्रद्धेने पुजल्याचे लेखकाने कादंबरीत व्यक्त केले आहे.

विविध आदर्श व्यक्ती ही कादंबरीत लेखकाने पुजनिय मानल्या आहेत, त्यामध्ये प्रामुख्याने शाहू महाराजांचा उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. कागल हे शाहूमहाराजांचे औरस गाव होते. दरवर्षी गैबीच्या कुस्त्या, बैलगाड्यांच्या शर्यती, रेड्या-बकऱ्यांच्या टकरी होत होत्या. प्रत्येक शेतकऱ्याच्या मनात शाहूमहाराजांविषयी आदराचे स्थान होते. आपल्या मुलाच्या पाठीवरून, बैलाच्या पाठीवरून शाहू महाराजांचा हात फिरावा असे प्रत्येक शेतकऱ्याला वाटत होते.(पृ.४) कादंबरीच्या ओघात कालखंडानुसार महात्मा गांधींच्या वधानंतर गावात जाळपोळीचा उल्लेख आला आहे. 'महात्मा गांधींविषयी लेखकाचा मित्र विठोजीच्या मनात असलेला आदर व्यक्त होतो. 'गांधी म्हणजे आज सगळ्या जगातला थोर माणूस त्या माणसाला मारायचा म्हंजे जगाची केवढी हानी झाली! आपल्या देशाचं केवढं वाटोळं झाल?'(पृ.१७६) शाहू महाराज व महात्मा गांधींच्या विचारांवर लेखकाची श्रद्धा होती.

लेखकाला वाचनाचा छंद होता. 'शिवाजी महाराजांची कारकीर्द पुनः पुन्हा वाचण हा आवडीचा छंद'.(पृ.९१) ना. गोखले, लोकमान्य टिळक, आगरकर, स्वामी विवेकानंद, साने गुरुजी यांची चरित्रे लेखकाने वाचून काढली. या सर्व आदरनिय व्यक्तींच्या कर्तृत्वाचा ठसा लेखकाच्या मनावर उमटला.(पृ.१८०) अशाप्रकारे ग्रामदेवता व काही वर उल्लेखलेल्या व्यक्तींविषयी लेखकाच्या मनात श्रद्धाभाव होता.

**१.२.१.७. झाडाझडती :**

जांभळी करांची खैरमोडे गुरूजींवर फार श्रद्धा होती. धरणग्रस्तांचे दुःख काय असते? हे खैरमोडे गुरूजींनी फार जवळून अनुभवले होते आणि त्यामुळे जांभळी धरण होऊच द्यायचे नाही असा त्यांनी दृढ निश्चय केला पण त्यांचा हा निर्धार खासदार शिंगाडे यांनी हाणून पाडला. त्यामुळे धरण होणारच हे लक्षात आल्यावर किमान या धरणग्रस्तांवर अन्याय होऊ नये, प्रत्येक धरणग्रस्ताला योग्य लाभ व्हावा. यासाठी खैरमोडे गुरूजींनी खस्ता खाल्ल्या. ''गुरूजी गावकऱ्यांच्या काळजाची कळ झालेले. कैक वेळा गुरूजी म्हणजेच जांभळी बुद्रक असे वाघेठाण तालुक्याला वाटायचे.''(पृ.१०) धरणग्रस्तांचे खैरापूरमध्ये पुनर्वसन करण्याचे ठरले म्हणून जांभळीकर खैरमोडे गुरूजींसोबत खैरापूरला जायला निघाले तेव्हा गुरूजींनी देव्हाऱ्यातल्या खंडोबाला अगरबत्ती लावली. तसेच चौकटीवरच्या बाबासाहेबांच्या फोटोला मनोभावे नमस्कार केला.(पृ.४४) म्हणजे खैरमोडे गुरूजी खंडेरायाला जसे भजतात तसाच भाव बाबासाहेबांबद्दल त्यांचा मनात असलेला

जाणवला. जांभळीकरांनी खैरमोडे गुरुजींवर तर खैरमोडे गुरुजींची खंडोबावर व बाबासाहेबांवर श्रद्धा होती.

जांभळी गावातील लोक देवभोळे होते. गावामध्ये लाडूबाचे मंदिर, मारूतीचे मंदिर होते. काळूबाईचे देऊळ, जाधवांच्या वस्तीवरची तामजाई ही ग्राम दैवते होती. दहा वर्षांपूर्वी मुंबईवाल्यांनी वर्गणी काढून मारूतीचे मंदिर बांधले. देवळाच्या भोवती चिंचेचे बन होते. मारूतीची संगत करणारी दहा-बारा माकडे चिंचेच्या झाडावर वस्तीला होती. देवबन म्हणजे लाडूबाच्या जवळचा दहा-पंधरा एकराचा, घनदाट झाडीचा डाग. तिथे आंब्या-जांभळीची आणि ऐनाची घनदाट झाडी होती. देवबनाच्या आजूबाजूची रानं उजाड झाली होती पण देवबनाच्या कस्पटाला सुद्धा कोणी कुऱ्हाड लावण्याचे धाडस करीत नव्हते. कारण जो कुऱ्हाड लावील त्याचा वंशखंड होतो अशी लोकांची समजूत होती.

जांभळी गाव धरणात बुडणार नाही अशी गावातील लोकांची भ्रामक समजूत होती. त्यांची काळूबाईवर श्रद्धा होती. काळूबाई जांभळीला धरणात बुडून देणार नाही असा ठाम विश्वास होता. देवीची पूजा करणारा ब्राह्मणाचा दिगुआण्णा छातीवर हात ठेवून लोकांना विश्वासाने काळूबाई गाव बुडून देणार नाही असे सांगत होता. देवभोळे लोक देवीला कौल लावीत होते काळूबाई गाव बुडून देणार नाही. अशा अपेक्षेने देवीकडे पाहात होते. तामजाई म्हणजे गावची गुराढोरांची देवी होती. गुराखी पैसे गोळा करून तामजाईला खाऱ्या माशाचा नैवेद्य दाखवित होते. अशा प्रकारे जांभळीतील लोकांची त्यांच्या ग्रामदैवतावर मनोभावे श्रद्धा होती.

**१.२.१.८. राघववेळ :**

अश्विन महिन्यात नवरात्र बसले जाते. त्या नवरात्रात मोठ्या श्रद्धेने मातंग समाजातील लोक इनाईचा उत्सव साजरा करतात. ''इनाई म्हणजे मांगांची गौरी! महालक्ष्मीच्या मुखवट्याची नवरात्रात मांगांची इनाई होते. इनाई सोबत असतो तिचा नवरा शंकरदेव.''(पृ.१३१) नवरात्रीच्या इनाई देवीचा म्हणजेच मांगांच्या गौरी पूजनाचा प्रसंग सुंदररित्या रेखाटला आहे. इनाईची कथा, स्त्रियांनी गायलेली लोकगीते यामधून मातंग समाजाचा इनाईवरील श्रद्धाभाव प्रकट होतो. हाल्या मारल्याची केसचा निकाल ज्या दिवशी असतो त्याच्या अगोदरच्या दिवशी पायरू गोपाळराव देशमुखाच्या घरी जातो. त्याला म्हणतो अशा प्रकारच्या केसेसमध्ये दंड होतो की शिक्षा होते. त्यावर देशमुख त्याला उत्तर देतो ''काय सांगाव बा. सायबाच्या मनावर आसते ते''(पृ.३००) त्यावर पायरू काहीच बोलत नाही. मनोमन फक्त मरीआईचा धावा करतो. ''माय गंगे, तूच घ्ये

आत! सजागीजा व्हवू देऊ नोको''(पृ.३००) संकटातून मरीआईने आपल्याला वाचवावे असे पायरूला वाटते. यावरून मरीआईवर असलेला श्रद्धाभाव यातून दिसतो.

**१.२.१.९. ताम्रपट :**

इंग्रजांविरुद्धच्या लढ्यामध्ये त्यांचे आदर्श जयप्रकाश, सुभाषचंद्र बोस. 'आपले नेते जयप्रकाश नारायण, राममनोहर लोहिया, अच्युतराव पटवर्धन'(पृ.५) असं नाना आपल्या सहकार्यांना समजावून सांगतात. तुकाराम भोईटेला नेहरू व गांधीजींबद्दल आदर होता तिच त्याची श्रद्धास्थाने होती. नानांच्या सहकार्यांच्या दृष्टीने नाना हे श्रद्धास्थान होते.

**१.२.१.१०. तणकट :**

कबीर ज्या व्यक्तींना श्रद्धेने मान देत होता त्यातील त्याचे आदर्श शिक्षक पुजारी सर. हायस्कुलमध्ये असताना कबीरची पुजारी सरांवर श्रद्धा होती. त्याच्या वर्गातील इटल्या, तो बाबू, मांगवाड्यातला बब्या यांना पुजारी सर स्वतः पुस्तक आणून द्यायचे. कबीरला वह्यापण द्यायचे. अभ्यासाची चौकशी करायचे. दहावी पास झाल्यावर तालुक्यात कोणत्या शाळेत प्रवेश घ्यायचा, कोणते विषय ठेवायचे या साऱ्या गोष्टी त्यांनीच काळजीपूर्वक पाहिल्या होत्या. यामुळेच पुजारी सर त्याच्या समोर एक आदर्श व्यक्ती होते.(पृ.४५) अशा प्रकारे पुजारी सर कबीरच्या श्रद्धास्थानी होते.

**१.२.१.११. डांगोरा एका नगरीचा :**

सिद्धमठ म्हणजे साइखेड संस्थानचे श्रद्धास्थान होते. गावातल्या भाविकांना तो सगळा परिसरच पवित्र वाटत असे. साइखेडामधील सर्व जनता मोठया श्रद्धाशीलतेने सण, उत्सव साजरे करीत असत. त्याचे चित्रण लेखक करतो. ''रीत अशी होती, की नव्या राजवाडयापासून निघालेली मिरवणूक जुन्या राजवाडयातील देवघरापाशी प्रथम येई. पायउतार होऊन राजा-राणी कुलस्वामीनीला जोडीनं नमस्कार करीत. मग राणी सरकारांची स्वारी तिथचं थांबत असे. मानकऱ्यांच्या स्त्रिया व इतरही आमंत्रित सुवासिनी तिथं आधीच जमलेल्या असत. हळदी कुंकू देणं, एकमेकींची ओटी भरणं, चुडेदान असा समारंभ बराच वेळ चाले. अत्तरगुलाब आणि पानसुपारी झाल्यावर देवघरात संध्याआरती होई. चौघडा-सनई वाजे. खिरापत वाटली जाई. या मधल्या वेळेत राजेसाहेबांनी विजययात्रा गावच्या मुख्य अशा एकमेव रस्त्यावरुन उत्तरवेशी बाहेर

पडे. वाटेत सवाष्णं बायका पाण्यानं भरलेल्या घागरी राजाच्या वाटेवर रिकाम्या करीत. पुरुष माणसं फुलं-गुलाल उधळत.

गावशीव ओलांडून यात्रा तारकेश्वरीच्या जंगलसीमेवर यायची. तिथं लगत श्रीभवानीचं व त्रिपुरान्तकाचं मंदिर होतं. त्या मंदिराच्या मध्यावर दीपमाळ होती. अन् दिपमाळेसमोर शमीवृक्ष होता. दीपमाळेसकट शमीला प्रदक्षिणा घातली जाई. 'हरहर महादेवा'चा न् जगदंबेचा 'उदे उदे'चा मुक्तकंठानं जयजयकार होई. तोवर दशमीच्या चंद्राचं नहार चांदण त्या सुगंधी वनराईवर पसरलेलं असे.''(पृ.५२)

तारकेश्वरी, श्रीभवानी, त्रिपुरान्तकाचं मंदिर हे सर्वांचे श्रद्धेचे ठिकाण होते. शास्त्रीबुवा नेहमी सांगत, ''मी कोण चिंता करणारा? सर्व साक्षी ईश्वर आहे. त्याच्यावर भरवसा ठेवा. कालच नृसिंह जयंती झाली. आजपासून स्वस्थ चित्तानं नृसिंहाचा जप सुरु करा. त्रिकालं.'' श्रद्धेने नृसिंहाची भक्ती करा मग दुश्मनाचा नाश होईल. अशा श्रद्धेच्या भावनेने शास्त्री म्हणतात.

संस्थानातल्या लोकांची देव-देवतांवर श्रद्धा होती, त्याचप्रमाणे समाजाच्या उद्धारासाठी महान कार्य करणाऱ्या विभूतींवर श्रद्धा होती. त्यामध्ये शाहू छत्रपती, टिळक, महात्मा जोतिबा फुले, न्यायमुर्ती रानडे, स्वामी विवेकानंद, अब्राहम लिंकन, इत्यादींवर श्रद्धा होती. हंबीर या व्यक्तिमत्वाविषयी लेखक म्हणतात, ''त्याच्या वडिलांचे निर्मळ आचार-विचार, अक्कलकोट स्वामींची तस्वीर आणि तुकारामांचा गाथा ही दोन श्रद्धास्थाने हंबीरने त्याही वयात मनानं स्वीकारली होती.''(पृ.१९९) अग्नीकांड घडवून आणणाऱ्याला शंभूराव जाधव आपल्या लेखणीतून बजावतात, ''वारकरी धर्ममंदिराचा कळस म्हणून लहानथोर मराठी भाविक ज्यांच्यापुढे नतमस्तक होतात, त्या तुकाराम महाराजांचे श्रद्धापूर्वक स्मरण एका घरगुती उत्सवाने साजऱ्या करणाऱ्या आमच्या एका नागरिक बंधूला अद्दल घडावी म्हणून ज्या कोणी हे अग्नीकांड घडवून आणले त्यांचा आम्ही जाहीर धिक्कार करीत आहोत.''(पृ.२६०) संतांविषयी नागरिकांमध्ये श्रद्धाभाव दिसतो. आदर्श व्यक्तींविषयी व देवदेवतांविषयी साईखेड संस्थानामधील लोकांमध्ये श्रद्धाशीलता दिसते.

**१.२.१.१२. बारोमास :**

प्रस्तुत कादंबबरीत सोनेरी टोळीला मारूतीची मूर्ती सापडली होती. सुभानराव आणि आजूबाजूच्या शेताचे मालक शनिवारी किंवा शनी अमावस्येला मूर्तीला शेंदूर लाऊन उडीद-तेल, रूईच्या पानाच्या माळा घालून पूजा करीत नारळ फोडायचे. शेतकरी शेतावर पेरणी, कापणी किंवा मळणी असली तर ते श्रद्धेने या मारूतीरायाची पूजा करीत होते.(पृ.३३) सोनेरी टोळीच्या कार्याला

मारुतीरायामुळे बळ मिळत होते. 'हनुमान म्हणजे शक्तीचा अन् भक्तीचा देव.'(पृ.३८) गावाच्या नदीच्या पलीकडच्या काठावर एक शंकराचे मंदिर होते. पाऊस पडावा म्हणून काही लोक कावडीने पाणी आणून गाभारा भरत होते. सगळा वेळ ते त्या कामातच घालवितात. 'हे सगळं भक्तिभावामुळे ! हा भक्तिभाव नसता तर माणसांनी काय केलं असतं? खून, मारामाऱ्या, लुटालूट... बलात्कर.... पण गुंतले बिचारे देवाच्या ध्यानात...'(पृ.२०४) श्रद्धास्थाने असल्यामुळे बऱ्याच वेळा माणूस वाईट गोष्टींपासून अलिप्त राहण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारे मारूती, शंकर या देवतांवर लोकांची श्रद्धा होती. तसेच कादंबरी नायकाचे वडील विठ्ठलाचे भक्त होते. मुखात सतत विठ्ठलाचे नाव होते तसेच नायकाची आई शेवंतामाईने महानुभव पंथाचा स्वीकार केला होता. 'एकनाथही लीळाचरित्राचे वाचन करताना आढळतो.'(पृ.२१०) एकूणच एकनाथचे कुटुंब श्रद्धाळू असल्याचा आपणास प्रत्यय येतो.

**१.२.१.१३. भूमी :**

मैथिलीच्या आईचा धर्म ख्रिश्चन असल्याने तिची येशूवर श्रद्धा होती, त्यामुळे ती चर्चमध्ये येशूसमोर कॅण्डल लावत होती पण तिने मैथिलीला चर्चमध्ये जाण्यास सक्ती केली नाही. रविवारी चर्चमध्ये जा नाही तर देवळात उदबत्ती लावून ये. असे मैथिलीची आई मैथिलीला सांगत असे. म्हणजेच मैथिलीच्या आईची येशूवर श्रद्धा होती पण तिचे पती हिंदू धर्मीय होते, म्हणून तिने मैथिलीला चर्च किंवा मंदिर यामध्ये कोठेही जाण्यास स्वातंत्र्य दिले अर्थात मैथिलीने देवळातच जाणे पसंद केले.

**१.२.१.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : प्रस्तुत कादंबरीच्या पहिल्या भागात व्यक्तींवरील श्रद्धेचा उल्लेख आला आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना युवती यशोधरा व माधुरी यांच्यामध्ये चर्चा झाली. चर्चेचा विषय होता आपण शिकतोय ते कशामुळे? यशोधराने विचारलेल्या या प्रश्नाचा खुलासा तिनेच केला. त्यात तिने राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये सामाजिक सुधारणा व स्त्री शिक्षण याबद्दल लोकजागृती उत्पन्न केली. महात्मा जोतिराव फुले यांनी पुण्यात मुलींची पहिली शाळा काढली. भाऊराव पाटलांमुळे माझ्या पप्पाचे शिक्षण झाले. भाऊराव पाटलांनी सातारला सायन्स कॉलेज काढले. यशवंतराव चव्हाणांनी मराठा समाजाला खरी अस्मिता दिली. अर्थात नेहरूंनी आधुनिकता आणली. राजीव गांधीनी आयटी. टीव्ही आणला.' म्हणूनच आपण एम.ए. मास कम्युनिकेशन करतोय. या यशोधरेच्या उत्तरातून तिने ज्या आदरणीय व्यक्तींचा उल्लेख केला

आहे. त्यांच्याविषयी तिच्या मनात आदर आहे. वाचकानाही या व्यक्ती वंदनीयच आहेत. या महानविभूती जणू काय त्यांची अपार श्रद्धास्थानेच होती.

कु टुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : प्रस्तुत कादंबरीतील या भागातील विलासचे कुटुंब श्रद्धाळू होते. तुळजापूरची देवी हे त्यांचे कुलदैवत आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबातील लोकं ही बऱ्याचदा तुळजापूरला जातात. हर्षद विलासच्या घरी आला तेव्हा त्याने त्याच्या आईविषयी विचारणा केली असता विलास म्हणाला, ''आई न वडील तुळजापूरला गेलेत.''(पृ.११६) आई-वडील तुळजापूरला गेलेले असताना विलासला संजयने बातमी सांगितली की त्याचा पेपर इंटरनॅशनल जर्नलने स्वीकारला. संजय म्हणाला, ''तुझा पेपर इंटरनॅशनल जर्नलमध्ये ॲक्सेप्ट झालाय तेव्हाच तुझे आईवडील देवीचे दर्शन घेताहेत.''(पृ.११७,११८) म्हणजेच पेपर ॲक्सेप्ट होणे हा देवीचाच आशीर्वाद आहे असे संजयला म्हणायचे असावे. विलासची बहीण वनिता तुळजापूरच्या देवीच्या मंदिरात ध्यानाला बसली. ध्यान करताना तिच्या मनात आले. 'संशोधन करु पाहणाऱ्या लोकांशी आपण कसे वागले पाहिजे.'(पृ.१४८) देवी मार्ग सुचवेल असे तिला वाटले असेल. हा श्रद्धाभाव वरील विचारातून, कृतीतून व्यक्त होतो.

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : प्रस्तुत कादंबरीतील या भागातील जावई आईवडलांसमोर सिग्रेट न ओढता बाहेर जात असे. बाबा म्हणतात, ''मी ओढायचो, तेव्हा मी तरी आईवडलांसमोर कुठं ओढत होतो?''(पृ.१५३) कुटुंबव्यवस्थेत आई-वडील अगर वडीलधारी माणसे आपल्या श्रद्धास्थानी असतात. चौदा नोव्हेंबर, 'मुलीच्या आईचा तिसरा श्राद्धदिन'(पृ.१६६) व नेहरुंचा तो जन्मदिन, बालदिन म्हणून साजरा होतो. नेहरुंची आठवण काढली जाते.

देशमुख हायस्कुलच्या मैदानावर दहा-पंधरा हजारांवर श्रोतृवृंद दरवर्षी मोठया श्रद्धेने रामकथा ऐकतात. राम हा आपल्या संस्कृतीचा प्राण कसा आहे, हे गवंडी महाराज पुन्हा पुन्हा भक्तिभावाने रामकथा सांगतात. नृसिंह, गणपती, अंबाबाई, दत्त, राम, कृष्ण, शंकर, देवी यांच्यावर विधुर म्हाताऱ्याची श्रद्धा होती. तो म्हणतो, ''अंबाबाई आमचे कुलदैवत. तरी आई दत्ताची पूजा करायची. तिची दत्तात्रयावर भक्ती. काषाय वस्त्र करी दंडधारण्यम् कमंडलूम पद्मकरेन शंखं चक्रंगदाभूषित भूषणाध्यम् श्रीपादराजम् शरणं प्रपद्ये. दत्तात्रयाला मनोभावे मनात स्वतः आठवून नमस्कार केला.''(पृ.१७३) अशाप्रकारे मुलीचे बाबा मोठ्या श्रद्धाभावनेने ही कृती करतांना दिसतात. वडिलांविषयी व अनेक देवदेवतांविषयी श्रद्धाभाव असलेला येथे आपणास दिसतो.

**१.२.१.१५. खारीच्या वाटा :**

भैरोबा, मारूती, विठ्ठल, रूक्मिणी ही दैवते गावात होती. तसेच अखंड दगडात घडवलेला मूळपुरूष, शेंदूर फासलेला सोमजाईचा म्हसोबा ही त्या गावातील लोकांची श्रद्धास्थाने होती. डोंगरमाथ्यावर गर्द देवराई. देवराईत शेंदूर फासलेला देव देवाचं नाव 'जागोबा.'(पृ.३१) अशा ग्रामदैवतांवर लोकांची प्रचंड श्रद्धा होती. गावगाड्यात ग्रामदैवताला श्रद्धेचे स्थान म्हणून महत्त्व असते.

**१.२.१.१६. फेसाटी :**

उमदी गावात मलकारसिद्धाची यात्रा भरत असे. गावातील लोकांची मलकार सिद्धावर श्रद्धा होती. काका-काकू मुलांसाठी सगळ्या देवाला नवस करीत होती. लेखकाचा कुलस्वामी, 'खरसोंडी' सिद्धनाथच्या नवसाने जन्म झाला. काकूने श्रद्धेने देवाच्या पायरीवर डोकं ठेवलं होते आणि दोन वर्षांनी नाथाचा जनम झाला. देवाच्या पुढचं माझं नाव ठिवलं 'नाथबाबा' (पृ.९७) असे नाथा सांगतो. मलकारसिद्ध, खरसोंडी सिद्धनाथ, मरगूगाई, यलम्मा, आक्का मायाक्का या दैवतांचा उल्लेख कादंबरीमध्ये आला आहे.

लेखक सहावीच्या वर्गात शिकत असताना सावंत सरांनी त्याला प्रश्न विचारला 'मम्मी म्हणजी काय?' तेव्हा लेखकाने उत्तर दिले मम्मी म्हणजे मम्मी. सर रागावले तेव्हा तो पुन्हा म्हणाला, मम्मी म्हणजे आई तेव्हा सावंत सरांनी त्याच्या आई वडिलांचा उद्धार केला 'आई बाप येडी म्हणतात तुला शाळेत घातलया.' तेव्हा लेखक मनातल्या मनात म्हणाला,'व्हय माझी काकू काका येडी हायती, पण मनानं लई श्रीमंत हायती. माझ्यासाठी तुमच्यापेक्षापण हुशार हायती, तुम्हाला काय येतया उगूच कायतर शिकुताय'(पृ.८०) यावरुन नाथाला त्याच्या आई-वडिलांचा अभिमान होता. काका-काकू ही त्याची श्रद्धास्थानं होती. लेखकाने बऱ्याचदा शाळा सोडून देण्याचा निर्णय घेतला पण त्याला दादा व काकूने शाळेत जाण्याविषयी समजावून सांगितले आणि त्यामुळेच तो बी.ए. झाला. थर्ड इयरचा निकाल लागला नाथा पास झाला तेव्हा शिवानंद पाटील सरांनी विद्यापीठात एम.ए. करायचा सल्ला दिला. पुढील शिक्षणासाठी बाहेर पडलेला नाथा म्हणतो, ''काकू, काका व दादाच्या पाया पडलू, हिचं माझी देव हुती.''(पृ.१८७) म्हणजेच काका, काकू व दादा ह्यांनी नाथाच्या जीवनाला आकार दिला, तिच त्याच्यासाठी दैवत होती. याशिवाय मलकासिद्ध, बिरोबा, खरसोंडी, सिद्धनाथ आक्का-मायक्का ही दैवत श्रद्धास्थाने होती.

### १.२.२. अंधश्रद्धा :

श्रद्धेचे अंधानुकरण झाले की, अंधश्रद्धा निर्माण होते. समाजातील प्रत्येक गोष्टीकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिल्यास अंधश्रद्धा नक्कीच दूर होईल. अंधश्रद्धा ही एक समाजातील वाईट चालीरितीच असते. प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेल्या अंधश्रद्धांचा आढावा उदाहरणे देऊन ह्या घटकात घेतला आहे.

#### १.२.२.१. ययाति :

ययातिने तारुण्यात पदार्पण केल्यावर आईला त्याच्या लग्नाची घाई झाली होती. कारण ययातिचा मोठा भाऊ राजवैभव सोडून, राज्याचा अमृताचा पेला सोडून संन्यासी होतो. त्यामुळे आईच्या मनात ययातिविषयी हीच काळजी वाटत असते. पण ययातिला वाटते माझ्या भविष्यात ज्योतिषाने अगणित राक्षसांना मारीन किंवा भरपूर अश्वमेध करीन असं सांगितलं आहे. आई या गोष्टीला साफ नकार देते. ती म्हणते, 'ययु तो ज्योतिषी म्हणाला, हा मुलगा मोठा भाग्यवान आहे, तो राजा होईल. सर्व प्रकारची सूखं त्याला लाभतील; पण सुखी मात्र तो होणार नाही.'(पृ.१९) अशा प्रकारचे भविष्य ऐकल्यानंतर ययाति मात्र त्या गोष्टीवर उपहासाने हसतो. आई मात्र पुत्रप्रेमामुळे या भविष्यावर अंधविश्वास ठेवून सतत भयभीत होते. ययातिचा थोरला बंधू यति हा घरातून पलायन करतो. खडतर आयुष्य व्यतित करतो. गुहेत, जंगलात हिंस्त्र प्राण्यांमध्ये राहतो. त्याला अनेक चमत्कारिक गोष्टी अवगत असतात, पाण्यावरुन, अग्निवरुन चालणे त्याला जमिनीवरुन चालण्याइतक सोपं वाटायचं. माझा डावा डोळा लवतोय, हा मोठा शुभशकुन आहे. असे म्हणणे हा ही अंधश्रद्धेचाच घटक आहे.

राजवाड्यात आलेल्या ज्योतिषाला देवयानीने स्वतःचा हात दाखविला तेंव्हा ज्योतिषाने तिला वर्षभरात मुलगा होईल असे सांगितले. त्यानंतर शर्मिष्ठेचा हात पाहिल्यावर ही मुलगी फार दुर्दैवी आहे पण हिचा मुलगा सिंहासनावर बसेन असे सांगितले. त्यानंतर देवयानीचा मुलगा यदू व शर्मिष्ठेचा मुलगा यांचेही भविष्य हात पाहून ज्योतिषी सांगतो. ज्योतिषाचे भविष्य सांगणे, पाणी, अग्नि व जमीन यांच्यावरून चालणे तसेच डावा डोळा लवण्याचा शुभशकून ह्या अंधश्रद्धाच आहेत. महाराजांची दासी कालिका व कालिकेची मुलगी अलका हिला ययातिच्या आईने तळाघरात नेऊन कोंडले. तिचा अंत झाला. या अलकेने तिच्या मावशीच्या पोटी पुन्हा जन्म घेऊन जणू काही ययातिची सेवा करण्याच्या निर्धारानेच त्याची सून म्हणून पुरु सोबत राजवाड्यात येणार की काय असा विचार ययाति करतो. यावरुन पुनर्जन्म ही संकल्पना सुद्धा एक अंधश्रद्धा आहे असे वाटते.

**१.२.२.२. रथचक्र :**

कादंबरीची नायिका 'ती' तिचे पती मौनिबाबा घरातून निघून जातात तेंव्हा घरातील लोक महालक्ष्मीच्या झाडाला दरवर्षी तो परत केव्हा येईल हा प्रश्न विचारीत होती. पंचक्रोशीतील झाडे शहाणी झाली होती. तो अमक्या दिशेला सापडेल असं आळीपाळीनं सांगत. तिच्या थोरल्या जावेने एकदा हिशेब केला. बहुतेक झाडांनी तो उत्तरेस कोठेतरी आहे, असं सांगितल्याचं तिच्या लक्षात आलं तो आपल्या पायांनी चालत येणार असे ज्योतिषी सांगत.(पृ.१) मौनीबाबा सापडणार म्हणून लक्षबिल्व पिंडीला वाहण्याचं उदक सुटल.(पृ.२) दर अमावस्येला मौनी बाबांच्या अंगात येई(पृ.१६) तिचा उजवा डोळा सारखा लवत होता म्हणून तिन डाव्या हातातली पाटली काढून तिनं डोळ्याच्या कडेवर चेपली कुठल्या अशुभाची ती सूचना होती.(पृ.२८) अशा प्रकारच्या अंधश्रद्धेचा मौनीबाबाच्या कृतीतून प्रत्यय येतो.

**१.२.२.३. स्वामी :**

राघोबा निजामाला मिळून मुरादखान आणि विठ्ठल सुंदर यांना घेऊन पुण्यावर चाल करण्यासाठी निघाल्याची बातमी आली तेंव्हा त्यांच्या विरुद्ध लढण्यासाठी अद्याप फौज का आली नाही असे माधवराव गोपाळरावांना विचारतात तेंव्हा गोपाळराव म्हणतात, ''वडिलांचे पत्र आले आहे त्यात ते म्हणतात की, आपले सध्याचे ग्रह ठीक नाहीत, कार्तिकात चंद्रग्रहण आहे. चार दृष्ट ग्रहांची युती आपल्या राशीस आहे. मार्गशीर्षानंतर आपला जय निश्चित आहे, असे होरारत्नांचे मत आहे.'' कादंबरीच्या तिसऱ्या भागात रघुनाथरावांना माधवरावांनी नजर केलं असताना त्याच कालावधीत माधवरावांच्या राजयक्षाच्या आजाराने जोर धरला तेंव्हा माधवरावांच्या पलंगाजवळच्या कोनाडयात त्यांना गुलाल फासलेले तीन धरी लिंबू सापडले.(पृ.३२६)

अंधश्रद्धा दाखविणारे मुद्दे लेखकाने सांगितले तरी पार्वती काकू किंवा माधवराव यांच्याकडून त्या मुद्यांचे खंडण करण्यात आले आहे. पार्वती काकू म्हणाल्या, ''अशी पन्नास लिंब सापडली, तरी तू घाबरु नको. जा, जरा झोप जा''(पृ.३३७) माधवराव म्हणतात, ''रमा, लिंबू सापडलं म्हणून काळजी करु नको. जे होतं, ते परमेश्वरी इच्छेनं माझा त्याच्यावर विश्वास आहे, असल्या लिंबावर नाही. पण हे बाहेर कळलं नसतं, तर फार बरं झालं असतं.''(पृ.३३४) पण माधवरावांच्या आजारपणामुळे घाबरलेल्या रमाबाई मात्र म्हणतात, ''ह्या वास्तुत सध्यातरी आम्हाला वास्तव्य करता येणार नाही, प्रकृतीला ते इष्ट नाही, म्हणे.'' माधवरावांच्या आजारपणामुळे रमाबाई अंधश्रद्धाळू झालेल्या दिसतात.

**१.२.२.४. स्मरणगाथा :**

लेखक कुटुंबासह नागपूरला रहायला गेले. तेव्हा एका नाग चावलेल्या बाईवर महार मांत्रिक उपचार करीत होता. म्हणजे मांत्रिक मंत्र पठण करीत होता.(पृ.६२) विषारी नाग चावल्यावर त्याचे विष शरीरभर पसरले तर या शारीरिक दोषाला मांत्रिकाचे मंत्र कसे पुरे पडतील. गोपाळ नाशिकला गेला तेव्हा त्याला एका खानावळवाल्याने खानावळीत काम करण्यासाठी नेले. तेथील बल्लवगुरुची अंधश्रद्धा होती की, 'कावळ्याच्या अंड्याच्या बलकामध्ये ज्योत भिजवून पेटवली तर तिच्या प्रकाशात गुप्तधन दिसतं.'(पृ.१४८)

नगर जिल्ह्यातील राहूरी तालुक्यातील वरवंडी या गावी मरीआईचं मंदिर होतं. ती त्या भागातील आदिवासींची कुलदेवता असावी. पुजारीपण भिल्लाकडे होते. परिसरातील लोक तेथे नवस फेडण्यासाठी जात. बहुधा नवस मुलांच्या आजारात केलेले असत. असे की, 'माझं दोन पायाचं वाचू दे, आई गे, तुला चार पायाचं वाहीन. 'वाहीन' चा अर्थ कापीन आणि खाईन'(पृ.२०६) मुलाला देवीच्या पायावर ठेवून शेंदूर माखला जात असे. देवीला हळदी-कुंकू-उदबत्ती कापूर वाहिले जात असे. मग बकरु लावण्याचा विधी पार पडे. मग बकऱ्याला कापले जायचे. बकऱ्याचं मुंडकं, कातडं अन् एक फरा भिल्ल पुजाऱ्याच्या वाट्याचा असे. त्याला चार आणे व मुलाण्याला चार आणे दक्षिणा मिळत होती. शिवाय पुजाऱ्याला जेवायलाही मिळायचे. तेथेच चुलीवर मटन शिजविले जात होते. भाकरी केल्या जात होत्या. सर्वजण यथेच्छ जेवूण परतायचे.(पृ.२०६)

गोपाळ पाटखळ बोरखळ्या गावात असतानांचा एक प्रसंग त्याने सांगितला. तेथे वास्तव्याला असताना एक मावशी त्यांना जेवण आणत होती. तिने तिच्या बरोबर वीस एक वर्षाची महिला आणली होती. त्या महिलेचा पती सैन्यात होता. त्याला गोळी लागून वीरमरण आले होते. तेव्हापासून तिने एक व्रत केले होते. ती महिन्यातले चार दिवस वगळता रोज कागदावर सव्वाहजार रामनाम लिहायची व कागदाचे चिठ्ठे एकेकावर एक रामनाम असे फाडायचे. त्यांच्या बारकाल्या गोळया करायच्या. पिठात त्या सव्वा हजार गोळया घालायच्या मग त्या सव्वा हजार गोळया नदीतल्या माशांना खाऊ घालायच्या. असा तिचा नेम होता. एक दिवसाचे रामनाम गोपाळकडून लिहून घेण्यासाठी त्या आल्या होत्या.(पृ.२३२,२३३) अशाप्रकारे विविध अंधश्रद्धांचा उल्लेख लेखकाने कादंबरीत केला आहे.

गोपाळचा मित्र सोहोली गावचा जिजाबा त्याच्या गावात सप्ताहाच्या निमित्ताने गोपाळ गेला. सोहोली गावातही त्यांच्या देवाला लोक बकरी कापत. त्या गावातील लोकांचे उद्बोधन करावे असे जिजाबाने गोपाळला सांगितले. तेंव्हा गोपाळने निर्णय घेतला या गावातील लोकाचं देवासाठी बकरी कापनं बंद करायचे आणि मगच येथून जायचे... गोपाळने त्या गावात कीर्तनासाठी तुकाराम महाराजांचा अभंग घेतला होता,

'नवसे कन्यापुत्र होती

तरी का करणे लागे पती।।'(पृ.२३७)

'देवाला नवस करतात, का देवा, मला मूल होऊ दे, तुला बकरु कापीन, आता एका बकऱ्याची लाच घेऊन जर देव मूल देतो, तर मग मुलगी शोधा, मुडवळ्या बांधा, वाजंत्री वाजवा, जेवण घाला. हे सगळं कशासाठी? सरळ बकरु घेऊन जावं देवाच्या स्वाधीन करावं. एक मूल घेऊन परत यावं!'(पृ.२३८) गोपाळ पुढे कीर्तनात सांगतो. लोक मारुतीला नवस करतात. एवढी ही सावकाराने लावलेली दहा हजारांची फिर्याद माझ्यासारखी होऊ दे. तुला नारळ फोडीन! कर्मधर्म संयोगाने फिर्याद याच्याप्रमाणे होते मग 'पोरांना म्हणतो, सखू! बकू! ठकू! गंग्ये! गोद्ये! चिम्ये! सुभ्ये! सखाराम! बकाराम! सगळी देवाच्या पाया पडा त्याला म्हणावं सुखीऽऽ ठेव!'(पृ.२३७)

गोपाळ कीर्तनातल्या विवेचनावर विनोद करतो. 'आता तुम्ही असं पाहा, की नखा एवढ्या खोबऱ्याच्या तुकड्यापोटी एवढया अवघ्या फलटणीला सुखी ठेवील देव? तो काय गांज्या प्यायलाय?'(पृ.२३७) गोपाळ परभणीस कोण्या एका मळयात सप्ताहात कीर्तन करीत होता. एके दिवशी कीर्तनात गोपाळने अंगात येणाऱ्या देवांवर झोड उठवली. 'वारकरी, ब्राम्हण, सावकार, शिक्षक यांसारख्या लोकांच्या अंगात कधीच देव येत नाही. मात्र जे आठ आठ दिवस स्नान करीत नाहीत, वाटेल ते खातात-पितात, खरं खोटं बोलायला मागंपुढं पाहात नाहीत, त्यांच्या अंगात देव येतो!'(पृ.२९०)

'प्रत्यक्ष जगताचा निर्माता-तो म्हणे यांच्या अंगी घुमू लागतो! अंगाला आळोखे काय, पिळोखे का, नाचणं काय, हुंकारण काय, डरकाळ्या फोडणं काय! अरे हा काय तमाशा आहे?' तुकाराम बाबांनी म्हटलं,

अंगी दैवत संचरे! मग तेथे काय उरे।।

'यांच्या अंगावरच्या फाटक्या धडुत्यांना ठिगळे लावणं यांना जमत नाही आणि म्हणे जगच्चालक परमात्मा यांच्या अंगात येतो. अरे परमात्मा म्हणजे काय, परसांतली भाजी आहे, की

आपली कुणीही खुडून काखोटीला मारावी?'(पृ.२९१) अंगात येण्याच्या प्रथेवर हल्ला केल्यामुळे त्या गावातली महिला की जिच्या अंगात येत होतं तिने दुसऱ्या दिवशी चांगलाच गोंधळ घातला. तिने तिथे तिच्या अंगात आले व तिने गोपाळला म्हटले, ''तुला असुदाच्या गुळण्या फुटतील''(पृ.२९३) त्या गावातली ती मोठी प्रसिद्ध बाई होती. करण्या करीत असे. मुठीबिठी मारीत असे. उतारे, तोडगे, निंब असा तिचा मोठा धाक होता.(पृ.२९३)

अशा प्रकारे स्मरणगाथा या कादंबरीत लेखकाने देवाला नवस करणे, नवस फेडण्यासाठी कोंबड, बकरु मारणे, अंगात येणे, देवाला नारळाची लाच दाखविणे यासारख्या अपप्रवृत्तींवर हल्ला चढवला आहे. म्हणजे विविध अंधश्रद्धेच्या बळी गेलेल्या लोकांना त्यातून बाहेर काढण्यासाठी अंधश्रद्धा निमूर्लनही केले आहे.

**१.२.२.५. झोंबी :**

आनंद यादव यांनी आपल्या झोंबी या कादंबरीत भूतांविषयीचे आणि ह्या संदर्भात अनेक घटनांचा उल्लेख केलेला आहे. आनंदच्या आजोबांना दहा-बारा मुलं झाली . त्यात आठ मुले होती. पण ती लहानपणीच एक-दोन वर्षांचे होऊन मरत. याचे कारण म्हणजे त्यांचे भाऊबंदच पोरांना बाधा घालतात किंवा लिंबू मंतरुन मारतात असा त्याच्या आजोबांना संशय होता.(पृ.१) लेखकाचे नाव शाळेत घातले. त्यांच्या वर्गात मुलांमध्ये भुतांविषयी चर्चा होत होती. त्यामुळे मुले घाबरुन शाळेत येत नव्हती. तेंव्हा निंबाळकर मास्तरांनी मुलांना सांगितले होते, ''देवाला भुतं भितात आणि 'रामा'च नाव घेतल्यावर तर भुतं पाऽर पळून जातात आणि हे तर 'रामा'चं मंदिरच आहे.''(पृ.३९) त्या विहिरीविषयी अनेक समज-उपसमज होते. ''तिच्यात साती आसरा हाईत. दोन-तीन वर्सांला एक तरी माणूस त्यांस्नी लागतं''(पृ.११२) सासुरवासाला कंटाळलेल्या स्त्रिया त्या विहिरीत जीव द्यायच्या किंवा पोहायला येणारे पुरुषही त्या विहिरीत मेले होते. त्यामुळेच त्या विहिरीच्या आराला दोन-तीन वर्सातनं माणूस लागत अशी गावभर चर्चा होती.

खळ्यात धान्य (मदन) करताना लेखकाचे वडील अनेकवेळा लेखकावर रागवायचे. वाकून मदन भरुन कंटाळा आलेला आनंद खाली बसला की, ''आन्दू, बसलास काय? तुला किर्तीदा सांगिटलं, बसून मदन भरलं की, लक्षीमी कटूटाळती म्हणून?'' लेखकाने टाळी वाजवून हातावरची कुस झटकली की वडील म्हणे, ''लक्षीमीला अशी झटकाय लागलास तर खळयात ऱ्हाईल का ती? आता पुन्ना टाळी वाजीव, तुझा हात वरुटया बंडी चेचतो का न्हाई बघ''(पृ.२३५) या अंधश्रद्धेपायी लेखकाचे वडील फसले होते पण नशिबाने बचावले होते.

एकदा लेखकाचे वडील कोल्हापूरला शेंगा विकायला गेले होते. शेंगा विकून येतांना पेठेच्या शेवटाला महादेवाच्या मंदिरासमोरुन जाताना महादेवाला नमस्कार केला. तेथे बसलेला गोसावी म्हणाला, ''जय शंकर, जय भोलेनाथ! बाबासाब, तू असा कसा चाललास? परमेशोरानं तुला आज रग्गड बरकत दिलीय, त्येच्या नावानं काहीतरी दान कर. लगेच इतरु नको.'' लेखकाचे वडील म्हणजे रतनू मंदिरात गेला व एक चवली देवासमोर ठेवली. तेंव्हा त्या गोसाव्याने आज तूला जी भरपूर लक्षमी मिळाली ती तू देवासमोर ठेव म्हणून सांगितले. त्या लक्षुमीवर अंगारा बांधून देतो व ती घरी गेल्यावर तीन दिवसात दुप्पट होईल असेही सांगितलं. वडिलांनी पैसे देवाच्या उंबऱ्यावर ठेवल्यावर गोसाव्याने हातचलाखीने पैशाची पुडी बदलली. बदललेली पुडी घेऊन वडील हॉटेलात गेल्यानंतर पुडी तपासून पाहिल्यावर शंका आली म्हणून पुडी उघडली तर त्यात नुसतेच कागदच होते. नोटा नव्हत्याच. त्यामुळे हवालदिल झालेला रतनू पुन्हा मंदिराकडे गेला तर गोसावी पळाला पण त्याला रतनूने पकडले. इतर लोकांनीही गोसाव्याला मारले. त्याच्या खिशातली पैशाची पुडी रतनूच्या ताब्यात दिली. अशा रितीने आनंदचे वडील अंधश्रद्धेपायी दोनशे चाळीस रुपयांना मुकले गेले असते.(पृ.२१२,२१३) अशा प्रकारे लेखकाने अंधश्रद्धेपायी माणसाचे कसे नुकसान होते हे पटवून देऊन कादंबरीच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मुलनही केले आहे.

गावात रामाचे, मारुतीचे मंदिर आहे. गावाच्या बाहेर यल्लमादेवीचे मंदिर आहे. त्या देवीची जत्रा गावात भरते. 'अल्लवा नि गैबीचा ऊरुस हे तर सगळ्या गावाचे असत. त्यात सगळ्या जाती धर्माचे लोक सामील होत.'(पृ.२१८) वेगवेगळ्या जातीधर्मातील लोकांचे विवाह त्याच्या प्रथेप्रमाणे केले जात होते. लग्न सराईपासून दिवाळी नि उरुसापर्यंत गावात सारखं काही ना काही बघायला मिळत होते. ब्राम्हण वर्ग सोडला तर इतर जाती-धर्माची लोकं एकोप्याने राहतात.

**१.२.२.६. झाडाझडती :**

हल्या वाचावा म्हणून गोत्याने खैरापुरात जाऊन कंठाबाईकडून अंगारंधुपार आणलं. त्याच्यावरुन लिंबू ओवाळून टाकं. कंठाबाई म्हणजे यल्लामाची भक्तीन वेगवेगळ्या संकटांपासून मुक्ती म्हणून आजूबाजूचे लोक कंठाबाईकडे जात. कंठाबाई मोराच्या पंखाचा साळूता आणला आणि सगळ्यांच्या अंगावर मारला. सर्वांना पवित्र केल. कंठाबाईनं आपल्या मोठ्या देवघरात सर्वांना नेले. तिनं आईचा दरबार असा सजवलेला की बघताक्षणी डोळं निवून जावत. सारी आईच्या पायावर नतमस्तक झाली. कंठाबाईनं लेकरांच्या कपाळाला भंडारा लावला.

पांडवांचा नातू राजा त्याला एकदा खूप ताप आला. पांडवाच्या सुनेने कंठाबाईचा अंगारा लेकराच्या अंगाला फासला. झाडापाला वस्त्रगाळ करुन पाजला, पांडबा तिला हात जोडून म्हणायचा. पोरी ऐक माज चल डागदराकडं. आणि शेवटी व्हायचं तेच झाला. राजान दम सोडला, राजा ना तू गेला.(पृ.२८९) पत्रावळेंनी कुशापाला सल्ला दिला. कुशापा तुझं नशीबच खोटं. कुठतरी पंचांगात बघ, ग्रह चांगले दिसत नाहीत तुझे. कुशापन श्रीरंग ब्राह्मणाच घर गाठल. श्रीरंगनं चार सोमवार येऊन जायला सांगितले. घरात फुकायला अंगारा दिला. कुशापानं अंगारा घरभर फुकलाच पण सरकारी कागद असलेल्या घडण्यावर निम्मी पुडी रिकामी केली.(पृ.३३६) कंठाबाई म्हणजे जंतरमंतर करण्यात अव्वल बाई. माझ्या बिरज्यावर खोट धरुन मूठ मारायची आणि चालतं बोलतं पोरगं गप् करायची, नुसत्या भीतीनंच नकुसाचं काळीज उडायचं.(पृ.३८५) धरणात गाव बुडणार नाही यासाठी बऱ्याच जणांनी कौल लावले.(पृ.८) काळू गाई धरणात बुडणार नाही, दिगुअण्णाची श्रद्धा(पृ.८) दिगुअण्णांनी काळूबाईंचा अंगारा काढला आणि प्रत्येकाच्या कपाळाला लावला.(पृ.११) वशा गुरवाच्या स्वप्नात काळूबाई आली. डोळ्यात पाणी आणून म्हणाली, गुलामांनो साऱ्यांनी वाड बांधलं, माड्या बांधल्या. पर मी गाव सांभाळीत उनापावसात मरतीया, माज्या आडोशाच बघाल का न्हाय? वशा गुरुवानं स्वप्नातच वचन देऊन टाकलं. पण आईन बजावलं. माजं देऊळ बांधायचं असेल तर दीस बुडल्यावर कामाला सुरुवात करायची आणि उगवत्या अंगाला दीसाचा गोंडा फुटायच्या आधी काम पुरं झालं पाहीजेल. एका रातीतच देऊळ बांधून पूर करायचं. सारा लाकुड फाटा, दगडं दीस बुडल्यावर गोळा करायची तर देऊळ निमतच राहिल तर गावाच वाटुळ होईल मेल्यांनो(पृ.११) कुणाला तरी धरणाची सय व्हायची आणि खिरीत खराटा पडल्यागत वाटायचं. आवडाई काळूबाईचा अंगारा दारात फुकायची(पृ.१५) हैबती बाजारात निघाला की आवडाई त्याच्यावरुन मीठ मिरच्या ओवाळायची.(पृ.१५)

''आय काळूबाय माज्या गावाला वाचव माझ्या धन्याला वाचव, करड्या पंखाच्या चार कोंबड्या वाहीन ग तुझ्या दरबारात''(पृ.१७) खैरमोडे गुरुजीची आई यसवदा ही जेजूरीच्या खंडोबाची भक्त थोरला दादू निजपल्यावर दहा वर्षे तिचं पोटपाणी पिकत नव्हतं. लेकरू झाडागत वाढलं असा दृष्टांत दिला पण त्यासाठी यसवदेन दरसाल पन्नास घरी पस्यापस्याची भीक मागायची. प्रत्येक गावातील दहा घरं असा पाच गावचा फेरा करायचा. शिधा गोळा करुन निवद बनवायचा. पोराच्या केसाला कोणीही धक्का लावला नाही. पोटातला पाच महिन्याच्या गोळा सांभाळीत यसवदेनं पाच गावं धुंडाळली. पन्नास घरचा पसा मागून निवदाच भागवलं.(पृ.३१) नकुसा पोटुशी

रहावी म्हणून अंगारंधुपारं केलं, देवरुक्या झाल्या पण फळ रुजना.(पृ.४२) दिगुआण्णा भातवाण पाण्यात बुडवून ते आईच्या अंगाला चिकटवीत होता. भातवाणं हवं तसं पडेपर्यंत तो देवीला कौल बोलत होता.(पृ.४५) दिगुअण्णा, ''अरे काळूआई निद्रिस्त आहे म्हणून तुमचे हे लाड. जरा लागू दे, तिच्या अंगाला पाणी. धरण भस्मसात झालं नाही तर जन्मात पुन्हा पूजा सांगणार नाही. समजलास!''(पृ.१५३) ग्रामीण जीवनामध्ये अंधश्रद्धा बाळगणाऱ्या लोकांचे प्रमाण जास्त असते. जेंव्हा मानवी जीवनावर संकटाचे सावट येते तेव्हा मनुष्य जास्त हळवा बनतो व त्या संकटावर मात करण्यासाठी अंधश्रद्धेचा बळी पडतो.

दिगुअण्णा काळूबाईची पूजा करणारा जांभळीचा ब्राम्हण होता. धरणाचे गाऱ्हाणे घेऊन येणाऱ्या प्रत्येकाच्या कपाळाला तो काळूबाईचा अंगारा लावून द्यायचा. दिगुंअण्णाच्या आधी वशा गुरव काळूबाईची पूजा करीत होता. परंतु काळूबाईचं मंदिर अर्धवट राहिल्याने गुरवाने अंथरुन धरले व त्यातच तो मरण पावला. त्याचीही मोठी कथा आहे. ती अशी गुरवाच्या स्वप्नात काळूबाई आली व माझ्यासाठी निवारा कर पण तिने एक अट घातली. मंदिराच्या बांधकामाला सुरुवात दिवस मावळल्यानंतर करावी व दिवस उगवण्याअगोदर मंदिर पुर्ण करावे पण तसे घडले नाही. मंदिर पुर्ण होण्याआधीच सूर्य नारायण उगवला व मंदिराचे काम अर्धवट राहिले.

'एक दिवस ह्या गावाची वाट लागणार. आजच एखाद्यावर जाईल एवढचं. पण गावचं मरण चुकणार नाही.'(पृ.१२) असा जांभळीकरांनी समज करुन घेतला आणि शेवटी धरण बांधण्याचा निर्णय ठाम झाला आणि जांभळीकर धास्तावले. जाधवांची आवडाबाई जांभळी धरण होणार या विचाराने कासाविस व्हायची. आवडाई काळूबाईचा अंगारा दारात फुकायची आणि देवीला हात जोडायची, ''आये, लेकराला बाशिंग तेवढं बांधू दे मग धरणाला कवाबी चूड लागू दे!''(पृ.१५) ''आय काळूबाय, माज्या गावाला वाचव. माज्या धन्याला वाचव. करड्या पंखाच्या चार कोंबड्या वाहीन ग तुझ्या दरबारात.''(पृ.१७) यावरुन आवडाबाई अंधश्रद्धाळू होती हे दिसते. पोटी मुले होणे यात देवाचा, अंगारा-धुपाऱ्याचा काहीही संबंध नसतो पण या देवभोळ्या लोकांना कसं समजणार, दहा वर्षात नकुसाला तीन वेळा गर्भ राहिला आणि पडला. गर्भ टिकावा म्हणून नकुसाने अंगारंधुपारं केल. देव-देवस्क्या झाल्या पण फळ रुजत नव्हत.(पृ.४२)

गुरुजींच्या जन्माची कहाणी ही थोडी अशीच आहे. गुरुजींच्या आईचे नाव यशोदा. यशोदा जेजुरीच्या खंडोबाची भक्त. गुरुजींच्या थोरल्या भावाच्या म्हणजे दादू येसकराच्या जन्मानंतर त्यांच्या आईला दहा वर्ष मुल बाळ झाले नाही. तेंव्हा आईच्या स्वप्नात खंडेराय आले व त्यांनी

आईला दरवर्षी पन्नास घरांमध्ये जाऊन भीक मागायची, प्रत्येक गावातील दहा घरं असा पाच गावांमधून शिधा गोळा करुन नैवद्य बनवायचा, असे केले तर पोराच्या केसालाही धक्का लागणार नाही. गुरुजी पोटात असतांना त्यांच्या आईने पाच महिन्यांचा गोळा सांभाळीत पाच गाव धुंडाळली. पन्नास घरातून धान्य जमवून नैवद्य केला. गुरुजी सहा वर्षाचे झाले तरी आई गुरुजींना बरोबर घेऊन धान्य मागत फिरली होती.(पृ.२९,३०) नकुसा किंवा गुरुजींची यशोदा यांनी मूलं व्हावीत म्हणून जो मार्ग अवलंबिला ती अंधश्रद्धाच होती.

खैरापुरामध्ये कंठाबाई यल्लामा देवीची भक्त होती. ती आईची भक्तीन होऊन संकटग्रस्तांचे संकट सोडविण्यासाठी त्यांना अंगारा देत होती. हिरा मास्तरीण अनेकदा कंठाबाईकडे गुरुजींचा डोळा चुकवून जायची. गुरुजींना कुठल्या तरी झाडाचा बाधिकार आहे. ते झपाटून टाकणार झाड गुरुजींना झडती घ्यायला लावतय आणि त्यावर उपाय तसेच शेवंतीच्या लग्नासंबंधीही सल्ला यासाठी हिराबाई कंठाबाईकडे गेली. तिच्या बरोबर आवडाई, नकुसा यादेखील कंठाबाईच्या दरबारात गेल्या होत्या. नकुसाचा मुलगा बिरज्या सारखा आजारी पडतो म्हणून नकुसाने कंठाबाईकडे गाऱ्हाणे मांडले. कंठाबाईने बिरज्याला भंडारा लावला. वास्तविक पाहता कंठाबाई इतरांच्या भल्यासाठी अंगाराधुपारा करणारी, पण तिला मात्र स्वतःला जीवनात फार मोठी ठोकर बसली होती. बालविवाह झालेल्या कंठाबाईचा नवरा वरातीच्या दिवशीच मरण पावला. लग्नाच्या रात्री बैलगाडीतून वरात निघालेली, फटाक्याच्या आवाजाने बैल उधळले, बैलगाडी उलटी पालटी झाली. कंठाबाईचा नवरा बैलगाडीच्या चाकाखाली सापडला व गतप्राण झाला.(पृ.२२९, २३०)

अशाप्रकारे स्वतःच्या जीवनाची दशा झालेली कंठाबाई गावकऱ्यांना अंगारा देऊन संकटमुक्ती कशी करणार असा प्रश्न पडतो.

**१.२.२.७. राघववेळ :**

वालंबीला कौशीने कुठे चालली विचारल्यावर ती म्हणते, 'मुलखावर..!' हे चिडून दिलेले उत्तर म्हणजे माणूस कोठे चालल्यावर त्याला हटकवू नये. ही अंधश्रद्धा त्याच्या पाठीशी होती. 'हो न बापा, तुह्या जोयशावाणी आधीच व्हरा जाणला.'(पृ.०२) ह्याशिवाय गिऱ्हाण मागणे, शेतातील खळे पुजणे, पोळ्याच्या दिवशी तोरण बांधणे, ईनाईचा उत्सव, धोंडी निघणे, देवाला नवस करणे, लाखोलीच्या पंगतीच्या वेळी लाकडे फोडणे, त्याशिवाय मातंगांना प्रसाद मिळणार नाही असा समज असणे, अशा विविध प्रकारच्या अंधश्रद्धा प्रस्तुत कथानकाच्या ओघात कादंबरीत येतात.

**१.२.२.८. ताम्रपट :**

नाना सिरुर यांचे पाळण्यातले नाव केशव होतं. पण तो सारखा रडायचा. रडून रडून घसा बसायचा तेंव्हा सुशिलाबाई म्हणाला, 'माझा नानुआजा पोटाला आलाय'(पृ.९) मृत पावलेली व्यक्ती पोटाला येणे ही एक अंधश्रद्धाच आहे.

**१.२.२.९. तणकट :**

नंदाप्पाच्या तळीजवळ बाळासाहेब शेंडबाळेला कोणीतरी बेदम मारले होते. ती जागा बाधित म्हणून प्रसिद्ध होती. कारण वर्षातून एकदा तरी त्या ठिकाणी अपघात हा होतच असतो. नंदाप्पाच्या तळी बाबत अनेक भूताखेतांच्या कथा सांगितल्या जात होत्या. त्यामुळे त्या जागेबाबत भीतीदायक वातावरण होते.(पृ.३३) एखादी जागा बाधित आहे ही केवळ अंधश्रद्धा आहे कारण अपघात होतात त्याला मानवी चुका कारणीभूत असतात असे वाटते. तसेच त्या विशिष्ट जागेवरच अपघात होणे हा योगायोगही असू शकतो. ज्या ठिकाणी अपघात होतो असा समज असतो त्या ठिकाणी माणूस सहाजिकच घाबरलेल्या अवस्थेत असतो.

**१.२.२.१०. डांगोरा एका नगरीचा :**

टुमालदाराबरोबर खांद्यावरल्या पडशीत नाही म्हटलं तरी हजारएक नगद नाणी, करोडगिरी रुपयांची. शिवाय चांदी-सोन्याचं. किडूक मिडूक पसाभर होते. तासाभरात दर्शनहळीचं सिवार लागणार होतं. ''माघातल्या त्या थंडीच्या रात्री पासलगावच्या देवीचं दर्शन त्यानं घेतलं. तिची खणानारळानं ओटी भरली. पुजाऱ्याच्या हाती दोन रुपये ठेवले. अन् नवस बोलून तिथनं काढता पाय घेतला. म्हणाला होता, आई जगदंबे, अच्युत कुलकर्ण्याचा काटा उपसून टाक. तुला चांदीचा साज वाहीन.''(पृ.२१३) प्लेगच्या साथीला बळी पडलेले बहुतांश जीव अतिशुद्र आणि अंत्यज होते. पूर्वजन्मीची पापं त्यांना भोवली असल्यानं, देवीची-रुद्राची आराधना करणाऱ्यांना त्यांच्याविषयी हळहळ दाखवायचंही कारण नव्हतं.(पृ.४०) साईखेड संस्थानामधील जनता भोळीभाबडी होती. त्याचप्रमाणे अंधश्रद्धेवर प्रमाणापेक्षा जास्त विश्वास ठेवणारी होती. प्लेगच्या साथीचे निर्मूलन करण्यासाठी एक गाव सुधारसमिती नेमली. त्या समितीमध्ये डॉ. थोरात, दिवाण खासणीस, चिटणीस माधवराव देसाई होते. ह्या समितीच्या मार्गदर्शनाखाली गावातलं घर अन् औषध पाण्यानं धुवून घेतलं. निर्जंतुक करुन टाकलं, उकिरडे साफ केले. रस्त्यांवरला, बोळाबोळातला पालापाचोळा आणि केर गाड्यांतून गावाबाहेर वाहून नेला. वेताळ टेकडीवर तो

पेटवून दिला. हा धृष्टपणासाठी वेताळाचा कोप होईल आणि गावाला, विशेषतः हे काम करणाऱ्या समितीच्या सदस्यांना कसा भोवेल ह्याविषयी पुष्कळच चुरचुरीत बोलणी ऐकू आली.(पृ.४१) साईखेडातील जनता पूर्णतः अंधश्रद्धेच्या आहारी गेलेली होती, हे वरील उदाहरणावरुन लक्षात येते.

**१.२.२.११. बारोमास :**

मधू हा पायाळू असल्याने त्याला जमिनीतील धनाचा लाभ होऊ शकतो. याची त्याला जाणीव करुन दिल्यामुळे तो आणि त्याची सोनेरी टोळी जमिनीतील धन मिळविण्यासाठी अंधश्रद्धेच्या बळी पडले. बनुबा नावाची हस्ती मधू आणि त्याची टोळी यांच्याकडून पाचशे रुपये घेऊन त्यांना धन मिळवून देण्यासाठी काहीतरी थातूरमातूर करतो, मंत्रोच्चार करतो व तुम्हाला आता जमिनीतील धन नक्की सापडेल. मधू व त्याच्या मित्रांना धन मिळो न मिळो बनुबाला मात्र प्रत्येकवेळी पाचशे रुपये मिळाले होते. 'जगाच्या कल्याणा संताच्या इभूती...'(पृ.३७) असं बनुबा स्वतःबद्दल म्हणायचा.

मधूच्या टोळीत धिवार नावाचा शिक्षकाची नोकरी असलेला मुलगा सामिल झाला कारण त्याची नोकरी पक्की होण्यासाठी डोनेशन भरायचे होते. धनाचा हंडा सापडला तर त्यालाही डोनेशन भरता आले असते. त्यांच्याबरोबर जमिनी खणतांना दिलीपच्या हाताला माणसाचा सांगाडा लागला. घाबरल्यामुळे उठता उठता त्याचे डोके आपटून तो पडला. मेंदूची नस तुटल्यामुळे किंवा सरकल्यामुळे वेड्यासारख वागू लागला. लोकांना वाटले त्याला भूताने झपाटले. माणूस मेल्यावर जळून राख झाल्यावर कुठून उडून येणार. 'समदे मनाचे खेळ हायेत हे. करणी कवटाळ, भूतखेतं, मंत्रतंत्र'(पृ.७९) असे मधू नथ्थू मोगलला स्पष्टीकरण देऊन एक प्रकारे अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य ही करतो. शेवतांमाईने मुलांना नोकरी मिळावी म्हणून नवस केल्याचाही उल्लेख आलेला आहे. 'देवीला इतले नवस केले, की मावले एक तरी पोराले नवकारी लागू दे. पण तिच्याबी काळजाले पाझर नाई फुटुन राहयला.....'(पृ.१४६) नवास सायास करुन एका तरी मुलाला नोकरी मिळावी अशी अंधश्रद्धा बाळगणारी शेवंतामाय दिसते.

**१.२.२.१२. भूमी :**

शंतनू आणि मैथिली सकाळच्या वेळी समुद्रकिनारी असलेल्या मंदिरातील दृश्य हे अंधश्रद्धा दर्शविणारे आहे. ''आता मंदिराच्या सभागृहात वर्दळ जाणवली. सकाळी साडेसहा वाजताच कुणाचा तरी महाप्रसादाचा नवस होता. अभिषेक होता. तरुण लग्न झालेलं जोडपं असावं. मंदिराचा

पुजारी त्यांच्या मस्तकावर कलशाचा आणि दिव्याचा स्पर्श करत होता.''(पृ.१७९) अशाप्रकारे नवसाचा उल्लेख हा अंधश्रद्धेचे निदर्शक आहे. मैथिलीची आई दवाखान्यात असताना मैथीलीला संध्याकाळी दिवा लावण्यास सांगत असे. तिच्यामते रात्री घरातल्या एका तरी रूममध्ये प्रकाश असावा.

**१.२.२.१३. उत्सुकतेने मी झोपलो :**

लग्न या विषयावर युरोप व भारत यांची तुलना करता युरोपात स्त्री पुरूष लग्न न करता एकत्र राहतात मग लग्न करतात तेथे घटस्फोट मोठ्या प्रमाणात होता. भारतात मात्र तसे नाही, नाईलाज म्हणून घटस्फोट होतात. माधुरीचे सुबोधशी लग्न झाले 'सात जन्म तोच पती असावा, पुनर्जन्मावर कोणीच फार विचार करत नाही' पुनर्जन्म ही अंधश्रद्धा आहे सात जन्म तोच पती मिळावा म्हणून भारतीय स्त्री देवाला श्रद्धेने सांगते पण तोच पती तिला मिळतो हे मात्र शास्त्रीय दृष्टीने सिद्ध झालेले नाही.

**१.२.२.१४. खारीच्या वाटा :**

लोकांना सापाविषयी अतिशय भय वाटे. सापाविषयी लोकांच्या मनात समज-गैरसमज होते. त्याला अंधश्रद्धा म्हणता येईल. 'आजोबांनी जखमी केलेल्या सापानं नातवाचा जीव घेतला', 'नागाच्या फणावर दिवा दिसला'.(पृ.९९) सापाला मारताना जर तो निसटला तर तो मारणाऱ्यावर डूख धरतो. वेळ साधून दंश करतो. माणसाला संपवितो या अंधश्रद्धेपोटी लोक दिसला साप की त्याला जीवे मार अशा वृत्तीचे बनले होते. अंधश्रद्धेबाबत लेखकाने सांगितलेला दहिहंडीचा प्रसंग, तो असा की दहीहंडी फोडल्यानंतर खाली पडलेल्या मडक्याच्या 'खापऱ्या वेचायला लहानथोर धिंगाणा घालीत त्याचे कारण, खापऱ्या धान्याच्या डिबक्यात टाकल्या की बरकत येते अशी भावना.'(पृ.१५२)

**१.२.२.१५. फेसाटी :**

लेखकाचा मोठा भाऊ देखणा होता. त्यामुळे दादा आजारी पडला की काकू त्याची दृष्ट काढायची, काकू चटणी, मीठ, वळचणीची काडी, तीन रस्त्याची माती, बोरीचा काटा, केसं, केरसुणीची काडी सगळं येकाजागी गोळा करुन तीनदा उतरुन चुलीत टाकायची. हातावर हात ठिवून काडकड बोटं मोडायची.(पृ.१४) जोंधळ्या पेंढ्या बांधून गंजी उभारल्यानंतर धान्य करण्यापूर्वी 'पाणी शिंपडून खळं सारवाण करायचं तेच्या मध्यभागी पाच दगडं ठिवून एक खापराचं

गाडगं, तेझ्यावर लोटकं, भात, वराण, जुंधळ्याची भाकरी, लिंबू, नारळ, ठिवायचा अन्‌वराण भात खळ्याच्या भोवंतनं शिंपडायचं.'(पृ.१५) 'काकूची देवावर अपाट श्रद्धा हुती, काकूच्या अंगात मरगुबाई येईची.'(पृ.८१) पुतळाबाईच्या अंगात आल्याचा उल्लेखे कादंबरीत आला आहे. पुतळाबाईला काका म्हणाला, ''देवा आमचं काय चुकलं माकलं तर आम्हाला तुझ्या पदरात घी. तेव्हा पुतळाबाईचं वारं बोललं नाय. भक्ता म्या पदरात घेईची नाय. येवढं मोठं काराण केललाचं पण माझ्या गादीला नवीन चोळी पातळ नेसुला नायचं. वटी भरला नायचं.''(पृ.१७४) यावरुन अंगात येणे ह्या अंधश्रद्धेचा उल्लख कादंबरीत आला आहे.

एकदा नाथाच्या घरच्या गुरांना गोचड्या झाल्या तेव्हा ज्योतिष्याने सांगितले, ''तुमच्या घराला करणी केल्याई, गोचडं सोडल्याती, तुमच्या घरात आनं हाय तर पानी नाय घरात व शेतात तीन तोंडाचं पुरलया. आमवश्याला करणी केल्याई. ती पण साप गरुड्यानं, लयं वाईट हाय. ती काढली पाहिजे नायतर तुमचं घर बुडणारं, जनावर मरणार, माणसालाबी धोका हाय''(पृ.७४) लेखकाने आणखी एक घटना सांगितली ती अशी, लेखक जेवत असताना एकदम कुडातनं लाल भडक पाणी अंगवार पडल ते पाणी कुंकवाच होतं घराच्या मागे जाऊन पाहिलं तर काय! 'पाच लिंबू, पाच बिबं, पाच सूया, दोन कणकीच्या बाहुल्या, बाहुलीच्या डोसक्यात पोटात अन्‌ गळ्यात सुया टोचल्या हुत्या. नारळाची शिंडी काढल्याली हुती. पिवळ्या कापडावर ठिवलं हुतं'(पृ.१६७) काकूला समजलं ही करणी आहे. त्यातच दुसऱ्या दिवशी नाथाला ताप आला. म्हणून काकू देवरशाकडे जाऊ लागली तेंव्हा तिला सांगितलं गेलं कोंबडा कापा, मरगुबाईला बोकड कापा. काकूने भूता खेताचं केलं. ताप कमी हुईना. शेवटी दवाखान्यात नेल्यावर डॉक्टरांनी शरीरातरील रक्त कमी होऊन अशक्तपणा आला आहे असे सांगितले. अशा प्रकारच्या अनेक अंधश्रद्धा कादंबरीत पाहावयास मिळतात.

**१.२.३. जातीयता :**

भारतीय समाजव्यवस्था ही अनेक जातीपातीच्या उतरंडीने तयार झालेली आहे. भारतामध्ये अनेक जाती असलेल्या दिसून येतात. तसेच उपजातीही दिसून येतात. या जातीव्यवस्थेमुळे भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर उच्चनिच्चतेचा भेदभाव आपल्या दृष्टीस पडतो. काही जातींमध्ये हीन प्रकारची वागणूक आपल्या समाजव्यवस्थेतील प्रतिष्ठीत उच्चवर्णीयांकडून दिली जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर वर्णजाती व्यवस्थेला बिनशिडीच्या इमारतीची (मनोऱ्याची) उपमा देतात. तसेच ते पुढे असेही मत व्यक्त करतात, ''या देशातील असंख्य जाती, पोट जातींचे समूह हजारो

वर्षे वेगळेपणाची भावना जपत राहीले. उच्चनीचतेच्या दृष्ट चक्रात पिढयान्‌पिढया गुरफटले. आपापल्या जातीच्या कुंपनातच जगत राहिले. वर्ण, जाती किंवा धर्मापेक्षा देश मोठा असतो हेच विसरुन गेले.''[५३] परमेश्वराने मानवाला जन्माला घातले.जन्माला घालताना त्याच्या भाळी कोणत्याही जातीचा शिक्कामोर्तब केला नाही. स्त्री आणि पुरुष असे दोनच भेद त्याने निर्मिले होते. जातीयतेचा जन्म हा मानवनिर्मित आहे. जातीयतेचा उगम हा वर्ण व्यवस्थेतून झाला. चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून मानवी समूहांमध्ये कामाची विभागणी करण्यात आली. विशिष्ट काम करणाऱ्या समूहगटाला त्याच्या कामानुसार संबोधले जाऊ लागले. त्यातूनच विविध जातींची निर्मिती झाली

**१.२.३.१. ययातिः**

शर्मिष्ठेला देवयानीच्या अटीनुसार तिची दासी होऊन हस्तिनापुरात यावं लागलं होते. तेव्हा तिच्या मनाची अवस्था अगदी दोलायमान झालेली होती. पण बऱ्याच वेळा तिला कचाची संगत लाभलेली होती. म्हणतात ना! 'सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो' त्या प्रमाणे कचाने तिला केलेला उपदेश आठवला आणि तिचे मत परिवर्तन झाले. तेव्हा तिने मांडलेले विचार, ''मी राजकुलात जन्माला आले म्हणून मला दासी होणं भयंकर वाटतयं, पण मी जर दासीच्याच पोटी जन्माला आले असते तर. गुणावगुण! काय जातीवर अवलंबून असतात? कच ब्राह्मण, देवयानी ब्राह्मण! पण तिच्या स्वभावात त्याचा एक तरी गुण उतरला आहे का?(पृ.१४८) तिच्या मते या जगात जन्मावर जातीवर काही अवलंबून नाही. पण माणूस जातीला विनाकारण महत्त्व देतो. खरेतर माणूस ही एकच जात महत्त्वाची आहे.

ब्राह्मण असलेल्या कचाने दानवांच्या नगरीत संजीवनीसाठी येण्याचे केवढे धैर्य प्रकट केले होते. साऱ्या क्षत्रियांना त्याने लाजविले. राजमातेला आपल्या क्षत्रिय जातीचा अत्यंत अभिमान होता आणि ब्राह्मण कन्या म्हणून देवयानीला स्वतःच्या जातीचा फार गर्व होता. दोघींमध्ये जात हा संघर्षाचा मुद्दा असे. अप्सरेच्या मोहाला बळी पडणारे विद्वान ब्राह्मण तप करतात पण बाई बघितली की तिच्या मागे पळतात. एका क्षत्रिय राजकन्येला आपण ब्राह्मण कन्येची दासी बनवून आपल्यासमोर कसं नाक घासायला लावलं हे देवयानी राजमातेला पटवीते.

अशा प्रकारे देवयानी व महाराणी म्हणजे तिची सासू यांच्यात जातीवरून वादविवाद होत असे. प्राचीन काळापासून समाजात जातीयता अस्तित्वात होती. जातीयता आजही एकविसाव्या शतकात असताना संपलेली नाही. तिचे अस्तित्व पुराणकाळापासून पौराणिक ग्रंथांमध्ये सुद्धा जातीयता आलेली आहे.

**१.२.३.२. रथचक्र :**

तालुक्याच्या गावातील ब्राह्मण आळीचे वर्णन करताना ती म्हणते, ''आळीतली माणसं स्वच्छ, घर स्वच्छ. तिच्या शेजारी मुसलमान वस्ती लेंगे नेसलेल्या मुसलमान बाया, पानाचा तोबरा चघळीत उंबरठ्यावर बसलेल्या असत. वाण्याची बायको पैसेवाली, लगटखोर, पण किती ओंगळ, सकाळी दहा वाजले पण अजून पारोशी(पृ.९४) तिच्या मुलीनं एकदा कोंबडी कापताना पाहिली तेव्हा त्याचे वर्णन ती आईला सांगू लागली. तेव्हा आई म्हणाली. ''आपण ब्राह्मण. असं वेडंविद्र पाहू नये !''(पृ.८१) तिला जेव्हा तालुक्याची ठिकाणी कुटुंबाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न पडतो, अडचणी येऊ लागतात तेव्हा नरवणकरांकडे ती थोटीच्या ओळखीने काम मागायला जाते. त्यावेळी थोटी म्हणते ''कामाला वाघ आहेत. त्या सुपारीवाल्याच. गावाला दिवसभर सोडे काढतात. पोराचं शेवटचं वर्षे आहे. प्रसंगात सापडल्या म्हणून नोकरी विचारायला आल्या नाहीतर कुणब्यात मिसळायची हौस का आल्ये? वेळ पडली म्हणजे सर्व करावं लागतं.''(पृ.१४१) नरवणकरांकडे काम करताना कुणब्यांत मिसळायचं नाही, असं तिने ठरवलं होतं. चोरासारखी एका कोपऱ्यात जाऊन बसे आणि दिवसभर काम करी.(पृ.१४७) ब्राह्मण, मुसलमान, कुणबी यासारखे काही उल्लेख जातीयता स्पष्ट करणारे रथचक्र कादंबरीत आलेले आहेत. ग्रामीण भाग असो की शहरी. जातीयता ही गाळात रुतलेल्या रथाच्या चाकाप्रमाणे समाजात रुतून बसलेली आहे असे वाटते.

**१.२.३.३. स्वामी :**

जातीव्यवस्थेचा उल्लेख आलेला नाही. पण ब्राह्मण जातीच्या राजाची ही शोकात्म कहाणी आहे. कारण संपूर्ण कादंबरीच पेशवाईच्या पार्श्वभूमीवर व माधवरावांच्या व्यक्तीजीवनावर आधारित आहे. निजामाच्या हेरखात्याचे मुख्य मीर मुसाखान जंगमध्ये सैन्याची वाताहात झाल्यामुळे गोदावरीच्या अलिकडेच राहिला. तो माधवरावांच्या रक्षकांच्या हाती सापडला, माधवरावांनी त्यास अभय दिले. त्याच्या छावणीत शेरजंग नावाची व्यक्ती अगोदरच आलेली होती. तो कर्तबगार आहे निजामाच्या कारकिर्दीला विटलेला आहे. शेरजंग पेशव्यांच्या आश्रयाला का आले? निजाम सून्नी पंथाचा आहे; आणि शेरजंग आणि मीर मुसाखान शिया पंथाचे आहेत. त्यांनी केवढीही कामगिरी केली तरी त्यांच्या सेवेचं योग्य ते चीज व्हायचं नाही. स्वामी या कादंबरीमध्ये जातीय संदर्भ फार कमी प्रमाणात आलेला आहे. फक्त शिया पंथाच्या शेरसिंग व मुसाखान या दोघांचा उल्लेख कथानकाच्या अंगाने आला येतो. कादंबरी ही ऐतिहासिक पार्श्वभूमी व चरित्रात्मक पार्श्वभूमी असल्यामुळे फक्त ब्राह्मण जातीचा उल्लेख येतो.

**१.२.३.४. स्मरणगाथा :**

गोपाळ नाशिकला देशपांड्याकडे वास्तव्यास असताना डॉ. आंबेडकर काळारामाच्या देवळात प्रवेश मिळविण्यासाठी सत्याग्रह करणार आहेत हे समजल्यावर त्याने देशपांड्यांची परवानगी घेतली व ते काळाराम मंदिराकडे गेले. 'महार तर हिंदूच मग त्यांना देवळात शिरण्यासाठी सत्याग्रह कशासाठी करावा लागतो.'(पृ.१५२) हा प्रश्न गोपाळला पडला. गोपाळ गणपतरावांच्या घरी गाई राखण्याचे काम करीत असताना एक मराठ्याचा पोरगा बकऱ्या घेऊन येत होता. त्या मुलाचे असे म्हणणे होते की, ''आपल्या दशमीला ठाकरानं हात लावला तर ती विटाळते.''(पृ.१६४) गोपाळला तो मुलगा बाटगा बाह्मण म्हणायचा वरील कथानकातून जातीयतेचा बालमनावरही पगडा होता, हे स्पष्ट होते. गाडगेबाबांच्या संप्रदायात विविध जाती धर्माचे, पंथाचे लोक यांचा समावेश होता. त्यामध्ये अभिमान बुवा महार, गणपतराव गांगण हा वाणी, रामबुवा हा मांग, राजाराम पाटील, कैकाडीबुवा, चंद्रभान पाटील, शंकरराव वंजारी, शंकर महाराज सुतार, गांगूबाई सकेंशा विधवा ब्राह्मण, गोपाळ चित्पावनी ब्राह्मण. गाडगेबाबांना जातीय भेदभाव मान्य नव्हता आणि त्यामुळेच गोपाळ म्हणाला, 'मला गळ्यांत बाबांच्या नावाची चिंधी पाहिल्यावर अस कुणी पुसत नसे, का तुझी जात कोणती''(पृ.२३०) गाडगे महाराजांची शिकवण अशी होती. जात पात पाळू नका. म्हणूनच त्यांच्या संप्रदायात सर्व जातीपंथाचे लोक होते.

'असोल' या गावी सप्ताह करण्याचे ठरल्यावर गावाबाहेर पटांगणात मोठा मांडव घातला होता. मांडवाचे खांब रोवण्याचे कामी महारांच्या पोरांनी मदत केली. ती मुले गोपाळला बाजुला व्हायला सांगत कारण बाट लागेल पण गोपाळ मात्र त्यांच्यापासून दूर जात नसे. एकदा तर लांब झाडाखाली जेवायला बसलेल्या महारांच्या भाकरीवरची चटणी उचलून खाल्ली. सारा हाहाकार झाला. गोपाळ परत गावकऱ्यांच्या पंगतीकडे फिरल्यावर ती माणसं पटापट उठली. त्याचा परीणाम असा झाला की बरेचशे गावकरी कामावर आले नाहीत.(पृ.२५४,२५५) गो.नी. दांडेकर हे कोणत्याही प्रकारची जात पात मानणारे नव्हते. पण समाज व्यवस्थेला ते पचणारे नव्हते.

एकदा कुशाबा तनपुरे ह्या बाबांच्या शिष्याच्या गावी सप्ताह होता. रात्री बाबांचे कीर्तन झाल्यावर सकाळी दहाच्या सुमारास पंगत जेवायला बसली. त्या पंगतीत महारही जेवायला बसले. ही गोष्ट गावातील काही कदाचित उच्चवर्णीय असतील त्यांना मान्य नव्हती. साताठ तालेवार बाबापाशी आले व विचारले, ''हे आमच्या मांडीला मांडी लावून जेवायला बसतील

काय?''(पृ.३०३) बाबा या प्रसंगाने रागावले व न जेवताच त्या गावातून निघून गेले. सर्व मानवजात एक आहे. माणूसकी हा तिचा धर्म आहे. असेच बाबांचे मत आहे.

लेखक ब्राह्मण असूनही त्याच्यावरही लोकांच्या संतापाला सामोरे जाण्याची वेळ आली. गोपाळ बाबांचे पत्र लेखनाचे काम म्हणजे बाबांचा लेखणीक म्हणून काम करीत होता. गोपाळ पत्र लिहिताना श्रीकर्णासारखे उदार, दानशूर अमूकसाहेब यांसी ''गाडगेबुवांचे अनंतकोटी नमस्कार, पत्रास कारण की- असा मायना लिहित होते. या मायन्यावरून गोपाळचे ज्येष्ठ गुरूबंधू नाराज झाले. त्यांचे असे म्हणणे होते की गाडगेबुवा ऐवजी 'सद्‌गुरू श्री गाडगेमहाराज' यांचे असे लिहिले पाहिजे. या गुरूबंधूने गाडगेबाबांसमोर जावून गोपाळ विषयी तक्रार केली. गाडगेबाबांनी या मुद्द्याला योग्य न्याय देण्यासाठी गणपतराव गांगण यांना बोलावले.

गुरूबंधूचे म्हणणे होते की, गोपाळ गाडगेबाबांचा अपमान करीत आहे. तेव्हा गणपतरावांनी विचारले, ''अपमान करतात?कसा काय?'' गुरूबंधू म्हणाले, ''अहो हा बामण आहे ना? हा केसानं गळा कापणार बाबांचा'' 'मला वाटत, की कुणीही मनुष्य स्वतःला श्रीसद्‌गुरू आणि महाराज म्हणवून घेणार नाही.'(पृ.३४३) असे गोपाळ उत्तरादाखल म्हणाला. गुरूबंधू भडकून म्हणाले, भटूरड्या? तू बाबांना सामान्य मनुष्य समजतोस? कुणीही वाटेवरचा भुरटा आणि बाबा हे एकाच योग्यतेचे असं तुला म्हणायचं आहे? '' गुरूबंधूबरोबर असलेले जवान म्हणू लागले, ''या भटाला इंगा दाखवला पाहिजे ! बामन भट कडी आंबट!''(पृ.३४३) गोपाळ या प्रसंगाने फार व्यथीत झाला. बाबांचे पत्र लिहिण्याचे काम बंद करण्याचा निर्णय त्याने घेतला. अर्थात गाडगेबाबांनी त्याला खूप समजावले. गोपाळने खर तर जातीचा गर्व कधीही बाळगला नव्हता. स्पृश्यास्पृश्यतेचे ओझे झुगारले होते. पण तरीही त्याला अशा प्रसंगाला तोंड द्यावे लागले याचा त्याला खेद वाटतो.

### १.२.३.५. सत्तांतर :

विविध जाती धर्म हे फक्त मनूष्य प्राण्याने निर्माण केलेले आहेत. प्राणिमात्रांमध्ये मात्र जाती नाहीत. माकड आणि वानर यामध्ये फरक आहेत, परंतु प्राण्यांच्या जाती हया मानवाने निश्चित केलेल्या आहे. जातीयतेच्या अंगाने सत्तांतरचा जर विचार करावयाचा झाल्यास त्यातील भेद फक्त नर आणि मादी अर्थात स्त्री आणि पुरुष असाच दाखविता येईल. सत्तांतरमधील वानर हा 'हनुमान लंगूर' आहे. ''वानरांच्या एकूण सोळा उपजातींची नोंद आहे. प्राणिशास्त्रज्ञांनी केलेली आहे. यासर्व उपजाती दक्षिण आशियात सापडतात. भारतात या उपजातींपैकी काही जाती-

१.धारवाड, बेलारी २.सिक्कीम ३.कूर्ग, काश्मीर ४.हिमाचल प्रदेश ५.मध्य प्रदेश ६.मलबार ७.बंगाल, राजस्थान, गुजरात ८.केरळ ९.तामिळनाडू १०.उत्तर प्रदेश आणि नेपाई-तराई या प्रदेशात आहेत.''

**१.२.३.६. झोंबी :**

लेखकाच्या कागल ह्या गावात विविध जाती-धर्माचे लोक राहात होते. त्यात प्रामुख्याने पिढ्यानपिढ्या शेती व्यवसाय करणारे-कुणबी, ब्राह्मण लोक, घोंगडी तयार करणारे सणगर व मांग या जातींचा समावेश होता. प्रत्येक गावात विविध जाती धर्माचे लोक असतात पण 'झोंबी' या कादंबरीत वरील जातीतील लोकांचा उल्लेख प्रामुख्याने आलेला आढळतो. आनंदचे वडील शेती व्यवसाय करीत आणि म्हणून मुलानेही फक्त शेतीच करावी व शिक्षणाला रामराम ठोकावा अशी त्यांची इच्छा होती. ''शेतकऱ्याचा पोर शेतकरी'' ही वर्णव्यवस्थेने, जातीव्यवस्थेने घालून दिलेली परंपरा पाळली जात होती.(पृ.८४) शेतीसाठी लेखकाच्या वडिलांनी लेखकाची शाळा बंद केली होती. हळदीकर सरांसारख्या अनेक लोकांनी दादाला म्हणजे लेखकाच्या वडिलांना शिक्षणाचे महत्त्व पटविले पण हटवादी दादाला मात्र ते पटले नाही. दादाच्या मते, ''भटाच्या घरात लिवणं, म्हाराच्या घरात गाणं नि शेतकऱ्याच्या घरात दाणंचं पिकलं पाहिजेत, का नग?''(पृ.१४७) लेखकाने शाळा शिकण्याच्या हट्टापायी बऱ्याचदा वडिलांचा मार खाल्ला होता पण शिकण्याचा हट्ट सोडला नव्हता. आनंदच्या आत्याचा मुलगा बाबू आनंदला समजावून सांगत होता. दादाचा मार खाण्यापेक्षा शेती कर त्याच्या मते, ''वाडवडलात उत्तम शेती, मददम येपार नि कनिष्ठ नोकरी असं म्हटलयं''(पृ.२३६) अशा प्रकारे विविध कारणांनी कुणबी जातीचा फक्त शेती व्यवसायाशी घनिष्ठ संबंध लावण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

लेखकाचे घर सणगर गल्लीजवळच होते. सणगर म्हणजे घोंगड्या तयार करणारे धनगर होय. सणगर समाज हा गावातला गरीब समाज होता. घोंगडी विणून पोटपाणी चालवणारा विठोबा आण्णांसारख्या या समाजातील व्यक्तीशी लेखकाच्या वडिलांचे मैत्रीचे संबंध होते. ब्राह्मण समाजही गावात बहुसंख्य होता. साकेकर भटजींसारखे भटजी दिवसभर सोवळ्यात असायचे. त्यांचे मंत्र, जप वाचन दिवसभर चालायचे, राम मंदिरात पूजा करायला ते सोवळ्यानं, मंत्र म्हणत जायचे नि मंत्र म्हणत परतायचे.

अशा प्रकारे कुणबी समाजाने फक्त शेतीच करावी व ब्राह्मणांनी ज्ञानार्जन करावे अशी धारणा त्यावेळी समाजाची होती हे ह्या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने व्यक्त केले आहे.

### १.२.३.७. झाडाझडती :

वसंता खैरमोडे गुरूजी हे कादंबरीचे नायक हरिजन समाजातील होते. रात्रीच्या वेळी गावाचे राखण करण्याचे काम पिढ्यानपिढ्या त्यांच्याकडे होते. गुरूजींनी सुद्धा येसकराची घुंगराची काठी वाजवीत गेली पंधरा वर्षे गाव जागता ठेवला होता. धरणामुळे गावातील लोकांची दशा त्यांना पाहवत नव्हती. धरणग्रस्तांची निरनिराळी गाऱ्हाणी सरकार दरबारी मांडणे. सरकार दरबारी होत असलेला भ्रष्टाचार उघडपणे सरकारी अधिकाऱ्यासमोर मांडण्याचे काम धाडसाने खैरमोडे गुरूजींनी केले होते. धरणाच्या लाभक्षेत्रातील पुढाऱ्यांना व खातेदारांना गुरूजी विकासाच्या कामातील धोंड वाटायचे. पण गुरूजीविरूद्ध ते काहीही करू शकत नव्हते कारण गुरूजी पडले हरिजन त्यांच्या 'अंगावर हात टाकावा तर गावाची दावण व्हायची. धरलं तर चावतयं आणि सोडलं तर पळतयं.'(पृ.३२) हरिजन जातीमुळे लोक वचकून राहात होते.

गुरूजी धरणग्रस्तांच्या हक्कासाठी खासदारांशी वाद घालत असलेले पाहून जिल्ह्याचे शिक्षण सभापती बळी अण्णाने लाला जाधवला तुमच्या गावातील गुरूजी आणि तुमचा त्यांच्यावर वचक नाही असे डिवचले तेंव्हा लाला जाधव म्हणाला, ''हरिजनाची बिलामत नको म्हणून आम्ही मोकळं सोडलं. तुम्ही जिल्ह्याचे शिक्षण सभापती! बघू की काय करता?''(पृ.३५) वरील दोन्हीही उदाहरणावरून पुढारी हरिजनांना घाबरून राहत होते कारण सरकारने हरिजनांसाठी त्यांच्या बाजूने कायद्याची बाजू भक्कम केली होती असे जाणवते.

धरणग्रस्तांना खासदार शिंगाडेंनी स्वतःच्या गावाच्या पश्चिम दिशेला असलेली स्टँड जवळील जागा मंजूर करण्यास लावली. तेव्हा खासदार शिंगाडेच्या मुलगा सबनीस साहेबांना आपले म्हणणे मंजूर करण्यास लावले. आम्ही खानदानी मराठा आणि तुम्ही कुलवंत ब्राह्मण! आपला देव आहे, धर्म आहे. आमच्या गावकऱ्यांची तक्रार आहे की गावठाण्यात नाना जातीचे लोक राहणार. कोण आदिवासी, कोण महार, कोण मांग ह्या अठरापगड जातींचा वारा पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहणार आणि मध्येच महादेवाचे मंदिर असे करून देवाला तुम्ही बाटवता काय? वास्तविक पाहता ती गावठानातील मोक्यावरची जागा, कारखाना किंवा बाय प्रॉडक्टस्‌साठी सर्जेरावांना हवी होती. पण जातीयतेचा मुद्दा पुढे करून धरणग्रस्तांसाठी मंजूर केलेली जागा त्यांनी वैयक्तिक स्वार्थासाठी रद्द केली. प्रत्येक खेडेगावात पूर्वी बारा बलुतेदारांना, अठरा पगड जातीच्या लोकांना गावकुसाबाहेर जागा दिलेल्या असायच्या. उच्च वर्णियाना मोक्याच्या जागा असत. हा जातीय भेदभाव ह्या कादंबरीत दिसतो.

**१.२.३.८. राघववेळ :**

या कादंबरीत काही ठळक जातींची माणसे दिसतात. जगदीश सरपंच, पांडुरंग पाटील, गोपाळराव देशमुख, जाधव आणि वाणी, मारवाडी, धनगर, लिंगायत, माळी, कलाल, न्हावी, सुतार, फकीर, महार, मांग, चांभार इ. जातीची माणसे या कादंबरीतून आपल्या जातीनुसार व्यवसाय करताना दिसतात. अठरापगड जातीच्या माणसांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेत गावगाडा एकमेकांच्या जातीवर व सहकाऱ्यांवर उभा राहिला आहे हे लक्षात येते.

**१.२.३.९. ताम्रपट :**

प्रस्तुत कादंबरीतील तुकाराम भोईटे पाटील नानांबरोबर स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले तेव्हा देशमुख पोलीस भोईटे पाटलांना म्हणतो, ''आपन सेतकरी मऱ्हाटे लोक ह्या बामनांच्या भानगडीत आपन लोकांनी पडून कायी उपेग नायी. भोईटेपाटील! ह्या लोकांच्या नादानी कधी कोण्हाचं भलं झाल्यालं नाही लय खराब जात.''(पृ.२०) ब्राह्मण जातीच्या स्वार्थी प्रवृत्तीचे दर्शन वरील वाक्यातून जाणवते. आवडाबाई तरूणपणी विधवा झाली तेव्हा तिचे वडील तिला पुनर्विवाहाचा सल्ला देतात. ज्या कोष्टी समाजात ती जन्माला आली होती लेखकाने विधवा पुनर्विवाहाच्या संदर्भात एक मत व्यक्त केले. 'बामणात समजा विधवा झालेली बाई तर आख्खी जिनगानी तशीच काढते ही गोष्ट खरी, पण तस तोंड दाबायची गरज काय? आपल्या आपल्या जातीची रीत आस्तीच. कोष्टीमध्ये किंवा बामण, खानदानी मराठे, वगेरे असे लोक सोडले तर असली मुस्कटदाबी तरण्या पोरींची करीत नाहीत.'(पृ.२४) सीताआजी बालवयातच विधवा झालेली 'खानदानी मराठा कुळात जन्मलेली असल्याने पुन्हा लग्न होण्याचा प्रश्नच नव्हता.(पृ.३५) कोष्टी जात पुनर्विवाहासाठी प्रोत्साहन देते तर ब्राह्मण वर्ग व खानदानी मराठा ह्या गोष्टीला परवानगी देत नाहीत.

नाना स्वातंत्र्य लढ्यातील सक्रिय कार्यकर्ता होते. त्यामुळे त्यांना मदत करणारे त्यांचे अनेक जातीधर्मातील सहकारी उदा. भिल्ल, रामोशी, मांग, महार, कोष्टी, कोंगाडी त्यांच्या घरी येत. नाना सिरूर हे जातीने ब्राह्मण होते. 'भास्करराव वृत्तीने सुधारक आणि समंजस तरीही हे स्वीकारणे त्यांना जड गेलं.'(पृ.३२) नाना सिरूर हे जातीने ब्राह्मण असूनही सर्व जातीचे लोक त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी एकत्र आलेले दिसतात. बुवासाहेबांचे शिक्षण दुसरी-तिसरीच झालेले पण लेखकाच्या मते त्याने काहीही बिघडल नाही. 'लिहिणं, वाचणं वगैरे या मुळात वाण्या बामणांच्या

गोष्टी शेतकऱ्याला काय करायचं शिकून हा रिवाज.(पृ.५२) वाण्या बामणांच्या जातीतील मुलांनीच शिकावे अशी मानसिकता कुणबी ह्या जातीची असलेली दिसते.

**१.२.३.१०. तणकट :**

कबीरला त्याच्या गावातून कॉलेजला चालत यायला अर्धा-पाऊण तास सहज लागत होता. त्यामुळे वर्गात जायला उशीर व्हायचा. एकदा प्रा. श्रीनिवास गर्जेकर राज्यशास्त्र शिकवित होते. वर्गाचे दार बंद होते. कबीरला तासाला वीस मिनीटे उशीर झाला म्हणून तो दारात उभा होता. त्याच्या मागून एक दुसरा विद्यार्थी आला त्याने दारावर लाथ मारली व वर्गात गेला त्याच्या मागे कबीरही वर्गात शिरला. तेव्हा प्रा.गर्जेकरांनी कबीरला विचारले, 'दारावर लाथ कुणी मारली' कबीरने उत्तर दिले, 'मी नाही'. मग प्राध्यापकांनी नाव विचारले. कबीरने स्वतःचे कबीर सदाशिव कांबळे हे नाव सांगितल्यावर प्राध्यापक म्हणाले, 'शिक्षणाला एक संस्कृती लागते. ती नसली की असच होणार नुसत्या स्कॉलरशीप सवलती देऊन शिक्षण पोहचत नाही. त्याला संस्कार असावे लागतात.'(पृ.१५) तेव्हा चवताळलेल्या कबीरने प्राध्यापकांना सडेतोड उत्तर दिले, ''जे बोलायचे ते विचार करून बोला दारावर लाथ मी मारलेली नाही यानं मारलेली आहे आणि त्याचे आडनाव कुलकर्णी आहे.''(पृ.१६) त्यावेळी गर्जेकरांना काय बोलावे तेच कळेना. ते म्हणाले, ''बर बर असुद्यात बसा आपण विषयाकडे वळू''(पृ.१६) अशा प्रकारे जातीय भेदभाव आपणास दिसतो.

सत्यपाल धर्मरक्षी हे दलित महासंघातील प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांना कॉलेजचे प्राध्यापक अवचित भालेराव यांनी 'आंबेडकरांनी धर्मांतर का केले?' या विषयावर आपले विचार व्यक्त करण्यासाठी आमंत्रीत केले. पण त्यांनी विषयांतर केले. हिंदू धर्मातील ब्राह्मण, मराठे, वाणी नालायक आहेत आणि त्यांना दलित पोरांनी ठोकले पाहिजे असे विचार व्यक्त केले. म्हणजेच कॉलेजमधील शिक्षण घेणाऱ्या दलित मुलांच्या मनात जातीयतेचे तेढ निर्माण करून देणारे दलित नेते होते. अवचित भालेराव, फणिंद्र कांबळे, जालिंदर बनसोडे, सत्यपाल धर्मरक्षी यांसारखी मंडळी समाजात जातीयतेचे तेढ निर्माण करत होते.(पृ.३६, ३७) प्रत्येक जातीतील काही लोक अथवा काही नेते एकमेकांच्या जातीला नावे ठेवण्यातच धन्यता मानतात हे ह्यावरून स्पष्ट होते.

कॉलेजमध्ये प्राध्यापकांमध्ये जातीयवाद होता. प्रा.गंजेकर ब्राह्मण होते व त्याच कॉलेजमध्ये प्राध्यापक नसलापुरे दलित प्राध्यापक होते. प्रा.गंजेकर हे नसलापुरे विरूद्ध विद्यार्थ्यांना भडकवायचे.(पृ.१२७) अशा प्रकारे महाविद्यालयासारख्या पवित्र ठिकाणी सवर्ण प्राध्यापक जातीयवादाचे विष समाजात पेरत होते. ह्या गावातील सवर्ण लोक व महार यांच्यात पूर्वी वाद

नव्हते पण गणू पाटलाच्या मुलाने आप्पुण्या महाराला मारल्यामुळे. त्या घटनेचा परिणाम म्हणजे गणू पाटलाच्या मुलावर महार नेत्यांनी केस लावली आणि जातीयवादाला सुरूवात झाली. या घटनेने महार व सवर्ण यांच्यात दुही निर्माण झाली. बाळासाहेब शेंडबाळे सारख्या सवर्णाने सवर्ण व महार यांच्यात सतत संघर्ष कसा होईल या विचाराने महारांना गावातील लोकांविषयी फितवले. त्यातच भर म्हणून जालिंदर बनसोडे, आनंदा कांबळे, अलताफ कांबळे या सारख्या पुढाऱ्यांनी सतत आगीत तेल ओतण्याचे काम केले. या संघर्षामध्ये आपल्याला महार जातीतील लोकांच्या हिताचे काहीतरी करायचे ही तळमळ दाखवून केवळ प्रसिद्धी व स्वतःच्या तुमड्या भरण्यासाठी जातीयवाद व गावामध्ये फूट पाडण्याचे प्रयत्न केले.(पृ.७३)

मांग व महार यांचीही गावात एकी नव्हती. मांग व सवर्ण सलगीने राहत होते. मांग वाड्यात आमदार निधीतून समाजमंदिर मंजूर झाल्याचे समजताच महारवाड्यातील लोकांना असुया वाटू लागली. भीमा महाराने त्याबद्दल राग व्यक्त केला. ''आमच्या बाबासायबानं दिल्याल्या सवलती घेत्यात, आनी आमच्यावरच तरपासत्यात. लईच घरच्या बेण्याची हाईत तर सोडा म्हणावी की मिळत्यालं सगळं.''(पृ.१७९) अशा प्रकारे गावात सवर्ण, महार, मांग असे जातीय प्रवाह होते. महार व मांग यातही संघर्ष असलेला दिसून येतो. फक्त सवर्ण विरुद्ध दलित असेच नाही तर दलितांविरुद्ध दलित असाही जातीयवाद दिसून येतो.

**१.२.३.११. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरीतील साईखेड संस्थानात समृद्धी होती आणि लुबाडणूक होती, तृप्ती होती आणि असंतोषही होता. माणसं एकएकटी गुणागोविंदानं वागणारी असूनही जाती-पोटजातीचा विचार तिखट झाला की, वेगळ्याच जाळानं भडकून उठतं.(पृ.३१) साईखेड्याला दोन वेशी होत्या. दक्षिणेला आणि उत्तरेला. दक्षिण वेशीबाहेर लिंगायतांची, माळया-कुणब्यांची स्मशानभूमी होती. ओल्या कोरड्या ओढ्यालगतचा झाड सावलीचा एक राखीव पट्टा ब्राह्मण-मराठ्यांचा होता आणि पलीकडे मुसलमानांच कबरस्तान.(पृ.१३०) उत्तर वेशीबाहेर पडताच डोळ्यांना सुखावणारा देखावा दुरवर पसरलेला होता. विस्तीर्ण कारंजबाग होती. बारमहा हिरवळीनं आच्छादलेली, फुलांनी बहरलेली. तिच्या पिछाडीस उभ्या असलेल्या अस्पृश्यांच्या झोपड्या सोडल्या तर दुसरी कुठलीही वस्ती तिथं नव्हती. राजवाड्या पाठीमागून उतरत येणाऱ्या सकल भूमीमधून वर्षातले आठ महीने तरी कमी-अधिक पाण्याचा ओहळ वाहता असे. त्याच्या पात्रात अंतराअंतरावर दोन विहिरी खोदलेल्या होत्या. त्यांचं पाणी खासबागेपर्यंत पोहोचवलं होतं. त्याच पाट-पाण्यावर

उन्हाळ्याच्या दिवसात अस्पृश्य वस्तीची गुजराण चाले. त्या झोपड्यांपैकी एकीत बाभळबनाच्या आडोशाला संदीपन महाराची तुंगा राहायची.(पृ.क्र.१३०) अशा प्रकारे साईखेड संस्थानात अनेक जातीपातीची माणसं राहत होती. त्यांच्या वस्त्या गावगाड्याने ठरवून दिलेल्या विशिष्ट ठिकाणी होत्या.

**१.२.३.१२. बारोमास :**

'बारोमास' या कादंबरीत जातीयवाद हा प्रकर्षाने जाणवत नाही. पण आपण मराठा म्हणजे बी.सी. नाही त्यामुळे नोकरी मिळवायला अडचणी येतात नाव मोठं अन लक्षण खोटं. मराठा म्हणून जन्माला येण्यापेक्षा इतर जातीत जन्मलो असतो तर नोकरी तरी मिळाली असती. नोकरीसाठी आपण कोणतीही जात स्वीकारायला तयार आहोत. तसे असले तरी एस.सी. असलेला दिनकर दाभाडेही बेकार आहे. म्हणजे नोकरीसाठी डोनेशनही महत्त्वाचे आहे.(पृ.५७) जातीमुळे नोकरी मिळते पण एस. सी. असलेला दिनकर दाभाडे बेकार आहे हे वास्तवही जातीयतेचे दिसते.

**१.२.३.१३. भूमी :**

भूमीमध्ये कोणत्याही जातीचा प्रत्यक्ष उल्लेख आला नाही. मैथिलीचे आई व वडील यांचा विवाह आंतरधर्मीय झाला होता. धर्म वेगळे म्हणजेच अर्थातच त्यांच्या जाती भिन्न होत्या. एकाच जातीधर्मातील विवाहाला समाजात मानाचे स्थान असते पण आंतरजातीय वा आंतरधर्मिय विवाह केल्यास समाज मान्यता देत नाही.

**१.२.३.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

प्रस्तुत कादंबरीची नायिका माधुरीचा विवाह सुबोधशी ठरतो. सुबोधचे घराणे पॉवरफुल मराठा घराणे होते. 'माधुरीच्या आणि सुबोधच्या सगळ्या नात्यातली लग्न मराठा जातीत झालेली आहेत. ठरवून करायची लग्न परजातीत व्हायची. सुधारणा महाराष्ट्रात अजून झालेली नाही'(पृ.१७, १८) यावरून लेखकाने आपले महाराष्ट्रातील लग्न व जात या विषयीचे मत व्यक्त केले आहे. महाराष्ट्र प्रगत राज्य नाही अजून प्रगतीशील राज्य आहेत. म्हणजेच आपल्या राज्यात ठरवून आंतरजातीय विवाह केले जात नाहीत म्हणजेच आपले राज्य प्रगत राज्यात गृहीत धरले जात नाही. बारशाच्या प्रसंगाचा खेळ करणाऱ्या मुलींविषयी माहिती देताना लेखक मत मांडतात, मराठ्यांकडे बारश्याचा खेळ चालायचा, तेव्हा शिवाजी, संभाजी, राजाराम, शाहू ही नावे विचारली जायची. ब्राह्मणांकडे खेळ चालायचा तेव्हा परशुराम, कृष्ण, राम, ज्ञानेश्वर ही नावे विचारली

जायची. इतर जातीत ह्या ग्रुपने खेळ केलेले नाही यावरून मुलाचे नाव ठेवण्यातही जातीयता हा मुद्दा असू शकतो याचे नवल वाटते. मानपान आपली श्रद्धास्थाने आपआपल्या जातीत वाटून घेतल्याचे स्पष्ट होते.

### १.२.३.१५. खारीच्या वाटा :

लेखकाच्या गावातल्या विहिरीला दोन रहाट होते. गावात दोनच ब्राह्मणांची घरे होती. एक स्वतंत्र रहाट फक्त दोन घरांसाठी होता. एक रहाट अख्ख्या गावासाठी होता. जेव्हा पाण्याने तळ गाठला जाई तेव्हा दोन्ही रहाटावरून सोडलेल्या कळशा, पोहरे खाली एकमेकांवर दणादण आदळत. डचमळत याचं पाणी त्यात पडे. तरी त्याची शिवताशिवत धरली जात नसे. वर आलं की पाणी वायलं होई.(पृ.१२५) ह्या उदाहरणावरून गावात जातीयता पाळली जात होती हे लक्षात येते.

### १.२.३.१६ फेसाटी :

लेखकाचे वडील एकदा गाय घ्यायला गेले पण त्यांना पैसे कमी पडत होते. तेव्हा सुदाक्काच्या सासऱ्याच्या ओळखीचा पारधी होता की जो व्याजाने कर्ज द्यायचा पण पारध्याच्या जातीविषयी सुंदाक्काचा सासरा भिमराव मोठे याने केलेला उल्लेख पुढील प्रमाणे, ‘पारधी लई कडू बोड्याची हायती. येकदा का पैशाची मुदत संपली घराम्होरनं उठतच नायती बगा.’ ‘प्रत्येक येळंला आली म्हणजी दोन कोंबड्यानं जीपचं तेलाचं पैसं वसूल केल्या बिगार जात दारातनं उठत नायती.’ ‘जर का आडवं बोललं म्हणजी जात मारायला पण माघं म्होरं सरत नायती. मेलं तर राखं घिवून जात्याती असली पारध्याची जात लई वंगाळ हाय.’(पृ.८२)

एकदा दहावीला असताना बिराजदार सर सरळव्याजाचे गणित सोडवत होते. पण त्यांनी गणित चुकीचं सोडवल पण चूक लक्षात आल्यावर त्यांनी गाईडमधून सोडवलं पण ते मुलांना फसवत होते. ‘मला गणित येत पण मी तुम्हाला येतय का? ते पाहत होतो’. असे सांगितले. हे ऐकल्यावर नाथाला हसू आले त्याला सरांनी शिव्या दिल्या व म्हणाले तुझा चुलत भाऊ गटविकास अधिकारी झाला तू मेंढरं राखायच्यापण लायकीचा नाही. चुलत भाऊ चांगला मुलगा होता. तो माझ्या हाताखाली शिकला तेव्हा त्याचं चांगल झालं. तू त्या जातीचा आहे तू येथेच राहणार अस मत सरांनी व्यक्त केल्यावर लेखकाला वाटले, ‘‘अहिल्याबाई होळकर पण येक धनगर स्त्रीच होती. ती रयतेच्या सुखदुःखात सहभाग घेणारी, समाजाला न्याय मिळवून देणारी, त्यानंतर बापू बिरु वाटेगावकर हा पण धनगरच होता. ह्यांनी पण समाज्यातील लेकी बाळांची नाण्णी तुटलेली तेनी

पुन्हा नांदवायला लावली. समाज्यातील वाईट लोकांचा नायनाट केला.'' (पृ.११५) मला पण काहीतरी चांगले काम करायचे आहे. असा निर्णय लेखकाने घेतला.

### १.२.४. घटना / प्रसंग :

घटना, प्रसंग यात फक्त कालानुसारी घडण नसते तर लेखकाची मूल्य संकल्पना आणि त्यातून अवतरलेल्या माणसांची मूल्यनिष्ठा यांचेच ते दर्शन असते. बाह्य आवरणाबरोबरच अंतःस्तराचे दर्शन घडविणे हे कादंबरीत महत्त्वाचे असते. बाह्य परिस्थितीत व्यक्तिमन, त्यानुसार त्यात शारीरिक हालचाली आणि मानसिक खळबळींचे दर्शन यातून लेखकाचे सामर्थ्य प्रकट होते. चंद्रकांत बांदिवडेकर घटनाप्रसंगाविषयी म्हणतात, ''घटना, प्रसंग व व्यक्ति हे घटक परस्परांशी अतुट असा संबंध प्रस्थापित करुनच कथासूत्राला अपरिहार्यपणे पुढेपुढे खेचित नेतात म्हणजे कादंबरीच्या त्या घटकामध्ये असा विकास घडवून आणण्याचे सामर्थ्य असावे लागते.''[५४] कथानकाला पुढे नेण्यासाठी घटना-प्रसंग महत्त्वाची भूमिका बजावतात. आकर्षण व उत्कंठावर्धक, घटना-प्रसंग यामुळे कथानकाला गती येते. घटना-प्रसंग कादंबरीचा आत्माच असतात.

### १.२.४.१. ययाति :

नगरदेवतांचा वार्षिक उत्सव होता. त्या उत्सवामध्ये कथा-कीर्तने, पुराणे-प्रवचने, भजन-पूजन, नृत्यसंगीत. स्त्री-पुरुषांचे विविध खेळ, नाना प्रकारची सोंगे असे दहा दिवसांच्या कार्यक्रमाचे स्वरुप होते. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी एका नव्या क्रीडेचा की जो साहसी सैनिकांच्या वृत्तीला प्रोत्साहन देणारा होता अशा क्रिडेचा समावेश केलेला होता. वेगाने धावणाऱ्या घोड्याला मद्य पाजून विशाल वर्तुळाकार रिंगणात मोकळे सोडून द्यायचे. तो मोकाट धावू लागल्यावर स्पर्धकाने मिळेल तेथे त्याला गाठून त्याच्यावर मांड ठोकायची आणि त्या प्रांगणात पाच फेऱ्या घालून त्याला न थांबवता खाली उतरायचे. प्रत्येक वेळी नवा तेजस्वी घोडा आणायचा. हा खेळ फक्त सर्वसामान्य सैनिकांसाठी होता. चार वीरांनी या खेळात उत्साहाने भाग घेतला पण त्यांना यश आले नाही. पाचवा घोडा प्रांगणात आणला गेला. तो घोडा एखाद्या भव्य, रेखीव राक्षसा सारखा दिसत होता. राक्षसासारखा व उन्मत हालचाल असणारा हा घोडा पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यात भिती, आश्चर्य आणि उत्सुकता यांचे मिश्रण दिसून येत होते. त्या घोड्याला पाहून ययातिची आई म्हणाली, 'या घोड्याला परत न्यायला सांगा. फार भयंकर दिसतोय तो. उगीच शेवटच्या दिवशी कुणाला अपघात होऊन अपशकुन होईल.' तेंव्हा ययातिचे बाबा म्हणाले, 'देवी, पुरुषांचा जन्म पराक्रमासाठीच असतो.'(पृ.२४) अनेक सैनिकांनी प्रयत्न केला पण घोडा कोणालाच दाद देईना. शेवटी बाबांच्या

त्या वाक्याने ययाति प्रेरित झाला व आपण पराक्रमी पुरुरव्याचा पणतू व शूर नहुषाचा पुत्र आहोत. या गोष्टीचा त्याला अभिमान वाटला. व आईच्या विरोधाला न जुमानता क्षणार्धात तो रिंगणात उतरला. लोक ज्याला मृत्युची दरी समजत होते, त्याऐवजी त्याला तो कीर्तीचा पर्वत वाटला. काही समजण्याच्या आत तो घोड्यावर स्वारही झाला होता. धुळ उडवीत वाऱ्याच्या वेगाने तो धावत होता. ययाति देहभान विसरला होता. तो तेजस्वी घोडा आणि त्यावर बसलेला ययाति दोघेही उन्मत्त होते. जणू ते दोघेही पुतळेच वाटत होते. चार फेऱ्या पूर्ण झाल्या. पाचव्या फेरीला त्याला त्याचे सोनेरी स्वप्न साकार झाल्यासारखे वाटत होते. आकाश ठेंगणे वाटू लागले. पाचवी फेरी संपत आली होती. बाबा आणि आई बसली होती. तेथून पुढे गेल्यावर ती फेरी संपणार होती. घोडा किंचित त्यांच्या आसनांच्या पुढे गेला. आईचा उल्हासित चेहरा पाहण्याचा मोह ययातिला झाला आणि मोहाचा तो एक क्षण त्याला खूप त्रासदायक झाला. त्याची घोड्यावरची मांड किंचित ढळली आणि त्या तापट जनावराने आपला सूड उगविला. त्याने त्याला हवेत भिरकावून दिले. हवेतच ययातिला अनेक चित्रविचित्र कर्कश आवाज ऐकू आले. त्यानंतर हा पराक्रमी राजकुमार आठ दिवस बेशुद्ध अवस्थेत होता.(पृ.२३,२४,२५,२६) अंगावर रोमांच उभा करणारा हा प्रसंग आहे. लेखकाने तो रोमहर्षकतेने वाचकांसमोर उभा केला आहे.

देवयानी आणि शर्मिष्ठा एकदा जलक्रीडेसाठी एका जलाशयापाशी आल्या. देवयानीला कचाने वस्त्रे दिली होती. देवयानी शर्मिष्ठेसमोर रुबाब मिरविण्यासाठी ती वस्त्रे घालणार होती व शर्मिष्ठेला तिच्या आईने वस्त्रे दिली होती पण ती शर्मिष्ठेने नीट पाहून घेतली नव्हती. त्या दोघींनी जलक्रीडेला जाताना एकाच दासीकडे वस्त्रे ठेवण्यास दिली होती. देवयानीने त्या दासीला बजावून सांगितले होते. दोघींची वस्त्रे वेगवेगळी ठेव. दोघीही जलक्रीडेसाठी जलाशयात उतरल्या. त्या दोघींमध्ये शर्यत लागली. जलाशयातील कमळापाशी दोन हंसांच जोडपं होते. तिथंपर्यंत जाऊन परत यायचं ठरलं. अशी पैज ठरली. देवयानी माशासारखी पोहत होती. तिने शर्मिष्ठेला मागे टाकले होते. शर्मिष्ठा संथ गतीने पोहत होती. देवयानी कमळापाशी आली. शर्मिष्ठा अजूनही मागे होती. देवयानी थोडी विसावली व पुन्हा काठाकडे जाण्यासाठी वळली. पण जेवढ्या वेगाने ती फुलाजवळ आली तेवढ्या वेगाने ती काठाकडे जाऊ शकेना. तिच्या हाता पायांना थकवा जाणवत होता. तिचा वेग मंदावला. आणि शर्मिष्ठा झपझप वेगाने तिच्यापुढे गेली. शर्मिष्ठेने पैज जिंकली होती. काठावर येऊन एका झाडामागे जाऊन शर्मिष्ठेने दासीने दिलेली वस्त्रे घातली. मान खाली घालून देवयानीही काठावर आली. दासीने तिला वस्त्रे दिली पण ती वस्त्रे तिची नव्हती. म्हणजे शर्मिष्ठेने

जी वस्त्रे परिधान केली होती ती देवयानीला कचाने दिली होती. की जी वस्त्रे तिने वसंतोत्सवाकरीता जपून ठेवली होती. देवयानीचा राग अनावर झाला. देवयानी ती सर्व वस्त्रे शर्मिष्ठेकडून ओढू लागली. शर्मिष्ठेने तिला पांगळी म्हणून चिडवलं. देवयानी शर्मिष्ठेला आंधळी म्हणाली. शर्मिष्ठाही देवयानीला खूप अपमानास्पद बोलली. 'वृषपर्वा महाराजांच्या पदरी असलेल्या एका भिक्षुकाची तू मुलगी आहेस. मी एक राजकन्या आहे. ''तू माझ्या वडीलांच्या आश्रिताची मुलगी आहेस. माझे बाबा तुझ्या बाबांना गुरुदेव, गुरुदेव म्हणतात. हा बाबांचा चांगुलपणा आहे. राज्यसभेत बाबा सिंहासनावर बसतात. तुझा बाबा मृगजिनावर बसतो. हे अंतर पुन्हा विसरु नकोस!''(पृ.१३२) असेही शर्मिष्ठेने तिला हिनवले.

या सर्व शर्मिष्ठेच्या बोलण्यामुळे देवयानीच्या तळपायाची आग मस्तकात गेली. तिच्या मनात अपमानाचा वणवा पेटला. ती रागाने तेथून निघाली व धावू लागली. शर्मिष्ठाही तिचा पाठलाग करीत होती. देवयानी एका विहीरीच्या काठावर आली. शर्मिष्ठाही तेथे पोहचली व तेथे झटापटीत देवयानी विहीरीत पडली. शर्मिष्ठा तेथून निघून गेली. गार पाण्यात तिचे शरीर थंडीने कुडकुडत होते. मनात एकीकडे सुडाची आग पेटली होती, दुसरीकडे भितीचा काळोख दाटत होता. अहो मला कुणीतरी बाहेर काढा! असे म्हणून देवयानी ओरडत होती आणि त्याचवेळी हस्तिनापूरचा महाराज ययाति तेथे पाण्याच्या शोधार्थ आला. धनुर्विद्येत पारंगत असलेल्या ययातिने बाणाचा पाळणा तयार केला व त्यात देवयानी उभी राहिली. तिला विहीरीबाहेर काढले. ययाति महाराज तिच्या सौंदर्याकडे टक लावून पाहत होते, हे देवयानीच्या लक्षात आले. अंगात असलेले ओले वस्त्र तिचे सौंदर्य वाढवित होते. माझ्या सौंदर्याने महाराजांचे मन जिंकले आहे, हे देवयानीच्या लक्षात आले आणि लगेचच महाराजांनी माझ्याशी विवाह करावा असे ईश्वरी संकेत आहे म्हणून येथे आपली योगायोगाने गाठ पडली असे देवयानी सांगते. नंतर दोघेही जाणार तेवढयात देवयानीचे बाबा व वृषपर्व महाराज रथात बसून तेथे आले. तेव्हा देवयानीने घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली व आता येथून हस्तिनापुरात ययाति महाराजांची पत्नी म्हणून जाणार आहे असा निर्णय त्यांना सांगितला. देवयानीचे बाबाही वृषपर्वाला म्हणाले, मी सुद्धा तप करण्यासाठी हिमालयात जातो. तेव्हा वृषपर्व गयावया करु लागले. शर्मिष्ठेला माफ कर, तुम्ही दोघी मैत्रिणी आहात. तू जी शिक्षा शर्मिष्ठेला देशील ती शिक्षा शर्मिष्ठा स्वीकारील. मी तुला वचन देतो असं राजा म्हणाला. तेव्हा देवयानीने तिला 'माझी दासी म्हणून हस्तिनापूरला पाठवावं' अशी आज्ञा केली.(पृ.१३० ते १४१)

या वरील प्रसंगामुळे ययाति, देवयानी व शर्मिष्ठा यांच्या जीवनाला पूर्णपणे कलाटणी मिळाली.

### १.२.४.२. रथचक्र :

'ति'चा नवरा तिचा धाकटा मुलगा सात वर्षांचा असतांना पळून गेला, त्यानंतर मुलांच्या भवितव्याची चिंता तिला लागली. मुलांनी खूप शिकावे, ही तिची इच्छा होती. थोरल्या मुलाने शाळेला रामराम ठोकला होता. धाकटयाने तरी तसे करु नये, असे तिला वाटत होते. तिला फसवून त्याने एकदा शाळा चुकविली. ती वाट पाहत होती. निरगुडीच्या काठीनं त्याला तिनं नखशिखांत फोडून काढले, जावा मध्ये पडल्या. परोपरीने सांगत होत्या, 'त्याचं वय झालं नाही, जाईल.' तिला ते पटलं नव्हते. त्याच्या बरोबरीच दोन इयत्ता पुऱ्या झाल्या. एवढं ती जाणत होती. आडवे उभे बसतील तसे फटके ती मारीत होती. शेवटी थोरली उभी राहिली. ''मांडलाय काय तुम्ही? का पिशाच्चं संचारलं? चालता हो रे इथून-'' रडतं लंगडत तो बाजूला जुडी करुन बसला. थोरली बाजूला झाली, तेंव्हा चवताळून त्याच्या अंगावर ती पुन्हा गेली. विचूं चावल्यागत तो ओरडला, ''जाईन शाळेत. मारु नको. माझं हाडं मोडलं गं!'' थोरली रडत तिच्याकडे गेली आणि ओरडली, ''त्याला आता हात लावा-ही धुण्याची काठी टाळक्यात घालीन.''(पृ.४) या प्रसंगाने खऱ्या अर्थाने तिच्या धाकटया मुलाच्या शिक्षणाला सुरुवात झाली होती. तिने त्याचे शिक्षण पूर्ण करणे हाच उद्देश डोळयासमोर ठेवला होता. पुढे कादंबरीच्या कथानकला अनेक घटना/प्रसंग लेखकाने साकार केलेले आहेत.

### १.२.४.३. स्वामी :

वर्षभराची हैदरची मोहीम आटोपून माधवराव पुण्याला आले तेव्हा पुण्यामध्ये सदाशिवभाऊंचा तोतया प्रकट झाला होता. शनिवारवाड्याचे वातावरण बदलून गेले होते. पर्वतीवर तोतयाची चौकशी सुरु केली. शनिवारवाड्यात आपण राहत होता. तेव्हा आपले निवासस्थान कुठे होते. तोतया उत्तरला, हजारी कारंज्या नजीकच्या महालात दुसऱ्या मजल्यावर. ती इमारत पाच मजली आहे अशी उत्तरे दिल्यावर जिन्याला पायऱ्या किती? असा प्रश्न केल्यावर तोतयाने शास्त्रीबुवांना प्रश्न केला, आपल्या गळयातील स्फटिकांच्या माळेला किती मणी आहेत? त्या प्रश्नाचे उत्तर शास्त्रीबुवा देऊ शकले नाही.(पृ.२३४) अशी प्रश्नोत्तरांची सरबत्ती झाल्यावर शेवटी तोतयासमोर बेलभंडार ठेवला गेला. माधवराव म्हणाले, ''बेलभंडारास शिवण्यापूर्वी जरुर विचार कर. की तू जे नाव धरण केलं आहेसं त्याचं कुल काय? शील काय? हे सर्व आठव, खोटी शपथ

घेऊन कदाचित तू त्या पराजयावर मात करशील आणि आम्ही बोलल्याप्रमाणे तुझा सदाशिवराव भाऊ म्हणून स्वीकारही करु. पण अद्यापि तू एका व्यक्तीचा विचार केला नाहीस. पानिपतावर पतीची निधनवार्ता ऐकूनही एका स्त्रीने त्यावर विश्वास ठेवला नाही, आपले सौभाग्य अलंकार न उतरवता जी साध्वी निव्वळ पतीनिष्ठेवर आपले आयुष्य कंठीत आहे, त्या स्त्रीसमोर जेंव्हा तू उभा राहशील, तेंव्हा तुझ सोंग टिकेल का? त्या साध्वीची फसवणूक करणाऱ्या महापातकाचा विचार कर, उचल भंडारा!''

उंचावलेल्या त्या शेवटच्या वाक्याने तोतयाने मान वर केली. त्याच्या कपाळावर दरदरुन घाम फुटला होता. सारे देवालय फिरते आहे असा त्याला भास होत होता. ओठ कोरडे पडले होते, ते सारे सहन न होऊन तो म्हणाला, ''क्षमाऽ श्रीमंत क्षमा... मी सदाशिवभाऊ नव्हे, मी तोतया... तोतया!''(पृ.२३६)

पर्वतीवरील देवालयाचे काम पुरे होत आल्यामुळे ते पाहण्यासाठी माधवराव पर्वतीवर जातात. बरोबर गारद्यांचे पथक, नाना, मोरोबा, पागे, धुळुप, श्रीपती होते. परतत असतांना अचानक मागच्या गारद्यांच्या पथकातल्या रामसिंग गारद्याने घोड्याला टाच दिली आणि काय होत आहे, हे समजण्याच्या आत त्याने घोडे पुढे काढले. श्रीपतीच्या घोड्याला धडक देऊन नानांच्या घोड्याला चुकवून रामसिंगाने घोडे पुढे काढले. आश्चर्यचकीत झालेल्या श्रीपतीला क्षणभर रामसिंगाच्या हातातील तलवारीच्या उघड्या पात्याचे दर्शन झाले. सारे बळ एकटवून तो ओरडला, ''सरकार घाऽत!'' पागेकडे पाहत असलेल्या माधवरावांची नजर चटकन वळली. रामसिंगाच्या हातातील तलवार त्याच वेगाने खाली येत होती. माधवरावांनी नकळत लगाम खेचला. ते उमदे जनावर त्या इशारतीबरोबर शहरायला आणि तलवार खाली यायला एकच गाठ झाली. तलवार सरळ माधवरावांच्या खांद्यावर उतरली. निमिषार्धात हे सारे घडले. माधवरावांचे घोडे त्यांच्या तोंडून निघालेल्या आरोळी बरोबरच बिथरले आणि एकदम उधळले. जखमेने असह्य झालेल्या माधवरावांचा रिकीबीतला पाय त्या घोड्याच्या बिथरण्याबरोबर सुटून ते घोड्यावरुन खाली पडले.(पृ.२९७) ह्या प्रसंगावरून एक गोष्ट लक्षात येते की, जानोजी भोसले, देवाजी पंत निजाम विठ्ठलसुंदर, रघुनाथराव, सखाराम बापू. होळकरांचे मातब्बर सरदार गंगोबा तात्या तसेच खुद्द माधवरावांचे मामा खलनायकांच्या भूमिकेत आढळतात. हे घटना प्रसंग साकार करताना जणू काय आपण त्या घटनेचे साक्षीदार आहोत, असा भास वाचकाला जाणवतो. अशा प्रकारचे ऐतिहासिक घटनाप्रसंग लेखक आपल्यासमोर साक्षात उभे करतो.

### १.२.४.४. स्मरणगाथा :

'स्मरणगाथा' ही गो.नी. दांडेकर यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. त्यांच्या वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंतच्या अनेक घटना प्रसंग, जीवनानुभव स्मरणसाखळीच्या स्वरुपात लेखकाने कादंबरीत मांडले आहेत. लहानपणी लेखक व त्यांची बहीण माई यांना त्यांच्या वडिलांनी खूप मारलेला प्रसंग, वस्तादाने लेखकाच्या डोक्यावर नारळ फोडण्याचा प्रसंग, लेखकाला सुंता करण्यासाठी वखारवाल्याने गारपीरला नेले पण तेथून लेखकाचे पलायन होण्याचा प्रसंग, गणपतराव जोशींच्या घरी असतांना गोऱ्याच्या गळ्यात लोढणे बांधण्यासाठी लोढण्याचे लाकूड फोडतांना कुऱ्हाडीचा घाव पायावर बसण्याचा प्रसंग, गोणपाटाची लंगोटी शिवून घातली. गोणपाट घासल्याने त्वचा लाल झाली. ती आग कमी करण्यासाठी मध लावले व मध लावल्याने मुंग्या चावल्या तो प्रसंग, गाडगेबाबांबरोबर महारोग्याला अंघोळ घालण्याचा प्रसंग, तसेच कीर्तन करत असतानाचे अनेक प्रसंग, भंडाऱ्या डोंगरावर निवासाला असताना वाघाच्या तावडीत सापडले असते तर जीवच गमवावा लागला असता, नर्मदा परिक्रमा करताना घडलेले अनेक प्रसंग अशी घटना-प्रसंगांची मालिकाच लेखकाने मांडली आहे.

वरील प्रसंगांपैकी एक प्रसंग म्हणजे लहानपणी लेखक आणि माई यांनी वडिलांचा खूप मार खाल्ला. हा प्रसंग उदाहरणदाखल येथे घेतला आहे. लेखकाचे वडील वरच्या वर्गाला गणित शिकवीत होते. वार्षिक परीक्षा चालू झाली होती. दादा म्हणजे लेखकाचे वडील ज्या वर्गाला गणित शिकवित होते, त्या वर्गातील एक मुलगा माई व लेखकाला शाळेच्या वाटेवर भेटला. दोघांसमोर तो ओक्साबोक्सी रडू लागला. माईने रडण्याचे कारण विचारले असता माईला समजले की, त्याचं गणित अतिशय कच्च आहे आणि त्यामुळे तो गणितात नापास होऊ शकतो. त्याच्या घरची परिस्थिती खूप हालाकीची आहे. जर नापास झाला तर त्या मुलाने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावर उपायही त्या मुलानेच सुचविला, ''दादांनी पेपर काढला आहे. त्यातली चार-सहा गणित मला सांगायची!''(पृ.४५) त्यावर माई म्हणाली, ''ते कसे पाहू देतील आम्हाला?''(पृ.५५) तेव्हा मुलाने 'आता मला फास घेण्याशिवाय पर्याय राहिला नाही.'(पृ.५५) असे मत व्यक्त केले. लेखकाला त्याची दया आली व त्याने त्याचे काम करण्याचा शब्द त्या मुलाला दिला. दादा जेवायला बसले असताना लेखकाने वडिलांच्या कोटाच्या खिशातून पेपर बाहेर काढला व त्यातील गणितं लिहून घेतली. पेपर पुन्हा खिशात ठेवला. शाळेत जातांना वाटेत त्या मुलाला गणितं लिहून घेतलेला तो कागद दिला.

तिसऱ्या दिवशी शाळेत गेल्यावर लेखकाची व माईची परीक्षा असल्याने तेही वर्गात पेपर लिहीत होते. वर्गाच्या दारात शिपाई आला व निरोप सांगितला. दांडेकर साहेबांच्या मुलाला मुख्याध्यापकांनी बोलाविले आहे. ऑफिसमध्ये माई अगोदरच गेली होती. ज्याला गणितं लिहून दिली होती तो मुलगाही तिथे होता. मुख्याध्यापकांनी विचारले, ''इयेस! हा सांगा दाण्डेकर, या..ला गणितं सांगितली का तुम्ही? वडिलांनी काढलेल्या पेपरातली?''(पृ.५७) लेखक नाही म्हणाला. तो मुलगा लेखकानेच ही गणितं सांगितली असे बोलला. माईला विचारल्यावर तिने फक्त नकारार्थी मान हलविली. हेडमास्तरांनी दोघांनाही घरी जाण्यास सांगितले. संध्याकाळी दादा घरी आले ते छडयांच एक बंडलच्या बंडल काखोटीस घेऊन. घरात शांतता पसरली होती. दादांनी बैठकीच्या खोलीत दोघांना बोलविले. खोलीला आतून कडी लावून लेखकाला विचारले, ''पेपर सांगितलास?''(पृ.५८) दोघांनाही विचारले. दोघेही नाही म्हटले. त्यानंतर दोघांनाही खाली वाकण्यास सांगितले. वाकल्यानंतर दोघांच्याही पाठीवर वेताची बरसात होऊ लागली. वेताचे बंडलच्या बंडल त्यांच्या पाठीवर फुटून संपले. अर्धा तास तोच क्रम चालू होता. आईने खूप विनविले पण दादांनी तिच्या बोलण्याला दाद दिली नाही. 'गुराढोरांसारखा मार खाऊन शेवटी आम्ही जिंकलो होतो.'(पृ.५९) असे लेखकाचे मत होते.

त्यानंतर दहा-बारा दिवस लेखकाची व माईची मौज होती. खायला देणे, मलमपट्टया करणे, ही कामे दादाच करीत होते. या घटनेने दादा मात्र व्यथित झाले व त्यांनी परतवाडा सोडण्याचा, ती शाळा सोडण्याचा निर्णय घेतला. लेखकालाही या गोष्टीची खंत वाटली. ''इतके दिवस 'बरी मुलं' असं मिळविलेलं नाव, थोडीबहुत प्रतिष्ठा, स्वास्थ्य हे सगळं अगदी धुळीला मिळालं. तोंडाला काळोखी फासून घेऊन परतवाड्याहून निर्वासित व्हावं लागलं.''(पृ.५४)

**१.२.४.५. सत्तांतर :**

''बोथरी शेपुट उभारत धावली. पातेऱ्यावर आवाज झाला. आणि एका झुडपा आडून रानकुत्र्यानं झेप घेतली. ती झेप नेमकी. बोथरीच्या अंगावर पडली. बोथरी पातेऱ्यात लोळताच कुत्र्यानं आपल्या पोलादी जबडयात तिचा गळा घेतला आणि जबडयाचा चाप खटकन मिटला.'' बोथरीच्या शेपटात, हातापायात एकाएकी विलक्षण बळ आलं. संतापलेल्या नागानं फणा आपटावा. तसं तिचं शेपूट जमिनीवर आपटले. कुत्र्यानं जबडयाची पकड जास्ती घट्ट केली. पुढचा एकपंजा बोथरीच्या छातीवर दाबला आणि दोन तीन हिसके दिले. निर्जीव चिरगुटासारखं बोथरीचं अंग लुळं पडलं. त्यासरशी आणखी कुत्री धावत आली आणि तिनं बोथरीच्या मांडीचा लचका

तोडला. लुटुलुटु धावत तिची सहा पिलं आली. ही वयाने चार महिन्यांची होती. सहा पिलं, त्यांची आई आणि बाप ताज्या भक्षावर तुटून पडले. दोन-अडीच घटका गेल्या. आणि त्या जागी काहीच उरले नाही. थोडे रक्ताचे शिंतोडे म्हाताऱ्या वानरीचे पुंजकाभर केस. बाकी काही नाही. फक्त वास, रक्ताचा, आतडं फुटून सांडलेल्या चारोटाचा, शेणाचा. कुत्रा-कुत्री, आणि बोथरीच्या मांसानं टिच्चून भरलेल्या पोटांच्या झोळया लोंबणारी सहा पोरं तिची सहा पोर नाल्याच्या धशिला गेली. गारवा बघून कुत्रा पसरला. पुढं जावून कुत्री पसरली. तिला लागनूच तिची सहा पोरं आईच्या पोटावर तोंड टेकवून एकमेकांच्या अंगावर चढून पसरली. त्यांची पोटं श्वासाबरोबर हालत राहिली. अधूनमधून कान टवकारत राहिली.(पृ.१३) बोथरीच्या जीवनाचा करूण अंत लेखकाने आपल्यासमोर वरील घटनेतून साक्षात उभा केला आहे. हा प्रंसग जणू काय आपल्या समोर घडतो आहे, आपण तो पाहतो आहे असे वाटते.

**१.२.४.६. झोंबी :**

प्रस्तुत कादंबरीत लेखक आनंद यादव यांची शिक्षणाची ओढ आणि वडिलांचा शिक्षणाला असलेला प्रखर विरोध या कादंबरीचे मूळ सूत्र आहे. वारंवार शिक्षणाला विरोध करुनही आनंद शाळेत जात होता यामुळे संतप्त वडील त्याला बेदम मारत असल्याचे अनेक प्रसंग कांदबरीत आले आहेत. आनंद इयत्ता सातवीत होता. सातवीची पूर्वपरीक्षा संपली होती. प्रत्येक विद्यार्थ्याचे एकशे वीस दिवस भरलेले असले पाहिजेत. गुऱ्हाळाच्या कामात लेखकाची पंधरा-वीस दिवस शाळा बुडाली. त्यानंतर तरी आपल्याला शाळेत जाता येईल, असे आनंदला वाटत होते, परंतु त्याच्या या अपेक्षेवरही विरजण पडले. ''आता येवढं लावणीचं बघू, नांगूर धरुन सऱ्या सोडून नि एवढं बी पेरुन घेऊ. म्हंजे मग तू मोकळाच हुशील''(पृ.२०१) असे त्याला वडिलांनी सांगितले. त्यामुळे आनंदचा धीर सुटला. तो दादाच म्हणणे न ऐकता शाळेत जात होता. नको जाऊ म्हणत असतांना आनंद शाळेत गेला आणि वडिलांनी त्याची शाळा गाठली. शिक्षकांच्या परवानगीने वडिलांनी त्याला हाताला धरुन बाहेर आणले. पुढच्या घटनाक्रमाची कल्पना आनंदला आली होती पण प्रतिकार करुन उपयोग होणार नव्हता तरीही राम मंदिराच्या चौकात आल्यावर वडिलांच्या हाताला हिसका देऊन, पळून जाण्याचा प्रयत्न केला परंतु काही कळण्याच्या आत पाठीत जोरात दणका बसला. चक्कर आल्यासारखी झाली. जवळ आलेल्या दादाने चपलेने तोंडावर, डोक्यावर, साऱ्या अंगावर कुठेही मारायला सुरुवात केली. आनंद जमिनीवर आडवा पडला. त्याला उठताही येईना. शाळेसाठी वडिलांनी आनंदला भर चौकात मारल्याची बातमी गावभर पसरली.(पृ.२०२, २०३)

शिक्षण घेण्याची तीव्र अभिलाषा व शिक्षण घेऊ नये यासाठी असलेला वडिलांचा प्रचंड विरोधाचे चित्रण वरील प्रसंगात मांडले आहे. या घटनेनंतरही अनेकवेळा मारल्याचे प्रसंग कादंबरीत लेखकाने मांडले आहेत.

**१.२.४.७. झाडाझडती :**

'झाडाझडती' या कादंबरीमध्ये धरणग्रस्त की जे आपल्या मायभूमीला पारखे झाले होते. यांचे आणि खैरापूरनिवासी की ज्यांच्या जमिनी धरणग्रस्तांना दिल्या होत्या. यांच्या मध्ये वाद झाल्याचे अनेक प्रसंग या कादंबरीमध्ये आलेले आहेत. त्यातीलच एक प्रसंग. खासदार शिंगाडे यांची जमीन धोंडीराम काळे याला कसण्यासाठी दिलेली होती. आणि तिच जमीन सावळेरामाला धरणग्रस्त म्हणून मंजूर झालेली होती. सावळेरामाने त्या जमिनीमध्ये मका पेरला होता. मक्याचे पीक जोमात वाढले होते. सावळेरामाच्या मक्याच्या उभ्या पिकात धोंडयाने चार बैलं, दोन-तीन म्हशी आणि दोन रेडे सोडले होते. गुरांनी उभ्या पिकाची नासाडी केली होती. सावळेराम बातमी कळल्यावर जीवाच्या आकांताने शेताकडे पळाला. 'बांधावर काठया, कुऱ्हाडी घेऊन धोंडया, राघु भिवा, बबेराव असे खैरापूरचे दहा-पंधरा शेतकरी उभे होते.'(पृ.२२३) सावळेरामाने ठो-ठो बोंब मारली. शेवटी त्याच्या सहनशक्तीच्या पलीकडे गेल्याने त्यानेही काठी घेतली व पुढे सरसावला पण त्याच्या बायकोने सावळेरामाच्या पायाला कवळले. कारण तिला भय होते ते शेताभोवती काठया कुऱ्हाडी घेऊन उभ्या राहिलेल्या खैरापूरकरांचे. ती किंचाळली, ''कारभारी व ऽऽ पिकाचा हुद्दे सत्यानास-पर तुमी जिवाला जपावं''(पृ.२२३) सावळेराम हवालदिल झाला. सावळेराम मातीत पडून, माती तोंडात घेत गुरासारखा बेरडत होता. गोम्याची बायको ही देखील बोंबा मारत कपाळ बडवून घेत होती कारण सावळेराम आणि कमळी यांनी दोघांनी भागीदारीत मका पेरला होता. गोम्याची खोप व सावळेरामाची झोपडी दुःखाच्या खाईत होती. दोघांच्याही चुली त्यादिवशी पेटल्या नाहीत. शेजाऱ्यांनी भाकरी दिल्या व दोघांच्या घरातील मुलांची पोटं भरली.

सर्जेरावाने सावळेराम व कमळी यांना वाडयावर बोलावून त्यांच्या हाती चार-चार हजार रुपये दिले. सावळेरामाला शेताची किंमत तीस हजार होत असली तरी उरलेले पैसे नंतर देऊ व मुलाला कारखान्यात नोकरीला लावू असा शब्द दिला. बिचाऱ्या सावळेरामाने खैरापूर सोडले व बहुतेक जांभळीच्या डोंगराकडं तो निघून गेला.(पृ.२२४)

वरील प्रसंगाने धरणग्रस्ताची व्यथा, वेदना, हालअपेष्ठा व्यक्त होते. गरीब बिचाऱ्या धरणग्रस्तांची जगण्याची धडपड आणि उन्मत्त लाभ क्षेत्रातले बडे शेतकरी यांचा उन्मत्तपणा पाहावयास मिळातो.

'आधी मरण मगच धरण' अशी व्यथा खैरमोडे गुरुजी नेहमी व्यक्त करायचे. खरचं हे धरण म्हणजे काही लोकांच्या दृष्टीने यमदूत ठरले. धरणाचा पहिला बळी आवडाईचा कारभारी गोईंदा हा ठरला. आणि त्यानंतर दुर्दैवी अंत झाला तो शिवरामचा याच्या खूप नवसाने झालेला मुलाचे बारसे आदल्या दिवशी झाले होते आणि शिवराम बाळाच्या गोड आठवणी घेऊन धरणाच्या कामावर गेला होता. 'पारीबरोबर त्याचे हात खणखणत होते. यांत्रिक हालचाल चाललेली. मन मात्र घारीगत बाळाच्या भोवतीनं घिरटया घालीत होतं. चोचीला चोच देत होतं.'(पृ.११०) डोझर ड्रायव्हरचे काम वेगाने चालले होते. टेकडया भूईसपाट करण्याच काम डोझरने चालले होते. शेवटचा ढिगारा टाकून झाला आणि ड्रायव्हरनं गडबडीनं बळीनं पंख आकसून वर धरावे तसे डोझरचे पाते वर आकसले. डोझर गरकन फिरवून मावळत्या बाजूने कातळावरुन तो उजवीकडे वळला. घरघरता डोझर वेगाने पुढे चालला होता. छिद्राकडे बघत एकाग्रतेने पारीचा घाव घालणाऱ्या शिवरामच्या अंगावर धारदार पात्याचा झटका बसला. त्याच्या उभ्या देहाची मोळी तो डोझारच्या आडवा पडला. पात्याने ड्रायव्हरची नजरबंदी केली होती. रणगाडयासारखी डोझरची रेटती चाकपट्टी शिवरामच्या अंगावरुन पुढं गेली. मांसाचा गोळा डोझरच्या आणि कातळाच्या मधोमध लाटला. अंगाची चपाती झाली. हाडं कातडं कातळावर चिकटून गेले.(पृ.११०)

लेखकाने हा प्रसंग सांगितल्यावर वाचकाला आसवांना वाट मोकळी करुन द्यावी वाटते. हृदय पिळवटून निघते. 'आधी मरण मगच धरण' हे या प्रसंगाने सिद्ध केले. यातून दुर्दैवाची गोष्ट म्हणजे धरणाचे काम करतांना बळी गेलेल्या या शिवरामाच्या पत्नीला नुकसान भरपाई मिळत नाही. कारण शिवराम नोकरीत कायम झाला नव्हता.

**१.२.४.८. राघववेळ :**

एकनाथ वाण्याची आजारी म्हैस मेल्यानंतर शिवऱ्या, बुग्या, पायरु, सुदामा हे ती म्हैस घेऊन गावाच्या बाहेर घेऊन जातात. मेलेल्या म्हशीच्या वाटण्या केल्या जातात. हे विदारक वास्तव लेखक पुढील घटना-प्रसंगातून मांडतो. ''एकनाथ वाण्याच्या गोठयात जाऊन चौघांनी म्हशीचे मागाचे पुढचे पाय जोडीने बांधले. दोन पायातून एक लाकूड अशी दोन लाकडे त्यातून घातली. डाव्या उजव्या बाजूला दोघे दोघे मागे-पुढे उभे राहीले. खांद्यावर म्हैस उचलली. रस्त्यावर आणली.

म्हशीचे ते जाडजूड धूड चौघांना उचलेना. परंतु जास्तीचा वाटेकरी त्यांना करावासा वाटेना. त्यामुळेच चौघांनीच म्हैस उचलली. रस्त्याला लागले. रस्ताभर रघू शेपुट धरुन त्यांना आपल्या परीने आधार देत होता. गावाच्या बाहेर येऊन ते आखरावरच्या वाण्याच्या कुपाजवळ थांबले.''

त्यांनी म्हैस खाली टाकली. आपापले दुखरे खांदे बराच वेळ कुरवाळले. म्हशीच्या पायांची दोर सोडले. चामडे सोलायला घेतले. तोवर वेटाळातील मुले-मुली, बायका, माणसे जमेल त्या अवजारानिशी टोपली, घमेली, पातेली, डबे, खोके काहीतरी घेऊन अखरावर आले. कौशीही घमेले घेऊन आली. पायरु, शिवऱ्या, सुदामासोबत बाकीच्यांनीही शक्य तितके म्हशीचे लचके तोडले. चामडे सोलल्याने म्हैस उघडी पडली. मांस काढल्याने अधिकच विद्रुप दिसू लागली. चौघांनी म्हशीच्या मागच्या पायांचे मांस सोडवले. पोट फाडून त्यातील काळीज, बोके, हेळे, फाशी, चरबी असे काहीबाही अल्लाद बाजूला काढले.

**१.२.४.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' या कादंबरीमध्ये स्वातंत्र्यपूर्व इतिहास रेखाटला आहे. १९४२ पासूनचा कालखंड असल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी जो काही लढा दिला, त्या रोमांचकारी घटना लेखकाने सांगितल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने सरकारी खजिना लुटणे, पोलिस ठाणे, तहसील कचेरी ताब्यात घेणे, टेलिफोन खांब उखडणे, तारा तोडणे तसेच ब्रिटिश फौजेसाठी शस्त्र घेऊन जाणारी ट्रेन उडवून देण्याचा प्रयत्न यासारख्या अनेक घटकांचा उल्लेख लेखकाने केला आहे.

ब्रिटिश राजसत्तेचं प्रतीक असलेली कचेरी ताब्यात घेण्याचा प्रसंग लेखकाने उदाहरणादाखल पुढीलप्रमाणे ''लागोपाठ तीनचार बॉंबस्फोट झाले, त्यासरशी शहराला उखडून जाग आली. नाईकांच्या गटाने आपले काम चोखपणे बजावले होते. आधी कच्च्या अंधारात आठ दहाजण पोलिस कचेरीत घुसले. गुलबा नाईक पुढे होते. सोबतीला मारुती, दगडू व त्यांचे विश्वासू साथीदार. पहाऱ्यावर पोलिस होता. तो निवांत घुरमळलेला होता. नाईकांनी त्याला मिठी मारली. तो ओरडायला लागताच त्यांनी आपला दणकट पंजा त्याच्या तोंडावर झाकणासारखा बसवून दिला. मारुतीने तिथली बंदूक उचलली आणि हवेत बार उडवला. त्याबरोबर बाकीचे होते ते पोलिस धावत आले. ते अर्थातच नि:शस्त्र होते. त्याचवेळी टोळीतील आणखी पंचवीस-तीस माणसं आत घुसली. त्यांनी पोलिसांना आवळलं. कचेरीच्या मागेच फौजदार राहत होता. त्याला झोपेतून उठवून आणलं आणि बांधून उभं केलं. काय होतंय याचा उलगडा व्हायच्या आत सारी कारवाई पूरी झाली होती. मग खुणेचे बॉंब उडाले आणि शहर जागे झाले. हादराच

बसला.''(पृ.४३) कचेरी ताब्यात घेतल्यानंतर ठाण्याचे प्रमुख म्हणून पांडुरंग तिकोने व तहसीलदार म्हणून तुकाराम भोईटे पाटील यांची नेमणूक केली.

ब्रिटिश सरकारची शस्त्रास्त्रांनी भरलेली ट्रेन उडविण्याचा जो प्रसंग होता तो असफल झाला. ट्रेन ज्या पुलावरुन जाणार होती त्या पुलावर ट्रेन आल्यानंतर पूल उडविण्याचा त्यांचा मनोदय होता. परंतु ट्रेन पुलाजवळ येऊन थांबली. ट्रेनमधून लष्कराच्या जवानांनी उड्या मारल्या. 'ही पंचकडी झाडोऱ्याच्या आसऱ्याने डोंगराच्या पोटातून पळत सुटली होती.'(पृ.७८) म्हणजे पांडुरंग, नारायण, गोविंदभाई नाईक व नाना हयांनी तेथून पलायन केले. जवानांनी फायरचा इशारा दिला. अशा प्रकारच्या अनेक रोमांचकारी घटनांचा कादंबरीत वेध घेतला आहे.

**१.२.४.१०. तणकट :**

जयभीम तरुण मंडळाला पाच गुंठे गावठाणातली जागा मंजूर झाली. गावातल्या लोकांना मात्र ही गोष्ट मानहानीकारक वाटली. तेथे गाववाल्यांनी डेअरी काढण्याचा निर्णय घेतला. त्या जागेवर गावकऱ्यांनी पाया खोदून बांधकाम उंबऱ्यापर्यंत आणले. बाळासाहेब व आलताफ कांबळेने आटापिटा करुन ती इमारत पूर्ण करण्याचा निर्णय घेतला. कामाची सर्व पूर्वतयारी केली. दिवस उगवल्यावर महारवाडयातून अनेक लोक बांधकामाच्या ठिकाणावर जमले.

बाळासाहेबदेखील काळा गॉगल व सफारी घालून केसाला चपचपीत तेल लावून आला. सुलीच्या हस्ते बांधकामाची सुरुवात करायचे ठरले आणि त्यामुळे सुली पंचपाळ, नारळ, उदबत्त्या घेऊन आली. सुली व बाळासाहेब दोघं मिळून पूजा करु लागली. आणि अचानक सुईऽऽ आवाज करत घोळक्यात दगड घुसला. भैरोबाला दगड लागला. क्षणार्धात दगडांचा वर्षावच सुरु झाला. गर्दीतले सगळे सैरावैरा पळाले. बायका वडारच्या घरात गेल्या. बाळासाहेब स्वतःच्या आडोशाला सुलीला घेऊन पळायला लागला. त्याच्या डोक्यात दोन दगड बसले. दगडांचा पाऊस पडल्यासारखे वाटत होते. दगडांचा वर्षाव थोडा वेळ थांबून पुन्हा सुलीच्या घरावर दगड पडू लागले. बाळासाहेबाला धरुन पाच जणांची डोकी फुटली. वाऱ्यासारखी बातमी पसरली. आलताफ कांबळे व जालिंदर बनसोडे घटनास्थळी उपस्थित झाले. वार्ताहराला बोलावून वर्तमानपत्रात बातमी देण्याचे ठरविले. तसेच मोर्चा काढण्याचे नियोजन केले.(पृ.२१६)

अशा प्रकारे महार व गावातील गावकरी यांच्यातील वाद विकोपाला गेला होता. हे या घटनेतून दिसते.

### १.२.४.११. डांगोरा एका नगरीचा :

प्रस्तुत कादंबरीतील उदाहरणादाखल पुढील एक प्रसंग नमुद केला आहे. सर्जेरावाविषयीचे कालकुट राणी कसं ओतायचं, कोणत्या शब्दात ते मनाशी ठरवून आले होते फौजदारसाहेब. पण सगळाच गडबड गुंडा झाला. सर्जेरावाची पहिली बायको नांदत नव्हती. आणि दुसरीने नुसता घराचा भंडवाडा करुन ठेवला होता. सर्जेराव हुशार पण जर विक्षिप्त डोक्याचा पहिल्यापासून. आईचा नादिष्टपणा चालवून घ्यायच्या भरात, त्यानं पहिल्या बायकाचं वैर ओढवून घेतलं. गेली ती सोडून. वर्षातून चार-दोन सणांच्या दिवशी देवीचा प्रसाद म्हणून मांसमच्छर चालवून घ्यायचा. एरव्ही भाजी-भाकरी, चटणी-ठेचा, मेतकुट-भात याच्यात त्याला आनंद. दुसऱ्या बायकोनं घरात पाऊल ठेवल्या दिवसापासून त्याच्या बामनी चोचल्यासाठी नाकदुऱ्या काढायला सुरुवात केली. सासूलाही झुगारलं. वर चष्मा ठेवून गाजू लागली तोफखाना होवून. आई-लेकांना जीव नकोसा झाला. तीचा गलका गल्लीभर ऐकू येवू लागला, की सर्जेरावला उभं वारं सुटायचं घरात. दोन घास पोटात घालून तो गावभर हिंडत रहायचा. बाजारपेठेतले अड्डे, चावडीची ढेळजं, कधी हे देऊळ कधी ते. फारच अस्वस्थ झाला म्हणजे तळ्यातल्या वर्षा महालाला जोडणाऱ्या घाटापायऱ्यांवर तो बसलेला असे...

भिंगरीसारखा गावभर फिरणारा चोवीस तास कडकड करणाऱ्या बायकोच्या कचाट्यात सापडला. त्याचा कणाच मोडून गेला. बावचळल्या सारखा वागू लागला. दरवाजाशी पहारा करणाऱ्या शिपायावर एके दिवशी कुऱ्हाड पाजळत चालून आला. त्या रात्री बाळंतिणीच्या अंधाऱ्या खोलीत त्यानं बायकोला कोंडल. चपळाई करुन आणि बााहेरुन कडी घातली. तिनं अक्षरशः बोंब ठोकली. आणि दाराला धडके देत ओरडू लागली. गल्ली जमा झाली. आई मधे पडली. तिला सर्जेरावानं स्वयंपाकघरात ढकलून घातलं. ओसरीवर तो जळफळत फेऱ्या घालीत असतांना राखणदार शिपाई वाड्यात घुसले. त्यांनी त्याला चुप बसविले. या प्रसंगानंतर फौजदारांनी सर्जेरावाला जाणूनबूजून वेडा ठरविले आणि त्याच्या बंदोबस्तासाठी थेट आता सदरेवर एक पाळतगार ठेवला.(पृ.३९५, ३९६) अशा प्रकारचे अनेक भयावह घटनाप्रसंग कादंबरीत कथानकाच्या ओघात जागोजागी आलेले आहेत.

### १.२.४.१२. बारोमास :

मधूने नोकरी मिळावी म्हणून एक लाख डोनेशन भरले. त्यासाठी दगडू महाकाळकडे कल्याणीचा मळा गहाण ठेवला. दगडू महाकाळने मधूला दोन लाख रुपये दिले. आमदाराच्या

पी.ए.ने मधूची फसवणूक केली. एक लाख रुपये पण गेले आणि नोकरीही मिळाली नाही. सुभानराव दगडू महाकाळला एक लाख रुपये घे आणि अर्ध शेत दे असे म्हणाले पण दगडू महाकाळने त्यांना नकार दिला. सगळे पैसे द्या आणि शेत ताब्यात घ्या, असे सांगितले. हताश झालेल्या सुभानरावांनी पालखीची वर्गणी द्यायची असे खोटे सांगून शंभर रुपये नेले व त्या शंभर रुपयाचे एन्ड्रिन आणले व ते औषध गोठ्यात जाऊन पिले. शेवंतामाय खरकटं पाणी टाकायला गेली तेव्हा तिला दिसले की, सुभानराव धाडकन खाली पडले. तेजराव तात्या, शंकरतात्या, बळीमामा, समाधान चांदणे, भामाबाई, शेवंतामायच्या रडण्याने जमा झाले. तेजराव तात्यांनी मिठाचं पाणी पाजलं त्यामुळे सुभानराव उलट्या करत होते. दत्ता वारे, एकनाथला घेऊन आले. उलट्यांमुळे दुर्गंधी सुटली होती. शंकर तात्यांनी मला ओळखलं का? म्हणून विचारले पण सुभानरावांनी कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही. याचाच अर्थ सर्व औषध बाहेर पडले नव्हते. म्हणून शंकर तात्यांनी एक जालीम उपाय सांगितला. लहान मुलाचा शौच पाण्यात कालवून पाजण्याचा. शेवटी तो उपायही केला व सुभानरावाच्या कानात ओरडले, ''सुभाना.... तुले नरकुडा पाजला. वक आता तू भडंभडं. हायगई नको करु... कर वानत्या... वक...''(पृ.३०८) हे शब्द ऐकल्यावर सुभानराव सगळया अंगाला हिसडे देत ओकाऱ्या करु लागले. सगळ औषध बाहेर पडले व धोका टळला. 'काळ आला व्हता पण येळ आली नवती'(पृ.३०९) अशा प्रकारे सुभानरावाने केलेला आत्महत्येचा प्रयत्न व पत्नी आणि काही जाणते लोक यांच्यामुळे सुभानरावांचे प्राण वाचले.

'बारोमास' या कादंबरीची पार्श्वभूमी प्रामुख्याने ग्रामीण, शेतकरी कुटुंबातील आहे. त्यामुळे घटना अथवा प्रसंग हे प्रामुख्याने कौटुंबिक आणि शेतीशी संबंधीत समस्या किंवा शेतकऱ्यांच्या जीवनाशी व्यथा व्यक्त करणारे आहेत. असाच एक कौटुंबिक वादाचा प्रसंग मधू-अलका यांच्या बाबतीतला आला होता. मधू नेहमीप्रमाणे धनाच्या शोधात जमीन खोदण्याचे काम करुन आला होता. त्याला अलकाने अंघोळीसाठी पाणी काढून दिले होते. त्याने अलकाला साबण मागितला. तिने साबण देण्यास नकार दिला, कारण तिने तो साबण माहेरहून आणला होता. अलकाने साबण न दिल्यामुळे त्या दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. रागाने मधूने अलकाच्या मुस्काटीत मारली. त्यामुळे अलका बेशुद्ध पडली. मधू अंघोळीला निघून गेला. सुभानराव डॉक्टरला आणायला गेले. शेजारच्या ममता वारेने तिला शुद्धीवर आणण्यासाठी कांदा हुंगायला लावले. अलका निःश्चल होऊन पडली होती. मधू आंघोळ आटोपून आला. आपल्या मारण्याने आपल्या भावजयीची दातखिळी बसली. या घटनेचा मधूच्या मनावर काहीही परिणाम झाला नाही. उलट उर्मटपणे तो

तिथून निघायला लागतो. अलकाच्या नवऱ्याला म्हणजे एकनाथला मधूच्या उर्मटपणाचा राग आला आणि त्यामुळे एकनाथही त्यावर धावून जातो. त्यांच्या दोघांमध्येही मारामारी सुरु होते. त्याच मारामारीत टी.व्ही.ला धक्का लागतो व टी.व्ही. खाली पडतो. घरातल्या एकुलत्या एक चांगल्या वस्तूच्या ठिकऱ्या-ठिकऱ्या होतात. एकनाथच्या पायाला जखम झाली. त्याच्या पायातून रक्त आले होते. अलका शुद्धीवर आल्यावर तिने रागाच्या भरात तिचा अवतार नीट केला आणि कपड्यांची आवराआवर केली व माहेरी निघून गेली. (पृ.१५४ ते १६१) अलका या घटनेनंतर जी माहेरी गेली ती परत कधीच आली नाही. अलका व एकनाथचा संसार या प्रसंगाने मोडला होता. अशा प्रकारे अलका व कुटुंबातील व्यक्ती यांच्याशी वादाचे अनेक प्रसंग कादंबरीत आले आहेत.

**१.२.४.१३. भूमी :**

मैथिलीचा आठव्या महिन्यात गर्भपात झाला त्याचा प्रसंग लेखिकेने हृदयाचा ठोका चुकविणारा रेखाटला आहे. स्त्रियांना वेगवेगळ्या प्रकारच्या दुर्दैवी घटनांना सामोरे जावे लागते. बाळाच्या येण्याची चाहूल लागण्यापासून कोणतीही स्त्री वेगवेगळी स्वप्ने रंगवू लागते असेच स्वप्न मैथिलीनेही रंगविले होते. पण तिच्या ह्या स्वप्नांचा चुराडा कशा प्रकारे झाला हे पुढील प्रसंगातून दिसते. मैथिलीला हॉस्पिटलमध्ये जाग आली. पांढऱ्या भिंती, हिरवे पडदे, हॉस्पिटलचा विशिष्ट वास तो लहानपणापासून आवडतोच तिला पण आता हे वेगळ आहे काही कंबर अजूनही दुखतेय. ओटीपोटावर हात ठेवला ते खाली झालेले समोर शंतनू पूर्ण विझलेला, पराभूत खाली मान घालून स्वतःचाच पूर्ण दोष असावा तसा अपराधी. मैथिलीने डोळे उघडल्याचे दिसले तेव्हा तो सिस्टरला बोलवायला गेला.

कालची रात्र! काल रात्रीच केव्हा तरी स्त्राव सुरू झाला. ओटीपोटातून प्रचंड कळा. आठवा महिना संपायचा होता, तेव्हाच ब्लीडिंग सुरू झालेले, डॉक्टरांनी रेस्ट घ्यायला सांगितली. कंबरही दुखायची. कॉलेजला जात नव्हतीच या महिन्यात. काल रात्री धर्मराजनला उठवावं लागलं. शंतनू इतका नर्व्हस, की गाडीची किल्लीही नीट धरता येईना. धर्मराजनला उठवलंही तिनंच. दोघेही सोबत आली. मिसेस धर्मराजन रात्रभर थांबल्या. ऑपरेशन करावं लागलं मुलगी होती. पहाटे कुणाच्या जन्माची वेळ असते, ती या मुलीच्या मरणाची होती. डोळे मिटूनच तिनं बाहेरचा प्रकाश क्षणमात्र अनुभवला. थोडा वेळ धुगधुगी होती-बस्स. अपुऱ्या दिवसांचा जन्म, बेबीचं वजन म्हणे जास्त होतं. ते म्हणे मैथिलीच्या गर्भाशयाला पेललं नाही. आई गर्भ पेलू शकली नाही ! मैथिलीच्या

डोळ्यात पाणी आलं. तिला मुलगीच हवी होती–तिच्यासारखी लांब, जाड दोन वेण्यांचे गुच्छ. जानकीआंटीनं घालून दिली तशी घट्ट वेणी तिनंही त्या मुलीची घातली असती. किनाऱ्याच्या वाळूत गुडघ्याभोवती हात घेऊन बसलेली दुसरी मैथिली ! नाही. तिच्या मैथिलीचं हे रूप नसेलच. ही दुसरी मैथिली ते बदलूनच टाकील तिच्या चिमण्या रंगांनी.

**१.२.४.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : कादंबरीच्या या भागामध्ये अनेक घटना प्रसंगाचा समावेश केलेला आहे. यामध्ये प्रामुख्याने सुबोध आणि सुमाधुरीच्या विवाहाचा, रिसेप्शनचा प्रसंग विवाहानंतर नववधूचे नाव बदलण्याचा प्रसंग, बाळ झाल्यानंतर त्याच्या बारशाचा प्रसंग, बाळाच्या संगोपणातील प्रसंग किंवा रात्री अपरात्री माधुरीचा चांदणे पाहण्यासाठी टेरेसवर जाण्याचा प्रसंग.

माधुरीचे नामांतर करण्यामध्ये सासू व आज्जेसासू यांची स्वतंत्र मते होती. सासूला माधुरी नाव आवडत होते त्याचे कारण असे माधुरी दिक्षित तिची आवडती होती. हम आपके है कौन? हा चित्रपट सासूने थिएटरमध्ये दहा वेळा टी.व्ही.वर सात वेळा आणि व्हि.सी.आर.वर अकरा वेळा पाहिला होता. आज्जेसासूला माधुरीचे नाव बदलून श्रीदेवी ठेवायचे होते. आज्जेसासू म्हणते. ‘श्री देवी ही देवाधर्मातले नाव आहे. आता घरात परक्यांची मुलगी येईतो मी ह्या जगात नसेल. माझ्या आयुष्यातले हे शेवटचे कार्य. श्रीदेवी नाव ठेवायचे’’ सुबोधचे वडील आई आणि बायको यामध्ये सापडलेला पुरुष ‘आई, बायको व नवरा प्रेमाचा खास त्रिकोण’ सुबोधच्या वडिलांना मधला मार्ग काढावा लागत असे. ते म्हणाले, ‘श्रीमाधुरी नाव बघा कसे वाटतेय नाही तर माधुरीदेवी, माधुरीदेवी एकदम घरंदाज राजघराण्यासारखे नाव, श्रीमाधुरी एकदम नवे नाव. माधुरीला स्वत:च्या नावाबद्दल उत्सुकता होती. शेवटी आज्जेसासूने नावाचा पेच सोडविला तिच्या मते नवरा मुलगा सुबोध तर नवरी मुलगी सुमाधुरी. सुमाधुरी नाव ठेवायचे निश्चित झाले.

नववधूचे नाव ठेवण्याविषयीची मते विनोद निर्मिती करणारे वाटतात. जिचे नाव ठेवायचे तिचे मत कुणीच विचारात घेतले नाही.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : विलास आणि हर्षद हे दोघे मित्र होते. हे एकमेकांचे दुःख एकमेकांना सांगत. पण मित्र असला तरी त्याने जर आपल्या वैगुण्यावर बोट ठेवले तर त्याचा स्फोट हा होतोच. हर्षदने मन मोकळे केले, तो म्हणाला, ‘‘गेले तीन आठवडे झोप नाही. जेवण धड नाहीय. डोकं भरकटून गेलयं.’’ तेव्हा विलास म्हणाला, ‘‘सहाजिकच आहे, तुझ्या आईचे अफेअर...’’ विलासने आपल्या जखमेवर मीठ चोळले असे हर्षदला वाटले आणि विलासचे वाक्य

पूर्ण व्हायच्या आतच विलासच्या तोंडावर सणसणीत गुद्दा बसला. कप पडला, फुटला. विलास जमिनीवर कोलमडला. क्षणात उठला आणि त्याने हर्षदच्या पोटावर लाथ उगारली. हर्षद भर्रकन मागे सरला. वेगाने दाराकडे धावला, दार उघडले, बाहेर पडला. दणादण जिने उतरुन गेट फाडकन उघडून बाहेर स्कुटरवर स्वार होऊन क्लच दाबून पहिला गिअर टाकून... स्कुटर सुरु... लगेच दुसरा गिअर, तिसरा गिअर... फुल स्पीड...(पृ.६२) अशाप्रकारे वरील प्रसंगावरुन विलास व हर्षद यांची मैत्री काही काळाकरिता तरी तुटली होती.

**१.२.४.१५. खारीच्या वाटा :**

लेखक, दिन्या, लुकी आणि दोन्ही घरची जनावरे अशी वरात नदीकडे जात असे. दिनू पुढं, लेखक मागे, खांद्यावर लुकी. अचानक आघाड्याचा एक पल्लेदार तुरा वाऱ्याच्या झोतानं खांद्यावर आदळला. फटकाच बसला. कानाखाली, मानेवर ओरखडे जाणवले. लुकी तिथंच बसलेली. तिलाही प्रसाद मिळाला असणार. लुकी बेसावध होती. ध्यानी मनी नसताना अवचित फटका बसला होता. तिला काय करावं हे न सुचल्यामुळे तिने लेखकाच्या खांद्यावरून उडी टाकली आणि ती बारशा बैलाच्या पाठीवर पडली. ती तरातरा वशिंडापर्यंत धावत गेली. पिंडीसारखी वशिंडाला घट्ट चिपकून बसली. लुकी घाबरलेली. बारशा बिथरला होता. पाठीवर कोण धावतंय, त्यालाही कळेना, तो मागले पाय आपटू लागला. ती पडावी म्हणून बारशा मानेला हिसडे देऊ लागला. हिसड्यागणिक गळ्यातल्या चंगाळ्याची घुंगरं जोरात वाजत. आवाजानं लुकी शेपटीकडे धावायची. बारशा चवताळून शेपटी पाठीवर आपटू लागला. शेपटीच्या गोंड्याचा फटका पाठीवर पडला की लुकी वशिंड गाठायची. असं चाललेलं. लुकी सैरभैर झालेली. बारशा बावरलेला, संतापलेला. त्याचाही तोल सुटलेला. एका क्षणी तो उधळला. बेभान झाला. त्वेषानं मान खाली घालून नाकानं फुस्कारू लागला. त्याने मोठी डरकाळी फोडली. अचानक उसळी मारून चौखूर उधळला. वेडावाकडा पळत सुटला. मधेच थांबून तडातडा पाय झाडी. अंगाला गचके देई. भेदरलेली लुकी घट्ट चिपकलेली. तिला काही कळेना. बारशा टापा झाडी. डरकाळी फोडी. मधेच पाठीवर शेपटीचा सपका मारी. लुकी पाठीवरून उतरेपर्यंत बारशाला चैन पडणार नव्हती. बारशाला थोपविण्याची हिंमत कोणातही नव्हती. बारशा पुन्हा पुन्हा पाठीवर शेपटीचे तडाखे देत होता. ते चुकविण्यासाठी लुकी सैरावैरा धावत होती. कधीतरी शेपटीचा फटका लुकीला बसेल असा बारशाचा कयास होता. नेमकं तस घडलं. शेपटीचा गोंडा पाठीवर आपटायला आणि लुकी त्याखाली यायला एकच वेळ झाली. फटका बसला. तिच्या मानानं जबर होता. कळवळून ती

खाली पडली. दमलेला बारशा लगेचच शांत झाला. कळपात घुसला. जसं काही घडलचं नाही. लुकी रपकन आपटली. धुरळा तापलेला. तरीही ती निचपित. तिची हालचाल थांबलेली. फुफाट्याचे डोळे चोळीत दिन्या धावला. लेखकही जवळ गेला. लुकीला मार लागला होता की घाबरली होती, काय ते कळेना. नुसतं मुटकुळं पडलेलं. लेखक रडवेला झाला होता. त्याने लुकीच्या अंगावरून हलकीच करंगळी फिरवली. मान किंचित हलली. दोन्ही हातांच्या तळव्यात तिला धरले तेथे तिला सुरक्षित वाटलं. नदीवर गेल्यावर पाण्याचे दोन चार थेंब लुकीच्या अंगावर टाकले. ओल्या हातांचा थबथबता सपका मारला. त्यामुळे लुकी थोडी तरारली. नाकावरचे केस लव्हाळ्यागत हालले. लेखकाला बरे वाटले.(पृ.७५, ७६, ७७) वरील प्रसंगात लुकीच्या जीवावर बेतण्याच्या प्रसंगाचे हुबेहुबे वर्णन लेखकाने केले आहे.

**१.२.४.१६. फेसाटी :**

हिराक्काच्या लग्नानंतर चार पाच दिवसांनी काकाच्या पोटात दुखू लागले. काकाला रक्ताच्या उलट्या झाल्या त्यातच मुसळधार पाऊस येत होता. पोट चढणी लागलं. अंग धोदरलं. मामाने बैलगाडीत उमदीत बार्शीकर डॉक्टरकडे नेले तेथून त्या डॉक्टरनी जतला मोदी डॉक्टरकडे नेण्यास सांगितले. पोट फार फुगल्यामुळे त्या डॉक्टरांनी सोलापूरला न्यायला सांगितले. काकाला टेम्पोत घातले. काकाचे पोट फुगून छाती पर्यंत वर सरकले होते. सोलापूरच्या कौरा डॉक्टरांच्या दवाखान्यात काकाला ॲडमिट केले. डॉक्टरने ऑपरेशन करायला सांगितले. ऑपरेशनचा खर्च बारा हजार सांगितला. अडीच तास ऑपरेशन चालले होते. काकाच्या आतड्याला तिडा पडला होता. सत्तावीस टाके पडले होते. पाहुण्या रावळ्यांकडून सात हजार गोळा केले. काकूचं डोरलं सोनाराकडे गहाण ठेवले व उरलेले पैसे जमा केले. (पृ.३७) अशा प्रकारे काकाला मरणाच्या दारातून परत आणल्याचा प्रसंग लेखकाने आपणा समोर साक्षात उभा केला आहे.

लेखकाने त्याच्या बालपणीचा एक प्रसंग सांगून कादंबरी वेदना, संघर्ष यापासून थोडी दूर नेऊन विनोदी बनवली आहे. लेखकाच्या घरी सर्जा व राजा नावाची दोन बैल होती. राजा गरीब असल्याने लेखक त्याच्या जवळ जायचा. नाथा जवळ गेल्यावर त्याचा हात चाटायचा, त्याच्या शिंगात, डोक्यावर हात ठेवायचा, बैल बसला म्हणजे त्याच्या पाठीवर बसत होता. पण तो कधी उठायचा नाही. एकदा दुपारी लेखक राजाच्या पाठीवर बसला. शिंगांना धरुन खेळायला लागला. नाथाला येझडी गाडीवर बसल्या सारखे वाटत होते. अचानक नाथाच्या मामाचं कुत्रं जोरात भुकायला लागलं तसं दोन्ही बी बैल धडपडून उठून उभे राहिले. आता काय करायच असा प्रश्न

लेखकाला पडला. खाली उतरायला पण येईना. बैलं इकडून तिकडं झाडाभोवती फिरायला लागली. लेखक खूप घाबरला. पालथा पडून त्याने वशिंडाला धरले. नाथाने जोराने आरडा ओरडा केला. तोपर्यंत मामा कामाकडनं आलेला दिसला. त्याला जरा बरे वाटले. मामाने खाली उतरवले तेव्हापासून त्याने बैलाच्या पाठीवर बसनं सोडून दिलं.

**१.२.५. पौराणिकता :**

**१.२.५.१. ययाति :**

ययाति ही वि.स. खांडेकरांची कादंबरी सामाजिक आहे की, पौराणिक हा संभ्रमात टाकणारा विषय आहे. यातील जी अनेक उदाहरणे दिली आहेत. ती पौराणिक उदाहरणे आहेत तसेच कादंबरीतील पात्र, स्थळ यांचा उल्लेख पुराणात आला आहे. स्थळाचा विचार करता ते उल्लेख पुराणात आहेत. स्थळाचा विचार करता हस्तिनापूर, अशोक वाटिका ह्या ठिकाणांच्या उल्लेखावरुन कादंबरी पौराणिक असल्याची वाटते. आजच्या वर्तमान जिवनातील परिस्थिती व समस्या यांची उत्तरे शोधण्यासाठी वा भावनात्मक साधर्म्याची प्रेरणा प्रबळ झाल्यामुळे पौराणिक कथांचा आधार घेण्यात आला. 'ययाति' (१९५९) ही महायुद्धोत्तर कालखंडातील वि.स. खांडेकरांची पौराणिक कादंबरी आहे. पौराणिक कादंबऱ्यांमध्ये ययाति ही अतिशय महत्त्वाची कादंबरी आहे.

ययाति अश्वमेध यज्ञासाठी राजधानी बाहेर पडतो. एकदा जंगलातील वणवा पाहून त्याच्या मनाला जे भावले ते त्याने व्यक्त केले. अरण्यात पेटलेला तो वणवा म्हणजे सृष्टीदेवतेचे प्रचंड यज्ञकुंड वाटले. अशाच एका यज्ञकुंडात पार्वतीने पतीच्या प्रेमासाठी उडी मारली. ती सती झाली. तो वणवा पाहतांना प्रीतीची ही अमरकथा त्याला आठवली.(पृ.३७) तसेच त्या भटकंतीमध्ये ययातिने रतीची मूर्ती पाहिली ती मूर्ती म्हणजे शंकराचे मदनाला जाळून टाकल्यानंतर शोक करीत उभी असलेली रती होती. हा उल्लेखही पौराणिक घटनेशी संबंधित आहे. ययाति माधवाच्या घरी गेला तेव्हा माधवाने आपल्या बंधूचे काव्य वाचनासाठी ययातिला दिले. त्या काव्यात कैलास पर्वताचे महात्म्य कवीने रेखाटले होते आणि भगवान शंकराने संसारासाठी या कैलास पर्वताची निवड केली हे सांगताना ययाति जे विवेचन करतो ते असे. 'उमा-महेश्वरांना' आपल्या प्रेमपूर्तीकरिता खराखुरा एकांत हवा होता. जिथे त्यांना मनसोक्त द्यूतक्रिडा करता येईल, हरल्यावर पट उधळून टाकता येईल. उमा रुसून बसल्यावर तिला बाहुपाशात बांधून टाकून तिचा रुसवा दूर

करता येईल. तसेच भगवान विष्णूही सागराच्या तळाशी शय्या पसरुन पहुडले आहेत. त्याचे कारणही हेच आहे. एकांतात जे सुख आहे त्याचा कुणीही भंग करु नये.

शर्मिष्ठेला दिवस गेलेत ही गोष्ट देवयानीला समजल्यावर बाळाच्या पित्याचे नाव तिने शर्मिष्ठेला विचारले त्यावर तिने 'मी व्याभिचारी नाही मला एका ऋषींच्या आशीर्वादाने'(पृ.२२७) असे उत्तर दिले. सूर्यासारख्या देवतेच्या किंवा मोठमोठ्या ऋषींच्या आशीवार्दाने कुमारिकांना अपत्यप्राप्ती झाल्याच्या अनेक कथा ऐकल्या आहेत. यावरुन हाही एक पौराणिक दाखला लेखकाने मांडला आहे. ययाति महाराजांचे शर्मिष्ठेवरील प्रेम किंवा शर्मिष्ठेचे ययाति महाराजांवरील प्रेम हे जर देवयानीला कळले तर ती शुक्राचार्यांना सांगेन आणि शुक्राचार्यांच्या कोपाला महाराज बळी पडले तर या भीतीने शर्मिष्ठा ठरविते, आपण पार्वती माईचा मार्ग स्वीकारु की जो मार्ग यज्ञकुंडापर्यंत जातो. पित्याच्या यज्ञकुंडात पार्वती सती झाली.(पृ.२५१) पार्वतींच्या सती जाण्याचा पौराणिक दाखला येथे आला आहे.

**१.२.५.२. रथचक्र :**

'रथचक्र' या कादंबरीचे मुखपृष्ठ पौराणिक संदर्भ देणारे आहे. कादंबरीच्या मुखपृष्ठावरील रथाचे चाक अर्धे भूमीत रुतलेले आहे. त्यामागे एक पौराणिक कथा आहे. कर्णाने नजरचूकीने ब्राम्हणांची गाय मारली तेंव्हा त्याला शाप दिला गेला होता. ऐन युद्धाच्या वेळी तुझे रथाचे चाक मातीत रुतून बसेन. या शाप वाणीचा संदर्भ घेऊन आपल्याला कादंबरीतील पौराणिकता स्पष्ट करता येईल. थोडक्यात 'रथचक्र' हे कादंबरीचे शीर्षक हे पौराणिक आहे.

**१.२.५.३. स्वामी :**

रमाबाईंना सासूबाईंनी वाचनासाठी दिलेल्या ग्रंथाचे नाव हरिविजय (पृ.५०) ''पांडव वनवासात जातात बाई! तो प्रसंग ऐकताना डोळे पाणवतात!'' ''तो पांडवप्रताप''(पृ.५०) या पौराणिक ग्रंथाचा उल्लेख कादंबरीत आला आहे. पुराणग्रंथांचे वाचन पूर्वीपासून घराघरातून केले जाते.

**१.२.५.४. स्मरणगाथा :**

स्मरणगाथा या कादंबरीत लेखकाला नाटकात काम करण्याची आवड असल्याने तो विविध नाटक कंपन्यांमध्ये नाटकात भूमिका करण्यास संधी मिळविण्यासाठी गेला. बालमोहन पौराणिक

नाटकाचे प्रयोग करीत होते. स्वर्गावर स्वारी या नाटकात प्रल्हाद, कयाधू, हिरण्यकशिपू या सारख्या पौराणिक पात्रांचा समावेश होता.

गोपाळने ‘स्वर्गावर स्वारी’ या नाटकात प्रल्हादाचे काम केले. नाटकात पौराणिक प्रसंगांचा समावेश होता. नर्मदा परिक्रमेचे साध्य प्राप्त झाले म्हणजे नर्मदा तीरावर पोहचल्यावर तिच्या दर्शनाने स्तब्ध झालेल्या लेखकाने आपल्या भावना पुढिल पौराणिक प्रसंगातून व्यक्त केल्या. ‘अर्जुनाला विश्वरूप पाहतांक्षणी जशी रोमावळी दाटून आली होती तस काहीसं झालं’.(पृ.४४१)

**१.२.५.५. सत्तांतर :**

‘‘सत्तांतर’’तील वानर हा Presbytis Entellus- ‘हनुमान लंगूर’ आहे. (प्रस्तावना, सहा, सत्तांतर) श्रीरामाची सेना ही वानरसेना होती. त्यातील हनुमान हा श्रीरामाचा परमभक्त होता.

**१.२.५.६. झोंबी :**

रतनूच्या वडिलांना दहा-बारा मुले झाली. त्यात आठ मुलगे झाले पण ते लहानपणीच एक-दोन वर्षाचे होऊन मरत असत. त्यामुळे रतनूच्या आई-वडिलांचा संशय बळावत चालला होता की, भाऊबंधच मुलांना मारतात. रतनूच्या वडिलांचे सख्ये भाऊ व त्यांच्या बायका यांचे वाद होत असत. तेंव्हा या प्रसंगाला अनुरुप लेखक दाखला देतात, ‘‘त्यांचा बा मेल्यावर वाली-सुग्रीवासारखे एकमेकांत भांडू लागले.’’(पृ.२) लेखकाने वाली सुग्रीवाचा केलेला उल्लेख पौराणिक आहे.

**१.२.५.७. झाडाझडती :**

जांभळी या गावात काळूबाईचे मंदिर होते. त्या मंदिराविषयी दिगुआण्णा या गावच्या ब्राम्हणाच्या मुलाने माहिती सांगितली. जांभळी हे गाव प्राचीन आहे. नदीकाठी वसलेले. गावाला कूस आहे तसेच वेशीची कमान देखील आहे. काळूबाई तर गावाच्या आधीचीच असली पाहिजे. आधी देव उतरतो. मग गाव वसतो. सक्या गुरव सांगतो, ‘‘मुंबईची मुंबादेवी म्हणजे काळूबाईची पाठची बहीण. तिला राजा महाराजागात मुंबईत दिली आणि ही वनवाशी बहीण सह्याद्रीच्या दऱ्यात, वाघजाईच्या काठी गरीब गावाची राखण करीत राहिली.’’(पृ.११) गावामध्ये दिगुआण्णा व जाधवांनी वाडा बांधला तेव्हा वशा गुरवाच्या स्वप्नात काळूबाई आली. डोळ्यात पाणी आणून म्हणाली, ‘‘गुलामांनो, साऱ्यांनी वाडं बांधलं, माड्या बांधल्या. पर मी गाव सांभाळीत उनापावसात मरतीया माझ्या आडोशाचं बघाल का न्हाय?’’(पृ.११) वशा गुरवानं स्वप्नातच मंदिर बांधण्याचे

वचन दिले. वाडा बांधण्याचा शब्द दिला, पण पुढे आईने अट घातली की मंदिराच्या बांधकामाला दिवस मावळताना सुरुवात करायची व दिवस उगविण्यापूर्वी मंदिर बांधून झाले पाहिजे पण पुढे जेव्हा मंदिराचे काम हाती घेतले ते सूर्य उगविण्यापूर्वी झाले नाही म्हणून अर्धवट राहिले आणि त्यामुळे काळूबाई आता कोपणार असा जांभळीकरांचा समज झाला. ही कथा पौराणिक वाटते.

**१.२.५.८. राघववेळ :**

दगडू आपल्या मांग समाजाचे असलेले महत्त्वपूर्ण स्थान स्पष्ट करुन सांगतो. आपण पाटील व सरपंचापेक्षाही मोठे आहोत. कारण 'श्रीकिरणाचा गुरु मांगच होता नं?'(पृ.१०६)

''सांदीपन ऋषी व्हता न लेक हो''(पृ.७६)

''आसन काय? त्योच व्हता''

''पण सांदीपन मांग व्हता?''

''मंग? एऱ्हीच जुने जानते लोक 'उठल्या बरुबर मांगाचं तोंड पहाव' म्हणतात का?''

''हे बाकी खरे हो, बर का आबा, पण श्रीकिस्नानं मांगच गुरु काहून केला आसन म्हून?''

पायरुने शंका उपस्थित केली.

''लहानपणी त्यो गोकुळात व्हता. कंसाले त्याचा ठेपा लागला. त्योन किस्नदेवाले मारण्याचे नाना उपाय केले. एक तर किसन देव लहान, त्यात त्यो नंदाच्या घरी सांभाळाय दिलेला. यसूदेले आन् तिच्या नवऱ्याले घोरच लागला जनू. तेवढयात नारदमुनी आला तिथं, म्हणाला,'' ''किस्नाले सांदीपन ऋषीच्या आश्रमात नेऊन घाला. तिथ त्या पोर नाना इद्या शिकनं, मंगच मायबापाची सुटका करु शसकन त्यो, नाही तर कंस तुमच्यावर येयाचा चालून.''

''पण आबा, कंस का कोण, त्यो तर देवालेही भीत नव्हता. ऋषीले कसा भीत आसन त्यो.''

''आबेत्त, देव ऋषीमुनीले भीत व्हते. त्यो तर कंसच होता जाणून बुजुन. इस्वामित्रानं नाही का सर्गाचं राज्य घेऊ नाही म्हून इंद्ररनं मेनका, रंभा धाडल्या त्याच्याकडं?''

''हो वाटते.''

''नाही न बे दुसरीच कोणकात्रु धाडली न. मांघल्या शरावनातच तर पोथीत निंघले ते.''

''धाडलती काणी? कोणी बी धाडो. पण भीवूनच धाडली मातर''

''हो आबा, खरं हो तुमचं. पण त्यो सांदीपन मांग कसा काय? त्ये बी सांगा ना.''

''त्याचं काय हो लेकहो, सांदीपन राहायचा शिंदीच्या झाडात. आन् शिंदीच्या झाडाचं माहितपण कोणाले? मांगालेच कानी? मांगते का मांगाच शिंदीच्या झाडा बिगर? करता येतात फडे, टोपले, डाले, कणगे?''(पृ.७७) ''एका सांदीपन ऋषीलेच शिंदीचं माहितपण उमगले व्हतं. म्हनूच मांगले उमगलं ते. म्हूनच म्हणतो की, त्यो मांगचं व्हता म्हून.''(पृ.७८) अशा प्रकारे मातंग समाज हा समाजव्यवस्थेतील अतिशय महत्वाचा घटक आहे. त्याच्या पौराणिक दाखला लेखक देतो. तसेच मातंग समाजातील 'इनाईचा उत्सव' किती महत्वपूर्ण असतो, हे लेखक इनाईच्या कथेमधून कादंबरीच्या सत्राव्या भागातून वाचकांसमोर मांडतो. ''इनाई म्हणजे मांगांची गौरी! महालक्ष्मीच्या मुखवटयाची नवरात्रात मांगांची इनाई होते. इनाई सोबत असतो. तिचा नवरा शंकरदेव''(पृ.१३१) अशा प्रकारचा पौराणिक संदर्भ लेखकाने दिलेला आहे.

**१.२.५.९. ताम्रपट :**

स्वातंत्र्यासाठी नाना सिरुर आणि त्यांचे सहकारी भूमिगत चळवळीच्या माध्यमातून अनेक डावपेच आखीत होते. त्यांच्या सहकार्यामध्ये गुलबा नाईक व पांडुरंग तिकोने यांच्यासारखे कार्यकर्ते नानांचा शब्द प्राण मानून कार्य करणारे होते. गुलबा नाईक नानांविषयीचा आदर व्यक्त करतो. 'तुमचे सारके देवमानूस-तुमची सेवा करायला मिळती, हे आमचं गरिबाचं...' तेंव्हा पांडुरंग तिकोने याने दिलेली प्रतिक्रिया, ''वा वा! शाब्बास रामभक्त हनुमान! शाब्बास'' म्हणजेच नानासाहेब राम व गुलबा हनुमान या पौराणिक दाखला देऊन नाना व गुलबा यांच्यातील नाते स्पष्ट केले आहे. रामायणातील हा उल्लेख कादंबरीत पौराणिकतेच्या अंगाने आला आहे.

**१.२.५.१०. तणकट :**

'गो ब्राम्हण प्रतिपालक' ही उपाधी शिवाजी महाराज कधीही लावत नव्हते. नंतरच्या काळात ब्राम्हणांनी स्वार्थासाठी ती घुसडलेली उपाधी आहे. असे ब्राम्हण जातीविषयी प्रा.नसलापूरे इतिहासाच्या तासाला सांगत असतं. थोडक्यात ब्राम्हण हया जातीचा उल्लेख अगर पगडा आपल्यावर पुराण ग्रंथातून, पौराणिकतेतून म्हणजेच पुराण काळापासून आजपर्यंत चालत आलेला आहे.

**१.२.५.११. डांगोरा एका नगरीचा :**

सिद्धमठाच्या बनात असलेल्या आडावर औदुंबराचे झाड होतं. मागे कधी हरिद्वारहून आलेल्या एका साधूनं तिथं यज्ञ केला, अशी आख्यायिका होती.(पृ.१२६) राजधानीवरील संकट

निवारण्याचे उपाय राणी साहेबांनी आपल्या परीने चालवले होते. शनि महात्म्याचं पारायणामागून पारायण. शिवाला रुद्राभिषेक, सप्तशक्तीचे पाठ. केशवभटांच्या पौरोहित्याखाली ब्राम्हण मंडळींनी कंबर कसली होती. राणी साहेबांच्या इच्छेचं त्यांना भक्कम अधिष्ठान होतं. पंढरीने गेल्या वर्षभरात 'रामविजय' एवढया हुरुपानं त्यानं वाचून दाखविला होता. त्यावेळी देसायांनी कितीतरी जणांसमोर त्याला नावाजले होते.(पृ.२८८) हा पौराणिकतेचा संदर्भ देऊन लेखकाला त्याकाळात पौराणिक ग्रंथाचे वाचन होत होते. ते पुण्यप्राप्तीसाठीचे हे सुचकत्व स्पष्ट करावयाचे आहे. जयंत मेढेकराच्या हाकेसरशी नारायण देशपांडे कोल्हापुराहून धावून आला. त्यामागे मित्रप्रेम होतं, तशी अन्यायाविरुद्ध दंड थोपाटण्याची बेदरकारी होती. हे स्पष्ट करण्यासाठी लेखक पुढील पौराणिक दाखला देतो. 'लक्ष्मणाला शक्ती लागली. तो मुर्च्छित झाला. त्याचे प्राण वाचवायला कराव्या लागणाऱ्या धाडसात स्वतःला झोकून घ्यायला एकच वीर रामसेनेत सिद्ध झाला. इतर अनेक महाबली खाली मान घालून उभे होते.'(पृ.३७०) शमी वृक्षाची शस्त्र अर्जुनानं याचदिवशी काढून पाजळली तशा प्रकारची साक्ष उदयापासून सुरु होणार म्हणून पौराणिकतेचा पुढील दाखला मेढेकर आईसाहेबांना (जिजीला) देतात. त्यावर आईसाहेब म्हणतात, ''खरं रे बाबा! तुला काय वाटतयं, माझ्या लेकाला या खटल्यातून इजा पोहचेल म्हणून मी खचून चाललेयं? मुळीच नाही बरं. या दिव्यातून खंडेराय त्याला सहीसलामत उजळून नेणार असचं माझं मन सांगतयं.''(पृ.३९९) असा एक पौराणिकतेचा दाखला लेखक देतो. पोलिसांच्या अड्डयात, खुद्द चावडीवर शंभूराव जाधवांचा, ''ज्योतीप्रकाश'' चोरुन वाचला जात होता. सरसकट शिपाई दल जाधवरावांच्या टिकेचा विषय नव्हतेच. साईखेडामधील पोलीसप्रमुख आणि गणंक शिरजोर झाले होते. त्याविषयी लेखक पुराणातील दाखला उदाहरण म्हणून देतात. ''कंस आणि हिरण्यकश्यपू पुराणतच असतात, असे नाही.''(पृ.४२८) तर आजच्या काळातही वाईट कृती करणारे शिरजोर झालेले आहेत. अशा प्रकारचे विविध दाखले संपूर्ण कादंबरीत जागोजागी आलेले दिसून येतात.

**१.२.५.१२. बारोमास :**

सोनेरी टोळीला भरपूर साजश्रृंगार केलेल्या लावण्यावतीचे शिल्प सापडले ते शिल्प बरचसे कोड्यात टाकणारे होते. वरच्या बाजूला स्त्रीचा हात खांद्यापासून कोपरापर्यंत मोडलेला होता. मनगटात भरगच्च बांगड्या हाताच्या वरच्या भागात उगवत्या सूर्याची, खालच्या भागात अगदी तळाशी उधळलेला घोडा आणि उजव्या हाती भाला घेऊन समोरच्या शत्रूवर चाल करुन जाणारा घोडेस्वार असे ते शिल्प होते. मूर्तीबद्दल एकनाथाने आईला विचारले तेव्हा ती सतीदेवता आहे

असे समजले होते. पूर्वीच्या काळी स्मशानात लोकांना चितेवर जाळलं जायचं त्यांच्या बायका सती जायच्या, त्यांची ती देवता. वटसावित्रीच्या दिवशी बायका वडासोबत त्या शिल्पाची पूजा करतात.(पृ.१७९) सतीदेवतेचा पौराणिक संदर्भ येथे आलेला आहे. वटसावित्रीचा व वडाचा हा पौराणीक संदर्भ येथे घेतला आहे.

### १.२.५.१३. भूमी :

भूमी या कादंबरीत लेखिकेने सीता व द्रौपदी ह्या दोन परस्परविरोधी व्यक्तिरेखा आहेत हे स्पष्ट केले. रामासारख्या पुरूषोत्तमाची पत्नी सीता हिचं तेज रामाने झाकाळून टाकले. रामाचाच संदर्भ घेऊन ती वावरली तिचे स्वतंत्र असे व्यक्तिमत्व नव्हते कारण रामायण कर्ता वाल्मिकी एक पुरूष होऊनच तिला बघतो, मापतो परंतु द्रौपदीला व्यासांनी कालातीत असे पाहिले. 'नवऱ्याच्या बरोबर वनवासात जातानाही पावलं तिची स्वतःचीच आहेत.' सीता व द्रौपदी यांचा पौराणिक संदर्भ घेऊन लेखिकेने भूमी या कादंबरीतील व्यक्तिरेखा रेखाटल्या आहेत.

### १.२.५.१४. उत्सुकतेने मी झोपलो :

विधुर म्हातारा आतेबहिणीच्या घरुन जेवून निघतो, त्यावेळी त्याच्या मनात एक पेच निर्माण होतो. तो आपल्या जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. 'पेच-अर्थ... जीवनाचा अर्थ पेचातच असतो, वाटते, अर्जुनाला नातेवाईकांना कसे मारु हा पेच पडला न् कृष्णाने अर्थ सांगितला... आठवत होता. पेचात नुस्ता संभ्रम नसतो. वेदना असते.'(पृ.१५७) अशा प्रकारचा महाभारतातील पौराणिक संदर्भ लेखक घेतो. विधुर म्हातारा रामकथा ऐकतो. ज्येष्ठांबरोबर गणपतीला जातो. त्याच्या मनात एक विचार आला. 'आंबाबाई आमचे कुलदैवत. तरी आई दत्ताची पूजा करायची, तिची दत्तात्रय आवड, भक्ती. दत्तात्रय म्हणजे तिन तोंडे. राम, कृष्ण, शंकर, देवी, नवीन देव कसा असेल?' असा प्रकारचा प्रश्न विधुर म्हाताऱ्याला पडतो. पुराण काळात देव निर्माण झाले, त्यानंतर नाहीच. अशा प्रकारचा पौराणिकतेचा उल्लेख लेखकाने प्रस्तुत कादंबरीतील आलेला आहे.

### १.२.५.१५. खारीच्या वाटा :

लेखकाचा मित्र दौलतीने नदीपलीकडे असलेल्या उंच डोंगराची कथा सांगितली आहे. दौलतीला ती गोष्ट त्याच्या आजोबांनी सांगितली होती. ''एकदा राम -लक्ष्मण आणि सीता ह्या भाागातून हिंडत होते. हिंडता हिंडता सांज झाली. रामानं ठरवलं की याच डोंगरावर मुक्काम करू

या वर लक्ष्मण म्हणाला की, इथं आपण किल्ला बांधू रामानं होकार भरला पण एक अट घातली. किल्ला एका रात्रीतच बांधून झाला पाहिजे. कोंबडा आरवायच्या आत म्हणजेच पहाटेपूर्वी काम संपायला हवे. दोघेही कामाला लागले. पण कसा कोण जाणे अचानक मध्यरात्रीच त्या गावातला कोंबडा आरवला. राम-लक्ष्मणाने लगेच काम थांबवलं. तिथून निघून गेले. तेव्हापासून हा किल्ला असाच राहिला. अर्धवट बांधून झालाच नाही.(पृ.३०) अशा प्रकारचा पौराणिक संदर्भ कादंबरीत येतो.

**१.२.५.१६. फेसाटी :**

प्रत्येक परिसरात असलेल्या दैवतांची कथा ही वैशिष्ट्यपूर्ण असते. लेखकानेही कादंबरीच्या ओघात एक कथा सांगितली. बिळानसिद्धाला दोन मुली एक कनुबाई व दुसरी कोणत्याव्वा. एकदा कनुबाई गरोदर असताना बिळनसिद्ध मुलीला आणायला उमदीला गेला. येताना कनुबाईला घोड्यावर बसविले व रस्त्याने गोष्ट सांगू लागला. त्याच्या असे लक्षात आले कनुबाई झोपली पण तिच्या पोटातून हुंकार ऐकू येऊ लागले. बिळानसिद्धाने कजुबाईला घोड्यावरुन ढकलून दिले व तिला तेथेच सोडून तो निघून गेला. घोड्यावरून पडल्यामुळे मुलं एकीकडे व कनुबाई एकीकडे पडली तेव्हापासून बिळान सिद्ध व मलकारासिद्ध यांची भेट होत नाही. दिवस उगवल्यावर गुराख्यांना कुनूबाई व तिचे बाळ दिसले. त्यांनी मायलेकरांना बोबलदमध्ये आणले. त्याठिकाणी कनूबाई बहीण कोणत्याव्वा रहात होती. ती मायलेकरांना घरात घेऊन आली. मायलेकरांना आंघोळ घातली. पाचवीच्या दिवशी घर सारवलं. कनुबाईला जेवायला घातले. मुलाला पाळण्यात झोपवलं. ती धुण धुवायला गेली. तो पर्यंत पाळण्यातलं हे बाळ सोन्याचा चेंडू घेऊन खेळायला गेले. कोणत्याव्वा माघारी आली बघते तर पाळण्यात मुल नाही. कनुबाई तर गप्पगार झाली. कोणत्याव्वा गावात विचारत सुटली. पाच दिवसाच बाळ पाळण्याच्या बाहेर कसं येईल असं वाटून लोकं तिला हसत होते. तेव्हा तिला मलकारसिद्ध रडताना दिसला. मलकारसिद्ध म्हणाला, 'मावशी माझा सोन्याचा चेंडू पोरांनी घेटलाय, अन् पटकाराचा चेंडू मला दिलाय तबक'(पृ.२२) तेव्हा कोणत्याव्वा त्याची समजूत काढत होती. तिच्या स्तानातून दूधाच्या धारा चालू झाल्या तेव्हा कनुबाईने कोणत्याव्वाला बाजेवर मलव्वरसिद्धा जवळ बसविले. मलकारसिद्ध मावशीचेच दूध पिऊ लागला. मावशीला आई म्हणू लागला. तवापासनं मलकारसिद्धाचं खेळणं चालू झालं. मलकारसिद्धाच्या भेटीला कुचनूर महादेवाप्पा, अरकेरी अमुखसिद्ध, धुळक्याडचा

रेवनसिद्ध अन मलकारसिद्धाचा बा रायप्पा गौडी ही उमदीत भेटीला येत्याती. भेट झाल्यावर दुसऱ्या दिवशी पहाटं मलकारसिद्ध खेळतो.

देव खेळताना सात मीटर पांढर धोतराचं कापड पुजारीच्या तोंडाला बांधायचं मग वरुन देवाचा मुकूट घालायचा. मग पुजारी उजव्या हातात शेलाचा वरा पदर धरुन अन् डाव्या हातात धरुन कोणत्याव्वाच्या लुगड्याचा पदरावर खेळतो. खेळताना दुसरा पुजारी मुकूटाला वारा घालतो. ढोल व बासरीच्या तालावर देव खेळतो. खेळून झाल्यावर पुजारी उजवीकडनं डावीकडं लिंबू टाकतो. लेखकाचे धनगर कुटुंब हे प्रामुख्याने पशुपालन आणि शेती यावर उदरनिर्वाह करणारे होते.

**१.२.६. कृषीजीवन :**

**१.२.६.१. रथचक्र :**

'रथचक्र' ही कोकणातील ब्राह्मण कुटुंबावर आधारलेली कादंबरी आहे. 'लखनौवाल्याला कलमांची नवी लागवड मधल्यान दाखवली.(पृ.२१) संपूर्ण कादंबरीत फक्त एवढाच उल्लेख कृषी व शेतीसंबंधी आला आहे.

**१.२.६.२. स्मरणगाथा :**

लेखकाची अखंड भटकंती चालू होती. त्यामुळे विविध प्रांतातील कृषीजीवनाचा उल्लेख कादंबरीत आला आहे. लेखकाचे मूळ गाव गुडघे म्हणजे कोकणातले होते. तसेच लेखकाच्या आईचे माहेर दिवेआगार हे होते. तेव्हा आई-वडिलांशी गप्पा मारताना त्यांना कोकणातील फुला-फळांविषयी ऐकायला मिळाले होते. 'तिथे उंडीच्या फुलांचे घोसच्या घोस होते. केतकीची बन होती. पाण्याचे पाट होते तरी कुणालाही तिथ मोटा हाकाव्या लागत नव्हत्या. देवाघरचे पाणी, बारा मास तेरा काळ वाहात असायचे हवं तितकं वापरा, हवं तितक नासा.'(पृ.२८) 'तिथे केळीच्या बागा होत्या, आमसुलाची झाडे होती, महाळुंग, फणस, ईडलिंबू, असं काय काय अन् काय काय?'(पृ.२८)

लेखक स्वतः कोकणात कुटुंबासोबत गेला तेव्हा त्याने शब्दबद्ध केलेला कोकण, ''छे छे! कोकण माझ्या अगदी कल्पनेपलिकडलं होतं. अशी उंच उंच झाडं, असे माड, अशा पोपळी, असे साग, असे मुचकुंद, अशी महाळुंग, अशी फुलझाडं! मी तर नंदनवनातच होतो.''(पृ.३५) वरील वर्णनातून कोकणातील फळफळांवर व फुलझाडांवर कृषीजीवन आधारलेले होते, याची वाचकाला कल्पना देते.

लेखकाचे बालपण वऱ्हाडात गेले. 'वऱ्हाडात हवे तितके ज्वारीचे धांडे. कापसाची अन् गव्हाची रोपं. पण उंचच्या उंच झाड काही तिथं नव्हती.'(पृ.२७) या लेखकाच्या आईने केलेल्या निवेदनातून वऱ्हाडातील पिकांविषयी माहिती मिळते. लेखक अकोल्याला गणपतराव जोशी यांच्या घरी राहत होता. गणपतराव बाबा बटईने शेती करुन घ्यायचे. लेखकही गणपतराव बाबांनी आणलेला विळा घेऊन बाजरी कापायला गेला होता. हरभऱ्याचा पेराही करायला याने मदत केली. ओंब्यावर आलेल्या हरभऱ्याची राखणही त्यांनी केली. खळ्यामध्ये बाजरीची मोडणी, तिड्याभोवती पात चालवणे. उफणणं या सर्व कृतींमध्ये लेखकाला सर्कत्याने प्रवीण केले.(पृ.१५८, १६०, १६१) अशाप्रकारे विविध प्रदेशातील कृषीजीवनावर स्वानुभवाने लेखकाने प्रकाश टाकला आहे. त्यामध्ये कोकणातील फळ, फुले, उंचच उंच झाडे, बागा यातून कृषीजीवन साकारलेले दिसते. वऱ्हाडातील ज्वारी, कापूस, गहू, बाजरी, हरभरा तसेच बटई, राखण, मोडणी, उफणणं, पात चालवणे, ह्या कृषीजीवनाशी निगडीत बाबींचा अनुभव लेखकाने घेतला होता.

**१.२.६.३. झोंबी :**

कोल्हापूर जिल्ह्यात कागलसारख्या खेडेगावात लेखकाचा जन्म झाला होता. गावातील अर्थव्यवस्था शेतीवर आधारित होती. गावातील बहुसंख्य लोक शेतीव्यवसाय करीत होते. रतनूचे वडील 'गावात मिळेल त्याची पाच-सात एकरांची जमीन तो फाळ्यानं करायचा. त्यातच ऊस, माळवं, मिरची, गहू-हरभरा पिकवायचा'(पृ.३) लेखकाचे आजी-आजोबा वारल्यानंतर वडीलही शेतीच करीत होते. देसायांचा मळा, बाळुगडीचा मळा आणि त्यानंतर भटाचा मळा वडिलांनी फाळ्यानी घेतला होता. ऊसाचे पीक, कोथंबीर, दोडके,भेंड्या, दिडक्या ही पीके घेतली जात होती. माळवं म्हणजे भाजीपाला. शेतीतील भाजीपाला बाजारात नेऊन-विकून कुटुंबासाठी लागणारे तेल-मीठ आणले जात होते.

आनंदला शेतीची बरीच कामे करावी लागत होती. पेरणी करणे, पिकाला पाणी देणे, वैरण कापणे, धान्य करताना खळ्यातील सर्व कामे करणे इत्यादी प्रकारची शेतीची कामे करून लेखक कुटुंबाला मदत करीत होता. लेखकाची आई तारा व आनंद यांना शेतात काबाडकष्ट करावे लागत होते. झोंबी कादंबरीच्या कथानकाचा पायाच शेतीवर आधारित आहे. आनंदच्या कुटुंबाच्या निमित्ताने शेती व्यवसायातील विविध अडीअडीचणी वाचकांना समजतात. शेतात सर्व लहान-मोठ्यांनी राब-राब राबून त्यांच्या कुटुंबाला पोटभर अन्नदेखील मिळत नाही ही व्यथा लेखकाने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आपला पिढीजात व्यवसाय करणे हे आपले परमकर्तव्य आहे आणि

कर्तव्य पार पाडण्यातच लेखकाचे वडील धन्यता मानतात. कुणब्याच्या मुलाने शेतीच केली पाहीजे अशा धारणेचा समाजाच्या मनावर असलेला पगडा रतनूच्या व्यक्तिरेखेतून स्पष्ट होतो.

**१.२.६.४. झाडाझडती :**

ग्रामीण जीवनाच्या अर्थव्यवस्थेचा पाया शेती हा आहे. जांभळीची खलाटीची जमीन शेलकी. माणूस पेरला तरी तो उगवावा अशा पोताची. पेरुच्या झाडाला इतकी फळं लागतात की फांद्या मोडून पडतात. केळीचे घड बळकट मेंढ्यांनादेखील आवरत नाहीत. जांभळीकर त्यांचा माल आंबेपूरला किंवा पुण्याला देखील नेतात.(पृ.१३,१४) जांभळी धरण हे आंबेपूर तालुक्यातील दुष्काळग्रस्त भागातील लोकांसाठी खासदार शिंगाड्यांच्या प्रयत्नातून सुरु झाले. बिचाऱ्या जांभळीकरांना आपल्या सोन्यासारख्या जमिनींना मुकावे लागले व खैरापूरला पडीक जमिनी घ्याव्या लागल्या पण या भूमीच्या पुतांनी घाम गाळून त्या बरड जमिनींना देखील अंकुर फोडले. खैरापूरला धरणाच्या पाण्यामुळे ऊस पेरला जाऊ लागला त्यावर खासदार शिंगाडेच्या मुलाचा सर्जेरावाचा साखर कारखाना उदयाला आला. ह्या कादंबरीतील बहुतांशी कुटुंबही शेतीवरच अवलंबून असलेली दिसतात.

**१.२.६.५. राघववेळ :**

पंडितराव देशमुखांची आंबराई राखायला गजरीने घेतली होती. ''गजरी रोज सकाळी उठायची. बबन नाहीतर पंजाब तिची दुपारची शिदोरी घेऊन यायचे. मुक्ता, कौशी कधी फणाला, पऱ्हाटया उपटायला जायच्या.''(पृ.२५०) वालंबी इतरांसारखी शेतातून अंबाडीची भाजी आणू लागली.(पृ.१) विचार करीत तिने नाला ओलांडला. त्या काठच्या पांडुरंग पाटलाच्या शेतात शिरली. शेतातून फसाकऽऽ फसाकऽऽ चालत तिने अंबाडीची पाने ओरबडली.(पृ.२) आपल्या लेकरांना वालंबीने फक्त पिठाअभावी भाजीच खाऊ घातलेली होती.

**१.२.६.६. ताम्रपट :**

ताम्रपट या कादंबरीचे नायक तुकाराम भोईटे पाटील व बापूसाहेब देशमुख हे शेतकरी कुटुंबात जन्मलेले होते. तुकाराम भोईटे पाटील यांनी स्वातंत्र्य सैनिक म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी लढा दिला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते आपल्या गावी जोमाने शेतीची कामे करीत होते. त्या परिसरात ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जात होते. परिसरात एकच ऊसाचा कारखाना होता आणखी एखादा साखर कारखाना काढण्यासाठी त्यांनी यशवंतरावांची भेट

घेतली व त्या भेटीचे पुनर्वसन म्हणजे पुढे भोईटे पाटील राजकारणात उतरले. तुकारामदादा खासदार झाल्यानंतरही त्यांची पत्नी शेतीची कामे करण्यात अग्रणी होती. आपल्या पत्नीने आता शेतीची कामे करू नयेत असे मत जेव्हा दादासाहेब मांडतात तेव्हा त्यांची पत्नी गोदाबाई म्हणतात, 'आपण शेतकऱ्याची जात उधामाधा करण्याचा आपला धर्म नायी. बापूसाहेब देशमुख हे देखील शेतकरी कुटुंबात जन्मले होते. बापूसाहेब देशमुख जेव्हा मंत्रीपदावरून पायउतारा झाले तेव्हा बापूसाहेबांनी तीन एकराची द्राक्षाची बाग लावली होती. वरील दोन्ही उदाहरणावरून असे लक्षात येते की, राजकारणातील उच्चपदस्त व्यक्तींची नाळ शेतीशी जोडली गेलेली असल्याने ते शेती करण्यात धन्यता मानतात.

**१.२.६.७. तणकट :**

प्रस्तुत कादंबरीमध्ये कृषीजीवनाचे चित्रण जागोजागी आलेले आहे. गावगाड्यातील लोकांच्या उदरनिर्वाहाचा केंद्रबिंदूच मुळात शेती व्यवसाय आहे. महार समाजातील लोक गावातील लोकांच्या शेतावर राबताना दिसले. रामा महार आबा पाटलाच्या शेतावर कष्ट करीत होता. 'रामा महार शेतावर असला की इकडची काडी तिकडं व्हायची नाही. त्यामुळे आबा पाटलाने हा मळा जवळजवळ रामाच्या नावावरच करुन टाकला होता.'(पृ.४१) एवढा विश्वास रामा महाराने संपादन केला होता.

'पावसानं उघडीप दिल्यामुळ गावात माणसांची नुसती झुंबड उडाली होती. माणसाला माणूस मिळत नव्हतं. कुणाची राहिलेली शेतं पेरायची होती, तर उगवून आलेल्या भाताला एखादी कोळपणी मिळते का, याची घाई लागली होती.'(पृ.१४६) अशाप्रकारे वरील निवेदनातून पेरणी, कोळपणी ह्या शेतीशी संबंधीत कृषीजीवनाचा प्रत्यय येतो. कृषीजीवनावर आधारलेला समाज कादंबरीत दिसतो. बलुतेदारी पद्धतीचा अवलंब होत असल्याचा प्रत्यय येतो.

**१.२.६.८. डांगोरा एका नगरीचा :**

शेतीचे उत्पन्न वाढावे यावर रघुवीर सिंहाचा कटाक्ष होता. माझ्या राज्यातली जमीन सोनं पिकवते, नदी-नाले आणि तळी यांच्या काठाला वनराया पोसतात. (पृ.७४) करारी स्वभावाचा मुरारी फौजदाराला म्हणतो, 'साहेब, अशा नोकरीवर लाथ मारुन घरी बसेन मी. वीस एकरांचा मळा आहे करुणेच्या काठाला.' साईखेड संस्थानचे नायब मामलेदार आणि रयत कल्याण अधिकारी वर्षअखेरची खेडोपाडीची जमावबंदीची फिरती संपवून राजधानीला येत.(पृ.२५६) साईखेड संस्थानाच्या मालकीच्या विस्तीर्ण माळजमीनी, चराईची गवतकुरण, दोनदोन विहिरी

असलेले प्रसन्न शेतमळे आणि फळबागा, तिथली लहान-मोठी बांधकामं, त्यात पडलेली अवजारं, भांडीकुंडी. गाईगुरांची खिल्लारं, घाड्यांची तबेले, उंटखाना(पृ.३६०) वरील बाबीवरुन आपणास असे लक्षात येते की, साईखेड संस्थानात कृषी जीवनाला महत्वाचे स्थान होते.

**१.२.६.९. बारोमास :**

कृषीजीवन हा भारतीय समाजव्यवस्थेचा पाया आहे. एकनाथ आणि त्याचे कुटुंब प्रातिनिधीक स्वरुपात घेऊन भारतीय शेतकऱ्याचे सर्वांगीण चित्रण लेखकाने केले आहे. लेखकाचे आजोबा पारंपरिक शेतीला महत्व देत होते. भरघोस पिकाच्या हव्यासापोटी काळया आईवर त्यांना अत्याचार नको होते. शेतीवर अपार प्रेम करणारा शेतकरी म्हणजे नानू आज्या होता. निसर्ग आपल्या लहरीपणाने शेतकरी व्यवसायावर निरनिराळी संकटे आणतो. कधी दुष्काळामुळे पीक करपून जाते तर कधी अतिवृष्टीमुळे हातातोंडाशी आलेल्या पिकाचे नुकसान होते. त्यामुळे शेतकरी नेहमी कर्जाच्या ओझ्याखाली दबतो. दिनकर दाभाडे व तेजराव खपके यांच्यामध्ये मोलमजूरी करणारा मजूर सुखी की शेतकरी सुखी? या चर्चेत मांडलेले मत, ''मजुरानं सुखी रहावं त्याले आमचा आजेबात इरोध नाई. पण कास्तकार? त्यांच काय? त्योबीत सुखी पाहयजे न? पण त्यो हामेशा लाचार, भिकारी, कर्जबाजारी. पेरणीपासून त मालाच्या इक्रीलोक याचा हात पुढीचं भीक मांगायले. आपल्या देशातल्या शेतकऱ्यात अन् भिकाऱ्यात काईच फरक राहयला नाई आता... त्याची पोरं उदास. त्याची बायको उदास. त्याचं घर भकास.''(पृ.१८८) हीच व्यथा शेतकऱ्याची आहे. हे एकनाथसारख्या शेतकरी कुटुंबात आहे, असे दिसते.

**१.२.६.१०. उत्सुकतेने मी झोपलो :**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचे एक मंडळ युरोपला गेले होते, त्यात माधुरीचे वडील होते.(पृ.७) अमरावतीच्या शेतकरी कुटुंबातील माधुरी पुण्याला आल्यानंतर जीन पॅन्ट व टी शर्टही घालते.(पृ.६) सुबोधशी माधुरीचे लग्न ठरले. नवऱ्यामुलाकडची मोठी बागायती शेती होती.(पृ.१७) रिसेप्शनसाठी तीन एकराच्या मैदानात तट घातला होता.(पृ.२३) सुबोधचा भाऊ द्राक्ष निर्यातीसंबंधात आठ दिवस दिल्लीला गेला.(पृ.३५) वरील प्रकारचे कृषीजीवन विषयक संदर्भ कादंबरीत आलेले आहेत.(पृ.२३) तसेच द्राक्ष निर्यातीचा सीझन सुरु झाला की सुबोधचा भाऊ मुंबईला जाऊन दिवसाआड परत माघारी घरी येऊन जात असे. ह्या वर्षी मात्र तो मुंबईला अडकला होता. त्याला दुसरे एक कारण होते. मुंबई ह्या देशाच्या आर्थिक राजधानीत महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा वावर वाढला पाहिजे. म्हणून महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांना मुंबईत

स्वस्तात फ्लॅट द्यायचे. अशी योजना महाराष्ट्र शासनाने आखली होती. सुबोधचा भाऊ फ्लॅट मिळविण्यातही गुंतला होता. ''फार कॉंपिटिशन आहेय. महाराष्ट्रातील सगळे शेतकरी इथे मुंबईत ठाण मांडून बसलेत. निर्णय मुख्यमंत्र्यांकडे आहेय. गृहमंत्र्यांचे न् मुख्यमंत्र्याचे नीट नाहीयं.'' सुबोधचा भाऊ फोनवरुन सुबोधला म्हणाला. ''तरी मी फ्लॅटच जुळवणार. जुहूतच फ्लॅट मिळवणार.'' ''जुहूतच हवाय आपल्याला, काहीही करुन मिळवं. मी इकडचं सगळ बघतोय. तू काळजी करु नकोस, मुंबई सोडू नकोस.'' सुबोध भावाला सांगायचा. ''जुळवतोच बघ.'' सुबोधला सगळं बघावचं लागतं होतं. द्राक्षतोडणी, वर्गीकरण, पेट्या, लेबलिंग शिवाय पेट्रोलपंपाची देखरेख... सुबोध सकाळी सहाला घराबाहेर पडायचा ते रात्री यायचा.(पृ.४७) अशाप्रकारे मोठ्या बागाईतदार, श्रीमंत शेतकऱ्यांच्या कृषीजीवनाचा उल्लेख कादंबरीत आलेला आहे. मनोहरांच्या कादंबरीतील कुटुंबे ही श्रीमंत आहेत. तसेच ही कुटुंबे ऐश्वर्यात जीवन जगणारी वाटतात. तो जरी शेतकरी कुटुंबातील असला तरी तो श्रीमंत शेतकरी आहे.

**१.२.६.११. खारीच्या वाटा :**

लेखक, त्याचा मित्र दिनू व लुकी आंब्याच्या शोधार्थ भटकंती करतात तेव्हा आंब्याच्या विविध जातींची ओळख लेखकाने करून दिली. लालभडक शेंदऱ्या, खोबऱ्या की ज्याची कैरी खोबऱ्यागत लागते. खापरागत जाड साल असलेला व लुसलुशीत गर ठासून भरलेला 'खापऱ्या', नावडता 'पुंगशा', साखरेची गोडी असलेला गरगरीत वाटोळा 'गाडग्या'. ह्या आंब्याच्या विविध प्रकारच्या झाडांचा उल्लेख लेखकाने कृषीजीवनाच्या पार्श्वभूमीवर केला आहे.

भात आणि नाचणी ही दोन महत्त्वाची पीके होती. खलाटीच्या सपाटीला भात तर डोंगर उताराला नाचणी होई. दुसऱ्या वर्षी नाचणीच्या बिवडात वरई पेरायची. वरईच पीक काढताना बैलाचे कष्ट घेतले जात नसत. शेतकरी स्वतःच कष्ट करून हे पीक काढत असे. ह्याच वरईच्या बिवडात पुढल्या साली सावा हे बाजरीसारखे दिसणारे तृणधान्य घेतले जाई. तसेच कारळे तेलासाठीचे पीकही घेतले जात असे. पावटा, हरभरा, मूग, चवळी, उडीद, हुलगा ही कडधान्ये भातकाढणी झाली की लगेच त्यांचा पेरा होई. जमिनीतल्या ओलीवर आणि पहाटेच्या दवावर ती पोसली जात.(पृ.१११, ११२) भात, नाचणी, वरई, कारळं तसेच अनेक कडधान्य शेतातून पिकविण्यासाठी शेतकरी व बैलाचे कष्ट याचे चित्रण कृषी जीवनाच्या पार्श्वभूमीवर लेखक करतो.

शेंडवेल, घोटवेल यांचा भाजीसाठी वापर केला जात असे. करटोली व वाघाटीचे वेल तसेच उभ्या कड्याच्या कपचीत, वाहत्या पाण्याच्या ओहळाजवळ कुळवीची लांबडी, वातेरी

पानांचा भाजीची चव न्यारीच होती. रानोमाळ उगवणाऱ्या कुर्डूची भाजी खाल्ली नाही असा एकही माणूस मिळणार नाही असे लेखकाचे मत होते. उन्हाळ्यात आंबा, फणस, तोरण, करवंद, आळू असा रानमेवा मिळत असे. शेतीची कामे संपल्यानंतर हिरडेवेचणीच्या कामाला लोक सुरूवात करीत. वरील वर्णनावरून कादंबरीत लेखकाने परिसरात घेतल्या जाणाऱ्या पिकांचा, रानमेव्याचा आढावा घेतला आहे, तसेच विविध कडधान्य, फळे, पालेभाज्या या साऱ्या गोष्टींचे वर्णन कृषीजीवनाच्या पार्श्वभूमीवर लेखक करतो.

**१.२.६.१२. फेसाटी :**

सांगली जिल्ह्यातील प्रमुख पीक ज्वारी आहे. नाथाच्या शेतात ज्वारी, कापूस, ऊस, मटकी, हुलगा ही पीके घेतल्याचा उल्लेख आलेला आहे. कधी अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले तर कधी अनावृष्टी मुळे शेतकऱ्याचे नुकसान झाले. उन्हाळा संपून पावसाळा चालू झाला. रान नांगरून ठेवली होती. 'बारा महिनं दुष्काळनं अन् आता ह्या पावसानं ऊगदीश आणून ठिवला हुता.'(पृ.१२९) काकाने पैसे उचल घेऊन ऊस लावला. तळ्याच्या पाण्यावर ऊस तरारुन उगवला. चार महिन्याने तळ्याचे पाणी बंद केलं. ऊस वाळू लागला. शेतात विहिर नव्हती त्यामुळे हाता तोंडाशी आलेला घास मातीत पडला.(पृ.१३२) पाऊस नसल्यामुळे सगळी रानं उघडी नागडी दिसत होती.

कित्येक वर्षातून तांबड्या रानात मटकी, हुलगे, बाजरी पेरली पावसाची रिमझिम चालू झाली होती बी काळ्या आईच्या पोटात दडून बसली. आठदहा दिवसातच नवं अंकुर पोटातनं बाहेर आले. काकाच्या त्वांडावर येक येगळीच चमक दिसत होती. एक दिवस चुलत्यानं कोंबड्या मुद्दाम रानात हाणल्या. एकरभर रानात कोवळे कोंब ही न फुटलेले दाने कोंबड्यांनी उकरुन खाल्ले. कोंबड्यांना हाणायला गेल्यावर भांडणाला सुरुवात झाली. चुलता सतत फक्त त्रासच द्यायचा. एकदा काकाने कापसाचं पीक घेतलं. पीक चांगल आले होते. कुणीतरी कापूस पेटवून दिला होता. त्यात पाण्यासाठी टाकलेला पाईप पेटवून दिला. लिंबाची, फिरंगीची, तरवडाची, चंदनाची झाडं हाय लागून निम्मी आर्धी जळली होती. कापसाला हाय लागून पट्टाभर कापूस सुकला होता. काका हा प्रातिनिधीक स्वरुपातील शेतकरी उभा करुन लेखकाने शेतात राबराब राबूनही शेतकऱ्याच्या वाट्याला फक्त नैराश्यच येत होते. याचे कृषीजिवनाच्या पार्श्वभूमीवर लेखक चित्रण करतो. शेत घेण्यासाठी कर्ज, पीकासाठी कर्ज आणि ते घेतलेले कर्ज फेडण्यासाठी तेच घेतलेले शेत शेवटी नाइलाजास्तव विकणे असे दुःख शेतकऱ्यांच्या भाळी लिहिले आहे.

### १.२.७. बंडखोरी :

माणूस एकमेकांविषयीचा राग, द्वेष, मोह, मत्सर आपल्या बंडखोर प्रवृत्तीतून व्यक्त करीत असतो. तो त्याचा एक मानसिक गुणधर्म आहे. समाजात स्वार्थासाठी एकमेकांवर कुरघोडी करुन बंडखोर प्रवृत्तीने वागणारे अनेक माणसे असतात. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील बंडखोर व्यक्तींचा उदाहरणादाखल येथे विचार केला आहे.

#### १.२.७.१. ययाति :

नहुष महाराजांच्या मृत्यूच्या समयी त्यांची पत्नी म्हणजेच ययातिची आई दुःखी होती. त्यांच्या मृत्युनंतर थोड्याच दिवसात तिने घरची-बाहेरची सूत्रे हाती घेतली. एखाद्या तरुणीप्रमाणे प्रत्येक गोष्टीत ती मनपूर्वक रस घेत होती. याचे कारण म्हणजे- ययातिचे बाबा इंद्राणीच्या मोहात पडले तेव्हा तिला फार मनस्ताप झाला होता. थोर पुरुषाची पत्नी होणे व त्याची आपल्या वरील मर्जी जाणार नाही याची तिला काळजी घ्यावी लागली होती. पण ययातिच्या बाबांच्या मृत्यूनंतर मात्र ती काळजी, ती भिती तिला नव्हती. ती राजमाता झाली होती.(पृ.९६)

वास्तविक पाहता नहुष महाराजांच्या मृत्यूनंतर तिने विरहात राहणे हे बायकांना अपेक्षित होते. पण तसे न घडता आतापर्यंतचे जीवन ती नहुष महाराजांच्या स्त्रीलंपट प्रवृत्तीमुळे तिला स्वतःच्या सौंदर्य संवर्धनासाठी सजग रहावे लागत होते. राजाच्या मृत्युनंतर ती मुक्त झालेली होती. स्वतःला आनंद मिळेल अशा पद्धतीने ती जगू लागते. ही तिची आंतरिक बंडखोरीच होती असे मला वाटते. कचाने देवयानीचे प्रेम लाथाडून दिले व 'कोणताही ऋषीपुत्र तुझे पाणिग्रहण करणार नाही.'(पृ.१२२) असा शाप दिला तेव्हा देवयानी म्हणते, 'मी अशी बाकीच्या बायकांसारखी रडत आणि कुढत बसणार नाही.'(पृ.१२५) मी माझ्या सौदर्याच्या जोरावर राजवैभवात सुखाने नांदेल अशी इर्षा मनी बाळगते.

#### १.२.७.२. रथचक्र :

'ती' थोरली जाव वगळता दोन्ही जावा तिच्याशी नेहमी भांडण काढत तेव्हा ती देखील वेळोवेळी बंडखोर होताना दिसते. धाकट्या मुलाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी त्याच्या शिक्षणासाठी घरातील सर्वांच्या विरोधाला न जुमानता तालुक्याच्या गावी राहायला जाण्याचा तिचा निर्णय तिच्या बंडखोर वृत्तीचा निर्देशक आहे. एवढेच नाही तर तिचा आत्महत्येचा प्रयत्न यातूनही तिची बंडखोरवृत्ती दिसून येते.

**१.२.७.३. स्वामी :**

प्रस्तुत कादंबरीत प्रामुख्याने कौटुंबिक वादातून म्हणजेच वेळोवेळी रघुनाथरावाच्या वागण्यातून बंडखोरी व्यक्त होते. होळकरांचे मातब्बर सरदार गंगोबा तात्या विरुद्ध पेशवाई बगावत करतात.(पृ.२८६) जानोजी भोसले (मराठा सरदार), दादांशी (रघुनाथरावांशी) हातमिळवणी करुन दौलत परकीयांच्या घशात ओतण्याची वृत्ती दिसते.

**१.२.७.४. स्मरणगाथा :**

गोपाळला परभणी जिल्ह्याविषयी आकर्षण होते. तो परभणीला गेल्यावर औंढा नागनाथच्या दिशेने चालू लागत असे. या वाटचालीत त्याचे एक तंत्र होते. दिवसभर चालावं व रात्री एखाद्या गावात कीर्तन करावे, औंढ्याच्या वाटेवर गोपाळने एका गावात कीर्तन केलं. त्या गावातील लोकांना कीर्तन फार आवडले. गावकऱ्यांनी गोपाळला तेथेच राहण्याचा आग्रह केला. लोकांच्या आग्रहाखातर गोपाळ तेथे तीन दिवस राहिला पण त्याला नागनाथाची ओढ लागलेली होती. गोपाळने थांबायला साफ नकार दिला. तेव्हा त्या गावच्या पाटलाने गोपाळला दम दिला. ''जाल? माझ्या शिवारातून? माझी परवानगी नसतां? बुवा हिला मोगलाई म्हणतात! कुठं गळा दाबून रानांत टाकून दिले तर पत्ताही लागायचा नाही!'' पाटलाच्या या दम देण्यामुळे गोपाळच्या अंगाचा असा भडका उडाला की सांगता पुरवत नाही. तेव्हा गोपाळ म्हणाला, ''अरे हा कोण! याची काय मजाल! नंग्याशी तर खुदाही दचकून असतो. माझा खून करायला लांब लांब दात पाहिजेत. याचे दात तर उलीउलीसे आहेत. गोपाळ उभा होता. दोन्ही हात त्याने उंच केले होते. एका हाती काठी घेतली. ती उंचावली आणि म्हणाला, ''रे पाटला एखादं मुसलमान शिपुर्डे आलं, अन् त्यानं तुला हग्या दम दिला, तर तुझी कढी पातळ होते. आहे हिंमत? ये सामोरा. हा मी निघालो. ज्याच्या आईनं त्याला दूध पाजलं असेल, तो आडवायला उभ ठाकेल.''(पृ.२७९) गोपाळ तेथून न घाबरता जातो. वरील प्रसंगातून गोपाळची बंडखोर वृत्ती उफाळून आलेली आपणास जाणवते.

परभणीला सप्ताह भरवण्यासाठी परभणीकरांनी गोपाळला गाडगेबाबांची तीथ पक्की करण्यासाठी व त्यांची भेट घेण्यासाठी पाठविले. गोपाळ नांदेड स्टेशनला उतरला. हिंगोलीला जाणाऱ्या गाडीला वेळ होता म्हणून गोपाळ तेथेच वेटिंगरुममध्ये बाकावर झोपला. तेथे एका पोलिसाने त्याला उठविले व सिगरेट आणून देण्यास सांगितली. गोपाळ त्याच्या कीर्तनातून व्यसनांचा कडाडून निषेध करीत होता. तेव्हा गोपाळने जाण्यास नकार दिला. त्या पोलिसाने

गोपाळला खूप मारले. पण गोपाळने त्याची आज्ञा पाळली नाही.(पृ.२८३) आपल्या मनाविरुद्ध एखादी गोष्ट सुचविणाऱ्या व सांगणाऱ्या व्यक्तीविरुद्ध गोपाळ बंडखोरी करताना दिसतो.

**१.२.७.५. सत्तांतर :**

'सत्तांतर' हया कादंबरीच्या शीर्षकातच 'बंडखोरी'चे बीज दडलेले दिसून येते. सत्तांतर हे विशिष्ट काळानंतर होतच असते. सत्तासंघर्ष सुरु झाला की मनूष्य अगर पशू आपल्या मूळ बंडखोर प्रवृत्तीचा वापर करीत असतो. 'सत्तांतर'मधील टोळयांमध्ये ज्यावेळी नर-पोरांची संख्या वाढायला लागते. तेंव्हा त्याच टोळीतील नायक आपल्याच हया मुलांना टोळीतून हूसकावून लावतो. ही बंडखोरीच आहे. हे असे प्रत्येक टोळीत घडत असते. शेवटी प्रत्येक टोळीतून हुसकावून दिलेले हे सर्व बेवारस वानर-नर एकत्र येतात. त्यांची एक बेवारस-लुटारुंची टोळी तयार होते... तात्पर्य हे बेवारस-लुटारु आपल्या मूळ टोळीवर हल्ला करुन आपल्याच कुटुंबातील सदस्यांशी बंडखोर वृत्तीने वागतात. उदाहरणादाखल लालबुड्या, दाढीवाला इत्यादींच्या टोळ्या अशाच निर्माण झाल्या होत्या. आपल्या सत्तेत अजून कोणी वाटेकरु होऊ नयेत. आपल्या टोळीतील नर-माद्यांची संख्या वाढू नये. याचाही विचार टोळी नायक करताना दिसतो. उदा.''मोगानं उरलेली तीन पोरं मारली. ओढून घेऊन घेऊन मारली. कुणाची डोकी चावली. कुणाची बोट फोडली.''(पृ.५०) सत्तेसाठी हे सर्वच टोळीप्रमुख आपल्या ताकदीच्या जोरावर बंडखोर प्रवृत्तीने वागतांना दिसतात. कादंबरीच्या प्रत्येक वळणावर वानर मादीकडूनही प्रसंगी बंडखोर वृत्ती दिसून येते.

**१.२.७.६. झोंबी :**

'झोंबी' ह्या कादंबरीचा कालखंड म्हणजे आनंदच्या आई-वडिलांच्या विवाहापासून ते आनंदच्या एस.एस.सी. पर्यंतचा कालखंड आहे. आनंदची शिक्षण घेण्याची इच्छा प्रबळ होती तर त्याच्या वडिलांचा मुलाच्या शिक्षणाला तितकाच विरोध होता. मुलगा व वडील एकमेकांसमोर परस्पर विरोधी भूमिकेत उभे रहात. आनंदला वडिलांनी त्याने शाळेत जाऊ नये म्हणून खूप वेळा मारले होते. शाळेच्या 'फी' साठी पैसे दिले नाहीत, तर कधीही पुस्तके घेतली नाहीत. तरीही आनंद त्याच्या मार्गापासून हटला नाही. आर्थिक अडचण, शेतीची कामे, वडिलांचा शिक्षणाला असलेला विरोध या सर्व अडथळ्यांना पार करीत आनंदाने जिद्दीने शिक्षणातील प्रत्येक वर्ष पदरात पाडून घेतले होते. अकरावी (एस.एस.सी.)ची सहामाही परीक्षा पार पडली नि दिवाळीची सुट्टी लागली होती. सुट्टीनंतर पावसाळा संपल्यामुळे शेतीची खूप कामे होती. आनंदाचे वडील आनंदला म्हणाले, ''आन्दा, तुला मिरगातच सांगिटलंय, यंदाचं वरीस शाळा बंद कर म्हणून तरी नुसता

पावसुळ्यापुरता जातो म्हणालास. आता पावसुळा संपला. कामांचा ह्यो ऽ डोंगर हितं हुबा हायलाय नि आता कुठं जातोस?''(पृ.३६३) शाळेत जाण्याच्या सततच्या विरोधाला आनंद कंटाळला होता आणि 'शाळेला जाणार' म्हणून ठामपणे सांगत होता.(पृ.३६६) आनंद व त्याचे वडील दोघांमध्ये खूप वाद झाला. आनंदही वडिलांची भिडभाड न ठेवता उलट उत्तरे देत होता. त्यामुळे वडिलांनी चिडून आनंदला काठीने मारले. ''मार, मार, ठार मार''(पृ.३६८) असं म्हणून आनंद बंडखोर बनला होता. आनंदने नकलांच्या, कवितेच्या, गाण्यांच्या बोलपट लिहून काढलेल्या वह्या घेतल्या, तिथून पलायन केले. थोडे दिवस आत्याच्या घरी राहिला व त्यानंतर कोल्हापूरला पळून गेला. काही गोष्टी सहन न झाल्यास आणि अन्याय वाढत गेल्यास माणसाची बंडखोर प्रवृत्ती उफाळून येते असे मला वाटते.

**१.२.७.७. झाडाझडती :**

'झाडाझाडती' या कादंबरीमध्ये धरणग्रस्त वारंवार बंडखोर होतांना दिसतात. धरणग्रस्तांना नेहमीच अन्याय व अत्याचाराला सामोरे जावे लागते आणि त्यामुळेच धरणग्रस्त अन्यायाविरुद्ध आवाज उठवितांना दिसतात. खासदार शिंगाडे यांनी स्वार्थासाठी जांभळी धरण व्हावे म्हणून आमरण उपोषण धरले. वाघेठाणला बाजाराला गेलेल्या जांभळीकरांना पोलिसांनी पकडले व पोलिस ठाण्यात डांबले तेंव्हा गावात असलेली तरुण मुले बंडखोर बनली. पवाराचा बाबू कोवळ्या मिशीवर ताव मारीत बोलला, ''रक्त सांडले तरी चालेल, एकाला धा मुडदं पडू देत, पण धरण होऊ देणार न्हायं.''(पृ.९) उद्या सकाळी ऊठू. धरणाच्या जागेचा ताबा घीऊ. रगात ओकू, पर माघार न्हाय.''(पृ.९) पाटलाचा दौलू बोलत होता. तरूण वर्गातील मुले धरणाच्या समस्येपुढे बंडखोर प्रवृत्तीने वागताना दिसत होती असे मला वाटते.

खैरमोडे गुरुजींनी कोयनेच्या बुडीतातल्या भागात लोकांचे हाल पाहिलेले असल्याने त्यांनी धरणाला निक्षून विरोध दर्शविला. धरणात बुडणारी जांभळी वाचविण्यासाठी त्यांनी चालविलेला आटापिटा, पुनर्वसनाची जोरदार मागणी, मोर्चे, सत्याग्रह यामुळे खैरमोडे गुरुजी धरणग्रस्तांचे प्रतिनिधी बनले होते. 'आधी मरण मगच धरण'(पृ.१०) असे गुरुजी झोपेतसुद्धा ओरडताना दिसतात. निकराच्या क्षणी खैरमोडे गुरूजीही सरकारच्या विरूद्ध बंडखोर होताना दिसतात. जाधवांची आवडाबाई मोठी धाडसाची होती. दहा वर्षापूर्वी पाटबंधारे मंत्री आणून धरणाचे भूमीपूजन करण्याचे ठरविले होते. उद्घाटनाच्या वेळी सुवासिनी मंत्र्याला ओवाळायला पुढे झालेल्या होत्या त्यात आवडाबाईही देखील होती. मंत्र्याने पूजा करायला सुरुवात केली आणि

त्याचवेळी आवडाईला जांभळीगाव व काळूबाई पाण्यात जात असल्याचे, घर ढासळत असलेली, जनावर गटांगळ्या खाताना दिसल्याचा भास झाला आणि त्याच क्षणी तिने पूजेच्या ताटावर पायाची ठेप मारली आणि ताट हवेत उधळलं आणि ओरडली ''तुमचं संसार फुलायसाठी आमची राखरांगुळी करता? तुमाला आयाभैनी, घरसंसार हाय का न्हाय?''(पृ.१३)

धरणग्रस्तांना पुनर्वसीत भागात पसंत पडतील अशा जमिनी मिळत नव्हत्या. लाभक्षेत्रातील लोक जमिनी द्यायला तयार नव्हते. संपादनाच्या जमिनी कमी पडू लागल्या. धरणग्रस्त म्हाकू भोसले याबाबत राग व्यक्त करताना म्हणतो, ''त्या धरणाला सुरुंग लावीन, नाहीतर बुलडोझर उरावर घीऊन मरंन शिवराम सणगरासारखा पर धरण होऊ देणार न्हाय''(पृ.११७) म्हाकू भोसले होणाऱ्या अन्यायाविरुद्ध बंड पुकारतो. यातून त्याची बंडाची तीव्रता लक्षात येते. गुरुजींना एकदा फार मोठ्या संकटाला सामोरे जावे लागले. धरणग्रस्तांचे पाठीराखे गुरुजी लाभक्षेत्रातील लोकांना व पुढाऱ्यांना विकासाच्या कामातील धोंड वाटत होते आणि यातूनच त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. त्यावेळी देखील म्हाकु भोसले बंडखोर झाला, तो म्हणाला, ''नाना, नुसता आदेश द्या. गावाला चूड लावून खैरापूर जाळतो! तुमच्या रक्ताचा सूड घेतू.''(पृ.३७३)

अशा विविध प्रसंगी धरणग्रस्त बंडखोर होताना दिसतात. पण प्रत्यक्षात मात्र कितीही बंड केले तरी त्यांना अन्याय सहन करावाच लागतो. कारण सरकारी यंत्रणा, तालुक्यातील पुढारी हे लाभक्षेत्रातल्या लोकांच्या पक्षातले असल्याने बिचाऱ्या धरणग्रस्तांना खैरमोडे गुरुजी शिवाय कुणाचाही आधार नव्हता.

**१.२.७.८. राघववेळ :**

रघू शाळेच्या टाकीजवळ मुलींशी बोलला. म्हणून वर्गशिक्षक व मुख्याध्यापक यांनी त्याला शिक्षा दिली. ''माजोरी करतोय? नालायक, बेशरम'' बसे म्हणून खरे काय? आणि खोटे काय? याची शहानिशा केली नाही. ''बोंडे सर येणार नाहीत का?'' एवढेच मंगला जोशीला विचारले असूनही त्याची शिक्षा मात्र मोठी सहन करावी लागली. रघू मनाशीच विचार करतो, ''आपण मंगलाशी बोललो, पण काय बोललो असे. सरांची चौकशी केली फक्त. त्यात काय चुकले आपले? त्याचीच तक्रार करावी मंगलाने...? मुलींशी फक्त बोललो तर शिक्षा? मग हिच मंगला, विद्या, सुनंदा कान्हेडच्या घरी जातात. ताही त्यांच्या घरी जातो. त्याची कशी नाही तक्रार करत कोणी? आपल्यालाच शिक्षा का म्हणून? असे तर नसेल, आपण मांग, मंगला ब्राम्हण, आपण तिच्याशी बोललो, तीच आपली चूक, असे का?''(पृ.२९६) दहावीच्या निरोप समारंभाच्या वेळी

एक हुशार विद्यार्थी म्हणून बाळू कुटेने रघूचे नाव वक्त्यांच्या यादीत लिहीले. सूत्रसंचालन करणाऱ्या कावरखेसरांनी त्याचे नाव पुकारले. तो काही भाषण करण्यास उठला नाही. आजूबाजूचया मुलांनी त्याला भाषण करण्याचा आग्रह केला. तो काही एक ऐकत नव्हता. कावरखेसरांनी पुन्हा एकदा त्याच्या नावाचा उच्चार केला. त्यावेळी रघू बंडखोर झालेला दिसतो. तो जागेवर उठून उभा राहतो. तिथूनच सर्वांना ऐकू जाईल असे म्हणतो, ''सर, माझ्या भावना त्यादिवशीच हेडमास्तरांच्या ऑफिसात मेल्या. आता कुठल्या भावना व्यक्त करु मी?''(पृ.२९७) रघूची अदृश्य जखम जाहीरपणे भळभळली. शिक्षक गोंधळले. मुले कुजबूज करु लागली. बकाल सरांचा चेहरा पार पडला होता.

**१.२.७.९. ताम्रपट :**

ताम्रपट या कादंबरीच्या कालखंडाचा विचार करता १९४२ च्या ऐतिहासिक घडामोडी कादंबरीत वर्णिल्या आहेत. १९४२ चा स्वातंत्र्यलढा म्हणजे इंग्रजांच्या अन्यायकारक सत्तेविरूद्ध भारतीय स्वातंत्र्यसैनिकांनी बंड पुकारले. इंग्रजांची सत्ता उलथून टाकण्यासाठी भूमिगत चळवळीतील कारवायांमध्ये नाना सिरूर व त्यांचे सहकारी यांनी इंग्रजाविरूद्ध बंडखोरी केली.

**१.२.७.१०. तणकट :**

जालिंदर बनसोडेने कॉलेजमध्ये येऊन सर्व दलित विद्यार्थ्यांसमोर भाषण केले आणि स्कॉलरशिप म्हणून मिळणाऱ्या पैशातून पाच रुपये समाजाच्या कार्यासाठी वर्गणी म्हणून देण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले तेव्हा हलकर्णी या गावाचा सुबाना कांबळेने धाडसाने जालिंदर बनसोड्याच्या कुकृत्यांचे प्रकटीकरण केले. ''हे बनसोडे आपल्या समाजाच्या आणि सवर्णांच्या केशीसमध्ये दलालीचा धंदा करतात. फौजदार आणि यांच खातं आहे. मामलेदाराला यांनी फितवून ठेवलंय. हे आमच्याच माणसांकडून पैसे खातात.''(पृ.७१) सुबाना कांबळे सारखा विद्यार्थी हा जालिंदर बनसोडे या पुढाऱ्याचे न घाबरता भांडे उघडे करतो. यातून त्याची बंडखोर वृत्ती दिसते.

साधारणतः प्रवाहाच्या विरोधी वागणारी व्यक्ती बंडखोर समजली जाते. 'तणकट' कादंबरीचा नायक काही प्रसंगी बंडखोर वृत्तीने वागतो. आप्पुण्ण्या महाराला आण्णाप्पा या सवर्ण व्यक्तीने मारल्यामुळे गावावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय महारांनी घेतला म्हणजे गावात कुणाच्याही शेतावर कामाला जायचे नाही. पण कबीरला हे मान्य नव्हते कारण गावात कामावर गेले नाही तर पोटापाण्याचा प्रश्न आहे. आणि म्हणून आपल्या समाजाला न जुमानता त्याच्या कुटुंबातील व्यक्ती गावातल्याच लोकांच्या शेतावर कामाला जात होते. या ठिकाणी कबीर हा

आपल्याच समाजातील लोकांविरूद्ध बंड पुकारताना दिसतो. फणिंद्र सरांबरोबर चर्चा करतांना कबीरने व्यक्त केलेले मत, ''सवर्णांचा राग मला येत नाही. असं नाही सर... पण खेड्यातल्या म्हारवाड्यात जगायचं म्हणजे तुमचं हे म्हणणं मला पटत नाही. तिथं हरघडी गावातल्या माणसांच्या दारात जावं लागतयं. रोज उठून ऐकमेकांची तोंड बघायला लागतात. त्यातच त्यांच्या बांधावर आमचं पोट अवलंबून असतयं''(पृ.११५) फणिंद्र सरांबरोबरही तो सडेतोडपणे बोलून आपला विरोध बंडाच्या भाषेतून करतो.

**१.२.७.११. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरीतील अनेक पात्रे एकमेकांवर बंडखोरी करताना दिसतात. काही पात्रांची बंडखोरी ही देशासाठी आहे. तर काही पात्रे स्वार्थासाठी बंडखोर वृत्तीने वागत असलेली दिसतात. उदाहरणार्थ, बखले वकील, घोरपडे यांचा असलेला चांडाळ चौकटींचा गट साईखेडामध्ये बंडखोर वृत्तीने राणीविरुद्ध वागत असलेला दिसतो. तर इंग्रज सरकारविरुद्ध शंभुराव जाधव यांचा 'ज्योतिप्रकाश'चा अंक लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम करतो तसेच साईखेडामधील चाललेला डांगोरा, दृष्ट व्यक्तींची बंडखोरी सर्वांच्या नजरेसमोर आपल्या जाहीरनाम्यातून प्रकट करतो. चंद्राजीचा मुलगा हरजन इंग्रजांविरुद्धच्या बंडात शहीद झाला होता.(पृ.१४४)

**१.२.७.१२. बारोमास :**

कादंबरी नायकाचा भाऊ मधू बारावी सायन्स चांगले मार्क्स मिळवून पास झालेला होता. शेतकी शाळेचे ट्रेनिंग त्याने केले होते. स्पर्धा परीक्षाही तो पास झाला होता. अत्यंत हुशार असलेल्या मधुला डोनेशन न भरल्यामुळे तलाठयाची नोकरी मिळाली नव्हती. डोनेशनसाठी त्याने शेत विकावे असे मत मांडले पण कुटुंबातील सर्वांनी नकार दिला. या गोष्टीचा मधूला राग होता. त्यामुळे त्याची वृत्ती बंडखोर झाली होती. कुटुंबातील सर्वांशी तो भांडायचा. कादंबरी नायक एकनाथची पत्नी अलका सर्व सोयींनी युक्त वातावरणात मोठी झाली होती. एकनाथच्या घरी मात्र अठरा विश्व दारिद्र्य म्हणजेच तेथे ती नाखूशीनेच राहत होती. त्यातच तिला मधूने म्हणजे दिरान मुस्कटात मारली. तेंव्हा ती माहेरी गेली. ती परत न येण्यासाठी म्हणजेच ती बंडखोर बनली.

**१.२.७.१३. भूमी :**

कादंबरी नायिका मैथिली ही वेळोवेळी प्रसंगानुरूप बंडखोर होताना दिसते. मैथिलीला तिच्या जन्मापासून अनेक संकटांना मानहानीला सामोरे जावे लागले. तिचे वडील तिच्या

लहानपणीच वारले. आईचे छत्रही लवकरच हरवले. त्यामुळे ती येणाऱ्या संकटांना तोंड देत देत आत्मनिर्भर होत गेली. ती तिच्या आत्याकडे रहात होती.

दहावीच्या परिक्षेतला शेवटचा पेपर मैथिली लिहून घरी आल्यावर तिने आत्याला पेपर कसा गेला या प्रश्नाचे उत्तर स्पष्ट शब्दात दिले. पेपर चांगला गेला नाही, घरी यावसं वाटलं नाही, सिनेमा पाहिला व नंतर भटकत राहिले तसेच पास होशील का या प्रश्नांचे दिलेले उत्तर नक्की नाही. बहुधा नाहीच.(पृ.३९) या उत्तरातून तिची बंडखोर वृत्ती दिसून येते. मैथिलीला निर्णय फक्त सांगून टाकायचीच सवय होती या तिच्या स्वभाव वैशिष्ट्यामधूनही तिची बंडखोर वृत्ती प्रतीत होते. तिचा पती शंतनू याच्याशी विवाहबद्ध झालेली मैथिली त्याच्या स्थिरवृत्तीशी जुळवून घेऊ शकली नाही. कुटुंबापासून दूर एकटीने राहण्यातही तिची बंडखोरवृत्तीच दिसून येते.

**१.२.७.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंब व्यवस्थेत फुलपाखराप्रमाणे बऱ्याच गोष्टी हातातून निसटून गेलेल्या असतात. त्या क्षणभंगूर असल्या तरी त्यांच्या आठवणी वा परिणाम दीर्घकाळ राहतात. त्यामुळे आपले मनही बंडखोरी वृत्तीने वागते. हया भागातील हर्षद व मुकुंद ही दोन्हीही श्रीमंत घरातील मुले आहेत. पण कुटुंबातील बऱ्या-वाईट गोष्टींचा त्यांच्यावर परिणाम झालेला आहे. हर्षदला सिग्रेट ओढण्याचे व्यसन लागते. तर मिलिंदला गुटक्याची सवय लागली होती. हे त्यांच्यातील बंडखोर प्रवृत्तीचेच द्योतक आहे. मिलिंदच्या आईची दोन लग्ने झाली होती. मिलिंद म्हणतो, ''आईने पहिल्याला सोडले, मी जन्मल्यावर मी दोन वर्षाचा असताना आईने दुसऱ्याला सोडले.''(पृ.९१) यामधून मिलिंदच्या आईची कुटुंबव्यवस्थेतील बंडखोरवृत्ती दिसून येते.

विलास हर्षदला म्हणतो, ''साहजिकच आहे. तुझ्या आईचे अफेअर...''(पृ.६२) हे विलासचे वाक्य पूर्ण व्हायच्या आतच विलासच्या तोंडावर सणसणीत गुद्या बसतो. कप पडतो. फुटतो, विलास जमिनीवर कोलमडतो. क्षणात उठतो आणि तो हर्षदच्या पोटावर लाथ मारण्यासाठी उगारतो. हर्षद मागे सरतो, वाचतो. 'तुझ्या आईचे अफेअर' असे म्हटल्यामुळे हर्षद रागावून बंडखोर प्रवृत्तीने वागतो.

कुटुंब व्यवस्था आणि पाऊस : आपल्या मनात येतील ते विचार आपल्याला पटतील त्या व्यक्तीला सांगावेच याविषयी मुलीचे बाबा (विधुर म्हातारा) बंडखोर वृत्तीचे विचार करतात. ''सैपाकीणबाई सैपाक उरकून गेल्यावर, मनात आले, सैपाकीणबाईंना का नाही सांगायचे विचार करायचे? पुन्हा तेच. सैपाकीणबाई गेल्यावर सुचतेय. मुलीला सांगितले जात नाही, कारण कुटुंबात तशी पद्धत

नाही. सैपाकीणबाईंना सांगायचे नाही, कारण त्या परस्त्री, आणिक सैपाकीणबाई खालच्या दर्जाच्या! डोके फोडून घ्यायची परिस्थिती आहे! मोलकरणीचे विचार, सैपाकीणबाईचे विचार, पोस्टमनचे विचार, प्लंबरचे विचार... कळणेच होत नाहीय. वर्तमानपत्र वाचा न् राजकारण्यांचे, नटनटयांचे विचार ऐका. मुलीचे सुद्धा.... बंगला, कार.... एवढेच कळले... काहीतरी उपाय शोधायचा आणि आपल्या जगण्यात जे थोडेफार लोक येतात, त्यांच्या जगण्यातून आलेल्या विचारांची गोष्ट ऐकायची... हया पुढे''(पृ.१८८) अशाप्रकारच्या बंडखोर प्रवृत्तीने वागण्याचा विचार मुलीचे बाबा हया वयात करतात.

**१.२.७.१५. खारीच्या वाटा :**

लुकीला भात खाऊ घालण्याची मजेशीर रीत शोधली होती. प्रथम लेखकाच्या उजव्या तळहातावर भाताची शिते ठेवायची त्यानंतर त्याच हाताच्या कोपराच्या खळग्यात नंतर उजव्या कानशीलाखाली तिथला भात खाऊन डाव्या हाताला उतार देऊन जमिनीवर टेकल्यावर ती सरळ खाली उतरे.असा त्याचा दिनक्रम चालला होता पण एक दिवस दिन्याने खोडसाळ पणा केला. लुकीला तिच्या नेहमीच्या जागावर भातच ठेवला नाही लुकी उजव्या तळहातावर चढली व डाव्या हातावरून खाली उतरली तिला कुठेच भात मिळाला नाही याचा राग आला असावा तिनं शेपटीचा झुपका अंगाभोवती लपेटला. संतापून 'कचकच' आवाज करीत ती टोपलीत शिरली.काही वेळ धुसफूस चालू होती आतल्या आत खुडबुड.टोपलीवर शेपटीचे फटके ऐकू येत होते. लेखक व दिन्याने तिला बाहेर काढण्याचा खूप प्रयत्न केला परंतु ती बाहेर आलीच नाही. त्यानंतर लुकी फक्त आईने बशीत ठेवलेलाच भात खात होती. त्या दोघांनी तिला भात खाऊ घालण्याचा खूप प्रयत्न केला पण सारे व्यर्थ केले. म्हणजेच या प्रसंगी लुकीची बंडखोर वृत्ती दिसून येते.

**१.२.७.१६. फेसाटी :**

लेखकाच्या सरांनी एकदा त्याच्या जातीचा उल्लेख करत त्याला राग येईल असे वक्तव्य केले, ''अरे ये येड्या धनगरा, बग त्यो तुझा चुलत भाऊ गटविस्तार अधिकारी झालाय, तेव्हा तू साधा मेंढरं राखायच्या पण लायकीचा नाहीच''(पृ.११५) भाऊ गटविकास अधिकारी झाला कारण तो चांगला मुलगा होता.''तू ह्या जातीचा हायचं म्हणून तू हिथचं राहणार हायचं.''(पृ.११५) असे ही सर म्हणाले, तेव्हा लेखक बंडखोर होताना दिसला. त्यावर त्याच्या सरांना त्याने जे प्रतिउत्तर दिले त्यातून त्याची बंडखोर वृत्तीही समजते,''माझ्या जातीवर का गेला सांगा? तुम्ही माझ्या

जातीवर जायचा काय संबंध. मी शिकीन नायतर बोंबलत जाईन. तुम्हाला काय करायचं हाय. माझ्या पुढं तेच नाव काढायचा काय संबंध.''(पृ.११६)

### १.२.८. संघर्ष :

कादंबरीच्या कथानकात पात्र व घटना यांच्या अन्योन्य संबंध इतकेच किंबहुना याहून अधिक महत्त्वाचे स्थान संघर्षाला आहे. जीवन संघर्षाला समर प्रसंग असेही म्हटले जाते. 'प्रतिभा-साधन' या पुस्तकात ना. सी. फडके यांनी समर प्रसंग हाच कथानकाचा आत्मा आहे असे म्हटले आहे. कादंबरीत अनेक पात्रांचा जीवनसंघर्ष चित्रीत होत असतो. नंदा मेश्राम यांच्यामते, ''जीवन एक संघर्ष आहे. जीवनात अनेक चढउतार असतात, अनेक संघर्षमय प्रसंग येतात. हा संघर्ष कधी कधी व्यक्तीगत असतो, तर कधी सामाजिक असतो. यातूनच मनुष्याची खरी कसोटी दिसून येते. त्याच्यातील धैर्य, साहस, प्रसंगावधान, सद्सद्विवेक बुद्धी इत्यादी गुण दिसून येतात. याच जीवनाचे चित्रण कादंबरीमध्ये व्यक्त होत असते म्हणूनच कादंबरीतील नायक-नायिकांच्या खऱ्या आणि चांगल्या गुणांची कसोटी लागत असल्यामुळे लेखकाने याचे चित्रण करणे आवश्यक आहे. असा संघर्ष हा कथानकाचा भाग व्हावा किंवा केंद्रबिंदू असावा, त्यामुळे कथानक आकर्षक, गतीमान आणि उठावदार होते. खरे तर संघर्ष हा कथानकाचा पाया आहे.''[५५] या जीवन संघर्षामुळे पात्रांच्या अंगभूत गुणांची पारख होवून ती पात्रे कसोटीला उतरतात. संघर्षाविषयी बापट/गोडबोले कादंबरीत समरप्रसंगाचे असलेले महत्त्व पुढीलप्रमाणे अधोरेखित करतात. ''जीवनाला पुष्कळदा संग्रामाची उपमा देण्यात येते व प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या आयुष्यात कशा ना कशाशी तरी झगडा करण्याचा प्रसंग येतोच. मग तो झगडा व्यक्तीशी असो, स्वतःच्या मनातील एखाद्या प्रबल झालेल्या तिरस्करणीय भावना विकाराबरोबर असो, की जगातल्या प्रतिकूल परिस्थितीशी असो. असा संघर्ष हा जीवनाचे मर्मच असल्यामुळे मानवी जीवनाचे अवश्यांगच आहे, इतकेच नव्हे तर तो इष्टही आहे. कारण अशा झगड्यातच मनुष्यातील धारिष्टादी श्रेष्ठ तेजस्वी गुण कसोटीस लागतात.''[५६] थोडक्यात कादंबरीच्या कथानकाशी मध्यवर्ती सूत्र संघर्ष हेच असते.

### १.२.८.१. ययाति :

ययाति कादंबरीच्या कथानकामध्ये देव व दानवांचा संघर्षं आहे. युद्ध होऊ नये म्हणून अंगिरस ऋषींनी शांतीयज्ञ आरंभिला व त्या यज्ञात दानवांनी विघ्ने आणू नयेत म्हणून ययातिसारख्या पराक्रमी योद्धाला ऋषींनी पाचारण केले होते. मृत्यू नकोच असे वाटणारे नहुष महाराज यांचा जीवनाच्या अंतापर्यंत चाललेला मृत्यूशी संघर्ष मनाला वेदना देतो. ययाति या कादंबरीत

कथानायकाचा आत्मीक संघर्ष आहे. आत्मा व शरीर यांचे जे नाते आहे ते समजून घेण्यासाठी त्याचा चाललेला संघर्ष येथे दिसतो. ऋषीकन्या देवयानी व पुरुरव्या महाराजांची राजकन्या शर्मिष्ठा यांचा वाद बालपणापासूनच होता. शर्मिष्ठेने देवयानीचा केलेला अपमान सहन न झाल्याने सुडाच्या भावनेने देवयानीने शर्मिष्ठेला स्वतःची दासी होण्याची शिक्षा दिली. देवयानी व शर्मिष्ठा यांच्यातील संघर्ष कथानकात व्यक्त झाला आहे. देवयानी व ययातिची आई यांच्यातही जातीच्या मुद्यावरून नेहमी वाद होत होते. देवयानी ही ब्राह्मणकन्या व तिला क्षत्रिय जातीचा असलेला अभिमान त्यांच्या सततच्या वादविवादातून संघर्ष व्यक्त होतो. देव-दानव संघर्ष, आत्मीक संघर्ष, देवयानी-शर्मिष्ठा संघर्ष, देवयानी व तिची सासू यांचा संघर्ष असे काही संघर्षाचे प्रसंग लेखकाने व्यक्त केले आहेत.

**१.२.८.२. रथचक्र :**

'रथचक्र' ही एका स्त्रीच्या संघर्षाचीच कहाणी आहे. कादंबरी नायिका 'ती' ही सात वर्षाची असताना तिची आई वारली. तेंव्हापासूनच तिच्या संघर्षाला सुरुवात झाली. आत्याकडे लहानाची मोठी झाली. एका संन्याशी वृत्तीच्या विद्रुप थोटया माणसाबरोबर लग्न झाले. पतीने प्रेमाची वागणूक दिली नाही. चौथी मुलगी पोटात असताना तो पळून गेला. सर्व मुलांची जबाबदारी तिच्यावर पडली. थोरला मुलगा आईला सन्मान न देणारा होता. जिल्ह्यात पहिल्या आलेल्या धाकट्या मुलाच्या शिक्षणासाठी घर सोडले, तालुक्याच्या गावी राहिली, धाकट्या मुलाच्या शिक्षणासाठी खस्ता खाल्ल्या पण त्या मुलानेही तिला सन्मानाने वागविले नाही. संकटांना पार करत आयुष्याला कंटाळलेल्या तिने जेंव्हा जीवन संपविण्याचा प्रयत्न केला, तोही निष्फळ ठरला. तिच्या आयुष्यातील या महत्वाच्या घटनांमधून तिचे संघर्षमय जीवन व्यक्त होते.

**१.२.८.३. स्वामी :**

माधवरावांनी रघूनाथरावांना शनिवारवाड्यात होमहवन करण्यास बंदी घातली. होमहवन करायला गावात अनेक मंदिरे, सुंदर ठिकाणे आहेत तिथं ते करावेत अशी आज्ञा दिली. तेव्हा रघूनाथरावांनी गोपिकाबाईना घडलेला प्रकार सांगितला. तेव्हा गोपिकाबाईही माधवरावांवर ओरडल्या, तेव्हा माधवराव म्हणतात. ''विपर्यास होतोयं काका! हा शनिवारवाडा आहे. दख्खनच्या दौलतीची सूत्र हलवण्याचं ठिकाण, मुत्सद्यांच माहेर घर, वीरांचं विश्रांती स्थान! इथं होमहवन शिवाशीव यांची बंधनं पाळून चालणार कसं? इथं जसे पटवर्धन येतात, तसेच घोरपडे येतात! राजाला सारीच प्रजा सारखी! धर्म ही त्याची वैयक्तिक बाब!(पृ.४७) माधवराव व रघुनाथराव, माधवराव व गोपीकाबाई यांच्यातील संघर्ष यामधून दिसतात. माधवरावांच्या अल्पशा कारकिर्दीत

त्यांना अनेक संघर्षाला सामोरे जावे लागले, सर्वात पहिला संघर्ष कौटुंबिक संघर्ष. माधवरावांना रघूनाथरावांविरूद्ध नेहमीच संघर्ष करावा लागला. एकमेकांविरूद्ध लढाईला सिद्ध होण्याची वेळ ही आली. तसेच हैदर व निजाम यांच्या विरुद्ध संघर्ष करण्याची वेळ आली होती.

**१.२.८.४. स्मरणगाथा :**

गो.नी. दांडेकर यांनी आपल्या 'स्मरणगाथा' या कादंबरीत स्वतःच्या जीवनातील कडू-गोड अनुभवांची मालिका जीवनाच्या संघर्षातून व्यक्त केली आहे. कुटुंबात असताना त्यांना त्यांच्या वडिलांचा मार खावा लागला पण त्यात त्यांची चूक होती. स्वातंत्र्यसंग्रामात उडी घेण्यासाठी वयाच्या तेराव्या वर्षी घरातून पलायन केले. संग्रामात उडी घेण्यातील निरर्थकता लक्षात आल्यानंतर वास्तविकता ते घरी गेले असते तरी ठिक होते पण त्यांनी घरी जाण्याचा मार्ग स्वतःच बंद केला. नाटकांमध्ये कलाकार म्हणून काम करण्याचे स्वप्न उराशी बाळगून विविध नाटक कंपण्यांमध्ये हिंडले पण त्यांना सगळीकडे फक्त त्यांचा वेगळ्या कामासाठी वापर केला जात आहे हे जाणवले. अन्नासाठीही फिरावे लागले हा ही एक प्रकारचा स्वतःच्या जगण्यासाठीचा संघर्षच म्हणावा लागेल.

लेखकांची भटकंती चालू असताना ते नाशिकला देशपांडे यांच्या कुटुंबात राहत होते. तेव्हा त्यांनी अस्पृश्यांचा काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठीचा सत्याग्रह होणार हे ऐकले. लेखकही काळाराम मंदिराकडे गेले तेथे त्यांनी महारांना मंदिरात प्रवेशासाठी सत्याग्रह करावा लागला हे पाहिले. 'तुकड्या तुकड्यांनी सत्याग्रही येताहेत, पोलीस त्यांना पकडून गाड्यांतून घेऊन जाताहेत.(पृ.१५२) महार हेही हिंदूच आहेत पण त्यांना देवाच्या दर्शनासाठी संघर्ष करावा लागला आणि तो संघर्ष लेखकाने पाहिला आणि म्हणून कादंबरीत उल्लेखिला आहे.

लेखक देशपांडे, यांच्या घरून अकोल्याला गणपतराव जोशी यांच्याकडे गेले. गणपतराव जोशींच्या व्यक्तिरेखेवर प्रकाश टाकताना गोपाळने म्हणजे लेखकाने एक प्रसंग सांगितला. अकोले तालुक्याचा मामलेदार खान नावाची व्यक्ती होती. साधारणता सतरा सालचा प्रसंग होता. खान हा इंग्रज सरकारातला अधिकारी होता. तो लोकांशी उन्मत्तपणे वागत असे. तो स्त्रियांच्या बाबतही लंपट होता. कुणाच्याही घरी संध्याकाळी निरोप जायचा. 'आज धाडून द्या. गावकरी लेकीबाळी अकोल्यास ठेवानासे झाले.'(पृ.१५५) तरण्याताठ्या मुलांनी सैन्यात भरती झालेच पाहिजे असा त्याचा दंडक होता. 'आयांच्या पदराखालून तरणीताठी लेकरं मारीत, झोडीत, हाती बेड्या अडकवीत गोळा केली. त्याबरोबर रात्री बेरात्रीच्या लेकीबाळी ही धरल्या'(पृ.१५५) खानाला धडा शिकविण्याचे गणपतराव बाबांनी ठरविले. अकोला परिसरातील दादाभिल्ल, परसूनवला या सारख्या

सात आठ व्यक्ती तयार केल्या व त्यांचे म्होरके गणपतराव बाबा यांनी मामलेदाराच्या घरात शिरून त्याच्यावर कुऱ्हाडीचे वार केले. त्याला जीवे मारले.(पृ.१५५, १५६) सर्वसामान्य जनतेला सुरक्षिततेचे जीवन जगता यावे म्हणून जुलूम करणाऱ्या विरूद्धचा संघर्ष महत्त्वपूर्ण व यशस्वी वाटतो. याचाच अर्थ गणपतरावबाबांना व त्यांच्या सहकार्यांना अन्यायाविरुद्ध आवाज उठवून खानासारख्या दुराचारी व्यक्तीला संपविण्यासाठी संघर्ष करावा लागला. मराठवाड्यामध्ये राज्यकर्त्या मुसलमानांच्या अत्याचाराला सर्वसामान्य जनतेला सामोरे जावे लागत होते. 'या उपद्रवाला लक्षात राहण्याजोगी टक्कर जर कुणी दिली असेल, तर ती आर्य समाजानं. समाजाच्या अनेक शाखा कित्येक वर्षापासून मोगलाईत कार्यरत होत्या, झुंज देत होत्या.'(पृ.३९६) आर्य समाजाचा हा ही एक प्रकारे मुसलमान राज्यकर्त्यांच्या अत्याचारा विरूद्धचा संघर्षच होता.

लेखक 'राष्ट्रीय स्वयंम् सेवक संघाचे' कार्यकर्ते म्हणून सक्रिय असताना कन्नोद या गावी घडलेल्या जातीय संघर्षाचे निवेदन केले आहे. 'भोपाळहून दोन मुसलमान कन्नोदला आले. मशिदीत राहू लागले. गुप्त बैठकी घेऊ लागले. रात्रीची खांद्यावर फावडी घेऊन संचलन काढू लागले. गावात तंग वातावरण झालं. त्यांना पकडण्यासाठी इंदूरहून पोलीस अधिकारी आले. ते दोघे मशिदीत लपले.'(पृ.५४०) पोलीस अधिकाऱ्यांनी भुरादादा म्हणजे गावातील पहिलवानाला बोलावले. भुरादादा व सात आठ जण मशिदित शिरले व त्या दोन मुसलमानांना कैद केले. भुरादादा सह सात आठ लोक जुते घालून मशिदीत गेल्यामुळे मुसलमान लोक भडकले. गावातील वातावरण अधिकच तंग झाले होते. दरम्यानच्या काळात मोहोरमचा सण होता. त्यामुळे गावात दंगे होऊ नये म्हणून इंदूरहून डी.वाय.एस.पी. कन्नोदला आला. तो मुसलमान होता. त्यामुळे मुसलमानांचे प्राबल्य वाढले. मुसलमान प्रगटपणे म्हणू लागले. ''हमारा हपसर आ गया। अब राममंदर सम्हालो। मस्जिद में कूद पडे थे, उसका बदला चुकायेंगे।'(पृ.५४२) अशा प्रकारे गावात हिंदू-मुस्लीम संघर्ष विकोपाला गेला होता. यावर उपाय म्हणून गावकरी लेखकाकडे गेले पण राष्ट्रीय स्वयंम सेवक संघ या वादात काहीही करू शकत नाही हे लेखकाने स्पष्टपणे गावकऱ्यांना सांगितले. तेव्हा गावकरी चिडले व संघ बंद करण्याच्या निर्णयापर्यंत पोहचले. संघ काही करू शकला नाही तरी मी मात्र यावर मार्ग काढेन असा लेखकाने शब्द दिला. लेखक म्हणाले, ''अगर मुसलमान मंदिरमे घुसेंगे ही, तो उन्हे पहले मेरे शवपर पैर देना होगा।''(पृ.५४३) अशा प्रकारे कन्नोद गावातील हिंदू-मुसलमान यांच्यातील धार्मिक वाद विकोपाला पोहचला. हिंदू-मुसलमान आपआपल्या धर्माच्या प्रतिष्ठेसाठी संघर्ष करीत होते हे लेखकाने कादंबरीत व्यक्त केले आहे.

**१.२.८.५. सत्तांतर :**

जन्मापासून ते मृत्यूपर्यंत संघर्ष हे मुडाच्या जीवनाचे सारतत्व असल्याचे लेखक नमूद करतो. नराला जगण्यासाठी सत्तासंघर्ष आणि जीवनसंघर्ष करावाच लागतो. प्राणी जीवनात तर प्रत्येकालाच संघर्षात आपले अस्तित्व सिद्ध करावेच लागते. या संघर्षात कमजोर प्राण्याचा किंवा व्यक्तीचा टिकाव लागू शकत नाही. 'कालचा बेवारस नर टोळीतील एक पेंढारी दाढीवाला सत्ताधारी बनतो. सत्तासंघर्षात विजयी होतो.'(पृ.५६, ५७) मोगा आणि दाढीवाला हे दोघेही मुडा आणि लालबुड्या यांच्यात सत्ता संघर्ष करून काबीज करतात. सत्तांतरच्या संघर्षाविषयी मीरा तारळेकर म्हणतात, ''कादंबरीत नायक, नायिका नाहीत. संवाद नाहीत. कथाकथन नाही. फक्त वानरांच्या दोन टोळयांमध्ये चालणाऱ्या संघर्षाचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण आहे. प्रत्येक टोळीतील जंगलातील क्षेत्र, टोळयांची परस्परांच्या हद्दीत चालणारी घुसखोरी, नरानरातले, माद्यामाद्यांतले संबंध, सर्व वानरांची जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यांपासून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळवण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या यांचे विलक्षण परिणामकारक दर्शन हया छोटयाशा कादंबरीत आहे.''[५७] वरील सर्व वर्णनातून वानरांच्या संघर्षाविषयीची आपणास जाणीव होते. तारळेकर त्याविषयी पुढे म्हणतात, ''सत्ता संघर्षाकडून ही कहाणी जगण्याकरता चाललेल्या संघर्षाचीही होऊ शकते.''[५८] सत्तांतर या कादंबरीमध्ये पहिल्या पासून ते शेवटपर्यंत संघर्षच भरून राहिला आहे.

**१.२.८.६. झोंबी :**

'झोंबी' या कादंबरीतील पात्रे जीवनाशी संघर्ष करताना दिसतात. कौटुंबिक संघर्ष हा या कादंबरीच्या अनुषंगाने महत्त्वपुर्ण आहे. लेखकाचे वडील रतनू व रतनूच्या वडिलांचा आणि चुलत्यांचा नेहमी वादविवाद होत होता. रतनूच्या वडिलांना पाच भाऊ ते एकमेकांचे वैरी होते. एकमेकांच्या वैरणी जाळणे, कापणीला आलेले पीक कापून नेणे, चोरून गवत कापणे; जनावर मारणे अशा प्रकारे ते भावाभावात वाईट कृत्य ते करीत होते.(पृ.२, ३) म्हणजेच भाऊबंदकीचे वाद विकोपाला पोहचलेले होते. आनंदने आपल्या आई-वडिलांचे भांडणही अनेकदा पाहिले होते. रतनू आनंदचे वडील ताराला नेहमी शिव्या देणे, मारणे अशी कृत्य करीत होते. वडिलांनीही आनंदने शाळेत जाऊ नये म्हणून आनंदला खूप वेळा मारल्याचे प्रसंग लेखकाने कथन केले आहेत. कौटुंबिक संघर्ष कादंबरीत अनेक वेळा येतो.

आनंदचा नेहमी स्वतःचा स्वतःशीच चाललेला संघर्ष त्याच्या स्वगतांमधून स्पष्ट होतो ''जलमभरच आपल्याला आता असं मरावं लागणार. कष्ट कष्ट करतच आपूण जाणार. आईबासाठी नुसतं आपूण राबायचं. मर मर मरायचं...(पृ.१११) आनंदला शिक्षण घेण्यासाठी मानसिक संघर्षा बरोबरच वडिलांशीही खूप वेळा संघर्ष करावा लागला होता. अनेक वेळा लेखकाला जीवनात संघर्ष करावा लागल्याचे प्रसंग आढळून आले आहेत. लेखकाच्या आईला एकूण दहा मुले झाली. त्यापैकी आठ मुले वाचली. घरात सतत एवढी माणसे आणि उत्पन्नाचे साधन म्हणजे शेती. शेतीतून जे मिळेल त्यात कशी बशी अन्नपाण्याची सोय होत होती. आनंदच्या शिक्षणातील प्रमुख अडचण म्हणजे आनंदचे वडील. ते आनंदला पुस्तकासाठी व शाळेची फी भरण्यासाठी पैसे देऊ शकत नव्हते. आनंदची शिक्षणाची ओढ पाहून त्याने बऱ्याचदा वडिलांचा मार खाल्ला होता. आनंदने शेतीची कामे करावीत अशी त्याच्या वडिलांची इच्छा होती. आनंद शिक्षण घेण्यासाठी परिस्थितीशी झुंजत होता.

तारा-लेखकाची आई इच्छा असूनही चांगले कपडेलत्ते घेऊ शकत नव्हती. कधीतरी मुलांच्या प्रेमापोटी मुलांना भेडबत्तास आणून थोडा थोडाच मुलांच्या हातावर देऊ शकत होती. मुलांना पोटभर व सकस अन्न खायला मिळत नव्हते. त्यामुळे सगळी भावंड रोगट दिसत होती. आनंदने हायस्कूल पर्यंतचे शिक्षण अनेक संकटांना तोंड देत पूर्ण केले. हायस्कूलमध्ये फुल फ्रिशिप मिळावी म्हणून अर्ज केला. पण आनंद सोडून इतरांना फ्रीशीप मिळाली होती. हायस्कूलमध्ये ज्यांच्या नात्यातील व्यक्ती होती त्या सर्वांना फ्रीशिप मिळाली होती. 'हायस्कूलमध्ये माझ्या नात्यातला कुणी शिपाईही नव्हता.'(पृ.२९३) असे आनंदचे मत होते आणि म्हणून त्याला फ्रीशीप मिळाली नाही. आनंदने त्यावर तोडगा काढला. आनंदचा मित्र आबाजीची गणित व भूमितीची शिकवणी घेतली व त्याबदल्यात आबाजीने त्याला फी इतके पैसे देण्याचे कबूल केले. अशा प्रकारे नववीचे वर्ष कसे बसे पार पडले. नववीची फी भरण्यासाठी एकदा चोरी देखील केली. पण आपण केलेली चूक ही क्षम्य नाही हे आनंदच्या लक्षात आले. ''माझा ह्यो नाद असाच वाढत गेला तर माझ्या शिक्षणाचा कायबी उपयोग न्हाई. मी खरंच दरोडेखोर हुईन सगळ्या गावाला हे कळलं तर कुणी मास्तर मला हुंबऱ्याच्या आतबी घेणार न्हाईत.''(पृ.३१७) आणि त्याने फीसाठी आणि पुस्तकांसाठी शाळांमधून नाट्य-छटांचे कार्यक्रम करण्याचे ठरविले. पण त्यातही यश आले नाही. आनंदला आपले शिक्षण चालू ठेवण्यासाठी अनेक संकटे व संघर्षांना सामोरे जावे लागले होते.

अशा प्रकारे अनेक अडीअडचणींना धैर्याने सामोरे जात, बिकट परिस्थितीशी संघर्ष करत, लेखकाने आपले शिक्षण पूर्ण केले. मानसिक, अर्थिक व कौटुंबिक संघर्षाशी दोन हात करत लेखक यशस्वी झालेला दिसतो.

**१.२.८.७. झाडाझडती :**

प्रस्तुत कादंबरीतील जांभळीकर किंवा धरणात उध्वस्त झालेली इरलेवाडी, बिबेवाडी, झांझडवाडी, फणसावडे या सारख्या नऊ गावांना आपल्या विविध मागण्या सरकार दरबारी मांडून मान्य करून घेण्यासाठी सतत संघर्ष करावा लागला. जांभळी धरण होऊच नये म्हणून खैरमोडे गुरूजींना शासन व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करावा लागला. 'शासनाच्या हाती राक्षसी सत्ता असते.'(पृ.३०) हेच शेवटी खरे. गुरूजींनी हरणारी लढाई शौर्याने लढविली. खैरमोडे गुरूजींना भ्रष्ट शासन व्यवस्था, चैनी, विलासी, स्वार्थी पुढारी यांच्याविरुद्ध आपल्या धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांसाठी संघर्ष करावा लागला. प्रसंगी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला देखील झाला. गुरूजी धरणग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत संघर्षाचे हत्यार उपसत होते.

हैबतीला नोकरी मिळविण्यासाठी झगडावे लागले. अखेरीस जीवनाच्या अंतापर्यंत त्याला पर्मनंट नोकरी मिळालीच नाही. धरणग्रस्तांना जमिनी संपादन करण्यासाठी झगडावे लागले पण लाभक्षेत्रातल्या त्या गाववाले जमिनीसाठी धरणग्रस्तांच्या जीवावर उठले उदाहरणार्थ राघू भिवाने हैबतीचा जीव घेतला तर सावळेरामाला सर्जेराव, राघूभिवा, धोंड्या, बबेराव या खैरापूरकरांनी पळवून लावले. धरणग्रस्तांचा जगण्यासाठी अखंड संघर्ष चाललेला होता. संपूर्ण कादंबरीत धरणग्रस्तांचा आक्रोश व संघर्ष भरुन राहिलेला दिसतो.

**१.२.८.८. राघववेळ :**

'राघववेळ'मध्ये मातंग समाजाला वेगवेगळ्या पातळीवरील संघर्षाला सामोरे जावे लागते. सर्वात प्रथम त्यांना अन्नासाठी संघर्ष करावा लागतो. आर्थिक संघर्षाला तर ते सतत सामोरे जातच असतात. रघुला दहावीची परीक्षा फी भरण्यासाठी संघर्षच करावा लागतो. टोळझाड येऊन गेल्यानंतर टोळ्यांनी प्रत्येकाच्या तोंडचा घास पळवला होता. त्यातच रघूची दहावीची परीक्षा फी भरायची होती. त्यासाठी वालंबी विचार करत होती. तिच्या मानसिक संघर्षातून ते व्यक्त होते. वालंबी विचारात पडली. बराच वेळ तिने विचार करून पाहिला. परंतु पैसा कुठे मिळेल त्याविषयी काहीच अंदाज करता येईना. तिला खूप रात्र झाली. जेवण करून अंथरून पडली. रघु, सिताराम अभ्यास करीत बसली. वाकळीवर पडली. थोडा वेळ अभ्यास करून सीताराम तिच्या वाकळीत

शिरला. झोपीही गेला. रघूचा अभ्यास संपून तोही अंथरूणात येऊन पडला. तरीही वालंबी टक्क जागी होती. तिने पुन्हा पुन्हा डोळे मिटून पाहिले पण काही करता तिला झोप  येईना. सारखा रघूच्या फीचा प्रश्न फेर धरत होता. फेरागणिक मोठा होत होता.  सकाळी ती उठली. लवकर चहा उरकला. घराबाहेर पडली. पायाला भिंगरी बांधून गावात हिंडली. पांडुरंग पाटील, जगदीश सरपंच, भिकुलाल मारवाडी, गोपाळराव, सोपानराव देशमुख अशा किती तरी जणांना तीने पैशांचे म्हणून पाहिले. त्यासाठी किती तरी उंबरठे चढली. उतरली परंतु कोणीच तिला पैसे दिले नाहीत.(पृ.२८०) अशा प्रकरणी फीसाठी वालंबीला मानसिक संघर्षाला सामोरे जावे लागते. शेवटी रघूच्या सोनकर सरांनी पन्नास रुपये रघूला फीसाठी दिले. रघूला शाळेची फी व दहावीची परीक्षेची फी भरण्यासाठी आर्थिक संघर्ष करावा लागतो.

**१.२.८.९. ताम्रपट :**

'ताम्रपट मधील संघर्षाचे स्वरुप हे गुंतागुंतीचे व विविध पातळ्यांचे आहे. दलित व सामान्य माणसे, सत्तास्पर्धा, जातीयता, शिक्षणसंस्थांमधील ध्येयवाद व व्यवहार यामधील संघर्ष यातून सत्तेच्या अपरिहार्य चौकटी आणि तत्त्वनिष्ठ राजकारण यातील संघर्ष व त्याचा सामान्यांवर झालेला परिणाम हे बाह्यरुप होते तर दलित, हिंदू-मुस्लीम, आणीबाणीतील दडपशाही असे रुप या संघर्षांतून प्रकटते.'[५९]

**१.२.८.१०. तणकट :**

'तणकट' या कादंबरीत सवर्ण समाज व दलित समाज यांच्यात संघर्ष झाल्याचे अनेक प्रसंग आले आहेत. गणू पाटलाच्या शेतात आप्पुण्या महार गेला होता. आप्पुण्याची म्हैस चरता-चरता मळ्यातल्या बांधावरच्या गुलब्यात गेली. त्यामुळे चवताळलेल्या गणू पाटलाच्या थोरल्या मुलाने म्हणजे आण्णाप्पाने आप्पुण्याला व त्याच्या म्हशीला खूप मारले. या घटनेने सर्व महार समाजातील लोक गणू पाटलाच्या वाड्यावर मोर्चा घेऊन गेले.  गौत्या म्हणजे गौतम कांबळेने मोर्चाचे नेतृत्व केले. वाड्यासमोर पोहचल्यावर गौत्या ओरडला, ''कोण हाय घरात?'' एवढ्या मोठ्या आवाजाची सवय वाड्यालाही नव्हती. गणू पाटीलही तावातावाने बोलत होते. कारण त्याला काय घटना घडली हेच माहीत नव्हते. त्याच वेळी गणू पाटलाच्या गल्लीतील मात्तबर मंडळी महारांच्या विरोधात उभी ठाकली पण जेव्हा गणू पाटलाल डेप्युटी गोपाळाकडून आप्पुण्याने आण्णाप्पाला मारल्याचे कळल्यानंतर गणू पाटील या संघर्षात मागच्या पावलावर आला खरा पण 'तुकड्यावर जगलेल्या म्हारड्याची ही हिम्मत? त्याच्या डोक्यची नस ठणकत गेली.'(पृ.७६,

७७) महार समाजातील मोर्चेकरी, परत फिरले असले तरी त्यांच्या डोक्यातील राग शांत झाला नव्हता. ''आपल्या म्हारोड्यातला एक सुद्धा माणूस हितनं फुडं गावात कामाला जाणार न्हाई''(पृ.७७) गौत्या आपल्या चढ्या आवाजात बोलला होता. म्हणजेच महारवाड्यातील लोकांनी गावातल्या लोकांच्या शेतात कामावर जायचे नाही असा निर्णय घेतला. ते एव्हढ्यावरच थांबले नाहीत त्यांनी आण्णाप्पावर पोलीस स्टेशनमध्ये जाऊन केस लावली. आण्णाप्पाला जेलमध्ये जावे लागले.

अशा प्रकारे आप्पुण्ण्या म्हाराला आण्णाप्या म्हणजे गणू पाटलाच्या मुलाने मारल्याच्या घटनेने गावामध्ये सवर्ण विरुद्ध दलित असे संघर्षाचे वातावरण निर्माण झाले.

सवर्ण लोक व महारवाड्यातील जातीयवाद निर्माण व्हायला यरगट्टीची घटना फार महत्त्वाची ठरली. यरगट्टीला महार समाजातील एका महिलेवर चोरीचा आरोप करुन चावडीत बांधून मारले. त्यावेळी दलित नेत्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला.(पृ.५७) पांढरीत गणू पाटलाच्या मुलाने म्हणजे आण्णाप्पानं आप्पुण्ण्या महाराला मारले कारण आप्पुण्ण्या महाराची म्हैस चरता चरता आण्णाप्पाच्या माळ्यातल्या बांधावरच्या गुलब्यात घुसली. या घटनेने दादबा गोपाळा, जानबा, भीमा हेडी, तुकन्या, संगाप्पा या सगळ्यांनी या अन्यायाला वाचा फोडण्याचे ठरविले. त्यांनी आण्णाप्पावर केस टाकली. या घटनेचा परिणाम म्हणजे गावातील सवर्ण व महार यांच्यात जातीय संघर्ष निर्माण झाला. महारवाड्यातला एकही माणूस गावात कामाला जाणार नाही असा गौतम कांबळेने आदेशच दिला. पण कबीर चे वडील सदबा महाराने याला विरोध दर्शविला. म्हणजेच त्यातून सर्व महार एका बाजूला व सदबा यांच्यात वाद झाला. कबीरच्या घराला सगळ्यांनी वाळीत टाकले. त्यामुळे कबीर व गौतम कांबळे या दोघांमध्ये बऱ्याचदा भांडण तंटा झाला होता.(पृ.७८) अशा प्रकारे सवर्ण विरूद्ध दलित, अशा जातीय संघर्षाबरोबरच आपआपसातील कौटुंबीक संघर्ष अन्यायाला वाचा फोडण्यासाठी घडलेला दिसतो.

**१.२.८.११. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरी ही एकूणच संघर्षमय असलेली दिसून येते. राजाराणीपासून ते सर्वसामान्य व्यक्तींपर्यंत सर्वजण मानसिक संघर्षात जीवन जगत असलेले दिसतात. राणी दमयंती, क्लारा, राजस इत्यादी उदाहरणे स्त्रियांच्या बाबतीत देता येतील. माधवरवव देसाई हेही आपल्या आयुष्यात संघर्षमय जीवन जगत असलेले दिसतात. शंभुराव जाधव हे साईखेडामधील कुकारस्थान करणाऱ्या लोकांविरुद्ध आपल्या अंकातून सतत लिहीत होते.

**१.२.८.१२ बारोमास :**

प्रस्तुत कादंबरीत प्रामुख्याने कौटुंबिक संघर्ष लेखकाने व्यक्त केला आहे. शहरी वातावरणात वाढलेली शेवंतामाईची सून अलका व शेवंतामाय यांच्या विचारांच्या तारा जुळल्याच नाहीत. घरात आर्थिक अडीअडचणी असताना शेतातील बी-बियाणांसाठी अलकाने बांगड्या मोडाव्यात असा तगादा लावणारी शेवंतामाय सासू म्हणून अलकाला कधीच भावली नाही. या दोघींमध्ये सतत शाब्दिक वाद झाले. अलका व तिचा दीर मधू यांच्यातही वादविवाद झाले. एकदातर मधूने तिच्या तोंडात मारली त्यानंतर अलका माहेरी गेली ती परत नांदायला आलीच नाही. लहानपणी राम लक्ष्मणा सारखे राहिलेले एकनाथ आणि मधू हे एकमेकांचे हाडवैरी झाले.(पृ.१६१) दोघा भावांमधील तसेच सासू सुनांमधील संघर्ष या कादंबरीमध्ये विकोपाला जाताना दिसतो.

''बारोमास कादंबरी म्हणजे शेतकरी कुटुंबाचा संघर्ष. एकनाथ व अलका यांच्यात आर्थिक परिस्थिती व ग्रामीण संस्कृतीवरुन चालणारा वाद, मधू व अलका यांच्यातील वाद पारंपरिक व आधुनिक विचारांमुळे झालेला वाद, सुभानरावांचा शेतीविषयी विचार त्यामुळे निर्माण झालेले ताण-तणाव, कर्जातून सूटका न झाल्यामुळे रावसाहेबांचा मृत्यू, एकनाथ व मधू या भावाभावांमधील वाद अशा अनेक वादातील संघर्ष म्हणजे 'बारोमास' साहित्य कृती होय.''[६०]

एकनाथचा स्वतःचाच स्वतःशी चाललेला संघर्ष आहे. असेच समाजव्यवस्थेशी त्याचा संघर्ष आहे. 'एम.ए. फर्स्टक्लास खंड्या सोबत राबतो. दुसरा बँड वाजवतो, अन त्याच पात्रतेवर बाकीचे महावीर पंधरा-वीस हजार रुपये पगार घेतात आरे थू. अशा समाजव्यवस्थेवर!'(पृ.२५७) सर्वच शेतकऱ्यांचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष लेखकाने एकनाथसारख्या उच्चशिक्षित शेतकऱ्याला मध्यवर्ती ठेवून मांडला आहे. आर्थिक संघर्षालाही शेतकऱ्याला सामोरे जावे लागते. सव्वीस एकर शेतीचा मालक असूनही घरात तेलामीठाची सतत कमतरता असते. कुणी पाहुणा जर घरी आला तर त्याला चहा करायचा तर लगेच साखर, चहापावडर रुपया-दोन रुपयाची आणावी लागते. शेतकऱ्याच्या डोक्यावर नेहमीच कर्जांचा डोंगर असतो. गरीब परिस्थितीमुळे आर्थिक संघर्षाला सामोरे जावे लागते.

अलका मूलं होऊ देत नाही याचे कारण सांगताना ती म्हणते. ''काय करायचं पैदा करून? इथं आपली तरी सोय आहे का त्या दरिद्री घरात? नरकवास आहे नुस्ता. नुस्ती रडारड. पाहुणे आले तर छटाक साखर आणायला पळता. घरात भाजीला तेल नसते अन् चालले मोठे पोरं पैदा

करायला.''(पृ.२२) अलकाचा आपल्या स्वतःशी, कुटुंबाशी संघर्ष चाललेला दिसतो. ती मानसिक संघर्षाला सतत सामोरी जात होती.

**१.२.८.१३. भूमी :**

भूमी या कादंबरीमधील स्त्री व्यक्तिरेखांचा संघर्ष लेखकाने रेखाटला आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यांचा स्वतःचाच स्वतःशी होणारा संघर्ष याचे उदाहरण म्हणजे मैथिली. घर सांभाळणारी म्हणून जिच्याकडे सासरच्या मंडळींनी पाहिले ती मैथिलीची मैत्रिण कीर्ती आपल्या मुलीसोबत स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेते म्हणजेच तिला तिचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागला. गोपाळरावांसारख्या आधी एक लग्न होऊन पहिल्या पत्नीच्या मुलासह गोपाळरावांना पती म्हणून स्वीकारणारी मैथिलीच्या आत्या जेव्हा दोघांमध्ये वयात खूप अंतर असल्याचा उल्लेख करते त्यावेळी तिने मांडलेले मत, 'मुलगी लहान असली की सेवेला बरी हे ह्यातून एकंदर स्त्री जाती विषयीचा आंतरिक संघर्ष त्यातून व्यक्त होता ललीसारख्या शारीरिक मानसिक व्यंग असलेल्या मुलीचा जगण्यासाठीचा किंवा तिच्या कुटुंबियांचा तिला बरे करण्याचा संघर्ष लेखिकेने मांडला आहे.

**१.२.८.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

प्रस्तुत कादंबरीत कौटुंबिक संघर्ष जागोजागी पहावयास मिळतो. हर्षद व त्याचे आईवडील यांच्यातील संघर्ष विलास व हर्षद यांच्यातील संघर्ष, वृद्ध म्हातारा याचा मानसिक संघर्ष आत्याबहीणीचा स्वतःशी चाललेला संघर्ष, सुमाधुरीचा लग्नानंतरचा नवीन घरातील लोकांशी जुळवून घेण्याचा आणि आपल्या विचारांना स्वातंत्र्य मिळते का? याविषयीचा मानसिक संघर्ष आपणास पहावयास मिळतो.

**१.२.८.१५. खारीच्या वाटा :**

दिनू व त्याचा मित्र यांचे गाव धरणामुळे उठणार होते.त्याच्या गावनदीवर धरण होणार होते. सरकारी खलीत्यांना भिऊन साऱ्या गावकऱ्यांनी स्वतःची भूमी कोणताही विरोध न करता सोडली. त्यांनी गाव सोडताना विरोध दर्शविला नसला तरी त्यांच्या मनात आंतरिक संघर्ष हा चालूच होताच. लेखक व दिनू यांच्या मनामध्ये गाव सोडून जाताना निर्माण झालेला विचार हा मानसिक संघर्षाचाच एक भाग होता. याशिवाय लुकी मात्र गाव सोडून जाण्यास तयार नसते. तिच्या मनामध्ये वैचारिक संघर्षाची जणू घालमेल चालू होती, असे वाटते.

### १.२.८.१६. फेसाटी :

'फेसाटी' ही सरळधोपट संघर्षाची कथा आहे. 'फेसाटी' कादंबरी एकूण जीवन संघर्षाची कहाणी आहे. कादंबरीच्या पानापानावर संघर्ष भरुन राहिलेला दिसतो. डॉ. सतीश आळेकर लेखकाच्या सत्काराप्रसंगी मनोगत व्यक्त करताना म्हणतात, ''छोट्या छोट्या गोष्टीसाठीही नाथाला संघर्ष करावा लागतो आहे. पण ही छोटी गोष्ट ही त्याच्यासाठी फार मोठी संघर्षाची गोष्ट आहे. नायकाची उर्मी जगण्याची आहे. तो ढकलत ढकलत शाळेत जातो, जगतो. तरीही नायकाचा आरडा-ओरडा नाही. भारत स्वातंत्र्य होऊन सत्तर वर्ष झाली तरीही जीवन जगण्याचे हे विदारक दृश्य आहे. शासनाच्या कोणत्या गोष्टी तळागाळा पर्यंत पोहोचल्या आहेत का? हा प्रश्न पडतो. त्याचे उत्तर असे वाटते की, गोष्टी सशक्तपणे पोहचल्या नाहीत तर त्या अशक्तपणे पोहोचल्या आहेत. म्हणून हा जगण्याचा संघर्ष आहे.'' नवनाथसारख्या अनेकांच्या घरातील संघर्ष येथे आलेला दिसतो.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यातून विविध प्रकारच्या जीवन संघर्षाचा प्रत्यय येतो. आर्थिक संघर्ष, सामाजिक संघर्ष, राजकिय संघर्ष, सत्ता संघर्ष, शैक्षणिक संघर्ष, भुकेसाठी चाललेला संघर्ष, दलित जातीतील लोकांचा संघर्ष, मानसिक संघर्ष इत्यादी प्रकारचे संघर्ष चित्रीत झाले आहेत. माणूस कोणत्याही स्तरातील वा परिस्थितीतील असला तरी त्याला जीवनात अनेक संघर्षांना सामोरे जावेच लागते हे प्रस्तुत कादंबऱ्यांच्या संघर्षातून चित्रीत होते.

## १.२.९. भूक

### १.२.९.१. ययाति :

ययातिने एका पाखराची शिकार केली, पाखराचे मांस ययातिच्या आईने शिजविले. ययातिच्या आई तिचा मुलगा यति, घर सोडून निघून गेला होता. म्हणून सतत तळमळत होती. तीच आई पाखरातल्या एका आईच्या मृत्यूचा आनंद उपभोगत होती. मुक्या मातेचे मांस मिटक्या मारीत खात होती. ययाति व यति यांची भेट झाली तेंव्हा यतिने त्याची फळे खाण्यासाठी त्याच्यापुढे ठेवली. ययातिने त्यातील एका फळाचा एक तुकडा खाण्यास घेतला. ययातिची जीभ कडू झाली. फळाचा कडूपणा ययातिच्या चेहऱ्यावर प्रतिबिंबित झाला. तेंव्हा यतिने जे भूकेच्या संदर्भात विचार व्यक्त केले ते असे, ''माणसाच्या जिभेला गोड फळं आवडतात. ती आपण तिला देत राहिलो, म्हणजे गोड फळांविषयी आपल्या मनात आसक्ती निर्माण होते. आसक्तीनं मनुष्य शरीर पूजक

होतो. देहाची पूजा करणाऱ्याचा आत्मा बधिर होत जातो. फक्त विरक्तीनंच माणसाचा आत्मा जागृत राहतो. त्या विरक्तीसाठी मी ही कडू फळं मिटक्या मारीत खात असतो.''(पृ.४३, ४४) ययाति आणि यति या दोघांमध्ये असलेला वैचारिक भेद येथे लेखकाने मांडला आहे. यतिने इंद्रीयांवर विजय मिळविलेला असल्याने भूक भागविण्यासाठी तो कडू फळे देखील खातो. परंतु ययातिला मात्र त्या फळाचा तुकडा खाणे कठीण जाते. थोडक्यात पोटाची भूक व शरीराची भूक यांच्यातील साम्यभेद लेखक मांडतो.

**१.२.९.२. रथचक्र :**

धाकट्या मुलाच्या शिक्षणासाठी ती तालुक्याच्या गावी राहात होती. तेथे घरखर्च भागविणे तिला कठीण झाले होते. साधा भात शिजवण्यासाठीही घरात पुरेसे तांदूळ नव्हते. त्यामुळे तिने आठिळा शिजत ठेवल्या. तालुक्याच्या गावी आणल्यामुळे आपण मुलांचे खाण्यापिण्याचे हाल करत आहोत याची तिला खंत वाटत होती. तिची छोटी मुलगी आठिळा नकोत असे म्हणून रागाने झोपली होती. धाकटा मुलगा कृष्णाबाईने दिलेल्या पोळ्या, बटाट्याची भाजी घेऊन आला. पोळ्या म्हणताच छोटी मुलगी उठली. मोठी मुलगी धावत आली त्यांनी डबा उघडला. डबा कोठून आणला, कोणी दिला याची चौकशी न करता सगळे जण भरपूर जेवले. सगळे तृप्त होऊन झोपी गेले.

**१.२.९.३. स्वामी :**

माधवरावांचे काका रघुनाथराव यांना सत्तेची भूक लागली होती. सत्तेच्या हव्यासापोटी त्यांनी नैतिकता जोपासली नव्हती. माधवरावाच्या मार्गात सतत काटे पेरण्याचे काम त्यांनी केले होते. सात्त्विक रमाबाई मात्र पतीच्या आजारपणात त्यांनी त्यांना बरे वाटावे म्हणून सतत उपासतापास करतात. उपासतापासांनी त्या कृष झाल्या होत्या. यामधून भूकेचे एक वेगळे वास्तव आपल्यासमोर साकार होते.

**१.२.९.४. स्मरणगाथा :**

वयाच्या तेराव्या वर्षी लेखकाने घर सोडले. तेव्हापासून त्याला निरनिराळ्या समस्यांना तोंड द्यावे लागले. एका पारशी टॅक्सीवाल्या ड्रायव्हरने गाडी धुण्याच्या बदल्यात जेवायला देण्याचे ठरले. ड्रायव्हर म्हणाला, ''हर रोजाना रातको-समझ्या क्या? हमारी गाडी धोना. हम तुमकू खाना देगा''(पृ.१२२) पुण्यात असताना एका मोटार ड्रायव्हरच्या घरी त्याच्या कुत्र्याला रोज

मंडईसमोरच्या कसाईखान्यातून बकऱ्याची आतडी आणावी त्या बदल्यात जेवण व आसरा मिळाला.(पृ.१३३) पोटाची भूक भागविण्यासाठी लेखकाने मिळेल ते काम केले होते. हे वरील उदाहरणांवरून दिसते.

लेखकाने नाशिक शहराचे वर्णन करताना म्हटले आहे. इतर शहरांपेक्षा नाशिक हे शहर उदार आहे. भरपूर अन्नछत्रे आहेत. धर्मशाळांमधून बरेच काही वाटले जाते. लेखकाच्या स्वाभीमानी स्वभावाला सर्व अवयव ठिक असताना लोकांच्या दातृत्वावर जगणे नको होते. पण लेखकाची सर्व चौकशी केल्यानंतर त्याला काम द्यायला कुणीही तयार नव्हते. त्यामुळेच त्याचे दातृत्वावर न जगण्याचे तत्व निभले नाही. 'पोटाची आग विलक्षण हे तर खरेच'(पृ.१४३) शेवटी लेखकाने अन्नछत्रांचा आधार घेतला.

कधी कधी भीकही मागितली. दिवसा लाज वाटत होती. म्हणून रात्री करूण आवाज काढीत भिकेसाठी लेखक हिंडत होता.(पृ.१४३). पोटाच्या भूकेची आग शमविण्यासाठी लेखक अन्नछत्राचा लाभ घेतो. तसेच रात्रीच्या वेळी करूण आवाज काढून भिक मागतो. अशा प्रकारे या भटकंतीमध्ये कित्येकदा लेखकावर अन्नासाठी वाईट वेळ आलेली दिसते.

**१.२.९.५. सत्तांतर :**

सगळी टोळी वडाच्या झाडावर चढुन लालचुटूक वडाची फळं खात होती.(पृ.२३) बाकीची सगळी टोळी वडफळं खाण्यात गर्क होती.(पृ.२३) मुडाच्या टोळीच्या प्रदेशातील फळझाडं त्यांची होती. इथल्या झाडांची लुसलुशीत कोवळी पालवी, कळया, फुलं, फळं, भेंड, रस, डिंक-सगळं त्याचं होतं...(पृ.५)

वरील निवेदनातून असे सूचित होते की, कोवळी पानं, कळया, फळ, भेंड, रस, डिंक इत्यादीचे भूक लागल्यानंतर वानरे आपापला आहार घेतांना दिसतात. 'लालबुडया'सारखे वानरं भूक लागल्यावर निवडक गोष्टींचाच आहार घेतात. उदा.पक्षांची अंडी, मधमाशांच्या पोळया अशा प्रकारे भूकेसाठी वनवन भटकतांना हया टोळया दिसतात. ''आईचे स्तन तोंडात मिळताच पोराला विलक्षण सूख होई. आईलाही होई. आईच्या अंगाची ऊब, मिळाली, उष्ण दूध मिळालं की, आणखीन काही मिळायचं बाकी राहतच नसे.''(पृ.३५) लालबुडया लहान असताना त्याची भूक वरीलप्रमाणे भागत असे. तशाच प्रकारे इतर वानर पिलांची स्थिती होती. बाज पक्षी मात्र आपली भूक भागविण्यासाठी वानरांच्या या लहान पोरांना उचलून घेऊन जातो. आणि उंच सागराच्या पार वरच्या भागावर जाऊन खाऊन बसतो.

**१.२.९.६. झोंबी :**

आनंदाच्या कुटूंबाचा शेती हा प्रमुख व्यवसाय होता. आनंदाचे आई-वडील म्हणजेच तारा आणि रतनू यांच्या कुटुंबाचा वेल, विस्तार वाढतच जात होता. लग्नानंतर एका पाठोपाठ एक अशी मुले झाली. एक बोटाला, एक रांगणारे आणि एक पोटात अशी ताराची मुले वाढत होती. शेती सोडून इतर कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते. जन्मदात्रीला म्हणजे ताराला सकस आहार मिळत नव्हता परिणामी अंगावर पिणाऱ्या मुलांनाही आईचे दूध अपूरे पडत होते.

'दोन दोन वर्षांनी पोरग होत होते. एकालाही कुणाला चांगले खायला, प्यायला मिळत नव्हते. आईच्या अंगावर दूध येत नव्हते. स्वतः आईही खंगत चाललेली. हाडाच्या सापळ्यागत दिसू लागलेली. पोरं शरीरानं नि संख्येन वाढतील तशी सगळ्याचे हाल होऊ लागलेले' त्यातच दुष्काळ पडला. रेशनचे सातू, मिलो, जोंधळा, पिवळा, किडकी डुकरी मका, सजगुऱ्याची चव असलेला तांदूळ. हा तांदूळ दळून-भरडून, कण्या, भाकरी करुन; उकडून आमटी बरोबर नाही तर ताकाच्या पाण्याबरोबर खावा लागायचा. हातात रेशनचा पैसा पाहिजे म्हणून म्हशीचे दूध रतिबाला घातले जात होते. शेळीचे व गाईचे दूध घरात ठेवले जात होते. सातूची चपाती चमड्यासारखी वातड होई. पिवळ्या मक्याच्या भाकरीचा कुबट वास येत होता. कितीही भूक लागली तरी जेवणाची इच्छा होत नव्हती. रेशनचे कुबट अन्न खाल्ल्याने सगळ्यांना हगवणी लागल्या होत्या. हिरा आणि शिवा यांना माती खाण्याची सवय लागलेली होती. हिरा आणि शिवा नाळरोगी बनली होती.(पृ.१३५, १३८) ह्या पोरांना घरात माती शिवाय दुसरं काही पोटभर खायला मिळत नव्हतं.(पृ.१४१)

आनंद एकदा कोल्हापूरला पळून गेला. दोन दिवस भटकून काहीही कामधंदा मिळाला नाही. एक दिवस ऊस व हरभरा खाऊन काढला. दुसऱ्या दिवशी रात्री कचराकुंडीतील केळीच्या साली खाल्ल्या. 'सकाळी ऊस, हरभरा नि रात्री केळीच्या साली, असं पोटात ढकलत होता... पोट असल्याची जाणीव सारखी होत होती.'(पृ.३७३) निकृष्ट दर्जाचे अन्न खाऊन हे कुटुंब उदरनिर्वाह करताना आपल्या लक्षात येते. लेखकाने पळून गेल्यावर तर ऊस, हरभरा व कचऱ्यात टाकून दिलेल्या केळीच्या साली खावून भूक भागविली होती. अशा प्रकारे आनंद आणि त्याचे कुटुंब कितीही काबाडकष्ट केले तरी अन्नाला मात्र मोताद होते. साऱ्या कुटुंबाला सकस अन्न मिळत

नव्हते कशी तरी भूक भागविणे ही एकच समस्या त्यांच्या समोर होती. हे वरील सर्व बाबींवरून समजते.

**१.२.९.७. झाडाझडती :**

जांभळीकर किंवा अन्य गावातील धरणग्रस्त यांचे उदरनिर्वाहाचे एकमेव साधन म्हण्जे शेती. त्यांची ही माय माऊली धरणी धरणाच्या पाण्यात बुडाली व सुखाने दोन घास खात असलेले धरणग्रस्त अन्नाला मुकले टिचभर पोटासाठी लाभवाल्या गावांमध्ये राहू लागले ज्यांच्यासाठी धरणग्रस्तांना बेघर होण्याची वेळ आली त्या लाभक्षेत्रातील लोकांनी त्यांना सुखाने पोट भरू दिले नाही.

**१.२.९.८. राघववेळ :**

'राघववेळ' कादंबरीत लेखकाने भूकेचे तीन वेगवेगळे स्तर दाखविलेले आहेत. शारीरिक भूक, पोटाची भूक व ज्ञानाची भूक. प्रत्येक टप्प्यावर ती महत्त्वाची असते. पोटाची भूक माणसाला कोणत्याही स्तरावर घेऊन जाते. त्याला काहीही करायला लावते. कादंबरीत विशेष करून भूकेच्या संदर्भात महत्त्वपूर्ण घटना प्रसंग आलेले आहेत. वाचकाचे मन हेलवणारे आणि मार्मिक प्रसंग लेखक समर्थपणे चित्रित करतो. पोटाची भूक भागविण्यासाठी पोळ्याच्या सणाला मोळ बांधणे, ग्रहण सुटल्यावर दान मागणे, सणाला वाजंत्री म्हणून काम करणे, धोंडी धोंडी म्हणून ओल्या अंगाने गावभर फिरणे, मेलेले जनावर फाडणे व ते वाटून घेणे, टोपल्या विणणे, शेतात ज्वारीचे अथवा गव्हाचे खळे झाल्यावर मातीत समप्रमाणात मिसळलेली ज्वारी ज्याला मातेरे म्हणतात ती धुऊन खाणे. पानांचे गठ्ठे गावात वाटणे, लग्नाचा बाजा वाजविणे, शेणातले धान्य धुऊन, वाळवून वापरणे, दुसऱ्याच्या घरी व शेतावर मजूरीने काम करणे इत्यादी कामे करून हा मातंग समाज आपली उपजिविका करतो. कारण त्याच्याकडे दुसरे उपजिविकेचे साधन नव्हते. तो आर्थिकदृष्टया परावलंबी असलेला होता. हे सारे तो पोटाची भूक भागविण्यासाठी करतो. शरीराची भूक भागविण्यासाठी सवर्ण लोक मातंग स्त्रियांच्या पोटाच्या भूकेचा गैरफायदा घेऊन आपली वासना तृप्ती करताना दिसतात. रघूला ज्ञानाची भूक लागलेली होती. ज्ञानाची भूक भागली की पोटाची भूक व शरीराच्या भूकेचा प्रश्न संपणार होता असे मला वाटते.

गोपाळराव देशमुखाकडे पायरू ज्वारी मागण्यासाठी जातो तेव्हा देशमुख म्हणतो, 'असं कर, जरा भरानं दे भाबीले धाडून'(पृ.१०) पायरूच्या मनात शंकेची पाल चुकचुकते पण तो स्वतःला सावरतो. तान्हीला देशमुखाने धरले होते. पण तो वाईट विचार मनातला काढून टाकतो.

लहानी मायचे आणि गोपाळरावचे भांडण झाले होते. त्याचा डुख धरला असेल असे त्याला वाटते. पायरू गोपाळराव विषयीचा विचार झटकून टाकतो. पायरूची बायको हरणी ज्वारी घेऊन येते. पायरू त्यातील थोडीशी ज्वारी वालंबीला देण्याविषयी हरणीला सुचवितो पण ती त्याला नकार देते. अंगमोडेपर्यंत कष्ट करावे लागले. तेव्हा पायलीभर ज्वारी मिळाली होती. पायरू म्हणतो, ''हिंग गेली आन हिंगच तर आली. काय अंग मोडस्तोर कष्टाव लागलं तुले?'' (पृ.११) यावरून असे लक्षात येते की हरणीला पायलीभर ज्वारीसाठी देशमुखाला शरीर द्यावे लागते. भूकेचे याच्यापेक्षा दुसरे वास्तव कोणते आहे? असे मला वाटते.

**१.२.९.९. ताम्रपट :**

धरणग्रस्तांच्या मागण्यांसाठी नाना सिरूर यांनी उपोषण केले. स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या कार्यकर्त्यांच्या घरी त्यांच्या उदरनिर्वाहासाठी नाना पैशाची मदत पाठवित होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निवडणूक प्रचारा दरम्यान गोरगरिब पण व्यसनी लोक दारूच्या नशेत घरी येतात. घरातल्या बायकापोरांना उपाशीच ठेवतात. सुजलाम सुफलाम देशाच्या दुरावस्थेने नाना व्यथीत होतात.

**१.२.९.१०. तणकट :**

कष्टकरी व्यक्तिंचा आहार हा भरपूर असतो. 'रामा महार बसल्या ताटावर सात-आठ भाकरींशिवाय उठायचा नाही.'(पृ.४२) पण आता त्याच्या इतके कष्ट करणारा व खाणारा माणूस महारवाड्यात नाही. आप्पुण्ण्या महाराला गणू पाटलाच्या मुलाने मारले त्याचा निषेध म्हणून गावात कामाला न जाण्याचा निर्णय गौतम कांबळे, दादू महार, भीमा महार यांनी घेतला. तेव्हा पोटाची आग तानू म्हातारीच्या स्वगतातून जाणवते. 'म्हण गावात कामा धंद्याला जायाचं न्हाई, मग खात्यात काय दगडं? बारा बिग्याची उत्पन्न लागल्यागत बोलत्यात मागनं रानोमाळ पळाय लागलं म्हणजे बोंबालतील...''(पृ.८२) यावरून असे समजते की गावातील महार समाजाने गावातील सवर्ण लोकांकडे काम करण्यास गेले नाहीतर त्याला उपासमारीला सामोरे जावे लागणार होते.

**१.२.९.११. बारोमास :**

कादंबरीनायक एकनाथला पत्नीचे प्रेम मिळाले नाही. तिने पतीला कधीही शरीरसुख दिले नाही. अलकाला सांजोळला म्हणजे एकनाथच्या गावी राहायचे नव्हते. गाव सोडून, शेती विकून त्या पैशात शहरात घर बांधून, धंदा करू पण शेती विकायला एकनाथचे कुटुंबीय तयार नव्हते.

तेव्हा अलकाचे व्यवहारी विचार, ''फक्त माझा देह पाहिजे. स्वार्थी, नेभळट, कृतिशुन्य''.(पृ.११०) यातून असे दिसते की, एकनाथला फक्त शारिरीक भूक भागविण्याची इच्छा आहे. बाकी काही नाही असे अलकाला वाटते.  कादंबरी नायक एकनाथला पत्नीचे प्रेम मिळाले नाही. तिने पतीला कधीही शरीरसुख दिले नाही. अलकाला सांजोळला म्हणजे त्याच्या गावी रहायचे नव्हते. गाव सोडून, शेती विकून त्या पैशात शहरात घर बांधू, धंदा करु पण शेती विकायला एकनाथचे कुटुंबिय तयार नव्हते. तेव्हा अलकाचे व्यवहारी विचार ''फक्त माझा देह पाहिजे. स्वार्थी नेभळट कृतिशुन्य...''(पृ.११०) अशा प्रकारच्या शारीरिक भूकेचा प्रसंग येथे नमुद केला आहे.

**१.२.९.१२. भूमी :**

स्त्रियांना कुटुंबामध्ये फक्त कुटुंबाच्या अपेक्षापूर्तीचे माध्यम याच दृष्टीने पाहिले गेले. मैथिलीला जन्मापासूनच एक आत्या सोडली तर कुणाचेच प्रेम तिच्या नशिबी नव्हते. म्हणजेच ती आजन्म प्रेमाला भुकेली राहिली. किर्ती सासरच्या लोकांचे प्रेम मिळवू शकली नाही. घर सांभाळणारी गृहिणी किंवा मोलकरीण या पलीकडे तिला कुटुंबात दर्जा मिळाला नाही. शंतनूला आईचे खरे प्रेम मिळाले नाही.

**१.२.९.१३. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : माधुरीच्या भावाला खूप खाणे लागते. आठवड्यात कमीतकमी दोनदा त्याला मटन लागते.(पृ.४) स्वातंत्र्योत्तर काळात अन्न, वस्त्र, निवारा ह्यांच्या आधुनिकतेवरुन कुणाचेच मतभेद नाहीत.(पृ.५) कुटुंबव्यवस्थेत सैपाकपाणी करणे ह्याला अनन्यसाधारण महत्व आहे. माधुरीची आई पाहुण्या-रावळ्यांचे व घरच्यांचे ते सर्व करीत असे. ती उत्तम सुगरणी होती. माधुरीच्या वडिलांच्या पुण्याच्या (दौंडच्या) मित्राने पुण्याजवळ बाणेरला मोठ्या टेरेसवर जंगी हॉटेल टाकले होते.(पृ.७) आधुनिक काळात मध्यमवर्गीय आणि श्रीमंत कुटुंबे आपल्या जिभेचे चोचले पुरविण्यासाठी व भूक भागविण्यासाठी एन्जॉय म्हणून हॉटेलिंग करताना दिसतात. ह्या बदलत्या गोष्टींचा अचूक वेध लेखक घेतो. माधुरीची आई बापुरावांबरोबर माधुरीसाठी पुण्याला जाताना चकल्या, करंज्या, मसाला पाठवते. तसेच आवर्जुन सांगते. ''घरचं ते घरचं. खायची आबाळ करु नकोस.''(पृ.८) ''तब्येत, जेवणखाण सांभाळतेयस ना? बाहेरचं सारखं खाऊ नकोस.''(पृ.९) माधुरी पुण्याला आल्यानंतर अभ्यासाच्या नोंदी (फिल्मविषयीच्या) करताना स्फुर्ती येण्यासाठी चहा पितांना दिसते. लेखक त्याविषयी लिहितो, ''चहा प्यावा. माधुरी

लगबगीने बाहेर पडली. कृष्णा हॉटेलात गेली.''(पृ.१५) माधुरीला ज्ञानाची ही भूक लागलेली दिसून येते. ज्ञानाची भूक भागवितांना अगोदर पोटाची भूक भागविण्याचा व त्यामुळे स्फुर्ती निर्मितीचा आनंद ती घेते.

लग्नाच्या अगोदर सुबोध व माधुरी पिक्चर पहायला जातात. नंतर ते दोघे जेवायला हॉटेलात गेले होते. सुबोधला मुंबई, दिल्ली, बंगलोर, हैद्राबादमधील उत्तम हॉटेल्स माहिती होती. तसेच सुबोधने आजीच्या हातच्या पुरणपोळीचे सांगितले होते. माधुरीने आईच्या हातच्या मटणाचे सांगितले होते. सुबोध व माधुरीच्या लग्नात वऱ्हाडी मंडळींच्या जेवणाची दोन्हीही मध्यमवर्गीय व श्रीमंत कुटुंबांना शोभेल अशी व्यवस्था केलेली होती. त्याचे वर्णन लेखक करतो. ''प्रत्येक स्टॉलच्यामध्ये खाद्यपदार्थांचे स्टॉल होते. बंगाली मिठाई, पुरणपोळी, बासुंदीपुरी, चाट... सगळ्या प्रांतातले खाद्यपदार्थ, चायनीज, कॉन्टीनेंन्टल, इटालियन, थायी... वेगवेगळी सूपं... कॉफिचे बत्तीस प्रकार, आईस्क्रीमचे सत्तावीस प्रकार...''(पृ.२५) अशा प्रकारची श्रीमंतांच्या पाहुण्यांची लग्नाच्या जेवणाची-भूकेची व्यवस्था होती. सुबोधची आई नाश्त्याला बदामाची अर्धा कप खीर घेते बहुधा...(पृ.३०) भूकेच्या ऐश्वर्याचे एक वेगळे रुप येथे आपणास दिसते. ''सुमाधुरी न् सुबोध उत्तेजित झाले. दोघांचा उत्तेजित शरीरसंबंध झाला. दोघेही अंथरुणात नग्न होते. दोघे एकमेकांच्या शरीराशी खेळत होते.''(पृ.२९) अशाप्रकारे लेखकाने शारीरिक भूकेचे चित्रणही केले आहे.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरु : या भागात हर्षदच्या पुढील कृतीतून त्याची पोटाची भूक स्पष्ट होते. ''पोळीची नुसती सुरळी तोंडात कोंबली. चारदा पाचदा चावून गिळली. चहा प्याला.''(पृ.६३) हर्षद दुपारी बाराला घरी येतो. जेवण तयार आहे. हर्षद पातेली, कुकर, डबे पाहतो. भाजी गरम करतो. भातावरणाचा कुकर शिट्टी काढून गॅसवर ठेवतो. तो कॉलेजला जायला लागल्यापासनं त्याच्या आईने त्याला हे शिकवले होते. त्याने रागावून एकदा आईला सांगितले होते, ''भात, वरण, भाजी, कोशिंबीर, चटणी, काहीतरी गोड, सगळं करुन ठेवत जा न् भरपूर करत जा. मी तीन पोळ्या खातो, म्हणून अगदी तीनच पोळ्या ठेवायच्या असं नाही पाहिजे.'' हर्षद भरपूर जेवतो. दोन दिवस अन्नावर राग काढला की तिसऱ्या दिवशी त्याला भूक अनावर होते.(पृ.६८) अशाप्रकारे हर्षदच्या भूकेचे वर्णन लेखक करतो. हर्षद किचनमध्ये गेला. डब्बे पाहयले. एका डब्यात मोतीचूर लाडू. दोन खाल्ले. पाणी प्याला.(पृ.८१) हर्षदनं आपली भूक भागविली. वनिताने व तिच्या मैत्रिनीने फॉर्मची फी भरली आणि दोघी एकदम मोकळ्या झाल्या. मैत्रिण म्हणाली, ''चल, भूक लागलीय. कॅंटीनमध्ये जाऊन इडली खाऊया.'' ''कॅंटीनमध्ये नको.

फार गडबड असते. दुसऱ्या हॉटेलात जाऊ. दोघी जवळच्या दुसऱ्या हॉटेलात गेल्या. इथे खरी उडपी इडली मिळते.''(पृ.८४) अशाप्रकारे वनिता व तिच्या मैत्रिणीने आपली भूक भागविली.

घरचे जेवणच जेवावे वाटून हर्षद घरी येतो. घाईने, भूकेने बंगल्याचे दार उघडतो. बुट काढून व्हरांड्यात फेकतो. तडक किचनमध्ये जातो. त्याने ''पोळ्यांचा डब्बा उघडून पाह्यला होता. पोळ्या होत्या. भाजीचा डब्बा उघडून पाह्यला होता. भाजीही होती. कुकर उघडला होता. वरण होते, भात होता. ताबडतोब हर्षदने एक डिश धुऊन घेतली. पोळीभाजी वाढून घेतली. जेवला. वरणभात घेतले. जेवला. भरपूर जेवला.''(पृ.८८) ''डब्बे पाह्यले, ब्रेडची स्लाईस घेतली. लोणी लावले, थांबला. उरलेला चहा गरम केला. कपात घेतला. ब्रेड चहा खाल्ला.''(पृ.९३) भूक भागविली. हर्षदने बिअरची, बिर्याणीची ऑर्डर दिली. सिग्रेटचे पाकीट मागवले. तासभर श्रीमंती एन्जॉय केली.(पृ.१०५)

विलासची आजी-वडलांची आई ह्यात होती, तेंव्हा सगळे कुटुंब एक होते. सैंपाक एकत्र होता. तेंव्हा सगळ्या नातवंडांनी रात्री जेवायच्या आधी हातपाय तोंड धुवून आजीच्या पाया पडायचे, असे वळण होते.(पृ.६८) कितीही भूक लागली तरी हे करावेच लागे. ''मग हर्षदच्या मनात जुळले? इट म्हणजे सेक्स. प्रौढ वयात सेक्स आवर्जुन करा. नाहीतर सेक्सची इच्छा हरवून बसाल आणि मग प्रौढ वयात स्त्री-पुरुषांत दुरावा येतो. असे झाले असेल मम्मी-पप्पात?''(पृ.७९) हर्षदच्या मनात वर्तमानपत्रातील 'प्रौढ वय: पुन्हा वळण' ह्या लेखातील हे विचार शारीरिक भूकेशी जुळणारे वाटतात.

वृद्ध एकट्या विधूर मामेभावासाठी वृद्ध एकटी विधवा आत्तेबहिण जेवायची तयारी करते. ''बरोबर दोघांना पुरेल एवढा भात, आमटी, पोळ्या, भाजी... मी आहेच जेवायला म्हणून गोड काहीतरी म्हणून तांदळाची खीर...''(पृ.१५९) वृद्ध वयातही शरीरासाठी भूकेची गरज असते. चौदा जानेवारीला संक्रांत, मुलीकडे गुळाच्या पोळ्या खाल्ल्या.(पृ.१६९) शरीरसंबंध ह्या प्रमेयातून कुटुंबव्यवस्था निर्माण झालीय.(पृ.१७२) म्हणून माणसाच्या जीवनात शारीरिक भूक महत्वाची आहे.

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : वृद्ध विधूर घरी आल्यावर टिव्हीवरच्या बातम्या ऐकतो. अन्न गरम करतो, वाढून घेतो, जेवण करतो.(पृ.१७४) येथे टी.व्ही. पाहून माहिती ज्ञानाची भूक व अन्न खाऊन पोटाची भूक भागविलेली दिसते. ''चिमटा ठेवल्याचा आवाज आला. भाकरी थापल्याचा आवाज आला. पुढच्या आवाजाची वाट पाहत राह्यलो... भाकरी भाजल्याचा वास आला. कुटुंब

व्यवस्थेतील आवाज, वास... हवेसे वाटले... बेडरुममधनं बाहेर आलो, किचनमध्ये आलो... पांढरे शुभ्र फेसाळ ताक ग्लासभर, हिरवी पालकाची पातळ भाजी... कुटुंब व्यवस्थेत किती रंग असतात! हॉलमध्ये जाऊन वर्तमानपत्र घेऊन बसलो, थोडे चाळले... टि.व्ही. लावला... थोडा पाह्यला...''(पृ.१०७) अशाप्रकारे कुटुंबव्यवस्थेतील प्रत्येकालाच पोटाची व ज्ञानाची भूक ही त्या त्या पातळीवर लागलेली असतेच.

**१.२.९.१४. खारीच्या वाटा :**

कादंबरी ची नायिका लुकी लेखकाने घरात आणली म्हणून तिला भात खाऊ घातला सर्व प्राणिमात्रांना मात्र स्वतःच्या अन्नाचा शोध स्वतःच घ्यावा लागतो, ती कला प्राण्यांच्या अंगी उपजतच असते आणि म्हणूनच लुकीला पिकलेल्या पाढाचा सुगावा सर्वात प्रथम लागतो.

**१.२.९.१५. फेसाटी :**

एकत्र कुटुंबातील सुनेला जेवायला मिळत नसे. लेखकाची आई दोन पोरींना पाटीत घालून मोलमजुरी करत होती. लहानसा जीव व्याकूळ होऊन रडत होता. पोटात अन्नाचा कण नसल्यामुळे काकूला दूध फुटत नव्हते. 'रानातली पातरीची भाजी न चिगळ काकू गपा गपा खायाची. दोन तांबी पाणी पेईची'(पृ.१४) बऱ्याचदा या कुटुंबियांना उपासमारीची वेळ आली. घरात जास्त पीठ नव्हतं त्यामुळं नाथाला व इंदाताईलाच भाकऱ्या करुन दिल्या होत्या. शाळेतून आल्यावर नाथा भाकरी खाईल म्हणून, टोपल्यात भाकरी ठेवून सगळे उपाशीपोटी कामाला गेले. पण घराला दरवाजा नसल्यामुळे कुत्र्याने त्या भाकरी पळवल्या. काकू म्हणायची, ''गरिबी आपल्या पाचवीलाच पुजलेली हाय.''(पृ.३०) नंदाक्काने काकूला घागरीत ठेवलेल्या मक्काची आठवण करुन दिली. त्याच्या कण्या नंदाक्काने दळल्या, इंदाताईनं सकाळी दिलेली भाकर खाल्ली नव्हती. नाथाला भूक लागेल म्हणून ती तशीच ठेवली होती. वास्तविक इंदाताईलाही भूक होती पण तिने स्वतःची भूक मारुन नाथाला भाकरी दिली. अशी ही भूकही माणसाला बरेच काहीतरी शिकून जाते.

अन्नासाठी होणारी तगमग पाहून मन विषण्ण होते. कोणताही सण असला तरी गोडधोड कधीच करता आले नाही. लेखक सांगतो, ''बारा महिन्यातला कुठलाच सण आमच्या घरला मिळाला नाय. भूक-भूक आणि फक्त भूक हुती.''(पृ.३५) दोन दिवसाच्या उपासानंतर जी भाकरी मिळाली ती भाकरी सोन्यापेक्षा चांगली लागत होती. कारण आंद्यामामाकडून शेरभर पीठ आणले. गळक्या घरामुळे चुलभर पाणी काडीपेटीही ओली होती. काकूने मामाकडून तव्यात विस्तव आणला. इंदाताईने लेखकाची पाटी चुलीवर धरली. काकूने त्या विस्तवावर ओली लाकडे चुलीत

सारली. तवा तापायला तासभर लागला आणि अशा या महाप्रयत्नाने काकूने सात-आठ भाकरी केल्या. लेखक म्हणतो, ''पोटाची आग शांत व्हत हुती. पण काकूच्या डोळ्याचं पाणी पिठात मिसळत हुतं. असाच आमच्या घरचा वनवास चालू हुता.''(पृ.१३०) अशा प्रकारचे भुकेचे करूण वास्तव लेखक चित्रीत करतो.

**१.२.१०. गावगाड्याचे चित्रण :**

शेतीशी संबंधित व्यवस्था सर्वत्रच अस्तित्वात असल्याचे दिसून येते. जगण्याचा आधार शेतीच. गावगाडा शेतीने जगवलेला पांढरीवर बसलेले गाव काळी जगवते. शेतीत राबणारा शेतकरी मध्यवर्ती असतो. त्यांच्या भोवती पाटील, कुलकर्णीसह बारा बलुतेदार रिंगण घालताना दिसतात. परस्परावलंबी जीवन हेच गावगाड्याचे मुख्य सुत्र आहे. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या मते ''ग्रामीणतेची संकल्पना समजून घेण्यासाठी गावगाडा समजून घेणे आवश्यक आहे.''(पृ.१२२)

ग्रामीण व दलित जीवन या परस्परावलंबी आहे. त्या एकाच हमरस्त्याच्या त्या पाऊल वाटा आहेत. ग्रामीण व्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ शेती आहे व कृषीव्यवस्थेला ग्रामदैवते, रूढी-परंपरा, सण, उत्सव हे विविध घटक अनुरूप असतात. ग्रामीण जीवनातील श्रद्धा, अंधश्रद्धा या देखील तेथील भौगोलिक परिस्थितीनुसार असतात. ग्रामीण जीवन व दलित जीवन चित्रण करताना ते एकाच वीणीत गुंफलेले दोन धागे आहेत असे भासते. ग्रामीण साहित्यात जेव्हा दलित जीवन व्यक्त केले जाते तेव्हा ते अगोदर ग्रामीण साहित्यच असते. ग्रामीण जीवनातून गावगाडा जर काढून टाकला तर खेड्याला, ग्राम संस्कृतीला कोणताही अर्थ उरणार नाही. गावगाड्यातील सर्व लोक ऐकमेकांवर अवलंबून असलेले दिसतात. सर्वजण ऐकमेकांच्या सुखदुःखात सहभागी होतात. म्हणून गावगाडा हा ग्रामीण संस्कृतीचा आत्मा आहे.

**१.२.१०.१. ययाति :**

ययाति ह्या कादंबरीत नहुष महाराजाच्या हस्तिनापूर नगरीचे गावगाडयाच्या पार्श्वभूमीवर वर्णन आलेले आहे. राजवाड्यात ऐश्वर्यात राहणारे नहुष, ययाति व त्याची आई यांच्या जीवनमानाचा उल्लेख कादंबरीत आला आहे. दास-दासी यांच्या सेवेला सदैव तत्पर असल्याचे दिसते. अशोक वाटिकेत नगरात येणाऱ्या पाहुण्यांची व्यवस्थ केलेली होती. राजपूत्रांना श्रेष्ठ वीर हेच राजाराणीचे स्वप्न होते. युद्धकौशल्यात निपुण होण्यासाठी ययातिला आश्रमात ठेवले होते. नगरदेवतेचा उत्सव दरवर्षी राज्यात मोठ्या आनंदात संपन्न होतांना दिसतो. त्या उत्सवात नगरी व आजूबाजूच्या परिसरातील लोक हस्तिनापुरात येऊन आनंद लूटत असत.

**१.२.१०.२. रथचक्र:**

पूर्वीपासून एका जातीचे लोक जवळ जवळ राहत. ब्राह्मण आळीतील माणसं स्वच्छ, घर स्वच्छ तिच्या जागेला ना आकार, ना रूप आसपास सगळीकडे मुसलमान वस्ती लेंगे नेसलेल्या मुसलमान बापा पानाचा तोबरा चघळीत उंबरठ्यावर बसलेल्या असतं.(पृ.९४)

**१.२.१०.३. स्वामी :**

कादंबरीच्या कथानकाला पुण्याची पार्श्वभूमी लाभलेली आहे. पेशवे शनिवारवाड्यात वास्तव्यास होते. गणेश दर्शनासाठी थेऊरला पेशवे कुटुंबीयांचे जाणे होई. तसेच माधवराव पेशवे पर्वतीवरही दर्शनास जात. याचा उल्लेख कादंबरीत आला आहे. पेशवे दरबारी निरनिराळी पदे भूषविली जात होती. प्रजेचे रक्षण ही जबाबदारी पेशव्यांची होती. राक्षसभुवनच्या लढाईत माधवराव पेशवे गुंतले असताना निजामाने पुणे लुटले व निजामाला रास्ते मामांनी मदत केली. ही गोष्ट त्यांना पुण्याला आल्यावर समजते तेव्हा ते स्वतः शहर फेरीसाठी गेले. नुकसान झालेल्या गावातील लोकांची नुकसान भरपाई करून दिली. त्यासाठी खजिन्यातून मदत देण्याविषयी त्यांनी हुकूम दिला होता. गद्दार झालेल्या सख्ख्या मामांना त्यांनी शिक्षा सुनावली. अशा प्रकारे माधवरावांनी प्रजेवर येणाऱ्या संकटांच्या निवारणाची जबाबदारी गावातील लोकांच्या झालेल्या नुकसानीची जबाबदारी स्वतः स्वीकारली व गावगाड्यातील लोकांना त्यांनी मदत केली. यातून असे दिसते की, माधवरावांचे आपल्या प्रजेवर पुत्रवत प्रेम होते.

**१.२.१०.४ स्मरणगाथा :**

लेखकाची अखंड भ्रमंती अविरतपणे चालू असल्याने कोणा एका विशिष्ट गावाची पार्श्वभूमी कादंबरीला लाभली नाही आणि म्हणूनच वेगवेगळ्या भौगोलिक परिस्थितीचा आढावा लेखकाने कादंबरीत घेतला आहे. नागपूर सारख्या गावात विविध अनेक प्रदेशांमधून लोकांचे आगमन होत असल्याने तेथे मराठा, महार, मुस्लीम, बंगाली, मद्रासी अशा विविध जाती-धर्माचे, प्रदेशाचे लोक राहातात. मुस्लीमांच्या मोहरम सणात डोले प्रथेचा उल्लेख कादंबरीत केला आहे. तसेच मुंबई-पुणे या शहरांचाही उल्लेख कादंबरीत आहे. शहरीभागात नोकरी धंद्यासाठी येणाऱ्या लोकांच्या खानावळीचा उल्लेखही झाला आहे. लेखक अकोल्याला गणपतराव बाबांच्या गावी गेला. तेव्हा गणपतरावबाबा स्टॅम्प वेंडरचा व्यवसाय करीत होते. परिसरातील कोळी, ठाकर, भिल्ल या अनपढ लोकांची सावकाराकडून होणारी फसवणूक बाबांच्या सजगतेमुळे होत नसे. तालुक्याच्या

मामलेदाराकडून होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी बाबांनी तालुक्यात जागृती केली. मामलेदाराला यमसदनास धाडले. तेथील बहुसंख्य समाज शेती व पशुपालनाचा व्यवसाय करीत होते. गाडगेबाबांचे शिष्य बनल्यामुळे एका गावी जास्त काळ राहायचे नाही या बाबांच्या नियमाला अनुसरून गोपाळने गावोगावी भ्रमंती केली. त्या निमित्ताने गावोगावी कीर्तनासाठी फिरताना लोकांचे सहकार्य त्याला लाभले. आपल्या उदरनिर्वाहाची दैनंदिन कामे उरकून लोक सप्ताह पार पाडण्यासाठी तनमनधनाने प्रयत्न करीत होते असे दिसते.

देहू, आळंदी या सारख्या धार्मिक स्थळांमध्ये राहावयास गेल्यानंतर तेथील वारकरी संप्रदायाशी त्यांचा संपर्क आला. ज्ञानेश्वरी वाचन, गाथेतील अभंगाचे गायन या सारख्या दैनंदिन अध्यात्मिक गोष्टीमध्ये सक्रीय सहभाग होता. पंढरपूर च्या वारीचा अनुभवही त्यांनी कादंबरीत रेखाटला आहे. अशा प्रकारे शहरी-ग्रामीण मराठवाडा, विदर्भ, कोकण अशा भिन्न भौगोलिक परिस्थितीत गावगाड्यातील विविध अंगाचा परिचय त्यांनी कादंबरीतून केला आहे.

**१.२.१०.५. झोंबी :**

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या गावाची पार्श्वभूमी लाभलेली 'झोंबी' ही आनंद यादवांची कादंबरी गावगाड्याचे चित्रण करतानाही दिसते. आनंद यादवांची जन्मभूमी असलेले कागल हे गाव. कागल हे खेडेगाव असल्याने कादंबरीला ग्रामीण वातावरणाचा बाज लाभलेला आहे. जातीनुसार व्यवसाय या तत्वाला अनुसरुन ग्रामीण जीवन उल्लेखिलेले आहे. गावातील बहुसंख्य समाज कुणबी आहे. त्यामुळे शेती व्यवसाय प्रमुख आहे. एखाद्या कुणब्याकडे शेती कमी असेल तर तो ब्राह्मणांची शेती फाळ्यांनी घेऊन आपला पारंपरिक व्यवसाय करताना आढळतो. गावात ब्राह्मण गल्ली आहे. बहुसंख्य उच्चशिक्षित वर्ग हा ब्राह्मण वर्ग आहे. घोंगडी विणणारा सणगर समाजही आहे. मांग जमातही बहुसंख्य आहे. गावामध्ये जातीनुसार व्यवसाय केले जात होते. लग्नकार्यात एकमेकांना मदत करणारे एकमेकांना जपणारे लोक आहेत. गावामध्ये प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा असल्याचा उल्लेख आनंदच्या शिक्षणाच्या निमित्ताने आला. इतर कोणत्याही शासकीय संस्थांचा उल्लेख कादंबरीत आला नाही.

**१.२.१०.६. झाडाझडती :**

'झाडाझडती' या कादंबरीची पार्श्वभूमी ही जांभळीगाव की जे धरणग्रस्तांचे व खैरापूर हे लाभक्षेत्राचे यांच्यामधली आहे. प्रामुख्याने या दोन्ही गावातील लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तींचा आलेख गावगाड्याच्या पार्श्वभूमीवर या कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने मांडला आहे. धरण होण्यापूर्वी

जांभळी गाव सुखा-समाधानाने नांदत होते. पण धरणाच्या संकटाने जांभळीकरांचे कंबरडे मोडले होते. शेती करून आपला उदरनिर्वाह करणारा समाज, गोम्या कोळ्यासारखा पाणक्या, गाव जाग ठेवणारा दादू येसकर, तसेच काळूबाईची पूजा करणारा ब्राह्मणाचा दिगुअण्णा ह्या गावातील प्रमुख व्यक्तिरेखा लेखकाने वर्णिल्या आहेत.

जांभळी या गावात वेगवेगळ्या जातीचा समाज होता पण धरणामुळे विस्थापित झालेल्या या गावांना एकाच गावात भूमीसंपादन न झाल्यास त्यांचे खैरापूर व केळापूर अशा दोन गावांमध्ये विभाजन करण्याचे ठरले. पवारांचा बाबू बोलला, ''गुरूजी, धरणाचा शेवटचा थर बांधायचा ऱ्हायलाय अजून. पायजेल तर त्यात गाडा आमाला, पर दुसऱ्या गावात जायला सांगू नका. जगू तर तुमच्याबर आनी मरू तर तुमच्यासंगऽ!''(पृ.१३२) गावगाड्याशी व गावातील माणसांशी जोडलेली नाळ वरील वक्तव्यातून स्पष्ट होते.

म्हणजे गावात ऐक्य होते. नवीन गावात गोम्या कोळ्याची पखाल कायमची रितीच होती. ज्ञानू शिंप्याने कपडे शिवायची मशीन गोणपाटात बांधून ठेवली होती. बंडू न्हावी मात्र नवीन गावात खुर्चीच्या शोधात होता कारण तिथले लोक दाढी-डोकी करायला पाटावर बसायला तयार नव्हते. शिवा चांभाराच मात्र इतरांपेक्षा बरं होतं. 'शिवा चांभार पोट भरून खात होताच, पण शिळंपाकं उरलं सुरल बंडूच्या खोपटात पाठवीत होता.'(पृ.२३३) म्हणजे कठीण परिस्थितीतही धरणग्रस्त एकमेकांना सहकार्य करीत होते. गावगाडा हा एकमेकांच्या आधाराने चालत असतो. गावातील सर्व जाती-धर्माचे लोक एकमेकांवर अवलंबून असतात. खैरमोडे गुरूजी हरिजन होते पण जांभळीकरांनी त्यांना आपला नेता मानले होते. पुर्ण कादंबरीमध्ये त्यांना गावकऱ्यांनी दलितांची वेगळी वागणूक दिल्याचे उदाहरण नाही. उलट खैरापुरात वेगवेगळ्या जातीचे लोक एकत्र राहात होते त्यांच्यात जी जात असेल तर ती फक्त धरणग्रस्तांचीच होती.

अशा प्रकारे सर्व धरणग्रस्त गावपंढरीत एकोप्याने राहत होते. पण पुनर्वसन झालेल्या गावातील गावगाड्यात मात्र त्यांना दुय्यम वागणुकीला सामोरे जावे लागले होते.

**१.२.१०.७. राघववेळ :**

'राघववेळ' मध्ये नामदेव कांबळे यांनी रघूच्या जीवनचरित्राबरोबर मातंग जातीचा गावगाड्यातील इतिहासच मांडलेला आहे. गावपंढरीतल्या मातंग समाजाची परवड ह्या कादंबरीत मांडण्यात लेखक यशस्वी झालेला आहे. गावगाड्यातील मातंग या अस्पृश्य जातीचे दुःख, अन्याय, जुलूम, अत्याचार यांचे वर्णन येते. तसेच मातंग समाजाच्या स्थितीशील, परंपरागत असे

चित्रण संयमाने लेखक करतो. या कादंबरीत गावगाड्यातील ग्रामीणतेचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडते. गावगाड्यातील एक प्रथा होती. दलित समाजाने कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी जेवणाच्या प्रसंगी सर्वांच्या शेवटी जेवण करायचे. या कादंबरीत लाखोलीच्या पंगतीचे उदाहरण दिले आहे.

**१.२.१०.८. ताम्रपट :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील विविध गावांमध्ये सुधारणेच्या मार्गाने लोक मार्गस्थ झाले. दादासाहेब भोईटे पाटलांसारख्याच्या प्रयत्नाने साखर कारखाना सुरू झाला. गावातील लोकांचा रोजंदारीचा प्रश्न मिटला. खेड्यांची अर्थव्यवस्था ही शेतीवर अवलंबून होती. गावामध्ये सावकारीची पद्धत होती. गरजेपोटी लोक वस्तू गहाण ठेवून पैसे घेत होते. मोठ्या घरातील मुलींचे मोठ्या थाटामाटात लग्न होत होती. गावोगावी शिक्षणाची गंगा नेण्यासाठी लोक झटत होते. गावामध्ये वेगवेगळ्या जाती धर्माचे लोक गावगाड्यात एकोप्याने राहात होते.

**१.२.१०.९. तणकट :** 'तणकट' ग्रामीण जीवनावर आधारित कादंबरी आहे. त्यामध्ये सवर्ण जातीतील समाज, महार व मांग या समाजाचे चित्रण आढळते. महारवाड्याच्या खालच्या बाजूला मांगवाडा त्याच्या थोड्या वरच्या बाजूला ढोराची तीन-चार घरे, महारवाड्या लगतच्या वरच्या बाजूला वडारांची पन्नास-साठ घरं लागूनच गावाला सुरूवात होते. चार गल्ल्यांच गाव. लागून भली मोठी गावंदर.(पृ.८) अशा प्रकारे साधारणतः गावाची रचना होती.

गावात प्रामुख्याने शेतकरी वर्ग अधिक होता. महारवाड्यातील लोक शेतीवर मजूर म्हणून जात होते. त्याबदल्यात वर्षभरासाठी लागणारे धान्य जमा करून ठेवत होते. थोडक्यात बलुतेदारी पद्धतीचा अवलंब केला जात होता. बडे शेतकरी अडीअडचणीला महारांना मदत करीत होते. गावात मांग जातीला महत्त्वाच्या कामांमध्ये मान होता असे दिसते. गावात कोणाचेही लग्न असेल तर त्यांच्या दाराला मांगांनी तयार केलेले तोरण बांधावे लागत होते. घराची वास्तूशांत असेल किंवा घरात कोणाचा मृत्यू झाला तर मांग पहिल्यांदा हजर असावेच लागतात. खळ्यातील धान्याची रास त्यांच्याशिवाय हालत नाही. बेंदराचा बैल घरातून बाहेर काढण्यासाठीही मांगच पाहिजे. अशा प्रकारे अनेक कामांसाठीचे त्यांचे असलेले महत्त्वाचे स्थान महारांना खपत नव्हते आणि त्यामुळे महार व मांग या जातींमध्ये परस्पर विरोधी तणाव होता.(पृ.४०)

बाळासाहेब शेडबाळे सारख्या व्यक्तीने सवर्ण लोक व महार यांच्यात जातीय तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये सुरुवातीला महारांना सुधारणेचे गाजर दाखविले आणि शेवटी बऱ्यांच महारांच्या नावावर कर्ज काढून पसार झाला त्यावेळी आक्काबा राणे सारख्या व्यक्तीने

महारांना त्या संकटातून वाचवण्याची तयारी दाखवली. त्यावेळी महारांना आपण केलेल्या चुकीची जाणीव झाली.

अशा प्रकारे एकमेकांवर अवलंबून असेलला गावगाडा तणकटमधून प्रत्ययाला येतो. आपल्या मुलाखतीत 'तणकट' कादंबरीतील गावगाड्याविषयी राजन गवस म्हणतात, ''तणकट मधील कबीर गावकुसाबाहेरून गाव पाहतो त्यावेळी गाव कोणत्या चक्रव्यूहात सापडलेला, हे अगदी स्वच्छपणे दिसते. 'तणकट' चा नायक गाव आहे. गावातील जातीय उतरंड, या उतरंडीतील पुन्हा उप उतरंडी, त्यातील ताणतणाव, त्याचे बदललेले आजचे स्वरूप या कादंबरीमध्ये मध्यवर्ती आहेत. गाव समर्गपणे समजूण घेण्याचं काम आपल्याकडे अत्यल्प स्वरूपात झालेलं आहे. काही लोक गाव आतून समजून घेण्याचा प्रयत्न करतात, तर काही लोक गावकुसाबाहेरून गाव समजून घेण्याचा प्रयत्न करतात. आतून बघणाऱ्याला एक गाव दिसतं, तर गावकुसाबाहेरून बघणाऱ्याला दुसरं एक गाव दिसतं. पण गाव आलुते, बलुते, फिरस्ते यांच्यासह पाटील, कुलकर्णी यांच्या सत्तेनं आणि विविध रूढी, परंपरा, प्रथा यांच्या उभ्याआडव्या गुंफणीनं बनलेलं आहे. त्याला सुटे सुटे विभागून पाहता येत नाही. समग्रपणेच गाव पाहावा लागतो तरच गावाला समजून घेणं शक्य होतं.''[६१] खेड्यात शेतीवर गुजरान करणारा समाज आहे. गावातील पाटील, राणे, जगदाळे, मिसाळ, देसाई ह्या सवर्ण मंडळींचा शेती हा पिढीजात व्यवसाय. त्यांच्या शेतात मजूरीने जाणारा महार समाज होता. महारांना वर्षभरासाठी लागणारे धान्य गावातील या बड्या शेतकऱ्यांकडूनच मिळत होते. थोडक्यात या सवर्णांच्या आश्रयाने महारवाडा जगत होता. त्याचप्रमाणे मांगही सवर्णांची विविध कामे करून त्यातून मिळणाऱ्या मोबदल्यात आपला उदरनिर्वाह करीत होता. पण परंपरेने काही महत्त्वाच्या कामात गावकरी मांगांना महत्त्व देत होते ही गोष्ट महारांच्या पचनी पडण्यासारखी नव्हती.

अशा प्रकारे विविध जातीतील लोक परस्परावलंबी जीवन जगत होते. पण बाळासाहेब शेडबाळेसारख्या व्यक्तीने गावात जातीयतेचे बीज पेरले आणि गावाच्या एकीला तडा गेला. सवर्ण-महार, महार-मांग असा संघर्ष गावात सुरू झाला. शेवटी बाळासाहेब शेडबाळेने महारांच्या डोक्यावर त्याच्या खोट्या सह्या, आंगठे घेऊन कर्जाचा डोंगर उभा केला तेव्हा मदतीसाठी आक्काबा राणे सारख्या उदारमताचा व्यक्ती खंबीर पणे महारांच्या पाठीशी उभा राहिला कारण आक्काबा राणे त्यांना आपलेच आहेत असे मानत होता. ग्रामीण भागात गावगाडयाला एक वेगळेच महत्त्वं प्राप्त झालेले दिसते. तो गावगाडा अर्थात त्यांचे जीवन एकमेकांच्या मदतीने पुढे जाते.

**१.२.१०.१०. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरीत 'साईखेड' संस्थान व त्यामध्ये असलेल्या अनेक खेडयांचा उल्लेख गावगाडयाच्या पार्श्वभूमीवर लेखक करतो. खेड्यातून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'श्रीशिवाजी बोर्डिंग' हे वसतिगृह राज्यरोहणाच्या दुसऱ्या वाढदिवशी स्थापन होईल, असा घाट देसायांनी जमवून आणला. राजधानीतल्या धनिकांनी व व्यापाऱ्यांनी बोर्डिंगला द्रव्य, धान्य आणि इतर वस्तू यांच्या रुपाने देणग्या दिल्या. 'संस्थानच्या खर्चात मराठा, कुणबी, माळी, लिंगायत, कोळी, कोष्टी यांच्याबरोबर धनगर, अस्पृश्य आणि लमाणवंजारी जातीच्या मुलांचं शिक्षण तिथ राहून घेण्याची सोय झाली.'(पृ.२७) गावगाड्यातील अठरापगड जातीच्या मुलांना शिक्षण मिळावे ह्या उद्देशाने राजाच्या मार्गदर्शनाखाली वसतीगृहाची सोय केली.

खऱ्या-खोट्या पराक्रमाच्या मोबदल्यात ब्राम्हणांनी जमिनी बळकावल्या. मंत्री आणि सेनापती यांपासून कुलकर्णी, जोशी, देशमुख, देशपांडे, उपाध्ये यांच्यापर्यंत सर्वांनी हात मारला आणि पाय पसरले. कसणारे शतकरी त्यांच्या जमिनीवर वेठमजुरी करु लागले. यांच्यात सरसकट जनता नागवली गेली.(पृ.२९) यामधून गावगाड्यातील शेतकरी व सर्वसामान्य यांच्या दयनीय स्थितीचे दर्शन घडते. गावगाड्यात अठरा पगड जातीचे लोक एकमेकांच्या आधाराने, सहकार्याने जीवन जगताना दिसतात. उच्च वर्गाकडून, धनीकांकडून, स्वार्थी व लबाड लोकांकडून सर्वसामान्य माणूस गावगाड्यात नागवला जातो.

**१.२.१०.११. बारोमास :**

'बारोमास' ही कादंबरी प्रामुख्याने सांजोळ या खेड्यातील वर्णनाची व एकनाथची हृदयद्रावक कहानी आहे. शाळा, तलाठी, ऑफिस, बँक ही सरकारी क्षेत्रे होती. यात काम करणारे कर्मचारी वगळता सर्व शेतकरी वर्गच आहे. शेतीची कामे, शेतकऱ्यांचे प्रश्न त्यांच्या अडीअडचणी कादंबरीत येतात. गावात सुशिक्षित तरुण वर्ग मोठ्या प्रमाणात आहे पण शेतीच्या कामाला हात न लावणारा तो वर्ग होता.

ब्राह्मणाला पावसा विषयी अंदाज विचारल्यावर दक्षिणा म्हणून धान्य दिले गेले यावरून रोकड पैश्याचे व्यवहार कमी होत तर बलुता दिला जात असावा असे जाणवते. अशा प्रकारे गाव पंढरीतील शेतकरी कुटुंब व त्यांच्या समस्या ही पार्श्वभूमी असलेली ही ग्रामीण कादंबरी आहे. गावगाड्यात पावसाला महत्वाचे स्थान असते. कारण पाऊस जर झाला नाही तर गावगाड्याची ऐकमेकांवरील अवलंबून असलेली अर्थव्यवस्था कोलमडते.

**१.२.१०.१२. भूमी :**

मैथिलीचे बालपण समुद्र किनारी असलेल्या कडलूर या गावी गेले. त्यानंतर मुंबईसारख्या शहरात ती वाढली. लग्नानंतर मैथिली मद्रासला गेली व त्यानंतर नोकरी निमित्ताने बेंगलोरला. मैथिली या कादंबरीभोवतीच म्हणजेच तिच्या वैयक्तिक जीवनावर प्रकाश टाकणारी ही कादंबरी असल्याने गावगाडा, समाज यांचे काहीही उल्लेख कादंबरीमध्ये आले नाहीत.

**१.२.१०.१३. खारीच्या वाटा :**

एका निसर्गरम्य खेडयाचे वर्णन लेखकाने केले आहे. पावसाच्या पाण्यावर शेती व्यवसाय करणारी कुटुंबे. शेती व पशुपालन हा प्रमुख व्यवसाय गावात चालत होता. फारशा सोयीसुविधा गावात उपलब्ध नव्हत्या. एक कराडकराचे छोटेसे दुकान होते. गावातल्या काही महत्वाच्या निर्णयाप्रसंगी चावडीमध्ये बैठक होत असे. ग्रामीण जीवनाचा पट कादंबरीच्या माध्यमातून समोर येतो. गावाच्या वेशीजवळ चार-पाच घरांची वस्ती होती. तेल्याची वाडी या वस्तीवर दोन घाणे होते. सगळया गावाचं तेल त्याच घाण्यावर गाळलं जाई. तेली हाही एक बलुतेदार. त्यामुळे पैशांची देवाणघेवाण हा प्रकार नसे. 'लोहार, सुतार, चांभार, न्हावी, तेली ही सगळी बलुत्याची माणसं. कामाच्या बदली त्यांना धान्य घालायची.'(पृ.११६) वरील वर्णनातून ग्रामीण भागातील गावगाडा आपल्या दृष्टीस येतो.

**१.२.१०.१४. फेसाटी :**

सांगली जिल्ह्यातील जत तालुका व जत तालुक्यातील उमदी हे गाव. गावात शेती व पशुपालन हे दोन मुख्य व्यवसाय असलेला समाज दिसतो. गावात एका शेटजीच्या मळ्यात माणसं कामाला जायची. त्याबदल्यात शेटजी धान्य किंवा पैसे द्यायचा. गावात मल्लापाचं 'बाबू किराणा स्टोअर्स' नावाचं किराणा मालाचे दुकान होते. गोरगरिबांना तो उधार द्यायचा. आठवड्याच्या पगारातून पैसे घ्यायचा. गावात हुशार माणूस कुलकर्णीच होता. कुणाचेही टपाल आले म्हणजे ते कुलकर्ण्यांकडून वाचून घेत होते. गावात शिक्षणाचे साधन म्हणजे फक्त एक प्राथमिक शाळा होती. केव्हातरी गुरुजी शाळेत यायचे. वर्गातही एक दोन विद्यार्थी असायचे. माणसे शाळेपेक्षा कामाला महत्त्व देत होती. मुलं जरा थोडी मोठी झाली म्हणजे लगेच गुराढोरांच्या मागं लावत. सगळा अडाणी समाज. मोलमजुरी केल्याशिवाय दोन वेळेला पोटाला मिळत नव्हते. गावात फक्त बाळू

गुरवाचे हॉटेल होते. तेथे फक्त चहाच मिळायचा. एखादा माणूस जर आजारी पडला तर त्याला उपचारासाठी तालुक्याच्या गावाला जावे लागत होते.

अशा प्रकारे कोणत्याही प्रकारच्या सोयी सुविधा नसलेले हे उमदी गाव. बहुतांश समाज हा मोलमजूरी करणारा होता. शेती हेच एकमेव उपजिविकेचे साधन होते. अशा प्रकारे लेखकाने गावगाड्याचे चित्रण उभे केले आहे.

**१.२.११. शोषण :**

समाज व्यवस्थेमध्ये अनेक लोक वेगवेगळ्या स्वभावाचे असतात. ते एकमेकांचे वेगवेगळ्या प्रकारचे शोषण करीत असलेले प्रस्तुत कादंबऱ्यांमधून आपणास प्रत्ययाला येते. शारीरिक, मानसिक, लैंगिक शोषण होत असलेले आपणास काही उदाहरणांवरुन दिसून येते.

**१.२.११.१. ययाति :**

राजकन्या असलेल्या शर्मिष्ठेला ऋषीकन्या देवयानी हिने स्वतःची दासी बनवून आणले. राजकन्येला ऋषीकन्येने कसे नाक घासायला लावले, असं गर्वाने देवयानी म्हणायची तिच्या बोलण्याने शर्मिष्ठेला फार वाईट वाटायचं पण आपण एक दासी आहोत आणि दासीला हात, पाय असतात पण तोंड आणि मन नसतं. असं ती स्वतःचे स्वतःच सांत्वन करायची. यावरुन शर्मिष्ठेचे एक प्रकारे शोषणच होत होते.

**१.२.११.२. रथचक्र :**

'रथचक्र' या कादंबरीची नायिका ती ही मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील स्त्री होती. एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये ज्या स्त्रीचा पती कमावता असतो तिला कुटुंबात मानाचे स्थान असते. तिचा नवरा संन्याशी वृत्तीचा असल्याने त्यांचे कुटुंबासाठी कोणत्याही प्रकारचे योगदान नव्हते. अर्थात न कमावत्या नवऱ्याची बायको म्हणून तिची कुटुंबात होणारी अवहेलना, तिच्या जावाकडून तिचा होणारा अपमान हे एक प्रकारचे  शोषणच होत होते.

**१.२.११.३. स्वामी :**

राक्षसभुवनची लढाई जिंकून माधवराव पुण्यात आले तेव्हा लढाईदरम्यान एक अनुचित प्रकार पुण्यात घडला. निजामाने पुणे लुटले. लुटारू निजामाला मल्हारराव रास्ते म्हणजे माधवरावांचे मामा यांनी मदत केली होती. मल्हारराव रस्ते यांच्यासारख्या घरभेद्याकडून प्रजेचे शोषण झाले होते.

**१.२.११.४. स्मरणगाथा :**

प्रस्तुत कादंबरीत अकोले तालुक्याचा मामलेदार खान नावाची व्यक्ती होती. सतरा सालच्या युद्धाचा कालखंड होता. खान हा तालुक्यातील लोकांशी उन्मत्तपणे वागत होता. ''खान त्याला विरोध केला तर म्हणायचा ''मै अंग्रेज हकूमत का हपसर हूँ। मेरे पीछे अंग्रेज सल्तनत है।''(पृ.१५६) गावातील लेकीबाळींवर त्याची वाईट नजर होती. तसेच तरण्याताठ्या ठाकुर, कोळी, भिल्ल तरूणांना जबरदस्तीने मारीत-झोडीत, हाती बेड्या अडकवीत सैन्यात भरती करण्यास नेत असे.(पृ.१५५) स्वातंत्र्यपूर्व कालखंडात इंग्रज सरकार व त्यांचा अधिकार वर्ग सर्वसामान्य लोकांचे शोषण करीत होते, हे या वरुन स्पष्ट होते.

मराठवाड्यात हिंदूवर अत्याचार होत होते. परभणी शेजारी असलेल्या एका गावातील व्यक्तीने लेखकाला मोगलाई जुलमाची कथा ऐकवली. एका हिंदूच्या घरी सत्यनारायणाची पूजा होती. मोघल सत्तेतल्या पोलीसाचे तो समारंभ पाहून पित्त खवळले. त्याने तो समारंभ बंद करायला लावला. त्याचे कारण, 'तो मोगलाईचा नियम होता, कुणाही भजनाचा आवाज देवळाबाहेर येणं निजामशाईला खपत नसे. ते सगळं चारी भिंतीच्या आत झालं पाहिजे. एक नियम तर अतिशय कसोशीनं पाळला जात असे. कुण्याही देवळाचा कळस मशिदीच्या कळसापेक्षा उंच उठतां कामा नये. प्रजा बिचारी इतकी नाडलेली होती, की या विरुद्ध आवाज उठवायची हिंमत एकामध्येही नव्हती'(पृ.२८०) एक प्रकारे हिंदूचे जुलूमी मोघल राजवटीकडून शोषण होत होते.

**१.२.११.५. सत्तांतर :**

सत्तांतर मधील प्रत्येक टोळीचा नायक हा दुसऱ्या टोळीतील वानर नर व माद्या यांचे सतत शोषण करताना दिसतात. त्यामुळे सर्वांकडून या टोळीतील नायकाचा आदब-मान-सन्मान राखला जातो. टोळ्यांमधील सर्वच जण या नायकांना घाबरून असतात. या टोळी प्रमुखांना प्रतिष्ठा व मान असतो. निवडक फळं, जागा, गोष्टी हे सर्व तो मिळविताना बाकीच्यांचे शोषण करताना दिसतो. पाहिजे त्या मादी बरोबर तो जुगतो. आपल्यात वाटेकरी होऊ नये म्हणून टोळ्यांमधील लहान वानरांना मारून टाकायलाही तो नायक मागे पुढे पाहत नाही. अशा प्रकारे सत्ताधारी नेहमीच सर्वसामान्यांचे शोषण करीत असतात. हे यांच्या मधून सूचित होते. प्रस्तुत कादंबरीत मोगा मुडा, लालबुडय़ा, दाढीवाला हे एकमेकांच्या टोळ्यांवर सत्ता गाजविण्याच्या नादात आपल्याच वानर जातीच्या वंशांच्या नर व मादीचे वेळप्रसंगी शोषण करताना दिसतात. मुडाचे अस्तित्व संपल्यामुळे मोगा उनाडीबरोबर वारंवार जुगतो. मोगा गेल्यामुळे मोगा उनाडीचे शारीरिक शोषणच करत

असलेला दिसतो. त्यांच्या जुगण्यामुळे उनाडीच्या पोटात गर्भ वाढत असतो. अशा प्रकारे कादंबरीतील शोषणाची अनेक उदाहरणे देता येतील.

**१.२.११.६. झोंबी :**

'झोंबी' या कादंबरीत आनंद यादव यांनी आपली आई, आपल्या बहिणी यांच्या चित्रणातून तत्कालीन महिलांचे कुटुंबाकडून होणारे शोषण मांडले आहे. बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. ताराचा म्हणजे आनंदच्या आई वडिलांचा बालविवाह झाला होता. सहासात वर्षाची तारा नांदायला गेली होती त्यावेळी सासू, दोन्ही नणंदा या ताराला मोलकरणीच्या मुलीसारखी कामे सांगत होत्या. लेखकाचे वडील तिच्यावर शिव्यांचा भडीमार करत होते. शेतावर वडिलांसाठी भाकरी घेऊन जायला उशिर झाला की, ''तुझ्या आयला तुझ्या! एवढ्या उशीरपतोर भाकरी हुईत न्हाईत?''(पृ.८) असा शिव्यांचा मार होत होता. खांद्यावरच्या चाबकांची वादी तिच्या पाठीवर फुटत असे. अशा प्रकारचे शोषण ताराचे होत होते. लेखकाची बहीण हिरा हिलाही तिच्या सासरच्या मंडळींनी खूप छळल्याचे वर्णन कादंबरीत लेखकाने मांडले आहे. कादंबरीत लेखकाने स्त्रीचे कार्यक्षेत्र म्हणजे, 'चूल आणि मूल' एवढेच आहे याचा वेळोवेळी प्रत्यय आणून दिला आहे. ताराला पहिल्या दोन मुली झाल्या आता मुलींचीच रांग लागणार याचा रतनूला संताप आला की तो ताराला मारी, दम देई. मुली होतात याला तारालाच जबाबदार धरले जात होते. अशा रितीने शारीरिक व मानसिक शोषणाला तत्कालीन स्त्रिया सामोऱ्या जात होत्या.

**१.२.११.७. झाडाझडती :**

झाडाझडती ही कादंबरीची मध्यवर्ती सूत्रच धरणग्रस्तांचे शोषण आहे. सर्जेराव शिंगाडयासारख्या राजकारण्यांना मतांसाठी आपला परिसरात सुधारणा करायच्या होत्या त्यासाठी जांभळी सारख्या गाववाल्यांना दाणाला लावले सर्जेरावाचे ऊसमुळे पिकविण्यासाठी धरण उभारले पण धरणग्रस्तांच्या हाती मात्र भिकेची झोळी दिली. धरणाने उठलेल्या धरणग्रस्तांचे लाभक्षेत्रातील लोकांनी सळो की पळो करून सोडले त्यांचे जगणे मुश्किल केले. भ्रष्ट सरकारी यंत्रणेनेही धरणग्रस्तांचे वेळोवेळी शोषण केले.

**१.२.११.८. राघववेळ :**

कौशीचे शारीरिक शोषण भुजंगराव करण्याचा प्रयत्न करतो. तो पुढील प्रसंगातून लेखक मांडतो. ''काही न बोलता तिने टोपले त्याच्या पुढ्यात ठेवले. त्याने तिघींची ज्वारी तिच्या

टोपल्यात टाकली. तिने टोपले उचलण्यासाठी हात खाली केले आणि संधी साधून भुजंगाने फटीतून डोकावणाऱ्या कबुतरांना दोन मुठीत गच्च धरले. त्यासरशी जीवघेणी वेदना तिच्या सर्वांगातून सरसरत गेली. तिने सरळ होण्याचा प्रयत्न करुन पाहिला. परंतु असहय वेदनेने कळवळली. मटकन खाली बसली. तिच्या डोळयात आसवे तरळली.''(पृ.१०७) यमुना भुजंगराव मजुरीच्या मोबदल्यात शारीरिक शोषण करतांना दिसतो.

भुजंगराव पैसे देऊन पंजाब व मुलांना दुकानातून खाऊ व चहाचे सामान आणायला पाठवित असे. आणि त्यावेळेत गजरी त्याला आपले शरीर देई. वीस रुपये घेऊन गजरी आपल्या सुनेला भुजंगरावाकडे धाडण्याचा प्रयत्न करते. एक प्रकारे या ठिकाणी स्त्रीच स्त्रीचे शोषण करताना दिसते.

**१.२.११.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' ह्या कादंबरीच्या कालखंडाचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतीयांचे इंग्रजांकडून सर्वच बाबतीत शोषणच होत होते. त्याविरुद्ध नाना सिरूर व त्यांचे सहकारी यांनी लढा दिलेला दिसतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपल्याच लोकांकडून सर्वसामान्य जनतेचे शोषण होताना दिसते. राजकारणातही स्वार्थी राजकारणी लोक आपल्या पदाचा वापर करुन सामान्यांचे शोषण करताना दिसतात. स्वातंत्र्यापूर्वी इंग्रजांच्या जुलूमशाहीला शोषणाला विरोध करण्याचे कार्य नाना व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. एकुणच राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील सर्वसामान्यांचे शोषण होताना येथे दिसते.

**१.२.११.१०. तणकट :**

बाळासाहेब शेडबाळे दारुड्या होता. तसेच रामा महाराची बायको सुली हिच्या नादाला तो लागला होता. शेडबाळेची पत्नी तारा हिला शेडबाळे दारुच्या नशेत मारहाण करीत असे. शेडबाळे सारख्या बाहेरख्याली व्यक्तिबरोबर संसार करणे म्हणजे ताराचे शोषणच होत होते. शेडबाळेने दलित समाजातील लोकांच्या अडाणीपणाचा फायदा घेऊन त्यांना लाखो रुपयांना गंडविले होते. म्हणजेच त्याने दलित समाजातील लोकांचे आर्थिक शोषण केले होते. प्रा.गंजेकर विद्यार्थ्यांना जातीवाचक बोलून त्यांचे जातीय शोषण करताना दिसतात. जालिंदर बनसोडे वकिलाच्या हाताखाली काम करताकरता भावाभावातील भांडणे मिटविण्याच्या नादात दलाली करुन त्यांचे आर्थिक शोषण करीत होता.

**१.२.११.११. डांगोरा एका नगरीचा :**

सर्वसामान्य जनतेचे साईखेडा संस्थानात राजा रघुसिंह गेल्यानंतर प्रत्येक बाबतीत शोषणच होत होते. सर्वत्र भयावहाचे वातावरण निर्माण झाले होते. उदाहरणादाखल शोषणाचा एक प्रसंग पुढीलप्रमाणे घडलेला होता. महाशिवरात्रीच्या दिवशी तारकेश्वरीच्या जंगलात असलेल्या त्रिपुरान्तकाची जत्रा नेहमीप्रमाणे भरली होती. खेडोपाडीची गरीबगुरीब माणसं उपासतापास करुन दर्शनाला येत. तळ्याकाठी स्नान करुन श्रद्धाळू अंतःकरणांनी बेलफुलं वाहत. रात्रभर जागून पहाटे पांगत. रेवड्या, शेव, जिलब्या खात. दुसऱ्या दिवशी गावची वाट धरीत. तिथल्या बंदोबस्तासाठी शिपायांची एक तुकडी तंबू ठोकून असे. अर्धनग्न, रोड आणि खप्पड अशा वनवासी भाविकांकडूनही चिरीमिरी लुबाडायची, हे व्रत या पुलिसांचे. सर्रास सगळयांकडून यात्रेचा कर म्हणून ते चवली-पावली उपटत ती वेगळीच. त्याची ना पावती, ना हिशेब. अशा प्रकारे सर्वसामान्य भाविकांचे शोषण होत आहे.

खांद्यावर घवघवीत पडशी घेऊन आलेला एखादा धष्टपुष्ट यात्रेकरु, हातात चांदीच कडं मिरवणारा कुणी भोळाभाबडा पैलवान शेतकरी, जरीचा रुमाल झोकात बांधून फिरणारी व्यापार टापारातली कुणी असामी, जाड जाजमतुकड्यावर लालभडक जीनं घातलेलं एखादं टुणटुणीत तट्टू हाकत आलेला रंगेल परदेशी... यांच्यावर तर शिपायांशी अचूक टेहळण असे. अशांना पाहून वेगळयाचं परीनं ते हरखून जात. कुणावर काही वहिम घालावा, कुणावर कसलं बालंट रचावं, झडती घेण्याचा बहाणा करता करता गांजा-अफूची एक लहानशी पुरचुंढी त्याच्या सामानात खुपसावी आणि नेमकी ती उचकटून त्याला बदमाष तस्कर ठरवावं, हा त्यांच्या हातचा मळ होता. मग काय, बदनामी, मारहाण किंवा तुरुंगवास यांतून सुटकेच्या बदल्यात यात्रेकरुजवळची रोकड किंवा चीजवस्तु लंपास व्हावी, हे राजरोस चालायचे. शिपायांच्या तंबूत खेचून नेलेल्या माणसाची तर धडगत म्हणून नव्हती. अंगावर कपडे ठेवूनही माणसांना माणसं कशी नागवू शकतात आणि राज्य चालवणाऱ्यांचे प्रतिनिधी होऊन तीच कशी खुशहाल होतात याचा तारकेश्वरीच्या जत्रेत रोकडा अनुभव घेता येत होता.

फौजदार घोरपड्यांच्या खास मर्जीत आणि तैनातीत असणाऱ्या शिपायांचा जथा या जत्रा-उत्सवाचा मानकरी असायचा. त्यांचा बंदोबस्त हाहाकाराला येऊन ठेपायचा. त्या बेशिस्त गदारोळात कुणाचं काय झालं-गेलं याचा पत्ता नसे. त्या शिवरात्रीची जत्रा परतली. दुसऱ्या पहाटे एका लमाण बाईची एका शिपुरडयानं छेड काढली. तिला तंबुत बोलावलं. ती बोटं मोडून शिव्या

घालू लागली तेव्हा तिच्या तोंडात बोळा कोंबला. आडोशाला नेऊन तिला खाली पाडलं. इतक्यात तिचा नवरा धावून आला. त्याला सुरीनं भोसकलं आणि मग बाईलाही. तिच्यावर बळजबरी करुन झाल्यावर लमाण जोडप्याची प्रेतं तिथचं पडून राहिली. त्याचा गवगवा झाल्याशिवाय कसा राहिल? पोलिस तपासनं सांगून टाकलं की, झाडाखाली झोपलेल्या त्या दोघांना साप चावून मृत्यू झाला. त्यांची शरीर काळी-निळी पडली होती. तोंडातून फेस बाहेर आला होता. दाद ना फिर्याद.

मग फाल्गुन महिना आला. होळीच्या आधीचे दिवस साइखेडात अती ओंगळवाणे असत. ऐन दुपारी टळटळ उन्हात गल्लोगल्लीचर शेंबडी आणि नको तेवढी कळती मुलं झुंडीनं निघत आणि ऐकुन कानात काटे सलावेत अशा शब्दांचे उखाणे घालत. थयथया नाचत निघत. तो काळ बायका पोरींच्या लज्जेला दिवसाढवळ्या भोसकणारा असे. अचकटपणाच्या जोडीला जातीजातीच्या द्वेषाने चरचरीत मीठपाणी फवारत येई. अजाणपण कुरुप उत्साहानं चेवलेल्या चिल्ल्यापिल्ल्यांना चिथावणारे मिशिदार सोळभोग रस्त्यांच्या कडेनं, बोळांच्या वळणांवर, आजारातल्या दुकान कट्ट्यांवर फिदीफिदी हसत बसलेले असायचे. आपण रचलेल्या कवितांच असे जाहीर कीर्तन ऐकून त्यांच्या आनंदाला उकळी येई.

साळी, कोष्टी, बुरुड यांच्या आळीतून एक जथा निघे. त्याला कवित्व फारसं जमत नसे. तोंडावर हात घेऊन खच्चून आवाज काढण्यात मात्र तो कोणाला हार जात नसे. लिंगायत-मराठ्यांची चुरस झणझणीत असायची. बामनांची नाक कापायला निघालेली. त्यांच्या माजघरातल्या अब्रूला तारांगण दाखवणारी. आणि ब्राम्हण-गल्लीतलं टोळकं, लहानसंच पण इब्लिसपणात तसूभरही कमी नसे. त्याची शाहिरी संस्कृतप्रचूर आणि द्विअर्थी शब्दांनी बहरलेली असे. लक्ष देऊन ऐकणाऱ्याला बेंबीच्या खालपासून गुदगुल्या होत. 'मवालीपणाची रुपं अशा कपटानं मोकाट वावरतात तेव्हा निपटा करायला सत्तेपाशी अशी एक कर्तव्यकठोर उदात्तपण लागतं. समाजाच्या अंगोपांगांत धीरानं खडी होणारी निर्भय मन.'(पृ.२२७) असावी लागतात. अशा प्रकारचे सदर कादंबरीत प्रत्येकाकडून एकमेकांकडे मानसिक शोषण केलेले दिसून येते.

**१.२.११.१२. बारोमास :**

शेतकऱ्याचे साऱ्याच समाजव्यवस्थेकडून शोषण केले जाते. शेतकऱ्याला अवजारावर सबसिडी मिळते. दीडलाखाचे लोखंड वापरून जो ट्रॅक्टर तयार होतो तो शेतकऱ्याला तीन लाखाला मिळतो. स्पिंकलर पाचशे रूपयाचे वायर पाइप पाच हजारात त्यावर सबसीडी तीस टक्के तरी नफ्यात व्यापारीच यासर्व सबसीडीत फायदा होतो तो व्यापारी आणि राजकारणी लोकांचा. सबसीडी

घ्यायची असेल तर अर्धा किंवा पाव हिस्सा नकद भरावा लागतो. शेतकऱ्याजवळ पैसा नसतो मग दुकानदार पैसे भरतात. शेतकऱ्याला अवजारे विकले असे पावती दर्शवितात. आणि मग दणादण बिलं वसूल करतात. शेतकऱ्याच्या हातावर शे-दोनशे ठेवून देतात. आणि समाजाला वाटते शेतकऱ्याने सबसिडी घेतली.(पृ.१८६) शेतकऱ्याला कर्ज काढायला सातबाराचा उतारा लागतो तर तलाठ्याचे हात ओले केल्याशिवाय तलाठी उतारा देत नाही तलाठ्याला लाच दिल्यानंतर कर्जाचे प्रकरण घेऊन गेल्यावर बॅंकेतले साहेब ही तसेच. पीक काढण्यासाठी जीवाचा आटापीटा केलेल्या शेतकऱ्यांना लुबाडायला आडते असतातच.म्हणजेच एकूण समाजव्यवस्थेकडून शेतकऱ्याचे शोषण हे ठरलेलेच असते. शेतकरी हा एकूणच समाजव्यवस्थेकडून नागला जातो. शेतकऱ्यांचा माल व्यापारी लोक पडत्या भावाने खरेदी करतात. तसेच तलाठ्याकडूनही त्यांचे आर्थिक शोषण केलेले आढळते.

**१.२.११.१३. भूमी :**

निराधार स्त्रीकडे समाजातील पुरूषांची पाहण्याची दृष्टी अस्वच्छ असते हे जाणवते. मैथिलीच्या आत्याचा मुलगा संजू मैथिलीशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न करतो. आत्याच्या पहिल्या पत्नीचा मुलगा उदय ही काही अंशी मैथिलीशी वेगळ्याच अपेक्षेने जवळ येतो. यातून स्त्रियांचे होणारे शोषण लेखिकेने व्यक्त केले आहे. चूल आणि मूल सांभाळण्याची अपेक्षा करणारे किर्तीचे सासरचे लोक कीर्ती सारख्या उच्चशिक्षीत मुलीचे शोषणच करताना दिसतात.

**१.२.११.१४. खारीच्या वाटा :**

लहान मुलं प्राण्यांशी जीवघेणा खेळ खेळतात. असाच एक प्रसंग प्राण्यांच्या शोषणाचा लेखकाने सांगितला आहे. देवळाच्या पाठीमागे असलेल्या नांदुरुकीच्या झाडाखाली मातीत एक खारीचे पिलू पडलेले होते. दत्ताने हातात टंटणीची वातेरी काडी घेतली, त्या काडीने त्या पिलाचे डोके उचलण्याचा तो प्रयत्न करीत होता. पण 'जरा उचललं की लगेच पडायचं, तशी पोरं खिदळायची.'(पृ.९) हा त्यांचा खेळ म्हणजे बिचाऱ्या पिलाचे शोषण होत होते. तसेच लेखक ज्या गावठाणात राहात होता तेथील लोकांना धरणग्रस्त झाल्यामुळे आपली मायभूमी सोडावी लागली. गाव सोडताना प्रत्येक माणूस व प्राणी आपल्या मायभूमीला सोडताना दुःखी होत होतो. हे ही एक प्रकारचे सरकारकडून लेखकाच्या गावातील लोकांचे मानसिक शोषणच झालेले दिसते.

थोडक्यात धरणग्रस्तांचे झालेले मानसिक शोषण यातून प्रकट होते. प्राणिमात्रांचेही गाव सोडताना झालेली दयनीय अवस्था ही एक शोषणाचीच बाजू असलेली दिसते.

**१.२.११.१५. फेसाटी :**

लेखकाचे वडील आणि चुलते जेव्हा एकत्र राहत होते तेंव्हा चुलता सतत कुरबूर करायचा. काकू म्हणजे नाथाची आई मिळल तिथं कामाला जायची. काकूची सासू म्हणजे लेखकाची आजी काकूचा छळ करायची. पोटाला भाकर सुद्धा द्यायची नाही. काकूने चोरुन भाकर घेतली हे आजीने काकाला म्हणजे वडिलांना सांगितले तेव्हा त्यांनी काकूला खूप मारले. 'काकूला उठायला ईना, चालायला ईना, तसल्यात त्या येळंला काकू गरोदर हुती.'(पृ.१३) पुढे काकांनी मात्र कधीही त्रास दिल्याचा उल्लेख कादंबरीत आला नाही. पोटाची भूक भागविण्यासाठी भाकर खाली म्हणून सासू व नवऱ्याकडून झालेले शोषण दिसते.

लेखकाची बहीण हिराक्काला तिची सासू म्हणजे जी तिची सख्खी मामीच होती. तिने ओटी भरण्याच्या वेळी माहेराहून दागिने आणले नाही म्हणून छळले आणि अखेरीस विहिरीत ढकलून दिले. थोड्याच दिवसात मुलाचे दुसरे लग्नही करुन दिले. येथे हिराक्काचे शोषण झालेले दिसते. लेखकाच्या चुलत्याने लेखकाच्या कुटुंबाला त्रास दिला. शेतावरून भांडणे केली. वडिलांनी खरेदी केलेल्या शेताचा वाटा सुद्धा वडिलांना मिळू दिला नाही. पैसे देऊन पोलिसांची तोंडे बंद केली. बिचाऱ्या वडिलांना अन्यायाविरुद्ध दाद मागूनही न्याय मिळाला नाही. नाथाचे एकदा घर जाळले. शेत पेटविले पण पुराव्या अभावी न्याय मागता आला नाही. लेखकाच्या चुलत्याने लेखकाच्या कुटुंबाचा ह्या ना त्या प्रकारचा छह सहन करुन शोषणच केले.

अशा प्रकारे लेखकाच्या कुटुंबाला वेळोवेळी अन्याय सहन करावा लागला. सतत या कुटुंबाचे शोषणच होत होते.

**१.२.१२. प्रथा–परंपरा :**

विविध प्रदेशांमध्ये पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या प्रथा– परंपरा या तेथील संस्कृतीचा निर्देश करतात. प्रथा परंपरांवर प्रादेशिकतेचा प्रभाव पडतो. प्रदेश भिन्नतेनुसार प्रथा–परंपरेमध्ये भिन्नत्व आढळते. भारतीय अर्थव्यवस्थेचा कृषी हा पाया आहे त्यामुळे कृषी जीवनाशी निगडित प्रथा व परंपरा अनेक ठिकाणी आढळतात. मानवाने आपल्या कष्टमय जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी काही प्रथा परंपरांचा अंगीकार केला. असे करीत असताना चांगल्या प्रथांबरोबर काही अनिष्ट प्रथांची रुजवात आपल्या संस्कृतीत झाली. उदाहरणार्थ, हुंड्याची प्रथा अनिष्ट प्रथा आहे. कादंबरीच्या स्वरूपाला अधिक मनोरंजक करण्यासाठी प्रस्तुत कादंबऱ्यांच्या काही लेखकांनी विविध प्रथा परंपरांचा उल्लेख केलेला आढळतो.

**१.२.१२.१. ययाति :**

सण उत्सव साजरा करणे हा एक प्रथेचाच हिस्सा आहे. हस्तिनापूरमध्ये नगरदेवतेचा उत्सव दरवर्षी साजरा केला जात होता. या उत्सवाला दूरदरच्या नगरांतून आणि खेड्यांतून लोकांचे लोंढेच्या लोंढे येत. कथा–कीर्तने, पुराण–प्रवचने, भजन–पूजन, नृत्यसंगीत, स्त्री–पुरुषांचे विविध खेळ, नाना प्रकारची सोंगे असा दहा दिवसाचा उत्सव होत होता. उत्सवाच्या शेवटच्या दिवशी सैनिकांच्या साहसी वृत्तीला प्रोत्साहन देण्यासाठी साहसी खेळांचा समावेश केला जात असे.

**१.२.१२.२. रथचक्र :**

ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या तत्कालिन स्त्रियांना कुटुंबापासून दूर एकटीला राहण्यास परवानगी नाकारली जात होती. त्यामुळे अशा कुटुंबापासून दूर गेलेल्या 'ति'ला म्हणजेच कादंबरीच्या नायिकेला पुन्हा कुटुंबात घेतांना शुद्ध करुन घेतली जाण्याची प्रथा हास्यास्पद वाटते.

**१.२.१२.३. स्वामी :**

प्रस्तुत कादंबरीत विविध प्रकारच्या प्रथा परंपरांचा उल्लेख आलेला आहे. 'उदाहरणादाखल काही पुढीलप्रमाणे श्रीमंतांच्यावर कसलाही प्रसंग आला, तरी ते नित्याची पूजा वाचन झाल्या खेरीज कोणत्याही कामाला हात घालत नाहीत.'(पृ.३७) ''अनुष्ठान चालू आहे. ना, आज समाप्तीचा दिवस तुळशीपत्रांची कसूर जर श्रीमंतांच्या ध्यानी आली, तर ती माफ व्हायची नाही!''(पृ.३८)

'वाड्यात होम हवन व्हायचं.'(पृ.४३)

स्वामीतील प्रथापरंपरेविषयी रेखा वडिखाये म्हणतात ''रमा सती जाते. तिच्या सती जाण्याच्या प्रसंगावरून सनातनी, पारंपरिक आणि सरंजामशाही मूल्यव्यवस्थेचे हुबेहुब चित्रण कादंबरीत येते.(पृ.२९१) 'स्वामी' या कादंबरीत सती जाण्याच्या प्रथेला उच्चतम पातळीवर नेऊन ठेवले आहे.

**१.२.१२.४. स्मरणगाथा :**

लेखकाचे कुटुंब नागपुरास स्थलांतरित झाल्यानंतर त्यांना अनेक प्रथा परंपरांचा अनुभव घ्यायला मिळाला. मुसलमान धर्मातील मोहरमचा सण व त्या सणातील डोल्यांची प्रथा. पट्टेदार वाघ म्हणजेच माणसांच्या अंगाला रंग लावलेले असेही वाघ नाचत. 'डफडं धुमूं लागे, अन् अवसान भरुन वाघ नाचूं लागे. वाहवा! काय ते नाचणं! काय त्या फलांगा! काय तो अर्विभाव!

पोरसोरं तर एकीकडे गर्भगळित होत, पण दुसरीकडे वाघाचं नाचणं पाहायची उर्मि देखील असा जोर करी, की सांगता पुरवत नाही.'(पृ.६५) नागपूरमध्ये लोकांना आखाड्याचे अतिशय वेड होते. एखाद्या चांगल्या कुटुंबात जर लग्न असेल तर वरातीला आखाड्यातील लोकांना निमंत्रण दिले जाई. 'हे आखाडे फरीदगा, लाठीबोथाटी, पट्टापान, तरवारी इत्यादी शस्त्रांचे प्रदर्शनी खेळ करीत मिरवीत चालत असत.'(पृ.६६)

लेखक म्हणजेच गोपाळ अकोल्याला असताना नवरात्र उत्सवाचे केलेले वर्णन प्रथा व परंपरा अधोरेखित करतात. 'नवरात्रात देवीसमोर बोहाडा होई. नऊही दिवस रात्रीची सोंग निघत. त्यामध्ये परशुराम, गणपती, राक्षस, देवी, राम, कृष्ण असे कितीतरी देव रस्त्यावरुन नाचत जात. नवरात्राच्या नऊही रात्री सगळा गाव जागत होता.'(पृ.१७१) आखाड्याची परंपरा लाठीबोथाटी, वाघाचं नाचणं, शस्त्राचं प्रदर्शनी खेळ, नवरात्रीच्या उत्सवात देव व देवी रस्त्याने नाचत जात. या प्रथापरंपरांचे वर्णन लेखकाने केलेले आहे. याशिवाय हिंदू-मुस्लीम धर्मातील प्रथा परंपरेचा उल्लेख व त्या अनुषंगाने घटना प्रसंगाचे विवेचन लेखकाने प्रसंगानुरूप वेळोवेळी केलेले आढळते.

**१.२.१२.५. झोंबी :**

प्रस्तुत कादंबरीतील काही प्रथा परंपरांचा उल्लेख उदाहरणादाखल येथे नमूद केला. आनंदच्या बहिणीच्या म्हणजे अनसाच्या लग्नात घुगोळ काढला. 'हा घुगोळ बिरूबाच्या माळाला अनवाणी पायाने नाचत घेऊन गेले.'(पृ.५९) धनगर वाड्यात लग्न असेल तर धनगरी गीतांचा कार्यक्रम तीन तीन रात्री चालत होता. 'त्यात बिरूबाचे अनेक चमत्कार ऐकायला मिळत होते.'(पृ.२१७) गावाच्या बाहेर यल्लमा देवीची जत्रा भरत होती. कागल व आसपासच्या गावातील जोगतिणी तिथं येत. प्रत्येकीचा एक एक ताफा असे. त्या ताफ्याचा एक मोठा जग असे. त्या जगाच्या मध्यभागी यल्लमाचा मोठा टाक बसवलेला असे. जगात जोगव्याचं धान्य साठवलं जाई. त्या जगाच्या भोवतीनं जोगतिणींची गाणी चालत. जोगतिणींना भाजी, भाकरी, भात याचा नैवेद्य दिला जाई व तो प्रसाद खाण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही कडेने लांबच लांब गोरगरिबांच्या पंगती बसत नी ते अन्न पंक्तीला वाढले जाई. शेवटच्या रात्री यल्लमा पायघड्यावरनं गावात प्रवेश करी. गावाच्या मुख्य भागातनं फिरून तिचं विसर्जन होई.(पृ.२१८) लग्नातील घुगोळ, धनगरी गीतांचा कार्यक्रम, बिरुबाचे चमत्कार तसेच यल्लमा देवीची जत्रा, जोगतिणींची गाणी ह्या प्रथा-परंपरांचा दाखला लेखकाने दिलेला आहे.

**१.२.१२.६. झाडाझडती :**

खैरमोडे गुरूजींसारख्या आदर्शवादी विचारांच्या व्यक्तीला आपल्या लाडक्या मुलीच्या लग्नात हुंड्याच्या अनिष्ठ प्रथेला लगाम घालता आला नाही. मुलगा बिजवर होता तरी मुलाच्या बापाच्या हातात गुरूजींनी आठ हजारांचे गाठोडे ठेवले होते. लग्नाला दोन वर्षे होत नाहीत तोच मुलाने बुलेटसाठी हट्ट धरला होता. अशा प्रकारे हुंड्याची अनिट प्रथा समाजात आजही असल्याचे दिसून येते.

**१.२.१२.७. राघववेळ :**

रघूचा प्रथा परंपरेवर व अंधश्रद्धेवर विश्वास नाही. म्हणूनच आपला धाकटा भाऊ सितारामला धोंडी केलेले त्याला आवडत नाही. जुन्या परंपरेनुसार गावकऱ्याची कामे हक्काने करायची. त्याच्या मोबदल्यात पायली, पसाभर धान्य किंवा मातेरा मेहरबानी म्हणून घ्यायचा ही प्रथा रघुला मान्य नाही. ग्रहण मागायला जाणे हे ही रघूलर आवडत नसे. ईनाइचा उत्सव ही प्रथा–परंपरा मातंग समाजात महत्त्वपूर्ण असलेली मला वाटते.

**१.२.१२.८. तणकट :**

भीमा महाराने मातंग जातीतील लोकांना मान आहे हे पटवून देताना बऱ्याच प्रथांचा उलगडा झालेला आहे. गावात कोणाच्या घरी लग्न असेल त्यांचे तोरण लागते. गावात कोणी मेलं तर मर्तिकीला मांग हजर असावे लागतात. त्यांच्याशिवाय खळ्याची रास हालत नाही. बेंदराचा बैल घरातून बाहेर काढायला मांग असावेच लागतात. मोठमोठ्या घरात कोणाचे लग्न झालं की नव्या नवरा बायकोची खोली मांगानाच पुजावी लागते.(पृ.४०) ही प्रथा गावगाड्यातील महत्त्वाची प्रथा–परंपरा मानतात.

**१.२.१२.९. डांगोरा एका नगरीचा :**

चातुर्मास्यात तिथं त्यांनी लावलेल्या नवनाथ–लीलांचं पुराण ऐकायला राणी सावित्रीदेवी बसल्या आणि केशवभटांचं भाग्य उद्याला आलं.(पृ.५६) आजही चार्तुमासात घराघरांमध्ये विविध धार्मिक ग्रंथ वाचण्याची परंपरा असलेली आपणास दिसते.

**१.२.१२.१०. बारोमास :**

बारोमास ह्या कादंबरीमध्ये शेतकरी कुटुंबाची अस्मानी सुलतानी संकटांमुळे बारमाही हालअपेष्टा भोगणे असे जीवनाचे स्वरूप होते. पिढ्यानपिढ्या परंपरेने चालत आलेला व्यवसाय

करण्यातच धन्यता मानणारा समाज होता. तसेच हुंड्याची प्रथाही होती. एकनाथची पत्नी अलका हिला तिच्या वडिलांनी हुंडा दिला होता. हुंड्यात मिळालेला टीव्ही एकनाथ व अलका दोघा भावांच्या भांडणात फुटला होता. हुंडा म्हणून समाजात आजही वेगवेगळ्या वस्तू मागण्याची प्रथा चालूच आहे.

**१.२.१२.११. भूमी :**

आपल्या संस्कृतीमध्ये विवाहाच्यावेळी मुलीपेक्षा मुलगा हा वयाने जास्तच असावा अशी प्रथा आहे. याविषयी आत्याने मांडलेला विचार 'स्त्रियांना गुलाम म्हणून वापरता यावं' ही समाजाची मानसिकता प्रतीत करणारी आहे. पतीची सेवा करण्याची क्षमता स्त्रियांमध्ये असावी म्हणून पत्नी कमी वयाची असावी ही प्रथा होती. ख्रिश्चन धर्मामध्ये येशूसमोर मेणबत्ती लावण्याची प्रथा-परंपरा धार्मिकतेचे द्योतक असलेली दिसते.

**१.२.१२.१२. उत्सुकतेने मी झोपलो :**

भारतीय संस्कृतीत लग्नानंतर एक महत्वाची प्रथा आहे ती उखाणे घेणे. पती-पत्नीने एकमेकांची नावे घ्यायची ती उखाण्यात. सुबोध व माधुरी यांच्या लग्नाच्या रिसेप्शन प्रसंगी वेगवेगळे स्टॉल होते. नावे उखाण्ययात घेण्याचाही हा स्टॉलही होता.(पृ.२५) सुनेने घरातील मोठ्यांना मान देणे ही आपल्या संस्कृतीतील एक चांगली प्रथा आहे. आज्जेसासूसमोर बसताना डोक्यावर पदर घ्यायचा. आदबीने वागायचे, थोरल्या सासूबाई सांगतील ते ऐकायचं. असा सल्ला माधुरीला तिच्या थोरल्या जावेने दिला.(पृ.२६) सुमाधुरीची जाऊ नवऱ्याला अहो जाहो करते.(पृ.३२) यातून कुटुंबव्यवस्थेतील प्रथा-परंपरा अधोरेखित होताना दिसतात. विधुर म्हातारा आपल्या पत्नीचे श्राद्ध घालतो. ही प्रथा मृत व्यक्तीचे श्राद्ध घालणे ही प्रथा फार पूर्वीपासून चालत आलेली आजही समाजात प्रचलित आहे.

**१.२.१२.१३. खारीच्या वाटा :**

गावात कुणाच्याही घरी लग्नकार्य निघाले की ते पार पाडायचे जबाबदारी गावाची अशी पिढ्यानपिढ्या प्रथा होती. गावात सुताराच्या दत्तूचे लग्न ठरले. त्या निमित्ताने लग्नाच्या प्रथेचे वर्णन लेखकाने केले आहे .लग्न ही काही एका दिवसात उरकायची गोष्ट नसे आधी हळदी .दुसऱ्या दिवशी लग्न. तिसरा दिवस वरातीचा, चौथ्या दिवशी पांजी असा सगळा रमणा. त्यात अखा गाव गुंतलेला. 'चुलबंद' निमंत्रण. एकाही घरची चूल पेटत नसे. सारं काही लगीन घरीच. गाव एक

कुटुंब होई. बलुतेदार, कातकरी, धनगर त्यातच येत. गावच्या कोळ्याकड द्रोण, पत्रावळ्या बनवायचं काम असे. शिवाय निमंत्रण ही तोच सांगे. भावकीला सुपारी घ्यायची. पाहुण्यांना चिट्ठी. ही कामही त्याचीच. घरातला कारभारी फक्त सोयरिकीच्या 'कुंकुऱ्या' आणि 'मानाच्या सुपाऱ्या' घ्यायचा. बाकी कार्य गावाचं वऱ्हाडाचा मान महत्त्वाचा पहिली पंगत सोयऱ्याची ती उठल्याशिवाय गावातला शेंबड पोरसुद्धा हातावर पाणी घेणार नाही.(पृ.९१). अशा प्रकारे लग्नाच्या मध्ये येणाऱ्या प्रथा-परंपरांचा उल्लेख कथानकाच्या ओघात लेखक करतात.

**१.२.१२.१४. फेसाटी :**

धान्य करण्यापूर्वी काका रास मुहूर्त पहायचा, 'रास मुहुरत बघटलं म्हणजी कुठली अडचण येत नसत्या.'(पृ.१५) असे काका म्हणायचा. मुहूर्त पाहण्याची प्रथा आधुनिक काळातील समाजातही प्रचलित असलेली दिसते. लेखकाच्या बहिणींच्या लग्नाच्या वेळी प्रत्येक मुलीला काकाला लेखकाच्या वडिलांना  हुंडा द्यावाच लागला. हुंड्या शिवाय लग्न जमतच नव्हते. त्यामुळे चार-पाच पोरींचा हा पिता सतत कर्जाच्या ओझ्याखाली दबत राहत होता. नंदाक्काच्या लग्नाचा प्रसंग लेखकाने कथानकामध्ये मांडून लग्नाच्या विधीचा सोहळा वाचकांसमोर मांडला आहे. नवरा बायकोला पाटावर बसवून एक-एकजण नवरा नवरीला हळद लावत होते. त्यानंतर दुसरा दिवस तांदळाचा म्हणजे लग्नाचा. तांदळाचे लुगडं नंदाक्काला नेसवले. नवऱ्या मुलाला धोतर टोपी व एक तीन गुंड्यांची अंगी घातली. डोक्यावर बाशिंग. तोंडही दिसत नव्हती. एका माणसाने नंदाक्काला व एकाने नवऱ्या मुलाला उचलून घेतले. दोघांना मारुतीच्या देवळाकडे घेऊन गेले. त्यांच्यापुढे वाजंत्री त्यांच्या मागे ढोल अन् केताळ वाजवत. त्यांच्या मागे एका बाईच्या डोक्यावर पितळची पाण्याने भरलेली घागर. घागरीच्या गळ्यात भोरमाळ घातली होती. दुसरं एक जोडपं त्यांच्या हातात आरतीचं ताट, पाच बायकांच्या डोक्यावर पाण्याने भरलेले पाच तांबे घेऊन सगळे मारुतीला पाया पडून मागे आले. पुन्हा कळस मांडला. कळसाला पाच फेरे घालून उजवा पाय पहिल्यांदा आत ठेवून नवरानवरी व त्यांचे आई वडील घरात आले. सगळ्यांची अंघोळ झाली. कळसाच्या बाजूला असलेल्या तांब्याभोवती गुंडाळलेला दोरा चारी बाजूंनी उचलला एकत्र केला व मंडपावर टाकला. सगळ्यांना तांदूळ वाटले. नवरा नवरीच्यामध्ये पांढरं कापाड धरलं. भटजीन मंगलअष्टका म्हणल्या. सगळ्यांनी तांदूळ टाकले. नंदाक्काचं लग्न झाले.(पृ.५८) नंदाक्काच्या लग्नाचा प्रसंग लेखकाने अतिशय समर्पक शब्दात आपल्या समोर उभा केला आहे.

हिराक्काला मारुन धुळ्याने म्हणजे तिच्या नवऱ्याने दुसर लग्न शेजारच्या येसाबर गाठ मारली. ह्यांचा कार्यक्रम अमावस्येच्या दिवशी केला. ही प्रथा परंपरा लेखकाने पुढील प्रमाणे मांडली आहे. 'गव्हाचे पाच घास जात्यावर डाव्या हाताने घास घालून जात उपराट फिरवून दळलं. त्यानंतर कुणीही पाव्हणा आला तर त्याला लगेच घरात बोलवलं नाही. ज्या मुलांबरोबर गाठ मारायची त्या मुलाला अंथरूण टाकायचं नाही. अमावस्येला रात्री बारा वाजता गव्हाच्या कण्या करुन त्या बाईनेच त्या पोराला वाढल्या. स्वतःही वाढून घेऊन खाल्ल्या. दुसऱ्या कोणालाही वाढल्या नाहीत. रुईच्या फुलांचे दोन हार करायचे मग बाईनं व पोराने मारुतीच्या गळ्यात घालायचे. मग त्या पोराच्या गळ्यातल्या शेलाला व बाईच्या पदराला गाठ ह्या बाईनंच मारायची. त्या दिवशी अंगावर नवीन कपडे घालायचे नाहीत. बांगड्या घालायच्या नाहीत. ओटी भरायची नाही. जुन्या कपड्यावर सगळे तेथून घरी आल्यावर पाणी तापवून त्यांची त्यांनीच आंघोळ करायची. तेथून रात्रीच मुलीने नवऱ्या पोराच्या घरी जायचे. दुसऱ्या दिवशी सकाळी त्या दोन्ही नवरा बायकोची कुणीही तोंड पाहायची नाहीत. कळसाच्या बाहेरच त्यांना आहेर करायचा ''मग ती तेझी गाठीची दुसरी बायको झाली.''(पृ.५५) हिराक्काला मारुन तिचा नवरा येसावर धुळ्याची गाठ मारल्याचा विधी लेखकाने काळीज पिळवटून टाकणारा घटना-प्रसंग सविस्तरपणे मांडला आहे.

### **१.२.१३. धार्मिकता :**

धर्म ही संकल्पना मानवी जीवन सुसहय करण्यासाठी, नैतिक मूल्यांच्या संकल्पना जोपासून ते मानवी जीवनात अंगिकृत करण्यासाठी तसेच या घटकांचा वैश्विक कायदा राबविण्यासाठी धर्माची निर्मिती जगातल्या विविध धर्म संस्थापकांनी यासाठी पुढाकार घेतलेला दिसून येतो. यातून यहूदी, हिंदू, बौद्ध, जैन, ख्रिश्चन, मुस्लीम या धर्मांची निर्मिती घडून आली. या प्रत्येक धर्माच्या विचारधारा, धार्मिक विधी, कर्मकांड, चालीरिती, सण-उत्सव, पूजाअर्चा आलेल्या दिसून येतात. प्रस्तुत कादंबऱ्यांमधून उदाहरणादाखल काही धार्मिक घटकांचा उल्लेख आढळून येतो.

### **१.२.१३.१. ययाति :**

प्रस्तुत कादंबरी पौराणिक असल्यामुळे पुराणानुसार अनेक धार्मिक बाबींचा समावेश झाला आहे. 'गंधर्व लोकातून यज्ञ क्रियेसाठी त्यांनी आणलेल्या तीन अग्नींचे मंदिर तर हस्तिनापूरचे भूषण होते.'(पृ.१९) याचाच अर्थ हस्तिनापूरमध्ये यज्ञविधी यथासांगपणे पार पडत होते. देवयानीचे पिता दैत्यगुरु शुक्राचार्य तपश्चर्येला बसत. अशाप्रकारे धार्मिकतेचा उल्लेख कादंबरीत येतांना दिसतो.

याशिवाय शाप देणे, उशाप देणे, पूजा-अर्चा, विधी यांमधूनही धार्मिकतेचा प्रत्यय प्रस्तुत कादंबरीत येतो.

**१.२.१३.२. रथचक्र :**

प्रस्तुत कादंबरीला कोकणची प्रादेशिकता लाभलेली आहे. कोकणातील धार्मिकता त्या अनुषंगाने कादंबरीत येते. 'ती' चा नवरा म्हणजे मौनीबाबा सापडल्याचे वृत्त तिच्या घरच्यांना समजले तेव्हा 'शंकराच्या पिंडीवर लघुरूद्राचा अभिषेक सुरू झाला. लक्ष बिल्वपत्र वाहण्याचे उदक सुटलं.' (पृ.२) बिल्वपत्रांचा अभिषेक यातून मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबाची धार्मिकवृत्ती दिसून येते.

**१.२.१३.३. स्वामी :**

माधवराव पेशवे यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली त्यांचा बराचसा वेळ हा पूजापाठ यामध्ये जात होता. याची जाणीव रामशास्त्रींनी माधवरावांना करून दिली. प्रजेचे रक्षण व प्रजेसाठी वेळ देणे हाच राजाचा धर्म असावा, असे ते सुचवितात. पुजा-अर्चा हे धार्मिक विधी कादंबरीत दिसतात.

**१.२.१३.४. स्मरणगाथा :**

लेखक पतरवाड्यात राहत असताना तेथिल ख्रिश्चन धर्माच्या प्रार्थनास्थळांविषयी म्हणजे चर्चविषयी विवेचन करतो. सिव्हिल लाइन्समध्ये दोन चर्चेस होती आणि तिसरे एक विद्वांसाच्या बंगल्यापलीकडे, शाळेच्या मैदानाजवळचे त्या चर्चमध्ये फक्त साहेब मंडळीच जात, गोऱ्यांशिवाय त्या चर्चमध्ये कुणीही प्रार्थनेला जात नसे. दुसऱ्या चर्चमध्ये बाटलेले गोंडकोरकू ख्रिश्चन जात होते. म्हणजे कोणी कोणत्या चर्चमध्ये जायचे हे ठरलेले होते.(पृ.११) धार्मिक स्थळांतही जातीवरुन भेद केला जात होता.

लेखकाच्या मते, ''आपण ख्रिश्चन तितके एक असं समजतो. पण हे काही खरं नाही. त्यांच्यातही प्रॉटेस्टंटांची खिचडी निराळी शिजते. कॅथॉलिकांची निराळी, गोवानीज किरिस्ताव तेवढे निराळा गट करीत.(पृ.२६) परतवाड्यामध्ये रोमन कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंण्ट या दोन्ही किरिस्ताव पाद्रींची प्रचारकेंद्रे होती. गोपाळला वखारवाल्याने स्वतः घरी नेले. त्याचा उद्देश त्याला स्वतःचा मुलगा म्हणून गोपाळला वाढवायचे होते. वखारवाल्याला मुलबाळं नव्हते. वखारवाला गोपाळला घेऊन गारपीरला गेला तेथे सुंता करायचे ठरले पण गोपाळच्या हा सर्व प्रकार लक्षात

आल्यावर 'ब्रम्हांड गरगरलं गेलं, पळालं पाहिजे. आता मात्र पळालचं पाहिजे. नाही सृष्टी बुडाली.' असे गोपाळला मनोमन पटले. वखारवाला त्या पोराला मुसलमान करण्यासाठी धडपडत होता. गोपाळ मात्र स्वतःचे जीवनसर्वस्व सांभाळण्यासाठी धावत होता. वरील प्रसंगात हिंदू धर्मीय गोपाळ मुसलमान धर्मात धर्मांतर होता होता वाचला. परभणी परिसरातही हिंदू धर्मीयांवर अन्याय होत होता. निजामशाहीत हिंदू धर्मीयाच्या सत्यनरायणाची पूजा यासारख्या धार्मिक विधीला प्रचंड विरोध होता. भजनाचा आवाज मंदिराबाहेर नको त्याचबरोबर मंदिरांची उंची मशिदीच्या उंचीपेक्षा जास्त नको या सारख्या जाचक अटी होत्या.(पृ.२८०)

अशा प्रकारे स्मरणगाथा या कादंबरीत धार्मिकता या मुद्दयाचे विवेचन करताना ख्रिश्चन धर्म त्यांचे दोन पंथ तसेच मुस्लीम राजवटीचा हिंदूवर होणारा अन्याय, स्वतः लेखकाच्या जीवनात आलेला धर्मातराची समस्या यांचा लेखकाने आढावा घेतला आहे. याबरोबरच त्याला अनुभवास आलेल्या परधर्मसहिष्णू असलेल्या मुसलमान व्यक्तीचा उल्लेख करण्यास लेखक विसरत नाही. मराठवाड्यातील एका गावचा मुसलमान पाटील पंढरीचा वारकरी होता. 'नियमानं वारी करायचा'(पृ.२१८) एकदा त्याने शेजारच्या गावात गोपाळचे कीर्तन ऐकले. गोपाळला स्वतःच्या गावी निमंत्रण दिले व मशिदीसमोर कीर्तन आयोजित केले. गोपाळचे मशिदीसमोर कीर्तन झाले.(पृ.२१८) यामधून सर्वधर्म समभावाची पेरणी गोपाळने व मुसलमान पाटलाने केलेली आपणास जाणवते.

लेखकाचे वडीलही इतर धर्माचा आदर करणारे होते. दादा म्हणाले, ''सगळ्याच धर्मांची तत्वज्ञाने अशी सारखी असतात. तेव्हा धर्मग्रंथाचा द्वेष करू नये.''(पृ.१३). दादांच्या मनावर निरनिराळ्या धर्मांच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाचा परिणाम झाला होता. त्यामुळे ते उदारमतवादी झाले होते. दादांना उर्दू-अरबीही चांगले येत होते. ते कुराणही वाचू शकत होते. थोडक्यात लेखकाच्या कुटुंबात धार्मिकतेच्या बाबतीत उदारमतवादी, सर्व धर्माला सामावून घेण्याचे संस्कार होते.

**१.२.१३.५. झोंबी :**

आनंद यादवांच्या प्राथमिक शिक्षणापासून त्यांच्या शाळेत चांगले संस्कारक्षम कार्यक्रम राबविले जात होते, याचा उल्लेख लेखकाने केला आहे. आनंदच्या शाळेत दर शुक्रवारी सरस्वती पूजनाचा कार्यक्रम होत असे. 'सरस्वती पूजनाच्या दिवशी मुली फेर धरुन गाणी म्हणत.(पृ.५०) शाळेमध्ये विद्येची देवता सरस्वतीची मनोभावे विद्यार्जन करणारे विद्यार्थी मनोभावे पूजा करीत होते.

### १.२.१३.६. झाडाझडती :

जांभळी गावातील लोक धर्मभोळे होते. काळूबाई धरणाचे काम होऊ देणार नाही अशी गावकऱ्यांना खात्री होती. त्यासाठी जांभळीकर धार्मिक लोक काळूबाईला श्रद्धेने हात जोडीत होते. जांभळी गावातील भोळी-भाबडी जनता गावातील देव-देवतांना धार्मिकतेच्या अनुषंगाने भजत होते.

### १.२.१३.७. राघववेळ :

श्रावणातील शेवटच्या सोमवारी वसारी गावात लाखोलीची पंगत होत असे. महादेवाच्या मंदिरावर ही सार्वजनिक लाखोलीची पंगत होत असे. श्रावणातल्या उपवासांचे उद्यापनच जणू त्या पंगतीने होई. गेल्या कित्येक वर्षापासून तो प्रघात टिकून होता. श्रावणातील हा एक महत्त्वाचा धार्मिक विधीच होत होता. इनाईचा उत्सव हा ही धार्मिक विधीच होता.

मुसलमान खाटीक असलेल्या मुसाचा उल्लेख कादंबरीत करताना लेखक म्हणतो, ''मुसा खाटीकाच्या दुकानासमोर जाऊन वालंबी थांबली. मुसाचा मुलगा अकबर दुकान पाहत होता, गर्दीतच भुग्याची बायको तान्ही दिसल्याने वालंबी म्हणाली, 'ताई व ऽऽ' तिने मागे वळून पाहिले. 'तुहं झालं की थांबशील आमच्यासाठी' 'ठर ना वो, ते बी काटता ना! इसकू तो लगाने दे जरा''(पृ.५१) अकबर म्हणाला. अशाप्रकारे कादंबरीत गावातील मुसलमान धर्माच्या मुसा व अकबराचा उल्लेख लेखकाने केलेला आहे.

### १.२.१३.८. ताम्रपट :

काशिनाथ ढोरमोले वकिलाची पत्नी सावित्री अतिशय श्रद्धाशिल होती. प्रत्येक गणेश चतुर्थीला ती ब्राह्मणांकरवी घरात सत्यनारायणाची कथा वाचून घ्यायची. कादंबरीच्या कथानकाच्या ओघात लेखकाने आंतरधर्मीय विवाहाला मान्यता दिली आहे. मोमिन मिसाळ व आवडाबाईची मुलगी ललिता जातीने कोष्टी म्हणजेच हिंदू धर्मीय होती. म्हणजेच हिंदू मुस्लीम विवाह संघर्षाविना पार पडला होता. याचा उल्लेख धार्मिकतेच्या बाबतीत कादंबरीमध्ये येतो. कादंबरीतील ही बाब धार्मिकतेची बाब अधोरेखित होणारी आहे.

### १.२.१३.९. तणकट :

प्रस्तुत या कादंबरीत आंबेडकरांनी धर्मांतर का केले? या विषयी विचार व्यक्त केले ते पुढील त्यांच्या भाषणातून स्पष्ट होतात. 'धर्म ही अत्यंत गैरलागू आणि टाकाऊ गोष्ट आहे. सत्यपाल

धर्मरक्षींनी सुरूवात केली. असं मी म्हणत नाही तर बाबासाहेब म्हणतात. धर्म सोयीसाठी उदयाला आले आणि धर्माने माणसांवर अनन्वित अन्याय केला. धर्माने माणसाला माणुसकी शिकवण्याचे काम कधीच केले नाही. धर्माने माणसाला बुळे बनवले हे आपण लक्षात घेतले पाहिजे. धर्म ही शोषणाची यंत्रणा आहे. शोषणाचे दुसरे नाव धर्म आणि या शोषणातून बाहेर पडण्यासाठी बाबासाहेबांनी धर्मांतर केले. या पाठीमागे त्यांच्या पूर्वीच्या धर्माने त्यांचा अनन्वित छळ केला. त्या धर्माचे नाव घेण्याची सुद्धा मला लाज वाटते. मी ते नाव मरेपर्यंत कधीही घेणार नाही. इथल्या प्रत्येक दलित तरूणाने अशी शपथ घेतली पाहिजे. हा धर्म आमचा शत्रू आहे. या धर्मातील सर्व माणसे आपली शत्रू आहेत. या शत्रूच्या छाताडावर बसून आपल्याला आपले हक्क मिळवले पाहिजेत. या धर्मातल्या या चोर लोकांना हे हक्क आम्हाला देताना यातना होत आहेत. त्यामुळेच ते राखीव जागांबाबत बोंब ठोकत आहेत.'(पृ.३६) डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या धार्मिकतेच्या बाबतीतील हे विचार कादंबरीत येतात. आंबेडकरांच्या आदर्श विचारांची स्वतःला आंबेडकरवादी मानणाऱ्या सत्यपाल धर्मरक्षीचे सखोल ज्ञान नसल्याने त्यांचे भाषण श्रोत्यांना रूक्ष वाटले.

**१.२.१३.१०. डांगोरा एका नगरीचा :**

अरविंद राजसला आपल्या आई-वडीलांच्या धर्माविषयी तसेच धार्मिकतेच्या बाबतीत स्वतः विषयीचे विचार मांडतो. ''जन्मानं मी ख्रिश्चन. पपां ख्रिश्चन म्हणून. पण मी स्वतःला हिंदू समजतो. माझ्या आईचा धर्म तो माझा. पपांना वाटलं होतं. लग्नानंतर ती येशूच्या कळपात येईल म्हणून. नाही आली खूप धुसफुस चालायची त्यांच्यात. विठ्ठल-रखुमाईची पुजा आई करायची, शंकराची, देवी भवानीची करायची. मला म्हणाल तर श्रीकृष्ण आवडतो. जीवसखा वाटतो. वास्तवातलं विश्वरुप दाखवणारा. पपांच्या येशूला योगेश्वर श्रीकृष्णाची एक शलाका मी मानतो. एक विभूती.''(पृ.४३२) अरविंदने ख्रिश्चन धर्म स्वीकारला नाही. पण येशूला ही नाकारले नाही. येशुला योगेश्वर श्रीकृष्णाच्या रुपातील एक शलाका त्याने मानला. परमेश्वरातील अद्वैतभाव त्याने व्यक्त केला आहे. कादंबरीत अनेक ठिकाणी ख्रिश्चन, हिंदू, मुसलमान इत्यादी धर्मांचा उल्लेख जागोजागी आलेला आढळतो.

**१.२.१३.११. बारोमास :**

प्रस्तुत कादंबरीत हनुमान या शक्तीच्या उपासकाची स्तुती गाईली गेलेली आहे. हनुमानाने बलाची उपासना केली. जगाला बळ दिले. हनुमान म्हणजे शक्तीचा अन् भक्तीचा देव. आपल्या मनात हनुमानाविषयी भक्ती पाहिजे. आपल्याला जर रात्री-बेरात्री फिरायचे असेल, भुताखेतापासून

बचाव करायचा असेल तर पुजापाठासारखे काही धार्मिक विधी करणे गरजेचे आहे. एकदा मारुती रायाच्या पायाचा शेंदूर कपाळी लागला की भीती पळून जाते. सोनेरी टोळीसाठी बनुबाने केलेला उपदेश धार्मिक आहे. अशा प्रकारे धार्मिकतेचा उल्लेख कादंबरीत जागोजागी येतो.

**१.२.१३.१२. भूमी :**

कादंबरीची नायिका मैथिली तिच्या आईवडिलांचा आंतरजातीय प्रेमविवाह झाला होता. आई तामिळी-ख्रिश्चन व वडील हिंदू धर्मीय होते. मैथिलीच्या आईने पतिचे नाव लावले होते. पण धर्म बदलला नव्हता. ती येशूसमोर कॅण्डल लावायची पण तिने मैथिलीवर फक्त ख्रिश्चन धर्माचा प्रभाव पडावा अशी अपेक्षा केली नाही. कारण तिने एकदा मैथिलीजवळ उदबत्त्या दिल्या आणि तिला म्हणाली, ''जा, उदबत्त्या लावून ये, ॲन्ड प्रे फॉर यूवरसेल्फ! मी चर्चमध्ये कॅण्डल लावून आले आहे.''(पृ.१०) या वरील उदाहरणावरून लेखिकेला मैथिलीच्या आईच्या माध्यमातून स्वधर्माबद्दल प्रेम आणि पतीच्या धर्माबद्दल तिला असलेला आदर व्यक्त करावयाचा आहे आणि यामुळे जेव्हा मैथिलीच्या आईचा मृत्यू झाल्यावर तीला पुरायचे की जाळायचे असा लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता.(पृ.२३) मैथिली मात्र वेगळ्याच वृत्तीची होती. आईने ती आजारी असताना रविवारी मैथिलीला चर्चमध्ये जायला सांगितले किंवा समुद्रावर जातेस तेव्हा देवळात जाऊन उदबत्ती लावण्यास सांगितले.(पृ.१७) मैथिलीला मात्र या दोन्हीही गोष्टी करायच्या नव्हत्या यावरून मैथिली मात्र नास्तिक वृत्तीची वाटते. मैथिलीने तिच्या आईच्या मृत्यूनंतर तिचा देवाबद्दल असणारा तिरस्कार तिच्या कृतीतून व्यक्त केला आहे. देवळातील उदबत्त्या पायाखाली चिरडल्या. दिपमाळेच्या वाती फुंकरीने विझवल्या.(पृ.२४). तेथील परिसरातील लोक पोंगल सण साजरा करत पण मैथिलीची आई तो साजरा करीत नाही. कारण ती ख्रिश्चन होती.

प्रस्तुत कादंबरीत धार्मिकतेचा प्रश्न पुन्हा एकदा उफाळून आला तो म्हणजे मैथिली व मिलींद यांचा प्रेमविवाह ठरण्याच्या प्रसंगी मिलींदच्या आईने विवाहास केलेला विरोध हा होय. मिलींदच्या आईचा विरोध मैथिलीवर असलेल्या संस्कारांना नव्हता. विरोध होता तो तिच्या धर्माला. कारण डॉ. विश्राम म्हणजे मैथिलीच्या बाबांशी विवाह करताना मैथिलीच्या आईने स्वतःचा धर्म बदलला नव्हता. आणि म्हणूनच मिलींदच्या आईने त्यांच्या लग्नाला प्रखर विरोध केला होता. मैथिली, शंतनू, गणेश, कावेरी व अंशुमन एकदा समुद्रकाठी फिरायला गेले तेव्हा त्या ठिकाणी मातीच्या ढिगाऱ्याला मूर्तीचा आकार लाभला आणि इतक्या पडझडीतून त्याला देवपण लाभले असे मैथिलीला वाटले. त्यापेक्षा आत्याने तिला दिलेला लंगडा बाळकृष्ण तिला बरा

वाटला. तेथे सगळ्यांनी त्या मूर्तिला नमस्कार केला पण मैथिलीने केला नाही. तेव्हा ढिगाऱ्याला नमस्कार करण्यापेक्षा मी खालच्या समुद्राला नमस्कार करीन असे मत मैथिलीने व्यक्त केले.(पृ.१४५) मैथिली बंगलोर युनिर्व्हसिटीत नोकरी स्विकारते तेव्हा तिच्या मित्राचे वडील म्हणजे डॉ. निरंजनचे वडील सूर्याला अर्घ्य देतानाचे वर्णन लेखिकेने केले आहे.(पृ.१९७) अशा प्रकारे काही प्रसंग लेखिकेने धार्मिकतेच्या बाबतीत उल्लेखलेले आहेत. लहानपणापासून तिला दैवाची साथ मिळालेली नाही म्हणून यदाकदाचित ती नास्तिक झाली असावी असे वाटते.

**१.२.१३.१३. उत्सुकतेने मी झोपलो :**

धुंडिराज गोविंद फाळके यांनी पिक्चर पॅलेस म्हणजे ज्या ठिकाणी चित्रपट दाखविले जातात ती जागा. तेथे ते उपस्थित होते. त्यावेळी चित्रपट होता 'ख्रिस्ताचे जीवन' त्याबाबत शास्त्रीबुवांनी म्हणजे धुंडीराज फाळके यांनी त्याबाबत जे लिहून ठेवले ते लेखकाने निवेदित केले. ख्रिस्त चरित्र पाहत असतना, ख्रिस्त हया व्यक्तिविषयी अंत:करणातील पूज्यभाव दृढ होत असताना ख्रिस्त चरित्रातील उदात्त प्रसंगांच्या दर्शनाने शास्त्रीबुवांच्या हातून नकळत टाळ्यांचा गजर होत असताना त्यांच्या अंत:करणात त्या दिवशी काहीतरी चमत्कारीक होवू लागले हाते. त्यांच्या चर्मचक्षूपुढून श्री येशू ख्रिस्त भराभर जात असता त्याच जागी भगवान श्रीकृष्ण, भगवान रामचंद्र, गोकूळ, अयोध्या ही नगरे ते त्या चित्रपटाच्या मोहात पडले. त्यांनी तो चित्रपट पुन्हा तिकीट काढून पाहिला. व त्यांना प्रश्न पडला. भारतपुत्रांस आमची भारतचित्रे पडद्यावर कधी दृष्टीस पडतील काय?(पृ.१२) अशा प्रकारचा ख्रिस्ती धर्माच्या श्रद्धास्थानी असलेल्या श्री यशू ह्या देवाचा उल्लेख लेखकाने प्रसंगानुरुप केलेला आहे.

**१.२.१३.१४. खारीच्या वाटा :**

प्रस्तुत कादंबरीत राजा कराडकर 'सत्यनारायणाची' पूजा पुस्तकात बघून म्हणायाचे यावरून लोक सत्यनारायणाची पूजा करीत होतो हे स्पष्ट होते तसेच राजा कराडकर दररोज गावातील मारुतीला दिवा लावीत असे. सत्यनारायण ही धार्मिक विधी मारुतीला दिवा लावणे, एवढाच त्रोटक भाग धार्मिकतेच्या अंगाने कादंबरीत येतो.

**१.२.१३.१५. फेसाटी :**

विविध जातीचा, प्रांताचा पगडा हा धार्मिक विधींवर असतो. धनगर समाजातील धार्मिकता दर्शविणारा विधी पुढील परिच्छेदातून दिसतो. ''पुनंव जवळ येत हुती. पुनवला दुध घालायचं हुतं.

डेर नव्हतं. येकदिशी माडग्याळाला जावून डेरं कुंभाराला करायला सांगटलं. काकूनं सहा शेर जुधळं निवडलं. पाच कुडतं, पाच बंगळी, पाच घास, जात्यानं भरडलं. सात मापटी भात किचडा कांडला. दुध केलं, वली पडद करुन कोणी जर आडवं आलं तर अपशकुन मानलं जायाचं. पिंपरीच्या झाडाची डावं केली. दोन मोठं डेरं ठिवलं. येकात दुधनं, दुसऱ्यात भात अनं तिसर मेथीचं गाडगं, कण्या शिजू घाटल्या. खाई केली. त्याच्यावर देवाच्या नावानं चांगभलं म्हणून खाईवर ठिवलं. मक्का, गहू, सजगुऱ्याचं दाणं, नाचण, पाचनिळवी, पाच कोळवी वरनं टाकलनं डेरं शिजवून घरात देव्हाऱ्याम्होरं खाली गवऱ्या लावून ठिवलं. तेझ्यावर डेर ठिवलं. प्रत्येक डेऱ्यासाठी पाच पाच पोळ्याची ताटं केली. डेऱ्याची सांच्याला पुज्या केली.

पहाटच्या दरम्यान डेऱ्यातनं दुधाची वाफ आपूआप चालू झाली. काकूनं देवाचं नाव घेटलनं डेऱ्यातलं दूध ऊतू गेलं. सकाळ आठ वाजूपतूर डेऱ्यातनं रट्ाऽऽ रट्ाऽऽ असा आवाज घुमत हुता. काका मायाक्काची कांचोळी अंगात घालून हातात येताची काठी घिऊन, खांद्यावर घोंगड टाकून पाच गावची वारी मागायला गेला. दिसभर वारी मागून दिस मावळताना माघारी आला. तवा गणं सवासनी बसल्या. धेवाऱ्यावर उदकाडी लावली. सगळ्या गणं सवासनीच्या ताटात दुध कण्या वाढल्या. गणाच्या कपाळावर कुंकवाचं नाम वडला. आडव्या भंडारा लावला. सवासनीला कुंकू लावला. सगळ्यांनी हात जोडला. मग सगळया देवाची नाव धिवून चांगभलं घालणं चालू झालं.

आक्का मायक्काचं चांगभलं, कृष्णा कोयनाचं चांगभलं, शिंगू बिरुचं चांगभलं, हालाळबाईचं चांगभलं, देवाच्या डेऱ्याचं चांगभलं, मायक्काच्या दुधाचं चांगभलं, मायक्काच्या घोड्याचं चांगभलं, डोंगरच्या हरीचं चांगभलं, मायक्काच्या बंधूचं चांगभलं, मायक्काच्या सबीन्याचं चांगभलं, मायक्काच्या बोन्याचं चांगभलं.''(पृ.१७३) अशा प्रकारे विविध जातीतील लोकांचा त्या त्या प्रांतांच्या रुढी परंपरेनुसार धार्मिकतेचा पगडा विशेष करुन वरील वर्णनातून स्पष्ट होतो. अशा प्रकारचा धार्मिक विधी लेखक आपल्या समोर वरील प्रसंगातून साक्षात उभा करतो.

**१.२.१४. अश्लिलता :**

लेखक कथानक साकार करताना आशयाच्या अनुषंगाने कधी-कधी अश्लिलतेचे चित्रण करतो. अनेक घटना-प्रसंगात अश्लिलता येते. ती त्या ठिकाणी क्रमप्राप्तच असते. ''कोणताही कलात्मक अनुभव अश्लील असत नाही, लैंगिक वृत्तीचा अनुभव कलात्मक अलिप्ततेने अभिव्यक्त होतो. व त्याच अलिप्ततेने रसिक त्या अनुभवाचे परिशीलन करतो. तेव्हा असा अनुभव

अश्लिल राहत नाही. तो सौंदर्यानुभवच असतो.''[६२] कधी कधी वाचक तो अनुभव विरेचन (कॅथॉर्सिस) म्हणून घेतो तरी कधी तो सेंद्रियत्वापर्यंत जातो. काहीही असो, अश्लिल वागणे ही मात्र अशोभनिय गोष्ट आहे.

**१.२.१४.१. ययाति :**

ययाति हा वासनेच्या आहारी गेलेला राजकुमार घोड्यावरून पडल्यानंतर बेशुध्द पडलेला ययाति शुद्धीवर येतो तेव्हा त्याच्यासमोर असलेली अलका ही त्याच्या वासनेची पहिली बळी ठरली. खर तर, अलकेच्या आईचे दूध पिलेला ययाति खर तर तिचा एका अर्थी भाऊ ठरतो. पण त्या अलकेच्या सौंदर्याच्या मोहाला तो बळी पडतो. रतीची सुंदर मुर्ती पाहून तो त्या मुर्तीची चुंबने घेतो. वडील मृत्यूशय्येवर असताना मृत्यूच्या भीतीने दुःखी झालेला ययाति मुकुलिकेच्या बाहुपाशात तो व तिच्या मुकुलिका असे एकरूप होतो. ज्या तारकेचे बोबडे बोल त्याने तारुण्यात ऐकलेले असतात ती तारका त्याच्या मित्राची पुतणी असते. ती सुध्दा त्याच्या वासनेचे भक्ष बनते. परममित्र माधव त्याची वाग्दत्त वधू माधवी हिचा ही तो उपभोग घेतो. ही माधवी वेडी होते व ह्या वेडातच स्वतःचा मृत्यू ओढवून घेते. पुरूची प्रेमिका की जी त्याची भावी सून होणार असते ती सुध्दा दुर्दैवी ठरली असती पण तिच्याबाबतीत दैव बलवत्तर म्हणून ती वाईट प्रसंगातून बचावली. अशा प्रकारे ययातिच्या बाबतीत अश्लिलतेची उदाहरणे देता येतील.

**१.२.१४.२. रथचक्र :**

प्रस्तुत कादंबरीतील कृष्णाताईचं वागण अश्लिल वाटते. नायिकेच्या मुलाला हिशोबाचे काम दिले होते. त्याला प्रथम आईला व बहिणीला लुगडी व घरच्यांसाठी जेवणाचे डबे आणि त्याला अभ्यासासाठी स्वतंत्र खोली देऊन तिच्या उपकाराच्या ओझ्याखाली वाकवलं. साधारण अठरा वर्षाचे मुलं, की ज्यानं नुकतेच पौगंडावस्थेत पदार्पण केले आहे. त्याच्या भावना चाळवल्या व त्यामुळे इतक्या हुशार मुलाचे अभ्यासातले लक्ष उडविले. ही कृष्णबाईंची अश्लिलता लेखक दाखवितो.

**१.२.१४.३. स्वामी :**

यमुनी आणि केसरी या राघोबांच्या खास दासी त्यांचे पाय चेपीत होत्या. स्वरूपा पंख्याने वारा घालीत होती. रघूनाथरावांनी विचारले, ''स्वरूपा, आज श्यामा कुठे दिसत नाही?''स्वरूपा खरोखरच नावाप्रमाणे ठसठशीत बांध्याची, उंचीची होती. राघोबांची तिच्यावर मर्जी असे. श्यामा

बाईसाहेबांच्या तैनातीला आहे. तिला तिकडं कुणी धाडलं. मीच म्हटल्यावर तिला इकडे घे. आजच सांगते म्हटल्यावर रघूनाथराव 'आजच नको', पण दोन दिवसात ती नकळत इकडे येईल, असे कर.!

तेव्हा स्वरूपा म्हणते, ''जावा! जवळ असणाऱ्यांची किंमत नाही सरकारांना! लांबचीच जवळ करावीशी वाटतात?''

थोड्या वेळाने पाय रगडणाऱ्या यमुना केसरीला बाहेर जाण्यास सांगतात त्या दोघींबरोबर स्वरूपाही जायला निघते. तेव्हा रघूनाथराव स्वरूपास थांबण्यास सांगतात. पण सखाराम बापूंच्या आगमनामूळे स्वरूपालाही जाण्यास सांगतात.(पृ.५८) नाचणाऱ्या गाणाऱ्या बायका, वेश्या, दासी सर्वांशी संबंध ठेवून शौक पुरे करण्याची आणि त्यासाठी सरकारी खजिन्यातून खर्च करण्याची बेशरमवृत्ती...(पृ.१२२) या सर्वांचा विचार करताना 'स्वामी'मधील राघोबाचं पात्र म्हणजे एक विलक्षण स्वभावाचा नमुना वाटते.

**१.२.१४.४. स्मरणगाथा :**

लेखकाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी घराचा त्याग केला. मुंबईत असताना त्याला एका नको त्या प्रसंगाला तोंड देण्याची वेळ आली. आळंदी, पंढरपूर यासारखी मुंबईत अन्नछत्र नव्हती, की सदावर्त ही नव्हती. त्यामुळे ज्या-ज्या वस्तू गरजेच्या आहेत त्या-त्या सर्व वस्तूंची किंमत चुकवावी लागत होती. लेखकाच्या मते, ''कधी कधी ती शरीर देऊनही चुकवावी लागे. केवळ स्त्रीयांनाच नव्हे, पुरूषाला देखील.''(पृ.१२२) या मताला पुष्टी देणारा एक प्रसंग लेखकाने सांगितला तो असा...एका पारशी टॅक्सी ड्रायव्हरने लेखकाची गरज ओळखून त्याला रोज खायला देण्याचे कबूल केले. त्याच्या बदल्यात लेखकाने त्याची गाडी रोज धुवून द्यावी असे ठरले. तसेच रात्री गाडीत झोपायलाही परवानगी दिली. चार दिवस लेखकाने गाडी स्वच्छ धुवून दिली. चारही दिवस त्याचे मजेत गेले. पाचव्या दिवशी गाडी धुतल्यावर ड्रायव्हर लेखकाबरोबर हॉटेलात गेला. ड्रायव्हरने भक्ष्य-अभक्ष्य स्वतः खाल्ले व लेखकालाही खाऊ घातले. त्यानंतर दोघे ही गेले, गाडीत बसले. टॅक्सी ड्रायव्हरने त्याच्या पाठीवरून हाथ फिरवला. लेखकाला झोप येत होती. त्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता लेखक झोपी गेला. त्याने लेखकाच्या चड्डीत हात घातला. लेखक धडपडून उठून बसला. ड्रायव्हर म्हणाला, ''कुछ नही-कुछ नही- कल सिनेमा देखने जायेंगे?''(पृ.१२४) लेखकाने ड्रायव्हरला प्रतिकार केला. लेखक वश होत नाही हे लक्षात येताच क्षणी तो म्हणाला,

''चोरी करता है? पुलीस को सोंप दूंगा।''(पृ.१२४) चड्डीच्या गुंड्या लावीत लेखक तेथून निसटला. या प्रसंगानंतर लेखकाने मुंबईला कायमचा रामराम ठोकला.

अशाच प्रकारच्या प्रसंगाला पुण्यातही गोपाळला सामोरे जावे लागले. पुण्यात युनायटेड पिक्चर्स कंपनीत लॅबोरेटरीच्या इनचार्जने लेखकाला एका टेबलापाशी नेले. त्या टेबलावर एका डिशमध्ये रसायन मिसळले होते त्याने त्याला त्या रसायनाचा वास घ्यायला सांगितला. तो वास घेत असतानाच दिवा विझवला. फक्त एक तांबडा बल्ब जळत होता. 'त्याच्या प्रकाशात मांजरडोळयानं मला कवळलं. माझ्या प्रतिकाराला न जुमानतां त्यानं आपली भूक भागवून घेतली. मुंबईच्या त्या पारशी ड्रायव्हरला जे पुरतं साधू दिलं नव्हतं, ते यानं करून शरीर विटाळून टाकलं.'(पृ.१२९) तेथूनही दाराला धडका देवून लेखक बाहेर निसटला. प्रभा गणोरकर अश्लिलतेच्या संदर्भात विधान करतात, ''अश्लिलता हे साहित्यातील निकषतत्व नसून ती नितीशास्त्रातील आणि विधीशास्त्रातील संकल्पना आहे. अपक्व मनावर अनैतिक परिणाम घडण्याचा संभव असेल तेथेच ते चित्रण अश्लील ठरते.''[६३] येथे अपरिपक्व मनावर अश्लिलतेचा वापर केलेला दिसतो. अशा प्रकारच्या दोन अश्लिलप्रसंग लेखकाच्या जीवनात आले होते.

**१.२.१४.५. सत्तांतर :**

बेवारस दाढीवाला लाल बुडाच्या टोळीतील झिप्री, जाडी, भुली या तिन्ही माद्या गर्भार असतानाही तो त्यांच्याशी पुन्हा पुन्हा जुगतो (समागम) करतो. किवडी आणि मारकुटी या माद्याही दाढीवाल्यांशी जुगतात. नव्या बळकट अशा मोगाला बघून लाजरी वाफेवर आलेली असते. मोगाकडे कुल्ले करून लाजरी शेपटी आपटत त्याला भूलविण्याचा प्रयत्न करते. मोगा लाजरीच्या सूचक इशाऱ्याचा फायदा घेऊन वारंवार तिला जुगत (समागम) करत राहतो. उनाडी अंगाने लहान असुनही वयात आल्यावर तिचे चाळे सुरू होतात. कुणाच्याही लहान धाकट्या वानरीला जवळ ओढून त्यांच्यावर नरासारखी चढायची उनाडीचा सवय होती. प्राणी विश्वातील ही नैसर्गिक प्रवृत्ती–भावना लेखकाने 'सत्तांतर'मध्ये अश्लिलतेचा पडदा आड न ठेवता स्पष्ट शब्दात मांडली आहे. ''वाफेवर आलेली वानरे वारंवार अपेक्षा करीत होती आणि नवशिका नर उणा पडत होता. वानरीच्या मागील पायांच्या मोडसांद्यांवर आपले दोन्ही पाय ठेवून त्यावर उभ्या शरीराचा तोल सांभाळणं त्याला काही केल्या जमत नव्हतं.''(पृ.३१) अशा प्रकारे अश्लिलतेच्या बाबतीत अनेक प्रसंग प्राणीविश्वाचे चित्रण करणाऱ्या 'सत्तांतर'मध्ये आले आहे. मानवी जीवनामध्ये ज्या प्रमाणे अश्लिलता दिसते त्याप्रमाणे प्राणी विश्वातही ती असते.

**१.२.१४.६. झोंबी :**

लेखकाचे वडील रतनू यांना त्यांची आई तारा मनात फारशी भरत नव्हती. आणि म्हणून त्यांच्या वडिलांनी बाहेर दोन मैत्रिणी केल्या होत्या. एक माळ्याची वांझोटी बायको आणि दुसरी शेजारच्या बोळातली एक जोगतीण.(पृ.१६) गावातील सावकार दत्तू सावकाराने आपल्या माडीच्या घरातून बायकामुलांना हाकलून देऊन एक नायकीण आणून ठेवली होती.(पृ.४१) गावातील डॉक्टर हा यल्लूमावशीचा ठेवलेला पुरूष होता. हा डॉक्टर धनगर समाजातील जोगतिणीला ठेवतो नि तिला घर बांधून देतो.(पृ.४२) गावात यल्लमा देवीची जत्रा भरत असे. जत्रेच्या शेवटच्या दिवशी जोगतिणी नटूनथटून गावात गात गात प्रवेशकरीत अनेक पैसेवाले, हौशी वतनदार लोक देखण्या तरुण जोगतिणी हेरत नि त्यांना 'ठेवत' किंवा त्यांच्याशी संबंध जोडून राहत.(पृ.२१८) गावाबाहेरच्या रानात मिलटरीची माणसं येतं होती. जोगतिणी त्यांच्या तळावर जाऊन गाणं म्हणत. 'कधी मधी जोगतिणींना गोरी गोरी पोरं होत.'(पृ.२७) वरील उदाहरणे देऊन लेखक जोगतिणींच्या समस्येचा त्यांच्या वर्तणुकीचा गैरफायदा घेणाऱ्या पुरुषी वासनेचा वा प्रवृत्तीचा मागोवा घेतो.

**१.२.१४.७. झाडाझडती :**

प्रस्तुत कादंबरीतील धरणग्रस्तांच्या मुलींवर गावातील टवाळ पुरूषांचा डोळा होता. धोंड्या छगनरावासारख्या उन्मत्त जमिनदाराला धरणग्रस्तांच्या पोरीबाळी म्हणजे हक्काची मालमत्ता वाटायची. धोंडयाने शेवंताला बाटवले होते. छगनराव धरणग्रस्त नामूची बायको शकूला रानकरवंद म्हणायचा. छगनराव शकूवर वाईट नजर ठेऊन होता. म्हणजेच धरणग्रस्तांच्या पोरीबाळींच्या अब्रुचे धिंडवडे उडविणे या सारखे अश्लिल प्रकार या गावात होऊ लागले होते. धरणग्रस्तांच्या उध्वस्त जीवनाचा गैरफायदा जमिनदार अश्लिलतेच्या अंगानेही घेतात.

**१.२.१४.८. ताम्रपट :**

प्रस्तुत कादंबरीत बुवासाहेब जाधवांसारख्या चारित्र्यसंपन्न व्यक्तिला राजकारणातून बेदखल करण्यासाठी जो सापळा रचला त्याचे वर्णन लेखकाने अश्लिलपणे केलेले आहे. बुवासाहेब जाधव सरकारी विश्रामगृहात गेले तेथे एक नागडी बाई आली व ती त्यांच्या पलंगावर बसली तेवढ्यात इंदिरा राजेंनी दरवाजा वाजवला. बुवासाहेबांनी दार उघडले तसे त्या आत आल्या व त्यांनी ते दृश्य पाहिले. इंदिरा राजे तेथून निघून गेल्या तेव्हा बुवासाहेब त्या विवस्त्र स्त्रीला म्हणाले, ''जा बाई

आता. झालं ना तुपलं काम!''(पृ.४६०) बापुसाहेब देशमुख यांच्यावरही अशाच प्रकारचा प्रसंग आला होता. पण ते मात्र त्यातून वाचले होते. थोडक्यात राजकारणामध्ये एखाद्या राजकारणी व्यक्तीला नामोहरन करायचे असेल तर त्या व्यक्तीचे विरोधक त्याला बदनाम करण्यासाठी त्याच्या चारित्र्याचे हरण करतात व सापळा रचून त्यात वरीलप्रमाणे अडकवतात.

**१.२.१४.९. राघववेळ :**

प्रस्तुत कादंबरीत कौशीच्या बाबतीत अश्लिलता घडलेली दिसते. तसेच कौशीची सासू गजरी तिचे भुजंगराव देशमुख यांच्याबरोबर असलेले संबंध अश्लिलतेचे, व्याभिचाराचे होते. गजरी भूकेसाठी व्याभिचार करताना दिसते. प्रस्तुत कादंबरीतील काही स्त्रिया पोटासाठी व्याभिचार करताना दिसतात.

**१.२.१४.१०. तणकट :**

प्रस्तुत कादंबरीतील बाळासाहेब शेडबाळेच्या शेतात कामाला जाता जाता सुली, रामा महाराची बायको व शेडबाळे यांचे सुत जुळले. दोघांमध्ये अनैतिक संबंध होते याची गावभर चर्चा सुरू झाली. 'आपोआप चर्चाही थंडावत गेली आणि बाळासाहेबाचं तिच्या घरात राजरोस येणं - जाणं सुरू झालं.'(पृ.३२) बाळासाहेब शेडबाळे व सुली ह्या दोघांच्या वर्तनाची चर्चा गावभर पसरली. त्यामुळे सुलीकडे पाहण्याची लोकांची दृष्टीच बदलली. सुली एकदा शामा मुळीकाच्या शेतावर जळणासाठी खोडवी आणायला गेली तेव्हा शामा मुळीक तिला त्याच्या खोपीजवळ ढीगभर खोडवी आहेत तेव्हा घेऊन जाण्याच्या आग्रहास सुलीने नकार दिला तेव्हा शामा मुळीक म्हणाला, ''का आमच्या सावलीचं वावड हाय वाटतं?'' मुळकान जीभ चावली. सुली मात्र तेथून निघून गेली. म्हणजेच सुलीचे वर्तन बिघडल्यामुळे शामा मुळीक सारखा व्यक्तीसुध्दा तिच्या कडे वाईट नजरेने पाहतो.(पृ.३१) बाळासाहेब शेडबाळे आणि रामा महाराची बायको सुली यांच्यातील अनैतिक संबंध अश्लिलता दर्शविणारे आहेत. बाळासाहेब शेडबाळे आणि त्याची पत्नी तारा यांच्या पुढील संघर्षात्मक संवादातून स्पष्ट होते. बाळासाहेब संध्याकाळी आंघोळीसाठी न्हाणीकडे गेला. तेव्हा ताराने त्याला आंघोळीसाठी पाणी दिले. तेव्हा पाणी ओतताना तारा म्हणाली, ''आंगुळ करायचा ह्यो काय येळ काळ वकोत?'' तेव्हा बाळासाहेब म्हणाला, ''लई आंग भगभगल्यागत वाटाय लागंलय म्हणून गार पाणी वतून घ्यावं म्हणतोय.'' ताराच्या पुढील प्रश्नाने बाळासाहेबाच्या गुन्ह्याचा तिने पाढाच वाचला. 'म्हारणीजवळ झोपल्यावर आग उठना तर काय

हाईल''(पृ.६४) गावातही शेडबाळे व सुली यांच्या संबंधाविषयी लोक उघडउघड चर्चा करीत होते. शेडबाळे महारवाड्याच्या कल्याणासाठी त्यांचा नेता बनला होता. तेव्हा शेडबाळेविषयी पुढील हास्यास्पद विधान मांडले. ''अरं, म्हारवाड्याच न्हाई व्हईना कल्याण. त्या सुलीचं तरी कल्याण करतोय काय न्हाई''(पृ.१०४) अशा प्रकारे तणकट या कादंबरीत अश्लिलता दिसून येते.

**१.२.१४.११. डांगोरा एका नगरीचा :**

'सगळं साइखेडा निःशब्द झालेलं होतं. बखले शांत आणि अबोल होते. ग्लास हातात धरुन अर्धनग्न उर्वशीच्या रंगीत तस्बेरीकडे टक लावून बसले होते.'(पृ.४५४). बखले हा बाई आणि बाटली याचा शौकीन होता.

**१.२.१४.१२. बारोमास :**

एकनाथच्या कॉलेजमधील मुलं मुलींच्या शरिराकडे पाहून जो उल्लेख करीत तो अश्लिल आहे. 'मुलीची जिद्द आणि चिकाटी बरीच वाढीला लागली आहे.' हे त्याचे उदाहरण देता येईल.

**१.२.१४.१३. भूमी :**

'भूमी' या कादंबरीत मैथिलीची आई व मॅथ्युज टिचर यांचे एकमेकांशी असलेले संबंध हे समाजमान्य नव्हते. मॅथ्युज टिचरचे वारंवार घरी येणे हे शेजारी राहणाऱ्या लोकांना किंवा समाजाला रूचत नाही असे वाटते. तसेच देवस्थळेबाई आणि दांडेकर यांचे एकमेकांसोबत राहणे फिरणे समाजमान्य नव्हते असे वाटते. कारण त्यांचे संबंध हे अनैतिक होते. ते समाजाच्या दृष्टीने अश्लिलतेचे द्योतक होते.

**१.२.१४.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

प्रस्तुत कादंबरीत विलासचा मित्र हर्षद याच्या आईच्या अफेरचा उच्चार उघडपणे विलास त्याच्या तोंडावर करतो. विवाह बाहय संबंध हा समाजमान्य नाही. हर्षदच्या आई-वडीलांच्या वैवाहिक संबंधाला तडा गेलेला आहे. आईच्या वागण्याविषयी अमेरिकेत असलेल्या मामाला सांगण्याचा विचार हर्षदच्या मनात डोकावतो. 'तो तिकडे अमेरिकेत एखाद्या वेळेस त्याला ते नॅचरलही वाटेल. नाही वाटायचे. मामा अमेरिकेत असला तरी इकडच्या मेंटॅलिटीचा आहे.'(पृ.९८) म्हणजेच अमेरिकेसारख्या देशात विवाहबाहय संबंधांना मान्यता असेल असे हर्षदला वाटले असेल. 'Use it or lose it...' इट म्हणजे सेक्स. प्रौढ वयात सेक्स आवर्जून करा नाहीतर सेक्सची इच्छा हरवून बसाल आणि मग प्रौढ वयात स्त्री पुरुषात दुरावा येतो.(पृ.७९)

वर्तमानपत्रातील पुरवणीतील 'प्रौढ वय : पुन्हा वळण' असा लेख होता तो लेख हर्षछने वाचला. व अनुमान काढले. त्याच्या मम्मी-पप्पात ही असेच झाले असेल. तारुण्यातील मुलाने हे विचार वाचणे अश्लिल वाटते. हर्षदने केलेला हस्तमैथूनचा उल्लेखही अश्लिल वाटतो.(पृ.१०४) सुमाधुरीने रुमला येवून संपूर्ण कपडे काढून अंघोळ केली. इत्यादी प्रकारची अश्लीलतेची उदाहरणे देता येतील.

**१.२.१४.१५. फेसाटी :**

नवनाथ सांगलीला एका बिअरबारमध्ये मित्राच्या मदतीने कामाला लागला. तिथे घडलेला एक प्रसंग अश्लिलतेच्या बाबत नाथाने व्यक्त केला आहे. बिअरबारमध्ये बायकांना दारु पिण्यासाठी वेगळी व्यवस्था केली होती. तेथे दारु प्यायला आलेल्या एका बाईला खूप दारु चढली होती. ''बाई उठायला गेली तशी धाडदिशी खाली पडली. आता काय करायचं, पहिलचं अंग जडं हुतं. तसल्यात दारु चढली हुती. त्यो साहेबपण फुल झाला हुता. त्यो तिला उठवतं हुतानं ती तेला उठवतं हुती. अन् जाग्यावरण हालायबी यिना. पाताळ निम्म फिटलं हुतं. बाई निम्मी नागवीचं. त्यो भाद्दर लागला दाबायला. माझं डोळचं झाकलं. म्या खाली आलू. मला कसनुशी वाटलं. शिवराम मामाला सांगटलं. म्या जेवाण केलं. कुठलं जातया जेवाण डोळ्याम्होरं नुसती बाईचं दिसत हुती.''(पृ.१०९) अशा प्रकारे फेसाटी कादंबरीत अश्लिलतेचा वरील प्रसंग लेखकाने प्रामाणिकपणे मांडलेला दिसतो.

**१.२.१५. व्यथा-वेदना :**

**१.२.१५.१. ययाति :**

प्रस्तुत कादंबरीच्या माध्यमातून लेखकाने स्त्रीयांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. दैत्यगुरु शुक्राचार्यांची मुलगी देवयानी हिचे कचावर प्रेम होते. पण ते त्याने नाकारले होते. पुढे ययातिची पत्नी बनलेली देवयानी ययातिचे निख्खळ प्रेम मिळवू शकली नाही. शर्मिष्ठा वृषपर्वा महाराजांची कन्या असूनही तिला आयुष्यभर देवयानीची दासी बनून रहावे लागले. ययाति महाराजांनी तिच्यावर खरे प्रेम केले, पण तिला ते जगासमोर व्यक्त करता आले नाही. अलका या दासी कन्येवर ययातिने प्रेम केले. त्याची शिक्षा अलकेला मिळाली. तिचा विवाह तिच्या मावशीने एका शेतकऱ्याशी लावला. तिचे दुर्दैव तिचा नवरा जुगारी निघाला. योगायोगाने तिची ययातिशी भेट झाली, ययाति तिला सोबत घेऊन हस्तिनापूरला आला. महाराणीने तिला विष

पाजले. व त्यातच तिचा अंत झाला. ययातिच्या मित्राची म्हणजे माधवची पुतणी तारका ही ययातिच्या शारीरिक वासनेला बळी पडली. त्यातच ती वेडी झाली. आगीच्या ठिणग्यांना फुले समजून आगीत शिरली व जळून मेली. स्वतः ययातिची आई, नहुष महाराजांची पत्नी म्हणजेच महाराणी ही देखील फार सुखी होती असे नाही. नहुष महाराज इंद्राणीच्या मोहात पडले, तेंव्हा महाराणीला किती वेदना झाल्या? सतत आपल्या सौदर्याच्या बळावर तिला पतीला मुठीत ठेवण्याचा प्रयत्न करावा लागला. ययाति ह्या कादंबरीमध्ये असलेल्या स्त्रिया मग त्या महाराणी असू देत. नाहीतर दासी असू देत त्यांना पुरुषी अहंकाराला व वासनेला बळी पडावे लागलेले असे दिसते. कादंबरीच्या शेवटी नायक 'ययाति' व्यथित झालेला आहे. शेवटी त्याला आपल्या कृत्याचा पश्चाताप होतो. हीच फार मोठी व्यथा-वेदना त्याला बोचत राहते.

**१.२.१५.२. रथचक्र :**

प्रस्तुत कादंबरीत 'ती' या कादंबरी नायिकेची व्यथा लेखकाने मांडली आहे. मुळात 'रथचक्र' ही कादंबरीच 'ति'च्या व्यथेची करुण कहाणी आहे. एकत्र कुटुंबात स्त्रियांना कोणताही अधिकार नसतो, हे ह्या कादंबरीतून सिद्ध हाते. 'ती'ला पत्नीचा दर्जा मिळाला नाही, मुलांसाठी तिने खस्ता खाल्या. पण त्या मुलांनी देखील आईचा म्हणून सन्मान केला नाही, याचे शल्य, टोचणी सतत तिला जाणवू लागते. म्हणून ती जीवन संपविण्याचा निर्णय घेते. तोही असफल होतो. अशी तिची व्यथा-वेदना लेखकाने तीच्या जीवनाची मांडली आहे.

**१.२.१५.३. स्वामी :**

प्रस्तुत कादंबरीत प्रजेच्या कल्याणासाठी लढणाऱ्या माधवरावांचा अंत हा वाचकांना वेदना देणारा आहे. माधवरावांना त्यांच्या आजाराच्या वेदना असहय करीत होत्या. 'श्रीमंतांना ताप भरला की अंगाची लाही लाही होऊ लागे, पोटात असह्य कळा उठू लागत. आधीच व्याधीने जर्जर झालेल्या शरीरात त्या वेदना सहन करण्याची ताकद उरली नव्हती. तो वेदना-दाह सुरु झाला की माधवरावांच्या आकांताला सीमा नसत.'(पृ.३८६) माधवराव असहय वेदनेने तडफडत होते. ओरडत होते. ''गजानना, किती अंत पाहशील? सोडव यातून. आईऽऽ गऽ!''(पृ.३८६) माधवराव प्रत्यक्षरित्या वेदना सहन करीत होते. पण रमाबाई माधवरावांच्या होणाऱ्या वेदनांनी व्याकुळ होत होत्या. माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाई सती गेल्या. ही व्यथा-वेदना अंगावर रोमांच उभी करणार

आहे. एकुणच कादंबरीचा अंत हा वेदनेनेच होतो. या साऱ्या प्रसंगाने वाचकांचे डोळे पाणावल्याशिवाय राहात नाहीत.

**१.२.१५.४. स्मरणगाथा :**

मराठवाड्यात मोगलाईतील जनतेला हिंदू जनतेवर अत्याचार होत होते. 'अन्याय अगदी शिगेस पोंचले होते. शहरांतूनच नव्हे, तर खेड्यापाड्यांमधून देखील राज्यकर्त्या मुसलमानांच्या अत्याचारांनी कळस केला होता.(पृ.३९७). धुळ्याचे अनंतरावबर क्षीरे नावाचे गृहस्थ. सामाजिक कार्यकर्ते हिंदूवर होणाऱ्या अत्याचारांविरूद्ध आवाज उठवित होते. क्षीरे पंचवीस कार्यकर्त्यांची एक तुकडी घेऊन मराठवाड्यांत सत्याग्रह करण्याच्या संकल्पाने प्रेरित होऊन, त्या योजनेचा प्रचार करीत आळंदीला गेले. त्यांनी सभेत निझामी सत्तेला आव्हान देण्यासाठी आठ दिवसांनी मराठवाड्यांत प्रवेश करणार आहोत तरी इच्छुकांनी यावे अशी घोषणा केली.(पृ.३९७, ३९८)

गोपाळही मारूतीबुवांच्या परवानगीने सत्यांग्रहात सामील होण्यासाठी औरंगाबादला गेला. तेथे मारूती चौकात कीर्तन करायला सुरूवात केली. कीर्तनात लोकांकडून 'वंदे मातरम्, वंदे मातरम्' म्हणून घेतले. उपस्थित असलेल्या पोलिसांनी गोपाळला पकडलं व लोकांना भडकवलं असे कोर्टात सिद्ध करून जेलमध्ये टाकलं.जेलमध्ये एका जवानाला खूप मारले. शेवटी तो जवान बेशुद्ध पडला.(पृ.४१०) वेतधारी वॉर्डर बेत घेऊन आला ए सुपरिंटेंडेट आज्ञा केल्यावर सत्याग्रहींच्या अंगावर वेताचे फटके मारले. गोपाळ म्हणाला, 'आम्हा सर्वांची' मनं पाझरली. पण त्या कृतान्ताला दया आली नाही.(पृ.४१३)

सत्याग्रहींमध्ये एक सन्याशी होता. तो गर्जला, ''जो बोले सो अभय । वैदिक धर्म की जय।''(पृ.४१४) बेत मारणाऱ्या वार्डरने पन्नास फटके मारले. त्याला धाप लागली पण संन्याश्यानं काहीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही तो पुन्हा गर्जला ''जो बोले सो अभय''(पृ.४१४) 'इतकं मारूनही सन्याशी डगमगला नाही. निःशस्त्र प्रतिकाराचं बळ काय असतं, हें सर्वांच्या ध्यानी ठसलं.'(पृ.४१४) उदाहरणादाखल ह्या व्यथा-वेदना येथे नमूद केल्या आहेत. याशिवाय गोपाळला आयुष्यात अनेक घटना-प्रसंगी भयानक व्यथा-वेदना सहन कराव्या लागलेल्या आहेत.

**१.२.१५.५. सत्तांतर :**

'सत्तांतर'मध्ये प्राणीविश्वातील वानरांच्या व्यथा आणि वेदनादायक वास्तव जीवनाचे चित्र लेखक आपणासमोर साकार करतो. प्रत्येक प्राण्याचा शेवट हा वेदना देणारा आहे. अन्नापासून ते निवाऱ्यापर्यंत आणि सतत भितीच्या छायेखाली राहणे ही व्यथा ह्या वानरांच्या टोळीमध्ये असलेली

दिसते. लालबुड्याला साप चावल्यानंतर होणारी वेदना हृदयद्रावक आहे. ''बघता बघता त्याच्या उजव्या हाताचा पंजा भप्प सुजला. वेदनांचा आगडोंब उसळला.''(पृ.३९) अशाप्रकारे संपुर्ण कादंबरीत व्यथा-वेदना व्यक्त झालेल्या दिसतात. त्यातच त्याचा शेवट होतो, ही एका नायकाची व्यथा लेखक  मांडतो. उदा.लांडीच्या पोराचा मृत्यूचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतो. ''पोराच्या डाव्या बगलेचा मोठा लचका त्यानं तोडला. सहा बोट रुंदीची जखम त्याच्या जबरदस्त सुळ्यानं पोराला झाली. त्या जखमेतून पोराची आतडी दिसायला लागली....''(पृ.४९) हे सर्व पाहून लांडी दुःखी होते. तिला बाळाला झालेल्या वेदना व त्यातून त्याचा झालेला मृत्यू ही व्यथा-वेदना लेखक वाचकांसमोर मांडतो. उदा.बोथरीचा रानकुत्र्यांकडून झालेला अंत, लेकरं गमावलेल्या वानरी, ठेचलेला, ओरबडलेला, रक्तबंबाळ झालेला मुडाचा चेहरा, पाण्याच्या काठी एकाकी पडलेला वानर टोळीचा नायक मुडा, इत्यादी उदाहरणे व्यथा वेदना स्पष्ट करतात.

**१.२.१५.६. झोंबी :**

प्रस्तुत कादंबरीत लेखकाने स्त्रियांच्या व्यथा प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेखकाची आई तारा एक वर्षाची असतांना तिचा विवाह झाला होता. सहा वर्षाची असतांना ती नांदायला गेली, तेंव्हा तिला सासरी अनेक जोखमीची कामे करावी लागत होती. कामे केली नाही तर तिचा नवरा मारझोड करीत होता. नणंदा, सासू, ह्याही तिचा छळ करीत होत्या. सतत मुलीच झाल्या, याचाही दोष त्यांनी तारालाच दिला होता. अनसा ही लेखकाची बहीण टी.बी.च्या आजारात गेली होती. शेवंताच्या जन्मानेच घरात मरणकळा आली. मुलगी झाली म्हणून ताराचा छळ झाला. त्यामुळे शेवंता योग्य संगोपनाअभावी चार वर्षाची असतांना देवाघरी गेली. हिरा नाळरोगी म्हणून तिच्या सासरच्यांनी तिचा छळ केला. चंदरा व सुंदरा या जुळ्या बहिणींमधील चंदरा अफूमुळे गतप्राण झाली, अशाप्रकारे कुटुंबातील स्त्रियांना अन्यायाला सामोरे जावे लागत होते. एकुणच स्त्रियांच्या व्यथा-वेदना लेखक कादंबरीत प्रभावीपणे मांडतांना दिसतो. आनंदा म्हणजे कुटुंबातील वंशांचा दिवा पण त्यालाही दारिद्र्यामुळे शिक्षण घेता येत नव्हते. अनेक अडचणींना सामोरे जात अनेक व्यथा-वेदना सहन करत तो शिक्षण घेत होता.

**१.२.१५.७. झाडाझडती :**

आंबेपुर जिल्ह्यामध्ये वाघेठाण तालुक्यातील जांभळी हे गाव धरणाच्या पाण्यात बुडाले होते. त्या गावाबरोबरच बिवेवाडी, कातोडवाडी, फणसवाडी, इरलेवाडी, साजुली, जांभळीखुर्द, जांभळी बु. ही गावे धरणात बुडाली. हजारो वर्ष चालत आलेली संस्कृती एका क्षणात नष्ट होते.

बेघर, भूमिहीन झालेले धरणग्रस्त सरकार देईल त्याठिकाणी राहतात. त्यांचे सारे वैभव, त्यांचे समाधानी जीवन क्षणात नष्ट होते. जगण्यासाठीच्या जीवघेण्या संघर्षाला सामोरे जावे लागते. न्याय हक्कासाठी झुंज द्यावी लागते. धरणग्रस्तांच्या वाट्याला आलेले हे एकूणच दुःख कधीही न संपणारे होते हीच त्यांच्या जीवनातील व्यथावेदना लेखक साकार करतो.

**१.२.१५.८. राघववेळ :**

प्रस्तुत कादंबरी ही जणू काय व्यथा आणि वेदनांचे भांडारच असलेली वाटते. कारण भुकेसाठी, पोटासाठी, शिक्षणासाठी होत असलेली हेळसांड मेलेल्या जनावरांचे वाटे करुन खाणे, तसेच मेलेल्या बकरीचे वाटे करुन घेणे. उदा.''बोटूसिंग आडेची बकरी मेली. तिचे वाटे टाकले म्या.''(पृ.२५७) तसेच गावातील पाटील, देशमुख वा उच्चवर्णियांच्या घरी, शेतात मातंग समाजातील स्त्रिया कामावर गेल्यावर त्यांचा शारीरिक छळ केला जातो. ही ह्या कादंबरीतील व्यथा असलेली दिसते. रघूला मेलेल्या जनावरांमधील वाटा, गिऱ्हाण मागणे, कौशिचा होणारा छळ, कोर्टातील न्यायनिवाडा, पायरूचे पोटासाठी लाचारीचे वागणे, शाळेतील रघूवरील प्रसंग, सितारामला धोंडी काढणे व त्यातच तो आजारी पडणे, हया सर्व गोष्टी वेदनादायक वाटतात.

मातंग समाजाचे हे हातावरचे पोट होते. काम केले तरच खायला मिळणार होते. कोणत्याही गाव जेवणाच्या प्रसंगी मातंगांनी सर्वांच्या शेवटी जेवायला बसण्याचा प्रघात होता. लाखोलीच्या पंगतीच्या (जेवणाच्या) वेळी नारायणाने असे सांगितले. ''समधे नका बसू. ज्याह्यानं लाकडं फोडले आस्तीन तेच बसा.''(पृ.१९) ज्यांनी लाकडे फोडली नसतील त्यांनी पंगतीवरुन उठा असे सांगण्यात आले. शेवटी ''सहादूने पत्रावळी टाकल्या. वाढ झाली. मांग जेऊ लागले. परंतु रघूचे घास मात्र काही केल्या खाली उतरत नव्हते. घशातच अडकत होतं.''(पृ.२१) या लाखोलीच्या जेवणाच्या पंगतीतून देवाच्या प्रसादासाठी किती जाणांना उठविले जात होते. रघूला मात्र घास घशाखाली जात नव्हता. तो विचार करीत होता. त्याच्या अंत:करणाला वेदना होत होत्या. आपले जीवन किती लाचारिचे आहे. ही व्यथा एकट्या रघूचीच नव्हती तर सर्व मांग वेटाळातील लोकांची होती.

**१.२.१५.९. ताम्रपट :**

प्रस्तुत कादंबरी नायक नाना सिरुर यांना निवडणूकीत पराभवाला सामोरे जावे लागते. त्यावेळी राजकारणातील ढासळत जाणाऱ्या मूल्यव्यवस्थेने ते व्यथीत होताना दिसतात. कादंबरीच्या

अखेरीस ते अंतर्मुख होताना दिसतात. ते त्यांच्या स्वतःचा स्वतःशी चाललेल्या प्रश्नोत्तरातून समजते.

कुठून कुठे आली, काय केलं, काय मिळवलं आणि मुख्य म्हणजे आयुष्याकडे आपल्याला काय हवं होतं? कशासाठी एवढी जिद्द, जिगर, योद्ध्यासारखी होती आणि नकरीही अनेकवेळा ठाम ठाम कैक गोष्टींना, ताम्रपट,पद्मश्री, सोयीसवलतींना, सन्मान वगैरेंना. मित्र मोठे झाले की त्यांना आपण दुरावलो? प्रत्येकवेळी आपणचं दूर केलं. मोठमोठाले उपदेश, तुकाराम भोइटे यांस पत्र. ह्या जीवनसंघर्षात पाय रोवून ठाम उभ्या राहणाऱ्या माणसांविषयी आपल्याला कधीच आस्था वाटली नाही काय? सत्काराला नकार, सन्मानाला नकार, आणखी काय काय नाकारत आलो आपण? या साऱ्याच्या मुळाशी एक अहंकार शुचिंतेचा, पावित्र्याचा, जे आपल्याजवळच सगळ्यात जास्ती होत असतं, असं सुप्त मनात, त्याचा अहंकार, वैराग्याच्या वृत्तीची अनासक्ती. मानवी दुःखाचे मुळ वासना, वासनेच्या मुळाशी अज्ञान, अज्ञानातून निर्माण होते दुरित. त्यातून वासना, पुढे दुःख, आपल्या साऱ्या स्वीकार-नकाराच्या मुळाशी हा अहंकार ती नव्हता? पीडीतांविषयी कणव फक्त आपल्यालाच वाटते, त्याच्या वेळेचा रस्ता आपल्यालाच ठाऊक आहे असं नाही? आपल्या मनात इतर मार्गांविषयी सुप्त तिरस्कार होता? की लवचिकताच नव्हती कोणत्याही प्रकारची? एस.एम. जोशींसारख्या ऋषितुल्य माणूस तिथे साने गुरुजी सभागृहात बोलत असताना जाऊन, 'अधिकार काय कोणाला इथे बसायचा, बोलायचा', असे आपण ताडताड म्हणालो, त्याच्या मुळांशी काय?(पृ.७९४) या उताऱ्यातून नानांची व्यथा लेखक मांडतांना दिसतात.

दादासाहेब भोईटे पाटलांना नातू झाला पण थोडा व्यंगात्मक जन्मला, त्याचे आठ फाटलेले, वरचा ओठ तर बेपत्ताच जवळपास. नाकाजवळ सशाच्या ओठासारखं विद्रुप. अशा व्यंगात्मक नातवाच्या जन्माने भोईटे पाटील व्यथीत होतात. 'सहकारी चळवळीचे प्रणेते, यशस्वी राजकारणी सारे काही पण दैवगतीपुढं तं खचून गेलेत.'(पृ.७९०) म्हणजेच सत्ता, संपत्ती कितीही असली तरी मनुष्य दैवापुढे मात्र हतबल असतो ही दादासाहेबांची व्यथा आपल्याला दिसते.

**१.२.१५.१०. तणकट :**

महारवाड्यातील म्हाताऱ्या आई-वडिलांची व्यथा लेखकाने मांडली आहे. पोटाला चिमटा घेऊन मुलांना शिकवायचे, शिक्षण घेऊन नोकरीला लागलेली ही सुशिक्षित पिढी नोकरीच्या गावी स्थायिक होते. पुन्हा आपले आई-वडील किंवा महारवाडा यांचे तोंडही पाहात नाहीत. महारवाडा त्यांना गलिच्छ वाटू लागतो.

तानू आजी एकटीच राहत होती. नवरा मरून तीन चार वर्ष झालेली. एकुलता एक मुलगा कोल्हापूरला पोलीस होता. सहा महिन्यातून कधीतरी एकदा गावाला यायचा. तानू आजीकडे फारसे लक्ष देत नव्हता. लग्न झालेल्या दोन मुली त्यांच्या हालाखीच्या संसारातही तानूआजीला जमेल तेवढं हव नको पाहात होत्या. मुलगा आपली काळजी घेत नाही. आपला सांभाळ करत नाही ही तानू आजीची व्यथा होती.(पृ.२४)

**१.२.१५.११. डांगोरा एका नगरीचा :**

राजा रघुवीरसिंह यांना वेळोवेळी अनेक दुःखदायक वेदनांना सामोरे जावे लागले होते. लेखक या वेदनेविषयी म्हणतो, 'राजांच्या मनात तर एक विचित्र वादळ उत्पन्न झालं. माणसांवर प्रेम करणाऱ्या अंतःकरणाला होतात त्या वेदना तर तिथं होत्याच. पण आपला क्षात्र धर्म ज्यांच्या सेवेला आपण रूजू केला ती सत्ता अशी पापकर्मी निघाली याचं तीव्र दुःख रघुवीरसिंहाना झालं. आपली निष्ठा आणि आपलं शौर्य हकनाक बाटून गेलं, याच शल्य खोल रूतत राहिलं.(पृ.३३) एकूणच डांगोरा एका नगरीचा ही कादंबरी व्यथा वेदनांनी साकार झालेली आहे. समाजातील अनेक लोकांना सर्वसामान्यांना व्यथा वेदनांना सामारे जावे लागते. सर्वसामान्य प्रामाणिक लोकांच्या वाट्याला व्यथा-वेदनांनी ग्रासलेले दिसते. राजस, क्लारा, राणी दमयंती हन आपल्या वैयक्तिक आयुष्यात व्यथा-वेदनांच्या बळी ठरलेल्या आहेत. अरविंद, माधवराव देसाई हे ही शेवटी दुःखी असलेले आपणास दिसतात.

**१.२.१५.१२. बारोमास :**

''सदानंद देशमुखांनी शीर्षकापासूनच शेतजमीनीशी आपली नाळ बारोमास जुळवून ठेवत, शेतीच्या जीवनातील सतावणाऱ्या वेदना आणि समस्यांचे प्रत्ययकारी चित्रण केले आहे.''(पृ.५१८) अलकाच्या आयुष्यात लग्नानंतर व्यथा-वेदनाच दिसतात. एकनाथ एवढे शिकूनही नोकरी नसल्यामुळे सतत व्यथीत व वेदनादायी जीवन जगताना दिसतात.

**१.२.१५.१३. भूमी :**

'भूमी' या कादंबरीत स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या दुय्यम स्थानामुळे स्त्री ही व्यथीत होताना दिसते. कादंबरीनायिका मैथिली आई-वडिलांच्या प्रेमाला पारखी झाली. मिलिंदचे व मैथिलीचे एकमेकांवर प्रेम होते पण तेथे आई व वडिलांच्या आंतरधर्मीय विवाहाचा मुद्दा अडसर झाला शंतनू सारख्या मुलाबरोबर नाइलाजास्तव मैथिलीने विवाह केला परस्परविरोधी वृत्तीमुळे त्यांच्या मनाच्या

तारा जुळल्या नाहीत. मैथिलीसारखी यशाची शिखरे पार करणाऱ्या पत्नीचा अभिमान वाटणे तर दूरच उलट शंतनू तिचा तिरस्कार करीत होता. ही मैथिलीची व्यथा लेखकाने अधोरेखित केली आहे. मैथिलीची मैत्रिण किर्ती लग्नानंतरही माहेरीच राहिली. तिचा नवरा, सासू, सासरे हे सर्वजण डॉक्टर होते. कुटुंबातील सर्वांचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन फक्त असा होता की तिने फक्त घर सांभाळावे. सर्वांची सेवा करावी. एक उत्तम गृहिणी म्हणून राहवं. पती पासून ती अलिप्त झाली. पतीने दुसरे लग्नही केलं कीर्ती एकाकीपणे राहू लागली. मानसिक, शारीरिक दृष्ट्या विकलांग असलेल्या व्यक्तिमत्वातून लेखिकेने लली व तिचे कूटुंबिय यांची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अशा प्रकारे 'भूमी' या कादंबरीत लेखकाने पुरूष प्रधान संस्कृतीत स्त्रियांची होणारी अवहेलना तसेच स्त्रिने यशाची शिखरे पार केल्यास तिला मिळणारी पतीची वागणूक तसेच विकलांग व्यक्ती व त्यांच्या समस्या, व्यथा, वेदना कादंबरीच्या माध्यमातून मांडल्या आहेत.

**१.२.१५.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंब व्यवस्थेत मग ते कुटुंब गरीब असो, मध्यमवर्गीय असो किंवा श्रीमंत असो, प्रत्येकाची व्यथा-वेदना वेगळी असते. मध्यमवर्गीय कुटुंब व्यवस्थेची मांडणी करतांना शाम मनोहर यांनी माणसाच्या आयुष्यातील कुटुंबव्यवस्थेचे महत्वपूर्ण स्थान अधोरेखित केले आहे. माणसाला ह्या कुटुंब व्यवस्थेत जगतांना त्याला त्याच्या पातळीवर वेगवेगळ्या व्यथांनाही सामोरे जावे लागते. त्याच्या मनाला झालेल्या आतंरिक वेदना बैचेन करतांना दिसतात. लग्न, नोकरी, व्यवसाय, एकत्र कुटुंब, विभक्त कुटुंब, लैंगिक भूक, सण, विधी, उत्सव, आजारपण, सेवानिवृत्ती, एकटेपण, स्वयंपाक, करियर करण्याच्या मागे लागलेला तरुण, घरातील वयस्कर माणसे, आपले नातेवाईक, सगेसोयरे इत्यादींची कुटुंब व्यवस्थेत जगतांना होणारी तग-मग, प्रचंड इच्छाशक्ती, असुया, लोभ, मत्सर मनावर होणारे विविध आघात, आयुष्याच्या शेवटी मृत्यूशी करावा लागणारा सामना इत्यादी बाबींमध्ये व्यथा-वेदना माणसाला सदैव टोचणी लावत असतात. ह्या व्यथेतून वा वेदनेतून माणूस जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न करतो. प्रस्तुत कादंबरीतील व्यथा वेदना उदाहरण दाखल पाहू. हर्षद विलासला म्हणतो, ''फॅमिली फुटल्याचे इतके दु:ख? हो, असते! फॅमिली नीट हवी असतेच.''(पृ.११७) ह्या वाक्यातून हर्षद व विलास दोघांच्याही कुटुंबाची व्यथा-वेदना आपणास समजते. कारण हर्षदच्या आई-वडीलांचे पटत नसते. आईचे अफेयर असते. तर विलासचे कुटुंब विभक्त झालेले असते. ह्यामुळे दोघांच्याही व्यथा-वेदना कुटुंबव्यवस्थेत वेगवेगळ्या असलेल्या दिसतात.

**कुटुंबव्यवस्था आणि पाऊस** : आते बहिणीला मोकळीक आहे तरी ती घेत नाही. ही तिची व्यथा आहे. 'आपल्या आईचा फोटो फुटला, ह्याचे मुलीला वाईट वाटले नाही.'(पृ.१८२) ह्या गोष्टींने बाबा व्यथित होतात. परत स्वत:ला सावरतात. म्हातारा (बाबा) म्हणतो, ''पावसाळ्यात माझ्या श्वासनलिकेला सूज येते. श्वासोच्छवास करताना छातीत दुखते ते आठवले. पावसाळा कधी संपतोय, असं वाटतयं.... बायकोबरोबरच्या दिवाळ्या आठवल्या, दु:खही झाले. आठवणी तर म्हातारपणीच असणार... मागच्या पावसाळ्यात खूप पाऊस झाला होता. ब्रॉकायटिसचा खूपच त्रास झाला होता.''(पृ.१५४) पत्नी गेल्याचे दु:ख वृद्धाला आहे. कुटुंबव्यवस्थेत जोडीदारापैकी एखादी व्यक्ती मृत्यू पावल्यास होणारी वेदना मनाला सतत टोचत राहते. अशा प्रकारे कुटुंब व्यवस्थेतील नवरा-बायको व मुले यांच्या व्यथा-वेदना लेखकाने मांडलेल्या आहेत.

**१.२.१५.१५. खारीचा वाटा :**

प्रस्तुत कादंबरीच्या पूर्वार्धात लेखक, त्याचा मित्र व लुकी यांनी केलेल्या गमती-जमती, लेखकाचे शालेय जीवन, यांचे सुखमय वर्णन आलेले आहे. त्या सुखी जीवनाला दृष्ट लागावी तसे झाले. राजा कराडकर यांनी पुण्यावरून येताना एक बातमी आणली. 'ती बातमी हिवतापाच्या साथीसारखी एका झटक्यात गावभर पसरली.'(पृ.१२५) बातमी अशी होती गावनदीवर धरण होणार. माणसं सैरभैर झाली. सोमजाईची देवराई भुईसपाट झाली. होत्याचं नव्हतं झालं. देवीची मूर्ती उन्हात भाजत होती. धरण होणार म्हणून गावात बैठक झाली. बैठकीत अंगठे घेतले पैसे मिळणार...पण....पण गाव सुटणार... घरं....जमीन....सगळं सगळं....ट्रक येणार.... सामान भरणार..... लांब मुलखात नेणार.... तिकडच सोडणार...'(पृ.१४३) असे लेखकाचा मित्र दिनू बरळत होता. या त्याच्या बरळण्यातून लहान मुले देखील किती दु:खी झाली होती याची सल वाचकाला जाणवते. तसेच हात लालेलाल होईस्तोवर मारले तरी न रडणारा हा दिनू कळवळून रडत होत. 'डोळ्यातून वळीव कोसळला. आभाळ रित झालं'(पृ.१४४). गाव सोडताना दिनूला वेदना होत होत्या. दिनूची एकूलती एक बहीण एक डोंगर टाकून पलीकडं तीचं सासर होतं. ती तिथेच राहणार होती. दिनूला मात्र त्याचं गाव सोडून जावं लागणार म्हणजेच या बहीण-भावांची ताटातूट होणार होती. ही दिनूची व्यथा लेखक मांडतो.

गावातील म्हातारी माणसे हा गाव सोडून जाण्याच्या विचाराने भयभीत झाली होती. सुताराच्या म्हातारीने गाव सोडण्याचा धसका घेतला होता. 'मी लाकडं, गोवऱ्या जमवून ठेवल्यात.

माझी मयत याच नदीवर जाईल.'(पृ.१४५) या म्हातारीच्या बरळण्यातून तिच्या वेदनांची जाणीव होते.

सरकारी ट्रक येई व एका एका घरातले सामान ट्रकमध्ये भरले जात होते. ज्या घरातलं सामान भरले जात होते त्या घरापुढे त्याचे नातेवाईक, पोरंबाळं जमत. ट्रक हलला की हल्लकल्लोळ होई. माहेरवाशिणी हंबरडा फोडीत, आया ऊर बडवीत. आतड्याला पीळ पाडणारा असा हा प्रसंग असे. गाव सोडताना प्रत्येकाची घालमेल होत होती. विस्थापित होण्यापूर्वी बऱ्याचशा धरणग्रस्तांनी आपली जनावरे विकली. लेखकाच्या घरी हरणी गाय, तिची कालवड, गुंडी म्हैस आणि दोन बैल. एक बारशा, दुसरा जैशा, त्यांना विकणं ही कल्पनाच काळीज चिरणारी होती. म्हणून लेखकाच्या वडिलांनी जणावरे विकण्यापेक्षा सांभाळायला देण्याचा निर्णय घेतला. वाड्यातून पाऊल काढताना बैलांच्या डोळ्यात पाणी तरारलं. भांब्याने म्हणजे पाळलेल्या बोक्याने केविलवाण्या स्वरात 'म्याँव... म्याँव' केले. लुकीने बारशाच्या पाठीवर उडी टाकली. नंतर जैशाच्या वशिंडावर, म्हणजे लुकी ही बेचैन झाली. एक-एक करता सारी कुटुंबे विस्थापित झाली. माणसं, जनावरं, अगदी कुत्र्यामांजरासह गाव हललेला. शुकशुकाट झालेला. दिनूचे कुटुंबही गेले व सर्वांत शेवटी लेखकाचे कुटुंब गेले व त्या कुटुंबातील लेखकाची जीवलग म्हणजे त्याची 'लुकी' ही खारूताई मात्र त्याच्याबरोबर गाव सोडून जात नाही यामुळे वाचकांच्या मनाला चुटपूट लागून राहते. अशा प्रकारच्या धरणग्रस्तांच्या, व्यथा-वेदना असलेल्या लेखक मांडतो.

**१.२.१५.१६. फेसाटी :**

प्रस्तुत कादंबरीच्या शीर्षकातून जो अर्थ निघतो त्यावरुन लेखकाच्या वेदनेची जाणीव होते. लेखकाने अत्यंत हालाखीत जीवन जगणाऱ्या धनगर कुटुंबाची व्यथा वेदना कादंबरीच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. लेखक नवनाथ गोरे म्हणतात, ''फेसाटीतून वंचित जगाच्या वेदना मी मांडल्या आहेत. ही केवळ कादंबरीच नव्हे तर माझ्या संघर्षाची कथा आहे.''[६४] मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच शिक्षण या प्रमुख गरजा आहेत. पण या गरजा या कुटुंबाला मिळाल्या नाहीत. कित्येकदा अन्नाविना उपाशी झोपण्याची वेळ लेखकाच्या कुटुंबावर आली. ज्वारीच्या कण्या खाल्ल्या. भाकरी बरोबर भाजी तर नशिबातच नव्हती. म्हणून तर कामाला गेलेली मायलेकरे सर्वांपासून वेगळे जेवायला बसत होती. कुटुंबातील मुलींना लग्नाच्या वेळेसच नवीन कपडे घालायला मिळाले होते. दरवाजा नसलेले घर पावसाळ्यात गळणाऱ्या या घरात चूल पेटविणेही मुश्किल व्हायचे. घर जळाले तेव्हा जे होतं नव्हतं तो फुटका संसार जळाला. पुन्हा त्या

माऊलीने म्हणजे लेखकाच्या आईने काडीकाडीने जमवला. ‘‘देवा, कशाला जल्माला घाटलाच रं माझ्या लेकीला, येवढं हाल करतुयाचं. जिती असताना तिला कवा सुख लागलं नाय. मरुन बी तिझी येवढी परक्षा बघतुयाचं रं बाबा ऽऽ का? असा कसा डोळं झाकून बसलायचं रं बाबा ऽऽ?’’(पृ.४२) आक्काला मामीने विहिरीत ढकलून दिल्यानंतरची आईची व्यथा-वेदना लेखक मांडतो. हिराक्का या मोठ्या मुलीचा हुंड्यासाठी बळी घेतला गेला होता. हिराक्काच्या आई वडिलांचे, भावंडांचे तिच्या आठवणीने नेत्र ओले व्हायचे. अखंड कर्जात बुडालेला शेतकरी व त्याची दयनीय अवस्था हृदय पिळवटून टाकणारी आहे. अनंत अडचणी पार करत लेखकाचा शिक्षण प्रवास नवीन पिढीला ऊर्जा देऊन जातो. अशा प्रकारे कादंबरीत लेखकाने दुष्काळ, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी प आपल्या कुटुंबाची झालेली वाताहात या सारख्या व्यथा-वेदना व्यक्त केल्या आहेत.

## (ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन

१.१. प्रास्ताविक

१.२. भाषाशैली

- १.२.१. निवेदन
- १.२.२. स्वगत
- १.२.३. संवाद
- १.२.४. भाष्य
- १.२.५. वर्णन
- १.२.६. म्हणी
- १.२.७. वाक्‌प्रचार
- १.२.८. प्रतिमा आणि प्रतिके
- १.२.९. रूपके
- १.२.१०. शब्दकळा
- १.२.११. सुभाषिते / सुविचार
- १.२.१२. शिव्या

१.३. वातावरणनिर्मिती

१.४. शीर्षकाची समर्पकता

१.५. समारोप

१.६. संदर्भ आणि टीपा

## ४.१. प्रस्तावना :

कोणत्याही साहित्य कृतीच्या महत्तेच्या संदर्भात मूल्यसंकल्पनेला अनन्यसाधारण असे महत्व असते. कोणतेही साहित्य किंवा साहित्यकृती यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारच्या मूल्याधार लाभलेला असतो. साहित्य किंवा साहित्यकृतीच्या महानतेच्या संदर्भात वाङ्मयीन मूल्ये आणि जीवनमूल्ये यांच्यामध्ये एक प्रकारचे जीवन संबंधीय असे अतूट नाते असते. यांच्यामध्ये एक प्रकारचे जीवन संबंधीच असे अतूट नाते असते. वाङ्मयीन मूल्यांची व्याख्या करताना श्री.के.क्षीरसागर म्हणतात, ''ललित वाङ्मयाच्या क्षेत्रातील अपेक्षापूर्तीच्या हेतूंना, अगर साधनांनाच आपण वाङ्मयीन मूल्ये हे नाव देतो. ज्या-ज्या गुणांनी अगर घटकांनी वाङ्मयीन आनंद लाभतो, त्यांना वाङ्मयीन मूल्ये म्हणण्यास हरकत नाही.''[६५]

थोडक्यात कोणत्याही साहित्यकृतीमंध्ये जीवनमूल्ये आणि वाङ्मयीन मूल्ये यांचे सेंद्रियत्व प्रस्थापित झालेले असते. या सर्वाच्या एकसेंद्रियत्वामुळेच साहित्य कृतीला सरसता प्राप्त झालेली असते. वाङ्मयीन मूल्यांचा विचार जीवनमूल्ये आणि सौंदर्यविचार यांच्या सहसंबंधातून करावा लागतो. तो अशा बंदिस्त संबंधातूनच साहित्य कृतीमधून रुप-स्वरुप घेत असतो. 'मूल्य' या संकल्पनेची व्याख्या गंगाधर पाटील पुढीलप्रमाणे करतात. ''साहित्य कृतीच्या किंवा अनुभवाच्या ज्या गुणवत्तेमुळे आपल्या मनात तिच्याविषयी आवड, आस्था व इच्छा यांची उत्पत्ती व परिपूर्ती होते, त्या गुणवत्तेला मूल्य असे म्हणता येईल.''[६६] मूल्य ही एखाद्या भौतिक वस्तूसारखी स्वतंत्र वस्तू नाही. मूल्य ही संबंधवाचक गोष्ट आहे. ललित साहित्यातील वाङ्मयीन मूल्यांची संकल्पना स्पष्ट करतांना यशवंत मनोहर म्हणतात, ''प्रमाणबद्धता, औचित्य, सूचकता, संयम, नाविन्य, वैविध्य, एकरुपता, प्रसाद, लय, पोत, मानुषता, लव इत्यादींना सौंदर्यमूल्ये मानले जाते. ज्या गुणांनी वा घटकांनी शब्दाकृती सुंदर ठरते, तिच्यात कलाप्रकर्ष होतो त्या गुणांना वाङ्मयीन मूल्ये म्हटले जाते.''[६७] कोणत्याही विचार प्रकटीकरणाच्या प्रक्रियेत भाषा हा घटक महत्त्वाचा असतो. विचार प्रकट करण्याची क्रिया ही भाषेच्या माध्यमातून होत असते. प्राचीन काळात भाषा निर्माण झाली नव्हती त्यावेळी हावभावांची, हालचालींची भाषा अवगत होती. मनुष्य जीवन जगत असताना त्याचा संपर्क अनेकांशी येत असतो. आपण कित्येक जणांशी बोलतो त्यांचे बोलणे ऐकून घेतो तर कधी स्वतःच मनाशी सोबत हितगुज करीत असतो.

म्हणजेच साहित्यातील सौंदर्यमूल्ये ही वाङ्मयीन मूल्ये असतात. वाङ्मयीन मूल्यांची संकल्पना स्पष्ट करताना रा.ग. जाधव म्हणतात, ''ललित वाङ्मयाची चिकित्सा करुन त्याच्या

श्रेष्ठ-कनिष्ठपणाविषयी निर्णय देण्यास ज्या कल्पनांची मदत घेतली जाते, त्या कल्पनांना वाङ्मयीन मूल्ये म्हणावयास हरकत नाही.''[६८] कल्पना या घटकाला वाङ्मयीन मूल्य या संकल्पनेत रा.ग. जाधव यांनी महत्व दिलेले दिसते. म्हणजेच अनेकविध प्रकारच्या कल्पनांना साहयघटक म्हणून घेऊन ललित साहित्यामध्ये त्याची सरस-निरसता ठरवावी लागते. ललित वाङ्मयीन क्षेत्रामध्ये अपेक्षापूर्तीची साधने किंवा हेतू यांना वाङ्मयीन मूल्ये असे म्हणतात. या वाङ्मयीन मूल्यांमधील गुणयुक्त आणि गुणप्रधान घटकांमुळे रसिक-वाचकाला साहित्यातील वाङ्मयीन आनंदाची प्राप्ती होत असते.

**४.२. भाषाशैली :**

कादंबरीची किंवा कोणत्याही ललितसाहित्याचे भाषा कशी असावी ह्याबद्दल काही निश्चित नियम सांगणे व त्या नियमांचा आग्रह धरणे कलाकृतीला जाचक ठरु शकते. कादंबरीत ज्या भावानुभवाचे प्रकटीकरण करावयाचे असेल त्यांच्याशी इमान राखणारी भाषा असावी. म्हणून कोणत्याही एका कलाकृतीची भाषा दुसरीसारखी नसते. कारण प्रत्येक कलाकृतीतून प्रकट होणाऱ्या भावानुभवाची जात भिन्न असते.

या कादंबरीतही लेखकाची भाषेवर हुकुमत दिसून येते. अशी छोटी-छोटी वाक्ये एक वेगळया प्रकारची घडण घेऊन येथे चित्रित झालेली दिसतात. वि.शं. पारगावकर, ''भाषा ग्रामीण असते, नागरी असते, विदर्भी असते, विदर्भी नागरी असते तशीच विदर्भी ग्रामीण असते, कोल्हापुरी ग्रामीण असते, तशीच माणदेशी ग्रामीणही असते. भाषा ही अनंत छटा आणि अनंत लकबीमधून विचार आणि भावना व्यक्त करणारे माध्यम आहे.''[६९] जसा परिसर असेल तशी भाषाही बदलत असते. प्रत्येक संस्कृतीची आपली भाषा असते. निवेदनाच्या बाबतीत इतर मराठी कादंबऱ्यांच्या तुलनेने वेगळी अशी ही कादंबरी आहे. भाषा ही आशय व विषय यांना चिकटून धरणारी असते. भाषेमुळे कादंबरीतील पात्रांना गडदपणा, स्पष्टपणा येतो.

डॉ.शशिकला कांबळे भाषाशैलीविषयी म्हणतात, ''कादंबरीचा अभ्यास करतांना भाषेचा विचार करणे अपरिहार्य ठरते, भाषा हे साहित्याचे द्रव्य असते, त्यामुळे भाषेशिवाय कोणताही वाङ्मय प्रकार शक्य नाही. भाषेमध्ये एक प्रकारची ताकद असते. प्रत्येक कादंबरीचे विशिष्ट असे रचनातंत्र असते. त्याचप्रमाणे प्रत्येक कादंबरीची तिची एक भाषा असते.''[७०] Style is the man असे जे म्हंटले जाते, त्याविषयी असं सांगता येईल की, शैली ही व्यक्तिमत्त्वाच्या रंगाने रंगलेली असते. म्हणून भाषाशैलीचे स्वरुप समजून घेतले पाहिजे. कारण शैलीचा उगम हा लेखकाच्या

स्वभावातच असतो. खांडेकरांची भाषा अलंकारांनी नटलेली, तत्वदर्शनात्मक अशी काहीशी बनेलेली आहे. कादंबरीतील आशय नेमकेपणाने परिणामकारक प्रगट होणे गरजेचे असते, हा आशय प्रभावी भाषाशैलीद्वारे लेखक प्रकट करण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्याविषयी शिरीष लांडगे आपले मत व्यक्त करतात, ''आशयानुभाची गरज आणि लेखकाची अभिव्यक्तीची पद्धत यातून कादंबरीची भाषा घडत असते. पात्रांचा स्तर, त्यांचा काळ, त्यांच्या सवयी, लकबी तसेच संवाद आणि निवेदनातील अर्थवाही, ओघवती, चित्रदर्शी भाषा कादंबरीला संपन्न बनवत असते.''[७१]

कोणतीही कलाकृती लेखकाने स्वीकारलेल्या आविष्कार पद्धतीतून जीवनदृष्टीतून आणि विचारप्रणालीतून आकारत जाते. प्रत्येक लेखकाची एक विशिष्ट अशी शैली असते. कादंबरीतील भाषा ही बदलती सामाजिक स्थिती, वर्ग, रचना आणि सत्तासंबंध यातूनच घडत जाते. भाषेशिवाय कोणताही व्यवहार अशक्य आहे.

**१.२.१. ययाति :**

वि.स. खांडेकराच्या 'ययाति' या कादंबरीच्याशैली विशेषाचा आढावा घेता ही कादंबरी पौराणिक पात्रांचे आत्मनिवेदन आणि निवेदन या स्वरुपात मांडली आहे. ययाति, देवयानी आणि शर्मिष्ठा यांच्या आत्मनिवेदनातून कादंबरी साकारली आहे.

कादंबरीमध्ये प्रतिमा, प्रतीक, रूपके यांची रेलचेल आहे. सुविचार, वाक्यांतील कोटीबाजपणा यांचा भरमसाठ वापर आहे. जीवनविषयक तत्त्वज्ञान मांडताना या गोष्टींचा समावेश केल्यामुळे बोजड तत्वज्ञान प्रतिमा व प्रतीक तसेच सुविचार यामुळे वाचण्यास रंजक वाटते. मन, आत्मा या अमूर्त कल्पना शब्दांच्या आकर्षक मांडणीतून मूर्त स्वरूपात आणण्याचा प्रयत्न केला आहे. आई–मुलगा यांचा प्रेमळ संवाद किंवा नहुषाच्या मृत्यूच्या वेळचा प्रसंग करूण रसाने भरलेला आहे. कच, अंगिरस यांचे उपदेश व माधवाने मांडलेला भोगवादी जीवनाचा प्रवास. कचाने पाठविलेले पत्र हे भाषाशैलीचे पौराणिक धाटणीच्या कादंबरीला थोडे विसंगत वाटते. निसर्गवर्णने, निवेदन, भाष्य तसेच संवादातील ओघवतेपणा यामुळे कादंबरी उच्चतम उंचीवर जाऊन बसते. ब्राह्मण, क्षत्रिय कुलातील पात्रे असल्यामुळे त्यांची भाषा ही शुद्‌ध स्वरूपातील आहे. तारके सारख्या बालिकेचे बोबडे बोल जसेच्या तसे कादंबरीत आले आहेत. काही शब्दांचा उदा. संस्कृत 'जगदद्रमस्य' हे समावेश प्रसंगानुरूप झालेला आहे. माधवाच्या भावाने सागरावर केलेली कविता. या सर्वांचा समावेश या कादंबरीत असल्याने उत्तम भाषाशैली हे या कादंबरीचे वैशिष्ट्य ठरते. भाषिक अंगाने कादंबरीला एक उंची प्राप्त झालेली आहे. तेच त्याच्या यशाचे गमक आहे.

**१.२.२. रथचक्र :**

प्रस्तुत कादंबरीतील लखनौवाला परत जायला निघाला तेव्हा धाकट्याला घेऊन त्याच्या पुढे उभे करावे म्हणून त्याला शोधण्यासाठी तिची पळापळ झाली. तेव्हा खाजणाजवळच्या एका भोप्याच्या झाडाजवळ तो बसला होता. तिला त्याचा खूप राग आला होता पण ती म्हणते, ''नाक दाबून एरंडेलाचा घोट घ्यावा त्याप्रमाणं तिन राग गिळाला.''(पृ.३२) त्या दिवशी ती त्याच्याबरोबर फार मनमोकळेपणाने बोलली. ''धरणाचा बांध फुटून पाणी मोकाट सुटावं त्याप्रमाणे ती बोलू लागली.''(पृ.३३) आपण अनाथ आहोत हे सांगताना ती म्हणते, ''माणूस अनाथ असलं की गांडूळाकडेसुद्धा त्याचा पत राहत नाही.''(पृ.३३) अशा प्रकारची वाक्ये कथानायिकेच्या तोंडी आहेत. कोकणस्थ ब्राह्मण कुटुंब असल्यामुळे संवाद, स्वगत, निवेदन यांतील भाषेत शुद्ध व प्रमाण भाषेचा वापर झालेला दिसतो.

एक दोन ठिकाणी कुणबीनीची बोली भाषा आली आहे. ''बामनिनिचा घो पलालेला हाय म्हणूनशान तिला कुणब्यावानी राबावा लागता.'' 'काय म्हणतांव?' 'नाय बा' अशी काही वाक्य संवादात आलेली आहेत. तिचा मधला दीर मंतरलेले गंडे विकू लागला तेव्हा त्याने मुंबईच्या वर्तमानपत्रात दिलेली जाहिरात. महत्प्रयासाने 'इष्टसिद्धी गंडा' बद्रिकेश्वरीच्या महान योग्याकडून मिळविलेला सिद्धमंत्र. या मंत्राने मंतरलेले गंडे घेऊन इष्टसिद्धी प्राप्त करून घ्या या गंड्याचे उत्पन्न बद्रिकेश्वरीच्या मठाकडे जाणार आहे. एका माणसाला एकच गंडा मिळेल त्वरा करा.(पृ.६१) मुळाव्याधीवर औषध काढल तेव्हा दिलेली जाहिरात 'फालतू औषध घेऊ नका. पाण्यात पैसा लोटू नका मुळव्याधीचा कर्दनकाळ-'रामबाण' एकदा घ्या आणि मुक्त व्हा.'(पृ.१९३) कथानकाच्या ओघात जाहिरातीवजा भाषा वापरलेली दिसते.

**१.२.३. स्वामी :**

माधवराव रमाबाईंना हरिहरेश्वराला गेल्यावर किंवा जाताना तुला काय काय अनुभवायला मिळेल हे सांगतात. ''तिथं आकाशाशी स्पर्धा करावयास निघालेले माड आपल्या झावळ्यांची सळसळ तुला ऐकवतील चांदण्यारात्री सळसळणाऱ्या त्या रूपेरी झावळ्या तुला मोहून टाकतील. भर दुपारचंदेखील सूर्याच बिंब पृथ्वीतलावर न पडू देणाऱ्या गर्द छायेतून तुझे मार्ग जातील. समुद्र काठचा सूर्यास्त तर कधीच चुकवू नको. सूर्यबिंब जेव्हा क्षितिजावर टेकतं, तेव्हा ते लाटांवरून दौडत अगदी तुझ्या हाती आल्याचा भास तुला होईल.''(पृ.३१८) ओहोटीच्या वेळी मोकळ्या पडलेल्या किनाऱ्यावर जेव्हा समुद्र-खेकडे रांगोळ्या घालू लागतील, तेव्हा तुझा अभिमान पार

धुऊन जाईल आणि कौतुकानं त्या रेखाटलेल्या कलाकृती तू बघत राहशील.(पृ.३१८) लेखक वरील वर्णनातून अलंकारीक भाषाशैलीचा उत्कृष्ट नमुना साकार करतात. रमा, आजवर मी जे शिकलो, ते निसर्गाकडूनच. त्यानं मला जेवढं शिकवलं, दिलं, तेवढं दुसऱ्या कुणीही नाही. 'समुद्रानं प्रेमाची विफलता कशी सहन करावी, हे सांगितलं. कर्नाटकाच्या उघड्या फत्तरांनी बेदरकार वाऱ्या वादळाशी अखंड टक्कर देत असता संकटांना कसं तोंड द्यावं, हे सांगितले. कड्यावरून स्वतःला झोकून देणाऱ्या प्रपातानं त्यागाची महती गायली.(पृ.३१८)

''रमा, मृत्यूचं भय एवढं वाटतं---?

मृत्यू हा अटळ आहे.

जीवन वा मृत्यूचं भय बाळगणाऱ्याला समृद्ध जीवन जगता येत नाही. जीवन किती वर्षे जगला, ह्यापेक्षा कसं जगला, ह्याला महत्व आहे. तसं नसतं, तर चंदनाचं नावही राहिलं नसतं. साऱ्यांनी वटवृक्षाचं कौतुक केलं असतं...''(पृ.४०८) वरील भाषाशैली आकर्षक रुपात लेखक साकार करतो. मैनेने म्हणलेल्या ओव्या काव्यात्मक भाषाशैलीचा नमुना म्हणून लेखक त्या मांडतो.

''ऐलतीरावर सुख । पैलतीरी नांदे दुःख ।

मधे वाहतें जीवन । हेंच संसाराचें रूप ।।

ताटातुटी कां, रे । देवा, खेळ हा मांडिला

देवपणा सांग त्याने । तुझा खरा काय झाला?

विघ्नहर्त्या विनायका, तुला पार्वतीची आण ।

रमा-माधवा संभाळ । तुझे आठवीन गुण ।।''(पृ.३२८)

कादंबरीतील काव्यात्मकता हा एक स्वामीच्या भाषाशैलीचा गुणविशेष आहे. कथानक साकारताना लेखकाने सर्वांगाने विचार करून भाषेची जास्तीत जास्त वैशिष्टे लेखनात उतरवली आहे. प्रभावी व्यक्तिरेखा उभारणी. वातावरणनिर्मिती करणारे वर्णन. नाट्यात्मक संवाद. विचारप्रवृत्त करणारी माधवरावांची स्वगतं. बोधपर, सुवचने यांची रेलचेल केली आहे. कादंबरी जरी ऐतिहासिक असली तरी वाचकांना सहज समजेल, उमजेल अशी भाषाशैली लेखकाने मांडली आहे. घडलेला प्रसंग हा प्रत्यक्ष वाचकांसमोर उभारण्याचे सामर्थ्य त्यांच्या भाषाशैलीत आहे. उत्तम निवेदनशैलीचा वापर केलेला आहे. कथानकाची आकर्षक मांडणी केलेली आहे.

लेखकांनी कादंबरीतून ज्या व्यक्तिरेखा रेखाटल्या आहे त्यामध्ये रमाबाईंची सात्त्विकवृत्ती दर्शविण्यासाठी तसेच त्यांचा प्रेमळ स्वभाव, कोमलमन व संवेदनशीलवृत्ती त्यांच्या वाणीतून व्यक्त

करण्याचा प्रयत्न केलेला आहे. किंवा त्यांची दासी मैना हिची भाषा किंवा श्रीपतीची भाषा त्यामध्ये ग्रामीण बोली भाषेचा समावेश आहे. रामशास्त्रीची भाषा की ज्यातून त्यांची खंबीर व न्याय प्रविष्ठ वृत्ती दिसते. माधवरावांच्या आजारामुळे निर्माण झालेली स्थिती, मनाची घालमेल वेळोवेळी रमाबाईंच्या प्रेमळ भाषेतून व्यतीत होते. तसेच जेव्हा रमा माधव यांच्यातील प्रेमळ संवाद होतो त्यावेळी व्यक्त होणारा शृंगार रस, अल्लड रमाबाईंचे पोक्तविचारी स्त्रीचे जे परिवर्तन होते ते रमा व माधव यांच्या संवादातून व्यक्त होते. सती जाण्याच्या प्रसंगी रमा बाईंना आठवलेले संवाद जेव्हा स्वगतातून व्यक्त होतात तेव्हा ते वाचकांचे मन हेलावून टाकतात.

**१.२.४. स्मरणगाथा :**

'स्मरणगाथा' ही गो.नी. दांडेकर यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. वयाच्या तीस वर्षे त्यांनी केलेली भटकंती त्यांच्या लेखणीतून उतरली आहे. या भटकंतीमध्ये त्यांचा विभिन्न भाषा बोलणाऱ्या विविध प्रदेशातील लोकांशी सुसंवाद झाला. त्या लोकांच्या बोलीचा समावेश लेखकाने प्रसंगानुरूप केला आहे. लेखक परतवाड्यात सिव्हिल लाइन्समधल्या फॉन्सेका नावाच्या गोवॅनीज ख्रिश्चनच्या बंगल्याच्या आऊट हाऊसमध्ये राहत होता. तेव्हा फॉन्सेकाने एका हरियाळ पक्ष्याला गोळी मारली तेव्हा त्या पक्ष्याला पाहून फॉन्सेका म्हणाला. ''खैसा ब्युटिफुल कलर हाय!''(पृ.७) फॉन्सेकाच्या गोवॅनीज मोलकरणीची भाषा, ''आपू रे, रिसालदारकू बंदूकसे माऱ्या रे! सोब व्हांच भाग रह्या है।''(पृ.१०) ठाकूर सैनिकाने नमाज पडणाऱ्या मुस्लिम रिसालदाराला मारल्यानंतरचे मोलकरणीचे ते वाक्य होते.

ठाकूरने गोळी घातल्यानंतर तो शांतपणे तेथेच उभा राहिला. त्याला दुसऱ्या सैनिकाने मागून धरले. त्याला ठाकूर म्हणाला, ''भाग थोडेही जाऊंगा? हाँ, मैंने गोली चलाई है।''(पृ.११) दादांचा म्हणजे लेखकाच्या वडिलांनी युरोपीय विद्यार्थ्याला जेवायला बोलावले. आईने जिलेबी केली होती तो गोरा शिष्य आईला म्हणाला, ''इफ यू वोण्ट माइण्ड मिसेस डण्डेकार, ही पक्वान टुमी कशी करटां? तेंच्यांत हा शुगरकेन ज्यूस टुमी कशा डवडटां?''(पृ.१३)

नागपूरला राष्ट्रभाषा हिंदीचा प्रसार अधिक होता. लेखकाच्या मते, ''नागपूरकरांची हिंदी ही काही शुद्ध हिंदी नव्हे. एक तर प्रत्येक वाक्यागणीक वैदर्भी हेलकावा उमटे. शिवाय तींत मुसलमानी वळण इतकं असे, की ती उर्दूच्या शेजारी जाऊन उभी राहायची.''(पृ.६८) नागपूरमध्ये विविध राज्यांचे लोक वास्तव्यास होते. बंगाली लोक मोठमोठ्या आवाजात वाद घालीत, ''शोतोंत्रोता, पोरोदाश्यो, ब्युरोक्रोशी, ओभीयान''(पृ.६९) असे ओकारयुक्त शब्द बंगाली

लोकांच्या बोलीत येत होते. लेखक स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाला, तेव्हा लढ्यात गुजराती स्वयंसेवक, आदर्श सत्याग्रह, कोणाचेही भांडण सोडवताना म्हणायचा, ''अरे, सांती रख्खो बाबा! बापूकी आग्यां मानो! सांती रख्खो।''(पृ.१०१) गोपाळला गाडगेबाबांचा सहवास मिळाला. गोपाळला झाडून दाखविताना ते म्हणाले, ''येते का नाई? पायजा बरं! ध्यान देल्लं, का अवघं येते!''(पृ.२१०) बाबांची बोली वऱ्हाडी बोली. कादंबरीमध्ये भाषेच्या वैविध्यपुर्ण घटकांचा समावेश झाला आहे. 'घमघम घमाटा, सोन्याची देवळं, रूप्याच्या घांटा, त्याच्या अंगाला भयंकर कांटा. असं फळ कोणतं?'(पृ.२८) अशाप्रकारचा उखाणा आलेला दिसून येतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील मुलांनी म्हणलेली प्रार्थना,

'नमो मातृभूमी जिथें जन्मलों मी
नमो आर्यभूमी जिथें वाढलों मी
नमो कर्मभूमी जियेच्याच कामीं
पडो देह माझा सदा ती नमीं मी'(पृ.६३)

नागपूरमध्ये धनतोली भागात तेथे मुले अनेक देशभक्तीपर गीतं म्हणत होती, ते आणि त्यांचे मित्र ही गीतं म्हणत. त्यांनी सर्वांनी फटका देखील म्हटला.

''जंगल तोडूनि मंगल केल दंगल झाली चहूंकडे।
रान मोडितां पान तोडिता पायांमाजी बेडिपडे।।
चारा नाहीं थारा नाहीं जनावरांची कठिण दशा।
अर्धउपाशी तडफड करिती काढित बसती ऊठबशा ।।
एरंडीचे तेल दिव्याला ठेवित मेणीवर पणती।
ढेकुण पिरुवा मी मी म्हणती उवांस
नाहीं खिसगणती ।।''(पृ.६८)

नाशिकला गोदातीरी कोण एक व्यक्ती आपल्याभोवती बसलेल्या लोकांना भारूड ऐकवित होती.

'सत्वर पावगे मला । भवानि आई रोडगा वाहिन तुला ।।
सासरा माझा गांवी गेला । तिकडंच खपवीं त्याला ।।
सासू माझी जाच करते । बोडकी कर ग तिला'(पृ.१५२)

गोपाळ अकोल्याला असताना कृष्णाबाईबरोबर गोरक्षणाची पेटी आणि झोळी घेवून, गावात गाण म्हणत भिक्षा गोळा करीत असताना त्याने म्हटलेली धेनूगीते,

'भावें वरितां गोमातेला । मोक्षपदहि लाभे जीवा ।।

शून्य सदन नच धेनु दिसे ते ।

व्यर्थ इतर हो संपदा ।।'(पृ.१५९)

वारकरी पंढरपूरला वारीला जाताना ज्या ठिकाणी घोड्याचे रिंगण होते तेथे घोडा धावायची वेळ होईपर्यंत भारूडं, फुगडया याचा आनंद वारकरी घेत. त्यातील एक फुगडीचे गीत,

'फुगडी ग फुगडी ग फू

मन चित्त धू, विषयावरी थू

मग परब्रह्म तूं ग बाई, फुगडी ग फू'(पृ.१९९)

गाडगेबाबांच्या कीर्तनात बाबा कबिराचा दोहा म्हणत.

''भगवान के दरबार बडी अंधेर उलटी रीत ।

अनमांगत मोती मिले मांगे मिले न भीख ।।''(पृ.२१५)

कैकाडी महाराजांच्या कीर्तनात ते जनाबाईंचे दळणावरचे अभंग म्हणत,

'सासू आणि सासरा । दीर तो तिसरा ।

ओव्या गाऊं भरतारा । तूं ये रे बा विठ्ठला ।।

प्रपंच दळण दळीलें । पुष्प म्यां वैरीलें ।

पाप उतूं गेलें । तूं ये रे बा विठ्ठला ।

जनीनें दळण दळीलें । किरंता राहिली ।।

एवढा लाभ होईल । तू ये रे बा विठ्ठला ।।'(पृ.२२६)

अशा प्रकारे लेखकाने कादंबरीमध्ये प्रसंगानुरूप उखाणे, प्रार्थना, फटका, भारूडे, धेनूगीत, फुगडी, अभंग यांचा समावेश केला आहे. कबीराचे दोहे तसेच इंग्रजी भाषेचा वापरही लेखनात केलेला दिसतो. त्याच प्रमाणे गोपाळ घर सोडुन गेल्यानंतर 'केसरी' व 'लोकमान्य' वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. ती जाहिरात कादंबरीत लिहिली आहे. तसेच गाडगेबाबांच्या कीर्तन कार्यक्रम होणार असल्यास तत्पूर्वी गावात व परिसरातील त्यांच्या कीर्तनाची दवंडी दिली जात होती. म्हणजेच उखाणा, दवंडी, जाहिरात या घटकांचा समावेश लेखकाने कादंबरीत भाषेच्या अनुशंगाने उत्कृष्टपणे केला आहे. अशा विविध भाषिक घटकांचा वापर करून लेखकाने वैशिष्ट्यपूर्ण भाषाशैलीचा

कादंबरीत समावेश केला आहे. विविध प्रांतातील बोलीभाषा तसेच हिंदी भाषेचा वापर लेखकाने आपल्या  लेखनात मोठ्या प्रमाणावर केलेले दिसतो. या कादंबरीत उत्कृष्ट भाषाशैलीचा नमुना वैशिष्ट्यपूर्ण रीतीने पाहावयास मिळतो.

**१.२.५. सत्तांतर :**

व्यंकटेश माडगूळकरांच्या भाषेला त्यांची म्हणून एक खास शैली लाभली आहे.  ती शैली त्यांनी स्वतः निर्माण करून विकसित केली आहे. सत्तांतरच्या भाषाशैलीविषयी मीरा तारळेकर म्हणतात, ''आपल्या अल्पाक्षरी, चित्रमय भाषाशैलीने स्पर्श, रुप, रस, नाद गंधानिशी मराठी साहित्य विश्वात आपल्या वेगळा आणि वेभवी बाज निर्माण करणारे व्यकटेश माडगूळकर होते.''[७२] उदाहरणांसाठी आपण काही पुढील वाक्ये पाहू शकतो. काळे कुळकुळीत कोतवाल पक्षी चोची उघड्या टाकून डहाळ्यांतून विसावले.(पृ.१)

''पानं गिरगिरत खाली आली''(पृ.१), उग्र भपकारा हवेत पसरला(पृ.१), आक्रमक असा गुरगुराट केला(पृ.३), टेकडीच्या मागे पहाटे दिवस वर येण्याआधी आभाळ तांब्याचं होई आणि सूर्य उगवे(पृ.४), हा एवढा प्रदेश तो आपल्या भूपकारानं दणाणून सोडत होता.(पृ.५), झाड गदगदलं आणि तांबड्या डोळ्यांच्या राघूंचा थवा दचकवणारा कलकलाट करत आभाळात उडाला.(पृ.७), तो सरासरा झाडाचं खोड उतरून दाणदाण उड्या घेत उतार उतरला.(पृ.१०), भयाकुल वानरांची टोळी नंतर बराच वेळ दात वाजवत, गुरगुराट करत, फांद्या हलवत राहिली.(पृ.१३), मुताच्या तुरतुऱ्या एकापाठोपाठ एक अशा सुटत(पृ.१५), काय कुडुम-कुडुम खाताहेत.(पृ.१५), गदागदा फांद्या हलवल्या. या फांदीवरनं त्या फांदीवर लांब उड्या ठोकल्या. गुरगुराट केला. करकरा दात चावले.(पृ.१७), या झटापटीत काळतोंडीनं तिला फटकावलंच.(पृ.१९),तांबडीलाल फट पडली(पृ.१९), सूर्य मावळला. रातव्या पाखरांनी 'चक्कुऽऽ चक्कुऽऽ चक्कुऽऽ' असा ठेका धरला(पृ.२०), रातकिड्यांचा कोरस सुरू झाला. हळूहळू जंगल अंधारात बुडू लागलं(पृ.२१), चपराक हाणत होत्या. गुरगुरत होत्या. शेजारणीवर त्या भुंकत होत्या. ठिसकत होत्या. हातांनी जमीन बडवत होत्या.(पृ.२६), पाण्याच्या पृष्ठभागावर खळबळाट झाला. तुषार चौफेर उडाले(पृ.३३), हे वीतभर पोर इकडंतिकडं धावत 'चिर्ररऽऽ चिर्ररऽऽ' असा आकांत करत.(पृ.३५), ती दचकून फऽर्रकन उडाली(पृ.३८), पाला पडू लागला. डहाळ्या डोलू लागल्या.(पृ.४२), इकडं-तिकडं टुकुटुकु बघायचं(पृ.४२), आणि वावटळ यावी, तसे आलेले हे सहाही घुसखोर आले तसे गरगरत निघून गेले, नाहीसे झाले.(पृ.४३), पोर सतत 'चींऽ चींऽ चींऽ'

असं जिवाच्या आकांतानं ओरडत होतं.(पृ.४९), बरंच रक्त गेल. जमिनीवर काळं-तांबडं ठिगळ दिसायला लागलं.(पृ.४९, ५०), एवढंसं तोंड उघडंच, डोळे उघडेच, असं लांडीचं बाळ न हलता, काही शब्द न करत, निळ्या आकाशाखाली, उन्हानं काळवंडून गेलेल्या धरित्रीवर उताणं पडून राहिलं(पृ.५०), निळे नीळकंठ, पिवळे धमक हळदुले, पंचरंगी कवडे, पांढरेशुभ्र बगळे, काळेकवरे खंडे तळ्याकडून झाडाकडे, झाडावरून पुन्हा तळ्याकडे भिरभिरू लागले.(पृ.५२), पंधरा-वीस मिनिटंच असा जोरदार पाऊस कोसळला झाडंझुडं धुऊन निघाली. जागोजागी खोलगट भागांतून गढूळ पाण्याचे पाट खळाळले.(पृ.५३), बिबट्याचा वास येताच 'पुकूऽऽ' असा इशारा करून ती विरूध्द दिशेला उडाली. मागोमाग सारा कळपही उधळला(पृ.५४), आणि जांभळीच्या खोडाजवळ येऊन, दोन पायांवर उभा राहिला. पुढच्या दोन्ही पंज्यांची नखं त्यानं खोडावर खराखरा चार-सहा वेळा ओढून नख्या धारदार केल्या. मग खोडाकडं पाठ फिरवली आणि उग्र वासाच्या मुताची तुरतुरी खोडावर सोडून ते भिजवलं(पृ.५५), त्यात काळ्या पाठीच्या बळक्या होत्या. गाय बगळे होते, काळ्या  मानेचे करकोचे होते, पाण कावळे होते.(पृ.५९), तेव्हा खालून तिला पोरांचा कुरूकुरू असा आवाज ऐकू आला. मग धांदलीनं तिनं भराभरा वाळू उकरली.(पृ.६१), त्याचे नाजूक लालचुटूक हात तिनं निरखून पाहिले. त्यांचा वास घेतला. ते चाटले. लालचुटूक कान, कुल्ले आणि सगळं अंग गडद तपकिरी रंगाचं.(पृ.६२). वरील सर्व उदाहरणांमधून आपणास व्यंकटेश माडगूळकरांच्या भाषेच्या वेगळ्या धाटणीचा जिवंतपणा साकार झालेला दिसून येतो. चित्रमयता, नादमाधुर्य, यमक, शब्दांची पुनरावृत्ती, रंगांची उधळण, दृकश्राव्य रचना इत्यादी स्वरुपाची भाषीक रचना मांडगूळकर लेखनात करतात.

व्यंकटेश माडगुळकरांच्या भाषाशैलीविषयी चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''माडगूळकरांची भाषा सर्वांगानी चित्रमय आहे. भाषेतील शब्दांची सहज आणि अचूक ठेवण, त्यातून निर्माण होणारी गद्यशैलीची अशी खास लय, ताल आणि थाट, अव्याप्ती आणि अतिव्याप्ती या दोघांना टाळून मोजकेपणाने, नेमकेपणाने आणि परिणामकारकतेने आपलं सर्व मनोगत व्यक्त करण्याची प्रभावी शैली, गद्यातून, दृक्‌श्राव्य संवेदना वाचकांमध्ये प्रभावीपणे उत्पन्न करण्याची क्षमता, जीवनव्यवहाराची पातळी सोडून कुठेही काव्यात्मकतेसाठी, कल्पनेच्या भरारीतून शब्दसंहितेचा उपयोग न करता सर्जनशील गद्याचा प्रभाव उत्पन्न करण्याचं सामर्थ्य जितकं माडगूळरांच्या शैलीत आढळतं तेवढं त्यांच्या सर्जनशीलतेचं कौतुक करण्यासाठी पुरेसं आहे.''[७३] वरील मतातून लेखकाच्या सत्तांतरच्या भाषाशैलीची परिणामकारकता लक्षात येते. अशाप्रकारे

माडगुळकरांची भाषा चित्रमय, दृकश्राव्य, संवेदना, लय, ताल, रुपरंग व्यक्त करणारी आहे असे मला वाटते.

**१.२.६. झोंबी :**

'झोंबी' या कादंबरीत कागल-कोल्हापूर परिसरातील बोलीभाषेचा वापर लेखकाने कौशल्याने केला आहे. कौटुंबिक संवादामध्ये बोलीभाषेची छटा उमटते. उदा. 'खा ये अदुगर', 'नको मला. मला भूक नाही.' 'अरं, खारं बाळा कालधरन उपाशी हाइस.' 'तुझ्या त्या मेहनत्याला दे जा खायला.' 'बारा नि बारा तास बसूण त्याला भूक लागली असल बघ'.(पृ.१०३) एक ते पंचवीस पाने ही तृतीय पुरूषी निवेदनाची तर पुढे प्रथम पुरूषी निवेदन आले आहे. निवेदनात प्रामुख्याने बोली व प्रमाण भाषा यांची सरमिसळ केलेली आढळते. कादंबरीतील घटना प्रसंगामध्ये ह्या भाषेमुळे जीवंतपणा आलेला दिसतो. बोलीभाषेतील शब्दांची परिणामकारकता दिसून येते. मिणत्या, कावकीक(पृ.१०३) लेखकाचे वडील कुटुंबातील व्यक्तींना विशेषता आईला शिव्या देतात. व्हैमाली(पृ.२३५), सुकाळीच्या अनेक प्रतिमा/प्रतिकांचा वापर कादंबरीत केला आहे. निसर्गवर्णने, व्यक्तीवर्णने अतिशय खुबीने केलेली आहेत. 'घोडं गंगेत न्हालं.' अशा प्रकारच्या म्हणींचा कथानकामध्ये समावेश झालेला दिसतो.

**१.२.७. झाडाझडती :**

'झाडाझडती' या कादंबरीतील भाषा ही मानवी विविध भावभावना सहजपणे व्यक्त करणारी आहे. तसेच निसर्गातील विविध घटकांचे हुबेहुब दर्शन घडवणारी आहे. धरणग्रस्तांच्या व्यथा व्यक्त करताना मनाला वेदना देणारी भाषा वापरलेली आहे. 'आधी मरण मग धरण'(पृ.७), 'आधी मरण आणि मगच धरणऽऽ!(पृ.१०), धरण! धरण! के बारा टिकल्यांचं धरण!'(पृ.७५) विश्वास पाटील यांच्या झाडाझडतीमधील भाषाशैलीविषयी शंकर सारडा म्हणतात, ''झाडाझडतीमधील भाषा, झाडंझुडपं, पशुपक्षी, डोंगरदऱ्या, निसर्गचक्र आणि मानवी हर्ष, खेदांचा फुलोरा या सर्वांना सहजपणे सामावून घेणारी रांगडी, तशी गोड आहे. ग्रामीण भाषेच्या अनंतकळा ती सहजपणे प्रकट करते. सत्ताधीशांची आणि नोकरशहांची मग्रुरीची भाषा, कायद्याची, अडवणूकीची भाषा आणि साध्या सरळ ग्रामीण जीवांची भाषा यांचा झटका झणझणीत ठरतो.''[७४] धरणग्रस्तांची भूमी संपादन केल्यानंतर त्यांना त्यांच्या जमिनींचे पैसे मिळाले त्यात काही जणांना जास्त पैसे मिळाले. उदाहरणार्थ, दत्तू सरपंच 'ज्याचं साधलं त्येचं उखळच पांढरं, अन ज्याचं बुडलं त्येच्या नाकातोंडात आताच पानी शिरलंयाऽ!'(पृ.५६)

अशा प्रकारची वाक्ये लेखकाने पात्रामुखी देऊन धरणग्रस्तांची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. आवडाई आणि नकुसा जात्यावरच्या ओव्या गायच्या. दोघींचाही कुंकवाचा धनी धरणाने गिळला. एकेक चरण गाताना त्या आपापल्या धन्याकडंच बघायच्या जणू!

'येशी बाहीरी चालला रथ। तुज्या मुलखी चाक रूतं।।

बुडला दरबार, बुडलं घरदार। पांगला रानवारा, तुज्या दारीचा स्वार।।'(पृ.१४२)

धरणाने जांभळी गाव बुडाले. धरणग्रस्तांना मायभूमीला परागंदा व्हावे लागले. आवडाईने आपल्या पतीला गमावले. घरदार सोडताना आवडाई तिच्या धन्याच्या आठवणीने व्याकूळ झाली तिच्या डोक्यात गौरीच्या गाण्याने फेर धरला होता.

'धन्या माज्या राजसरा ।

गेला सावलीचा आसरा ।।

धन्या माज्या राजबिंडा ।

काळ बांधी पदरी धोंडा ।।

येशीबाहीरी चालला रथ ।

तुज्या मुलखी चाक रूतं ।।

ढासळला पाऊस, पडला वाडा ।

कुण्या जल्मीचा हा रं झाडा? ।।

बुडाला दरबार, बुडलं घरदार ।

पांगला रानवारा, तुज्या दारीचा खारा ।।

राणी वनवाशी तुझी, तिचं पांढरं कपाळ ।

दिसाच्या माथ्यावरी कोसळलं आभाळ।।'(पृ.१५०,१५१)

गौरीच्या गीतातून आवडाईने तिचे दुःखी मन मोकळे करण्याचा प्रयत्न केला आहे. हा एक भाषाशैलीचा उत्कृष्ट नमुना मला वाटतो. विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' कादंबरी विस्ताराने मोठी असून देखील आकर्षक भाषाशैलीमुळे वाचकांना खिळवून ठेवते. झाडाझडतीची भाषाशैली प्रभावी, परिणामकारक, वास्तवदर्शी आणि लक्ष्यवेधी आहे. उदा. 'हैबती म्हणजे वाघाचा बछडा', 'तो मास्तर म्हणजे सापाचं पिल्लू', 'खैरमोडे गुरूजी म्हणजे काळा नाग', 'धरणग्रस्त म्हणजे धरतीची लेकरं', 'जांभळी गाव मुलखाचा डांबरट', 'रूपा म्हणजे चंद्राची चंद्रावळ', 'कुशाप्पा म्हणजे जंगलाचा राजा' अशा प्रकारच्या रूपकांचा वापर मोठ्या प्रमाणावर

केलेला आहे. या कादंबरीतील भाषाशैलीमध्ये उपमा या अलंकाराचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आहे. उदा. 'हल्या हत्तीसारखा माजला होता', 'म्हातारी म्हणजे तुरकाटीसारखी शिडशिडी', 'तिचे केस मोरपिसा सारखे दिसत होते', 'रूपा चाबकाच्या वादीसारखी कडाडली', 'चोरगे लग्नातल्या करवल्यासारखा ऐटीत बसलेला.' 'झाडाझडती' या कादंबरीतील निवेदने प्रामुख्याने तृतीयपुरुषी आणि संवादात्मक पद्धतीची असून बोलकी आहेत.

**१.२.८. राघववेळ :**

वालंबीची भाषा ही स्वगतांचीच भाषा आहे. 'संवाद' हे वऱ्हाडीतील भाषिक रुपांनी परिपूर्ण आहेत. कादंबरीत दलितांची-मातंगांची वैदर्भिय बोली समर्थपणे लेखकाने उपयोगात आणली आहे. मातंगांच्या रोजच्या व्यवहारातील व व्यावसायिक बोलींच्या उपयोजनांतून कादंबरीला एक वेगळेच परिमाण प्राप्त झाले आहे. वैदर्भिय शब्दकळा, वैदर्भिय म्हणी, वाक्‌प्रचार, सुविचार यांचा केलेला वापर कादंबरीच्या परिणामकारकतेत निश्चितच भर टाकतांना दिसतो. प्रसंगाला व घटनेला समर्पक वातावरण निर्मिती करुन कथानकाला साजेल अशी वर्णने आली आहेत. राघववेळच्या भाषाशैलीचे वैशिष्ट्ये म्हणजे मोठया समर्थपणे वापरलेली वैदर्भिय बोली हे आहे. लहान-लहान वाक्य ही महत्त्वाची बाब कादंबरीत प्रत्येक पृष्ठावर आलेली आहे.

**१.२.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' या कादंबरीचे कथानक हे ऐतिहासिक आहे. कथानकातील प्रमुख पात्रे ही सुशिक्षीत आहेत त्यामुळे बहंतांशी संवाद हे प्रमाणभाषेत आहेत. निवेदनशैली प्रमाणभाषेत आहे. एकंदरीत ही कादंबरी लेखकाने प्रमाणभाषेत साकारलेली आहे. संवाद मात्र बोलीभाषेत आलेले आहेत. आवडाबाई वडील मुलीला समजावताना म्हणतात, राधाकिसन लपला होता त्याठिकाणी फोटोग्राफीच्या याच उद्देशाने आलेल्या एका इंग्रजाच्या तोंडची वाक्ये, ''व्हेअर इज द गर्ल? आय वॉन्ट टू सी हर. शी इज व्हेरी चार्मिंग. आय वॉन्ट टू सी हर. प्लीज, डोन्ट मिसअंडरस्टँड.''(पृ.११५) अशा प्रकारे प्रसंगानुरूप इंग्रजी संवादांचा वापर केला आहे. हिंदी भाषेचाही मधून मधून संवाद आला आहे. अकबर भाई म्हणाला, ''वैसे काँग्रेसकू माननेवाले कम नहीं, हमारी कौम मे, लेकीन अपनके भी कान्ट्याक्ट है और तुमने बोला करके अपन लड रहे हैं. नही तो इन कम्युनिस्ट लोगोंका क्या? इनको मजहब, अल्लाह, कुछ खयाल नही.''(पृ.२६७) अशा प्रकारच्या प्रसंगानुरूप इंग्रजी व हिंदी वाक्यांचा वापर कादंबरीमध्ये केलेला दिसतो.

''बिकट वाट वहिवाट नसावी, धोपट मार्गा सोडू नको

संसारामधिं ऐस आपला, उगाच भटकत फिरू नको...''(पृ.२८)

साने गुरूजींनी नाना, पांडुरंग, नारायण यांना प्रेरणा देण्यास कुसुमाग्रजांची कविता ऐकविली.

''गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार

अन् वज्रांचे छातीवरती घ्या झेलून प्रहार...!

खळखळू द्या या अद्य शृंखला हातापायात

पोलादाची काय तमा मरणाच्या दारात...?''(पृ.१३२)

नानांनी कार्यकर्त्यांच्या सभांसाठी सभागृह निर्माण केले होते. तेथे साधारणतः पंधरा सोळा वयोगटातील मुले कविता म्हणत होती.

''सदैव सैनिकाऽऽ पुढेच जायचे

न मागुती तुवाऽऽ कधी फिरायचे...''(पृ.१४९)

देशभक्ती जागविणारी भाषाशैली कथानकाच्या ओघात लेखक साकार करतो.

धरणग्रस्तांनी नानांसमोर आपली कैफियत मांडली त्यातील काही धरणग्रस्तांनी त्यांना ज्या पद्धतीने लाभवाल्या क्षेत्रातील लोकांनी समजुत घातली ती अशी, ''तुम्ही आम्ही भाऊ भाऊ समदे मिळून सुकानी राहू.''(पृ.२००)

धरणग्रस्तांची धारणा, ''ठेविले अनंते तैशेची राहावे। चित्ती असू द्यावे समाधान''(पृ.२०१) अशी झाली. अशा प्रकारे निवेदनाचा उत्कृष्ट नमुना लेखकाने मांडला आहे. कादंबरीमध्ये लेखकाने पत्रांचा समावेशही केला आहे. भाषेच्या अंगाने 'ताम्रपट'ची भाषाशैली अलंकार, प्रतिमा, रुपके, यांमधून काव्यात्मक रुपात साकारते.

**१.२.१०. तणकटः**

'तणकट' ही राजन गवस यांची ग्रामीण कादंबरी तसेच दलित जीवनाचा ही समावेश असल्यामुळे तिला दलित ग्रामीण म्हणता येईल. 'तणकट' या कादंबरीतील संवादातून ग्रामीण भाषा प्रकट होते. संघर्षाच्या संवादामध्ये वाक्या-वाक्याला शिव्या आहेत. गणू पाटील याच्या वाड्यावर गेलेल्या महारांच्या मोर्चाला बघून गणू पाटील म्हणाला, ''अरंऽऽ तुमच्या मायलाऽऽ सगळी म्हारं मिळून आल्यासा व्हय रंऽऽ रांडच्यानुऽऽ'' म्हणजे पाटलाच्या शब्दातून पाटीलकी व्यक्त होते.(पृ.७५)

महारवाड्यातील मुलांची भाषा हा ग्रामीण आहे व भाषेत ही अरेरावी जाणवते. ग्रामीण भागातील शिकले सवरलेले विद्यार्थी ही मित्रांशी गप्पा मारताना बोली भाषेचाच वापर करताना

आढळतात. कबीरचा मित्र पितांबर जगदाळे कबीरला म्हणाला, ''शाब्बास! आयला, सरकारचं जावाई तुमी. तुमास्नी शिकल्या शिकल्या नौकऱ्या. आजी आमास्नी काय तर धतुरा! आता खरी चैनी तुमचीच गं।''(पृ.६३) पितांबर जगदाळे व मोहन बल्लाळ या दोन्ही सवर्ण विद्यार्थ्यांच्या भाषेत फरक वाटतो. मोहन बल्लाळ प्रमाण भाषेत बोलतो.

स्थलवर्णन करताना लेखकाने अंधाराची विविध रूपे आपल्या लेखणीतून व्यक्त केली आहेत. 'समोर फक्त अंधारच अंधार. तांब्यातल्या पाण्यावर किरमिंजी झालेला अंधार. झाडातून उभा पाझरणारा अंधार, दगडांच्या गर्दीत लदबदलेला अंधार. आकाशात फक्त अंधारच अंधार. गडद काळा. फक्त त्याच्यावर निळसर छटा. मध्येच कुठंतरी लुकलुक करणारी एखादी अस्पष्ट चांदणी पण तीही अंधाराच्या विळख्यात निस्तेज बसल्यासारखी'(पृ.७७) अंधाराचे वर्णन लेखक भाषेच्या एका वेगळ्याच छटेतून मांडतो. कादंबरीतील संवाद हे प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहेत. त्यात निवेदने, कबीरचे स्वगत, वर्णन हे मात्र प्रमाणभाषेत आलेले आहे. ग्रामीण वाक्प्रचारांचा समावेश आहे. भांडण नसले तरी व्यक्तींच्या तोंडात शिव्या आहेत. भाषणांची भाषा व्यक्तीनुरूप वेगवेगळी आहे. प्रतिमा-प्रतिके, रुपके सुविचार, म्हणी यांचा प्रसंगानुरुप वापर केलेला आढळतो.

**१.२.११. डांगोरा एका नगरीचा :**

'डांगोरा एका नगरीचा' ही कादंबरी भाषाशैलीच्या दृष्टीने एक वेगळ्याच उंचीवर गेलेली आहे. अनेक विचार, सुविचार, सुभाषिते, श्लोक यांचा वापर घटना-प्रसंगानुसार लेखकाने समर्पकतेने केलेला आहे. इंग्रजी शब्दांचा वापर हे एक वेगळेच वैशिष्टये भाषेत असलेले दिसते. समर्पक म्हणी, वाक्प्रचार, समृद्ध शब्दकळा भाषेला उंची प्राप्त करुन देतात. संवाद हे मोठे असले तरी कथानकाला पुढे घेऊन जाण्यासाठी ते योग्यच असलेले वाटतात. स्वगत व भाष्य ही जणूकाय आपणास एक प्रकारचे विचार देऊन जातात. अनेक प्रतिमा, प्रतिके, अलंकार यांची रचना घटना प्रसंगांना व व्यक्तिचित्रणांना महत्त्व प्राप्त करुन देतात. त्यातूनच कादंबरीच्या वाङ्मयीन सौंदर्यात भर पडलेली आहे. न्यायालयीन कामकाजातील भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर लेखकाने केलेला आहे. न्यायालयीन जबान्या व उलट तपासण्या करण्यासाठी लेखकाने प्रश्नोत्तरांच्या ऐवजी नाटयछटात्मक रचनेच्या भाषेचा वापर परिणामकारकतेसाठी प्रभावीपणे केलेला आहे. पात्र व प्रसंगानुरुप बदलणाऱ्या भाषेमुळे आशयाला व आविष्काराला परिणामकारकता प्राप्त झाली आहे.

उदा.मराठी, इंग्रजी, कन्नड, हिंदी, उर्दू मिश्रित मराठी यांचे उपयोजन योग्य ठिकाणी समर्पकपणे केलेले दिसून येते.

**१.२.१२. बारोमास :**

'बारोमास' या कादंबरीचे लेखन तृतीय पुरुषी निवेदन पद्धतीचे आहे. निवेदनात नागरी आणि संवादात वैदर्भी बोली भाषेचा वापर लेखकाने केला आहे. या कादंबरीचे वैशिष्टे म्हणजे यातील म्हणी, वाक्प्रचार यांचा फार मोठया प्रमाणावर वापर केलेला आहे व त्यावर प्रामुख्याने वैदर्भी बोलीचा प्रभाव जाणवतो. लेखकाने बोलीभाषेतील अनेक शब्द वापरले आहेत. शिव्याही बोलीभाषेतल्या आहेत. अधूनमधून सुविचारांचाही वापर केलेला आढळतो. म्हणी, वाक्प्रचार, शब्दकळा, शिव्या या सर्वांचा मिळून वैदर्भीबोलींचा शब्दकोश तयार होऊ शकतो. ग्रामीण साहित्यात शेतकऱ्यांच्या व्यथा मांडताना विद्रोह येतो. पण बारोमासचे वैशिष्टे म्हणजे कादंबरीत कुठेही विद्रोह किंवा आक्रस्ताळेपणा आला नाही. लेखकाने मानवी जीवन दाखविण्यासाठी ज्या प्रतिमा वापरल्या आहेत. त्यात प्राणीजीवनाचा उल्लेख जाणवला. चंद्री मांजर हे त्यातील महत्वाचे उदाहरण सांगता येईल. अन्नासाठी तिचा चाललेला आटापिटा आणि शेवटी एन्ड्रिनमुळे झालेला तिचा मृत्यू यातून मानवी जीवनाशी तिचे साधर्म्य असलेले जाणवले.

**१.२.१३. भूमी :**

'मैथिली' या कादंबरीत लेखिकेने अनेक सुभाषिते, श्लोक, काव्य ओळी, नाटकातील उत्कृष्ट संवाद यांचा समावेश करून कादंबरी आकर्षक बनवली आहे. मैथिलीच्या डॅडीचे मित्र डॉ. चित्तरंजन एकदा मैथिलीच्या घरी आले त्यावेळी पहाटे आंघोळ केल्यानंतर म्हणलेला श्लोक–

'दिनमषि रजनी सायंपातः
शिशिरवसन्तौ पुनरायातः
कालः क्रीडति गच्छत्यायुः
तदपि न मुञ्चत्याशावायू:'(पृ.६)

लहानपणी आत्याच्या घरी तिने रेडिओवर ऐकलेली प्रार्थना–

'वंदे त्वा वागदेवी बुध्दिदायिनीम्
नमतु नमतु पदयुगुलं तव निरंतरम्'(पृ.२५)

दहावीच्या पुस्तकातील अपन्हुती अलंकाराचे उदाहरण असलेली कविता–

'रविरपि न दहाति या दृग्याद्दग्दहति वालुकानिकरः।'(पृ.४४) किंवा मैथिलीला आवडलेली कविता व तिच्या काव्य ओळी–

'न हे नभोमंडल वारिराशी
न तारका फेसचि हा तयाशी
न चंद्रमा नावचि चालताहे
न अंक तो तीवर शीड आहे'(पृ.४४)

मैथिलीने चेतनचा स्वर पकडून 'राजसन्यास' नाटकातील उत्कृष्ट, भाषाशैलीचा नमूला मांडला आहे. ''रायगडचा राजा आज तुझ्याशी पुन्हा लग्न करीत आहे. मस्तकावर सुटणाऱ्या या थेंबांची बिनसरांची मुंडावळ तुझ्या कपाळी शोभते आहे. समोर संध्याकाळचा होम पेटला आहे. तुफान दरियात मरणाचा नेम नसल्यामुळे काळाचा एक पाश आपल्या दोघांच्या कंठात आहे. त्याचीच लगीनमाळ करून डोंगरलाटेच्या बोहल्यावर रायगडचा राजा मनाच्या मुक्या मंत्र्याने तुलसी तुझ्याशी लग्न लावीत आहे.''(पृ.७५) निसर्गवर्णनात विवाह प्रसंगातील विधी प्रतिकात्मक रूपात मांडून जो संवाद लेखिकेने येथे दिला आहे. त्यामुळे लेखिकेच्या भाषाशैलीला विशिष्ट उंची प्राप्त होते.

**१.२.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

प्रस्तुत कादंबरीला पार्श्वभूमी ही प्रामुख्याने शहरी वातावरणाची आहे. तसेच सुबोध आणि सुमाधुरी यांच्यासारख्या उच्चभ्रू कुटुंबातील संवाद यामध्ये आहेत. संवादाची भाषाही प्रामुख्याने शहरी प्रमाण भाषा आहे. कादंबरीच्या या भागात अनेक इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. उदा. ट्रान्सलेशन, फिल्ममेकिंग, टर्मिनॉलांजी, मूव्ही, कॉमेडी कॉन्फिडन्स हंड्रेड पर्सेंट, लायब्ररी, कल्चरल, कास्ट, सिनेमा, ऑडिटारियम, स्क्रीनिंग, सेंसार इत्यादी.

या कादंबरीत सर्वच माणसांना काही ना काही प्रश्न पडलेले आहेत. त्यांच्याजवळ या प्रश्नांची उत्तरे नाहीत. आपआपल्या संस्कृतीने प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी शाब्दिक आणि भावनिक व्यवस्था करुन ठेवली आहे ती बिनदिक्कत स्वीकारुन वेळ निभावून नेण्यातच जगणे मानणारी सर्व मंडळी आहेत. किशोर सानप मनोहरांच्या भाषाशैली विषयी म्हणतात, ''श्याम मनोहरांचे लेखन सहज ओळखता येईल. अशीच शैली त्यांच्या कादंबरीमध्ये दिसून येते. वेगळेपणा आणि निवड ही शैलीची स्वाभाविक वैशिष्टये आहेत. भालचंद्र नेमाडे यांची शैली, तुकारामांची शैली, नारायण सुर्व्यांची शैली, मर्ढेकरांची शैली जशी स्वतंत्र आणि स्वयंभू आहे तशीच श्याम

मनोहरांची शैली मराठीत ओळखली जावी एवढी ती स्पष्ट आणि ठळक आहे. मराठीत अशी शैली निर्माण करण्याची क्षमता दुर्मिळ आहे.''[७५] श्याम मनोहरांच्या शैलीची काही मोजकी उदाहरणे देऊन तिचे ठळक स्वरुप स्पष्ट करता येईल. कादंबरीचे सर्व निवेदन हे तृतीयपुरुषी निवेदन आहे. छोटे छोटे संवाद म्हणजेच आटोपशीर संवादांचा समावेश केलेला आहे. चित्रपट क्षेत्रातील परिपूर्ण माहितीची निवेदने कादंबरीत समाविष्ट झालेली आहेत. इंग्रजी शब्दांचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला आहे.

**१.२.१५. खारीच्या वाटा :**

'खारीच्या वाटा' ही ग्रामीण कादंबरी आहे. ग्रामीण भागातील मुलांचे भावविश्व ह्यात मांडले आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाशी संबंधित सर्व घटना-प्रसंग त्यात आलेले आहेत. दोन किशोरवयीन मुले व त्यांनी पाळलेली खार 'लुकी' या प्रमुख पात्रांची गुंफन असलेल्या या कादंबरीत संवाद तुरळक आहेत. त्यामुळे ग्रामीण भाषेतील संवाद अल्प आहेत. परंतु शेतीशी संबंधीत अनेक शब्द तसेच ग्रामीण भाषेतील शब्दांचा लेखकाने वाचकांना परिचय करुन दिलेला आहे. उदाहरण द्यायचं झालं तर 'नांगर, फाळ, डोईनांगर, शिळवाट, पास, पाडयाळ, मुस्की विळे, कोयते, कुदळ्या, फावडी, टिकाव' शिवाय 'धान्याच्या कणगी, डिबली, बांबूंच्या पाट्या, डाल, इरली मातीची भरडण, जाती, दगडी जाती, मडकी, रांजण, माथला, उखळ'(पृ.१४५)

यमक जुळणारी किंवा नादमाधुर्य साधणारी शब्दरचना लेखकाने वापरली आहे. धोंडीबा म्हणजे त्यांचा गुराखी. त्याच्या घुंगराच्या काठीचा नाद 'खळ्ळक खळ्ळक'(पृ.१७) या धोंडीबाची कधी 'खटखट नाही. मटमट नाही'(पृ.७२) धोंडीबाने जेव्हा साप पाहिला व त्याने त्याला फटका मारण्याचा प्रयत्न केला तेव्हा 'साप गांगरलेला. धोंडीबा भेदरलेला'(पृ.९८) लेखक ज्या शाळेत जात होतो तेथे शाळेतील सुटीच्या वेळा म्हणजे सावलीवर ठरत होत्या. सुटीची वेळ झाली पण गुरुजी पहिलीच्या मुलांमध्ये रमले होते. तेव्हा लेखक म्हणतो, ''त्यांना सांगण म्हणजे स्वतःलाच टांगण''(पृ.२४) लेखक त्याच्या सवंगडयासोबत खेळत तेव्हा खेळाच्या जोशात 'ढकलाढकल बुकलाबुकल' असायची.(पृ.२८) अशा प्रकारे कितीतरी उदाहरणे देता येतील.

लेखक व त्यांचे मित्र खेळायला सुरुवात करायचे तेव्हा खेळाचा पंच एक मंत्र म्हणायचा. 'आरिंग मिरिंग लवंगा तिरिंग... तिरता तिरता डुब डुब बाजा... हुक्का तिक्का रेस मास... उतरला राजा...'(पृ.२९) कादंबरीच्या ओघात लेखकाने दत्तुच्या लग्नाचा सविस्तर उल्लेख केला आहे. दत्तूला हळद लावताना वाजंत्र्यांनी गाणं सुरु झालं. 'गणानं घुंगरु हरिवलंऽऽ... हरिवलं तर हरवू

दे ऽऽ गणाला माझ्या घेऊन येऽऽ'(पृ.९४) सावरीच्या फुलात बोटभर लांबीच्या बारीक, लवलवत्या काडया. त्यांच्या टोकाशी लगडलेले, मोहरी ऐवढे दाणे ते रात्रभर पाण्यात भिजवून दुसऱ्या दिवशी रंगपंचमीचा रंग तयार करणे हा मुलांचा रंगपंचमी साजरी करण्याचा मार्ग होता. त्यातून तयार होणार रंग हा जांभळा आहे. तेव्हा लेखक सांगतो, 'आत जांभळा बाहेर जांभळा। जांभळया डोहात जांभळया उडया. जांभळया बुडया!'(पृ.१३०) अशा अलंकाराचा वापर लेखकाने केला आहे. या कादंबरीचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे कादंबरीत लेखकाने सांकेतिक भाषेचा वापर केला आहे. सुटीच्या वेळा सावलीवर ठरत. 'सावली पहिल्या पायरीला भिडली की गुरुजी टेबलावर दोनदा मूठ आपटीत. म्हणजे सुटी झाली. असं समजायचं'(पृ.२२) 'एकदा आपटली म्हणजे सगळयांनी एकदम 'बे' चे पाढे सुरु करा.'(पृ.२५) असे सर्व विद्यार्थ्यांनी समजायचे.

**१.२.१६. फेसाटी :**

'फेसाटी' ह्या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे ह्या कादंबरीतील संवादच फक्त बोली भाषेतील नाहीत तर त्यातील निवेदनही बोली भाषेतीलच आहेत. सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील निगडी या गावात धनगर समाजातील शेती आणि पशुपालन करणारे नाथाचे कुटुंब आहे. त्याने स्वतःच्या जीवनाचा प्रवास सुंबरानच्या आख्यानरुपात गुंफला आहे. कादंबरीची भाषा अतिशय ओघवती आहे. विविध घटना-प्रसंग कथेच्या रुपात गुंफून कादंबरी साकारली आहे. भाषेविषयी लेखक नवनाथ गोरे म्हणतात, ''हा इथला संघर्ष आहे, त्याचा विषय या भुमितला आहे, यामुळे त्याची भाषा धनगरी बोलीची ठेवली आहे. पण त्यामुळे ती वाचकांना जास्त भावली असावी.''[७६] कौटुंबिक संवाद हे बोलीभाषेत आले आहेत.

चार ते पाच शब्दांची वाक्ये असे ह्या कादंबरीचे वैशिट्ये सांगता येईल. उदा. 'आता मी दहावीला गेलू हुतो. शाळा चालू हुती. दिसभर घरात खावून झोपायचू. झोपून कंबर लई दुखायची.'(पृ.११४) कमी शब्दांची वाक्यरचना हे भाषेचे वेगळेपण ह्या कादंबरीत अधोरेखित होणारे आहे. बोली भाषेतील अनेक शब्दांचा वापर कादंबरीत केला आहे. उदा.चिपाडं, श्यात(पृ.१२), खांडवा(पृ.१४), बलीम(पृ.१५) हिरक्काच्या लग्नाच्या वेळी बाया पोळ्या लाटतच गाणं म्हणतात.(पृ.३६)

'लेकीचा जल्म आतराळी दोडका

सोयरा रितीचा हुडका

नवरीचा बाप हुंड्याबद्दल दितू गहू

नवरा थोराचा हाय बाजीराऊ

नवरीचा बाप हुंड्याबद्दल दितू डाळ

नवरा सावकाराचा हाय बाळ...'(पृ.३६)

ह्या गीतातून लेखकाच्या भाषाशैलीचा तो उत्कृष्ट नमुना असलेला वाटतो. यमक जुळवून अर्थपूर्ण रचना केलेली आहे. लेखकाने कथानक लिहिताना धनगरी ओवीचा समावेश केला आहे.

सुंबरानं मांडीलं । सुंबरानं मांडीलं ।।

तवाच्या बा येळंला। येळंच्या बा घडीला ।।

लोमेश ऋषी बोलला। धर्म तेव्हा राजाला ।।

एका सूर्यवंश कुळीला । मृत्यू तेव्हा लोकाला ।।

अयोध्या त्याहे नगरीला । हरिश्चंद्र गादीला।।

राणी तारामती जोडीला । फार शोभा दोघाला ।।

दानशूर राजाला । पुत्र एक वंशाला ।।

रोहिदास नाव लेकाला । लहान असे वयाला ।।

राज्य तेव्हा करण्याला । होते अयोध्या नगरीला ।।

त्याच तेव्हा येळला । इंद्र महा सभेला ।।

आणखी महान ऋषीला । तेहत्तीस कोट देवाला ।।

इंद्र बसला गादीला । आनंदी आनंद चालला।।

इंद्र तेव्हा सभेला । इंद्र त्याही राज्याला ।।

सुंबरानं मांडीलं । सुंबरानं मांडीलं । सुंबरानं मांडीलं ।।(पृ.८०)

सुगीच्या दिवसात काकू फार आनंदात होती. कारण शेती घेतल्यापासून एवढे धान्य कधीही झाले नव्हते. त्यामुळे जात्यावर दळताना काकू आनंदाने गात होती.

नाचार संसार

तिन लाकडाची नव्हती कोप

दोन्ही माझी बाळं

सोप्या माळीला जागं आखं

लक्ष्मी आई आली

सोप्या माळीला कटाळली

आता माझ्या दोन्ही बाळानू

तन घराला राजी झाल्याई

लक्ष्मी आई आली.

आल्या पांगळ्या पायाची

आता माझ्या दोन्ही बाळान्

तुमच्या जल्मा जायाची

नाचार संसार देव बसलं ईचाराला

लईंदी झालया नाचाराला

नाचार संसार

देव ईचार करत्यात

हाती धरावं म्हणत्यात

हाती धरावं म्हणत्यातं(पृ.८५)

कर्नाटकच्या सीमेलगतचा जिल्हा असल्याने कन्नड भाषिकांची भाषा ऐकायला मिळते. काकू ज्या मालकाच्या शेतात मजूरीला जात होती. तेथेच ती नाथाला घेऊन गेली, तेव्हा तो मालक कन्नड मध्ये बोलला, ''ये सुबा ईवानिगी यॉक तंद्दीदी. ईवां दगद्दा मांडाव्वां. ईवनिगी ह्यांग आगताद दगद्दा.'' म्हणजे ये सुब्बा हेला कशाला आणलंय ही काम करणारा हेला काम कसं हुईल.(पृ.८७) कादंबरीच्या भाषेविषयी लेखक म्हणतो, 'जत तालुक्याची बोलीभाषा अत्यंत समर्पकपणे वापरली.'[७७] कादंबरीचा आरंभ आणि समारोप हा लेखकाने सुंबरानाने केला आहे. म्हणजेच सुंबरान, धनगरी ओव्या, जात्यावरची गाणी, लग्नातील गाणी यांचा समावेश कादंबरीत केला आहे. बहुतांशी वाक्यांचा शेवट हा उकारान्त क्रियापदांनी केला आहे. उदा. हुतं, हुती, आलू, गेलू, यितू प्रस्तुत कादंबरी भाषाशैलीच्या अनुषंगाने समृद्ध असलेली दिसते.

**१.२.१. निवेदन :**

प्रस्तुत भागात कादंबरीचे निवेदन व भाषाशैली मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील निवेदन, स्वगत, संवाद, भाष्ये, वर्णन ह्या अंगाने येथे विचार केलेला आहे. त्या अनुषंगाने प्रत्येक कादंबरीने व्यापलेला परिसर, त्यामधील पात्रे

ह्यांचा परस्पर संबंध लक्षात घ्यावयाचा आहे. भाषेतून प्रत्येकाला येणारी वातावरणनिर्मिती ह्या पात्रांची बोली, परंपरा, रुढी, शब्दकला, म्हणी, वाक्‌प्रचार ह्याही गोष्टी समजून घ्यावयाच्या आहेत.

कादंबरीमध्ये येणारा निवेदक सर्वसाक्षी असतो. निवेदक हा सर्वसाक्षी भावाने हे कथाविश्व एकीकडे पाहतच असतो, तर दुसरीकडे त्या कथानकाचा ओघ कायम ठेवण्यासाठी सर्वसाक्षी भावाने आपले निवेदन करीत असतो. निवेदकाला सर्वकाळातील व स्थळातील घटना, गोष्टी, प्रसंग, पात्रे, त्यांचे स्वरुप, त्यांच्या भावना, त्यांच्या कल्पना, त्यांचे विचार त्याला माहीत असतात. अशाच भूमिकेतून तो आपले निवेदन करीत असतो. कादंबरीतील निवेदनाचे महत्व स्पष्ट करताना नंदा मेश्राम म्हणतात, ''कादंबरीला एक विशिष्ट रुप देतांना सर्व घटकांचा म्हणजेच विशिष्ट स्वभाव धर्माच्या व्यक्ती, त्यांच्या कृती-उक्ती, घटनाप्रसंग, वातावरण इत्यादी तपशील पुरविण्यासाठी आणि विशिष्ट पद्धतीने मांडणी करण्यासाठी कादंबरीकाराजवळ निवेदन हेच एक साधन असते. कादंबरीकाराने निवेदनाच्या बाबतीत कोणतेही प्रयोग केले, तरी खऱ्या अर्थाने निवेदनाची सूत्रे त्याच्याच हाती असतात. तरीही प्रत्येक कादंबरीमध्ये निवेदन तंत्राच्या वेगवेगळया पद्धती, प्रकार दिसून येतात. कारण वास्तवात असणाऱ्या अनेकविध रुपांची परिमाणे, एकाच ठाशीव-ठरीव निवेदन पद्धतीचा वापर करुन, सूचित करता येणार नाही. म्हणून कादंबरीकार आशयानुरुप निवेदनाचे तंत्र किंवा प्रकार उपयोगात आणतो.''[७८]

वरील सर्व गोष्टी विचारात घेता हा निवेदक निवेदनाच्या बाबतीत कितपत यशस्वी झाला आहे, याचे आकलन होण्यास मदत होते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेली निवेदन ह्या कसोटीस कितपत पात्र ठरतात याचा परामर्श घेता येईल. ''एक पाठोपाठ या क्रमाने येणाऱ्या कल्पित घटनांच्या अनुक्रमाचे निवेदकाने विशिष्ट दृष्टिने व विशिष्ट रीतीने केलेला शब्दरूप म्हणजे निवेदन असते.'' साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये अशा स्वरुपाची कथानकाला पुरक अशी अनेक निवेदने येतात. त्याचा प्रातिनिधिक स्वरुपात परामर्श घेऊ.

### १.२.१.१. ययाति :

'ययाति' ही कादंबरी लेखकाने ययाति, देवयानी व शर्मिष्ठा यांच्या आत्मनिवेदनातून साकारली आहे. त्या प्रमुख पात्रांच्या प्रथम पुरूषी निवेदनांतून संपूर्ण कादंबरी साकारली आहे. ह्या प्रमुख पात्रांच्या प्रथम पुरूषी निवेदनांतून संपूर्ण कथानक गुंफले गेले आहे. प्रमुख पात्रे कथन करीत असताना त्यांनी जे भोगले व ते जे जगले ते व्यक्त केले. त्या तिघांच्या जीवनात येणाऱ्या घटना

प्रसंगांची गुंफण परस्परांवरती असल्यामुळे पात्रामुखी निवेदन होताना पुनरावृत्ती दिसते. ययातिने त्याची काम कथा मांडली आहे. देवयानीने संसार कथा रंगविली, शर्मिष्ठेने प्रेमकथा आळविली तर कचाने भक्तीगाथा प्रकट केली. लेखकाने केलेली निवेदने वाचकाला अंतर्मुख होण्यास भाग पाडतात.

ययाति धनुर्विद्येचे धडे देत असताना त्याने एका पक्षीणीवर बाण सोडला तेव्हा कवी मनाच्या ययातिला वेदना झाल्या. निसर्गाशी असलेले ययातिचे नाते तत्क्षणी तुटले. ययातिची त्यावेळी झालेली मनोव्यथा लेखक पुढील निवेदनातून व्यक्त करतो. ''मी वीर झालो होतो; पण तो सुखासुखी नव्हे. माझ्यातल्या कवीची हत्या करून त्याच्या समाधीवर या वीराने आपले सिंहासन थाटले होते. त्या शरसंधानाचे कौतुक झाले त्या रात्री! राजवाड्यात आईने स्वतः त्या पाखरांचे मांस शिजविले. मोठे रूचकर करून तिने ते बाबांना नि मला वाढले, स्वतःही खाल्ले, बाबांनी ते मिटक्या मारीत, घासा-घासाला माझे कौतुक करीत खाल्ले. मला मात्र प्रत्येक घास गिळताना कोण कष्ट पडले ! रात्री झोपेत दोन-चारदा मी जागा झालो. जिव्हारी बाण लागून ती पक्षीण आक्रोश करीत आहे, असा मला एकदा भास झाला. पुन्हा जागा झालो. तेव्हा तिच्या पिलांचा चिवचिवाट ऐकू आला. अनेक वर्षांपूर्वी नाहीशा झालेल्या मुलाच्या आठवणीने आपली आई अजून व्याकूळ होते, पण तीच आई पाखरातल्या एका आईचा मृत्यू हसतमुखाने पाहते ! त्या निष्पाप प्राण्याचे शरीर विछिन्न करणाऱ्या मुलाचे कौतुक करते, त्या मुक्या मातेचे मांस मिटक्या मारीत खाते. त्या मांसाचा कण नि कण शेवटच्या क्षणापर्यंत आपल्या पिलांकरिता धडपडत होता, हे सहज विसरते. जीवनातल्या या विचित्र विरोधाने मी गोंधळून गेलो.(पृ.२१) ययातिचे हे निवेदन हृदय पिळवटून टाकणारे व प्राणी मात्रांविषयी दया निर्माण करणारे तसेच मातेचे प्रेम व्यक्त करणारे आहे.

**१.२.१.२. रथचक्र :**

प्रस्तुत कादंबरीमध्ये तिचा मुलगा मॅट्रिकच्या परीक्षेत पहिला आला ती आनंदाने बेहोष होते. तिला तिच्या कष्टाचे चीज झाल्यासारखे वाटतं तेव्हा ती मुलाला पत्र पाठवून सांगते, तुला एकदा डोळे भरुन पाहावं एवढंच मनात आहे. उताराला पैसे पाठवलेस तर मुंबईला येईन पण मुलगा मात्र मला कोणालाही भेटावे अशी इच्छा नाही असं पत्रानं कळवितो. त्यावेळी तिने आत्महत्येचा विचार केला आणि त्यानंतर तिला जे आठवले ते तिने आत्मनिवेदनातून व्यक्त केले आहे. ''त्या घरातले सुखाचे दिवस तिला आठवले. त्यानंतरच्या घटनांचं स्मरण होताच ती चकित

झाली. एका क्षुद्र आयुष्यात केवढाले उत्पात! जावा तिचं कौतुक करीत होत्या. फार दिवस ते सुख तिला लाभलं नाही. असं का झाल? याचा विचार करायला तिला आता फुरसत नव्हती. तिनं आकाशाकडे नजर टाकली. चंद्र पश्चिमेकडे कलला होता. वाजले तरी किती? पक्ष्यांची किलबिलसुद्धा ऐकू येत नव्हती. घराला एक प्रदक्षिणा घालून विहिरीवर जावं असं तिच्या मनात आलं.''(पृ.२०६) अशा प्रकारे द्वितीय पुरुषी निवेदन लेखक करताना दिसतो.

**१.२.१.३. स्वामी :**

'स्वामी' ह्या कादंबरीमध्ये आलेल्या अनेक निवेदनापैकी उदाहरणादाखल पुढील निवेदने घेतली आहेत. गणेश महालात दरबार भरला होता. पेशवाईचे सारे सरदार, मानकरी आपापल्या बैठकीवर बसले होते.(पृ.३) गणेश महालाच्या प्रवेशद्वारापासून पेशव्यांच्या मसनदीपर्यंत तांबडी पायघडी अंथरली होती. मसनदीच्या दोन्ही बाजूंना सरदार-दरकदार यांच्यासाठी बैठका सजल्या होत्या. दबल्या आवाजात एकमेकांशी बोलण्यात सरदार मंडळी गर्क असतानाच मसनदीच्या डाव्या बाजूला असलेल्या चिकाच्या पडद्यांची हालचाल झाली. क्षणात दरबारात स्तब्धता पसरली त्याचवेळी भालदार-चोपदारांनी दिलेली ललकारी साऱ्यांच्या कानावर आली.(पृ.४) माधवराव थेऊरला गेले. देवदर्शन घेऊन सारे वाड्याकडे वळले. दिवाणखान्यात आले तेव्हा लेखकाने आपल्या निवेदनशैलीने दिवाणाचे रुप आपल्यासमोर मूर्त केले. 'शामदान्या, समयांच्या उजेडात दिवाणखाना उजाडला होता. छताला टांगलेल्या झुंबरांचे लोलक आत येणाऱ्या वाऱ्याबरोबर किणकिणत होते. दिवाणखान्यात गालिच्यांची बैठक अंथरली होती. मध्यभागी जरी-कलाबतूनं सजलेली बैठक होती. माधवराव बैठकीवरील मखमली लोडाला टेकून बसले. त्यांच्या आज्ञेने सर्व स्थानापन्न झाले आणि पाहता पाहता बैठक जुन्या नव्या आठवणींनी रंगली, ती थेट भोजनाची वर्दी येईपर्यंत!(पृ.३०) स्वामी ह्या कादंबरीमध्ये येणारी निवेदने हे प्रथम आणि द्वितीय पुरूषी येतांना दिसतात.

**१.२.१.४. स्मरणगाथा :**

स्मरणगाथा ही गो.नी. दांडेकरांची त्यांनी त्यांच्या जीवनामध्ये जे भोगलय किंवा अनुभवलं आहे ते स्वानुभव प्रथमपुरुषी निवेदनातून मांडले आहे. गो. नी. दांडेकर ज्या परिसरात वास्तव्यास होते किंवा ज्या ज्या ठिकाणी ते भटकले त्या स्थळांना त्यांनी त्यांच्या जीवनात जणू चित्रपटात दाखवावे. तसे दाखवण्याची क्षमता त्यांच्या निवेदनशैलीमध्ये आहे. स्मरणगाथा या कादंबरीत निसर्गवर्णने, स्थलवर्णने, यांचा समावेश आहे त्यामुळे त्यांच्या निवेदनातून ही ती वर्णने प्रभावी

झालेली आहेत. कादंबरीत गोपाळची कीर्तनशैली व गाडगेबाबांची कीर्तनाची शैली, तसेच नाटकातील पात्रांचे निवेदन, विविध घटना-प्रसंगावरील लेखकाचे भाष्य हे लेखकाच्या निवेदनशैलीमुळे कादंबरीचे कथानक उत्कृष्ट साकारलेले आहे. एकसंघ व कालानुक्रमे प्रथम पुरुषी निवेदन केल्यामुळे वाचकाला चित्रपट आलेख पाहिल्यासारखी अनुभूती मिळते. 'अकोले' हे प्रवरेकाठचं खूप जुनं गाव. किती जुनं? सिध्देश्वराचं हेमाडपंती देऊळ. स्मशानाजवळ. ते अगदी पार बुजून गेलं होतं. नांगरट करीत असता फाळाला त्याचा कळस लागला. मग सगळं देऊळ उकरुन काढलं.'(पृ.१६६)

गोपाळने जेव्हा पहिल्यांदा पांडुरंगाचे दर्शन घेतले तेव्हा कसा दिसला पांडुरंग? त्याचे उत्तर कीर्तनातून पांडुरंगाच्या रुपाचे वर्णन ऐकले होते ते त्यांनी कादंबरीत उतरविले; ''तो राजस, सुकुमार आहे. मदनाचा पुतळा आहे. भाळी कस्तुरीमळवट आहे. चंदनाची उटी आहे. कासे सोनसळा. पांघुरे वाटोळा असा तो घननीळ सावळा आहे. तें सुंदर ध्यान विटेवर उभे आहे. कटावरी कर आहेत. गळा तुळशीहार. कासे पितांबर. श्रवणी मकरकुंडले तळपताहेत. कंठी कौस्तुभमणि विराजितो आहे.''(पृ.२०३) अशा प्रकारे पांडुरंगाच्या मनमोहक रुपाचे वर्णन निवेदित करून पांडुरंग दर्शनाचा लाभ वाचकांना ही कांदबरी करून देते. प्रत्यक्ष पांडुरंगाचे रुप पाहिले, ''पांडुरंगाचं ते अत्यंत सौम्य, स्नेहभावानं दाटलेलं मुखमण्डल दिसलं. डोळे चांदीचे लावले होते, पण मी ते पाहिले नाहीत. किंबहुना मुद्रेवरला प्रत्येक अवयव पृथकपणं मला जाणवलाच नाही. भान झालं ते स्मितमुखी मुद्रेचं.''(पृ.२०३) अशाप्रकारे कीर्तनात ऐकलेले पांडुरंगाच्या रुपाचे निवेदन व प्रत्यक्ष पांडुरंग दर्शनाचे निवेदन लेखकाने करून वाचकाला पांडुरंगमय बनविले.

लेखकाने नर्मदा परिक्रमेला प्रारंभ केला. तेव्हा त्यांनी नर्मदेच्या भोवतालच्या घटकांचे जे निवेदन केले आहे त्यातून तेथील परिसराची कल्पना वाचकाला येते. 'संध्याकाळचं जे काय रेवेचं रुप दिसलं, ते सांगतां पुरवत नाहीं. ती पूर्वपश्चिम वाहाते. त्यामुळं सूर्यबिंब जणूं तिच्या पात्रांतच बुडी देऊं निघालं होतं. तिचं तरंगायित जल अवघं सोनेरी झालं होतं. ते स्थिर नव्हतं. चंचल होतं. पाण्याचा प्रत्येक खवला सोनेरी रुप ल्याला होता. ते शतसहस्त्र खवले एकाशेजारीं एक असे जडवले होते. जणूं त्या खवल्यांची प्रचण्ड भरजरी पैठणी मजसमोर पसरली होती. ती रुपमहिमा पाहून थक्क होऊन गेलो. सूर्यबिंब रेवाजळी बुडी देईपर्यंत अपलक नेत्रांनी तो अपूर्व रंगोत्सव पाहात राहिलो. सूर्यास्त झाल्यावर अचानक एक सोनेरी आभा उठली, आणि तिनं रेवेचं पात्र, दोन्ही तीरं, माझ्या मागचं सिद्धेश्वराचं मंदिर या सर्वांनाच अगदी उजळून टाकलं. तो भास काही

क्षण टिकला, आणि मग अंधकाराचा पडदा त्या अवघ्यावर हळूंहळूं उतरुं लागला.'(पृ.४४३, ४४४) परिक्रमा करताना लेखकाने नर्मदेच्या परिसराचे, परिक्रमावासियांचे तसेच त्याला आलेल्या, अनुभवांचे त्याला भावलेल्या नर्मदेच्या विविध रुपांचे मनोहारी दृश्य वरील निवेदनातून व्यक्त केले आहे.

**१.२.१.५. सत्तांतर :**

साहित्यकृतीच्या आशयाभिव्यक्तीसाठी लेखकाने कोणती निवेदनपद्धती वापरली आहे, हे पाहणे महत्वाचे असते. कादंबरीच्या आशयाला न्याय देणारी व आशयाचा समतोल राखणारी तृतीय पुरुषी निवेदनपध्दती कादंबरीकाराने ह्या कादंबरीत वापरली आहे. चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात. ''व्यंकटेश माडगूळकर हे उत्तम कथानिवेदक आहेत आणि त्यांच्या निवेदन कौशल्याचा प्रभाव कादंबरीच्या वाचकाच्या मनावरील संस्कार अधिक गहरा करतो.''[७९] सत्तांतरमध्ये कादंबरीच्या सुरुवातीलाच 'हळहळीत दुपार होती'(पृ.१) या वाक्याने निवेदक ही चित्रमयकथा सांगायला सुरुवात करतो. 'सत्तांतर'च्या निवेदनाविषयी मीरा तारळकर म्हणतात, ''माणूस हा मूलतः प्राणी आहे. त्याच्या साऱ्या प्रेरणा, आस्था, ईर्ष्या प्राणीविश्वातून आल्या आहेत. त्यामुळे जीवन जर समजून घ्यायचं असेल, त्याचे मूलभूत घटक आणि रुप जर न्याहाळून पाहायचे असतील तर या प्राणिसृष्टीच्या अनुभव विश्वात जायला हवं, अशी एक आदिम प्रेरणा माडगूळकरांना अस्वस्थ करीत असावी अणि त्यातूनच ते निसर्गाच्या, प्राण्यांच्या, वनस्पतींच्या, गवताच्या एवढे जवळ गेले असावे आणि इतकी सर्व विविधता त्यांनी साध्या बाळबोध निवेदनाच्याद्वारे मांडली. बहुतेक सर्व ठिकाणी निवेदक नसतो तर ते स्वतःच-माडगूळकरच-बहुतेक ठिकाणी निवेदक होतात. आणि आपल्या अनुभूतींचे दर्शन आपल्या साध्यासुध्या पारंपरिक कथन पद्धतीतून, मिताक्षरी शैलीतून करीत राहतात, हे उल्लेखनीय होय.''[८०]

**१.२.१.६. झोंबी :**

'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखक आनंद यादव यांनी निवेदन अतिउत्कृष्टपणे योजले आहे. कादंबरीच्या आरंभीचा काही भाग म्हणजे साधारणातः पंचवीस पानांपर्यंत लेखकाने स्वतःच्या जन्मापुर्वीचा भाग रेखाटला आहे त्यात रतनू म्हणजे लेखकाचे वडील आप्पाजी, रतनूचे वडील व चुलते तसेच आनंदाची आई तारा. तिचे वडील शिवाप्पा यांच्या  कौटुंबिक जीवनावर प्रकाश टाकला आहे. ते लेखकाने तृतीय पुरुषी निवेदनात व्यक्त केले आहे. त्यानंतरचा कादंबरीचा भाग मात्र प्रथमपुरुषी निवेदन व काही प्रसंगी तृतीय पुरुषी निवेदन असा संमिश्र स्वरुपात लेखकाने

मांडला आहे. ''विविध घटना प्रसंगामध्ये लेखक स्वतः उपस्थित असतो तेव्हा निवेदन हे प्रथमपुरुषी निवेदन असते. घटनांचा तपशील, वर्णन यात तृतीय पुरुषी निवेदन आले आहे. ''निवेदनाच्या तंत्रामुळेही 'झोंबी' ची परिणामकारकरता वाढली आहे.''[८१]

कादंबरीलेखन करताना लेखकाने विविध प्रसंगांचा बारकाव्याने वेध घेतला आहे. लेखकाने सहावीत असताना स्वातंत्र्यदिनाच्या दिवसाचा तपशीलवार वेध पुढील निवेदनामधून घेतला आहे.

''सगळ गाव ताजं ताजं वाटतं होतं. माणसं आंघोळी करून बाहेर पडलेली. गांधी टोप्या ज्याच्या त्याच्या डोक्यावर दिसत होत्या. उरुसात माणसं नटावीत तसा जो तो नटलेला. गाव माणासांनी भरल्यागत वाटत होतं. कुणीकुणी गुढ्याही उभ्या केलेल्या. भट गल्लीतनं शाळेकड चाललो; तर घराघरावर तिरंगी झेंडा लावलेला दिसत होता. दारासमोर रांगोळ्या काढल्या होत्या. तिकटीवर महात्मा गांधींजींचा मोठा फोटो कमान सजवून पुजला होता. गावचावडीवर मोठी गर्दी जमली होती. गावातले सरकारी डॉक्टर, वकील मंडळी, ब्राह्मण गल्लीतली बरीच मंडळी, सरकारी अधिकारी, कारभारी जमले होते. हुकूम देतील तशी पोलिसांची परेड इकडं तिकडं फिरत होती. पण तिथं थांबावं असं वाटेना.''(पृ.१८१)

वरील निवेदन हे लेखकाने स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी भटगल्लीतून शाळेच्या दिशेने जाताना टिपले आहे त्यामुळे ते तृतीय पुरुषी निवेदन आहे. महात्मा गांधाजींची हत्या झाली त्यावेळी गावातील मोठमोठया ब्राह्मणांची घरे जाळली, त्यावेळी केलेल्या जाळपोळीमुळे उद्‌वलेल्या परीस्थितीची कल्पना लेखकाच्या पुढील निवेदनातून आलेली आहे.

''आता वाडयावरचं सगळं छप्पर जळालेलं, कोलमडून ते आत पडलं होतं. काल रात्री पेटवलेला वाडा. तरी अजून धुमसत होता. बागेत झाडाच्या सावलीत तिघे भाऊ, त्यांची मुलं, त्यांच्या बायका, सुना, लेकी, नातवंड बसलेली दिसली. एका लग्नाचं वऱ्हाड होईल इतकी माणसं, गोऱ्यागोमटा बायका-मुली कधी नव्हे त्या बाहेर पडलेल्या दिसत होत्या. मुलं नेहमीच्याच आनंदानं खेळतं होती. मोठी मंडळी बसून काहीतरी बोलणी करत होती. साध्या पोशाखात होती.''(पृ.१७२)

**१.२.१.७. झाडाझडती :**

विश्वास पाटील यांच्या 'झाडाझडती' या कादंबरीतील निवेदन हे प्रामुख्याने तृतीयपुरुषी व संवादात्मक आहे. कादंबरीतील घटनाक्रम हा लेखकाने तृतीयपुरुषी निवेदनाने व्यक्त केला आहे. संवादही याच पद्धतीने मांडले आहेत. कादंबरीतील घटना, प्रसंग, निसर्गवर्णने किंवा लेखकाने

विविध विषयांवर केलेले भाष्य हे प्रामुख्याने वाचकांसमोर मांडतांना लेखकाने उत्कृष्ठ निवेदकाची भूमिका पार पाडलेली दिसते.

धरणाचे काम होणार म्हणून जांभळी गाव अनेक सोयी-सुविधांपासून वंचित होते. 'का तर आज ना उद्या धरण होणार रस्ता पाण्यात जाणार. नवा बांधायचा कशाला? दहा वर्ष मराठी शाळेची पडकी भिंत तशीच आहे. गुरुजींनी उसाच्या पाल्यानं ती कुडून घेतली एवढंच. वरच्या वाघजाई खोऱ्यासाठी जांभळीला एक सरकारी दवाखाना मंजूर झालेला. पुन्हा तो रद्द झाला. साऱ्यांचं मूळ एकच. धरण!'(पृ.१३) धरण होणार म्हणून सुविधा मिळाल्या नाहीत. धरणाग्रस्तांचे पुनर्वसन ज्या गावांमधये झाले त्या गावांमध्येही त्यांना सोयी सुविधा उपलब्ध झाल्या नाहीत. 'गावठाणात वीज आली होती. पण एखाद्या खांबावरचा बल गेला की तो बसवण्यासाठी सहा महिने बोंब मारावी लागत होती. तेव्हा कुठं बलाचा उजेड दिसायचा. अनेकजणांना घर बांधणीचं वाढीव चार हजाराचं कर्ज मिळालेलं. पण तेवढ्यात घराची चौकट होणार नव्हती. बुडीत जांभळीतली दुमजली घरं लोक विसरुन गेले होते. एक मोठं स्वप्न संपल्यासारखाच गाव पाण्याखाली गेला होता.'(पृ.२१४). गावठाणात शिक्षणाची दुरावस्था होती. म्हणजे एकूणच काय तर 'गावठाण पण दम्यानंच आजारी मात्र खरा दमेकरी कधीतरी सुटणार होता, धरणाग्रस्तांचा दमा एकदोन पिढयांचा बळी दिल्याशिवाय हटणार नव्हता.'(पृ.२१५) अशाप्रकारे लेखकाने तृतीय पुरुषी निवेदनातून धरणग्रस्तांची व्यथा मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. रस्ता, वीज, शाळा, घर यांची झालेली दयनीय स्थिती वरील निवेदनातून लेखक मांडतो.

**१.२.१.८. राघववेळ :**

मातंग समाजातील लोकांना ग्रहणाची लागलेली आतुरता लेखक पुढील निवेदनातून करतो. ''पौषातील पौर्णिमा. बोचऱ्या थंडीचा महिना पौष. कडाक्याच्या थंडीमुळे एरव्ही रात्री साडेआठ-नऊ वाजताच निजानीज व्हायची. परंतु पौर्णिमेच्या दिवशी थंडीचा मांग वेटाळ रोजच्या सारखा झोपला नाही. टक्क जागा होता. घराघरात गप्पा गोष्टी, हसणे, खिदळणे ऐकायला येत होते. दुधावरची लहान मुले-मुली सोडल्या तर सर्व जागत होते. त्यांच्या जागण्यालाही कारण होते, चंद्रग्रहण, खग्रास चंद्रग्रहण!''(पृ.५३) वरील निवेदनातून लेखकाने आपल्या समोर मातंग समाजातील लोकांचा खग्रास चंद्रग्रहण म्हणजे आपल्या जीवनातील एक पर्वणीच आहे. हा दृष्टिकोन मांडला आहे. साधी, सरळ भाषा, छोटी वाक्ये यातून लेखकाने मातंग समाजातील आनंदोत्सवाचा प्रसंग उभा केला आहे. मातंग समाजातील लोकांच्या जीवनात ग्रहणाला विशेष महत्व असते.

म्हणूनच हे लोक ग्रहणाची आतुरतेने वाट पाहत असतात. वरील निवेदनातून हे लोक ग्रहणाची किती आतुरतेने वाट पाहत असतात. याचा जल्लोष, आतूरता, उत्कंठा आपणास प्रत्ययास येते.

**१.२.१.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' या कादंबरीतील निवेदने प्रभावशाली आहेत. महात्मा गांधींनी १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात लोकांना प्रेरित करण्यासाठी जी भाषणे केली त्याचे निवेदन लेखकाने पुढील पध्दतीने केले आहे की त्या निवेदनामुळे श्रोत्यांमध्ये वातावरण निर्मिती होते. ''करेंगे या मरेंगे या वाक्यावर गांधीजींनी आपले भाषण पुरे केले. आणि हात जोडून ते मिनिटभर शांत उभे राहिले. साऱ्या सभागृहात निस्तब्ध शांतता पसरली होती. त्र्याहत्तर वर्षांच्या एका महान संताने साऱ्यांना प्राण झोकून देण्याचे आवाहन केले होते. गुलामीच्या बेडया तोडण्याचा मंत्र दिला होता. करेंगे या मरेंगे! गांधीजी हात जोडून उभे राहिले तेव्हा सारे सभागृह भावनावश, चैतन्याकुल झालेले होते. लोकांना वाटले, महात्मा आपला अखेरचा निरोप तर घेत नाहीत? आणि दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांना अटक झाली, आता युध्दाला तोंड लागले आहे. आता मागे फिरायचे कोणतेही रस्ते राहिलेले नाहीत.''(पृ.४१) सदर निवेदनामधून लेखकाने वाचकांना महात्मा गांधीची लोकांना प्रेरित करणारी घोषणा आणि त्यानंतर त्याचा जनतेवर झालेला परिणाम स्पष्ट केला आहे.

**१.२.१.१०. तणकट :**

येरवट्टी गावातल्या सोमशेट्टी नावाच्या लिंगायत माणसाच्या परड्यात यमुना ठकू कांबळे ही महारवाड्यातील स्त्री झाडलोटीचे काम करत होती. तिच्यावर सोन्याची चेन चोरल्याचा आळ घेतला, ती कबूल झाली नाही. म्हणून तिला चावडीत मारहाण झाली. या घटनेने दलित संघटना पेटून उठल्या व त्यांनी त्यसंदर्भात काढलेल्या मोर्चाचे निवेदन लेखक पुढीलप्रमाणे करतो.

''मोर्चाच्या अग्रभागी प्राध्यापक सत्यपाल धर्मरक्षी, जालिंदर बनसोडे, अलताफ कांबळे ही मंडळी होती. दोन्ही रांगांच्या मधल्या मोकळया जागेत आनंदा कांबळे इकडून तिकडे फिरत होता. पां.चि. माने, प्राध्यापक अवचित भालेराव मोर्चात दिसत नव्हते. कबीर आपल्या बरोबरीच्या कॉलेजच्या मुलांच्या घोळक्यातून पुढे सरकत होता. त्याची नजर फणींद्र कांबळे सरांना शोधत होती. तर फणींद्र कांबळे सर जीव तोडून घोषणांना प्रतिसाद देत सर्वात शेवटी चालत होते. त्यांच्या चालण्यातही एक संयमीपणा आहे असं त्याला वाटू लागलं. गर्दीच्या रेट्याबरोबर तो सरकत होता. अशात रांगेच्या मध्यभागी त्याला दादबा आणि शेडबाळे दिसले. शेडबाळ्या अंग चोरून चालत होता. कबीरला तो मोर्चात सामील झाल्याचे बघून आश्चर्य वाटलं आपलं त्याच्या विषयी काहीतरी

चुकतं आहे? आपण समजतो तसा तो वाईटच असता तर मोर्चात कशाला आला असता? त्याच्या मनात प्रश्नांचं जंजाळ सुरु झालं.''(पृ.५४, ५५)

बाळासाहेब शेडबाळे नेहमी घरी मदयपान करुनच येत होता. तो घरी आल्यानंतरचे त्याचे नेहमीचे वर्तन लेखकाने पुढील निवेदनाद्वारे केले आहे. ''बाळासाहेब शेडबाळे दाराला थडकला, तेव्हा मध्यरात्र उलटून गेली होती. नेहमीच्या सवयीनं त्यानं दारावर टकटक केली. मग त्यानं हळू आवाजात हाका मारत राहिला. नंतर दाराची कडी वाजवण्याचा त्यानं सपाटा सुरु केला. ताराला जाग आली. पण म्हातारी काढंल कडी म्हणून ती तशीच पडून राहिली. तारवटलेल्या बाळासाहेबाची सहनशीलता संपली आणि त्यानं दारावर लाथा मारायला सुरुवात केली. आवाजानं शेजारपाजारच्या घरातली माणसं जागी व्हायला लागली. तेव्हा नाइलाजान ताराबाई उठली. म्हातारी हाटमुऱ्यासारखी डोळं झाकून पडली होती. तारानं कडी काढली. बाळासाहेबाच्या तोंडाचा भासऽऽकन वास आला. ती गर्रकन वळली. एवढयात बाळासाहेबानं झडप घालून तिचा बुचडा पकडला. कळायच्या आत तिच्या कमरेत लाथ बसली. तारा कळवळून कोलमडली.''(पृ.१५६) दारु पिऊन आलेल्या व्यक्तीचे घरी आल्यानंतरचे दुवर्तन वरील निवेदनातून व्यक्त होते. मोर्चाचे व बाळासाहेब शेडबाळे दारू पिऊन घरी आल्यानंतर घडलेल्या प्रसंगाचे हुबेहुब वर्णन लेखक वरील निवेदनातून करतो.

**१.२.१.११. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरीतील राजपुत्र रघुवीर सिंह मुंबईहून एडनकडे बोटीने रवाना झाले. त्यांना निरोप देऊन साईखेडास आल्यापासून मिस क्लाराची अवस्था बेचैन झाली. पण तिच्या दैनंदिनीत कोणताही फरक लगेच झाला नाही. त्या विषयीचे लेखकाने केलेले निवेदन ''बागेत आमराईच्या काठावरल्या वसंतकुंजात ती काही वेळ घालवी. टेबलखुर्च्यांचा सरंजाम तिथं मांडून ठेवलेला असायचा. बागेत हिंडता हिंडता वेचलेल्या पानाफुलांची रचना फुलदाणीत न चुकता ती करीत असे. पेशन्सचा एखादा डाव स्वतःशी रंगवायचा. रोजनिशीचं लेखन शांतपणानं करायचं... आणि निघण्यापूर्वी काही आसनांचे प्रयोग करुन थोडी विश्रांती घ्यायची हे तिचं ठरलेलं होतं. तिथल्या तुळशीबनाभोवती एक फेरा घातला की क्लाराचं मन प्रफुल्लित व्हायचं. बागडणाऱ्या हरणांचं दर्शन नाही झालं तर तिला रुखरुख लागायची. संकेतभंग झाला म्हणजे एखाद्या अभिसारिकेला हिरमुसायला व्हावं तसं तिला होई. शहाबागेची सफर म्हणजे या दोन गोष्टी न चुकता व्हायला हव्यातच असं तिच्या मनानं घेतलेलं. सफर सहसा व्यर्थ होत नसे. म्हणून वर इतक्या ओढीनं ती

रोज यायची.''(पृ.१९) वरील निवेदनातून बारकाव्यांसह सर्व गोष्टींच्या तपशिलांचा लेखकाने निर्देश केलेला आहे. प्रत्येक निवेदनात बारकाव्यासह लेखक प्रतिपादन करतो.

**१.२.१.१२. बारोमास :**

मृग नक्षत्रात शेतकऱ्यांनी पेरण्या उरकल्या पण पावसाचा थेंबही खाली बरसेना. शेतकरी पावसाच्या आशेने आभाळाकडे डोळे लावून बसले होते. लागोपाठ दोन नक्षत्रं कोरडी गेली होती. त्यामुळे शेतातल्या पिकांची झालेली दूरावस्था लेखकाने पुढील निवेदनातून व्यक्त केली. ''पावसाच्या अभावाने वर आलेले पिकांचे अंकुर करपू लागले. तासी लागलेलं पीक सोकाटून सपकू लागलं. ज्वारीच्या उगवलेल्या रोपांना कोरपड लागली. जमीन कोरडी. त्यामुळे पाखरांच्या चोची बिनधास्त मातीत घुसू लागल्या. रोपाच्या खाली असलेला बिजबाईचा दाणा घशात गिळताना रोप उलटे पालटे करू लागल्या. संकरित बियाण्याचे ते विषारी थिमीट लावून पेरलेले दाणे खाऊन रानोमाळ चिमणी पाखरं गुंगीत घोळू लागली. पटापट मरु लागली. मेल्या पाखरांना कावळे, गिधाडं टोकरु लागले. काही चुकून राहिले ते तळपत्या उन्हात वाळून कचरा झाले. मेल्या पाखरांची पिसं रानोमाळ वाऱ्याच्या झोतावर हिंदकळू लागली. पाखरांच्या चोचींतून वाचलेल्या मूग, सोयाबिन, तूर, उडीद अशा पिकांची बोट बोट उंच वाढलेली रोपं मग उन्हाच्या तलकीत सुकून माना टाकू लागली. पऱ्हाडीच्या बिया भुईत कोंबारून आल्या होत्या, त्या ठसठस आंबट ओल्या बियांना मुंग्यांच्या रांगा कुठच्या कुठे वाहून नेऊ लागल्या. नुक्तीच हिरवळू लागलेली भुई पुन्हा आपलं काळंतांबडं अंग उघडं-नागडं करुन आभाळ निरखू लागली.''(पृ.१६३) वरील निवेदनातून संकरीत बियाणे व विषारी थिमीट लावून पेरलेल्या दाण्यांमुळे झालेली वाताहात लेखक प्रभावी शैलीत मांडतो.

निसर्गाच्या कोपाला सामारे जाता जाता दुबार पेरा करुन वाढविलेली पीकं हाताशी आली खरी पण पुढे त्यांच्या विक्रीचे नवेच संकट शेतकऱ्यापुढे उभे राहिले. गावोगावचे शेतकरी आपला माल घेऊन आल्यामुळे अचानक बाजारपेठा मालाने भरल्या. व्यापारी बोली बोलू लागले. पडत्या भावाने माल मागू लागले आणि अचानक पावसाने हजेरी लावली. त्यावेळची परिस्थिती लेखकाने पुढील निवेदनातून व्यक्त केली आहे.

''तेवढ्यात टिनाच्या शेडवर तडतड धडधड पाऊस वाजू लागला आणि पाहता पाहता दम धरून कोसळू लागला. ज्यांचा माल उघड्यावर भिजत होता ते शेतकरी धांदरून गेले. आपली पोती झाकण्यासाठी खताच्या थैल्याचे फट्टे, पोती घेऊन पळापळ करू लागले. पण आभाळाला

भलताच जोर चढला आणि उघड्यावरच्या पोत्यांतून पाणी आत घुसू लागलं. शेवटी हतबल झालेले ओल्या कपड्यांत निथळणारे शेतकरी टिनाच्या शेडमध्ये आश्रयाला आले. तोंडावर निथळणारं पाणी बोटाने निरपत आपलंच मरण आपल्या डोळ्यांनी पाहू लागले. तर दुसरीकडे आडते, व्यापारी, बोली बोलणारे, हमाल मोंढ्यातल्या मजूर-बायका हसत-खेळत एकमेकांची थट्टामस्करी करत पाऊस भोगू लागले.''(पृ.२७५) वरील दोन्ही निवेदनातून शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास वाया जाताना त्याची होणारी तगमग तर दुसरीकडे आडते व्यापारी यांचा मस्तवालपणा दिसून येतो.

**१.२.१.१३. भूमी :**

'भूमी' कादंबरीत लेखिकेने निवेदन शैलीचा उत्कृष्ट वापर केलेला आहे. साधारणातः यौवनावस्थेत मुली कशा स्वप्नाळू बनतात पण मैथिली कशी हटके होती हे लेखिकेने पुढील निवेदनातून व्यक्त केले आहे. ''ती आता ऐकत नव्हती. मुठीत मावेनाशी झाली होती. अबोल तर होतीच. आता जास्त गंभीर, अंतर्मुख. घरात फारशी बोलायचीही नाही कुणाशी. एखादी साधीच गोष्ट जास्तच ठामपणे सांगायची. तिच्या फारशा मैत्रिणीही नव्हत्या. घरी येणाऱ्या तर कुणीच नव्हत्या. आत्याचा कामाचा भार मात्र तिनं खूप हलका केला होता. काम झालं की गॅलरीत. अभ्यासाची नाही तर इतर पुस्तकं. या वयात मुलींमधे बदल होतोच, पण वेगळा बदल. त्या स्वप्नाळू होतात. मैथिली तशी होत नव्हती. उलट आपलं स्वप्नाळू वय जसं मुद्दाम बाजूला करावं अशीच काहीशी. रागवावं, नावं ठेवावीत असं काही नाही; पण...''(पृ.४९) अशा प्रकारे प्रवाहाच्या विरुद्ध वागणारी मैथिली वरील निवेदनातून व्यक्त होते. मैथिली आणि शंतनू यांचा विवाह झाला त्यानंतर ते दोघे मद्रासला जायला निघाले तेव्हा स्टेशनवर त्या दोघांना निरोप देण्यासाठी आत्या, बीना, सुभाष, दांडेकर गेले होते. ह्या प्रसंगाचे निवेदन लेखिका पुढीलप्रमाणे करते.

''स्टेशनवर सोडायला आत्या, दांडेकर, बीना-सुभाष. चारची गाडी अर्धातास की पंचेचाळीस मिनिटं लेट...परवा लग्न झालं. लग्नानंतर हनिमूनचा वगैरे प्रश्नच नव्हता. सुट्टीच नव्हती शंतनूला. पॅकिंग आधीच झालेलं. प्रथम जातानाच हवं ते नेलेलं, नको ते टाकून विकून टाकलं. ती पुस्तकांची ट्रंकसुद्धा त्याच वेळेला पाठवून दिलेली. खरं म्हणजे ती आता तिच्याबरोबर जायला हवी होती. पाठराखणीसारखी. पण मोठेपणी कुठं असतात पाठराखणी! स्वतःच स्वःची रक्षा करायची. आत्मसन्मान सांभाळायचा. बीना काहीबाही बोलत होती. इकडचंतिकडचं. सुभाष

शंतनूशी बोलत होता. बोलणं चालू ठेवायचं होतं– गाडी सुटेपर्यंत. आत्या मात्र काही बोलत नव्हती आणि मैथिलीही. बोलायचं ते सगळं बोलून झालेलं. आता फक्त गाडी सुटायची बाकी होती. अंगावर डॉ. मित्रांच्या बायकोनं लग्नात दिलेली बंगाली साडी. बीनानं दिलेलं कानातलं. आत्यानं दिलेल्या तिच्याच दोन बांगडया, एक साखळी आणि शंतनूनं दिलेलं मंगळसूत्र...''(पृ.११४, ११५) ह्या निवेदनातून पुढे काय होणार याची उत्सुकता लागून राहते. तसेच रक्ताच्या नात्यापेक्षा मैत्रीतून निर्माण झालेली नाती सोडतांना ह्या निरोपाच्या घटनेचे निवेदन मोठ्या ताकदीने लेखिका साकार करते.

**१.२.१.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : माधुरी पुण्यामध्ये एम.ए. मास कम्युनिकेशन करीत होती. अभ्यास विषयाला अनुसरून तिने आठ दिवसाचे एक सेमिनार केले. त्या सेमिनारमध्ये तिने चित्रपट सृष्टीतील विविध घडामोडींच्या नोंदी केल्या. त्यातील महत्त्वाची गोष्ट म्हणजे धुंडिराज गोविंद फाळके यांनी तयार केलेल्या पहिल्या चित्रपटाच्या माधुरीने केलेल्या नोंदीचे निवेदन लेखक पुढीलप्रमाणे मांडतो. ''१९१२ साली फाळके कर्ज काढून इंग्लडला गेले. तिथून परतले ते एक सिनेकॅमेरा घेऊन व पुष्कळशी पुस्तके घेऊन. फाळक्यांचा पहिला चित्रपटः त्यांनी घरच्या एका कुंडीत वाटाण्याचे बी पेरले व कुंडीसमोर सिनेकॅमेरा लावून ठेवला. बीजाला कोंब फुटून त्याची जसजशी वाढ होत गेली तसतसे त्याचे चित्रण केले. ह्याचा सव्वा मिनिटांचा एक चित्रपट तयार झाला, हे पाहून मुंबईच्या यशवंत नाडकर्णींनी फाळक्यांना पहिला चित्रपट काढण्यासाठी पैसा पुरवला. हा पहिला चित्रपट राजा हरिश्चंद्र १९१३ साली मुंबईला 'कॉरोनेशन' या प्रेक्षागृहात झळकला.

'राज हरिश्चंद्र' मध्ये तारामतीची भूमिका गिरगावातल्या एका हॉटेलात काम करणाऱ्या अण्णा सांळुके नावाच्या वेटरने केली. कारण, स्त्रिया, नायकिणीही कॅमेऱ्यासमोर उभे राहायला तयार नव्हत्या. फोटोग्राफीचे काम तेलंग ह्या फाळक्यांच्या मित्राने केले. चित्रिकरणानंतरच्या रासायनिक प्रक्रियेचे काम सरस्वतीबाईंनी केले. नेपथ्य, वेशभूषा, चित्रणस्थळाची निवड, अभिनेत्यांची निवड अशी कामे फाळक्यांनी केली.'राजा हरिश्चंद्र' हा सर्वार्थाने स्वेदशी चित्रपट होय. तीन मे १९१३ पासून 'कॉरोनेशन' थिएटरमध्ये राजा हरिश्चंद्र नियमितपणे सुरू झाला.(पृ.१३) वरील निवेदनातून आपल्याला पहिल्या चित्रपटाच्या निर्मितीची पार्श्वभूमी समजते. चित्रपट

सृष्टीकडे स्त्रियांचा पाहण्याचा दृष्टिकोन लक्षात येतो. दादासाहेब फाळके यांनी पहिला चित्रपट तयार करताना आलेल्या अडचणीवर मार्ग काढत पहिला स्वदेशी चित्रपट साकारला.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : कादंबरीच्या या भागाचे तृतीयपुरूषी निवेदन आहे. विलासचा मित्र हर्षदकडे आला. हर्षद जेव्हा जेव्हा तणावाखाली असे तेव्हा तेव्हा तो विलासच्या घरी जायचा. विलासच्या घरातले सगळे तुळजापूरला गेले होते. एकटा विलासच घरात होता. त्याने दोन कप चहा केला पण हर्षद कोचात झोपला. चहा पिण्यासाठी उठला नाही. विलासने हर्षदचा कप आत नेऊन ठेवला व स्वतःच्या कामाला लागला त्याचे निवेदन पुढीलप्रमाणे आलेले आहे.

''हर्षदकडे नजर राहील, असा विलास बसला आणि कामाला लागला. अजिबात आवाज होणार नाही, ह्याची काळजी घेत काम करू लागला. फुलपाखरांची रंगीत छायाचित्रे तो आल्बममध्ये डकवत होता. दोन छायाचित्रे डकवून झाली होती. सहा डकवायची होती. छायाचित्र आल्बममधल्या चौकटीच्या आकारात कापून घ्यायचे. मग डकवायचे. छायाचित्राखाली त्या फुलपाखराची शास्त्रीय माहिती लिहायची. फुलपाखराची शास्त्रीय माहिती लिहिताना मधेमधे थांबायचा. विलास थांबत थांबत काम करत होता. छायाचित्राचा आकार कापताना थांबून राह्यचा. एका छायाचित्राचे काम पूर्ण झाल्यावर बराच वेळ नुस्ता बसून राहायचा कामात तो रंगला होता. कामात तो आनंदित होता आणि त्याला पडेल वाटत होते. आपण आनंदी आहोत आणि पडेल आहोत हे त्याला अर्धवटपणे जाणवत होते. त्याची सर्जनशीलता अपरिपक्व होती. फुलपाखरांची छायाचित्रे आणि शास्त्रीय माहिती ह्यांचा संबंध विलासच्या मनात आधिभौतिक मुद्यांपर्यंत पोचला नव्हता. विलासचे चार छायाचित्रे डकवण्याचे काम पूर्ण झाले. आनंद होत होता. पडेल वाटत होते. थांबून मग पाचवे छायाचित्र हातात घेतले.(पृ.६१) वरील निवेदनातून आणि एकूणच कादंबरीच्या ह्या दुसऱ्या भागात 'पडेल वाटत होते' हे वाक्य लेखक आपल्या निवेदनातून अनेकवेळा वापरताना दिसतो. अशा प्रकारे कादंबरीमध्ये स्वगत, संवाद वगळता अधिकांश भाग हा तृतीय पुरूषी निवेदनाचा आहे.

डॉ.शशिकला कांबळे प्रस्तुत कादंबरीच्या व मनोहरांच्या निवेदनशैलीविषयी म्हणतात,''श्याम मनोहर यांची निवेदन शैली समाजव्यवस्थेच्या संदर्भात भाष्य करते. त्याचबरोबर अर्थपूर्ण सुसंगत जीवनाच्या शोधासाठी वाचकाला अंतर्मुख करण्याची ताकद या निवेदनशैलीत आढळते.''[८२] ह्या कादंबरीतील तीनही भागांचे निवेदन सलग नाही. तर ते तुकड्यातुकड्यात आहे. हे तुकडे चरित्रकळा आणि विविध गोष्टींनी साकार झालेले आहेत. त्यातून हे चिंतन

प्रतिकात्मक आणि साध्यासाध्या भाषेतूनच व्यक्त झालेले आहे. श्याम मनोहरांची भाषा आणि शैलीचे बळ त्यांच्या पुन: पुन्हा आवृत्त होण्यामध्ये एकवटलेले आहे. भाषिक अंगाने आणि अभिव्यक्तीच्या अंगाने ही सर्वच कलाकृती श्रेष्ठ आहे.

**१.२.१.१५. खारीच्या वाटा :**

'खारीचा वाटा' या कादंबरीत लेखकाने तो प्राथमिक शाळेत शिक्षण घेत असताना त्याचा मित्र दिन्या व त्याने ज्या खारीचे प्राण वाचविले. ती खारुताई यांच्यातील सहजीवनाचा वृत्तांत मांडण्याचा प्रयत्न केला आहे. बऱ्याचदा लेखकाने प्रथम पुरुषी निवेदन शैलीचाच वापर केला आहे. ''वाढत्या वयाबरोबर लुकी बदलत होती. एरवी माझ्या अवतीभोवती घोटाळत असे. अभ्यासाला बसलो तरी शेजारी बसून राही. शाळेत जाताना मला आणि दिनूला निरोप घ्यायला झोप्यापर्यंत यायची. मग कुंपणात पसार व्हायची. आता तसं राहीलं नव्हतं. जेवणापुरती आणि दिन्या असेपर्यंत ती सोबत राहायची; नंतर गायब व्हायची. तिचा घरापेक्षा झाडावर मुक्काम वाढला. बांबूंच्या बेटातून अडुळशाच्या झुडपातून ती वेगानं धावायला लागली. घर अपुरं वाटू लागले. आवाजातला चिरकेपणा जाऊन तो धारदार झाला. चपळता वाढली. लुकी पहिल्यापेक्षा निराळी वाटू लागली.'(पृ.४०) लेखकाने प्रथमपुरुषी निवेदनातूनच पुढे तृतीय पुरुषी निवेदन करुन लुकीच्या बदलत्या वर्तनाचे, तिच्यातील बदलांचे वर्णन तृतीय पुरुषी निवेदनातून व्यक्त केले आहे.

'खारीचा वाटा' या कादंबरीतील धरणाच्या फतव्याने कादंबरीचा नूर पालटला. धरणाचे स्वागत लोकांनी कसे केले असा बनावट प्रश्न कॅमेऱ्याने टिपला व त्यानंतर बैठक झाली. तिचे लेखकाने तृतीय पुरुषी निवेदन पुढीलप्रमाणे मांडले : ''दोनेक दिवसांनी चावडीत बैठक झाली. झाडून गाव गोळा झाला होता. काही सरकारी माणसंही होती. बैठकीला हजर राहायलाच हवं असं कराडकरानं आधीच बजावलेल चावडी गडयांनी खच्चून भरलेली. पोलिसाच्या खुर्चीवर साहेब बसलेला. शेजारी कराडकर दोन माणसं हातात कागदाचे गठ्ठे घेऊन उभी. अशी बैठक या आधी झाली नव्हती पोरं पोरं पडवीत घुसलो. आमची कुजबुज, खसफस चाललेली कराडकर कातावला. पळून गेलो. विहीरीच्या कठड्यावर बसलो. खूप वेळ गेला. काही कळेना. मधून मधून एकट्या कराडकरांचा तेवढा आवाज ऐकू येत होता. पण बोलणं समजेना कुणी चावडीबाहेरही पडेना. कंटाळले. घरी गेलो, चावडीत काय शिजलं कोण जाणे? पण अप्पा घरी आले, त्यावेळी ते कसनुसेच वाटले?''(पृ.१४१) अशाप्रकारे लेखक काही वेळेस प्रथम पुरुषी निवेदन व तृतीय पुरुषी निवेदन यांची सरमिसळ करताना दिसतात.

### १.२.१.१६. फेसाटी :

'फेसाटी' या कादंबरीचे निवेदन हे प्रथम पुरुषी निवेदन आहे. लेखकाने त्याच्या जीवनात जे भोगलं म्हणजे आयुष्यातला एक-एक प्रसंग जसाजसा आठवला तसतसा लिहिला. लेखक आपल्या मनोगतात म्हणतो,'जीवनात प्रत्येक व्यक्ती आपलं जगणं आपल्या परीने शोधत असतो. तसाच मीही एक माणूस म्हणून माझं जगणं भोगणं आणि एकूणच अनुभवणं शोधत होतो. त्यातून जे गवसलं ते येईल तसं मांडण्याचा प्रयत्न मी केला आणि फेसाटीची निर्मिती झाली' लेखकाने भोगलेले वास्तव जीवन लेखक मांडताना दिसतो.

स्वानुभवाचे लेखन म्हणजे प्रथम पुरुषी निवेदन. नाथा दहावीत असताना त्याला आपण पास होऊ का? याविषयी चिंता वाटायची, परीक्षा, अभ्यास या गोष्टीपासून नाथा दूर जात होता. तर सिनेमाला जाणे, दगड्याच्या नादाने स्टार पुडी खाणे, चोरुन कोंबडी आणून मटन खाणे, एवढेच नाहीतर दारू पिणे या सारख्या वाईट व्यसनांच्या आहारी नाथा जाऊ लागला होता. एकदा तो दगड्या बरोबर दारु पिऊन बिराप्पाच्या घरी झोपला. काका-काकू रातभर हुडकत होती. त्यावरचे लेखकाचे निवेदन असे होते.

''म्या हाथरुणातनं उठलूनं घरला गेलू, काकू चुलीपुढं भाकऱ्या करत हुती. काका कुडाला टिकून खाली बगत बसला हुता. नंदाक्काची पोरगी ठ्यां ऽ.. ठ्यां ऽ करुन रडत हुती कुणीच कुणाला बोलत नव्हतं. मी गप्प जावून जात्याला ऊस लावून झोपलू, थोड्या येळानं काकूनं भाकऱ्या संपूल्यान उठली. माझ्या जवळ यिवून डोसक्यावरनं हात फिरवत म्हणाली,ल 'बाळा असं येड्यावानी का करतूयाच हॉ? दिसभर फिरतुयाचं. काम नाय,धाम नाय येवढं शेवटाचं वरिस हाय परीक्षा दी, पास हुदी, नाय तर नापास हुदी तोंडात आल्याला गास हिसंडून टाकू नगुचं. तू शाहणा माझा बाळ. जा शाळला. म्या तुला पैस दिती. उठ आंघुळ कर, आवरं अन् जा?' मला काकूनं मया केली, म्हणजी वाटायचं, आपून शाळा शिकावं, कुणी शिव्या देत नव्हतं सगळी मयाचं करायची. म्या शिकावं अस वाटत हुतं माझं मन लागत नव्हते तरी पण कसंतर ऊरांवर धोंडा ठिवून म्या शाळची वाट धरली परीक्षा पंधरा दिसात हुती, वेळापत्रक, हॉल तिकीट आली हुती. शाळंत गेलू. हॉल तिकीट घेतलं. बोर्डिंगात शिंदे सरला भिटलूनं अभ्यासाला लागलू''(पृ.१२६) सदर निवेदनातून परीक्षेच्या भीतीने व्यसनांच्या आहारी जाणारा मुलगा आईच्या प्रेमळ समजावण्याने मतपरीरिवर्तन होऊन अभ्यासासारख्या सत्कृत्याला लागतो हे स्पष्ट होते.

नाथाच्या कुटुंबावर अनेक संकटांनी घाला घातला. त्यापैकी एक म्हणजे त्याचे राहते घर कोणीतरी पेटवून दिले होते. सगळ्या घराला आगीन घेरले होते काही माणसं पाटीनं माती वतत हुती. लेखकाने गाईच दावं सोडलं कालवडीने खुटा उपसाला. पण जेव्हा लेखकाच्या लक्षात आलं पेटीत पैसे आहेत तेव्हा त्याच्या काळजाला भोकं पडत गेली. 'म्या जोरात वरडलो.''अहो पत्र्याच्या पीटीत पैसं हायतं. सगळं जळलं रे बाबा' म्हणून पळालू. तसं वरलं आडं पडलं. मला दोघातिघांनी धरलं मला आत जाऊ देत नव्हती मोकळी पोतीनं हथरुण कांभरुनं अर्धवट जळत हुतं. त्यातनं मोठाच्या मोठा नाग बाहीर येईला धडपडत हुता. तेझ्या अंगावर मोठ्यामोठ्या फोडं उठलं हुतं. जीभ बाहीर काढून मान आपटत हुता. काकूनं काकानं हंबरडा फोडला हुता. जळकी राख वाऱ्याबरं वरवर जात हुती. अंगावरल्या कापडावर लालभडक कोळग्याकडं बघत टिप गाळत हुतो.

आता लई भकास वाटत हुतं. पोटाची आग ईजवूपतूर सगळ्या संसाराचा कोळसा झाला हुता. त्यादिशी रातबर आम्ही लिंबाच्या झाडाखाली बसलू दिस ऊगुला. आजून धूर निघत हुता. भांडीकुंडी जळून काळी पडली हुती. दिवाळीचं उंडडं पत्र्याच्या डब्यात काळ्या रानातल्या ढेकळावानी झालं हुतं. काकाच्या अंगीच्या सोन्याच्या तीन गुंड्या तेवढ्या राखत घातल्या हुत्या. रक्ताचीनाती सगळी आमच्यासाठी पोरकी झाली हुती. दिस माथ्यावर आला हुता. त्वॉडात पाणी नव्हतं. पाण्याची येकच घागर हुती तीबी निम्मी जळून वरनं आडं पडल्यावर चिपटून गेली हुती'(पृ.१७८) उदाहरणा दाखल घेतलेल्या वरील निवेदनातून नाथाचं पेटतं घर समोर उभं राहीलं त्याच्या कुटुंबाची झालेली दयनीय अवस्था पाहून मन व्यथीत झाले.

कादंबरी लेखनात तादात्म्य पावलेली मानसिकतेवर प्रकाश टाकणारी निवेदने ही कथानकाला, प्रसंगाला जिवंतपणा मिळवून देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरत असतात. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील काही निवेदने पति-पत्नीच्या नाते संबंधावर प्रकाश टाकणारी आहेत. पात्रांची स्वविषयक जाणीव व्यक्त करणारी निवेदने, पात्रांचा स्वभाव, त्यांची धारणा आणि त्यांची मनःस्थिती साकार करण्यासाठी उपयुक्त ठरलेली आहेत. प्रस्तुत कादंबऱ्यामधील निवेदने ही विविध निवेदन पद्धतींचा अवलंब करून स्त्री पुरूष पात्रांच्या व मुलांच्या बाह्यजीवना बरोबरच अंतरमनाचा ठाव घेण्यास उपयुक्त ठरलेली आहेत. आवश्यक तेथे परिणामकारकता, ठसकेबाज आणि उठावदार शब्दांचा वापर करून ही निवेदने, कथानक, वातावरण, संवाद या घटकांना जिवंत ठेवण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरलेली आहेत. स्त्री-पुरूष

पात्रांच्या मनाची हळूवारपणे उकल करण्याच्या हेतूने योजलेली शब्दकळा या कारणांमुळे निवेदने उत्कट आणि प्रभावी झालेली आहेत असे म्हणता येईल.

**१.२.२. स्वगत :**

कादंबरीचे कथानक आकाराला येण्यास कादंबरीतील पात्रे महत्वाची भूमिका बजावतात. ह्या पात्रांच्या वाटयाला आलेले जीवन, संघर्ष, घटनाप्रसंग, त्यांच्या भावना, विचार, कल्पना, राग-लोभ, त्यांच्या श्रध्दा या आणि अशा अनेक गोष्टी पूर्णांवशाने इतरांबरोबर व्यक्त करता येतील असे नाही. वरील घटकांसंदर्भात ज्या गोष्टी इतर कुणाबरोबर ही व्यक्त करता येत नाहीत पण व्यक्त केल्याशिवाय कथानकाला किंबहुना पात्राला न्याय मिळत नाही. अशा गोष्टी स्वगतामधून अभिव्यक्त होताना आढळून येतात. साहजिकच कादंबरीमधील ही स्वगते कथानकाचा ओघ कायम ठेवण्यासाठी निश्चितच पूरक ठरतात हे लक्षात येते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यामधील पात्रांच्या निमित्ताने आलेल्या प्रातिनिधीक स्वगताचा येथे परामर्श घेऊ.

स्वगत म्हणजे स्वतःशी बोलणे, स्वगतात पात्रांचा संवाद स्वतःच्या मनाशी चाललेला असतो. स्वगताचा खरा हेतू कोणता आहे? संपुर्ण जगभरातील नाटयव्यवहारात स्वगत ही पुर्णपणे स्वीकारली गेलेली रुढ/सोय/कलृप्ती आहे. एखादया व्यक्तीचे विचार, भावना, उद्देश अंतर्मन, हेतू, मनःस्थिती इत्यादी प्रेक्षकांपर्यंत थेट पोहचवणे हा स्वगताचा खरा हेतू आहे. यातून संवादाचा हेतू स्पष्ट होताना दिसतो. हा संवाद खऱ्या अर्थाने स्वतःचा स्वतःशी चाललेला असतो.

**१.२.२.१. ययाति :**

हस्तिनापूरचे महाराज राजा नहुष. मृत्यूशय्येवर असताना त्यांची जी जगण्याची आसक्ती होती ती ते ययातिसमोर व्याकूळ मनाने व्यक्त करत होते. हस्तिनापूरच्या दिग्विजयी सम्राटाचे ते अश्रू पाहून ययाति अतिशय व्यथित होतो. ''मानवी जीवन जसा कल्पवृक्ष आहे तसा तो विषवृक्षही आहे.(पृ.६०) मृत्यू हा अष्टौपृहार अश्वमेध करणारा विजयी सम्राट आहे.(पृ.६१) मरण हाच जीवनाचा शेवट असेल, तर जगात मनुष्य जन्माला येतो तरी कशाला?''(पृ.६२) अशा सर्व मृत्यूच्या कल्पनेने ययातिच्या मनात मृत्यूविषयी जे काहूर माजले त्यातच त्याचा मित्र माधव याने त्याच्या मनाची कशी अवस्था झाली असेल या विचाराने ययाति अस्वस्थ होतो.

मृत्यूची अनामिक भीती त्याने त्याच्या स्वगतातून व्यक्त केली आहे. ''वेडयासारखा मी स्वतःच्या शरीराकडे-त्याच्या प्रत्येक अवयवाकडे पाहू लागलो. देह नाही तर मंजूळ संगीत नाही; तर सुंदर चंद्रोदय नाही, देह नाही, तर स्वादिष्ट पक्वान्ने नाहीत, देह नाही; तर सुवासिक फुले

नाहीत, देह नाही तर प्रेमळ स्पर्श नाही! जन्माला आल्यापासून जे सुख मी उपभोगले होते, ज्या ज्या उन्मादाचा मी अनुभव घेतला होता, त्याच्या त्याच्याशी माझ्या देहाचा अगदी निकटचा संबंध होता. मी म्हणून स्वतःचा उल्लेख करणारा ययाति या देहापेक्षा भिन्न आहे, की नाही, हे मला सांगता येत नव्हते. देह निराळा, आत्मा निराळा असे मी लहानपणापासून ऐकत आलो होतो, पण पुन्हा-पुन्हा एक प्रश्न माझ्यापुढे एखाद्या अग्निज्वालेप्रमाणे नाचत जाऊ लागला- ययातिच्या शरीरावाचून ययातिचा आत्मा जगातल्या कोणत्या सुखाचा उपभोग घेऊ शकणार आहे?(पृ.८८, ८९)

ययातिच्या या स्वगतातून त्याला मृत्यूचे वाटणारे भय शरीर आणि आत्मा हे जर वेगळे आहेत तर आत्म्याच्या सुखासाठी शरीर अनिवार्य आहे. देहाशिवाय माणूस कोणताही उपभोग घेऊ शकत नाही हे तो व्यक्त करतो. कचाने देवयानीचे प्रेम झिडकारले. तिचे प्रेम पायदळी तुडवून त्याने तिला ‘कोणताही ऋषीपुत्र तुझं पाणि ग्रहण करणार नाही!’ असा शाप दिला. त्याने देवयानी फार व्यथीत झाली. ‘फुलांच्या पाकळया झडून जातात मागे उरतात ते केवळ त्यांचे काटे!’(पृ.१२४) त्याप्रमाणे तिच्या कचावरील प्रेमाचही तसेचं झाले. पण इतर स्त्रियांप्रमाणे ती प्रेमभंगामुळे व्यर्थ कुढत बसणारी नाही असा मनोनिग्रह करून आपल्या स्वगतातून तिच्या भावना व्यक्त करते.

‘‘अंहं! त्याच्यावरले माझे प्रेम विसरून जाणार आहे मी. मला शाप देऊन गेला आहे तो. खरे प्रेम कधी शाप देऊ शकेल का? काय म्हणे, ‘कुणीही ऋषिपुत्र तुझ्याशी लग्न करणार नाही! न करीना!’ ऋषिपुत्राच्या गळयात माळ घालून रानातल्या झोपडीत दिवस कंठण्याची इथं कुणाला हौस आहे? वेडा कच! माझ्या इतका जवळ आला तो! पण माझे मन त्याला कधीच कळले नाही! केवळ फुलांनी शृंगारण्याकरिता का आदिशक्तीने मला हे अलौकिक सौंदर्य दिले आहे? शर्मिष्ठेसारखी लावण्यवती राजकन्या रात्रंदिवस माझा हेवा करते, तो काय उगीच?’’(पृ.१२५) देवयानीच्या या स्वगतातून तिचा स्वभाव, तिची वृत्ती यावर प्रकाश टाकण्याचा लेखकाने प्रयत्न केला आहे.

शर्मिष्ठेची अनेक स्वगते लेखकाने कथानकात गुंफली आहेत. जलक्रीडेच्या वेळी तिच्याकडून देवयानीला जे अपशब्द बोलले गेले. त्याचा ती सारासार विचार करते. ‘‘सकाळी जलक्रीडेच्या वेळी माझ्या तोंडून नाही नाही ते शब्द गेले! जे जायला नको होते! देवयानीला लागेल, असे मी खूप खूप बोलले ते मी बोलायला नको होते! पण मी तरी काय करू? मनावर,

जिभेवर–कशावरच माझा ताबा राहिला नाही! लहानपणापासून मी पाहतेय, माझा पाणउतारा करायची एकसुद्धा संधी देवयानीने कधी गमावली नाही! ती ऋषिकन्या झाली, माझ्यासारखी राजकन्या झाली नाही, हा काय माझा अपराध? पण जिथे तिथे, पावलोपावली, देवयानी शर्मिष्ठेपेक्षा श्रेष्ठ आहे, हे सिध्द करण्याचा अट्टहास ती सदैव करीत आली.(पृ.१४३) अशाप्रकारे ययाती, देवयानी, शर्मिष्ठा यांची मोठ्या प्रमाणात स्वगते आलेली आहेत. स्वगतातून आपले मन मोकळे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातून त्यांनी आपल्या व्यथा मांडल्या आहेत. स्वगतातून त्यांची स्वभाववैशिष्ट्ये कळून येतात.

**१.२.२.२. रथचक्र :**

'रथचक्र' या कादंबरीमध्ये तिचा मुलगा सातवीला जिल्ह्यात पहिला आला. त्याच्या पुढच्या शिक्षणासाठी तिनं तालुक्याला जायचं ठरविलं. घरातील सर्वांना त्याच्या शिक्षणाची काहीही आस्था वाटत नव्हती. त्याच वेळी 'ति'चा नवरा जो पळून गेला होता त्याचा ठावठिकाणा कळल्याची बातमी आली होती. अशावेळी तिची जी घालमेल चालली होती, ती स्वगतातून व्यक्त केली आहे. दिराचा सल्ला घेण्याचा विचार तो आल्यापासून तिच्या डोक्यात घोळत होता. ''या घरात आपण कसा मुका मार सहन करीत आहोत त्याचा त्याला पत्ताही नसेल. सगळी हकिगत त्याला कळली तर तो स्वस्थ बसणारा माणूस नव्हता.'' आता तिला वाटू लागलं.– ''स्वस्थ बसणार नाही म्हणजे काय करील? दिरांना विचारील, थोरलीला विचारील. त्यानंतर सगळे घर ढवळून निघेल. एवढं झाल्यावर जावा काय स्वस्थ बसतील? आपली पाटी पाहिजे तेवढी स्वच्छ नाही. तक्रारच करायची झाली तर आपल्या विरुद्ध बोलण्यासारखं पुष्कळ आहे, ते सगळं बाहेर येईल. स्वतःला सावरण्याकरिता आपण काहीतरी बोलत सुटू आणि एकदा दीर परत गेला की जावांना सगळं रान मोकळं मिळेल. असला वेडेपणा करू नये. असं तिनं ठरवलं. वेळीच आपल्याला सुचलं म्हणून तिला हलकं वाटत होतं.''(पृ.२७)

मुलाच्या शिक्षणाबद्दल त्याचा सल्ला घ्यावा असं मात्र तिला अजून वाटत होतं. काकांनी आयता विषय काढून ठेवला आहे. आपल्याला फारसं बोलावंही लागणार नाही. विषय काढल्याबरोबर दीर बोलू लागेल. कौतुक करील. ''चांगलं आरंभलं आहेस. माझे आशीर्वाद आहेत!'' असं म्हणून फाडकन पाचपन्नास रुपये हातावरसुद्धा ठेवायचा.(पृ.२७) शिक्षणाचा प्रश्न निघाल्यानंतर तो काय करील भरवसा नव्हता. ''ताबडतोब तालुक्याला चालती हो, सगळा खर्च मी करीन.'' अस तो म्हणता तरीसुद्धा तिला आश्चर्य वाटलं नसतं. अस घडो–न–घडो आपला

बेत त्याच्या कानावर असलेला बरा त्यात नुकसान नाही. लखनौचा बेत तिने केव्हाच दृष्टीआड केला होता. त्याच्याकडे काही मागायचं नव्हतं; पण तो इथं येऊन आपल्याबेताचा सुगावा त्याला दिला नाही. तर उद्या तो म्हणेल, ''तीसुद्धा ड्यांबीस. तिथं गेलो तरी बोलली नाही!'' कदाचित तो काही सुद्धा म्हणणार नाही. त्याकरिता सांगायचं असं नाहीच. घरातल्या एकच्या एक शहाण्याला कळलेलं असावं. भविष्यानं आपल्याकरिता काय वाढून ठेवलं आहे कुणास ठाऊक? वेळ पडली तर त्याच्याकडे तोंड वेंगाडायला जागा तर राहील? पण त्याचा जर जाण्याचा बेत झाला! आता कुठली सवड मिळायला? उदासवाणी ती विचार करत बसली.(पृ.२७)

तिचा नवरा आत्मोद्धारासाठी व तपश्चर्येसाठी घरातून पलायन करतो आणि त्यामुळे निराधार म्हणून तिला जगावं लागत. मुलांची जबाबदारी तिच्यावर पडते. मुलाच्या शिक्षणासाठी कष्ट सहन करावे लागतात. नवऱ्याविषयी तिला खूप तिरस्कार वाटत असतो. त्याच्याकडे असलेली पुण्याई व सामर्थ्य याविषयी तिच्या मनात शेवटी चाललेली चलबिचल तिच्या स्वगतातून व्यक्त होते. ''नवऱ्याजवळ खरोखरचं मंत्रसामर्थ्य आहे का? थोरलीची फीट उतरली तेव्हापासून ती हा विचार करीत होती. लखनौच्या जावेला मुलग्याच्या परीक्षेकरिता त्यानं नेम सांगितला. एवढा धर्मलंड दीर तोसुद्धा त्यांच्यापुढं मान तुकवतो. अंगात तसचं काही असल्याशिवाय हे कसं शक्य आहे? थोरलीची फीट आपसूक उतरली असावी-नवऱ्यावर त्याच श्रेय लादलं जात आहे, हा आपला समज खोटा असावा, असं ती स्वतःल सांगत होती. खरं-खोटं काही असो, नवऱ्यानं स्वतःच्या मुलग्याकरिता निदानीची प्रार्थना तरी का करू नये? नुकसान तरी काही होणार नाही?''(पृ.१९५) वरील स्वगतातून कथानायिका मंत्रतंत्राच्या बाबतीत द्विधा मनस्थितीत असताना शेवटी त्या मंत्रातंत्रावर थोडा विश्वास ठेवताना जाणवते.

**१.२.२.३. स्वामी :**

माधवरावांना त्यांचा अंतःकाळ जवळ येतोय याची तीव्र जाणीव होऊ लागली तेव्हा त्यांना रमाबाई समोर जे मत व्यक्त करावेसे वाटले ते स्वगता प्रमाणे भासते. ज्यांच्यावर निष्ठा ठेवली. त्या मातुश्रींचं अंतकाळी दर्शनही दुर्लक्ष झालं. ज्यांच्या पराक्रमानं लहानपणापासून दबून गेलो, जे आदर्श वाटले, तेच काका शत्रूला मिळून राज्याविरुध्द उभे ठाकले. त्याच काकांना आज ह्या हातांनी नजर कैदेत ठेवावं लागलं. जेवढी ताकद काकांना सावरण्यात खर्ची पडली, तेवढी जर वाचली असती तर राज्याचं कोणतंच स्वप्न साकार व्हायचं राहिलं नसतं! कडक शिस्तीखाली आई-वडिलांच्या प्रेमाला मुकलो, काकांच्या प्रेमापोटी राज्याशी बेइमान झालो. तुझ्यासारखं

सात्विक, सुंदर प्रेम दाराशी असूनही त्यापर्यंत हात पोहचवू शकलो नाही... आज नौबती झडताहेत, या राज्याच्या यशाच्या. मी सदैव अपयशीच राहिलो...'' प्रत्येक मनुष्य आपल्या वैयक्तिक आयुष्याकडे पाहूनच जीवनाचं यश आजमावतो. ते माप हाताशी धरलं, तर अपयशाखेरीज ह्या तुझ्या पतीच्या हाती काही उरलं नाही...''(पृ.३७९) काकांचे शत्रुला जाऊन मिळणे. आई वडिलांच्या प्रेमाला आपण मुकणे. पत्नीला वेळ न देणं ह्या साऱ्यांचा पश्चाताप माधवरावांच्या वरील स्वगतातून प्रकट होतो.

''अंतकाळी तीन गोष्टी मनात राहिल्या आहेत. पहिलं गिलच्यांचं पारिपत्य. त्याशिवाय पानिपताचा सूड उगवला, असं वाटणार नाही. दुसरं हैदरचं पारिपत्य. तीन वेळा जाऊनही अनेक कारणांमुळं आम्ही ते करु शकलो नाही; आणि तिसरी गोष्ट म्हणजे आमचं कर्ज. राज्याच्या पायी जे कर्ज झालं, ते निवारलं गेलं नाही. सावकाराघरी जी आमची खतं आहेत, ती सुटली नाहीत, तर आमच्या आत्म्याला शांती मिळणार नाही...''(पृ.३९५) माधवरांवानी बोचणारी तीन सत्य त्यांनी वरील स्वगतातून व्यक्त केली आहेत.

वयाची सोळा वर्षे लागण्याच्या आतच अचानक ही जबाबदारी अंगावर पडली. ही राज्याची जबाबदारी पेलता जीव गुदमरुन गेला. ह्या अकरा वर्षाच्या कारकिर्दीत चार कर्नाटकाच्या, दोन नागपूरकर भोसल्यांच्या, दोन निजामाच्या मोहिमा झाल्या. तेव्हा राज्य स्थिर झालं आणि उसंत मिळेल, असं वाटलं, तेव्हा ह्या व्याधीनं सोबत दिली. हे सारं होत असता तुझ्याकडे लक्षच देता आलं नाही. मनाला खंत...(पृ.३९७) कमी वयात अंगावर येऊन पडलेली जबाबदारी, अनेक स्वाऱ्या, शेवटी व्याधी या साऱ्यातून रमाबाईकडे लक्ष द्यायला वेळच मिळाला नाही. याची खंत वरील स्वगतातून माधवराव मांडतात.

**१.२.२.४. स्मरणगाथा :**

'स्मरणगाथा' या कादंबरीत लेखकाने जे घरातून पलायन केले आणि त्यामुळे अनेक वेळा त्याने स्वतःलाच दोष देण्याचा प्रयत्न वारंवार केला आहे. तो ते आपल्या स्वगतातून मांडतात. परत घरी जाण्याचा विचारही त्यांच्या मनात डोकावून गेला पण क्षणार्धात त्यांचे मत परिवर्तन झाले हे त्याच्या पुढील स्वगतातून स्पष्ट होते, 'घरी जाणं सोपं आहे. गाडीत बसलो की नागपुरी उतरेन. इथून गाडी बदलावी लागत नाही. तिकिटासाठी कवडी नाही. खरं, पण हात जोडले, गयावया केल्या, तर तिकिटचेकर उतरून देणार नाहीत.'

पण दारी काय म्हणून उभा राहू? छी थू किती होईल? वर्गबंधूना कसा सामोरा जाऊ? भावंडं मजकडे कोण्या दृष्टीने पाहतील? अवघे पळपुटा म्हणून थुंकतील. सगळे आळीकर मजकड बोटं दाखवून प्रगटपणं हांसतील. आई अन दादांचा मजवर विश्वास उरलेला नसेल. मजकडे प्रतिक्षणी ती संशयानं पाहतील आणि मर्माची गोष्ट, माईसमोर मी तोंड दाखवूं तरी कसा? इतके संस्कार केले तिनं मजवर! ती मजकडे पाहणारही नाही. तोंड वळवून घरात जाईल. ते दुःख मी कसं साहू शकेन? 'छे छे! घरी परतायची वाट मीच माझ्या हातांनीं अगदी गुंडे रचून बंद करून टाकली आहे. त्या सगळया भर्त्सना सहन करायचं धैर्य मजपाशी नाही. आता माझी वाट मलाच शोधली पाहिजे. हे तीर किंवा ते तीर! सहन करवत नसेल तर कुठंतरी रुळवाटेवर शरीर फेकून दिलं पाहिजे.'(पृ.१४४)

लेखक नर्मदा परिक्रमा करीत असताना त्याच्या मनात विचारांच काहूर माजले होतं. त्याने वज्रापात ह्या विधिविषयी वाचले होते की ज्याचं जीवन भोगून संपलं त्यानं शेवटी तो करायचा. एक लहानसा होम. त्यात सर्व संबंधांची आहुती. यज्ञोपवीत देखील आगीत टाकायचं कुण्या एका तीर्थांत एक उंच कडा आहे. श्रीवर्धनापासल्या हरेश्वराला की काय नकळे तसंच एक स्थान गंगेवरही आहे. एक हिमालयातही. असे केल्याने आत्महत्येचा दोष लागत नाही. पुन्हा जन्मही घ्यावा लागत नाही. गोपाळच्या डोक्यात ही विचार मालिका चालू असताना तो स्वतःविषयी या अंगाने पुढीलप्रमाणे विचार करू लागतो. ते त्यांच्या पुढील स्वगतातून स्पष्ट होते.

''जीवनांत नेमकी तृप्ति आहे का? अतृप्तीही नाही. खूप पाहिलं आहं. भलंही पाहिलं. साधू पाहिले. सन्त पाहिले. सत्पुरुष पाहिले. राजकारणी पाहिले. शूर पाहिले. कर्तबगार पाहिले. तसेच अन्याय आणि अत्याचारही पाहिले. पतनाच्या शेवटच्या टोकापर्यंत पोचून तिथून परतलो. सन्मार्गाला लागलो. मन अस्थिर आहे. जाऊ नये तिथ जातं. पाहू नये ते पाहायला धडपडतं. करू नये त्याची चिन्ता करतं. तेही आकळायचा प्रयत्न केला आहे. यश मिळालं न मिळालं हा वेगळा भाग. धडपड तर अवश्य केली आहे. जीवनात कुठं मायापाश गुंतले नाहीत. घरच्यांनीही आशा जवळजवळ सोडलीच आहे. हा माणूस पै कमवून आणायचा नाही, यासंबंधी त्यांची खात्री पटली आहे. तेव्हा तिकडूनही मुक्तता झाली आहे. कुणी आपल्यासाठी उसासा सोडणार नाही. कुणी आसू ढाळणार नाही. कुणाचा हुंदका आतल्या आंत घुसमटणार नाही. कुणी आपलं स्मरण करून खन्तावणार नाही.

आपलं प्रेत कुणाच्या हाती लागणार नाही. लागलं तरी कुणी ते ओळखणार नाही. म्हणतील, कुणी फक्कड होता. गमावला बिचारा. बस एवढंच.' 'तेव्हा जर शरीर स्वेच्छेनं मरणाधीन करायचं असेल, तर यापरती सोनेरी वेळ दुसरी असणार नाही.'(पृ.४६२, ४६३) गोपाळच्या म्हणजेच लेखकाच्या वरील स्वगतातून त्याची वृत्ती पलायनवादाकडे झुकलेली आहे. हे पलायन त्याचे स्वतःच्या जिवीतापासूनचे आहे. त्याचे विचार आता आपण आपलं जीवन संपवलं पाहिजे तसेच त्याला आता जगण्यातली निरर्थकता जाणवू लागली असे वाटते.

**१.२.२.५. सत्तांतर :**

पाखरं मोठ्यांदा बोलत नव्हती. मधमाशा, डास, भुंगे यांच समूहगान तेवढं चालू होतं.(पृ.१) दयाळ पक्षी सुरेख गाणी गात, घुमत, सानुल्या मंजुळ बोलत.(पृ.४) ही धावाधाव आणि पळापळ कदाचित उभी रात्र चालणार होती. वारंवार इशारे देणारे आवाज उठणार होते. कधी चितळ मादीचं, कधी सांबराचं, कधी रानडुकरांचे केकाटणं, कधी टिटवीचा कर्कश ओरडा(पृ.१२) बोथरी इतका वेळ दात विचकत, उंचीवरची फांदी धरुन बसली होती. तिला उर्मी आली की, आपण हे झाड सोडावं, धूम पळावं आणि शेजारी असलेल्या दुसऱ्या सुरक्षित झाडावर जावं.(पृ.१२) समूहगान, मंजूब बोलणे, केकारणे हे एक प्रकारचे प्राणी जीवनातले स्वगतच आहे. आपल्या हद्दीत कुठं, कोणतं झाड फळाला आलं आहे, हे लालबुड्याला माहीत असे. तरी काही वेळ, कुणीकडं जावं याचा निर्णय त्याला करता येत नाही, अशी त्याची मुद्रा दिसे. काही वेळ थंड बसण्यात जाई. मग एकाएकी लालबुड्याचा निश्चय होई आणि तोंड फिरवून तो दिशा धरे.(पृ.२१) पण लालबुड्याचा करुण अंत झाल्यावर सकाळी लालबुड्याचा आवाज ऐकु आला नाही. तेंव्हा मुडानं उंच चढून पाहिलं, लालबुड्याची सर्व टोळी उघड्यावर बसून कोणत्या दिशेला जायचं, हे ठरवत होती.(पृ.२२) प्रत्येकाच्या मनात हे एकच स्वगत चालू आहे. मुडा मोगाला इशारा देत भूपकारं करायचा व मनाशी म्हणायचा, ''मी येतोय, असलास तर पळ''(पृ.३०) ढाण्या वाघाच्या आवाजाची गर्जना ऐकताच पाखरं, हरण ओरडत होती. सर्व आवाज इशाऱ्यांचेच होते. ''सांभाळा रे सांभाळा, वैरी आला''(पृ.३२) अशा प्रकारे सत्तांतरमध्ये स्वगत, संवाद हे विशिष्ट आवाज व हावभाव, कृतीव्यक्त व दात खाऊन प्रकट झालेले आपणास दिसतात.

**१.२.२.६. झोंबी :**

'झोंबी' या कादंबरीतील स्वगते ही प्रामुख्याने आनंदाची आहेत. काही वेळेस तारा व मामा यांची स्वगते आली आहेत. ताराचे सासू-सासरे वारल्यावर, नवऱ्याच्या मारापासून

वाचवणाऱ्या म्हाताऱ्या सासूसासऱ्यांचा ताराला आधार होता परंतु त्यांच्या पाठी संसाराची जबाबदारी आपल्याला पार पाडावी लागणार त्यामुळे ताराच्या नवीन आशा पल्लवीत झाल्या होत्या. ते तिच्या पुढील स्वगतातून स्पष्ट होते. ''कसंबी झालं तरी आता मीच संसाराची मालकीण म्हेनत्याला आता माझ्याबगार सत नि गत आता त्यो कुठं जाईल? आईबाऽच्या जीवावर उडया मारत हुता. बापईपणा घरातल्या घरात, दावायसाठी आई-बा समोर मला मारत हुता. आता मारलं तर खाईल काय?''(पृ.१४) यातूनच तारा आत्मनिर्भर होत गेलेली दिसते. हे वरील स्वगतातून स्पष्ट होते.

आनंदला बालपणी सिनेमाचे वेड होते. घरच्यांना कळू न देता गुपचूप लेखक सिनेमाला गेला पण त्याचे पितळ उघडे पडले आणि त्यामुळे रात्री उशिरा आल्यावर आईने लेखकाला खूप मारले व सकाळी वडिलांनीही मारले. दुपारपर्यंत अन्नाचा एक कणही न खाता आनंदा शेतात राबत होता. चार पाती काढायच्या राहिल्या होत्या म्हणजे ते काम करायला दोन वाजणार होते त्यावेळी आनंदाच्या पोटात भुकेचा डोंब उसळला होता. त्यावेळी आनंदाचा स्वतःशीच चाललेला संवाद पुढीलप्रमाणे ''म्हंजे दोन वाजणार. मरणार तवर आपूण. मेलो तर बरं हुईल. खरं असल्या आई-बाऽच्या पोटाला जल्माला यायला नगं. कवा पोर म्हणून खेळायला सोडत न्हाईत. कवा अंगावर हौसंनं रंगीत कापडं न्हाईत, कवा गावाच्या पोरागत सेनेमाला सोडत न्हाईत का कौतुक न्हाई. जलमभर ह्येंच्यासाठी गड्यागत मरावं लागणार; तवा कुठं ते नुसतं पोटाला घालणार माझ्या. त्येच्यापेक्षा गावाच्यात रोजगार केला तर काय वंगाळ हुणार हाय? कुणा डाक्टराकडं, वकिलाकडं झाडलोट करायला ऱ्हायलो तरी निदान खायाला चांगलं मिळंल. त्येंची पोरं सांभाळता सांभाळता त्येंच्यासंगं खेळायला मिळंल, तिथंच बसून मोकळ्या वक्ताला गोष्टीची पुस्तकं वाचायला मिळतील, सेनेमालाबी जायाला मिळंल.''(पृ.१०२) लेखकाला सिनेमा पाहण्याचा छंद होता. लेखक 'संत ज्ञानेश्वर' सिनेमा पाहून बाहेर आले तेव्हा त्याचे स्वगत मनाला चटका लावून जाते. ''आपलंबी असंच व्हावं. दादा आपल्याला असाच त्या भटजी- पंडितासारखा छळतोय. आपूनही अशीच निवांत समाधी घ्यावी. जिवाचा जाळ तरी न्हाईसा हुईल. न्हाईतर ज्ञानेश्वरांच्या आई-बासारखं नदीत, हिरीत पडून जीव दयावा.''(पृ.१०९) आनंदाला शेताच्या कामात जुंपला होता त्यामुळे त्याला जे छंद होते त्याला मूठमाती दयावी लागत होती. ''जलमभरच आपल्याला आता असं मरावं लागणार. कष्ट कष्ट करतच आपूण जाणार. आईबासाठी नुसतं आपूण राबायचं. मरमर मरायचं.''(पृ.१११)

आनंदची पाचवीतून शाळा बंद झाली होती. जेव्हा तो शाळेत जाणाऱ्या मुलांच्या गप्पा ऐकत होता तेव्हा त्याला खूप वाईट वाटले, 'आता हयेंचं जग न्यारं, आपलं जग न्यारं, हयेंची कापडं न्यारी, हयेंचं चड्डी-कुडतं तर माझा धोतर पटका. हयेंच्या नशिबात शाळा, तर माझया नशिबात मळा. गुराढोरांची मी शेणं काढायची नि हयेंनी पाटीवर लिणं काढायचं ही सुखाच्या सावलीलाबसून मजा मारत्यात ती सावली आता मला न्हाई मिळायची. जलमभर आता मळा नि मळयातला चिखूलच.'(पृ.१४९) आनंदाच्या स्वगतांमधून शिक्षणाविषयी प्रबळ इच्छाशक्ती सिनेमा, वाचन या छंदांविषयी असलेली आसक्ती दिसते. मासा जसा पाण्याविना तळमळतो त्याप्रमाणेच आनंदा शिक्षणासाठी तळमळत होता पण वडिलांच्या आनंदाने कुणबीकी करावी या दुराग्रहापुढे आनंदाला वेळोवेळी हात टेकावे लागत होते.

**१.२.२.७. झाडाझडती :**

खैरमोडे गुरुजी धरणग्रस्तांच्या प्रत्येक समस्येसाठी झटत होते. त्यामुळे त्यांच्या डोक्यात धरणग्रस्तांच्या अनेक प्रश्नांचे काहूर माजले होते. जांभळीकरांना काकडे साहेब जमिनी दाखवत होते. पण खैरापूरचे जमीन मालक मात्र आम्ही जमिनी देणार नाही त्यासाठी आम्ही कोर्टात जाऊ असा काकडे साहेबांशी वाद घालत होते आणि त्यामुळेच खैरमोडेगुरुजींना धरणग्रस्तांच्या प्रश्नांची चाललेली हेळसांड त्याच्या मनात चाललेल्या घालमेलीने व्यक्त होते. ''किती जणांचा गुंता सोडवायचा होता. जांभळीला वनजमीन रग्गड-चराऊ गवत मुबलक. प्रत्येकाची जवळपास आठदहा जनावरं. सकाळी लाडूबाजवळ नेऊन सोडली की चरून-फुगुन तिन्ही सांजची गोठयात. त्या जनावरांचं या परक्या गावात कसं होणार? कुठं चरणार ती? नकुसेचा कुंकवाचा धनी गेला, तिच्या पोराला कोण तारणार? पांडू येताळासारखे नव्याण्णव वर्षांचे खातेदार काय करणार? गोम्या कोळ्यासारख्या आणि रामू कुंभारासारख्या बलुत्यांनी कसं जगायचं नव्या गावठाणात? घळभरणीच्या आधी पुनर्वसन होईल का? हैबतीसारख्या पोरांच्या नोकरीचं काय? तिकडं मिळालेल्या कमी पैशात इकडं जमिनी कशा खरेदी करायच्या? रानातला मालकीचा लाकूडफाटा कोण आणि कधी ओढणार? इथले खातेदार कोर्टात तांत्रिक कारणानं यशस्वी झाले, त्यांची वगळणीची प्रकरण मंजूर झाली तर मिळणारं क्षेत्र कमी होणार. क्षेत्र कमी झाल तर सगळ्या जांभळीचं पुनर्वसन हया एकटया गावात पूर्ण होईल का? न होईना तर काय मूळ गावठाण फोडायचं? उरलेल्यांनी कुठल्या गावात जायच? माणसं कशी वाटायची? आणि देव कसे

वाटायचे?''(पृ.११४) या ना अशा अनेक प्रश्नांनी खैरमोडे गुरुजी चिंताग्रस्त झालेले दिसले. त्यांच्या स्वगतातून निरनिराळ्या धरणग्रस्तांच्या समस्या वाचकांसमोर येतात.

**१.२.२.८. राघववेळ :**

वालंबीच्या कुटुंबातील सारेजण फणे वेचण्यासाठी भल्या पहाटे जातात. काम केल्यानंतर त्यांना भूक लागते. सिताराम सारखीच भाकरी मागतो. त्यावेळी रघू आईला म्हणतो, ''दे, जेऊ दे त्याले.''(पृ.१५१) वालंबी रघूकडे पाहते. सितारामला अर्धी भाकर व त्यावर चटणी देते. आणि विचारात गढून जाते. त्यावेळचे तिचे स्वगत ''एवढुसा माहा रघू. आठवीतून नववीत बसन यंवदा. म्हंजे लय मोठा झाला का त्यो? ल्हानच तर ह्ये. पण किती अक्कल ह्ये त्याले! मायच्या जिवासाठी किती तुटते! ल्हान भावाले श्याण्यासुर्त्या माणसावाणी इचाराच्या चार गोठी सांगते. शाळा करुन काम बी करते. खरंच महा रघू लय सुदा! लय समजदार! नाही तर त्याच्या वयीची लेकरं खातात, उंडरतात. माहं लेकरु नाही तसं. कुठुन आलं आसन हे शाणपण. एक परवानं उणी असलेली लेकरं सुदरतात, नाही तर बिघडतात. माह्या लेकरान आजोर माहं मन मोडलं नाही. देव करो आन् त्याचं शाणपण आसंच ऱ्हावो.''(पृ.१५१) वरील स्वगतातून आपल्या मुलाचा समजुतदारपणा वालंबीला अभिमानास्पद वाटतो. प्रेमळ, कष्टाळू, समजदार त्याचा स्वभाव शेवटपर्यंत असाच राहो, अशी तिची परमेश्वराकडे प्रार्थना आहे, हे या स्वगतातून प्रकट होते.

गुढीत मिळालेल्या धान्याची केव्हाच वाटणी झाली होती. पैसाही वाटून झाला होता. भांडयापैकी रघूला एक प्याला, एक गडवा, दोन ताटे मिळाली. वालंबीने गुढीत आलेला हंडा साठ रुपयात खंडवून घेतला. मांग वेटाळातील लोक मिळालेले धान्य व वस्तु वाटणी करुन घेत असत. ते करतांना एकमेकांना समजून घेतात. ह्या कृतीवरील रघूचे स्वगत बोलके आहे. ''एवढं तेवढं मांगायले बक्कळ मिळते. म्हूनच मांग मांगणं सोडत नसतीन. तसंच असावं कदाचित. आता हेच घ्यान. नारायण कुट्यानी आधी लयशी काही देलं नाही. पण येवतीत एका रातीत कितीतरी भेटलं. कुट्यानंबी आता बरचं देलं. मांगायचंच कशाले? आपलं घ्या नं. आपूण इरोध करतो कव्हा कव्हा. पटत नाही आपल्याले, म्हूनच का नाही? पण माय म्हणली, लहाने बापूनं लाऊन धरलं की आपूण नांगी टाकतो. मुकाट्यानं मांघायले जातो. माय म्हंते म्हून जात आसू आपूण? आपल्याच मनाले आतून कुठून तरी वाटत आसन म्हून तर जात नाही आपूण? तसंच आसन कदाचित. आपल्या बापानं, आजानं केलेली काम आपल्याला एकाएकी टाकता येत नसतीन. नसतीनच टाकता येते. ह्येट! आपूण ल्हान. मायला दुखवता येतं आपल्याले? म्हूनच तर जातो

आपूण.''(पृ.२१०, २११) परंपरेने मांग वेटाळातील लोक सवर्ण लोकांच्या घरी सणवार आणि इतर प्रसंगी जातात मिळालेल्या पसा दोन पसा धान्याची वाटणी तसेच इतर वस्तुंची वाटणी आपआपसात करताना दिसतात. याला आपण अपवाद नाही. आईला दुखवू नये, लहाने बापू सांगतो ते ऐकावे हेच रघूच्या वरील स्वगतातून व्यक्त होते. आपल्या मनातील द्वंद्व रघून वरील स्वगतातून मांडतो.

**१.२.२.९. ताम्रपट :**

'ताम्रपट' कादंबरीचे नायक नाना सिरूर लोकाग्रहाखातर बापूसाहेब देशमुख यांच्या विरोधात निवडणुकीला सामोरे जातात दोन्ही गटांनी आपापल्या नीतितत्त्वांना धरून प्रचार केला. मतदान झाल्यानंतर मतमोजणीचा दिवस उजाडला तेव्हा नाना नदी किनारी फेरफटका मारायला गेले तेव्हा तेथे त्यांना एक दृश्य दिसले. ऊसाच्या पाचटाच्या कोपीबाहेर एक नागडा लहान मुलगा स्वतःशीच हसत होता. त्याची आई त्याला आत बोलावित होती. तेवढ्यात तेथे एक माणूस आला. तो माणूस उंच, काळा, मोठ्या हाडापेराचा, मात्र किरकोळ शरीरयष्टी असलेला होता. प्रथमदर्शनी नानांना तो माणूस भला माणूस नसावा असे वाटले. जेव्हा नाना त्या खोपटाजवळ आले त्या खोपटात त्यांनी डोकावले तर तोच माणूस मान खाली घालून रडत असलेला त्यांना दिसला. त्यांच्यासमोर त्याची पत्नी की जिच्या अंगावर लज्जारक्षणापुरतीही वस्त्र नव्हती. हे दृश्य पाहिल्यानंतर नानांना पडलेल्या अनेक प्रश्नांचा कल्लोळ त्यांच्या पुढील स्वगतातून स्पष्ट होतो.

''मघाशी भेटलेला तो माणूस. उपाशी वाघाच्या जबड्याचा. तो रस्त्यावर कुठेही किंवा कोणत्याही गल्लीच्या तोंडाशी सहज दिसू शकतो. तेव्हा आपली पहिली प्रतिक्रिया काय असते? बदमाष, हबशी, क्रूर, काळा. का? कसले संकेत याच्यापाठी असतात? कशामुळं आपल्याला असं वाटतं? अशी कोणती तर्कपद्धती आपल्या मनात बांधलेली असते? या माणसाच्या भुकेजल्या उध्वस्त चेहऱ्याला आपलं मन भितं? का? एवढ्या कामानंतरही? अनुभवानंतरही? इतकी सारी माणसं पाहूनही? की हे झिरपत आलेले संकेत? पसरट जाड पायांचा माणूस. राक्षसी चेहरा, बदमाष! नानांना वाटलं, पहिली प्रतिक्रिया म्हणून त्याच्या दुःखाचा विचार आपल्या मनावर का उमटत नाही? त्याला रडताना पाहून आपण चक्रावलो. तो दिवसभर उपाशी हिंडला. फुकट मिळाली निवडणुकीची म्हणून त्याने खूप दारू ढोसली आणि घरी येऊन भानावर आला तेव्हा रडत बसला. कशासाठी? कोणासाठी? अब्रू वाळत टाकून विड्या बांधत बसलेल्या बायकोसाठी? की नागडं नाचणाऱ्या शेंबड्या पोरासाठी? मुळातूनच काहीतरी घोटाळा आहे. नानांना वाटलं, या सुजलाम्

सुफलाम् देशातले हे कोरडे नदीकिनारे आणि तिथं धुळीत राहणारी ही विकल माणसं. यांचा देश कोणता? हे राज्य, हे स्वराज्य कोणाचं? स्वराज्य, स्वातंत्र्य या गोष्टींशी या माणसांचा संबंध काय? यांच्यासाठी आपण काय करु शकतो? त्यांना आपल्याविषयी कसा विश्वास वाटेल? कोणासही लढत आहोत आपण? स्वतःसाठी की यांच्यासाठी? कोणाची फसवणूक करीत आहोत? आलो निवडून आपण तर हा माणूस आपल्यापुढे येऊन उभा राहणारा आहे काय? आला तरी तो आपल्याला दिसेल का? आपण त्याच्याकडे बघू का? माणसाला माणसासाठी खरोखरीच काही करायचं असेल तर त्यासाठी सत्ता, आकांक्षा ही कितपत उपयोगी? झालाच तर अडथळाच होईल त्यांच्यामुळं. संवादच नाहीसा होईल आणि आकांक्षेच्या भरजरी वारूवर आरूढ होऊन आपण भरसभेत दुःखाची गाणी गात टाळ्या घेऊ, रडण्याचा सुंदर अभिनय करू; उपाशी माणसाच्या आठवणीचा गहिरव प्रकट करू. त्याला बदमाष म्हणणार नाही पण त्याचा आपला संवादही होणार नाही. काय उपयोग काय?''(पृ.४०७) आपण निवडून आल्यानंतर गरीब पण वरकरणी गुन्हेगार तसेच सर्वसामान्य वाटलेल्या व्यक्तींसाठी आपण काय करु शकतो का? हा नानांना सतावणारा प्रश्न त्यांच्यावरील स्वगतामधून पडतो. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्वातंत्र्य, समता, बंधुता हे प्रश्न कायमच उरलेले आहेत, हे या स्वगतातून व्यक्त होते.

**१.२.२.१०. तणकट :**

महारवाड्यातून शिक्षण घेऊन बाहेरगावी नोकरीच्या निमित्ताने गेलेली तरूण मुले परत महारवाड्याचे तोंड पाहत नव्हती. शिक्षण घेतल्यानंतर नोकरी व नोकरी मिळाली की ते आपले आई-वडील, आपले कुटुंब याकडे पाठ फिरवित होते. याचे कारण त्यांना आपल्या जातीची लाज वाटायची पण कबीर मात्र तसा विचार करणारा सुशिक्षित तरूण नव्हता या अनुशंगाने त्याची होणारी घालमेल त्याच्या खालील स्वगतातून दिसून येते.

''कॉलेज संपलं. आता हा म्हारवाडा सुटला पाहिजे... कबीरच्या मनात अचानक आलं आणि तो दचकला... आपल्याला असं का वाटावं? म्हारवाडा सुटला पाहिजे म्हणजे आपण म्हारवाडयाला वैतागलो. की महार पणाला वैतागलो... पण महार म्हणून बाकीचे ओळखतात. तो शब्द पुन्हा पुन्हा आपण पालीसारखा झटकायचा तर प्रयत्न नाही ना करत? पण तसा प्रयत्न आपण कधी केलाच नाही. आणि का करावा? महार म्हणून मला ओळखावं याची मला चीड आहे. संताप आहे. त्याविरुद्धचा सगळा संघर्ष मला करायचाच आहे. पण मला महार जातीत जन्मलो हे लपवावं असं मात्र वाटत नाही. आणि लपवायचे तरी का? मला कुणी सवर्ण समजावं म्हणून?

आणि आपल्याला कुणी सवर्ण समजल्यानं काय फरक पडणार आहे? मग आपल्या मनात म्हारवाडा सुटला पाहिजे असं आलं याचं कारण काय? की आपण शेडबाळेला घाबरतोय? की गौत्याला घाबरतोय? हे तर शक्यच नाही... मग असं का व्हावं? म्हणजे मी स्वतःलाच घाबरतोय असा त्याचा अर्थ आहे. आणि स्वतःला घाबरण्यात काय वाईट आहे माणसानं? उलट माणसानं फक्त स्वतःलाच घाबरलं पाहिजे. इतर कुणाला घाबरण्यापेक्षा...(पृ.२२२) बाळासाहेब शेंडबाळे याने सतत महारांना गावातील सवर्ण लोकांविरुध्द फितवले. सतत महार त्याच्या दुष्कृत्यांना साथ देत होते. गौतम कांबळे व कबीर यांच्यात मारामारी झाली तेव्हा संध्याकाळी गौतम कांबळे, बाळासाहेब शेडबाळे, डेप्युटी गोपाळा, दादबा कबीरच्या घरी भांडायला गेले या घटनेने कबीरच्या मनात अनेक प्रश्नांचे काहूर माजले ते त्याच्या पुढील स्वगतातून दिसते.

''म्हणजे ही माणसं कोणत्याही थराला जाऊ शकतील, इतकी ती शेंडबाळयाच्या कहयात गेलेली आहेत. असं बाळ्या शेंडबाळ्याकडं काय असेल? ज्यामुळं तो इतक्या जुन्या जाणत्या माणसांना खुळं बनवू शकतो, की त्यानं महारवाड्यातल्या माणसांची अतृप्त आणि सुप्त आकांक्षा ओळखलेली असावी? जिला गोंजारत तो त्यांच्यावर हुकुमत गाजवतोय. नेमकं काय असू शकेल? या माणसांना कधीच का त्याच्यावर अविश्वास दाखवावा असं वाटत नसेल? आपुण्या म्हाताऱ्याच्या प्रकरणात गावच्या विरोधात जाऊन कामाला न जाता घरात थांबणारी ही माणसं पुन्हा गावात कामाला जाताना वरमली का नसतील? त्यांना काहीच वाटलं नसेल का? की त्यांना कशाचच काय वाटत नाही, इतकी ती यांत्रिक बनून गेलेली आहेत? ती जर यांत्रिकच झाली असती तर शेडबाळ्याला तरी का मुठीत सापडली असती? तो दाखवत असलेल्या अमिषांना ती कशी काय बळी पडतात?...'' अशा प्रकारे महारवाड्यातील लोकांच्या वृत्ती प्रवृत्तींची उकल करण्याचा प्रयत्न कबीरच्या मानसिकतेतून व त्याच्या स्वगतातून स्पष्ट होते. तसेच शेडबाळ्याने महारवाड्यातील माणसांवर जणू काय एक प्रकारची मोहिनीच टाकली आहे, हे ह्या स्वगतातून दिसते.

**१.२.२.११. डांगोरा एका नगरीचा :**

खंडोबाच्या देवळापुढं चिंचपाटावर बसून आपल्या पंख्याच्या पुढ्यात आत्मसंतोषाने बोलणाऱ्या प्रल्हाद भटाच्या ठिकाणी राजसच्या दर्शनानं एक सुकुमार जाणीव उगवली होती. ती पुढील स्वगतातून प्रकट होते. ''आपल्या देखत देखत कुणी येतं-जातं, भेटतं न भेटतं आणि आपल्या ललाटी एक तापलेली मुद्रा नकळत रुतून बसते.... तर मग जन्मकुंडलीतली ग्रहनक्षत्रं

अदृष्टात राहून आपलं नशीबचक्र किती सूक्ष्म फिरवत असतील, याचं गणित कधीतरी कुणाला सुटेल का? चाळिशीपुढं झुकणारं आपलं आयुष्य विशीतल्या एका देखण्या श्यामलेला पाहून क्षणभरात विचलित होतं... आजवरचे दिवस चोथ्यासारखे वाटू लागतात, याचं रहस्य काय असेल?''(पृ.४६) प्रल्हादभट आपल्या मनातील खंत व राजसच्या सौंदर्याचे मोठेपण सदर स्वगतातून व्यक्त करतात तसेच प्रल्हाद भटांचे हे स्वगत स्वतःचे आत्मपरिक्षण करणारे वाटते.

**१.२.२.१२. बारोमास :**

प्रस्तुत कादंबरीचा नायक एकनाथ हा एम.ए.बी.एड. होता. पण केवळ संस्थाचालकांकडून डोनेशनची मागणी झाली. एकनाथसारखा शेतकरी कुटुंबातील मुलगा एवढे पैसे कुठुन आणणार आणि त्यामुळे नोकरीला तो मुकला. शिक्षण असल्यामुळे अलकासारख्या शिक्षित आणि देखण्या मुलीशी त्याचा विवाह झाला पण त्याच्या दारिद्रयाला कंटाळून अलका माहेरी निघून गेली. त्याच्या जीवनाची वाताहात झाली. त्याच्या मनाची झालेली तगमग त्याने पुढील स्वगतातून व्यक्त केली आहे.

''नोकरी असती तर आपण जिच्यावर जिवापाड प्रेम करतो ती अलका आपल्याजवळ असती. दोघांचा सुखी संसार. एखाद्या कॉलनीत पॉश घर. आणि साहित्यातही नाव झालं असतं... स्वतःचे पैसे टाकून पुस्तकांवर पुस्तकं छापले असते. एवढी सुंदर आपली बायको, पण तिचं सुख आपल्याला नाही. आपलं तिला नाही. वणवा आहे फक्त. आपलं हे सुख कोणी लुबाडलं? बापानं? शेवंतामायने? पण त्यांनीच लावतोड करुन आपलं अर्ध आयुष्य पेललं. पण एक चूक केली. आता मध्यासाठी जे केलं ते आपल्यासाठी केलं असत तर आपल्या आयुष्याचं सोनं झालं असतं. आता नशिबात फक्त जळणं... जळून कोळसा होणं... कोळसाही जळत राहिला तर मग राख... फक्त राख... आयुष्य भोगून झाल्यावर शेवटी होते भेसूर स्मशानातल्या सरणावर जीवनाची थैलीभर राख पण ही राख तर आपण जगत असतानाच आपल्या काळजावर. किती झाडायची, किती फुंकायची? आपल्याच जीवनाची आपल्याला भीती वाटत राहते. जीवनाला भितो. आपण आपल्याच जीवनाला भितो...काळजाला थरथर कापरं भरते घबराट सुटते...''(पृ.२९६, २९७) वरील स्वगत काळजाचा ठाव घेणारे आहे.

शेतकऱ्याला बारोमास विविध संकटांना सामोरे जावे लागते. बँकेचे कर्ज काढून शेत वहिवाटीला आणायचे पीक चांगले आले की निसर्गाची त्याच्यावर वक्रदृष्टी पडते. अतिवृष्टी किंवा अनावृष्टी यामुळे पिकाची नासाडी होते. करडई, हरबरा व गहू याच पीक जोमाने वाढायला

सुरुवात झाली आणि धूकं पसरलं. त्या धुक्यात रब्बीच्या पिकांची बरबादी होणार त्यामुळे दुःखी झालेल्या एकनाथची व्यथा पुढील स्वगतातून व्यक्त होते.

''आपलंही आयुष्य ह्या धुक्यात हरवलेल्या सृष्टीसारखंच. आयुष्याला कुठलीच वाट गवसली नाही. एवढं लांबलचक आयुष्य आपण पुढेही याच पद्धतीने जगणार का? असेच आकळया देत राहणार का? ह्या धुक्यातून कधी बाहेर पडणार आपण? आपलं घर? आयुष्याच्या तीस-बत्तीस वर्षात काहीच काहीच हाती आलं नाही. सगळं सगळं सुटत गेलं. या वयात आपल्या सोबत शिकणारांनी, दोस्त-मित्रांनी बंगले बांधले, सुख मिळविलं आणि आपल्या हाती जे होतं, ते ही गंजट थेंब होऊन ओघळून चाललं. हे कशामुळे? आपल्या हाती आलेल्या शेतीच्या धंद्यामुळे... काहीच साठवण करू शकलो नाही आपण ह्या गंजलेल्या भुतकाळाशिवाय. उभारी घेऊन जरा पुढे पळायला जात होतो, तर एकावर एक ठोकरा लागत होत्या आणि आपण कोलमडून पडत होतो. पडत आहोत.''(पृ.३२१) एकनाथच्या आयुष्यात दुःखाचा डोंगर सतत पुढे असायचा. नोकरीत, शेतीत, कौटुंबिक जीवनात हताश झालेल्या एकनाथचे स्वगत मनाला चटका लावते.

**१.२.२.१३. भूमी :**

मैथिलीला आपली आई आणि मॅथ्युज अंकल यांच्यातील मैत्री अजिबात आवडत नव्हती. कधीही न आवडणारे मॅथ्युज टिचर तिला ''माय चाईल्ड!'' म्हटल्यावर ''आय ॲम नॉट युवर चाईल्ड!''(पृ.२) हे स्पष्ट व्यक्त करता आले नाही तरी ती तिच्या भावना स्वगतातून व्यक्त करते. मैथिलीची आई म्हणते, मॅथ्युज म्हणाले, की ''तुला मॅथ्समध्ये मार्कस कमी आहेत.'' तेव्हा मैथिलीला वाटलं, 'ज्यांच्या घराची दारं संध्याकाळी बंद असतात खूप वेळपर्यंत, त्यांना कसे मिळतील हंड्रेडपैकी हंड्रेड!'(पृ.३) वरील दोन्ही स्वगतातून बालमनात उमटलेल्या भावना व्यक्त होतात.

मैथिली बेंगलोरला गेली तेव्हा तिची सुधीर यांच्या कुटुंबाशी जवळीक झाली. सुधीर यांच्या मुलीचे म्हणजे दर्शनाचं लग्न झाल्यानंतर ती दिल्लीला गेली. दर्शना नसल्यानंतरच एक सुन्नस रितेपण तिलाही जाणवलं. आपण सासरी गेलो त्यावेळी आणि आता दर्शना सासरी गेल्यानंतरचा फरक ती आपल्या स्वगतातून व्यक्त करते. ''आपली अशी एक जागा कधीही नव्हती कुणाकरता, की आपण नसताना ती रिती व्हावी. दर्शनासारखं आपण सासरी गेलोच नाही; कारण जिथून जायचं ते माहेर नव्हतं. ते आत्याचं घर होतं. आत्यानं प्रेम दिलं, पण तिला माहेर देता आलं नाही. माहेरच्या घराची मातीच सासर घरी बदलते म्हणे. आपल्याला ते माहिति

नाही.''(पृ.२२२) माहेरपण मिळाले नसल्याची व्यथा मैथिली आपल्या स्वगतातून व्यक्त करते.

मैथिली ही शंतनू व अंशुमन यांच्यापासून दूर म्हणजे बंगलोरला जाण्याचा निर्णय घेते. तिच्या कॉलेजमध्ये तिचा सेण्ड ऑफचा कार्यक्रम झाला. सगळ्यांनी तिला निरोप दिला आणि ती फक्त समुद्राच्या त्या लाटांकडे पाहत मनोमन म्हणाली, 'अरे, तू तर मला इतका जवळचा, आपला, माझा एक हिस्साच असा! तू कां रे असा निर्विकार, अलिप्त! मी जाते आहे तुला कळलं नं? की तुला आपलं माहीत झालं आहे निरोपाच्या वेळा, त्या वेळचे सगळे कढ खोटे असतात म्हणून!'(पृ.१८६) समुद्र काठावर जाऊन हताश होऊन ती आपल्या भावना वरील स्वगतातून व्यक्त करताना दिसते. अशाप्रकारे वरील स्वगतामधून फक्त मैथिलीची व्यथाच व्यक्त होताना दिसते.

**१.२.२.१४ उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : माधुरी विचार करते विदर्भातल्या कुणीच फिल्म काढली नाही तिचं मन आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करीत होते ती विचार करते तिची आजी दुसरी पास, आई नववी पास, माधुरी एम. ए. झाली. ''भारतात पहिला सिनेमा तयार झाला तेव्हा आपले कोण... खापरपणजी, खापरखापर पणजी-पणजोबा... कोण काय करत असेल? आपल्या घराण्यात पहिल्यांदा कुणी सिनेमा पाह्यला असेल? आर्ट फिल्म पाहणारी आमच्या कुटुंबातली मीच पहिली... आणि मी आर्ट फिल्म काढणार...''(पृ.१५) चित्रपट सृष्टीची किवा उच्चशिक्षणाची कोणतीच पार्श्वभूमी नसलेली नव्हे नव्हे विदर्भातल्या कुणीच अजून फिल्म काढली नसताना माधुरी आर्ट फिल्म काढण्याचा निर्णय घेते. तेव्हा तिची जी घबराहट किंवा मानसिकता होते. ती तिच्या वरील स्वगतातून व्यक्त होते.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : विलास स्वतःच्या भविष्याची दिशा ठरविताना जे नियोजन करतो ते त्याच्या पुढील स्वगतातून स्पष्ट होते. ''आठवतंय सगळं! पेपर वाचायच्या सवयीमुळे बी.फार्म.चा अभ्यास सोपा वाटतोय. तरी आपण फुलपाखरांचाच अभ्यास करायचा आयुष्यभर ! मेडिकल शॉप टाकले तरी फुलपाखरांचाच अभ्यास करायचा आयुष्यभर... मेडिकल शॉप टाकायचेच, असेही काही नाही. आपल्या घराण्याचा गाद्याउश्यालोड करायचा व्यवसायही चालू ठेवू आणि फुलपाखरांचा अभ्यास करायचा आयुष्यभर!''

मस्त चौथा मजला बांधायचा. सबंध मजला नाही. दोन खोल्या बांधायच्या. एक स्टडी रूम, एक प्रयोगशाळा आणि मेडिकल शॉप किंवा गाद्याउश्यालोडाचा कारखाना.... काम संपले

की मस्त स्टडी रूममध्ये, प्रयोगशाळेत जाऊन अभ्यास करायचा... फुलपाखरे येतील अशी बाग करायची... इन्स्टिट्यूट नाही काढायची. आपल्याला एकट्याने अभ्यास करायला आवडते. आपल्याला एकान्त आवडतो. एकान्तात एकट्याने प्रयोगशाळेत काम करायचे, स्टडीत स्टडी करायची, पेपर लिहायचे.(पृ.७३) म्हणजेच मेडिकल शॉप, गाद्या उश्या, लोडचा कारखाना, फुलपाखरांचा अभ्यास, बाग आणि एकान्तावासात संशोधन असे स्वप्नरंजन विलास वरील स्वगतातून व्यक्त करतो.

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : प्रस्तुत कादंबरीतील 'कुटुंबव्यवस्था आणि पाऊस' या भागातील वृद्धाच्या मनातील उलटे सुलटे विचारांचे चक्र विधुर म्हाताऱ्याच्या स्वगतातून लेखक प्रभावीपणे मांडतो. मनात आलेल्या विचारांचा उलटाही विचार तो वृद्ध म्हातारा पुढीलप्रमाणे करतो. ''व्यक्तीने उल्टासुल्टा विचार करायची देणगी गमावता कामा नये. उल्ट्या विचाराला आपला स्वतःचा न् दुसऱ्याचाही विरोध होतो. उल्टा विचार प्रस्थापितही होऊ शकतो. तर पुन्हा उल्टा विचार करून बघायचा उल्ट्याचा उल्टा विचार म्हणजे सुल्टा नव्हे. उल्ट्याच्या नाना तऱ्हा असतात. मग भीतीदायक, दुष्ट, भंपक विचारही छानपणे हाताळता येतात. मनाचा घट्टपणा कमी होतो. मन जेवढे सैल तेवढे जीवनाचे झिरपणे अधिक.''(पृ.१८८) यातून वृद्ध म्हातारा विचारांची चैन करताना दिसतो. मुक्त विचारातून जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन तसेच जीवनाविषयीची सकारात्मकता व नकारात्मकता वरील स्वगतातून जाणवताना दिसते. मुक्त विचारांचे स्वातंत्र्य वृद्धाच्या आयुष्याच्या उत्तरार्धात जाणवते.

**१.२.२.१५. खारीच्या वाटा :**

लेखकाला त्याच्या आईने नदीच्या पाण्यात घायपात भिजवायला सांगितले होते. लेखक व त्याचा मित्र नदीकडे गेले. जाताना त्यांनी लुकीला बरोबर नेले. लेखक आणि दिन्या घायपात भिजवण्याच्या कामी गुंतले. तेवढ्यात लुकी तेथून पसार झाली. घायपात भिजत घातल्यानंतर ते जेव्हा पाण्याबाहेर आले तेव्हा लुकी त्यांना कुठेच दिसेना. लुकीची शोधाशोध सुरु झाली. लेखकाचे मन थाऱ्यावर नव्हते. लंखकाच्या मनात अनेक विचारांचे काहूर माजले. 'लुकी सापडली नाही तर?... कदाचित रानात निघून गेली नसेल? .... आईला काय वाटेल?... मी कसनुसा झालो. काय काय आठवायला लागलं. एवढुसा मांसाचा गोळा... मी घरी आणला... आईनं जीव लावला... तिच्यामुळीच लुकी वाचली... लहानाची माठी झाली. दोघींनाही एकमेकींची सवय

झालेली... लळा लागलेला...'(पृ.५२) या स्वगतातून लेखकाचे लुकीविषयी असलेले प्रेम व ती सापडत नसल्याने लेखकाची झालेली बेचैन अवस्था दिसून येते.

'खारीच्या वाटा' या कादंबरीचा विषय हा प्रामुख्याने लेखक, त्याचा मित्र दिनू आणि त्यांची प्रिय खार या त्रयींने बालपणी केलेल्या करामती, लुटलेला आनंद सांगणाऱ्या अनेक घटना हा आहे. अचानक या सगळ्याला कलाटणी मिळाली ती धरणाने. धरणाच्या भिंती जवळच पहिलं गाव लेखकाचे असल्याने त्यांना स्वमुलुख सोडून जावे लागणार होते. गाव सोडण्याच्या नोटीसांवर गावकऱ्यांचे अंगठे घेतल्याने धरण बांधण्याचा निर्णय पक्का झाला होता. त्यामुळे गावाला विस्थापित व्हावंच लागणार होतं. तेव्हा लेखकाची व्यथा त्याच्या पुढील स्वगतामधून स्पष्ट होते.

''ती नदी... तिचा गहिरा डोह... काठावरची लेंडी जांभळं... लगडलेली उंबरं... भाताची खलाटी... हिरडे... आंबे... रानमेवा.. सारं सारं जागच्या जागी राहणार फक्त आम्ही जाणार... आता कोणत्या डोहात बुडया मारायच्या...? कुठल्या माळावर 'हब्बड' खेळायची? आखरावर बसून पावा वाजवायचा...? इंद्रधनुष्य पाहायचं... मोरपिसं गोळा करायची... डोंगरी आवळे खायचे... वाहत्या टाकीचं पाणी प्यायचं... तुरट-गोड चव घ्यायची... नाचणीची हिरवी कणसं ओरबडून खायची... जाळीझुडपातले शेंडवेल, घोटवेल कचाकचा चावायचे... आळू, करवंद, तोरणं, गोटी आंबे खात, दिवस दिवस रानात भटकायचं... हे सारं नव्या ठिकाणी असेल? कुणाला विचारणार? मला फक्त दिनूचा आधार. तो तर पुरता ढासळलेला. धड बोलतही नव्हता. मोठी माणसंही गपगप. गावालाच कसनुशी कळा आलेली. लुकीही बदलली. बावरल्यासारखी झाली. तिला कसं कळलं..? का मलाच तसे वाटत होतं...?''(पृ.१३२, १३३) धरणांमुळे गाव विस्थापित होणार हे निश्चित झाल्यावर लेखकाची जुन्या आठवणींनी आणि गावाच्या प्रत्येक गोष्टींच्या,ऋणानुबंधांनी होणारी घालमेल हया स्वगतातून व्यक्त होते.

**१.२.२.१६. फेसाटी :**

लेखकाने शाळा शिकताना कितीतरी वेळा शाळा न शिकण्याचा निर्णय घेतला होता पण काकूने समजावले की तो विचार चक्रात अडकायचा, 'काकू अशी बोलली म्हणजी वाटायचं काकूचं खरं हाय. जावावं शाळंला, पण दुसरं मन लगीच सांगत हुतं. 'नकुरे बाबा शाळा. हिच आपलं खुरपानं बरं हाय'(पृ.९३) काकू काका नाथाला खड्डे खणण्याच्या कामाला येऊ नको म्हणून बजावतात. शाळा शिक. नोकरीला लाग. असं म्हंटल्यावर नाथा पुन्हा त्याच विचारात राहायचा 'काकू काका अशी बोलली म्हणजे मला वाटायचं, शिकावं शाळा, लागावं नोकरीला.

पण नोकरी कुठली लागत्याई आपलं कामचं बरं. दुसरं मन सांगत हुतं'(पृ.१०३) नाथा दहावी पास होईल की नाही याची चिंता करत होता. तेंव्हा त्याच्या मनात पाल चुकचुकली 'म्या नापास झालुया वाटतय गड्या काय खर नाय, आपलं माझं दुसरं मन म्हणायचं ''आसुदी लगा नापास झालं म्हणजी शाळचा तर वनवास संपला ऊगूच किटकीट मिटून जाईल.''(पृ.१२८) अशा प्रकारे नाथाचा स्वतःचाच स्वतःशी चाललेला उलट सुलट संवाद वरील स्वगतामधून स्पष्ट होतो.

लेखकाच्या कुटुंबावर अनेक संकटे आली. त्यातलच एक म्हणजे त्यांच घर पेटवून दिले. त्या आगीत सारा संसार भस्मसात झाला होता. त्यावेळी दिगंबर काका, मीना वैनी, विमल वैनी, सुवर्णा वैनी, ज्ञानू काका यांनी आपआपल्या परीने मदत केली पण या संकट समयी नाथाच्या बहिणींनी पाठ फिरवली याची खंत त्याच्या पुढील स्वगतातून व्यक्त होते, 'येका नाळंचा जल्म तुटला त्यो तुटलाचं. कुण्या कैवाऱ्याची साथ कुणाला? येवढी निष्ठूर कशी काय झाली असावी? आई बाला ईसरावं....? येवढ्या चिमुकल्या पिलाला चोचीनं दाणा चिमणी घालून मोठं करत्या. तसं काकू काकानं केलं. ह्याची जाण नसावी का? ज्या आईनं दिसरात काबाडकष्ट केलं. नऊ महिनं उदरात वाढवलं. मायेनं त्वाँडात थान दिलं. गालाचा मुक्का घेटला. डोळ्याचा दिवा केला. दिव्यासारखी जळत राहिली. तिचा संसार जळला ह्याचं काय वाटलं नसावं का? वाटंचा वाटसरु धावून आला. त्योच खरा रक्ताचा म्हणावा का...?'(पृ.१७९) नाथाच्या वरील स्वगतातून तुम्हासाठी जीवाचे रान करणाऱ्या मातेचे दुःख लेखक व्यक्त करतो. आपल्या जवळच्याच रक्ताच्या नात्याच्या माणसांनी या दुःखात सहभागी होऊ नये. यासारखे दुसरे दुर्दैव असू शकत नाही. हे यातून समजते.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांमधून येणारी स्वगते साचेबंद नाहीत. घटना प्रसंगानुरुप बदलणारी त्यांची आविष्कारपध्दती आहे. ही स्वगते भूतकालीन घटना-प्रसंगाविषयांची सूचकता दर्शविताना दिसतात. काही स्वगतातून पात्राच्या स्वभाव, मनोवृत्तीवर प्रकाश पडतो. काही स्वगते स्त्री मनाचा वेध घेणारी आहेत. पश्चातापाची भावना हया सर्वांवर प्रकाश टाकणारी विविध स्वगते कादंबऱ्यांमधून आलेली आहेत. अगदी थोडक्या शब्दात पात्रांच्या मनातील भावभावना, आचार-विचार प्रभावी पणे व्यक्त झालेली आहेत. स्वगते ही सहजपणे आलेली असल्यामुळे त्यात अकृत्रिमता आहे. पात्रांच्या, अंतर्मनाचा ठाव घेणारी अशी ही स्वगते आहेत. पात्रांना, घटनाप्रसंगाने जिवंत ठेवण्याचे कार्य या स्वगतांतून झाले असल्यामुळे कथानकाचा ओघ कायम टिकून राहिलला दिसून येतो.

### १.२.३. संवाद :

कादंबरीतील घटना, प्रसंग, आणि व्यक्ती या महत्वाच्या घटकांना स्वतंत्रपणे किंवा एकाचवेळी साकार करण्याची विलक्षण शक्ती संवादामध्ये असते. कथानकाला साजेसे, पुरक आणि योग्य परिणाम साधणारे संवाद पात्रांच्या तोंडी असावे लागतात. निरनिराळया पात्रांच्या घटनेविषयीची प्रतिक्रियाही संवादातून कळू शकते. तसेच प्रभावी संवादातून अनेक घटना आणि प्रसंग कळू शकतात. नंदा मेश्राम कादंबरीतील संवादाविषयी लिहितात, ''कादंबरीतील संवाद हे प्रत्यक्ष जीवनातल्या संवादासारखे तंतोतंत असू नयेत. बोजड भाषा, अलंकारिक कृत्रिम वाक्यरचनाही संवादाला योग्य नसते. प्रत्यक्षाच्या आभास निर्माण करुन पण प्रत्यक्षात न आढळणारा चटकदारपणा, आटोपरशीरपणा, गतिमानता संवादामध्ये असावी. काही वेळेस लेखकाने पात्रांचे वर्णन करण्यापेक्षा लेखकाच्या मध्यस्थीशिवाय पात्रांच्या संवादामुळे, सत्याचा आभास उत्पन्न होण्यास अधिक मदत होते. संवाद सहज व स्वाभाविक असावेत.''[८३] अशाप्रकारे सहज व स्वाभाविक संवाद कादंबरीला कलात्मक पातळीवर पोहोचविण्यासाठी प्रभावी ठरतात. तसेच कादंबरीच्या रचनेला संवादाचे फार मोठे साहाय्य होते. पात्रांच्या संवादातून कथानक उलगडत जाते. पात्रांच्या मनातील विचार-विकार, भाव-भावना इत्यादी गोष्टी व्यक्त करण्याचे संवाद हे एक उत्कृष्ट साधन आहे. संवाद लिहितांना कादंबरीच्या लेखकाची भाषा व्यक्तिपरत्वे बदलणारी असेल तर संवाद वैशिष्टयेपूर्ण ठरतात. या संदर्भात उषा हस्तक लिहितात, ''संवाद लिहितांना लेखकाची भाषा अत्यंत लवचिक असावी लागते. त्या भाषेवर, लेखकाची 'छाप' असण्याला कादंबरीत महत्व नसते तर, त्याची भाषा, त्या विशिष्ट व्यक्तिमनाचे रंग, संवादाच्या भाषेतून कितपत समर्थपणे व्यक्त करु शकते, हयाला महत्व असते आणि म्हणूनच, लेखकाच्या भाषेत, 'व्यक्ती'प्रमाणे रंग बदलण्याचे थोडे तरी सामर्थ्य असावे लागते.''[८४] म्हणजेच संवादाचा संबंध एका बाजूला कथानकाशी तर दुसऱ्या बाजूला व्यक्तिदर्शनाशी आहे, परंतु त्यातही व्यक्तिदर्शनाचे प्रभावी साधन म्हणजे संवाद होय. संवादामध्ये व्यक्तिप्रमाणे रंग बदलण्याचे थोडे सामर्थ्य असेल तर संवाद अर्थपूर्ण आणि प्रत्ययकारी ठरतात. पात्र आणि प्रसंग यांना अनुकुल असे संवाद रचले पाहिजे तरच ते स्वाभाविक वाटतात. संवाद कृत्रिम वाटता कामा नये. कथानकाची गरज म्हणून त्यांची निर्मिती असली पाहिजे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांतील संवाद हे कथानकाची व आशयाची गरज म्हणून कादंबऱ्यांमध्ये येतात. त्यामुळे या कादंबऱ्यांतील संवादांना विशेष म्हत्व आहे.

कादंबरीतील कथानकाला जिवंत आणि प्रवाही ठेवण्याचे काम पात्रे करतात. मात्र ही पात्रे त्यांच्या मनातील भावभावना, विकार-विचार-आचार, मानवी नात्यातील संबंध समजण्यास साहाय्यभूत ठरतात. तरीही कादंबरीत आलेली पात्रे, त्यांचे स्वभाव, त्यांचे नात्यातील सहसंबंध ह्या आणि इतर गोष्टी समजण्यास पात्रांमधील संवाद अधिक साहाय्यभूत ठरतात. ह्यांच्यातील खटकेबाज; रोचक तसेच परिणामकारक संवाद कथानकाला पुढे नेण्यास मदत करतात, आणि त्याबरोबर पात्रा-पात्रांमधील सहसंबंध आकलन होण्यास अधिक मदत करतात. संवादाचे महत्त्व स्पष्ट करताना कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''मानवी मनामध्ये संवाद होऊ शकतो. एका व्यक्तीमनाचा अनुभव दुसऱ्या अनेक व्यक्तीमनामध्ये होऊ शकतो''[८५] हे मला वाटते. संवाद हा मानवी मनाचा मोठा आधार आहे.' संवाद ही दुहेरी चालणारी प्रक्रिया आहे. संवाद दोन्ही बाजूंनी चालू असेल तरच त्याला एकरूपता प्राप्त होते. एकेरी संवाद शक्य होत नाही. संवादशैली बदलण्याची अनेक कारणे असू शकतात. वयानुसार, सामाजिक परिस्थितीनुसार, काळानुसार, प्रदेशानुसार, विविध माध्यमांनुसार संवाद होत जातो. संवाद प्रभावी असतील तेवढी त्या विचारांची परिणामकारकता वाचकांवर होत असते. संवाद साधताना योग्य वेळी भाषेतील शब्द रचनेचा प्रभावी वापर लेखक आपल्या लेखनात प्रसंग घटनेनुसार करीत असतो.

भाषा व संवाद यांच्यातील संबंध सांगतांना हरिश्चंद्र थोरात म्हणतात, ''भाषा मूलत: संवादात्मक असते. मर्यादीत अर्थाने संवाद हा भाषिक देवाणघेवाणीचा फक्त एक प्रकार असला तरी व्यापक अर्थाने भाषिक देवाणघेवाणीचे प्रकार संवादात्मक असतात. भाषेचा उपयोग अशा अनेक क्षेत्रांच्या दुसऱ्याचे अस्तित्व गृहीत धरुन केलेला संवादच असतो.''[८६] कादंबरीमध्ये भाषिक संवादांना फार महत्वाचे स्थान आहे. येथील पात्रे खूपच बोलतात. ती स्वत:शी कमी बोलतात. यातील निवेदक हा कितीही लेखकाप्रमाणे वाटत असला तरी तरी तो लेखकच आहे, असे खात्रीने सांगता येईलच असे नाही. तो निवेदकच असतो. त्यामुळे लेखक व निवेदक या वेगवेगळया संज्ञा दिसतात. दैनंदिन व्यवहाराच्या वळणाची भाषा पात्रांच्या संवादासाठी उपयोगात आणलेली आहे.

**१.२.३.१. ययाति :**

ययाति जेव्हा देवदानवांचे युद्ध होऊ नये म्हणून अंगिरस ऋषींच्या मदतीला जातो त्यावेळी त्यांच्या आश्रमात एक छोटी ऋषी कन्या, कच व ययातिला एका फुलाजवळ घेऊन जाते. पण फूल एक व अतिथी दोन अशा वेळी हे फूल कोणाला दयावे असा तिला प्रश्न पडतो. त्यावेळचा ता संवाद अतिशय मार्मिक आहे. कच म्हणाला, ''बाळ हे फूल तू युवराजांना दे'' ययाति, ''अं

हं, यांनाच दे तू.  मोठे थोर ऋषी आहे ते हे!'' ती मुलगी अर्धवट उमललेली ती कळी खुडणार इतक्यात कचाने हळूच तिचा हात हातात घेतला आणि तो म्हणाला, ''बाळ तुझी ही सुंदर भेट मला पोहोचली पण ती तिथंच वेलीवर राहू दे. तिथचं उमलू दे. मी प्रत्येक दिवशी सकाळी इथं येईन. तुझ्या या फुलाशी बोलेन मग तर झालं?''

त्याच्या या शब्दांनी त्या मुलीचे समाधान झाले. पण ययाती मात्र अस्वस्थ होऊन गेला. त्या दिवशी रात्री बोलता-बोलता कचाजवळ हा विषय त्याने काढला ययाति म्हणाला ''ती कळी उद्या-परवा पूर्णपणे उमलेल, दोन-चार दिवस ते फूल वेलीवर हसत राहील. मग ते कोमेजेल, आपोआप गळून खाली पडेल हे सारं पाहण्यात कसलं आलय सुख? फुलं काय केवळ दुरून पाहायची असतात. ती तोडण्यात हुंगण्यात, त्यांचे हार करण्यात, ती केसांत गुंफण्यात आणि शय्येवर पसरण्यात खरा आनंद आहे.''

कच स्मित करीत उद्‌गारला,

'आनंद आहे खरा.  पण तो क्षणभंगुर! केवळ उपभोगाचा.' ययातिने विचारले,

'उपभोगात पाप आहे ?'

कच म्हणाला, 'नाही, धर्माचं उल्लंघन न करणाऱ्या उपभोगात पाप नाही; पण या जगात उपभोगापेक्षा श्रेष्ठ असा दुसरा आनंद आहे.'

ययातिने विचारले, 'कोणता?'

कच उत्तरला, 'त्यागाचा!'(पृ.५५)

ययातिला यतीची आठवण झाली. रानहत्तीची शिकार, त्याची विचित्र गुहा, काटेरी वेलींचे अंथरूण हे आठवल्याने ययातिने कचाला प्रश्न केला, 'या जगात संन्यास हाच एकच सुखाचा मार्ग आहे का?' पुढे तो हसला थोडा वेळ स्वस्थ बसला. त्याने पुन्हा प्रश्न केला, 'उद्या राजा व्हायचं सोडून, मी संन्यासी झालो, तर ते योग्य होईल?'

कच गंभीर झाला, तो आवेशाने उद्‌गारला, 'मुळीच नाही. युवराज. राजा होऊन प्रजेचं न्यायानं पालन करणं व प्रजेच्या सुखाकरिता झटणं हा तुमचा धर्म आहे राजधर्म हा सन्यासधर्माइतकाच श्रेष्ठ आहे.' ययातिला समजावण्यासाठी कच म्हणाला, 'युवराज, संसार करणं हीच मनुष्याची सहजप्रवृत्ती आहे, साहजिकच त्याच्या जीवनात सर्व प्रकारच्या उपभोगांना स्थान आहे. माणसानं उपभोग घेऊ नयेत अशी जर ईश्वराची इच्छा असती, त्यानं शरीर दिलंच नसतं पण केवळ उपभोग म्हणजे जीवन नव्हे. देवानं माणसाला शरीराप्रमाणं आत्माही दिला आहे.

शरीराच्या प्रत्येक वासनेला या आत्म्याचं बंधन हवं म्हणून माणसाचा आत्मा सदैव जागृत असायला हवा! मद्याच्या धुंदीत असणाऱ्या सारथ्याच्या हातून लगाम निसटून जातात. घोडे सैरावैरा उधळतात. रथ खोल दरीत पडून त्याचा चक्काचूर होतो आणि आतला शूर धनुर्धर व्यर्थ प्राणाला मुकतो.'(पृ.५५, ५६) कच आणि ययातिच्या संवादातून कचाच्या माध्यमातून लेखकाने समाजाचे उद्‌बोधन करण्याचा प्रयत्न केला आहे. क्षणिक सुखाच्या मोहाला बळी पडून चूकीचे कृत्य करू नका. आपल्या कृत्याला सद्‌सद्‌विवेकबुद्‌धीचा लगाम लावा म्हणजे आपला विनाश होणार नाही.

लेखकाने कादंबरीचा समारोप सुखांत केला आहे त्यावेळी देवयानी व शर्मिष्ठा यांचा चाललेला प्रेमळ संवाद, पुढील प्रमाणे-

ययाति अंथरूणावर बेशुद्‌ध अवस्थेत होता. रात्री काही क्षण ययातिला चांगली शुद्‌ध आली त्यावेळी त्याने दोघींचा संवाद ऐकला. शर्मिष्ठा ययातिचे पाय चेपीत बसली होती. तेव्हा देवयानी शर्मिष्ठेला म्हणाली, 'तू आता वारा घाल, मी पाय चुरीत बसते.'

शर्मिष्ठेने विचारले, 'ते का?'

देवयानी म्हणाली, 'पाय दाबून दाबून तुझे हात दुखू लागले असतील.'

शर्मिष्ठेने हसत उलट प्रश्न केला, 'वारा घालून हात दुखत नाहीत, वाटतं?'

देवयानी हसत उत्तरली, 'माझा एक हात दुखत असला, तर तुझे दोन्ही हात दुखत असतील.

उद्या लोक म्हणतील, 'पाहा, ही देवयानी सवतीला कशी वाईट वागवते, ते!'

'मी तुझ्याहून मोठी आहे. माझं ऐकायलाच हवं तुला. चल, हा घे पंखा.'(पृ.३९२)

मग दोघीही हसू लागल्या. दोघींचे मनमोकळे हसणे मिळून गेले; दोन नद्या मिळतात, तसे. देवयानीच्या मनात शर्मिष्ठेबद्‌दल असलेली मत्सराची भावना गेली आणि दोघी सवती असल्यातरी एकमेकींच्या सख्या बनल्या हे वरील संवादातून स्पष्ट होते. 'ययाति' या कादंबरीत ययाति-आई, ययाति-कच, ययाति-अंगिरस, ययाति-देवयानी, ययाति-शर्मिष्ठा, ययाति-माधव किंवा देवयानी-शर्मिष्ठा असे विविध संवाद आलेले आहे. कच, अंगिरस, माधव, यति यांच्याशी संवाद करताना त्यांनी ययाति समोर जे जीवनाविषयक तत्त्वज्ञान मांडले आहे ते सर्वच संवादातून मनाला भावते.

**१.२.३.२. रथचक्र :**

'रथचक्र' ह्या कादंबरीतील प्रमुख पात्रे 'ती' ह्या नायिकेच्या भोवती गुंफलेली आहेत. 'ती' आणि तिच्याशी नाते सांगणाऱ्या तिच्या कुटुंबातील व्यक्ती यांच्यातील परस्परसंवाद कादंबरीत

प्रसंगानुरूप मांडले आहेत. प्रस्तुत कादंबरीतील संवादातून बहुतांशी कौटुंबिक संघर्ष अनुभवास येतात.

‘‘चालवलांय काय तुम्ही?’’ मधलीनं तिला विचारलं.

तिनं लक्ष दिलं नाही. पुतण्याला हातानं ढवशीत ती बाजूला व्हायला सांगत होती. विनवणीच्या स्वरात ती म्हणाली,

‘‘मला दे ना थोडी जागा--’’

‘‘नॉऽऽही.’’

‘‘नाही म्हणजे काय? दिली पाहिजे.’’

‘‘बघ ना आई, काकू कसं करत्ये--’’

‘‘अहो पण--त्याला अशा ढकलता काय?’’

‘‘एवढासा मुलगा दंगा करतो आहे ते तुम्हांला दिसत नाही. मलाच ओरडता !’’

‘‘मी आधी बसलेला आहे.’’

‘‘होयच रे. उठू नको.’’

‘‘लहान मुलांना अशी फूस देता हे काही चांगलं नाही--’’

‘‘पण तुमचं काही अडलं आहे का? इथं कशाला आलात?’’

‘‘कशाला म्हणजे? मी कोणीच नाही वाटतं.?’’

‘‘ते स्वतःलाच विचारा--’’

‘‘काय विचारायचं? मला माहीत आहे-- तुम्ही सगळ्यांनी कट केलाय. काय तुमचं धोडं मारलं आहे तर अशा वागता?’’(पृ.२४, २५)

‘‘उगाच तोंड वाजवू नका. झोपाळ्यावर जाऊन बसा. इथं हवी तेवढी माणसं आहेत कामाला.’’

‘‘मी हलणार नाही. मला पण पानं मोजायची आहेत.’’ आणि ती पानं मोजू लागली.

‘‘तुम्ही उठा रे. पानं गोळा करायला जा.’’

मधलीनं सांगताच सगळी मुलं भुर्रकन निघून गेली. आता जावा-जावा पानं मोजीत होत्या. न बोलण्याचा जावांचा कट सुरू झाल्याचं लक्षात येताच ती बोलू लागली.

‘‘वाटणीच्या गोष्टीत माझं नाव गोवलायत हे कळलाय मला. खोटंनाटं काही पिकवलंत तरी देव पाहतो आहे.’’

''मुकाट्यानं पानं मोजायची असली तर मोजा. नाही तर चालायला लागा. तुमच्या तोंडाला तोंड देणं परवडायचं नाही.''

''माझं नाव त्यात का गोवलंत ते आधी सांगा. भावजी विषय काढीपर्यंत मला माहीतसुद्धा नव्हतं.--''

''तुम्हांला काय माहिती आहे आणि काय नाही, सगळं जगजाहीर आहे. मुलग्याला लखनौला पाठवायचंसुद्धा तुम्हांला माहीत नसेल-''

''त्यांना कॉऽऽही माहीत नाही. काही दिसत नाही. ऐकायला येत नाही.'' धाकटी जाऊ बोलली.(पृ.२४, २५)

थोडक्यात 'रथचक्र' या कादंबरीतील संवाद हे कौटुंबिक स्वरूपाचेच आहेत. त्यामध्ये आई-मुलगा, आई व मुलगी, 'ती' व तिच्या दिराशी होणारा संवाद, जावा-जावांचे व 'ती' चे संवाद इ. संवादांचा समावेश 'रथचक्र' मध्ये झाला आहे.

**१.२.३.३. स्वामी :**

'स्वामी' कादंबरीत  रमाबाई व माधवराव यांचे अनेक प्रेमळ संवाद मांडले आहेत त्यातील एक संवाद. जेवणानंतर रमाबाई माधवरावांसाठी गोविंदविडा घेऊन येत. परंतु माधवराव विडा घेण्यास नकार देतात. कारण विचारले असता आपण एकच विडा घेऊन येता. तुमच्यासाठीपण विडा घेऊन या. माधवरावांच्या आग्रहाखातर रमाबाईंनी दोन विडे आणले. माधवरावांनी एक विडा उचलला अन् ते म्हणाले, ''घ्या ना!''

लाजत रमाबाईंनी विडा घेतला.

पाहता पाहता रमाबाईंचे नाजुक ओठ रंगले.

माधवराव म्हणाले, ''अरे, वा! विडा रंगला, तर!''

''मग, विडा रंगतोच! आपला ही रंगला आहे.''

''विडा उगीच रंगत नाही!'' डोळे मिचकावीत माधवराव म्हणाले.

''म्हणजे? मी नाही समजले!''

''तुम्हाला माहीत नाही?''

''अंहं!''

''विडा रंगणे हा संकेत आहे. पतिपत्नीच्या उभयतांवरील प्रेमाखेरीज विडा रंगत नाही असं म्हणतात!''

''काहीतरीच तुमचं!''

''का पटत नाही? बोला ना?''

क्षणभर रमाबाईंनी माधवरावांना न्याहाळले आणि त्या म्हणाल्या, ''ते समजायला का विडा रंगावा लागतो?''(पृ.३५) अशा प्रकारचे प्रेमभाव व्यक्त करणारे अनेक संवाद प्रस्तुत कादंबरी साकारले आहेत.

**१.२.३.४. स्मरणगाथा :**

'स्मरणगाथा' या कादंबरीचा विस्तार मोठा आहे. लेखकाचे वास्तव्य कोकण, मुंबई, मराठवाडा, विदर्भ, अशा ठिकाणी होते. त्यांना भेटलेले लोकही वेगवेगळया बोलीभाषा असलेले होते. त्यामुळे लेखकाचा संवाद हा वेगवेगळया प्रान्तातील लोकांशी झाला. अनेक महान व्यक्तिंना भेटण्याचा, त्यांच्याशी संवाद साधण्याचा योग लेखकाला आला. त्यापैकीच एक सावरकर होते. खटाववाडीत 'लोकमान्य' दैनिक छापलं जात असे. त्याचे संपादक सावरकर होते. लेखक त्या प्रेसमधील वृत्तपत्राचे गठ्ठे सडकेवर न्यायला एजंटला मदत करीत होता. अचानक एके दिवशी एजंटने सांगितलं,

''रे, तुला मालकांनी बोलावलं आहे.''

आश्चर्यानं विचारले.

''मालक?''

''म्हंजे आपल्या छाप्याचे संपादक.''

लेखक दुपारी ऑफिसमध्ये जाऊन पोचलो. चार दोन टेबलांशेजारी वृत्तसंपादक बसले होते. शिपायानं विचारलं,

''कोन पायजे?''

''साहेबांनी बोलावलं आहे.''

नवलानं त्यान नाव पुसलं. सांगितल्यावर तो त्यांच्या खोलीत गेला, अन लगेच बाहेर आला, म्हणाला,

''जा आंत.''

लेखक आत गेला. गोरटेले, साधारण स्थूल असे सावरकर टेबलामागे बसले होते. टेबलावर खूप कागद होते. ते टाकानं भराभरा काही लिहीत होते. लेखक आत जाताच ते थांबले. त्यांच्याकडे रोखून पाहात ते म्हणाले,

''तूं काय प्रेसमध्ये असतोस झोपायला?''

''हो.''

''पाहाटास अंक विकतोस?''

''होय.''

''कुठला तू?''

''नागपूरचा.''

''वडील काय करतात?''

''मला आईवडील नाहीत.''

''नाव काय?''

''आत्माराम''

''सगळ सांग-''

''आत्माराम नीलकण्ठ दाण्डेकर.''

क्षणभर लेखकाकडे तीव्रतेने पाहात त्यांनी विचारलं, ''वडील केव्हा वारले?''

लेखकाने चाचरत उत्तर दिले, ''झाली-दोन वर्ष.''

कठोर होऊन त्यांनी म्हटलं, ''इकडे ये.''

लेखकाच्या सर्वांगातून जणूं मुंग्या धावून गेल्या. कसाबसा तो त्यांच्या पोहोचेत म्हणजे त्याच्याजवळ पोहचला. त्यांनी त्याचे बकूटधरीत विचारले, ''निळूदादाचा मुलगा ना तूं? पळून आलास ना घरून? अन् खोटारड्या, बेशरमासारखं वडील वारले म्हणून सांगतोस? अरे, अंबावहिनीला कळलं हे, तर ती तुला फाडून खाईल ना!'' त्यांनी शिपायाला हाक मारली अन् म्हणाले, ''याला नीट धरून आमच्या घरी पोचव. सोडूं नका म्हणावं. संध्याकाळी मी लवकर येतोच.''(पृ.११८, ११९)

वरील संवादातून असे लक्षात येते की लेखक सावरकरांबरोबर खोटे बोलले होते. निळूदादा लेखकाच्या वडिलांच्या परिचयाचेच नव्हे तर त्यांचे आप्त होते. याची बिचाऱ्या आत्मारामला मात्र कल्पनाच नव्हती. लेखकाचे पितळ उघडे पडले होते.

गोपाळला गाडगेबाबांसारख्या महान व्यक्तीचा सहवास लाभला. आळंदीला गाडगेबाबांच्या धर्मशाळेत बाबा, गोपाळ व गोपाळचे साथीदार यांना राहण्याचा योग आला.

गाडगेबाबांच्या कीर्तनात गोपाळने टाळ वाजवले. कीर्तन संपल्यावर बाबा एका झाडाखाली बसले होते. तेथे गोपाळ पोहचला त्याने बाबांना लांबूनच नमस्कार केला.  बाबा हसले आणि म्हणाले,

''गोपाळ महाराज हायेत काय? उभे काहून? बसा ना!''

गोपाळ अदबीने बसला. बाबा म्हणाले,

''झाडणं जमलं काय?''

''जी!''

''मग सांगा आता-काय घेऊन आले?''

गोपाळने महानंदस्वामींच्या मुलांबरोबर वरवंडीला राहिलो, हे सगळं सांगितलं. बाबांनी विचारलं,

''मग आता काय विचार आहे?''

गोपाळने धीर धरुन म्हटले, ''या आठदहा महिन्यांत एक गोष्ट ध्यानी आली बाबा!''

''कोनती?''

''हीच की आपल्याला काही कळत नाही!''

बाबा हांसले आणि म्हणाले, ''मग मुद्याची गोठ आली जी तुमच्या ध्यानी!''(पृ.२१०)

क्षणभर थांबून ते म्हणाले, ''कळायचा रस्ता मालुम आहे काय बाबू तुले? देवानं हे इतलं मोठ पुस्तक आपल्यासाठी लेहेलं थे  वाचीत मस्त हिंडाव्''

''मीही तेच म्हणतो बाबा!''

''थेच मन्ता काय? चालाचालूं लागा. येक्या जागीं राहूं नोका. कोठीसाही काम केल्याबिगर खाऊ नोका. कोनाचंही कामं करावं. झाडून काढावं. लाकडं फोडाव्.  खुरपाव्. मग कोनीही खायाले घालते. मस्त कीर्तन कराव्. कोनापासून काई घेऊ नोय्. येक्या घरी जेऊं नोय्. कोनाच्या घरी राहूं नोय्. मस्त जंगलात झोपाव्.''

''ज्याच्या मनांत आशा नाई, थो जगाचा राजा. ज्याच्या मनांत आशामनसा, त्याच्यासारखा दुखी कोनी नाही. अशे निरास होऊन मस्त हिंडा.''

''येक गोठ तुमाले सांगून ठेवतो. कबिरचा पुरावा आहे-

ऐसी बात बोलिये कोई न बोले झूट।

ऐसे जगह बैठिये, कोई न बोले ऊठ।।''

''का कोनी असं म्हनल् का बोआ अथून ऊठ, अशा जागी बश्याचं मनांत आनूं नोका. मंग कहीसा निंघता?'' गोपाळच्या मनात आशा होती, की आठपंधरा दिवस बाबा आपल्याबरोबर हिंडवतील. गोपाळ म्हणाला,

''तुम्हासंगें हिंडलो असतो थोडे दिवस-''

पण बाबांनी तत्क्षणी म्हटलं.

''आम्हासंगे? नाई. येकले हिंडा. भिता काय येकले हिंड्याले?''

''नाही-''

''मंग चला, चालू लागा-''(पृ.२१०, २११)

उपरोक्त संवाद हा गाडगेबाबा व लेखक यांच्यामधील आहे. या संवादात गाडगेबाबांनी गोपाळला उपदेश केला आहे, जो वाचकांनाही उपकृत करतो. गाडगेबाबा लेखकाबरोबर संवाद साधताना आपल्या नेहमीच्याच शैलीचा-प्रश्नांचा वापर करतात. वरील दोन संवाद उदाहरणादाखल येथे घेण्यात आले आहेत. जे संवाद लेखकाच्यादृष्टीने महान व्यक्तिंबरोबर व जीवनाला कलाटणी मिळणारे व बरेच काही शिकवून जाणारे आहेत. तसेच प्रस्तुत कादंबरीतील एकुणच संवादातून गाडगेबाबा समाज परिवर्तनाचा विचार देताना दिसतात.

**१.२.३.५. सत्तांतर :**

'सत्तांतर' मधील संवादाच्या संदर्भात माडगूळकर सत्तांतर कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हणतात, ''संवादाशिवाय सर्व निवेदन करण्यामागेही मानवी आरोप नको, हाच हेतू होता. वानरांचे हावभाव आणि हालचाली फार बोलक्या असतात. शिवाय नाना आवाज काढूनही ते आपले म्हणणे दुसऱ्या वानरांपर्यंत आणि पर्यायाने जंगलातील प्राण्यापर्यंत पोहचवतात. वाघ, बिबळ्या, रानकुत्रे किंवा शिकारी दिसताच हुप्या 'खकर्र ऽऽ खक् ऽऽ- 'खकर्र ऽऽ खक् ऽऽ' असा विशिष्ट आवाज करतो, हे मी अनेकदा ऐकले आहे. पक्षी आणि वन्यप्राणी कोणत्या शारीरिक हालचालीतून आणि कोणते आवाज काढून परस्परांशी इतरांशी बोलतात, याचे अल्पसे ज्ञान मी करून घेतले आहे.''[८७] सत्तांतर साकारताना माडगूळकरांनी या ज्ञानाचा उपयोग कादंबरीतील कथानक, निवेदन, संवादाशिवाय प्रवाही ठेवण्याचे महत्त्वाचे काम केले आहे. हावभाव, आवाजातील चढउतार, विशिष्ट आवाज, विशिष्ट कृती या सर्वांमधून वानरांमध्ये एक प्रकारचा प्रभावी मुकसंवाद संपूर्ण कादंबरीत वानरांमध्ये व एकूणच प्राणी विश्वात चाललेला दिसून येतो.

उदाहाणार्थ, मधमाशा, डास, भुगे यांचं समूहगान तेवढं चालू होतं. ‘एका नरान तोंड वर करून ‘हुपऽ हुपऽ’ असा जोरदार आवाज केला. त्यांन भुपकार करून फांद्या हलवल्या.’(पृ.१) ‘गुरुगुराट केला. करकरा दात चावले. ‘समोरासमोर बसून एकमेकांच्या अंगावर खेकस, चापट्या हाण, केस धरून ओढ असा एकच गदारोळ सुरू झाला.’ तान्ही पोर पोटाशी धरून वानरी कडा कडा भांडत राहिल्या. रागांना भुई बडवत एकमेकींना वेडावु लागल्या.’ ‘पळापळी, खेकसा खेकसी चालू राहिली.’(पृ.१७) दोन टोळ्यांमधील भांडणे व त्यातील हावभाव कृतीतून हे सर्व मुक संवादातून साकार होताना दिसते.

मोगा आणि तरणी यांच्यातील कृतीयुक्त, अभिनययुक्त, हावभावयुक्त मुक्त संवाद पुढीलप्रमाणे, ‘‘हलक्या आवाजात हा स्वतःशीच रागांनं बडबडत बसलेला बघून तरणी हळूच उठून जवळ आली. त्याच्या पाठीचे केस पाहण्यासाठी वाकली पण मोगान तिला अंगाला हात लावू दिला नाही. तिन नेटाने प्रयत्न चालू ठेवला तेव्हा तोंडाचा 'आँ‘ करून त्यांन तिला धाक दाखवला. मग मात्र ती गप्प झाली, दूर सरकली. हा पुन्हा बडबडायला लागला. दात खायला लागला. मोठ्या फांदीवर इकडून तिकडे येरझारा घालायला लागला आणि रोखून रोखून आठी दिशांना बघत राहिला. नंतर एका जागी बसला. त्याचा चेहरा फार संतापलेला दिसायला लागला. जोरजोराने त्यांन दोनदा 'हुप ऽऽ हुप ऽऽ’ असा आवाज केला.(पृ.४८) अशा प्रकारचा कादंबरीत संवाद आलेला दिसून येतो. अशा प्रकारे कृती, अभिनय, हावभाव यांतून प्राणी संवाद साधताना दिसतात.

**१.२.३.६. झोंबी :**

‘झोंबी’ ही आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. त्यामुळे या कादंबरीतील संवाद हे प्रामुख्याने कौटुंबिक संवाद आहेत. त्याचबरोबर आनंद व त्याचे मित्र, आनंद व त्याचे शिक्षक त्यांच्यातील संवाद प्रसंगानुरूप कादंबरीत आले आहेत. आनंदाला शिक्षणाची ओढ होती आणि वडील त्याने शिकण्यापेक्षा शेतात काबाडकष्ट करावेत या विचारांचे होते. वडील त्याला शेतात सक्तीने पाठवीत होते. त्याने सातवीत प्रवेश घेतला. पण सकाळी उठून शेतात जाऊन दुपारपर्यंत शेताला पाणी द्यावे लागत होते. दुपारनंतर आनंद धावतपळत कसाबसा शाळेत पोहचत होता. असाच एकदा जीवाच्या आकांताने पळून आनंद शाळेत पोहोचला वर्गात हेडमास्तर गणित समजून देत होते. उशिरा आलेल्या आनंदकडे पाहून मास्तर उपरोधिकपणे म्हणाले,‘‘या, या; किती वाजले? स्वागत करावं का तुमचं पायघड्या घालून?’’(पृ.२००) तेव्हा मात्र लेखकाला दुःख अनावर झाले ते हुंदके देऊन

रडू लागले. तेव्हा आनंदचा मित्र मधुकर सणगर की ज्याला आनंदची परिस्थिती माहीत होती. तो मास्तरांना म्हणाला, ''मास्तर, त्याच्या घरची परिस्थिती फार बिकट आहे. आत्ता तो शेतावर सकाळपासनं जाऊन कामं करून आलाय त्याचे वडील त्याला नको म्हणतानाही तो शिकतोय.'

मास्तरांचा आवाज एकदम बदलला

''मला माहिती आहे ते. जकाते नावाचाच हा मुलगा ना?'' ''हो''

''खरचं जकाते, तुझं स्वागतच केलं पाहिजे. तुझ्याविषयी मला सगळं कळलं आहे. कितीही उशीर झाला तुला शाळेला यायला तरी येत जा... संध्याकाळचे चार वाजले असले तरी चालतील, पण शीक, ध्येयाची पूर्तता कर.''(पृ.२००) वरील संवादातून आनंदाच्या जीवनातील तो प्रेरणादायी क्षण होता असे वाटते. आनंदाची शिक्षणासाठी स्वतःची स्वतःच्या जीवनाशी चाललेली झोंबी व त्यात हेडमास्तरांसारखे काही प्रेरक लोक त्याच्या जीवनात आले त्यामुळे त्याला शिक्षणाचे ध्येय गाठण्यास बळ मिळाले. शिक्षणातील अडसर, काटेकुटे पार करत आनंदचे सातवी पर्यंतचे शिक्षण कसे बसे पुर्ण झाले. त्यानंतर शिकण्याची आशा संपली होती. वेळ मिळाला की कथा-कादंबऱ्या वाचणे, कविता करण्याचा छंद आनंदने जोपासला होता. आनंदला लग्नाच्या बेडीत अडकून टाकावे म्हणजे शिक्षण बंद होऊन तो संसाराला लागेल असा त्याच्या आई-वडिलांचा विचार होता. तेव्हा आनंदच्या आई-वडिलांचा संवाद पुढील प्रमाणे होता.

''आन्दूच्या डोसक्यातनं शाळंचं खूळ काय जाईत न्हाई असं दिसतंय. सारखा चिन्नभिन्न झाल्यासारखा असतोय. नुसती पुस्तक वाचत बसतंय काय करावं ह्या पोराचं मला काय कळंना झालंय. ''त्येचं मन मळ्यात लागत न्हाई नि हातातनं पुस्तक सुटत न्हाई.''

''रातचं घरात तरी नीट वस्तीला असतोय का गं?''

''ते कुठलं? मळ्याकडनं घरात आला की बूडसुदीक भुईला टेकत न्हाई च्या प्याला की गल्लीत पळतोय. शाळंच्या पोरांत जाऊन बसतोय.''

''काय करायचं आता ह्या पोराला? मला वाटलं; आता त्याच्या मनातनं शाळचं खूळ गेलं असंल.''

''त्येचं लगीन करून टाकावं!''

''मग काय हुईल?''

''बायकूच्या निमतानं घर नि मळा धरून ऱ्हाईल तरी वयानबी तो आता ल्हानगा न्हाई. रानामाळातनं कुणाबुणाच्या पोरी हिंडत्यात. एखाद्या वक्ती त्यांच्या कळी काढत ह्यो हिंडायला लागंल.''(पृ.२३०) वरील संवाद रतनू आणि तारा यांच्यातील आहे. आनंदच्या आई-वडिलांमध्ये सुसंवाद हा आढळत नाही नेहमी ताराला शिव्याच मिळतं परंतु वरील संवाद हा फक्त संवाद नाही तर सुसंवाद आहे.

**१.२.३.७. झाडाझडती :**

जिल्हा अधिकारी अनिल देशमुख यांनी जांभळी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या गावी भेट देऊन त्यांच्या सर्व अडीअडचणी समजून घेतल्या. धरणग्रस्तांसाठी बांधलेल्या शाळेच्या आणि समाजमंदिराच्या कामाबद्दल अनेक तक्रारी केल्या होत्या. म्हणून देशमुख साहेबांनी कार्यकारी अभियंत्यांना विचारलं,

''सोनार, कुणाला कंत्राट दिलं होतं कामाचं?''

''धरणग्रस्ताला दिलं होतं, साहेब.''

''नाव घ्याकी त्येचं.'' पाठामागून बाबू ओरडला.

''तायाप्पा धर्माप्पा कांबळे.''

''म्हणजे मघाचा तोऽ?'' साहेबांना आश्चर्य वाटलं.

आपल नाव निघाल्याबरोबर कोपऱ्यात रंजीस तोंडानं बसलेला ताया कांबळे कावराबावरा होऊन उभा राहिला. म्हाकू भोसला विचारू लागला,

''सायेब, ह्यो खरा कंत्राटदार असंल असं वाटतं का तुमाला? हयो फक्त नावाचा धनी. ''

''मग कोण आहे खरा?''

''मी सांगतो, कंत्राटदार तोच आहे.'' दत्तू उठून बोलू लागला,

''त्याला पैशाअडक्याची मदत लागली तर ती करतो मी.''

''ते कळले काय काढलेत कंत्राटदार शोधून?'' साहेब

''साहेब, पुन्हा एकदा बघून घ्या ती कामं.'' म्हाकू उठून बोलला.

''पाहिलीत नं मघाशी?''

''बाहेरनं बाहेरनं बघितलीत, साहेब जरा आतनं बघा की. मगं कळंल सरकारी पैशाची कशी खाली वाट लागली ती! आमचंबी कसं वाटोळं हुतं ते!''(पृ.३१६) त्यानंतर साहेबांनी आतून

काम बघितली फरशी खाली सिमेंट, वाळूच नव्हती मातीवर फरशी बसवली होती सागवानी तुळया बसवल्या असे दाखवून भरमसाठ बिलं वसूल केली. प्रत्यक्षात जांभळीचे लाकूड वापरले.

वरील संवादातून असे लक्षात येते की, विविध शासकीय योजनांमध्ये ती योजना प्रत्यक्ष उपभोगत्यापर्यंत येताना कसा भ्रष्टाचार होतो. शासनाची मदत कंत्राटदार व भ्रष्ट अधिकारी वर्ग यांच्यातच वाटला जातो. उपभोगत्यांच्या तोंडाला फक्त पानेच पुसली जातात. जांभळीकर धरणग्रस्तांना अनेक वर्षे पडीक असलेल्या जमिनी खैरापूरला मिळाल्या. पण पदरी पडले आणि पावन झाले असे समजून त्यांनी अंग झाडून कामाला सुरूवात केली. आवडाई व हैबतीला राघू भिवाचे पडकं बाभळीनं भरलेलं रान पेरणी योग्य केले. राघू भिवा घोडयावरून एखादया राजासारखा आला आणि त्या रानाकडं बघू लागला. तेव्हा हैबती, राघू भिवा व आवडाई यांच्यातील संवाद लेखकाने रेखाटला आहे.

''कोण? मालक वाटतं?''

''बरी वळख लागली.'' राघू भिवा गुरगुरला.

''आधी बघितलं नव्हतं तुमास्नी. ताब्याच्या वेळेला तुमी गावात नव्हता. त्ये बघूनच तू ताबा घेतलास पोरा. तुमा धरणग्रस्तांच्या अंगात लै किडाऽ! जात बेरकी उसातल्या कोल्यावानीऽ!''

राघू भिवानं घोडयावरच सुपारी कातरली आणि दाढंखाली धरली. हैबती भांबावल्यागत गपगार उभाच. राघू भिवानं पुन्हा तोंड उघडलं.

''तुमा उचल्यास्नी माणसं न्हाय वळकायची. इकडच्या जमनी दाबल्या की डोळयांवर धूर चढतू तुमच्या.''

''तस न्हाई मालक. कबजाच्या वक्ताला तुमी गावातच नव्हता.'' हैबती चाचरत बोलला.

''कसा असंन? एक काम लावलंत का सरकारांनी? त्येंच्यासंग दिल्लीतच तळ ठोकलाता दोन म्हैनं. कारखान्याच्या मंजुरीसाठी. मंजुरी घेतली तवाच दिल्ली सोडली.''

हैबती गरीब आवाजात बोलला, ''मालक, तुमच्या आशार्वादाने जमीन करायची म्हणतुया. ध्यान असुदे गरिबावर.''

''ग्वॉड बोलून काळीज कापू नगो पोराऽ'' राघू भिवा कडाडला, ''सरकारासंग दिल्लीत हुतो. न्हायतर कोन कबजा देतुया आन कोण घेतुया तेबी बघितलं असतं. तंगडीच फासटली असती पार खुब्यापासनं.''

''असं का बोलतासा दादा?'' आवडाई पसरुन गयावया करीत बोलली. ''तुमीबी लेकराबाळाचं धनी हायसा. धरणात रान-गाव उठल्यावर आमीतरी कुठं जायाचं?''

''त्येच म्हनतोय मी. माजी सोडून दुसऱ्याची जमीन घ्याची हुती तुमी.''

''परतेकजण असंच म्हनतंया. आमी कुठं जायाचं?''

''मग? आमी तरी कुठं जाऊ? पोटाला दोन पोरं. पांडा नि धोंडा खात्यावर एकंदर जमीन नुसती पंधरा एकर पर येळंत दोन खाती झाली न्हाईत म्हणून सरकारनं गळा धरला. कुठं जायाचं आमी? तू कर चार दिवस शेती. जमीन तरी चांगली ऱ्हाईल माजी. पर धेनात ठेव राघू भिवाची जमीन हाय ही. ठोकलाय सरकारकडं अरज. बघू त्यांच्या पध्दतीनं काय होतंय. न्हाय तर आमचा गावठी हिसका हायच की.''

''अस का वं बोलता, दादा?'' आवडाईचं डोळ पाणावलं.

''त्येच सांगतुया नीट ऱ्हावा.''

राघू भिवाची दमाची रोखठोख भाषा ऐकून हैबतीचं पाय गळालं. आवडाईलाही ते सहन झालं. नाही. हात जोडून ती बोलली, ''येऽ दादा, आमी गरीब मान्सं. तुमच्या सावलीत चार घास खाऊ देत आमाला.''

''गरिबांच्या ढेंगतच दहा मण मांदं असतं पर लै दिवस पचू देणार न्हाय मी.''(पृ.२१३, २१४)असे बोलून राघू भिवा निघून गेला. आवडाईची अवस्था मुळ्या तुटून बांदावर पडलेल्या झाडासारखी झाली होती. हैबतीतर पुरता खचून गेला होता, हे वरील संवादातून व्यक्त होते.

**१.२.३.८. राघववेळ :**

'राघववेळ' मधील संवाद अतिशय कमी शब्दांचे, छोट्या वाक्यांचे, समजण्यास साधे-सोपे आहेत. लक्ष्मणच्या बायकोचे मीराचे अवघडलेले बाळंतपण करण्यासाठी वालंबीला बोलविण्यासाठी नारायण कुटे दिवस उजडायच्या अगोदर वालंबीच्या घरी येतो. त्यावेळी त्या दोघांमधील संवाद, नारायण म्हणतो, ''उठली का वालंबे.'' ''हो, काय म्हंता?'' ''घरालोक चाला लागता तुले.'' ''काय काम हृचे?'' ''लक्ष्मणच्या बायकोचं पोटं दुखून ऱ्हायलं.'' ''कव्हापसून?'' ''घंटाक झाला आसन.''(पृ.२०१) वालंबी गावात बाळंतपण करण्यासाठी सुईन म्हणून प्रसिद्ध होती. अवघडलेली बाई ती आपल्या कौशल्याने मोकळी करते. वरील संवादातून त्याची सूचकता आपणास प्रत्ययाला येते. अतिशय कमी शब्दात प्रभावी संवाद आहे.

रघूच्या धाकट्या भावाला सितारामला वारंवार ताप येत होता. मध्यंतरीच्या चार–सहा दिवसात त्याला आराम पडला, पण परत त्याला ताप येऊ लागला. हे पायरुला समजल्यावर तो वालंबीकडे आला. सितारामच्या अंगाला हात लावून बघितले. तो वालंबीबरोबर बोलू लागला.

''बराच ताप ह्ये.''

''हो न, काही केल्या ऱ्हायना. तरी बी इंजक्षण, गोळया देल्या.''

''जेर गीर तर नाही निंघत?''

''काय सांगाव माय?''

''दगडू बापूले दाखोलं नाही का?''

''नाही.''

''त्याला दाखवून पाहा लागत व्हतं न.''

''पाहा लागन.''

''मीच सांगतो त्याले.''(पृ.९५)

ह्या संवादातून पायरुची आपल्या भावाच्या कुटुंबाविषयी काळजी दिसून येते. तसेच दगडू बापूकडून उद्या म्हाताऱ्याला दोरा घालायला तो लावणार होता. घाबरला असेल तर दोऱ्याने फरक पडेल, अशी त्यांची समजूत होती. पायरु भोळाभाबडा असून, त्याच्यातील आणि एकुणच मातंग समाजातील अंधश्रद्धा बळकट रुतून बसलेली दिसते. शिवाय आपल्या भावाच्या कुटुंबाविषयीची आपुलकी, भावाच्या आजारी मुलाविषयी प्रेम वरील संवादातून दिसून येते. छोटी पण अर्थपूर्ण संवाद रचना हे 'राघववेळ'चे यश आहे.

**१.२.३.९. ताम्रपट :**

तुकाराम भोईटे सीताबाईंच्या पडळीवर राहायला होता. तेथे त्याला शिक्षणासाठी ठेवले होते. वाचनाची आवड असल्यान वर्तमानपत्र वाचायचा त्याच्यावर राष्ट्रवादी, काँग्रेसवादी विचारांचा पगडा होता. नानांबरोबर तो स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी झाला होता. देशमुख हवालदार सीताआजीच्या पडळीवर येऊन गेला होता. ही खबर तुकारामाच्या मित्राने त्याला दिली त्यानंतर पंधरा दिवस होऊन गेले तरी पोलिसाची चौकात वाट पाहूनही गाठ पडली नाही. पंधरा दिवसानंतर भेट झाल्यानंतर जो संवाद दोघांमध्ये झाला तो पुढीलप्रमाणे–

''आवो बदली झाली व्हती'' देशमुख पोलीस म्हणाला,

''बदली? तुमची? कुठं?''

''नाशिकला''

''मग?''

''क्यान्सल करुन घेतली.''

''इतके स्ट्रांग कानट्र्याक्ट? फारच मर्जी बुवा गोऱ्या सरकारची तुमच्यावर.''

''समंद ठिवावे लागतेत.''

''सहज आले होते?''

''कुठं? पडळीवर ना? हां सयजच म्हनलं, पघू भोयटे-पाटलांची पडळी.''

''का? तुम्हाला माहीत नाही जशी काय! आणि माझी थोडीच आहे ती? ती सीताआजीची पडळी. तुम्ही येऊनं गेलात तर म्हातारीनी किती आरडाओरडा केला, माहिती आहे?''

''मीच पळून आलो. लईच अस्सल म्हातारी!'' देशमुख हसला.

''सहज आलते?''

''हा. सहजच- चला चालता चालता बोलू''

''का?''

''चाला की राव! का काय नाष्ट्याबिष्टा करायचा?''

''नाही, तसं नाही. चला.''

दोघेही उठले आणि चालत निघाले. देशमुख 'सीआयडी' कडे होता. तालुक्यापासून जवळचं त्याचं गाव होतं. चौथी पास होऊन पोलिसात शिरला होता.

''नाशिकला तसं लांब नव्हतं-आमचा पुतन्या तिथंच आस्तोय.''

''काय करतो?''

''शिकायलाच हाये. लय हुश्शार. पयलेपसून कायम पहयला नंबर. खालचा नंबर मायतीच नाही की राव! तुमच्याच वयीचा येईन. तुम्ही पन नाशकाला का नायी जात भोईटे-पाटील? कशाला ह्या झंगटीत पडता? ही आपल्यासारक्यांची कामं नायीत.''

''कसली झंगट? मी कुठं काय करतो?''

''तुमचं समदं आम्हाला माहीत आनी आमचं तुम्हाला; भोईटे-पाटील. आम्हाला तुमच्याबद्दल लोभ कशासाठी तं तुम्ही आमचे मान्सं-म्हंजे स्पष्ट बोलतो, त्याच्यात कायी चुकत आसन त माफी आसुंद्या-पन आपन सेतकरी मऱ्हाटे लोकं. ह्या बामनांच्या भानगडीत आपन लोकांनी पडून कायी उपेग नायी भोईटे-पाटील! ह्या लोकांच्या नादानी कधी कोन्हाचं भलं

झाल्यालं नायी. लय खराब जात. म्हंजी काळे ढवळे समदीकं आस्तेत. ह्यो भास्करराव वकिलाचा पोऱ्या. बरा मानूस पन एकून काय खरं नायी. आन् हे उद्योग आपल्या सारक्यांला परवडनारे नायीत. आपन शिकाया पायजे.''(पृ.१९, २०) वरील संवादातून बदली रद्द करण्यासाठी गोऱ्या सरकारची मर्जी सांभाळावी लागते हे समजते. तसेच आपण मराठी माणूस म्हणून मला तुमच्याबद्दल प्रेम आहे, तुम्ही हया झंगटीत पडू नका मला तुमच्या कार्याबद्दल आदर आहे पण पोटासाठी प्रपंचासाठी हे करावे लागते. तसेच ब्राह्मण-मराठा फरक स्पष्ट केला असे दिसते.

**१.२.३.१०. तणकट :**

बाळासाहेब शेडबाळेने गावात महार समाजासाठी पतसंस्था सुरू केली होती. त्याने गोपाळ, गोंदबा, भैरु कांबळै, गौतम कांबळे, पंढऱ्या यांच्या नावावर साधारणतः चाळीस ते वीस हजारापर्यंत कर्ज घेतले व पसार झाला. या घटनेने महारवाड्यातील लोक आवाक झाले होते. त्यावेळी कबीर आणि पंढऱ्या यांच्यातील संवाद पुढीलप्रमाणे

''पंढऱ्याऽऽ नेमकं काय चाललंय म्हारोडयात?''

''तुज्या कानावर आलं आसंलच की सगळं. तू म्हणतास तव्वाच ऐकाय पायजे व्हतं. कळालं न्हाई तवा.''

''मागचं बोलू नको. आत्तचं सांग. कबीरनं स्वतःला आवरलं पण आवाज करडा झालाच नाकाच्या पाळा फुलल्या.''

''पतसंस्थेत वीस जणांच्या नावावर कर्ज काढलंय आणि त्याच्या बँकेत पंधरा जणांच्या नावावर कर्ज उचललंय.''

''पतसंस्थेचं रेकॉर्ड कुणाकडं हाय?''

''ते जप्त करून न्हेलंय. शेडबाळ्यानं गाव सोडल्यावर, बनसोड्यानं कुठल्या आपीसात अर्ज करू न्यायला लावलं म्हण.''

''बनसोड्या पतसंस्थेत सभासद होता?''

''त्येला संचालकबी केलतं. त्येनंच पोलिसात कळीवलंय म्हण.''

''कोण म्हणालतं?''

''गोपाळतात्या आनी मी त्येच्याकडं गेलतावं. उलट आमालाच दम दिला. अलतापनं तर तात्याच्या कानसुलात मारलं. जास्त काय बोललास तर ठार मारीन म्हणाला.''

''आनी गौत्या कुठं हाय?''

''दोन दिवसापास्नं बेपत्ता हाय. घरात यायलाच न्हाई.'' पंढऱ्याच्या डोळ्यातून टिपं गळाय लागली.

''मग आता काय ठरलंय तुमचं?''

''तू म्हणशील तस्सं.''

''आता मी काय करणार?''(पृ.२२७)

''कायबी. जे सुचंल ते. ह्यात तू पडल्याबिगार धड व्हणार न्हाई. न्हाय तर म्हारोडा जगत न्हाई.''(पृ.२२८)

वरील संवादातून शेडबाळेने लोकांच्या केलेल्या फसवणूकीचा उलगडा झाला व पंढऱ्याने कबीरवर विश्वास टाकून वाचविण्याचे साकडे घातलेले समजते.

बाळासाहेब शेडबाळे व गौतम कांबळे यांच्यातील संवाद–

''गौतम, आता लईच वडातान व्हायालीया.''

''कशाची?'' गौत्यानं न कळून विचारलं.

''हेच की रंऽऽ त्या केसला पैसे, हया केसला पैसे, त्यात धान्य दुकान मंजुरीला पैसे, पतसंस्था मंजूर कराय पैसे गेलं ते वेगळचं. घरचा खर्च. पुन्हा म्हारोडयातला खर्च. सगळीकडनं भलताच आत आलोय.''

''सायेब, एवढा खर्च कसा काय सोसला कुणास धक्कल पण आता काय तरी मार्ग काढा. तुमी तरी किती पदरमोड करणार. त्येला काय परमाण हाय का काय?''

''त्येच म्हणतोय रं मी.''

''मग काढा की मार्ग. पैसे गोळा करू या.''

''गोळा कराय लागत नाहीत. गौतम, अस केलं तर...''

''कस?''

''समाजाच्या कामासाठी लागणाऱ्या पैशाला आपण आपल्याच पतसंस्थेतनं कर्जापोटी. पैसे उचल करूया मागनं आपल्याला जमतील तसे भरत जाऊ या. नाही तरी डी. डी. सी. कडनं आपण कर्ज घेतोयच. तीच फिरवाफिरवबी दिसंल.''

''मग काढा की अनमान का. म्हारोडयातल्या कुणाचाबी आंगठा आणून देतो. न्हाई कोण म्हणतोय?''

''नाही कोण म्हणंल खरे, ते मनाला बरं वाटेना झालंय रंऽऽ काय अस करू? एक एकर माझी जमीन इकून टाकू?''

''सायेब, खुळं का काय? जमीन इकायची न्हाई आनी काय न्हाई, उदया सगळया म्हारोडयाचं आंगठं तुमाला खुशीनं आणून देतो.''

''काय कळंना गडया.''

''कळायचं बिळायचं सोडा. ते माझ मी बगतो. ते पतसंस्थेत कसं करायचं तेवढं सांगा तुमी.''(पृ.१८३, १८४) म्हणत गौत्या उठला. पाठोपाठ शेडबाळया. त्याला अंधारातही उजेड असल्यागत दिसत होतं...

वरील संवादामधून बाळासाहेब शेडबाळे ने गौतम कांबळेला नियोजनपूर्वक फसविले. महार समाजाच्या कल्याणासाठी स्वतःची शेती विकण्याची तयारी असल्याचे भासविले. गौतम कांबळे सारखा अर्धवट शिकलेला व सारासार विचार करण्याची बुध्दी नसलेला तरूणाला शेडबाळेने आपल्या जाळयात ओढले व महार वाडयातील बऱ्याच लोकांचे फसवून कर्ज प्रकरणांवर आंगठे घेतले.

**१.२.३.११. डांगोरा एका नगरीचा :**

साईखेड संस्थानातील सच्चे, प्रामाणिक, सज्जन गृहस्थांना एका पाठोपाठ अटक होते, त्यावेळी देसाईंचा निष्ठावंत पंढरी सुमंत सरांकडे जातो. त्यावेळी ते त्यांच्याकडे पाहत म्हणाले,

''तेच सांगायला आलायस ना? लागली खबर''

''आता काय बोलू? असं त्याला झालं.''

''भाईकाका कुठं आहेत, आहे ठाऊक?''

''नाही. त्यांना जाऊन दीड महिना झाला. पत्र नाही, चिठ्ठी नाही.''

''तू लिहिशील त्यांना?''

''ते एके ठिकाणीच थोडेच राहतात.''

''मग काय करशील?''

''तेच विचारायला आलो...''

''मी काय डोंबलं सांगणार...?'' अशा प्रकारचे आटोपशीर संवाद संपूर्ण कादंबरीत आलेले दिसतात. संवादामध्ये एक प्रकारचा प्रभावीपणा विशेष करुन जाणवतो. संवादाच्या भाषेमध्ये अनेक हिंदी-इंग्रजी भाषेचा प्रसंगानुरुप वापर केलेला आहे.

### १.२.३.१२. बारोमास :

'बारोमास' ही कादंबरी दारिद्रयात जीवन कंठणाऱ्या शेतकरी कुटुंबाची कथा आहे. त्यामुळे कादंबरीतील संवाद हे प्रामुख्याने कौटुंबिक संवाद आहेत. एकनाथ व अलका या पती-पत्नीचे वादविवादात्मक संवाद एकनाथ व सुभानराव यांच्यातील शेतीत कोणते पीक घ्यायचे याविषयावरील चर्चा किंवा बळीमामासारखा शेतकरी व तलाठी यांच्यातील संवाद. शेवंतामाय आपल्या मुलाच्या नोकरी संबंधी तळमळताना होणारा संवाद किंवा हिच शेवंतामाय आपल्याला नातू नाही याविषयी व्यथा मांडतानाचा संवाद. मधू आणि त्याची सोनेरी टोळी यांच्यातील संवाद. तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि शेती या विषयातील तज्ञांशी संवाद. अशाप्रकारचे मुख्य संवाद 'बारोमास' या कादंबरीत लेखकाने मांडले आहेत.

एकनाथ, त्याचे वडील सुभानराव व आई शेवंतामाय यांच्यातील संवाद. अलकाने ओले सरपण असल्याची तक्रार एकनाथजवळ केली. तेव्हा एकनाथने तिला स्वयंपाकासाठी वेळू काढून दिले. शेवंतामाईने येळवावर स्वयंपाक केला म्हणून आकांडतांडव केले. जेवणाच्या वेळी त्यांच्यातील संवाद पुढे मांडला आहे.

''इठ्ठलाले म्हन्ल. आज येळवावर सयपाक झाला. त्योच खायाले लागले तुमी.'' बाहेरच्या ओसरीतून शेवंतामाय बोलली.

''आं...''

''काही नाही.'' एकनाथ म्हणाला.

''काय म्हन्ली तू?''

''काही नाही म्हणत ती. चुपचाप जेवा तुम्ही...''

सुभानराव म्हणाले, ''जेवूनच त राहयलो. मी कुठ काई बोल्लो... पण आता मिरुग तोंडावर आला लागवडीची चिंता पल्डी इठ्ठलाले.''

हे ऐकून एकनाथच्या पोटात खोल खड्डा झाला. तोंडतला घास तोंडतच गुरमळत राहिला.

''कितीक पैसे लागतील आनंदा. तुवा टिपण केलं आशीन नं?''

''ते आपून काय पेरतो त्याच्यावर अवलंबून हाये. समजा उडीद अन् मूगच पेरला तर खर्च कमी येईल.''

''उडीद अन् मुंगच पेरून कसं भागलं? पऱ्हाटी लावाच लागलं. हाब्रीड पेराच लागंल. उडीद मुंगासंग सोयाबिनबी पेराच लागंल.''

''कल्याणीच्या मळयात या वर्षी फक्त सोयाबिनच पेरावं मला वाटते. गहू हरबऱ्यासाठी चांगला बिवड होतो.''

''चालते! महा त मुंग पेरायचाच इचार नाई आवंदा. गेल्यासाली काय ठोंग बसली सम्दं वावर आंगावर पल्डं.''

''तसं म्हणून चालते का? सम्दच कठाण कुठाण पेरा लागते. वावराचा एक कोपरा पिकला तरी कसर निंगती. या पिकाची त्या पिकात सरबराई व्हती.''(पृ.१०) अशा प्रकारे शेतकरी कुटूंबातील संवाद लेखकाने मांडला आहे. पण त्या कुटूंबातील अलका व एकनाथचा भाऊ मधू यांचा संवादात सहभाग नाही कारण अलका शहरी वातावरणात मोठी झाली व मधूला शेतीमध्ये काहीच रस नव्हता. शेवंतामाय आणि सुदामा शेलकराची बायको यांचा संवाद पुढीलप्रमाणे–

शेवंतामाय ने विचारले, ''काय नाव ठेवलं नाताचं?''

''कायनू माय. लय भारी नाव हाये. रूचितिलीक का काय नवाडंच नाव हाये. मले येतबी नाई. मी आपली त्याले बाबूच म्हणती.''

''चांगलं झाल माय. तुले नातू खेळवाय भेटते.''

''हाव. लय करमते लहान लेकरासंग...''

''नशीबच पाहयजे नातवाचं तोंड पाहयाले.''

''तुमच्या मोठयाले काईच नाई आजून. पाच–सा सालं झालं अस्तीन नं लगनाले?''

''झाले. पण नातू नाई झाला. काय सांगावं तुले करमाचे भवाडे.''

''कावून दुपवती का काय सून?''

''दुपवती नाई. पाडू पाडू आणती, राहूच देत नाई.''

''आता माय बया. बाई हाये का कैदासीन? तरी शिकेल सवरेल हाये न?''(पृ.१२९)

अशा प्रकारे आपल्याला नातू नसल्याची खंत शेवंतामाय व्यक्त करते. आणि नातू असल्याचा आनंद सुदाम शेलकरांची बायको व्यक्त करते.

**१.२.३.१३. भूमी :**

मैथिली देवस्थळेबाईंकडे काम करण्यासाठी गेली. देवस्थळेबाईंना कामवाली हवी होती. त्यावेळी मैथिली आणि देवस्थळीबाई यांच्यातील संवाद.

मैथिली म्हणाली, ''प्रोफेसर देवस्थळींनी वाचनालयाला पुस्तकं दिली न?''

''घरात पुस्तकांची गर्दी नुसती!'' त्या म्हणाल्या.

''ती ज्या वाचनालयाला दिली तिथली रोहिणी मायदेव माझी मैत्रिण. मी तिथंच काम करत होते.''

''तू वाचनालयात काम करत होतीस? मग ती नोकरी का सुटली?''

''ती नोकरी नव्हती. अशीच महिनाभर होते तिथं. सुट्टी म्हणून. परीक्षेनंतर.''

''थोडक्यात सांग. किती घोळ घालतेस?'' त्या म्हणाल्या.

''मी माझा परिचय देते आहे. तुमच्या दांडेकरसाहेबांनी पाठवलं म्हणून आले. तुम्हाला गरज नसेल तर मी जाते.''

''नाव काय तुझं?'' त्या जरा मुद्यावर येऊन म्हणाल्या.

''मैथिली हुद्दार.''

''वडील काय करतात?''

''ते डॉक्टर होते- न्यूरोसर्जन. माझ्या लहानपणीच गेले.''

''आई?''

''आईपण गेली.''

''तीही डॉक्टर होती?''

''नाही. नर्स होती साउथला. मिशनरी हॉस्पिटलमध्ये.''

''नर्स?'' बाईंच्या कपाळावर पुन्हा आठी.

''मिशनरी हॉस्पिटलमध्ये म्हणजे तू-तुम्ही ख्रिश्चन?''

''माझी अम्मा ख्रिश्चन. ओरिजिनली तामिळीयन.''

''मला जरा आपल्यातील मुलगी हवी होती.'' त्या म्हणाल्या,

''मला मग तुझे कॅरॅक्टर सर्टिफिकेटही लागेल.'' मैथिली ताडकन उठली.

''मला ही जमायचं नाहीच. माझं हे बारावीचं वर्ष आहे. प्रोफेसर देवस्थळींची पुस्तकं पाहिली म्हणून खरं म्हणजे मला यावंसं वाटलं.''(पृ.४८)

या संवादानंतर मैथिली तेथून रागाने निघून गेली. एकंदरीत या संवादातून मैथिलीचा परिचय लेखिकेने करुन दिला आहे. देवस्थळीबाई व मैथिलीच्या स्वभाव वैशिष्टयांची कल्पना यातून येते. जातीविषयी उल्लेख येतो. मैथिलीचे पुस्तकांविषयीचे प्रेम ही वरील संवादातून स्पष्ट होते. अंशुमन जेव्हा समंजसपणे किंवा कुटुंबातील एक जबाबदार व्यक्ती म्हणून विचार करू लागला त्यावेळी

आई आणि वडील यांच्यात असलेले तणावाचे संबंध आणि या त्यांच्यातील तणावाला आईच जबाबदार आहे हे अंशुमन व मैथिली यांच्यातील संवादातून स्पष्ट होते.

''तू मुद्दामच लायब्ररीत बसतेस नं अम्मा?'' तो एकदम म्हणाला मधेच.

''अं...नाही तर-'' म्हणताना ती थांबलीच.

''तुम्ही दोघं किती चांगली आहात, अम्मा! पण तेच तुम्ही ऐकमेकांकरता मात्र तसे नाही.''

''डॅडी म्हणतात की तू-तू ओव्हर अँबिशस आहेस!'' मैथिली, ''मी! ओव्हर अँबिशस!

तुला वाटतं का तसं? तुझ्यावरूनच बघ...'' तो बोलला नाही.

''आपल्याला जे करावंसं वाटतं आतून, त्यातलं सगळं तरी आपण कुठं करतो! फार थोडं करतो. त्यातलं थोडं जमतं. बाकी तर राहूनच गेलेलं असतं नं अंशुमन...''

''पण तुला त्यांना बरोबर घेता आलं नाही, अम्मा!''

''त्यांना यायचं नव्हतं.''

''असंच म्हणता येणार नाही.'' अंशुमन म्हणाला.

''अंशुमन!'' ती दुखावून गप्प बसली.

''तू समर्थ होतीस! डॅडी तसे नव्हते. नाहीत. ते तुला भीतही होते. मला लहानपणापासून कळायचं ते-त्यांचं भिणं. तुझ्या लक्षात नाही आलं, अम्मा!''

''अंशुमन, मलाच असं नाही, तुझे डॅडी पूर्णपणे भ्यालेलेच आहेत- स्वतःलाच भ्यालेले. त्यांचा स्वतःवरही विश्वास नाही, स्वतःचीच त्यांना शंका आहे...'' मला-मलाच फार कठीण गेलं'' पण तिला ते त्यावेळी अंशुमनला सांगावसं वाटले परंतु तिने सांगितले नाही''

''मग तुला काही करावंसं वाटल नाही?''

''निर्भय तर आपण आपले होत असतो, अंशुमन! कुणी कुणाला द्यायची ती गोष्ट नाही.''(पृ.१७३)

वरील संवादात अंशुमनच्या बऱ्याच प्रश्नांची व शंकांची उत्तरे मैथिलीने दिली आहेत. अंशुमन म्हणजे मैथिलीचा मुलगा याने आईला तिची चूक दाखवून दिली त्यामुळे मैथिली दुखावली गेली नंतर तो आईला सॉरी म्हणाला. अंशुमनने मैथिलीला दोषी ठरविलं परंतु मैथिलीने अंशुमनला जीवनाचे सत्य सांगितले. प्रत्येकजन निर्भय स्वतःच होत असतो. निर्भयपणा ही एकमेकांना देण्याची

गोष्ट नाही. आपल्या बाबतीत जेव्हा काही वाईट किंवा चुकीच्या गोष्टी घडतात त्यावेळी त्याला काही प्रमाणात आपणच जबाबदार असतो हे मैथिलीने वरील संवादातून अंशुमनला पटवून दिले.

**१.२.३.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : सुबोधचा एक मित्र अनिकेत त्याला एकदा सुबोधने घरी आणले माधुरीने त्याला हॅलो म्हणायचे, मनात असूनही तिने नमस्कार म्हटले. सुमाधुरी व सुबोध अनिकेतच्या समोरच्या कोचावर संथपणे बसले. त्या तिघांमधील संवाद पुढीलप्रमाणे झाला ''सुमाधुरी, अनिकेत सिनेमा करतोय.''

''मराठी?''

'हो' अनिकेत म्हणाला.

''आपल्या बॅनरखाली करणाराय. अनिकेत, सुमाधुरीने शिकत असताना फिल्म अर्काईव्हज्चा फिल्म ॲप्रीसिअेशनचा कोर्स केलाय.'' ''फिल्म अर्काईव्हजचा नाही. फिल्म ॲप्रीसिएशनचा असा नाही. 'पथेरपांचाली' चे एकाने ॲप्रीसिएशनचे एक दिवसाचे वर्कशॉप घेतले होते, ते अटेंड केलेय,'' सुमाधुरी म्हणाली. ''सुमाधुरीने फिल्म अर्काईव्हज्मध्ये खूप सिनेमे पाह्यलेत.'' सुबोध म्हणाला, ''खूप नाहीत, पंधरावीस पाह्यलेत'' सुमाधुरी म्हणाली, मग अनिकेतला म्हणाली,

''आर्ट फिल्म करणाराहात?''

''आर्ट फिल्म असे नाही,'' अनिकेत म्हणाला, ''पण कमर्शल असेही नाही. मधला सिनेमा असला पाहिजे, असे माझे मत आहे. कमर्शल नाही, पण लोकांनी सिनेमा पाह्यला पाहिजे, हा दृष्टिकोन आहे माझा.''

''स्क्रिप्ट झाले तयार'' सुमाधुरी अनिकेतला म्हणाली. ''अनिकेत स्वत:च लिहितोय,'' सुबोध म्हणाला, ''अनिकेत, सुमाधुरीने बऱ्याच क्लासिक सिनेमाच्या स्क्रिप्टस् वाचल्यात.'' ''बऱ्याच नाहीत. एकच वाचलीत 'पथेर पांचाली'ची,'' सुमाधुरी म्हणाली.

''माझी पटकथा पूर्ण लिहून झाली की, मी वाचून दाखवीन तुमच्या सजेशन्स उपयोगाच्या होतील.''

''एवढा नाही माझा अभ्यास,'' सुमाधुरी म्हणाली.(पृ.३७, ३८)

अनिकेत, सुमाधुरी व सुबोधच्या संवादातून एक गोष्ट लक्षात येते की, फिल्म तयार करायची असे सुमाधुरीला वाटते तिला प्रोत्साहन देण्याचे काम सुबोध करतो तिच्या विषयीची तिच्या फिल्मच्या ज्ञानाची स्तुतीपर विधाने तो अनिकेतसमोर करतो पण सुमाधुरी मात्र सगळी उत्तरे

नकारात्मक देते म्हणजेच उलट सुलट विचार करण्याची तिची स्वभावृत्ती वेळोवेळी दिसते. उच्चशिक्षित स्त्रीच्या करिअरविषयीचया आवडी जोपासण्याचे काम आधुनिक कुटुंबात होतांना दिसते.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरे : या भागातील संवाद हे प्रामुख्याने कौटुंबिक संवाद आहेत, तसेच मित्र-मैत्रिणी, बहिण-भाऊ यांच्यातील संवाद आहेत. उदाहरणादाखल विलास व विलासची आई यांच्यातील संवाद पुढीलप्रमाणे-

''फुलपाखरांचं आता आवरतं घे आणि अभ्यासाला लाग''

''माझ्या अभ्यासावर घसरलीस एकदम?''

''तुझे बाबा म्हणत होते, तू पास झालास की तुला मेडिकल स्टोअर काढून द्यायचेय.''

''हं.''

''आपल्या धंदयाचं काही खरं नाहीय.''

''का? काय झालं?''

''ग्लोबलायझेशन आलंय ना? तुझे वडील म्हणत होते, यंदा डिफेन्सची ऑर्डर मिळत नाहीय.''

''डिफेन्स मिनिस्ट्रीने गाद्या लोड संगळं परदेशातनं आणायचं ठरवलेय.''

''का म्हणून?''

''आपल्या गाद्या चांगल्या नाहीत म्हणे.''

''मग चांगल्या गाद्या तयार करायच्या.''

''डिफेन्स मिनिस्ट्रीने बेल्जीयमहून गाद्या आणायचे ठरवलेय. आपली ऑर्डर कँन्सल केलीय.'' विलास बोलला नाही.

आई म्हणाली, ''आपल्या गाद्या चांगल्या नाहीत, हे खोटं आहे, आतली गोष्ट अशीय, डिफेन्स मिनिस्ट्रीने बेल्जीयमकडून तोफा खरेदी केल्यात, त्यात बेल्जीयम सरकारने अट घातलीय, गाद्या बेल्जीयमकडून घेतल्या पाहिजेत.'' विलास दूध प्यायला उठला.

''आता मेडिकल स्टोअर्स काढायचे तुझे बाबा म्हणत होते.''(पृ.८६)

अशाप्रकारे राजकीय घडामोडींचा छोट्या व्यावसायिकांवर परिणाम होतो व त्याचाच परिणाम म्हणून विलासलाही आईच्या म्हणण्यानुसार वागण्याची दिशा ठरविण्यास आई तयार करते

हे वरील संवादातून दिसते. कादंबरीच्या संवादांमधून मध्यमवर्गीय सुशिक्षित कुटुंबातील भाषा ही प्रभवी संवाद निर्माण करते. सदर संवाद हे कौटुंबिक आहे.

**१.२.३.१५. खारीच्या वाटा :**

या कादंबरीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य लक्षात आले ते संवादाचे. कादंबरीत संवाद हा अल्पप्रमाणात आला आहे. कादंबरीतील प्रमुख पात्रे लेखक, दिन्या आणि लुकी ही आहेत. त्यांच्यातील संवाद हा फार कमी आहे. कारण लुकी प्राणी व दिन्या खाणाखुणांची भाषा वापरताना दिसतो. त्यामुळे लेखकाचा संवाद खुंटल्यासारखा वाटतो. लेखक व त्याचा मित्र दिन्या नदीवर जायला निघाले तेव्हा दिन्या म्हणाला, ''लुकीला बरोबर घ्यायचं?'' लेखक नको म्हणत होता पण दिन्याच्या अट्टाहासापायी लेखकाने लुकीला उचलले. दिन्याने हातानेच 'चल' म्हणून खुण केली. म्हणजेच बऱ्याचदा दिन्या खाणाखुणांचीच भाषा वापरताना दिसतो. शाळेतील शिक्षकही विद्यार्थ्यांशी संवाद साधत नाहीत असे दिसते. विद्यार्थ्यांशी ते सांकेतिक भाषेत संवाद साधत होते. उदाहरणार्थ गुरुजींनी टेबलावर दोन मुठी आपटल्या म्हणजे मधली सुट्टी झाली. एकदा आपटली म्हणजे 'गप्प बसा.' टाळी वाजवून हात वर म्हणजे एकदम 'बे' चे पाढे म्हणा.(पृ.२५)

एकदा धोंडिबा म्हणजे लेखकाची गुरे राखणारा गुराखी त्याला लाकडं माळयावर रचण्याचे काम सोपवलेले होते. तेथे अचानक त्याला साप दिसला त्याने मदतीसाठी आवाज दिला तेव्हा चौथीच्या विद्यार्थ्यांसह गुरुजी लेखकाच्या घरी गेले. 'सावध रहा' असा हाताने इशारा केला. डोळे वटारुन मुलांना गप्प बसविले सापाला बेचल्यातून बाहेर काढल्यानंतर काठी सापाच्या मानेवर ठेवली तेव्हा गुरुजी पहिल्यांदा बोलले, ''इकडे ये'' लेखकाला बोलवून त्या काठीवर पाय देण्यास सांगितले. गुरुजींना मुलांना सापाच्या डोकीचे, पोटावरचे खवले दाखवले. ते म्हणाले, ''यावरुन साप विषारी आहे की नाही हे कळतं. बघून ठेवा. नंतर समजावून सांगेन'' धोंडीबा म्हणाला, ''गुर्जी, नंतर समदं कळलं. आता पयला ठेचा वाद्याला.''(पृ.१०२) अशा प्रकारे संपूर्ण कादंबरीत एक-दोन वाक्यांचेच संवाद आहे. बाकी सांकेतिक भाषेचा वापर करुन संवाद साधला आहे.

**१.२.३.१६. फेसाटी :**

नाथाने स्वतःच्या आयुष्यातील घटनां-प्रसंगांची मांडणी प्रस्तुत कादंबरीत केल्यामुळे कादंबरीतील संवाद हे प्रामुख्याने नाथा, त्याची आई, वडील, बहिणी, चुलता, मामा यांच्या मधील आहेत. शिमग्याच्या सणा दिवशी आईने काहीही गोडधोड केले नव्हते. शेजारची मुले पोळ्या खात

होती. नाथाला मात्र पोळी खायला मिळाली नाही. तेंव्हा नाथा व काकू यांच्यातील संवाद मनाला वेदना देतो. नाथा म्हणाला, 'काकू त्वा पोळ्या का केल्या नायचं?'

'बाळ! आपला सण नाय ह्यो,'काकू.

'का?'

'आपल्या आयुष्याचा शिमगा चालू हाय न्-सण कुठला बाळ?'

'काकू मला पोळ्या नकू, मी कवा तुला पोळ्या मागणार नाय.'

'अरं माझं शानं बाळं' काकू.(पृ.३५)

म्हणजे सणा दिवशी या कुटुंबाला पोळ्या करता आल्या नाहीत. पण आईने समजावल्यानंतर नाथाचा समंजसपणा त्यातून कळतो. नाथा दहावी पास झाला. त्याची शाळा चालू होऊन खूप दिवस झाले पण तो शाळा शिकायचं नावच घेत नव्हता तेंव्हा दादा म्हणाला, ''बाळा अकरावीची शाळा चालू झाल्याली, जा फॉर्म भर. प्रवेश घी. आजून दोन वरिस काढ. बारावी संपली म्हंणजी कुठतरं क्लार्कची नायतर शिपायाची नोकरी लागलं?'' एवढ्या वेळ दादा बोलत होता. नाथा गप्पच होता तेवढ्यात काकू जोरात ओरडली.

''अरं ये कडू भाड्या. त्वाँड शिवलय काय. कवाच्यानं पोरगं दाताच्या कण्या करुन बोलतया. अन् तू म्हसोबा बडूल्यावानी नुसता गप्प बसलायचं. बोलायला त्वाँड नाय का? तोंडात माती पडल्याई.''

''अगं काकू मी बोलतूया की, तू कशाला तरास करुन घेत्याचं. मी सांगतुया नव्ह. तू गप्प बस.''

''बाळा मी यितू उद्या, तुझ्याबर चल तुला प्रवेश धिवून मग मी येतो.''

''मला नाय शिकायचं?''

''का शिकायचं नाय?''

''शिकूण कोण कलेक्टर झालाय व्हय.''

''अरं तसं नव्हं, आता दहावीतर झाल्या. अजून दोन वरीस शिकला म्हणजी काय तर हुईलच की?''(पृ.१३०)

नाथाच्या शिक्षणाची काळजी करणारी आई व नाथा यांची तळमळ तसेच नाथाला शिपाई क्लार्कची तरी नोकरी मिळेल ही वेडी आशा वरील संवादातून व्यक्त होते. तसेच नाथाने दहावीनंतर

पुढील शिक्षण घ्यावे म्हणून त्याचा मोठा भाऊ दादा आणि काकू यांनी त्याला समजावले हे वरील संवादातून लक्षात येते.

अशा प्रकारे साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील संवाद वेगवेगळ्या संवाद वैशिष्ट्यांनी अभियुक्त झालेले आहेत. सत्तांतरमधील संवाद हे प्राण्यांच्या मुक अभिनयातून साधलेले आहेत. तर खारीच्या वाटा मध्ये अल्पसंवाद असून त्यामध्ये सांकेतिक भाषेचा वापर संवादासाठी केलेला दिसून येतो. कथानकाला साजेसे, पुरक आणि योग्य परिणाम साधणारे संवाद पात्रांच्या तोंडी आहेत. कादंबऱ्यांमधील आशय प्रभावी संवादांमुळे समृद्ध झालेला आहे. तसेच त्यातून स्वभाव चित्रणाला चालना मिळाली आहे, प्रभावी संवादांमुळे व्यक्तिमत्वातील विविध पैलूंचे आकलन होण्यास मदत झाली आहे. पात्रांच्या मनातील भावभावना, विचार-विकार प्रस्तुत संवादातून व्यक्त झाले आहेत. ग्रामीण, दलित, मध्यमवर्गीय, अज्ञानी, अशिक्षित, अंधश्रद्धाळू, रुढी-परंपरा, रीतीरिवाज जपणाऱ्या माणसांचा हा संवाद निख्खळ, प्रांजळ व निर्व्याज झालेला आहे. हया प्रभावी संवादातून वाचकाच्या डोळ्यासमोर ती व्यक्तिचित्रे उभी करण्याचे सामर्थ्य प्रस्तुत सर्वच कादंबऱ्यांमध्ये दिसते.

**१.२.४. भाष्य :**

कादंबरीतील कथानकाला प्रवाही ठेवण्याचे आणि गती देण्याचे काम कादंबरीतील घटना, प्रसंग, पात्रापात्रांमधील सहसंबंध, निवेदने, स्वगते, संवाद हे साहाय्यभूत ठरतात. असे असले तरी या घटकांच्याद्वारा कादंबरीच्या कथानकाला पूर्णत्व येत नाही त्यात इतरही घटक महत्त्वपूर्ण ठरतात. त्यात 'भाष्य' घटकही महत्त्वपूर्ण ठरतो. वरील घटकांच्याद्वारा ज्या गोष्टी साधल्या जात नाहीत अशा गोष्टी भाष्याद्वारा साधल्या जातात. पात्रे, पात्रापात्रांमधील संवाद वा विसंवाद, त्यांच्या भावना, विचार, कल्पना, हेवेदावे, प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे अभिव्यक्त होतात. मात्र वरील सर्व घटकांद्वारा ज्या गोष्टी व्यक्त होऊ शकत नाहीत. त्या सर्वसाक्षी भावाने, परकाया प्रवेशाने निवेदक मांडत असतो. त्या मांडणीला, विवेचनाला, क्रिया-प्रतिक्रियेला, राग-लोभाला व्यक्त केले जाते, त्याला 'भाष्य' असे म्हणता येईल. भाष्याची व्याख्या करताना वा.म. कुलकर्णी म्हणतात, ''ज्यात सूत्रासारख्या असलेल्या वाक्यांनी मूळ सूत्रांचा अर्थ स्पष्ट केला जातो. शिवाय ज्यात भाष्यातील पदाचे विवरण केले जाते त्याला भाष्य म्हणतात.''[८८] साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये विविध स्वरुपाची भाष्ये आलेली आढळतात. प्रत्येक कांदबरीतील काही प्रातिनिधिक भाष्याचा येथे उदाहरणादाखल परामर्श घेता येईल.

**१.२.४.१. ययाति :**

अंगिरस आणि ययाति यांच्या संवादात ययातिच्या प्रश्नांना उत्तरे देताना अंगिरसाने सांगितलेले भाष्यरुपी तत्त्वज्ञान मनाला भिडते. ''परमेश्वराने आपल्याला जो मनुष्य जन्म दिला आहे तो त्याचा प्रसाद आहे. पण तो अनेक शापांनी युक्त असलेला वर आहे आणि या शापांतून मुक्त होणे हेच मानवी जीवनाचं ध्येय आहे. इतर प्राण्यांना शारीरिक सुख दुःखापलीकडची अनुभूती असत नाही. ती केवळ मनुष्याला मिळालेली देणगी आहे. या अनुभूतीच्या बळावरच मनुष्य पशूकोटीतून वर आलेला आहे. संस्कृतीच्या दुर्गम पर्वताची चढणं तो चढत आहे. आज ना उदया तो त्या गिरिशिखरावर जाईल मग या सर्व शापांतून त्याचं जीवन मुक्त होईल. शरीरसुख हा मानवीजीवनाचा मुख्य निकष नाही. तो निकष आहे आत्म्याचं समाधान!''(पृ.५९)

नहुष महाराजांच्या मृत्यूची बातमी अंगिरसाला कळल्यानंतर ययातिला आधार देण्यासाठी त्यांनी एक पत्र लिहिलं त्यात त्यांनी मृत्यू या संकल्पनेचे भाष्यरूपी विवेचन केले. त्यासाठी त्यांनी निसर्गाचा आधार घेतला. ''वसंत ऋतूत वृक्षावर हळूच डोकावणारी तांबूस कोमल पालवी अशी आदिशक्तीची लीला आहे, तशी शिशिरात गळून पडणारी जीर्ण पिवळी पर्ण ही सुद्धा तिचीच क्रीडा आहे. या दृष्टीनंच आपण मृत्यूकडं पाहिलं पाहिजे. उदयास्त, ग्रीष्म-वर्षा, जन्म-मृत्यू, स्त्री-पुरुष, सुखदुःख, शरीर आत्मा या अभेद्य जोड्या आहेत. जीवनाचं हे द्वंद्वात्मक व्यक्त स्वरुप आहे. या सर्व आडव्या-उभ्या धाग्यांनीच आदिशक्ती विश्वाच्या विलासाची आणि विकासाची वस्त्रं विणीत असते.

अशा प्रकारे जन्म आणि मृत्यू या दोन्ही घटना हे नियतीचं चक्र आहे. मृत्यू हा जीवमात्राला जितका अप्रिय आहे, तितकाच अपरिहार्य आहे. ययातिच्या जीवनाची कथा, व्यथा तो सांगायला प्रवृत्त होतो त्याचे प्रमुख कारण म्हणजे, ''जखम उघडी करून दाखविली म्हणजे माणसाचे दुःख हलके होते. कुणी जवळ बसून विचारपूस केली, की आजाऱ्याला बरे वाटते. आपुलकीच्या अश्रूंनी दुदैवी माणसाच्या मनातला वणवा विझतो.''(पृ.४) ययातिचे वडील नहुष राजा यांचा मृत्यू होतो त्यावेळी ययातिची आई थोडे दिवस दुःख करत बसते पण थोड्याच दिवसात राज्यकारभारात ती लक्ष घालते. महाराणी पद भुषविते. तेव्हा सर्वस्वीबाबांवर अवलंबून असलेली आपली आई बदलते तेव्हा ययाति पुढील भाष्य मांडतो. ''या जगात प्रत्येक जण स्वतःसाठीच जगत असतो. वृक्षवेलींचीमुळे ही नेहमी ओलाव्याकडे वळतात. तशी माणसेही सुखासाठी निकटच्या लोकांचा आधार शोधतात.''(पृ.९५) याला जग प्रेम, प्रीती, मैत्री अशी नावे देतं पण

ते खर तर आत्मप्रेम असतं.  एका बाजुचा ओलावा नष्ट झाला तर मनुष्य दुसऱ्या बाजुला ओलावा शोधू लागतं. मानवी जीवनही तसेच आहे ते नेहमी प्रेम मिळण्याच्या शोधात राहतं व हे वेगवेगळ्या रुपातल प्रेम मिळवून आपलं जीवन झाडाप्रमाणे टवटवीत करण्याचा प्रयत्न करते.

शर्मिष्ठेने स्त्री व पुरुष यांच्यातील भेदावर आपले समर्पक भाष्य मांडले आहे. ''पुरुष अमूर्त गोष्टींच्यामागे धावतो; कीर्ती, आत्मा, तपस्या, पराक्रम, परमेश्वर यांचे पुरुषाला झटकन आकर्षण नसते. तिला प्रीती, पती, मुले, सेवा, संसार अशा गोष्टींचे आकर्षण असते. या मूर्त गोष्टींसाठी ती त्याग करील. संयम पाळील. सर्वस्वाने, पूजा करायला किंवा अश्रुंचा अभिषेक करायला तिला मूर्ती लागते.  पुरुष आकाशाची आणि स्त्री पृथ्वीची पूजा करते.''(पृ.२३७)

**१.२.४.२. रथचक्र :**

पुढील शिक्षणासाठी ती त्याला तालुक्याला घेऊन आली होती. पण अगदी शेवटचे चार महिने राहिले असताना कृष्णाताईच्या खानावळीत हिशोबाचे काम करण्यासाठी तो गेला असताना त्याचा तोल जातो. अभ्यासातले त्याचे लक्ष उडते आणि त्यानंतर धाकट्याने केलेलं भाष्य पुढीलप्रमाणे– घरचे शिव्याशाप खात आई त्याला ह्या ठिकाणी घेऊन आली. तिला उद्या कळलं तर काय वाटेल? देवाला नमस्कार घालीत प्राण सोडणारे आजोबा, बारा वर्षे तपश्चर्या करणारा बाप– त्या आठवणींचा काही उपयोग नव्हता. गेले आठ दिवस ह्या सगळ्याचे तो स्मरण करीत होता. त्याच्या कुळात अनाचार झाले असतील; पण अठराव्या वर्षी गुण उधळणारा कोणी निपजला नव्हता. उद्या ह्या गोष्टीचा गावात बभ्रा झाला तर? हेडमास्तर आपल्याकडे रोखून का पाहतात? त्यांना काही सुगावा तर लागला नाही? त्याला आठवलं; आपल्या हातून अजून पाप घडलं नाही. त्या विचारानं त्याला बळ आलं. पण पाप घडलं नाही ह्याच श्रेय त्याला नव्हतं. त्याच मन केव्हाच व्यभिचारी बनलं होतं. असले विचार नुसते डोक्यात आले तर त्याला शरमल्यासारखं होत असे.(पृ.१७६) घडलेल्या प्रसंगात तिचा मुलगा स्वतःला दोषी ठरवतो आणि त्यातून एका निश्चयाने बाहेर पडतो व मन लावून अभ्यास करतो व मॅट्रिकच्या परिक्षेत पहिला येतो. 'ति'चा मुलगा परिक्षेत पहिला आला त्यावेळी तिला तिचे जीवन कृतार्थ झाल्यासारखे वाटते. त्यावेळची तिची अवस्था खालील भाष्यातून व्यक्त होते.

''मरणाचे विचार गेले. ती बेहोष झाली. दोन वर्षांपूर्वी त्याच झोपाळ्यावर बसून तिनं ही बेहोषी अनुभवली होती. त्यावेळी तिनं स्वतःभोवती गिरक्या घेतल्या ती बातमी कोणाला सांगावी अशी इच्छासुद्धा तिला होत नव्हती. हवं तर वाचा. वाटलं तर करा कौतुक. सारी मुंबई त्याच

कौतुक करत असेल. तुमच्या चतकोराची वाट पाहायला तो भिकारी नाही. कृतार्थतेच्या धुंदीत ती झोपाळ्यावर बसून होती.''(पृ.२०४)  अखेरच्या चाळणीत हे श्रेय तिचे होते. दोन वर्षांपूर्वी तिन घरातून बाहेर पडण्याचं धाडस केलं म्हणून हा दिवस उगवला.''अखेरीस मुलाच्या या यशामुळे तिला आपल्या जीवनाच सार्थक झाल्याच व आता तिला कुणाचीही पर्वा नाही असे वरील भाष्यातून दिसून येते.

**१.२.४.३. स्वामी :**

स्वारीवरुन धन्यानं परत येणं यात काय सुखं असते, या मुद्यावर गोपिकाबाईंनी स्त्रीयांच्या आयुष्यातील पतीचे महत्त्व अधोरेखित केलेले भाष्य. ''आम्हा स्त्रियांचा जन्मच चमत्कारिक, ती दुःखं सांगायची कुणाला! पती युद्धावर असताना नित्य दिवस वैऱ्यासमान भासतो. नाना अशुभ कल्पनांनी घास गिळवत नाही. कुंकवाच्या कोयरीत तासन्तास हात थबकतो, आणि एवढं सोसल्यावर जेव्हा तिकडून परतणं होतं, तेव्हा मनाचे बांध फुटून जातात.''(पृ.६२) रमाबाईनी आपल्या ओंजळीत प्राजक्ताची फुलं आणली. मंद सुगंध दरवळत होता. तेव्हा माधवरावांनी त्या फुलांवर भाष्य केले, ''पाहिलंस, किती टवटवीत फुलं राहिली आहेत ही! प्राजक्त हे स्वर्गीचं फूल! एका अजोड प्रेमासाठी पृथ्वीतलावर आलं. त्या ह्या फुलाला देखील एक शाप आहे. आत्यंतिक निर्मल प्रेमाखेरीज ही फुलं ताजी राहत नाहीत, असा तो शाप आहे. खुद्द देवांच्या सहवासातही ज्यांचं ताजेपण टिकत नाही, ती ही पारिजातकाची फुलं, सूर्य वर आला असताही तुझ्या हाती कशी हसरी आहेत, बघ!  हे पाहून थक्क व्हायचं नाही तर काय व्हायचं?''(पृ.३४६) प्राजक्ता ह्या स्वर्गीच्या  फूलाचे व महात्म्य माधवरावांना रमाबाईंच्या स्वभावातून उमजते.  हे सदर भाष्यातून सूचित होताना दिसते.

**१.२.४.४. स्मरणगाथा :**

गोपाळ देहूला गाडगेबाबांच्या धर्मशाळेत वास्तव्यास गेला. तेथे बनूबाई नावाची विधवा माळकरीण धर्मशाळेची व्यवस्था पाहात होती. महानंदस्वामींच्या बोलावण्यावरून गाडगेबाबांची ही तांबडी पलटण मुंबईला सप्ताहासाठी गेली. सप्ताहावरुन परततांना गोपाळ रस्त्यात विविध गावांमध्ये कीर्तन करत होता. दुपारी ज्या गावात ते उतरत, त्या गावात फिरून भाकऱ्या मागत आणि जेवत. पण कोणत्या घरासमोर जाऊन भिक्षा मागावी यासाठी जे काही संकेत होते ते गोपाळने पुढील भाष्यामधून व्यक्त केले आहेत.

''कुठलीं घरं टाळावींत, तें मलां नेमकं माहीत होतं. ज्या घरीं संस्कृतीचं कसलंच चिन्ह नाहीं, दारीं तुळस नाहीं, अंगणीं सडा नाहीं, रांगोळी रेखलेली नाहीं, पुरुषांचं बाहुल्य दिसतं आहे, फार पोरवाडा आहे, त्या घरीं भीक न मिळण्याचा संभव. ज्या घरीं गायवासरुं नाही, दारीं कुत्रा मांजर नाहीं, एकूण सगळ्यावर अवकळा आलेली जाणवते, तें घर वर्ज्य, ज्या घराच्या भिंती वर्षांवर्षांत सारवलेल्या नाहींत. ज्याच्या छपरावरल्या कौलांवर छावणाऱ्याचा हात फिरलेला नाहीं. जें घर अंधारवाणं आहे, पुरता प्रकाश नाहीं. त्या दारीं उभं राहू नये. ज्या घरीं भांडणाचे स्वर आइकूं येताहेत, दुश्चितवाणं दिसतं आहे, ओसाडी जाणवत्ये आहे ते घर त्यागावं. फार संपन्नता दिसत असेल, चहूंकडे लखलखाट असेल, दारीं तबेल्यांत मोटार किंवा टांगा असेल, पोरांना सांभाळायला गडीमाणूस असेल त्याही घरीं भिकाऱ्याला भीक मिळण्याचा संभव कमीच. ती सामान्यपणं मध्यम स्थितीतल्या घरींच मिळायची. तिथल्याच आईबाईच्या, मायमावशीच्या कानीं भरदूपारीं कणवभरली हांक पोंचली कीं तिथं कोरकुटका मिळायचा.''(पृ.१९०) अशा प्रकारे वरील भाष्य हे लोकांच्या घरा-दाराच्या दृष्य स्वरुपावरून त्या घरात राहणाऱ्या लोकांच्या वृत्ती प्रवृत्तीचा अंदाज येतो. म्हणजे घराची दुरावस्था आहे. दारिद्र्यामुळे म्हणा एकंदर त्याच्या आळशीवृत्तीमुळे घराला अवकळा आलेली आहे अशा घरात भिक्षा मिळूच शकत नाही. तसेच ज्या घरात खूप धनवान लोक राहतात. त्यांच्याकडे दान करण्याची दानत नाही. त्यांच्याकडूनही भिक्षा मिळणे अशक्य. या दोन्ही परिस्थितीतील घरांचा विचार करता गोपाळने मध्यम परिस्थितील सर्वसामान्य लोक भिक्षा देतात. हा अन्वयार्थ वरील भाष्यातून स्पष्ट केला.

साधू कसा असावा याविषयीचे मत गोपाळने पुढील भाष्यातून व्यक्त केले आहे. ''साधूला नुसतं विरक्त असून भागत नाही. केवळ निस्पृहता उपयोगाची नाही. ती जनांच्या ध्यानी आली पाहिजे लोकांनी म्हटलं पाहिजे की कसा विरक्त! पायावर डोकंही ठेवू देत नाही!''(पृ.२२६) लेखकाने 'स्मरणगाथा' या कादंबरीत अनेक गहन विषयावर भाष्य केलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गाडगेबाबांचा उपदेश, ज्ञानेश्वरी सारख्या महान ग्रंथावर भाष्य, तुकाराम महाराजांच्या अभंगावर भाष्य, अंधश्रद्धेवर भाष्य, नर्मदा परिक्रमा यासगळ्यांवर केलेली भाष्य, यामुळे कादंबरीचे वाङ्मयीन मूल्य वाढले आहे, असे मला वाटते.

**१.२.४.५. सत्तांतर :**

वानर आणि मानवी जीवनावरील भाष्य लेखक पुढीलप्रमाणे मांडतो. ''संघर्ष हा काळानुसार नितांत चालणारा आहे, ''काळाप्रमाणंच संघर्षही सतत वाहतच असतो. त्याला खंड

असा नसतोच. असली तर भरती असते, पूर असतो. जेव्हा जेव्हा खाणारी तोंड भरमसाट वाढतात, गर्दी होते; तेव्हा तेव्हा संघर्ष बळावून उठतो. जेव्हा उपलब्ध अन्नात, भूमीत वाटेकरी निर्माण होतात, तेव्हा संघर्ष उचल खातो. जेव्हा अस्थिरता निर्माण होते, एखादी जात धोक्यात येते, बाहेरून परकं कोणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो. ज्यांना बोलता येतं, ते हा राग, उद्दामपणा, संघर्ष शब्दांतून दाखवतात. ज्यांना बोलता येत नाही त्यांचे रागलोभ, प्रेम हावभावांतून, स्पर्शातून सांगितलं जातं. संघर्ष पेटला की, शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात, ते सुळे, नखं वापरतात. संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो.''(पृ.५७) हे भाष्य एकूणच पशू आणि माणसाच्या जीवनावरचं भाष्य आहे. तसेच ते पशू आणि एकूणच माणसाच्या जीवनाचे महत्वपूर्ण निरीक्षण आहे. सत्ता आणि संघर्षावरील हे महत्त्वपूर्ण अवलोकन आहे. असे मला वाटते.

**१.२.४.६. झोंबी :**

'तिकडं तिची नियती परस्पर ठरविली जात होती.'(पृ.६) वरील भाष्य लेखकाने बालविवाह प्रथेवर केले आहे. तारा म्हणजे लेखकाची आई एक वर्षाची असताना, लेखकाच्या आई-वडिलांचा विवाह झाला. रतनूचे म्हणजे वडिलांचे वय साधारणतः सात- आठ वर्षांचे होते. मुलगी एक वर्षांची व मुलगा सात-आठ वर्षांचा अशा नकळत्या वयातच त्या चिमुरड्यांचा विवाह झाला. त्या प्रसंगाचे वर्णन लेखकाने पुढील भाष्यातून केले आहे. 'एक वर्षाच्या ताराच्या गळ्यात काळेभोर मण्यांचं मंगळसुत्र, डोरलं घातलं होतं. वास्तविक वीस वर्षांनंतर लावली जाणारी हळद चिमुरड्या ताराला तिची चुलतीने मांडीवर घेऊन लावली. कुंकवाचा मळवट ही भरला व शालूची घडी तिच्या पाळण्यात ठेवली होती. नवरी मुलगी पाळण्यात झोपली व नवरा मुलगा हातात मंगळसुत्र घातलेला एक तांब्या धरुन एकटाच घोडयावरुन मिरवत होता. मुला-मुलीचे आईवडील मात्र स्वतःची हौस भागवून घेत होते.' वरील भाष्यातून बालविवाहाच्या प्रथेवर लेखकाने प्रकाश टाकला आहे. ताराचे भविष्याचे धागे दोरे परस्परच बांधले गेले. 'पोरीची जात म्हणजे दोन्हीकडच्या नुसत्या कष्टाच्या गायी.'(पृ.३४९)

लेखकाला अनसा, शेवंता, हिरा, धोंडूबाई, चंद्रा, सुंदरा, लक्ष्मी एवढ्या बहिणी होत्या. अनसाला लग्नापूर्वीपासूनच घरातला स्वयंपाक करावा लागत होता. लग्नानंतर ही तिची कामातून सुटका झाली नाही. अनसाचे लग्न मामांबरोबर झाले, तेव्हा तिचे कष्ट संपले नाहीत. शेवंता बिचारी चार-एक वर्षांची असताना वारली. हिरा, धोंडूबाई ही हाताला पडेल ते काम करीत होत्या.

धोंडूबाई चंद्रा-सुंदराला सांभाळून घर काम करीत होती. हिरा माती खाण्याच्या सवयीमुळे नाळरोगी बनली होती. हिराचं लग्न झालं. सासरच्या मंडळींचा छळ सहन करत हिरा एक वर्षभर कशीतरी सासरी राहिली. त्यानंतर जी माहेरी आली ती बरेच दिवस माहेरी. पुन्हा सासरी पाठविले. तिथे आजारी असतानाही तिला कष्टच उपसावे लागत होते. पुन्हा-पुन्हा नांदायला गेलेली हिरा सहा महिन्यात माहेरी येत होती. माहेरी आली की आईला कामात मदत करीत होती. याचाच अर्थ पोरीची जात म्हणजे दोन्हीकडच्या नुसत्या कष्टाची गाय हे लेखकाने केलेले भाष्य मनोमन पटते.

**१.२.४.७. झाडाझडती :**

जिल्हाधिकाऱ्याने कसे असावे याच्यावर दत्तू करवंदेने आपले मत व्यक्त केले आहे. ''आजवर आमी थोडे कलेक्टर बघितलेत का? अवो अधिकाऱ्यानं कसं असावं? पानाला चुना लावला कधी, हलक्या हातानं देठ खुडला कधी, आनी इडा रंगला कधी हे कळलंबी न्हाई पायजेल. धरणग्रस्त म्हणजी वैतागल्याली टकुरी. त्यांचं डोकं गरम पण कलेक्टरनं तरी डोकं थंड ठेवायला नगो का? करतू करतू म्हणावं दिवस ढकलावं बायकामुलं घेऊन गाडीतनं रेष्ट हाऊसं पालथी घालवीत हसतखेळत तीन वर्षे काढली की येतंय प्रमोशन पन या बहादुराची तऱ्हा काय न्यारीच. कुणी तक्रार करायची सोय न्हाई, लगेच उकरायचं आनी टोकारायचं! याची चौकशी कर. त्याला सस्पेंड कर. काय चाललंय काय हया जिल्ह्यात?''(पृ.३१२) वरील भाष्यातून अधिकाऱ्याने कसे वागावे हे लेखकाना सूचवायचे होते.

अनिल देशमुख साहेबांसारख्या आदर्श जिल्हाधिकारी भ्रष्ट लोकांना मानवणारा नव्हता. जिथे जिथे अन्याय होईल तिथे तिथे अनिल देशमुख साहेब स्वतः लक्ष देऊन धरणग्रस्तांवर होणारा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करीत होते आणि असे सत्यवादी अनिल देशमुख साहेब दत्तू करवंदे, भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट पुढारी यांना नको होते. त्याचा बदला, करण्याचा प्रयत्न पुढाऱ्यांकडून केला जात असे. अशाप्रकारे जिल्हाधिकारी कसा असावा ह्या विषयावर दत्तू करवंदेसारख्या भ्रष्ट सरपंचाने केलेले वरील भाष्य विचार करायला लावणारे आहे. धनाढ्य मंत्र्यांना कितीही आर्थिक सुबत्ता असली तरी जास्तीत जास्त धनवान होण्याची ईच्छा असते. त्यांची श्रीमंतीची हाव कधीही पुर्ण होत नाही. खासदार शिंगाडे यांच्याही अशाच हव्यासावर लेखकाने खालील भाष्य केलेले आहे.

''खासदारांचा गाव म्हणजे दुष्काळी भागातली बाजारपेठ खैरापूर. त्यांचं परंपरागत घराण म्हणजे अस्सल देशमुख गावाभोवतीचा पडका तट आणि मध्यभागी असणारा भव्य लाकडी वाडा

त्यांच खानदान दाखवतो. पहिल्यासारखं विहिरींना पाणी नाही. पूर्वीची हिरवळही नाहिशी झाली. आपली दीडशे एकर जमीन पाण्याखाली यावी आपल्यासोबत भागाचाही विकास व्हावा म्हणून ऐन तारूण्यात त्यांनी जांभळी योजनेची मागणी केली. तिच्या पूर्तीसाठी जंगजंग पछाडलं; पण एखाद्या कामात वेळ नाठाळ लागली की हाती काहीच गवसत नाही. यामध्ये अपयश आलं तर खासदारांनी आपली प्रगती थांबवली नाही. त्यांच्याकडं खताची मोठी एजन्सी आहे. त्यांचा दारूला विरोध; पण त्यांचे दोन पुतणे आंबेपूरला कंट्री लिकरची तीन दुकानं चालवतात. त्यांचे ते पोटं भरतातच ना, मग जाऊ दे. शिवाय त्यांचा एक पेट्रोलपंप आंबेपूरला तरं दुसरा वाघेठाणलाच आहे. भागतं याच्यात कसतरी.''(पृ.२८) अशा प्रकारे खासदार शिंगाड्यांच्या ऐश्वर्यावर लेखकाने आपले मत मांडले आहे. दीडशे एकर जमीन, खताची एजन्सी, दारुची तीन दुकाने, दोन पेट्रोलपंप अशी सर्व सुबत्ता असताना खासदार शिंगाडे साखर कारखाना काढायचा होता. त्यासाठी जांभळी धरणाचा घाट त्यांनी घातला होता.

**१.२.४.८. राघववेळ :**

गावगाड्यातील रूढी, परंपरा यांमुळे सणांच्या दिवशी दलितांना कशा प्रकारची वागणूक मिळते या विषयीचे भाष्य पुढीलप्रमाणे, ''कष्टापरिस मोबदला परतेक मांगाले जास्त भेटलं. तिसऱ्या दिवशी शिळं का असेना आन्न भेटलं? कमी कष्ट करुन बी जास्त भेटलं. कशानं? गावच्या रुढीनं. पण हे तर निऱ्हा भीकं मांघणं झालं. काहीबी न करता भेटते ती आन् जरासं कायतरी करुन. त्या परीस लय मोठी भेटते ती बी भीकचं.''(पृ.३) खांदेमळणीपासून लेखक भीक मागण्याच्या अनेक तऱ्हा पाहत होता. पोळा, करी इत्यादी. त्याच्यावरील भाष्य लेखक रघूच्या स्वगतातून व्यक्त करतो. एकूणच पोटाची भूक भागविण्यासाठी भिक मागावी लागते. याच्या सारखे दुःख दुसरे नाही. हे दुर्दैवी बाब जातीवयवस्थेने, परंपरेने निर्माण केली आहे. हे ह्या भाषेतून व्यक्त होते.

**१.२.४.९. ताम्रपट :**

'वाल्याकोळ्याचा वाल्मीकी होऊ घातला होता.' नानांविषयी लेखकाने केलेले भाष्य आहे. एका सुट्टीत नाना सोलापूरला आत्याकडे गेला तेव्हा एका कामकऱ्याचा लंगोट, चाकू आणि आरसा चोरला होता. शाळेतही मारामाऱ्या करायचा. शहरातल्या एका प्रतिष्ठित व्यापाऱ्याच्या शेतातला भुईमूग उपटून उध्वस्त करून टाकला. गडीमध्ये गेला तर त्यालाही बदडून काढलं केशवराव ठाकऱ्यांनीही नानाविषयी आपल मत व्यक्त केलं. ''तुम्ही या पोराला जपा. हा फार

तीव्र वृत्तीचा मुलगा आहे.''(पृ.३१) पण हळूहळू नाना मोठा झाला त्यानंतर त्याच्या कार्यामुळे त्याच्या भेटीसाठी एस.एम. जोशी, नानासाहेब गोरे, अच्युत पटवर्धन अशी मंडळी येत त्यामुळे नानांविषयी भास्कररावांनी वरील भाष्य केले आहे.

**१.२.४.१०. तणकट :**

कादंबरीचा नायक कबीर कांबळे याने त्यांच्या समाजाला म्हणजे महार समाजाला शासनाकडून ज्या सवलती मिळतात त्या देणारे नेते त्यांना आवडू लागतात आणि मग सारा समाज त्यांना डोक्यावर घेतो. आमच्या माणसांना सगळ फुक्कट पायजे. तेही जलद पाहिजे. फुक्कट काहीही मिळवून घेणं हा आपल्याला मोठा आनंद असतो. त्यामुळे जो जो फुक्कट देण्याच्या भरभरुन घोषणा करील त्याच्या पाठीमागं जाण्यात आमच्या माणसांना मोठेपणा वाटतो. त्यांना सगळं तयार फुक्कट आणि जलद मिळालं की खूश. घेण वाईट आणि देणारा तो उपकाराखातर देतो. त्यातून मिंदेपण येणार हा विचार करायला आमच्या माणसांना सवड नाही. उलट घेण्याची आपली परंपरा बलुत्यासारखीच की. सततच्या अन्यायाचा हक्क म्हणून सवलती ही गोष्ट मला मान्य आहे. पण सवलतीमागची भूमिकाच आम्हाला कुणी सांगितली नाही. त्यामुळे मिळेल ते ओरबाडत सुटायचं, ही प्रवृत्ती आमच्या नेत्यात आली आणि नेते आमच्या माणसांनाच ओरबाडून खात सुटले. फक्त आता ते हुशारी कराय लागले. 'आपल्या समाजाला ओरबाडून खायचं पण खाण्याआधी म्हशीला दूध काढण्यापूर्वी भरडा ठेवतात तसं काहीतरी ठेवत राहायचं हे शहाणपण त्यांनी कमावलंय. आणि हे शहाणपण तुमच्याजवळ नसल्यामुळे माणसं त्याच्याकडे जातात. तुमच्याकडं येत नाहीत.'(पृ.२१४) कबीरने केलेल्या भाष्यातून त्याच्या जातीतील लोकांच्या फुकट मिळविण्याच्या हव्यासी वृत्तीचा फायदा घेऊन त्यांचे नेते मंडळी स्वतःचा स्वार्थ साधून घेतात हे स्पष्ट होते.

कबीरच्या मित्रांनी तालुक्यातील नेत्यांना शह देण्यासाठी दलित संघात तालुकास्तरीय मेळावा जाहीर केला पण अलताफ कांबळे, बनसोडे या तालुक्यातील नेत्यांनी प्रतिमेळावा भरविला. त्यामुळे कबीरच्या मित्रांना तोंडावर पडण्याची वेळ आली. कबीर मात्र या सर्वांपासून अलिप्त होता. मोहन बल्लाळ सारखा सवर्ण मित्र या सर्वांपासून अलिप्त होता. नेहमी तात्विक चर्चा व्हायची. तेव्हा मोहन बल्लाळ कबीरला आपण स्वविकास करण्यासाठी अभ्यास करावा तरच आपण टिकू. तेव्हा 'मरेपर्यंत करण्यासारखी चांगली गोष्टच शिल्लक नाही'(पृ.२०४) असे म्हणत त्याला अडविले तेव्हा त्याला उत्तर देताना मोहनचे भाष्य तात्वीक वाटते.

''अरे, चांगल्या गोष्टी अजूनही शिल्लक आहेत. या जगात नोकरीला वशिला लागतो वशिला. पण समाधानाने जगाय तर वशिला न्हाई लागणार? आपण आपल्याशी प्रामाणिक आहोत हे पटवून द्यायला तरी वशिला नाही लागणार? आणि तू भ्रष्टाचाराविषयी म्हणत असशील तर त्यावरही माझा विश्वास नाही. अजूनही स्वतंत्रपणे श्वास घ्यायची मोकळीक हया देशात आहे. फक्त चिकाटी पाहिजे. आज बाकीच्या भानगडीत पडायची गरज नाही. कारण तो काळ आज शिल्लक नाही.''(पृ.२०४) हे सर्व ऐकल्यावर कबीरने मोहन जमवित असलेल्या बातम्यांविषयी त्यालाच जाब विचारले तेव्हा मोहनने केलेले भाष्य ''अरे समाधानान जगाण्यासाठी आपण ज्या वास्तवात जगतो त्या वास्तवाचे सर्व संदर्भ आपल्याजवळ असावेत.''(पृ.२०४) अशा प्रकारे कबीर व त्याचा मित्र मोहन बल्लाळ यांच्यातील संवाद भ्रष्टाचारावर भाष्य करणारा आहे.

**१.२.४.११. डांगोरा एका नगरीचा :**

राजे रघुवीर सिंहाच्या ठिकाणी राणीविषयी प्रेम नव्हते. राणीची जवळीकही त्यांना हवी नव्हती. फक्त शरीर धर्माच्या पुर्ततेसाठी कधी ना कधी तापून जाऊन त्यांनी राणीच्या मनासारखं होऊ द्यावं, यात कोणता अडथळा होता हे मात्र समजत नव्हते, यावरील भाष्य लेखक करतो, ''काही स्त्रिया, आदीपुरुष फार मनमुख असतात. मनाला भावतात तेचं करतात. भावत नाही ते निक्षून टाकतात. शरीरधर्माची वाळवण त्यांना खुपत नसते असं नाही, पण ती ते कडाक्यानं स्वीकारतात. कष्टी होतात. मौनी होतात किंवा मग कसल्यातरी मोहिनीत स्वतःला बुडवून टाकतात. एखाद्या स्त्रीनं आपल्या पतीला किंवा एखाद्या पुरुषानं आपल्या स्त्रीला असं मनाबाहेर ठेवलं तर काय होत असेल? ज्याचा त्याला ठाव, तो ताण, ती वेदना.''(पृ.६६) शरीर धर्माविषयी स्त्रीच्या मनातील विचार व प ुरूषांचे वागणे याविषयांचे मत वरील भाष्यातून व्यक्त होते.

चैत्र पाडव्याच्या दिवशी साई खेडात दोन ठिकाणी जे जाहिरनामे लावले होते. त्यावरील भाष्य लेखक सांगतो, ''संशय, अविश्वास, भीती, जगण्याचं रसायन यांनी कालवलं की माणसांची मन कातर होतात आणि आसरा शोधू लागतात. सत्ता ज्यांच्या हाती त्यांना अशा भयग्रस्तांचा भरवसा मोठा असतो. त्यांना पिळून वळून केलेले दोर सगळया सामाजिक विकासाला वेसण घालू शकतात, साईखेडाला दोघा चौघांनी एका मंतरलेल्या रिंगणात खेचून आणलं होतं.''(पृ.२७४) वरील भाष्यातून साईखेडाला लागलेली घरघर व्यक्त होते.

राजकुमार रघुवीर सिहांची टयूटर गार्डीअन म्हणून क्लारा साईखेडात रुजू झाल्यानंतर त्या दोघांमधील निर्माण झालेल्या नात्याचे चित्रण पुढील भाष्यातून सरदेशमुख करतात. ''ओंजळभर

फुलं आणून तिच्या शेजारी ठेवावीत, टपोर जांभळांनी भरलेला केळीच्या पानाचा हातोहात केलेला द्रोण तिच्या रक्सॅकमध्ये अलगद खोचावा, नाचणाऱ्या मोराला आपली चाहुल न देण्याचा इशारा करीत, तिच्या बोटांना धरुन हलकेच वेळूबेटाआड निमूट उभं राहावं, पूर्णिमेच्या चंद्राला दोन्ही हात जोडून नमस्कार करावा.... करायला लावावा... अशा त्याच्या वागण्यानं मिस क्लारा पुरती गोंधळून जायची. थांग लागत नाही तो त्याचा की आपल्याच स्वतःचा, तिला कळेनासं झालं.''(पृ.९) रघुवीर सिंहाच्या व क्लाराच्या मनातील भाव वरील भाष्यातून प्रकट होतो.

**१.२.४.१२. बारोमास :**

एकनाथसारख्या उच्चशिक्षित तरुणाची वैफल्यग्रस्त मानसिकता बारोमास मधून व्यक्त होते. उच्चशिक्षण घेऊनही डोनेशन न भरू शकल्यामुळे शेती हा आपला पारंपरिक व्यवसाय करताना त्याला शेतीत आधुनिक तंत्राचा वापर करून खर्च जास्त व नफा कमी त्यामुळे नेहमी तो कर्जातच बुडालेला असतो. मागची उधारी देणे व पुढच्या खर्चासाठी कर्ज घेणे. म्हणून त्याने आपल्या कर्जबाजारी पणावर केलेले भाष्य समर्पक वाटते 'कर्ज आणि उधारी...हेच आपलं भाग्योदय!'

निसर्ग, सावकार आणि सरकार हे शेतकऱ्याचे तीन शत्रूच आहेत. सावकाराकडून कर्ज उचलून पीक उभे करणे तसेच ओला व कोरडा दुष्काळ या निसर्गाच्या कोपाला सामोरे जाणे आणि या सर्वांतून पीक आलेच तर त्याला भाव मिळेलच याची खात्री नाही आणि यामुळे शेतकऱ्याला सुख ते कसले मिळतच नाही. शेतकरी म्हणून जन्माला येऊ नये. ''शेतकऱ्याच्या पोटी जल्माले येणं म्हणजे मांगल्या जन्मातलं पाप फेडणं झालं आता. जो शेतकऱ्याचे पोटी जल्माले आला, समजावं की यानं मांगल्या जल्मात लय पाप केलं!'(पृ.१९०) यातून लेखकाने शेतकरीपुत्राच्या जीवनावर केलेले भाष्य हृदय पिळवटून टाकणारे वाटते.

**१.२.४.१३. भूमी :**

नोकरी निमित्त मद्रास सोडून मैथिलीने बेंगलोरला जाण्याचा निर्णय घेतला त्यामागे तिचा उद्देश खर तर तिच्या पदरी आलेले कौटुंबिक नैराश्य होय. तिने या नैराश्यातूनच शंतनू आणि अंशुमन यांच्यापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला होता.त्यावेळी लेखिकेने केलेले भाष्य पुढीलप्रमाणे आहे. ''आपल्यामुळं समुद्राचं पाणी काही वाढत नसतं, आपणच किती खोल, किती दूर जातो हे महत्वाचं.''(पृ.१८२) मैथिली मद्रास युनिव्हर्सिटीत आल्यानंतर डॉ.पद्मनाभन की जे सायकॉलॉजिचे प्रोफेसर होते, त्यांचे व मैथिलीचे मैत्रीचे संबंध होते. ती त्यांना बेंगलोरला जाण्याचा निर्णय सांगायला गेली तेव्हा पद्मनाभन म्हणाले, खर तर त्यांनाही बेंगलोरला जायचे होते, पण त्यांना

त्यांच्या आजारी पत्नीमुळे मद्रास सोडता आलं नाही. तेव्हा ते स्वतःच्या मनाची समजूत काढण्यासाठी वरील भाष्य करतात. आपण कितीही समृद्ध असलो तरी आपण आपला विकास सतत करीत राहिला पाहिजे, हे त्यातून त्यांना सांगायचे आहे. लेखिकेने निर्भयपणाविषयी केलेले भाष्य,

''निर्भय तर आपण आपले होत असतो, अंशुमन! कुणी कुणाला द्यायची ती गोष्ट नाही.''(पृ.१७३) मैथिली आणि अंशुमन आई व मुलगा यांच्या संवादात अंशुमन आईला म्हणतो, 'डॅडी म्हणतात तू ओव्हर अँबिशस आहे.' तेव्हा मैथिली म्हणते, 'आपल्याला जे करावसं वाटते ते आपण करतो. त्यातल सगळच आपल्याकडून होत असं नाही.' 'बाबांना बरोबर घेऊन तू यशाचे शिखर गाठायला हव होत तसेच बाबांच्या भ्याडपणा घालवून तू त्यांना निर्भिड बनवायला हवं होतं' अशी अंशुमनची अपेक्षा होती. हे एकंदर त्यांच्या संवादातून प्रतीत होते तेव्हा अंशुमनच्या मताचे खंडन करण्यासाठी मैथिलीने वरील भाष्य केले आहे. त्या भाष्यातून व्यक्त केलेले मत वास्तविक सत्य भासते.

**१.२.४.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : लेखक कुटुंबव्यवस्थेतील निर्मितीला असलेले स्थान भाष्यात मांडतो, 'आपल्या जीवनात निर्मिती हा अविभाज्य घटक आहे. स्त्रियाना सृजनशीलतेची किवा निर्मितीशीलतेची जन्मजात देणगी मिळालेली असते. परंतु कुटुंबातील रितीरिवाजानुसार निर्मितीशीलता कुंठीत होताना दिसते. निर्मितीशीलतेला कुटुंबात स्थान नाही.'' सुमाधुरी मात्र या विचाराला फाटा देण्याचा विचार करते. या संदर्भाला अनुसरून तिने पुढील भाष्य केले आहे. ''निर्मिती हॉटेलातल्या गॉसिपमधलं, सेमिनारमधलं, सभामधलं अशी घराबाहेर ठेवायची पद्धत पडलीय. ती घालवून निर्मितीला कुटुंबातच जागा करून दिली पाहिजे.''(पृ.५४) अशा प्रकारे निर्मितीला कुटुंबव्यवस्थेने अनन्यसाधारण महत्व दिले पाहिजे हे वरील भाष्यातून लेखक मांडतो.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरु : हर्षद त्यांच्या कौटुंबिक अडीअडचणींना वैतागला होता. त्याच्या आईचे अफेअर होते. त्याच्या स्वगतामधून सतत त्याच्या मनाची होणारी घुसमट व्यक्त होतांना दिसते. त्यात त्याचा मित्र विलास याने या गोष्टीचा त्याच्यासमोर स्पष्ट उल्लेख केल्यामुळे तर तो फारच संतापला. विलासला आपण मित्र म्हणून निवडले नव्हतेच. एका शाळेला होतो, म्हणून मैत्री होती. आपण आपल्या जीवनात येणाऱ्या कोणत्या व्यक्ती निवडाव्यात व कोणत्या निवडू शकत नाही यावर हर्षदचे भाष्य समर्पक आहे. 'आई निवडता येत नाही, वडील निवडता येत नाहीत,

बहिणभाऊ नाहीतच आपल्याला. तेही आपण ठरवू शकत नाही. कोणतेच नाते आपण निवडू शकत नाही. मित्र निवडायचे. करिअर निवडायची. बायको निवडायची.'(पृ.७२) वरील भाष्यातून हे स्पष्ट होते की काही गोष्टी निवडण्याचे आपल्या हातात नसते. पण काही गोष्टींची निवड आपण आपल्या मतानुसार करू शकतो.

**१.२.४.१५. खारीच्या वाटा :**

खारीच्या वाटा या कादंबरीत लेखक दुष्काळावर भाष्य करतात 'वैशाखातच विहिरीला कोरड पडायला लागे जेष्ठात तर पार उघडा होई. पाण्यासाठी वणवण सुरू-नदीपात्रात डवरा खणायचा.वाळूतून पाझरलेल पाणी साडेपर्यंत ताटकळत बसायचं. वाटीवाटीन अलगद हंडा भरायचा. पुन्हा थांबायचे तासनतास वाट्या, भगुली वरखाली करून मनगट भरून येत. एवढा आटापिटा एक दिवसाच्या पाण्यासाठी!'(पृ.७१, ७२)

**१.२.४.१६. फेसाटी :**

दादा, हिराक्का, नंदाक्का, सुंदाक्का, सुमाताई, इंदाबाई, नाथा व नाथाच्या पाठीवर बऱ्याच दिवसांनी झालेली नकुसा अशी ही भावंडे होती. नकुसाचा जन्म झाला तेंव्हा सुंदाक्का काकूला म्हणाली त्याने काकू जरी दुखावली असली तरी तिचे बोलणे संयुक्तिक वाटते. पहिल्याच पाच पोरी असताना नकुसाला जन्माला कशाला घातले. पहिलीच आपली किती अबदा हाय हे तिचे मत दोघींच्या संवादातून समजते हे तिचे भाष्य छोट्या कुटुंबाचे महत्त्व पटविणारे वाटते. सुंदाक्काला नको वाटलेली ही नकुसा एक दिवस देवाघरी जाते तेव्हा काकूचे त्यावरील भाष्य,'देवाला पण कळलं असावं का?' नकुसा नावाची पोरगी कुणालाबी नकुच असत्या असं? कामूनं ही नकुसा नाव ठिवलं? दुसरं नाव ठिवलं असतं तर जगली असती का? सुंदाक्काच्या मनाजोगं झाल अशील का? नकुसाला पाळणा मिळाला नाय. पोत्याची झोळीच तिझा पाळणा हुता, त्या झोळीला पण नकुसा नग हुती का? असं अनेक इचार मनात येत हुतं.'(पृ.३२) काकूच्या या स्वगतरुपी भाष्यातून दारिद्र्याला सामोरे जाणाऱ्या कुटुंबात जन्मलेल्या मुलींचे हाल व्यक्त झाले आहेत. नको असलेल्या मुलीचा जन्म ह्या आजच्या काळातील वास्तवाला लेखकाने स्पर्श केला आहे.

नाथाची मोठी बहीण हिराक्काला तिच्या मामाच्या मुलाला दिले होते. थोड्याच दिवसात मामीने हिराक्काला विहिरीत ढकलून दिले. जिवंत असताना हिराक्काला कसलेच सूख मिळाले नाही. मेल्यानंतर तिचे दहन करण्यात पण पावसाचा अडथळा येत होता. तेव्हा काकूचे हिराक्काच्या मरणावरील भाष्य हृदय पिळवटून टाकते, ''देवा, कशाला जन्माला घाटलाच रं माझ्या लेकीला,

येवढं हाल करतुयाचं. जिती असताना तिला कवा सुख लागलं नाय. मरुनबी तिझी येवढी परक्षा बघतुयाचं रं बाबाऽऽ का? असा कसा डोळं झाकून बसलायचं रं बाबाऽऽ?''(पृ.४२) एका स्त्रीने एका स्त्रीला एवढे छळणे हे माणुसकीला काळीमा फासणारे आहे. जीवंत असताना हिराक्काला छळ आणि छळच सहन करावा लागला पण दुर्दैवी हिराक्काला मृत्युनंतरही दफन प्रसंगी पावसानेही अडथळा आणलेला दिसतो. अशाच प्रकारे कादंबरीत लेखकाने दुष्काळ, कर्जाच्या ओझ्याखाली दबलेला शेतकरी, जास्त मुली असलेल्या घरातील मुलींचे हाल, सासरकडील सासुरवास या सारख्या समस्यांवरही भाष्य केले आहे.

एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील आलेली ही सर्व भाष्ये कादंबरीच्या कथानकाला गतिमान बनवून परिणामकारक दिशेकडे घेऊन जाण्यास उपयोगी ठरतात. कादंबऱ्यांमधील ह्या भाष्यांतून पात्रांच्या व्यक्तिमत्वाबरोबरच अंतरंगावर प्रकाश पडतो. अत्यंत छोट्या छोट्या वाक्यातूनही तात्विक पातळीवरील भाष्ये आलेली आढळतात. सभोवतालच्या समाजाविषयीच्या रुढी-परंपराची जाणीव करून देणारी भाष्ये सामाजिक भान देतात. काही भाष्ये स्त्री-पुरुष नातेसंबंधातील वस्तुस्थिती समजण्यास मदत करतात. तसेच छोट्या छोट्या भाष्यरूपी वाक्यातूनही फार मोठा गर्भित अर्थ मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखकांनी केलेला आहे, हे प्रकर्षाने जाणवते. समाजाकडे, जीवनाकडे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन भाष्यातून अत्यंत परिणामकारकपणे व्यक्त झाला आहे असे म्हणता येईल. एकूणच कादंबरीतील भाष्यविषयी विचार केला असता घटना, प्रसंग पात्रांना, जिवंत करण्याचे व कथानकास पुढे नेण्याचे कार्य भाष्यातून होते.

**१.२.५. वर्णन :**

इतर साहित्य प्रकारातील वर्णनापेक्षा कादंबरीमध्ये आलेले वर्णन मोठ्या प्रमाणावर बदलणारे असते. कोणतीही कादंबरी एका कलावकाशात घडत असते. त्यात माणूस सामाजिक, राजकीय, आर्थिक, नैतिक, तात्त्विक अशा घटनांनी बंदिस्त असतो. कादंबऱ्यात दृश्याचा भावानुभव साकल्याने जाणवावा अशी प्रतिकात्मक वर्णने दिसून येतात. निसर्गवर्णनातून पात्रांची मनोवस्था व्यक्त करता येते. हे स्पष्ट करताना आत्मविश्लेषक ॲमिएल हयांनी म्हटले आहे, की 'निसर्गदृश्य ही सुद्धा एक नाडस्थानच असते ना.'[८९] साहित्यकृतीला पूर्णत्व देण्यास आणि साहित्यकृतीचे कथानक पुढे नेण्यास वर्णन हा घटक साहाय्यभूत ठरतो. माणूस साहित्यकृतीत असलेल्या घटना- प्रसंग, निवेदन, स्वगत, भाष्य, म्हणी-वाक्प्रचार, शब्दकळा ह्यांमधून व्यक्त होतो. असं असले तरी माणसाच्या अभिव्यक्तीला ह्यातून पूर्णत्व सिद्ध होतेच असे नाही. म्हणून

वर्णनाचे महत्व साहित्यकृतीच्या पूर्णत्वासाठी व कथानकासाठी महत्वपूर्ण असते. त्यात प्रामुख्याने व्यक्तिवर्णने, स्थलवर्णने, निसर्गवर्णने अधिक साहाय्यकारी ठरतात. ह्या गोष्टी लक्षात घेता साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्शे आलेली वर्णने कितपत साहाय्यभूत ठरतात हयाचा प्रातिनिधिक स्वरुपात परामर्श घेऊन आलेले वर्णन... हुबेहूब मूर्ती ठसविणार आहे....ह्या शब्द योजनेमुळे...प्रतिमा वाचकांच्या मनावर ठसा उमटविते.

**१.२.५.१. ययाति :**

ययाति अश्वमेध यज्ञासाठी महालाबाहेर पडतो. त्या दिवसाच्या आठवणी त्याचे मन अजूनही फुलवितात असे ययाति म्हणतो. जवळजवळ दीडवर्ष तो अश्वमेधाच्या घोड्याबरोबर फिरत होता. ''प्रत्येक भागातील भूमी किती मनोहर होती. ऋतूऋतूला ती नवी सुंदर वस्त्रे नेसत होती. नाना प्रकारच्या अलंकारांनी नटत होता. एखाद्या वेळी ती लोकमाता सजीव होऊन माझ्यापुढे उभी राहिली आहे असा मला भास होई; मग नद्या या तिच्या दुग्धधारा वाटत पर्वतांच्या स्तनांतून वाहणाऱ्या या धारांनी ती आपल्या लाखो लेकरांचे पोषण करीत आहे, या कल्पनेने मी पुलकित होई.''(पृ.३४, ३५) वरील  वर्णनातून एकूण भूमीवरील निसर्गाचे वर्णन साकार होते.

देवदानवांचे युद्ध होण्याचा संभव निर्माण झाला होता. हे युद्ध होऊ नये म्हणून अंगिरसांनी शांतियज्ञाचा संकल्प सोडला होता. या यज्ञात दानव विघ्ने निर्माण करणार हे अंगिरसांच्या लक्षात आल्याने त्यांनी ययातिसारख्या दिग्विजयी युवराजाला यज्ञ संरक्षणासाठी आमंत्रित केले. त्यावेळी अंगिरसांच्या आश्रमाकडे जातानाचे वर्णन ययाती पुढीलप्रमाणे करतो, 'सायंकाळ झाली होती समोरच्या झाडीतून कृष्ण धूम्ररेषा निळसर आकाशाकडे वक्र गतीने जात होत्या त्यांची ती हालचाल नर्तकीच्या तालबद्ध पदक्षेपाप्रमाणे वाटत होती. घरट्याकडे परत येणारी पाखरे मधुर किलबिल करीत होती. जणू काही पश्चिम दिशेला सुंदर यज्ञकुंड प्रज्वलित झाले होते. त्यात मेघखंडाच्या आहुती दिल्या जात होत्या आणि हे सारे पक्षी ऋत्विज बनून मंत्र म्हणत होते.'(पृ.४८) वरील निसर्ग वर्णन करताना लेखकाचे कवीमन जागृत झाल्यासारखे वाटते. अश्वमेध यज्ञाच्यावेळी बाहेर पडलेल्या ययातीला जी निसर्गाची विविध रुपे पाहायला मिळाली व त्याचे कवीमन जागृत झाले व ते त्याने सदर वर्णनातून व्यक्त केले. 'शांती आणि उन्माद यांचे या भ्रमणात किती रुपांनी मला दर्शन झाले, म्हणून सांगू! धरित्रीच्या अंगावर उभ्या राहिलेल्या रोमांचासारखी भासणारी हिरवळ आणि आपल्या पुष्ट दंडानी आकाश सावरण्याकरता गर्वाने उभे असलेले देवदार वृक्ष! आशीर्वादाच्या वेळी पुरोहितांनी गंगाजलाने प्रोक्षन करावे, अशी वाटणारी पावसाची झिमझिम

आणि प्रलय काळाच्या प्रचंड लाटांची आठवण करून देणाऱ्या त्यांच्या हत्तीच्या सोंडेसारख्या धारा! करंगळीवर पळभर बसले, तर जणू काही चिमुकली रत्नजडित अंगठी घातली आहे, असा पाहणाराला भास उत्पन्न करणारे सुंदर, चिमणे फुलपाखरु आणि घोड्यासकट सैनिकाला गिळून टाकून, झाडाला विळखा घालीत त्यांचा चुराडा करणारा भयंकर अजगर! देवालयाची उत्तुंग गोपुरे आणि गणिकांची मनोहर मंदिरे! तीन तीन पुरुष उंचीचे वीरांचे पुतळे आणि डोंगराच्या अंतरंगात कोरलेल्या रमणींच्या मोहक आकृती!'(पृ.३७,३८) वरील निसर्गवर्णने व स्थळवर्णने यांचा मिलाफ करून लेखकाने अतिशय काव्यात्मक स्वरुपात वाचकांसमोर मांडली आहेत.

**१.२.५.२. रथचक्र :**

हताश झालेली नायिका जेव्हा आत्महत्येच्या विचाराने विहिरीवर जाते तेव्हाचे वर्णन लेखक करतो. 'खोल गेलेल्या विहिरीचं पाणी काळोखात लुप्त झालं होतं. विहिरीवर टाकलेली पोफळ कुठे आहे ते तिनं पाहिलं. पोफळ, रहाटाची माळ चुकवून तिला उडी टाकायची होती. ''जगदंऽब जगदंऽऽब...'' आता ती मोठ्यानं जप म्हणत होती. विहिरीच्या गाभाऱ्यात तो आवाज घुमत होता. पायांतल्या जोडव्यांकडे तिचं लक्ष गेलं. पितळेच्या पाटल्या, किटलेली कुडीजोड सारं काढून तिनं हातणीवरच्या द्रोणीत ठेवलं. विहिरीच्या काठावर ती पुन्हा आली. मागच्या बाजुला गेलेलं मंगळसूत्र सारखं करण्यात ती गुंतली होती. एवढ्यात तिचा पाय घसरला आणि वेडीवाकडी ती खाली कोसळली. मिटलेल्या डोळ्यांपुढे अंधेर पसरला होता. चोपण्याच्या फटक्यासारखा आपल्या छातीला मार बसला एवढंच तिला कळलं.(पृ.२०७) विहिरीच्या जागेचे वर्णन तिच्या आत्महत्येच्या प्रयत्नावेळचे लेखक मांडतो.

**१.२.५.३. स्वामी :**

थेऊरच्या नदीकाठाचे वर्णन माधवराव रमाबाईंना सांगतात, ''ती जागा फार सुंदर आहे. प्रशस्त घाट आहे. या घाटावर जरा वरच्याबाजूला जाऊन उभं राहिलं व पाहिलं, की काळ्या फत्तरांनी रेखत गेलेला नदीकाठ डोळयांत भरतो. नदीच्या पात्रावरून वाऱ्याबरोबर सळसळ येणाऱ्या लाटा मनाचे तरंग उठवतात. नदीच्या दोन्ही बाजूंना पसरलेले विस्तीर्ण मळे आणि वरचे निळेभोर आकाश मनाला भुरळ घालते.''(पृ.३३) निसर्गवर्णन व स्थळवर्णन लेखकाने वरील वर्णनातून वाचकांसमोर उभे केलेले आहे.

माधवराव व निजाम एकमेकांची भेट घेण्यास आले. तेव्हा लेखकाने केलेली हुबेहुब व्यकितवर्णन पुढीलप्रमाणे 'दख्खनच्या दोन बलाढ्य दौलतींची सार्थ प्रतीके जणू एकमेकांसमोर

उभी होती. पेशव्यांनी अंगात पांढरा शुभ्र चुणीदार अंगरखा घातला होता. त्यांच्या तांबड्या पगडीवर पाचूचे हिरवेकंच पिंपळपान उठून दिसत होते. निजामाच्या हिरव्यागर्द किमॉशवर हिऱ्याच्या एक्क्याला लावलेल्या माणकांचा शिरपाव मोठा खुलून दिसत होता. अंगात भरजरी अंजेरी जामा घातलेला, उंचापुरा, सावळा, रेखीव चेहऱ्याचा तिशीचा निजाम आपल्यापेक्षा आठ-दहा वर्षांनी लहान असलेल्या, कर्पूरगौर शेलाट्या अंगलटीच्या तरूण पेशव्यांच्या सौंदर्यावर खूश होऊन, आपल्या घाऱ्या बदामी डोळ्यांनी टक लावून पाहत होता. निजामाचे व्यक्तित्व पाहून मनात आनंदलेले माधवराव चेहऱ्यावरची रेषाही न बदलू देता, अथांग समुद्राच्या नीलिम्याची झाक असलेल्या आपल्या गहिऱ्या पाणीदार नेत्रांनी त्याच्याकडे रोखून पाहत होते. माधवरावांच्या नेत्रांत बुध्दीमत्ता आणि दरारा यांचे पाणी खेळत होते, तर निजामाच्या डोळयांत सौम्य, प्रसन्न छटा उमटली होती. माधवरावांच्या भालप्रदेशावर आडवे चंदनाचे केशरी शिवगंध रेखाटले होते आणि त्यावर कस्तुरीचा काळा ठिपका लावला होता. कानातील भिकबाळीच्या पाणीदार मोत्यांची गुलाबी झाक गोऱ्या गालावर उमटली होती, तर निजामाने घातलेला हिऱ्यांचा हार अंजेरी जाम्याचा रंग पिऊन एक वेगळयाच रंगच्छटेने झगमगत होता. पेशव्यांच्या गळ्यात एकच एक टपोऱ्या मोत्यांची माळ आणि कमरेभोवती लपेटलेल्या जरतारी गुलाबी दुपेटयात बिचवा, कटयार आणि पल्लेदार तलवार ही अवजारे खोवली होती. निजामाने दोन्ही हातांवर चढवलेल्या सोनेरी दस्त-बख्तावर विविध खड्यांचे नाजूक काम केले होते आणि त्यांच्या जरतारी दुपेटयात पेशकब्ज, कटयार आणि रत्नजाडीत म्यानात पल्लेदार तलवार खोवलेली होती. (पृ.२४५) वरील वर्णनातून लेखकाने माधवराव व निजाम यांच्या व्यक्तिरेखा हुबेहुब वाचकांच्या समोर मूर्त स्वरूपात आणल्या आहेत.

**१.२.५.४. स्मरणगाथा :**

'स्मरणगाथा' ही कादंबरी म्हणजे वयाच्या तिसाव्या वर्षांपर्यंत भ्रमंती केलेल्या व्यक्तीचा जीवनप्रवास आहे. त्यामुळे या प्रवासात अनेक स्थलवर्णने, व्यक्तीवर्णने व निसर्गाची विविध रूपे प्रकट करणारी निसर्गवर्णने ही मोठ्या प्रमाणावर लेखकाने रेखाटली आहेत. लेखकाचे जन्मगाव परतवाडा, मुळगाव कोकणातील गुडघे, तसेच घर सोडून गेल्यानंतर मुंबई, अकोले, नाशिक, नागपूर, धुळे, तसेच मराठवाडा प्रान्त इत्यादी ठिकाणी भ्रमंती केल्यामुळे स्थलवर्णने भरपूर आलेली आहेत.

गो.नी. दांडेकरांच्या 'स्मरणगाथा' कादंबरीचे वैशिष्टये म्हणजे जेव्हा एखादया व्यक्तिचा उल्लेख प्रथमदर्शनी येतो तेव्हा त्या व्यक्तिची व्यक्तिरेखा लेखक वाचकांसमोर व्यक्तिवर्णनातून

उभी करतो. निसर्गवर्णनामध्ये मनाला भुरळ पाडणारा समुद्र व कोकणचे वर्णन लेखकाने केले आहे. प्रवरा नदी व तिच्या भोवतालचा परिसर(पृ.१७१) वसंतगड व त्याच्या पायथ्याशी असलेले तळबीड गाव(पृ.२३३). देहू, इंद्रायणी नदी, भंडारा डोंगर यांचे वर्णन(पृ.३४६) नर्मदा नदीचा परिसर या सर्वांचे वर्णन लेखकाने रमणीय केले आहे. सप्त्यासाठी मुंबईला गेल्यामुळे पुणे ते मुंबई पायी प्रवास तसेच परतीचा प्रवास, रेल्वेतील प्रवास यांचे वर्णनही लेखकाने सविस्तर केले आहे.

लेखक अकोल्याला होते तेव्हा ते गुरे राखायला प्रवरा नदीच्या परिसरात गेले. तेव्हा प्रवरा व तिच्या आसपासचा परिसर याचे वर्णन लेखक करतो, ''प्रवरेचं खोरं हिरवंगच्च झालेलं आम्हासमोर दिसू लागलं. झिलमिल वाहणारी प्रवरा. तिच्या दोन्हीं बाजूंचीं इवलीं इवलीं खेडीं. खपरेली घरांचीं, अन् केंबळांच्या शाकाराचीं. मधेंच चमकणारे ऊसमळे. ऐल डोंगरदाटी, तशीच ती पैलही. ऐल डाव्या हाताला, गर्धनीचा नीट आकाशीं उभवलेला डोंगरसुळका.''(पृ.१७१) लेखक देहू भंडाऱ्या डोंगरावर गेला होता. तेव्हा तेथील स्थलवर्णन लेखकाने खालीलप्रमाणे केले आहे. 'भंडाऱ्याला दक्षिण दिशेनें वळसा घालीत, देहू गांवाशेजारून पुनः इंद्रायणी उत्तरेकडे वळली आहे. ती पूर्वेकडे असलेल्या आळंदीकडे वाहात चालली आहे. भंडारा दक्षिणोत्तर पसरला आहे. महादेवाच्या साळुंकेसारखा त्याचा आकार आहे. तो एकुटवाणा डोंगर. आगंमागं कांही नाहीं. देहू तिथून अडीच मैल. शिखरावर पांडुरंगाचं देऊळ. पुढं त्यापासून विलग सभामंडप. त्याशीं काटकोनांत एक ओवरी. पन्नास पावलांवर एक विहीर.'(पृ.३४६) असे हे अतिशय एकान्त स्थळ त्याचे वर्णन लेखकाने कौशल्याने केल्याने मुर्तरूप धारण करते.

कादंबरीत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या रूपाचे वर्णन लेखकाने केले आहे. त्याचा आढावा आपण प्रमुख व्यक्तिरेखामध्ये घेतला आहे. कादंबरीच्या दृष्टीने पात्र जरी गौण असले तरी लेखकाने त्या व्यक्तीचे वर्णन प्रभावीपणे मांडले आहे. रघूजी राजे भोसले त्यांनी लेखकाच्या वडिलांना गुरूभाऊ मानले होते. त्या रघूजी राजाचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे, 'भव्य धिप्पाड शरीर, सांवळा वर्ण, भल्या थोरल्या मिशा अन् चांगले ठोसर कल्ले. मुद्रा चांगली भरदार. नाक म्हणजे एक प्रांतच होता. मुद्रेवर रूबाब अन् सौजन्य या दोन्हींच एकत्र मिश्रण झालेलं दिसत होत.'(पृ.७८) गोपाळ नाशिकला गेला तेथे भद्रकाली रस्त्याजवळच्या खानावळीत त्यांना खानावळ मालकाने नेले. तेव्हा तिथल्या बल्लवार्चांचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे-'गळ्यात रूद्राक्ष, वाढलेले केस, दोन्ही भूवयांना शेंदरी टिळा, शेंदूर खाल्ल्यानं आवाज पार

बसलेला.'(पृ.१४५) याचा अर्थ असा की लेखकाने कादंबरी लिहिताना मुख्य पात्र तर रंगविलेली आहेतच पण गौण पात्रही वाचकांच्या समोर हुबेहुब उभी करण्याचा उत्कृष्ट प्रयत्न केला आहे.

नर्मदा परिक्रमा करीत असताना गोपाळ तीरावरून पुर्वेकडे चालत होता. 'मैल दोन मैलावर छोटीं छोटीं गावं. त्यामधून चुन्यानं रंगवलेली एखादी हवेली. बाकी मग सगळीं लहान लहान घरं. काही खपरेली. काही कुडाची छतं असलेलीं. शेतांवावरांतून कुठं आउतं चाललेलीं. हिकडेतिकडे मोकाटपणं हिंडणारी गुरं. त्यांच्यावरल्या गोचिडया टिपण्यासाठीं त्यांच्या भोंतालीं हिंडणारे बगळे. कुठं कुण्या झाडाखालीं गुराखी पोरं झोपलेलीं पालथी. उभे धरलेले हाडकुळे पाय हलवीत. पायांखालीं पाऊलवाट, क्वचित कुठे तिच्यावर गोखरू. कुठं पावसाळ्यांतल्या पुरांत वाहून आलेला तवंग. त्यांत कुजलेले काटे.'(पृ.४४७) अशा प्रकारे लेखकाने निसर्ग, व्यक्ती, स्थल यांचे हुबेहुब वर्णन वाचकांसमोर उत्कृष्ठपणे उभे केले आहे. ती वर्णने वास्तवता जाणवून देण्याचा प्रयत्न करतात.

### १.२.५.५. सत्तांतर :

'सत्तांतर'मध्ये निसर्गाचे वर्णन माडगूळकरांनी हुबेहुब साकार केले आहे. निसर्ग हा माडगूळकरांचा सोबतीच आहे. पाणगळी वृक्षांच्या ह्या मोठ्या जंगलाचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतो. पानगळी वृक्षांचं हे मोठं जंगल होतं, इथं नाना वृक्ष होते, वेली होत्या, झुडपं होती. साग, बिजा, ऐन, करू असे दहा-दहा, बारा-बारा पुरूष उंचीचे भव्य वृक्ष होते. मोठ्या तळ्याच्या काठानं आणि या जंगलातून वाहणारे अनेक नाले आणि ओढे यांच्या काठांनी आंबा, चिंच, उंबर, जांभूळ, वड, पिंपळ असले फळांनी लहडणारे वृक्ष होते. उन्हाळ्यात झगझगीत रंगाचा फुलोरा येऊन वनप्रदेश सुगंधित करणारे सावरी, पळस, पांगारा, बहावा, मोहा असे फुलणारे वृक्ष होते. बांबूची घनदाट बेटं होती. इथं अनेक जंगली प्राणी राहत होते. अनेक जातींची पाखरं राहत होती. काही हंगामापूर्ती येत होती, जात होती, इथं आजूबाजूला तुरळक अशी आदीवासींची वस्तीही होती.(पृ.४) वरील वर्णनात पानगळी वृक्षांच्या या जंगलात विविध प्रकारचे वृक्ष, वेली, झुडुप, नाले, ओढे, फळझाडे, फुलझाडे, जंगलातील प्राणी इ. चे वर्णन लेखक करतो.

### १.२.५.६. झोंबी :

'झोंबी' या कादंबरीत लेखकाने व्यक्तीवर्णने, निसर्गवर्णने खुबीने रेखाटली आहेत. कृषीजीवनाशी घनिष्ठ संबंध सांगणारी कादंबरी असल्याने त्या संदर्भातही लेखकाने वर्णने केली आहेत. लेखकाने स्वतःच्या वडिलांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. 'भोकरी

रंगाचं पाणीदार डोळं. कटयारीच्या आकाराचं धारदार नाक. फुगवट नाकपुडया, गुटगुटीत अंग, तांबूस गोरा रंग. उन्हात तापला की गाजरासारखा दिसे.'(पृ.४) लेखकाने प्रमुख व्यक्तिरेखांचे वर्णन तर केले आहेच पण कादंबरीतील गौण पात्रांचे वर्णन करायला लेखक कमी पडले नाहीत. लेखकाचे शाळेत नाव घातल्यानंतर त्याने त्याच्या शिक्षकाचे वर्णन हुबेहुब केले आहे. 'एक शेलाटा, कुबडात किंचित वाकलेला, काळयाकबऱ्या रंगाचा, पट्टयापट्टयांचा मातकट कोट घातलेला पांढऱ्या धोतारातला मास्तर' या पहिलीतल्या मोठया आवाजात शिकवणाऱ्या मास्तरचे वर्णन येथेच थांबले नाही तर पुढे 'त्याचे डोळे गोलगोल मोठे होते कपाळावर आठ्या घालून चाळीशी नि कपाळ यांच्यामधनं तो पोरांकडं बघताना भीती वाटत होती.'(पृ.३४) पुढे लेखकाने निंबाळकर मास्तरांचेही वर्णन केले आहे. 'मला मारणाऱ्या निंबाळकर मास्तरांचे पाय किंचित वाकडे होते. पायाचे अंगठे सरळ पुढे न येता किंचित तिरपे होते. आणि त्यांच्या हातापायांची बोटं भुईमुगाच्या शेंगेच्या बोटकासारखी पुढं मोठी होती. त्यांच्यावर रुंद वाकडी नखं होती.'(पृ.३८) अशा प्रकारे अतिशय सूक्ष्म निरीक्षण करण्याचा लेखकाचा गुण ह्या वर्णनामधून येतो.

राममंदिरापासून जवळच मोटार अड्डा होता. मोटार अड्डा म्हणजे- कागल-कोल्हापूर, कागल-निप्पाणी असा प्रवास करणाऱ्या खासगी मोटारी थांबण्याची जागा. त्याचे वर्णन लेखकाने पुढीलप्रमाणे केले आहे. ''मोटार अड्डा 'अड्डा' असूनही शांत होता. चारी बाजूंनी झाडांची गार सावली पिंपळाचा वृक्ष राजासारखा मधी बसलेला, त्यांच्या अंगावर;''(पृ.४०) ''ताराला पहिली पाच मुलं असताना पुन्हा दोन जुळ्या मुली झाल्या. त्या दोघींच्या देखणेपणाचे वर्णन लेखकाने केले आहे, 'दोघींची काळीभोर जावळं, उठावदार नाकं, पाणीदार काळे मासोळीसारखे डोळे बघून दृष्ट लागे. एकीची चण बारीक तर दुसरीची- सुंदराची चण किंचित मोठी दोघीही गोऱ्यागोमट्या आणि सुंदर दिसत होत्या...'(पृ.८१) आपल्यासमोर ते दृश्य, व्यक्ती साक्षात उभी करण्याची क्षमता लेखकाच्या वर्णन शैलीमध्ये असलेली दिसते. लेखकाचे कुटुंब शेतीवरच उपजिविका करणारे होते. त्यामुळे झोंबी या कादंबरीत शेतीशी संबधित सर्व घटकांचा विस्ताराने उल्लेख आलेला आहे. लेखकाचे गाय, वासरू विशेषतः बैलांवर विशेष प्रेम होते. त्यांच्या गाईला झालेल्या वासराचे लेखकाने हुबेहुब वर्णन केलेले आहे, 'गायीचं थोरलं वासरू तापट निघाल होतं...त्याच्या अंगावर तांबडे-पांढरे ठिपके होते. कपाळावर पांढराधोट चांदासारखा ठिपका त्यामुळे ते देखणं दिसत होतं.'(पृ.२४१) लेखकाने वर्णनात पाल्हाळीकपणा न करता थोडक्यात पण सुबक वर्णन केले आहे.

### १.२.५.७. झाडाझडती :

जांभळी धरण होण्यापूर्वी जांभळीकर आपले जीवन सुखाने जगत होते. त्याचे वर्णन लेखकाने केले आहे. 'तिन्ही सांजेला गार वारा सुटलेला. गावच्या काळीत पेरवीच्या आणि केळीच्या अनेक बागा. बागांना वरचेवर पाणी सोडलेलं असायचं. रानाच्या अंगातून गारठा निघायचा नाही. खलाटीच्या रानानच गोम्यांन वर जांभळी गावाकडं नजर टाकली. लाडूबाच्या डोंगराच्या उताराला हजारबाराशे लोकवस्तीची जांभळी वसलेली गाव हिरव्या झाडांच्या दाटीत हरवलेला. तरीपण गावातली काही उंच रंगीत माडीची घरं, लाला जाधवाचा वाडा, दत्तू करवंदेचं तीन मजल्यांच घर, बामणाच्या दिगू आण्णाचा वाडा लांबूनही दिसायचे. गाव पांढरी भोवतीनं चिवारीचा तट. त्यामुळं गावची शोभा आगळी भासायची. जांभळीच्या वर डोंगरात देवबन. दाट झाडांची राई. त्यातलं लाडूबाचं पत्र्याचं देऊळसुद्धा उठून दिसत होतं. मावळतीची किरणं देवळावर फाकलेली. वरून डोंगराकडून गावाकडे येणारी पांद आता पोथीला बसल्यागत बडबडू लागली. गाईम्हशींच्या गळयातल्या घंटांनी आणि गुराख्यांच्या आरोळयांनी पांद भरून गेलेली. लाडूबाच्या दरडीवरून खाली ब्यां ऽ ब्यां ऽ करीत शेरडं शेपटया उडवीत येत होती.'(पृ.४) सदर वर्णनातून असे लक्षात येते. झाडाझडती ही कादंबरी लेखकाने धरणग्रस्तांच्या व्यथा, वेदना मांडण्यासाठी लिहिलेली असली तरी कथानकाच्या मूळ घटना प्रसंगाच्या ओघात निरनिराळया वर्णनांचे तपशीलवार लेखन केले आहे.

### १.२.५.८. राघववेळ :

लेखक रामराव मार्केच्या घराच्या ठिकाणाचे वर्णन करतो, ''मार्केचे घर, हरी जाधवाच्या घराच्या पार दुसऱ्या टोकाला. त्याच्या घरासमोरुन जाणारा रस्ता गावातला मुख्य रस्ता. गावाच्या एका टोकापासून पार दुसऱ्या टोकापर्यंत जातो.''(पृ.१३) या वर्णनातून वाचकास त्या स्थळाचा पूर्णपणे अंदाज येतो. लेखकाची वर्णनशैली आपणासमोर ते स्थळ उभी करते. पाटलाच्या खळ्याच्या स्थळाचे वर्णन करताना लेखक लिहितो, ''यादवने बैलगाडी जुंपली. त्यात गोणी, डाले टाकले. काल संध्याकाळपर्यंत पाटलाचे खळे शिंपून झाले होते. यादवनेच खळ्याच्या मधोमध पळसाच्या लाकडाची मेढ रोवली. तिला वर टोकाला सवंदड, आभाटा बांधला. ज्वारीच्या शेतातील जागा वारुन पाणी शिंपून बैलांकडून ती जागा तुडवून घेतली. खळ्याची जागा टणक झाल्यावर त्याने आणि बेण्याने मिळून खळ्याला गोलाकार कडब्याच्या पेंढया लावल्या. खळ्याची परसडी तयार झाली. पाटलाने हळद कुंकू वाहून पूजा केली.''(पृ.१४३) अशा प्रकारे

गावगाड्यातील, कृषी संस्कृतीत शेतकऱ्यांच्या दृष्टीने असलेल्या खळ्याच्या स्थळाचे महत्त्व लेखक हुबेहूब साकार करतो.

**१.२.५.९. ताम्रपट :**

धोतर, नेहरूटोपी असा साधा, काहीसा मातकट वेष, थोडे पिवळट मोठे डोळे, ओठ काळपट निळसर होते.(पृ.२३) असे वर्णन लेखकाने गोविंदभाई तामसरे यांचे केलेले आहे. पांडुरंग जातीने काही ठाकर वा महादेव कोळी वगैरे नव्हता पण दिसे मात्र अस्सल तसाच. अंगाने किरकोळ काटकुळा गडी होता. अर्धी चड्डी, अर्धा बाह्यांचा सदरा आणि टोपी असं त्याचं ध्यानं इतकं बावळ दिसे.(पृ.११) अशा प्रकारे पांडुरंग तिकोणेचे व्यक्तिवर्णन लेखकाने रेखाटले आहे.

**१.२.५.१०. तणकट :**

'तणकट' या कादंबरीचा प्रारंभ महारवाडयातील घरांची रचना तसेच पाऊस पडण्यापूर्वीच्या निसर्गातील विविध छटांच्या वर्णनाने झाला आहे. एक गडद काळा ढग गावच्या चावडीवर आला. नंतर तो सरकत सरकत म्हारोड्यावर स्थिर झाला. एकदम अंधारले. हवेत उष्मा नव्हता. वाऱ्याला नेहमीसारखीच संथ गती होती. पाऊस पडेल अशी शक्यताही नव्हती. ढग जागच्या जाग्याला स्थिरच. कबीरला ढगाकडे बघताबघताच गम्मत वाटाय लागली. कधी कधी असं होतं. ढग अचानक जमा होतात. सगळीकडून काळवंडून येतं. पाऊस तर पडत नाहीच. पण काही वेळात फेक्क उजेड. कशाचंच नामोनिशान उरत नाही. कबीरनं बसलेली जागा सोडली. महारवाडयाच्या मध्यभागी असलेली तक्क्याची इमारत तेवढीच बंगलोरी कवलं सांभाळत उभी. बाकी सगळी खोपटं. कुठंकुठं काळया ठिक्कर पडलेल्या खापऱ्या. तर काही खोपटांवर उसाचा काळपट पडलेला पाला. अशात भिमाबा म्हार आणि गोपाळ म्हाराची पक्क्या विटांची घरं. सगळयात उठून दिसणारी. त्यांच्या चौकटीला लालभडक रंग लावलेले. त्यामुळं त्यांच ठळकपण अधिकच जाणवणारं. एकाच गल्लीचा म्हारोडा. तीस-चाळीस घर. गल्लीत सगळीकडं खडी उठलेली मध्येमध्ये मोठाले खड्डे. त्यात पाणी साचलेलं. वर घुंगुरटयांचा तवंग.(पृ.७) गाव व गावातील घरांच्या स्थळाचे वर्णन लेखकाने निसर्गाच्या पार्श्वभूमीवर केलेले दिसते.

थळू आजाचे वर्णन लेखकाने केले आहे. ''हातात काठी, डोक्याला झुरमुळया उरलेला पटका, अंगात काळा विटून गेलेला कोट. जवळजवळ गुडघ्याला येऊन टेकलेला. पायात रापलेलं धनगरी पायताण. सत्तरी उलटून दोन-चार वर्षे झाली असली तरी गडयाच्या चालण्यात ऐटबाजपणा.''(पृ.१९) वरील वर्णनातून व्यक्तीच्या दारिद्रयाची जाणीव होते. आक्काबा राणे हे

व्यक्तित्त्व छाप पाडणारे असे होते ते पुढील वाक्यातून लक्षात येते, 'म्हातारा सत्तरी गाठली तरी अजून कणखर व पिळदार दिसत होता. चेहऱ्यावर तकतकी डोळ्यात निर्मळपण.'(पृ.१५९) अशा प्रकारे थळू आज्या, आक्काबा राणे यांसारख्या गौण पात्रांचे वर्णन लेखकाने यथार्थपणे केले आहे.

**१.२.५.११. डांगोरा एका नगरीचा :**

प्रस्तुत कादंबरीत साईखेडाच्या सरकारी कोठीच्या स्थळाचे व सुमंत सरांच्या वाड्याचे वर्णन लेखक करतो. ''हायस्कुलशेजारी भलं प्रशस्त सरकारी कोठीघर होतं. चौकोनी अंगणात मध्यभागी पाण्याचा हौद. त्यात एक लहानसं कारंजं. अंगनाच्या भोवताली चहुबाजूंनी चांगली पघळ ओसरी. दोन दोन खणांवर दणकट लाकडी खांब असलेली, ओसरीमागे लहान मोठ्या खोल्या माळवदावर झरोके असलेल्या. कोठीच्या फक्त दर्शनी अंगाला वीस खणांची माडी होती.'' सुमंत सरांच्या वीस खणांच्या माडीच्या ठिकाणाचे वर्णन लेखक हुबेहूब करतो. 'साईखेड एका रितीनं बेटासारखं विलगं होतं. रेल्वे फाटापासून बरचं आत. लहान टेकाड रांगांनी आणि दुर्लक्षित वन रांगांनी वेढलेलं. तरी, दक्षिणेस कर्नाटकाचा उत्तर भाग आणि पश्चिमेस करवीर संस्थानचा प्रदेश यांच्याशी त्याचे अनेक पदरी जवळचे संबंध होते.' (पृ.३०) 'एकशेपाच खेड्यावाड्यांचे नेपथ्य भोवती मांडलं आहे.'(पृ.३४) अशाप्रकारे साईखेड संस्थानचे स्थळवर्णन लेखक करतो.

साईखेड संस्थानच्या नगार खान्याकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेच्या मनोहर्षक निसर्ग लेखक मांडतो. ''नगारखान्याकडे जाणाऱ्या त्या रस्त्याकाठी दुतर्फा बुचांची उंच उंच झाड होती. समान अंतरावर उभी असलेली. शोभा आणि गौरव देणारी. त्यांच्यावर पांढरीशुभ्र लांब देठांची फुलं अधी उमललेली होती. खाली कोमेजलेल्या फुलांचा सडा पडलेला होता. अश्विनाच्या निर्मळ हवेत त्यांचा मंद वास मिसळला होता.(पृ.क्र.४०६) अशा प्रकारे साईखेडाच्या निसर्ग सौंदर्याचे हुबेहुब वर्णन लेखक करतो.

**१.२.५.१२. बारोमास :**

मधू आणि त्याची सोनेरी टोळी खजिन्याच्या शोधात रातरातभर खोदत फिरायचे. त्यात त्यांना सोने नाणे मिळाले नाही पण बऱ्याचदा दगडी मूर्ती सापडायच्या अशाच एका मूर्तीचे वर्णन लेखकाने केले आहे. 'भरपूर साजशृंगार केलेल्या लावण्यवतीचे ते शिल्प होते. कमरेत लचक मारून उभी असणारी तरूणी दीड पायावर उभी राहून हात मागे करून खच्चून आळस देत होती. हात मागे केल्यामुळे तिचा वक्षभाग चांगलाच टचटचीत आणि उठावदार दिसत होता. अर्धमिटल्या डोळ्यांनी ती तिच्याकडे पाहणाऱ्याकडे घायाळ करणाऱ्या नजरेने पाहात होती. कमानी ओठांवरचं

हसू गालात मावत नव्हतं. पायघोळ अशा पातळावर कमरपट्टा, मांड्यांपर्यंत आलेला साज. केसांवर दागिने. कानात दागिने. नाकात इवलीशी नथ. गळ्यात भरघोस माळा. एक नक्षीकाम केलेली माळ तर वक्ष्यावरून थेट बेंबीपर्यंत आलेली. भांगावरही मोत्याच्या माळा. पाठीवर मात्र केस सैल सोडलेले. हातात नक्षीकाम केलेल्या बांगडया. दोन्ही पायात तोडे. एक पाय ताठ ठेवून एका पायात बाक आणल्यामुळे दीड पायावर नजाकतीने ती उभी होती. सगळी देहकाठी घोटीव, रेखीव एकएक अवयव असा उठावदार की पाहताना दोघेही बराच वेळ नुसतेच पाहत राहिले. अबोल होऊन. मंत्रमुग्ध झाल्यासारखे.'(पृ.१७७) सोनेरी टोळीला खोदताना मिळालेल्या मूर्तीचे लेखकाने केलेले वर्णन अवर्णनीय आहे.

दिलीप पवार एका संस्थेत शिक्षकाची नोकरी करीत होता. पण यावर्षी डोनेशन दिलं नाही तर त्यांची नोकरी जाणार होती. त्यामुळे डोनेशन भरण्यासाठी पैसे पाहिजेत म्हणून दिलीप मधूच्या सोनेरी टोळीत सामिल झाला. पण जमीन खोदत असताना दिलीप पवारला मानवी सांगाडा हाती लागला. तो घाबरला त्याचा तोल जावून त्याचे डोके दगडावर आपटले. मेंदूला मार लागल्यामुळे दिलीप वेडयासारखा वागू लागला होता त्याच्या दुर्दशेचे वर्णन लेखकाने केले आहे. 'दाढीचे केस वाढलेले. डोईचे केस विस्कटलेले. धूळ भरलेले अंगावरचे कपडे घामाचे थर साचून मळलेले तरी त्याने अंगातला शर्ट पॅन्टमध्ये टाकला होता. वर पट्टाही लावलेला पण पायात काहीच नाही.'(पृ.७७) डोनेशन देऊ न शकणारा, नोकरी गमावलेला, पैसे मिळविण्यासाठी सोनेरी टोळीत झालेल्या दिलीपच्या दयनीय स्थितीमुळे झालेल्या अवस्थेचे वर्णन लेखक करतो.

### १.२.५.१३. भूमी :

मैथिली देवस्थळीबाईंकडे कामानिमित्त जायची. एकदा तीने त्यांच्याकडे अभ्यासासाठी जायचे ठरविले. ती प्रोफेसर देवस्थळींच्या खोलीमध्ये गेली तिने समोरची खिडकी उघडली. 'समोर मोकळं होतं, इमारती नव्हत्या. पहाडासारखे उंचवटे, लाल मातीचे. झाडं आणि मागचं दिसणारं आभाळ. दुरून वाजणारी कुठल्या तरी देवळाची घंटा आणि चक्क शाळेची प्रार्थना सुद्धा जवळून ऐकू आली. लहान लहान मुलांची, आता मराठीतली. जरा पाहिलं तर शाळेचंच कुंपण दिसलं. समुद्र तेवढा लांब.'(पृ.५७) असे स्थळ वर्णन केले आहे. देवस्थळी बाईंना मैथिलीबद्दल राग होता. रागापेक्षा असे वाटते की असुया होती, 'तिचा ताठपणा, अभिमान, बुध्दी, समज, वाचनाची आवड आणि रूपही. सुंदर म्हणता यावं असं नाही; पण एकूण आविर्भाव देखणेपणाचा. एक वाचनाची, पुस्तकांची आवड सोडली, तर हे त्यांचंच जणू तरूणपणचं रूप. त्या कदाचित देखण्याही

होत्या जास्त. ही मुलगी त्यांच्या एका अभेद्य कोटाला वारंवार धक्के देत होती;'(पृ.५६) असे मैथीलीचे, देवस्थळी बाईंना भावलेले व्यक्तिमत्त्व लेखिकेने साकारले आहे.

मैथिली मिलिंदच्या घरी तिच्या आत्याबरोबर गेली म्हणजे मिलिंद व मैथिलीच्या लग्नासंदर्भात मिलिंदच्या आईबाबाकडे बोलणी करण्यासाठी तेव्हा मैथिलीचे व्यक्तिवर्णन लेखिकेने केले आहे. 'मैथिली...कीर्तीची मैत्रिण- मिलिंदनं पसंत केलेली मुलगी-स्कॉलर, गोरी, उंच, स्मार्ट, देखणी आणि त्याला जोडून गुणीसुध्दा! कशात मिलिंदला नि तिला रस होता? त्या नाटकांत नाही, शिक्षणात नाही, तर घरकामात. घरातलं सगळं बघते. आत्याचा उजवा हात. लहानपणापासूनच कामाची सवय. आई सततच आजारी नं!(पृ.८०) वरील दोन्हीही परिच्छेदात मैथिलीच्या व्यक्तिमत्वातील रूपाचे, गुणांचे वर्णन केलेले आहे.

मैथिली, शंतनू मैथिलीची मैत्रिण कावेरी व तिचा नवरा गणेश मद्रासहून जवळील समुद्र किनारा पाहण्यास गेले त्या स्थळाचे वर्णन 'मद्रासहून जवळच तो छोटासा समुद्र किनारा, सुंदर निवान्तसा. दीड-पावणेदोन तासांच्या रस्त्यावर. खाडीसारखं समुद्राचं पाणी आत घुसलं म्हणाव तर तसा नाही, समुद्राचाच एक तुकडा हिरव्या, दाट झाडीत बसवावा तसा!' प्रत्यक्षात कावेरीनं सांगितलं त्यापेक्षाही ही जागा सुंदर होती. पिऊन घ्यावीशी वाटणारी शांतता. वाळूच्या शेवटी जरा दूरवर गर्द झाडीत जरा आडव्यातिडव्या हुलकावणी देत जाणाऱ्या पायऱ्यांवर एक देऊळ. हनीमून कॉटेजसारख्या झोपडया. एका टिनशेडमध्ये एक हॉटेल टाकलेलं.(पृ.१४३) अशा प्रकारे लेखिकेने वरील निसर्ग वर्णनातून आपल्यासमोर स्थळाचे चित्र उभे केले.

**१.२.५.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : सुबोध आणि माधुरी यांच्या लग्नाचे रिसेप्शन मोठ्या थाटा-माटात झाले. त्याचे वर्णन लेखकाने केले आहे. 'रिसेप्शनसाठी तीन एकराच्या मैदानाला तट घातला होता. एका बाजूला वरवधूंसाठी मंच उभारला होता. मंचावर डार्क ग्रीन कार्पेट. वधुवरांना बसण्यासाठी मयुरासने होती. म्हणजे खुर्च्यांच्या पाठी मोराच्या फुललेल्या पिसाऱ्याच्या आकाराच्या. पिसाऱ्यात फ्लुरोसेंटचे निळे ठिपके. प्रकाशात निळेभोर चमकत होते. सबंध मंच फुलांनी मढवलेला होता. वेगवेगळ्या रंगाच्या प्रकाशाचे झोत वधूवरांवर पडत होते. ब्यूटिशियनने मेकप केलेली, पारंपरिक शालूदागिन्यात मढलेली, डोक्यावर पदर घेतलेली सुमाधुरी आणि पूर्ण सूट आणि रेशमी फेटा घातलेला सुबोध... दोघांना बहुतेक वेळ उभेच राहावे लागत होते. फोटोचे फ्लॅश अखंड चमकत होते. लाऊडस्पीकरवर मंद स्वरात प्रणयगीते वाजत होती.'(पृ.२३) एवढेच

नाही पुढे लेखकाने तीन एकराच्या स्थळाचे व त्या क्षेत्रात लावलेल्या विविध स्टॉल्सचेही वर्णन केले आहे. अशा प्रकारे केलेल्या या वर्णनामुळे वाचकाला रिसेप्शनला उपस्थित असल्याचा भास होतो. हे स्थळ आपल्यासमोर साक्षात उभे राहते.

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : विलासच्या घरात भांडणे चालली होती, त्यावेळी विलासने अंदाज घेतला. तो बाहेरच्या बाहेर मागे फिरला व स्कुटरवर ज्या ठिकाणी तो फुलपाखरे पाहायला अनेकदा आला होता, अशा ठिकाणी आला. त्या ठिकाणचे त्याने पूर्वी पाहिलेल्या निसर्ग सौंदर्याचे वर्णन लेखक करतो. ''फुलपाखरांच्या ऋतूत घळीच्या उतारावर झेंडूची फुलेच फुले. सगळा उतार सलग हिरवागारआणि झेंडूची फुले एकेकटी असली तरी पिवळेपण इतके विपुल की फुलांचे एकेकटेपण उरायचे नाही. आणि फुलपाखरे! किती एक फुलपाखरे! फुलपाखरे थव्याने फिरत नाहीत. एकेकटी पण फिरतात... हे महत्त्वाचे. वर निळे आकाश. आणि वातावरणात हिवाळ्याची चाहूल. जमीनीवर सर्वत्र हिरवेपण. ठायी ठायी झेंडूच्या फुलांचे पिवळेपण. आणि पिवळा, निळा, काळा, नक्षीदार नाच, बागडणे फुलपाखरांचे. निसर्गाची लयलुट, सौंदर्याचा देखावा.''(पृ.१३९) अशा प्रकारच्या निसर्ग आपल्या पुढयात लेखक साकार करतो. सुमाधुरीच्या वडिलांच्या घराच्या ठिकाणाचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतात, ''माधुरीच्या वडिलांचें जुने वडलोपार्जित घर आहे. तीन पिढ्यांत थोडे थोडे वाढवत नेलेले आहे. पुढचा भाग दगडी आहे. ओसरी मातीची होती, हॉटेल बांधकामाच्या वेळी फरशी घातलीय. सैपाकघर मातीचे व विटांचेच आहे. त्याला लागून दोन खोल्या कॉंक्रिटच्या आहेत.''(पृ.४) या वर्णनातून घराच्या जुन्या नव्याचे एकत्रीकरण झालेले दाखविण्यात आले आहे. त्याचे हुबेहुब वर्णन लेखक करतो.

**१.२.५.१५. खारीच्या वाटा :**

लेखकाने त्यांची शाळा ज्या मंदिरात भरत असे त्या भैरोबाच्या देवळाचे वर्णन केले आहे. 'जोत्याला घडीव दगड. जोतं छातीभर उंचीचं. भक्कम पायऱ्यांचं. कुसाभोकात उभे केलेले कोरीव खांब. प्रत्येक खांबाखाली कातीव दगड. खांबावर टेकलेल्या जाड तुळ्या. त्याला जोडणारे लग. चारपाखी आढं. दर्शनी भाग सोडून तिन्ही अंगाला उतरत्या पडव्या. पडव्यात देवाच्या छबीन्याची पालखी, बगाडाचा रहाट, खुंटीला लटकते टाळ, पखवाज, ढोल, लेझीम ठेवलेले असायचे. शिवाय गावकीची भांडी, बत्ते असं बरचं सामान देवाची मूर्ती दगडाची काळी कुळकळीत, गुळगुळीत. वर छोटी कमान. मधोमध लटकती पितळी घंटा. भवती नवसाचे पाळणे, नारळाच्या वाट्या, तांबडी निशाणं, बारक्या घंट्या असं काहीबाही अडकवलेलं. गाभारा अंधूक, देवापुढं

चपटी चीप. त्यावर नारळ फुटत. कमानीच्या आत दोन लहानग्या देवळ्या. त्यात दगडी पणत्या, तेलानं मेणचटलेल्या. वात लावल्यावर उजेड पांगायचा. भैरोबाची मूर्ती स्पष्ट दिसायची. चांदीचे डोळे चमकायचे.'(पृ.२०) लेखकाने या भैरवनाथाच्या मंदिराचे वर्णन करताना मंदिरातील बांधकामाचे, त्यातील सर्व वस्तुंचे, मूर्तीचे वर्णन करून वाचकांसमोर साक्षात मूर्तीमंत मंदिराचे स्थळ उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाच्या घरी त्याने एक बोका पाळला होता त्याचे वर्णन लेखकाने केले आहे. 'भांब्या म्हणजे आमचा बोका. तो सर्वसाधारण मांजरात मोडणारा नव्हता. तब्येतीनं तगडा-भुरकट अंगावर काळपट पट्टे. वाघासारखे. कपाळाच्या मधोमध पांढुरका चट्टा. टिळा लावल्यासारखा खुलून दिसायचा भेदक नजर. तांबूस नाकाखाली जबड्यावर लवलवते केस लव्हाळ्यासारखे. जाडजूड शेपटी. मजबूत फरे आणि दणकट पाय. एकूण पैलवानी बाज'(पृ.१३) त्याच्या वर्णनाखाली पुस्तकात भांब्याचे रेखाटलेले चित्र देखील आहे. भांब्याचे वर्णन आणि त्याचे चित्र यामध्ये साधर्म्य साधण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकाने केला आहे.

लेखकाने त्याच्या राहत्या घराचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे. 'ऐसपैस आवार, एकरभराचं तरी असेल. पुढं अंगण. माग मोठ्ठ परढं, चिंच, जांभूळ, बेल, आंबा, फणस अशी झाडांची रेलचेल. त्यावर सोडलेले बटवलाचे वेल. त्यांची पांढरी-जांभळी फुलं. मधुनच शेंगाचे घड. परड्याच्या बांधावर बांबूची बेटं पहारेकऱ्यासारखी हारीनं उभी.(पृ.४९) गावातील घरे ही प्रामुख्याने जवळजवळ होती. मधे गचपन होते. पण त्यामानाने लेखकाचे घर रमणीय होते. त्यामुळेच लेखकाच्या घरात लुकी खूश होती. शेवटी लेखक लिहितो. 'म्हटलं तर रान नाहीतर घर असा परिसर.'(पृ.४९) घराचे वर्णन करताना निसर्ग आणि स्थळ वर्णनाचा मिलाफ करण्यात लेखक यशस्वी झालेला दिसतो. अशाप्रकारे लेखकाने कादंबरीत व्यक्तिवर्णने त्याबरोबरच तितक्याच चलाखीने प्राण्यांची देखील उत्कृष्ट वर्णने केली आहेत. गावातील निसर्ग सौंदर्याचे, गावातील विविध ठिकाणांचे, स्थळांचे मनोवेधक वर्णन केले आहे. आपल्या घराचे व गावातील भैरवनाथाच्या मंदिराचे हुबेहुब वर्णन लेखक आपल्या समोर साकार करतो.

**१.२.५.१६. फेसाटी :**

प्रस्तुत कादंबरीत लेखकाने गावातील काही स्थलवर्णने साक्षात उभी केली आहेत. 'गावात येक शेटजीचावाडा हुता. सर्वात मोठा, चारी बाजूंनी भिंती, चिच्चची, लिंबाची झाडं, लाकडी खिडक्या, समोरचा दरवाजा लाकडाचा, उघड्यावर मोठ्याने आवाज काढायचा. आतमध्ये मोठा सोपा. समोर झोपाळा.'(पृ.१५) लेखकाने शेटजीच्या वाड्याबरोबर शेटजीच्या व्यक्तिमत्त्वाचेही

वर्णन हुबेहुब केले आहे. 'शेटजी दिसायला एकदम गोरापान. डोक्यावर काळी टोपी. अंगात अंगरखा, पायापर्यंत धोतार'(पृ.१५) नाथाच्या पाठीवर एक मुलगी झाली होती. तिचे नाव नकुसा ठेवले होते. तिचे वर्णन लेखक पुढीलप्रमाणे करतो. 'नकुसा दिसायला येकदम गोरी गोमटी. मोठ्यां डोळं, डोस्क्यावर काळ भोर जावाळ, लई चांगल दिसायच.'(पृ.३१) अशा प्रकारे नकुसाचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर साकार होते.

लेखक चौथी पास होऊन पाचवीत गेला. पाचवीचा वर्ग उमदी, गावात होता. इंदूताई त्याच शाळेत जात होती. प्रियांका फोटे स्टुडिओ पासून पुढं गेल्यावर'समोर नडगेटी कट्टा, मध्यभागी भल्लं मोठं लिंबाचं झाडं. झाडाच्या म्होरं विरभद्राचं बारकचं देऊळ, येक भगवा झेंडा काठीला वर बांधल्याला वाऱ्यानं फडकत हुता. तेच्या पुढं शाळा. शाळा कसली म्हणायची नुसता बोर्डच दिसतुया'(पृ.७२) अशा प्रकारे स्थल वर्णन लेखकाने कादंबरीत साकार केले आहे. कापसाच्या शेताच्या बांधाला कुणीतरी आग लावली तेव्हा त्याचे वर्णन लेखकाने केले. 'चिंमण्याचा कालवा वाढला तसं पुढं गेलू. कित्येक खारूट्या. सरडं अर्धेकच्च भाजलं हुतं. पाण्यासाठी टाकल्याला गुंडाळी पाईप मेणबत्तीवानी इरगाळून जागोजागी चिंडूवानी झाला हुता. कापसाला हाय लागून पट्टाभर कापूस सुकला हुता.'(पृ.१८६) अशा प्रकारची हुबेहुब वर्णने लेखकाने ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर केलेली दिसून येतात.

एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधून विविध प्रकारची वर्णने आलेली दिसून येतात. त्यामध्ये निसर्गवर्णन, स्थळवर्णन व व्यक्तीवर्णन अशा प्रकारची वर्णने आहेत. निसर्ग हा प्रसन्न, रमणीय, सौंदर्यशील आहे. निसर्ग हा महान जादूगार आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लिला अगाध आहेत. त्याच्या संगतीत रमताना कळत नकळत आपण खूप साऱ्या गोष्टी शिकतो. आपण अंतर्मुख होतो. विचार करू लागतो. स्थळवर्णनात एखाद्या ठिकाणाचे महत्त्व विषद केलेले असते. स्थळवर्णनावरून त्या स्थळाचे, त्या वास्तूचे महत्त्व अधोरेखित होते. प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेली व्यक्तीवर्णने तटस्थपणे, त्रयस्थपणे सर्व साक्षीभावाने आलेली आहेत. पात्रांची वर्णने एकाचवेळी सलगपणे न येता घटना, प्रसंग, वातावरण याप्रमाणे वेगवेगळ्या घटना प्रसंगाशी निगडीत होऊन आलेली आहेत. प्रस्तुत लेखकांनी केलेली वर्णने आखीव-रेखीव आणि कथानकाला योग्य त्या परिणामाच्या दिशेकडे घेऊन जाण्यास सहाय्यभूत ठरणारी आहेत. कथानकाची उकल करण्याच्या ओघात वर्णन करीत असताना वर्णनाच्या विविध पद्धती प्रस्तुत लेखकानी हाताळल्याचे दिसून येते. व्यक्ती वर्णन असो वा स्वभाव

वर्णन स्थळवर्णन असो वा निसर्गवर्णन या कुठल्याच वर्णनामध्ये कृत्रिमता वा अनैसर्गिकपणा आढळत नाही.

**१.२.६. म्हणी :**

एखाद्या जागेतील वातावरणनिर्मिती, त्यातील सौंदर्य लेखक आपल्या लेखनशैलीतून साकार करीत असतो. ते सौंदर्य सुचविण्यासाठी तो अनेक प्रतिमा, प्रतिके, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, विशिष्ट शब्दांची रचना करतो. त्यातून लेखकाला एक प्रभावी परिणाम साधायचा असतो. म्हणीतून व्यक्त होणाऱ्या सत्याला अनुभवाचे अधिष्टान असते म्हणून म्हणींविषयी दुर्गाबाई भागवत म्हणतात, ''म्हणी अनुभवाच्या खाणी आहेत.''[१०] मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये सर्रासपणे म्हणींचा वापर केला जातो. म्हण या शब्दाची व्याख्या वि.वा. भिडे पुढीलप्रमाणे करतात, ''ज्यांत काही अनुभव, उपदेश, माहिती, सार्वकालिक सत्य किंवा ज्ञान गोविलेले आहे, जे अल्प शब्दात्मक आहे, ज्यांत काही चटकदारपणा आहे आणि लोकसंभाषणांत वगैरे जे वारंवार योजतात, असे वचन किंवा वाक्य''[११] 'वऱ्हाडी म्हणी आणि लोकधर्म' मध्ये डॉ.विठ्ठल वाघ म्हणतात, 'म्हण म्हणजे लघुत्तम महाभारत', जे जगात आहे ते म्हणीत आले आहे, जगातील सर्वच भाषांमध्ये म्हणी आहेत. जगातील विविध भाषांनी म्हणींचे महत्व स्पष्ट केलेले आहे. म्हण ही लोकजीवनाच्या दीर्घकालीन अनुभवाचा अर्क असतो. मीठामुळे खाद्य पदार्थाची आस्वादकता वाढते तशी म्हणीमुळे भाषेची आस्वादकता वाढते. ''हिब्रु भाषेत बागेत फुल, आकाशात तारका, भोजनात मिष्टान्न तशी भाषेत म्हण महत्वाची मानतात.''[१२] विविध म्हणी, वाक्प्रचारांच्या वापरामुळे भाषेला आशयघनता, सजीवता आणि सारगर्भता प्राप्त होत असते. म्हणी आणि वाक्रप्रचार हे लोक – जीवनातील भाषेचा अर्क असतात. ते एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे परंपरानुगतिक चालत आलेले लोकभाषेचे संचित असते. हया म्हणींना भौगोलिक आणि सामाजिक पर्यावरणाचे संदर्भ असतात.

**१.२.६.१. ययाति :**

ज्याचं जळतं, त्याला कळतं.(पृ.१०२), नावडतीचे मीठ अळणी!(पृ.२००), सुंठीवाचून खोकला गेला!(पृ.२०५)

**१.२.६.२. रथचक्र :**

हातचं सोडून पळत्याच्या मागे लागला. त्याचा जन्म वाया जाणार.(पृ.३), वाटाण्याच्या अक्षता लावणे.(पृ.४), कर नाही, त्याला डर कशाला?(पृ.४३), चोरीचा मामला आणि हळूहळू

बोंबला.(पृ.४६), खाल्ल्या घरचे वासे मोजाल.(पृ.८८), पाण्यात पडलं म्हणजे पोहता येतं.(पृ.१११), ऐट कुबेराची आणि कुवत लाचाराची!(पृ.८९)

**१.२.६.३. स्वामी :**

काप गेला आणि भोकं तेवढी राहिली.(पृ.३), लहान तोंडी मोठा घास घेणे.(पृ.११), मुलाचे पाय पाळण्यात पाहावेत.(पृ.१४), भिंतीला देखील कान असतात!(पृ.१७), मी रडल्यासारखं करतो, तू मारल्यासारखं कर.(पृ.५५), सिंहाला कोल्ह्याने अक्कल शिकविणे.(पृ.७२), मांजराच्या गळयात घंटा बांधायची कुणी!(पृ.२२०), नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही.(पृ.२२०), जसा राजा तशी प्रजा, घरावर गाढवाचे नांगर फिरवून घेणे.(पृ.२३५)

**१.२.६.४. स्मरणगाथा :**

उठतां लाथ बसतां बुक्की.(पृ.४२), ''घी देखा लेकिन बडगा नही देखा!, तो बोले, दळ हाले.''(पृ.१५५), मोर नाचे म्हणून लांडोर नाचे(प.२४८) देखादेखी लिया जोग, घटे काया बडे रोग!(पृ.२४८), नंग्याशीं तर खुदाही दचकून असतो.(पृ.२७९), मोरीले बोळा, अन् दिल्ली दरवाजा मोकळा!(पृ.३०६), कोई दिन चना, कोई दिन वोभी मना!(पृ.३३५), बामनभट, कढी आंबट!(पृ.३४३), आल्ला बी कष्टी अन् मसूदबी कष्टी?(पृ.३९४), बाप दाखव नाहींतर श्राध्द घाल.(पृ.४६०), आमके आम और गुठलियोंके दाम.(पृ.४९२). मराठी म्हणींबरोबर हिंदी म्हणींचाही वापर प्रस्तुतकादंबरीत लेखकाने सुचकतेने केलेला आहे.

**१.२.६.५. सत्तांतर :**

जिवावर बेतलं होतं, ते शेपटावर निभावलं.(पृ.७), मनं धाक वितात आणि झोटिंग, हडळी जन्माला येतात.(पृ.५१)

**१.२.६.६. झोंबी :**

दुधाची तहान ताकावर भागवीत असे.(पृ.९३), घोडं गंगेत न्हालं बघ.(पृ.१२४), माझंबी लाखाचं बारा हजार व्हायला उशीर लागला नसता.(पृ.१५१), कुणाच्या पोळ्या कुणाच्या घरावर कशा भाजल्या.(पृ.१७९) तोंड दाबून तिला बुक्क्यांचा मार मिळत होता.(पृ.२६१), तर कालचं बरं खरं उद्याच नगं(पृ.२६९), न्हाईतर हगलं काय नि पोट गेलं काय, सारखंच.(पृ.२७३) झोंबीमधील ह्या म्हणी ग्रामीण भागातील संदर्भ सूचित करणाऱ्या आहेत. ग्रामीण भागातील

बोलीभाषेतील शब्द ह्या म्हणींमध्ये लेखकाने समर्पकपणे वापरले असून त्यामुळे झोंबीच्या वाङ्मयीन मूल्यात भर पडते.

**१.२.६.७. झाडाझडती :**

बारा महिने तेरा काळ(पृ.३), किती पिळला म्हणून रेडा दूध दील का?(पृ.९) एका दगडात दोन पक्षी.(पृ.२९), नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही.(पृ.३०), पालथ्या घड्यावर पाणी(पृ.३३) ज्याचं जळतं त्याला कळतं.(पृ.३४), उघड्यापाशी नागडं गेलं आन रातबर थंडीनं मेलंऽ!(पृ.४३), घरचं झालं थोडं आन् इवायानं धाडलं घोडं.(पृ.४८), ज्यो तळं राखील त्यो पाणी चाखील.(पृ.५३), ज्याचं साधलं त्येचं उखळच पांढरं, अन् ज्याचं बुडलं त्येच्या नाका तोंडात आताच पानी शिरलंयाऽ!(पृ.५६), गव्हू तवा पोळ्या.(पृ.५९), लकडीशिवाय मकडी वठत नाही हेच खरं.(पृ.६८), येड्याचं सोंग घेऊन पेड्याला जाणे.(पृ.७३), एका तीरात दोन शिकारी गवसणे.(पृ.९१), सुंभ जळला तरी पीळ जळत नाही.(पृ.१०७), ता म्हणता ताकभात ओळखणे.(पृ.११६), मढ्याच्या टाळूवरचं लोणी चाटणारी माणसं.(पृ.१२७), ज्याचा हात वला, त्येचा सब भलाऽ!(पृ.१४४), राजा उदार झालाऽऽ आन् हातात भोपळा दिलाऽऽ!,(पृ.१७१), सर घोडया की पे पाणी!(पृ.१७५), धरलं तर चावतयं आणि सोडलं तर पळतंय.(पृ.१९२), ये रं माझ्या मागल्या आणि ताककण्या चांगल्या!(पृ.२११), हाबी गेलं, हूबी गेलं आणि हाती धुपाटणं आलं.(पृ.२४४), नराचा वानर आणि डोंगराचा समुद्र करणे(पृ.३०३), इच्छा असंल तर मार्गबी गवसंल.(पृ.२८०), एक घाव नि दोन तुकडे.(पृ.३१८), भित्यामागं ब्रम्हाराक्शस.(पृ.३७३), नंगेसे खुदाबी डरता है.(पृ.३७४), रोज मरे त्याला कोण रडे!(पृ.३७६), पालथ्या घड्यावर पाणी.(पृ.३७७), नुसता खायला कार आनी धरणीला भार हुता.(पृ.४०९), जावं त्याच्या वंशा तेव्हा कळं.(पृ.४२५), मांजराच्या गळ्यात घंटी बांधणार कोण?(पृ.४६८) प्रस्तुत कादंबरीत लेखकाने ग्रामीण भागातील अस्सल व कथानकाला समर्पक अशा म्हणींचा वापर केला आहे.

**१.२.६.८. राघववेळ :**

बारभाई खोती आन् बाफळ्या लागेना हाती, पेंड खाऊन घोडं ऱ्हायला येणे(पृ.१८), खायाले भागो भागो अन् कामाले आग लागो.(पृ.१९), पचलं तसं खावाव आन् सोभलं तसं लेवाव माणसानं.(पृ.५०), गरिबाच्या लेकरानं गरिबासार्क ऱ्हावावं.(पृ.५०), पाळाय ना पोसाय फुकट डोळे वासाय.(पृ.५०), गिऱ्हा बी येळं आंधी येत नस्ते. त्याच्या येळलेच येत त्यो.(पृ.५४), उगीच येडी व्हऊन पेडा नोको खाऊ.(पृ.६९), गरीब गाय आन् पोटात पाय!(पृ.७०), येळ न

वखत आन् कोळमं काखत.(पृ.७६), शिक्यावर टांगलं, काढलं तर काढलं, नाहीतर जागीच सडलं.(पृ.९३), नाही तर व्हणं न जाणं धाऊ धाऊ गोठणावर जाणं.(पृ.९८), पडिक जिमीन वहितीले काढली तर तन टाका का धान टाका, उगवतेच ते.(पृ.९९), आपलं ते मापलं लोकायचं मातर कापलं.(पृ.१०४), येडं व्हाऊन कोडं घेवाव.(पृ.१०५), मारणाराचा हात धरवते पण बोलणाराचं तोंड कसं धरावं?(पृ.१०५), सासू तशी सून दरूजाचा गुण.(पृ.१०७), जीवाचं व्हवून ऱ्हायलं शेणपाणी सासू मातर खात आसन लोणी.(पृ.१०८), वन जळते जन पाह्यते. मन जळते कोण पाह्यते?(पृ.११९) एक परवानं उणी असलेली लेकरं सुदरतात, नाहीतर बिघडतात.(पृ.१५१), घरी ऱ्हावाव आन् काय खावावं?(पृ.१२८), देव करो आन् त्याचं शाणपण आसंच ऱ्हावो.(पृ.१५१), जीव जात नाही म्हून आखळ्या देणं हो हे!(पृ.१५५), नाव सोनाबाई हाती कथलाचा वाळा ही नाही.(पृ.१६४), उसन्याची माय थोडीच मेली(पृ.१६६), दुखणं पायाले पट्टी मातर कपाळाले.(पृ.१७५), जिथं चोरा चिल्टाचं भ्या तिथंच दिवस मावळते.(पृ.१७९), जित्याची खोड मेल्याबिगर जाते का?(पृ.१९७), कान फुटते लेकराचा आन् डोमणवाडा व्हतो मायचा.(पृ.१९९), पहिला बेटा कपाळी गोटा, पहिली बेटी तुपाची रोटी.(पृ.२०६), एकाले अंगाशी दुसऱ्याने जांगंशी.(पृ.२०९), येळलं केळं वनवासाले सिताफळं!(पृ.२१८), गाईची शिंग गाईला भारी नसतात.(पृ.२१८), गाठीले आसतं तर वटीले आणून घातलं असतं.(पृ.२२१), एक कराय जावाव तर दुसरंच उभं ऱ्हायते.(पृ.२२७), बरं तर बरं, नाही तर केवढी बुरी गत.(पृ.२२७), माणसानं दुखानं धावाव, सुखानं खावावं, मानानं रहावं.(पृ.२३६), एकदा तोंड पोळल्यावर तर ताक बी फुकून पिवावं.(पृ.२३८)

**१.२.६.९. ताम्रपट :**

बुडत्याला काडीचा आधार.(पृ.२५), वाल्या कोळ्याचा वाल्मिकी होणे.(पृ.३२) सारे एकाच माळेचे मणी.(पृ.९०), मन चिंती ते वैरी न चिंती.(पृ.१२७)

**१.२.६.१०. तणकट :**

म्हार त्यो म्हार आनी बोलतोच बघ तालेवार.(पृ.१०), ये केस आनी बेस! श्याना उटला आनी मापट्यात मुतला.(पृ.७४), सरड्याची धाव कुंपणा पतोरचं.(पृ.८०), ताकाला जाऊन मोगा लपवणे.(पृ.९२), सगळीकडनंच तीन-आडकून सीताराम झालंय.(पृ.१३२), साप-साप म्हणून भूई बडविणे.(पृ.२११).

**१.२.६.११. डांगोरा एका नगरीचा :**

आपण मनाशी एक धरतो न् दैव वेगळंच काही वाढून ठेवतं.(पृ.१४), हातच्या काकनाला आरसा कशाला.(पृ.३०१), चोरावर मोर(पृ.१७९) पण कसचं काय न् फाटक्यात पाय!(पृ.२७८), डाव्या हातचं उजव्या हाताला कळता कामा नये.(पृ.३०९), उगाळावा कोळसा तितका काळाच(पृ.३१५), मुल्क राणीचा, अंमल परधानजीचा, हुक्म फौजदाराचा(पृ.३६३), वेड पांघरु नका आणि मला पेडगावला पाठवायचा प्रयत्न करु नका.(पृ.३६७), दे माय धरणी ठाय(पृ.३८१), साप साप म्हणून दोरीची खांडोळी करणे(पृ.४०२), गतकाल तो गतकाल(पृ.४२३) कुणाचं कशात, तर कुणाचं कशात असतं. ते बदलणं कुणाच्या हातात?(पृ.४३३) काळ आला होता, पण वेळ नव्हती आली.(पृ.४४०, ४४१) जो करतो तो भरतो(पृ.४५२), एका दगडात दोन पक्षी मारणे(पृ.४५३) आपल्यावरुन जग ओळखावं म्हणतात, सत्त्व सांभाळावं आणि प्रजेच्या कल्याणासाठी झटावं.(पृ.४८०)

**१.२.६.१२. बारोमास :**

दिसायले देखणी अन् कामाले पोकळ फुकणी.(पृ.१६), जसा संग तसा रंग.(पृ.१७), असून अडचण, नसून खोळंबा!(पृ.२६), पैसा फेक तमाशा देख.(पृ.४४), ज्याचा हात मोडंल त्याच्या गळयात पडंल.(पृ.४९), मुठभर घुगऱ्या अन् सारी रात मचमच झाली.(पृ.५०), बारा वर्स तप केलंन् गाढवाशी पाप केलं.(पृ.५३), नाव मोठं अन् लक्षण खोटं.(पृ.५७), दुभत्या म्हशीच्या लाता लय गोड.(पृ.८७), तोंड दाबून बुक्क्यांचा मार.(पृ.९३), आपलंच नाई धड, न् दुसऱ्याले कशाले म्हणावं जड.(पृ.९४), काळा कोळसा कितीबी उगाळला तरी काळंच उमटणार हाये.(पृ.९६), काम सरो आणि वैद्य मरो.(पृ.९९), खाया पिया कुछ ना... गिलास फोडा बाराणा...(पृ.१०४), सहज पडे अन् दंडवत घडे!(पृ.१०७), पळसाला पानं तीनच.(पृ.१२२), इकडून तिकडून वारलं अन् मंधी मुसळ मारलं.(पृ.१३०), उठता लात बसता बुक्की.(पृ.१३०), सतरा कारभारी अन् ज्यो त्यो पायखोरी.(पृ.१४९), घरोघरी मातीच्याच चुली.(पृ.१५६), आया बाया दाराशी अन् वायगोळा उराशी(पृ.१५६) मस्तकातच काही नाही तर नाकात तरी कुठून उतरणार.(पृ.१६३), चोरच्या चोर अन् शिरजोर.(पृ.१६७), आपलेच ओठ आपलेच दात, कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ.(पृ.१६९), तुमी तशा आमी अन् नीट बसा मामी.(पृ.१७२), आडजीभ खाय अन् पडजीभ कोल्डी राय.(पृ.१९३), एक घाव दोन तुकडे.(पृ.१९७), ज्याच्या हाती ससा त्यो पारधी.(पृ.२१८), दुधाचा चटका लागला त ताकबी फुकून फुकून पितात

लोकं.(पृ.२१९), कळतं पण वळत नाई.(पृ.२३४), जशी करणी तशी भरणी.(पृ.३३२) प्रस्तुत कादंबरीतील म्हणी वैदर्भिय बोलीतील ठेवा असून लेखक त्याची पेरणी आशयानुरुप समर्पक पात्रांच्या मुखातून वदविताना दिसतो.

**१.२.६.१३. खारीच्या वाटा :**

काम नाय कुठं अन् नाकात बोटं.(पृ.८६), एक सरकार त्याचं बारा परकार (पृ.१२७)

**१.२.६.१४. फेसाटी :**

हिथ वलबी जळतया अन् वाळंबी  जळतया. पैसा हाय तर सगळं हाय(पृ.१४३)

प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेल्या सर्वच म्हणी लोकजीवनातील विविध संदर्भ स्पष्ट करतात. त्यामुळे कादंबरीच्या भाषेला एक प्रकारचे भाषिक मूल्य प्राप्त होते.

**१.२.७. वाक्प्रचार :**

मोजक्या शब्दांत गहन अर्थ व्यक्त करणारा शब्दसमुदाय म्हणजे वाक्संप्रदाय होय. लोकजीवनातील अनुभवातुन वाक्प्रचार विकसीत होत असतात. प्रा.दिनेश डांगे म्हणी व वाक्प्रचाराचे महत्त्व स्पष्ट करतांना म्हणतात, ''भाषा हा मनुष्याचा विशेष अधिकार आहे. परंतु प्रभावी भाषा हा भाषाप्रभूंचा विशेष अधिकार आहे. भाषेमध्ये म्हणी आणि वाक्प्रचारांचा वापर केल्याने विविध व इच्छित परिणाम साध्य होतात. टोमणे मारणाऱ्यांना तर या म्हणी म्हणजे वरदानच असते. या चतुर मंडळीमुळेच म्हणी आणि वाक्प्रचारांचा जन्म होत असतो. म्हणींचा वापरही जपून करण्यात यावा.''[९३]

**१.२.७.१. ययाति :**

गहिवर येणे(पृ.१७), हुरहुरू लागणे(पृ.५८), सुताने स्वर्गाला जाणे(पृ.१५६), पाणिग्रहण करणे, समरस होणे(पृ.१६६), कानावर येणे, जीवाचे कान करून ऐकणे(पृ.१७७), तोंडाला पाणी सुटणे(पृ.२००), नाक मुठीत धरणे, मन व्याकूळ होणे, गदगदून जाणे(पृ.२०७), जीव भांड्यात पडणे(पृ.२५५), तोंडचे पाणी पळणे(पृ.२६१), आगीत तेल पडणे(पृ.२७७), सुश्रूषा करणे(पृ.२८१), जीवाला जीव देणे, डोळ्यात तेल घालून जपणे(पृ.३०८), आनंद गगनात मावेनासा होणे(पृ.३१०), डोळयात प्राण आणून वाट पाहाणे(पृ.३११), जीव कासावीत होणे(पृ.३१६), डोळे लावून बसणे.(पृ.३२३), तळपायाची आग मस्तकात जाणे, कानावर हात ठेवणे(पृ.३२६), अंगाची लाही लाही होणे(पृ.३३६), गहिवरून जाणे(पृ.३८६) ययातिमध्ये

आलेल्या वाक्प्रचारांचा उदाहरणादाखल मोजक्याच परंतु आशयाला अनुसरुन वापर असलेल्या वाक्प्रचारांचाच समावेश येथे केला आहे.

**१.२.७.२. रथचक्र :**

फोडून काढणे(पृ.३), दाद देणे(पृ.४), तोंडात साखर पडो(पृ.५), शंख करणे (पृ.१३), कानावर येणे(पृ.१४), कानउघडणी करणे(पृ.१५), धारेवर धरणे, पडखाणे(पृ.२२), तोंडाला तोंड देणे(पृ.२५), गुदगुल्या होणे(पृ.२७), गहिवरून येणे(पृ.२९), जीवात जीव येणे, मुसळ केरात जाणे(पृ.३४), उदक सोडणे(पृ.४४), वेळ वटावणे(पृ.४५), कोंड्याचा मांडा करणे (पृ.४६), पाय पोस पायात न राहणे(पृ.५३), मुठीत जीव धरून पाहणे(पृ.५५), कानावर हात ठेवणे(पृ.५७), वर्मी बसणे(पृ.७३), ठाव घेणे(पृ.८९), काटयाचा नायटा होणे, अंगाला घाम सुटणे(पृ.९०) तोंड वेंगाडणे(पृ.१४९), भानावर येणे(पृ.१८०), जीवाचे कान करणे(पृ.१८२), उत्सवावर विरजण पडणे.(पृ.११२)

**१.२.७.३. स्वामी :**

भानावर येणे(पृ.५), आश्चर्यचकित होणे(पृ.८), पराचा कावळा करणे(पृ.१४), गर्भगळीत होणे(पृ.२१), डोळ्याला डोळा न लागणे(पृ.२९), कानी येणे(पृ.४४), दाती तृण धरणे(पृ.५१), लहान तोंडी मोठा घास घेणे(पृ.७०), जीवात जीव येणे(पृ.९२), उराला उर भिडणे(पृ.९४), तोंड देणे(पृ.११२), कूच होणे(पृ.११५), देहभान विसरून जाणे(पृ.११७), तलवारीचं पाणी दाखविणे(पृ.१२६), कुणाचा पायपोस कुणाच्या पायात न राहणे(पृ.१३१), डोळ्यात प्राण आणणे (पृ.१३२), स्वर्गाला हात टेकणे(पृ.१३६), डोळ्याचे पारणे फिटणे(पृ.१४६), मग्न होणे(पृ.१९२), जिवाचे रान करणे, तोंडाला पाणी सुटणे(पृ.२०५), पाणी पाजणे(पृ.२१४), भान नसणे(पृ.२१६), जीवाचे मोल देणे(पृ.२२०), घरावर गाढवाचे नांगर फिरून घेणे(पृ.२३५), मुलाहिजा न राखणे(पृ.२९६), बभ्रा होणे(पृ.२९९), शुभ्र धोतराची पितांबरे होणे(पृ.९७), पळता भूई थोडी होणे(पृ.९६).

**१.२.७.४. स्मरणगाथा :**

अरत्र ना परत्र असं होणे(पृ.११), तिरपिट उडणे(पृ.१३), डोळे पांढरे होणे(पृ.१३), दांतातळी आंगुळी दाबणे(पृ.२१), पंचतत्वात विलीन होणे(पृ.२२), मनात दंभ असणे(पृ.२६), बारामास तेरा काळ वाहाणे(पृ.२८), मनाच्या दुधडी अगदी काठोकाठ भरून जाणे(पृ.३२),

दातांतळी आंगुळ्या अडकणे(पृ.१००), घाम फुटणे(पृ.१३४), ब्रम्हांड गरगरून जाणे(पृ.१३९), मासा गळाला लागणे(पृ.१३९), बोंब ठोकणे(पृ.१३९), ताकास तूर न लागणे(पृ.१४३), चट्टामट्टा करून टाकणे(पृ.१४५), घाव घालणे(पृ.१५६), हुं की चूं न करणे(पृ.१७६), मन भरून जाणे(पृ.१९५), तृप्त होणे(पृ.२२८), तोंडाला फेस येणे(पृ.२२८), चित्त वेधून घेणे(पृ.२३४), तोंडात शेण घालणे, सुकृतावर पाणी फिरणे(पृ.२६०), मस्तकशुळ उठणे(पृ.२७८), मन भारावून जाणे(पृ.२८७), जीव तीळ तीळ तुटणे(पृ.२८८), मुरकुंडया वळणे (पृ.३१६), मन पाझरणे(पृ.४१३), मन हादरणे(पृ.४१५), करतळी आवळा डोलणे(पृ.४२४), मस्तकाचं अवघ्राण करणे(पृ.४३९), मन हुरहुरं लागणे(पृ.४४०), भानावर येणे(पृ.४४१), गर्भगळीत होणे(पृ.४९८), मन गढूळ होणे.(पृ.५४९).

**१.२.७.५. सत्तांतर :**

उड्या ठोकणे, गिरगिरत खाली येणे (पृ.१), हादरवून टाकणे, उखडून लावणे (पृ.२), घबराट होणे, सुसाट पळणे, कराकरा दात खाणे (पृ.३), धीर येणे, निवडून काढणे, हरकत नसणे, उखाळ्या पाखाळ्या करणे (पृ.४), आव्हान देणे (पृ.५), काळ येणे, हिंमत न होणे, भिऊन असणे, दगा देणे, अदमास घेणे (पृ.६), जिवावर बेतणे, मान डोलवत राहणे, हिसकावून पळवणे, भागीदार होणे (पृ.७), सरकू लागणे, पर्याय नसणे, जोखमीची असणे, निरखून पाहणे, धारिष्ट्य करणे, काळ येणे, बळ एकवटणे (पृ.१०), वावगं न घडणे (पृ.११), क्षणभरही न रेंगाळणे, जीव कानात गोळा होणे, इशारा देणे, धोंड्यासारखे गप्प राहणे, स्तब्ध राहणे (पृ.१२), भक्ष्यावर तुटून पडणे, काही न उरणे, कान टवकारणे, निशाणी न राहणे (पृ.१३), नादात असणे (पृ.१४) आदब दाखविणे (पृ.१५), उजाड होणे, अनुकूल संधीची वाट पाहणे, भिऊन राहणे (पृ.१६), व्यग्र असणे, सुगावा नसणे, आदमास घेणे (पृ.१७), निकराची चकमक होणे, विनाश होणे, अवसर मिळणे (पृ.१८), पकड सैल करणे, अंधारात बुडू लागणे (पृ.२१), दबकत दबकत शिरणे, मागमूस नसणे (पृ.२२), टक लावून पाहणे, चोरासारखे आजूबाजूला पाहणे, गर्क असणे, कोलाहल उठणे (पृ.२३), सर्वस्वी अपरिचित नसणे, दोन्हीही डगरींवर पाय ठेवणे, सुगावा लागणे, भरवसा असणे (पृ.२४), वश करणे, पराभूत होणे, कल्पना असणे, इरादा असणे, अस्वस्थ होणे, चेव येणे (पृ.२६), राजी नसणे, पाठलाग नसणे, बेधडक जाणे, हिसका मारणे (पृ.२७), धूमतकाट पळणे, मोहरा फिरवणे, तावडीत सापडणे (पृ.२८), सुसाट धावणे, झांझड पडणे, कह्यात ठेवणे (पृ.२९), विनाशाकडे जाणे, कसोशीने प्रयत्न करणे, काढता पाय घेणे (पृ.३०), सत्ता काबीज करणे, बाजूला

जाणे, सुसाट पळणे, टवकारून पाहणे, कानात जीव आणणे (पृ.३१), आवाक्यात नसणे, दचकून जाणे (पृ.३२), भयचकित होणे (पृ.३३), कोलाहल होणे (पृ.३६), हुसकावून लावणे (पृ.३७), फस्त करणे (पृ.३८), भम्म सुजणे, वेदनांचा आगडोंब उसळणे, शरिराची विटंबना होणे, जीव घाबरा होणे, पत्ता लागणे, आतुरतेने वाट पाहणे, नामोनिशाणी न राहणे (पृ.३९), ताकदीचा अदमास घेणे, प्राणावर बेतणे (पृ.४०), सावध होणे, चाहूल घेणे (पृ.४१), दृष्टीभेट होणे (पृ.४२), बेजार होणे, कडकडून चावा घेणे, कळवळून ओरडणे, रट्टे मिळणे, भयाकुल नजरेने पाहणे, तावडीत सापडणे, आनंदाने उड्या ठोकणे (पृ.४३), मतलब नसणे, गळा सुकून जाणे, संशयित नजरेने पाहणे, डोकावत राहणे, धास्ती असणे (पृ.४५), टेहळणी करणे (पृ.४६), हाकलून देणे, थरकाप होणे, भराभर खाली येणे (पृ.४७), वासना होणे, खुणावत राहणे, पराकाष्टा करणे (पृ.४८), काळीज उन्मळून येणे, जिवाच्या आकांताने ओरडणे, भितीने डरंगळायला होणे (पृ.४९), विरोध न करणे (पृ.५०), सैरावैरा इकडे तिकडे धावणे, धोक्यातून सुटका होणे, सणका फार वाढणे, गदगदू लागणे, धावाधाव होणे, काळवंडून येणे, भराऱ्या सुरू होणे, भिरभिरू लागणे (पृ.५२), चालढकल करणे, चिवचिवाट करणे, घट्ट बिलगणे, भयचकीत डोळ्यांनी पाहणे (पृ.५३), दंग होणे, इशारा करणे, दडून गप्प बसणे, धारदार करणे (पृ.५४), जोरदार दंगा करणे, एकत्र हिंडणे, दिसेनासे होणे (पृ.५५), अंगावर धावून येणे, ध्यानात येणे, आसपास फिरकू न देणे, हाकून देणे, शेपट वर करून पळणे, परागंदा होणे, पोटाशी धरणे, शिरकाव करणे (पृ.५६), प्रतिसाद देणे, दखल घेणे, बोलता न येणे (पृ.५७), नावनिशाणी न राहणे (पृ.५८), सतत कोलाहल असणे, वाट बघणे, झाकोळून येणे, बाहेर पिटाळणे, चाचपून बघणे (पृ.५९), कलकलाट करणे, माघारी पळू लागणे, (पृ.६०), उलथून पडणे, नजर असणे, पहारा असणे, खाऊन गट्ट करणे (पृ.६१), घायाळ करणे (पृ.६२)

**१.२.७.६. झोंबी :**

पाचवीला पुजलेलं (पृ.१), घरावर गाढवाचा नांगर फिरविणे(पृ.११), हाय खाणे(पृ.१३), काळजाचं पाणी होणे(पृ.२२), पोटात भीतीचा गोळा उठणे(पृ.२७), जीव भांड्यात पडणे(पृ.३०), कानात प्राण आणून ऐकणे(पृ.६४), पाचावर धारण बसले(पृ.७३), जीवाचा कान करणे, धडपड करणे(पृ.९७), कानाडोळा करणे(पृ.क्र.१२९), उकाळ पांढरं होणे(पृ.१५२), मन खट्टू होणे(पृ.१५८), भान हरपून जाणे(पृ.१६१), कान टवकारणे(पृ.१७१), मनात गलबलून येणे(पृ.१७९), जीव तळमळणे(पृ.१९३), सर्वांगाला दरदरून घाम सुटणे(पृ.२०२), मनातल्या

मनात दात धरून असणे(पृ.२१९), वर्मावर बोट ठेवणे(पृ.२३२), जिवाला इंगळ्या डसणे(पृ.२६५), तगमग होणे (पृ.२७९), मनाचा हिय्या करणे(पृ.३००), येडबडल्यागत होणे (पृ.३०९), आभाळाला हात लागणे (पृ.३३६), मन उद्विग्न होणे(पृ.३३८), जीव कैगटून जाणे(पृ.३३९), हालात ख्याल करणे(पृ.३६५), डोक्यात वादळ घोंगावणे(पृ.३७१).

**१.२.७.७. झाडाझडती :**

कान लावून बसणे(पृ.३), बिलामत येणे (पृ.४), डोळ्यात जीव आणणे, सुखाचा जीव दुःखात घालणे (पृ.७), मातीच्या मोलाने विकणे (पृ.९), दिवसा चांदण्या मोजणे (पृ.१२), गुंगारा देणे (पृ.१४), फणा काढणे (पृ.१३), खिरीत खराटा पाडणे, आक्रीत वाटणे (पृ.१५), कान टवकारणे (पृ.१८), डाव साधणे (पृ.२०), डोळयात तेल घालून राखण करणे (पृ.३८), हात ओलं करणे (पृ.५८), डोळ्यात जीव आणणे (पृ.६४), आक्काबाई आठवणे (पृ.६८), पाण्यात खडा टाकणे, कान टवकारने (पृ.७४), डोंगरासारखा आधार वाटणे (पृ.८०), तोंडच पाणी पळणे (पृ.८५), तोंडातून पाणी गळणे (पृ.९०), काळजाचं पाणी होणे (पृ.९५), वश असणे (पृ.९७), जीव तीळ तीळ तुटणे (पृ.९९), अधाशासारखे बघणे (पृ.१००), चंग बांधणे (पृ.१०४), टांग मारणे (पृ.११७), जीव आतल्या आत पाखडणे (पृ.१२०), उदोउदो करणे (पृ.१२३), सुपडा साप होणे (पृ.१३७), जीवात जीव येणे (पृ.१६७), अंगाची आग आग होणे (पृ.१६९), तीळ तीळ तुटणे(पृ.१९०), जीव गुदमरून जाणे(पृ.१९१), टूम लागणे(पृ.२०१), जीवापाड जपणे(पृ.२०२), जिवाचा आटापिटा करणे(पृ.२१५), जीव भांड्यात पडणे (पृ.२२७), मन भरून घेणे (पृ.२५५), आयागमनी होणे (पृ.२७८), कानी कपाळी ओरडणे (पृ.२८३), गनीम होणे (पृ.क्र.२८७), ताकासतूर लागू न देणे (पृ.२९२), सर्गाला तोरण बांधणे (पृ.२९४), आक्काबाई आठवणे(पृ.३०५), जीव नकोसा होणे (पृ.३१५), आक्काबाईचा फेरा मागं लावणे (पृ.३१९), हातावर उदकं पडणे (पृ.३२०), कानीकपाळी ओरडणे (पृ.३३२), जीवाचा थरकाप उडणे (पृ.३४४), जीव गहाण ठेवण (पृ.३४५), सळो की पळो करून सोडणे (पृ.३६५), पत्थराला पाझर फोडणे (पृ.३८१), जीवात जीव येणे (पृ.३८६), पोळी भाजून घेणे (पृ.३८९), कोंड्याचा मांडा करणे (पृ.३९५), तोंडाला पाणी सुटणे (पृ.३९९), खटुकाला घाम फुटणे (पृ.४०६), हबकून जाणे (पृ.४२५), माती होणे (पृ.४३६) झाडाझडतीतील वाक्प्रचार हे दुःखाची जाणीव करुन देणारे अस्सल ग्रामीण असलेले एकूणच भाषाशैली व निवेदनाला पोषक अशा प्रकारचे असलेले दिसतात. त्यातून प्रभावी परिणाम साधला जातो.

### १.२.७.८. राघववेळ :

फणा उभारणे, काजळागत काळेकुट्ट होणे, खंड नसणे, झाडीवर घालणे, ठप्प होणे, त्रेधा तिरपिट उडणे(पृ.१), फसाक फसाक चालणे(पृ.२), अचंबा वाटणे, भडभडून येणे(पृ.३), दृष्टीआड होणे, पोटात इस्ती भरायची येळ येणे(पृ.४), गलबलून जाणे, पऱ्हया होणे (पृ.५), भोकाड पसरणे(पृ.६), कोंडू कोंडू मारणे, घुटमळणे(पृ.७), हिरामोड होणे(पृ.८), हिरमुसला होणे(पृ.९), आशेचे अंकुर फुटणे, धीर येणे, विचारात गढणे, जीव धाकधूक करणे(पृ.१०), छिलेस माणूस असणे, कानावर हात ठेवणे, जीवाले खाऊन ऱ्हाहणे, डुख धरणे(पृ.११), आवाज चढणे, नड्डीच धरणे(पृ.१२), चित्त नसणे, सोडपिच्छा करणे, रामराम ठोकणे(पृ.१३), हाटकून पाहणे, उघाड देणे, सांगावा येणे(पृ.१७), भिरु भिरू लागणे(पृ.१९), खाटल्यावर घालणे(पृ.२०), जीवात जीव येणे(पृ.२०), लोभसवाणा दिसणे(पृ.२५), तोऱ्यात डोलणे(पृ.२५), धोंडी भोंडी करणे(पृ.२५), तिरिमिरीने म्हणणे(पृ.२९), विचारात हरवणे(पृ.३१), तंद्री भगणे(पृ.३२), वटीत घेणे, पडखाणे, डुंबून जाणे(पृ.३३), शहारून वाढणे(पृ.३५), हार्राशी होणे, दिस्ती होणे(पृ.४२), खात्री पटणे(पृ.४३), फाटक्यापेक्षा नेटकं असणे(पृ.४५), झाकतच येणे(पृ.४८), बुनगाळ लावणे(पृ.५०), जीवावर येणे(पृ.५१), अदमास घेणे, हातपाय आखडून मुडपून पडणे(पृ.५३), खसखस पिकणे(पृ.५५), सामसूम जाणवणे(पृ.५६), ढवळून निघणे(पृ.५७), डहळून येणे(पृ.६०), गुढा सुटणे(पृ.६२), गप्पाटप्पा होणे(पृ.६७), खकाणून जाणे(पृ.६८), सुदीच चेंदा लावणे(पृ.७०), अर्धमेली होणे(पृ.७१), उघळून लावणे(पृ.७३), दुजोरा देणे(पृ.७४), चिंतेने ग्रासणे(पृ.७४), बुजुन निघणे(पृ.७५), तृप्त होणे(पृ.७६), चिंतागती होणे(पृ.७६), सरम वाटणे(पृ.८१), चोप पडणे (पृ.८१), कसकस भरून येणे(पृ.८२), हिव वाजणे(पृ.८२), भेलकांडत राहणे(पृ.८६), विचारांना झटकून टाकणे(पृ.८९), विरून जाणे(पृ.९२), तुसडयागत बोलणे(पृ.९३), दृष्टादृष्ट होणे(पृ.९३), तोंडी तोंडी बी न लागणे(पृ.१००) धांडोळू लागणे(पृ.१००), सैरभैर करणे(पृ.१०२), हवीहवीशी वाटणे, मोडून पडणे(पृ.१०४), वटी येणे, तळमळत राहणे(पृ.१०४), तिडीक निघणे, धडधडू लागणे, खजील होणे(पृ.१०५), बचबच होणे(पृ.१०७), मांजरझाक होणे(पृ.१०८), रागाचा पारा चढणे, गच्च आवळणे, कल्ला करणे, विळखा घट्ट होणे, अवसान गळणे, तीरासारखे निघून जाणे(पृ.११०), डोळेवासून पाहणे(पृ.१११), विचारांची भिंगरी डोक्यात फिरणे, कपाळाची शिर तटतटू लागणे, त्याची ढंगाची असणे(पृ.११४), तटतटत राहणे(पृ.११५), पिच्छा सोडणे, वाट धरणे(पृ.११८), भडभडून येणे, ओक्सा बोक्शी

रडणे(पृ.११८), कळ काढणे(पृ.११९), तंद्री भंगणे(पृ.११९), भडभडून येणे, भांबावून जाणे(पृ.१२०), आतच्या आत तटतटणे(तळतळणे), विचारात गढणे(पृ.१२१), मनात खंतावणे(पृ.१२३), हारहमेशा मारणे(पृ.१२४), फिकीर न करणे, चऱ्हाट वळत राहणे, बुहाऱ्या वाण्याचे असणे(पृ.१२५), धुसफुसणे बंद होणे(पृ.१२६), खट्टू होणे(पृ.१३५), अल्लख ठोकणे(पृ.१३८), डोळे पाणावणे, घळाघळा रडणे(पृ.१४०), तोंडावरची रया जाणे, उत्साह मावळणे, धीर देणे, फिकीर न करणे(पृ.१४१), मळमळ ओकणे(पृ.१४८), रेपतच बसणे(पृ.१५०), तंद्री भंगणे(पृ.१५१), डोळा पाणावणे(पृ.१५४), हाताची बोटं सारखी नसणे(पृ.१५५), मुंगीच्या गतीने सरकणे(पृ.१५८), फिकीर मिटणे(पृ.१६७), सवड मिळणे, चिवचिव चालू राहणे(पृ.१६९), उत्सुकता शिगेला पोहोचणे(पृ.१७०), कोंडाळे करणे(पृ.१७१), जीव काचणी लागणे, तोंडाले काळं लागायची वेळ येणे(पृ.१७३), कानावर हात ठेवणे, घुम्यासार्की मुकीमुकी राहणे, पोटाले झोंबा येणे(पृ.१७४), तंद्रीत नाचू डोलू लागणे, मनातल्या मनात कच खाणे(पृ.१७५), उलगडा न होणे, जानजमान असणे(तरूण असणे)(पृ.१७८), खाली पाहत बसणे(पृ.१८०), आठ्या पडणे, चेव येणे, हुल्या देणे(उलट्या करणे) (पृ.१८३), कलकल लावणे, आघड-दुधड बोलणे (पृ.१८४), झपाझप पावले उचलणे (पृ.१८८), होकार मिळविणे, जाळभाज असणे(पृ.१८८), बांधून घेणे, जीव जागेवर येणे(पृ.१८९), जीव काट्याच्या आणीसारख्या होणे, जीव मेटाकुटीला येणे(पृ.१९१), बारा हत्तीचं बळ येणे(पृ.१९१), गच्च धरून ठेवणे(पृ.२०४), आकांत करणे(पृ.२०५), खसाखसा खणने, पेंग येणे, दणाणून जाणे(पृ.क्र.२१५), गुलमोहर बहराने ओसंडून जाणे, चेहऱ्यावर पळस फुलणे, न्याहळू लागणे(पृ.२१६), लाऊलाऊ पुरविणे(पृ.२२०), नसती जोखीम घेणे, बलामत येणे(पृ.२२१), मेटाकुटीला येणे, डू होणे(पृ.२२३), खाणा खराबा होणे(पृ.२२६), इधीन येवून ऱ्हाणे, अंगाला बिलगणे, धडपडत चालणे(पृ.२३२), कंबर मोडून येणे(पृ.२३५), हाड हाड न करणे(पृ.२३५), नाव न घेणे(पृ.२३६), कामात गढणे, विचारांनी तटतटणे(पृ.२३८), नाकी नव येणे, मुतात मासुळ्या मारणे(पृ.२४०), उभारी मिळणे, जिवाचं रान करणे(पृ.२४१), सुपुर्त करणे(पृ.२४२), सारासार करणे(पृ.२४३), मेणासारखी पाघळणे(पृ.२५२), आकसा जीव ओवाळून टाकणे(पृ.२५५), झोलांड रचने, घरदार सप्पा होणे(पृ.२६२), हाताशवाणे बोलणे, ताणून न धरणे(पृ.२६४), इराखतीला बसणे(पृ.२६५), बालबाल गोष्टी करणे(पृ.२६९), सांज धकणे(पृ.२७६), फिकिर लागणे(पृ.२७६), धाड घालणे, फन्ना उडविणे, खेळकर वातावरण विरुन

जाणे(पृ.२७७), ठाण मांडून बसणे, दवंडी देणे(पृ.२७९), हाताशवाणी बसणे, टक्क जागी असणे(पृ.२८०), खट्टू होणे, अंगावर काटा उभा राहणे(पृ.२८१), टिवल्या बावल्या करणे, डोळे मिचकावणे, गोरीमोरी होणे(पृ.२८८), छेडत राहणे, चाळीत बसणे(पृ.२८९), खसखस पिकणे(पृ.२९०), माजोरी करणे(पृ.२९२), उलगडू लागणे, सलगी करणे(पृ.२९३), होकारार्थी मान हालवणे, कपाळावर आठ्यांचे जाळे वाढणे, दृष्टी चुकविणे, घोळका करणे, मोडून पडणे(पृ.२९५), मख्ख बसणे(पृ.२९६), कानावेगळा करणे(पृ.२९७),जीव मेटाकुटीला येणे(पृ.२९९), चित्त हरपणे(पृ.२९९), त्रस्त करणे(पृ.३०१), पुकार होणे(पृ.३०२), दाताचं पाणी गिळणे, झाड पाडून अंगावर घेणे(पृ.३०५), डोळयात आनंदाश्रू उभे राहणे(पृ.३०६).

**१.२.७.९. ताम्रपट :**

मान डोलावणे(पृ.२३), पाट लावून घेणे(पृ.२५), सामील होणे(पृ.२६), जीवाला जीव देणे(पृ.३२), हरबऱ्याच्या झाडावर चढवणे(पृ.३५), हृदय भरून येणे(पृ.४५), सळो की पळो करून सोडणे(पृ.४९), संभ्रमात पडणे(पृ.५२), नाकी दम येणे(पृ.५४), लष्कराच्या भाकरी भाजणे(पृ.७१), भूईला कान लावणे(पृ.८३), जीवात जीव येणे(पृ.८५), जीव टांगणीला लागणे(पृ.८६), भान हरपणे(पृ.८९), हात चोळत बसणे(पृ.९७), बेभान होणे(पृ.१०१), पसार होणे(पृ.११०), चकित होणे(पृ.११६), मनाचे सांत्वन करणे(पृ.१२३).

**१.२.७.१०.तणकट :**

कुणाचाच सासूल नसणे(पृ.९), तुटून पडणे(पृ.९), इंदरनी करून घेणे(पृ.१०), खुळयात जमा करणे, खिल्ली उडवणे, आवसान गळाटणे, आटा सरकणे, वचकून असणे, चार हात लांब असणे(पृ.१३), मारक्या म्हशी सारखं बघणे(पृ.१६), चेहरा पाठ असणे(पृ.१९), थुकाय लागणे, वचक असणे(पृ.२०), रंजीसपण येणे(पृ.२४), जीवाला सलम पडणे(पृ.२५), खुळ्यात काढणे(पृ.२७), डोक्यावर मिऱ्या वाटणे, डाफरून जाणे(पृ.२८), अवगत होणे(पृ.२९), आबादी आबाद असणे(पृ.३२), आजीजीचा सूर लावणे(पृ.३९), कानावर आदळणे, टाळा उघडणे(पृ.४१), चेव चढणे(पृ.४६), बूड थाऱ्याला नसणे(पृ.४७), रक्ताचं पाणी करणे, जग बसविणे(पृ.४८), थाकाला थूर लागू न घेणे(पृ.५८),जीवात जीव नसणे(पृ.६१), तालामाला बघणे, अव्याहत सुरू असणे, अंगवळणी पडणे(पृ.६४), गळ्याला येणे(पृ.६७), कोड्यात टाकणे(पृ.६९), आवाक होणे(पृ.७१), नूर पालटणे(पृ.८७), घायकुतीला येणे(पृ.९५), मनात

पाल चुकचुकणे(पृ.११२), कान टवकारणे(पृ.१५३), पराचा कावळा करणे(पृ.१५४), डोळ्यासमोर काजवे चमकणे(पृ.१८६), कंडका पाडणे(पृ.२०६).

**१.२.७.११. डांगोरा एका नगरीचा :**

झाकोळून टाकणे (पृ.३), बभ्रा सोसावा लागणे, अबोल होणे (पृ.१६), परवड निघणे (पृ.१७), एक ठाय खिळून राहणे (पृ.५३), सापाने मुंगसाला आमंत्रण देणे, जुगाड पडणे (पृ.६०), वाभाडे निघणे, सबूरीने घेणे (पृ.६४), फुरसत नसणे (पृ.६५), तकलीफ नसणे, झक्कास असणे, बुचकळ्यात पडणे (पृ.६९), सय करणे, ब्येस होणे, झालं गेलं गंगेला मिळणे, रांकेला लावणे (पृ.७०), मुद्रेवर आल्हाद दर्शवीणे (पृ.७२), चामडी लोळवणे, देशोधडीला लावणे(पृ.८३), ओक ओका होणे(पृ.१००), दक्ष असणे, विस्कटून टाकणे(पृ.११३), झिम्मड उडणे(पृ.१२६), तालेवारपणा मानणे(पृ.१३३), पायदळी घालणे(पृ.१३७), मिराण होणे, शाबीत होणे(पृ.१५३), तारांगण होणे(पृ.१५५), छातीत लकलकणे(पृ.१५७), कज्जे उठणे, तडजोड करणे(पृ.१७३), कानाला खडा लावणे(पृ.१७५), बभ्रा होणे(पृ.१७६), दम निघणे, उभ्याचा आडवा करणे(पृ.१७७), रया ठेवणे(पृ.२०७), गुऱ्हाळ लावणे(पृ.२१८), वडाची साल पिंपळाला लावणे(पृ.२३६), लकाकून जाणे, काळीज चिमून जाणे(पृ.२८९), जीव सहिराबहिरा होणे(पृ.२९२), अवचित टपकणे(पृ.३०१), शरमिंधा होणे, आश्चर्य वाटून चूर होणे(पृ.३०२), धीर धरणे, वाट धरणे(पृ.३०७), तुळशीत भांग उगवणे(पृ.३१२), निर्वाळा देणे(पृ.३१३), जन्माची आठवण ठेवणे(पृ.३१५), सळो की पळो करणे(पृ.३१६), तंद्री मोडणे(पृ.३१७), कुंपनावर बसून सुगीची स्वप्ने पाहणे, कंबर बांधून उतरणे(पृ.३२३), तारे तोडणे(पृ.३२४), आक्रीत करणे, बिनघोर करणे, वावड्या उठविणे, झोकून देणे(पृ.३२५), वेसण घालणे, थुंकून टाकणे, खेळखंडोबा होणे, डोक्यात भ्रम होणे, खल होणे(पृ.३२६), हितगुज करणे, तोंडात बोट घालणे(पृ.३२७), कड लावणे(पृ.३२९), गर्भगळीत होणे(पृ.३३६), आतल्या आत जळफळ होणे, घालमेल होणे(पृ.३३७), तलाश जारी असणे(पृ.३४३), पळता भुई थोडी करणे(पृ.३४९), भयानं दडखून जाणे(पृ.३५०), मनात अंगार भरणे(पृ.३५६), जबरदस्तीने वदवून घेणे(पृ.३५७), बोंब ठोकणे(पृ.३५८), शनीचा फेरा येणे, केस बी वाकडा न करणे, जीब न धजणे, डोळ्यावर कातडं ओढणे(पृ.३५९), रेघ न् रेघ ठावूक असणे, बिनडाग इमानं देणे(पृ.३६०), आवाका कळणे(पृ.३६१), हबकून जाणे, उग्रपणा धारण करणे, नसती बलामत घालणे(पृ.३६५), मन फणा काढून उठणे, वडाची साल पिंपळाला लावणे, लक्तरं काढणे(पृ.३६७), माथी मारणे(पृ.३६८),

गरगरुन जाणे(पृ.३६९), उचापत न करणे, निमुट चालणे, ठणका सांगणे, गय न करणे, सुन्न होणे(पृ.३८१), बाईलं काम नसणे, कोडं पडणे(पृ.३८२), नखशिखांत भांबावणे, तंद्री मोडणे(पृ.३८३), उन्माद चढणे(पृ.३८५), फशी पाडणे, भ्रांत वाटणे(पृ.३८८), जखमेवर मिठ चोळणे, मासा जाळ्यात येणे, नजरेतून न निसटणे(पृ.३९२), दिङ्मुढ होणे(पृ.३९४), सळो की पळो करुन ठेवणं, खास मामला असणे, मनसुबा पुरता विस्कटून जाणे(पृ.३९६), सुगावा न लागणे(पृ.३९७), उरावर बसणे(पृ.४१५), हिकमत करणे, भंबेरी उडणे(पृ.४२८), गावीही नसणे(पृ.४३०), मुलाहिजा न धरणे(पृ.४३१), जीव पाण्याहून पातळ होणे(पृ.४३२), निःस्तब्ध होणे(पृ.४४०), डोक्यात किडे पडणे, कपाळावर हात मारणे, घशाला कोरड पडणे, जीव घाबरा होणे, दिव्यातून बाहेर पडणे, ओक्साबोक्शी रडत बसणे, निश्चिंत होणे, धीर न सोडणे, ऋणी असणे(पृ.४४९), पळता भुई थोडी होणे(पृ.४५५), गलबलून जाणे(पृ.४५६), हुरळून जाणे(पृ.४६९), हात्ती अंगावर चालून येणे(पृ.४९१)

**१.२.७.१२. बारोमास :**

टेक गाजवणे(पृ.१), खुषामत करणे(पृ.२), जीवाचा घोळसा करणे(पृ.५), काट्याने काटा काढणे(पृ.४०), हातावर हात देऊन बसणे, जन्माची माती होणे(पृ.४५), चेऱ्याचे वारे होणे(पृ.४८), मनाला पालवी फुटणे(पृ.५९), आयुष्यात माती कालवणे(पृ.९३), मेहनत पाण्यात जाणे(पृ.९५), बाराच्या भावात जाणे (पृ.१०१), कानकोंडला होणे (पृ.१११), देहाची भिंगरी होणे (पृ.१२७), पोटात खोलवर खड्डा पडणे (पृ.२२०), चालत्या गाडीची खिळी काढणे (पृ.२३७), गर्भगळीत होणे(पृ.२५२), तीळ तीळ जीव तुटणे(पृ.), ताकाले तूर लागू न देणे(पृ.२९३), डोळयात प्राण आणून वाट पाहाणे(पृ.२९२), डोळे लावून बसणे(पृ.३१८)

**१.२.७.१३. भूमी :**

आतल्या आत कुरकुरणे(पृ.३), आठवणी मनात जमा होणे(पृ.३), डोक्यात दाटी होणे(पृ.१०), धुसफुस सुरू असणे(पृ.२५), जीव घाबरणे(पृ.२६), जीव टाकणे(पृ.२९), भानावर येणे(पृ.४२), चेहरा पडणे(पृ.८२), जीव कळवळणे(पृ.८३), भानावर आणणे(पृ.९४).

**१.२.७.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

रस असने(पृ.३), मतभेद नसणे(पृ.५)

**१.२.७.१५. खारीच्या वाटा :**

नेम नसणे, जीव भांडयात पडणे, उरात धडकी भरणे(पृ.५), हुंदका फुटणे (पृ.६), भानावर येणे(पृ.७), टुळु टुळु पाहणे, हुलहुल चालणे(पृ.११), सुस्कारा सोडणे(पृ.१२), कयास बांधणे(पृ.२३), पळ काढणे(पृ.२५), गुंग होणे(पृ.२७), धडा गिरवणे(पृ.३४), पसार होणे(पृ.३६), सगळं मुसळ केरात जाणे, जिव्हारी लागणे(पृ.३७), शिरस्ता होणे(पृ.३८), नूर न्याराच असणे(पृ.४०), टाप नसणे(पृ.४३), गावीही नसणे(पृ.४४), मागमूस नसणे(पृ.५२), जीव भांड्यात पडणे, गुडूप होणे(पृ.५३), लाही फुटणे(पृ.६०), हातचा मळ असणे(पृ.६४), सगळ्यावर पाणी पडणे(पृ.६६), त्रेधा उडणे(पृ.७०), तळहाताच्या फोडागत जपणे(पृ.७३), जीवात जीव येणे(पृ.७७), वड्याचे तेल वांग्यावर काढणे(पृ.७८), बोलायची शामत नसणे(पृ.७९), हुं की चूं न करणे(पृ.८२), चळ भरणे(पृ.८४), नाकी नऊ येणे(पृ.९५), वाचा बसणे(पृ.९८), होत्याचं नव्हतं होणे(पृ.१३५), तिनताड उडणे(पृ.१४९)

**१.२.७.१६. फेसाटी :**

धरणीला पडणे (पृ.१७), जीवात जीव येणे (पृ.१९), हाडाची काडं करणे (पृ.क्र.३१), जमीन धरणे (पृ.३३), जीव गहाण ठेवणे (पृ.३८), मुक्याचा मार खाणे (पृ.५५), यदगदीत पडणे (पृ.५७), घुखनी लागणे (पृ.६१), घर बुडणे (पृ.६७), जीव रंन्दीस होणे (पृ.९३), घरावर डोंगर कोसळणे (पृ.१००), दार पुजणे, पाठ फिरवणे (पृ.१०२), जीव घट्ट करणे (पृ.११३), तोंडाच्या कण्या करणे (पृ.११४) हे सर्व वाक्प्रचार माणसाचा स्तर, जीवनरहाटी कळण्यास मदत करतात.

**१.२.८. प्रतिमा व प्रतिके :**

**१.२.८.१. ययाति :**

बालपणीच्या आठवणीबद्दल यतातीच मत ''काळ्याकुट्ट ढगांनी झाकाळून गेलेल्या आभाळातून मंद चांदणे झिरपावे, तशा वाटतात त्या''(पृ.७) यति घरातून निघून गेला. त्याचा खूप शोध केला, पण ''आभाळातून गळून पडलेली चांदणी कधी कुणाला दिसते.''(पृ.१२) बालपणीचे स्वप्नाळू जगातील अनुभव म्हणजे फार गोड असतात. ''आभाळातील ढगांचे इवले इवले पांढरे पुंजके म्हणजे बागेतल्या सशाची आकाशाच्या आकाशात पडलेली प्रतिबिंब''(पृ.१४) ययातिची आई ययाति यौवनात आला तेव्हा माझीच दृष्ट लागू नये असे आईला वाटते. माझी एक काळजी दूर झाली, असेही ती म्हणते. तेव्हा ययातिला वाटते, या हस्तीनापूरच्या महाराणीला कसली

आलेय काळजी? तेव्हा आई म्हणते, ''ज्याच्या कलशातल्या अमृताचं विष झालं आहे. त्याला दुसऱ्या कलशाची काळजी वाटते.''(पृ.१६) आईच्या दृष्टीने पहिला कलश म्हणजे यति जो पळून गेला व दुसरा कलश म्हणजे ययाति. नगरदेवतांचा वार्षिक उत्सवाच्या शेवटच्या दिवशी एक साहसी खेळ आयोजित केला होता. वेगाने धावणाऱ्या घोड्याला मद्य पाजून विशाल वर्तुळाकार रिंगणात मोकळे सोडून द्यायचे. तो धावू लागल्यावर स्पर्धकाने त्याला गाठून त्याच्यावर मोड ठोकायची व त्या प्रांगणात पाच फेऱ्या घालून त्याला न थांबवता खाली उतरावयाचे. या स्पर्धेत ययातिचे सहभागी झाली आणि पाचवी फेरी सुरू झाली. तेव्हा ययाति सोनेरी स्वप्न सत्यसृष्टीत उतरले होते. ''स्वातीच्या पर्जन्य धारेतला बिंदू शिंपल्यात पडून मोती बनला होता. माझा आनंद गगनात मावेना''(पृ.२६) ययाति व यतिची जंगलात भेट होते. यति, ययातिला त्याच्या गुहेत घेऊन जातो व फळ खायला घेतो. कडू असलेली फळ यति संपवतो. ययाति मात्र त्याला गुहेच्या बाहेर येणं शक्य असत तर त्यान तो फळाचा तुकडा फेकून दिला असता. संन्यासी झालेला यति ययातिला म्हणतो, 'प्रत्येक इंद्रियावर माणसान विजय मिळवला पाहिजे. यासाठी तो एक प्रतिमा वापरतो. 'हिरवळीत साप लूपन बसतात. विरक्तीच्या आड आसक्ती ही तशीच''.(पृ.४४) कच दारूतून बाबांच्या पोटात गेला होता, संजीवनीसह का होईना तो सजीव होऊ दे म्हणून देवयानीने बाबांची पायधरणी केली होती. पण या कचाने मात्र देवयानीचे प्रेम झिडकारले. तेव्हा देवयानीला असे वाटते, 'हृदयाच्या तबकात प्रीतीची निरांजने लावून मी त्याला ओवाळीत असताना त्याने ते तबक उन्मत्ताप्रमाणे उधळून लावावे?'(पृ.१२३) कचाने देवयानीचे प्रेम झिडकारले जेव्हा देवयानीची जी अवस्था होते. ती पुढील प्रतिमेतून लेखकाने व्यक्त केली आहे. 'फुलांच्या पाकळ्या झडून जातात. मागे उरतात, ते केवळ त्यांचे काटे! प्रीती अशीच आहे का?' त्या फुलाच्या विरून गेलेल्या सुगंधाची आठवण करीत स्त्री मात्र झुरत राहते! त्या काट्याची ती वेडी पूजा करीत बसते. ते टोचून बोटातून रक्त येऊ लागेल.(पृ.१२५) पण देवयानी विचार करते मी मात्र या बायकांसारखी रडत बसणार नाही. अलका व मुकुलिकेने जे दिले त्यापेक्षा अधिक प्रेम मिळविण्याकरीता ययातिने देवयानीचे पाणिग्रहण केले. पण ययातिला असे वाटते. पुष्पशय्या मानून जिच्यावर मी सुखनिद्रा घेण्याकरिता निघालो होतो, तिच्यातून सापाची पिले बाहेर पडली होती!(पृ.१६९) यातून देवयानी विषयी ययातिच्या मनात असलेली कटूता व्यक्त होते. देवयानी एकदा आजारी पडली तेव्हा देवयानी व ययातिचे मूक संभाषण चालू होते. तिचे डोळे पाणावले, तिचे ते अश्रू-कमलदलावरच्या दवबिंदू सारखे दिसणारे ते अश्रू-(पृ.१७१) पुरूषाच्या जीवनातील स्त्रीचे स्थान सांगताना लेखकाने

ययातिच्या व्यक्तिरेखेच्या सहाय्याने मांडलेले मत असे, 'उन्हात जशी वायूची शीतल झुळूक, तशी रूक्ष व्यवहाराने व्यापलेल्या, संत्रस्त झालेल्या पुरूषाच्या जीवनात स्त्री! तिचे ओझरते स्मित, तिची साधी हालचाल फार काय तिचे भोवतालचे नसते अस्तित्वसुद्धा पुरूषाला सुखावह वाटते, उल्हासित करते.'(पृ.१७६) शर्मिष्ठेला महाराज भेटून गेल्यानंतर प्रत्येक रात्र, अगणित घटका त्यातिल असंख्य पळे तिला सुखाचे कांरजे वाटते. तेव्हा चा तो ब्रम्हानंद म्हणजे 'समुद्र शिंपल्यात घालून कशी कुणाला दाखविता येईल का? फुलाचे चित्र काढून त्याचा सुगंध कुणाला देता येईल का?' प्रीतीची अनुभूतीसुद्धा अशीच आहे.

प्रतिके : मूल हे आईच्या डोळयांतली बाहुली असतं, रे!(पृ.१३) मृत्यू हे भयंकर अस्वल आहे.(पृ.६१) मृत्यू हा अष्टौप्रहर अश्वमेध करणारा विजयी सम्राट आहे.(पृ.६१) प्रजा ही राजाला लाभलेली कामधेनु होय.(पृ.९९) मुलीचे मन लाजाळूच्या झाडाप्रमाणे असते.(पृ.१२७) समुद्रमंथनातून वर येणाऱ्या लक्ष्मीप्रमाणे विहिरीतून बाहेर येणारी देवयानी भासली.(पृ.१६५) 'प्रेमिकांचा खरा पुरोहित चंद्र आहे!'(पृ.२४३) शर्मिष्ठा महाराजांची सूर्यफूल होऊन त्यांची दूरून पूजा करीन असा विचार करते.(पृ.२४५)

**१.२.८.२.रथचक्र :**

तिचा धाकटा मुलगा रात्री अभ्यास करत होता. त्याला चहा करून देण्यासाठी ती उठली. त्यावेळी थाबड्यावर (गौरी) रॉकेल ओतून तिन काडी लावली. तेव्हा त्याच्या (थाबड्याच्या) जीवनचक्रातून मानवी जीवनाची प्रतिमा ती उभी करते. स्वतःच्या हातान थापलेला तो थाबडा काही वेळ धगधगून त्याची राख होणार होती. काही दिवसांपूर्वी तो गाई त्या पोटात टाकाऊ झालेला एक अन्नांश होता. त्याही पूर्वी गवताच्या रूपांन कोठेतरी वावरत असेल. लौकर तो पुन्हा मातीच्या कुशीत जाणार होता. कुठल्यातरी तृणांकुराला जगवणार होता. आयुष्याच्या अखेरच्या फेऱ्यात तो तिच्या उपयोगी पडत होता. खरं म्हणजे त्या फेऱ्याला आदि-अंत नव्हते. सर्वांच्याच आयुष्याचा रहाट असा फिरत असतो. काही लोटे भरलेले असतात; पण भरण्यापूर्वी ते आगोदर रिकामे व्हावे लागतात. तिच्या आयुष्याचा लोटा रिकामा व्हायचा राहिला नव्हता. तिनं आणखी थोडी कळ सोसली तर तिचाही लोटा भरेल. सृष्टीचा क्रम म्हणून ते अपरिहार्य होते.(पृ.१३६) जेव्हा ती आत्महत्येसाठी विहिरीच्या काठावर जाते. तेव्हा तिचा पाय घसरतो व वेडीवाकडी खाली कोसळली. तेव्हा तिचा एक हात रहाटाच्या माळेला लटकला होता. माळेवर चढण्याचा ती प्रयत्न करू लागली. माळ सरकत खाली आली. हातांतील खापेकड निसटू लागलं.

लगबग करून तिनं पाण्यात विसावलेल्या माळेच्या टोकावर पाऊल रोवलं. दोन्ही माळ घट्ट पकडून आता ती उभी होती. डाव्या हाताच्या रिकाम्या लोट्यांकडे तिच लक्ष गेल. उजवीकडल्या लोट्यांतील डचमळलेल पाणी स्थिर होतं.(पृ.२०७) अंतःकाळी तिचे जीवनही डाव्या व उजव्या बाजूच्या लोट्यांप्रमाणे आहे. रिकामा लोटा हे तिच नियतीच्या चक्रापूर्वी तिनं संपविलेलं जीवन आहे व उजवी कडल्या लोट्यांतील डगमगलेलं पाणी स्थिर आहे. म्हणजे तिनं आता पर्यंत जे खडतर आयुष्य जगलं आहे. ते आता स्थिरावलं आहे.

प्रतिके : सुतार पक्ष्याप्रमाणे अनेक विचार तिच्या डोक्यावर ठोके मारु लागले.(पृ.२३) स्थापना होण्यापूर्वीचं मुर्तीचं विसर्जन व्हाव तशी गत झाली होती.(पृ.२७)

**१.२.८.३. स्वामी :**

प्रतिमा ढगाळलेल्या आकाशातून चंद्र क्षीणपणे हसत होता.(पृ.९२) आपण महाली आलात, तेव्हाच आम्ही ते ओळखलं; पण एवढ्या लवकर चंद्रोदय होईल, असं आम्हाला वाटलं नव्हतं.(पृ.१८७) ''साक्षात मूर्तीमंत गाणं आमच्या हाती असताना हे गाणं ऐकायला कोण जाईल? आम्ही एवढे का अरसिक आहोत?''(पृ.१९२) गंगोबातात्यां रघूनाथरावांबद्दल म्हणताते, सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवला, म्हणून वनराज कधी स्वस्थ बसेल का? (पृ.९२) कोल्हापूर आणि सातारा ही एकाच धन्याची दोन ठिकाण आहेत. हे पटवून देताना 'ह्या छत्रपतींच्या गादीचा वटवृक्ष केवढा जरी फोफावला, विस्तार पावला, अनेक पारंब्यांनी तो सुशोभित झाला, दख्खन दौलतीला छाया मिळाली, तरी त्या वटवृक्षाच्या पारंब्यांनी, बुंध्याला तो जीर्ण आहे, बेडौल आहे, ढोली पडून विच्छिन्न दिसतो आहे, म्हणून हसू नये. जोवर तो बुंधा उभा आहे, तोवरच त्या पारंब्याच्या सौष्ठवाला किंमत आहे. जर दुर्दैवाने तो बुंधाच कोसळला, तर त्या पारंब्याच काय, त्या झाडाच्या आश्रयाला राहणारी आमच्या सारखी पाखरे बेघर होऊन जातील. छत्रपतीच गेले, तर महाराष्ट्र टिकेल कसा? ती गर्दी टिकवण्याची आमची जबाबदारी आहे, तशीच आपली आहे...'(पृ.२००) अनवडीच्या जंगलात हैदर लपून बसला तेव्हा माधवराव म्हणाले, ''बिळात शिरलेल्या सापाला बिळाच्या तोंडावर प्रहार करून काहीच अपाय होणार नाही. उलट, बडवणाऱ्याची शक्ती मात्र कमी होत जाईल. सापाला बाहेर काढण्याविना इलाज नाही.(पृ.२२०)'' माधवराव रमाबाईंना म्हणतात, ''तुझी आठवण यायला एवढं भव्य-दिव्य पाहावं लागत असं नाही. चैत्रातील पालवलेली चिंच पाहिली, तरी तू उभी ठाकतेस भर उन्हाळ्यात आकाशातून कापूस पिंजत जाणारा एकाकी मेघ जरी पाहिला तरी तुझ्या आठवणीने जीव व्याकूळ होतो.'' रमाबाई हरिहरश्वराच्या

यात्रेला जाण्याच्या तयारीला लागतात. तेव्हा माधवराव अनेक प्रतिमांचा वापर करतात. ''रमा, ज्या मार्गाने तू जातेस तो डोळे भरून बघ, वाटेनं तुला सागराचं दर्शन होईल. किनाऱ्याकडे सारखा झेपावणारा तो सागर बघ. प्रत्येक ठिकाणचा सागर तुला वेगळा भासेल. प्रत्येक ठिकाणचा किनारा बारकाईनं पाहिलास, तर वेगळा आवाज देईल. काही ठिकाणी सागराचा प्रमत्तपणा दिसेल; काही ठिकाणी त्याच्या आवाजात व्यथा व्यक्त होईल. भरतीला पृथ्वी पादाक्रांत करण्यासाठी गर्जत येणारा सागर, जेव्हा ओहोटी सुरू होते. तेव्हा व्याकूळ होऊन मागे जाताना दिसेल. काठावरच्या नारळी-पोफळींच्या बागा सागराला हसतानां दिसतील. तो पराजय मोठा विदारक आहे; क्लेशदायक आहे. हाताशी आलेला धरतीचा स्वीकार करता येऊ नये, हा त्या प्रियकर सागराचा पराभव अनुकंपेन बघ. नित्याचा पराभव तो सहन करतो आहे. तरीही त्याच्या प्रेमाची उत्कटता एवढीही कमी होत नाही.''(पृ.३१८)

प्रतिके : रघूनाथरावांना स्वकीयांशी लढण्यासाठी यवनांशी सुलूख केला. घोडनदीच्या पात्रात दोन्ही सैन्यांची गाठ पडली. पहिल्यादिवशी लढाईत दोन्ही बाजूंची हानी झाली. नंतर निजामांची मदत काकांना मिळाल्यामुळे काकांची ताकद वाढली. त्यामुळे तह करण्यास माधवराव तयार झाले. पण तरीही काकांनी माधवरावांच्यावर चाल केली. ऊराला ऊर भिडले व शेवटी माधवरावांनी काकांच्या स्वाधीन व्हायचे ठरविले. शरणागती पत्करली तरीही चारी बाजूंनी गारद्यांनी माधवरावांच्या तळाला वेढा दिला.

माधवरावांना त्यानंतर शिकारीला येण्याची आज्ञा केली. लेखकाने शिकारीचा प्रसंग डोळयासमोर साकारला आहे. निजामअल्ली सोबत रघूनाथराव आणि विठ्ठल सुंदर सोबत होळकर मुरादखानाने सुचविलेल्या टेकडीवर माधवराव गेले. चारीबाजूंनी हरणांच्या कळपाला वेढा दिला. सर्व हरणांनी वाट काढली व ती निसटली. एक नर तेवढा उरला. (चिंकारा जातीचा) ते भ्यालेले उमदे जनावर कावरेबावरे होऊन पाहत होते. धावत होते. जिकडे धावावे, तिकडून उतरणारी माणसे दिसत होती. चिंकारा धापा टाकीत एका रामकाठी झाडाखाली उभा होता. ती भीतीग्रस्त जनावर चारी बाजूंनी शेकडो स्वारांनी वेढले असूनही जीव वाचवण्याचा प्रयत्न करत होते. सारी शक्ती पणाला लावून ते जनावर धावत होते. माधवराव बेभान होऊन ते दृश्य पाहत होते. उभ्या जागी चिंकाऱ्याचे पुरे अंग धापत होते आणि त्याचवेळी एक स्वार चिकाऱ्याच्या दिशेने वेगाने सुटला. त्याने आपला पल्लेदार भाला सरसावला होता. साक्षात मृत्यू येत असलेला पाहूनही त्याचे पाऊल उचलत नव्हते. आपल्या टपोऱ्या नेत्रांनी मान वळवून तो स्वाराकडे पाहत होता. त्याच वेळी अगदी

नजीक जाऊन स्वाराने भाला पेलला...(पृ.१०९) चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''माधवरावांच्या एकूण अवस्थेचे दर्शन शिकाऱ्यांच्या चक्रव्युहात सापडलेल्या चिंकाऱ्यासारखं प्रतीकात्मक पद्धतीने लेखकाने दाखवलं आहे. यात प्रमुख शिकारी आहेत राघोबादादा.''[१४] जणू काही वरील प्रसंगातून रघूनाथरावांना आपली जी अवस्था (चिंकाऱ्यासारखी) झाली आहे. हेच माधवरावांना दाखवायचे होते असे वाटते. कारण शिकारीचा प्रसंग पाहिल्यानंतर माधवराव म्हणाले, ''काकांना सांगा त्यांच दुःख आम्हाला समजले.''

**१.२.८.४. स्मरणगाथा :**

लेखक गो.नी दांडेकर यांनी 'स्मरणगाथा' या कादंबरीमध्ये लेखन आकर्षक करण्यासाठी प्रतिमांचा वापर भरपूर केला आहे. लेखकाचे सद्‌गुरू काका शीर्षासन लावून तासन्‌तास उलटे उभे रहायचे. 'सद्‌गुरूंच शीर्षासन म्हणजे एक विस्मय होता. तो जणू पिवळ्या तेजस्वी मेणाचा उलटा ओतीव पुतळाच असे'(पृ.१६) लेखकाला त्याचे वडील महात्मा गांधीजींकडे घेऊन गेले. तेव्हा लेखकाने महात्मा गांधीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले, 'लख्ख तांब्याचा एखादा कोरीव कातीव पुतळा असावा, तसे मला गांधीजी दिसले.'(पृ.८१) लेखकाचे कुटुंब कोकणात त्यांच्या गावी जाण्यासाठी बोटीत बसले. तेव्हा बंदरामधून मचवे माणसे भरभरून बोटीकडे येत. त्यांचे बोटीत शिरणे जणू, 'वारूळांतून भुळुभुळु मुंग्या बाहेर याव्यात तशी माणसं जळमजल्यांतल्या जिन्यावरून वर चढत अन् भराभरा इथंतिथं सतरंज्या, अंथरू लागत.'(पृ.३२) बंदर सोडून बोट समुद्रात शिरली. तेव्हा 'चहू बाजूंनी भल्या मोठ्या तळ्यांत एखादी काटकी वाहात असावी, अन् तिच्यावर खूप मुंग्या असाव्यात तशी आम्ही माणसं त्या बोटीवर'(पृ.३३) असेच भासत होते. कोकणातील गोपाळ गड पाहिल्यानंतर लेखकाने गोपाळ गडाला उत्कृष्ठ प्रतिमा वापरली. 'एखाद्या म्हाताऱ्याच्या चकोटी केलेल्या डोक्याभंवती पागोट्याची चिंधुटी गुंडाळलेली असावी, तसा तो दिसत होता.'(पृ.३३) सुर्यास्ताच्या वेळी समुद्रावर सुर्याची किरणे पडल्यावर मनोहर दृश्य दिसत होती. 'दिवसा डोळे दिपवणारं सूर्यमण्डल आता अगदी मलूल झाल होतं. पाहता पाहता ते पाण्यावर टेकल. पण कसं ते आश्चर्य ! पाण्याला काही ते स्पर्श करीत नव्हतं. तिथल्या तिथ आपलं आपल्यांतच जिरत होतं पाहता पाहता ते चपटं झाल. जणू तापलेल्या सोन्याची ती लगडच आहे.'(पृ.३४) कोकणातील त्यांच्या गुडघे गावातील लेखकाची पहाट झाल्याची सूचना पक्ष्यांनी दिली. झाडांच्या गर्दीतून पक्षांचा कलकलाट ऐकू येत होता. 'त्यामुळं असं वाटे, की झाडांनाच सुरेल गळे फुटले आहेत.'(पृ.३५) अशा विविध प्रतिमा वापरून लेखकाने कोकण वाचकांच्या समोर उभा केला

आहे. लेखकाचे कुटुंब परतवाड्याहून नागपूरला गेले. तेव्हा 'डबक्यात झोपलेली मासोळी प्रचण्ड सरोवरांत जाऊन तिथं झोपेतून जागी झाली.'(पृ.६१) असे लेखकाने कल्पिले. तसेच पुढे असेही मत मांडले, 'आमची दिंडी नागपुरी जाऊन स्थिरावली, अन् कोंडलेल्या पाखराला आकाश मोकळे व्हाव, तसं माझं झाल'.(पृ.७०) लेखकाच्या खराब अक्षराविषयी लेखकाच्या वडिलांनी मांडलेले मत, 'चिखलात कोंबड्या नाचवाव्यात, अन् मग त्यांच्या पायांखाली कोरे कागद ठेवावेत मग ज्या आकृती उठतील, त्यांच्यात अन् तुझ्या अक्षरांत फारसा फरक नाही.'(पृ.८५) लेखक जेव्हा स्वातंत्र्य संग्रामांत उडी घेण्यासाठी घरातून पळून गेला. तेव्हा घरच्या अनंत आठवणी मनात घुमू लागल्या. 'वारूळ फुटल्यावर मुंग्या बाहेर धावाव्यात तशा.'(पृ.९६) गाडगेबाबांचे कीर्तन चालू असे तेव्हा प्रचंड जनसमुदाय भजना टाळ्या वाजवीत जणू, 'भल्या प्रचंड शेतांत पेरलेली ज्वारीची ताटं वाऱ्यानं हिंदकळावीत, तसं ते दृश्य दिसे' राप् राप् राप् गारा पडाव्यात, तशा आवाजांन सगळ मैदान भरून जाई.(पृ.२२८) गोपाळ म्हणजेच लेखक जेव्हा नर्मदा परिक्रमा करीत होते. तेव्हा त्यांना एक जंगलही पार करून जावे लागले. ते जंगल म्हणजे 'अस्वलीच्या अंगावर केस, मेंढ्याच्या अंगावर जितकी दाट लोकर, तितकं ते गहन' असे होते.(पृ.४९४) त्या जंगला भिल्लांच्या वसतीत गोपाळं गेला तेव्हा, 'एखाद्या हाडकुळ्या सशानं वाघाच्या गुहे समोरच मांडा ठोकून बसावं, ती गत झाली होती.'(पृ.४९८)

**१.२.८.५. सत्तांतर :**

पानांवर रेषा असाव्यात तशा या अरण्यात जनावरांच्या पायांनी पडलेल्या पायवाटा होत्या.(पृ.२०, २१) मोठ्या आगीच्या आसपास धगीमुळे जाता येत नाही, तसं रागामुळे त्याच्या आसपास कोणी फिरकत नव्हतं.(पृ.४५) दुपारी चार वाजता मोगा हळू आवाजात बडबडत तळ्याकाठच्या उंच सावरीवर चढला. फलटणीतल्या राखणदार जवानानं आपल्या उंचावरच्या नाक्यात उभं राहून आसपास टेहळणी करावी तशी त्यानं केली.(पृ.४६) तळ्याच्या पाण्यावर पांढऱ्या लाह्या फुटु लागल्या.(पृ.५३)

**१.२.८.६. झोंबी :**

शाळेत पहिल्या दिवशी गेल्यावर इतर मुलांची अवस्था लेखक पुढील प्रतिमेतून मांडतो. ''शाळेत माझ्यासारखी नवी आलेली दहा-पंधरा पोरं दोन भिंतीच्या कोपऱ्यात ओक्साबोक्शी रडत बसलेली. मेंढ्या रानात गेल्यावर कोकरं जशी ढालग्यात कोंडून ठेवताना ओरडतात, तशी त्या

पोरांची अवस्था.''(पृ.३४) ''मळ्याचा हिरवागार जीव वाटणारं उंबराचं जुनं जुनं झाड आज्या-पणज्यासारखं वाटायचं, कधी कधी ते नातवाकडं ज्या नात्याच्या नजरेनं बघावं, तसं माझ्याकडे बघतयं, असं वाटू लागायचं.''(पृ.११८) मागील वर्षी नापास झालेल्या चव्हाणाच्या मुलाने पटका टेबलावर ठेवून नंतर तो टेबलाखाली ढकलला, आनंदाच्या वर्गातील मुलांनी त्यावरुन आनंदच्या केलेल्या टिंगलटवाळीचे वर्णन लेखक प्रतिमा-प्रतिकांमधून करतो. ''माणसानं शिवलेल्या कावळ्याच्या पिलाला, बाकीचे कावळे चारी बाजूने हल्ला करुन टोचून मारतात, तशी माझी अवस्था झालेली. माझीच शाळा मला टोची मारायला उठलेली.''(पृ.१५९) लेखकाची सादलंगेकर मास्तरांशी जवळीक निर्माण झाली कारण त्यांनी लेखकामध्ये असलेला कवी व कलाकाराचे सुप्तकलागुण ओळखले होते. म्हणून लेखक म्हणतो, ''शब्दाचं वेड लागू लागलं. मनात सूरपेटी वाजते आहे, असं वाटू लागलं.''(पृ.१६२) आनसाचा बाळू खाण्यापिण्यामुळे गुटगुटीत दिसत होता. त्याला सर्वांना घ्यावेसे वाटत होते. ''उलट आईची बारकी पोरं उपटून टाकलेल्या भाजीगत कोळमसून गेलेली वाटायची.''(पृ.१८७) शाळा बुडली की दिवसभर जीव तळमळत होता. त्याविषयी लेखक प्रतिमा वापरतो, ''वासराला पहिल्यांदा जेव्हा दावं लावलं जातं, तेव्हा त्याची जशी मान सोडून घेण्यासाठी धडपड चालते नि शेवट ते दमून दमून जसं केविलवाणं होऊन कोलमडून बसतं, तसं होत होतं.''(पृ.१९३) अशा प्रकारे लेखकाने प्रस्तुत कादंबरीत सर्व ग्रामीण प्रतिमा-प्रतिके वापरलेली आहेत.

**१.२.८.७. झाडाझडती :**

जांभळी धरणासाठी आवडाईच्या घरादारावर शेतातल्या पिकावर बुलडोझर फिरवला त्यावेळी आवडाईने आगपाखड केली पण शासकीय आदेशापुढे नाविलाज होता. तेव्हा लेखकाने निसर्गातील विविध घटकांच्या प्रतिमा योजून या प्रसंगाला अनुरूप विविध प्रतिमांतून मानवी मनाची तगमग व्यक्त केली आहे. 'डोझरनं मुग्यांची वारूळं झटक्यात उदसून टाकली. मुग्यां ढेकळाच्या आडाला अंग चोरू लागल्या. बिळं उद्ध्वस्त झाल्याने उंदीर येड्यावानी इकडतिकड उड्या घेऊ लागले. चिवारीतली पाखरं पिल पोटाबर धरून उडून गेली. मध्येच निसटतं पात मोठ्या वारूळाला लागल. वारूळ मध्येच कलिंगडासारखं कापलं गेल. त्यातून सापाचं जुळ बाहेर आलं. मादीची शेपटी तुटली. रक्तबंबाळ मादी आणि चवताळलेला नर, दोघेही सुडानं बेधुंद होऊन गणग्यावर उभे राहिले. त्यांनी समोरचा अक्राळविक्राळ डोझर बघितला आणि दोघांनीही भिऊन काट्याकुट्यांतून सूंबाल्या केला.'(पृ.२२) वेगवेगळ्या प्रतिमा वापरून धरण म्हणजे मरण आहे किंवा धरणामुळे

धरणग्रस्तांच्या जीवनाची परवड होणार आहे हे स्पष्ट करण्यात लेखकाने कस पणाला लावला आहे. 'ढगातनं इजबाई कोसाळती का? तसंच धरणांच कवा उरावर बसंल कुणाला ठावं'.(पृ.५) 'बकऱ्याला पाण्यात सुरी दिसावी तसा जांभळी गावाला आपला भविष्यकाळ दिसत होतो.' (पृ.२३) 'गावपांढरीच्या घट्ट मुळ्या तिच्या मनात रूतलेल्या काळ्या खडकात वडाचं झाड रूजावं तशी ही नाळ तोडून कुठ जायचं?' (पृ.४०)'हे धरण बेनं बघ की कसं काळजात घुसतंया तांबीरलेला खिळा टाचंत घुसावा तसा. पायबी तांबीरतोय आन् खिळाबी निघेना-'(पृ.७५) 'पोटात खिळा खुपसल्यासारखं गावच्या रानात धरण उभं राहिलेलं'(पृ.१२९)

**१.२.८.८. राघववेळ :**

काळेकुट्ट घोंगडे पांघरून गळणारे आभाळ(पृ.२), काजळागत काळेकुट्ट झाले.(पृ.२), झड ही अशी खरजच्या खाजंवाणी थांबायचं नाव घेईना झाली.(पृ.६), बैलगाडीला अडकवलेल्या वंगणाच्या नळ्यासारखा त्याच्या मागे चालला. विजेचे बटण दाबताच एखादे यंत्र हलावे तसे मांग भराभर जागचे हलले.(पृ.१८), दिवसभर रघू त्याच विचारात दोरा तुटलेल्या पतंगासारखा भिरभिरत होता.(पृ.३०) ग्रामीण भागातील पार्श्वभूमीवरील प्रतिमा लेखक कौशल्याने वापरतो. ते वरील उदाहरणांवरुन स्पष्ट होते.

**१.२.८.९. ताम्रपट :**

नाना व त्यांचे सहकारी स्वातंत्र्य लढ्यात उतरल्यानंतर त्यांना भूमिगत व्हावे लागले. 'विंचवासारखं पाठीवर सारं बिऱ्हाड'(पृ.५७) वेषांतर करून हे लढवय्ये फिरत होते. एकदा नाना हे जयप्रकाश व मुक्ता यांना घेऊन नदीवर गेले. नदीविषयी जयप्रकाशला ते सांगत होते, ''ती एखाद्या प्रेमळ आईसारखीच आहे. आपला सारा मळ ती पोटात घेते. तरी ती सगळ्यात जास्ती निर्मळ आहे.''(पृ.२३०) गोविंदभाई तामसरेची पत्नी जेव्हा जगाचा निरोप घेत तेव्हा तिच्याविषयीचे मत लेखकाने व्यक्त केले आहे. ''केवढे थोर, क्रूर, सोशिक, गवताच्या पात्यासारखे जिणे''(पृ.२६७) नाना सिरूर यांनी कारखान्याच्या संचालक पदाचा राजीनामा तुकाराम भोईटेंना सुपुर्द केला त्यात त्यांनी लिहिले होते, ''शेगडीजवळ जास्ती उष्णता असली तरी ती तिथून इतर भागाकडे सारखी वाहात असते ती काही तिथेच अडून राहत नाही. तसे प्रगतीने साऱ्यांना कवेत घेतले पाहिजे.''(पृ.२८६) अशा प्रकारच्या प्रतिमांचा लेखकाने आपल्या लेखनात कौशल्याने समावेश केला आहे. सदर प्रतिमांचा वापर करुन लेखकाने आशयाला एक विशिष्ट संदर्भ प्राप्त करुन दिलेला आहे. हे वरील प्रतिमांच्या उदाहरणांवरुन लक्षात येते.

**१.२.८.१०. तणकट :**

'रस्ता मरून पडलेल्या सापासारख्या निर्जीव'(पृ.३८) 'उंडग्या जनावराला एकदा इरड करायची सवय लागली की, ती कशी सुटणार?' 'मेल्याल मेंढरू काय आगीला भीतंय काय?(पृ.९६) सिताबाच्या काटकुळ्या शरीरावरच्या चिंध्या होत चाललेल्या धोतरातून बघितल्यासारखं त्याला समोरचं शिवार अंधुक दिसाय लागलं.(पृ.१३३)

**१.२.८.११. डांगोरा एका नगरीचा :**

मिस् क्लाराचा प्रकाश क्षितिजा आड झाला(पृ.२१) पण तिकडला हा राक्षसी स्फोट, झोपी गेलेली वाटावी अशा या राजधानीच्या वस्तीवर एखाद्या जळत्या उल्केसारखा उतरला.(पृ.३३)

**१.२.८.१२. बारोमास :**

बारोमास या कादंबरीत लेखकाने निसर्गातील व प्राण्यांच्या वर्णनात ज्या प्रतिमा वापरल्या आहेत. त्यातून ग्रामीण जीवन नजरेसमोर उभे राहते. पहाटेची किंवा दिवस उजाडायची वेळ झाली. हे सांगण्यासाठी लेखक ते उत्कृष्टपणे मांडताना दिसतो, 'दिशा पंख झाडल्या पाखरासारख्या फटफटू लागल्या होत्या'.(पृ.४९) लेखकाचे वृक्षांवर फार प्रेम होत. त्याचा भाऊ मधू याने बांधावरची झाडे स्वतःच्या चैनीसाठी विकून टाकली. 'बिनझाडाचा बांध म्हणजे बिनकपड्याचा माणूस'(पृ.१००) यातून लेखकाचे वृक्षप्रेम दिसते. एकनाथ अलका आणायला मोहाडीला गेला. तेव्हा तिच्या पगारदार बापाचे घरातील वैभव पाहून त्याला स्वतःची कीव आली. आपण शेतकरी मात्र नेहमीच कर्जबाजारी आणि त्याच्या डोक्यात विचारांचे चक्र सुरू झाले. 'तळ्याच्या पाण्यात तरंग किंवा समुद्रावरच्या सारख्या येत राहणाऱ्या लाटा तसे आपल्या मनात विचाराचे हेलकावे'(पृ.१०९) लग्नानंतर एक वर्षापर्यंत अलका आणि एकनाथ यांचे वैवाहिक आयुष्य थोडे चांगले गेले. पण त्यानंतर मात्र हे प्रेम ओसरत गेले. 'तळ्याचं पाणी आटत नाव उन्हाच्या झपक्यात, तसं ते सगळं हळूहळू ओसरत गेल आणि खडक उघडा पडला'(पृ.२२४) एकनाथ ला घरातल्या दारिद्र्यामुळे व वैवाहिक जीवनाचा झालेला निरस यामुळे रात्रभर झोप लागत नव्हती. 'कधी कधी लहानपणापासून भोगलेल्या भूतकाळातला एखादा प्रसंग आठवायचा आणि त्यातच तो पुरात ओंडकं वाहत जावं, तसा वाहत जायचा आणि मग सकाळचे चार वाजायचे'(पृ.२४९) अशा प्रकारे निसर्गातील प्रतिमांचा वापर करून आपल्या भावनांना लेखकाने व्यक्त केल्या आहेत.

प्रतिके : लेखकाच्या लेखन कौशल्याचे मूल्यमापन करताना लेखकाने प्राण्यांना, पक्ष्यांना निसर्गातील घटनांना प्रतिकात्मक रूप देऊन विशिष्ट उंचीवर नेऊन ठेवले आहे. असे वाटते. निसर्गाच्या लहरीपणाचा शेतकरी जीवनावर होणारा परिणाम त्याची होणारी होरपळ, जीवनाशी चाललेला संघर्ष यासाठी लेखकाने प्रतिकांचा चपखलपणे वापर केला आहे. चंद्री मांजर तर जणू काही कादंबरीतील एक व्यक्ती आहे असे कल्पून लेखकाने तिला कादंबरीत स्थान दिले आहे. चंद्रीचा लाड पुरविणारा एकनाथ चंद्रीला फार प्रिय वाटतो, कारण एकनाथ घरात आला की चंद्री खाण्याच्या अपेक्षेने त्याच्याकडे व्याकूळ नजरेने पाहायची, दूधाचा काला द्यायला गेलेल्या एकनाथच्या पायात लाडाने घोटाळायची म्हणजे खाण्यासाठी तिलाही आटापिटा करावा लागतो तसेच जेव्हा उंदराशी ती झटापट करते तेव्हा लेखक तटस्थ राहतो. त्यांच्या भांडणात सहभागी होत नाही. कारण उंदराला वाचवले तर चंद्रीचा राग ओढवून घ्यावा लागेल. शेवटी एंड्रीन पिऊन चंद्रीचा झालेला मृत्यू या सर्व घटनांचा वापर करून लेखकाने चंद्री मांजराचा दारिद्र्याशी झगडणारी व्यक्ती म्हणूनच प्रतिकात्मकता वाचकांच्या मनावर ठसविली आहे. अशाच प्रकारे सांजोळ गावातील गुरं-ढोर, कुत्रे-मांजर, आळ्या चिलट, डास किडे, नाग याचा उल्लेख प्रतिकात्मकतेने करून लेखन केले आहे. वरील प्रतिमा-प्रतिकांच्या उदाहरणांमधून आपणास ग्रामीण भागातील पार्श्वभूमी लेखक आपणासमोर मांडतो.

**१.२.८.१३. भूमी :**

प्रतिमा : मैथिलीच्या वडिलांचे मित्र चित्तरंजन मैथिलीच्या घरी आले तेव्हा ते पहाटे संस्कृत श्लोक म्हणाले, तेव्हा मैथिलीला त्या 'समुद्रावर छोट्या-मोठ्या लाटा मागपुढं होतात, फुटतात एका रिदममधे त्या रिदमसारखं'(पृ.७) अशा भासल्या असे मत ती व्यक्त करते. समुद्रातील सायंकाळच्या दृश्याच वर्णन करताना लेखिकेने 'लाटा समोर-माग होताना गदरिंगच्या कोरस सारखीच रिदम होती' असे भासते असे व्यक्त केले.(पृ.५)

दहावीला नापास झालेल्या मैथिली पुणे शिक्षण न घेण्याचा निर्णय घेते त्यावेळी मैथिलीची आत्या तिला शिक्षणासाठी प्रेरित करते. त्यावेळी ती तू विश्राम की जो अतिशय हुशार होता. त्याची मुलगी आहेस त्याची बुद्धी घेऊन तू आलेली आहेस. तेव्हा 'ओरबाडलेला कोथिंबिरीचा देठसुद्धा फोडणीत टाकला ठेचून तर चांगली चव येते. प्रश्न आहे की आपण आपल काय करायचं ठरवल आहे'(पृ.३५)अतिशय उत्कृष्ट प्रतिमेचा वापर केला आहे. उदाहरणांदाखल घेतलेली प्रतिमा समर्पकपणे योजलेली दिसते.

### १.२.८.१४. उत्सुकतेने मी झोपलो :

प्रतिमा : सुमाधुरी सर्जनशील आहे हे सांगण्यासाठी लेखकाने निसर्गातील विविध घटकांचा वापर केला आहे. ‘पिवळया गाऊनवर पूर्ण बाहयांचा मोरपंखी स्वेटर घालून सुमाधुरी वावरतेय. वातावरणाइतकीच ती ताजीतवाणी आहे. निसर्गातील सौंदर्या आहे. तेवढे तसे सौंदर्य सुमाधुरीच्या अंगोपांगी आहे निसर्गातल्या चैतन्याइतके चैतन्य तिच्या मनात आहे. ती निसर्गाप्रमाणेच सर्जनशील आहे.’(पृ.३७)

प्रतिक : कादंबरीच्या या भागात ‘कुटुंबव्यवस्था आणि चांदणे’ हे शीर्षक आहे. चांदणे हे सृजनशीलतेचे प्रतिक आहे. सुबोध आणि सुमाधुरीच्या मुलाचे नाव परिस ठेवले आहे ज्याच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते, असा मौल्यवान दगड हा परिस सुबोध आणि सुमाधुरीच्या कुटुंबात सोन्यासारखा आनंद निर्माण करणार होता.

### १.२.८.१५. खारीच्या वाटा :

प्रतिमा : खापऱ्या आंब्यासाठी लेखकाने वापरलेली प्रतिमा ‘साल खापरागत जाड, पण लुसलुशीत. खायला नुसती साखर...’(पृ.७) मातीवर एक खारीच पिल्लू पडलं त्याला पाहण्यासाठी डोक्यात पांढऱ्या टोप्या घातलेला मुलांचा घोळका गुडघ्यावर हात टेकून वाकून बघत होता. डोक्याला डोकी भिडली होती. ‘टोप्या पांढऱ्या फुलांच्या पाकळया एकवटाव्या तशा वाटत होत्या.’(पृ.९) खारीचे पिल्लू ‘शेण्यातल्या किडयागत मध्येच अंग आकसून घ्यायचे.’(पृ.११) लेखकाची गुरे राखण्याचे काम करणाऱ्या धोंडिबाकडे एक काठी होती. काठीच्या वरच्या बाजुला बारीकसं भोक पाडून त्यात दोरी ओवून तीन-चार लहानशी घुंगरं बांधलेली होती. काठीच्या तळाशी अंगठीसारखी घातलेली मंडली. ‘एखाद्या बादशहानं मानदंड सांभाळावा तसा धोंडिबा ही काठी बाळगून असायचा.’(पृ.१७) लेखक आणि त्याचे सवंगडी माळावर खेळायला जात. खेळत असताना जर पाऊस आला तर त्या पावसाने होणारा चिखल व त्या चिखलात घोटयापासून गुडघ्यापर्यंत चिखलाने माखलेली मुले या दृश्यासाठी लेखकाने वापरलेली प्रतिमा अशी ‘लेझीम खेळताना गुलाल उधळावा तसं वाटे’(पृ.३०) बारशा बैलाचे वर्णन करताना, ‘गळयाखालचा लोंबता लुसलुशीत पातळ पडदा म्हणजे जणू आई हातावर भाकरी करायची तेव्हा तव्यावर पडेपर्यंत ती ओली भाकरी तशीच लटपटायची.’ तसेच ‘भंडाऱ्याच्या दिवसांत देवाच्या गाभाऱ्यात जसा वास येतो तसा बारशाचा अंगाचा वास यायचा.’(पृ.८०) लेखकाचे गाव धरणामुळे विस्थापित झाले. सरकारी ट्रकमधून कुटुंबाच्या सामानाची वाहतुक केली जात होती. ज्या घरातलं सामानं भरलं जात होतं त्यांचे

नातेवाईक पोरंबाळ जमत ट्रक हलला की एकच हल्लकल्लोळ होई. माहेरवाशिणी हंबरडा फोडीत. आया ऊर बडवीत. आतडयाला पीळ पडे. 'ट्रकने उसळलेला मातीचा खकाणा हळुहळु खाली बसे.'(पृ.१४६) म्हणजेच वरील प्रतिमेतून लेखकाने असे स्पष्ट केले आहे की, हतबल धरणग्रस्त व त्यांचे नातेवाईक आपल्या दुःखाला वाट मोकळी करुन देतात आणि सरकारी दबावापुढे शेवटी आपले हात टेकवतात.

प्रतिके : 'खारीच्या पिलाचे इवलेसे डोळे लुकलुकताना दिसले काजव्यासारखे'(पृ.११) लेखकाने त्याच्या परिसरातील डोंगराचे वर्णन करताना लिहिले आहे, 'ह्या डोंगराच्या उगवतीला आणि मावळतीलाही उतरत्या पण उंच कडा होत्या. हत्तीच्या सोंडेसारख्या.' हया कडांना 'दांड' म्हणत.'(पृ.३१) तर नदीच्या पाण्याला 'काचेसारखं पाणी'(पृ.५०) म्हणले आहे. दऱ्यात फुललेल्या लालभडक पळसाला 'पेटत्या मशाली' व पांगाऱ्याच्या फुलांना 'फुलता निखारा' तसेच सावलीत उगवलेले गवत 'म्हाताऱ्याच्या दाढीसारखं खुरटं'.(पृ.५७)

पर्वतीचा डोंगर हिरवागार उतारापर्यंत दाट झाडी पायथ्याला आधीमधी विटांच्या भटया. त्याला खेटून उसाची वावरं हिरव्या रानात वीटभट्टया, तुरळक धूर 'म्हाताऱ्याच्या चिलमीसारखा'(पृ.११०) दसऱ्याच्या दरम्यान तिळाची रानं पिवळी धम्मक पडत सगळीकडे हिरवं हिरवं. अधीमधी हे तिळाचे माळ. 'हिरव्या लुगडयाला पिवळे बुट्टे.'(पृ.१११) असे वाटते. पिकाची काढणी झाल्यावर मोकळया रानात काटेसावरी वाढायला लागत. काटेसावरीच्या कळीकळीतून लालबुद्रुक फुलं उलगडायला लागत. शिमग्यापर्यंत अवघ्या पांढरीतल्या सावरी 'लालभडक मळवट' भरुन होळीसाठी आतुर झाल्या.'(पृ.१२९) तसेच 'तालीखालची सावर लांबून तांबडया पागोटयागत डौलदार दिसत होती.'(पृ.१३१) लेखकाने निसर्गातील विविध रुपांना सुंदर प्रतिकांमध्ये गुंफून कादंबरीच्या माध्यमातून स्वतःच्या कवी मनाची वाचकांना अनुभूती दिलेली आहे.

**१.२.८.१६. फेसाटी :**

जोराचा पाऊस पडत होता हे सांगण्यासाठी लेखक लिहितो, 'पाऊस सुपानं पाणी वतत हुता'(पृ.१८), हिराक्काला तिच्या सासूने म्हणजे सख्ख्या मामीने विहिरीत ढकलून दिले तेव्हा काकू रडत होती. 'चिमणीचं घरटं मोडलं म्हणजी चिमणी जशी आपल्या पिलासाठी वरडत्या तशीच काकू ह्या पिलासाठी वरडत हुती.'(पृ.४२) गोचिडांच्या हैदोसामुळे दारासमोरील जनावरं विकली. फक्त एकच गाय होती. तेंव्हा लेखक लिहितो, 'अंगाण सगळ रडक्या बायवानी दिसत

हुतं.'(पृ.७८) पाऊस चांगला पडला होता आणि जोंधळ्याचे पीक चांगले आले होते तेव्हा लेखकाने आनंदून लिहिले, 'सगळं शिवार वरमाई वानी दिसत हुतं. सकाळचं कवळं ऊनं हळदीच्या पातळावर नवरी हुभा राहिल्याई असं वाटतं हुतं. मनात नवीन अंकुर फुटला.'(पृ.८०)

**१.२.९ रूपक :**

**१.२.९.१.ययाति :**

शर्मिष्ठेला वसंतोत्सवाच्या पहिल्या दिवसाचा अरुणोदय तिच्यावर गुलाल उधळीत आहे असा वाटला. तो अरुण लग्नातल्या पवित्र होमासारखा वाटला.(पृ.१४२) देवाविषयी कचाने देवयानी समोर आपल मत व्यक्त केलं. दैव मोठं लहरी आणि निर्दयी आहे, ते एका क्षणात आकाशातल्या उल्केला पृथ्वीवरील पाषाण करून सोडते.(पृ.२११) कच देवयानी बरोबर चर्चा करीत होते. चर्चा कसली वादविवाद चालला होता. तेव्हा साऱ्या तंत्रमंत्राचे आणि जादूटोण्याचे सार त्याच्या दोन्ही डोळयांत उतरले होते, तेव्हा देवयानी त्याची दृष्टी म्हणजे अजगर वाटसरूकडे पाहू लागला की, जागेवरून हलायची, त्या माणसाची शक्तीच नाहीशी होते, तशी कचाची आताची दृष्टी होती!(पृ.२११) लहानपणी देवयानीने अजगराच्या गोष्टी ऐकलेल्या होत्या. तेव्हा कचाची दृष्टी अजगरातील गोष्टीप्रमाणे भासली. आत्मा म्हणजे काय? या ययातिने कचाला विचारलेल्या प्रश्नाला ययातिला समाधानकारक उत्तर देणे जमले नव्हते. तेव्हा कचाने पाठविलेल्या पत्रात आत्माचं रूपकात्मक स्वरूप सांगितले आहे. ''मानवी जीवनात आत्मा हा रथी, शरीर हा रथ, बुद्धी हा सारथी आणि मन हा लगाम आहे. विविध इंद्रिय हे घोडे उपभोगाचे सर्व विषय हे त्यांचे मार्ग आणि इंद्रियं व मन यांनी युक्त असा आत्मा हा त्याचा भोक्ता आहे.''(पृ.२१७)

शर्मिष्ठा पुरूला घेऊन हस्तिनापुरातून ययातिच्या मदतीने स्वसंरक्षण व पुरूलाही कोणताही धोका पोहचू नये म्हणून बाहेर पडते. गावोगावी हिंडते तेव्हा ती एक दवंडी ऐकते. जो कोणी, महाराणी देवयानीची दासी जी पळून गेली आहे, तिच्याजवळ एक लहान मुलं आहे, तिला व तिच्या मुलाला पकडून हस्तिनापूरच्या महाराणीसमोर हजर करेन, त्याला मोठं बक्षीस दिले जाईल, तेव्हा शर्मिष्ठेची अवस्था अतिशय हिन-दिन झाली. पुरूपासून दूर जायचे हे अगदी अशक्य होते. तिच्या मनाची अस्वस्थता पुढील रूपकामधून स्पष्ट होते. तेलावाचून पणती कधी प्रकाश देत राहिल काय? पूरूचे डोळे हे माझे सूर्यचंद्र होते. त्याची नाजूक मिठी हे माझे संरक्षण करणारे सुदर्शनचक्र होते. त्याचे पापे-कुबेराच्या भांडारालाही लाजविणारे माझे धन होते ते! झोपेत तो हसला, म्हणजे मध्यरात्री अरुणोदय झाल्याचा मला आनंद होई.(पृ.३०२)

नहुष राजाच्या मृत्यूनंतर थोडे दिवस नहुष राजाच्या पत्नीने दुःखात घालविले पण लवकरच राजमाता म्हणून तिने घरची बाहेरची सारी सूत्रे आपल्या हाती घेतली. प्रत्येक गोष्टीत ती मोठया उत्साहाने लक्ष घालू लागली. तेव्हा ययातिला असे वाटू लागले. 'माझ्या उदास वृत्तीच्या पार्श्वभूमीवर तिच्या उत्साही मूर्तीचे चित्र अधिकच उठून दिसते-निदान मला तरी! कृष्णमेघमालेतून वीज चमकावी, तसे!'

प्रीती ही कधी उमलणाऱ्या फुलासारखी हसते, तर कधी उफाळणाऱ्या ज्वालेसारखी दिसते. ती कधी चांदणी होते तर कधी वीज होते, ती कधी हरिणीचे रूप घेते, तर कधी  नागिणीचे! ती कधी जीव देते, कधी जीव घेते.(पृ.१२३) कचाने देवयानीचे प्रेम झिडकारलं पण तिचं वेड मन त्याच्यावर अजून प्रेम करीत आहे आणि तिचं विचारी मन त्याचा द्वेष करीत आहे? प्रेम आणि द्वेष! अग्नी आणि पाणी!(पृ.१२४)

**१.२.९.२. रथचक्र :**

ती तालुक्याला येते तेव्हा गतकाळच्या आठवणींनी ती व्याकूळ होते. नवी सून म्हणून जेव्हा ती घरात येते तेव्हा तिचं फार गोड कौतुक होते. ते कौतुक तसचं राहिलं असते तर तिला व्यथित होण्याची आवश्यकता नव्हती. पण नवऱ्याचे पलायन व घरातल्याचे नव्याचे नऊ दिवस संपल्यानंतरच वागण. एकटी थोरली जाव सोडली तर तिच्याविषयी कोणालाही सहानुभुती नव्हती. त्यात तिला स्वतःच्या चुका आहेत का?  हा प्रश्न सतावतो आणि म्हणून लेखक म्हणतो, ''गुदमरलेली उष्णता खरेच्या रुपानं सर्वांगावर फुटावी त्याप्रमाणे तिची अवस्था झाली.''(पृ.८१)

**१.२.९.३. स्वामी :**

रमाबाई माधवरावांच्या जवळ आल्या तेव्हा माधवरावांच्या खांद्यावर कुंकवाचा डाग पडला होता. रमाबाई त्यांना अंगरखा बदलण्याचा आग्रह करत होत्या. तसेच तो डाग टिचकीने झाडण्याचा प्रयत्न करीत होत्या. तेव्हा माधवराव म्हणाले, ''राहू दे, रमा.  ज्या डागांची लाज वाटावी, असे अनेक डाग पडले असताही आम्ही ते झटकू शकलो नाही. ज्या डागांचा आनंद वाटावा असा एक तरी डाग आमच्या अंगावर राहू दे.''(पृ.२५८) माधवरावांनी गंगोबातात्यांनी पेशवाई विरुध्द बगावत केली म्हणून माधवरावांनी त्यांच्यावर तीस लाखांची खंडणी लादली. तेव्हा गंगोबातात्या श्रीमंतांना म्हणाले, ''श्रीमंतांची गरज कदाचित तीस लाखांची असू शकेल; पण ह्याचा अर्थ असा नव्हे, की ते आमच्या सारख्यांवर लादलं जावं.'' 'सापाला घरी दूध पाजत बसून वृथा दोरीला साप साप

म्हणून झोडपण्यात काय अर्थ आहे?'(पृ.२८७) अशा प्रकारची समर्पक रुपके लेखक योजताना दिसतो.

**१.२.१०. शब्दकळा :**

शब्द हे भाषेचे महत्वाचे साधन आहे. त्यामधून आपणास हवी तशी रचना करता येते म्हणून शब्द हे फार मोठे हत्यार आहे. आणि ते आपण जपून वापरणे गरजेचे आहे. दुसऱ्या भाषेतील शब्द आपल्या भाषेत आल्यामुळे भाषा समृद्ध होत असते. त्यासाठी दुसऱ्या भाषेतील शब्द आपल्या भाषेत येणे हेही गरजेचे आहे. प्रभा गणोरकर शब्दाचे महत्त्व पुढीलप्रमाणे नमूद करतात,''शब्द हे अश्लिल नसतात, ज्या संदर्भाने ते वापरले जातात, त्यानुसार ते श्लील-अश्लिल ठरतात. वाङ्मयात काव्यात्म भाववृत्तीच्या संदर्भात शब्दांचे उपयोजन होते.''[९५] दुसऱ्या भाषेतील शब्दांचा स्वीकार करणे हे भाषेच्या जीवंतपणाचे लक्षण आहे.

डॉ. शशिकला कांबळे कादंबरीतील शब्दकळेविषयी म्हणतात, ''साहित्यातील शब्द हे विशिष्ट स्थिती, मन:स्थितीचा निर्देश करणारे असतात. शब्दांची निवड, वाक्यांचा लहान-मोठेपणा, त्यांचे पोत यातून भाषा ही घडत जाते. एखादी कादंबरी वाचताना निव्वळ एका शब्दाकडून दुसऱ्या शब्दाकडे जाणे नसते तर अर्थाच्या एका पातळीवरुन दुसऱ्या पातळीवर जाणे असते. ही भाषेच्या दृष्टीने समजावून घेणे महत्वाचे असते.''[९६]

**१.२.१०.१. ययाती :**

मृगया(पृ.३९), उपरती(पृ.४४), ऋत्विज(पृ.४७), कुऱ्यात(पृ.४८), दर्भाची(पृ.४९), युयुत्सू मन (पृ.१०१), तांबूल(पृ.१५६), मृगाजिन(पृ.२०७), पुरश्चरणाचा(पृ.२२३), डोळे खदिरांगासारखे(पृ.३६७), नातिचरामि(पृ.३७३), मृगाजिनाचा आनंद(पृ.३९१).

**१.२.१०.२. रथचक्र :**

प्रपादायला (पृ.३१), रूजवात (पृ.४३), खासडायचं (पृ.४५), खुरमांडी (पृ.२९), परमार्थाच्या आंगराची (पृ.४०), हटेपर (पृ.५१), भोऱ्याचं झाड, वास्तपुस्त (पृ.५५), घडवंची (पृ.५६), हडेलहप्पी(पृ.६३), थाबडयावर(पृ.१३६), गोशत(पृ.२००).

**१.२.१०.३. स्वामी :**

रुद्रावतार, चक्षुपैसत्यं वृत्तांत (पृ.१७), मसनद (पृ.२०), शामदानी (पृ.२०), रागाचे नाव(शुद्धकल्याण)(पृ.२१), चाफेखणाची गादी(पृ.२३), सदावर्त(पृ.२८४), बगावत(पृ.२८६).

**१.२.१०.४. स्मरणगाथा :**

बागनेट (पृ.१०), मोतद्दार (पृ.९), अघोचर (पृ.१७), गिऱ्हा (पृ.२९), गर्भाधान (पृ.३०), प्राज्ञा (पृ.४७), करवादू (पृ.८८), भिंगुळवाणं (पृ.१३३), वायदा-बिदागी(पृ.१३४), कोंदली (पृ.१५६), बटईनं (पृ.१५८), सर्कती (पृ.१५९), किरींट (पृ.१७५), शिणेचा, पटकूरं (पृ.२२९), कुक्लकाष्ठ (पृ.२८९), राहाळ (पृ.३००), फर्लांग (पृ.४०५), कृतककलह (पृ.४८३).

**१.२.१०.५. सत्तांतर :**

टळटळति, चुपचाप, कुलुकुलु, झुंड, हुपडहुपड, गुरगुराट(पृ.१), दणादण, डहाळया, गदागदा, दांडगट, लेकुरवाळया, चित्कार, खोडाखाड, सटासटा(पृ.२), खसपसार, मागोमाग, कराकरा, गुरगुराट, सणसणत(पृ.३), धगाटा, अंगलटी, गुठळया, घटका, पांढरधोट, झिरमिरून(पृ.४), बोडक्या, कुडकुडीत, भूपकारानं, दणाणून, हाणामाऱ्या, नरानरांत, तीक्ष्ण चोची, कधीमधी(पृ.५), जगल्या-वाचल्या, पंधरा-विस, अदमास, नाक-डोळे(पृ.६), सटकन, अर्धमुर्ध, गदगदलं, कलकलाट, ओढुनओढून, तापट, झुळवून, इकडे-तिकडे, तडाखे(पृ.७), आधी, खोडाखोड(पृ.८), पानाआड, वासडाआड, दडायची, भ्यायच्या, जेंव्हा-तेंव्हा, काळुंदी, काळीकरडी, कुले, लालचुटुक, विटकारी, हकालपट्टी, सगेसोयरे, भाईबंद, रक्तबंबाळ, डुलकी, मागं-मागं(पृ.९) पाणी-पाणी, ओढ्या ओंगळीच्या, चुळकाभर, गडबड, सरासर, आक्राळविक्राळ, पोलादी कवच, जबरदस्त शिग(पृ.१०) खसपसाट, केकाटणं(पृ.१२), कडंग, खटकन, हिसडे, लुटुपुटु, चारवटाचा, धशीला, दात वाजवत, गुरगुराट करत(पृ.१३), पळापळी, पसरुन-पसरुन(पृ.१४), चाळवली, एकापाठोपाठ, हुप...हुप, दुरवर, कुठुकुठून, पालापाचोळा, चारघटका, उन्हाचा सणका, उलटापालटा, मागोमाग, कुडुम-कुडुम, खवंभर(पृ.१५), झिंज्या(पृ.१६), गुरगुराट, करकरा, खेकसाखेकसी, कडाकडा(पृ.१७), भेदरट, कांगावखार, पोरीटोरी(पृ.१८), ओढाओढी, झाडाबुडी, गडगडल्या, झटापटीत, कोकलत(पृ.१९), शिंतडले, चक्कऽऽ चक्कुऽऽ चक्कऽऽ(पृ.२०), कोरस, भूपकार, भरपूर, हळूहळू, डहाळया, थोराड(पृ.२१), मागमूस, दबकत(पृ.२२), झुडपाआड, आजुबाजुला, बरोबरीनं, हिरवेरान, कोलाहल, टपटप(पृ.२३), आळीपाळानं, दबकत-दबकत(पृ.२४), आरोळया, धडपडाट, टवकारून, चेव, ठिसकत, बडवत(पृ.२६), हिकमती, कळवळायचं, लंगटायचं, गट्टगोळा, पांढरेधोट(पृ.२७), भ्यालेल्या(पृ.२८), झांझड, विंचरता-विंचरता, वारंवार(पृ.२९), वीस-बावीस, पोरंटोरं,

आपोआप, सहजासहजी(पृ.३०), एकट्या-दुकट्याची, आल्या-आल्या, सुळे-दात, पालवीत, खोडाआड, सांभाळ रे, सांभाळा, उंच-उंच(पृ.३१), पांढरे पुंजके, पांढऱ्या चांदण्या, मोठमोठी, सैरावैरा, निळयागर्द, फडफडाट, चरफडत, चिडखोर (पृ.३२), भेंडाळले, दूर-दूर, खळबळाट, धडाधड, लांब ढांगा, खालीवर (पृ.३३). सत्तांतरमध्ये वापरलेले शब्द नेमके व सूचक आहेत. काळुंडी, काळीकरडी, लालचुटुक ह्या शब्दांमधून रंगसंवेदना जागृत होतात.

कटकट, काळुंद्र्या, इकडंतिकडं, चिर्ररऽऽ चिर्ररऽऽ, वारंवार, चिल्लाट, लट्टकन, तिरतिरत, लुटुपुटीची, चेकाळायचे, गरगरा(पृ.३५), सणकन, पळापळ, पाठोपाठ, अर्धवट, करकरा(पृ.३६), दरडावून, धक्काबुक्की, चार-सहा(पृ.३७), हाणामाऱ्या, कडाकडा, चाटूनपुसून, हुडकुन (पृ.३८), काटक्याकुटक्याचं, गाठभेट, आठ-आठ, फडर्रकन, काटकी, घाई-गडबडीत, झाडत, झटकत, खुपसू, बडबडत, वारंवार, करत-करत, लगोलग (पृ.३९), आडदांड, भणंग, कंगाल, हाणामारी(पृ.४०), मारझोड, पायतळी(पृ.४१), लटकून, झाडाबुडी, इकडंतिकडं, टुकुटुकु, तिरतिरत, म्हातारीकोतारी, लहान-धाकटं, हूपऽऽहूपऽऽ(पृ.४२), कडकडून, लचके, गरगरत(पृ.४३), टीचभर, तांबडीलाल, भेलकांडून, ठेचलेला, ओरबाडलेला, रक्तबंबाळ, भळाभळा, ताड-ताड(पृ.४४), गुपचूप, आसपास, चाटवाव, भराभर(पृ.४५), राखणदार, आसपास, बडबडत(पृ.४६), ओरबाडलं, भांडखोर, गुरकावत, थरकाप, लेकुरवाळी, खेकसू, लटपट, धाडकण, सव्वापुरुषभर(पृ.४७), ताणतणाव, लेकुरवाळया, बडबडत, येरझारा, रोखून-रोखून, भेलकांडून(पृ.४८), चींऽचींऽची, जबरदस्त, रक्तबंबाळ, तडफडत, काळं-तांबडं, ठिगळ(पृ.४९), हळूवारपणे, किरकिरत, हिंडू-फिरू, धामधुमीत (पृ.५०), सैरावरा, इकडंतिकडं(पृ.५१), चणचणून, पिलावळ, बदाबदा, तिरपेच, भीत-भीत, रखरखीत, पांढऱ्याधाट, झाडझुडं, गदगदू, कडाडू, धावाधाव, वारंवार, आसरा, जोरदार, पांगलेल्या, पिवळेधमक, पंचरंग, पांढरंशुभ्र, नीळकंठ, काळेकबरे, भिरभिरू, तिरकस, झाडांवर, पानांवर, पाचोळयावर(पृ.५२), धुरकटून, तहानलेल्या, दुबेळक्यात, ढापी, किंचाळत, पंधरा-वीस, झाडंझुडं, जागोजागी, खोलगट, खळाळले, फडफडवून, उघडीप. दाटीवाटीन, अर्धगोलकार, दौडत, दमछाक(पृ.क्र.५३), घोसच्याघोस, दबत-दबत, वळवळत, खराखरा, चार-सहा(पृ.५४), तुरतुरी, राहूनराहून, गुरगुराट, मारामारी(पृ.५५), खाता-पिता, जवळजवळ, घेऊन घेऊन, कुरवाळलं, खाता-पिता, गालाला-गाल, बघून-सवरून, कुठंकुठं(पृ.५६), स्थिरस्थावर(पृ.५७), ओकं-बोकं, लालचुटूक, पिवळसर(पृ.५८), दणकट, तांबडसर(पृ.५९), आळीपाळीनं, धडपडत,

डगमगत, कलाकलाट(पृ.६०), सुकलेल्या, बुंध्याभोवती, सरपटत, कुरूकुरू, भराभरा, सरपटत, झाडाबुडी(पृ.६१), खरपसत, चाटूनपुसून, लालचुटूक, निरखून-निरखून, शोधून-शोधून, रहाटगाडगं(पृ.६२) मीरा तारळकर त्यांच्या शब्दकळेविषयी म्हणतात, ''जातिवंत साहित्यिकाच्या लेखनीतून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द हा कलेचीच एक अद्वितीय भाषा निर्माण करीत असतो, याचे प्रत्यंतर त्यांच्या प्रत्येक लेखनाने दिले. अनुभवाच्या आणि आविष्काराच्या नित्यानूतन उन्मेश त्यांची प्रतिभा निर्माण करीत राहिली.''[९७] प्रस्तुत कादंबरीतील सर्व शब्दकळा तारळकरांच्या या मताशी समर्पक असलेली दिसते.

**१.२.१०.६. झोंबी :**

कावकिक्क(पृ.९), जिवाळा(पृ.२९), वई(पृ.४५), बाळूगडी(पृ.७९), इस्वाटा, बुट्टी(पृ.८७), पोल्मी(पृ.१२६), हुन्नर(पृ.१६३), गुळभात (पृ.१६७), फाळा (पृ.१९२), मटमाया(पृ.२३१), हराटी नि कुंदाय(पृ.२३८), शेगायचं(पृ.३०५), कारटखाऊनी (पृ.३२३), चेड (पृ.३५७).

**१.२.१०.७. झाडाझडती :**

आबादानी (पृ.६), जिमिन, पैक (पृ.६३), पचैस कमेटीचा चेअरमन (पृ.२६०), अदरवाईन आय वील टेक ॲडव्हर्स नोट अगेन्स्ट यू(पृ.३६७), कलेक्टर, एसपी, मॅच्युरिटी चार्ज, ऑफिसर, अटेंप्ट टू मर्डर, डिस्टिलरी, डायरेक्टर(पृ.३७८), इंटरकॉम(पृ.३८२), इंप्रेशन (पृ.३८३), द लेडी हॅज नो आदर सोर्स ऑफ इन्कम, जी.आर.टू. कंपेल कलेक्टर टू टेक सच रिव्हू(पृ.३८४), फायनानशिअल डिफिकल्टीज(पृ.४२५).

**१.२.१०.८. राघववेळ :**

तव्हरक, ठ्र, मुलुख, हटकणे(पृ.१), तडक, झिमझिमत, थांबायले, काहून, काटक्या, येयाले, फसाक(पृ.२), पोऱ्हं, ठ्रू, उतरा, भानुस, इचार, लय, व्हती, करतीन निखुळया(पृ.३), निऱ्हा, म्हणो, म्हून, आस्तरेक, आसन(पृ.४), पऱ्हया, पुढी, ठूलं, गंज(पृ.५), कालवा, देलं, घोंगटा, पाणराजा(पृ.६), चपाक-चपाक(पृ.७), वापीस, दीन, म्हंतं, हिंग, आस्तीन, जेवारी, वऱ्ही, सर्कच(पृ.८), धाडून, उपडी(पृ.१०), घ्येट, जोळ, छिलेल कुठी, हिंग(पृ.११), नडडीच, वक्टी, ईल, व्हती, दळण कांडण, ईन, सईस, कळणा, कोंडा(पृ.१२), भरूसा, निंघल, वंजूळभर, वर्स(पृ.१३), जेवारी, नेवाव, मलेच, हेलपाटत(पृ.१४), संगमांघं, नेवावं, मनासार्क(पृ.१५),

आखर, कूप(पृ.१६), उघाड, लाखोलीची पंगत, वसारी, झिपल्या(पृ.१७), जथा, मंग, समध्या, भिरभिरू वाढपे, परसाद, नोको(पृ.१९), मायवताचं, सपादत, आवतन, कुठी, वहिदा(पृ.२०), नोको, याह्याले, काहून(पृ.२१), खांदेमळणी, म्हंतं, चाला(पृ.२३), पानाले, मोळाले, चोपणाकडे, निंघा, बसान, चिपचिप, चिबड(पृ.२४), टन(पृ.२५), काहून, संगं, उदीमावर(पृ.२६), जाव द्या, निऱ्हा, हलकट(पृ.२८), नोको(पृ.२९), ठोंबरा, निऱ्हा, मांघण, दिस(पृ.३०), तर्पण, शेरखांड, सर्वा, कोरुडा, ढवळं-कव्हळं, उलु-तिलू, निवद, कोरुडे, ल्योक(पृ.३१), त्याह्यचे, पुसात, गुणभान, हिंणकट, मांडणूक, पूंजा, सामाइन(पृ.३२), ताकती, मेळवणे, परमानं(पृ.३३), मांघायले(पृ.३४), यधळोक(पृ.३६), दुरडी(पृ.३७), साबू(पृ.४०), खोळंबणे, आंघुळ(पृ.४१), बक्षिशी, सुरकी, नादारी, मले, गंज, भिजवाव, आखुडा, झंपर, महागा, माघंदी(पृ.४२), जानजमान, ठुवाची(पृ.४३), हर्राशी(पृ.४४), वळखत, मारजी, मांजरझाक, इचारायले, ह्योत, झाकतच(पृ.४८), आमाशीक (पृ.४९) म्हंतात, देलेका, सांडरांडं, देलेका(पृ.५०), बजारले, मले, उंडरते, दुम्हाऱ्या(पृ.५१), कुठोर, हिंग(पृ.५३), हबकाऱ्याने, आरबळून, फरकुट(पृ.५४), दांडाळ, गवणे, तिखरतील(पृ.५५), श्या, गमल, माऊ(पृ.५६), करवादली, जुनेर, हाळ्या(पृ.५७), बरसात, फजिता (पृ.५९), नानमुख, भाबी, इले, देवक, आहिर, पऱ्ह्या, ठाईच (पृ.६०), शेवाळ्या, उष्टाळणे, जानोसा, पहल्या, नान्नूक(पृ.६१), भांडणारायले, दारवा, विसणले(पृ.६२), मुकळी(पृ.६३), लटांबर(पृ.६४), आरामले, च्या, झकासवाणी, बांडीशी(पृ.६५), ऐणे गियणे, ऐणा(पृ.६६), व्हवो, भंडवाडाच, नवाड्या, बुजाडते, हेळली, कायजून(पृ.६७), इऱ्हीवर(पृ.६८), खेप, नेवाव, बटुकडे वाणी, आधला(पृ.६९), आस्तं, साल, घरूबा, यासले(पृ.७०), पुखात, अबादानी, झालती, पुढी(पृ.७४), बलवा, उंद्या, पाह्यरी, ठसेलं, खेप, मातर, संमध्यायले, जेऊ, घेताव(पृ.७५), मायवंत, हेट(पृ.७६), सरावन, फडे, टोपले, डाले, कणगे, ठेपा(पृ.७७), कराच, ख्यांता, डाखले, काहाले(पृ.७८), दाणागोटा, मुसळ, लेकरु(पृ.८०), धजेना(पृ.८१), वाकळ(पृ.८२), थडथडू, खरुखर, बरुबर, कण्हत(पृ.८३), काशा, फकस्त, पारग(पृ.८४), दीठ(पृ.८५), नदर(पृ.८६), देल्या, जेवारी, इकली(पृ.८७), इचार, इषयी(पृ.८८), टाळणे(पृ.८९), गमू(पृ.९०), तडातडा, पारगाले, धाडून, सरम(पृ.९१), यधळोक(पृ.९२), फोलपटे, तडक(पृ.९२), पऱ्ह्या, मुरमुशा(पृ.९३), आस, वक्टी(पृ.९५), ऱ्हायेना, भिला गिला, उजूक(पृ.९६), मंधात, म्हून, कदांचित, पाथंवर, देलेच(पृ.९८), आमासाक(पृ.९९), धांडोळू(पृ.१००), गोठी, इचास, ह्यांट, तव्हरक(पृ.१०१), इख(पृ.१०४), बाहिर(पृ.१०५),

सवसारावून, दुम्हाऱ्या, बलाऊन(पृ.१०८), सईसच(पृ.१०९), चाल्ली(पृ.११०), व्याजोळून, ईस, लडून, जिरवलं, व्हंडकी(पृ.१११), जानजमान, वंजले(पृ.११२), पुढयात, धाडलं, पाठुलं, कुठल्ले, टिपण, चलवादे(पृ.११३), हिरस-तुरस, चवताळणे, कैदासीन(पृ.११४), जोळ(पृ.११५), तव्हर, कळ, मातर, लडत, आमासीक, चाराचं(पृ.११८), इस्तो, धूपट(पृ.११९), बिगर(पृ.१२०), बलावून, इव्हायाले, मांघल्ला, ठुतो(पृ.१२१), डवरणे, महिनदार(पृ.१२३), दुम्हाऱ्या(पृ.१२४), दाताळावं(पृ.१२५), बिगीनं, सोभत(पृ.१२७), इहिण, इथी, वाण, टाकाचं, कायजून, व्ह्यालं(पृ.१२८), तडंतडं, रोंभा, आठोण, नस्तं(पृ.१२९), वहिदा, आस्ते, नोका, बंगई, सईसच(पृ.१३०), ईनाई, मधात, हाल्या(पृ.१४०), मेढ, परसडी, सवंदड, आभाटा(पृ.१४३), जाळभाज, बहाड्या(पृ.१४४), सुदा, वापिस, खुडण(पृ.१४५), झिपुट्या(पृ.१४६), नाननूक(पृ.१४७), नवलास, येयाली, पत्ततवाळ्या(पृ.१४८), चूणगीण, फणं, फुकणे(पृ.१४९), पाथ, फणं(पृ.१५०), आऊड, कोरभर, आखीन, तव्हरक(पृ.१५१), ठसठस(पृ.१५४), पायपुसणं, बंदुडपणा(पृ.१५५), चाला, झाडझुड, शेवटून (पृ.१५७), ढुशी, देली(पृ.१५८), वरमणे (पृ.१६३), लडून (पृ.१६५), बळेबळे(पृ.१६६), पांथवर, उधारपाधार(पृ.१६८), ढेपाळली, औषिद, झोंब(पृ.१७५), धुऱ्यावर, टोचण्या, निंदण(पृ.१७६), चलिंतर, येगळच, म्हणो, काहून, सोकली(पृ.१७७), कन्हा-बोव्हा, इटकं-चिटकं, शिळ-पाळं, आंबट-चिंबट(पृ.१७८), हुव्या, भोंबारा, ईन, गठ्ठया, भरूया, निमित्ताले(पृ.१७८), देराले(पृ.१७९), सईस(पृ.१८०), इव्हायाले, समध्या, समुर, जवायाले, रुजुगाही(पृ.१८१), आवो(पृ.१८२), चलिंतर, दीडदुमतं कोचायला, तेढलं, गणते, तिले(पृ.१८४), सर्वा, टोपल, भगुलं, योचला, मातेरे, अधेलीभर, निखाखोखायची(पृ.१८७), तरास(पृ.१८८), सुखंढालं, बिनसलं, इचकलं, देरासमून, पुढीपुढी, येड्यात, देर(पृ.१८९), डाफरायची, मथारिले(पृ.१९१), बंदुडपणा, जलम, पखाणाची आसन, घरंगळून(पृ.१९२), हाकलून, पाचवीलेच(पृ.१९३), तीघायले, दडवीत(पृ.१९८), घंटाक(पृ.२०१), उंजीपांजी निजजो(पृ.२०२), इतच(पृ.२०३), टोंगळे (पृ.२०४), सुलथे, विसणले(पृ.२०५), हेल (पृ.२०६), शहाडा(पृ.२०८), तुंग्यात(पृ.२०९), कसा(पृ.२१३), कुसा(पृ.२१५), ओणवून(पृ.२१६), सोयीनं, बागत, एऱ्हीबी(पृ.२१८), ईस(पृ.२१९), पोऱ्हं, जोजवले, घुगऱ्या, पयलाडू, निपटत(पृ.२२०), रहाटगाडगे, फडेगीडे, काती, वजेवजे, माय, मांघून(पृ.२२३), कोड्याशाले, मुंगुड्या(पृ.२२४), बोंदाडकडं, पनाळ्या, भुकजलेला, चुटूचुटू(पृ.२२५), बुडाकड, फांदोऱ्या, सुदी, गामुटी(पृ.२२६),

पडकातले फोक, डाले(पृ.२२९), मोहूळ, डसरं, हुलवतो(पृ.२३१), पनाळ्यांचा भारा, फडे, व्हळी(पृ.२३३), आमाशीक, मूठ, तव्हरक(पृ.२३४), अरबाळणे, कार्ले, मुठीला गाठ, गोमेचे कार्ले(पृ.२३५), खुडण, खळं (पृ.२३६), म्हणलतं, म्हून, ईस (पृ.२३७), हिंग, तंग, निसंग (पृ.२३८), आस्तरेक(पृ.२३९), सुदं(पृ.२४०), कव्हा-बोव्हा(पृ.२४१), बटक्या(पृ.२४२), धाडलत्त, नेयाले, वंजले, तेहडा(पृ.२४३), येवदे, वर्स(पृ.२४४), रेपत, मोडशी(पृ.२४५), गंज, दण्णकन, हिंदकळणे, गुत्याने(पृ.२४६), येचा(पृ.२५०), आगूती(पृ.२५१), कद की नद(पृ.२५१), दीठ, ढमढम-निऱ्हाचं, मुकं-मुकं, घुरं (पृ.२५५), फकस्त, बांडीशी, सातीत (पृ.२५९), गंज (पृ.२६०), हागायले (पृ.२६१), नडडचं, जीनगी, रांडरु (पृ.२६३), बेकसूर, लडू, परवंडा(पृ.२६४) इराखत (पृ.२६५), सांजच्याले (२६७), सईस, पीठकूट (पृ.२६८), आच्छेखाले(पृ.२६९), टोळधाड(पृ.२७५), फिकीरीत, धकली, बालुतं, इस्टयानीवर, नाकतोडा(पृ.२७६), टेंभे, जव्हा-तव्हा(पृ.२७७), दवंडी, देववून(पृ.२७९), सरकेले(पृ.२७९), आलम, दुनिया, हारपलं(पृ.२८१), बलवाय(पृ.२८२), टाकायले, पुढ्यात(पृ.२८७), गुरकावले(पृ.२९५), निंघू, सजागीजा, व्हवू, नोको(पृ.क्र.३००), कव्हरक(पृ.३०१), दिशी, हांडीचा, आर्जा, ईस(पृ.३०२), येळधोक, ईन, बलावल्यावर(पृ.३०३), इथी, कायजून, निर्दोस(पृ.३०४), सोंग, कोरट, आमक्या, तमक्या, इथी(पृ.३०५), सईसच, तारल(पृ.३०६), जिनगीतला, आक्रीताचा, दीस, लडतं, पुसबा(पृ.३०७).

**१.२.१०.९. ताम्रपट :**

खलबतखाना(पृ.९), दुर्भेध(पृ.१०), क्षिती(पृ.१०१), फ्रिडम फायटर(पृ.१०७), खंक(पृ.१२४), रिमांड होम, सॅल्यूट(पृ.१९१), इंगित(पृ.२२१), इंस्पेक्टर(पृ.६४८), पस्तावा(पृ.६९९)

**१.२.१०.१०.तणकट :**

खवळली (पृ.१०), कावदरली (पृ.२०), न्हान (पृ.२०), किनीटी (पृ.२०), गुलबा(पृ.२०), इच्यार(पृ.२०), धक्कल(पृ.२५), नदर, बिनसला(पृ.३९), मेलाव, माजोर (पृ.४०), खळबळले, धुंकरूक, वकोत, सूनसान(पृ.४१), किनीट(पृ.४२), चकोट, झिंजाडलं (पृ.क्र.), शांताई(पृ.४९) धतुरा, झंगट(पृ.६३), ढिम्म(पृ.६४), भिरंबाटलं(पृ.७५), वायलंच (पृ.८२), इरड (पृ.८४), टपणं (पृ.१३९), तिकाटनं (पृ.१४३), यरगटलय (पृ.१७९), बुट्टी(पृ.१८९)

**१.२.१०.११. डांगोरा एका नगरीचा :**

'कीलोत्पारीव वानर'(पृ.४२), अलबत्या गलबत्यांच्या (पृ.५२), नवलाव झाला (पृ.५२), नावाजणी होऊ लागणे(पृ.५६), जुगाड पडणे(पृ.६०), मेज, अंमळशानं, कंची(पृ.६९), गुमान, मोका, पिचतायत, युअर रॉयल हायनेस (पृ.१३) 'माय डिअर'(पृ.१४), 'आय फरविड यू स्फफिंग लाईक दिस. बिवेअर ऑफ युअरसेल्फ'(पृ.१५) 'जस्टिस'(पृ.१७), 'प्रोसेसर'(पृ.१७)'गॅलरी, हेबलँप'(पृ.१८), 'गॉड इज ग्रेट, हिज् वेज् आर इन्स्क्रुटेबल'(पृ.२१)

**१.२.१०.१२. बारोमास :**

अंबार, पेववसाप(पृ.१), डुंग्यावर(पृ.२), पऱ्हाटी, बिवड(पृ.१०), फेंदाड(पृ.११), आवतण(पृ.४८), वाढूळ(पृ.५१), करवादली(पृ.१२८), लचांड(पृ.१३१), इच्चकडोणा (पृ.१६३), गारगोंड (पृ.१९३), तांगडतिंगा(पृ.२२६), तडनड(पृ.२४३), मोहतुंबी(पृ.२६५)

**१.२.१०.१३. भूमी :**

फॅमिली प्लॅनिंग, ऑपरेशन, ड्रेस, बिच, डिप्लोमा (पृ.३७), हॉटेल, रिझर्व्ह (पृ.३८), क्लार्क (पृ.७२), प्रपोजल, बँक, ऑफिसर, फ्लॅट (पृ.९०), ड्रिंक, ॲबिशन, इंजिनिअर, आय वॉज नेव्हर ॲटेन्ड टू हर (पृ.११९), लिटरेचर, गॅदरिंग (पृ.१३८), सायकॉलॉजी, प्रोफेसर, सिनिआरिटी, डिपार्टमेंट, हेड, पिरीयड, माइल्ड पॅरिलिटिक ॲटॅक, युनिर्व्हसिटी, रिसर्च, पीएच.डी., थिसीस, सबमिट अशा प्रकारच्या इंग्रजी शब्दांचा वापर कादंबरीमध्ये लेखिकेने प्रसंगानुरूप केलेला दिसून येतो. 'पडेल वाटले' ह्या वाक्यातील 'पडेल' हा शब्द पुन्हा पुन्हा कादंबरीच्या दुसऱ्या भागात पुनर्रावृत्ती होताना दिसतो.

**१.२.१०.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

पॉवरफूल, पॅन्ट, बुश शर्ट, (पृ.१), सॅन्डेल, हॉटेल, मिलिटरी, कर्नल (पृ.३), मॅनेजमेंट, जिन्स पॅन्ट, टी-शर्ट, आर्किटेक्चर (पृ.४), मास कम्युनिकेशन, मॅडम, ओव्हर (पृ.८), प्राड्युसर (पृ.३१), हेलपाटली(पृ.५८), डकवत(पृ.६१), स्क्वेअर, ऑफव्हाईट, फॅशन इत्यादी इंग्रजी शब्दांचा वापर प्रस्तुत कादंबरीतील पहिल्या भागात केलेला आहे. एन्जॉय, बिअर, ऑर्डर, पाकीट(पृ.१०५), ॲडमिनिस्ट्रेटिव्ह, ऑफिसर, कंपनी, पर्चेस, बॉडी बिल्डर (पृ.१०६), सेन्सीटिव्ह (पृ.११४), फॅमिली (पृ.११६) अल्बम, मेडिकल स्टोअर्स, इंटरनॅशनल जर्नल, पेपर ॲक्सेप्ट, नर्व्हस (पृ.१४७), एक्सरसाईज, रूम, टेन्शन, प्रॉब्लेम, इन्स्टिट्यूट, सेक्रेटरी, प्लॅन,

लायब्ररी, लेक्चररूम, आयडीया, कॉलेज, फंक्शन, केमिकल, इंजिनिअर इ. इंग्रजी शब्दांचा वापर लेखकाने कथानकाच्या अनुशंगाने केला आहे. लाईट (पृ.१७९), नंबर, टिव्ही, मेजर, ॲक्टिव्ह, जॉगींग, टेनिस, बिझनेस, फिट्ट, ड्रिंक, मेडिकल, सॅलेड, व्हाईट, इंम्पोर्ट-एक्सपोर्ट, अपार्टमेंट, हायस्कूल, हेड मास्तर, कि.मी., टाऊन, बि.टेक. अशा प्रकारच्या इंग्रजी शब्दांचा वापर लेखकाने कायंबरीच्या तिन्ही भागामध्ये केलेला दिसून येतो. यावरून असे लक्षात येते की, सदर कादंबरीतील कुटुंबे ही उच्चशिक्षीत व श्रीमंत असलेली दिसतात.

**१.२.१०.१५. खारीच्या वाटा :**

धुळपाटी हारीनं, पुढयात बारदाना(पृ.५), टिरकान्या, आपसूक, सवता (पृ.६), आटापिटा(पृ.८), कोंडाळं(पृ.९), कातवणे, असारवी(पृ.१२), चुकीचे वहील(पृ.१५), मुडली, आखर, पवारी, खेतऱ्या(पृ.१७), वायला(पृ.१९), रुजवात(पृ.२०), आवाडी(पृ.२६), आखर(पृ.२७), हाब्बड(पृ.२८), तिष्ठेणे(पृ.३८), लळालोंबा(पृ.३९), गुटुगुटु(पृ.४४), बयजवार(पृ.५०), वाख(पृ.५१), कानगी(पृ.६४), फाडी(पृ.६५), आगोटा(पृ.७०), हडबडणे(पृ.७५), वांबाळ, जानवसा(पृ.९०), पांजी, चूलबंद, कुंकुत्र्या, मानाच्या सुपाऱ्या, देवक(पृ.९१), शेलकोट, शिंगाट, पिपाणी(पृ.९२), वरधावे करवल्या(पृ.९३), सातारा(पृ.१०३), तिळकूट(पृ.११२), आधोली, शेर, पायली, मण, खंडी(पृ.११६), लाभ, गंजी (पृ.११७), गादवल्यागत(पृ.१२७), कलागती(पृ.१२८), कोडाळ (पृ.१२८), बिवड(पृ.१२८), घायटा (पृ.१३७), इस्कोट(पृ.१३८), मुऱ्हाळी(पृ.१४४), केंबूळ(पृ.१४५), बिऱ्हाड(पृ.१४९), चुबूळबाळ(पृ.१५७)

**१.२.१०.१६. फेसाटी :**

चिपाडं, भगुनं, श्यात(पृ.१२), खांडवा, बलीम(पृ.१५) भिडकुळ्या, वागर(पृ.१८) वक्कळ(पृ.३४), बेस्तरवार(पृ.५६), धगुरडा(पृ.७९), मैंदाळ(पृ.८१), वकुत(पृ.१२७), सवं(पृ.१३५), कांबरायला(पृ.१५२)

**१.२.११. सुविचार :**

मनावर संस्कार करणारे विचार म्हणून सुभाषिते, सुविचार, श्लोक यांचा वापर लेखक आपल्या लेखनामध्ये कथानकाच्या अनुषंगाने करीत असतो. त्यामुळे भाषेला एक वेगळेच सौंदर्य

प्राप्त होते. भाषा ही आकर्षक होते. जीवन जगताना आपणास ते दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरतात, म्हणून त्यांचा वापर

**१.२.११.१. ययाति :**

आयुष्याच्या आरंभी ज्यात काही अर्थ नाही, असे वाटते, त्यातच खोल अर्थ भरलेला आहे, असे आयुष्याच्या शेवटी आढळून येते.(पृ.७), शब्दापेक्षा स्पर्श अधिक बोलका असतो. पण त्याला काही माणसाच्या काळजाला हात घालता येत नाही. ते काम अश्रूंनाच साधते. (पृ.८), बाळपण एकच काळ जाणते-वर्तमानकाळ.(पृ.क्र.९), मूल हे आईच्या डोळ्यांतली बाहुली असते.(पृ.१३), झाड चांगल्या रीतीनं वाढायला पावसाइतकंच ऊनही आवश्यक असतं.(पृ.१७,१८), आईच्या नखात जे बळ असतं, ते बायकोच्या मुखात.(पृ.१९), जीवन हे देवालय नाही! ते रणांगण आहे.(पृ.२१), जग शक्तीवर चालते, स्पर्धेवर जगते, भोगासाठी धडपडते.(पृ.२१), कौर्य आणि शौर्य ही जुळी भावंडे आहेत.(पृ.२१), जगात सर्व गोष्टी योग्य वेळी माणसाला कळतात. झाडांना काही पानांबरोबर फुलं आणि, फुलांबरोबर फळ येत नाहीत.(पृ.क्र.२३), शरीर हा मनुष्याचा सर्वांत मोठा शत्रू आहे; त्याच्यावर विजय मिळविण्याकरता सतत धडपडत राहणं हेच या जगात मनुष्याचं प्रमुख कर्तव्य आहे.(पृ.४३), आसक्तीनं मनुष्य शरीरपूजक होतो.(पृ.४३), हिरवळीत साप लपून बसतात. विरक्तीच्या आड आसक्तीही तशीच(पृ.४४), आसक्ती हा आत्म्याचा सर्वांत मोठा शत्रू आहे.(पृ.४५), जग जिंकण्याइतकं मन जिंकण सोपं नाही!(पृ.४५), मूल कितीही मोठं झालं, तरी आईला ते लहानच वाटतं.(पृ.४७), प्रेम अंधळे असते, हेच खरे; मग ते आईचे मुलावरचे प्रेम असो, नाही तर गुरुचे शिष्यावरले प्रेम असो.(पृ.५०), या जगात गोड फळांनाच कीड लागण्याचा अधिक संभव असतो!(पृ.५४), अपहारासारखा अधर्म नाही.(पृ.५६) मानवी जीवन हा जसा कल्पवृक्ष आहे, तसा तो विषवृक्षही आहे.(पृ.६०), मृत्यू हे मोठे भयंकर अस्वल आहे.(पृ.६१), मृत्यू हा अष्टौप्रहर अश्वमेध करणारा विजयी सम्राट आहे.(पृ.६१), सुख हा अनेकदा मृगजळाचा शोध ठरतो. सुख ही दुःखाची छाया आहे, की दुःख ही सुखाची सावली आहे.(पृ.५८), रुपवती स्त्री जशी विनयानं शोभून दिसते, तसेच अर्थ आणि काम हे धर्माच्या संगतीत सुंदर वाटतात.(पृ.५८) शरीरसुख हा काही मानवी जीवनाचा मुख्य निकष नाही तो निकष आहे आत्म्याचं समाधान!(पृ.५९), लज्जा हा सौंदर्याचा अलंकार आहे. सत्याचा नाही. सत्य हे नग्न असते.(पृ.६५), मोहाचा पहिला क्षण ही पापाची पहिली पायरी आहे.(पृ.८२), मृत्यू हा जीवमात्राला जितका अप्रिय, तितकाच अपरिहार्य

आहे.(पृ.९८), प्रजा ही राजाला लाभलेली कामधेनू आहे.(पृ.९९), आशाभंगासारखे जगात दुसरं दुःख नाही!(पृ.११४), जे सुंदर असतं, त्याचीच पूजा जग करतं!(पृ.१२६), सौंदर्याची पूजा हा स्त्रीचा धर्म आहे.(पृ.१२६), मनुष्य रागाच्या आहारी गेला, म्हणजे क्रूर होतो, पशू बनतो!(पृ.१४५), एखादी गोष्ट दुरून जितकी भयंकर दिसते, तितकी ती खरोखर भीतिदायक नसते. मरणसुद्धा असंच आहे.(पृ.१४८), निःस्वार्थी, निरपेक्ष, निरहंकारी प्रेम हीच माणसाच्या आत्म्याच्या विकासाची पहिली पायरी असते, असलं प्रेम केवळ मनुष्य करू शकतो! खरं प्रेम नेहमीच निःस्वार्थी असतं. निरपेक्ष असतं.(पृ.१४९), जीवनात प्रेम ही उच्च भावना आहे.(पृ.१५०) पण कर्तव्य ही तिच्यापेक्षाही श्रेष्ठ अशी भावना आहे!, कुठला ना कुठला छंद हे दुःखावरले फार गुणकारी औषध आहे.(पृ.१५५), माणसाच्या पोटात शिरण्याचा मार्ग त्याच्या ह्दयातून असतो.(पृ.१८३), माणसाचं मोठेपण विकारांबरोबर वाहत जाण्यात नाही, विचाराच्या साहाय्यानं विकारांवर विजय मिळविण्यातच खरा मनुष्यधर्म आहे, संसारयज्ञ सफळ व्हावा, म्हणून त्यात पतिपत्नींना जी अगदी पहिली आहुती द्यावी लागते ती आपल्या अहंकाराची, ज्याचा आत्मा मुक्त असतो, तोच या जगात ईश्वराचं दर्शन होऊ शकतो. प्रेम म्हणजे दान-सर्वस्वाचे दान! ते पाप कसे होऊ शकेल?(पृ.२४५), स्वप्न सत्याहुनही भयंकर असते., प्रेम म्हणजे प्रिय व्यक्तिवरून आपले प्राण हसत मुखानं ओवाळून टाकणारी मनाची उत्कटता(पृ.२७७), संयोग आणि वियोग यांच्या अद्‌भूत रसायनालाच जीवन म्हणतात का?(पृ.२९९) तेलावाचून पणती कधी प्रकाश देईल का?(पृ.३०१) जीवन ही योगायोगाची मालिका आहे का?(पृ.३०६) शरीर आणि आत्मा यांचे नाते शत्रुत्वाचे नाही ही एकाच रथाची दोन चाके आहेत.(पृ.३०७) या जगात ज्याला आपली शिकार होऊ द्यायची नसेल त्याने सतत इतरांची पारध करीत राहिले पाहिजे.(पृ.३४६), स्वतःसाठी जगण्यात जेवढा आनंद आहे, त्याच्यापेक्षा दुसऱ्यासाठी जगण्यात-दुसऱ्यासाठी मरण्यात-शतपटीनी अधिक आनंद आहे!(पृ.३८४), या जीवनात दोनच गोष्टी खऱ्या आहेत, प्रीती आणि मृत्यू.(पृ.३८५) स्मित ही मानवाची किती मधुर भाषा आहे.(पृ.३८७), बुध्दी, भावना आणि शरीर यांचा त्रिवेणी संगम म्हणजे मानवी जीवन.(पृ.३८८) सुखात, दुःखात सदैव एक गोष्ट लक्षात ठेव. काम आणि अर्थ हे महान पुरुषार्थ आहेत.(पृ.३९४)

**१.२.११.२. रथचक्र :**

माणूस अनाथ असलं की गांडुळाकडे सुद्धा त्याची पत राहत नाही.(पृ.३३) श्रद्धा हा माणसाचा मोठा आधार आहे.(पृ.२०५)

### १.२.११.३. स्वामी :

''विश्वास आणि माणसे पाहून नियम पाळायचे असतात.''(पृ.८), श्रीमंता घरच बोलावण आलं, की गरिबालादेखील मान चढतो.(पृ.१७), भूपाळीनेच देव जागा होतो, असे थोडेच आहे? तो भावाने जागा होतो.(पृ.२१), ''एका माणसाची बुद्धी राज्यस्थापनेला उपयोगी पडत नाही.''(पृ.२९), ''जिथे इमानेइतबारे सेवा होत नाही तेथे माणसाने राहू नये.''(पृ.४२), ''संकटांना तोंड दिल्याखेरीज ती थांबत नाहीत''(पृ.४५), ''वेळ फिरली की, ग्रहही फिरतात.''(पृ.४५), ''देवाबद्दल का भीती बाळगावी! परमेश्वराबद्दल प्रेम वाटावं आदर असावा! भीती शत्रूची!''(पृ.४७), ''राज्यकर्त्यांना ईच्छा नसतात; नुसती कर्तव्ये असतात''(पृ.५३), ''मानानं जगता येत असेल तरच माणसानं जगावं!''(पृ.७५), ''राज्याची ऐट सेवकांच्या मानमरतबावरच अवलंबून असते!''(पृ.८१), ''गंगोदकाला स्वतःचा रंग नसतो. जो रंग मिसळावा, तसा त्याचा रंग होतो आणि सध्याचे रंग काही ठीक दिसत नाहीत!''(पृ.६८), ''चिखलात हत्ती रूतला की कोल्हेदेखील त्याला सांगणारच''(पृ.७२) ''भावनेला राजकारणात स्थान नसते.''(पृ.१००) ''शरणागताला मत नसते.''(पृ.१०२), ''घरात ढेकूण झाले, म्हणून घरच पेटवून देण्यासारखं आहे ते!''(पृ.११३), ''राज्यावरले परचक्र म्हणजे कमाईची संधी, असा सुटसुटीत अर्थ आमच्या मातब्बर सरदारांनी करून घेतला आहे.''(पृ.११४), ''जगलो वाचलो तर कौतुक होईल. लढता लढता मेलो तर स्वर्गाची जोड मिळेल''(पृ.१२२), ''माधवा, ही युद्धभूमी आहे, इथे सोयरसुतक पाळायला वेळ नाही''(पृ.११७), ''राजकारण भावनेवर चालत नाही'', ''माणसाच्या श्रद्धेने परमेश्वर सुद्धा नमतो''(पृ.२३७), ''धनीपण सोपे; पण सेवकत्व फार कठीण(पृ.२९७), ''सापाला कितीही दूध पाजल, तरी जेव्हा तो ओकेल, तो गरळच ओकणार! तिथं अमृताची अपेक्षा करू नका''(पृ.३०४), ''मृत्यूचं भय माणसाला असलं, तर तो स्वतःला जपतो.''(पृ.३२९), ''जीवन किती वर्ष जगला त्याला फारसा अर्थ नाही. जीवन कसं जगला, ह्याला महत्व आहे. नाही तर चंदनाचं नावही राहिलं नसतं. साऱ्यांनीवटवृक्षाचं कौतुक केलं असतं.(पृ.३६०), ''खोटी श्रद्धा जीवनात उपयोगी पडत नाही. एक ना एक दिवस पश्चात्तापाची पाळी येतेचं यासारखं मोठं दुःख नाही!''(पृ.३६१), ''ह्या पृथ्वीतलावर जी गोष्ट घडते तो परमेश्वराच्या इच्छेने घडते. उत्पत्ती आणि अंत ह्या दोन्हींचा कर्ता तो आहे.''(पृ.३२२), ''राज्यकर्त्याला मन नसतं त्याला नेहमी कर्तव्यच पाळावं लागत. (पृ.३५३), ''खोटी श्रद्धा जीवनात उपयोगी पडत नाही. एक ना एक दिवस पश्चातापाची पाळी येतेच. यासारखं मोठ दुःख नाही.(पृ.३६९) ''स्त्रीच्या मनाची कल्पना, तिच्या

श्रद्धेची ताकद तुम्हांला आजमावता येणार नाही. ते समजून घ्यायचं असेल तर त्याला स्त्रीच व्हावं लागतं.(पृ.३६९) यशाबद्दल वाहवा आणि अपयशाबद्दल निंदा हे वैद्यराजांच लेणच आहे. मृत्यू हा अटळ आहे आणि तो दोष परमेश्वर आपणांकडे घेत नाही. कोणत्यातरी व्याधीच्या नावाखाली मृत्यूची नोंद होते आणि त्याच खापर वैद्याच्या माथी राहतं.(पृ.३९९)

**१.२.११.४. स्मरणगाथा :**

नटाचं खर जीवन रंगभूमीवरचं त्याचे ते विकार, क्षोम उसळण, मंदावण, रडणं, हसणं खुळावणं हेच खरं!(पृ.४४), अनुभव हाच इथं शिक्षक होता. जनांची आवड हीच कसोटी होती. श्रोत्यांना ज्याचं बोलणं भावलं, तो कीर्तनकार झाला.(पृ.१८९) चर्चा आणि प्रत्यक्ष काम ही जणू एकमेकांची वैरीच आहेत.(पृ.२५४), जथी लोक मान्याले लागले, थ्या जागी राहू नोय. मानूस लोक हिच्या प्रेमांतनी अडकून पडते.(पृ.२६५), चमत्कारालाच नमस्कार करायची, अशी लोकांना सवे (सवय) आहे.(पृ.३३५), निर्लोभ वैराग्य हे मोठी गोठ (गोष्ट) आहे.(पृ.३६४)

**१.२.११.५. सत्तांतर :**

पाणी हे जीवन होते, तसंच मरणही होतं. कोणतीही धारिष्टयाची गोष्ट करताना आणीबाणीचे क्षण अगदी थोडे असतात आणि त्यांना सामोरं जाणं हीच खरी परीक्षा असते. (पृ.१०), निकराच्या चकमकीत विनाश होतो.(पृ.१८), आईची माया दाईला कुठली असणार. आईच्या अंगाची ऊब मिळाली, उष्ण दूध मिळालं की, आणखीन काही मिळायचं बाकी राहतच नसे.(पृ.३५), सर्वंकष युध्द पुकारणं म्हणजे आत्मनाश आहे. संघटित राहण्यासाठी खऱ्या व काल्पनिक अशा शक्तीची धास्ती असावीच लागते. कोणत्याही चोरीत जोखीम असते.(पृ.३८), मोठया आगीच्या आसपास धगीमुळे जाता येत नाही.(पृ.४५), धोक्यामुळे तर दहाजण एकत्र येतात आणि एकत्र राहू लागतात.पळून गेलं की, सगळया धोक्यातून सुटका होते, असं थोडचं आहे? एकत्र राहण्यासाठी धाक लागतोच. बाहेरचा नसला, तरी घरातला! घरातला नसला, तर मनातला!(पृ.५१)

**१.२.११.६. झोंबी :**

गांधी म्हंजे आज जगातला सगळयात थोर माणूस(पृ.१७६) ‘इंगरजी शाळा, शिकून घोटाळा, रयताचा ताळा, सोडू नका’(पृ.२३७) वाडवडलात उत्तम शेती, मध्यम येपार नि कनिष्ठ नोकरी असं म्हंटलय.(पृ.२३६) झोंबी या कादंबरीत कथासूत्र लेखकाला असलेली शिक्षणाची

जोड, शिक्षणाच्या वाटेत आलेले सारे अडथळे दूर करुन लेखकाने शिक्षण पूर्ण केले हाच मोठा सुज्ञ विचार वाचकांच्या मनात पेरला आहे.

**१.२.११.७. झाडाझडती :**

श्रद्धांजल्या अर्पण करुन आनी आरत्या ओवाळून विझलेल्यया चुली पेटवता येत नाहीत.(पृ.३४)सोन्याची सूरी असली म्हणून कोन पोटात मारुन घेतं का?(पृ.४४)धरणग्रस्त म्हणजे धरतीची लेकरं(पृ.११६)आभाळाला टाका घालायला मी काय वाकळ हाय व्हय?सापापेक्षा माणसाची जात फार विषारी होती.(पृ.२८६)जिथं जन्मलू तिथं मरणासारखं सूख न्हाई(पृ.२९३) धरणग्रस्त लोकांच्या अनुभवातून आलेले सुविचार लेखक प्रस्तुत कादंबरीत मांडतो.

**१.२.११.८. राघववेळ :**

उठल्या बरुबर मांगाचं तोंड पहावं(पृ.७७), सत्य झोंबणारे असते(पृ.८६), नवरा महादेवावाणी भोळा असतो. त्याचा इस्वास ह्यो, तव्हरक बाईची ठाकूरकी(पृ.९४), इस्वाचे घोट गरीबाले गिळा लागते, बदनामीपासून कितीही पळतो म्हटले तरी आपल्या न कळत ती पाठीमागे येतेच.(पृ.१०७), हासू नाही कोणाच्या गरीबीले(पृ.१६३), उधार पाधार घेण्यात उपकार नसतात. फुकटात घेण्यातच उपकार असतात.(पृ.१६८), आवो, चिवटाले लागलेलं ढोर बी धावू धावू तिकडंच पळते.(पृ.१८२), बाळातपण म्हंजे नवा जलम आसते बाईचा(पृ.२०३), मन मेलं की हातातली ताकत बी मरते(पृ.२१२), मायची मया अशीच आसते माय(पृ.२१९), शाहण्यानी कोर्टाची पायरी चढू नये.(पृ.२९९)

**१.२.११.९. ताम्रपट :**

'कोणत्याही प्रकारच्या सत्ता ही माणसाला भ्रष्ट होण्याला प्रवृत्त करणाारी गोष्ट आहे.'(पृ.४३०) राजकीय पक्ष हे राजकारणासाठीच असतात आणि राजकारण सत्ता प्राप्तीसाठी असतं.(पृ.४३१) 'ठेविले अनंते तैशेची राहावे! चित्ती असू द्यावे समाधान'(पृ.२०१) 'ईश्वराच्या दारी देर असतो, पण अंधेर नसतो.'(पृ.४७८)

**१.२.११.१०. तणकट :**

कसं कळत ह्या मुक्या जनावरांना? आपल्या मनातलं पटकन त्यांच्याप्रत पोहचतं.(पृ.८) पैशामुळे पैशाचा लोभ निर्माण होत असेल.(पृ.९) जेव्हा आपण एखाद्या गोष्टीची मुळं शोधून सत्य हातात मिळवतो तेव्हा सत्याची कारणमीमांसा करताना तर्काशिवाय पर्याय नसतो.(पृ.१३५) या

जगात नोकरीला वशिला लागतो वशिला. पण समाधानानं जगाय तर वाशिला न्हाई लागणार?(पृ.२०४) समाधानानं जगायसाठी आपण ज्या वास्तवात जगतो, त्या वास्तवाचे सर्व संदर्भ आपल्याजवळ असावेत.(पृ.२०४) वरील सुविचारातून वास्तव विचार लेखक मांडतो.

**१.२.११.११. डांगोरा एका नगरीचा :**

जवळचा असो की दूरचा असो, इतिहास दडून असतो. आपण नीट वाचलेला नसतो. सावधान न्याहळलं तरच वर्तमानाला तो कसा स्फोटक करतो हे कळतं.(पृ.३) दुःखाचा लोंढा एखाद्या घराण्यावर असा वाहत येतो की, त्याचा निचरा व्हायच्या आत कुणाकुणाची कोणती दशा होऊन जाईल, सांगवत नाही.(पृ.४) अनपेक्षिताला उत्तर द्यायला एक धाडस लागतं.(पृ.६) तरुण मनाला साहसाची हौस असते. अदृष्टाचं भय नसतं. कुतुहल असतं.(पृ.७) स्वप्नातलं सुख राजरोस समोर वावरताना माणूस दिङ्मूढ होणार नाही तर काय? वासना उदात्त करता येतात. कशा? एक तर त्या पायदळी घालून चालावं लागतं. नाहीतर आपल्याच हातांनी त्यांच्या चिंधोट्या कराव्या लागतात. आणि यांनी आपल्यात करुनही चलबिचल झालेली नाही अशी समजूत घालावी लागते. प्रेमात पडलेला पुरुष आपल्या प्रेयसीशी खोडकरपणा करु इच्छितो.(पृ.९), गरीबगुरीब माणूसही ऐन जवानीत आलं की असाध्य ते साध्य करायची हिंमत धरुन चालू लागतं.(पृ.१०) कोणी कुणाची हमी घेऊ नये, घेऊ शकत नाही. स्वतःची जोखीम सांभाळता आली तरी पुष्कळ झालं. हट्टाग्रहानं कुणाच्या जिंदगीला मधून आकार द्यायचा प्रयत्न कुणी करु नये. या क्षणानंतरच्या भवितव्याचं कर्तेपण आपल्याकडे राहील असं मानू नये.(पृ.१०) लोक मिळवायचे तर लोकनेते आपलेसे झाले पाहिजेत.(पृ.१२) आपण मनाशी एक धरतो न दैव वेगळचं काही वाढून ठेवतं. हे अनुभवल्याशिवाय नाही कळत.(पृ.१४) सावलीत जाण्याआधी असंच उन्हात पोळून घ्यावं लागतं.(पृ.१५), आयुष्यात एक मिळतं तर दुसरं हरवतं. एक नुसतं स्वप्नासारखं तरळून जात आणि दुसरं जिवंत नामरुप घेऊन पुढयात येतं. आपल्या न जागेपणीचं सौभाग्य होतं.(पृ.१६) निर्वाणीचं असतं ते बाकीचं सगळं खुटलं म्हणजे करायचं असतं.(पृ.१६) ज्यांच दुःख त्याला वाहून न्यायचं असतं. दुसऱ्यांना त्याचं काय सोयरसुतक?(पृ.१६) आपल्या जिव्हाळ्याच्या पुरुषाला अशा विपरित परिस्थितीने वेदना सहन करताना पाहून कुणीही स्त्रिची अंतःकरणात करुणा भरुन येते. मग ती आई असेल, बहीण असेल... प्रिया असेल, मैत्रीण असेल...(पृ.१७), कोणाचा दिवस कोणत्या क्षणी बुडेल, सांगता येतं का?(पृ.१८), चार भिंतीआड सोफ्यावर आराम करतांना पुस्तक तर छानचं सोबत करतात.(पृ.१९), अजाणपणाच्या हातून वाईटाची कुठवर फरफटत नेली

जाईल हे सांगतां नाही येतं.(पृ.२९) लोकांना जाणावणारा विद्रोही प्रतियुगात जन्मावा लागतो. तरच समाज सर्वनाशापासून बचावतो.(पृ.२९) वाटतं तितकं युग दीर्घ नसतं. त्यांच्या नव्या चोखपणात हां हां म्हणता जुनी किल्मिषं मिसळतात.(पृ.२९) माणसं निरुद्योगी अन् निव्वळ पोटार्थी झाली की वाकड्या वाटांनी जातात.(पृ.३०) काळाचा पडदा कोणत्याही क्षणी उभा आडवा फाटून जातो, अन्यायाचा जबडा उघडतो न् माणूस इतिहास जमा होऊ शकतो.(पृ.३१) राजा असणं ही राजा होण्याहून वेगळीच गोष्ट आहे.(पृ.३४) पुस्तकात खुणा केलेली वाक्य प्रियजनांनी दिलेल्या लहानमोठ्या भेटींसारखी असतात.(पृ.३५) प्रेयसी होता आलं नाही तरी प्रेमिक म्हणून जगता येतं.(पृ.३८) नावाला साजून दिसणारी माणसं फार दुर्मिळ भेटतात.(पृ.४४) स्वतःच्या नाठाळपणावर स्वतःच प्रहार करायला देखील बाहेरचं प्रचोदन लागतं.(पृ.४९) स्वप्न ज्यांना पडतात ती माणसं पलीकडे पाहू लागतात, अजेयाच्या पडद्याचं अस्तर ती सोलायचा प्रयास करीत. लौकिकातल्या काळोखानं त्यांच्या पायघड्यांसाठी अंथरलेला असतो. खळग्यांचा गालिचा.(पृ.५०) ज्ञान मिळवा अन् निर्भय व्हा.(पृ.५१) असं वेगळं काही अवचित वाटयाला येतं हे माणसाच्या ध्यानीमनीही नसतं. त्याक्षणी आपण एकाकी नसून संयुक्त आहोत याचं अनोखं स्फुरण उजळून जातं.(पृ.५३), एका एका क्षणानं आयुष्याचं वळण सिद्ध केलेलं असतं.(पृ.५४)आपणच आपल्याला तपासून बघायचे दिवस कधीतरी येतात.(पृ.५५) वैगुण्य आपल्यात की आपल्या सहचरात याचा तलास घ्यायला एक निर्भयपण लागतं.(पृ.५५), सुवर्ण निर्माणाचं समंध एकदा की मागं लागल की माणसाला विकृतीवाचून काही सुचेनासं होतं.(पृ.५७) बढाईखेरापणानंच निम्मे जिंकतात गिऱ्हाईकाला.(पृ.५९) थोरामोठयांच्या हिमायतीचा काही माणसांना फार लळा असतो. त्या वलयात आपली रुप ते उजळून घेतात. आणि स्वतःवर लट्टू होऊन वागतात.(पृ.क्र.६२) सुबत्ता आणि सत्तेची जवळीक यांच्यानं, मुळात दृष्ट नसलेली माणसंही वाकडी वाट धरणारी होतात.(पृ.६२) माणसाची सर्व आकांक्षा आणि सर्व अधिकार लालसा अंतःकरणाच्या निर्मळ आणि प्रियाळ वृत्तीशी जोडली गेली तरच सजीव आणि सुंदर होते. अन्यथा अत्याचारी आणि कुरुप.(पृ.६५) काही स्त्रिया, काही पुरुष मनसुख असतात. मनाला भावते तेच करतात. भावत नाही ते निक्षून टाकतात. शरीरधर्माची वाळवण त्यांना खुपत नसते असं नाही, पण ती ते कडाक्यानं स्वीकारतात. कष्टी होतात, मौनी होतात. किंवा मग कसल्या तरी मोहिनीत स्वत:ला बुडवून टाकतात, एखाद्या स्त्रीनं आपल्या पतीला किंवा एखाद्या पुरुषानं आपल्या स्त्रीला असं मनाबाहेर ठेवलं तर काय होत असेल? ज्याचा ठावा तो ताण, ती वेदना. सामान्य

जन लोकांचा धोपट तर्कही जीवनाच्या तळागाळाशी थेट संधान साधू शकतो. ती तर मुळीची जनशक्ती आहे. पण दुर्दैव कसं एखाद्यावर टपून बसलेलं असतं.(पृ.६६) करीत असलेल्या कामाची कुणी ना कुणी वाहवा करावी ही सुप्त आकांक्षा माणसाला असते.(पृ.७१) माणूस मुळातून दुष्ट असलं असं नाही. पण 'माझं-माझं'च्या भोवऱ्यात एकदा का गरगरु लागलं, की त्याचे इतरांशी असलेले सांधे तुटत जातात. त्यानं येणारं भकास दुबळेपण स्वत:त रिचवून घेण्यापलीकडे त्याला काही करता येत नाही. यातून अशा 'मी'ला एक सर्वभक्षक फुगवटा येतो. त्यात प्रथम तो जीव स्वत:च गुदमरतो. मग इतरांना जीव नकोसा करीत आपला जीव बचावण्याचं समाधान त्याला शोधावं लागतं.(पृ.७२)

खरंखोटं, भलंबुर याचा निर्णय घ्यायला विवेक जागा लागतो. मी तेवढी खरी, माझं तेवढ भलं असा हेकटपणा धरला तरी यातलं वैगुण्य ध्यानी भरताच माणूस दुधा होण्याच्या काठावर लटपटत राहतं.(पृ.७२) मनाचे खेळ अजब असतात. काल्पनिकाचं गारुड पसरुन ठेवता ठेवता वस्तुस्थितीचं भान चाटून जाईल असा प्रकाशाचा कवडसा त्याच्या चंचल हुतूतूतही कुठेतरी स्थिरावतो. किंचित काळ... आणि दिवस-रात्रीची बेचैनी माणसाला देतो.(पृ.७२) पण मनामनांची मिळणी झाली अन् बेभान एकवटता आलं तर त्याहून स्त्रीपुरुषांच्या ऐहिकाचं सौभाग्य तरी कोणतं?(पृ.७३) या ध्रुवावर 'मी-माझं'चं पोषण होता हेत नाही, शोषण मात्र नक्की होतं. विश्वातल्या सुखदु:खाचा भार एका असहाय मी-बिंदूवर वाढत जातो. त्याची सहनशक्ती तग धरते तोवर ठीक. तिचा स्फोट झाला की चित्र चिरफाळतं. स्वत:ला दंश करु लागतं. होष जाण्याची वेळ येते. तशात शरीरबळाने दगा दिला का ते हमखास घसरणीला लागतं.(पृ.७५) जाणारा जातो म्हणून काय त्याच्या मागं सबळ तसंच निचेष्ट व्हावं(पृ.७९) कितीही धीराचा झाला तरी जिवलगाच्या मरण स्पर्शानं माणूस मुळातून गलबलतो(पृ.८५) दु:ख केवळ स्वत:चं नसतं सर्वात आणि सर्वत्र ते उगवलेलं आहे. त्याला आळा घालणं आवाक्या बाहेरचं आहे.(पृ.९१) एवढ्या अथांग अज्ञानाला, अन् वैराला तोंड द्यायला एक एक माणूस किती अपुरा. एखाद्या लोकसमूहाचा स्वामी असणं हे भाग्याचं की दुर्भाग्याचं(पृ.९१) गोष्टींचे धागे माणसाला कधी कधी फार उशिरा उलगडतात. तोवर त्यांची मुळं तुटून जाण्याची वेळ ठेपलेली असते.(पृ.९३) मनाचा थारा मोडला की डोळे नीट बघू शकत नाहीत. कान नीट ऐकू शकत नाहीत. संभ्रम वाणीत उतरतो. पाऊल ठीक पडत नाही.(पृ.९३) सदा सावध असा. नीट पाहत्या व्हा. राज्य एकट्याचं नसतं. एकटयानं ते हाकता येत नाही. जागोजाग सल्ला लागतो. तो देणारा जाणता, निस्पृह जवळ लागतो.

मसलतीसाठी कार्यकर्ते लागतात. अधिकारी लागतात. कारकून लागतात. हरकामे सेवक लागतात. आपआपल्या ठायी दक्ष, सभ्य आणि न्यायी असे. कोठल्याही पातळीवर राज्याचा म्हणजेच प्रजेचा द्रोह होऊ शकतो.(पृ.९४) काय करावं न करावं असा पेच येतो. ही वाट धरावी की ती, असं साकडं पडते. अकस्मात आणीबाणी उभी होते, तेव्हा निर्णयाची जबाबदारी सर्वांवर हुकुमत ठेवणाऱ्याला उचलावी लागते. त्या क्षणी सल्लागार पडद्याआड होतात. अधिकारी कानांवर हात ठेवतात. कार्यकर्ते हात झाडून मोकळे उभे राहतात. जाब द्यावा लागतो तो तुम्हाला. सत्तांपीठावर असणाऱ्याला(पृ.९४) बिकट समयाला कुठली दुरुन येणारी तिरीपही माणूस धरु पाहतं.(पृ.९७) बायकांना असाच नवरा आवडतो. आपल्या हातचं खाऊनपिऊन पुष्ट झालेला.(पृ.९७) ज्यांना आपण कावेबाज आणि आपमतलबी म्हणून हिणवतो ती माणसं एकांगी चतुर असतात. सत्वशील माणसं एखाद्या परिस्थितीत कशी वागतील याचा अचूक अंदाज त्यांना असतो.(पृ.११२) खांडोळी करणारे घाव पडतात तेव्हा आपल्या अवदेशाचा साक्षी होण्या पलीकडं एखाद्या देववृक्षाला काय करता येतं?(पृ.१२२) रयतेला खूष केल्याशिवाय राज्य करणाऱ्यांचं आसन बळकट होत नाही.(पृ.१२३) राजकृपेची महात्मता सहजासहजी थोडीच कुणाला झिडकारता येते? मिंधेपणापासून दूर राहू पाहणारी माणसंही अशा अनपेक्षित आणि अनाकलनीय अगत्याच्या ओझ्याखाली चूर होऊन जातात.(पृ.१२४) राजधानीतल्या मुखंडांना काखेत घेऊन त्यांची बुद्धी मलिन करायला राजसत्तेचा एवढासाही कस्तुरीगंध नाकाशी हुंगायला दिला की बस्स होतं(पृ.१२४) पण जिथं पेशानं मोजला जाणारा प्राणपणास लागतो. तिथं कोण आपला, कोण परका?(पृ.१२७) प्रापंचिक जगात स्वाभाविक निर्मळता व तिच्या जोडीनं संपादन केलेली सत्त्वशीलता ही नेमकी कोणाच्या न कोणाच्या द्वेषाला कारण होतात.(पृ.१२८) या जगात आपण गृहीत धरलेल असतं ते मानवी संबंधातलं सूत्र कोणत्या क्षणी विलयाला जाईल किंवा विरूप होईल याची काहीच शाश्वती नाही.(पृ.१२८) संसाराच्या क्रूर धकाधकीत सद्गुणही लोढांन होऊन माणसाला भिरंगटून सोडतात.(पृ.१२९) दृष्ट व्हायचे नाही आणि घेणाऱ्यांची कॉलर धरायची हे काम एकट्या दुकट्याचा हातून तडीला जाणं अवघड असत. आपल्याला निर्भय आणि निर्भिड राहू द्यायला तशाच विश्वस्त सांगातींची फळी मागून फळी आपल्या पाठीशी असल्याचा निर्वाळा सामान्य सात्विकाला आवश्यक असतो.(पृ.१२९) निष्ठावंत अनुयायी मिळायलाही काळाची एक अनुकुलता लागते, नशीब लागतं.(पृ.१२९) स्वत:भोवती कोश गुंफून गुंफून घेतला की आतला जीव जितका सुरक्षित तितकाच प्राणसंकटांशी संमुख उभा असतो.(पृ.१२९) जंगल राज्यात नुसतं

निर्भय राहून निभत नाही. असावध वागतो, त्याला गच्छंती वाचून पर्याय नसतो.(पृ.१२९) एवढयाशा गावात बहुतेकांची बिंग इतर बहुतेकांना माहीत झालेली असतात. त्यामुळे प्रत्येक जणं काही काळ अळीमिळीची शपथ घेतल्याप्रमाणं वागताना दिसतो. पण वेळ येताच गवताची गंज पेटवायला मोठा विस्तव थोडाच लागतो.(पृ.१३४) अनाचाराला प्रायश्चिताची पहाट नाहीच दिसली तर काळोखाला काय उणं? प्रायश्चितापर्यंत यायला विवेक जागा असायला लागतो. सर्वांविषयीची प्रेमज्योत जळती रहावी लागते.(पृ.१३६) जळतेपण क्षीणं होतं आणि जागेपण बावरलेलं.(पृ.१३६) भयाला नेहमी हिंसेचं काळंगडद अस्तर असतं. अशानं भूमी दिवसरात्र द्वंद्वासाठी सजलेली असते.(पृ.१३७) आपण सर्वजण एकाच ईश्वराची लेकरं आहोत. या सृष्टींच वैभव सर्वांसाठी आहे. त्याचा उपयोग घ्यायला सर्वांना समान संधी हवी. दुसऱ्याच्या दु:खाला कारण व्हायचं नसेल तर आपण अन्यायी न झालं पाहिजे, स्वत: बरोबर इतरांना समान हक्क आणि अधिकार मानला पाहिजे, विषमवृत्ती आणि वरचढपणा पायदली घातला पाहिजे.(पृ.१३७) उगवणारा प्रत्येक दिवस शेवटचा असू शकतो याचा चटका आमच्या चिताला कधीच बसला असता तर आग लागलेल्या घरातून जिवानिशी पळ काढावा तसे आम्ही जातीपातींच्या वैमनस्यातून झाडझाडून बाहेर निघालो असतो. अट्टहास आम्ही कसला करतो! शेवटचा दिवस आमच्या गणतीतच नाही.(पृ.१३७) प्रत्येक बदचालीला प्रायश्चित असतं. जाहीरपणं ते न घ्याल तर दडपलेल्या आजारासारखं अवकाळी झडप घालतं ते... तुमच्या प्राणांवर(पृ.१३८) बाजारपेठ, रस्ते, चावडी ही तर कोणा वरिष्ठ म्हणवणाऱ्या जातवाल्यांच्या मालकीची नसतात! तिथं एक दुसऱ्याची लक्तरं टांगू पाहतो. अन् कुणालाच त्याची किळस वाटत नसते.(पृ.१३८), भ्रष्टाचारांनी धुंद झालेल्या डोळयांना भोवतीची परिवर्तन आणि त्यातले बारकावे स्वच्छ दिसेनासे होतात.(पृ.१५२), अर्धपोटी राबडा-गाय घरात आली म्हणजे देवाचं पाऊल उंबऱ्याआड आलं म्हणायचं. 'राष्ट्र' नुसतं माणसांचं नाही होत बरं. त्यांच्यावर उपकार करणाऱ्या पशूंचं अन् प्राण्यांचही असतं.(पृ.१५८) आपण भले, जग भले(पृ.१५९) या जगात सज्जनपणाशी बेसावध होऊन अर्धमिटल्या डोळयांनी एका तंद्रेत मोकाट फिरु लागला, की कोणत्या कडेलोटावर पोहोचेल, कोणत्या फासात सापडेल ते मुळीच सांगता येत नाही.(पृ.१५९) खरेच हितचिंतक जवळ येऊन खालच्या आवाजात काही काही सांगतांना तेंव्हा विश्वास बसू नये इतक्या वैराचे धनी आपण झालो आहोत, हे कळतं.(पृ.१६०) 'गरिबांचा वाली व्हायचं.' वगैरे सर्व ठिक असतं पुराणातलं. देवादिकांची कामंती. माणसांनी कसं चारचौघांसारखं वागावं.(पृ.१६०) पराकाष्ठेचे प्रेमळ तरी

मुलुखाचे फटकळ(पृ.१६०) न्याय करायचा, सत्याला प्रतिष्ठा द्यायची, चांगुलपणा मिळवायचा, देवानं दिलेलं अंत:करणाचं समाधाान भोगायचं, तर दुर्जनांनी केलेला अपवाद सोसायला पाहिजे.(पृ.१६०) पाठीमागून कोणी घाव घातले तरी तो ईशकृपाच मानली पाहिजे. अंगावर उडणारी राड होता होईल तेवढी निपटायला पाहिजे.(पृ.१६०) ''व्रती माणसानं आत्मसंतोष जोडलेला असतो. ती प्रत्यक्ष ईश्वराची देणगी असते. कोणाही ऐबू गैबूची नसते. तिचा अपहार होत नाही. या फडतूस मानवी आयुष्यात चित्ताच्या समाधानाइतकं मौल्यवान दुसरं असतं तरी काय?''(पृ.१६१) अप्रिय प्रसंग-गुंतातून बाहेर वाट काढायला बघावी, हे माणसाच्या मनाचं स्वाभाविक वर्तन असतं.(पृ.१६२) जे ठरवाव ते कृतीत उतरण्यापूर्वीच्या मधल्या अवकाशात आपल्यावर अवचित काम चालून येतं, याची माणसाला कुठं कल्पना असते.(पृ.१६३) मुलांना शिकवायचं काम करणाऱ्याला स्वत: चांगलं लिहीता आलं पाहिजे. त्यानं खूप वाचलं पाहिजे.(पृ.१६४) साधुपुरुषानं कोठलीच भूमी अंमल वाटत नसते. तिच्यावर वावरणाऱ्यांच्या करणीनं ती तशी ना कशी होते.(पृ.१६५) नि:स्वार्थ माणसाचे उपकार आळशांतही नवी चेतना निर्माण करतात.(पृ.१६५) मोकाट फिरायला कुणाला नाही आवडत (पृ.१६९), दिवाणाच्या हुद्यावर असलेल्या माणसाला संस्थानची चाकरी म्हणजे सुळावरची पोळी व्हावी, यापेक्षा कलियुगाचा महिमा तरी कोणता?(पृ.१७६), बऱ्यागोष्टींचे मनसुबे एकटे पणानं उघडयावर होऊ शकतात. बुरा व्यवहार छुपं संगनमत मिळविण्याच्या प्रयत्नात असतो.(पृ.१७८), चाकरी करून पोटभरणाऱ्याला स्वत:च्या मनासारखं वागता कुठं येतं?(पृ.१८७), कीव करणारे लागेल तितके असतात. करूणेनं हातपुढं करणारा एखादाच असतो.(पृ.१८७), साधंभोळं माणूस मोहात लवकर अडकतं. उशिरा जाग होतं मग विवेकाचं काही सुचलं तरी लोभापायी त्याला मुरड घालून वागत राहतं.(पृ.१८७) अशा काही व्याधी असतात, की ठणका उठण्यापूर्वी खोलात निमूट पसरतांना कशा कशा आडचरत जातात. गावच काय न् माणसाचं काय?(पृ.१९०) आपली नसलेली वस्तू कोणाला कळू न देता बळकावी किंवा परस्पर कोणाला दाण देवून टाकावी, यानं होणार आनंद कशाबाहेर तोलावा?(पृ.१९१) कसलंही काम न करतां, कसलाही जबाबदारी न उचलता चार घास गिळायची सोय झाली की, माणसं आळशी आणि व्यसनी होतील नाहीतर की काय?(पृ.१९१) आपल्याला वाटतं, फडतूस किग्गळ माणसंही, यांच्यानं काय उलथापालथ होणार जगाची? तसं नसतं(पृ.१९३) सर्वसामान्य माणसं साधीसुधीच असतात आणि दिसतात. साधारण निष्पापसं जिणं जगत असलेली बहुतांश दुर्लक्षित. अहंमन्य पण अजाणबुध्दीला ती निव्वळ

पोतेऱ्यांसारखी वाटतात. पण समाजाच्या त्याच तर रक्तवाहिन्या असतात. कुठूनकुठून साचत आलेल्या द्वेषानं आणि अविवेकानं त्यांची मनं ग्रासली, की तीच माणसं सर्पांसारखी चळवळू लागतात. पाहता पाहता त्यांचं अभिसरण वेगवान होतं अन् समाजाच्या अध:पात डोळ्यांदेखत होत राहतो.(पृ.१९३) काष्ठात झोपलेला अग्नी अशा नाचणाऱ्या बाहुल्यांच्या मार्फत ठिणग्या टाकत असतो. गाफिल वस्तीचे रहिवासी त्यातून पेट घेतात मग हाहाकार होतो.(पृ.१९३) माध्यान्हीला जे मूर्च्छित पडलेलं वाटतं तेच सुंदरपण कडोसा पडायला प्रहर आला की खायला उठतं. अनामिक भयाच्या शहारा भरून ठेवंत झाडाझाडात.(पृ.१९३)पावसाचं मान कमी जास्त झालं तरी तिचं दान आखडत नसायचं. तिच्या पोटातला पाण्याचा उमाळा स्वभावत:च कृपावंत होता.(पृ.१९४) शरीरानं विसविशित अन् बुध्दीनं चंचल झालेल्यांच्या ठायी भ्रांतीच वारं भरायला वेळ लागत नाही. पाठोपाठ खोड्याळपणा येतो. इच्छा असो नसो क्रूर व्हावं लागतं. त्याशिवाय निभाव नाही अशी धासत पडते.(पृ.१९४) चोख न्यायी माणसं विरळ बाबा देवाचा झेंडा घेऊन आलेली असतात ती.(पृ.१९९) अज्ञातातून आश्वासनाचा प्रकाश माणसांपुढं येतो. अन् अगम्य शक्ती आपल्याला छळतात की जोजवतात, त्यापुरत्या आधंळ्या आहेत की डोळस, हे त्याला कळेनासं होतं. माणसातला शरण–भाव जागा होता.(पृ.२००) गेलेल्या प्रिय माणसाचं स्मरण ठेवून आपल्या कर्तव्याला सामोरं जावं.(पृ.२००) डोईवरचं छत्र एकाएकी असं उडून गेलं म्हणजे उदास आणि पोरकं वाटू नये तर काय!(पृ.२००) देव किती दयाळू आहे! स्वप्नातही नव्हता असा सुंदर प्रदेश त्यानं आपल्या कर्तबगारीच्या आरंभासाठी बहाल केला.(पृ.२०१) तरुण मनाच्या अलिंगनात जे जे भव्य आणि उत्कट ते ते किती हां हां म्हणता सामावून येतं! किती उमाळयान हवाले देतं!(पृ.२०१) बहिरंग असा वाचता यावा की अंतरंगाचा सुगावा लागावा.(पृ.२०२) कर्तव्यदक्ष असायच तर सेवेत मनोभावांन रुतून घ्यावं लागतं... त्याचवेळी निष्ठावंत सेवेचा मोल मोजू न शकणाऱ्या अधिकाऱ्याच्या हाताखाली फार सोसावं लागतं. आतल्या आत.(पृ.२०३) खरं आणि काल्पनिक ही दोन्ही मिळून आपल्या विचाराचं तसंच वर्तनाचं, वस्त्र विणतात काय?(पृ.२०४) विपरीत अनुभव यायला पुष्कळ जगावं लागतं असं नाही, माणसाला तो कोठल्याही क्षणी गळयाशी धरतो.(पृ.२०४) घात वेळेची चाहूल लागली की प्राण स्तब्ध होतात. त्यांचं कावरेबावरेपणही संपलेलं असतं.(पृ.२०६) परंपरा सदाच वेढून असते. तिला तोडून बाहेर यायचं, किती एकांना सुचतही नाही. सुचलं तरी किती एकांना बाहेरवाट दिसत नाही. त्यासाठी जिगर पणाला लावावी अशी निकड वाटत नाही. परंपरेत राहूनही काही माणसं दिवस रात्र सार्थकी लावतात.(पृ.२०६)

त्याची शक्ती लहान होती पण मनाचा आवाका मोठा होता.(पृ.२०६) अत्याचार पाहून फार तर आतल्या आत कळवळावं पण माणसानं प्रतिकाराची आणि निषेधाची ठोस पावलं टाकू नयेत. कातडी बचावून जगत राहायचं पथ्य पाळावं. तरच गुळमुळीत का असेना सुख मिळतं.(पृ.२१०) निधडा स्वार्थ, भलती हावभाव, द्वेष आणि मत्सर यांच्या पोटी माणसं पशूंनाही खाली पाहायला लावणारी कृत्यं करतात.(पृ.२१०) सामाजिक अवस्थेचे स्तर कितीही विषम असोत, माणसातल्या मूळ प्रवृत्तींचा लगदा एकाच रसाचा असतो; वस्तीत, खेड्यात आणि राजधानीत चालणारे दशावतार एकाच मुशीत ओतलेले असतात.(पृ.२१०) चलाख आणि दुष्ट माणसं डोईजड होतात आणि शिडी लाथाडून स्वर्ग गाठतात. पैसा, जमीन आणि बाई यांपैकी एकेका क्षेत्रातही भलेभले बेताल वागू लागतात.(पृ.२११) जमीन आणि पैसा ही दुबळ्या अनाथांची मालमत्ता नव्हे.(पृ.२११) पण माणसाचं असंच आहे. त्याला लहानपण, त्याला भव्यतेची स्वप्न देत त्याचं मोठेपण कधी कधी त्याला बिळात सरपटणारा करत.(पृ.२११) काळ कशाच्या आन् कुणाच्या रुपाने येतो, कुणी जाणलं आहे?(पृ.२१२) कितीही चलाख पारधी झाला तरी, दोन पक्षांची शिकार विरळ साधते.(पृ.२१३) तामसी बुद्धी एकदा पेटून उठली की तिच्या मसलखान्यात दुष्मनाच्या चुपचाप कत्तलीचा करार होऊन जातो. त्यासाठी शब्द खर्च होत नाही की शाई वाळावी लागत नाही . मागमूस उरू नये अशी वाट लावली जाते.(पृ.२१३) माणूस दुष्टपणापुढ एका भयानं चिमुन जातं, तसं दुष्कर्म करीत असतानाही आतून भेदरलेलं असतं.(पृ.२१५) माणूस किती वाकुडा, किती दुष्ट, किती निर्दय असू शकतो किंवा होऊ शकतो त्याच्या सीमा नेहमी पुलिस–ऑफिसरला गम्य असल्या पाहिजेत. तर त्याला समोरच्या आरोपीला वठणीवर आणणं शक्य होतं.(पृ.२१७) अंतरात्म्याला साक्ष ठेवून आकाशात फेलेला शब्द नाशवंत होत नाही की बेवारस राहत नाही.(पृ.२६४) माणसं अशी मरत असतात कणाकणांनी. मारणारे शूरपणानं मिरवतात.(पृ.२२०) हिंसा आणि रक्तपात यांची वर्णनं वाचणं–ऐकणं निराळं अन् डोळयांदेखत त्यांचा अनुभव घेणं फार फार निराळं. माााणसांची अशी खंडना तर वेगवेगळया पातळीवर अदृश्य हत्यारांनी होउ शकते.(पृ.२२०) असंतोष. सामान्य, साधं जीवन जगणारी माणसं. त्यांना महत्वकांक्षा नव्हत्या.(पृ.२२५) कोणी कामासक्त, तर कोणी व्यसनाधीन, कोणी द्वेषपीडेनं जर्जर झालेले. त्यांचा स्वार्थ त्यांना अन्यायाला नेत होता. क्रुर व्हायच्या क्षणी शरमिंध होऊन चालत नाही.(पृ.२२५) कंगाल आणि लाचार माणसं सदाच ओशाळी असतात. नाकावरची माशी उडवायची झाली तर दहादा विचार करतील.(पृ.२२७) आडवाटांनी गेलं अन् कुणासाठी खड्डा खणून ठेवला तर थोडंच

उजागरीला येतं!(पृ.२३०) दंगा झाला, डोळी फुटली, धरपकड झाली म्हणजे रयतेमधल्या निरपराध माणसांना काय सोसावं लागतं, हातावर पोट असणाऱ्यांची कोण काहीली होते, ते पुलिसखात्याला चांगलं माहीतं असतं.(पृ.२३६) माणसाला महत्वकांक्षा असावी यात अवघड ते काय?(पृ.२३७) व्यासंगी आणि विद्वान, उदार पण विवेकी माणसं काय वळणावळणाला भेटतात. स्वाभिमान पोटी त्यांना सुखभोग सांडावे लागतात. चूल पेटली नाही तर तुळशी दलाबरोबर फुल पात्रभर पाणी पिऊन आडवं व्हावं लागतं, नि:स्पृह असणं ही ब्राम्हणपणाची एक अट आहे. जगण्याच्या सौद्यात त्याची काय किंमत द्यावी लागते ते त्या वंशाला जाणाऱ्यालाच कळतं.(पृ.२३९) भेकड माणूस आपला खिसा गुपचूप भरणाऱ्या आपल्या सहकाऱ्याविरुद्ध ब्र काढील हे कसे शक्य आहे?(पृ.२३९) जुलुमानं भरडल्या जाणाऱ्या असहायांच्या वस्तीत एकवट सत्त्व कुठून खडं व्हायला?(पृ.२३९) सत्ता ज्याच्या पातयळी त्याच्या बोटांच्या पेरापेरांवर म्हणियार उगवितात. पापण्यांच्या हालचालींवर हस्तक हत्यारं घेऊन निघतात. श्वास झेलायला पावला पावलांवर शागीर्द असतात.(पृ.२४०) क्षुद्रजीवनच सगळा विचका करीत असतात. एखाद्या भव्य समारंभाचा! त्यांना कुठं थोरा मोठयांच भलंबुरं कळतं?(पृ.२४५) काळोख आणि थंडी यांचं संगनमत झाले की हवेत दाट कापरं भरुन येतं. माणसं मुडपून जातात. त्यांची मनं धास्तावतात.(पृ.२४७) जग निर्माण करणारा करतो. राखणारा राखतो. संहार करणारा संहार करतो. जन्माला येणंच आपल्या हातात नाही. मग पुढल्या पाप-तापाच्या गोष्टींसाठी वाफ कशाला दवडायची? हे झालं या ब्रम्हांडाविषयी.(पृ.२४९) माणसं सहसा आपणच आखून घेतलेल्या चौकटीची नकळत आज्ञाधारक झालेली असतात. दैनंदिन रहाटीला या चौकटीचं कुंपण पुरुन उरतं हेच खरं. भक्कम असतं ते. माणसांची मनं त्या मानानं फार डळमळतात.(पृ.२५०) करायचे बोलो नये। बोलायचे लिहो नये- रामदास स्वामी(पृ.२६१) तरुणांच्या ओठांतून येणाऱ्या सामूहिक आवाहनाला एक वेगळं चमत्कार सामर्थ्य असतं.(पृ.२६४) विचार करता करता एक क्षण असा येईल, की ज्यावेळी तुम्हाला कळून चुकेल. आपण नगन्य आहोत, कुणी अन् होत तरीही त्या गहनाचे आणि विराटाचे अंश आहोत. तिच शरणावस्था, ती एकदा आत्मसात झाली की मनोमन भरुन येत...(पृ.२६५)आपण ज्या पंचमहाभूतांच्या मिळणीतून जन्म घेतला. त्यांच्याच प्रभाव आणि सामर्थ्य आपल्या गणवेत येत नाही, तर या विश्वात्मक ईश्वराचा ठाव कसा सहजासहजी लागेल तरी निराश व्हायचं नाही. आपलं लहानपण उमलून घ्याल तेव्हाच आपल्या हातून सारे काही घडेल याचा खूणगाठ बाळगा (पृ.२६५) घटाची, कुळाची, जातीची , गावाची कुंपण मानूच नका. मग ती तोडायचा प्रश्न देणार

नाही. या प्रयत्न घटिकेला आकाशाला डोळे लावा म्हणजे त्या सर्वात्मक सुंदराचा एकसूक्ष्म पण गहन थट्टा तुमच्या जिवावर उमटेल. (पृ.२६६) आकाशाला भेटायचा कोणची सोबत गरजेची नसते. कोणाची परवानगी लागत नाही (पृ.२६६) या पृथ्वीवरचा प्रत्येक दिवस असा सुरू होतो. राम रंगानं रंगलेला आणि आपण त्याला पुढल्या पहरात कसल्या कसल्या कुयाळ रंगांनी बरबटून टाकतो. (पृ.२६६) शाळेतल्या पुस्तकातून शिकता त्याहून बाहेरल्या जगात अफाट काही चाललं आहे. (पृ.२६६) वरिष्ठांची मर्जी राखावी आणि आपल्यावाचून त्याचं पान हालू नये याची तजर्वता करण्यात एखाद्याचा हातरूंडा असतो (पृ.२६८) माणसानं आहे त्यात समाधान घ्यावं म्हणतात, होतं जातं ते बऱ्यासाठीच असं पण ते सांगतात. यातलं तथ्यं कळायला जाणतं व्हावं लागतं (पृ.२७०) राज्य ज्यांच्या खांगिराखाली आणि रंग ज्यांच्या डोळयांत उतरलेल्या, त्यांना विचारवंत ही पदवी नकोच असते. ते धनी करणीचे (पृ.२७०) विधिनिषेघ एकदा काडोक्याला गुंडाळले, की माणसाला एक नीच धरिष्टय येतं. त्यानं घरकुलं नष्ट होतात. मग आकाशाची माया निसंतान होते.(पृ.२७१)(मांसडीचा, अवलाद शिव्या)घटकाय अन् बाहेरला समाज काय नीतिधर्माचा पासंग तुटला की ती अशी नातीी विरूप आणि अभद्र दिसू लागतात. (पृ.२७२) कुणाचं भान सुटतं तोच क्षण आणखी कुणाला भान येण्याचा असतो काय? (पृ.२७३) संशय, अविश्वास, भीती जगण्याचं रसायन यांनी कालवलं की माणसाची मनं कातर होतात अन् आसरा शोधू लागतात. सत्ता ज्यांच्या हाती त्यांना अशा भयग्रस्तांचा भरवसा मोठा असतो. त्यांना दिसून वळून केलेला दोर सगळया सामाजिक दिवसाला वरूण घालू शकतात. (पृ.२७४) सकारचा रोष ज्याच्यावर होतो त्याचे आपण कोणी लागत नाही हे दाखवायची ज्याच्यावर होती ज्याचे आपण कोणी लागत नाही हे दाखवायची अहम हातिक लागते (पृ.२७९) माणसाचं काय अन् देवाचं काय असंच असतं. दुर्धर संकट ओढवलं म्हणजेच त्यांना परब्रह्म आठवतं अहंपणाच्या मस्तीत त्याचा सर्वकाह विसर पडलेला असतो. (पृ.२८१) आत्मा बलशाली असतो तो भंगुर देहाच्या सान्निध्यानं(पृ.२८१) एक युग येतं-जाते, मागून दुसरं येतं असं आपण म्हणतो. ते आपल्या कालकल्पनेप्रमाणं समजायला सोपं म्हणून. खरं तर ती एकात एक गुंफलेली असतात. जसे आपले सहा ऋतू. थेंबात समुद्र असावा तशी चारही युगं चालू घडीत सामावलेली असतात.(पृ.२८२) कर्मशील आणि ज्ञानशील ही जेंव्हा एकवटतात तेंव्हा निव्वळ भोगासक्त सत्ताधाऱ्यांची झोप उडते. मग ते नीतीचा अन् न्यायाचा खून दिवसाढवळा करायला मागंपुढं पाहत नाहीत.(पृ.२८२) युग कोणतंही असो, तामसपुत्र कली हा पायदळी चळवळत असतो. तेजोमंडप उलथून टाकायची शिकस्त तो करतो.(पृ.२८२) अनंत

कोटिब्रम्हांडनायक परमात्मा नारायणाची कृपा इतकीच की सत्ययुगाची दीपमाळ कधीच विझत नाही. सतत चैतन्यशील, आश्वासक असते.(पृ.२८२) संग्राम संपला तरी चकमकी पुनः पुन्हा झडतात. सद्-असद्‌चा, तमस-तेजाचा संघर्ष प्रतिक्षणी चालू असतो.(पृ.२८२) शस्त्रांच्या युद्धात विजयी होणारा आंतरिक संघर्षातही उत्तीर्ण झाला असेल असं म्हणवत नाही.(पृ.२८२, २८३) उद्योग आणि तपस्या यांचं मिलन घडून येतं. तेंव्हा सुखवादी, अहंकारी सत्ताधाऱ्यांच्या पोटात गोळा उठतो.(पृ.२८३) दुष्टांचं परिपात्य देव करतो म्हणतात ते खरं नाही तर!(पृ.२८७) ज्याचा तो शिकतो ते केंव्हा ही अधिकशहाणा होतो हे(पृ.२९५) माणसं प्रेम करतात ती वेडयासारखी.(पृ.२९८) घरा बाहेरलं जग आक्रस्ताळेपणानं अंगावर येताना पाहिलं तेंव्हा त्याचं मन सैरावैरा झालं.(पृ.२९८) राष्ट्राला कोणी विझवू शकत नाही.(पृ.३११) ईश्वराच्या अनन्य भक्ताचे इतर कोणतेही गुण माझ्यात असतील-नसतील, पण मी ‘अनिकेत नक्कीच आहे.’(पृ.३२०) पण कुणाला कशा, तर कुणाला कशा वेळा गाठतातच की!(पृ.३२१) धनमंत्रानं सगळी दारं उघडतात हे लक्षात ठेवा.(पृ.३२८) पण अनुभवी, मुरब्बी पुरुष पराजय कुरवाळत बसत नाहीत. नवा मोर्चा बांधू बघतात.(पृ.३३६) माणूस खूप चाणाक्ष असतं, तरी निसटतं असं काही काही त्याच्या चिमटीतून.(पृ.३३९) आठदहा रुपये पगार घेणाऱ्याला रुपया-दोन रुपयांच्या मुखलेपही दाट होऊन बसतो.(पृ.३४४) जे स्वयंभू आणि स्वयंसिद्ध त्याची पूजा बांधायची हे आपलं ब्रीद(पृ.३४८) आपल्या करणीला कोणी राजकीय म्हणू नये, कोणता सामाजिक टिळा लावू नये, अशी एकाग्र झापड असल्यावाचून आपल्या जातीचा उद्धार होणार नाही की दुष्काळाचं निर्दालन व्हायचं नाही.(पृ.३४८) सज्जन माणसं आपल्या ठायी अशी कळंजून जातात तेंव्हा समाजाचा कपाळमोक्ष ओढावलेला असतो.(पृ.३५९) प्रामाणिकतेला डर असू नये हे खरं. पण न केलेला गुन्हा अवचित आपल्या माथी आला तर त्याखाली चिरडून जातांना कसं वाटेल?(पृ.३६५) माणसांचे खासगीतले संबंध वेगळे असतात.(पृ.३६६) फुकाफुकी कुणी कुणाला असं भावत नाही.(पृ.३६७) कुणाचं कोणी नसतं तरी जीव असा अधांतरी झुल्यावर हेलावतो तेव्हाचे क्षण आपले असत नाहीत तरी त्यांना नको म्हणताच, पुरेवाट होते.(पृ.३७८) कुतूहल माणसाला कसल्याही भरीला पाडतं.(पृ.३९१) पोटासाठी काहीही करावं लागतं माणसांना. कुणाचीही गुलामी उरावर मिरवावी लागते. पण बऱ्यावाईटाचा विवेक, अडाणी वाटतात त्यांचाही सुटलेला नसतो.(पृ.३९७) कुणाच्याच ओंजळीत रत्नमाणिक उरलं नाही. तरी ईश्वरसाक्ष दिवस काढायचे आहेत, हिंमत न सांडता(पृ.३९८) कोर्ट मूग गिळून बसतं. निश्चल ऐकत असतं एखांद्या

पाषाणमूर्तीसारखं. पण आम्हांला कळतं त्यांच्या डोळ्यांतून, एकुण मुद्रेवरुन त्यांच्या मनात काय चाललं असलं पाहिजे ते.(पृ.३९८) मनातल्या मनात एखाद्या व्यक्तीचा अनुनय करता येतो; पण तो व्यक्त करण्यासाठी किती धीर लागतो? तो करायची रीत थोडीच सहजपणानं आपलीशी होते.(पृ.४०७) न्यायाधीशांच्या आसनावर बसून कायद्याची दर्शनं होतात ती फार सुरेख सोज्वळ असतात. म्हणजे जिथल्या तिथं नेटकी. नियमांच्या अन् तर्कांच्या साखळया जोडणारी. ठोस न्याय दिला म्हणून हात झाडायला मदत करणारी...(पृ.४१२) लहान गावात मुलंमुली लवकर कळती होतात. लवकर म्हणजे वेळीच. निसर्गाची क्रीडा त्यांच्या दृष्टीस सहजी पडलेली असते. तोंडानं ती कमी चौकस असतील, पण त्यांचे डोळे आणि कान सतत जागे अन् तिखट असतात.(पृ.४२०) माणूस निसर्गाला धरुन वागू लागतं तेंव्हा ओठ मिटलेले आणि मन उमललेलं असतं.(पृ.४२०) कुवार तरुणी मनमोकळी वागते तेंव्हा न शिकवलेल्या नृत्यमुद्रा तिच्या अंगांगातून रुपवान होतात.(पृ.४२०) आपलं नशीब आपल्या वाटेवर खुणावत असतं. खेचून नेतं तिकडे.(पृ.४२१) पुरुषाची वासना आपल्या अंगावर झोंबायला येतेय हे जसं कळतं स्त्रीला तसं, त्याचा उत्कट प्रेमभाव आपल्यासाठी पायघड्या होऊ पाहतोय, हेही जाणवतं. पहिली जाणीव भय आणते, कधीकधी किळसही. पण दुसरी तिला पंख देते... यक्ष किन्नरांच्या भूमीवर नेते. तिचा वर्तमान क्षण संपन्न होतो.(पृ.४२३) सहसहा पुरुष भडक आणि उथळ वागतात, मैथूनभाव जागा झाला की, पण सगळेच कुठं तसे असतात?(पृ.४२३) गतकाळ तो गत काळ. तो आठवावा आणि मर्जीनुसार मनगटावर मिरवावा. नाहीतर खुशाल पाठीवर टाकावा. वर्तमानाचं तसं नव्हतं. तो तुम्हाला समोरुन भोगतो. तो सोसावा लागतो, नाहीतर, इच्छा असा-नसो, त्यावर सवारी भरावी लागते. तुम्ही मांड न घ्याल तर क्षणभरात उलथून जाल.(पृ.४२४) प्रेम ते प्रेम, चेतनेसारखं सर्वव्यापी. आयुष्य संपतं. म्हणजे त्याला मिळालेलं नामरुप लोपून जाते. चेतना तशीच चिरंतर उरते. नव्य देहमातीत रुजण्यासाठी.(पृ.४२४) तसं प्रेमाचंही असतं. ते सर्वत्र सर्वकाळ विहरतं. स्त्री पुरुषांनी त्याला सरुप करावं लागतं. त्यांच्यातील चेतनेचं ते ऐश्वर्य असतं. प्रेम मावळतं... नष्ट होत नाही. ते पुन्हा उगवतं. कोणत्याही दिशेला. कोणत्याही रुपानं आपल्या अंतर्यामीच्या आकाशानं त्याचं स्वागतचं करावं. त्याचा धर्म निष्ठेचा, जात सख्याची आणि प्राण करुणेचा.(पृ.४२४) स्वीकाराला असतं तसं अर्पणालाही प्रेम सदाच उत्सुकच असतं.(पृ.४२४) दु:ख दिलं आणि घेतल ही. सर्वस्व आणि वेचल ही. अशा धुमाळीत एवढंच होऊ शकतं. ते जन्मभर पुरतं.(पृ.४२४) साधूने आणि ब्राम्हणाने नृपांगणात पाऊल न टाकणे बरे.(पृ.४२७) विद्या

हे आमचं सर्वश्रेष्ठ धन.(पृ.४२७) छळाला प्राणपणाने विरोध करावा.(पृ.४२७) अर्धवट स्वत:शी बोलल्यासारखा. आशय मनात पक्का उतावा म्हणून काहींना तसं बळ आणावं लागतं.(पृ.४३०) या सृष्टीत सगळे सगळयाशी जुडलेले आहे. आपल्या लक्षात देखील यायचं नाही, कुणाच्या वर्माची कळ कुणी कशी दाबली आणि आपल्या कामाचा इस्कोट कसा झाला ते.(पृ.४३३) जिवंत माणूस चिंध्याच्या बाहुलीसारखं नाचू लागतं, तेंव्हा बघण्यासारखं कौतुक असतं.(पृ.४३९) माणसांची मनं सदाच संधिप्रकाशातल्या सृष्टीसारखी असतात. प्रकाशाला बोळवून खिन्न बसलेली आणि प्रकाशाची आतूरतेनं वाट पाहत असलेली. कुठल्याही दंड शाहीकडून, मग ती घरची असो की दारची, जितक्या प्रमाणात ती बुचाडली जातात, तितक्या प्रमाणात ती जागी आणि धारदार होतात.(पृ.४४०) सज्जनांच्या संकटकाळी कोणत्या न कोणत्या रुपानं देव त्यांच्या पाठीशी उभा असतो.(पृ.४४०) चांगली चांगली दिसणारी माणसं वाईट वाईट काम करतात.(पृ.४४४) साक्षीदार कितीही शहाणा असला, खरं तेच बोलणारा असला, तरी कोर्टाच्या पिंजऱ्यात उभा राहिल्यावर हमखास दिक् चुकतो. बोलू नये ते बोलतो. बोलायचं ते हरवून बसतो आणि केविलवाणा होतो. म्हणून त्याचा वकील त्याला संथा देतो. पढवतो. हे जगजाहिर आहे. यात अस्वाभाविक काही नाही.(पृ.४४५) नाटकाच्या खेळापुरता झाला तरी शेणकुटाचा मुखवटा नाकातोंडावर कोण चढवून घेईल?(पृ.४४७) एखादा मनुष्य कविता लिहितो. एवढ्याच पुराव्यावर कसलीही ओंगळ रचना त्याच्या अंगाला चिकटवावी, हे निव्वळ मत्सराचं किंवा निव्वळ द्वेषाचं लक्षण आहे.(पृ.४४९) एका दांडगट झाडाखाली दुसरी शेपटी आपल्या मनाजोगी थोडीच वाढू शकते.(पृ.४५०) हिजडे कितीही जोसानं नाचले तरी जमीन दुभंगत नसते.(पृ.४५२) बाटलीतलं पिशाच्च एकदा का बाहेर आलं की आपला ताबा गेला.(पृ.४५२) एखाद्याचा एखादाही पैलू कळायला तसा कसोटीचा प्रसंगच यावा लागतो.(पृ.४५३) कोण्या एका जातीचे म्हणून आपल्या हिश्श्याला आपोआपच बदनाम होतात बेटे(पृ.४५३) ''गच्छ सूकर भद्रं ते''(पृ.४५५) एकटेपण माणसाला कधी कधी गांगरुन सोडतं.(पृ.४५६) आपल्याला कुणीतरी हाकारत आहे आणि आपण तिथवर पोहोचायची वाट न दिसावी इतका काळोख सभोवार दाटावा, असं झालं म्हणजे माणूस मुळापासून गलबलून जातं.(पृ.४५६) आयुष्यात पावलोपावली प्रश्न उभे राहतात. सुख चिमुन टाकणारे, दुःखावर डागणी देणारे, यात काय? त्यात काय? अशी टाळाटाळ आपण पुष्कळदा करु शकतो. सहज धडकावून बोलतो. पण, कुठंतरी अदृष्टात आपल्याविरुद्ध कट शिजत असतो तेंव्हा कळत सुद्धा नाही. एखाद्या फुजूल वाटणाऱ्या प्रश्नाचा क्षणार्धात नागफणा कसा होतो ते. पायांखालची जमिन सटकते आणि

ब्रम्हांड आठवतं.(पृ.४५६) ''आढयो ऽ भिजनवानसास्मि कोडन्योऽ स्ति सदृशो मया''(पृ.४७८) जन्मजात अहंकार माझ्यापाशी नसला तरी मी कर्तव्यनिष्ठ, मी नीतीमान, मी लोकांचे कल्याण करणारा हा अहंभाव माझ्यात वाढला असला पाहिजे.(पृ.४७८), ''काय म्यां पामरें बोलावी उतरें। परि त्या विश्वंभरें बोलवीले''(पृ.४७८), ''अहंकारविमुढत्मा कर्ताऽ हमिति मन्यते''(पृ.४७८) नेमून दिलेलं कर्तव्य आपण करतो; त्याच्या बदल्यात चरितार्थ चांगला चालतो. मग लोभ कशाचा धरावा(पृ.४७९) गरीब रयत आपल्याला मान देते, वर दुवाही देते.(पृ.४७९) सत्त्व सांभाळावं आणि प्रजेच्या कल्याणासाठी झटावं(पृ.४८०) इमान आणि प्रेम ते मागून मिळत नाही आणि विकत घेता येत नाही. ते तर अंतरात्म्याचे गुण.(पृ.४८१) या जग रहाटित सरलतेबरोबर वक्रता, भद्राबरोबर अभद्र, शुभाचाराबरोबर व्यभिचार आणि पुण्याबरोबर पापही सारखाचं प्रभुत्वानं नांदत आहेत.(पृ.४८२), शुभ आणि मंगल, सत्य आणि न्याय हीच या जगाचं नियंत्रण करतात आणि विजयी होतात.(पृ.४८२), सद् आणि असद् ही दोन्ही मिळून 'मी' आहे.(पृ.४८२), विद्या संपादन करणं, व्यवसायात नावलौकिक मिळवणं हे केवळ स्वत:च्या अधीन.(पृ.४८४), नाकीडोळी एवढा सुरुप असलेला मनुष्य आतून एवढा खतरनाक असू शकतो?(पृ.४८५), कुणाला कुणापासून सुख मिळतं की दु:ख, कुठं सांगता येतं?(पृ.४८६), काही गोष्टी अशा असतात, ज्यांसाठी कोणाचा मुलाहिजा ठेवता कामा नये.(पृ.४८७), सांगाती नसेल तर आयुष्याला अर्थ नाही.(पृ.४८७) एकलेपण खायला उठतं. कितीही धैर्यवान असू आपण(पृ.४८७) कुणाच्या ही धर्मभावनेला चेववलं अन् सुखवलं, की तो निम्मा अधिक आपलासा होतो.(पृ.४८९), कपट, मिथ्याचार आणि क्रूरपणा यांनी भरलेल्या राज्यात माणसे जागच्या जागी ठेचली जातात.(पृ.४९१), ईश्वरभक्ती आणि राष्ट्रप्रेम यांचे मीलन मनाला एक प्रसन्न आश्वासन देतं.(पृ.४९२), अनपेक्षित येतं ते संभ्रमात तर टाकतंच; बरोबर अशुभाचा संकेतही आणतं.(पृ.४९५), माणसाची विचारशक्ती, स्वत:ची नियंत्रण शक्ती इतकी कशी लुळीपांगळी होते, बेफाट वागण्याखाली आपलं दुबळेपण लपवणारा पुरुष आपला सहायक कसा होवू शकतो.(पृ.४९७), गतकाळाच्या गुंत्यात माणूस असं फिरुन फिरुन शिरु पाहतं.(पृ.४९७), काहीच न विचारता बसावं तर अंत:करणात न मावेल इतकी भरती मत्सराला येते. आपला भूतकाळ जितका उजाड तितकाच भविष्यकाळही असण्याची दाट शक्यता. कुणाला जीव लावावा हे आपल्या रक्तात नसेल, तर कुणी आपल्यावर जीव लावावा असं आपल्या प्राक्तनात. असणारही नाही.(पृ.४५७), आपल्यावर अनुरुक्त असलेल्या पुरुषांतून कुण्या एकाची निवड करतांना स्त्रीला ही नैसर्गिक लालसाच दिशा दाखवते.(पृ.४५७), बिनसलं तरी रिवाज

सोडता येत नाहीत सभ्य माणसाला.(पृ.४५७), जी माणसं सैतानाच्या सेवेत असतात, त्यांनाच स्वर्गाची स्वप्नं पडत असावीत.(पृ.४५९), अन्य भक्कम पुराव्याशिवाय एक्सपर्टच्या शब्दगारुडाला कवडीचीही किंमत देता येत नाही.(पृ.४६५), एखाद्या विषयाची आसक्ती मनात खोल मुरु द्यावी अन् तिला मोकळवाट न मिळावी, असं झालं तर सौजन्य आणि समजूतदारपणा यांना ती सहज डावलून जाते.(पृ.४६६), पत्रं कशी आपल्या जिवाशी बोलतात! पत्रातून माणसाचं चरित्र उजळून येतं की नाही?(पृ.४६६), एखादा शब्द ही पुरतो माणसाला हुरळून जायला.(पृ.४६९), आणीबाणीत घरभेदही नैतिकच(पृ.४७०) अधर्मी आणि दुष्कर्मी माणसांचं, ती कोठल्याही अधिकार पदावर असोत, कोणत्याही वयाची असोत, त्यांचं पारिपत्य हे झालेच पाहिजे. दुष्टांचं निर्दालन करताना नातीगोती रद्द होतात.(पृ.४७०), लढाईच्या कहाण्या रम्य असतात. लढणाऱ्यांना यमघंटा ऐकू येत असते.(पृ.४७१), देशाच्या उन्नतीसाठी कोणी कोणी पुष्कळ काही करीत असतात. आपापल्या जागी(पृ.४७२), माझं आयुष्य देवाच्या हाती; अन् माझ्या मंगळाचा धनी मी.(पृ.४७५), सन्मार्गाने जाणाऱ्यांचा ही इहलोकी किती परींनी छळ होतो त्याचे दाखले पुराणान्तरी आहेत.(पृ.४७६), दु:ख संकट बाहेरुन येतात तशी आपल्या वृत्तिदोषांतूनही उद्‌भवतात.(पृ.४७७), तुझं सुखसमाधान केवळ तुझ्या कल्पनेच्या कुंपणात नसते. अन्तर्बाहय जो संघर्ष चालू आहे, चांगला-वाईटचा, पाप-पुण्याचा, त्याच्या स्वीकारात असतं. त्या संघर्षाचा निकाल कसाही लागो, त्यातला आपला वाटा स्वीकारण्यातही ते असतं. त्याविषयी चडफडून चालत नाही.(पृ.४७७), विवेक आणि सद्‌भाव टाकायचा नसेल तर नीचांच्या चालींना तशाच प्रतिक्रियांनी उत्तर द्यायचं मनातही आणायचं नाही.(पृ.४७७), आपली चाल आपण सोडायची नाही; स्वत:ला उधळायचं नाही.(पृ.४७७), ईश्वरावर, सत्तावर श्रद्धा हा भुसभुशीत मामला नाही.(पृ.४७७), स्पर्शाचे संकेत द्यायला न धजणारा पुरुष आपल्या कामनेची डोळयांतली पडछाया पुसून टाकू शकत नाही. साध्या हालचालीत, देवघेवीत अनुनयाच्या छटा तरळून जातात.(पृ.४९७), पण कुणाचंही नैतिक आधाराचं ऋण फेडणं तसं सोपं असतं? (पृ.४९७), आसक्ती एकदाच आणि एके ठायीच सर्वस्व देते-घेते म्हणतात.(पृ.४९७), आपली विद्या, आपले गुरु, आपले हितचिंतक... कोणीच या गूढ वाटेवरल्या प्रवासात सोबतीला येत नाही. आपण आणि अंत:करणाचा प्रत्यय एवढंच आपले पाथेय. हो-नकोचा निर्णय तुझा. फार तर, आमचं बळ शुभचिंतनाचं, हे सांगत सगळे दुरुन बघत राहतात. माझं मलाचं चाललं पाहिजे. मुक्काम भेटेल तर वाहवा! त्याआधीच प्राण्यांना शोष पडेल तरी वाहवा!(पृ.४९७), न्याय न्याय म्हणतात तो नेहमीच कायद्याचा अन् नीतीला वाट पुसत जात

नाही. न्याय देणाऱ्या मंगलमूर्तीचे पाय शाडूचे असतात तेंव्हा तर फुलांच्या राशीवर निखारे आंतले जातात.(पृ.४९९), हलक्या कानांनी वागणाऱ्या माणसापाशी निःस्पृह सल्लागार वावरु शकत नाही.(पृ.५००), बदनामी कोणी केली, धमक्या कोणी दिल्या याचे उत्तर साक्षीपुराव्यांतून सुलभपणाने मिळते असे नाही.(पृ.५००), महत्वकांक्षी माणसू कोणत्या थराला जाईल, सांगवत नाही. आपल्या आंकाक्षापूर्तीसाठी तो करणार नाही किंवा करवून घेणार नाही, असे कोणतेही नैतिक अपकृत्य असू शकत नाही.(पृ.५०१), स्वामीनिष्ठेत लांगूलपणाला आणि होयबापणाला जागा नाही.(पृ.५०१), प्रियकराची अशी निकटता स्त्रीमध्ये एक उत्कट संमिश्र भाव निर्माण करते. संकोच नकोनकोचा,आतुरता हवंहवंची, कृपणता आणि करुणा भरुन वाहू लागते. रक्तातून नखशिखान्त.(पृ.५०३) अशा प्रकारच्या विविध व विपुल विचार, सुविचार, सुभाषिते, यांमधून कादंबरीला अर्थपूर्णतेची एक वैश्विक उंची प्राप्त झालेली मला वाटते.

**१.२.११.१२. बारोमास :**

जगाच्या कल्याणा संतांची इभूती(पृ.३०), जुनं ते सोनं(पृ.६६), थांबला तो संपला(पृ.८९), अन्न हे पुर्णब्रम्ह(पृ.९९), मनाला आराम मिळतो वाचनाने(पृ.१०९), पुस्तक म्हणजे आपले भांडवल(पृ.११५), जान बचाई लाखो पाई(पृ.३१८), आत्महत्या करून समस्या संपत नाहीत उलट वाढतात.(पृ.३२७)

**१.२.११.१३. भूमी :**

लहान मुलांची प्रार्थना येशू ऐकतो.(पृ.१७), जे पूर्ण आहे, असेल त्यालाच अर्थ असतो(पृ.३२), भरोसा फक्त स्वत:चा करावा, तोही स्वत:चा स्वत:ला करता यावा, या करता काही करावं लागतं(पृ.३९), सुर्यसुद्धा जेवढा ताप देत नाही, तेवढी त्यानं तापलेली वाळू ताप देते(पृ.४४), आपलं वेगळपणं आपल्याजवळ ग, पण ते आपण जपायचं, आपल्या स्वत:करता(पृ.४६), एका बाईनं तरी दुसऱ्या बाईबद्दल शंका घेऊ नये. सगळयांना एकच चढण चढायची आहे.(पृ.१९५), आपल्याला जे बघता आलं ते आग्रहाने मांडता आले पाहिजे.(पृ.२३०)

**१.२.११.१४. उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : कष्टाळू गृहिणी ही कुटुंबव्यवस्थेत आवश्यक गोष्ट असते.(पृ.४) रक्ताच्या नात्यापेक्षा व्यावसायिक नातीच महत्त्वाची असतात.(पृ.७) खऱ्या गोष्टी नंतर शांतता

येते.(पृ.२२) जगात हजार तऱ्हा असतात, इतिहासातनं येणारा उत्साह फार खरा नसतो.(पृ.३८) बायकांचे काही खरं नसतं. मुलींना अजूनही वावरायला समाजात जागाच कुठाय?(पृ.९४) दोन व्यक्ती एकत्र येतात, काही काळ जवळीक असते, पुढे दुरावतात.(पृ.९६), घर मुलांचेही असते. मुलांनीही संसारात कामे करायला हवीत तरच घराचे घरपण टिकते.(पृ.१०५), आयुष्यात नाना अडचणी येतात. जीवनात हजार तऱ्हा असतात. सगळं स्वीकारून जीवन उभं करायचं.(पृ.१०८), ज्ञान नम्रतेने शोभते., जीवन कसं असतं बघ, एक गोष्ट चांगली घडते तर दुसरी गोष्ट वाईट घडते. जीवनाबद्दल सर्वसाधारण नियम मांडतो, माणसाला चैन पडत नाही. कुटुंब फुटले म्हणजे शत्रू नाही व्हायचे एकमेकांचे(पृ.१२०), एखादा रिसर्च पेपर वाचतानाच त्यातच पुढच्या रिसर्चचे मुद्दे असतात. ते त्याच वेळेला जाणवतात असे नाही. कुठंपण लक्षात येतात.(पृ.१२७), माणसाला आख्या आयुष्याची मांडणी विचरात करून ठेवावी लागते!(पृ.१३२), साठीनंतर माणसाचे मरण माणसाने मान्य केलेच(पृ.१४३), दुःखाच्या आठवणी आल्या की माणूस रडतो, दुःखाचा नुसता आशय जाणवला तर माणूस आध्यात्मिक होतो, शब्दांसह दुःख जाणवले तर माणूस साहित्यिक होतो.(पृ.१४४), न सूचणे हे क्रूर आहे.(पृ.१४८)

कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरूः डोक्यात खूप काळ प्रश्न राहिला की, प्रज्ञा त्या प्रश्नाचे उत्तर शोधू लागते. प्रज्ञा उत्तर शोधण्यास जबरदस्त सायास करते. उत्तर शोधण्याच्या धडपडीतल्या वेदना सहन करु शकतो तो प्रतिभावंत.(पृ.६६) कुणालाच दुखवायचे नाही. हृदय कसे लोण्याप्रमाणे मृदू असावे.(पृ.६९) मुख्य गोष्टीचा अभ्यास होताना दुसऱ्या गोष्टीपण सूचतात.(पृ.७४) मुलगा हवा, मुलगीही हवी तेव्हाच कुटुंब पूर्ण होतं.(पृ.७७) ज्ञान नम्रतेने शोभते.(पृ.११९) घर मुलांचेही असते. मुलांनीही संसारात कामे करायला हवीत तरच घराचे घरपण टिकते.(पृ.१०५)

कुटुंबव्यवस्था आणि पाऊस : म्हातारपणी आठवणी नको असतात, म्हणून निसर्गानेही म्हातारपणी स्मृती कमी केलीय.(पृ.१५४), आठवणीसाठी अचूक भाषा फार गरजेची आहे.(पृ.१५५), म्हातारपणी तेच तेच मनात येत राहते. जीवनाचा अर्थ पेचातच असतो. पेचात नुसता संभ्रम नसतो, वेदना असते.(पृ.१५७), काळजे करतो त्याला नशीब म्हणतात.(पृ.१५९), आयुष्य म्हणजे घडणे न् पुन्हा ते वर्णन करणे. प्रेमाच्या माणसाजवळ वर्णन करणे.(पृ.१६४), मोठे झाल्यावर ओढीवर संयम ठेवायचा असतो. सगळ्यांवर माणसांना नाही प्रेम करता येत. म्हणून कुटुंबव्यवस्था, तेवढेच प्रेम माणसाला करता येते. कुटुंबव्यवस्था नसती तर मृत्यूचे दुःख इतके कळले नसते. कुटुंबव्यवस्थेमुळेच तीव्र भावना होतात माणसांना अमर काय आहे, तर कुटुंब.(पृ.१६८), आख्खा

समाज एकाच विचारसरणीचा कधीच होऊ शकत नाही. व्यक्तीला जीवनाचे दर्शन होते, जीवनाचे दर्शन घेण्याचा हक्क व्यक्तीने बिल्कुल गमावता कामा नये.(पृ.१७०), जीवनाचे दर्शन होते, त्यावरून वाटेल तो, तसा विचार करायची ताकदही व्यक्तीने स्वतःच मिळवायची.(पृ.१७१), जीवनातला खरा आळस न् खरा कंटाळा ओळखणे अवघड आहे. अब्जावधी जणात कुणालातरी एखाद्याला कशातले काहीसे कळते.(पृ.१७२), सगळे कळण्याची जगण्यासाठी अट नाहीय.(पृ.१७३), वागणे, कृती करणे, ॲक्टला मर्यादा असतेच. विचार अफाट असू शकतो. मनात टोकाचा, उल्टापाल्टा, सगळा विचार करून पाहीलाच पाहिजे. जीवनाचा अर्थ शोधणे इथून चारित्र्य सुरू होते.(पृ.१७७), आंघोळ करतानाच आपण आपल्या देहाशी जवळ असतो.(पृ.१८३), कुटुंबव्यवस्था कितीही वाढवली, तरी विश्वाएवढी नाही होणार. फ्रेश असताना एकांत मिळणे, ही एक विलक्षण गोष्ट आहे.(पृ.१८४), प्रत्येक जण जीवनावर विचार करत असणार. जीवनावर विचार करण्याइतके सुंदर दुसरे काही नाही. एकटे होऊन जीवनाचा विचार करण्याचे आकर्षण जबरदस्त असते.(पृ.१८५), राजकारणी, नेते, बुध्दिवंत ह्यांना मात्र वेळच्या वेळीच उमजले पाहिजे.(पृ.१८७), वेळच्या वेळीच उमजते, कळते, त्यांनीच नेतृत्व करावे, ज्यांना वेळच्या वेळी कळत नाही. त्यांनी नेतृत्व करण्यासाठी धडपडू नये; सर्वसामान्य म्हणून जगावे. गोष्टीत गंमत असते.(पृ.१८७) जीवनात ज्ञान असते, विचित्र ज्ञानही असते. दोन्ही एकत्रितपणे गोष्टीतच येऊ शकते.(पृ.१८८)

### १.२.११.१५. फेसाटी :

सत्याला देव कुठले नं धर्म कुठला? नुसता वनवास (पृ.७८), सोन्याची साखळी तुटेल पण आईची माया तुटणार नाही (पृ.८०), चारित्र्याचे जडणघडण म्हणजे शिक्षण होय.(पृ.११७)

### १.२.१२. शिव्या :

भारत हा देश खेड्यांचा आहे. ग्रामीण भागातील ह्या खेड्यांमधील बोलीभाषेमध्ये संवाद करताना अक्षर राग व्यक्त करताना शिव्या ह्या येतच असतात. शिव्यांमुळे त्या भाषेला एक सजीवपणा अगर नैसर्गिकपणा आलेला दिसतो. वाईट कृती करणाऱ्याला समोरची व्यक्ती शिव्या देत असते. ह्या शिव्या शारीरिक व्यंगापासून ते अनैतिक मानवी मूल्यांचा उपहासात्मक पद्धतीने व्यक्त करताना दिल्या जातात. शिव्यांमुळे भाषेमध्ये एक प्रकारची धमक-ताकद असलेली आपणास जाणवते.

**१.२.१२.१. ययाति :**

वैरीण, वेड्या(पृ.९५), लंगडं ते लंगड, आंधळी (पृ.१३१), भिकारडे(पृ.१३२), नीच, दुष्ट, उन्मत्त(पृ.१३२).

**१.२.१२.२. रथचक्र :**

दळभद्री रांडेचा (पृ.३२), रोंग्या (पृ.११), रांडेच्या (पृ.११), हलकट (पृ.१५५)

**१.२.१२.३. स्वामी :**

स्वामी या कादंबरीचे वैशिष्ट्य असे सांगता येईल की या कादंबरीत शिव्या, अपशब्द अपवादात्मकरीतीने आलेले दिसतात. राघोबादादा व माधवराव यांच्यात वादविवाद झाले. माधवरावांनी रास्तेमामांना शिक्षा फर्मावली माधवराव विष्णू पाणक्यावर संतापले पण त्यांनी या सर्व प्रसंगामध्ये अपशब्द वापरले नाहीत. राघोबादादांनी आपण केलेल्या चुकांची कबुली देताना ते म्हणतात, 'हे पदरचे हलकट कान भरवतात'.(पृ.३) येथे रघुनाथरावांनी अपशब्द वापरला आहे.

**१.२.१२.४. स्मरणगाथा :**

भांचोदा(पृ.३९), बदमाष लेकाचा!(पृ.४९), सभी साले भडूए है(पृ.१०९), च्यायला! भडव्याला(पृ.१६७), कुनाची तिरडी चालली ग या वखुताला(पृ.२१७), हरामजादे, कमीने(पृ.२२४), भाडमे(पृ.४७१).

**१.२.१२.५. सत्तांतर :**

लालबुडयाच्या खेळगडयाला जेंव्हा बाजपक्षी दोन्ही पंखांच्या नखात घट्ट दाबून घेऊन जातो, तेंव्हा ''टोळीचा हुप्या आणि पाठोपाठ पोराची आई दोन्ही हात पसरुन अर्धवट चालल्यासारखं पळत, बाज पक्षाच्या पाठोपाठ धावले, तेव्हा करकरा दात खाण्याच्या, शिव्यांचा खर्कर्ऽऽ खक्या कोलाहलच उडाला''(पृ.३६) अशाप्रकारे वानर हे आपला मनस्ताप, चिड व्यक्त करण्यासाठी तसेच आपआपसात भांडणतंटा करताना विशिष्ट आवाज काढून शिव्यांच्या माध्यमातून राग व्यक्त करताना दिसतात.

**१.२.१२.६. झोंबी :**

तुझ्या आयला तुझ्या(पृ.८), खज्जाळीच्या(पृ.११), तुझ्या आयचं कार्ट तुझ्या(पृ.४५), त्येच्या आयला(पृ.५७), इच्या आयला, भडवीच्या(पृ.६५), रांडच्या, गतकाळे(पृ.९६), आयला तुझ्या, बाराबेन्याचं कुंठलं (पृ.१३८), सिंच (पृ.१५९), आयला लवला व्हलर व्हल्यो (पृ.१९७),

व्हैमाले(पृ.२२५), सुक्काळीच्या(पृ.२३२), रंडे(पृ.२४४), भडव्या(पृ.३६८). झोंबी या कादंबरीमध्ये लेखक आनंद यादव यांचे वडील आनंदला व ताराला वेगवेगळया प्रसंगी शिव्या देताना आढळतात.

**१.२.१२.७. झाडाझडती :**

सरकारचं मढं बशीवलं, तुमच्या आयला (पृ.८), मुडद्यानी(पृ.९), त्येच्या बंबुऱ्या मारी(पृ.९), बंबऱ्यामारी (पृ.९), तुझं वाटूळं वाटूळं हुईल (पृ.१०), तुज वाटूंळ हुईल तुझं सरकार मरलं (पृ.१०), शेण्याच्या कांद्या (पृ.११), मुडदा बशीवला (पृ.२२), तुझा मुडदा बसन (पृ.४५), वांझुटी रांड मेली (पृ.१०५), मनमाडी, उष्ट्या, पत्रावळया चाटणारी अवलाद ऽऽ (पृ.१८३), भडव्यांनो (पृ.१९२), मुडद्या(पृ.६५), वांझूटी रांड मेली (पृ.१०५), उपरं ते उपरं भूकतंया झिपरं (पृ.१६६), जगे लेकाचेऽऽ! (पृ.१६७), मनमाडी उष्ट्या पत्रावळ्या चाटणारी अवलादऽऽ (पृ.१८३), भडव्यांना (पृ.१९३), मुडद्या, रांड (पृ.२१०), त्येची डोली गेली त्येची(पृ.२२५), डॅम इट(पृ.२५८), हरामखोर(पृ.३९७).

**१.२.१२.८. राघववेळ :**

मुकी न व ऽऽ रांड(पृ.४), आपलीच मुसलमान्नी लावा तुम्ही(पृ.६), गांड जागी मान तोंड राबी(पृ.६), ह्येत तिच्या मायची त(पृ.९), हालकट(पृ.२८)

**१.२.१२.९. ताम्रपट :**

हुल्लडबाज साले(पृ.६५), भडव्या(पृ.८८), त्येच्याये फोदरी(पृ.९६).

**१.२.१२.१०. तणकट :**

भोसडीच्या(पृ.१४), भाड्या(पृ.), त्येच्या मायला(पृ.४०), रांडची(पृ.४०), त्येच्या आयलाऽऽ(पृ.६३), तुमच्या मायलाऽऽ रांडच्यानुऽऽ(पृ.७५), मादरचोत, भडवे(पृ.१५२), बायकोच्या भाड्या, आरकाट बोड्याच्या(पृ.१३), भडवं(पृ.८७), डांबरट मैला(पृ.१०६), साल्या(पृ.१५७), हरामखोर, मादरचोद, हालकट(पृ. २८७).

**१.२.१२.११. डांगोरा एका नगरीचा :**

वेडझवे, अडाणचोट, गांडीवर(पृ.१७३), माय व्यालीय (पृ.३११), छीथू (पृ.३४३), बोडक्यावर, भांचोद (पृ.४५२), अवदसा (पृ.२१७), तुझी बाईल (पृ.२१६), च्या मायला (पृ.२१८), थू: तुमची (पृ.२१९), शिंदळकी (पृ.२२०), बोंबला, थू: तिच्या (पृ.२२१), रांडेला

(पृ.२२३), रांडेच्यांनी (पृ.२९२), बेन अक्करमाशी (पृ.३२७), अडाणचोट (पृ.३४२), छीथू (पृ.३४३), बोडकेच्यांनी (पृ.३४७), भडव्या (पृ.३५०, ३५४), मादरचोदांना (पृ.३५४), थूः तुझ्या (पृ.३५५), हेपलायला (पृ.३५८), फुकन्या (पृ.३५९), त्याची काय माय व्याली (पृ.३६३), बदमाष... शिंदळीचा (पृ.३६९), अबे लोंडे, अवदसेचा फेरा (पृ.३८०), च्या मायला (पृ.३८१), लाजलज्जा, सटविला, चेटकिण (पृ.३८१), भडव्या(पृ.३८२), थूः तुझ्या मायला (पृ.३८५), भडव्या(पृ.४३५), हलकटांनी(पृ.३९४), मादरचोद, अंडाला चाप लावीन, भोसडीच्या(पृ.४३७), चहाडीचुगली (पृ.४४०), भांचोद, बोडक्यावर (पृ.४५२), कैदाशिणी (पृ.३८८), भाडखाऊ चुगल्या करणारे (पृ.४७१)

**१.२.१२.१२. बारोमास :**

बायकोच्या भाड्या, आरकाट बोडाच्या (पृ.१३), भडवं (पृ.८७), डांबरट मेला (पृ.१०६), साल्या(पृ.१५७), हरामखोर, मादरचोद, हालकट(पृ.२८७) हट् सालं (पृ.३५), आरे च्यूतम सल्फेट (पृ.४०), नेंभळया वाणाचं (पृ.४७), कंदाड (पृ.७६), साल्या (पृ.७८), च्युतके, छिनालके (पृ.१२२), बाईलबुग्या (पृ.१४०), राक्षस, भवानी (पृ.१५४), बुहार बटक्याही (पृ.१५६)

**१.२.१२.१३. उत्सुकतेने मी झोपलो :**

आईच्या त्याला घोडाच लावला पाहिजे.(पृ.५८)

**१.२.१२.१४. खारीच्या वाटा :**

गाढवा, गधडया(पृ.क्र.७)

**१.२.१२.१५. फेसाटी :**

रांड(पृ.१८), सुक्काळीच्या(पृ.२७), वाढूख झालं, तेच मंड बसवल भिताडासंग कडू भाड्या(पृ.२८), तुझ्या आयला(पृ.५९), नालायक कुठला, मुर्ख, बेशरम, लाज नाय वाटत(पृ.८६) शाळच्या आयला पांडुरंग लावला(पृ.८७), खवीस लवड्याची (पृ.८८), रांडिच्याना(पृ.९१), हेंच्या आयला लावला घोडा(पृ.९२), तुटक्या(पृ.१०२), हेंच्या आयला लावला घोडा वसावा(पृ.१२८), तुमच्या आयचा दानां फाडला वसावा(पृ.१४२) प्रस्तुत कादंबरीत लेखकाने जत परिसरातील अस्सल ग्रामीण शैलीतील शिव्यांचा वापर आशयाच्या अनुषंगाने पात्रांच्या मुखातून केलेला दिसून येतो. त्यातून प्रभावीपणे परिणाम साधला गेलेला आहे.

### १.३. वातावरणनिर्मिती :

वातावरणनिर्मिती हा कादंबरीचा पूरक घटक आहे. कथानक व व्यक्तिदर्शन यांच्यामानाने त्यांचे स्थान गौण असले तरी कादंबरीतील त्याचे महत्त्व कोणत्याही प्रकारे कमी नाही. स्थल काल वैशिष्ट्यांचे कादंबरीत पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. वातावरणाचा आपण विचार करु लागलो की आपली दृष्टी प्रथमतः स्थलविषयक किंवा भौगोलिक वातावरणाकडे वळते. भौगोलिक वातावरण निर्माण करणे हे वातावरण निर्मितीच्या तीन अंगापैकी पहिले अंग असून तिला जर कादंबरीच्या अंतरिक्षाची पहिली पातळी मानली तर कादंबरीची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी ही दुसरी पातळी मानावी लागेल. तात्विक पातळी ही तिसरी पातळी होय. आधीच्या दोन पातळ्यांपेक्षा सुक्ष्मतर अशी असते. डॉ.शिरीष लांडगे कादंबरीतील वातावरणनिर्मितीचे महत्त्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात. ''कादंबरीतील पात्रे ही स्थलकालाच्या चौकटीत बद्ध असतात. ह्या स्थलकालाच्या चित्रणातून कादंबरीत वातावरणनिर्मिती होत असते. यातून कादंबरीतील भौगोलीक, ऐतिहासिक, सामाजिक, तात्विक वातावरण तयार होत असते.''[९८] त्याशिवाय कादंबरी अपेक्षित परिणाम साधत नाही. इतके महत्त्व कादंबरीतील वातावरणाला असते. ह्या तीन पातळ्या किंवा आवरणे मिळूनच कादंबरीचे एकंदर वातावरण बनते. कादंबरीची कला यशस्वी होण्यास विभागात्मक वातावरणाचे कवच आपल्या कथावस्तूभोवती लेखकाने निर्माण केले पाहिजे अशी जी अपेक्षा प्रा.बापट व प्रा. गोडबोले यांनी व्यक्त केली आहे ती रास्तच ठरते.

लेखक कादंबरीत आशयाच्या विशिष्ट परिणामासाठी योग्य ती वातावरण निर्मिती करतो. वातावरणातून आशय अधिक स्पष्ट होत जातो. कथानक साहित्याची निर्मिती विशिष्ट स्थल, काल, परिस्थिती इत्यादींच्या पार्श्वभूमीवर होते. यातून कादंबरीचे वातावरण तयार होते. या दृष्टीने वातावरणात कथनात्मक साहित्य निर्मितीतील एक क्रियाशील घटक ठरतो. मानवी जीवनावर स्थल, काल वैशिष्टयाचा मोठा प्रभाव पडत असतो. कादंबरीतील वातावरण निर्मितीच्या संदर्भात उषा हस्तक म्हणतात, ''कादंबरीतील व्यक्ती कोणत्याही पोकळीत जगत नाही, त्यांची मुळे (कादंबरीच्या जगात नव्हे तर) कादंबरीमध्ये, कादंबरीकाराच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेल्या वातावरणात रुजलेली असतात. कादंबरीचा फलक विस्तृत असल्यामुळे व्यक्तिंच्या सभोवतालचे वातावरण प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक तो सगळा बारीक-सारीक तपशील कादंबरीकार पुरवू शकतो. कादंबरीतील व्यक्तींच्या आंतर्बाह्य वर्तनाला चालना देण्याचे फार मोठे सामर्थ्य 'वातावरणा'मध्ये असते. कादंबरीकार त्यांच्या या सामर्थ्याचा ज्यावेळी उपयोग करुन घेतो,

त्यावेळी कादंबरीतील वातावरणाचे स्वरुप हे केवळ वर्णनात्मक पातळीवर राहत नाही, तर कादंबरीच्या रचनेचाच एक अविभाज्य दुवा बनते.''[११] वरील विवेचनावर हे अधोरेखित होते की, वातावरण निर्मिती हा कादंबरीचा एक लक्षणीय विशेष मानण्यात येतो. म्हणजेच कादंबरीच्या रचनेत 'व्यक्ती' या घटकाप्रमाणेच 'वातावरण' हा घटकही महत्वाचा आहे. एकंदरीत कादंबरीची कथाबीज ज्या परिसरात घडते, ज्या जीवनव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर घडते, ज्या सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भातून व्यक्त होते, त्याचा प्रत्यय येण्यासाठी आवश्यक असणारी परिस्थिती निर्माण करणे म्हणजे वातावरण निर्मिती होय. वातावरणामुळे व्यक्ती, प्रसंग, परिसर, नाटय, काळ अधिक प्रभावित होतात. थोडक्यात कादंबरीत वातावरण निर्मितीला अनन्यसाधारण महत्व असते.

**१.३.१. ययाति :**

ययाति आपल्या जीवनाची कथा सांगण्यास का प्रवृत्त होतो. त्याच्या प्रास्ताविकातून त्याने ते स्पष्ट केले आहे. वेलीवर पुष्कळ फुले फुलतात, त्यातील काही देवदेवतांच्या मूर्तीवर विराजमान होतात. त्यांना भक्तीने नमस्कार मिळतात. काही फुले राणीच्या केशकलापांचे सौंदर्य वृद्धींगत करतात. महालातल्या मंचकावरचे विविध विलास ती आपल्या चिमुकल्या डोळ्यांनी पाहतात. काही फुले वेड्या माणसाच्या हाती पडतात. तो क्षणार्धात त्यांचा चोळामोळा करुन टाकतो. या जगात येणारी माणसेही अशीच असतात. कुणी दीर्घायुषी होतात, कुणी अकाली मरण पावतात, कुणी वैभवाच्या शिखरावर चढतात, कुणी दारिद्र्याच्या दरीत कोसळून पडतात, कुणी दृष्ट, कुणी सृष्ट, कुणी कुरुप, कुणी सुरुप! पण अंती सारी फुले मातीत मिसळून जातात. त्यांच्यामध्ये एवढे साम्य असते ही सारी फुले कधी आपल्या कहाण्या सांगतात का? मग माणसाने आपल्या जीवनाला इतके महत्व का द्यावे, असे ययाती निवेदन करतो. ययातीला वाटते माझ्या या जीवनप्रवासात काहीतरी वेगळे आहे. हा माझा कदाचित भ्रम असेल पण तरीही बालपण, कुमार अवस्था, यौवन आणि प्रौढ ययाती यांच्यात जे बदल होत गेले ते सांगण्याचा मोह त्याला अनावर होतो.(पृ.४,५)

वरील फुलांच्या, विविध स्थानाच्या अस्तित्वातून त्याच्या जीवनाला महत्व प्राप्त होते. त्याची प्रतिकात्मकता वापरुन ययातीने स्वतःचा जीवनप्रवास सांगण्यास का प्रवृत्त झालो हे त्याने केलेल्या वरील वातावरण निर्मितीतून समजते.

**१.३.२ रथचक्र :**

'रथचक्र' या कादंबरीतील वातावरण निर्मिती आशयाला अनुरुप आहे. रथचक्र याची नायिका दुर्दैवी, दुःखी व वेळोवेळी अपयशी होताना दिसते. आत्महत्येपुर्वीची वातावरण निर्मिती

यातून तिची जगण्याची इच्छा नष्ट झाली हे स्पष्ट होते. तसेच कादंबरीत तिच्या मन:स्थितीचे वर्णन करण्यासाठी लेखकाने जी वातावरण निर्मिती केली, ती पुढील परिच्छेदातून समजते, ''ती गुपचूप उठली अणि चुलीशी गेली. डबडयातलं रॉकेल ओतून तिनं काडी लावली. भपकन थाबडा पेटला. स्वत:च्या हातानं तिनं तो थापलेला होता. लौकरच त्याच्यावर ती चहाचं आंधण ठेवणार होती. काही वेळ धगधगून त्याची राख होणार होती. काही दिवसांपूर्वी तो गाईच्या पोटात टाकाऊ झालेला एक अन्नांश होता. त्याहीपूर्वी गवताच्या रुपाने कोठेतरी वावरत असेल. लौकरच तो पुन्हा मातीच्या कुशीत जाणार होता. कोठल्यातरी तृणांकुराला जगवणार होता. आयुष्याच्या अखेरच्या फेऱ्यात तो तिच्या उपयोगी पडत होता. खरं म्हणजे त्या फेऱ्याला आदि-अंत नव्हते. सर्वांच्याच आयुष्याचा रहाट असा फिरत असतो. काही लोटे भरलेले असतात; पण भरण्याकरिता ते अगोदर रिकामे व्हावे लागतात. तिच्या आयुष्याचा लोटा रिकामा व्हायचा राहिला नव्हता. तिनं आणखी थोडी कळ सोसली तर तिचाही लोटा भरेल. सृष्टीचा क्रम म्हणून ते अपरिहार्य होतं. तिचे विचार चालले होते आणि पाण्याला उकळी फुटली.''(पृ.१३६) वरील परिच्छेदातून असे स्पष्ट होते की, थाबड्याच्या प्रवासाच्या प्रतिमामधून मानवी जीवनाचा प्रवास प्रतीत होतो.

**१.३.३. स्वामी :**

माधवरावांच्या निधनानंतर रमाबाईंनी सती जाण्याचा निर्णय घेतला. रमाबाईं सावकाश पावले टाकीत आत येत होत्या. रेशमी श्वेतवस्त्र त्यांनी परिधान केले होते. नुकतेच स्नान केल्यामुळे पाठीवर केस रुळत होते. कपाळी मळवट भरलेला होता. कानात हिऱ्याच्या कुड्या .......... ढाळू लागल्या. (पृ.४०६)

''खडी ताजिम, निगा रखो महाराज ऽऽ।''

सारा दरबार खाडकन उभा राहिला आणि श्रीमंत माधवराव पेशवे दरबारात प्रवेश करते झाले. क्षणांत साऱ्यांच्या नजरा झुकल्या. चोपदार पुकारत होता.

''आस्ते कदम, महाराज! नजर बक्दर्म होशियाऽऽरऽऽ''(पृ.५)

**१.३.४. स्मरणगाथा :**

गोपाळने गाडगेबाबांचे शिष्यत्व स्वीकारले होते. तो तल्लख बुद्धिमत्तेचा असल्याने त्याने उत्कृष्ट कीर्तनकार म्हणून नावलौकिक मिळविला होता. तो गावोगावी जावून कीर्तन करीत असे. त्याला कीर्तनासाठी लोक बोलवत होते. असोल या गावी त्याने सप्ताह पार पाडला. पुढील परिच्छेदातून कीर्तनापूर्वीची यथासांग मांडणी करून लेखकाने उत्कृष्ट वातावरणनिर्मीती साधली

आहे. ''असोलेकर मंडळींनी आजूबाजूचे नामांकित भजन्ये पाचारले होते. ते गावाचे सगेसोयरे होते. आठवडाभर तिथच राहणार होते. एक जण चांगला उत्तम पखवाजा होता. अशी ती सगळी मंडळी स्नानं करून, तांबडे रेशमी फेटे लेवून, कपाळावर गोपीचंदनाची गंध अन् अष्टगंधाची बोटं रेखलेल्या मुद्रा मिरवीत मांडवात एकत्र झाली. त्या अवघ्या वारकऱ्यांमध्ये मीच एक खुरखुरमुंड्या खविसासारखा दिसत होतो. मांडवाच्या एक्या अंगाला मध्यभागी देवायतन मांडलं. पांडुरंगाचं सुरेख चित्र. दोन्ही बाजवांना ज्ञानेश्वर-तुकारामांच्या प्रतिमा. समोर पेटत्या समया. उदबत्त्या. धूप जळत असलेला. अन् अशा त्या थाटात समोर गळ्यात वीणा अडकविलेला मी. बाजूला लाकडी घोडीवर मांडलेला मृदुंग. पखवाज्याच्या धुमपुडावरल्या थापेसरशी गंभीर बोल उमटवीत असलेला. दुतर्फा जवळजवळ पन्नास टाळकरी उभे. मंडपात बायामाणसांची गच्च गर्दी.''(पृ.२५५)

असोल या गावी बाबांनी कीर्तनासाठी तारीख दिली. कीर्तनानंतर असोलमध्ये आलेल्या पाहुण्यांसाठी जेवणाची तयारी केली. बाबांच्या आगमनापुर्वी केलेल्या सिद्धतेतून एक प्रकारे प्रसन्न वातावरणनिर्मिती झाली. ''एकीकडे तयारी अगदी भरास आली. गहूं भरडून आले. गुळाच्या भेल्यांची थप्पी लागली. पाण्याच्या सांठवणाची भली थोरली भांडी, डेगी, पिंप असं येऊन पडलं. पत्रावळींचा ढीग रचला. चर खणून झाले. लाकडं फोडून त्याची रास उभी राहिली. तोरणं पताका तयार झाल्या. बाबांच्या कीर्तनाची सगळी सिद्धता झाली.

पटांगण झाडण्यासाठी खराटे, कचरा भरून टाकायला घमेली, फावडी, पंगतींच्या ओळी आखण्यासाठी चुना, मापं मोजायला दोऱ्या, असं जे जे आठवलं तें तें सगळं जुळवून ठेवलं. बाबांच्या कीर्तनासाठी मैदानभर लावण्यासाठी परभणीहून पन्नास बत्त्या मागवल्या. त्यांच्यासाठी घासलेट. अशी व्यवस्था माझ्या परीनं तर कडेकोट करून ठेवली.''(पृ.२६०) अशा प्रकारे लेखकाने आपल्या जीवनातील विविध घटना प्रसंग सांगण्यापूर्वी प्रत्येकवेळी त्याला साजेल अशी वातावरणनिर्मिती करून वाचकाला सतत गुंतवूण ठेवण्याचा प्रयास केला आहे.

**१.३.५. सत्तांतर :**

'सत्तांतर' मधील प्रत्येक घटना प्रसंगांच्या समयी लेखकाने समर्पक अशा प्रकारची वातावरण निर्मिती साधलेली आहे. कादंबरीच्या आशयाला अनुरुप अशा प्रकारची सर्वच वर्णने यामध्ये एखाद्या प्राण्याचे, स्थळाचे, निसर्गाचे वर्णन करण्याअगोदर त्याला साजेल अशा प्रकारचे वातावरण सूचकतेने लेखक तयार करतो. त्यासाठी वन्य प्राण्यांचा दिनक्रम, स्वभाव आणि सवयी यांचे बारकाईने केलेले निरिक्षण, अवलोकन याचा उपयोग लेखकाला होताना दिसतो. पावसाळा

सुरु होण्याच्या अगोदर पक्षांची घरटी बांधण्याची व अंडी घालण्याची कृती लेखक पुढील वातावरणनिर्मिती करुन मांडतो.

''सबंध वैशाख ओकं-बोकं वाटणारं जंगल आता हळूहळू फुलू लागलं होतं. मोहाच्या झाडांच्या लालचुटूक पालवी आली होती. बहाव्याला पिवळे धम्मक फुलांचे लोंगर लोंबू लागले होते. सकाळी पाखरांचं गाणं नव्या मोहोरानं सुगंधित होऊन रान घुमवित होतं. आता लवकरच उष्माकाळ संपणार होता आणि तापलेल्या जमिनीवर पाण्याच्या धारा आभाळातून कोसळणार होत्या. उदंड नवं गवत, नवी पालवी, नवे कीटक जन्माला येणार होते. सृष्टी अन्नब्रम्हाच्या पूजेला बसणार होती. पावसाळा येऊ घातला आणि पाणपाखरांनी घरटी बांधण्याची धांदल सुरु झाली.'' मुडाच्या मरण्याचा प्रसंग, लालबुडाचा साप चावून झालेला शेवट, पावसाळ्यापूर्वी वातावरणात झालेला बदल, बोथरीच्या मरणाचा प्रसंग, वानराच्या टोळ्यांमधील संघर्ष इत्यादी घटना प्रसंगाच्या वेळी लेखकाने वाचकांसमोर उभे केलेले वातावरण साक्षात त्यावेळी तेथे आपण साक्षीदार आहोत, अशा प्रकारचेच आहे.

जंगलाच्या परिसराची पार्श्वभूमी 'सत्तांतर'च्या वातावरण निर्मितीला मिळालेली आहे. आशयसूत्रांशी अतिशय सुसंगत वातावरण निर्मितीमुळे त्याला एक वेगळेच परिणाम लाभलेले आहे. तळ्याच्या पाण्याशी एरवी कधीकधी दिसणाऱ्या डोकरी पक्षांच्या जनन सोहळ्याची सुरुवात झाली. तळ्यापलीकडं थोडसं मोकळं रानं होतं. त्यात दरवर्षीप्रमाणे एकएक पक्षी येऊन बसू लागला. लांब मानेचा, ढांगुळ्या पायांचा, तांबडसर मानेवर काळ्या रेघा असलेला, डोक्यावर पंखांचा बटा असलेला. एक-एक करता करता संख्या वाढत गेली. खांदे उभे करुन स्वतःतच मग्न असे तीस-पस्तीस-चाळीस पक्षी दिसू लागले. एवढे पक्षी एकत्र आले की, केवढा गोंगाट करतात; पण एकमेकांची काहीही दखल न घेता हे बसून राहिले. पावसाळी हवेमुळे, ढंगामुळे, वाऱ्यामुळे सृष्टीत घडलेल्या या बदलांमुळे त्यांच्या शरीरातही काही विलक्षण बदल होत होता.

हर बदल घडून आला आणि नर पक्षांनी घरट्यांसाठी तळ्यातील आसमंतातला चिंचेचा महावृक्ष शोधून काढला. वसाहतीच्या बांधकामाला सुरुवात झाली. फांद्यांवर इथंतिथं नेटका आधार बघून एक-एक पक्षी भरारी घेऊन लांबलांबच्या सफरी करु लागला. चोचीतून दणकट काटक्या आणून घरटयाचा पाया घालू लागला. चिंचेवर एकच गर्दी उसळली. सतत कोलाहल होऊ लागला.

या समर्थांनी घरटी सुरु केली. तेव्हा पायरीपायरीनं लहानं पाणपक्ष्यांनी आपलीही घरटी चिंचेवर धरली. त्यात काळ्या पाठीच्या बळक्या होत्या, गायबगळे होते, काळ्या मानेचे करकोचे

होते, पाणकावळे होते. एकच गर्दी चिंचेवर उसळली. काड्यांचा सडा चिंचेखाली पडू लागला. घरट्यांची कशीबशी बैठक घालून कबऱ्या रंगाचे ढोकरी पक्षाचे नर आपापल्या घरट्यात बसून आभाळाकडे बघत माद्यांची वाट बघू लागले. आभाळात ढग जमत होते. झाकोळून येत होतं. छायाप्रकाशाची पाठशिवणी सारखी चालू होती. पाऊस वारा घालीत होता. हवेत थंडावा येत होता. मग एके दिवशी माद्यांचा थवा आभाळात दिसू लागला. बसल्या जागी पंख पसरुन, माना काढून, मोठ्यामोठ्यानं कलकलाट करुन नरांनी माद्यांना हाका दिल्या, तेव्हा माद्या चिंचेकडे झेपावल्या. निवड–सोहळा सुरु झाला. आपापल्या आकर्षक वाटणाऱ्या जोडीदाराकडं एक–एक मादी जाऊ लागली. हा की तो, तो की हा, यात बराच काळ गेला. अखेर जोड्या जमल्या. घरटयांचा ताबा माद्यांनी घेतला आणि आता ते नीटनेटके, बळकट करण्यासाठी, सामानसुमान आणण्याकरीता त्यांनी नराला वारंवार बाहेर पिटाळलं.

चोचीत काडी घेऊन नर येताच, मादी आधी ती काडी या कडेपासून त्या कडेपर्यंत चाचपून बघे. पसंत पडली तर ठेवून घेई, नाहीतर खाली टाकून देई. बापडा नर पुन्हा चांगली काडी आणण्यासाठी बाहेर पडे.(पृ.५९) असा खटाटोप काही दिवस चालू राहिला आणि बरीच घरं बांधून झाली. बैठक जुळवून माद्या बसल्या. कुणी तीन, कुणी सहा अशा तळ्यातल्या पाण्याच्या रंगाचीच अंडी घातली.(पृ.६०)

**१.३.६. झोंबी :**

आनंदाला पाडव्याला शाळेत जायचे होते. त्यापूर्वीच्या तयारीतून शाळेला जाण्याची त्याची मानसिकता सकारात्मक होण्यासाठी 'दादानं रामाला नारळ फोडला. पुडीतली साखर सोडली. चिरमुऱ्यात भेडबत्तासू मिसळले. साखरं, खोबरं, थोडं चिरमुरं, भेंडबत्तासूची एक कांडी मला देऊन तो बाकीच्या मुलांना वाटू लागला.'(पृ.३४) वरील परिच्छेदातून आनंदाच्या शाळेप्रवेशाच्या तयारीची वातावरणनिर्मिती झालेली दिसते.

लेखकाला एकदा म्हशीने ओढत नेले. त्यात त्याच्या साऱ्या अंगाला मार लागला होता. या घटनेपूर्वीची वातावरणनिर्मिती लेखकाने पुढीलप्रमाणे केलेली आहे. 'माळाच्या उतरणीला म्हैस आणि तिची रेडी चरण्यासाठी लेखकाला बांधायची होती.' 'म्हशीला नेऊन मी कशीबशी बांधली. मग परत येऊन तिच्या दीड वर्षाच्या रेडीला नेण्याची तयारी केली. कारण दोन्ही म्हशींना एकदम मला बांधता येणं मला शक्य नव्हतं. रेडी खेळकर होती. ती फार पळायची म्हणून तिच्या आईला प्रथम जागेवर माळावर नेऊन बांधलं. मग गोठ्यात बांधलेल्या रेडीच्या दोन्ही शिंगांच्या बेचक्यातून

सोंदर घेऊन गच्च बांधला. त्या सोंदराची कोपरी माझ्या खांद्याला अडकवली नि रेडीच्या गळ्याचं दाव्याचं बिरडं फोडलं. खोपीपासनं फर्लांगभर अंतरावर म्हैस बांधली होती. मध्ये नुकताच जोंधळा कापलेलं सडांग. त्यात सडाचे खोंबारे टीचटीचभर. मग म्हाळाच्या उतरणीची खड्डे-खबदाडं, दगडं-धोंडं. रेडी गोठ्यातनं जी बाहेर आली ती अनपेक्षीतपणे जोराने चौखुर पळू लागली. हातातला सोंदर आवरता आवरेना. ओढ जोरात बसू लागली., म्हणून सोंदर सटकन सोडून दिला नि खांद्याला अडकलेली कोपरी काढूस्तवर हातात अडकली मी आडवा झालो. खड्डे-खबदाड, दगडं-धोंडे यातनं फरफटत ओढत जाऊ लागलो.'(पृ.९०)

**१.३.७. झाडाझडती :**

लेखकाने 'झाडाझडती' या कादंबरीमध्ये पुढे घडणाऱ्या घटना-प्रसंगाला पोषक ठरावे यासाठी वातावरणनिर्मिती करण्याचा चपखलपणे प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी निसर्गवर्णने ही मोठ्या प्रमाणात वेळोवेळी केलेली आहेत. हैबती आणि शिवराम दोघे भाऊ होते. हैबतीचा भाऊ गुणवंता की जो सुभानराव ह्या त्यांच्या मामाने दत्तक घेतला होता. त्याच्या गावी झांझडवाडीला गेले. तेव्हा शिकारीच्या पूर्वतयारीने शिकारीची वातावरण निर्मिती केलेली होती. 'रेडखिंडीच्या वाटेवरच्या गवंडावर गुणवंता, कुशाराजा, हैबती, शिवराम आणि दोन जोले दबा धरुन बसलेले. खालच्या बाजूला जिवंत पाण्याचा एक टाका होता. रात्रीची जनावरं इथंच पाणी प्यायला येतात. हे कुशापाला माहीत होतं. इथचं त्यांच्या गोळीची शिकार होऊन या आधी कित्येक जनावरे उलटी होऊन पडली होती. कुशाच्या आणि गुणवंताच्या काखेत ठासणीच्या बंदुका शिकारीसाठी आतुर झालेल्या.'(पृ.३६) सदर सर्व वर्णनातून शिकारीची पूर्वतयारी दर्शविली आहे आणि शिकार करण्यासाठी योग्य अशी वातावरण निर्मिती केल्याचे समजते.

**१.३.८. राघववेळ :**

लेखकाने रघूच्या शाळेत साजऱ्या होणाऱ्या पंधरा ऑगस्टच्या अगोदरची तयारी व त्यासाठी कादंबरीत केलेली एकुणच वातावरण निर्मिती उदाहरणादाखल लक्षात घेण्यासारखी आहे. लेखक ती पुढीलप्रमाणे करतो. भल्या सकाळी रघू उठला. त्यानेच चूल पेटवून पाहिले. ..... रघूने काल धुतलेले, रात्री तांब्यात विस्तव भरुन इस्त्री केलेले कपडे घातले. शाळेकडे निघाला... शाळेपासून प्रभात फेरी सुरु झाली. हातात घोषणांचे फलक घेतलेल्या मुली सर्वात पुढे. त्यांचे मागून इतर मुली, नंतर मुले. त्यांच्यातील काहींच्या हातात घोषणा फलक. रांगेच्या दोन्ही बाजूंनी शिक्षक.

''भारत माता की जयऽऽ''

''जयऽऽ''

''महात्मा गांधी कीऽऽ....''

''स्वातंत्र्य दिनऽऽ....''

''चिरायु होवोऽऽ''

मुले, मुली घोषणा देत होत्या. पांढरे शटर्स्, खाकी रंगाच्या हाफ पॅन्टस् घातलेली मुले, पांढरे ब्लाऊज व निळे परकर घातलेल्या मुली रस्त्यालगतच्या घरातील बायका, माणसे कौतुकाने मुलामलींकडे पाहत होते. व सारीच्या रस्त्यावरुन फिरुन मुलामुलींची प्रभात फेरी शाळेत आली. तोवर गावातील प्रमुख माणसे ही आली. ध्वजासमोरच्या पटांगणात विद्यार्थ्यांना बसविण्यात आले. निमंत्रित खुर्च्या, बाकांवर बसले.(पृ.२७१, २७२) अशा प्रकारे लेखकाने १५ ऑगस्टच्या अगोदर केलेली संपूर्ण वातावरणनिर्मिती समर्पक आहे.

**१.३.९. ताम्रपट :**

महात्मा गांधींनी स्वातंत्र्याच्या लढ्यात साऱ्यांना प्राण झोकून देण्याचे आवाहन केले. गुलामीच्या बेड्या तोडण्याचा मंत्र दिला. महात्मा गांधींना अटक झाली. नेहरुंच्या हस्ते गवालिया टँक मैदानावर झेंडावंदनाचा कार्यक्रम ठरला पण त्याआधीच त्यांना अटक झाली. नंतर अरुणा असफअली यांच्या हस्ते झेंडावंदन होणार होते. पोलिसांविरुद्ध धुमश्चक्री चालू झाली. अशा प्रकारे बड्या नेत्यांनी क्रांतिकारक पाऊले उचलल्यामुळे नानांनी कोणत्याही आदेशाची वाट न पाहता आपण आपल्या लढ्याचा मार्ग निश्चित केला. त्यासाठी त्यांनी जो कृतीकार्यक्रम आखला तो असा, 'योजना समिती, कृती समिती, कार्यवाही समिती कोणाच्या वाट्याला कोणकोणती कामे याची तपशीलवार योजना करावी लागेल. तुमची सगळ्यांची याला तयारी आहे ना? उद्या आपण पकडले जाऊ शकू. तुरुंगवास भोगावा लागेल. सगळ्या प्रकारच्या छळांना सामोरे जावे लागेल. गांधीजींनी साऱ्यांना हाक दिलीय. तुमची तयारी आहे ना?'(पृ.४२)

अशा पद्धतीने योग्य नियोजन करुन कार्यकर्त्यांची स्वातंत्र्य लढ्यात स्वतःला झोकून देण्याची चेतना जागवण्यासाठी येथे वातावरणनिर्मिती केली आहे. कादंबरीची पार्श्वभूमी काय आहे हे आपल्याला कादंबरीच्या प्रारंभी समजते. ताम्रपट ही राजकीय कादंबरी असली तरी तिला ऐतिहासिक पार्श्वभूमीचा बाज आहे. तशी ती ऐतिहासिक की राजकीय कादंबरी असा एक संभ्रमात टाकणारा प्रश्न निर्माण होतो.

कादंबरीची सुरुवात नाना सिरुर या कादंबरी नायकाच्या भाषणाने होते. ब्रिटिशांनी त्यांचे आपल्या देशावर असलेले साम्राज्य सोडावे त्यासाठी दुसऱ्या महायुद्धात अडकला गेलेला इंग्लंड. या संधीचा आपण फायदा घ्यावा असे आपल्या नेत्यांनी ठरविले. 'आपले नेते जयप्रकाश नारायण तुरुंगात आहेत. राममनोहर लोहियांना अटक झालीय. शेकडो कार्यकर्ते गजाआड झालेत. पण म्हणून लढा थांबवलेला नाहीय.'(पृ.३) या नाना शिरुर यांच्या भाषणाने कादंबरीची पार्श्वभूमी काय आहे हे ठरविण्यासाठी लेखकाने नानांच्या भाषणाने वातावरणनिर्मिती केलेली आहे.

**१.३.१०. तणकट :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करायची होती त्यामुळे महारवाडा सज्ज झाला होता. तालुक्यातील प्रमुख नेते कार्यक्रमाला येणार होते. सर्वजण त्यांची वाट पाहत होते. खालील बाबींच्या पूर्वतयारीतून कार्यक्रमाची वातावरणनिर्मिती झालेली दिसते. 'स्पीकरचा आवाज सगळ्या शिवारात दुमदुमला. म्हारोड्याच्या तोंडाला नारळाच्या झावळ्यांची कमान उभारली. सगळ्या म्हारोड्याभर पताका लावल्या गेल्या. तक्क्यावर दिवसा लाईटिंग सुरु होती. प्रत्येकाच्या घरासमोर सारुन रांगोळ्या घातल्या गेल्या. पोर रात्रभर ह्याच उद्योगात होती. म्हारोडा झाटून-लोटून झगझगीत केला होता. जयन्तीनिमित्त बाळासाहेबाने गौत्याला लांबलचक झब्बा शिवला होता. गौत्या झब्ब्यात उठून दिसत होता. त्याच्या भोवती पोरं घुटमळत होती. म्हारोड्यातल्या बायका ठेवणीतली लुगडी काढून नटल्या होत्या. सगळ्या जय्यत तयारीनिशी म्हारवाडा बाळासाहेबासह पाहुण्यांची वाट बघत बसला होता.'(पृ.२०७) 'महारवाड्यात विविध सुधारणांची घोषणा करण्यासाठी तक्क्यावर अनेक दलित मंडळी उपस्थित होणार होती. तक्क्यात नेहमीसारखीच गर्दी होती. बाया-बापड्या, पोरं-टारं दाटीवाटीनं बसली होती. गौत्या सगळ्यांना सरकून सरकून जागा करुन देत होता. पंढऱ्या चौकटीबाहेर उभ्या असलेल्या माणसांना आत रेटून कोंबत होता.'(पृ.१६०) सभेसाठीची तयारी त्यातून दिसते.

**१.३.११. डांगोरा एका नगरीचा**

प्रस्तुत कादंबरीत प्रत्येक घटनाप्रसंगाच्या वेळी लेखकांनी आशयाला समर्पक अशी वातावरण निर्मिती साधलेली दिसून येते. उदाहरणच द्यावयाचे झाल्यास बाभळबनाच्या आडोशाला संदीपन महाराच्या तुंगाची झोपडी होती. त्या झोपडीचे ठिकाण सांगण्याच्या अगोदर लेखक उत्कृष्ट वातावरण निर्मिती करतो, 'उत्तर वेशीबाहेर पडताच डोळ्यांना सुखावणारा देखावा दूरवर पसरलेला होता. विस्तीर्ण कारंज बाग होती. बारमहा हिरवळीनं आच्छादलेली. फुलांनी बहरलेली, तिच्या

पिछाडीस उभ्या असलेल्या अस्पृश्यांच्या झोपड्या सोडल्या तर दुसरी कुठलीही वस्ती तिथं नव्हती. राजवाड्यापाठीमागून उतरत येणाऱ्या सकल भूमीमधून वर्षातले आठ महीने तरी कमी–अधिक पाण्याचा ओहोळ वाहता असे. त्याच्या पात्रात अंतराअंतरावर दोन विहिरी खोदलेल्या होत्या. त्यांचं पाणी खास बागेपर्यंत पोहचवलं होतं. त्याच पाठ–पाण्यावर उन्हाळ्याच्या दिवसांत अस्पृश्य वस्तीची गुजराण चाले.'(पृ.१३०) अस्पृश्य वस्तीचे स्थळ, तुंगाची राहण्याची झोपडी स्पष्ट करण्यासाठी लेखक वरील वातावरणनिर्मिती करताना दिसतात. तत्कालिन पुण्याचे सामाजिक वातावरण लेखक पुढीलप्रमाणे स्पष्ट करतो. 'त्या दिवसात पुण्यातील सामाजिक वातावरण मात्र दुषित झालेलं होतं. पुढाऱ्यांतही मतभेदांचा जोर भरलेला होता. परस्परांच्या सभा उधळल्या जात. आपल्या वर्चस्वाखालील नियतकालिकांतून विरोधकांविषयी गरळ ओकण्यात कुणी मागं नसे.(पृ.११९) स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील पुण्यातील पुढाऱ्यांत असलेले मतभेद वरील कृतीतून स्पष्ट करण्यासाठी लेखक चपखल वातावरणनिर्मिती साधतांना दिसतो.

**१.३.१२ . बारोमास :**

शेतकऱ्यांना दुष्काळजन्य परिस्थितीला सामोरे जावे लागणार. त्याच्यावर येणाऱ्या संकटाची चाहूल लेखकाने खालील परिच्छेदातून करुन दिली आहे. 'मृगात पेरण्या आटोपून शेतकरी हवालदिल झाले. लागोपाठ दोन नक्षत्र कोरडी गेली. मृगात आभाळ सोडून गेलेला पाऊस आर्द्रा नक्षत्रात येईल या आशेने शेतकरी रोज आभाळ पाहत होते. ज्यांच्या शेतात विहिरी होत्या त्यांनी मोटारपंप सुरु केले. पण भुई पार भेगाळली, तहान वाढलेली आणि विहिरींना तर कुठे पाणी होतं? भुईत मनसोक्त पाऊस जिरलाच नाही तर विहिरी तरी कशा पाझरणार? मस्तकातच काही नाही तर नाकात तरी कुठून उतरणार?'(पृ.१६३) यावरून भयानक दुष्काळाला सामोरे जावे लागणार या विषयीची वातावरण निर्मिती करण्यात लेखक यशस्वी झाला आहे.

**१.३.१३. भूमी :**

मुलीच्या लग्नात पित्याची किंवा मुलीच्या नातेवाईकांची होणारी मनोव्यथा आपण अनुभवतो. मुलगी हे परक्याचं धन. तिच्या हक्काच्या घरी जाताना वडील आपल्या भावना स्पष्टपणे व्यक्त करू शकत नाहीत असाच अनुभव दर्शनाच्या लग्नात तिचे पिता डॉ. सुधीर याच्या वागण्यातून लेखिकेने मांडला आहे. तसेच तिच्या विवाहाच्या वर्णनाने वातावरण निर्मिती करण्याचा प्रयत्न लेखिकेने प्रस्तूत उताऱ्यातून केला आहे. 'दर्शनाला अंतरपाटाआड उभं केलं. ते देवघर, सुधीरच्या वडिलांनी केलेली मंगलाष्टक, संस्कृतातली. आपल्या खड्या आवाजात म्हणणाऱ्या आजी,

सर्वांच्या डोळ्यांत पाणी. त्याचा स्पर्श मैथिलीलाही झाला. हे कढ तिनं तिच्या स्वतःच्यावेळी अनुभवलचं नव्हतं. ती तर कोरडी होतीच. पण आंतरपाटापलीकडला माणूसही कोरडाचं होता. तिच्या वेळी राहून गेलेलं हे सगळं... अंतरपाट दूर झाला वाद्यांचा गजर, टाळ्या, अक्षता, फुलं, सनई.... सुधीर वर जाताना दिसले. खाली मान घालून, नजर चुकवून, मैथिलीही त्यांच्या मागोमाग गेली. ते गच्चीत उभे होते. ही घराची मागची बाजू. ही सजलेली नव्हती. इथं तोरणं रोषणाई काही पोचलं नव्हतं. गच्चीवर ओणवं झालेल्या त्या मोठ्या झाडाची सावली तेवढी होती. खालचा जल्लोश, गजर, उत्सव इथं येऊन पोचत नव्हता. तिथं ते एकटे उभे होते. मैथिली मात्र क्षणभर उभी राहिली. त्यांच्या पाठीवर हळूच हात ठेवला. (पृ.२१९) वरील उताऱ्यातून लेखिकेने अनेक प्रसंगाची वातावरणनिर्मिती केली आहे.

**१.३.१४ उत्सुकतेने मी झोपलो :**

कुटुंबव्यवस्था आणि चांदणे : सुमाधुरीच्या बाळाच्या बारशाच्या निमित्ताने सुमाधुरीच्या बंगल्याच्या हॉलमध्ये हा खेळ चालला होता. गावातल्या सहा मुलींनी पारंपरिक पद्धतीने बारसे करायचा खेळ बसवला होता. त्यातल्या दोन मुली मुंबईला जाऊन आठवडाभराचेच थिएटर वर्कशॉप करून आल्या होत्या. त्याची ती आयडिया गावात कुणाकडे बारसे असेल तिथे या मुली संपर्क साधून हा बारशाचा खेळ दाखवत. आता प्रेक्षक होते सुमाधुरी, सुबोध, त्यांचे आईवडील, आज्जी, भाऊ, वहिणी, बहीण, मेव्हणे, काका, काकू, पुतणे, भाच्या वगैरे जवळचे नातेवाईक गावातले जवळचे ओळखीतले. सुमाधुरीचे आईवडील, भाऊ, काकू असे एकूण बहात्तर जण. सहा मुलींपैकी दोन मुलीनी पुरुषांचे ड्रेस केले होते. एक प्रौढ पंचावन्न छपन्न वयाचा पुरुष, डोक्याला रेशमी फेटा, झुबकेदार अर्धवट पांढऱ्या मिशा, तपकिरी रंगाची पँट आणि जोधपुरी त्याच रंगाचा कोट हा पुरूष म्हणजे नाटकातला बाळाचा आजोबा. दुसरी मुलगी तरुण पुरुष झाली होती. दाढीमिशा नसलेला गुळगुळीत चेहेरा, खूप केस डोक्यावर, जीन पँट आणि व्हॅन हुसेनचा इर शर्ट हा पुरुष म्हणजे बाळाचे वडील. चार जणीतली एक बाळाची आजी प्रौढ स्त्रीचा कौस्च्युम केलेली मुलगी, दुसरी तरूण लग्नाला आलेली बाळाची आत्या. तिसरी अर्थातच बाळाची आई आणि चौथी बाळाच्या आईची मैत्रिण.

लेखकाने जे निवेदन केले यातून बारशाच्या प्रसंगाचे नाटकीकरण किंवा बारशाच्या प्रसंगाचा खेळ करण्यासाठी त्या सहा मुलींनी केलेल्या वेशभुषेचे वर्णन लेखकाने केले. तसेच

वयानुरूप वेशभूषा करणारे लोक बाळाशी जवळचे नाते स्पष्ट करणारे आहेत. यातून बारशाच्या खेळाची पूर्वतयारी झाली व बारशाच्या प्रसंगासाठीची त्यातून वातावरणनिर्मिती झाली असे दिसते. कुटुंबव्यवस्था आणि फुलपाखरू : हर्षदची आई व त्याचे वडील यांच्यातील पती-पत्नीचे नाते निकोप नव्हते. पण अचानक एके दिवशी सकाळी हर्षद झोपेत असताना हर्षदच्या आईने ''रघुवीऽर'' अशी त्याच्या पप्पांना हाक मारली व पप्पांना धोतर तिकडेच नेसायला सांगितले. हर्षदला आपण स्वप्नात असल्यासारखे वाटले कारण त्याने त्याच्या आईवडीलांचा संवाद बरेच दिवस ऐकला नव्हता. 'आईने हिरवा शालू नेसला होता. हिरवा ब्लाउज घातला होता. कपाळावर ठसठशीत कुंकू लावलं होतं. गळ्यात ठसठशीत मंगळसूत्र. आई कधी मंगळसूत्र घालते, कधी नाही. कधी कुंकू लावते, कधी नाही. हर्षद चहा गाळून घेत होता. तिथे वडील आले. पांढराशुभ्र इस्त्रीचा लेंगा, पांढराशुभ्र घोळदार झब्बा. कपाळावर उभी लाल गंधाची जाडसर रेघ. वडील पिशवीत धोतराची घडी घालत किचनमध्ये आले होते. तसेच आईने वडिलांना ताम्हण व निरंजनही घेण्यास सांगितले.(पृ.९९) ह्या सर्व वर्णनातून आई-वडील धार्मिक विधीला जाणार असल्याचे समजते. म्हणजे धार्मिक विधीला जाणार अशी वातावरण निर्मिती लेखकाने त्यातून केलेली दिसते...' शहरातील एक हजार एकशे अकरा दांपत्य यज्ञाला बसणार होते. त्यासाठी हर्षदचे आई-वडीलही जाणार होते हेही त्यातून स्पष्ट होते.

**१.३.१५. खारीच्या वाटा :**

धरणाने सारे गाव विस्थापित झाले होते. सारे गाव परमुलखात जात होते. दिनू, बाळापाटील आणि लेखक अशी तीनच कुटुंबे सामानाची बांधाबाध करून सामान वाहून नेणाऱ्या सरकारी ट्रकची वाट पाहत होती. दिनू आणि बाळापाटलाचे घर मागच्या आळीत होते. लेखकाचे घर त्याच्यापासून थोडे दूर होते. रात्रीच्या वेळची भीषणता दाखविण्यासाठी केलेल्या निवेदनातून समर्पक वातावरणनिर्मिती झालेली वाटते.

'रात्र खायला उठे. कधी पाचोळ्याची खसपस तर कधी डोहावर टिटवीनं धरलेला ताल. मध्यान्हीला घोंघावणारा भेसूर वारा. साथीला अंधार चिरणारी कोल्हेकुई. नंतर सारं सामसूम. गोठवणारा गारठा. मर्तिकाची कळा. कालवाकालव, पोटात भीतीचा गोळा. कधी फटफटत असं होई. नदीवर टिटवी ओरडली म्हणजे कुणीतरी आल्याची खबर. बहुधा जनावरं पाण्याला येत.'(पृ.१४९)

वरील परिच्छेदाने रात्रीच्या वेळी एकटे कुटुंब असेल तर कुटुंबातील व्यक्तींना भीती वाटेल असे वातावरण तयार होते. वरील वर्णन भीतीची तिव्रता दर्शविणारे आहे. लेखक दिन्यासह तिन्ही आवाड म्हणजे तिन्ही आळ्या फिरून आला. तेव्हा त्यांनी पाहिलेले दृष्य 'नुसत्या पडक्या भिंती, खांबाच्या जागा ढासळलेल्या, मोडलेल्या चुली, उखडलेल्या उखळाच्या खुणा, कांगी उसवलेल्या टोपल्या, डाल, तुटकी दोरखंड, बारीकसारीक लाकूडफाटा, चिंध्या चांध्या, पटकुरं, फुटकी डबडी, बाटल्या, काय काय म्हणून पडलेलं.'(पृ.१५१) धरणग्रस्तांच्या उध्वस्त होण्याच्या प्रसंगाची कल्पना वरील परिच्छेदातून वाचकाला येते. उध्वस्त झालेल्या कुटुंबाची भिषणता दर्शविण्यासाठी लेखकाने वरील वातावरणनिर्मिती साकारलेली दिसून येते.

**१.३.१६. फेसाटी :**

हिराक्काच्या मृत्यूचा प्रसंग सांगण्यापूर्वी लेखकाने जे निवेदन केले आहे त्याने पुढील घटनेची पुसटशी वातावरण निर्मिती होते. 'रोजचा उगुल्याला दिस मावळत हुता. म्या दिसभर पावसात खेळायचूं. काकाची तब्बेत चांगली सुधारली हुती. काकानं गई वरच्या बांधाते सोडली हुती. अधनंमधनं पावसानं चांगलाच फेरा धरला हुता. वड्याला दुही तरफा पाणी वाहात हुतं. काकू लमाण हिरामणामणीच्यात दाणं उफणायला गेली हुती. सुमाताई, नंदाक्का, सुंदाक्का पाण्याला गेल्या हुत्या. तेवढ्यात मामीन जोरात किंकाळी फोडली. काकानं गई बांधातच सोडलीनं पळत गेला. त्या येळला दिस मावळला हुता. नंदाक्कान हुभ्यानच डोस्क्यावरचं डिचकं खाली टाकलं. पळतच घरामाघं गेली तर हिरीपाशी रडायचा आवाज येत हुता.'(पृ.४१) पुढची घटना म्हणजे मामीने हिराक्काला विहिरीत ढकलून दिले होते. ही घटना सांगण्यापूर्वी लेखकाने वातावरणनिर्मिती साधली आहे.

लेखकाचे घर जळाले. ते जळण्यापुर्वी रात्री लेखकाच्या कुटुंबियांना अशुभाचे संकेत मिळत होते. पहिली चाण्णी ऊगली हुती. टिटवीनं वरडायला चालू केलं. लांबवर वरडत जायाची आणिक छपरावरनं माग जायची वरडयची. तेव्हा काकू सकाळी सांगत होती. 'टिटवी रांडतर सारखीच वरडत्या, अन् कालपसनं उजवी पापणी सारखी फरफरत्याई. माझी पापणी लई वाईट. काय देवानं वाडून ठिवलंय कुणास ठावं? तोपतूर टिखी छेपरावरनं गोल गोल फिरत खाली गेली. दिस ऊगून कासरावर वर चढला. तरबी टिटवी काय वरडायची बंद हुईना.'(पृ.१७७) दुसऱ्याच दिवशी त्यांच घर कुणीतरी पेटवलं.

प्रस्तुत कादंबऱ्यांमधील नानाविध तपशीलांच्या वर्णनातून वातावरणनिर्मिती करण्यात आलेली आहे. तसेच जीवन व्यवस्थेशी नाते जोडलेले आहे. त्याचे गहीरे दुःख वातावरणनिर्मितीतून सहजपणे प्रकट झाले आहेत. व्यक्ती, घटना-प्रसंग, घटना प्रसंग वर्णन यांच्या माध्यमातून कादंबरीचे हेतू प्रभावीपणे स्पष्ट झाले आहेत. हेतू प्रभावीपणे स्पष्ट करण्यासाठी योग्य वातावरण निर्मिती केलेली दिसते. त्यातूनच प्रस्तुत कादंबऱ्यांची आशयविश्व फुलत गेलेली दिसतात. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या सर्वच लेखकांनी प्रस्तुत कादंबऱ्यांतून पात्रांचे मनोविश्व प्रकट करण्यासाठी तसेच घटना प्रसंगांना वास्तवाचे अधिष्ठान प्राप्त करुन देण्यासाठी उत्तम वातावरणनिर्मिती साधलेली आहे.

**१.४. शीर्षकाची समर्पकता :**

कादंबरीच्या आशयाचे सारे संदर्भ कादंबरीच्या शीर्षकातच दडलेले असतात. शीर्षक हा कादंबरीचा आरसा असतो. वाचकांचे कुतुहल वाढविणे, जिज्ञासा जागविणे हे कार्य शीर्षकाच्या माध्यमातून होते. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या वाङ्मयीन मूल्यमापनांचा विचार करतांना कादंबऱ्यांच्या शीर्षकाचा विचार करणे गरजेचे आहे. कारण आशयगर्भित सूचक शीर्षके वाचकांचे लक्ष वेधून घेतात. ह्या कादंबऱ्यांच्या शीर्षकांतून वैचारिक व भावनिक असे सुचित होतो. शीर्षकाच्या समर्पकतेतून साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांच्या प्रतिभाशक्तीचा प्रत्यय येतो.

**१.४.१. ययाति :**

वि.स. खांडेकर यांची 'ययाति' ही कादंबरी मुख्यतः 'ययाति' ह्या कादंबरी नायकाच्या स्मरणगाथेतून फुलली आहे. ययाति स्वतःला आलेले अनुभव समाजापुढे मांडून आपले अंतर्मन उघड केले आहे. ययाति स्वतःच्या बालपणापासून सुरुवात करतो. ते त्याच्या वानप्रस्थाश्रमाच्या निर्णयापर्यंत त्याने जे अनुभवले, भोगले, तसेच जीवन-मृत्यु याविषयी त्याला पडलेल्या गहन प्रश्नांची उत्तरे ययातिच्या रुपाने लेखकाने मांडली आहेत. ययाति या कथानकाभोवती गुंफली गेलेली पात्रे देवयानी, श्रर्मिष्ठा, आई-वडील, यति, कच, माधव, अंगिरस, पुरु, यदू, मुकुलिका, अलका, तारका या सर्वांनी ययातिच्या अनुरोधाने आपली भूमिका व्यक्त केली आहे. म्हणून 'ययाति' हे शीर्षक समर्पक आहे. ययाति म्हणजे पौराणिक पात्रांच्या आत्मनिवेदनाच्या रुपाने सांगितलेली गोष्ट. कादंबरी नायकाचेच नाव कादंबरीला देण्यात आले होते.

**१.४.२. रथचक्र :**

मानवी जीवन हे चक्राकार आहे. त्याला आपल्याला आपले जीवन कोणत्याही परिस्थितीत संकटांना सामोरे जात जगावे लागते. रथचक्र मधील 'ती' ही नायिका जन्मापासूनच दुर्दैवी आहे. आईचे छत्र हरवलेली 'ती' एका सिद्ध पुरूषाशी विवाहबंधनात अडकते. मुलांना जन्माला घालून त्यांची जबाबदारी तिच्यावर सोपवून तो पळून जातो. थोरला मुलगा तिला जुमानत नाही. शेवटी हुशार असलेला 'ती'चा धाकटा मुलगा तिला आशेचा किरण वाटतो. कुटुंबाच्या विरोधाला न जुमानता ती त्याच्या शिक्षणासाठी खचता खाते परंतु शेवटी तो मुलगाही तिच्या पासून दूर जातो. शेवटी ती तिचे जीवन संपविण्याचा प्रयत्न करते पण ते ही तिला तिच्या इच्छेप्रमाणे संपविता येत नाही. जीवनरूपी रथ चालविताना अनेक संकटांना सामोरे जात दुर्दैवी नायिका लेखकाने रेखाटली म्हणून 'रथचक्र' हे कादंबरीचे शीर्षक समर्पक वाटते. 'रथचक्र'च्या शीर्षकाविषयी डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात, ''एका अनामिकेच्या दुर्दैवाची कथा अधोरेखित करण्यासाठी या कादंबरीच्या शीर्षकात त्यांनी कर्णकथेतील रथचक्राचे प्रतिक वापरले आहे.''[१००] कर्णाप्रमाणेच कथानायिकेच्या वाट्याला दुःख आणि दुःखच आलेले दिसते.

**१.४.३. स्वामी :**

माधवरावांच्या आजाराची वार्ता मोरेश्वर भटाला समजल्यानंतर तो माधवरावांच्या भेटीसाठी उत्तरेतून आला. मोरेश्वराने संत तुकाराम महाराजांचा अभंग गायिला. तेव्हा माधवराव म्हणतात, ''मोरेश्वर धन्य आहे तुमची, तुमच्या काळजाला भिडणाऱ्या आवाजाची, आम्ही या अवस्थेला पोहचलो असतानाही, आम्ही राज्याचे 'स्वामी' ही भावना सुटली नाही. आपल्या आजच्या अभंगाने आम्ही जागे झालो. आम्ही राज्याचे 'स्वामी' नव्हे. 'स्वामी' तो आहे. आम्ही नुसते दीन एक अनाथ, हेच खरं, कुणी सांगावं? त्याची जाणीव देण्यासाठीच कदाचित परमेश्वराने तुम्हाला एवढया लांबून पाठवलं असेल...''(पृ.३५९) माधवराव आपल्या मृत्युमुळे रमाबाईवर येणाऱ्या संकटाला त्यांनी सामोर जावं म्हणून माधवराव त्यांना समजावीत होते. तेव्हा रमाबाई ''स्वामी...'' असं आर्त स्वरात म्हणाल्या. तशी हाक रमाबाईंनी माधवरावांना केव्हाच मारली नव्हती.(पृ.३६१) थोडक्यात स्वामी म्हणजे रमाबाईचे धनी तसेच पेशवाईचे धनी या अर्थाने माधवरावांना 'स्वामी' म्हटल आहे. रमाबाईंनी माधवरावांना आपले सर्वस्व अर्पण केलेले आपणास दिसून येते. स्वामी म्हणजे व्यक्तीच्या जीवनातील सर्वश्रेष्ठ व्यक्तीच असते. जगातील सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे रमाबाईच्या दृष्टीकोनातून माधवराव म्हणजे स्वामी होय.

### १.४.४. स्मरणगाथा :

लेखक गोपाळ निलकंठ दांडेकर यांनी आपले स्वतःचे बालपण ते तारूण्यापर्यंतचा म्हणजे वयाच्या ३० वर्षापर्यंतच्या कालखंडातील जीवनप्रवास स्मरणगाथा या कादंबरीत मांडला आहे. या कादंबरीचे स्वरूप हे आत्मचरित्रापेक्षा स्मरण साखळी सारखे आहे. आपल्या जीवनातील अनेक घटना प्रसंग, भ्रमंती व त्या अनुषंगाने त्यांना ज्या थोरव्यक्तींचा सहवास लाभला त्यांची व्यक्तिचित्रणे तसेच विविध परिसरातील भौगोलिक नैसर्गिक वातावरणाची यथासांग मांडणी त्यांना स्मरणावर आधारित केली म्हणूनच त्यांनी या स्वानुभवांना एकत्रितपणे 'स्मरणगाथा' संबोधले आहे.

### १.४.५. सत्तांतर :

सत्तांतर होणे म्हणजे एक सत्ता जाऊन त्या जागी दुसरी सत्ता येणे. सत्तांतरच्या शीर्षकाविषयी मीरा तारळेकर म्हणतात, ''सत्तांतर म्हणजे एक नायक जाऊन तेथे दुसरा नायक येणे, एकाचा पराभव आणि दुसऱ्याचा विजय म्हणजेच सत्तांतर. जे वानरांमध्ये तेच त्याच्या वंशजांमध्ये म्हणजे मनुष्यप्राण्यांमध्ये आज चाललेले आहे. यात संपूर्ण मानव जातीच्या मनोव्यापाराचे, अस्तित्ववादी प्रवृत्तीचं दर्शन माडगूळकर घडवितात. जीवनाची, जगण्याची एक बाजू वानरांच्या टोळयांच्या सत्तांतराच्या निमित्ताने माडगूळकर आपल्या समोर आणतात.''[१०१] 'सत्तांतर' म्हणजे एक सत्ता जाऊन त्याच्या जाग्यावर दुसऱ्याची सत्ता येणे. थोडक्यात सत्तेत बदल होणे. माडगूळकर 'सत्तांतर' च्या प्रस्तावनेत म्हणतात, '''सत्तांतरा'प्रमाणे सुरुवात उन्हाळ्यातील उजाड पानगळीच्या जंगलाने आणि शेवट धुवाँधार पहिल्या पावसाने, सुरुवात बोथरी वानरी रानकुत्र्यांकडून मारली आणि खाल्ली जाते, या प्रसंगाने आणि ढोकरी पक्ष्यांच्या मगरीच्या जनन सोहळ्याने, तरणी वानरी विते आणि चिमुरड्या पोराला जन्म देते. या प्रसंगाने अशी रचना करण्याची गरज कादंबरी-लेखकाला असते, शास्त्रज्ञाला नसते. शेवटी संबंध कादंबरी ही वानरांच्या जीवन वर्णनातून मानवी सत्तासंघर्षावर, चालू राजकीय स्थितीवर मूकपणे टीका-टिपणी करते, अशा स्वरुपाचे अर्थ समीक्षकांकडून वाढते जातात. तसे शास्त्रीय ग्रंथातून निघत नाहीत.''[१०२]

''दिवस उगवायला तीन-चार घटका बाकी असताना तरणी व्यालो. तिला एवढसं चिमुरडं पोर झालं. तिनं ते चाटूनपुसून स्वच्छ केलं. दोन्ही हातांनी उचलून वर धरलं आणि बघितलं - काय आहे? नर की मादी? नर होता. त्याचे नाजूक लालचूटूक हात तिनं निरखून निरखून पाहिले. त्यांचा वास घेतला. ते चाटले. लालचुटूक कान, कुल्ले आणि सगळं अंग गडद तपकिरी रंगाचं. काही तासातच ते एवढसं पोर, दोन्ही हातांनी, दोन्ही पायांनी आईच्या पोटाला घट्ट चिकटायला

लागलं. शोधून-शोधून, छातीशी डोकं घुसमटून दूध प्यायला लागलं. हा पोर मुडाचा होता. सत्तांतरानंतर जन्माला आल्यामुळेच केवळ तो वाचणार होता. कदाचित जगला, वाचला, तर हाच उद्या सहा वर्षाचा होऊन मोगाला घायाळ करणारा होता आणि टोळीचा मालक होणार होता. हे राज्य त्याचं होणार होतं. हजारो वर्ष फिरत आलेलं सत्तासंघर्षाचं हे रहाटगाडगं असंच फिरत राहणार होतं.''(पृ.६२) लेखकाने हया प्रसंगातून कादंबरीचा समारोप केला आहे. त्यातूनही लेखक सत्तासंघर्षाचे बीज आपणासमोर ठेवत असलेला दिसतो. प्रस्तुत कादंबरीतील मुडा, मोगा, लालबुडया, दाढीवाला एकमेकांबरोबर संघर्ष करुन आपल्या टोळीची सत्ता प्रस्थापित करताना दिसतात. प्रत्येक वळणावर कादंबरीत सत्तांतर झालेले दिसून येते. हे सत्तांतराचे रहाटगाडगे सतत चालूच राहणार आहे हे यातून सूचित होते.

**१.४.६. झोंबी :**

'झोंबी' ही आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. या कादंबरीत लेखकाने त्याच्या आई-वडिलांचा विवाह, लेखकाचा जन्म, त्याचा शाळा प्रवेश ते लेखकाचे एस. एस. सी. पर्यंतचे शिक्षण या कालखंडातील लेखकाच्या जीवनातील घटना-प्रसंग झोंबीमध्ये रेखाटले आहेत. 'झोंबी' हा ग्रामीण भाषेतील शब्द आहे. त्याचा अर्थ आहे, जीवनात येणाऱ्या संकटांशी झुंज देणे. कादंबरीच्या दृष्टीकोनातून झोंबीचा अन्वयार्थ लावायचा झाल्यास तो पुढीलप्रमाणे सांगता येईल. झोंबीचा अर्थ आहे आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी कितीही संकटे आपल्या मार्गात आली तरी त्यांना न जुमानता आपले ध्येय पूर्ण करण्यासाठी झटणे, असे मला वाटते.

आनंद यादव यांचीही आपल्या जीवनाशी झोंबी चालली होती. लेखकाला शिकण्याची प्रचंड इच्छा होती. शिक्षण घेतल्यावर आपल्याला नोकरी मिळेल व आपले हालाकीचे दिवस बदलतील अशी आनंदची माफक अपेक्षा होती. परंतु रतनू म्हणजे लेखकांचे वडील त्याच्या शिक्षणाला विरोध करीत होते. वडीलांची अपेक्षा आनंदने आपला पारंपरिक व्यवसाय करावा आणि म्हणून मुलगा आणि बाप यांच्यात हाडवैर होते. अनेकवेळा वडिलांनी आनंदला खूप मारले होते. पण आनंदने शेतीची कामे करुन, वडिलांचा मार खाऊन शाळाही केली व प्रत्येकवेळी पहिल्या नंबरने पास होऊन दाखविले. अठरा विश्व दारिद्रय, शेतीची कामे, वडीलांचा मार, पुस्तकांसाठी, फी साठी असलेली आर्थिक अडचण या शिक्षणातील संकटांशी सामना करत झोंबी घेत लेखकाने आपले शिक्षणाचे ध्येय गाठले. एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. नुसते पूर्ण केले नाही तर आनंद हायस्कुलच्या विद्यार्थ्यांत तिसऱ्या नंबराने पास झाला होता.

### १.४.७. झाडाझडती :

'झाडाझडती' ही कादंबरी विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांच्या दुःखाला वाचा फोडण्यासाठी लिहिलेली आहे. पूर्वाश्रमीचे जांभळी हे गाव सुखाने नांदत होते. सुखात राहत असलेल्या या गावात, जांभळीकरांच्या जीवनात धरणाने  माती कालविली. पिढयान्‌पिढ्या ज्या गावात लोकांचे जीवन गेले, त्यांच्या डोळ्यासमोर त्यांच्या शेतातील बागांना मोठ्या कष्टाने उभ्या केलेल्या घरांना बुलडोझरने नष्ट केले. त्यावेळी त्यांना झालेल्या वेदनांची कल्पनाच करवत नाही आणि म्हणूनच गोईंदासारख्या हलक्या मनाच्या धरणग्रस्ताने आत्मघात केला. आपले घरदार, शेतीवाडी मातीमोल किमतीला विकून धरणग्रस्त विस्थापित झाले. पुर्नर्वसित गावांमध्ये त्यांना तुच्छतेची वागणूक मिळाली. जमिनी संपादन करण्यासाठी सरकारचा उंबरा झिजवावा लागला. शैक्षणिक सुविधा, पाणी तसेच स्मशानभूमी, घरे मिळविण्यासाठी झगडावे लागले. हैबती सारख्या तरुणाला पित्याच्या प्रेमाला पारखे व्हावे लागले. नामाची मुलगी रुपा की जिच्यावर त्याचा जीव जडला होता पण धरणग्रस्त म्हणून रुपाने हैबतीला नकार दिला. जीवनाच्या अंतापर्यंत भ्रष्टाचारीच्या सरकारी यंत्रणेमुळे नोकरीत कायम होता आले नाही. पुनर्वसित गावाच्या राघू भिवा सारख्या उद्दाम व्यक्तीने शेती मिळू दिली नाही. खैरापूर वासियांनी हैबतीला बेदम मारले. शेवटच्या उपचारासाठी दवाखान्यापर्यंत देखील पोहचू दिले नाही. म्हणजेच हैबतीच्या जीवनाची झाडाझडती सरलीच नाही. झाडाझडतीच्या शीर्षकाविषयी डॉ. आशा सावदेकर म्हणतात, '''झडती' म्हणजे सूक्ष्म तपासणी, धांडोळा तर 'झाडा-झडती' म्हणजे कवडीकवडीचा हिशेब घेणे, जाब विचारणे होय.''[१०३]

कादंबरी नायक खैरमोडे गुरुजी यांनी धरण होऊ नये म्हणून आंदोलन केले. जांभळी धरणाला तीव्र विरोध केला. पण खासदार शिंगाडे यांनी विकासाच्या गोंडस नावाखाली जांभळीकर धरणग्रस्त व इतर गावांना मृत्यूच्या दाढेत लोटले. खैरमोडे गुरुजींनी धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी तसेच धरणग्रस्तांच्या मुलांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून सरकराचा उंबरा झिजवला. पण त्यांच्या पदरात काहीही पडले नाही. खैरापुरातील धनदांडग्यांनी त्यांना मारहाण केली. त्यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला. वेळोवेळी भ्रष्टाचारी लोकांनी गुरुजींना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. 'विकासाला विरोध करणाऱ्या खैरमोडे गुरुजींनी माजी जिल्हाधिकाऱ्याच्या मदतीने भरपूर माया जमा केली आहे. त्यांचा एक टोलजंग बंगला आंबेपूरला असून हा म्हातारा मतलबी शाळा मास्तर धरणग्रस्तांची फसवणूक करतो. त्यांचा नेता असल्याची ऐट मारतो.'(पृ.४०७) असा बदनामीकारक मथळा वृत्तपत्रात छापला होता. यावरुन खैरमोडे गुरुजींनी निःस्वार्थी वृत्तीने धरणग्रस्तांसाठी कार्य केले.

परंतु लालची पुढारी व भ्रष्ट कर्मचारी यांनी त्यांची सतत गळचेपी केली. त्यांच्या प्राणाहून प्रिय असलेल्या शेवंताच्या जीवनाची धुळधाण झाली. अशाप्रकारे खैरमोडे गुरुजींनी आयुष्यभर फक्त जीवनाशी झुंज दिली. डॉ. आशा सावदेकर म्हणतात, ''झाडाझडती (१९९१) ही विश्वास पाटील यांची कादंबरी म्हणजे एका समुहाचा आक्रोश आहे. त्यात जातीचे बंधन नाहीत, समाजस्तराचे नाहीत, तो माणसांचा आक्रोश आहे. शासन, त्यातील अधिकारी, त्यांच्या भ्रष्टाचारी प्रवृत्तीला दाणापाणी घालणारी व सामाजिक आडदांडपणा जोपासणारी राजकीय स्थितीगती, विशिष्ट प्रदेश, त्यातील शेती, वाडी, जमीन यात गुंतलेली साधीसुधी माणसे, त्यांचे दुःखभोग, त्यांची सामाजिक, राजकीयख आर्थिक आणि सांस्कृतिक परिप्रेक्ष्यात गुंतलेली पाळेमुळे यांची एकजिनसी तरीही बहुपेडी अशी गुंफण साकार करते आणि म्हणून समकालीन ग्रामीण, राजकीय, सामाजिक संस्कृतीचाच 'झाडाझडती' बनते.''[१०४] वरील सगळ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी होऊन झाडाझडती चालूच होती.

शिवराम सणगर धरणाच्या कामावर असताना बुलडोझरखाली चिरडला गेला. त्याच्या जाण्याने त्याची पत्नी नकुसा व मुलगा यांचा आधार गेला. अनुकंपा म्हणून नकुसाला सरकारने जमीनदेखील दिली नाही. जंगलाच्या राजासारखा राहिलेला कुशापा पण धरणाने त्याच्या जीवन भिकाऱ्यासारखे केले. 'एकेकाळी वाघासारखा जंगलातून गुरगुरत हिंडणारा आणि स्वतःला जंगलचा राजा समजणारा कुशापा हातात घुंगराची काठी घेऊन गुराख्यासारखा हॉटेलच्या बाहेर खडा राहणारा होता.'(पृ.४५९) गावातील बलुतेदार अन्नाला मोताद झाले होते. गोम्या कोळयाची अवस्था वेडयासारखी झाली होती. आवडाई नकूसा, फुला यांची कपाळ पांढरी झाली होती. शेवंताच्या आयुष्याचे मातेरे झाले होते.

खैरमोडे गुरुजींनी धरणग्रस्तांना स्मशानभूमीत जागा मिळावी म्हणून सरकार दरबारी वारंवार अर्ज केले पण त्या अर्जांना जुमानले नाही. धनाढय लोकांच्या बागा फुलाव्यात, ऊसमळे झुलावेत, साखर कारखाने निघावेत, यंत्रे चालावीत, शिक्षितांच्या घराघरात वीज खेळावी म्हणून धरणग्रस्तांचे भवितव्य प्रकल्पाच्या घशात कोंबले. विकासाचा नारळ फोडण्यासाठी दगड म्हणून धरणग्रस्तांची डोकी वापरली. धरणग्रस्तांना मात्र पाण्यासाठी, स्मशानासाठी भिका मागण्याची वेळ आणली. धरणग्रस्तांची 'जीवंतपणी आणि मेल्यावरही झडती चालूच' (पृ.४०५) ह्यावरून झाडाझडती हे शीर्षक कथानकाला समर्पक आहे.

### १.४.८. राघववेळ :

'राघववेळ' कादंबरीचे हे शीर्षक कादंबरीची समर्पकता दाखविणारे आहे. उज्ज्वल भविष्याची पहाट दाखविणारी राघववेळ आहे. रघुने मॅट्रीकची परीक्षा पास होणे म्हणजे त्याच्या दृष्टीने आपल्या आयुष्यातील विकासाचा रामप्रहरच झाला आहे. येथून पुढे आपल्या आयुष्यात चांगले दिवस येतील त्याची जणू ही नांदीच आहे. शिक्षणाच्यादृष्टीने मॅट्रिक होणे ही आपल्या जीवनातील पहाटच आहे. असे रघु व वालंबीला वाटते.  एस. एस. सी. चा टप्पा आपल्याला पुढील शिक्षणासाठी दिशादर्शक ठरणारा असतो. म्हणून 'राघववेळ' हे शीर्षक कादंबरीची उंची वाढविणारे आणि समर्पक आहे.

### १.४.९. ताम्रपट :

'ताम्रपट' हे एक सन्मानचिन्ह आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्याला पंचवीस वर्षे पुर्ण झाल्यामुळे तत्कालिन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपट प्रदान केले. कादंबरीचा कालखंड हा इसवी सन १९४२ ते १९७९ असा असून आठशे सात पानांच्या या विशाल पटात लेखकाने स्वातंत्र्यपूर्व चळवळींचा, स्वातंत्र्य सैनिकांच्या लढ्याचा तसेच स्वातंत्र्य प्राप्तीनंतरच्या राजकारणाचा इतिहास मांडला आहे. दादासाहेबांसारख्या सच्च्या कार्यकर्त्याला 'ताम्रपट' मिळाल्याने कृतकृत्य झाल्यासारखे वाटते. ताम्रपटाची शोभा खऱ्या अर्थाने दादासाहेबांसारख्यांच्या बंगल्यात वाढते. 'ताम्रपट' अनेक स्वातंत्र्य सैनिकांना मिळाला. परंतु दोन खोल्यांच्या जुनाट घरात 'ताम्रपट' शोभा देणार नाही. दादासाहेबांच्या बंगल्याला दिलेले हे नाव शोभून दिसते. सुंदर भव्य फ्रेममध्ये ठेवलेला 'ताम्रपट' शोभिवंत आहे. यात लिहिलेला मजकूर

सत्यमेव् जयते्

भारत सरकार

> स्वतंत्राके पच्चीसवे वर्ष
> के अवसर पर स्वतंत्रता संग्राममें
> स्मरणीय योगदान के लिए राष्ट्र की
> ओरसे प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधीने
> यह ताम्रपट भेंट किया.

१५ अगस्त १९७२

२४ श्रावण १८१४ शकाब्द (पृ.६०१)

दादासाहेब भोईटे पाटलांनी स्वातंत्र्यसैनिकाची भूमिका सर्वार्थाने पार पाडली. व स्वातंत्र्यानंतर मिळालेल्या लाभांचा आस्वादही घेतला. त्यांनी त्यांचे वैयक्तिक जीवनमान, प्रतिष्ठा, समृद्धी, ऐश्वर्य, सत्ता अशा सर्वांगाने उपभोगले.

कादंबरी नायक नाना सिरुर हे स्वातंत्र्याचे सच्चे प्रेरक पण आपल्या आदर्शवादी विचारधारेमुळे ते मात्र सुखवस्तू, भोगविलासी जीवनापासून अलिप्त राहिले. देशातील स्वातंत्र्यसैनिकांना 'ताम्रपट' प्रदान करण्यासाठी ज्यांनी अपार कष्ट केले, असे नाना सन्मानरुपी ताम्रपटापासून अलिप्त राहीले. भ्रष्टाचारी वृत्तीने बरबटलेल्या समाजाला असा सच्चा कार्यकर्ता भावला नाही. कारण जेंव्हा ते निवडणुकीला सामोरे गेले तेव्हा त्यांना पराभवाला सामोरे लावे लागले. सूर्य आग ओकतो. त्याच्या झळा माणसाला असह्य होतात. पण तो अन्नही तयार करतो. हा एक कारुण्याचा प्रकार आहे. 'जीवो जीवस्य जीवनम्' या निसर्गाच्या नियमानुसार सारी सृष्टी चालते. कादंबरीच्या अखेरीस नाना अंतर्मुख होतांना दिसतात. आयुष्याने आपल्याला पुष्कळ दिले. कोणत्याही सामान्य माणसासारखा करुणेचा 'ताम्रपट' आपण छातीत घेवून आलो होतो. आपल्या मर्यादेत आपण माणसांवर प्रेम केले आणि अखेरच्या क्षणी करुणेचा उजेडही पाहिला. कादंबरीला साजेल अशी शीर्षकाची समर्पकता म्हणून 'ताम्रपट' अधोरेखित होते.

**१.४.१०. तणकट :**

'तणकट' या शब्दाचा अर्थ पिकात वाढणारे निरुपयोगी गवत. तणकटाला शेतातून, पिकातून कितीही नष्ट करण्याचा प्रयत्न केला, तरी ते पुन्हा पुन्हा उगवते व शेतकरी पिकाचे नुकसान करणाऱ्या तणकटाच्यामागे हात धुवून लागतो.

**१.४.११. डांगोरा एका नगरीचा :**

करा रे हाकारा
पिटा रे डांगोरा :
नगरात कोणी उपाशी? तापाशी?
उपाशी नाही, तापाशी नाही...
माळ्याचा माळा पिकला आहे
विहिरीला पाणी लागलं आहे!
सुर्यनारायण जेवायला बैसले
पहिल्या घासास केस लागला!

अग अग, कोण्या पापिणीचा केस हा?

पापिणी नाहीः स्वामीनी नाही

राजाच्या राणीला दलिंदर आले आहे...

न्हाली नाही, ल्याली नाही

अंधार कोन्यात बैसली आहे !

प्रस्तुत कादंबरीच्या शीर्षकाचे रहस्य वरील काव्यओळीतून लेखक मांडतो. साईखेडा ह्या संस्थानात कोणी, उपाशी–तापाशी पाही. परंतु सर्वचजण भितीच्या दडपणाखाली आहे. राजाची राणी मुठभर लोकांच्या सांगण्यावरुन, कुटकारस्थान करणाऱ्या लोकांनाच जवळ करते. सच्चे, प्रामाणिक मात्र दूरावलले दिसतात. सर्वत्र भ्रष्टाचार, अनाचार, लुबाडणूक पावलोपावली दिसते. सर्वचजण नगरीच्या नावाने डांगोरा पिटत असलेले दिसतात.

**१.४.१२. बारोमास :**

'बारोमास' हे कादंबरीला दिलेले शीर्षक अतिशय समर्पक आहे. बारोमास याचा अर्थ बारा महिने. बाराही महिने शेतकऱ्याला दारिद्र्यात जीवन जगावे लागते. शेतीच्या तुटपुंज्या उत्पन्नावर शेतकऱ्याला आपल्या जीवनावश्यक गरजा भागविणे ही शक्य होत नाही. जगाचा पोशिंदा असणारा, जगाचा पालनकर्ता मात्र सतत हालअपेष्टा सहन करतो.

**१.४.१३. भूमी :**

भूमी या कादंबरीची नायिका मैथिली आहे. मैथिली तिच्या नावाविषयी म्हणते, ''मी माझ जे काही व्यक्त रुप आहे, ते त्या पुराणकालीन मैथिलीच्या नावाशी एकदम न जुळणारं आहे. यावरुन पुढं मग मला वाटलं, की मैथिलीचं हे रुप तिच्यावर वाल्मीकींना लादलं आहे. यावरुन मग मला सारखं वाटायचं की अयोनी संभवा अशी ती एक वेगळी स्त्री त्यांना अभिप्रेत होती, पण तशी ती त्यांच्या हातून निर्माण झाली नाही, रामानं तिचं तेज झाकोळून टाकलं, रामासारख्या पुरुषोत्तमानं जिच्यावर जिवापाड प्रेम केलं, असा रामाचाच संदर्भ घेऊन ती वावरली. इथं वाल्मिकी हा रामायणाचा लेखक, पण तो पुरुष होऊनच सीतेला बघतो.''(पृ.१९८) यावरुन मैथिली म्हणजे जानकी, प्रभू रामचंद्राची पत्नी तिच भूमीकन्या होय. या भूमीकन्येला रामाने अग्निपरीक्षा दयायला लावले. आधुनिक मैथिली मात्र आत्मनिर्भर होतांना दिसते. स्वत: तेजस्वी बनते.

### १.४.१४. उत्सुकतेने मी झोपलो :

'उत्सुकतेने मी झोपलो' या कादंबरीतील पहिल्या भागाचे नाव आहे 'कुटुंबव्यवस्था आणि चांदणे' अनेक लेखकांनी व कवींनी चांदण्यांना आपल्या लेखनामध्ये मोठे स्थान दिले आहे. चांदण्याच्या आल्हाददायक प्रकाशात नवनिर्मिती झाली आहे. चांदणे हे नवनिर्मितीचे, सृजनशीलतेचे प्रतिक आहे. चांदण्यांचा कुटुंबव्यवस्थेशी संबध लावल्या तर मात्र विरोधाभास आहे. कारण कुटुंबव्यवस्थेत ज्ञानाला सृजनाला जागा नाही हे सांगण्यासाठी लेखकांनी चांदणे हे प्रतिक म्हणून वापरलेले आहे.(पृ.३४२)

### १.४.१५. खारीच्या वाटा :

ल.म. कडू यांच्या 'खारीच्या वाटा' या कादंबरीमध्ये लेखक, दिनू या किशोरवयीन मुलांनी पाळलेली खार व तिच्या करामती रेखाटल्या आहेत. लेखकाने लुकीला घरी आणले तेव्हा लुकी म्हणजे मांसाचा गोळा भासत होती. या मांसाच्या गोळ्याला आकार देण्याचे काम, लेखक व विशेषतः दिनू यांनी केले. प्रथम तिला लेखकाच्या अंगा खांद्यावर खेळविण्यासाठी दिनूने शक्कल लढविली. खार घरभर फिरू लागली. घरापेक्षा अंगणात, परढ्यात लुकीचा वावर वाढला. चिंचेचे झाड एवढचं तिच विश्व मर्यादीत राहिलं नाही. चांगलच रूंदावल. कुंपणाच्या झुडपांतून काटेकुटे चुकवतं ती सैराट धावायची. बांबूच्या बेटात वळसे घालणं, बेलाच्या झाडाचा शेंडा गाठणे, जांभळी, पिपरणं, आंबा असा सारा परिसर ती मनसोक्त हिंडायची. अशा प्रकारे लुकीने सारा परिसर पादाक्रांत केला. ती हिंडण्याफिरण्यात तरबेज झाली.

लुकीला पिकलेल्या पाडांचा सुगावा लागतो. या तिच्या कौशल्याचा दिनू ने स्वतःसाठी फायदा करून घेण्याचं ठरविले. लुकीला पाड तपासणीचे कसब दिनूने शिकविले व लुकीमागे जाऊ लागले. लेखक म्हणतो, 'आता तीच आमचा वाटाड्या झाली होती.'(पृ.६१) दिनूच्या बुद्धी चातुर्याने त्याने लुकीला हिरडा हुंगायला लावले व त्या प्रकारचा वास शोधण्यासाठी फिरू लागले. इतर मुलांनी लपवून ठेवलेला हिरड्यांचा ऐवज लुकी शोधून काढीत होती. त्या हिरड्यावर लेखक व दिनू डल्ला मारीत. लेखक म्हणतो, 'माल विकणारे पहिले आम्हीच होतो. जवळजवळ मणभर हिरडे विकले.'(पृ.१२१) खारीच्या विस्तारलेल्या वाटांचा लेखक व दिनूला फायदाच झाला होता. लुकीने शोधलेल्या वाटांवर मार्गक्रम करणे हा ह्या दोघांचा दिनक्रमच झाला होता. म्हणूनच कादंबरीला दिलेले खारीच्या वाटा हे नाव समर्पक वाटते. लेखक व दिनू यांना लुकी नावाच्या खारीच्या पिलाने (खारीने) अनेक वाटा, मार्ग, दाखविले. त्या वाटांनीच लेखक व दिनूचे

लहानपणीचे बरेचशे मार्ग, दिशा ठरविण्यात आल्या म्हणून ह्या कादंबरीचे शीर्षक 'खारीच्या वाटा' समर्पक वाटते.

**१.४.१६. फेसाटी :**

'फेसाटी' ही कादंबरी म्हणजे लेखकाच्या संघर्षाची कथा आहे. प्रा.डॉ. रणधीर शिंदे म्हणतात, ''ग्रामीण परिसरातील सर्व तऱ्हेच्या अभावग्रस्त कुटुंबातील जीवघेण्या संघर्षाची, धडपडीची कहाणी या कादंबरीतून लेखक गोरे यांनी मांडली आहे.'' तसेच लेखक ही म्हणतात, ''फेसाटी'तून वंचित जगाच्या वेदना मी मांडल्या आहेत. ही केवळ कादंबरीच नव्हे तर माझ्या संघर्षाची कथा आहे.''[१०५]

कादंबरीत 'फेसाटी' या शब्दाचा उल्लेख पुढील उताऱ्यात आला आहे. 'मिरगाचा पाऊस चांगलाच खवळून उठला. काकानं दुसऱ्याच श्यात निम्म्यानं केलं हुतं. पिकत तर तसं कायच नव्हतं जी थोडंफार पिकल तीबी निम्म्यावारी जाऊन लागवडीतच राबून नुसती अंगाची फेसाटी हुयाची वर्षभर राबलं तर एक दोन पोती दाणं, कडबा ह्याचा. घरात पाच-सहा लेकरं खायची हुती ती उपाशी मरायची'(पृ.१७) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची शीर्षके ही प्रस्तुत कादंबऱ्यांच्या आशयाचा सार व्यक्त करताना दिसतात. प्रत्येक शीर्षकातून एक गर्भित अर्थ व्यक्त झालेला आहे.

**१.३. समारोप :**

'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व' ह्या तिसऱ्या प्रकरणात एकुण सोळा कादंबऱ्यांच्या आशयाचा थोडक्यात कथानकाच्या अंगाने विचार केलेला आहे. प्रस्तुत कादंबऱ्यांची कथानके यात मांडलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात 'ययाति', 'रथचक्र', 'स्वामी', 'स्मरणगाथा', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'ताम्रपट', 'तणकट', 'डांगोरा एका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी', 'उत्सुकतेने मी झोपलो', 'खारीच्या वाटा', 'फेसाटी' हया कादंबऱ्यांचे आशयविश्व थोडक्यात जाणून घेतले आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये विविध प्रकारच्या कादंबरी वाङ्मय प्रकारांचा समावेश झालेला आहे. पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी, प्रयोगशील कादंबरी, बालकादंबरी, आत्मकथनात्मक कादंबरी, इत्यादी प्रकारच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. 'ययाती' या कादंबरीमधून पौराणिकतेचा संदर्भ घेऊन महाभारतातल्या एका उपआख्यानावर सदर पौराणिक कादंबरी लिहिली गेलेली आहे. तर 'रथचक्र'

ही कादंबरी कोकणातील प्रादेशिकतेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून आपल्या समोर साकार केलेली आहे. 'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावरील ऐतिहासिक-चरित्रात्मक कादंबरी आहे. 'स्मरणगाथा' ही गो.नि. दांडेकरांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. 'सत्तांतर' ही वानर जीवनाचे, सत्ता संघर्षाचे चित्रण करणारी प्राणी जीवनावरील महत्त्वाची कादंबरी आहे. 'झोंबी' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी ग्रामीण साहित्यातील एक मैलाचा दगड ठरलेली आहे. या कादंबरीपासून आत्मचरित्रात्मक कादंबरी हा एक कादंबरीचा प्रकार आनंद यादवांनी रूढ केलेला दिसून येतो. झोंबीतील पितापुत्रांचे नाते प्रल्हाद हिरण्यकश्यपू प्रमाणे पण स्मरणगाथेमधील पितापुत्राचे बालपणीचे नाते स्नेहाचे असलेले दिसते. रतनूचा आनंदच्या शिक्षणाला विरोध होता तर गोपाळचे वडील स्वतः शिक्षक असल्यामुळे गोपाळने शिकावे म्हणून ते प्रयत्न करीत होते. 'स्मरणगाथा' व 'झोंबी' मध्ये आठ आठ दहा दहा पोरे असलेली दिसून येतात. नाथाची आई व आनंदची आई दोघींमध्ये साम्य असलेले दिसून येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा उल्लेख 'झोंबी', 'स्मरणगाथा', 'ताम्रपट' या कादंबऱ्यांमध्ये आलेला दिसून येतो. 'ताम्रपट' व 'स्मरणगाथे'मध्ये स्वातंत्र्य संग्रामातील पुढाऱ्यांची मनोवृत्ती या सैनिकांच्या मुडद्यांच्या पायठाण्या करीत. वर चढून गळ्यात जयमाला घालून मिरवताना दिसतात. त्याचप्रमाणे 'ताम्रपट' मधील पुढारी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निवडणूक लढविताना एकमेकांवर कुरघोडी करताना दिसतात. 'झाडाझडती' ही कादंबरी धरणग्रस्तांच्या जीवनाची होणारी दुर्दशा, परवड व्यक्त करते. ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी उत्कृष्टरीतीने साकार झालेली आहे. संपूर्ण कादंबरी ही धरणग्रस्तांच्या दुःखालाच वाचा फोडणारी आहे. 'झाडाझडती' कादंबरीतील खैरमोडे गुरूजी स्वतः धरणग्रस्त होते. त्यांनी धरणग्रस्तांचे प्रश्न सरकार दरबारी अविरतपणे मांडले.

एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये सर्रासपणे पुरुष, स्त्रियां, मुले यांच्या संदर्भात आलेली निवेदन, स्वगते, संवाद, भाष्ये, वर्णन, म्हणी, शब्दकळा, सुभाषिते(सुविचार) ह्या बाबी सर्व पात्रांना उठाव देणार आणि कादंबरीचा ओघ कायम ठेवण्यास साहाय्यभूत ठरणाऱ्या अशी आहेत.

कादंबरीतील घटना-प्रसंगांची, पात्रांच्या मनाची उकल करण्याकरिता विविध निवेदन पद्धतीचा अवलंब करून सर्वसाक्षी भावाने पात्रांच्या बाह्यवर्तनाबरोबरच अंतर्मनाची उकलही होते.

प्रस्तुत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरीच्या भाषेचा विचार करता ती कादंबऱ्यांच्या विषयाला न्याय देणारी अत्यंत सहज, साधी, सोपी आहे ह्याचा प्रत्यय प्रत्येक

कादंबरीमधून येतो. त्यांची भाषा पात्रे ज्या परिसरात वावरतात, ज्या जाती-धर्माची ती पात्रे आहेत, त्या त्या समूहाची भाषा त्या त्या पात्रांच्या मुखी आलेली दिसून येते. ऐतिहासिक, पौराणिक, दलित, ग्रामीण, राजकीय इत्यादी स्वरूपाच्या कादंबऱ्या असल्याने त्या त्या काळानुरुप व्यक्तिनुरुप भाषेचे उपयोजन केले आहे. 'सत्तांतर' च्या भाषेने रंग, ताल, नाद, लय, रेखाचित्रे ह्या कलेशी निगडित असणाऱ्या भाषेचा आश्रय घेतलेला दिसतो. 'ययाति' सारख्या पौराणिक कादंबरीमध्ये योजलेली भाषा ही तत्कालिन भाषिक संकेत जपताना दिसते.

पात्रांच्या स्वगतातून म्हणजेच एकांतात स्वतःच्या मनाशी केलेल्या आत्मसंवादातून पात्राची विचारसरणी, तिची भावनात्मकता, तिची संवेदनशिलता व्यक्त होत असतानाच त्या पात्रांचा परिसर, त्या परिसरातील बोली, त्या परिसरातील रुढी संकेत, तेथील परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, तेथील व्यवसाय, त्यांच्या बोली ह्या सर्वांचा उलगडा ह्यातून होतो.

प्रस्तूत कादंबऱ्यांच्या संवादातून पात्रांच्या स्वभाववृत्ती, परस्परांतील प्रेम व आपुलकी, परस्परांतील द्वेष व हेवेदावे व्यक्त झाले आहेत. घटना प्रसंगांच्या साहाय्याने येणारे खटकेबाज संवाद पात्रांच्या भावभावनांचे विश्व उलगडून दाखविणारे आहेत. पात्रांच्या मनातील स्पंदने संवादातून साकार झालेली आहेत. पात्रांची जीवनशैली, विचारशैली समजून घेण्याच्या उद्देशाने म्हणी, वाक्रप्रचार उपयोगी ठरलेल्या आहेत. संवादातून विशिष्ट प्रकारची शब्दकळा, सुभाषिते(सुविचार), म्हणी, वाक्प्रचार वेळप्रसंगी पात्रांच्या तोंडून आलेल्या शिव्या समाजातील प्रचलित समजुती, त्या समाजाची संस्कृती समजण्यास साहाय्यभूत ठरतात. पात्रांच्या वागण्याबोलण्यातून त्यांचा सामाजिक स्तर, वर्ग, व्यवसाय, धर्म ह्या गोष्टी सहजपणे कळतात. प्रसंगी पौराणिक कथांचे, ऐतिहासिक कथांचे आलेले संदर्भ, शहरी, ग्रामीण जीवनातील काळानुरुप होणारी स्थित्यंतरे, दलितांमध्ये जागृत झालेले आत्मभान, हे दलितांवर होणारा अन्याय, विस्थापितांचे प्रश्न, प्राणी व आदीम माणसाची प्रवृत्ती या सर्व पात्रांच्या संवादातून साकार झालेला दिसतात. एखाद्या जागेतील वातावरणनिर्मिती, त्यातील सौंदर्य, लेखक आपल्या लेखनशैलीतून साकार करीत असतो. ते सौंदर्य खुलविण्यासाठी तो अनेक प्रतिमा, प्रतिके, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, शब्दांची रचना करतो. त्यातून लेखकाला एक प्रभावी परिणाम साधायचा असतो.

**१.४. संदर्भ व टीपा :**

१. लांडगे, शिरिषकुमार, *'चरित्रात्मक कादंबरी : स्वरूप व संकल्पना'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १ जुलै २०१८, पृ.११.

२. भोसले (डॉ.) पांडुरंग, *‘नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा’*, पांडुरंग प्रकाशन, पंढरपूर, २००४, पृ.६१.

३. *‘नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा’*, उ.नि., पृ.६७-६८.

४. *‘मराठीतील चरित्रात्मक कादंबरी’*, उ.नि., पृ.१५,१६.

५. खांडेकर वि.स., *‘ययाति’*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, आवृत्ती सदतिसावी-एप्रिल २०१५, पार्श्वभूमि, पृ.४०९.

६. कुरुंदकर नरहर, *‘धार आणि काठ’*, देशमुख आणि कंपनी, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९७२, पृ.२३०.

७. भोसले (डॉ.) द.ता., *‘साहित्यःआस्वाद आणि अनुभव’*, ग्रंथाली प्रकाशन, प्र.आ., ३ मार्च २०१२, पृ.१०२.

८. ठाकूर रविंद्र, *‘मराठी कादंबरी : समाजशास्त्रीय समीक्षा’*, पृ.३२८.

९. कुलकर्णी श्री.मा., *‘कादंबरी समीक्षा’*, उन्मेष प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, मार्च १९७२, पृ.२१२.

१०. सारडा शंकर, *‘काही पुस्तके, काही लेखक’*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६५, पृ.३९-४०.

११. बांदिवडेकर (डॉ.) चंद्रकांत, *‘देशीवाण’*, अक्षर प्रकाशन, पहिली आवृत्ती, मार्च २००२, पृ.१२३.

१२. लिमये नरूभाऊ, *‘दैनिक विशाल’*, सह्याद्री, पुणे, ८ मे १९७७ पृ.७.

१३. माडगूळकर व्यंकटेश, *‘सत्तांतर’*, प्रस्तावना, पृ.१८.

१४. मंचरकर रत्नाकर बापूराव, *‘सत्तांतर : एक पुननिर्मिती’*, साहित्यसूची, आक्टो. १९८६, पृ.२७.

१५. *‘देशीवाण’*, उ.नि., पृ.३७८.

१६. *‘देशीवाण’*, उ.नि., पृ.३७९.

१७. *‘झोंबी’*, प्रस्तावना, पृ.१५.

१८. *‘देशीवाण’*, उ.नि., पृ.४१४.

१९. सावदेकर आशा, *‘कांदबरीचा आशयवेध’*, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, पृ.१३८.

२०. देशीवाण, उ.नि., पृ.४६१-४६२.

२१. हातकणंगलेकर म.द., *'साहित्यविवेक'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९७, पृ.१५४.

२२. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.४६८.

२३. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.४६७.

२४. बांदिवडेकर चंद्रकांत, *'बारोमास : विराट अनुभवाची महाकाव्यीय अभिव्यक्ती'*, अंतर्नाद, एप्रिल २००५, पृ.४१.

२५. शेळके (डॉ.) भास्कर, *'ग्रंथवेध'*, प्रथम आवृती, शब्दालय प्रकाशन, पृ.१३९.

२६. तत्रैव, पृ.१४८.

२७. मोकाशी (डॉ.) मधुकर, *'ग्रामीण दलित साहित्य : चळवळ आणि समिक्षा'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पृ.४५३.

२८. कांबळे (डॉ.) शशिकला, *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, स्नेहवर्धन प्रकाशन, प्र.आ., २६ जाने.२०११, पुणे-३०, पृ.७५.

२९. जाधव मनोहर, (संपा), *'समीक्षेतील नव्या संकल्पना'*, अरुणा दुभाषी, 'भारतीय स्त्रीवाद' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. मार्च २००१, पृ.१४.

३०. *'कांदबरीचा आशयवेध'*, उ.नि., पृ.१३.

३१. खांडेकर वि.स., *'ययाति'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, ३७वी आवृत्ती, एप्रिल, २००५, पृ.४०५.

३२. चुनेकर सु.ना., *'ययाति : निरपेक्ष प्रेमाचा महामंत्र'*, अंतर्नाद, जुलै, २००६, पृ.३२.

३३. खांडेकर वि.स., *'ययाति'*, महेता पब्लिसिंग हाऊस, पुणे-३०. आवृत्ती-ऑगस्ट २००८, पार्श्वभूमी, पृ.४१९.

३४. *'कांदबरीचा आशयवेध'*, उ.नि., पृ.१६८.

३५. यादव आनंद, *'विशाखा'*, (दिवाळी अंक), जुलै-१९९२, पृ.८९.

३६. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.१२०.

३७. भोसले द.ता., *'साहित्य : आस्वाद आणि अनुभव'*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई-२८, प्रथमावृत्ती : ३० मार्च २०१२, पृ.१६४.

३८. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.३८३.

३९. तत्रैव, पृ.४४३.

४०. सलालकर राजेंद्र, *'रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील स्त्रीदर्शन'*, पृ.४७.

४१. *'रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील स्त्रीदर्शन'*, उ.नि., पृ.३८,३९.

४२. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.४७५.

४३. येळवंडे लक्ष्मीकांत, *'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या : एक आकलन'*, स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, आक्टोंबर २००७, पृ.९८.

४४. लिंबाळे शरणकुमार, *'वादंग'*, दिलीपराज प्रकाशन, पृ.३५१.

४५. रॉय अरूधंती, *'भूमी : एका आधुनिक मैथिलीचे जीवनायन'*, युगवाणी, एप्रिल–मे–जून २००७, पृ.२३.

४६. चौघुले उषा वि., आशा बगे, *'साहित्याची आस्वाद रूपे परंपरेचे नवे रूप'*, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, २०११, पृ. १४७, १४८.

४७. शिंदे (डॉ.) रणधीर, *'महाराष्ट्र टाईम्स्'*, दिवाळी अंक, २०१८, पृ.१६९.

४८. शेळके (डॉ.) भास्कर, *'मराठी प्रादेशीक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण'*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २५ एप्रिल २०१२, पृ.१६.

४९. साने गीता, *'भारतीय स्त्रीजीवन'*, मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ.१९.

५०. जाधव सरिता, पाटील सुनंदाः *'समाजव्यवस्था आणि कुटुंब, विवाह व नाती'*, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ, नाशिक, प्र.आ.जून २००२, पृ.४४.

५१. *'समाजव्यवस्था आणि कुटुंब, विवाह व नाती,'* उ.नि., पृ.४५.

५२. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.११८.

५३. चव्हाण रामनाथ, *'भटक्या विमुक्तांची जात पंचायत'*, देशमुख आणि कंपनी पब्लीशर्स, पुणे, प्र.आ., ५ मार्च २००२, पृ.१४.

५४. बांदिवडेकर चंद्रकांत, *'मराठी कादंबरीचा इतिहास'*, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे, द्वि.आ., १९९६, पृ.४.

५५. मेश्राम नंदा, *'दलित कादंबरी : स्वरूप व समिक्षा'*, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १६ डिसेंबर २००६, पृ. २४.

५६. बापट प्र.वा./गोडबोले ना.वा., *'मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास)'*, व्हीनस प्रकाशन, पुणे. तृतीय आवृत्ती, सप्टेंबर १९७३, पृ. ९६, ९७.

५७. तारळेकर मीरा, *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, साहित्य अकादमी प्रकाशन, २०१०, पृ.२९.

५८. तत्रैव, पृ.३०.

५९. *'कादंबरीचा आशयवेध'*, उ.नि., पृ.२२४.

६०. भोसले डॉ.पांडुरंग(संपा.), *'मराठी ग्रामीण साहित्य'*, शब्दवैभव प्रकाशन, पुणे, पृ.७२

६१. घोंगडे बाळासाहेब(संपा.), *'अक्षरपेरणी'*, (कादंबरी निर्मिती प्रक्रिया-विशेषांक २०१६, पृ.२२.

६२. गणोरकर प्रभा (संपा.), *'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश'*, जी.आर. भटकळ फाउंडेशन, पृ.८६)

६३. तत्रैव, पृ.८६.

६४. *'लोकमत'*, शनिवार दि. २३/०६/२०१८, पृ.८.

६५. क्षीरसागर श्री.के., *'टीका विवेक'*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर १९८५, पृ.८५.

६६. वैद्य सरोजिनी, बांदिवडेकर चंद्रकांत व इतर (संपा.), *'वाङ्मयीन महता'*, प्र.आ., मुंबई, जाने. १९९१, पृ.२५२.

६७. मनोहर यशवंत, *'नवे साहित्य शास्त्र'*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, द्वि.आ., १५ जुलै २००९, पृ.१७२.

६८. जाधव रा.ग., *'वाङ्मयीन निबंध लेखन'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ., १९८७, पृ.१२१.

६९. पारगावकर वि.शं., *'एका नवीन टप्प्यावर घडणारी कलाकृती'*, माणूस, जानेवारी १९९४, पृ.३०.

७०. *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, उ.नि., पृ.८३.

७१. *'चरित्रात्मक कादंबरी : स्वरूप व संकल्पना'*, उ.नि., पृ.१६.

७२. *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, उ.नि., पृ.६.

७३. *'देशिवाण'*, उ.नि., पृ.२६२.

७४. सारडा शंकर, *'ग्रंथसंवत्सर'*, पुष्प प्रकाशन, पुणे-७, प्रथमावृत्ती, १९९३, पृ.१७

७५. सानप (डॉ.) किशोर, *'प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर'*, बजाज पब्लिकेशन्स्, अमरावती, प्र.आ., १९९८, पृ.८६.

७६. *'लोकसत्ता'*, दि.२४/६/२०१८, पृ.१.

७७. *'लोकमत'*, शनिवार दि. २३/६/२०१८ पृ.६.

७८. *'दलित कादंबरी : स्वरूप व समिक्षा'*, उ.नि., पृ.३४.

७९. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.२६२.

८०. *भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, उ.नि., पृ.३१.

८१. *'ग्रंथवेध'*, उ.नि., पृ.२१८.

८२. *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, उ.नि., पृ.८१.

८३. *'दलित कादंबरी : स्वरुप व समीक्षा'*, उ.नि., पृ.३२.

८४. हस्तक उषा, *'कादंबरी आणि मराठी कादंबरी'*, (समीक्षा लेख), साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., नोव्हें. १९९३, पृ.७८.

८५. http://www.esakal.com

८६ थोरात हरिश्चंद्र, *'हे ईश्वरराव... हे पुरुषोत्तमराव... आशयसूत्रांचा शोध'*, अनुष्टुभ, जुलै–ऑगस्ट १९९५, पृ.३३.

८७. माडगूळकर व्यंकटेश, *'सत्तांतर'* (प्रस्तावना), मौज प्रकाशन, पृ.क्र.१५.

८८. *'मराठी वाङ्मय कोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा'*, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती–२००२, पृ.४१४.

८९. मालशे स.गं.(अनुवाद), *'साहित्य- सिध्दांत'*, म.रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, दु. आ., २००२, पृ.क्र.२४५.

९०. भागवत दुर्गा, *'लोकसाहित्याची रूपरेखा'*, वरदा बुक, पुणे–३०, द्वि. आ. १९७७, पृ.२७६.

९१. भिडे वि.वा., *'मराठी भाषेचे वाक्प्रचार व म्हणी'*, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्र.आ., ऑगस्ट १९७१, पृ.३५९.

९२. पाटील विजय, (संपा.), *'बारोमास: एक अन्वयार्थ'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजय नगर, पुणे–३०, प्रथमावृत्ती, २०११, पृ.७६.

९३. डांगे (प्रा.) दिनेश, *दै.पुढारी,* दि.२६/१०/२०१७, पृ.६.

९४. *'देशीवाण'*, उ.नि., पृ.१२२.

९५. *'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश'*, उ.नि., पृ.८६.

९६. *'कादंबरीचा आशयवेध'*, उ.नि., पृ.८३.

९७. *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, उ.नि., पृ.४.

९८. *'चरित्रात्मक कादंबरी : स्वरूप व संकल्पना'*, उ.नि., पृ.१६

९९. भागवत श्री.पु., रसाळ सुधीर व इतर(संपा.), *'साहित्य : अध्यापन आणि प्रकार'*, द्वि.आ., ऑक्टो.२०११, पृ.२७४.

१००. ठाकूर (डॉ.) रविंद्र, *'मराठी ग्रामीण कादंबरी, (१८८० ते २०००)'*, स्नेहवर्धन प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, १ सप्टेंबर २००१, पृ.क्र.१०४.

१०१. *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, उ.नि., पृ.२९.

१०२. माडगूळकर व्यंकटेश, *'सत्तांतर'* (प्रस्तावना), पृ.२१.

१०३. *'कादंबरीचा आशयवेध'*, उ.नि., पृ.१३६.

१०४. तत्रैव, पृ.२२२.

१०५. *'लोकमत'*, शनिवार दि. २३/०६/२०१८ पान नं. ८.


*****

**प्रकरण–पाच**

**संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारसी**

**उपसंहार**

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये ''साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरी : एक अभ्यास'' या प्रबंधामध्ये समाविष्ट केलेल्या प्रकरणांचा समारोप केला आहे. 'संशोधन विषयाची ओळख', त्या अनुषंगाने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन जडणघडण, 'संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा', 'संशोधनाची कार्यपद्धती' व त्या अनुषंगाने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व, 'माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन' त्या अनुषंगाने (अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे, (ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे, (क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ, (ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन ह्या गोष्टींचा विचार केलेला आहे.

'संशोधन विषयाची ओळख' ह्या पहिल्या प्रकरणात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन जडणघडण प्रस्तुत प्रकरणात मांडली आहे. त्यामध्ये कादंबऱ्यांच्या लेखकांचे बालपण, शिक्षण, कौटुंबिक पार्श्वभूमी, विविध साहित्यप्रकारांमध्ये त्यांनी केलेले लेखन आणि त्यासाठी त्यांना मिळालेले पुरस्कार याविषयी शोध घेण्यात आलेला आहे. 'संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा' ह्या दुसऱ्या प्रकरणामध्ये घेण्यात आलेला आहे. 'संशोधनाची कार्यपद्धती' व त्या अनुषंगाने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व, या तिसऱ्या प्रकरणामध्ये आशयाच्या अंगाने विचार करुन थोडक्यात प्रस्तुत कादंबऱ्यांचे आशयविश्व जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रकरण चार मध्ये 'माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन' त्या अनुषंगाने (अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे, (ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे, (क) साहित्य अकादमी

पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ, (ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन या घटकांचा विचार केलेला आहे. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील व्यक्तिचित्रणात प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेल्या पुरुष चित्रणांचा, स्त्री चित्रणांचा व त्या अनुषंगाने आलेल्या अनेक गौण पात्रांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंच्या अंगाने वेध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच त्या त्या पात्रांचे कादंबरीच्या अनुषंगाने कुटुंबातील व समाजातील स्थान जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ' यात कादंबरीचा श्रद्धास्थाने, अंधश्रद्धा, जातियता, पौराणिकता, कृषिजीवन, घटना-प्रसंग, बंडखोरी, संघर्ष, भूक, गावगाड्याचे चित्रण, शोषण, प्रथा परंपरा, धार्मिकता, अश्लिलता, व्यथा / वेदना या बाबींचा विचार केलेला आहे. 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन' हया यात प्रस्तुत कादंबऱ्यांच्या निवेदन पद्धतीच्या व भाषाशैलीच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला आहे. ह्या मध्ये भाषाशैली, निवेदनाचे स्वरुप, स्वगत, संवाद, भाष्ये, वर्णने, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा-प्रतिके, रुपके, शब्दकळा, सुभाषिते-सुविचार, शिव्या, शीर्षकाची समर्पकता, वातावरण निर्मिती, समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. संशोधनाचा सारांश, निष्कर्ष व शिफारसी ह्या पाचव्या प्रकरणात अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष आणि निरीक्षणे नोंदवलेली आहेत.

'संशोधन विषयाची ओळख' ह्या पहिल्या प्रकरणात संशोधन विषयाची ओळख करुन दिली आहे. तसेच 'साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्याच्या लेखकांचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मयीन जडणघडण' थोडक्यात मांडला आहे. ह्या मध्ये वि.स. खांडेकर, श्री.ना. पेंडसे, रणजित देसाई, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, विश्वास पाटील, नामदेव कांबळे, रंगनाथ पठारे, राजन गवस, त्र्यं.वि. सरदेशमुख, सदानंद देशमुख, आशा बगे, श्याम मनोहर, ल.म. कडू, नवनाथ गोरे ह्या लेखकांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय करुन देण्यात आला आहे. सदर ओळख ही परिचयात्मक असून प्रस्तुत लेखकांचे व्यक्तिमत्त्व कसे घडले, त्यांनी कोणते साहित्यप्रकार हाताळले, याचा थोडक्यात उहापोह केलेला आहे. त्यामध्ये प्रथमत: जन्म व कुटुंब यांची माहिती देऊन शिक्षण व नोकरीविषयीचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तुत लेखकांची वाङ्मयीन जडणघडण पाहताना त्यांनी कोणकोणत्या साहित्यप्रकारांमध्ये

लेखन केले आहे, त्याचा विचार करुन साहित्य क्षेत्रातील त्यांचे योगदान निश्चितच अधोरेखित होणारे आहे, हे स्पष्ट केलेले आहे. प्रस्तुत लेखक हे विविध साहित्यप्रकार हाताळतात, हे येथे मांडण्यात आले आहे. तसेच त्यांच्या ह्या वाङ्मयीन सेवेसाठी त्यांना देण्यात आलेल्या विविध प्रकारच्या पुरस्कारांची माहिती नमूद करताना त्यांना मिळालेल्या साहित्य अकादमीच्या पुरस्काराचा विशेषत्वाने समावेश केलेला आहे.

वि.स. खांडेकर हे शिक्षक होते. वि.स. खांडेकर यांच्या 'ययाति' ह्या कादंबरीला साहित्याच्या क्षेत्रातील 'ज्ञानपीठ' हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच 'ययाति'ला 'साहित्य अकादमी' हा ही मानाचा पुरस्कार मिळाला आहे. खांडेकरांचे लेखन हे ध्येयवादी आहे. त्यांच्या लेखनातून समाजजीवनावर भाष्य केलेले आहे. जीवनवादी लेखक म्हणून ते ओळखले जातात. कथा, कविता, लघुनिबंध, समीक्षा, चित्रपटांच्या कथा, नाटक, व्यक्तिचित्रे, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारात त्यांनी लेखन केलेले आहे. त्यांच्या अनेक पुस्तकांना विविध पुरस्कार मिळाले आहेत, डी.लिट. ही पदवी देऊन त्यांच्या साहित्यिक कार्याची दखल घेतली गेली आहे.

श्री.ना. पेंडसे यांनी बेस्ट कंपनीत सेवानिवृत्त होईपर्यंत नोकरी केली. कथालेखक व कादंबरीकार म्हणून त्यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. प्रारंभी त्यांनी आपल्या लेखनात कोकणातील विश्व व लोकजीवन यांचे चित्रण केले. नंतर त्यांनी महानगरीय अनुभव तेवढ्याच ताकदीने साकार केले. मराठी कादंबरीला प्रादेशिकतेची नवी प्रवृत्ती व प्रकृत्ती त्यांच्या कादंबऱ्यांनी रुढ करुन दिली आहे. लेखन कार्यासाठी साहित्य अकादमी पुरस्काराबरोबरच त्यांना अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.

रणजित देसाई ह्यांनी इंग्रजी शाळेत असतानाच आपल्या लेखनाला सुरुवात केली. कथा, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्मय प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. साहित्य अकादमी, पद्मश्री, महाराष्ट्र गौरव इत्यादी पुरस्कारांनी लेखक सन्मानित झाले आहेत.

गो.नि. दांडेकर यांनी विपुल साहित्य लेखन करुन मराठी साहित्याची सेवा केली आहे. 'शितू', 'पडघवली', 'माचीवरचा बुधा' ह्या कादंबऱ्यांमुळे मराठी कादंबरीला एका वेगळया उंचीवर त्यांनी नेऊन ठेवले आहे. मराठी कादंबरीच्या क्षेत्रात त्यांच्या कादंबऱ्यांचे योगदान

महत्वाचे ठरले आहे. अनेक पुरस्काराबरोबरच त्यांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांनी आपल्या कथासंग्रहांतून जास्तीतजास्त ग्रामीण जीवन वास्तव पूर्णतेने साकार करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य इत्यादी साहित्यप्रकारात त्यांनी समर्थपणे लेखन केलेले आहे. रंग, रेषा, चित्र, लय, ताल, निसर्ग इत्यादींच्या माध्यमातून एकूणच त्यांचे लेखन आविष्कृत झालेले आहे. साहित्य अकादमीने त्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेतली आहे.

आनंद यादव यांनी ग्रामीण साहित्याची चळवळ मोठ्या समर्थपणे रुजविली. ग्रामीण भागाची जाण आणि भान असलेला हा लेखक समर्थपणे लेखन करताना दिसतो. यादवांनी प्रथम आकाशवाणीवर नोकरी केली. नंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागात प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून त्यांनी काम केले. काव्य, कथा, कादंबरी, वैचारिक, ललित, समीक्षा, व्यक्तिचित्रे, बालकथा, विविध प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. 'साहित्य अकादमी' ह्या पुरस्काराबरोबरच साहित्य सेवेविषयी त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत.

विश्वास पाटील यांनी भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. शालेय शिक्षण घेत असतानाच त्यांना वाचनाची आवड लागली. कथा, वक्तृत्व, पोवाडे, लोकगीतांमुळे त्यांच्यावर साहित्याचे संस्कार झाले. 'मराठा', 'नवयुग' या नियतकालिकांमधून त्यांनी विशेष लेखन केले. महाविद्यालयीन शिक्षण घेताना त्यांचे कथालेखन चालू होते. त्यांनी एम.ए., एल.एल.बी.चे शिक्षण पूर्ण केले. ग्रामीण जीवनाच्या मुशीतून तावून-सुलाखून घडलेला हा लेखक पुढे प्रशासनात कुशल अधिकारी ठरला. 'साहित्य अकादमी' ह्या पुरस्कारासह साहित्याच्या सेवेबद्दल पस्तीसहून अधिक पुरस्कारांनी ते सन्मानित झाले आहेत.

नामदेव कांबळे यांनी दलित साहित्यात आपला एक वेगळा ठसा उमटविलेला आहे. राघववेळ, ऊनसावली, सांजरंग ह्या तीनही कादंबऱ्यांमधून त्यांनी संघर्षातून शिक्षणाचा आलेख आपणासमोर मांडलेला आहे. त्यांच्या 'राघववेळ' ह्या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेला आहे.

रंगनाथ पठारे हे संगमनेर महाविद्यालयात भौतिकशास्त्राचे प्राध्यापक होते. त्यांनी कथा, कादंबरी, अनुवाद, वैचारिक समीक्षा व संशोधनात्मक स्वरूपाचे लेखन करून मराठी साहित्यात

मोलाची भर टाकलेली आहे. साहित्य अकादमी पुरस्कारासह ते अनेक पुरस्कारांनी सन्मानित झालेले आहेत.

त्र्यं.वि. सरदेशमुख यांनी 'बखर : एका राजाची', 'डांगोरा एका नगरीचा', आणि 'उच्छाद' या त्रयींच्या माध्यमातून १९१० ते १९६० हा कालावधी व्यापलेला आहे. वर्तमानात भूत-भविष्य लपलेले असते. तिन्ही कृती आपापल्या जागी स्वयंपूर्ण वाटाव्यात अशा प्रकारच्या आहेत.

सदानंद देशमुख यांना लहानपणापासून अभिनय, वाचन व लेखनाची आवड लेखकाला आहे. कथा, कविता, ललितलेख, कादंबरी हे वाङ्मयप्रकार लेखकाने हाताळलेले आहे. साहित्य अकादमीसह अनेक पुरस्कार लेखकाला प्राप्त झालेले आहेत.

आशा बगे या साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यामधील एकमेव स्त्री लेखिका आहेत. अशा बगे यांनी मराठी साहित्य व संगीतात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. संसार सांभाळून त्यांनी लेखनाची आवड जोपासली आहे. त्यांच्या लेखनाची सुरूवात 'सत्यकथेपासून' झाली. श्री.पु. भागवत व राम पटवर्धन यांनी त्यांच्या लेखनशैलीला आकार दिला. तेरा लघुकथासंग्रहासह त्यांनी सात कादंबऱ्या लिहिल्या. अनेक पुस्तकांची संपादने व ललितलेखन त्यांनी केले आहे. अनुवादही त्यांनी केले. साहित्य अकादमीच्या पुरस्कारासह त्यांना अनेक पुरस्कारप्राप्त झाले आहेत. सन २०१८ साली राम शेवाळकर यांच्या नावाचा पहिला 'साहित्यव्रती' पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

श्याम मनोहर ह्या टोपणनावाने श्याम मनोहर आफळे यांनी लेखन केले आहे. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यात झाला. श्याम मनोहर हे सर परशुराम भाऊ महाविद्यालयात विज्ञानाचे प्राध्यापक होते. विद्यापीठातून त्यांनी एम.एस्सी.ची पदवी संपादन केली. लघुकथा, कादंबरी, नाटक ह्या साहित्यप्रकारातून त्यांनी लेखन केले. प्रचलित व प्रस्थापित असलेल्या लेखनशैलीला त्यांनी छेद दिला. एक प्रयोगशिल लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे अनेक भाषांमध्ये अनुवाद झाले आहेत. मनोहर हे 'साहित्य अकादमी' सह अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाले आहेत.

ल.म. कडू हे बाल साहित्यकार म्हणून प्रसिद्ध आहेत. लेखक, चित्रकार आणि प्रकाशक असा प्रतिभेचा त्रिवेणी संगम त्यांच्यामध्ये आहे. बालसाहित्यावर त्यांनी तीस पुस्तके

लिहिली आहेत. त्यांची 'गमभन' ही प्रकाशन संस्था आहे. 'साहित्य अकादमी' पुरस्कारासोबत त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

नवनाथ गोरे हे नव्या दमाचे लेखक आहेत. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यात झाला. शिवाजी विद्यापीठातून त्यांनी एम.ए.ची पदवी संपादन केली. सध्या ते शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागात प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांच्या बृहत संशोधन प्रकल्पाचे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत. लेखकाने काही कथांचे लेखन केले आहे. त्यांच्या 'फेसाटी' ह्या कादंबरीला प्रचंड वाचकप्रियता मिळाली. 'फेसाटी' ही कादंबरी 'साहित्य अकादमी' सह अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाली आहे.

'संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा' ह्या दुसऱ्या प्रकरणामध्ये संबंधित विषयाची पूर्वपाहणी करुन संबंधित विषयाचे महत्व अधोरेखित केले आहे. ह्या संशोधन साहित्याचा आढावा वेगवेगळ्या अंगाने घेण्यात आलेला आहे.

'संशोधनाची कार्यपद्धती' व त्या अनुषंगाने साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे आशयविश्व, ह्या तिसऱ्या प्रकरणामध्ये आशयाच्या अंगाने विचार करुन थोडक्यात प्रस्तुत कादंबऱ्यांचे आशयविश्व जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. या तिसऱ्या प्रकरणात एकूण सोळा कादंबऱ्यांच्या आशयाचा थोडक्यात आशयाच्या अंगाने विचार केलेला आहे. प्रस्तुत कादंबऱ्यांची कथानके यात मांडलेली आहेत. प्रस्तुत प्रकरणात 'ययाति', 'रथचक्र', 'स्वामी', 'स्मरणगाथा', 'सत्तांतर', 'झोंबी', 'झाडाझडती', 'राघववेळ', 'ताम्रपट', 'तणकट', 'डांगोरा एका नगरीचा', 'बारोमास', 'भूमी', 'उत्सुकतेने मी झोपलो', 'खारीच्या वाटा', 'फेसाटी' ह्या कादंबऱ्यांचे आशयविश्व थोडक्यात जाणून घेतले आहे.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये विविध प्रकारच्या कादंबरी वाङ्मयप्रकारांचा समावेश झालेला आहे. पौराणिक कादंबरी, ऐतिहासिक कादंबरी, ग्रामीण कादंबरी, दलित कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी, प्रयोगशील कादंबरी, बालकादंबरी, आत्मकथनात्मक कादंबरी इत्यादी प्रकारच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे. 'ययाति' या कादंबरीमधून पौराणिकतेचा संदर्भ घेऊन महाभारतातल्या एका उपआख्यानावर सदर पौराणिक कादंबरी लिहिली गेलेली आहे. 'रथचक्र' ही कादंबरी कोकणातील प्रादेशिकतेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून साकार केलेली आहे. 'स्वामी' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनावरील

ऐतिहासिक-चरित्रात्मक कादंबरी आहे. 'स्मरणगाथा' ही गो.नी. दांडेकरांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. 'सत्तांतर' ही वानर जीवनाचे, सत्ता संघर्षाचे चित्रण करणारी प्राणीजीवनावरील महत्त्वाची कादंबरी आहे. 'झोंबी' ही आत्मचरित्रात्मक कादंबरी ग्रामीण साहित्यातील एक मैलाचा दगड ठरलेली आहे. झोंबीतील पितापुत्रांचे नाते प्रल्हाद हिरण्यकश्यपूप्रमाणे पण स्मरणगाथेमधील पितापुत्राचे बालपणीचे नाते स्नेहाचे असलेले दिसते. रतनूचा आनंदच्या शिक्षणाला विरोध होता तर गोपाळचे वडील स्वतः शिक्षक असल्यामुळे गोपाळने शिकावे म्हणून ते प्रयत्न करीत होते. 'स्मरणगाथा' व 'झोंबी'मध्ये आठ-आठ दहा-दहा पोरे असलेली दिसून येतात. गोपाळची आई व आनंदची आई दोघींमध्ये साम्य असलेले दिसून येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा उल्लेख 'झोंबी', 'स्मरणगाथा', 'ताम्रपट' या कादंबऱ्यांमध्ये आलेला दिसून येतो. 'ताम्रपट' व 'स्मरणगाथे'मध्ये स्वातंत्र्य संग्रामातील पुढाऱ्यांची मनोवृत्ती या सैनिकांच्या मुडद्यांच्या पायठाण्या करीत वर चढून गळ्यात जयमाला घालून मिरवताना दिसतात. त्याचप्रमाणे 'ताम्रपट'मधील पुढारी स्वातंत्र्य मिळाल्यानंतर निवडणूक लढविताना एकमेकांवर कुरघोडी करताना दिसतात. 'झाडाझडती' ही कादंबरी धरणग्रस्तांच्या जीवनाची होणारी दुर्दशा, परवड व्यक्त करते. ग्रामीण भागाच्या पार्श्वभूमीवर ही कादंबरी उत्कृष्ट रीतीने साकार झालेली आहे. संपूर्ण कादंबरी ही धरणग्रस्तांच्या दुःखालाच वाचा फोडणारी आहे. 'झाडाझडती' कादंबरीतील खैरमोडे गुरूजी स्वतः धरणग्रस्त होते. त्यांनी धरणग्रस्तांचे प्रश्न सरकार दरबारी अविरतपणे मांडले.

'ययाति' या कादंबरीमध्ये लेखकाने ययातिच्या भोगलंपट वृत्तीचे पर्यवसन विफलतेत कसे होते हे वाचकांच्या निदर्शनास आणले आहे. जीवन हे भोगासाठी नाही तर त्यागातूनही जीवन सार्थकी लागते हेच कादंबरीचे मध्यवर्ती सूत्र आहे. ययाति व देवयानी यांच्या व्यक्तिमत्त्वावर कच, शर्मिष्ठा व पूरु यांसारख्या आदर्श व्यक्तिमत्त्वांचा प्रभाव पडतो व त्यातून अखेरीस ययाति व देवयानी यांचे सर्वांगाने उद्बोधन होते हेच लेखकाने सिद्ध केले आहे.

'रथचक्र' कादंबरी ही मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातील एका अनामिक स्त्रीच्या भावविश्वाशी गुंफली आहे. 'ती'च्या जन्मापासून ते तिने तिचे स्वत:चे जीवन संपविण्याच्या केलेल्या निष्फळ प्रयत्नापर्यंतचा जीवनालेख कादंबरीतून प्रतित होतो. पत्नी म्हणून जो दर्जा मिळणे अपेक्षित असते तो तर तिला लाभला नाहीच. एकत्र कुटुंबातही तिची अवहेलना झाली.

हुशार असणाऱ्या धाकट्या मुलाने खूप शिकावे. या तिच्या स्वप्नासाठी साऱ्या कुटुंबाच्या विरोधाला सामोरे जाणारी 'ती' मात्र त्याच धाकट्या मुलाच्या प्रेमाला पारखी होते. बालवयातच आईच्या प्रेमाला पारखं झालेल्या 'ती' ला लग्नानंतरही कुणाचेच प्रेम लाभत नाही. तिचे दुर्दैव तिचा सतत पाठलाग करते. मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबातल्या एका स्त्रीची शोकांतिका या कादंबरीतून प्रतीत होते.

'स्वामी' ही रणजित देसाई लिखित ऐतिहासिक कादंबरी माधवराव पेशव्यांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी आहे. लहान वयात पेशवाईची सूत्रे हाती घेतलेल्या माधवरावांना सतत परकीय आक्रमकांना तोंड द्यावे लागते. परकियांशी लढताना त्यांना कौटुंबिक कलहाला सामोरे जावे लागते, याची सल त्यांच्या मनात खोलवर जखम करुन जाते. शारीरिक आजाराने माधवराव खचले. या कादंबरीच्या कथानकात मनाला सुखावह ठरणारे रमा माधव यांचे एकमेकांविषयी असलेले उत्कट प्रेम व्यक्त होते. त्यातूनच रमाबाईंचे सती जाणे मात्र मनाला वेदना देऊन जाते. सती जाणे हा प्रसंग हृदय पिळवटून टाकणारा आहे.

'स्मरणगाथा' ही कादंबरी म्हणजे गो.नी. दांडेकर यांचे त्यांच्या बालपणापासून ते वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंतच्या जीवनानुभवांची स्मरणसाखळी आहे. पहिली तेरा वर्षे कुटुंबासमवेत घालवल्यानंतर स्वातंत्र्य मिळविण्याच्या ध्येयाने प्रेरित होऊन घरादाराचा त्याग केल्यानंतर त्यातील निष्फळता जाणवल्यानंतर सुरु झालेली भटकंती त्यामध्ये आलेले अनुभव कालानुक्रमे लेखकाने वाचकांसमोर मांडले आहेत. प्राथमिक गरज म्हणजे अन्न, ते मिळविण्यासाठी धडपड म्हणजेच दानापेक्षा काम श्रेष्ठ मानून उदरनिर्वाहासाठी केलेला आटापिटा वर्णिला आहे. नाटकात काम मिळविण्यासाठी केलेला निष्फळ प्रयत्न तसेच गाडगेबाबांचे प्रामाणिक शिष्य होण्यासाठी, गाडगेबाबांच्या कार्याला हातभार लावण्यासाठी प्रामाणिकपणे केलेला प्रयत्न आहे. शेवटी ते राष्ट्रीय स्यंसेवक संघाचे सच्चे कार्यकर्ते बनले. त्यानंतर वारकरी संप्रदायाचे पाईक होण्यासाठी केलेला अट्टहास पुर्ण झाला. लेखकाने केलेली 'नर्मदा परिक्रमा' कादंबरीला परिपूर्णता देते.

'सत्तांतर' ही व्यंकटेश माडगूळकर लिखित वानरांच्या टोळ्यांमध्ये सत्तेसाठी होणाऱ्या सत्तासंघर्षावर आधारित कादंबरी आहे. मनुष्य जातीमध्ये असलेल्या नेत्याप्रमाणे ताकदीच्या जोरावर इतर दुर्बलांवर वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीचे त्याचबरोबर टोळीला सुरक्षित ठेवण्याच्या

आपल्या कर्तव्याचे नेत्याला भान असते. त्याचप्रमाणे वानरांचे वर्तनही नेत्यांचे असते. विविध मानवी भावभावनांचे प्रकटीकरण लेखकाने वानरांच्या कृतीतून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. सत्तासंघर्षाला केंद्रवर्ती मानून लेखकाने ह्या कादंबरीचे लेखन केले आहे.

'झोंबी' ही आनंद यादव यांची आत्मचरित्रात्मक कादंबरी आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबातील मुलाची जीवनाशी चाललेली झोंबी कादंबरीतून वेळोवेळी व्यक्त होते. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत लेखकाने आपल्या दहावीपर्यंतच्या शिक्षणाचा टप्पा कसा पार केला तसेच त्यासाठी त्याला करावा लागणारा जीवनसंघर्ष कादंबरीतून मांडला आहे.

'झाडाझडती' या कादंबरीत लेखक विश्वास पाटील यांनी धरणग्रस्तांची होणारी झाडाझडती कथीत केली आहे. विकासाच्या नव्या वाटा चोखाळताना, दुर्बलांचा कसा बळी दिला जातो हे या कादंबरीचे मुख्य सूत्र आहे. आनंदाने जीवन जगत असलेल्या समूहाला धरणामुळे बेघर व्हावे लागते. त्यांच्या दु:खाची, वेदनेची कदर ना सत्ताधाऱ्यांना असते ना ज्यांच्यासाठी त्यांना धरणग्रस्त व्हावे त्या लाभार्थींना! भूमिपुत्रांच्या जीवनाची व्यथा लेखकाने 'झाडाझडती' या शीर्षकाखाली व्यक्त केली आहे.

'ताम्रपट' ही रंगनाथ पठारे लिखित कादंबरी इ.स.१९४२ ते इ.स.१९७९ अशा दीर्घ कालखंडातील राजकीय स्थित्यंतराचा वेध घेणारी आहे. या कादंबरीचे वैशिष्ट्य म्हणजे या कादंबरीचे दादासाहेब भोईटे पाटील, नाना सिरुर आणि बापूसाहेब देशमुख असे तीन नायक आहेत. राजकारणातून समाजकारण, समाजासाठी निर्मोही वृत्तीने जगणे व राजकारणातून स्वत:चा स्वार्थ साधणे असे तीन मतप्रवाह व्यक्त होतात.

'तणकट' ही राजन गवस यांची ग्रामीण कादंबरी आहे. कादंबरी नायक कबीर कांबळे हा महार समाजातील सुशिक्षित तरुणांचे प्रतिनिधित्व करतो म्हणून तिला दलित ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. अशिक्षित, अडाणी, दलित समाज बाळासाहेब शेडबाळेसारख्या सवर्णाकडून फसविला जातो. कबीर कांबळे शेडबाळेसारख्या बांडगुळावर विश्वास ठेवू नका, असे वेळोवेळी पटवितो. परंतु स्वकीयच त्याच्यावर बहिष्कार टाकताना दिसतात. दलितांबद्दल कळवळा दाखवून राजकारणी लोक स्वत:ची तुंबडी भरताना दिसतात. राजकारण व सत्ताकारण यांवर भाष्य करणारी व व्यापक पट असणारी कादंबरी आहे.

'डांगोरा एका नगरीचा' या कादंबरीत त्र्यं.वि. सरदेशमुखांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील समाजवास्तव तसेच संस्थानांमधील घडलेल्या राजकारणाचे चित्रण केले आहे. साईखेड या संस्थानाने भोगलेल्या-अनुभवलेल्या दुःखाच्या कहानीचा वृत्तांत येथे रेखाटलेला आहे. इ.स.१९२२ ते इ.स.१९२९ या कालखंडातील साईखेड संस्थानात घडलेल्या घडामोडी लेखकाने मांडलेल्या आहेत. संस्थानातील दुषित वातावरण, प्रत्येक राजकीय गोष्टीत इंग्रजांचा हस्तक्षेप, भोळ्याभाबड्या जनतेचे अडाणीपण, इंग्रजांचे डावपेच, स्वार्थी, भ्रष्टाचारी, सत्तांध अधिकारी वर्ग, संस्थानामधील घाणेरड्या राजकारणात भरडली जाणारी सर्वसामान्य जनता, गोरगरिबांवर होणारा अन्याय, प्रामाणिक माणसांना होणारा त्रास, न्याय देवता व पोलिस यंत्रणा यांचा उलटा कारभार, राणी दमयंतीला नजरबंद करुन स्वार्थ साधणारा अधिकारी वर्ग अशा प्रकारच्या घटनाप्रसंगांचे विराट, सविस्तर व भीतीदायक विदारक चित्रण प्रस्तुत कादंबरीमध्ये लेखकाने चित्रित केलेले आहे.

'बारोमास' या सदानंद देशमुखांच्या कादंबरीतील शेतकरी कुटुंबातील एका सुशिक्षित बेरोजगार एकनाथची व्यथा लेखकाने मांडली आहे. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्याची बारोमास म्हणजे बाराही महिने होणारी जीवनाची हालअपेष्टा, त्रेधातिरपीट मांडली आहे. एकनाथ व त्याचा भाऊ हे दोघेही उच्च शिक्षण घेऊन भ्रष्टाचारी समाजव्यवस्थेमुळे नोकरीपासून अलिप्त राहतात. शेतात कधी पीक पिकलं तर टिकत नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीत कसे जीवन जगतात याची शोकात्म कहाणी लेखकाने मांडली आहे.

'भूमी' ही आशा बगे यांची स्त्रीच्या बदलत्या रुपाचे, कष्टाचे, आधुनिक विचाराचे, प्रगल्भ स्त्रीचे, समाजवास्तवाचे चित्रण करणारी कादंबरी आहे. तसेच गृहीणी म्हणून काम करणारी स्त्री आणि आर्थिक दृष्ट्या काम करणारी स्त्री, यांच्यामधील तफावत कादंबरीमधून स्पष्ट होते. तसेच आधुनिक स्त्री आत्मनिर्भर होताना दिसते.

'उत्सुकतेने मी झोपलो' यामध्ये लेखकाने तीन भागांमधून कुटुंब व्यवस्थेचे स्थान निश्चित केले आहे. श्याम मनोहर हे प्रयोगशील कादंबरीकार असल्यामुळे त्यांनी प्रस्तुत कादंबरीत कथानकाच्या अंगाने तीन वेगळी कथानके पण ती सलगतेने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रस्तुत कादंबरीत कुटुंब निर्माण होणे, कुटुंब वेगळे होणे आणि आयुष्याच्या उत्तरार्धात एकाकी राहणे या घटकाचा वेध घेतलेला आहे. निर्मिती, विघटन आणि एकाकीपण या

अवस्थांमधून कुटुंबाचे दर्शन वेगळ्या पण उपहासगर्भतेकडून निर्मळ साध्या मनःपूर्वकतेकडे घेवून जाताना दिसतो.

'खारीच्या वाटा'मधीलही सर्व गाव हे धरणामुळे विस्थापित झालेले दिसून येते. लेखकाच्या बरोबर गुरेढोरे व गावातील माणसे टप्प्याटप्प्याने स्थलांतर करताना दिसतात. पण लेखकाने पाळलेली खार मात्र लेखकाबरोबर गाव सोडून येण्यास तयार नसते. गावातील लोक गाव सोडून जाताना गहिवरलेले दिसून येतात. एकूणच झाडाझडती, ताम्रपट, खारीच्या वाटा यामध्ये धरणग्रस्तांचे स्थलांतर झालेले दिसून येते.

'फेसाटी' ह्या कादंबरीमधून नाथाचे कुटुंब अस्मानी, सुलतानी संकटांना सामोरे जाताना दिसते. कितीही काबाडकष्ट केले तरी हाती, पदरी मात्र धोंडेच येतात. अशा कुटुंबातील मुले शिक्षण घेताना अनेक अडीअडचणींना सामोरे जावून आपले शिक्षण पुर्णत्वास नेतात. ते शिक्षण पूर्णत्वास जावे म्हणून घरच्यांची तीव्र इच्छा असते की आपल्या मुलाने शिकावे, ही बाब नाथाच्या आयुष्याला शिक्षणामुळे कलाटणी मिळेल व कुठेतरी चांगल्या पगाराची नोकरी मिळेल आणि कुटुंबाचे हालाकीचे दिवस बदलतील, असा आशावाद यातून स्पष्ट होतो.

'माहितीचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन' त्या अनुषंगाने (अ) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील पुरुषांची व्यक्तिचित्रणे, (ब) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमधील स्त्रियांची व्यक्तिचित्रणे, (क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये आलेले विविध संदर्भ, (ड) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन या संबंधीत घटकांचा विचार प्रस्तुत प्रकरणात केलेला आहे.

(ड) प्रस्तुत कादंबऱ्यांची निवेदनपद्धती व भाषाशैली, स्वगते, संवाद, भाष्ये, वर्णने, म्हणी, वाक्प्रचार, प्रतिमा-प्रतिके, रुपके, शब्दकळा, वर्णने, घटना-प्रसंग, सुभाषिते-सुविचार, शिव्या व शीर्षकांची समर्पकता, वातावरणनिर्मिती आदी घटकांच्या अनुषंगाने प्रस्तुत कादंबऱ्यांचे वाङ्मयीन मूल्यमापन केलेले आहे. प्रस्तुत घटकांचा सविस्तर, समग्र, सखोल आणि उदाहरणे देऊन विचार केलेला आहे. प्रस्तुत साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबरीच्या भाषेचा विचार करता ती कादंबऱ्यांच्या विषयाला न्याय देणारी अत्यंत सहज, साधी, सोपी आहे ह्याचा प्रत्यय प्रत्येक कादंबरीमधून येतो. त्यांची भाषा पात्रे ज्या परिसरात वावरतात, ती पात्रे आहेत, त्या त्या समूहाची भाषा त्या त्या पात्रांच्या मुखी आलेली दिसून येते. ऐतिहासिक, पौराणिक,

दलित, ग्रामीण, राजकीय, प्रादेशिक, प्रायोगिक इत्यादी स्वरूपाच्या कादंबऱ्या असल्याने त्या त्या काळानुरुप, व्यक्तिनुरुप भाषेचे उपयोजन केले आहे. 'सत्तांतर' च्या भाषेने रंग, ताल, नाद, लय, रेखाचित्रे ह्या कलेशी निगडित असणाऱ्या भाषेचा आश्रय घेतलेला दिसतो. 'ययाति' सारख्या पौराणिक कादंबरीमध्ये योजलेली भाषा ही तत्कालीन भाषिक संकेत जपताना दिसते.

(अ) एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांमध्ये सर्रासपणे पुरुष, स्त्रिया, मुले यांच्या संदर्भात आलेली निवेदने, स्वगते, संवाद, भाष्ये, वर्णने, म्हणी, वाक्प्रचार, शब्दकळा, प्रतिमा, प्रतिके, रूपके, घटना-प्रसंग, वातावरणनिर्मिती, सुभाषिते (सुविचार), शिव्या, शीर्षकांची समर्पकता, अश्लिलता ह्या बाबी सर्व पात्रांना उठाव देणाऱ्या आणि कादंबरीचा ओघ कायम ठेवण्यास साहाय्यभूत ठरणाऱ्या अशा आहेत. कादंबरीतील घटना-प्रसंगांची, पात्रांच्या मनाची उकल करण्याकरिता विविध निवेदन पद्धतीचा अवलंब करून सर्वसाक्षी भावाने पात्रांच्या बाह्यवर्तनाबरोबरच अंतर्मनाची उकलही केली आहे. पात्रांच्या स्वगतातून म्हणजेच एकांतात स्वतःच्या मनाशी केलेल्या आत्मसंवादातून पात्राची विचारसरणी, तिची भावनात्मकता, तिची संवेदनशिलता व्यक्त होत असतानाच त्या पात्रांचा परिसर, त्या परिसरातील बोली, त्या परिसरातील रुढी संकेत, तेथील परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा, तेथील व्यवसाय, त्यांच्या बोली ह्या सर्वांचा उलगडा ह्यातून होतो.

(क) साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या मध्ये कथानक-आशयाच्या अनुषंगाने विविध संदर्भ आलेले आहेत. ह्यामध्ये लेखकांनी केलेले कादंबरीचे प्रारंभ, कादंबरीची उत्कंठा वाढविण्याचे काम करतात. मानवी जीवनातील श्रद्धाभाव तसेच काही कादंबऱ्यांमध्ये आलेल्या अंधश्रद्धा आपणास ठळकपणाने जाणवतात. भारतदेशात अनेक जाती-पातींच्या व विविध धर्माच्या लोकांचे वास्तव्य असल्याने त्याचाही उल्लेख अनेक कादंबऱ्यांमध्ये केलेला आढळतो. विषय व आशयाला न्याय देणारे अनेक घटना-प्रसंग प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आहेत. आपल्यावर पौराणिकतेचा मोठा पगडा असल्यामुळे काही कादंबऱ्यांमध्ये पौराणिक संदर्भ येतात. भारतदेश हा कृषिप्रधान आहे. त्यामुळे कृषिजीवन व त्याला जोडून गावगाड्याची रचना, गावगाड्यातील सर्व घटक काही कादंबऱ्यांमधून आलेले दिसून येतात. प्रथा-परंपरा ह्या पिढ्यान्पिढ्या आलेल्या दिसतात. समाजजीवनातील त्यांचे वर्णन प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेले आहे. संघर्ष व बंडखोरी ह्या बाबी प्रत्येकामध्ये असतात. सत्तेसाठी संघर्ष अनेक कादंबऱ्यांमध्ये

दिसतो. उदा.ताम्रपट, सत्तांतर इत्यादी. काही पुरुष व स्त्री पात्रे बंडखोर प्रवृत्तीने वागताना दिसतात. पोटाची, ज्ञानाची व शरिराची भूक प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये कमी-जास्त प्रमाणात मांडलेली दिसून येते. उदा.राघववेळ, स्मरणगाथा. उच्चवर्णियांकडून दलित वर्गाचे शोषण झालेले आहे. प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये काही प्रसंगी अश्लिल वर्णन आलेले आहे. स्त्रियांची, दलितांची व्यथा-वेदना प्रस्तुत कादंबऱ्यांमधील काही लेखकांनी केलेला आहे.

प्रस्तुत कादंबऱ्यांच्या संवादातून पात्रांच्या स्वभाववृत्ती, परस्परांतील प्रेम व आपुलकी, परस्परातील द्वेष व हेवेदावे व्यक्त झाले आहेत. घटना प्रसंगांच्या साहाय्याने येणारे खटकेबाज संवाद पात्रांच्या भावभावनांचे विश्व उलगडून दाखविणारे आहेत. पात्रांच्या मनातील स्पंदने संवादातून साकार झालेली आहेत.  पात्रांची जीवनशैली, विचारशैली समजून घेण्याच्या उद्देशाने म्हणी, वाक्रप्रचार उपयोगी ठरलेले आहेत. संवादातून विशिष्ट प्रकारची शब्दकळा, सुभाषिते(सुविचार), म्हणी, वाक्प्रचार वेळप्रसंगी पात्रांच्या तोंडून आलेल्या शिव्या समाजातील प्रचलित समजुती, त्या समाजाची संस्कृती समजण्यास साहाय्यभूत ठरतात. पात्रांच्या वागण्याबोलण्यातून त्यांचा सामाजिक स्तर, वर्ग, व्यवसाय, धर्म ह्या गोष्टी सहजपणे कळतात. प्रसंगी पौराणिक कथांचे, ऐतिहासिक कथांचे आलेले संदर्भ, शहरी, ग्रामीण जीवनातील काळानुरुप होणारी स्थित्यंतरे, दलितांमध्ये जागृत झालेले आत्मभान, दलितांवर होणारा अन्याय, विस्थापितांचे प्रश्न, प्राणी व आदीम माणसाची प्रवृत्ती या सर्व पात्रांच्या संवादातून साकार झालेल्या दिसतात. एखाद्या जागेसाठी प्रसंग-घटनेसाठी वातावरणनिर्मिती, त्यातील सौंदर्य, लेखकाने आपल्या लेखनशैलीतून साकार केलेले आहेत. ते सौंदर्य खुलविण्यासाठी तो अनेक प्रतिमा, प्रतिके, म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते, शब्दांची रचना करतो. त्यातून लेखकाने एक प्रभावी परिणाम साधला आहे.

साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्याचे लेखक सिद्धहस्त लेखक असलेले आढळतात. त्यांची लेखणी विविध साहित्यप्रकारात संचार करताना आढळते. त्यामुळे त्यांच्या साहित्याचे कादंबरीच्या अभ्यासाबरोबरच साहित्याच्या अनुषंगाने वैचारिकता, पुरूषचित्रणांचा स्वतंत्र अभ्यास, समाजशास्त्रीय अभ्यास, भाषिक अभ्यास, पर्यावरणीय अभ्यास, अशा विविध अंगांनी अभ्यास करता येईल. काही कादंबऱ्यांवर दूरदर्शन मालिका प्रसारीत झालेल्या आहेत. काही कादंबऱ्यांचे आकाशवाणीवरून सादरीकरण झालेले आहे. ग्रामीण जीवनातील आणि शहरी

जीवनातील ह्या सर्वच कादंबऱ्यामधील प्रखर वास्तव विचारात घेता ह्या कादंबऱ्यांवर आधारीत आधुनिक वास्तवावर प्रकाश टाकणारे चित्रपट, नाट्यरूपांतरे, दूरदर्शन मालिका, आकाशवाणीवरून वाचन, इत्यादींची निर्मिती होऊ शकेल त्यामुळे एक वेगळे जीवनविश्व व प्राणीविश्व आपल्यासमोर येईल असे मनोमन वाटते. याबरोबरच ते एकूणच समाजजीवनाला मार्गदर्शन, दिशादर्शक आणि अंतर्मुख करणारे ठरेल, असा विश्वास वाटतो.

**निरीक्षणे :**

१. साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांचे साहित्यविषयक योगदान महत्त्वाचे आहे.

२. 'कादंबरी' या वाङ्मयप्रकारात साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांच्या लेखकांचे योगदान महत्त्वाचे आहे.

३. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या लेखकांच्या साहित्यविषयक कार्याचा यथोचित गौरव झालेला दिसून येतो.

४. तत्कालीन, सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थीतीचे चित्रण या कादंबऱ्यांमध्ये आलेले आहे.

५. 'ययाति' ह्या पौराणिक व 'स्वामी' ह्या ऐतिहासिक कादंबऱ्यांना प्रचंड लोकप्रियता लाभलेली आहे.

६. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या लेखकांनी कादंबऱ्यांच्या विषयानुरूप कथाबीज साधलेले दिसून येते.

७. 'झोंबी'ने आत्मचरित्रात्मक कादंबरीची उत्तम पायाभरणी केली आहे. त्यातून आनंद यादवांनी आपला दहावी पास होईपर्यंतचा जीवनपट रेखाटलेला आहे.

८. 'राघववेळ' व 'झोंबी' या दोन कादंबऱ्यांमध्ये काही प्रमाणात साम्यभेद दिसून येतो. 'राघववेळ' मध्येही दहावी पास होईपर्यंतचा जीवनपट लेखकाने रेखाटलेला आहे.

९. 'फेसाटी' मध्ये लेखकाने आत्मचरित्रात्मक कादंबरीची झोंबी सारखीच प्रचिती आणून दिली आहे.

१०. ‘सत्तांतर’ व ‘खारीच्या वाटा’ या दोन्ही कादंबऱ्या प्राणी जीवनाचे चित्रण करताना मानवी भावभावनांना स्पर्श करतात. एवढेच काय मानवी भावभावनांचे आरोपण होऊनच यातील विविध पात्रे (प्राणी) येतात, हे स्पष्ट होते.

११. प्रस्तुत कादंबऱ्यांमधून स्त्री-विषयक भावना चित्रीत झालेल्या आहेत.

१२. प्रस्तुत कादंबऱ्या मानवी जीवनात किती महत्त्वपूर्ण आहेत हेही लक्षात घेण्यासारखे आहे. पात्रचित्रणातून वास्तव समाजजीवनाचा अनुभव येतो.

१३. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या लेखकांनी अनेक अंगानी विचार करून समाजजीवनाचे भान ठेवून लेखन केलेले आहे.

१४. आत्मचरित्रात्मक कादंबरी लेखनाच्या उगमावरील ‘झोंबी’ ही एक महत्त्वाची व वाङ्मयीनदृष्ट्या सजग असणारी कादंबरी आहे. ग्रामीण जीवनाची व्यामिश्रता प्रस्तुत कादंबरीत आली आहे.

१५. दलित व ग्रामीण जीवनाची व्यामिश्रता चित्रीत करणाऱ्या ‘झोंबी’, ‘तणकट’, ‘राघववेळ’, ‘खारीच्या वाटा’, ‘फेसाटी’ या कादंबऱ्यांचे लेखन आहे.

१६. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या लेखनाच्या मूळस्थानी कुटुंबव्यवस्था, जातीव्यवस्था, राजकीयव्यवस्था, समाजव्यवस्था हे घटक आहेत.

१७. ग्रामीण व दलित जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांची कथानके वास्तववादी आहेत. ह्या कादंबऱ्या व्यक्तिनिष्ठ नसून समूहनिष्ठ आहेत.

१८. जीवनसंघर्ष हे प्रस्तुत कादंबरी लेखनातील मध्यवर्ती आशयसूत्र आहे.

१९. आर्थिक परिस्थितीने गरीब आणि गरजू व्यक्तींचा आपल्या स्वार्थासाठी फायदा घेणाऱ्या व्यक्तींचे चित्रण काही कादंबऱ्यांमधून आले आहे. उदा. ‘राघववेळ’, ‘तणकट’, ‘ताम्रपट’, ‘फेसाटी’, ‘स्मरणगाथा’, ‘झाडाझडती’, ‘डांगोरा एका नगरीचा’ इत्यादी.

२०. प्रस्तुत कादंबऱ्यांमधून घटना-प्रसंग, स्थळ-काळाचे वर्णन येताना कथानकाच्या गतीशिलतेची प्रचिती येते.

२१. काही कादंबऱ्यांमधून मराठीबरोबरच हिंदी, इंग्रजी शब्द व संवाद येतात.

२२. प्रस्तुत कादंबऱ्यांमधील काही पात्रे आपला राग-द्वेष, प्रतिकार व्यक्त करताना शिव्या, म्हणी, वाक्प्रचार व अश्लील शब्दांचा वापर करताना दिसतात.

२३. समाजातील विकृत प्रवृत्ती असणाऱ्या व्यक्तींकडून होणारे अनैतिक वर्तन आलेले दिसते. उदा. 'तणकट', 'ताम्रपट', 'फेसाटी', 'झाडाझडती' इत्यादी.

२४. प्रस्तुत कादंबऱ्यांमधून स्त्रीविषयक चित्रण येताना स्त्री ही सोशिक, अत्याचार, जुलूम सहन करणारी असली तरी वेळप्रसंगी आपल्यावरील अन्याय, अत्याचारांचा सूड घेणारी आहे.

२५. काही कादंबऱ्यांमधून अंधश्रद्धेस खतपाणी घालणारे घटन–प्रसंग येताना दिसतात.

२६. प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये समाजातील माणूसकी जपणाऱ्या सज्जन व्यक्तींबरोबर खलनायकी प्रवृत्तींच्या व्यक्तिरेखाही आहेत.

२७. त्या कादंबऱ्यातील निवेदनही वास्तववावर प्रकाशझोत टाकणारे आहे.

२८. प्रस्तुत कादंबऱ्यातील व्यक्तिरेखांच्या आधारे समूहजीवनाचे चित्रण करताना हृदयस्पर्शी वर्णने रेखाटली आहेत.

२९. प्रस्तुत कादंबरी लेखनावर जागतिकीकरणाचे पडसाद उमटलेले दिसतात.

३०. सुविचार व सुवचने यांच्या माध्यमातून प्रस्तुत कादंबऱ्यांनी समाजप्रबोधनपर कार्य केलेले आहे.

३१. 'ताम्रपट' 'डांगोरा एका नगरीचा', आणि 'स्मरणगाथा' या कादंबऱ्यांमधून ब्रिटिशकालीन घटनांचा व स्वातंत्र्यासाठी झगडणाऱ्या व्यक्तींचा देशाभिमान व त्याग दिसून येतो.

३२. एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांनी अखिल भारतीय मराठी कादंबऱ्यांची आशय कक्षा निश्चितच विस्तारित केल्या आहेत.

३३. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या आशयानुरुप शीर्षक समर्पकतेची प्रचिती येताना दिसते.

३४. समाजातील ज्वलंत प्रश्नांना अनुसरुण, विशिष्ट समाजगटातील वेदनेला वाचा फोडलेली आहे. उदा. 'झाडाझडती'मधील धरणग्रस्त, तसेच 'बारोमास'मधील सुशिक्षित बेकार.

३५. प्रस्तुत कादंबऱ्यांमधील शब्दकळा, वाक्प्रचार, म्हणी व शिव्या आदींच्या वापरामुळे या कादंबऱ्यांच्या वास्तवाभिमुखतेत भर पडली आहे.

३६. प्रस्तुत कादंबऱ्या गावगाडा व कृषी संस्कृतीशी नाळ जोडणाऱ्या आहेत.

३७. प्रस्तुत कादंबऱ्यातील भाषाशैलीचे वैशिष्ट्य म्हणजे आशय विषयाच्या वेगळेपणानुसार भाषेचा वापर केला आहे.

३८. प्रस्तुत कादंबऱ्यातील भाषेवर प्रादेशिकतेचा व समाजस्तरांचा प्रभाव पडलेला आहे.

३९. प्रस्तुत कादंबऱ्यांमधील देवदेवतांबरोबरच आदर्श असणाऱ्या व्यक्तींना श्रद्धास्थानी ठेवलेले आहे.

४०. प्रस्तुत कादंबऱ्यांच्या लेखनात निवेदनात्मक, संवादात्मक लेखनीशैलीचा अवलंब केल्यामुळे व लेखनासाठी वापरलेल्या वेगवेगळ्या बोलीभाषांमुळे कादंबऱ्यांचे भाषिक सौंदर्य वृद्धिंगत झालेले आहे.

४१. काही कादंबऱ्यातून अंधश्रद्धा निर्मूलनास बळ देण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

४२. प्रस्तुत काही कादंबऱ्यांमधून विविध जाती-धर्मातील लोकांकडून जातीय व धार्मिक संघर्ष निर्माण होतो तर काही कादंबऱ्यांमधून सर्वधर्म समभाव हे मूल्य जोपासलेले आहे.

४३. प्रस्तुत कादंबऱ्यांमध्ये आलेल्या प्रतिमा, प्रतिके यामुळे कादंबरीतील आशय समृद्ध झाला आहे.

४४. प्रस्तुत कादंबऱ्यांमधील स्वगते व भाष्ये वाचकाला अंतर्मुख करतात.

४५. एकूणच साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांचा विचार करता मानवी जीवनातील समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, तत्त्वज्ञान, पारंपरिक पुरुषी मानसिकता, माणसांचे हेवेदावे, माणसांना दारिद्र्यामुळे करावा लागणारा संघर्ष, नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्ती, स्त्रियांचे विविध प्रश्न, माणसांच्या भावभाावना, वृत्ती-प्रवृत्ती या आणि यासारख्या विविध प्रश्नांना स्पर्श करीत मानवी जीवनातील गुंतागुंत टिपण्याचा प्रयत्न करुन मराठी कादंबरी विश्व समृद्ध केले आहे.

*****

**१.आधारभूत साधनग्रंथ सूची**

## साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त कादंबऱ्यांची सूची

| अ.क्र. | पुरस्काराचे वर्ष | कादंबरी | लेखक | प्रकाशन स्थळ | प्रकाशन वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९६० | ययाति | वि.स.खांडेकर | देशमुख आणि कंपनी, पुणे | १९५९ |
| २ | १९६३ | रथचक्र | श्री. ना. पेंडसे | मौज प्रकाशन, मुंबई | १९६२ |
| ३ | १९६४ | स्वामी | रणजित देसाई | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९६२ |
| ४ | १९७६ | स्मरणगाथा | गो. नि. दांडेकर | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९७३ |
| ५ | १९८३ | सत्तांतर | व्यंकटेश माडगूळकर | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९८२ |
| ६ | १९९० | झोंबी | आनंद यादव | मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे | १९८७ |
| ७ | १९९२ | झाडाझडती | विश्वास पाटील | राजहंस प्रकाशन, पुणे | १९९१ |
| ८ | १९९५ | राघववेळ | नामदेव कांबळे | देशमुख आणि कपंनी, पुणे आवृत्ती चौथी | २००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | १९९९ | ताम्रपट | रंगनाथ पाठारे | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | १९९४ |
| १० | २००१ | तणकट | राजन गवस | साकेत प्रकाशन, औरंगाबाद | १९९८ |
| ११ | २००३ | डांगोरा एका नगरीचा | त्र्यं.वि.सरदेशमुख | मौज प्रकाशन, मुंबई | १९९८ |
| १२ | २००४ | बारोमास | सदानंद देशमुख | कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे | २००२ |
| १३ | २००६ | भूमी | आशा बगे | मौज प्रकाशन, मुंबई | २००४ |
| १४ | २००५ | उत्सुकतेने मी झोपलो | श्याम मनोहर | पॉप्युलर प्रकाशन, मुंबई | २००६ |
| १५ | २०१७ | खारीच्या वाटा | ल.म.कडू | ग.म.भ.न. प्रकाशन, पुणे | २०१७ |
| १६ | २०१८ | फेसाटी | नवनाथ गोरे | अक्षर वाङ्मय प्रकाशन, पुणे | २०१८ |

**२. संदर्भग्रंथ सूची :**

१. कुरुंदकर नरहर, *'धार आणि काठ'*, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथमावृत्ती १९७२.

२. कुलकर्णी श्री.मा., *'कादंबरी समीक्षा'*, उन्मेष प्रकाशन, नागपूर, पहिली आवृत्ती, मार्च १९७२.

३. कांबळे नामदेव, *'राघववेळ'*, (प्रस्तावना), देशमुख आणि कपंनी, २०००, पुणे.

४. कांबळे (डॉ.) शशिकला, *'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्य आणि श्याम मनोहर'*, स्नेहवर्धन प्रकाशन, प्रथम आवृत्ती पुणे, २०११.

५. खांडेकर वि.स., *'ययाति'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ३७ वी आवृत्ती, एप्रिल २००५.

६. गणोरकर प्रभा (संपा.), *'वाङ्मयीन संज्ञा-संकल्पना कोश'*, जी.आर. भटकळ फाउंडेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, २००१.

७. गोरे दादा, *'गो.नी. दांडेकरांची कादंबरी'*, (मनोगत), गोदा प्रकाशन, औरंगाबाद, दु.आ., २४ नोव्हे.२०१०.

८. घोलप दत्ता, *'मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार'*, अक्षरवाङ्मय प्रकाशन, पुणे, प्र.आ., जुलै २०१८.

९. चव्हाण रामनाथ, *'भटक्या विमुक्तांची जात पंचायत'*, देशमुख आणि कंपनी, पुणे, प्र.आ., ५ मार्च २००२.

१०. चौघुले उषा वि., *'साहित्याची आस्वादरूपे'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १५ ऑगस्ट २०११.

११. जाधव मनोहर, (संपा), *'समीक्षेतील नव्या संकल्पना'* अरुणा दुभाषी, 'भारतीय स्त्रीवाद' स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., मार्च, २००१.

१२. जाधव रा.ग., *'वाङ्मयीन निबंध लेखन'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, तृ.आ., १९८७.

१३. जाधव सरिता, पाटील सुनंदा, *'समाजव्यवस्था आणि कुटुंब, विवाह व नाती,'* यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ, नाशिक, प्र.आ., जून २००२.

१४. ठाकूर (डॉ.) रवींद्र, *'मराठी ग्रामीण कादंबरी (१८८०-२०००)'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, १ सप्टेंबर २००१.

१५. तारळेकर मीरा, *'भारतीय साहित्याचे निर्माते व्यंकटेश माडगूळकर'*, साहित्य अकादमी प्रकाशन, नवी दिल्ली, प्र.आ., २०१०.

१६. थोरात हरिश्चंद्र, *‘कादंबरी : एक साहित्य प्रकार’*, शब्द पब्लिकेशन्स, प्र.आ., मुंबई, ऑगस्ट २०१०.

१७. पठारे रंगनाथ, *‘आजची कादंबरी : नोंदी आणि निरीक्षणे’*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २०१४.

१८. पाटील (डॉ.) तानाजी राऊ, *‘मराठी कादंबरी समीक्षा’*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, प्रथमावृत्ती, ५ फेब्रु. २००९.

१९. पाटील विजय, (संपा.), *‘बारोमासः एक अन्वयार्थ,’* कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजय नगर, पुणे-३०, प्रथमावृत्ती, २०११.

२०. पारगावकर वि.शं., *‘एका नवीन टप्प्यावर घडणारी कलाकृती’*, माणूस, १९९४.

२१. पेंडसे श्री.ना., *‘रथचक्र’*, प्रस्तावना, मौज प्रकाशन, मुंबई, दु.आ., १९६२.

२२. बापट प्र.वा./गोडबोले ना.वा., *‘मराठी कादंबरी’ (तंत्र आणि विकास)’*, व्हीनस प्रकाशन, पुणे. तृतीय आवृत्ती, सप्टेंबर १९७३.

२३. *‘बालसाहित्य’*, पुस्तक तिसरे, बालसाहित्यः कविता, नाटक व चरित्र, य.च.म.मु. विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन, जून २००२.

२४. बांदिवडेकर चंद्रकांत, *‘देशीवाण’*, अक्षर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, मार्च २००२.

२५. बांदिवडेकर (डॉ.) चंद्रकांत, *‘मराठी कादंबरीचा इतिहास’*, मेहता पब्लीशिंग हाऊस, पुणे, द्वि.आ., १९९६.

२६. भागवत दुर्गा, *‘लोकसाहित्याची रूपरेखा’*, वरदा बुक, पुणे, द्वि. आ. १९७७.

२७. भागवत श्री.पु., रसाळ सुधीर व इतर(संपा.), *‘साहित्य : अध्यापन आणि प्रकार’*, मौज प्रकाशन, मुंबई, द्वि.आ., ऑक्टो.२०११.

२८. भिडे वि.वा., *‘मराठी भाषेचे वाक्प्रचार व म्हणी’*, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, प्र.आ., ऑगस्ट १९७१.

२९. भोसले (डॉ.) द.ता., *‘साहित्यःआस्वाद आणि अनुभव’*, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, प्र.आ., ३ मार्च २०१२.

३०. भोसले (डॉ.) पांडुरंग, *‘नामदेव ढसाळ आणि हाडकी हाडवळा’*, पांडुरंग प्रकाशन, पंढरपूर, २००३.

३१. भोसले डॉ.पांडुरंग(संपा.), *‘मराठी ग्रामीण साहित्य’*, शब्दवैभव प्रकाशन, पुणे, २०१७.

३२. मनोहर यशवंत, *'नवे साहित्यशास्त्र'*, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, द्वि.आ., १५ जुलै २००९.
३३. *'मराठी वाङ्मय कोश खंड चौथा समीक्षा-संज्ञा'*, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती २००२.
३४. माडगूळकर व्यंकटेश, *'सत्तांतर'* (प्रस्तावना), मौज प्रकाशन, मुंबई, १९८२.
३५. मालशे स.गं.(अनुवाद), *'साहित्य- सिद्धांत'*, म.रा. साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, दु.आ., २००२.
३६. माळी (डॉ.) जी.पी., *'रणजित देसाई, जीवन आणि साहित्य'*, शब्दवेल प्रकाशन, कोल्हापूर प्रथमावृत्ती, ८ एप्रिल २००१.
३७. मेश्राम नंदा, *'दलित कादंबरी : स्वरूप व समिक्षा'*, डिंपल पब्लिकेशन, मुंबई, प्रथम आवृत्ती, १६ डिसेंबर २००६.
३८. मोकाशी (डॉ.) मधुकर, *'ग्रामीण दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.
३९. यादव आनंद, *'झोंबी'* (प्रस्तावना), मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८७.
४०. येळवंडे लक्ष्मीकांत, *'सदानंद देशमुखांच्या कादंबऱ्या : एक आकलन'*, स्मितांजली प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, आक्टोंबर २००७.
४१. लांडगे, शिरीषकुमार, *'चरित्रात्मक कादंबरी : स्वरूप व संकल्पना'*, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १ जुलै २०१८.
४२. लिंबाळे शरणकुमार, *'वादंग'*, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २० मे २०१०.
४३. लिंबाळे शरणकुमार, *'साहित्याचे निकष बदलावे लागतील'*, दिलीपराज प्रकाशन, पुणे, द्वितीया आवृत्ती, २००७.
४४. वडिखाये रेखा, *'महायुध्दोत्तर मराठी कादंबरी'*, लाखे प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती ३ जुलै २०१२.
४५. वैद्य सरोजिनी, 'बांदिवडेकर चंद्रकांत व इतर (संपा.), *'वाङ्मयीन महता'*, लोकवाङ्मय गृह, प्र.आ., मुंबई, जाने. १९९१.
४६. शेळके (डॉ.) भास्कर, *'ग्रंथवेध'*, प्रथम आवृती, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, २०१२.
४७. शेळके (डॉ.) भास्कर : *'मराठी प्रादेशीक कादंबरी : स्वरूप आणि विश्लेषण'*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २५ एप्रिल २०१२.

४८. सलालकर राजेंद्र, *'रंगनाथ पठारे यांच्या साहित्यातील स्त्रीदर्शन'*, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती, २०१५.

४९. सानप (डॉ.) किशोर, *'प्रायोगिक कादंबरी आणि श्याम मनोहर'*, बजाज पब्लिकेशन्स्, अमरावती, प्र.आ., १९९८.

५०. साने गीता, *'भारतीय स्त्रीजीवन'*, मौज प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती, २०१०.

५१. सारडा शंकर, *'काही पुस्तके, काही लेखक'*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९६५.

५२. सारडा शंकर, *'ग्रंथसंवत्सर'*, पुष्प प्रकाशन, पुणे-७, प्रथमावृत्ती, १९९३.

५३. सावदेकर आशा, *'कादंबरीचा आशयवेध'*, विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, १४ ऑगस्ट २०१३.

५४. हस्तक उषा, *'कादंबरी आणि मराठी कादंबरी'*, (समीक्षा लेख), साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ., नोव्हें. १९९३.

५५. हातकणंगलेकर म.द., *'साहित्यविवेक'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९९७.

५६. क्षीरसागर श्री.के., *'टीका विवेक'*, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सप्टेंबर १९८५.

**३. नियतकालिक सूची**

१. *अक्षरपेरणी*, (कादंबरी निर्मिती प्रक्रिया-विशेषांक २०१६.

२. *अनुष्टुभ*, जुलै-ऑगस्ट १९९५.

३. *अंतर्नाद*, जुलै, २००६.

४. *अंतर्नाद*, एप्रिल २००५.

५. *चित्रलेखा*, जाने.२००५.

६. *महाराष्ट्र टाईम्स्*, (दिवाळी अंक), २०१८.

७. *माणूस*, जानेवारी १९९४.

८. *युगवाणी*, एप्रिल-मे-जून २००७.

९. *ललित*, (दिवाळी अंक), १९८५.

१०. *विशाखा*, (दिवाळी अंक), जुलै-१९९२.

११. *सक्षम समीक्षा*, एप्रिल-मे-जून, २०१६.

१२. *सक्षम समीक्षा,* ऑक्टो-नोव्हें.-डिसें.२०१२.

१३. *साहित्यसूची,* आक्टो. १९८६.

**४. वर्तमानपत्र सूची**

१. *दै.पुढारी,* गुरुवार, २६/१०/१७.

२. *दै.लोकमत,* शनिवार दि. २३/०६/२०१८.

३. *दै.लोकमत,* शब्दधन, दि. २३ जून २०१८.

४. *दै.लोकसत्ता,* दि. २४/६/२०१८.

५. *दै.सकाळ,* शनिवार, दि.२३ जून २०१८.


६. *दै.विशाल,* सह्याद्री, पुणे, ८ मे १९७७.

७. http://www.esakal.com


*****

## परिशिष्ट


## साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी कादंबऱ्यांची मुखपष्ठे

१) 



ययाति – वि.स.खांडेकर

२) 


रथचक्र – श्री.ना.पेंडसे


३) 


स्वामी – रणजित देसाई

४) 



स्मरणगाथा–गो.नी.दाण्डेकर

५)





सत्तांतर – व्यंकटेश माडगूळकर

६)





झोंबी – आनंद यादव

७)





झाडाझडती – विश्वास पाटील

८)





राघववेळ – नामदेव चं. कांबळे

९)




ताम्रपट – रंगनाथ पठारे

१०)





तणकट – राजन गवस

११)



डांगोरा एका नगरीचा – त्र्यं.वि. सरदेशमुख


१२)





बारोमास – सदानंद देशमुख

१३) 



भूमी – आशा बगे

१४) 


उत्सुकतेने मी झोपलो–श्याम मनोहर

१५) 


खारीच्या वाटा – ल.म. कडू

१६) 


फेसाटी – नवनाथ गोरे